तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र

खंड ३

नीतितत्त्वज्ञान राजकीय आणि सामाजिक



संपादक
वसु भारद्वाज




महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र

नीतितत्त्वज्ञान
राजकीय आणि सामाजिक

खंड तिसरा

१. राजधर्म
२. इंग्लंडातील राज्यकारभार व्यवस्थेच्या इतिहासाची मूलतत्त्वे
३. नीतिशास्त्रविचार

संपादक
वसु भारद्वाज

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

➢ **पुस्तकाचे नाव :** तत्त्वज्ञान आणि नीती खंड २

➢ **संपादक :** डॉ. वसु भारद्वाज

➢ **आयएसबीएन :** ९७८-९३-९३५९९-१६-२

➢ **प्रथमावृत्ती :** २०२२

➢ **प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

➢ **© प्रकाशकाधीन**

➢ **मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
फोटोझिंको मुद्रणालय आवार,
जी.पी.ओ. नजीक, पुणे - ४११००१.

➢ **किंमत : रुपये २९१/–**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने स्थापनेपासूनच ग्रंथवैविध्यांचा विचार करीत मराठी भाषकांना भाषेच्या चिंतनगंगोत्रीचा परिचय करून देण्याचे कार्य हाती घेतले आहे. त्यातूनच आजपर्यंत विविध ग्रंथ अभ्यासकांसमोर आणून भाषेला आणि मराठी संस्कृतीला समृद्ध करण्याचा अविरत प्रयत्न केला आहे. मराठी भाषेचा इतिहास तसा प्राचीन आहे. केवळ रंजनात्मक नव्हे तर सांस्कृतिक वैभवाची परंपरा सांभाळण्याचे उत्तरदायित्वही मराठी भाषेने निभावले आहे. संत साहित्य आणि इतिहासाने या वैभवाचा कळस उभारल्याचे आपल्या लक्षात येते. विश्वात्मक देवाशी संवाद करणाऱ्या संतमांदियाळीने मराठी भाषेतच तत्त्वज्ञानाचा ध्वज फडकावून भाषेला नवे कोंदण दिले आहे.

मराठी ग्रंथ प्रकाशनाच्या कालखंडामध्ये १८६४ ते १९४७ हा कालखंड अत्यंत महत्त्वाचा असा मानला जातो. या कालखंडामध्ये प्रकाशित ग्रंथांचे वैविध्य पाहिले की विस्मय वाटतो. धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास, भूगोल, चरित्रे, आध्यात्म, भूगोल अशा विविध विषयांवरची ग्रंथसंपदा, नव-मुद्रणकाळाची सुतोवाच ठरली. भारतीय तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्राच्या बाबतीत बोलायचे झाल्यास हे केवळ शिखरदर्शनच होते. त्यासोबतच पाश्चात्य विश्वातील तत्त्ववेत्ते आणि नीतितत्त्वज्ञ यांचे विचारही मायमराठीच्या पोशाखात परिचित करून देण्याचे महत्त कर्म काही द्रष्ट्यांनी मोठ्या साक्षेपाने केले. तत्कालीन अभ्यासकांना एक मोठे दालन उघडे झाले, हे मात्र खरे ! पण अभ्यासक जरी सातत्याने तयार होत राहिले तरीही कालौघात ग्रंथ व्यवहार लुप्तप्राय होण्याच्या मार्गावर आला. दुर्मिळ आणि मौल्यवान संदर्भग्रंथांची वानवा दिसू लागली.

याच कारणाने काही महत्त्वाच्या पण दुर्मिळ ग्रंथांचा शोध घेऊन समकाळामध्ये ते संदर्भ उपलब्ध होण्यासाठी काही ग्रंथ पुनर्मुद्रणाचा प्रकल्प आपण हाती घेतला आहे. याच मालिकेमध्ये 'तत्त्वज्ञान आणि नीतिविषयक दुर्मिळ ग्रंथांचे संपादन व पुन:प्रकाशन' हाही एक प्रकल्प आहे. या प्रकल्पामध्ये खंड पहिला हा 'पाश्चात्य तत्त्वज्ञान आणि विचारदर्शन', खंड दुसरा हा 'तत्त्वज्ञान आणि नीति' तर खंड तिसरा हा 'नीतितत्त्वज्ञान, राजकीय आणि सामाजिक'हे तीन खंड संपादित करून वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे. या खंडांच्या निमित्ताने केवळ भारतीय नव्हे तर जागतिक तत्त्वज्ञानाचा परामर्ष घेतला गेला आहे. अभ्यासकांसाठी एक मोठा संदर्भ उपलब्ध होत आहे. तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्राच्या गंगोत्रीची धारा ही अक्षय्य वाहणारी आहे. इथे या जागतिक प्रतिभेचा त्रिवेणी संगम आहे. या प्रतिभासंगमावर सुस्नात होऊन मनातील भेदांच्या किल्मिषांचा त्याग करून अभ्यासक आपल्या विचारांना विश्वात्मैक्याच्या दिशेने नेतील अशी अभिलाषा आहे.

(डॉ. सदानंद मोरे)
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

प्रस्तावना

भूमिका

मानवाच्या इतिहासाकडे पाहिले, तर एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते की, मानवाचा इतिहास हा जीवसृष्टीतील इतर प्राण्यांप्रमाणे केवळ शरीराच्या आकारमानातील एकंदर बदलांचा नाहीय. तसेच हा इतिहास रहिवास आणि त्या रहिवासातील वनस्पती, प्राण्यांमधील सादप्रतिसादाचा किंवा वृद्धी विनाशाचा नाहीय. मानव निसर्गाचा एक घटक असला तरीही विचार आणि विचारांवर आधारित असलेले त्याचे वर्तन आणि त्या वर्तनातील परिवर्तन हे त्याच्या एकंदर अस्तित्वाचे वैशिष्ट्य आहे. इतर कुठल्याही प्राण्यांमध्ये अशा प्रकारचे विचार वा विचारांवर आधारित प्रतिसाद देण्याचे कार्य घडत असेल, असे वाटत नाही. माणूस आणि विचारांवर आधारित वर्तन यांच्यामध्ये एक अविभाज्य असे नाते आहे. पूर्णपणे सजग आयुष्य जगण्याचा प्रयत्न करणे, भोवतालामधील घटनांकडे सूक्ष्म दृष्टीने पाहणे, त्यातून काही शिकत व त्याला प्रतिसाद देत जगणे हे मानवाच्या जगण्याचे वैशिष्ट्य आहे. या जगण्यामध्ये केवळ अवलोकन, शिक्षण वा प्रतिसाद एवढ्याच गोष्टी असतात, असे मात्र नाही. निसर्ग व त्या अनुषंगाने असणारा भोवताल हा अनुकूल, प्रतिकूल अशा अनेक घटनांनी भरलेला असतो. त्यात पूर्ण जीवसृष्टीतील सर्व घटकांना प्रतिसाद देत स्वतःचे समायोजन करावे लागते. अशा अनेकविध इष्ट-अनिष्ट घटनांचे सूक्ष्म निरीक्षण मानवाच्या अभ्यासाला कारणीभूत ठरले असावे, हे नक्की! त्यातून मानवाच्या विचारांना अनेकविध आयाम लाभले असले तरीही सुनिश्चित अशी दिशाही लाभली आहे. इतर प्राण्यांच्या प्रतिसादामध्ये वैचारिकता अंशत: भासत असली तरीही मानवाइतकी ती सुस्पष्ट वा प्रगल्भ नाही. सविचार प्रतिसाद हे जीवनसृष्टीमध्ये केवळ प्रगत असलेल्या मानवाचे लक्षण आहे. जीवसृष्टीतील एकंदर उत्क्रांती ही मानवाच्या वैचारिक क्षमतेला केंद्रस्थानी ठेवून गणली

जाते. ग्रीक विचारवंत ॲरिस्टॉटल याने अगदी सुस्पष्टपणे 'मानव हा परिपूर्ण असल्याने इतर प्राण्यांच्या अभ्यासाची तुलना त्याच्याशी करणे योग्य आहे,' असे म्हटले आहे. एवढेच काय; पण मानवाच्या समग्र अभ्यासासाठी 'मानवशास्त्र'[१] (Anthropology) ही संज्ञा वापरणारा तो पहिलाच विचारवंत होता. पाश्चात्त्य विचारवंतांमध्ये मानवशास्त्राचा अभ्यास तसा खिस्तपूर्व एक हजार वर्षे हॅनो याने सुरू केला आणि नंतर आलेल्या हेरोडोटस किंवा हिप्पोक्रेटिसने यामध्ये भर घातली. असे असले तरीही मानवशास्त्राविषयी ॲरिस्टॉटलपासून शास्त्रशुद्ध विचारमंथन सुरू झाले असे म्हणता येईल.

तरीही भोवतालातील एकंदर घटना आणि त्यापासून मिळणारी माहिती यामुळे मानवात मन, बुद्धी आणि चित्त यांचा विकास केव्हा झाला काही सांगता येणार नाही. आधुनिक विज्ञान कदाचित अशा प्रकारच्या प्रश्नांना निरर्थक म्हणून बाजूला सारेल. केवळ शारीरिक विशेषतः मेंदूचा विकास आणि नैसर्गिक समायोजनामध्ये मानवाचा प्रतिसाद या दोन गोष्टी विज्ञानाला महत्त्वाच्या वाटू शकतात; पण मनुष्याने सातत्याने सजग राहून संवेदना ग्रहण करणे, त्यावर चिंतन करून त्यांचा अर्थ लावणे, आपल्याकडच्या संग्रहित माहितीचे रूपांतरण ज्ञानात करणे आणि संभाव्य घटनेस प्रतिसाद देण्यासाठी बौद्धिक ज्ञानाधिष्ठित तयारी करणे या सरल प्रक्रियांमधून मनुष्याच्या चेतनेमध्ये मन, बुद्धी आणि चित्त यांचा विकास झाला असल्याचे नाकारता येत नाही. तशी विज्ञानाने अजून चित्ताला स्वीकृती दिली नाही, हा भाग वेगळा! मानवशास्त्राची म्हणजे मानवाच्या एकंदर अस्तित्वाच्या अभ्यासाची व्याप्ती तशी खूप मोठी आहे. पण कोणत्याही एका शास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात झाली की. मग त्याचा उगम, इतिहास, व्याख्या, ध्येय वगैरे गोष्टींवर चर्चा सुरू होते. सुरुवातीला असे असले तरीही पुढे अभ्यासाची व्याप्ती वाढल्यानंतर त्याच्या उपशाखांची संख्या वाढते आणि काही कालांतराने या उपशाखा स्वतंत्र शास्त्र असल्याप्रमाणे स्वत:चे अस्तित्व सिद्ध करतात. मानवशास्त्राच्या अगदी सुरुवातीच्या काळात पुरातत्वविद्या, समाजशास्त्र, मानसशास्त्र, भाषाशास्त्र वगैरे अनेक उपशाखा स्वतंत्र शाखा म्हणून उदयाला आल्या. या सगळ्या शाखांचा अभ्यास मानव्यविद्या या नव्या मथळ्याखाली सुरू झालेला दिसतो.

या सगळ्या गोष्टींचा विचार करता भारतामध्ये अशा प्रकारचा मानवकेंद्रित अभ्यास बऱ्याच आधी सुरू झालेला होता, असे समजायला हरकत नाही. अगदीच सांगायचे झाले,

---

१. 'मानवशास्त्र' या शास्त्राची निर्मिती मानवाच्या क्रियाशीलतेचा अभ्यास करण्यासाठी झाली. मानववंशशास्त्र अशी संज्ञा प्रथमतः डॉ. इरावती कर्वे यांनी रूढ केली. पुढे शास्त्र अभ्यासाच्या संकोचातून बाकीची शास्त्रे बाहेर पडली. मानसशास्त्रादी शास्त्रे स्वतंत्र शास्त्रे म्हणून ओळखली जाऊ लागली. (संदर्भ : प्रस्तावना, भौतिकी मानवशास्त्र, लेखक प्रा. वि. श्री. कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, १९८३)

तर मानवाच्या इतिहासामध्ये ख्रिस्तपूर्व काही सहस्त्रक वर्षे आधी वैदिक कालखंडामध्ये वैदिक तत्त्वज्ञांनी मन आणि मानवी वर्तन यांचा विविधांगांनी अभ्यास केला होता, हे अगदी स्पष्ट आहे. मानवी मनाच्या जागृती, स्वप्न, सुषुप्ती या अवस्था असतात, त्या अवस्थांमधून त्याचे कार्य चालते.

देहाला अन्नाची व अनुकूल वातावरणाची गरज असते, तशीच मनालाही असते. मनाचा विकास म्हणजे जीवनाचा विकास हे वेदांमध्ये म्हटलेले आहे. त्या तुलनेत सामान्य आणि अपसामान्य अशा वर्तनांचा भारतीयांनी विचार केला होता, हे अगदी नक्की! मानवशास्त्राच्या बाबतीत बोलायचे झाले, तर भारतीय तत्त्वज्ञांनी मनुष्याच्या केवळ भोवतालाचाच विचार केला होता असे नव्हे, तर मनुष्याचे स्व-तंत्र व्यक्तित्व, त्याची शरीररचना आणि क्रियाशारीर, समाजमानस, लैंगिकता, अशा अनेकविध विचारांनी अभ्यास मांडला होता. उपनिषदांचा काळ हा तसा अजूनच प्रगल्भ होता. काळ असा शब्द वापरण्याचे कारण इतकेच की, उपनिषदांचा कर्ता कुणी एक नाही. ती एक विचारधारा आहे. ज्या विचारधारेवर केवळ कुणा एका मनुष्याचे वा त्याची विचारधारा मानणाऱ्यांचे जीवन परिपुष्ट होते असे नव्हे, तर संपूर्ण समाजावर त्याचे इप्सित परिणाम झाल्याचे दिसून येतात. उपनिषदांमध्ये भारतीय उपखंडातील मानवी विचारांचे प्रगत दर्शन घडून येते. शरीरासाठी आवश्यक घटक कोणते, अन्नमय, प्राणमयादी कोष, मानवाच्या भावभावना, मते, बुद्धी, सवयी, कौशल्य, ज्ञानविद्यादी गोष्टींवर प्रदीर्घ चर्चाही उपनिषदांमध्ये आढळते. दार्शनिकांचा काळ सुरू झाला, तसे या विचारांना अधिक मूल्य प्राप्त होत गेले, हे अगदी स्पष्ट आहे.

एकंदर जागतिक स्तरावरचा विचार करता मानवाच्या इतिहासामध्ये अशा प्रकारचा ऊहापोह अगदी प्राचीन काळापासून सुरू झाला होता, हे अधोरेखित आहे. त्यात आजच्या सन्मान्य प्रमाणानसार तरी भारतीय उपखंड हा सर्वात प्राचीन अशा विचारधारेचा दिसून येतो. भारतीय विचारखंडातील या विचारदर्शनाकडे पाहता आजमितीला मानवाविषयी सखोल चिंतन मांडणारी दुसरी कोणतीही विचारधारा या तुलनेत प्राचीन नाही, हे स्पष्ट आहे. अर्वाचीन काळात पाश्चात्त्यांनी उभे केलेले विचारविश्व हे केवळ वैचारिक विश्वालाच संपन्न करणारे राहिले नाही, तर त्यामुळे विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये भले मोठे परिवर्तन घडून आले. एकंदरच मानव प्रजात ही इतर जीवनसृष्टीच्या तुलनेत केवळ शारीरिक स्तरावरच नव्हे, तर वैचारिक स्तर, मानस स्तर या स्तरावरही उत्क्रांत झालेली दिसते. ज्याचा परिपाक म्हणून भाषा, धर्म, संस्कृती, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, इतिहास, कला, विज्ञान, तंत्रज्ञान, खगोलशास्त्र अशा अनेक स्तरांवर मनुष्य सृष्टीमध्ये स्वतःचे अस्तित्व सिद्ध करून आहे. दुसऱ्या बाजूने पाहता संघर्ष, कलह, स्पर्धा, युद्धे, अशांतता, आक्रमण, अनारोग्य, अस्वास्थ्य या गोष्टी केवळ मानवामध्ये अनैसर्गिक रीतीने वाढलेल्या दिसून येतात. मानवाच्या आकांक्षांना आता सीमा राहिली नाही, अशी स्थिती झालेली दिसते. आपले अस्तित्व सिद्ध

करण्यासाठी मानवाचे पाऊल पृथ्वीबाहेर केव्हाच पडले आहे.

मानवी जीवन व्यवहाराचे हे सारे पैलू आहेत. याला आधुनिक विज्ञानाने सहमती दर्शवली आहे. उत्क्रांती तत्त्वांमध्ये हे सारे घडत गेले आणि मानवशास्त्रही त्यासोबतच विकसित होत गेले असे साधारणपणे दिसून येते. नाही तरी जगातील सारी मानवविचारकेंद्री शास्त्रे, दर्शने आणि विज्ञाने ही एक रात्रीतील शोधाची परिणती नव्हे. उत्क्रांतीच्या कुठल्याशा टप्प्याला केवळ मानवाचाच मेंदू अशा प्रकारे उन्नत का होऊ शकला, इतर जीवांचा का नाही? हे कुणी सांगू शकणार नाही. हे सारे मानवाच्या मेंदूचे कर्तृत्व आहे. मानवी मेंदूतील सेरेब्रल कॉर्टेक्स हा सर्वात उत्क्रांत भाग मानला जातो. मानवाच्या मानव प्रजाती म्हणून केल्या गेलेल्या सर्व उत्क्रांत कार्यांमध्ये या सेरेब्रल कॉर्टेक्सचा सहभाग सर्वात जास्त असतो. मानवाच्या मेंदूतील काही केंद्रे आणि प्रीफॉन्टल कॉर्टेक्स एकमेकांकडे संदेश पाठवण्याचे काम करतात. ही दुहेरी संदेशवहनाची कार्यपद्धती असते. मानवी बोधन आणि वर्तन या दोन्हीही क्रिया ही केंद्रे सुसंबद्ध करत असतात. त्यांच्यात एकसूत्रता ठेवतात. माणूस एकाच वेळी अनेक कार्य करू शकण्यामागचे कारण हेच असते. माणसाच्या सर्व शारीरिक क्रिया मेंदू सांभाळत असतो; पण एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की, हायर फंक्शन्स व एक्झिक्युटिव्ह फंक्शन्स ही मेंदूची कार्ये शास्त्रे व तत्त्वज्ञानाशी संबंधित आहेत. माणसाची जाणीव, भाषा, वाणी, वक्तृत्व, भास, भ्रम या साऱ्या गोष्टी हायर फंक्शन्समध्ये येतात, तर तर्कबुद्धीने विचार करणे, अवधान ठेवणे, कोणत्याही गोष्टींविषयी स्वतःची विचारप्रणाली तयार करणे, अमूर्त विचार करू शकणे, येणाऱ्या घटनांचे भान असणे, त्याबाबत निर्णय घेता येणे, माहिती साठवणे, योग्य वा अयोग्य प्रतिक्रिया होण्यावर नियंत्रण ठेवणे अशा सर्व क्रियांना एक्झिक्युटिव्ह फंक्शन्स म्हणतात. मानवाच्या मेंदूचा, विचाराने उन्नत होण्याचा, विविध शास्त्रे आणि तत्त्वज्ञानाकडे वळण्याचा संबंध तो असा आहे. संपूर्ण जीवसृष्टीमध्ये मानवाच्या मेंदूचे जैवविज्ञान हे जसे उत्क्रांतीच्या सिद्धांतावर सिद्ध करता येते. त्यामुळे आपसुकच शास्त्र आणि तत्त्वज्ञान हे मानवाच्या वाट्याला का, हेही सहज सिद्ध करता येते.

वेदकाळ : नीतिशास्त्र आणि तत्त्वज्ञानाचा उगम

उपलब्ध लेखनाच्या आधारे वेदकाळ मानव जीवनातील चिंतनाचा सर्वात प्राचीन कालखंड होता, असे मानण्यास काही हरकत नाही. वेदकालीन समाज खरेच नीतिशास्त्राची रचना करणारा, त्याचे पालन करणारा वा तत्त्वचिंतन करणारा होता का? अशी शंका अनेकांच्या मनामध्ये येऊ शकते. प्राचीन सभ्यतेचे काही संकेत आपण ऋग्वेदासारख्या सर्वात प्राचीन ग्रंथात पाहू शकतो. त्यातील काही मोजके उल्लेख पाहता आपण तत्कालीन समाज हा वैचारिकदृष्ट्या एका टप्प्याला पोहोचला होता, हे जाणून घेऊ शकतो. वेदकाळात असलेले अनेक उल्लेख म्हणजे कवच, लोखंडी द्वार, सोने वा लोहाची नाणी, सुसज्ज

सेना, ढाल-तलवार, कारावास, हातकड्या, शंभर वल्ह्या असलेली नौका, लोखंडी पाय, आंधळ्यास मिळू शकणारी दृष्टी, जुगार, शारीरिक संबंध वा व्यभिचार, कन्येस अलंकृत करणे, लाकडी पेटी, चाबूक, लगाम, अंकुश, सुई, कोष्टी, कुंभार, रथकार, सोनार, शेतकरी, तलावातील पाणी शिंपणे, नांगरादी उल्लेख तत्कालीन समाज आणि सामाजिक व्यवस्था व नैतिकतेची साधारण कल्पना देतात. या साऱ्या गोष्टींवरून वेदकालीन लोकव्यवहार व नीतीचे दर्शन होतेच. बहुधा प्रारंभीच्या कालखंडामध्ये सामाजिक स्तरावर नैतिकता जपण्यासाठी आणि नैसर्गिक शक्तीसामर्थ्यांसमोर नतमस्तक होण्यासाठीच देवता आणि त्यांचे पूजन अशी संकल्पना आली असावी. सत्य समाजामध्ये नांदावे, असत्य दूर व्हावे, छळकपटापासून सुटका व्हावी, प्रामाणिकपणे लोकव्यवहार व्हावेत, न्याय्य मार्गाचा अवलंब करून वर्तन असावे, समाज आणि विशेषतः राजा सद्गुणी असावा, हा त्यामागचा हेतू होता, हे अनेकदा स्पष्ट दिसून येते. मॅक्डोनाल्डने आपल्या 'वेदिक मायथॉलॉजी' या पुस्तकामध्ये अगदी स्पष्टच उल्लेख केला आहे की, 'सर्व वैदिक देवांचे शील व स्वभाव नीतिमय आहे. त्यांच्या अंगी सत्यत्व आणि कपट वा छद्माचा अभाव दाखविला आहे व ते प्रामाणिकपणा व न्यायपरायणता या सद्गुणांचे मित्र व पुरस्कर्ते असे वर्णिले आहेत[२]. अर्थात, असे असले तरीही वेद हे काही इतिहास ग्रंथ नव्हेत, तसेच वेदांतील देवतांची नावे म्हणजे कुणा व्यक्तीची नावे नव्हेत. मॅक्डोनॉल्डने 'वेदिक इंडेक्स मध्ये दिलेल्या सर्व पदांचे व वैदिक इतिहासाचे निराकरण करण्यात आलेले आहे. वेदांमध्ये जी नावे आहेत ती व्यक्तिविशेषांची नसून यौगिक पदे आहेत, हे स्वामी दयानंद सरस्वतींनी म्हटले आहे.

विशुद्ध ज्ञानाचा शोध घेण्याची अभीप्सा ही मानवाच्या चिंतनास कारणीभूत ठरली, असे समजण्यास काहीच हरकत नाही. समाज स्तरावर माणसाचे जीवन सुरू झाल्यानंतर खरे तर व्यक्तीसोबतच समाजाचा उत्कर्ष साधण्यासाठी नैतिकतेची आवश्यकता तेव्हाच्या मानवास पडली नसती तर नवल! त्यातूनच बहुधा समष्टीच्या शांतीची अर्थात विश्वकल्याणाची संकल्पना पुढे आली असावी. सारे काही ज्ञानरूप आहे, त्या ज्ञानरूपातूनच विश्व निर्माण झाले असावे आणि त्यातील सर्वोच्च शक्तीसोबत मानवाचे जीवन व्यतीत होताना मानवाने त्याच्याशी समर्पित राहिले पाहिजे या संकल्पनेतून साधना पद्धती विकसित झाली असावी. या साधनापद्धतीत मिळालेल्या असीम शांततेला विश्वकल्याणार्थ बनवण्यासाठी वेदांची निर्मिती झाली हे समजायला हरकत नाही. कारण वेदांतील कुठल्याही ऋचेचा कर्ता हा कर्ता नाहीय, तो द्रष्टा आहे. त्याने अनुभूत ज्ञानाला छंदबद्ध करण्याचे काम केलेले आहे; पण त्याला सत्य प्रकटनाचे वा ज्ञानस्वरूपाच्या अनुभूतीस विश्वकल्याणार्थ बनवण्याचे श्रेयही

---

२. The Character of the Vedic gods is also moral. All the gods are 'true', 'not deceitful', being throughout the best friends and guardians of honesty and righteousness' (vedic mythology)

नको, इतका तो समर्पित असतो. 'ज्ञान असा प्रकाश आहे, जो मानवाच्या मन आणि मस्तिष्क यांच्यातील अंधार नष्ट करतो, परमेश्वराने सृष्टीच्या आरंभी मानवाला मार्गदर्शन करण्यासाठी व त्याच्या कल्याणासाठी जो ज्ञानाचा प्रकाश दिलेला आहे, त्याचे नाव 'वेद' आहे.'[३] वेदांचा अर्थ ज्ञान आहे, हे स्पष्टच आहे. वेदांमध्ये ज्ञान आणि भाषा दोन्हीही आहेत. ईश्वराने केवळ ज्ञान दिले नाही, तर ते व्यक्त करण्याची भाषाही दिली आहे. कोणतीही भाषा विचारांशिवाय राहू शकणार नाही, तसेच विचारही भाषेखेरीज व्यक्त करता येणार नाही. मनात उत्पन्न होणारे विचार हे वाक्यस्वरूपाने भाषेत येतात. त्यामुळे मनुष्याला प्राप्त झालेल्या साधनोत्तर ज्ञानाचे भाषिक अवतरण म्हणून वेदांतील ऋचा मानल्या जातात. त्यासाठीच त्याचे कर्ते स्वतःला द्रष्टे मानतात. इतर माणसे अशा द्रष्ट्या ऋषींच्या अंत:करणात प्रविष्ट झालेल्या सत्याला जाणून घेतात आणि त्याप्रमाणे आपले जीवन व्यतीत करतात[४], त्या सत्याची अनुभूती घेतात आणि इतरांपर्यंतही ही वेदांची भाषा अर्थात ज्ञान घेऊन जाण्याचे कार्य अर्थात् विश्वकल्याणार्थ कार्य करतात. ही वैदिक जीवनपद्धती आहे. त्याप्रमाणे व्यतीत केलेले जीवनही ज्ञानरूपात[५] परिणत होते, हा दृढ विश्वास आहे. मनुष्य जे ज्ञान प्राप्त करतो ते काळाने परिच्छिन्न असते; पण ईश्वर हा काळाच्या परिसीमेत येत नाही, तो ज्ञानाचा भांडार आहे, अर्थात, ज्ञानरूपच आहे. म्हणून ही ज्ञानसाधना ईश्वराशी म्हणजे सत् तत्त्वाशी अर्थात ज्ञानाशीच एकात्म होते.

वेदांपासून ही ज्ञानसाधना सुरू झाली ती पुढे एकेक टप्प्यावर प्रगल्भ होत गेली असे म्हणावे लागते. ऋग्वेद हे तसे विज्ञानकांड आहे. विज्ञानात गुण आणि गुणीचे वर्णन आणि विश्लेषण असते. जो गुणी व गुणीच्या ज्ञानाचे वर्णन करतो तो ऋक् आहे. ऋग्वेदाचे नाव तसे सार्थ आहे. यजुर्वेद कर्मप्रधान आहे. त्याचा अर्थ देवपूजा, संगतीकरण व दान असा आहे. अर्थात्, हे सारे क्रियात्मक बाबींचे विवेचन आहे. सामवेद तसे उपासनात्मक आहे. सा सर्वशक्ती परमेश्वर आहे आणि अम जीव आहे, त्या दोन्हींचे एकत्रीकरण तो साम आहे. हे समन्वयात्मक नाम आहे. अथर्ववेद ज्ञानकांड आहे. अथ अर्वाङ् अथर्वन् असे हे पद आहे. अर्थात जगातील पदार्थांमध्ये त्या ईश्वराची सत्ता वा वस्तुतत्त्व शोधल्यामुळे हा अथर्व आहे. अर्थात, या साऱ्या रचना अत्यंत विचारपूर्वक व सार्थ केलेल्या आहेत हे नक्की!

---

३. ऋग्वेद प्रस्तावना, आचार्य वैजनाथ शास्त्री, अनुवादभाष्य : सौ. सविता ब. जोशी, प्रकाशक : आर्य समाज

४. 'यज्ञेन वाचः पदवीयमायन्तामन्वविन्दन्नृषिषु प्रविष्टाम्।

तामाभृत्या व्यदधुः पुरूत्रा तां सप्त रेभा अभि सं नवन्ते ॥ (ऋग्वेद १०/७१/३)

५. 'परिणामाची पराकाष्ठा आकाशात परिसमाप्त होते, त्याचप्रमाणे ज्ञानाची पराकाष्ठा एकमात्र सर्वज्ञ ईश्वरामध्ये समाप्त

मुळात वेद शब्द महत्त्वाचा आहे. 'वेद पद व्याकरणाने ज्ञानार्थक विद् धातू, लाभार्थक विद् धातू व सत्तात्मक विद् धातूने बनलेला आहे. त्यामुळे वेद हे ज्ञान आहे. ज्यामुळे श्रेष्ठ लाभ होतोच, शिवाय त्याच्या विचाराने सत्ता स्थित होते. ज्ञानात विद्या प्राप्ती होते, लाभात धर्म, अर्थ, काम, मोक्ष येतात. विचार हा विश्लेषणात्मक, संश्लेषणात्मक व प्रेक्षात्मक असतो. सत्ता पदाने ईश्वर, जीव व प्रकृतीचा बोध होतो. ते वेदवर्णित आहेत. अनेक मंत्रदेवतांच्या रूपात त्यांचे व जगाचे वर्णन आहे. वेद ज्ञानाचे, मानव विचारांचे, जीवनाच्या महान प्राप्तीचे. सत्ताविषयकचे हे पद अर्थ मख्य वाच्य आहेत.[६]

थोडक्यात सांगायचे झाले तर वेद मानवाच्या जीवनाला काही आकार देऊ पाहतात. वेद हे ज्ञानरूप आहेत; पण केवळ ज्ञान आहे असे म्हणून होत नाही. कारण त्या ज्ञानाचा काही लाभ मानवास झाला पाहिजे आणि तोही चिरंतन लाभ झाला पाहिजे ही वेदांची इच्छा आहे. त्यासाठी त्या ज्ञानाचा अवलंब करून मानवी जीवनामध्ये वेद काही घडवू पाहत आहेत. पशुतुल्य अवस्थेपासून एका उन्नत जीवाच्या अवस्थेपर्यंत त्याची स्थिती जावी आणि आपण त्या पूर्णज्ञानाचा एक घटक आहोत, या दृढ भावनेने त्याच्या चित्तात रूपांतरण होऊन त्याने आपण पूर्ण असल्याची निरपेक्ष अनुभूती घ्यावी, अशी योजना आहे. म्हणून वेद मनुष्यास केवळ ज्ञान देत नाहीत, तर त्या ज्ञानाचा लाभ नेमका कसा होतो हेही स्पष्ट करतात. लाभ हे चारी पुरुषार्थाच्या आचरणाने येतात. वेदांतील ज्ञानाने बुद्धी प्रशिक्षित होते. निश्चयात्मक ज्ञानाने विवेक प्राप्त होतो. धर्मविचार हे बुद्धीसाठी आहेत. बुद्धी प्रशिक्षित झाली की, ती योग्य ते निर्णय घेऊ शकते. अर्थज्ञान व्यवहारासाठी असते. अर्थव्यवहार व्यवस्थित असले म्हणजे जीवन जगणे सुकर होते. सर्व गरजा भागवता येतात. म्हणून अर्थज्ञान हवे. काम देहाच्या गरजा पूर्ण करतात. भोग्य काय आणि अभोग्य काय हे कामाच्या ज्ञानाने समजते. म्हणून तेही तितकेच महत्त्वाचे आहे आणि अशा पद्धतीने जीवनपद्धती ठेवली की, जीवास मोक्ष प्राप्त होतो. कारण ज्ञानविचार हे सत्ता स्थित होण्यास मदत करतात. सत्ता या पदाने ईश्वर म्हणजे काय, जीव म्हणजे काय आणि प्रकृती म्हणजे काय यांचा बोध होतो. अशाश्वत काय हे एकदा समजले की, शाश्वत स्थितीमध्ये साधक स्थिर होऊ लागतो. सत् तत्त्वाचे अंतरंगात स्थिर होणे म्हणजे सत्ता स्थिर होणे. म्हणून वेद सद्विद्येचा मूळ स्रोत आहे, अशी धारणा आहे.

पुरुषार्थाचे मानवी जीवनात मूल्य काय आहे. हे आपण पाहिले. पण केवळ एवढ्या विवेचनावर सर्व काही होते असे नाही. प्रत्यक्ष कृतीशिवाय काहीही होणे शक्य नाही. वेद कर्मवादी आहेत ते असे आहेत. म्हणून ज्ञान केवळ बाह्य वर्तनाचे, व्यवहाराचे किंवा

---

६. ऋग्वेद प्रस्तावना, आचार्य वैजनाथ शास्त्री, अनुवादभाष्य : सौ. सविता ब. जोशी, प्रकाशक : आर्य समाज

नैतिकतेचे असते असे नाही, तर या शास्त्रांचा अभ्यास केल्याने जे ज्ञान प्राप्त होते त्यातून सद्विचारांची निर्मिती होते. त्याचे प्रयोजन केवळ धर्म, अर्थ, काम नव्हे तर मोक्षात आहे. पण आपल्याकडे सहसा शास्त्रांची उपेक्षा केली जाते. वेद, ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे, वेदांगे, षड्दर्शने ही विचारांना एक उन्नत स्वरूप देत राहतात. त्यासाठी शास्त्रांचे अध्ययन आवश्यक मानले आहे. त्यामुळे वेद हे ज्ञान आहे, त्याच्या अध्यययाने श्रेष्ठ लाभ होतोच; पण केवळ धर्म, अर्थादी गोष्टींवर हे थांबत नाही. त्या ज्ञानाच्या विचाराने... ज्ञानात विद्या प्राप्ती झाल्यानंतर चिंतनाने सत्ता स्थित होते. कारण विचार हा विश्लेषणात्मक, संश्लेषणात्मक व प्रेक्षात्मक असतो. हे समजून घेतल्याशिवाय विद्येचे काय करायचे हे उलगडत नाही. कारण अर्थ, कामाच्या ज्ञानातून माणसाच्या गरजा पूर्ण होतात. धर्म विवेकज्ञान देईल, असे असताना पुनश्च ज्ञानविचार का? असा प्रश्न पडू शकतो; पण वेदद्रष्ट्या ऋषींनी वेदांना प्रसवले आहे. ते केवळ भौतिक स्तरावरच्या उन्नतीसाठी नव्हे, तर पारमार्थिक स्तरावरचे सर्वोच्च ध्येय त्या ज्ञानरूपाशी तादात्म्य प्राप्त करण्याचे आहे. म्हणून ज्ञानावर चिंतन आवश्यक आहे. भौतिक जगण्यातील ज्ञान हे पूर्वसुरींच्या आप्तांच्या आचरणातून प्राप्त होऊ शकते; पण मोक्षविषयक ज्ञानासाठी अर्थात अदृष्ट गोष्टींच्या विवेचनार्थ चिंतन आवश्यक आहे. कारण ते मोक्षज्ञानाचे विश्लेषण करते. त्यामळे नेमके मोक्ष कशाला म्हणायचे आणि तो कसा साधायचा हे समजते. त्याचे संश्लेषणही होते. कारण एकदा विश्लेषण झाले की, चित्त त्याप्रमाणे आकार धारण करू लागते आणि ते प्रेक्षात्मक असते म्हणजे विचारपूर्वक कृती केल्यास आकार धारण करू देणारे असते. त्यासाठी शास्त्राचे अध्ययन अत्यंत आवश्यक असते, असे शास्त्रकारांचे मत आहे. नवव्या, दहाव्या शतकात आलेल्या 'न्यायमंजरी'कार जयंत भट्टांनी तर 'शास्त्रानामवश्याध्येयत्वम्'[७] असे सांगून शास्त्राच्या अध्ययनाचे महत्त्व आपल्या वृत्तीत वर्णिलेले आहे. प्रत्येक शब्दाचे वा विधानाचे अगदी सरळ सरळ अर्थ तर असू शकत नाहीत. त्यातील अपरोक्ष ज्ञान[८] काय आहे हे चिंतनाने उलगडते आणि मगच साधकाला सत्याच्या दिशेने जाता येते, असे शास्त्राध्ययनाचे महत्त्व आहे. अर्थात, वेदद्रष्ट्या ऋषींनी हे सारे मानवाच्या केवळ अध्ययनार्थ केले नसून त्यास धर्मधारणा होऊन निःश्रेयस प्राप्त व्हावे यासाठी केलेले आहे.

वेदांचा हा कालखंड मानवाच्या चिंतनशीलतेची पहाट असतानाचा असला तरीही

---

७. (शास्त्रानामवश्याध्येयत्वम्) इह प्रेक्षापूर्वकारिणः पुरुषार्थसंपदमभिवाञ्छन्तः तत्साधनाधिगमोपायमन्तरेण तदवाप्तिममन्यमानाः तदुपायवगमनिमित्तमेव प्रथममन्वेषन्ते।... तस्मादस्मदादेः शास्त्रमेवाधिगन्तव्यम्। (शास्त्रविमर्शः, जयंतभट्टकृत न्यायमंजरी)

८. अनेक संशयोच्छेदि परोक्षार्थस्य दर्शकम्।
सर्वस्य लोचनं शास्त्रं यस्य नास्त्यन्ध एव सः॥

प्रगल्भ आहे. त्यामुळे वेद प्रसवापूर्वीचा अभ्यासक ऋषींचा सुप्त निशाकाल हा अशा विश्वकल्याणार्थ ज्ञानाच्या सर्जनशीलतेला पोषक असावा हे आपसूक सिद्ध होते. त्या निशाकालात अज्ञानाच्या तमात चाचपडताना सत्याचा उन्मेष चिंतनशील ऋषींना साधनेत कुठेतरी भासला असावा. साधनोत्तर त्याचे प्राथमिक स्तरावरचे दर्शनच त्यांना द्रष्टेपणा देऊन गेले आणि मानवाच्या जगण्याला त्या नवोन्मेषाचा आकार देण्यासाठी त्यांनी वेदज्ञान प्रसवले असे समजायला हरकत नाही.

वेदातील सूक्तांचा आणि त्यात प्रकट विचारांचा एकंदर सारांश असा सांगता येईल की, वेदांमध्ये मानवाला केंद्रीभूत ठेवून सारे काही रचलेले आहे. मानवाच्या कल्याणासाठीच हे सारे आहे. याला आपण मानववंशशास्त्रीय विचारांची रचना म्हणू शकतो. त्याबरोबरच ईश्वर किंवा ज्ञानतत्त्व म्हणजे काय असे विश्वरचनावादी प्रश्नही वेदाने उपस्थित केलेले आहेत. वेदातील तत्त्वज्ञान तसे एकत्ववादी (Monism) आहे. ऋग्वेदाच्या १० मंडलातील १२९ वे सूक्त... नासदीय सूक्त याविषयी अनेक प्रश्न उपस्थित करते. विश्वांतर्गत असलेल्या व्यवस्थेला ऋत् अशी संज्ञा वेदांमध्ये आहे. या ऋतातूनच सारे पुढचे व्यवस्थापन होते म्हणून नैतिकतेचा पहिला आधार सत्यास मानले आहे. सत्य, परोपकार, विश्वप्रेम, मैत्री, शौर्य, मार्दवादी गुणांचा अंगीकार व्यक्तीने करून समाजात वर्तन ठेवावे आणि ऋताच्या व्यवस्थापनामध्ये सहभाग ठेवावा, अशी नैतिक आणि तात्त्विक जगण्याची संकल्पना आहे. याचा अर्थ मानववंशशास्त्रीय वा विश्वरचनावादी तत्त्वचिंतनासोबतच नीतितत्त्वज्ञानावरही मंथन सुरू झाल्याचे लक्षात येते. कदाचित हा काळ फारच प्राचीन असल्याने तत्कालीन नैतिक संकल्पना कालबाह्य झाल्या असे वाटत असले तरीही आधुनिक नैतिक मूल्यांशी त्यांची तुलना करता ते कालबाह्य नाहीत, हे लक्षात येते.

वेदांच्या उत्तरकाळामध्ये पुनश्च एकवार देवतावादांचा काळ सुरू झाल्यानंतर धार्मिक कर्मवादाने जोर धरला, तेव्हा धर्मविषयक विचारांना जास्त प्राधान्य दिल्याचे लक्षात येते. यज्ञकालखंडामध्ये विष्णू देवता विशेष प्रचलित आणि पूजनीय असल्याचे लक्षात येते. यज्ञो वै विष्णू... यज्ञ वा कर्म करणे हेच विष्णूचे स्वरूप मानले जाऊ लागले. ऋग्वेदकाळातील निसर्गशक्तींना देवतास्वरूप मानून उपासना करण्याच्या पद्धतीमुळे ऋषींच्या वृत्तीचे बहिर्मुख होणे स्वाभाविक होते; पण ब्राह्मणकालखंडामध्ये ती वृत्ती स्वतःच्या उपासनेच्या कर्मावर स्थिर झाली. ती जशी जशी अंतर्मुख होऊ लागली तसतशी उपनिषदांच्या वैचारिकतेकडे झुकू लागली, असे दिसते. यज्ञीय कर्मे ही बाह्यतः केली जात असली तरीही जी जिच्यासाठी केली जातात ती विश्वशक्ती मूलाधार आहे, हे लक्षात येऊ लागले आणि या विश्वशक्तीरूप परब्रह्माच्या शोधासाठी उपनिषदांचे विचारमंथन सुरू झाले. साधारण इसवीसनाच्या दीड-दोन हजार वर्षे आधी औपनिषदिक विचारांनी जोम धरलेला दिसून येतो. उपनिषदांच्या कालखंडाला विशुद्ध तत्त्वचिंतनाचा कालखंड म्हणावा असे ते आहे. तेव्हापासून

उपनिषदांच्या आधीच्या कालखंडातील क्रियांना कर्मकांड आणि उपनिषदरूपी चिंतनाला ज्ञानकांड संबोधण्याची रीत सुरू झाली. उपनिषदांच्या अमृतधारांनी कर्मकांडांचा निषेध केला नाही. केवळ ज्ञानाशिवाय कर्मात परिपूर्णता नाही, हे सांगण्याचा मार्ग अवलंबल्याचे दिसून येते. उपनिषदांनी ज्ञानाची महती गायलेली आहे; पण हे ज्ञान बुद्धिगम्य नाही, हे स्वानुभवगम्य आहे, स्वानुभूतिजन्य आहे. अर्थात कृतीचे मूल्यही आपसुकच अधोरेखित झाले. ज्ञान कर्म कृतार्थ करणारे ठरले. ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडुक्य, बृहदारण्य, तैत्तिरीय, ऐतरेय वगैरे उपनिषदांतून व्यक्ती, त्याचे भोग, कर्म, आत्मतत्त्व, परतत्त्व वा परमात्मतत्त्व, ब्रह्म, परब्रह्म, अपरब्रह्म, ब्रह्मात्म्यैक्य, मोक्ष वगैरे अनेक गोष्टींवर संवादरूपाने चर्चा आहे. संवादरूपाने चर्चा करण्याची औपनिषदिक रीत काय आणि पाश्चात्य तत्त्ववेत्ता प्लेटो याने लिहिलेली डॉयलॉगची रीत काय तशी सत्याच्या अन्वेषणासाठी आकलनसुलभ व जिज्ञासा तप्त करणारी वाटते. एकंदर मोक्ष वा निःश्रेयस वा अमृतत्त्व प्राप्ती हेच मानवाचे श्रेयस आहे. त्यासाठी प्रेयस वाटणारे जीवन नैतिकपूर्णतेकडे नेणारे जगावे याकडे साधारण उपनिषदांच्या नीतितत्त्वज्ञानाचा व धर्मतत्त्वज्ञानाचा ओढा दिसतो.

उपनिषदांचा कालखंड संपल्यानंतर साधारणपणे इसवीसन पूर्व एक हजार वर्षे भगवद्गीतेचा कालखंड दिसून येतो. गीता हे सर्व उपनिषदांचे सारतत्त्व आहे. अगदीच सांगायचे झाले तर गीतेची रचनाही औपनिषदिक प्रश्नोत्तरांच्या स्वरूपामध्ये आहे. गीतेचा रोख मात्र कर्मसिद्धांत समजून घेऊन व्यक्तीने कर्म करताना फलाशा न ठेवता समर्पण बुद्धीने कर्म करून भक्तियुक्त अंत:करणाने ईशसाधना करावी, योगाच्या साहाय्याने इंद्रियांवर जय मिळवून मोक्षसुखाचा लाभ घ्यावा याकडे आहे. गीता मुळातच कर्माच्या निवडीमध्ये संभ्रम झाला म्हणून निर्माण झालेली आहे. गीता ही केवळ तत्त्वज्ञान नव्हे, तर नीतिशास्त्राचे यथोचित पोषण करणारी सर्व उपनिषदरूपी गायींची दुग्धधारा ठरली, जी विश्वातील विचारवंतांच्या अभ्यासाचा आणि चिंतनाचा विषय झाली. गीतेनंतरच्या कालखंडामध्ये विविध स्मृतिग्रंथांचा काळ सुरू झाल्याचे लक्षात येते. समाज आणि सामाजिक रचनेवर जास्त अंकुश ठेवण्यासाठी काही ग्रंथांची निर्मिती केली गेली, असे दिसून येते.

इसवीसनाच्या पाचशे ते तीनशे वर्षांच्या कालखंडामध्ये भारतीय उपखंडातच बौद्ध आणि जैन विचार समाजामध्ये रुजू लागले. पुढे स्वतंत्र धर्म म्हणून त्यांना स्वीकारण्यात आले. बौद्धावतार हा मानवाला त्याच्या दुःखापासून सुटका करण्यासाठी झाला असे मानण्यात येते. दुःख, दुःखाचे कारण, दुःखाचा निरोध आणि दुःखनिरोधाचा मार्ग हा चार आर्यसत्यावर बौद्ध धर्माची मांडणी केली गेली. त्यासाठी वेदविचारांना नाकारण्यात येऊन मनुष्यास केंद्रीभूत करण्यात आले. भगवान महावीर यांनी बुद्धांच्या समकाळातच जैन धर्माचे विचार पुढे आणले. तत्त्वज्ञान आणि व्यवहार या दोन्ही बाबतीत जैन वैदिक धर्माच्या जास्त जवळ आहे. कर्म, कर्माचे फळ, कर्ममूल वासना, वासनामूलक कर्मचक्रातून सुटका

होण्यासाठी निर्वासन होणे या साऱ्या गोष्टी वैदिक धर्माप्रमाणेच आहेत. दोन्ही धर्मांच्या अभ्यासाकडे ज्ञानचक्षूने पाहणे गरजेचे आहे.

वैदिक धर्मामध्ये रामायण, महाभारतादी काव्य आणि इतिहासग्रंथांच्या रचनाही नीती आणि तत्त्वज्ञानाच्या पोषकतेसाठी झाल्याचे लक्षात येते. एकंदर सर्व लेखनाचा आणि तत्त्वचिंतनाचा आकृतिबंध पाहता अगदी सर्वसामान्य माणसालाही आपल्या आयुष्यामध्ये धर्मजीवन कसे जगले पाहिजे, हे समजावे हा त्या मागचा हेतू आहे हे स्पष्ट होते. उपनिषदांच्या ज्ञानसत्राच्या अनुषंगाने षड्दर्शनांची झालेली रचनाही अगदी पूरक आहे. दार्शनिक ऊहापोह करण्यामागचा हेतूही न्यायमंजरीकार जयंत भट्टांच्या हेतूप्रमाणेच आहे. शास्त्रे ही केवळ वाचण्यासाठी वा पठनांसाठी नसतात, त्यांचे आचरण होणे गरजेचे असते. ते होण्यासाठी ते विश्लेषणात्मक, संश्लेषणात्मक आणि प्रेक्षात्मक आहे, हे समजून त्याचे अध्ययन व्हावे, ही अपेक्षा जागोजागी दिसून येते. उत्तरकाळामध्ये अनेकविध धार्मिक व तत्त्वचिंतनपर ग्रंथाची भर पडली असली. तरीही त्यांचा एकंदर कालखंड आणि विषयांची पुनरावृत्ती झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. महाभारतासारख्या ग्रंथलेखनानंतर एकंदर राजधर्म, राजाची कर्तव्ये, प्रजेची कर्तव्ये अशा अनेक गोष्टींची चर्चा सुरू झाल्याचे लक्षात येते. भीष्मयुधिष्ठीर संवाद वा विदुरनीतीसारखे आचारविचार स्पष्ट करणारे ग्रंथ या काळात निर्माण झाले. राजकीय आणि सामाजिक तत्त्वज्ञान असे अगदीच आधुनिक नाव सुस्पष्टपणे देता येत नसले तरीही त्या दिशेने अनेक ग्रंथकारांचे विचार चालले होते हे लक्षात येते. साधारणपणे इसवीसनपूर्व ३२१ मध्ये झालेल्या चाणक्य अर्थात विष्णू शर्मा यांचे 'कौटिल्याचे अर्थशास्त्र' अर्थात राजनीतिशास्त्र हेही तत्कालीन राजकीय आणि सामाजिक विचारवंतांच्या एकंदर मनोभूमीचे सुस्पष्ट दर्शन घडवणारे लेखन आहे. राजनीतिशास्त्र वा राज्यविवेकाची कल्पना भारतीय उपखंडाच्या तुलनेत पाश्चात्त्यांमध्ये मॅकियाव्हेलीनंतर जास्त जाणवते, हे विशेष आहे. एकंदरच मानवाच्या तत्त्वचिंतनाच्या इतिहासामध्ये भारतीय विचारवंताचे योगदान हे अभ्यासनीय आहे, यात शंका नाही. यानंतर पाश्चात्त्यांमध्ये जी तत्त्वविचारांची सुरुवात झाली ती मानवाच्या जगण्याशी केंद्रीभूत झाली, नवविज्ञानाच्या उदयास कारणभूत ठरली. पाश्चात्त्य आणि पौर्वात्य तत्त्वचिंतनामधील काही वैशिष्ट्ये ही अगदी लक्षात घेण्यासारखी आहेत. पौर्वात्य अर्थात भारतीय तत्त्वज्ञान हे तत्कालीन मानवाचे लक्ष बाह्य सृष्टीतील विषयांकडे आकृष्ट झाल्याने निर्माण झाले, असे साधारणपणे मानण्यात येते. निसर्गातील विविध शक्तींच्या भयाने मानव प्रथमत: त्यांच्यासमोर नतमस्तक झाला. त्यानंतर त्या शक्तीपासून आपल्याला काही त्रास होऊ नये म्हणून त्यांना पूजण्याची एक परंपरा सुरू झाली.

पुढच्या काही काळानंतर मनुष्याने आपले जीवन त्या ईश्वराच्या वा ज्ञानशक्तीच्या अधीन राहून नैतिकदृष्ट्या व्यतीत केले, तर त्याला नैतिकपूर्णता प्राप्त होऊन त्या ईश्वरी तत्त्वाच्या परम सुखाचा लाभ होऊ शकतो, अशी साधारण दृष्टी होती हे दिसून येते. पुन्हा काही

काळानंतर असे सर्वोच्च नैतिक जीवन जगणे म्हणजे धार्मिक जीवन जगणे हेच निःश्रेयस अशी संकल्पना लोकारूढ झाली. पुढे ब्राह्मण काळात बाह्य शक्ती, त्यामागचा ईश्वर यावरून ती कृतिप्रधानतेकडे वळली. यज्ञयाग, पूजापद्धती याकडे धर्मतत्त्वज्ञानाचा सक्रिय कल वाढला. निसर्गातील शक्तीखेरीज सर्वश्रेष्ठ अमूर्त शक्तींना प्राधान्य मिळू लागले. विशेषतः विष्णू देवता... बहुधा आधी निर्गुण व मग सगुणात आली. 'यज्ञ वै विष्णू....' यज्ञ अर्थात साधनेसाठी कृती करणे म्हणजेच विष्णू अशी ती रूढ झाली. ब्राह्मण काळात अर्थात, यामुळे कर्मवाद वाढला.

पुढे आरण्यकानंतर आलेल्या उपनिषद काळात यातील काही आचरणाला कर्मकांड म्हटले जाऊ लागले हा भाग वेगळा असला तरीही त्यानंतर त्या कृतीचे इष्ट-अनिष्ट परिणाम साधकांवर काय होतात, याची चिकित्सा नक्कीच सुरू झाली असे दिसते. कारण त्यानंतर परमात्म तत्त्व असलेले परब्रह्म, जीव, त्यांचे तादात्म्य यावर विस्तृत चर्चेचा काळ सुरू झाला. निःश्रेयस, श्रेयस आणि प्रेयस यावर चर्चा सुरू झाली, तशी प्रत्येक कृतीमागचे हेतू तपासले जाऊ लागले. त्याचे मनुष्यावर होणारे परिणाम पाहून मन, बुद्धी, चित्त, चेतना, अचेतन, प्राण, अन्न, विज्ञान, आनंद वगैरे संकल्पना सुस्पष्टपणे आकाराला येऊ लागल्या. त्याचा एक इष्ट परिणाम म्हणून अंतरंग साधनेला एक मूल्य आले. केवळ निसर्गातील बाह्य शक्ती आणि त्यामागे उभे असलेले परमात्म तत्त्व ईश्वर वा ज्ञानतत्त्व यावरून सर्वात्मक असलेल्या ज्ञानतत्त्वावर चर्चा व साधना येऊन ठेपली. यातून विश्वात्मक भाव, विश्वकल्याण वगैरे विचारातून एक उत्तम नैतिक सामाजिक जीवन व धार्मिक जीवन कसे असावे, याचा विचार मांडला गेला. हजारो वर्षांच्या काळात रुजत गेलेले विचार आणि त्याप्रमाणे होत असलेले आचार या चाकोऱ्या पक्क्या करीत गेल्या. त्यातून प्रामाण्यवाद, रूढीवाद, कट्टरता, पंथवाद, जातिभेद वगैरे गोष्टी संस्कृतीच्या जतन प्रक्रियेमध्ये जन्माला येत गेल्या, हे खरे असले तरीही यामध्ये विशुद्ध तत्त्वचिंतन मात्र त्यापासून अबाधित राहिले. त्या तत्त्वचिंतनामध्ये या कुठल्याच गोष्टींना थारा मिळाला नाही. धर्मजीवन हे आश्रमव्यवस्थेतील पद्धतीशी निगडित राहिल्याने एकंदर जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा विरागशील वा अनासक्तीचा होत गेला. त्यातून नवविचारांच्या बाबतीत काहीशी उपेक्षा आणि अस्वीकार्यता निर्माण झाली. केवळ जगण्यासाठी आवश्यक असलेल्या स्वल्प गरजा भागवण्यासाठी उदरनिर्वाहार्थ केलेली कृती वा त्यातून प्राप्त गोष्टींवर ईश्वरदत्त म्हणून श्रद्धा ठेवून केलेली उपजीविका ही सारी विद्वानांची लक्षणे मानली गेली. परिणामी नवविचार आणि जीवन सुलभ व सुखकर जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या सर्व कर्मांपासून विद्वानांनी सुटका करून घेतली. भौतिकतेकडे पाठ फिरवल्यामुळे बाह्य जगाची त्या अर्थाने चिकित्सा संपली. त्यामुळे भौतिक विज्ञानातील संभाव्य शोधाकडे जाणारी वाट बंद होत गेली. मध्येच आलेल्या चार्वाक विचारांनी आणि बौद्ध, जैन या नास्तिक दर्शनांनी काही प्रमाणामध्ये मानवाची सुखदुःखे केंद्रस्थानी ठेवून

जीवन पराङ्मुख झालेल्या समाजाला या प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न केला असला तरीही चार्वाक वगळता कुणाचे वैचारिक मूळ फारसे पक्के नव्हते.

बौद्ध आणि जैन हे दोन्हीही संन्यासधर्मावर वैदिकांपेक्षाही जास्त श्रद्धा ठेवून राहिले. किमान यतीधर्म हे वैदिक धर्माच्या आश्रमव्यवस्थेतील विद्वानांच्या निवडीचा अंतिम व सर्वोच्च टप्पा तरी होता. जैन-बौद्धांत अहिंसेची आत्यंतिकताही होतीच. यमनियमांचे पक्के आचरणकवच सोबतीला होते. त्यामुळे बौद्ध वा जैनांपेक्षा वैदिक धर्म हा जास्त कर्मवादी ठरला. चार्वाकांची परंपरा कितीही भौतिक असली तरीही तिच्या रुजण्याची अपेक्षा करणे अशक्य असावे. कारण चार्वाक विचारांचा अग्निहोत्रादी यागांच्या विरोधासोबतच वेदासारख्या ज्ञानग्रंथालाही विरोध होता. मग भले कारणे काहीही असोत. वास्तविक भौतिक सुखासाठी केल्या जाणाऱ्या पर्जन्ययागासारख्या अनेक क्रियाकर्मात तथ्यांश काय आहे. त्यामुळे मानवाला खरोखरच भौतिक सुखे प्राप्त होऊ शकतील की नाही, यासारख्या अनेक गोष्टींविषयी जडवादी चार्वाक काही करू शकले असते; पण ते न करता सर्वच वैदिक विचारांना चार्वाक विरोध करीत सुटले. द्रष्ट्या ऋषींनी प्रसवलेल्या वेदांना नाकारण्यापलीकडे कुठलेही परिवर्तन चार्वाक करू शकले नाहीत. आपल्या विरोधी विचारांचे रूपांतरण पाश्चात्त्यांप्रमाणे आधुनिक विज्ञानाच्या अभ्यासामध्ये चार्वाकच काय कुणीही करू शकले नाही. वैदिक विचार अर्थात अबाधित राहिले, अभ्यास परंपराही बळकट होत गेली हे खरे असले तरीही चार्वाक विचारांची जडवादी केवळ परंपरा मात्र टिकून राहिली.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञान : स्थित्यंतराचा पर्वकाळ

भारतीय उपखंडामध्ये मानवाच्या तत्त्वचिंतनाचे प्रहर सरत असतानाच पाश्चात्त्य तत्त्वविचारांनी मूळ धरल्याचे दिसून येते. सर्वप्रथम ग्रीकांमध्ये अशा विचारांचे मूळ पक्के झाले. ग्रीक विचारवंत थेल्स यांच्यापासून खरे तर तत्त्वचिंतनाला प्रारंभ झाला असे मानण्यात येते; परंतु तत्पूर्वीही काही विचारवंतांनी त्या दिशेकडे निर्देश करणारे लेखन केलेले असू शकते. केवळ उपलब्ध नाही म्हणून नाकारण्यात काही अर्थ नाही. थेल्सची परंपरा कशी, कोणती याबाबतचे विचारमंथन इथे अपेक्षित नाही. अथवा थेल्सच्या विचारसरणीवर नेमके परिणाम कुणाचे? ते केवळ पाश्चात्त्यांचे की पौर्वात्य विचारवंतांचे विचार तिकडेही गेले होते, या चर्चेला किमान तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात खरे तर काही मूल्य नाही. मुळात तत्त्वज्ञान ही मानवाच्या प्रगत होत जाणाऱ्या विचारांची एक अभिव्यक्ती असते. त्यामध्ये ठाम अशी सैद्धांतिक मांडणी नसते. क्वचित असली तरी अशी मांडणी गणित वा आधुनिक विज्ञानातील सिद्धांताप्रमाणे अंतिम नसते. त्याच्या खंडनमंडनाच्या प्रक्रिया चालच असतात. पौर्वात्य दर्शन वा पाश्चात्त्य दर्शन अशी विभिन्न आणि भेदात्मक मांडणी वरकरणी दिसत असली तरीही ती केवळ खंड वा राष्ट्र यांच्यापुरती मर्यादित असते, ती भाषा वा काळ यांनी परिछिन्न असू शकत

नाही. त्यावर संपूर्ण मानव जातीचा तेवढाच अधिकार असतो. आपले पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन बाजूला ठेवून त्याकडे बघणे हे तत्त्वचिंतकाचे काम असते. त्यामुळे परंपरा नेमकी कुठून कुठे गेली, वा तिकडची इकडे कशी आली या चर्चेला किमान विश्वातील तत्त्वचिंतक तरी फारसे महत्त्व देत नाहीत. पाश्चात्त्य तत्त्वविचारांतून आधुनिक विज्ञानाच्या अभ्यासाची आणि संशोधनाची दारे उघडायला सुरुवात झाली आहे. या कारणाने त्याला एक वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्यानंतर मानवाच्या ऐहिक जगण्यातील प्रश्न सुकर होणे सुरू झाले हे नक्की!

थेल्सपासून साधारणपणे ग्रीक देशामध्ये तत्त्वज्ञानाची परंपरा सुरू झाली, असे मानण्यात येते. प्रारंभी साधारणपणे विश्वरचनावादी तत्त्वविचारांना सुरुवात झाली. विश्वाचा आधार असलेल्या सत् तत्त्वाचे स्वरूप काय असावे, यापासून खरे तर थेल्सने मांडणी केलेली आहे. हे पाहता साधारणपणे विश्वभरातील तत्त्वचिंतकांना सृष्टीचे मूळ काय आहे, सत् तत्त्व आहे की नाही किंवा अंतिम वस्तुमात्र काय आहे, याविषयी साधारण चिकित्सा करण्यात नक्कीच रस होता. थेल्सनंतर आलेला ॲनॅक्झिमीनस वा ॲनॅक्झिमॅन्डर यांनीही विश्वामागे आधारद्रव्य असलेल्या सत् तत्त्वाचे स्वरूप जाणण्याचा प्रयत्न केला आहे.

पाश्चात्त्य विचारवंतांबद्दल एक कौतुकास्पद निरीक्षण असे नोंदवता येईल की, त्यांनी तत्त्वांना जाणण्याचा प्रयत्न बौद्धिक स्तरावर केला. बहुधा असे असल्याने बुद्धिनिष्ठता ही जास्त प्रमाणामध्ये वाढीस लागली. विविध मते आणि मतांतरांचा स्वीकार होऊ लागला व त्याचबरोबर तिकडे तत्त्वज्ञानाच्या उदयानंतर प्राथमिक कालखंडातच विविध विषयांचे असे बीजारोपण झाले की, त्याच्यामुळे विज्ञानाच्या विविध शाखांच्या संशोधनाला मार्ग मिळाला. अगदीच उदाहरण द्यायचे झाले तर पायथागोरसचे देता येईल. अगदी सुरुवातीला तो धार्मिक तत्त्ववेता म्हणून ओळखला गेला होता; पण पुढे त्याच्या राजकीय आणि नैतिक विचारांना समाजाभिमुख करण्याचे काम त्याने जास्त केले; पण एवढ्यावरच त्याची ओळख थांबत नाही. त्याची खरी ओळख ही भूमितीतील सिद्धांतामुळे झाली. अंकगणितातही त्याचे कार्य तसे लक्षणीयच राहिले. एवढेच काय; पण संगीतावरही त्याचे संशोधन होते. याचा अर्थ असा की, केवळ बुद्धिनिष्ठता ठेवल्याने विविध शास्त्रांच्या अभ्यासाकडे पाश्चात्त्य विचारवंत झुकू शकले. अंतिम सत् तत्त्व वा सद्वस्तू ही बुद्धिगम्य नाही, असे ठामपणे स्वीकारले असते, तर कदाचित बाह्य वस्तुजाताकडे चिकित्सेच्या दृष्टीने न पाहता अनुभूतीसाठी आंतरिक साधना करण्याकडे त्यांचा कल वाढला असता. बहुधा अंतिम सत् वा ज्ञान हे बुद्धिगम्य नाही हे स्वीकारल्यामुळे भारतीय तत्त्ववेत्ते आंतरिक साधनेला जास्त मूल्य देऊ पाहत होते. नेमका हा भेद भारतीय तत्त्वचिंतक आणि पाश्चात्त्य तत्त्वचिंतकांमध्ये होता, असे मानावे लागेल. एका पायथागोरसमुळे अनेक शाखांच्या अभ्यासाची पाळेमुळे खोलवर रुजली गेली असे म्हणता येईल. हेरॅक्लिटससारखा विचारवंत हा अनित्यत्व आणि परिवर्तनावर आपले विचार मांडताना इतरांच्या अगदी विरोधी विचारधारा मांडत असतानाही त्याचा स्वीकार केला

गेला ही बाब महत्त्वाची आहे. पारमिनाईडसचे विचार हे तसे भारतीय अद्वैत सिद्धांताच्या अगदी जवळचे वाटत असले तरीही त्याचे अद्वैत हे बुद्धिगम्य आहे. त्यामुळे तो विचार त्या काळामध्येच काय पण आजच्या काळातही तुलना व अभ्यास करण्याजोगा आहे. थोडक्यात, अद्वैत हा विषय बुद्धिगम्य आहे की नाही, यावर लगेच चर्चेला प्रारंभही झाला. झिनो, एंपिडोकल्स वा डिमॉक्रिटस हे विचारवंत वेगवेगळ्या पद्धतीने अगदी विज्ञानाकडे झुकणारेच विचार मांडत होते हे अगदी सिद्ध होते. त्या काळात खगोलशास्त्र, परमाणू अशा अनेक गोष्टींवर अगदी प्राथमिक स्तरावर का होईना; पण अभ्यासपूर्ण मते मांडलेली आहेत.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञान एका वेगळ्या वळणावर आले ते सॉक्रेटिसपासून...! सॉक्रेटिस हा तेव्हाचा क्रांतिकारक विचारवंत होता, हे मानावे लागते. केवळ विचारांना नाकारून वा धक्का देऊन भागणार नाही, तर सत्य नेमके काय आहे, हे जाणण्यासाठी त्यावर चिंतन करणे भाग आहे. हे त्याने स्वीकारले होते. त्यासाठी प्रश्न उपस्थित करणे आणि आलेल्या उत्तरावर प्रतिप्रश्न तयार करून पुढे जाण्याची एक अनोखी पद्धती सॉक्रेटिसने अवलंबिली. यालाच सॉक्रेटिसची 'संशय पद्धती' म्हणून ओळखले गेले. सततच्या चर्चेतून सारतत्त्वाकडे जाण्यासाठी विगमनाची आणि निगमनाची पद्धतीही बहधा त्याच्या काळातच जास्त प्रसिद्ध पावली. सॉक्रेटिसला आपल्या प्राणाची आहुती द्यावी लागली ही नोंद विशेष आहे.

सॉक्रेटिसपासून विशुद्ध तत्त्वचिंतन करणाऱ्या या पिढ्यांमध्ये संप्रदायांचा उदय झाला, असे आपण ठामपणे म्हणू शकतो. त्याचा शिष्य असलेल्या प्लेटोने सॉक्रेटिसच्या संवादाचे लेखन केले. प्लेटोचे डॉयलॉग्ज हे सॉक्रेटिसच्या आज उपलब्ध होऊ शकणाऱ्या तत्त्वज्ञानाचे मूल स्रोत... अन्यथा लिखित स्वरूपामध्ये आज ते उपलब्ध नसते. प्लेटोने पद्धतशीरपणे तत्त्वज्ञानाला एक दिशा दिली असे म्हटले तरी चालेल. सॉक्रेटिसपासून खरे तर सोफिस्टांना पद्धतशीरपणे विरोध करण्याची एक परंपरा सुरू झाली. आपल्या ज्ञानाची विक्री करून प्रसिद्धी मिळवण्याचा हव्यास असणाऱ्या सोफिस्टांची निंदा तेव्हा झाली; पण असे असले तरीही आजच्या घटकेला सोफिस्टांचाच आदर्श केवळ तत्त्वचिंतकांच्याच समोर आहे, असे नाही, तर सामान्य माणसेही सोफिस्टांप्रमाणे वागत असतात ही बाब अधोरेखित करावी अशी आहे.

सॉक्रेटिसनंतर प्लेटो हाच त्याचा शिष्य जास्त लोकाभिमुख झाला असला तरीही ॲन्टिस्थेनिस आणि ॲरिस्टिपस या दोघांचाही प्रामुख्याने उल्लेख करावा असे त्यांचे कार्य आहे. ॲन्टिस्थेनिस याने उपेक्षावाद मांडला तर ॲरिस्टिपस याने सुखवादाची मांडणी केली. एकाच विचारवंताच्या विचारांचे आकलन तीन शिष्यांना विभिन्न कसे होऊ शकते याचे प्लेटो, ॲन्टिस्थेनिस आणि ॲरिस्टिपस हे उत्तम उदाहरण आहे. त्यानंतर आलेला एपिक्युरियनवाद हाही एक प्रकारचा सुखवादच मानला जावा, असा होता. त्यावर डिमॉक्रिटसच्या अणुवादाचा बराच परिणाम होता, असे स्पष्ट जाणवते; पण ॲन्टिस्थेनिसच्या

उपेक्षावादाची अगदी परिपूर्ण वाटावी अशी वैराग्यशील आवृत्ती झिनोने आपल्या स्टॉईकवादामध्ये आणली आहे. स्टॉईकांची विचारधारा ही बरीच वर्षे समाजमनावर गारूड घालत होती, हे अगदी स्पष्ट आहे. खिस्तपूर्व सुरू झालेली ही विचारधारा खिस्तोत्तर दोन-चारशे वर्षे समाजावर अधिराज्य गाजवत होती. याच परंपरेमध्ये स्थितप्रज्ञ असलेला सेनेका आणि रोमन बादशहा मार्कस ऑरेलियसही होऊन गेला. स्टॉईकांचे विचारपर्व हे इतके समर्पित आणि तसे धार्मिक वाटणारे होते की, लोक त्याकडे आकर्षित होणे साहजिक होते; पण त्याच काळात आलेल्या ख्रिस्ती धर्माने स्टॉईकांचा आधार घेत आपले धर्मप्रसाराचे काम सुरू केले आणि पुढे स्टॉईकांना बाजूला सारले गेले. अर्थात, नीती तत्त्वज्ञानापेक्षाही धर्म तत्त्वज्ञानाचा पगडा जास्त बसू लागला.

मार्कस ऑरेलियसनंतर जवळपास सहस्रकभर धर्म आणि नीतितत्त्वज्ञानाचा पगडा पाश्चात्त्यांवर दिसून येतो. त्यानंतर आलेले सेक्स्टस, प्लॉटिनस वगळता सेंट ऑगस्टिन, थॉमस ॲक्विनसारखे ख्रिश्चन विचारवंत, अल किंदी, अल फरेबी, अल रजा, इब्न सिना, अल गजाली वगैरे मुस्लिम विचारवंत आणि इब्न गॅब्रिएल, अब्राहम इब्न दाऊदसारखे ज्यू विचारवंत हे आपापल्या धर्म विचार प्रसारार्थ कार्य करीत होते. त्याच्या अनुषंगाने त्यांनी मनुष्यमात्र आणि त्याचे जीवन यावर काही वैशिष्ट्यपूर्ण कार्य केले असल्याचे फारसे आढळत नाही.

तेराव्या शतकापासून पुन्हा एकवार नवविचारांचे वारे वाहू लागल्याचे स्पष्टपणे दिसून येते आणि रॉजर बेकनसारखा विचारवंत दिसून येतो. तरीही लगेच धर्म आणि तत्त्वचिंतन यांची सरमिसळ झाल्याचीच अनेक चिन्हे दिसून येतात. खरे तर आधुनिक तत्त्वज्ञानाचा कालखंड सुरू झाल्यानंतर म्हणजे सोळाव्या शतकापासून मॅकिएव्हेलीसारखा राजकीय विचारवंत, थॉमस मूरसारखा मानवतावादी, ब्रुनोसारखा खगोलशास्त्राविषयी चिंतन करणारा विचारवंत यांचा काळ सुरू असतानाच फ्रान्सिस बेकन याने अनुभववादाची मांडणी सुरू केली आणि पाश्चात्त्य विचारदर्शनाने एक नवे स्वरूप धारण केले. रेने देकार्त, लायब्निज, स्पिनोझा, जॉन लॉक, बार्क्ली, ह्यूमसारख्यांनी विवेकवाद आणि अनुभववादाची परंपरा पुढे नेली. पुढे जेरेमी बेंथाम, कांटसारखे विचारवंत अठराव्या शतकाच्या उंबरठ्यावर झाले आणि आधुनिक विचारवंतांची परंपरा पुढे सुरू झाली. सतरा-अठराव्या शतकानंतर विविध विचारदर्शनांनी पाश्चात्त्य तत्त्वजगतामध्ये आपले नाव अजरामर केले ही बाब अधोरेखित करण्यासारखी आहे. मग तो चिद्वादी हेगेल असो, उपयुक्ततावादी जेम्स मिल वा जॉन स्टुअर्ट मिल असो. सोरेन कर्केगॉर्दपासून सुरू झालेले मानवाच्या अनिश्चित जीवनाबद्दलचे अस्तित्ववादी विचार पुढे फ्रेड्रीक नित्शे, जिआँ पॉल सार्त्र यांनी पुढे नेले तर हेगेलच्या चिद्वादाला संपूर्ण विरुद्ध स्वरूप देऊन कार्ल मार्क्सने उभा केलेला मार्क्सवाद हा जगभर सामाजिक आणि राजकीय चळवळीचा पाया ठरला. पाश्चात्त्य विचारवंतांची मानवाच्या जगण्याचे विभिन्न आयाम

प्रकाशात आणणारी परंपरा लुडविग विटगेन्स्टाईन, कार्ल जॅस्पर्स वगैरेंनी पुढे नेली. एकंदर जागतिक तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रामध्ये भर घालण्याचे काम या विचारवंतांनी केले, एवढेच नव्हे तर त्यांच्या चिंतनामुळे आधुनिक विज्ञानाच्या पायाभरणीस प्रारंभ झाला.

हिपोक्रेटसनंतर मानवी शरीरविषयक अभ्यास सुरू झालेला असला तरीही ॲरिस्टॉटलनंतर विज्ञानविषयक विभिन्न विषयांना गती प्राप्त झालेली दिसते. गॅलिलियो वा ब्रुनोसारखे खगोलशास्त्रीय अभ्यासक तेव्हा होतेच; पण न्यूटनच्या प्रिंसिपिया या ग्रंथानंतर जवळपास दोन-चारशे वर्षे विज्ञानाच्या संशोधनाला आणि अभ्यासाला प्रचंड गती मिळाली. भौतिकशास्त्रातील महत्त्वाच्या संशोधनाला प्रारंभ झाला. डार्विनच्या उत्क्रांतीवादानंतर जीवशास्त्रीय संशोधनाला एक वेगळे वळण मिळाले. क्युरी दांपत्यानंतर भौतिकशास्त्र आणि जीवशास्त्र यांच्यातील परस्पर सहकार्य वाढीस लागले. एडिसननंतरची क्रांती हा वेगळा विषय ठरेल. आईन्स्टाईन, नील बोहर, राईट बंधू अशा अनेक शास्त्रज्ञांची नावे घेता येतील, ज्यांचे कार्य हे मानवजातीला वरदान ठरले आहे.

तत्त्वज्ञान या एका विषयातून अनेक विद्याशाखांचा जन्म झालेला असला तरीही विज्ञान आणि तत्त्वज्ञान यांच्यात काही साम्यभेद स्थळे आहेतच. सृष्टीमागचे रहस्य उलगडणे आणि मानवास सुख प्राप्त करून देणे हे दोन्हीचेही ध्येय असले तरीही दोन्हीचे मार्ग आणि सुखाच्या संकल्पना विभिन्न आहेत. सृष्टीमागे सत् तत्त्व वा ज्ञानतत्त्व आहे, हे जाणून घेणे हे मानवाचे लक्ष आहे, असे तत्त्वज्ञान सांगू शकते; पण विज्ञान केवळ तेच करीत नाही. सृष्टीमागचे रहस्य उलगडणे एवढेच नाही, तर त्याच्या आधारे मानवी जीवनातील समस्यांचे मूळ उलगडणे आणि उत्तर शोधून समस्यांचे निराकरण करून आयुष्य सुखकर करणे हे विज्ञानाचे लक्ष असते. त्यादृष्टीने अभ्यास, निरीक्षण, चिंतन, मनन, त्यानुसार योग्य प्रयोग, प्रयोगाचे निष्कर्ष व निष्कर्षावर आधारित उपाययोजना ही समाजातील कुठल्याही व्यक्तीसमोर भेदभाव न होऊ देता पोहोचवणे ही विज्ञानाची मानवी जीवनाभिमुख कार्यमहत्ता आहे. आपल्याला उपलब्ध झालेल्या ज्ञानाचे सामान्यीकरण करणे व सर्वांना त्या ज्ञानाच्या साहाय्याने अज्ञानमुक्त करणे हे ध्येय असते. मनुष्य रूढी आणि परंपरा पाळतो म्हणून संस्कृती टिकत असली तरीही चाकोरीबद्धता आणि नियमबद्धतेतून निर्माण होणाऱ्या अंधश्रद्धांतून त्याला सोडवून खरा ज्ञानमार्ग दाखवणारा व जीवन सुखकारक करणारा विज्ञान हा ज्ञानदीपस्तंभ असतो. त्यामुळे विज्ञानाची सर्वंकषता ही जास्त असते. शिवाय तत्त्वज्ञानापेक्षा विज्ञानाचा उपयोजित भाग हा सामान्यांना तसा आचरणासाठी सोपा असतो. त्यामुळे पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आणि विज्ञान हे परस्परपूरक कार्य करीत असल्याप्रमाणे वाटतात.

अर्थात, अशा प्रकारच्या विज्ञान संशोधनाची सगळी दारे भारतीय उपखंडामध्ये बंद होती किंवा अजिबातच प्रयत्न झाले नाहीत असे नाही किंवा भारतीय दार्शनिकांचा त्यांना विरोध होता असेही नाही. भारतीय दर्शने ही मोक्षाभिमुख होती, याचा अर्थ ती पारलौकिक

सुखापलीकडे दुसरे काहीही पाहत नव्हती, असा अर्थ नाही. जीवन चांगल्या पद्धतीने जगण्यासाठी जे काही नैतिक मार्गाने शक्य आहे ते करावे. भौतिक जगण्याला न्याय देत मोक्षप्रद मार्गाने चालू लागावे हीच धारणा होती. भारतीय वेद आणि दर्शनकाळामध्येही बाह्य जगताविषयी कुतूहल होते आणि त्यांच्या परीने त्यांनी सृष्टीतील अनेक गोष्टींचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला होता हे अगदी सुस्पष्ट आहे. आधुनिक विज्ञानाची, अभ्यासाची पद्धती आणि प्रयोगपद्धती ही जास्त सुस्पष्ट व विश्वासार्ह आहे इतकेच! अगदीच वेदकाळात जरी डोकावून पाहिले तरीही बाह्य सृष्टीविषयीचे औत्सुक्य तत्कालीन विचारवंतांना होते हे दिसून येते. वेदांमध्ये काही मंत्र आहेत ते खगोलीय ज्ञानाचे सूचक आहेत. याखेरीज बीजगणित वा अंकगणित आणि भूमितीय ज्ञानाचेही सुस्पष्टपणे संकेत त्यात आहेत; पण हे सारे मानवाच्या विकसनशील काळातील असल्याने त्यात फार मोठ्या प्रमाणामध्ये भर पडली असावी असे वाटत नाही. भारतीय आयुर्वेद मात्र मानवाची शरीररचना वा क्रियाविज्ञानाचा सांगोपांग विचार करीत होते हे दिसून येते. चरक, सुश्रूत किंवा वाग्भट यांच्या कार्यावरून हे स्पष्ट दिसून येते. आयुर्वेदावरून तरी सृष्टीतील वनस्पती विषयांचे ज्ञान एका टप्प्यात पोहोचले होते आणि त्याचे उपायोजनही होत होते, हे सिद्ध होते. सतत प्रयोग करणाऱ्या नागार्जुनासारखे अनेक रसतज्ज्ञ म्हणजे रसायनशास्त्रज्ञ या भूमीत कार्यरत होते, असे म्हणायला हरकत नाही. इसवीसनाच्या पूर्व सहाशे वर्षे झालेला कणाद किमान मूलद्रव्याच्या अंतिम कणापर्यंत विचार मांडत होता ही नोंद घेणे आवश्यक आहे. आर्यभट्टांसारखा गणिती इसवीसनाच्या पाचव्या, सहाव्या शतकात होता. भास्कराचार्यांसारखा गणितीही बाराव्या शतकात होऊन गेला. सिद्धांतशिरोमणी, लीलावती, बीजगणित, गोलाध्यायसारखी प्रकरणे ही त्यांच्या गणिती प्रज्ञेची साक्ष देतात. एकंदर भारतीय तत्त्वचिंतकांपैकी सर्वचजण केवळ मोक्षाचाच विचार करून जीवनपराङ्मुखता दर्शवत होते असे काही नाही. काही प्रमाणामध्ये उपलब्ध साधनांच्या द्वारा त्यांचे विज्ञानविषयक कुतुहलावर उत्तर शोधण्यासाठी प्रयोग चालच होते. पण हे केवळ उपलब्ध साहित्याद्वारे मांडता येते असे नाही, तर शास्त्र, शिल्प, कला, संगीत, शरीराचा अभ्यास, आरोग्य, उपाययोजना यासारख्या अनेक आयामांद्वारे हे सिद्ध करता येते की, अगदी मूलभूत अशा प्रश्नांची उकल करण्यासाठी भारतीय मानस विज्ञानाच्या संशोधनाकडे वळले होते. गेल्या काही शतकांमध्ये पाश्चात्त्य देशांमध्ये आधुनिक विज्ञानाची पहाट झाली आणि ज्या वेगाने त्यातील संशोधनांचे आणि उपकरणांचे सामान्यीकरण झाले ते पाहता भारतीय उपखंडात अशा प्रकारचे विशुद्ध विज्ञानतत्त्वांवर कधी चिंतन झाले नसावे, असे वाटू लागते; पण ते तितकेसे योग्य नाही. भारतीय मानस हे अगदीच पारलौकिक सुखाचा विचार करीत राहिले हे काही खरे नाही. शिवाय गेल्या सहस्रकामध्ये आणि त्या

आधीही देशाटन आणि इतर माध्यमातून ज्ञानाची देवाणघेवाण होतच राहिली. त्याचा एक परिपाक म्हणून आधुनिक विज्ञानामध्येही भारतीय उपखंडातील लोकांनी संशोधनात्मक कार्य केले तर भारतीय विचारधन जगभर तितक्याच आस्थेने स्वीकारले गेले.

महाराष्ट्रीय संत : विशुद्ध ज्ञान आणि नीतितत्त्वांचा विश्वकल्याणप्रद प्रवाह

गेल्या सहस्रकामध्ये संतांनी केलेल्या कार्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला नाही, तर महाराष्ट्रातील तत्त्वचिंतन प्रवाहाची धारा खंडित केल्याप्रमाणे होईल. त्यामुळे आपल्या संतप्रवरांच्या कार्याचा लहानसा आढावा घेणे भाग आहे. महाराष्ट्रातील आद्य कवी मुकुंदराजांपासून ही विचारधारा सुरू होते आणि संत बहिणाबाईंपर्यंत येऊन ठेपते. मुकुंदराज ते बहिणाबाई यांच्यामधील सर्व संतांच्या कार्यांचा आढावा घेणे म्हणजे भागवत धर्माच्या कार्याचा आढावा घेणे आहे. काही जणांचे याविषयी दुमत असू शकेल की, महाराष्ट्रातील संतांनी जे कार्य केले ते तत्त्वज्ञान या विषयाच्या जवळपास तरी जाते किंवा नाही; पण असे काही नाही. महाराष्ट्रीय संत म्हणजे केवळ भक्ती असे गृहीत धरण्यात काही अर्थ नाही. संतांनी जे कार्य केले त्यामध्ये भक्तीसोबतच कर्म आणि ज्ञानमार्गाचाही उल्लेख होणे गरजेचे आहे. संतांनी केवळ भक्तीचे प्रतिपादन केले असे नाही, तर इतर मार्गांचाही यथायोग्य गौरव केला आहे. त्यासाठीच महाराष्ट्रातील संत काय म्हणतात ते पाहू.

भारतीय दार्शनिक साहित्यातील जे विविध विचारप्रवाह सर्वत्र पसरले, त्यातील अद्वैतवादाचा आणि विश्वकल्याणाचा फार मोठा परिणाम महाराष्ट्रात भागवत धर्म सांभाळणाऱ्या संतांच्या कार्यावर दिसून येतो. वेदप्रणीत तत्त्वज्ञान जवळपास सर्वच संतांना मान्य होते, असे दिसून येते. शिवाय संतांची समानतेची शिकवण ज्या अद्वैताच्या पायावर उभी होती तो श्रुतीमान्यच आहे. त्यामुळे मुळात संतांचे कार्य हे भारतीय तत्त्वचिंतकांच्याच मार्गाने जात होते, यात कुठलीही शंका नाही. मग तो संप्रदाय कुठलाही असो किंवा संत कुठल्याही संप्रदायाचा असो, त्याने कधी मानवाच्या कल्याणाचा हेतू मनात ठेवला नाही, असे नाही. मुकुंदराजांसारखा आद्य कवी हा विवेकसिंधू आणि परमामृतामध्ये हीच शिकवण देतो. वेदातील तत्त्वचिंतनाप्रमाणे विश्वामागे असणारे सत् तत्त्व वा ज्ञानतत्त्व हेच सर्वांठायी आहे ही धारणा अगदी मुकुंदराजांच्या विवेकसिंधूत आणि परमामृतातही दिसून येते. विवेकसिंधू[९]... जो मराठीतील आद्य काव्यग्रंथ मानला जातो त्यात पहिल्या प्रकरणात मुकुंदराज लिहितात, 'तू निर्गुण निर्विकार । निःसंगु निराकार । तुझीया स्वरूपाचा पार । नेणती ब्रह्मादिक ॥२॥ ... तूं सच्चिदानंदतनु । षड्भावविकारविहीनु । स्वप्रकाशें प्रकाशमानु । स्वसंवेद्य ॥४॥ ... वेदशास्त्राचा मथितार्थु । मराठीया होय फलितार्थु। तरी चतुरी परमार्थु । कां न घ्यावा ॥११॥

---

९. विवेकसिंधू, संपादन : श्री. विष्णू कृष्ण आठल्ये, प्रकाशक : गजानन चिंतामण देव, गोंधळेकर छापखाना, इ.स. १९११

तर परमामृताच्या अगदी पहिल्याच प्रकरणामध्ये श्रीमुकुंदराज 'जैसा सर्व पटांमाजी येक तंतु । तैसा तूं विश्वी विश्वभरितु । सर्व व्यापुनी विरहितु । अलिप्त तूं ॥७॥' असे सातव्या ओवीमध्ये स्पष्ट म्हणतात. मराठी संतसाहित्यातील सुरुवातीच्या या दोन ग्रंथांतील ओव्यांवरून पुढील संत विचारांचा प्रवाह हा वेदप्रणीत तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्रीय संकल्पनांनी प्रभावित होता, हे अगदी सुस्पष्टपणे दिसून येते. थोडक्यात सांगायचे झाले, तर संतमांदियाळीची अद्वैताची बैठक पक्की होतीच. अर्थात्, या अद्वैताकडे जाताना त्यांनी कर्माची कठोर परीक्षा केली होती. केवळ ईश्वरतत्त्वाला जाणणे हे मनुष्यमात्राचे जीवितकार्य नसून त्या जीवितार्थासाठी काही साधन करणेही तितकेच आवश्यक आहे, हे त्यांनी मान्य केले होते. कर्माची कठोर परीक्षा करण्यासाठी नैतिकतेचे अधिष्ठान पक्के असावे लागते. संतांनी नैतिकता आणि नैतिक जीवन याविषयीचे चिंतन स्वानुभवावर मांडले आहे. संतश्रेष्ठ ज्ञानदेवांपासून ते थेट जगद्गुरू तुकोबारायांपर्यंत सर्वांनी व्यक्ती, व्यक्तीचे काम, कामातील नैतिकता, कर्म कोणते, अकर्म कोणते, त्याज्य कर्म कोणते याविषयी महत्त्वाचे तपशील आपल्या साहित्यामध्ये मांडले आहेत. मनुष्याने आपले कर्म नैतिकता पालन करूनच करावे, मग भलेही त्या मार्गावर चालताना त्याला दुःख सहन करावे लागले तरीही चालेल; पण इतरांना त्यामुळे दुःख पोहोचता कामा नये, अशा कठोर नैतिक वर्तनाची अपेक्षा संतांनी केली नसली तर नवल! वारकरी संप्रदायातील संतांनी केवळ नैतिकता शिकवली नाही, तर ती आचरणामध्ये कशी आणावी याचा वस्तुपाठ स्वतःच्या जीवनातून दाखवून दिला. म्हणून गेल्या सात-आठशे वर्षांपासून वारकरी संप्रदाय हा अगदी आजही सश्रद्धपणे आपले आचरण करीत आहे. ही जीवनपद्धती तशी प्रपंच व्यवस्थित करून देणारी असली तरी भक्तीच्या आधारामुळे समर्पित आहे. तिच्यात आसक्ती नाही. व्यवहार असला तरी त्यात दंभ नाही. ही पारमार्थिक जीवनाची रीत असली तरीही त्यात संसारचक्राकडे दुर्लक्ष नाही वा त्याचा त्यागही नाही. प्रपंच भोगाचा असला तरीही त्यात स्वार्थ नाही. त्यामुळे नैतिक जीवनाची सर्वोच्च स्थिती म्हणून त्या सृष्टीकर्त्या परमात्म्याचे अपरोक्ष ज्ञान आहे. त्याचेच सगुण साकार स्वरूप म्हणून पंढरीला दर्शनाला जाण्याची तळमळ अंतरंगामध्ये आहे. सोबत सोबत्यांना नेण्याची परंपरा आहे. ही परंपरा केवळ जतन केली जाते ती दर्शनाच्या स्वार्थाने नव्हे तर पायी जाता जाता 'जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ॥' अशी अनेक प्राणिमात्रांमध्ये तेच चैतन्य आहे. याचा अनुभव घेत जाणे आहे. विश्वात्मक भगवंताची प्रत्येक भूतमात्रात असलेली छाया ओळखत जाण्याची ही प्रात्यक्षिकाची जीवनपद्धती आहे. त्यातच विश्वकल्याण चिंतन करणे आणि सर्वांभूती दया व्यक्त करीत नैतिक जीवनाची इतिश्री करणे आहे. हे केवळ वारकरी संतांनी सांगितले असेही नाही. सर्व संप्रदायांचा अर्क असाच आहे. श्रीरामदासी संप्रदायाने समुदाय मेळवून कार्य उभे करण्यास सांगितले तेही यासाठी आहे. समर्थांनीही नैतिक जीवनाची उत्कट स्थिती आपल्या ग्रंथात वर्णिलेली आहे. जीवन कसे जगावे आणि विश्वातील प्रत्येक

प्राणिमात्रात त्याच ईश्वराचा अंश आहे, हे कसे समजून घ्यावे हे संतांनी आपल्या आदर्श जीवनातील अनेक उदाहरणांवरून सिद्ध केलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील संतपरंपरा आणि संतांचे जीवन ही केवळ तत्त्वज्ञानाची चालती-बोलती पाठशाळाच नव्हती, तर धर्म, धर्मातील तत्त्वज्ञान, धर्मातील नीतिशास्त्र, उन्नत नैतिक जीवन यांची ती प्रयोगशाळा होती. संतांचे वाङ्मय ही अशा जगण्याची एक संहिता मानली जाते. श्रीमुकुंदराजांचा विवेकसिंधू असो वा परमामृत, नामदेवांची गाथा असो वा ज्ञानदेवांची भावार्थदिपिका, अमृतानुभव, नाथांचे भले थोरले वाङ्मय असो वा तुकोबांची गाथा किंवा श्रीसमर्थांचा दासबोध असो वा एकवीस समासी वा मनाचे श्लोक ही सर्व धर्म जीवनाला व वेदप्रणीत सत्याचे जीवनात आविष्करण करणारी संपदा आहे हे निश्चित!

तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र : मानवाच्या उन्नत विचारदर्शनाचा इतिहास

गेल्या काही सहस्रकांमध्ये मानवामध्ये झालेल्या वैचारिक उन्नतीचा इतिहास पाहणे म्हणजे तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्राचा अभ्यास करणे होय. साधारणपणे उत्क्रांत मानवाचे लक्षण हे त्याच्या विचारांवर आधारित असलेल्या आचारांवरून स्पष्ट होते; पण असे असले तरीही काही मूलभूत भेद ध्यानी घेऊन याकडे बघणे श्रेयस्कर आहे आणि हे भेद तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र आणि मानसशास्त्र यातील आहेत. नीतिशास्त्र ही तत्त्वज्ञानाची एक शाखा आहे. नीतिशास्त्र हे मानवाच्या वर्तनाशी संबंधित असले तरीही ते मानसशास्त्र नाही. मानसशास्त्रात मनष्याच्या आचाराचा अभ्यास महत्त्वपूर्ण मानला जातो, तर नीतिशास्त्रामध्ये केवळ एक अभिव्यक्तीचे साधन म्हणून आचाराचा स्वीकार केला जातो. मानवी आचार हा नीतिशास्त्राचा अभ्यासविषय नसून त्या आचारावर दिलेला नीतिनिर्णय हा आहे. थोडक्यात, मानसशास्त्र म्हणजे मनुष्याच्या आचाराचा अभ्यास करणारे शास्त्र ठरेल, तर नीतिशास्त्र हे मनुष्याच्या आचारावर दिलेल्या नीतिनिर्णयाचे शास्त्र ठरेल. तसे तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाची कुठलीही सीमारेषा ठरवून दिलेली नाही. सृष्टीतल्या कुठल्याही गोष्टीवर केलेले सांगोपांग चिंतन हे तत्त्वज्ञान ठरू शकते. तत्त्वज्ञानातील कुठलेही सिद्धांत हे ठाम असू शकत नाहीत, तर वस्तुज्ञानाच्या परिपूर्ण अपेक्षेने केलेली ती केवळ मांडणी ठरते. कुठल्याशा वळणावरची खूण म्हणून एक सैद्धांतिक रचना कुणीतरी मांडलेली दिसते; पण याचा अर्थ तिथेच थांबावे, असे नाही, तर त्या वळणावरून पुढे जाणे हे त्या अभ्यासकाचे कर्तव्य ठरते.

विषयाच्या शिस्तबद्ध वर्गीकरणाच्या बाबतीत भारतीय तत्त्ववेत्ते फारसे लक्ष देत नाहीत, असे काहीसे आहे. वेद, ब्राह्मण ग्रंथ, आरण्यके, उपनिषदे, वेदांग, षड्दर्शने आणि त्यावर आधारित शास्त्रग्रंथ अशी सरळ सरळ मांडणी आहे. यामध्ये तत्त्वज्ञान, धर्म, नीतिशास्त्र अशी फार स्वतंत्रपणे मांडणी करण्याची गरज का वाटली नसावी, ही बाब विचार करण्याजोगी आहे. मुळात भारतीय उपखंडामध्ये तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्र या दोन्ही गोष्टी सोबतच

जन्माला आल्या आहेत. धर्मशास्त्र म्हटल्यावर नैतिक मांडणी हवीच म्हणून त्या अनुषंगाने नीतिशास्त्रही जन्माला आले. थोडक्यात, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र व धर्मशास्त्र यांची सरमिसळ भारतीय उपखंडामध्ये झालेली आहे. ती इतकी नेमकेपणाने आणि तंतोतंत आहे की, कुठल्याही दोन शास्त्रांमधील सीमारेषा सुस्पष्टपणे सांगता येत नाहीत. त्यामुळे भारतीय उपखंडामध्ये तत्त्वज्ञानाच्या अवकाशामध्ये या गोष्टी वेचून पाहाव्या लागतात. शिवाय भारतीय साधनपद्धती पाहता हे सारे त्यासाठीच केले असल्याची खात्री पटते.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञान मात्र अगदी प्रारंभीच्या काळातच बहुआयामी राहिल्याने त्यामध्ये विभिन्न शाखा आणि त्यांची मांडणी अगदी स्पष्टपणे दिसून येते. ॲरिस्टॉटलने तत्त्वज्ञानाची पाच भागांमध्ये मांडणी केली आहे. .

अ. तर्कशास्त्र (Logic)

आ. तत्त्वमीमांसा (Metaphysics)

इ. भौतिकशास्त्र (Physics)

ई. नीतिशास्त्र (Ethics)

उ. सौंदर्यशास्त्र (Aesthetics)

ॲरिस्टॉटलनंतरच्या विचारवंतांनी भौतिकशास्त्राला त्यातून वगळले. आधुनिक तत्त्ववेत्ते मात्र तत्त्वज्ञानाच्या तीन शाखा मानल्या आहेत.

क. तत्त्वमीमांसा (Metaphysics)

ख. ज्ञानमीमांसा (Epistemology)

ग. मूल्यमीमांसा (Axiology)

क. तत्त्वमीमांसा (Metaphysics) :

तत्त्वमीमांसामध्ये मूलतत्त्वाचे विश्लेषण अपेक्षित असते. तत्त्व या शब्दातून सारी सृष्टी ज्यातून निर्माण झालेली असते त्या तत्त्वाचे विश्लेषण अपेक्षित असते. पाश्चात्त्य विचारवंतांमध्ये थेल्सला जनक मानले जाते. विश्वाचे आदिद्रव्य हे जल आहे, हे त्याने सांगितले. पण पुढे त्याच्या शिष्यांनी मात्र त्याचे खंडन केले असले तरीही या विषयावर चर्चेला सुरुवात झाल्याचे मूल्य मात्र टाळता येत नाही. विश्वाच्या मूलभूत अशा कारणद्रव्याविषयी मात्र चर्चा कायमच चालू राहिलेली आहे. भारतीय उपखंडात मात्र विश्वाचे आदिद्रव्य हे कायमच ईश्वरतत्त्व मानले गेल्याने मूलद्रव्याचे स्वरूप आध्यात्मिक आहे का असा प्रश्न सहजच उपस्थित होतो. याखेरीज पदार्थ, मन, आत्मा, पुनर्जन्म आहे का, ईश्वर वगैरे गोष्टींवरही तत्त्वमीमांसेमध्ये चर्चा सतत झालेली आहे. पदार्थ आणि त्यांचे वर्गीकरण याबाबतीत वैशेषिक दर्शनाने चांगली मांडणी केली आहे जी अभ्यासनीय आहे.

ख. ज्ञानमीमांसा (Epistemology) :

ज्ञानमीमांसा हा तत्त्वज्ञानाचे दुसरे उपांग मानले जाते. याला ज्ञानाचे शास्त्र किंवा प्रमाणविज्ञानही मानले जाते. आधुनिक तत्त्वकाळामध्ये विचारवंतांकडून तत्त्वमीमांसेपेक्षा ज्ञानमीमांसेला जास्त महत्त्व दिले जाते. ज्ञानमीमांसेमध्ये विशुद्ध ज्ञानाचे स्वरूप, ज्ञानाचा स्रोत, ते बुद्धिगम्य आहे की नाही, ज्ञानाचे परीक्षण करून स्वीकार इत्यादी गोष्टी अभिप्रेत असतात. पाश्चात्त्य विचारवंतांमध्ये हा प्रश्न चर्चेत असतो की खरेच सत्य ज्ञान हे बुद्धी प्राप्त करू शकते की अनुभव प्राप्त करू शकतो ? बुद्धी समस्त ज्ञान प्राप्त करू शकते असे मानणारे बुद्धिवादी (Rationalist) आणि अनुभवाने समग्र ज्ञान प्राप्त होऊ शकते असे मानणारे अनुभववादी (Empiricist) म्हणून ओळखले जातात. मानवी ज्ञान कसे निर्माण होते, त्याच्या मर्यादा कोणकोणत्या आणि त्याचे परीक्षण कसे केले जावे, यावर ज्ञानमीमांसेमध्ये विचार केला जातो.

ग. मूल्यमीमांसा (Axiology) :

तत्त्वज्ञानामध्ये ज्ञानाचे मूल्यांकनही केले जाते. तीन प्रकारे मूल्यांकन केले जाते.

१. तार्किकदृष्ट्या मूल्य : याचा अभ्यास तर्कशास्त्रामध्ये (Logic) केला जातो.

२. नैतिकदृष्ट्या मूल्य : याचा अभ्यास नीतिशास्त्रामध्ये (Ethics) केला जातो.

३. सौंदर्यशास्त्रीय मूल्य : याचा अभ्यास सौंदर्यशास्त्रामध्ये (Aesthestics) केला जातो.

याखेरीज तत्त्वज्ञानाच्या विविध शाखा आधुनिक अभ्यासकांनी निर्माण केलेल्या आहेत. ज्यामध्ये इतिहासाचे तत्त्वज्ञान, राजकीय तत्त्वज्ञान, सामाजिक तत्त्वज्ञान, अर्थशास्त्रीय तत्त्वज्ञान, धर्मांचे तत्त्वज्ञान, शिक्षणाचे तत्त्वज्ञान, भाषेचे तत्त्वज्ञान, मानसशास्त्राचे तत्त्वज्ञान अगदीच काय पण विज्ञानाचेही तत्त्वज्ञान अभ्यासकांनी निर्माण केले. हे खरे असले तरीही मराठी भाषकांमध्ये तत्त्वज्ञान, धर्माचे तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, ज्ञानमीमांसा याच गोष्टींना जास्तीत जास्त महत्त्व देण्यात आलेले आहे. आधुनिक विज्ञानाचा प्रसार सगळीकडे झाल्यानंतर तेही भारतीय उपखंडामध्ये स्वीकारले गेले आहे. महाराष्ट्रामध्येही गेल्या दीड-दोन दशकांमध्ये विज्ञान प्रसार आणि प्रचारही झालेला आहे. नीतिशास्त्र आणि तत्त्वज्ञानाचा विचार करता त्यावर गेल्या काही सहस्रकामध्ये प्रचंड प्रमाणामध्ये लेखन झालेले आहे, हे मान्य करायला हवे. विशेषतः धर्म, धर्मांचे तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र या विषयांवर गेल्या सहस्रकामध्ये महाराष्ट्रीय संतांनी जे कार्य केलं आहे, त्याला तोड नाही. महाराष्ट्रीय संतांचे वाङ्मय आजही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे हे विशेष! महत्त्वाची बाब म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानावरील बहुतांशी ग्रंथ हे तसे मौखिकच राहिले. वेदवाङ्मयाचा एकंदर कालखंड बघता त्या काळामध्ये आधुनिक छपाई तंत्र नव्हते हे अगदी उघड आहे. इतका प्राचीन ठेवा जतन करणे ही बाब मौलिक आहे. अशा वेळी हस्तलिखिते तयार करणे हा एक पर्याय होता. तेराव्या शतकामध्ये विनाशाकडे गेलेल्या नालंदा विद्यापीठामध्ये लाखोच्या संख्येने हस्तलिखिते होती; पण त्याहीपूर्वी वेदवाङ्मयांना जतन करण्यासाठी मौखिक परंपरा हीच

जास्त प्रभावी आणि विशुद्ध स्वरुपाची राहिली हे अगदी स्पष्टपणे दिसून येते. बहुधा गायत्री, उष्णिक, अनुष्टुभ, त्रिष्टुभ वगैरे छंदांची रचना करण्याचा आणि त्याच रचनेमध्ये ऋचा लिहून त्या स्वरबद्धतेने मुखोद्गत करण्याचा हेतूही हाच असावा. शब्द, त्यातील हस्वदीर्घता, उदात्त, अनुदात्त व स्वरित उच्चार वगैरे जशाला तसे पाठ करून वाङ्मय जतन करण्याची परंपरा जगात केवळ भारतामध्येच होती. आजही वेदवाङ्मयाच्या बाबतीत हीच परंपरा चालू आणि विश्वासार्ह मानली जाते. प्रारंभी मौखिक, मग हस्तलिखितांची परंपरा उभी राहिली असावी. आजही लाखो अशी हस्तलिखिते उपलब्ध आहेत ज्यांच्या अभ्यास करून ती प्रकाशात आणण्याची आवश्यकता आहे.

हस्तलिखितांची परंपरा भारतीय उपखंडात कधीपासून आहे हे कुणीही सांगू शकत नाही. महाराष्ट्रातही प्राचीन काळापासून मराठी हस्तलिखितांची परंपरा आहेच. मुकुंदराजांचा विवेकसिंधू किंवा महानुभावांचे ग्रंथ हे हस्तलिखित स्वरूपामध्ये आहेत. ज्ञानदेवांच्या ग्रंथाचे म्हणजे ज्ञानेश्वरीचे लेखन सच्चिदानंद बाबा यांनी शके १२१२ मध्ये म्हणजे इसवी सन १२९० मध्ये केल्याची नोंद आहे. शिवाय प्रती नकलण्याचीही नोंद आहेच. नाथांनी त्यानंतर शके १५०६ मध्ये म्हणजे साधारण इसवी सन १५८४ मध्ये ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत केल्याचीही नोंद आहे. नाथांनी ही शुद्ध प्रत तयार करण्यापूर्वी अनेक प्रती हाताळल्याची नोंद आहे. म्हणजे ज्ञानदेवांनंतर महाराष्ट्रामध्ये ज्ञानेश्वरीच्या बऱ्याच हस्तलिखित प्रती तयार झाल्या असाव्यात. नाथांच्या अफाट वाङ्मयाच्याही प्रती तयार झाल्या. मुद्रणाचे युग सुरू झाल्यानंतर ज्ञानेश्वरीची पहिली छापील आवृत्ती बाळशास्त्री जांभेकरांनी इसवी सन १८४५ मध्ये काढल्याची नोंद मिळते. पुढे सोहनी, कुंटे, तुकाराम तात्या, केरळकोकीळ, साखरे, माडगावकर, राजवाडे यांच्या प्रती या इसवी सन १८९० ते १९१० दरम्यान आल्या. वारकरी संप्रदायामध्ये आणि इतरही ठिकाणी ग्रंथांची पारायणे आणि प्रवचने सुरू झाली तेव्हा या प्रतींची संख्या वाढली असावी; पण हे सारे छपाई तंत्र अमेरिकन मिशनऱ्यांच्या प्रेसनंतर सुरू झाले. त्यांच्या पहिल्या छापखान्याची नोंद १८१३ इसवीसनाची आहे. बायबल आणि ख्रिस्ती धर्मप्रचाराचे साहित्य छापणे हा त्यांचा मूळ उद्देश होता. अर्थात् ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलाचे भाष्य छापण्याचा प्रयोगही त्यांनी केला होता, हा भाग वेगळा! १८३१ मध्ये गणपत कृष्णाजी पाटील यांनी मराठी छापखाना सुरू करून मराठी छपाईचा खरा प्रारंभ केला असे म्हणावे लागेल. तरीही धर्म आणि तत्त्वज्ञानपर पुस्तकाच्या आधुनिक छपाईस तसा बराच उशीर झाला म्हणावे लागते. बाळशास्त्री जांभेकरांनी आपले मराठी वृत्तपत्र 'दिग्दर्शन' हे १८३७ इसवीसनामध्ये काढल्याची नोंद मिळते आणि इसवी सन १८४५ मध्ये ज्ञानेश्वरीची प्रत काढली. म्हणजे दिग्दर्शनानंतर जवळपास आठ वर्षे ज्ञानेश्वरीच्या छपाईस लागले. हे फक्त एका ग्रंथाच्या बाबतीत सांगता येते. पण इतरही अनेक हस्तलिखिते आजही आहेत. नाथांच्या समकालीन असलेले दासोपंत यांचे वाङ्मयही मोठ्या प्रमाणावर होतं. त्यातील

बरेचसे आता लुप्त आहे. समर्थ संप्रदायाच्या ग्रंथांच्या बाबतीत तर नेमका आकडा सांगता येण्यासारखा नाही. रामदासी मठातून संप्रदाय आणि इतरही ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती बनण्याचे कार्य हाती घेतले जात असे. तुकोबा आणि बहिणाबाईंचा गाथा आजही उपलब्ध आहे, याचे कारण त्या प्रतीचे केलेले रक्षण आणि पुनर्मुद्रण हेच आहे. पण अशा हस्तलिखित प्रतींनाही एक मर्यादा होतीच. १९१० नंतर जास्तीत जास्त धार्मिक आणि तत्त्वज्ञानपर ग्रंथांच्या प्रती बाजारात अभ्यासकांसाठी उपलब्ध होऊ लागल्या आणि अभ्यासकांसाठी एक नवे दालन उघडले गेले. हे केवळ संत साहित्याच्या बाबतीतच घडले असे मात्र नव्हे. यावर पद्धतशीरपणे संशोधनाचा पायाही घातला गेला. महाभारताची शुद्ध आणि विश्वासार्ह अशी संपादित प्रत तयार करण्याचे कामही मराठी संशोधकांनी केलेले आहेच. महाभारताच्या नीळकंठी प्रतीचा शोध आणि त्यावरून एक विश्वासार्ह प्रत तयार करण्याचे काम कितीतरी वर्षे चालूच होते. अजूनही असे कार्य चालूच असते. पुण्याचे भांडारकर प्राच्यविद्या, भारत इतिहास संशोधन मंडळ. धुळ्याचे राजवाडे आणि सत्कार्योत्तेजक सभा, वाग्देवता मंदिराचे कार्य सर्वश्रुत आहे. धर्म आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात असे संशोधनात्मक कार्य विद्यापीठ पातळीवरही चालू असते.

गेल्या दीड-दोन शतकांमध्ये मात्र अशा प्रकारच्या कामाला जी गती प्राप्त झाली तिचा उल्लेख करणे अनिवार्य आहे. महाराष्ट्रामध्ये जरी अशा प्रकारच्या ग्रंथांची पुनर्मुद्रणे झाली वा नवनिर्मिती झाली असली तरीही ती मुख्यतः धार्मिक स्तरावरच्या तत्त्वज्ञानविषयक ग्रंथाची होती, हे प्रामुख्याने मान्य करावे लागते. तरीही पाश्चात्त्य विचारवंत आणि भारतीय तत्त्ववेत्ते यांच्या विचारांतील तुलनात्मक अभ्यास अनेकांनी अगदी ताकदीने मांडला असल्याची नोंद मिळते. अगदीच उदाहरण द्यायचे झाले तर लोकमान्यांचा गीतारहस्य हे एक आहे किंवा गुरुदेव रानड्यांचे अभ्यासपूर्ण लेखन आहे. याखेरीज अनेक ग्रंथ हे तौलनिक अभ्यास मांडणारे निर्माण झाले असले तरीही परिपूर्णपणे परिचय करून देणाऱ्या ग्रंथांची रचना होणे आवश्यक असते, हे जाणून महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारच्या ग्रंथांची निर्मिती अभ्यासकांसाठी करण्यात आलेली आहे. विशेषतः नीतिशास्त्रावरच्या आणि धर्मशास्त्र... त्यातही दार्शनिक चिकित्सा करणाऱ्या पुस्तकांचा समावेश जास्त आहे. पाश्चात्त्य विचारवंतांची पुस्तकेही अभ्यासार्थ अनुवादली गेलेली आहेत.

यासाठी विशेषतः प्रयत्न कुणी केले असतील तर ते बडोद्याच्या महाराजा श्रीमंत श्रीसयाजीराव गायकवाडांनी केलेले आहेत. शिक्षण, धर्म आणि तत्त्वज्ञान हे त्यांचे तसेही आवडते क्षेत्र होते. शिवाय अनेक आदेश हे लेखी स्वरूपात देण्याची त्यांची पद्धतही तेव्हाच्या राजघराण्यांच्या पद्धतीपेक्षा किंचित वेगळी होती. विचारांनी अत्यंत प्रागतिक आणि बुद्धिवादी असलेल्या सयाजीरावांची हीच कामाची पद्धती अत्यंत मोलाची ठरली. त्यांनी केलेल्या कामाची मोजदाद सहज करता येते. किमान पंचाहत्तर हजारांपेक्षा जास्त

आदेश लेखी काढणारा हा किमान भारतातील एकमेव राजश्रेष्ठ असावा. त्यामुळे झाले काय की, त्यांच्या कार्याचा अभ्यास करणे अतिशय सुलभ झाले. सयाजीरावांच्या हे लक्षात आले होते की, धर्म, तत्त्वज्ञान तसेच नीतिशास्त्रीय ग्रंथांसोबतच अनेक ग्रंथ हे प्रकाशित होऊन सामान्यांच्या हाती गेले पाहिजेत. तसेच पाश्चात्त्य विचारवंतांचे विचारधनही मराठी भाषेमध्ये उपलब्ध असल्याशिवाय अभ्यासकांना वाचता येणार नाही. त्यासाठी त्यांनी श्रीसयाजी साहित्यमालेच्या माध्यमातून अनेक लेखकांना लेखनास प्रोत्साहन दिले, तसेच अनुवादकांकडून कित्येक पुस्तकांचा अनुवाद करवून घेतला. त्यातील जवळपास सर्व पुस्तके आता एक तर कालबाह्य आहेत वा जीर्णावस्थेत तरी आहेत. सयाजीरावांच्या निधनानंतर म्हणजे ६ फेब्रुवारी १९३९ नंतर मात्र या प्रकल्पाला मिळालेला एकमेव राजाश्रय नाहीसा झाला. पुन्हा असा विद्याप्रेमी, विज्ञाननिष्ठ व बुद्धिवादी राजा आपल्याला लाभला नाही, हे खरेच!

अशा अनेकविध ग्रंथप्रेमींच्या प्रयत्नातून काही महत्त्वाचे ग्रंथ हे अभ्यासकांना उपलब्ध होत गेले, तसेच अनुवादकांच्या माध्यमातून पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा परिचय होत गेला. तत्पूर्वी कुठल्याही पाश्चात्त्य विचारवंतांचे विचार मराठी भाषेमध्ये अनुवादित झालेले असतील असे वाटत नाही किंवा अगदीच सांगायचे झाले तर ब्रिटिशांच्या अमलाखाली असताना जेवढी पुस्तके इंग्रजीतून उपलब्ध होती त्यापेक्षा जास्त काही संदर्भासाठी नसावे. शिवाय इंग्रजी वा इतर भाषा शिकण्याची सोयही सर्वसामान्यांसाठी नसल्याने व आधुनिक शिक्षणाचा प्रसार नसल्याने जागतिक तत्त्वज्ञान वा विचार यांचा परिचय मराठी भाषकांना होत असेल असे काही वाटत नाही. आधुनिक छपाई यंत्रानंतर भारतामध्ये अशा प्रकारचा शिक्षण प्रसार वेगाने होऊ लागला, हे मान्य करायला काही हरकत नाही. शिवाय जागतिक विचारधन हाती आल्यानंतर भारतीय विद्वानांना तौलनिक अभ्यास करून आपल्या विचारांना पडताळून पाहता येऊ लागले. आपल्या सांस्कृतिक संचितामध्ये नवी भर पडली.

गेल्या शतकामध्ये मात्र काही प्रमाणामध्ये या परिश्रमाला किंचित ओहोटी लागली की काय अशी शंका येते. नवशिक्षणाचे वारे जरी महाराष्ट्रातून वाहू लागलेले असले तरीही शिक्षण हे केवळ चरितार्थाचे साधन म्हणून त्याकडे पाहिले गेले. विद्याप्रेमी शिक्षक मंडळी हळूहळू कालौघात नष्ट होत गेली. पोटाची खळगी भरण्याचे साधन म्हणून शिक्षणाकडे जसे जसे पाहण्याची दृष्टी निर्माण होत गेली तसे तसे इंग्रजी शिक्षणाचे वारे वाहू लागले. संस्कृत भाषेला मृत भाषेचा दर्जा देण्यात आला. मानवाच्या इतिहासामध्ये ज्यांनी आद्य वाङ्मय निर्माण केले त्या वेदकर्त्या ऋषींना आणि विचारवंतांना वर्ण-जातीच्या वेष्टणात गुंडाळून बाजूला ठेवण्यात आले. इंग्रजी भाषा हीच केवळ आधुनिक जगामध्ये टिकेल आणि जो इंग्रजी शिकेल तोच जगात जगू शकेल अशा अभिनिवेशाने मराठीकडेही हेतूपुरस्सर दुर्लक्ष करण्यात आले. मग प्राचीन भाषांनी संपन्न असलेल्या आपल्या देशातील जागतिक आद्य

वाङ्मयाकडे कोण पाहणार? बरे, इंग्रजी शिक्षण घेतले तरी तेही केवळ आर्थिक संपन्नता प्राप्त व्हावी यासाठी घेतले जावे. त्यामुळे आर्थिक संपन्नता हाच शिक्षणाचा केवळ निकष ठरला. मग इंग्रजी येत असूनही माणसामध्ये माणूसपण आणणाऱ्या पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांचे विचार वाचणार कोण? शिवाय मुळात ज्या मानवशास्त्रातून सारी शास्त्रे निर्माण झाली त्याचा कुणी विचारही करीत नाही अशी स्थिती निर्माण झाली. त्यामुळे अर्थातच तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्राच्या अभ्यासाचे निकष बदलले. परिणामी लिहिल्या जाणाऱ्या पुस्तकांची संख्या कमी झाली..

परंतु तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र हे मानवाचे भौतिक जीवनामध्येही प्रागतिकता आणणारे विषय आहेत, हे समजून घेतले पाहिजे. तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र यांना कुठल्याही सीमारेषा नाहीत. मानवाच्या जगण्याच्या प्रत्येक क्षणाचे आणि त्याला पडणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचे चिंतन हे तत्त्वज्ञानामध्ये रूपांतरित होऊ शकते. तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र ही शास्त्रे नसून विचार करण्याच्या पद्धती आहेत, हे जोपर्यंत समजत नाही तोपर्यंत हा याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे शक्य नाही आणि जोपर्यंत जीवनाभिमुख असणाऱ्या या विचारधनाचा परिचय होत नाही, तोपर्यंत त्याच्या जगण्याचा आशय त्याला गवसणे शक्य नाही. याच विचारातून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने इसवी सन १८६४ ते १९४७ या कालखंडातील काळाच्या ओघात नष्ट होत असलेल्या दुर्मिळ ग्रंथांच्या पुनर्मुद्रणाचा प्रकल्प मराठी भाषकांसाठी आखला आहे. तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र या विषयांचा परिचय नव्याने होणे गरजेचे आहे. पाश्चात्त्य व भारतीय तत्त्वचिंतकांचा परिचय होणे आणि त्यांचे कार्य लोकांपर्यंत पोहोचणे हे गरजेचे आहे. तत्त्वज्ञान व नीतिशास्त्र म्हणजे केवळ क्लिष्ट वा ऐहिक जीवनाकडे पाठ फिरवून बसलेली शास्त्रे नसून पदोपदी पडणाऱ्या प्रश्नांना उत्तरे मिळवून देणारी शास्त्रे आहेत, हे समजावे हा त्यामागचा हेतू आहे. नीतिशास्त्र समजल्याशिवाय नैतिक जीवन म्हणजे काय, हे कसे समजावे आणि नैतिकतेचे अधिष्ठान आपल्या वर्तनात कसे यावे? याकरिता प्राचीन भारतीय व पाश्चात्त्य नीतितत्त्वापासून ते आधुनिक काळातील विद्वानांची नीतिशास्त्रांवरची मते समजावी, अशा ग्रंथांची निवड करण्यात आलेली आहे. तत्त्वज्ञान म्हणजे केवळ आदिभौतिक बाब नव्हे, तर जगण्याचेही तत्त्वज्ञान असते. नीतिशास्त्र हाही तत्त्वज्ञानाचाच भाग आहे. धर्माचे तत्त्वज्ञान, राजकीय तत्त्वज्ञान, सामाजिक तत्त्वज्ञान, शिक्षणाचे तत्त्वज्ञान, मानसशास्त्राचे तत्त्वज्ञान, विज्ञानाचे तत्त्वज्ञान असे तत्त्वचिंतनाचे विभिन्न विषय किमान सुशिक्षितांच्या दृष्टीस तरी पडावे हाच यामागचा हेतू आहे. विभिन्न तत्त्वज्ञानपर ग्रंथसंपदा तशी अफाट असली तरीही किमान तत्त्वज्ञान व नीतिशास्त्रची चौकट सामान्यांना समजावी व त्यांनी अभ्यासास उद्युक्त व्हावे ही अपेक्षा आहे. त्यासाठी काही महत्त्वाच्या ग्रंथांची निवड पुनर्मुद्रणासाठी करण्यात आलेली आहे.

संपादन करताना काही महत्त्वाच्या बाबी गृहीत धरण्यात आलेल्या आहेत. मूळ लेखकांचे ग्रंथ वा त्यांनी केलेला अनुवाद हा जास्तीत जास्त त्यांच्या मूळ लेखनाप्रमाणेच

ठेवण्यात आलेला आहे. तत्कालीन मराठी भाषेमध्ये उपयोगात आणलेले शब्द वा व्याख्या यांना तसेच ठेवण्यात आलेले आहे; परंतु त्या त्या जागी प्रचलित मराठी शब्दांची योजना काय आहे, हे टिपा देऊन सांगण्यात आलेले आहे किंवा काही ठिकाणी काही महत्त्वाच्या अवतरणांचा समावेश टिपेमध्ये करण्यात आलेला आहे. काही जागतिक ग्रंथ हे केवळ दुर्लक्ष झालेले आहेत. त्यांच्या बाबतीत असे म्हणता येते की, त्या ग्रंथांचे मराठी अवतरण हेच काय ते अभ्यासार्थ उपयुक्त आहे. काही ग्रंथांचा अनुवाद होताना त्यातील बरेचसे लेखन हे संदर्भहीन वाटते. मूळ पुस्तकाचा लेखनाचा कालखंड, त्याचा अनुवादाचा कालखंड आणि अनुवादातील मराठी भाषेची उपयोजनाची पद्धती पाहता ते तसे वाटू शकते; पण त्या काळातील त्या पुस्तकांची व ज्ञानप्रसाराची गरज पाहता ते केलेले आहे, हे लक्षात येते. अशा वेळी ससंदर्भ टिपा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे ग्रंथ वाचताना त्यातील कालबाह्यता जाणवणार नाही.

प्रत्येक ग्रंथाचा समावेश करताना एक प्रदीर्घ प्रस्तावना देऊन त्याचा समावेश करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच उपलब्ध ग्रंथांच्या आधारे त्या त्या तत्त्वज्ञांच्या कालातील धागे जोडण्याचा एक प्रयत्न केला आहे. त्यामुळे तत्त्वज्ञान असो वा नीतिशास्त्र त्या त्या विषयाच्या लेखन काळातील विविध विचारांना जोडून घेत सलगता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे मानवाच्या वैचारिक उत्क्रांतीच्या एका वळणाचे आपण शब्दश: का होईना; पण साक्षीदार होत आहोत, याची जाणीव होत आहे. प्रत्येक ग्रंथाचा परिचय हा त्यातील विचारवंतांच्या विचारांचे केवळ परिशीलन नसून त्यांच्या पर्वकाळात, समकाळात व उत्तरकाळातल्या घडलेल्या वैचारिक मंथनांचा आलेख आहे. तो सद्य:काळातील विचारांसोबत आणण्याचा आणि सद्यकालीन जीवनपद्धतीशी जोडून पाहण्याचा एक प्रयत्न आहे. हे करीत असताना विषयाचे वाचकांना आकलन सुलभतेने व्हावे, हा विचार मनात होताच. त्यासाठी अनेक ठिकाणी पाश्चात्त्य आणि पौर्वात्य अशा सीमारेषा न आखता परस्पर तौलनिक संदर्भही दिलेले आहेत. भारतीय मानस विशेषतः मराठी मानस हे सश्रद्ध आणि आध्यात्मिक आहे; परंतु असे असले तरीही ते विज्ञाननिष्ठ व बुद्धिवादीही आहे याची जाणीव ठेवून विविध संदर्भाची रचना केलेली आहे. महाराष्ट्रातील संतसाहित्य हा मराठी माणसाचा सांस्कृतिक आत्माच आहे, असे म्हणावे लागेल. शक्य तिथे त्यांच्या वचनांचा संदर्भ देण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारतीय तत्त्ववेत्ते काय म्हणतात, हे आकलन होण्यासाठी संतांचे संदर्भ या ओळखीच्या खुणा ठरतात, तर विशेषतः पाश्चात्त्य विचारवंतांचे विचार समजण्यासाठी उपनिषदादी संदर्भ हे जास्त वैचारिक स्पष्टता आणून देतात. त्यासाठी अनेकविध ग्रंथांतील संदर्भ देण्यात आले आहेत.

औद्योगिक क्रांतीनंतर गेल्या शतकभरामध्ये आमुलाग्र बदललेल्या जीवनपद्धतीने अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. जीवितार्थाची नवी साधने उभी राहिली असली तरीही सामान्य माणसाच्या आयुष्यातील जगण्याची असोशी गेली हे वास्तव आहे. हाताचे काम

यंत्रावर गेले, उत्पादनाचा वेग वाढला, तरीही माणसाला पोटासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षातून किंचितही सुटका झाली नाही, उलट जगण्याची स्पर्धा वाढली. त्याखेरीज गेल्या शतकभरातच साम्राज्य आणि शस्त्र अशा दोन स्पर्धाही निर्माण झाल्या. दोन महायुद्धेही झाली. विश्व तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे का असा प्रश्न पडावा असे सुप्त युद्ध विविध पातळ्यांवर चालू आहे. आता शस्त्रांचे युद्ध तर चालू आहेच, त्याखेरीज मानवाच्या मानवी अस्तित्वावर 'खरेच हाही मानवच आहे का?' असा प्रश्न पडावा, असे वैचारिक युद्धही चालू आहे. उत्क्रांत मानवाचे लक्षण समजले जावे अशी व्यवस्थाच युद्धाचे कारण बनत आहे. धर्म व तत्त्वज्ञान हे शांततेसाठी की शांततेच्या विनाशासाठी हा प्रश्न पडत आहे. अशा वेळी खऱ्या वैचारिक विश्वाची ओळख सामान्य माणसाला होण्याची गरज आहे. त्याने नैतिकतेच्या प्रश्नावरून कुणावरही अगदी स्वतःवरही संशय व्यक्त करावा, अशी ही वेळ आहे. अत्यंत अस्थिर अशी जीवनपद्धती, राजकीय स्थिती, धर्म, नीती आणि तत्त्वज्ञानाच्या नावाखाली होत असलेली फसवणूक, कोसळत चाललेले सामाजिक स्वास्थ्य यामुळे माणसाला मानवी जगण्याची शाश्वतता वाटू नये अशी स्थिती आहे. अशा वेळी एकच उपाय तो म्हणजे जगण्याचे इप्सित काय, मूल्य काय हे जाणले जावे. तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्राचा नेमका याच काळात परिचय होण्याची गरज आहे आणि हीच खरी या अभ्यासामागची प्रस्तुतताही आहे. वाचक यामागची ही भूमिका समजून घेतीलच. अभ्यासकही हे विचारधन पुढे घेऊन जातीलच.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने हा प्रकल्प हाती घेऊन अभ्यासकांना एक दालन खुले करून दिले आहे. संपादनाची जबाबदारी पार पाडताना अनेक विषयांच्या अभ्यासास उजाळा मिळाला. तुलनात्मक अभ्यास मांडताना बरेच काही शिकता आले. अर्थात, मूळ ग्रंथकारांच्या परिश्रमाच्या तुलनेत हे काही फार नाही. तरीही त्रयस्थपणे सारे काही मांडण्याचा प्रयत्न केला आहे. वाचक आणि अभ्यासक या ग्रंथाचा लाभ घेतील, अशी खात्री आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने ही जबाबदारी माझ्याकडे सोपवली त्याबद्दल मंडळाचे माजी अध्यक्ष माननीय श्री. बाबा भांड सर, विद्यमान अध्यक्ष माननीय श्री. डॉ. सदानंद मोरे सर, मंडळाचे सचिव व सर्व सदस्य मंडळाचे आभार व्यक्त करतो. तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्रपर या ग्रंथाचे सर्व खंड अभ्यासकांच्या संग्रहात असतील, अशी खात्री आहे.

- वसु भारद्वाज
ग-३५, ज्ञानेश्वर कॉलनी,
मध्यवर्ती परिसर, म. फुले कृषी विद्यापीठ,
राहुरी, जि. अहमदनगर. पिन-४१३ ७२२
भ्रमणध्वनी : ९८५०७७८९४८,
९४०४११३२१२

संपादकीय

तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र या मालिकेतील 'तत्त्वज्ञान आणि विचारदर्शन, खंड पहिला' यामध्ये आपण पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांच्या एकंदर विचारविश्वाचा आढावा घेतला. त्यानंतर 'तत्त्वज्ञान आणि नीती : पौर्वात्य आणि पाश्चात्त्य, खंड दुसरा' यामध्ये आपण भारतीय तत्त्वचिंतनाची धारा आणि त्यासोबतच होत गेलेला नीतिशास्त्राचा उद्गम आणि विकास यांचा आढावा घेतला. ज्यामध्ये आपण नीतितत्त्वज्ञानाची नेमकी पार्श्वभूमी काय आहे, हे समजून घेण्याचा प्रयत्न केला. नीतिशास्त्राची व्याख्या व स्वरूप समजून घेऊन विविध प्रश्नांवर चर्चा करीत आपण नीतिशास्त्रातील समस्याही समजून घेतल्या. नीतिशास्त्राच्या संभाव्य अभ्यासपद्धती मांडून एकंदरीतच उत्तम अभ्यासपद्धती कोणती असू शकते, यावर चर्चाही केली. ज्यामध्ये स्पेन्सरच्या भौतिक व जैविक अभ्यासपद्धतीचे उदाहरणही पाहिले. नीतिशास्त्र केवळ अभ्यासाचे शास्त्र आहे की उपयोजित शास्त्र आहे, हेही पाहिले. नीतिशास्त्राच्या अभ्यासाने काय काय घडू शकते याचा विचार पाहिला. नीतिशास्त्राच्या अभ्यासाने केवळ व्यक्तीच नव्हे, तर समाज, राज्य वगैरेंना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष लाभ होतच असतो. नीतिशास्त्राच्या अभ्यासाचा समाजातील विविध संस्थांवर होणारा सुपरिणाम आपण त्यात रेखाटला होता.

नीतिशास्त्राचा उगम आणि विकास पाहताना मागील खंडात आपण वेदकाळापासून होत असलेला नैतिक तत्त्वांचा विकास कसा होता हे पाहिले. त्यामध्ये वेदकाळापासून सुरू असलेली विचारधारा ही मानवी जीवनामध्ये नीतितत्त्वांची बांधिलकी काय आहे, हे कसे स्पष्ट करते ते समजून घेतले. वेदकाळामध्ये ऋत् या सृष्टीच्या व्यवहारामागे असलेल्या नैतिक संकल्पनेच्या मूलतत्त्वाचे स्पष्टीकरण आहे. या ऋतापासूनच सारे काही निर्माण झालेले आहे. हे ऋत् तत्त्व म्हणजे सत् तत्त्व असलेल्या ईश्वराचे स्वरूपच आहे. त्यामुळे या ऋतापासूनच सारे काही निर्माण झालेले आहे. हे ऋत् तत्त्व म्हणजे सत् तत्त्व असलेल्या

ईश्वराचे स्वरूपच आहे. त्यामुळे या ऋताला ओलांडून देवदेवताही कार्य करू शकणार नाहीत, हे स्पष्ट होते. सृष्टिगत तत्त्व असलेल्या या ऋताचे मानवी जीवनामध्ये असलेले अवतरण म्हणजे सत्य होय. ऋताच्या संकल्पनेतून पुढे सत्य, मग परोपकार, विश्वप्रेम, मैत्री, शौर्यादी गुणांचा विकास होत गेलेला आहे. ऋत् या एका शब्दामध्ये पूर्वेचे सारे नैतिक अधिष्ठान वसलेले आहे, असे समजायला हरकत नाही. वेदकाळातच धर्म आणि नीतिशास्त्र यांची अशी सांगड घातलेली दिसते, की पुढे या दोन्ही संकल्पना या सामरस्याने पुढे गेल्याचे आपल्या निदर्शनास येते. वेदकाळानंतर येणारा ब्राह्मण ग्रंथांचा कालखंड आणि त्यानंतर आलेला उपनिषदांच्या वैचारिक मंथनाचा कालखंड हे सारे आनुषंगिक आहे. वैचारिक मंथनातील सातत्य आणि त्याचा परिपाक म्हणून उत्तरोत्तर परिपक्व विचारधारा प्रसवल्या जाणे हे शक्य आहे. उपनिषदातील चर्चेत केवळ नैतिकता ही काय असते यावर चर्चा होऊन पुढे मनुष्यासाठी प्रेयसापेक्षा श्रेयसाची प्राप्तव्यता जास्त असते हे सिद्ध झाले. पूर्वेच्या नैतिक संकल्पनांचा हा सर्वोच्च बिंदू होता, असे समजायला हरकत नाही, कारण त्यानंतर याच श्रेयसाच्या प्राप्तीसाठी हेतुपूर्वक उभारावी लागलेली जीवनपद्धती आणि त्यासाठी निश्चित करावी लागलेली आचरणपद्धती याची चर्चा जास्त आहे. गीतेचा काळखंड हा यासाठीच कर्माची निवड आणि कर्माचे फळ यावर चर्चा करतो, ही त्याच शृंखलेतील कडी आहे.

ऋत्..., त्याचे मानवी जीवनामध्ये सत् स्वरूपात होणारे अवतरण, मनुष्याच्या श्रेयसासाठी त्याने प्रेयसातून सुटका करून घेऊन केलेली कर्माची निवड व फलनिष्पत्ती यांचा विचार करता कर्मसिद्धांताचे नैतिक तत्त्वज्ञानामध्ये अवतरण सहज आहे. मनुष्याचे नियत कर्म कोणते, हे ठरवण्यासाठी पुनश्च स्वधर्माची निवड पाहावी लागते. मग स्वधर्माने कर्मफलाचा त्याग करून केलेले हे कर्म हे श्रेयसाकडे नेते; पण त्यासाठी सद्गुणांचा अंगीकार आवश्यक आहे. त्यांचा अंगीकार करून वर्तन केल्याशिवाय हे शक्य नाही. म्हणून आपण पूर्वोक्त तत्त्वज्ञान आणि विकसित असलेले नीतिशास्त्र यांचा सारांशग्रंथ म्हणून गीतेकडे पाहतो.

स्मृतिग्रंथांनंतरचा काळ हा बौद्ध-जैनांच्या उदयाचा होता. नैतिक जीवनामध्ये निरीच्छता येणे म्हणजे निर्वाण अशी बौद्धांची धारणा असल्याने आणि आत्म्याची पूर्णावस्था म्हणजे मोक्ष ही जैनांची धारणा असल्याने आचरण व काही तात्त्विक मुद्यांचा भेद वगळता पूर्वेकडच्या नैतिक संकल्पनांमध्ये कुठलाही आमूलाग्र बदल होऊ शकला नाही हे वास्तव आहे. त्यामुळे पुराणांच्या काळामध्ये नैतिक संकल्पनांवर केवळ चर्चा झाली आणि पुनश्च श्रेयसाकडे मानवाने कसे वळावे यासाठी दिशादर्शन केले गेले असे मानावे लागते. दर्शनांच्या कालखंडात पुन्हा एकवार नैतिक उद्दिष्टाच्या बाजूने चर्चा झाल्याचे लक्षात येते. मानवी आत्म्याला कुठल्याशा उदात्त हेतूसाठी अभिव्यक्त व्हायला आवडते आणि तो हेतू संपादन करणे हेच श्रेयस असले तरीही त्या श्रेयसाचे नेमके स्वरूप निश्चित कसे करावे, यासाठी पूर्वेकडे उपनिषदाच्या काळखंडानंतर दार्शनिक चर्चा जास्त सुस्पष्ट आहे. न्याय

आणि वैशेषिकांनी स्पष्ट केलेली निःश्रेयस ही स्थिती प्राप्त करण्याचे मार्ग सांगितले आहेच. द्रव्यगुणकर्मादी पदार्थांच्या साधर्म्य व वैधर्म्यांच्या 'तत्त्वज्ञानातून निःश्रेयसाची प्राप्ती होते असे सांगणारे वैशेषिक दर्शन आणि प्रमाणप्रमेयादी सोळा पदार्थांच्या ज्ञानातून विशुद्ध ज्ञानतत्त्व असलेल्या निःश्रेयसाची प्राप्ती होते हे सांगणारे न्यायदर्शन यांची एक वेगळी; पण दिग्दर्शन करणारी चर्चा आहेच. सांख्यांचे, 'प्रकृतीपेक्षा मी भिन्न आहे हे पुरुषाने जाणणे असे कैवल्य' आणि योगाचे, 'देह आणि मनाला विवेक व वैराग्याच्या साहाय्याने शिस्त लावून प्राप्तव्य असलेल्या समाधीचे कैवल्य' यामध्ये केवळ कैवल्य या संकल्पनेत... सांख्यप्रणीत दर्शनात द्रष्ट्याची 'बुद्धिगम्यता' आणि योगप्रणीत दर्शनात 'स्व-रूपावस्थेची अपरोक्षानुभवता' एवढा भेद नक्की आहे; पण तरीही दोन्हीच्याही नैतिक प्रतिपादनामध्ये कुठेही विसंगती आढळत नाही, हे विशेष आहे. पूर्वमीमांसा वेदाज्ञा म्हणून शास्त्राचे काटेकोर पालन करायला सांगते. हीच त्यांची नैतिक संकल्पना आहे. ऋताच्या परिपूर्णतेची अप्रत्यक्ष आश्वासकता इथे पुनश्च आढळते. उत्तरमीमांसा वा वेदान्त दर्शनाचे स्वमतमंडनार्थ विभिन्न आचार्य कार्य करीत असले तरीही केवळ अंतिम लक्ष्य असलेल्या मोक्षस्वरूपाविषयीची मतभिन्नता दिसून येते. सत् तत्त्वाचे अस्तित्व मात्र सर्वांनी एकसारखे स्वीकारलेले आहे. अगदी अद्वैत सिद्धांत प्रतिपादन करणाऱ्या विभिन्न आचार्यांमध्ये मतभिन्नता जरी दिसून येत असली तरीही ती केवळ मांडणीतील व अद्वैतसिद्धीसाठी कराव्या लागणाऱ्या शाब्दिक रचनेतील तपशिलातील आहे. अद्वैत वा ईश्वरी कृपेची अवस्था वा मोक्ष याच्या अस्तित्वाविषयी कसलाही भेद दिसत नाही, म्हणूनच नैतिक संकल्पनेमध्ये कुठेही भेद नाही.

नीतिवाङ्मयाच्या कालखंडामध्येही गुणावगुणांची चर्चा आहे, तसेच भागवत संप्रदायाच्या काळातही वैचारिक समन्वयाची बरीच चर्चा आढळते. हीच विचारधारा पूर्वेकडे संतांनी पुढे नेलेली आहे, हे सिद्ध करण्याचीही गरज नाही. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानामध्ये नीतिवाङ्मयाचा विकास कसा होत गेला हे बघणे मनोरंजक आणि ज्ञानवर्धकही आहे. कारण पाश्चात्त्यांमध्ये नीती व मनुष्याची जीविताची उद्दिष्टे याबाबत विविध मते आहेत. थेल्सनंतर आलेल्या सोफिस्टांच्या कालखंडामध्ये बहुधा नीतिशास्त्रीय चिंतनाला आणि रचनेला प्रारंभ झाला असावा, असे समजायला हरकत नाही. कारण सोफिस्टांच्या कार्यपद्धतीनंतरच खरे तर नीतिमत्ता आणि सद्विचार यावर वाद सुरू झाले. सॉक्रेटिसच्या आगमनानंतर त्याने सोफिस्टांच्या विचारधारेला सुरुंग लावला आणि नीतिविषयक नवविचार सुरू झाले. सिज्विकने पुढे सॉक्रेटिसने ज्ञानाला अवास्तव महत्त्व दिल्याचा दोष दिलेला असला तरीही नीतिविषयक कुणाचे दुमत दिसत नाही. ज्ञान आणि सद्गुण यांचा अविच्छेद्य संबंध प्रतिपादन करून त्याप्रमाणे जीवन जगण्याची रीत प्रतिपादन करणाऱ्या सॉक्रेटिसनंतर खरे तर पाश्चात्त्य नीतिशास्त्राला वेगळे वळण मिळाले. सॉक्रेटिसच्या नीतिसंकल्पनांना पुढे नेण्याचे कार्य प्लेटोने लेखनाच्या माध्यमातून केले. ॲरिस्टॉटलनेही प्रचंड ग्रंथसंपदा लिहून कार्य पुढे नेले.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानामध्ये विशेषतः रोमन कालखंडामध्ये रोमन लोकांची बुद्धी ही स्वभावतः व्यावहारिक असल्याने त्यांच्याकडे नैतिक वा तात्त्विक चर्चा फार काही केली गेली नाही, ही बाब अपरिहार्यपणे स्वीकारावी लागते. शासनाचा दबाव असतानाही पुढे नीतिशास्त्राला मूल्यांकित करणारे स्टॉईक, एपिक्युरियन वगैरे पंथांचा प्रचार होतच गेला आणि शेवटी नीतिशास्त्रीय संकल्पनांना नवयुग पाहायला मिळाले. ख्रिस्ती धर्माच्या उदयानंतर तर स्टॉईकांचे 'निसर्गाप्रमाणे सहज जगा' असे विचार आणि ख्रिस्तीचे विचार यांचा समन्वय होत गेल्याचे लक्षात येते. रोमन बादशहाने ख्रिस्ती धर्मविचार स्वीकारल्याने संपूर्ण नीतिशास्त्राला ख्रिस्ती धर्माचे वळण मिळाल्याचे बघण्यात येते. कारण निओ प्लेटोनिस्ट, पॅट्रिस्टिक व विशेषतः स्कोलॅस्टिक हे पंथ जोम धरीत असल्याचे लक्षात येते. प्लॅटिनस, सिरियाचा लॅम्ब्लिकस, प्रोक्लस, जॉन द स्कॉट, अल-फरेबी वगैरे नवप्लेटोनिस्ट, सेंट अन्स्लेम, अल्बर्ट मॅग्नस, टॉमस अक्विनस, पीटर लोम्बार्ड यांसारखे स्कोलॅस्टिक, सेंट ऑगस्टाईनसारखे पॅट्रिस्टिक विचारवंत याच विचारांनी भारलेले होते हे दिसून येते.

मार्टिन ल्यूथरनंतर ख्रिस्ती धर्मातील कर्मकांडाचा भाग बराचसा कमी होऊन पुन्हा एकवार नीतिशास्त्रीय विचारांकडे आणि आचाराकडे पाश्चात्त्य विचारवंत वळल्याचे आपल्या लक्षात येते. हा ब्राह्मण कालखंडानंतर येणाऱ्या औपनिषदिक कालखंडाप्रमाणे आहे.

पाश्चात्त्य नीतिशास्त्र यानंतर मात्र एक वळण घेऊन सरळ मानवी सुखदुःखावर येऊन थांबल्याचे लक्षात येते. हॉब्जचा सुखवाद हा त्याचे एक प्रातिनिधिक उदाहरण म्हणून पाहता येईल. स्पिनोझाने तद्नंतर त्यात स्वार्थ आणि परार्थ यावर चर्चा करून वेगळी दिशा दिली. कड्वर्थ, सॅम्युअल क्लार्क, हचिसन्, जोसेफ बटलर यांनी नीतिशास्त्रीय संकल्पनांना विभिन्न आयाम दिले. स्वार्थ, परार्थ, नैतिकता, नीतिशास्त्रीय सौंदर्य, सहजबुद्धिवाद असे अनेक संकल्पनांचे विकल्प पाश्चात्त्य देशांमध्ये याच काळात उभे राहिले असे सांगता येते. मुख्य म्हणजे ख्रिस्ती मतप्रवाह आणि स्टॉईकांचा मतप्रवाह यांना एकत्र करण्याचाही प्रयत्न झालाय. जास्तीत जास्त संभाव्य चांगले असे बाजूला काढण्याचा विचारही झाला; पण केवळ अशा प्रकारच्या बहुमताने नैतिकता ठरवली जावी की नाही, हाही चर्चेचा विषय आहे. जास्तीत जास्त लोकांची जास्तीत जास्त सुख हा काही सुखाचा तसा अंतिम निकष असू शकत नाही. किमान राष्ट्रहिताचा असेलच हेही सांगता येत नाही. नीतिशास्त्राचा विचार पुढे सरकत जाऊन ह्यूम, ॲडम स्मिथ आणि इमॅन्युअल कांट यांचे विचार पुढे प्रसारत गेले. कांटच्या शुद्ध बुद्धीने घ्यावयाच्या निर्णयाची आणि कर्तव्याची चर्चा तर आजही होतेच आहे. भारतामध्ये विशेषतः कांटच्या मतप्रवाहाची चर्चा होण्यामागचे कारण गीतेची कर्तव्य आणि कर्माच्या निवडीची पार्श्वभूमी आहे, हे स्पष्ट आहे. पुढे विज्ञानाच्या विकासासोबतच नीतिशास्त्रीय संकल्पनांनाही विज्ञानाच्या कसोटीवर घासून बघण्याचे दिवस सुरू झाले. चार्ल्स डार्विन, स्पेन्सरनंतर हे स्पष्टच झाले. स्पेन्सरचा 'डाटा ऑफ इथिक्स' हा ग्रंथ त्यावरचे

भाष्य अधोरेखित करणारा आहे.

'नीतिमीमांसा अथवा नीतिशास्त्राची मूलतत्त्वे' हा दुसऱ्या खंडात समावेश असलेला ग्रंथ स्पेन्सरच्या मताचे स्पष्टीकरण करणारा आहे. प्रथमतःच डार्विननंतर धर्म आणि नीती यांच्या तुलनात्मक अभ्यासाकडे न बघता विज्ञान आणि नीती असा तुलनात्मक अभ्यास सुरू झाला. धार्मिक दृष्टिकोनापलीकडे जाऊन वैज्ञानिक विचारांवर आधारित जीवशास्त्रीय नियमानुसार पाडावे, हे प्रश्नही नीतिशास्त्रालाच हाताळावे लागतात. त्यातून योग्य असा नैतिक निर्णय उभा राहतो जो कृतीला प्रेरक ठरतो.

एक महत्त्वाचा प्रश्न आपण मागील खंडामध्ये हाताळला आहे तो म्हणजे नैतिक निर्णय हा त्या कृती करणाऱ्या व्यक्तीचाच असतो की त्याच्यावर लादण्यात आलेला असतो? कारण आचरणातून फळ जरी मिळत असले तरीही ते आचरण स्वेच्छेने निवडलेले आहे की कुणी त्याच्याकडून करून घेतले आहे? मुळातच संकल्प करण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला असते की नाही? म्हणजे कर्म करताना स्वेच्छेने करीत असतो की बाह्य परिस्थिती त्याच्यावर कर्म करण्याची सक्ती करीत असते? बाह्य परिस्थितीने तो बद्ध तर नाही? तसे असेल तर कर्म नियत ठरते. यातूनच पुढे नियतिवाद, अनियतिवाद व आत्मनियतिवादासारखे सिद्धांत निर्माण झाले. याची चर्चाही मागील खंडात झालेली आहे.

पहिल्या 'तत्त्वज्ञान आणि विचारदर्शन' आणि दुसऱ्या 'तत्त्वज्ञान आणि नीती : पौर्वात्य आणि पाश्चात्त्य' या खंडामध्ये क्रमशः तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र या दोन विषयांचा आपण परिचय करून घेतला आणि सांगोपांग चर्चाही केली. पाश्चात्त्य आणि पौर्वात्य अशा दोन्ही तत्त्वज्ञानामध्ये काय भेद-साम्ये आहेत हे पाहिले. तत्त्वज्ञानाने व्यापलेल्या क्षेत्राप्रमाणेच नीतिशास्त्राचीही व्याप्ती बरीच मोठी आहे. मानवाला भेडसावणाऱ्या अनेक अवघड प्रश्नांची उत्तरे ही नीतिशास्त्राशी संबंधित असतात. म्हणूनच नीतिशास्त्र म्हणजे काय, त्याच्या विविध अभ्यासाच्या पद्धती कोणत्या, त्यातील विविध नैतिक दृष्टिकोन कोणकोणते आणि ते व्यक्त करणारे विचारवंत कोणकोणते यांचा आपण परिचय करून घेतला. तसेच स्पेन्सरच्या जीवशास्त्रीय अभ्यासपद्धतीवर सविस्तर चर्चाही केली.

आता 'नीतितत्त्वज्ञान : राजकीय आणि सामाजिक, खंड तिसरा'मध्ये आपण नीतिशास्त्रातील उर्वरित मुद्यांसोबतच राजकीय व सामाजिक तत्त्वविचारांचाही आढावा घेणार आहोत. तसेच नीतिशास्त्राच्या अभ्यासाची अंतिम परिणती म्हणजे त्याची उद्दिष्टे केवळ निःश्रेयस वा मोक्ष नसून विवेकी आणि तत्त्वज्ञ जीवन जगणे हेही महत्त्वाचे आहे हे समजून घेणार आहोत. तत्त्वज्ञ जर राजा झाला तर प्लेटोच्या संकल्पनेप्रमाणे राज्यही सुशासित होऊ शकते. त्यासाठी प्रारंभी राजकीय तत्त्वचिंतनाचा भाग बघून मग त्याकडे वळणार आहोत. राज्य चालवताना प्रशासनपद्धतीने घेतलेल्या निर्णयाने काय काय घडू शकते, याचाही अदमास आपल्याला येणे आवश्यक आहे. त्यासाठी पाश्चात्त्य वास्तववादी

राजनीति तत्त्वज्ञानाची आखणी करणारा निकोलो मॅकियाव्हेली याच्या 'प्रिंस' या पुस्तकाचा रियासतकार सरदेसाई यांनी केलेला अनुवाद 'राजधर्म', एफ. सी. मॉंटेग्यू यांच्या ग्रंथावर आधारित व श्री. शिवराम गोविंद फाळके लिखित 'इंग्लंडातील राज्यकारभार व्यवस्थेच्या इतिहासाची मूलतत्त्वे' व अंतिमतः श्री. विनायक सदाशिव गोगटे लिखित 'नीतिशास्त्रविचार' या ग्रंथांचा परिचय करून घेणार आहोत. ग्रंथांकडे वळताना काही मूलभूत बाबी समजून घेणे गरजेचे असते, तेवढे आपण करू.

एक महत्त्वाची गोष्ट आपण थोडक्यात समजून घेऊ, ती म्हणजे राज्य सुशासित करायचे म्हणजे नेमके काय केले पाहिजे? केवळ कायदे किंवा संरक्षण व्यवस्था वा आंतरिक सुरक्षा ही काही राज्याच्या सुव्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडू शकत नाही. राज्याचा कारभार चालण्यासाठी काही नैतिक मूल्ये वा आदर्श हे व्यक्ती आणि समाज दोन्हीलाही नियंत्रणात ठेवण्यात महत्त्वाची भमिका पार पाडतात. केवळ राजा व प्रशासन हे हाती दंड घेऊन बसले तरीही राज्य आणि पर्यायाने समाज हे दोन्ही सांभाळले जाऊ शकत नाहीत. राज्यप्रशासनाच्या अंकुशासोबतच काही नैतिक आदर्शही समोर असावेच लागतात. राज्य हे कशासाठी असते हे समजून घेणे आवश्यक ठरते. राज्य हे त्यातील प्रजेच्या सुखासाठीच असते. प्रत्येक व्यक्तीच्या चरित्राचा विकास व्हावा, त्याला स्वातंत्र्य मिळावे, केवळ त्याने एखाद्या यंत्राप्रमाणे राहू नये, तर त्याला मानवी जगण्याचे मूल्य मिळावे, हाच राज्याचा हेतू असतो. त्यासाठी राज्याकडून त्याला आणि त्याच्या विकासाला साहाय्य मिळावे अशी अपेक्षा असते. राज्य हे व्यक्तीसाठी असते, केवळ व्यक्ती राज्यासाठी असते असे नव्हे. एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घालण्याचे काम राज्यप्रशासन करू शकत नाही. हं, जर त्याच्या कृत्यामुळे कुणाचे नुकसान होणार असेल तर मग मात्र काही प्रमाणात त्याच्यावर कारवाई करणे भाग असते. यातून काही मौलिक प्रश्न समोर येतात.

राज्याचे नैतिक आधारस्तंभ कोणते?

अव्यवस्था किंवा अराजकता ही राज्यशासनाच्या चुकीच्या कार्यपद्धतीची निर्देशक ठरते. शासनकर्ता कोण आहे, तो मनमानी करणारा असेल तर तो राज्यातील रहिवासी असलेल्या व्यक्तींच्या मूलभूत अधिकारांवरही गदा आणू शकतो. स्वातंत्र्य हे नैतिक जीवनाचे एक तत्त्व असले तरीही ते राज्याच्या सत्तेच्या अगदीच विरुद्ध असते असे नाही. राज्य हे मानवाच्या अथक प्रयत्नातूनच शेवटी उभे राहिलेले असते. मनुष्याला स्वभावतःच सामाजिक आणि राजकीय संघटनाच्या स्वरूपात राहायला आवडते. पण राजकीय जीवनामध्ये त्याच्या नैतिक जीवनाचा अंत होणे अपेक्षित नसतेच. राज्याची सत्ताही व्यक्तीसाठीच असते. नैतिक व्यक्तींच्या अस्तित्वासाठी आवश्यक असेल तर राज्यामध्ये बळाचा उपयोग करणेही अपेक्षितच असते. आदर्श राज्य हे नागरिकांच्या सर्वंकष सामान्य अशा इच्छांवर आधारित असते, त्यामुळे अशा वेळी बळाचा उपयोग हा चांगल्या नैतिक कृतीसाठी केला असे मानले

जाते.

सर्वोच्च असणारे प्रशासन हे जनतेतील सामान्य अशा व्यक्तीच्या इच्छेचेच प्रतिनिधित्व करीत असते. जनतेच्या सामान्य इच्छा-आंकाक्षेतच प्रशासनाची सत्ता दडलेली असते. म्हणून राज्यशासनाच्या कुठल्याही आदेशाचे पालन करणे म्हणजे सर्वमान्य इच्छेचे आदेश पालन करण्यासारखे आहे. अशा वेळी राजा मीच आणि प्रजाही मीच अशी प्रजेची स्थिती असते.

राज्याची नैतिक कर्तव्ये कोणती?

राज्य हे एक अत्यंत महत्त्वपूर्ण असे सामाजिक आणि नैतिक संघटन असते. त्यामुळे व्यक्तीच्या नैतिक जीवनाचे माध्यम म्हणून राज्याचे दोन महत्त्वपूर्ण नैतिक कर्तव्ये मानली जातात. एक म्हणजे, कुठल्याही व्यक्तीचे इतर व्यक्तींपासून किंवा समाजापासून राजकीय स्वरूपातील आक्रमणापासून रक्षण करून त्याला स्वातंत्र्य देणे अर्थात न्यायाचे कार्य करणे; आणि दुसरे म्हणजे राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या नैतिक जीवनाच्या स्थितीला उन्नत बनवण्याचे विधायक कार्य करणे अर्थात परोपकार किंवा कल्याणकारी कार्याची आखणी करणे. या दोन्ही कार्यासाठी सत्ता आणि सर्वकल्याणाची इच्छा असणे आवश्यक असते.

व्यक्तीचे अधिकार म्हणजे संपत्ती वा इतर कार्य करण्याच्या अधिकाराला जतन करण्याचे आणि त्याचे संरक्षण करण्याचे कार्य राज्याने करणे गरजेचे असते. अशा मौलिक अधिकारांवर गदा आणणाऱ्या व्यक्तीला वा समूहाला दंडित करून सामजिक व्यवस्थेचे संरक्षण करण्याचे आवश्यक काम राज्यप्रशासनाला करावे लागते. दंडित करणे हे निषेधात्मक कार्य असले तरीही ते राज्याला करावे लागते; पण याखेरीज राज्याचे रचनात्मक कार्यही तितकेच मोलाचे असते. राज्यातील नागरिकांच्या भौतिक आणि आध्यात्मिक कल्याणात वृद्धी व्हावी त्यासाठी आपले नियोजन करावे लागते. उदाहरणार्थ, राज्यातील व्यक्तींना शिक्षण देणे, त्यांचे आरोग्याचे प्रश्न हाताळणे, नोकरी आणि आर्थिक फायद्याच्या योजना आखणे याकडे लक्ष देणे गरजेचे असते. राज्यातील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनावर प्रशासनाचा हक्क असतो असे नव्हे, तर त्याचे जीवनाचे व जगण्यासोबत येणाऱ्या हक्कांचे संरक्षण करणे हे राज्यप्रशासनाचे काम असते. सर्वोत्तम राज्य त्याला म्हणता येईल, ज्यामध्ये व्यक्तीला आपले जीवन वैयक्तिकपणे अगदी सुरक्षितपणे जगता येत असते. राज्याचे हे परोपकारी धोरण असते.

परंतु इतकेच पुरेसे आहे, असे मात्र नव्हे. मानवाचा स्वभाव हा सद् आणि असद् अशा संमिश्र प्रकृतीचा आहे. मानवाची असद् वृत्ती कोणत्याही परिपूर्ण अशा सामाजिक व्यवस्थेमध्ये पूर्णपणे नष्ट होऊ शकेल असे काही नसतेच. त्यासाठी त्यावर कोणते ना कोणते बाह्य नियंत्रण गरजेचे असते. जर एखाद्या व्यक्तीची असद् वृत्ती वा दुष्ट प्रवृत्ती ही

राज्यातील इतरांविरुद्ध काही कटकारस्थाने करीत असेल तर राज्यप्रशासनाकडून त्याच्यावर व त्याच्या कृतीवर वचक असला पाहिजे. जर अशा वर्तनावर नियंत्रण नसेल तर मग मात्र राज्यामध्ये अव्यवस्थेचा, अराजकाचा प्रसंग उद्भवू शकतो. त्यामुळे कुणा व्यक्तीचे वा जनसामान्याचे नैतिक जीवन उद्ध्वस्त होऊ शकते. त्यामुळे राज्यामध्ये एखाद्या सामाजिक वा नैतिक संस्थेची आवश्यकता असते जी नैतिक मूल्यांची जाण करून देईल. राज्यातील प्रशासनपद्धतीत काहीही बदल झाले तरीही राज्याचे स्वरूप हे एका नैतिक जीवनाची शिकवण देणाऱ्या श्रेष्ठ संस्थेच्या स्वरूपामध्ये असणे आवश्यक असते, कारण प्रशासन पद्धतीतील बदल हे नैतिकतेच्या मौलिक पायांवरच उभे असतात. दोन राज्यातील संघर्ष संपून शांती प्रस्थापित होऊ शकते, विरोधाचे रूपांतरण सामंजस्यामध्ये होऊ शकते; पण नैतिक जीवनाच्या सर्वोत्तम स्थितीवरून राज्य सुस्थिर असल्याची खात्री होते. नैतिक जीवन हे राष्ट्रीयता व मानवता या दृष्टिकोनातून निर्माण केले जाते.

राज्याचे मूळ सिद्धांत कोणते?

राज्य प्रस्थापनेमागचे काही मूळ सिद्धांत कोणते असतात, हे आपण पाहू.

अ. राज्य एक संघशक्ती असते :

राज्य हे सत्ता एकसंध ठेवण्यासाठीच असते. शक्तीचे हे भौतिक स्वरूप असते, असे म्हटले तरीही चालेल. राज्यामध्ये सुशासन राहावे आणि बाह्य आक्रमणापासून राज्याचे संरक्षण व्हावे यासाठी सत्तेची शक्ती आवश्यक असते. शासनाचा अर्थच आपले वर्चस्व ठेवणे असा आहे. त्यामुळे आदेशाचे पालन न केल्यास काय दंड व शिक्षा होऊ शकते हेही सांगितले जाते. शक्ती हे राज्याच्या मुळाशी असलेले महत्त्वाचे तत्त्व असते. लोकप्रशासनामध्ये ही शक्ती जनतेच्या सर्वंकष सामान्य अशा इच्छाशक्तीवर आधारित असते. प्रशासन चालवण्यासाठी काही प्रमाणात बळाचा वापर करावा लागत असला तरीही सत्तेचे अंतिम अधिष्ठान जनताच असते.

आ. राज्य हे यंत्रवत् असते :

काही लोक व्यक्तिस्वातंत्र्याचे भोक्ते असतात, ते व्यक्तिस्वातंत्र्याला राज्याच्या सत्तेपेक्षा जास्त महत्त्व देतात. त्यांच्या दृष्टीने राज्य म्हणजे व्यक्तिविशेषाच्या स्वातंत्र्याला जपणारे एक यंत्र! राज्याचे काम हेच असावे, की व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड येणाऱ्या अडथळ्यांना दूर सारावे; पण यामुळे कदाचित गोरगरिबांवर अन्यायही होऊ शकतो. त्यामुळे आधुनिक लोकशाहीवादी लोककल्याणकारी राज्याचे हेच कर्तव्य असते, की बहुतांच्या कल्याणार्थ इतरांच्या स्वातंत्र्यावर गदा येऊ नये म्हणून नियंत्रण ठेवणे. वास्तविक पाहता असा यंत्रवत् संबंध आहे, असे म्हणणे योग्य नाही, कारण राज्याचा विकास हा मनुष्याच्या सामाजिक स्वभावाचा एक भाग म्हणून व्हायला हवा. राज्यासोबत मनुष्याचे संबंध काही यंत्राप्रमाणे

नसतात. मनुष्य स्वतःच राज्याचा एक घटक. सदस्य असतो. परंतु, हॉब्ज, लॉक व रुसो यांच्या प्रतिपादनाप्रमाणे राज्य हे त्यातील घटक व्यक्तींनी निर्माण केलेला एक यंत्रवत् समूहच आहे, जो त्यांनी आपले जीवन आणि संपत्ती यांच्या संरक्षणार्थ केलेला आहे. या विचाराप्रमाणे राज्य एक सावयवी मानवी रचनेप्रमाणे आहे, असे लक्षात येते.

इ. राज्य शरीराप्रमाणे विभिन्न अवयवाचे बनलेले असते :

स्पेन्सर वगैरे लोकांच्या मते जसे शरीर विभिन्न अवयवांचे असते, शरीर म्हणजे अनेक अवयवांचा संघात असतो, तसेच राज्यही असते. राज्य असे सावयवी शरीर असते ज्याचा कोश व्यक्ती असते. कोश जसे विभिन्न अवयवांमध्ये राहून पोषण करतात तसेच व्यक्तीही करीत असते. शरीराचे विभिन्न अवयव जसे विभिन्न कार्य करीत शरीराचे पोषण करीत असतात तसेच या राज्यांचेही असते. राज्याची उत्पादन व्यवस्था ही पचनसंस्थेप्रमाणे, रक्तसंवहन दळणवळणाप्रमाणे, मेंदू केंद्रीय मंत्रीगणाप्रमाणे कार्यरत असतो. राज्य आणि शरीर यामध्ये असे साधर्म्य असते.

पण असे असले तरीही शरीर हे चेतनेवर चालते, शरीरातील कोशही त्यावर चालतात. त्यांना स्वतंत्र चेतना वा जीवन नसते. व्यक्ती स्वतंत्रपणे आत्मतत्त्व म्हणून स्वतःच्या कार्याचा निश्चय करीत असते व आपल्या उद्दिष्टांप्रमाणे कार्य करीत असते. भोजन झाले की शरीर अंतर्गत व्यवस्थाकडून पोषण होऊन व्यवस्थित राहते, त्याचा विकास होतो. राज्याचे असे होत नाही. विकास, ऱ्हास वा मृत्यू हे शरीराला लागू होतात, तसे राज्याला होत नाहीत.

ई. राज्य हे एकात्म असते :

अनेक विद्वान राज्याला एकभाव मानतात. हेगेलसारखा विचारवंतही राज्याला एकतासंपन्न सजीवाप्रमाणे मानतो. राज्याचे अस्तित्व हे त्यातील सदस्यांपेक्षाही श्रेष्ठ व उच्च असते. राज्याची एक संकल्पशक्ती व चेतना असते जी त्यातील सदस्यांच्या इच्छाशक्ती व चेतनेपेक्षा भिन्न असते. राज्याची उद्दिष्टे ही व्यक्तिगत उद्दिष्टांपेक्षा भिन्न असतात. ती सर्वांवर लादण्याचा अधिकारही असतो; पण हे जरी खरे असले तरीही निर्णय घेणारे अधिकारीच असतात. राज्य स्वतः तर असा निर्णय घेतच नसते. म्हणून राज्याला एकात्म म्हणून सजीवाप्रमाणे व्यक्तित्व देणे काही उचित नाही. तसे मानले तर राज्याचे अधिकार निरंकुश, स्वेच्छाधारी व हुकूमशाहीचे होऊ शकतात. त्याचा आनुषंगिक परिणाम म्हणून व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला येऊ शकतो.

उ. राज्य हे अतिमानवाप्रमाणे असते :

हेगेल हा राज्याला निरपेक्ष ईश्वराची अभिव्यक्ती मानतो. 'राज्याचे अस्तित्व म्हणजे ईश्वराचा भौतिक संसारातील प्रवास आहे. राज्य ही पृथ्वीवरील अशी अबाधित सत्ता आहे जी स्वतःतच त्याचे हेतू वा लक्ष्य नियोजित करते'; पण असे मानणे म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्यावर

एक प्रकारचा घाला आहे. राज्याला दैवी मानणे म्हणजे एका अबाधित वा सर्वोच्च अशी संपूर्ण व परिपूर्ण सत्तेचा स्वीकार करणे आहे. राज्याला तसे व्यक्तिखेरीज स्वतंत्र अस्तित्वच नाही. त्याचे अस्तित्व हे खरे तर व्यक्तिहितासाठीच असते.

ऊ. राज्य स्वतः एक नैतिक संस्था असल्याप्रमाणे कार्य करते :

ग्रीनच्या मताप्रमाणे राज्य त्यात समावेश असलेल्या सदस्यांच्या आत्मलाभाकरिता आवश्यक आहे. राज्य हा व्यक्तीच्या सामाजिक प्रकृतीचा एक भाग आहे. मनुष्य आपल्या संकल्पशक्तीच्या उपयोजनार्थ स्वतंत्रच असतो. त्याच्या या स्वातंत्र्यातूनच अधिकार प्रकट होत असतात. त्याचे हे अधिकारच राज्याच्या अस्तित्वाची मागणी करीत असते. असे राज्य त्याच्या स्वातंत्र्याच्या आड येणाऱ्या अडथळ्यांना दूर करण्याचे काम करीत असते आणि व्यक्तीच्या विकासाला चालना देत असते. राज्य हे आत्मविकासाचे सर्वोच्च साधन मानायला हरकत नाही.

बोजान्केच्या मतानुसार राज्य एक नैतिक संस्था आहे. वास्तविक स्वतंत्रता आणि विवेकपूर्ण आत्मनियंत्रणास मदत करणारी ती एक संस्था आहे. जनतेच्या सर्वंकष अशा इच्छेवर राज्य आधारित असते. सर्वसामान्य माणसाच्या ज्या इच्छा असतात, त्यांची परिपूर्ती करण्यासाठी राज्यप्रशासन असल्याने सामान्य माणसानेही कायदा आणि सुव्यवस्था यांचे विवेकाने पालन करावे.

ए. राज्य एक समष्टीरूप असते :

लोकतंत्रीय उदारवाद हे व्यक्ती साध्य तर राज्याला साधन मानते; परंतु समष्टीवाद हे व्यक्तीला साधन व राज्याला साध्य मानते. समष्टीवादाच्या दृष्टीने राज्यच एक ध्येय आहे; आणि ते निरंकुश व सर्वसत्तासंपन्न व सर्वशक्तिमान आहे. व्यक्ती त्याचे कल्याण आणि त्याचे श्रेष्ठतेचे साधनमात्र आहे. राज्याच्या कल्याणासाठी व्यक्तींनी ठरवलेल्या सर्व कार्यांवर नियंत्रण ठेवून त्याचे नियमन करू शकते. त्यामध्ये एखादी व्यक्ती वा काही व्यक्तींच्या स्वातंत्र्याचा प्रश्न उद्भवत नाही. राज्य नागरिकांच्या स्वतंत्रतेला नियंत्रित करू शकते. शिक्षण, कला, नैतिकता आणि धर्म यांचे नियमन करणे हे राज्य करू शकते. आर्थिक नियंत्रण ठेवू शकते. नागरिकांच्या संपूर्ण जीवनावर नियमाने नियंत्रण ठेवू शकते. संक्षिप्त स्वरूपात सांगायचे झाले तर समष्टीवाद सेना बलावर विश्वास ठेवून निरंकुश सत्तेवरच विश्वास ठेवते.

ऐ. लोकसत्ताक राज्याचे स्वरूप :

समष्टीवादापेक्षा लोकसत्ताक पद्धती ही अधिक उत्तम अशी सामाजिक आणि राजनैतिक आदर्श व्यवस्था आहे. त्याचा अर्थ लोकप्रिय अथवा बहुमताचे शासन असा आहे. अर्थात् अब्राहम लिंकनच्या भाषेत 'लोकांनी लोकाकरवी चालवलेले लोकांच्या हिताचे शासन म्हणजे लोकशाही' होय; पण आधुनिक काळात हे लोकप्रतिनिधींचे शासन झाले आहे.

जनतेतून बहुसंख्येने निवडला गेलेला पक्ष हे शासन चालवतो. जनतेचे प्रतिनिधीच कायदे तयार करतात आणि पालनासाठी आदेश काढतात. लोकशाही अर्थात् लोकसत्ताक पद्धतीमध्ये स्वेच्छाचार, दमन किंवा अत्याचार असत नाहीत. सर्व नागरिकांना समान अधिकार असतो. सर्वांना विकासाची संधी समान असते. लोकशाहीमध्ये राजनैतिक स्वातंत्र्य, शिक्षण वगैरे समान असले तरीही सर्वांना सारखे आर्थिक सुख किंवा समानता सहजी लाभतच नाही.

राज्याचे नैतिक आधारस्तंभ म्हणून अशी बरीच चर्चा असली तरीही प्रत्येक विषय हा परिपूर्ण असतोच असे काही दिसत नाही. राज्यधारणा ही प्रजेच्या सुखासाठी असते हे जरी खरे असले तरीही प्रत्येक बाबीमध्ये काही गुण आहेत, तसेच दोषही आहेत. राज्यप्रशासनाला हे दोष सावरावे लागतात. राज्यशास्त्र वा राजकीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाच्या दृष्टीने इतकेच महत्त्वाचे आहे. कारण इतर चर्चा फार महत्त्वाची नाही. आपण केवळ राजधर्म म्हणजे राज्याच्या प्रशासकाने पाळावयाची संहिता अभ्यासणार आहोत. अर्थात् त्यातही काही तुलनात्मक विषय पाहणार आहोत. प्राचीन राज्यपद्धतीसाठी अशा प्रकारचे काही आदर्श निर्माण केले होते का आणि असतील तर त्याची मांडणी कोणत्या प्रकारे केली होती, हे पाहणे आवश्यक असते. राष्ट्राच्या राजवटीमध्ये परिवर्तन तर सतत घडतच असते, शिवाय प्रत्येक राष्ट्राची स्वतःची अशी काही नीती असते. अशा नीतितत्त्वांवर आधारित असलेल्या राष्ट्रातील नीतितत्त्वांचा अभ्यास हा समकालीन राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीवर तर प्रकाश टाकतोच, त्याखेरीज समकालातील वैचारिक स्थित्यंतराचा एकंदर अदमास येतो. त्या त्या काळातील राष्ट्र, राष्ट्राचे प्रशासन व प्रशासक यांचे राष्ट्रातील घटकाशी अर्थात प्रजेशी असणारे नाते कसे होते व आपापल्या नीतितत्त्वांचा ते अवलंब प्रशासनात कसा करीत होते हे पाहणे म्हणजेच प्राचीन राजकीय तत्त्वज्ञानाचा आढावा घेणे आहे.

राजधर्म : (अनुवाद : रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई)

(The PRINCE... By Niccolo Machiavelli 1516).

एकंदर सव्वीस प्रकरणे असलेला हा ग्रंथ म्हणजे पाश्चात्त्य विचारविश्वातील राजकीय आणि सामाजिक स्थितीचा आरसा आहे असे समजायला हरकत नाही. निकोलो मॅकियाव्हेली कोण, त्याने ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न का केला, त्याचा अधिकार काय होता, तो राजकीय नेता होता की केवळ विचारवंत होता, हेही प्रश्न उपस्थित करण्यासारखे आहेत; पण रियासतकारांनी या सगळ्या प्रश्नांची उत्तरे सांगोपांग दिलेली आहेतच. सुरुवातीला एक संक्षिप्त चरित्र लिहून या सर्व प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. पाश्चात्त्य विचारवंतांमध्ये राजकारणात सक्रिय राहूनही ज्यांनी आपले विचारधन लिखित स्वरूपात ठेवलेले आहे,

असे काही मोजके का होईना पण विचारवंत आढळतात. पूर्वेकडे त्याचा अभाव आहे. क्वचितच कुणा राजाने वा राजकारणात सक्रिय असलेल्या कुणा व्यक्तीने तसा प्रयत्न करून स्वतःविषयी, राज्याविषयी किंवा प्रशासनपद्धतीविषयी काहीतरी लिहून ठेवलेले आहे. पायथागोरस (५८०-५०० इ.स.पू.) हा त्यांच्यामध्ये पहिला असावा, असे वाटते. सॉक्रेटिस वा प्लेटो हे काही सक्रिय राजकारणी नसावेत. विशुद्ध तत्त्वचिंतन मांडण्याचे काम त्यांनी केले. तत्त्वज्ञ व्यक्तीने राजकारणात यावे आणि सत्तेत राहून प्रशासन मांडावे अशी 'तत्त्वज्ञ राजा' ची संकल्पना प्लेटोने मांडली. अथेन्समध्येच असलेल्या क्रिटीयसला (४६०-४१३ इ.स.पू.) राजकारणी नास्तिक विचारवंत म्हणून ओळखले जाते. स्टॉईक विचारवंत असलेला मार्कस ऑरेलियस बादशहा (१२१-१८० इ.स.) हाही तसा सत्ताधीश विचारवंत! स्टॉईक विचारवंत असलेल्या मार्कसचा उल्लेख अगदी आदराने करावा असाच तो होता. पहिल्या खंडामध्ये आपण ते पाहिले आहेच. शिवाय राजधर्ममध्येही निकोलो मॅकियाव्हेलीने त्याचा उल्लेख अतिशय आदराने केलेला आहे. १२८९ वर्षे म्हणजे जवळपास एक सव्वा सहस्त्रक वर्षे आधी होऊन गेलेल्या मार्कस ऑरेलियसबद्दल निकोलोसारखा मुरब्बी वकील व राजकारणी आदराने बोलतो, याचा अर्थ मार्कसचा प्रभाव बराच काळ टिकून होता, हे स्वीकारावे लागेल.

निकोलोच्या लेखनाची तुलना आपण पायथागोरससोबत करू शकत नाही, कारण पायथागोरसच्या राजकारणामध्ये सक्रिय होण्याचे कारण पूर्ण वेगळे होते. सत्तासंपादनातून आपल्या संप्रदायाची वृद्धी करायची हा त्याचा हेतू होता. त्याने विशिष्ट राजकीय तत्त्वज्ञान म्हणून असे काही लिहिले नाही. तसेच आपण निकोलोच्या लेखनाची तुलना मार्कसच्या लेखनासोबत करू शकत नाही. कारण मार्कस हा केवळ राजकारणी नसून सत्ताधीश रोमन सम्राट असूनही त्याने सत्तासंपादन, त्यासाठी करावे लागणारे राजकारण, संघर्ष, युद्धे याविषयी काहीही न लिहिता सरळ सरळ स्टॉईकांचे तत्त्वविवेचन केलेले आहे. स्टॉईक जीवनपद्धती ही स्थितप्रज्ञाची जीवनपद्धती कशी आहे, हे सांगणे हाच उद्देश मार्कसच्या बारा पुस्तिकांमध्ये होता. आपले राजकीय तत्त्वज्ञान काय आहे, याविषयी त्याने काहीही विशद केले नाही. मूळ सत्तासंपादन करणे आणि प्रशासन सांभाळणे हा त्याचा जीवितहेतू नव्हताच. तो केवळ परंपरेनुसार सत्तेवर आला, त्याच्या नैतिक संकल्पनानुसार त्याने राज्यकारभार केला, यशस्वीपणे केला असे म्हणावे लागेल. त्यानंतर किंवा त्याआधीही कुणी तसा प्रयत्न केला तर यश आले नाही, हेही सिद्ध झाले आहे. निकोलोने त्याचा विशेष आदराने उल्लेख करण्यामागचे कारणही हेच आहे.

निकोलो मॅकियाव्हेलीच्या लिखाणासोबत पूर्वेकडील कोणत्या विचारवंतांची तुलना करता येण्यासारखी आहे, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. त्याच्यापूर्वी दोनेक सहस्त्रक आधी झालेल्या कौटिल्याची तुलना मॅकियाव्हेलीसोबत करता येते आणि त्याच्यानंतर बरोबर

दोनशे वर्षांनी म्हणजे १७१५ मध्ये लिहिलेल्या श्री. रामचंद्रपंत अमात्यांच्या 'आज्ञापत्र' या शिवकालीन प्रशासनावर प्रकाश टाकणाऱ्या ग्रंथासोबत मात्र अगदी सहज तुलना करता येण्यासारखी आहे.

निकोलो मॅकियाव्हेली हा मूळचा इटलीमध्ये फ्लोरेंस येथे ३ मे १४६९ रोजी जन्मला आणि २२ जून १५२७ रोजी त्याचा तेथेच मृत्यू झाला. साधारण अठ्ठावन्न वर्षांचे आयुष्य त्याला लाभले. प्रस्तुत ग्रंथ द प्रिंस हा वयाच्या सत्तेचाळीसाव्या वर्षी म्हणजे इसवी सन १५१६ मध्ये लिहून अर्पण केला असावा. याखेरीज काही महत्त्वाचे लेखन निकोलो यांनी केलेले आहे. द आर्ट ऑफ वॉर, टू ट्रिटायजेस ऑन गव्हर्नमेंट, डिसकोर्सेस ऑन लिव्ही, फ्लोरेंटाईन हिस्ट्रीज, लाईफ ऑफ कॅस्ट्रेसिओ कॅस्ट्रेकनी वगैरे मूळ इटालियन भाषेमध्ये लिहिले गेलेले ग्रंथही आहेत. द प्रिंस या ग्रंथाची ल्यूजी रिक्कीने तयार केलेली प्रथम इंग्रजी आवृत्ती द वर्ल्ड क्लासिक (हंफ्रे मिलफोर्ड, द ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस) या मालिकेमध्ये १९०३ मध्ये प्रकाशित झाल्याची एक नोंद मिळते, पुढे त्याच्याच आवृत्त्या मिळतात. त्याखेरीज डब्ल्यू. के. मॅरॉट यांनी अनुवादलेले प्रकाशन वर्ष नक्की कोणते हे सांगता न येणारी एक प्रतही मिळते; पण प्रथम इंग्रजी आवृत्ती इसवी १९०३ मध्ये प्रकाशित झाली हे तितकेसे खरे नसावे, कारण रियासतकारांनी अनुवाद केलेली ही प्रत १८९० मध्ये छापल्याची सुस्पष्ट नोंद आहे. याचा अर्थ रियासतकारांनी वापरलेली अनामिक अनुवादकाची इंग्रजी प्रत ही त्यापूर्वीची असावी. द वर्ल्ड क्लासिक मालिकेने ती प्रथम तेव्हा छापली असावी.

कौटिल्याच्या अर्थशास्त्राशी तुलना हा विषय पुढे येईलच; पण कौटिल्याचा कालखंड तसा प्राचीन मानला जातो. साधारणपणे इ.स.पू. चौथे शतक हा त्याचा कालखंड आहे. त्यामुळे कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या हस्तलिखित प्रती आपल्याकडे फारशा उपलब्ध नसल्याच्या नोंदी मिळतात. डॉ. शामशास्त्री या म्हैसूर संस्थानच्या ग्रंथपालाला तो इसवी १९०६ मध्ये सापडला, त्यांनी तो १९०९ मध्ये प्रकाशात आणला. मग सारेच त्याकडे वळले. कौटिलीय अर्थशास्त्रातील 'स्वामी' आणि मॅकियाव्हेलीच्या राजकीय साहित्यातील 'द प्रिंस' या ग्रंथाची तुलना होऊ लागली. तत्पूर्वी कौटिलीय अर्थशास्त्राविषयी केवळ उल्लेखच मिळत असावेत किंवा पूर्ण ग्रंथ बहुधा उपलब्ध होत नसावा. अर्थात् कौटिल्य आणि मॅकियाव्हेली यांच्यामध्ये जवळपास अठरा शतकांचे अंतर आहे. दोघांच्या भोवतालातील सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक स्थिती अगदीच भिन्न असणार. त्यामुळे त्यांच्यात बरेच साम्यभेद असणार हे उघड आहे. ते आपण थोडक्यात पुढे पाहणार आहोतच.

रामचंद्रपंत अमात्यलिखित शिवकालीन राज्यप्रशासन पद्धतीवर प्रकाश टाकणारा ग्रंथ 'आज्ञापत्र' विविधज्ञानविस्तार मासिकात टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात आला. साधारणपणे ऑगस्ट १८७२ ते जानेवारी १८७४ अशा दोन वर्षांत सात अंकांमध्ये 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या सदराखाली विविधज्ञानविस्तार मासिकामध्ये छापला गेला. 'ज्या

मूळ प्रतीवरून ते छापले गेले, ती आता उपलब्ध नाही व ती कोठून कशी पैदा झाली याचाही थांग लागत नाही. या संबंधाने विस्ताराच्या संपादकांनीही काही खुलासा त्या वेळी केलेला नाही' असे विविधज्ञानविस्तारामध्येच प्रसिद्ध झालेल्या मजकुराचे पुस्तकरूपाने मार्च १९२३ मध्ये पुनर्मुद्रण केले त्यात श्री. अनंत आत्माराम मोरमकरांनी लिहिलेले आहे. हे सांगण्यामागचा उद्देश एवढाच आहे, की याच प्रथम पुस्तकास रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांचीच प्रस्तावना आहे. या प्रस्तावनेतील काही अंश श्री. विलास खोले संपादित लोकवाङ्मयगृह पुनर्प्रकाशित (प्रतिमा प्रकाशन प्रकाशित) आज्ञापत्रात दिलेला आहे, तेवढ्यावरून तरी या शिवकालीन प्रशासनाचे वैशिष्ट्य सांगणाऱ्या या ग्रंथाच्या प्रस्तावनेमध्ये रियासतकारांनी मॅकियाव्हेलीच्या 'द प्रिंस' अर्थात् 'राजधर्म'चा उल्लेख केल्याचे काही दिसत नाही. बत्तीस वर्षांपूर्वी आपणच अनुवाद केलेल्या पुस्तकाचा उल्लेख करण्यास रियासतकार तटस्थ का राहिले, त्यांना तुलनात्मक बाबी का मांडाव्या वाटल्या नाहीत, हे सांगता येत नाही. शिवाय राजधर्माच्या प्रस्तावनेमध्येही रियासतदारांनी काही आज्ञापत्रांचा उल्लेख केलेला दिसत नाही. ऑगस्ट १८७२ ते जानेवारी १८७४ दरम्यान आज्ञापत्र विविधज्ञानविस्तारमध्ये प्रकाशित झाले तरीही जवळपास अठरा वर्षे म्हणजे १८९० मध्ये राजधर्माचा अनुवाद करताना रियासतकारांना माहिती नव्हते हेही पटत नाही. ही बाब आश्चर्य वाटावे अशीच आहे. पुढे कष्टपूर्वक संशोधन करून रियासतीचे प्रदीर्घ आणि अभ्यासपूर्ण खंड लिहिणाऱ्या सरदेसायांच्या स्मरणात मॅकियाव्हेलीच्या राजधर्मवेळी कौटिल्य जाऊ द्या, अगदी आज्ञापत्रही नव्हते ही बाब पटत नाही.

राजधर्मचा अनुवाद रियासतकारांनी केला आणि त्यानंतर मला वाटते पुन्हा कुणीही दुसरा अनुवाद वा त्याच अनुवादाची सुधारित व संपादित आवृत्ती काढण्याचा प्रयत्न केला नसावा. अगदी रियासतकारांनीही नाही. मॅकियाव्हेलीच्या द प्रिन्सचा अनुवाद सरदेसायांनी कसा व का केला यापेक्षाही जास्त मूल्य एका जागतिक विचारवंतांचे मौल्यवान विचार मराठीत आणले ही बाब जास्त महत्त्वाची वाटते. मॅकियाव्हेलीशी मराठी वाचक आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यासक सुलभ भाषेत परिचित होऊ शकला ही बाब अधोरेखित व्हावी. मॅकियाव्हेली हा काही मुळातच उमराव घराण्यातील नव्हता किंवा मार्कस ऑरेलियसप्रमाणे त्याला काही राजघराण्याची पार्श्वभूमीही नव्हती किंवा पायथागोरसप्रमाणे तो स्वतंत्र पंथ, समुदाय काढून कार्य करीत होता असेही नाही. बर्नार्डो आणि बार्टोलोमिआ नेली या इटालियन दाम्पत्याला झालेला हा मुलगा एक मध्यमवर्गीय पण सुशिक्षित आणि सुस्वभावी घराण्यात जन्माला आला होता. कुणीही उच्चपदस्थ वगैरे नव्हते; पण घरातील संस्कार मात्र राष्ट्रप्रेमाचे आणि काहीतरी करून दाखवण्याचे होते. आर्थिक संपन्नता जरी मॅकियाव्हेलीच्या कुटुंबाला लाभली नसली तरीही बौद्धिक उन्नती मात्र चांगली होती आणि त्याच जोरावर निकोलो मॅकियाव्हेली 'राजकीय वास्तववाद' (political realism) मांडणारा विचारवंत व द्रष्टा

लेखक ठरला. निकोलोच्या काळामध्ये एकंदर इटलीमध्येच राजकीय गोंधळाचे वातावरण होते, असे दिसून येते. फ्लॉरेन्सचे राज्य निकोलो लहान असताना मेडिसाय वंशाकडे होते. तेव्हाचा राजा लारेन्झो हा इ.स.१४९२ मध्ये निधन पावल्यावर त्याचा मोठा मुलगा पायरो हा गादीवर बसला. इथून पुढे बहुधा निकोलो मॅकियाव्हेलीला आपली बुद्धिमत्ता आणि वकिली चातुर्य वापरण्याची संधी मिळाली असावी. कारण पोप कुणी व्हावे यासाठी संघर्ष झाला. पायरोच्या समकालीन असलेल्या पोपचे मतभेद असल्याने मध्यस्थी करण्याच्या मिषाने फ्रान्सच्या राजाने इटलीमध्ये शिरकाव करून घेतला. त्यामुळे फ्लॉरेन्सच्या जनतेने नाराज होऊन बंड केले व राजास हाकलून दिले. आणि इ.स. १४९४ मध्ये प्रजासत्ताक राज्य स्थापन केले. ते जवळपास अठरा वर्षे टिकले आणि मॅकियाव्हेलीचा उत्कर्ष याच काळात झाला. पायरो सत्तेवरून पायउतार झाल्यावरही जवळपास अठरा वर्षे प्रजासत्ताक टिकावे म्हणून त्याने प्रयत्न केला. त्याचे कौशल्य पाहून राज्याचा मुख्य सचिवही त्यालाच निवडले गेले. दरम्यान वकिली, युद्ध करून पिसा शहर मिळवण्याचा अयशस्वी प्रयत्न असे अनेक अनुभव घेऊन झाले. विशेषतः फ्रान्सच्या दरबारामध्ये वकील म्हणून अनेक वर्षे त्यांनी काम पाहिले. दरम्यान, मेडिसाय वंशीयांनी बंड करून १५१२ इ.स. मध्ये पुन्हा एकवार राज्य ताब्यात घेतले. प्रजासत्ताक मोडून ही गादी पायरोच्या लारेन्झो (दुसरा) या एकवीस वर्षाच्या मुलाला मिळाली. पुढे राज्य हाती आल्यावर लारेन्झो आणि त्याचा चुलता पायरोचा बंधू गिलियानो यांच्या खुनाच्या कटात संशयी म्हणून मॅकियाव्हेलीसहित अनेकांना पकडण्यात आले; पण ज्युलियस पोप गेल्यावर दहावा लिओ पोप झाला आणि त्याने सर्वांची सुटका केली. निराश झालेला मॅकियाव्हेली शेवटी गावाकडे येऊन राहिला व त्याने 'द प्रिंस' अर्थात राजधर्म हे पुस्तक पायरोचा मुलगा लारेन्झोलाच अर्पण केले. पुढे मेडिसाय घराण्याचा रागही कमी होऊन पुन्हा त्याला एकवार देशसेवेसाठी बोलावण्यात आले. त्यानेही सोपवलेली सर्व कामे यथासांग पार पाडली. मग शेवटी पुन्हा १५६७ मध्ये पुन्हा गावाकडे आला; पण फार दिवस जगला नाही. २२ जून १५६७ रोजी वयाच्या अठ्ठ्यानव्या वर्षी त्याचे निधनही झाले. सरदेसायांनी निकोलोचा मृत्यू जुलैमध्ये सांगितला आहे.

द प्रिन्स वा राजधर्म या पुस्तकामध्ये एकंदर सव्वीस प्रकरणे असून विविध विषय हाताळले आहेत. त्यातील प्रकरणे आणि विषय आपण आता बघणार आहोत. अगदीच संक्षिप्त स्वरूपात सांगायचे झाल्यास राज्य, राज्याचे प्रकार, वंशपरंपरागत राज्ये, संकीर्ण राज्ये, राज्यांवर विजय मिळवणे, त्यांच्यावर प्रशासन ठेवणे वा लादणे, त्याच्या पद्धती, राज्य विविध मार्गाने मिळवल्यावर काय करावे लागेल, राज्याची नेमकी शक्ती कशी समजावी, धर्मसत्ताक राज्ये, सेना व सैन्याचे प्रकार, राजाची एकंदर कर्तव्ये वगैरे अनेक गोष्टींचा ऊहापोह यामध्ये केलेला आढळतो. कौटिल्याचे अर्थशास्त्र आणि आज्ञापत्र यामध्येही अशाच प्रकारच्या विषयांची चर्चा आहे का, असेल तर कोणत्या हेतूने आणि हे दोन्ही

ग्रंथही लिहिले गेले त्यामागचे हेतू काय असावेत, यावर आपण संक्षिप्त चर्चा करणारच आहोत. एक खरे की जागतिक तत्त्वज्ञानामध्ये राजकीय वास्तववादी विचारवंत तत्त्वचिंतक म्हणून ज्याप्रमाणे मॅकियाव्हेलीचे नाव घेतले जाते, त्याप्रमाणे कौटिल्याच्या अर्थशास्त्राचे वा रामचंद्रपंत अमात्यलिखित शिवकालीन प्रशासनव्यवस्था अर्थात् आज्ञापत्राचे घेतले जाते का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. अर्थात् याही दोन्ही ग्रंथांचे अनुवाद इंग्रजीत झालेले असले तरीही राजकीय विचारवंतांच्या वा तत्त्वज्ञांच्या यादीमध्ये यांच्या लेखनाची फारशी दखल घेतली गेली असे काही वाटत नाही, हे मात्र खरे! एवढेच काय, तर भारतीय विचारवंत व संशोधकांनीही मॅकियाव्हेलीच्या लेखनाची तुलना कौटिल्यासोबत केलेली आढळते; पण अमात्यांसोबत मात्र मला तरी कुठे आढळली नाही. या दोघांसोबत तुलना मांडण्याचा आपला हेतू हा मॅकियाव्हेलीच्या लेखनाचा हेतू समजून घेण्याचा तर आहेच; पण त्यासोबतच आपण कौटिल्याला वा अमात्यांना जागतिक राजकीय विचारवंतामध्ये नेऊ शकलो नाही, ही खंत व्यक्त करण्याचाही आहे.

द प्रिन्स अर्थात राजधर्ममध्ये मॅकियाव्हेलीने हाताळलेले विषय :

द प्रिन्सच्या इंग्रजी आवृत्तीमध्येही एकंदर प्रकरणे सव्वीसच आहेत. रियासतकारांनी अनुवाद करताना अगदीच तंतोतंत केला असे मात्र नाही; पण मिळताजुळता मात्र जरूर केला आहे. लेखनाच्या सुरुवातीलाच मॅकियाव्हेलीने ग्रंथाची अर्पणपत्रिका जोडलेली आहे. ग्रंथ त्याने पायरो डि मेडियासचा पुत्र लारेंझो[१] याला अर्पण केला आहे, तो जेव्हा सत्ताधीश होता. लेखन अर्पण करण्यामागे आपली राजनिष्ठा[२] प्रकट करण्याचा हेतू त्याने दडवून ठेवला नाही हे विशेष आहे. तसेच आपल्यासारख्या सामान्य माणसाने राजघराण्यातील माणसांना केवळ वर्तनच सांगितले असे नाही तर नियमही दाखवले म्हणून काही प्रमाद करीत असल्याचा आरोप माझ्यावर येईल; पण तो रास्त नाही.[३] हेही त्याने त्या अपर्णपत्रिकेत सांगितले आहे. अंतिमतः तर आपल्या वैभवशाली सर्वोच्च पदावरून जरा निम्न स्तरावर दृष्टी टाकल्यास दैवाच्या प्रतिकूलतेमुळे मला किती विपत्ती भोगावी लागत आहे.[४] हेही आपल्याला दिसून येईल हेही सांगितले आहे. हे खरे तर धैर्याचे काम आहे.

पहिल्या प्रकरणाला प्रारंभ करतानाच मॅकियाव्हेलीने राज्याचे विविध प्रकार सांगितले आहेत. त्याचे एक छान वर्गीकरण रियासतकारांनी अनुवाद करताना केलेले आहे. राज्य हे दोन प्रकारचे असते, एक राजसत्ताक आणि दुसरे प्रजासत्ताक, पुढे राजसत्ताकाचे वंशपरंपरागत आणि नूतन असे दोन भाग करून नूतनचे संकीर्ण आणि विसंगत असे दोन प्रकार सांगितले आहेत. लगेच थांबून पुढच्या प्रकरणामध्ये वंशपरंपरागत राज्ये कशी असतात वगैरे सांगितले आहे. खरे तर ते मॅकियाव्हेलीचे धैर्य मानावे असे काम आहे. कारण मेडियास वंश गेल्यानंतर अठरा वर्षे प्रजासत्ताक राजवट तिथे होती; आणि तेव्हाच मुख्य

सचिव म्हणून त्याने कामकाज पार पाडले होते. आता पुन्हा वंशपरंपरागत राज्यप्रशासन मेडियास घराण्याकडे आलेले होते. शिवाय त्याने एकवार राजघराण्याच्या नाराजीचा अनुभवही घेतला होता. तरीही प्रजासत्ताकाविषयी मी दुसरीकडे सविस्तर लिहिले आहे, असे दुसऱ्या प्रकरणाच्या अगदी सुरुवातीलाच सांगून टाकणे हे धैर्याचेच काम आहे.

पुढील प्रकरणामध्ये संकीर्ण राज्याविषयी सांगितले आहे. अर्थात् त्यामध्ये जिंकून घेतलेले राज्य हे मूळ राज्याला जोडणे आलेच. यामुळे कोणकोणते राजकीय पेचप्रसंग निर्माण होऊ शकतात, हे मॅकियाव्हेलीने सांगितले आहे. हे सद्यकाळालाही लागू होणारे वर्णन आहे. अशा वेळी येणारी नवी शासनप्रणाली कशी असेल हे काही सांगता येत नाही. जर शासक उद्धट असेल व शासनाधिकारी उद्धटपणा करीत असतील तर प्रजाजन नाराज होण्याची शक्यताच जास्त असते. मग एकत्रितपणे उठाव होऊन वा अनागोंदी माजून राज्य उलथवले जाऊ शकते अशा वेळी नेमके काय करता येईल हे अतिशय कुटील राजनीतिज्ञाप्रमाणे मॅकियाव्हेलीने सांगितले आहे. एक तर, पूर्वीच्या राजाचा संपूर्ण वंशच नाहीसा करावा अर्थात् त्याच्या बाजूने असणारे मुत्सद्दीही संपवावेत म्हणजे वैचारिक स्तरावर विरोध करून तो पसरवणारे कुणी राहत नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट, म्हणजे नवे कायदे तरी करू नयेत, म्हणजे जनता नाराज होणार नाही. जिंकलेल्या ठिकाणी महत्त्वाची ठाणी कोणती, कुठून बंड होण्याची शक्यता आहे, अशा ठिकाणी आपली माणसे वा सैन्य ठेवावे. कारण जो प्रदेश आपण जिंकू तो जर भाषा, रूढी, परंपरा, कायदे याबाबतीत भिन्न असेल तर असा प्रदेश ताब्यात कायम राहण्यासाठी दैवाची साथ आणि भरपूर बळाची आवश्यकता असते.[५]

रियासतकारांनी धर्मसत्ता आणि राजसत्ता यातील संघर्षाचा अनुवाद चांगला केला आहे. ते सारे मूळ पुस्तकातून वाचणे जास्त महत्त्वाचे आहे. राजाने राज्य वाढवायचे असेल तर काही कामे हाती घ्यावी लागतात. अर्थात् त्यासाठी यद्ध करून जिंकावे लागते हा भाग आहेच: त्यापेक्षा जास्त जिंकलेला भाग आपल्या ताब्यातच ठेवण्याचे कौशल्य राजाला वापरावे लागते. पोप याचे वैभव आणि स्पेनची इटलीमध्ये सत्ता वाढली. त्याला कारण फ्रान्सच ठरला. पण त्यामुळे फ्रेंचांचा बीमोड झाला आणि त्यांना इटली सोडून जावे लागले हेही तितकेच खरे आहे. या साऱ्या गोष्टींवरून एक सर्वसाधारण नियम मॅकियाव्हेलीने सांगितला आहे तो म्हणजे 'इतरांना मोठे करण्याच्या नादामध्ये आपण अनेकदा स्वतःचा विनाश करून घेतो.'[६] किमान दुसऱ्यास थोडे मोठे करताना स्वतःमध्ये काही प्रमाणात शक्ती हवी व तसे वर्तनही हवे. अन्यथा समोरचा मोठा होताना आपला विनाश होत जातो.

अलेक्झांडरने डरायसचे (डेरियसचे) राज्य घेतले ते त्याच्या हाती तर टिकलेच; पण त्यापेक्षाही जास्त म्हणजे त्याच्यामागून जे राजे आले त्यांना काहीही अंतर्गत बंडाळी न होऊ देता राज्य सांभाळता आले. याबाबतीत नेमके काय झाले हे सांगताना मॅकियाव्हेलीने चांगली टिपणी दिली आहे, ती म्हणजे एकसत्ताक राज्ये दोन रीतींनी चालतात, एक म्हणजे

राजाने केवळ स्वतःच्या इच्छेने प्रधान म्हणून काही नोकर ठेवून त्यांच्या सल्लामसलतीने राज्यकारभार चालवणे आणि दोन, राजाने आपल्या सरदारांच्या मदतीने राज्यकारभार चालवणे. या साऱ्या गोष्टी एखाद्या राजाने करणे हे किती अवघड आहे, हे समजून घेणे आवश्यक आहे. रोमन लोकांचे साम्राज्य जसे जसे वृद्धिंगत होत गेले तसे तसे विनाशाकडे सरकत गेले. प्रत्येक रोमन अंमलदाराचे बळ वाढले आणि मुख्य म्हणजे राजवंश नाहीसा झाल्याने राजा म्हणून कोणी वारस राहिला नाही, शिवाय, सारे काही निर्नायक झाले. त्यामानाने अलेक्झांडरला आशियाचे राज्य राखता आले.[७] हे विशेषतः मॅकियाव्हेलीने लिहिले आहे. हेच पिरस आणि इतरांना मात्र जमले नाही, कारणे काही असोत.

मॅकियाव्हेलीने एक निरीक्षण स्वतःच्याच अमलाखाली आलेल्या व स्वतंत्रपणे चालवत असलेल्या राज्यांचे आणि शहरांचे प्रशासन कसे राखावे, याविषयीही आपले मत व्यक्त केलेले आहे. अशी शहरे एक तर नष्ट करावीत किंवा स्वतः तिथे जाऊन राज्य करावे किंवा सरळ आपल्यातर्फे काही लोकांना राज्यावर घेऊन त्यावर आपला वचक ठेवून राज्य चालवावे. अशा वेळी जनतेला जाचक वाटतील असे कायदे वा नियम लावू नयेत किंवा जनतेच्या पूर्वस्वातंत्र्याचा व कायद्याचाच अंमल असू द्यावा. हे असे करण्याचे कारण अगदी स्पष्ट आहे कारण सामान्य माणसाला सत्तेत रस नसतोच, तो सामान्यपणे आपल्या जगण्याचा मार्ग सुरळीत आहे का, हे पाहतो. जर कायदे आणि नियम तेच असतील व त्याच्या अधिकारावर वा स्वातंत्र्यावर कुठलीही गदा येत नसेल तर सहसा सामान्य माणसे ही सत्तांतरावर बेफिकीर असतात हे नक्की! याबाबतीत रोमन आणि स्पार्टाचे उदाहरण त्याने दिलेले आहे. राज्य प्रशासनाच्या बाबतीत विवेक हा फार महत्त्वाचा असतो, जर विवेकाने राज्य राखता आले तर मग प्रश्नच येत नाही. मोझेस वगैरेंनी बळाचा वापर करून कायदे अमलात आणले; पण फ्रायरला ते जमले नाही; पण एक उत्तम उदाहरण मॅकियाव्हेलीने दिले आहे ते म्हणजे सायराक्यूसच्या हायरोचे! राज्यातील जनतेवर अन्याय होत असताना नेमके हायरोला सेनाध्यक्षपद मिळाले. त्याने ते कार्य अतिशय उत्तम पद्धतीने निभावले, पुढे कष्ट करून त्याला राज्यप्रशासनही ताब्यात घेता आले.

राज्य प्रशासनासाठी ज्ञान आणि शक्ती ही हवीच असते. केवळ इतर राज्यांवर हल्ला करून राज्य चालवणे ही बाब वेगळी! पण राज्य एकाएकी, फारसे परिश्रम न करता प्राप्त झाले तरीही त्याचे रक्षण करण्यास शहाणपण हवे असते. मिलानच्या ड्यूक झालेल्या फ्रान्सिस फोरझाला परिश्रमपूर्वक मिळवून टिकवताही आले; पण तेच सीझर बारजीयाला मात्र सहजी मिळवूनही टिकवणे जमले नाही. याची अनेक उदाहरणे इतिहासाचे अवलोकन आणि अभ्यास करून मॅकियाव्हेलीने दिलेली आहेत. आपण संघर्ष करतानाही कुणासोबत करतो आणि त्याची निष्पत्ती काय होणार हे जरा पाहून घ्यायला हवे. विशेषतः बलवानासोबत आपला संघर्ष असेल तर तो कसा असावा, याबाबतीत मॅकियाव्हेलीने सुतोवाच केलेले

आहे. 'बलवान लोकांवर उपकार केले तरीही ते आपला पूर्वीचा द्वेषभाव व मानहानी विसरून जातील असे मानणे ही चुकी होय.'[८] समकालीन राजकारणात मॅकियाव्हेलीने किती प्रसंग पाहिले असतील आणि त्यापासून कोणते धडे घेतले असतील याची ही साक्ष आहे.

राजकारणात आणि सत्ताकारणात काहीही होऊ शकते याचे एक उदाहरण म्हणून मॅकियाव्हेली सांगतात, की दुष्टाने अन्यायाने एखादे राज्य जर मिळावले तरी ते टिकवणे इतके काही सोपे नाही. एक तर दुष्टपणा करून मिळवले किंवा राज्यातील जनतेने जरी आपखुशीने दिले तरीही ते सांभाळणे तितकेसे सोपे नाही. मॅकियाव्हेलीने आलिव्हरोटोचे उदाहरण दिले आहे. ते फारच भयंकर आहे. असे राजकारणात विशेषकरून एकाधिकारशाहीमध्ये घडू शकते. राजाने आपले वर्तन तरी किमान एकसारखे ठेवावे अशी अपेक्षा आहे. प्रजेशी वर्तन करताना खूपच चांगले वागणे हेही त्रासदायक असते; पण किमान फार वाईटही वागू नये. कुठल्याही प्रसंगी वर्तन बदलण्याची वेळ येणार नाही, असे मध्यम धोरण ठेवावे, असे मॅकियाव्हेली म्हणतो.

आपखुशीने कुणी राज्य सोपवणे म्हणजे जवळ जवळ प्रजातंत्र किंवा लोकशाही असे म्हणता येईल. अर्थात् ते तितकेसे तंतोतंत नाही, कारण अनेकदा राजेशाहीतील राजाला पदच्युत करूनही पुनर्रचना होताना दुसरा कोणी राजाच सिंहासनी बसलेला दिसून येतो. अशा वेळी सर्वसामान्य लोकांचा आधार मिळवणे अतिशय आवश्यक होऊन बसते. नेविडीस या स्पार्टन लोकांच्या राजाने ग्रीस आणि रोमन लोक राज्यावर उठले असतानाही सामान्य माणसांच्या आधारावर स्पार्टा टिकवून ठेवले. महत्त्वाचे म्हणजे बड्या लोकांची कटकारस्थाने त्याने उलथवून लावली. एक महत्त्वाची नोंद त्याने दिली ती अशी की सामान्य लोकांमधून जर कुणी राजा झाले वा सत्ताधीश बनले तर सर्वच सत्ता बळकावण्याचा प्रयत्नही करू नये. राजाने दूरवर दृष्टी ठेवून प्रासंगिक वर्तन सारखेच वर्तन ठेवले व लोकास आपल्या प्रशासनाची गरज वाटेल असेच ठेवले व लोक आपल्याशी एकनिष्ठ कसे राहतील या अंदाजाने ठेवले तरच राज्य टिकेल असे त्रिकालाबाधित सत्य मॅकियाव्हेली नोंदवतो.[९]

राज्याची शक्ती कशी समजावी, याविषयी काही महत्त्वाच्या बाबी मॅकियाव्हेली याने सांगितलेल्या आहेत. राजा हा कुठल्याही संघर्षास तयार आहे का, कसा, प्रजेच्या बळावर की स्वबळावर, त्याची सत्ता कुठपर्यंत आहे, पूर्ण राज्याचे संरक्षण करण्यास तो तत्पर व सक्षम आहे की केवळ राजधानीच्या भोवती तटबंदी घालून बसला आहे, हे महत्त्वाचे! किमान राजा हा तरी प्रजेच्या मर्जीतला असावा, प्रजेची कुठल्याही संकटापासून सुटका करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे याचे सतत स्मरण त्याने ठेवणे गरजेचे असते. धर्मसत्ताक राज्याच्या बाबतीत एक सुरक्षितता असते असे स्वतः मॅकियाव्हेलीने कबूल केले आहे. जरी मॅकियाव्हेलीचा दृष्टिकोन हा धर्माच्या बाबतीत कट्टर नव्हता तरीही अगदीच निधर्मीही नव्हता. त्यामुळे धर्मसत्ताक राज्य स्थापन करताना आधी कष्ट घ्यावेच लागतात, मात्र एकदा

ते स्थापन झाले की पुन्हा त्यातील प्रजाजनच ते सांभाळण्यासाठी प्रयत्न करीत राहतात,[१०] याची नोंद त्याने दिली आहे. धर्मसत्ताक राज्याबद्दल बोलतानाही अंतिमतः पोप लिओ हे प्रामाणिक व सद्गुणी असल्याने धर्माची सत्ता वाढून लोकांच्या मनात सद्बुद्धी निर्माण होईल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

पण केवळ राजा व राज्य असून भागत नाही. राजा प्रजेचे संरक्षण करणार ते कशाच्या भरवशावर? त्यासाठी सैन्य तर हवेच असते; आणि सैन्य एक तर पुरेसे असावे लागते किंवा भाड्याने सैन्य आणावे लागते. अशा वेळी नेमके काय विश्वासार्ह आणि काय नाही, हा प्रश्न उपस्थित होतो; पण महत्त्वाची बाब अशी की, सैन्य स्वतःचे असेल तर त्याला प्रशिक्षित ठेवता येते, सैन्य सुव्यवस्थित प्रशिक्षण असेल तर तेही लढायला तयार राहतील; पण जर सैन्याला प्रशिक्षण व्यवस्थित नसेल तर ते तरी लढणार कशाच्या जोरावर? पण भाड्याने मागवलेले सैन्य हे कायम तात्पुरत्या निष्ठेने आणलेले असते. अशा सैन्याच्या प्रामाणिकपणाची काय खात्री आणि त्यांनी प्रशिक्षण घेतले याची तरी काय खात्री? मॅकियाव्हेलीने स्वतःचे सैन्य, भाड्याचे सैन्य, मदतनीस व मिश्र असे चार प्रकार केलेले आहेत. एक महत्त्वाची गोष्ट अशी, की भाड्याने आणलेले सैन्य जर प्रामाणिक नसेल तर तेच राजाला जिंकून वा प्रजेला छळून सत्ताधीश बनू शकतात. बहुधा मॅकियाव्हेलीने दिलेल्या लढ्यातील काही अनुभव गाठी ठेवून त्याने हे लिहून ठेवलेले असावे, कारण प्रत्येक सत्ताधीशास, प्रशासकास येणारा हा अनुभव अनेक राज्यात आणि देशात आपल्या राज्याची बाजू मांडायला जाणाऱ्या वकिलाला नक्कीच माहीत असावे.

त्या अनुभवातूनच त्याने राज्य, शासनकर्ता राजा, त्याचे सैन्य आणि परस्परसंबंध या सगळ्या गोष्टींवर मॅकियाव्हेलीसारखा अनुभवी माणूस लिहू शकतो. राजाला आपल्या प्रशासनाखालील संपूर्ण राज्याचे संरक्षण करायचे असेल तर त्याला स्वतःचे सैन्य समर्थपणे बाळगता आले पाहिजे, सैन्याचे व्यवस्थापन करता आले पाहिजे. लढण्यामुळे स्वतःचे राज्य वाचवता येते, नसेल तर बलाढ्य व्यक्तीला आणि राज्यकर्त्या राजाला ते लढून मिळवताही येते; पण मिळवलेले राज्य जपायचे असेल तर शस्त्रसज्ज सैन्य हवे, कारण प्रशासनात त्याची मदत होते. राजास स्वदेशस्थितीची उत्तम कल्पना असणे गरजेचे असते, कारण त्याशिवाय त्याला परराज्य आणि तेथील एकंदर स्थितीचा अदमास लावता येत नाही. राजाने विशेषतः परराज्यातील आदर्श कसे आहेत, लोकभावना यांचा विचार अवश्य करावा.

राजाच्या वर्तनाविषयी मॅकियाव्हेलीने इतके विस्ताराने लिहिण्याचे कारण एवढेच की राजे लोक स्तुतीस जसे पात्र ठरतात, तसेच निंदेसही पात्र ठरतात. त्यामुळे राजाचे वर्तन हे प्रजेच्या एकंदर भावनांचा विचार करून असावे. कारण चांगले वर्तन आणि वाईट वर्तन यांचा निर्णय करणे राजाच्या बाबतीत अवघड असते. जे वर्तन आपण चांगले आहे, असे म्हणून लागतो, त्याचाच परिणाम पुढे अतिशय वाईट असा असू शकतो. तर कधी वाईट

वर्तनाचा अंतिम परिणाम म्हणून चांगलेही निष्पन्न होऊ शकते[११]. राजाच्या बाबतीत हे सांगता येत नाही, म्हणून राजाने प्रजाजनाशी वागताना अत्यंत विचारपूर्वक वागावे. त्यामुळे राजाने औदार्य दाखवावे की कृपणता याविषयीही संभ्रम निर्माण होऊ शकतो. राजा हा औदार्य असलेला चांगलाच; पण त्यालाही एक मर्यादा असते. एका मर्यादेपर्यंत औदार्य दाखवून मग त्याने पुनश्च मूळ वृत्तीत परतायला हरकत नाही. कारण शेवटी खुल्या हाताने राजेश्वर्य उधळणाऱ्या राजाचा कोष अंतिमतः रिक्त होऊन राज्याची परिस्थिती बिकट होऊ शकते. शिवाय राजाने कसे वागावे याचा विचार करताना आत्यंतिक दया दाखवावी की नाही? की निर्दयपणे वागावे, हाही प्रश्न पडतो. प्रजेच्या मनामध्ये एखाद्या कायद्याविषयी वा नियमाविषयी प्रेम असावे की भय असावे, याचा विचार करून अशा प्रकारच्या प्रश्नांचा विचारपूर्वक निर्णय राजाने घेणे भाग ठरते.

राजा म्हटल्यावर त्याला प्रजेला वा इतर राज्यांची संबंध ठेवताना त्यांना काही शब्द देणे भाग असते. राजकारणात सारे काही क्षम्य असते तसे आपल्याकडेही म्हणतात. मॅकियाव्हेलीनेही त्याचा विचार केला आहे. त्याच्या मते, राजाने राजकारणामध्ये जशास तसेच वागावे. जी माणसे सत्याने वागतात, त्यांना दिलेला शब्द खरा करायला हरकत नाही; पण जी माणसे सतत धोकेबाज खेळी करीत असतात, अशांना योग्य वेळी शासन देणे अत्यंत आवश्यक असते. मात्र राजाने वागताना मात्र आपण सद्गुणीच आहोत, असे वागले पाहिजे. अगदीच शक्य नसेल तर किमान आपण सद्गुणी आहोत, असे दाखवले तरी पाहिजे. मॅकियाव्हेलीने सहाव्या अलेक्झांडरचे उदाहरण दिले आहे, तो वचन देताना अतिशय मोकळेपणाने देई, सत्यवक्ता दिसे; पण कधीच पाळत नसे. पण लोकांना तो चांगले ओळखत असल्याने त्याला कधीच बिकट प्रसंगांना तोंड द्यावे लागले नाही, हे विशेष आहे. थोडक्यात, किमान स्वतःला आणि राज्याला वाचवून त्याचे भले करायचे असेल तर खोटे बोलणेही काही गैर नाही. मॅकियाव्हेलीने एक उदाहरण देताना म्हटले की 'हल्ली एक राजा'[१२] असा आहे की, त्याच्या तोंडात खरेपणा आणि शांतता याशिवाय दुसरे काही नाही. आणि जर त्याने त्या खरेपणाचा व शांत स्वभावाचा खरोखरी उपयोग केला असता, तर त्याचा कधीच नाश होऊन गेला असता.' हे वाक्य त्याने अरगॉनच्या फर्डिनांडबद्दल म्हटल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

पण अर्थात् असे वर्तन झाले, की प्रजेस अप्रिय होण्याचा दाट संभव असतोच, कारण शब्द देऊन परतणारा राजा हवा कुणाला? त्यासाठी काय करावे लागेल? राजाने सद्वर्तनी असावे, प्रजेच्या हिताचे कामही करावे, शब्द जपून वापरावे, कारण त्यामुळे प्रजेचा विश्वास राहू शकतो. मग अशावेळी जर कुणी राजाविरुद्ध कटकारस्थान केले तरीही जनता त्याला साथ देणार नाही. सदवर्तन हा एक चांगला उपाय आहेपण समजा. राजाला काही वाईट वा लोकप्रिय निर्णय घ्यावा लागला तर काय करावे? अशा वेळी तो निर्णय अंमलदाराकडून

अंमलात आणावा व कृपा आणि दयाभूतपणाची कृत्ये मात्र स्वतः करावी'[१३], म्हणजे लोकांत मोठेपणा दिसून येतो. याविषयीचे उदाहरण देताना मॅकियाव्हेलीने मार्कस ऑरेलियस, पर्टिनाक्स आणि अलेक्झांडर यांची उदाहरणे दिलेली आहेत. हे बादशहा अतिशय गरीब, न्यायप्रिय असून दुष्टपणा त्यांना अजिबात आवडत नसे; पण त्यांना त्याचा त्रास झाला. केवळ मार्कस ऑरेलियस बादशहाला फार त्रास झाला नाही. त्याला परंपरेने[१४] वडिलांकडून गादी मिळाली होती, प्रशासन हाती येण्यासाठी प्रजाजन व सैन्य यांचे साहाय्य घेतल्याचे त्याच्यावर उपकार नव्हते, तसेच तो स्वतः चांगला असून जनतेस त्याने असे काही प्रभावाखाली ठेवले होते, की कुणीही नाराज नव्हते. प्रथम खंडामध्ये आपण मार्कस ऑरेलियस बादशहाच्या बोधवचनांच्या पुस्तकांचा समावेश केलेला आहे. तो विचाराने आणि आचाराने स्टॉईक होता, राज्य मिळावे म्हणून त्याने कसलेही बंड केले नव्हते वा त्याला तशी राजा होण्याची पिपासाही नव्हती, अत्यंत अनासक्त असलेल्या मार्कसने राज्यावर बसलेला असतानाही वैभव भोगले नव्हते, त्याच्या या अनासक्त व जनहितार्थ कार्य करण्याच्या इच्छेमुळेच खरे तर तो सत्तेवर टिकून राहिला व जनमतही त्याच्या बाजूने राहिले. मॅकियाव्हेलीने मार्कस आणि सेव्हरस यांच्याविषयी गौरवोद्गार काढलेले आहेत. नव्याने राज्यावर आलेल्याने सेव्हरस वा मार्कस यांची नक्कल करण्याचा प्रयत्न करू नये तर राज्यास बलशाली करण्यासाठी काय करायचे ते सेव्हरसपासून शिकावे व राज्य प्राप्त झाल्यावर ते कसे सांभाळावे, त्याचे संरक्षण कसे करावे हे मार्कसपासून[१५] शिकावे असे तो म्हणतो.

काही महत्त्वाच्या मुद्यांची चर्चा मॅकियाव्हेली करतो. प्रजाजनाजवळ शस्त्रे असू द्यावीत की नाही? असा प्रश्न तर भारतीय उपखंडातही लोकशाहीत हा प्रश्न विचारण्याजोगा आहे. ज्यांच्याजवळ शस्त्रे असतात ती आक्रमक झाली तर देशात अनागोंदी माजेल असे म्हटले जाते; पण आपल्याकडे शस्त्रे असलेली काही माणसे उन्मत्त आणि निःशस्त्र असलेली माणसे सज्जन व विद्वान आहेत. त्यामळे आदर्श लोकांना केवळ पराकोटीच्या अहिंसकपणामळे उन्मत्त व सत्ताधारी लोकांच्या मागे मुकाट्याने जावे लागते. यासाठी बहुधा मॅकियाव्हेलीने सुस्पष्टपणे असे सांगितले आहे, की लोकांना केवळ हत्यारेच देऊ नयेत, तर प्रशिक्षणही द्यावे. अगदी नवे राज्य जिंकले आणि त्या देशातील नागरिकांजवळ शस्त्रे असतील तरीही असू द्यावीत. हळूहळू त्यांना विश्वासात घेऊन मगच काढून घ्यावीत. जुन्या राजास काढून जर नवा राजा म्हणून आपल्याला नेमण्यात आले तर आपण हा विचार अवश्य करावा, की आपणासच का नवा राजा नेमण्यात आले आहे? असेच मत किल्ल्यांच्या बाबतीतही निकोलो मॅकियाव्हेली याने दिले आहे. जर राजा प्रजेच्या अनुकूल असेल तर किल्ल्याशिवायही राजा हा सुरक्षित असतो आणि प्रजा प्रतिकूल असेल तर किल्ला असूनही राजा काही सुरक्षित राहू शकत नाही. म्हणून सारासार विचार करूनच अशी बांधकामांची रचना केली जावी.

राजाचा लौकिक वाढावा म्हणून काय करावे, राजाचे प्रधानाप्रती कर्तव्य काय असते,

राजाचे इतर खुशामती करणाऱ्या लोकांशी वर्तन कसे असावे वगैरे अनेक गोष्टींवर मॅकियाव्हेलीने आपले मत व्यक्त केले आहे. राजाने दैवावर विश्वास ठेवावा की नाही, यावरही चर्चा करण्यास त्याने मागेपुढे पाहिले नाही. एकंदर मॅकियाव्हेलीने आपली मते स्पष्टपणे मांडली आहेत. एकंदर सव्वीस प्रकरणांमधून निकोलो मॅकियाव्हेलीने आपले राजकीय विचार मांडले आहेत. हे सारे लिहिताना कितीही निर्भीडपणे लिहिले असले तरीही एक राजघराण्याचा वचक वर असल्याची मर्यादा नक्कीच जाणवते.

भारतीय राजनीतिविचार आणि राजधर्म : एक तुलना

भारतीय राजनीतिविचार आणि राजधर्म अर्थात् द प्रिन्स यांच्यामध्ये काही साम्य व भेदस्थळे नक्कीच आहेत. भारतीय राजनीतिशास्त्राचा विचार करायला सुरुवात केली, की सर्वप्रथम दृष्टीसमोर येते ते कौटिल्याचे अर्थशास्त्र! इ.स.पू. चौथ्या शतकामध्ये झालेला कौटिल्य अर्थात् चाणक्य आणि त्यानंतर जवळपास अठराशे वर्षांनंतर झालेला मॅकियाव्हेली यांच्यात तशी तुलना करणे सोपे नाही. दुसरी तुलना करता येते ती श्रीरामचंद्रपंत अमात्य यांच्या आज्ञापत्र या शिवकालीन प्रशासनपद्धतीवर प्रकाश टाकणाऱ्या ग्रंथांशी! हा ग्रंथ तसा मॅकियाव्हेलीलिखित प्रिन्सच्या उत्तरकालीन असला तरीही फार उशिराचा नाही. काही महत्त्वाच्या बाबींवर चर्चा करता येण्यासारखी आहे, तेवढेच आपण पाहू.

प्रथमतः राजकीय तत्त्वज्ञान कशाला म्हणावे हे आपण समजून घेऊ. प्रत्येक तत्त्वज्ञानाचे काही विशिष्ट घटक असतात, असे समजायला हरकत नाही. राजकीय तत्त्वज्ञानाचेही काही घटक आहेत. एक म्हणजे त्यात राजकीय मूल्ये, राजकीय तत्त्वे व राजकीय आदर्श असतात. दोन, राजकीय संकल्पनांचा पायाभूत विचार, राजकीय सिद्धांत, विचार, विचारप्रणाली यांची पद्धतशीर मांडणी त्यात केलेली असते. तीन, वस्तुनिष्ठ अभ्यासातून मांडलेल्या राजकीय सिद्धांताची पद्धतशीर रचना म्हणजे राजकीय तत्त्वज्ञान म्हणता येईल.

कौटिल्य, रामचंद्रपंत अमात्य वा मॅकियाव्हेली यांच्या लेखनांमध्ये अशा प्रकारच्या घटकांचा तसा अंतर्भाव नाही. कौटिल्य वा मॅकियाव्हेली यांच्या लेखनामध्ये राजकीय संज्ञा, संकल्पना किंवा भाषिते मांडतात. त्यात काही तत्त्वे व गृहीत तत्त्वेही सापडतात, मतमतांतरेही सापडतात; पण राजकीय तत्त्वज्ञानाची उंची त्याला लाभत नाही. "राजकीय तत्त्वज्ञान हे व्यक्ती आणि समाजाच्या राजकीय जीवनाशी निगडित असते, म्हणूनच तर त्याच्या अभ्यासाचे ध्येय हे व्यक्ती आणि समाजाच्या अंतिम ध्येयासाठी करावयाच्या कृतीशी संबंधित असते आणि अंतिम ध्येय हे नेहमीच नैतिक व उच्च कोटीचे असते, म्हणून राजकीय अभ्यासाचे विषय हे स्वातंत्र्य, समता, न्याय यासारखे मौलिक असतात."[१६] कौटिल्य किंवा मॅकियाव्हेली यांनी अशा प्रकारच्या मूलभूत तत्त्वांची मांडणी केलेली आहे का वा सिद्धांताची मांडणी केलेली आहे का, याचे उत्तर नकारार्थी द्यावे लागते. हेगेल,

मार्क्स वा मिल यांना राजकीय तत्त्वज्ञ म्हणता येते, कारण ते आपल्या राजकीय कृतीच्या अंतिम अशा काही उद्दिष्टांचा वेध घेतात, त्यांची ध्येये व हेतू हे तसे उच्च असल्याचे लक्षात येते. तशी राजकीय तत्त्वज्ञानाची उंची काही कौटिल्य म्हणा वा मॅकियाव्हेली म्हणा यांच्या लेखनामध्ये सापडत नाही हे खरे. त्यांच्या लेखनामध्ये तसे राजकीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचे घटक सापडत नसल्याने त्यांना राजकीय तत्त्वज्ञ म्हणण्यापेक्षा राजकीय विचारवंत म्हणणे जास्त सयुक्तिक होईल. त्यामानाने रामचंद्रपंत अमात्य यांचा 'आज्ञापत्र' हा ग्रंथ केवळ शिवकालीन प्रशासन व्यवस्थेचा एक दर्पण आहे असे समजल्यास फारसे वावगे होणार नाही, कारण अशा प्रकारची कसलीही मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला नाही, तसेच केवळ श्रीराजाराम महाराजांचे पुत्र शंभू छत्रपतींनी अर्थात् छ. संभाजीराजे दुसरे यांनी आज्ञा केली म्हणून थोरल्या महाराजांची प्रशासन पद्धत शब्दबद्ध केलेली आहे, तर कौटिल्याने भावी युवराज याने राज्यप्रशासन कसे पाळावे, यासाठी ग्रंथनिर्मिती केली. मॅकियाव्हेलीने मात्र आपल्या राजकीय कारकीर्दीतील अनुभवांद्वारे प्रशासनव्यवस्था कशी असावी हे सांगितले. तौलनिक विषय बघता तिघांमध्ये एक मोठे साम्य आढळते, कौटिल्य काय किंवा रामचंद्रपंत अमात्य काय, दोघेही स्वतः लढवय्ये नव्हते. हाच अनुभव मॅकियाव्हेलीच्या बाबतीत सांगता येतो. प्रत्यक्ष लढायचे कौशल्य दाखवण्याची वेळ आली तेव्हा त्याला ते जमले नाही. मोहिमा मात्र तिघांनीही अगदी पूर्णपणे यशस्वी केल्या. यामध्ये कौटिल्याचे यश हे अधिक प्रभावळ देऊन जाते, कारण त्याने एक साम्राज्य उलथवून दुसऱ्याची स्थापना केली. अगदी पद्धतशीरपणे पावले टाकत त्याने हे केले. मॅकियाव्हेलीने प्रजासत्ताकामध्ये कार्य केले, महत्त्वाची भूमिका निभावली. पुढे जेव्हा राजसत्ता आली तेव्हाही त्याला मिळालेल्या संधीचे त्याने प्रामाणिकपणे सोने केले. रामचंद्रपंत अमात्य हे शिवप्रभूच्या उत्तर काळात म्हणजे १६७२ मध्ये पिता निळो सोनदेव यांच्या मृत्यूनंतर प्रत्यक्ष दरबारी कामास आले. शिवप्रभूच्या देहावसानानंतर आणि छ. संभाजी महाराजांच्या क्रूर हत्येनंतर छ. राजाराम महाराष्ट्र सोडून जिंजीस गेले तेव्हा रामचंद्रपंतांची खरी कर्तबगारी दिसून आली. त्यांनी महाराष्ट्रात संघटन केले. महाराष्ट्राच्या दक्षिण भागाची जबाबदारी संताजी घोरपडे आणि त्यांच्यावरच होती. १६९६ मध्ये संताजी मारला गेल्यावर एकट्या रामचंद्रपंतांनी १७०७ मध्ये शाहूंची सुटका होईपर्यंत काम निभावले. त्याच काळात १७१५ ला त्यांनी शंभू छत्रपती यांच्या आज्ञेने आज्ञापत्राचे लेखन केले. अर्थात् तिघांनीही राजघराण्याची सेवा करण्याच्या मिषाने हे लेखन केलेले आहे हे विशेष! आणि तिघांनीही आपल्याला मिळालेल्या संधीचे अगदी सोने केले असे म्हणता येईल. त्यांचा आदर्श ठेवून कार्य करणाऱ्यांची संख्या कमी नाहीय, त्याचे कारणही हेच आहे

लेखनशैलीच्या बाबतीत तिघांमध्येही कसलेही साम्य असण्याचा काही प्रश्न येत

नाही. भाषा हा मुद्दा तर आहेच. कौटिल्याचे लेखन संस्कृतात, मॅकियाव्हेलीने लिहिलेले इटालियन भाषेमध्ये तर रामचंद्रपंत अमात्यांचे लेखन हे मराठीमध्ये आहे. तिघांनीही राजकीय अनुभवातून परिपक्वता मिळवली असली तरीही मॅकियाव्हेली आणि रामचंद्रपंत अमात्य यांनी मात्र प्रत्यक्षात सत्तेतील पदे भूषवून येणारे पेचप्रसंग हाताळल्याचे लक्षात येते. मॅकियाव्हेली जवळपास पस्तीसचाळीस वर्षे सत्तेवर व सत्तेशी संबंधित असावा, तर रामचंद्रपंत अमात्य नाही म्हटले तरीही पंचेचाळीस ते पन्नास वर्षे संबंधित असावेत. त्यातील पस्तीस वर्षे ते सत्तास्थानावर होते, असे समजायला हरकत नाही. एकंदर सारे काही लेखन हे अनुभवाधिष्ठित आहे. कौटिल्याने राजाने कसे वर्तन ठेवून राज्यप्रशासन सांभाळावे यासाठी लिहिले, मॅकियाव्हेलीचाही जवळपास हाच हेतू आहे. अमात्यांचा हेतू हा शिवप्रभूच्या कारकिर्दीतला एक साक्षीदार म्हणून प्रशासकीय पद्धती लिखित स्वरूपात ठेवून त्यानुसार वर्तावे हाच आहे. कौटिल्य व मॅकियाव्हेली यांची जागतिक स्तरावर दखल घेतली गेली तेवढी रामचंद्रपंत अमात्यांच्या आज्ञापत्राची घेतली गेली नाही, हे वास्तव आहे. नाही म्हणायला १९२९ मध्ये श्रीकृष्ण व्यंकटेश पुणतांबेकर यांनी आज्ञापत्राचा इंग्रजी अनुवाद A Royal Edict on the principles of State Policy and Organization, during the sixty years years' Wars of Maratha Independence (A.D 1646-1706)' या नावाने 'Journal of Indian History' च्या आठव्या वर्षीच्या अंकात केल्याची नोंद आहे, जे पुढे पुस्तकरूपाने आले, पण कुठे फार चर्चा झाल्याचे दिसत नाही.

एकंदर मॅकियाव्हेलीने आपल्या राजधर्ममध्ये सव्वीस प्रकरणांमध्ये कुठले विषय हाताळले याचा सारांश आपण पाहू शकतो.

राजनीती : मुळात ग्रंथ लिहिण्याचा हेतू हा राजनीतीतील खाचखळगे आणि संभाव्य प्रसंग वा डावपेच सांगण्याचा होता हे अगदी स्पष्ट आहे. कारण तसे स्पष्ट दिसते. अर्थात् राजनीतीचे हे वर्णन आणि त्याचे महत्त्व हे आपण कालसापेक्ष आहे का, असा विचार करू शकतो. कारण ही राजनीतीची संकल्पना मुळात राजेशाहीच्या संकल्पनेतून उदयाला आलेली दिसते. कौटिल्य काय किंवा मॅकियाव्हेली काय यांच्या राजनीतीच्या संकल्पना या राजेशाहीशी निगडित होत्या.

'राजा म्हणजेच राज्य' अशा प्रकारची त्यांची राज्य संकल्पना दिसते. मॅकियाव्हेलीने प्रजासत्ताकाचा अनुभव घेतला असला आणि ते टिकावे असा प्रयत्न त्याने केलेला असला तरीही प्रस्तुत ग्रंथामध्ये मात्र त्याने प्रजासत्ताकाच्या कुठल्याच विचारांची मांडणी केलेली नाही. त्यामुळे त्याचे गणतंत्र ते तसे राजा आणि सम्राटांच्या प्रशासनाखालीलच असल्याचे लक्षात येते. कौटिल्याचा विचार करता तो फार प्रजासत्ताकाचा समर्थक असेल असे काही वाटत नाही. व्यक्तिस्वातंत्र्याच्या संकल्पनाही दोघांनी राजा आणि राज्यप्रशासन सापेक्षच मांडलेल्या आहेत, असे दिसून येते. रामचंद्रपंत अमात्यांचा आज्ञापत्र हा ग्रंथ तसा शास्त्रीय

मांडणीचा, साधार विधाने करणारा वा सोपपत्तिक वा खंडनमंडनपर विधाने करणारा नाही. पूर्वापारपासून चालत आलेल्या प्रशासनपद्धतीचा अवलंब शिवप्रभुंनी कसा यशस्वीपणे केला हे केवळ सांगण्याचा हेतू आहे. अभ्यासकांच्या म्हणण्यानुसार महाभारतातील शांतिपर्वात येणारे राज्यव्यवहाराचे विवेचन, कौटिलीय अर्थशास्त्र, कामंदकीय नीतिसार यासारख्या काही ग्रंथातील राजनीतितत्त्वांशी पंतांच्या आज्ञापत्राचे वैचारिक साम्य असले तरीही भेद मात्र भरपूर आहेत. 'जेथे जेथे पारंपरिक संचिताचा भाग येतो तेथे तेथे 'आज्ञापत्र' आणि प्राचीन ग्रंथ यात साम्य आढळते. आणि जेथे जेथे समकालीन व्यवस्थेचे, विचारांचे प्रत्यंतर येते तेथे तेथे 'आज्ञापत्र' आणि प्राचीन ग्रंथ यांत भेद जाणवतो.'[१७] तसे मॅकियाव्हेलीचे लेखन हे सुस्पष्ट आहे. कुठल्याही प्राचीन ग्रंथाचा त्याने आधार घेतल्याचा सुस्पष्ट उल्लेख तरी नाही. काही प्रमाणामध्ये राजाची कर्तव्ये वा वर्तन किंवा सद्गुणांविषयी बोलताना मात्र तो राजा सद्गुणी व विचारशील असावा हे मात्र मान्य करतो. बहुधा मार्कस ऑरेलियसच्या स्टॉईक विचारांचा वा प्लेटोच्या तत्त्वज्ञ राजा या विचारांचा त्याच्यावर थोडाफार प्रभाव असावा; पण केवळ नैतिक असूनही प्रशासन उत्तम सांभाळता येईलच, याची ग्वाही तो देऊ इच्छित नाही. प्रसंगोपात्त धोरण तो मान्य करतो.

प्रशासकीय व्यवस्था : खरे तर याच विषयावर मॅकियाव्हेलीच्या प्रिन्सचे संपूर्ण लेखन अवलंबून होते असे म्हणायला हरकत नाही. कारण यामध्ये येणारे विषय हे राजाची कर्तव्ये, राजा आणि त्याचा प्रधान यांचे संबंध, प्रधानाची निवड कशी करावी, यावर त्याने लेखनाचे केंद्र ठेवले होते, असे स्पष्टपणे दिसून येते. दुसरी महत्त्वाची बाब मॅकियाव्हेलीच्या लेखनामध्ये दिसून येते ती अशी, की संरक्षण व्यवस्थेच्या बाबतीत मॅकियाव्हेली तसा खूपच जागरूक आहे. त्याबाबतीत त्याने अगदी पदोपदी सूचना दिल्याचे लक्षात येते.

कायद्याच्या बाबतीत मॅकियाव्हेली हा कौटिल्याइतकाच जागरूक होता, असे समजायला हरकत नाही. तसेच त्याचे कसोशीने पालन व्हावे, असेही त्याला नक्कीच वाटत होते. कायद्याचे पालन केले म्हणजे स्वातंत्र्याचे रक्षण होते, न्याय मिळतो. न्यायामुळे स्वातंत्र्य अबाधित राहते व कायद्याची अंमलबजावणी होते. स्वातंत्र्य, कायदा आणि न्याय यांचा विचार मॅकियाव्हेलीने केवळ प्रिन्समध्येच केला असे नव्हे, तर ठिकठिकाणी त्याने त्याचा उच्चार केला आहे. राजाचे प्रशासन हा जरी कळीचा मुद्दा त्याने मानला असला तरीही राज्य कोणते आणि कोणत्या मार्गाने हाताशी आले यावर मॅकियाव्हेलीने जोर दिलेला आहे. एक तर वंशपरंपरेने राज्य जरी मिळाले तरीही ते सांभाळण्याची पात्रता राजाजवळ हवी, याविषयी तो ठाम दिसतो. शिवाय अशी वेळ आल्यास नेमकी प्रशासन व्यवस्था कशी असावी, याचे संकेत त्याने वारंवार दिलेले आहेत. राजाला वंशपरंपरेने मिळालेले राज्य असेल तर त्याने कुठलेही नवे कायदे लावू नयेत याविषयीही तो जागरूक आहे. तर समजा, आक्रमण करून राज्य जिंकले असेल तर त्याचे प्रशासन कसे असावे, राजाने तिथे

जाऊन राहणे शक्य असेल तर अन्यथा त्याने तिथल्याच स्थानिक लोकांचे प्रशासन ठेवून राज्य चालवणे कसे सोयिस्कर असेल, भाषा, संस्कृती यांची समानता व भिन्नता असेल तर प्रशासनात येणाऱ्या अडचणींचा विचार मॅकियाव्हेली नक्कीच करतो. याला प्रशासन धोरण वा आंतरराष्ट्रीय वा राज्य संबंधातील धोरण असे म्हणता येते. अर्थात् कौटिल्य व मॅकियाव्हेली यांच्यामधले साम्य असेल तर ते इथेच आहे की, नवी भूमी संपादणे, तिचे रक्षण करणे, तिच्या हितासाठी कामे उभी करणे, आपल्या आणि प्रजेच्या हितासाठी योजना आखणे हे दोघेही इष्ट समजत होते.

अर्थात् युद्धनीती आणि लष्करीकरण हा एक महत्त्वाचा विचार मॅकियाव्हेली हाताळताना दिसतो. कौटिल्य याबाबतीत जरा जास्तच दक्ष दिसतो; आणि शिवकालीन युद्धनीतीचा भाग बघता आज्ञापत्रही याबाबतीत सजग दिसते; पण फरक इतकाच आहे, की आज्ञापत्रात केवळ गड आणि किल्ले यांच्या रचना आणि संरक्षणाचा भाग जास्त येतो. आरमारी युद्धाचाही संदर्भ येतो, त्यामुळे आरमार बळकट असावे असे शिवकालीन धोरण दिसते. कदाचित तेव्हाची परिस्थिती आणि त्याला कसे तोंड द्यावे लागणार यावर हे ठरते, असे म्हणावे लागेल. मॅकियाव्हेली किल्ले बांधण्याच्या बाबतीत तितकासा उत्साही दिसत नाही; पण कौटिल्याप्रमाणेच तोही आक्रमक आहे. राजाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा शूरवीर सेनाप्रमुख असाच आहे. त्यामुळे दोघांनाही युद्धनीती व सैन्याचे महत्त्व वाटत नसते तर नवल! त्या दोघांचीही युद्धनीती म्हणजे आक्रमक असणारे लष्करी धोरण होते असे म्हणता येते. लष्करी गुण व लष्करी आदर्श याविषयी कौटिल्य व मॅकियाव्हेली दोघेही सजग दिसतात. तशी परकीय देशावर आक्रमणाची संकल्पना वा साम्राज्यवाढीस करावे लागणारे यातायात यांचे संदर्भ आज्ञापत्रात असण्याची शक्यता नाही. एकंदर शिवप्रभुंचा कालखंड, तदोत्तर मराठी राज्य वाचवण्यासाठी करावी लागलेली धडपड हीच फार मोठी होती. तरीही जमेल तिथपर्यंत मुसंडी मारून मुगलांचा नवा प्रांत हाती घ्यावा, असे मॅकियाव्हेलीप्रमाणे शिवप्रभूचेही धोरण होते असे दिसून येते. आज्ञापत्रात 'नूतन देश साधणे, त्या देशात जी स्थळे असतील ती महत्प्रयासाने हस्तवश करावी. ज्या देशांत गडकोट नसतील त्या देशात आपल्या राज्याच्या सरहद्दीपासून पुढे जबरदस्तीने नूतन स्थळे बांधीत बांधीत तो देश आक्रमावा. त्या स्थळांचे आश्रयी सेना ठेवून पुढील देश स्वशासने वश करावा. असे करीत करीत राज्य वाढवावे,[१८] असलेल्या या उल्लेखाने एक स्पष्ट होते, की मॅकियाव्हेलीप्रमाणेच आक्रमक युद्धनीती शिवप्रभूही अवलंबत होते. पण तरीही याला साम्राज्यवादी धोरण न म्हणता आपण परकीयांच्या आक्रमणापासून आपली भूमी मुक्त करण्याचे धोरण म्हणू शकतो. अशी आक्रमकता मॅकियाव्हेलीच्या लेखनामध्येही आहेच.

लष्करी तयारी हा एक मॅकियाव्हेलीच्या चिंतनाचा विषय असावा, असे म्हटले तरीही ते फार वावगे होणार नाही. सैन्य या विषयावर त्याने स्वतंत्र प्रकरण लिहिलेले आहे. तसेच

सैन्याचे प्रकार आणि सैन्याप्रती असलेले राजाचे कर्तव्य यावरही स्वतंत्र प्रकरणे आहेत. सैन्य कसे असावे. यावर त्याने विचार मांडलेले दिसतात. सैन्याचे प्रकार कोणकोणते, राजाने स्वतःचे सैन्य बाळगणे किती आवश्यक आहे, स्वतःचे सैन्य असल्यास त्याला प्रशिक्षित करणे सोपे आणि ते राखले तर ते स्वतःच्या राज्यासाठी आणि राजाच्या भल्यासाठी लढू शकेल याचा विश्वास मॅकियाव्हेलीला वाटतो; पण भाड्याचे सैन्य असल्यास त्यावर लक्ष ठेवण्याची गरज किती हे तो सांगतो. कारण सैन्य भाड्याचे आणले याचा अर्थ राजा स्वतःचे सैन्य सांभाळण्यास नक्कीच सक्षम नाही हे सिद्ध होते. वेळ आली आणि भाड्याच्या सैन्याने दगा दिल्यास ते ज्याच्यासाठी आलेले आहे त्याच राजावर सत्ता गाजवू शकेल. त्यामुळे राजाने स्वतः अतिशय सतर्क राहणे गरजेचे आहे, असे मॅकियाव्हेलीला वाटते. तसेच सैन्याचे प्रकारही त्याने त्यासाठी केलेले आहेत. मदतीस आलेले सैन्य किंवा मिश्र म्हणजे काही आपले तर काही दुसऱ्याचे सैन्य आणि संपूर्णपणे स्वतःचे सैन्य यावर राजाची लष्करी तयारी अवलंबून असते. त्याचे लष्करी धोरणही अवलंबून असते. त्यामुळे राजाने सैन्याशी कसे वागावे याचे संकेतच मॅकियाव्हेलीने दिलेले आहेत. एखाद्या लष्करी धोरणाच्या बाबतीत तो कौटिल्याप्रमाणेच युद्ध आणि सैनिकीकरण यावर चिंतन मांडतो. त्यामानाने आहे त्या दुर्गांचे रक्षण करण्यासाठी गडावरील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या कशा व्हाव्यात, अधिकारी सतत कसे बदलावेत, एकाच घरातील अधिकारी का नसावेत, दगाबाजास शासन करावे, वगैरे अनेक शिवकालीन संरक्षण पद्धतीवर अमात्य प्रकाश टाकतात.

संरक्षण आणि परराष्ट्राशी ठेवावे लागणारे संबंध याविषयी मॅकियाव्हेलीने प्रजेच्या हिताच्या दृष्टीनेच पाहिले आहे. कायदा, कायद्याचे राज्य आणि न्याय यांचे पोषण करावयाचे असेल आणि आपल्या आधिपत्याखालील भूमीचे रक्षण करायचे असेल तर शस्त्रसज्जता हवीच हे तिघांनाही मान्य होते, असे समजायला हरकत नाही. असे असले तरीही मॅकियाव्हेलीने लोकप्रशासनाचा तसा सैद्धांतिक स्तरावर विचार मांडलेला दिसत नाही, जसा कौटिल्याने मांडला आहे. कौटिल्याने मात्र लोकप्रशासनाकडे कला आणि शास्त्र या दोन्ही दृष्टीने पाहिले आहे.

राजा आणि प्रधान वा मंत्रिमंडळ यांचे संबंध : राजाचे प्रधानाशी संबंध कसे असावेत, हा कळीचा मुद्दा आहे. याबाबतीत मॅकियाव्हेलीचा प्रिन्स आणि अमात्यांचा आज्ञापत्र हे अधोरेखित करावे असे मुद्दे मांडतात. अमात्य काय किंवा मॅकियाव्हेली काय, सुरुवातीला राजाची कर्तव्ये कोणती याचा आधी विचार करतात. राजाला कितीतरी कामे करावी लागतात. ती करणे हेच त्याचे कर्तव्य असते, कारण त्याचे, राज्यातील प्रजेचे आणि पर्यायाने राज्याचे भले त्यातच असते; पण सगळीच कामे काही राजाने प्रत्यक्षात जाऊन करावी अशी नसतात. त्यासाठी राजाने प्रधानांची नियुक्ती करणे गरजेचे असते. मॅकियाव्हेलीने तर स्पष्ट सांगितले आहे, की राजाने आपला प्रधान नेमणे हे काम सोपे नाही.

कारण मुळात ही व्यक्ती राजाच्या जवळची असते. त्यामुळे राजास जी काही माहिती मिळते ती त्याच जवळच्या लोकांकडून मिळत असते. त्यामुळे ही माणसे फार विश्वासार्ह असावी लागतात. शिवाय राजाला प्रत्येक गोष्टीविषयी व्यवस्थित माहिती हवी, कारण ती असेल तरच इतर कोणी त्याला फसवू शकणार नाही. अन्यथा राजाला प्रधानही फसवणे शक्य आहे. असा माणूस मिळाला, की राजाने त्याच्या सर्व सुखाची व्यवस्था करण्यास हरकत नाही, कारण तो पूर्णपणे राजासाठीच काम करीत असतो. त्याला जर सर्व काही मिळत गेले तर तोही राजाच्या सर्व कार्यामध्ये अगदी पूर्णपणे झोकून देऊन काम करू शकतो.

अमात्यांनी तर प्रधानाविरहित राज्यकारभार नाही असे सांगून प्रधानाचे महत्त्व सांगितले आहे. प्रधान म्हणजे राज्यलक्षणगृहाचे स्तंभ आहेत, असे सांगून अमात्य प्रधानाची 'प्रधान म्हणजे सरकारकून' अशी व्याख्या सांगतात. 'प्रधान हेच राजेलोकांची बाजू, प्रधानच राजबंधू, असे राजेलोकी पूर्ण चित्तात आणून लाक्षणिक प्रधान पाहून करावे. त्यावर संपूर्ण कारभार ठेवावा. प्रधान म्हणजे सरकारकून. त्याची भीड सर्वांपेक्षा अधिकोत्तर वागवावी. आपले शासनाप्रमाणेच त्याचे शासन सकळांवर चालवावे...'[१९] असे स्पष्टपणे सांगतात. शिवाय मॅकियाव्हेलीप्रमाणेच अमात्यही त्याची अवगणना, अपमान होणार नाही, त्याला बहुमान मिळावा, वगैरे प्रधानास सांभाळण्याचे पथ्यही सांगतात. थोडक्यात, मॅकियाव्हेलीने मांडलेले विचार हे प्रशासक असलेल्या राजाने अगदी राजकीय कौशल्याप्रमाणे अंगी बाणवावेत.

धर्मसत्ताक राज्य, राजकारण आणि नीतिमत्ता : मॅकियाव्हेली हा आपल्या लेखनामध्ये धर्म, राजकारण आणि नीती या तिन्ही गोष्टींना अगदी अनन्यसाधारण महत्त्व देत होता, हेच सिद्ध होते. प्रिन्स अर्थात राजधर्म हे एक उदाहरण झाले; पण एकंदरच मॅकियाव्हेलीच्या राजकीय विचारांमध्ये धर्म आणि राजकारण यांची सांगड घातली गेलेली लक्षात येते. एक तर पाश्चात्त्य विचारविश्वामध्ये ख्रिश्चन धर्माचा उदय आणि विस्तार होत जाणे ही गोष्ट क्रांतिकारक मानली गेलेली आहे; पण त्याही आधी नीतिशास्त्राच्या विचारांमध्ये स्टॉईकाची विचारधारा आली. झिनो (इ.स.पू. ३३३-२६४) याने स्टॉईकांच्या पद्धतीने स्थितप्रज्ञ आयुष्य जगण्याची नवी रीत उभी केली. मागोमाग झालेल्या ख्रिस्ताच्या उदयाला आणि धर्मप्रसाराला एक प्रकारची स्थिर अशी बैठक तयार झाली होती. सेंट ऑगस्टीनपासून तर धर्मप्रचारक तत्त्वज्ञांनी काम करायला सुरुवात केली होती. त्यामुळे जवळपास दीड सहस्रकात त्याचा परिणाम जनमानसावर होताच. त्यामुळे मॅकियाव्हेलीला धर्मसत्ताक राज्यावर लिहावेसे वाटले असेल तर त्यात फारसे काही नवल नाही. अगदी सुरुवातीलाच तो 'धर्मसत्ताक राज्य उभे करण्यासाठी संघर्ष करावा लागतो; पण ते एकदा उभारले की मग त्याला राखणे सोपे असते, कारण धर्माधिष्ठित सत्ता सर्वांना पूजनीय असल्याने तसे प्रजाजन करू देत नाहीत' असे सांगून टाकले आहे. ख्रिश्चन धर्माने आधीच आपले स्वर्गीय स्थान

घोषित करून टाकल्याने मानवाचा श्रेष्ठ आणि सद्गुणी मानव बनवण्याचे कार्य त्यांनी शिरावर घेतले होते. पहिला कॉन्स्टंटाईन याने चर्चला अधिक स्वातंत्र्य आणि सुरक्षितता असल्याचे मान्य करून टाकले होते, त्यामुळे चर्च हाच साम्राज्याचा अधिकृत धर्म बनला. ख्रिश्चन धर्माचा प्रसार आणि प्रचार या दोन गोष्टी कायमच सत्तेला पोषक राहिल्या. म्हणून तिकडे धर्म आणि राजसत्ता यांची सतत सांगड घालणे आवश्यक होऊन बसले; पण मॅकियाव्हेलीने असे म्हटलेले असले तरीही तो धर्माधिष्ठित राज्य पद्धतीच्या बाजूने होता, असे मानणे फार योग्य होणार नाही. त्याच्या दृष्टीने राजकीय जीवन हे सर्वश्रेष्ठ आणि सर्वात अधिक मौलिक होते.ख्रिश्चनांच्या नीतितत्त्वांना विरोध करणारा म्हणून त्याला ओळखतात. डिस्कोर्सेस या ग्रंथात त्याने म्हटले आहे की, 'मी राजकीय जीवन हे सर्वश्रेष्ठ मानून त्याचा पाठपुरावा विद्यमान धर्माच्या दुबळेपणामुळे केला असे नव्हे, तर त्या धर्माने अवघ्या मानवतेचे राजकीय जीवनाकडे दुर्लक्ष घडवून आणून जी काही हानी केली आहे, त्यामुळे ख्रिश्चन विश्वातील अनेक राज्यांत, प्रांतांत व शहरांत मौलिक इतिहासाचा ऱ्हास झाला. सर्वसामान्य लोक एकेकाळचा वैभवसंपन्न इतिहास कायमचा विसरून गेले की काय, इतकी हानी झाली आहे.' एवढेच काय पण त्याने ख्रिश्चन धर्मावर युद्धनीती दूषित केल्याचा आरोपही केला होता.

कौटिल्यानेही त्रिवर्गधर्म आणि वर्णाश्रमधर्म यापेक्षाही जास्त महत्त्वाचा मानला होता तो राजधर्म! जवळपास मॅकियाव्हेलीनेही असेच मानले आहे. राजकारणाला प्रथम प्राधान्य देणाऱ्यापैकी तो एक होता.

मॅकियाव्हेलीच्या केवळ एका ग्रंथावरून त्याच्या नैतिक संकल्पनांचा आढावा देणे योग्य होणार नाही; पण राजनीती आणि नैतिकता या विषयापुरता विचार करायचा झाल्यास तो सुस्पष्टपणे थोडक्यात सांगता येणे शक्य आहे. मॅकियाव्हेली म्हणतो, “The means are the counsels of necessity.” जर ध्येयपूर्तीची साधने चालू शकत असतील व परिणामकारिकता साधता येत असेल तर त्यांच्या अनैतिकतेचा प्रश्नच उभा राहत नाही, असे त्याचे मत दिसून येते. मॅकियाव्हेलीच्या या विचारातील साध्य-साधन संबंधांमुळे राजकारणात नैतिकतेचा प्रश्न निर्माण झाला, हे वेगळे सांगण्याची गरज नाही, कारण स्पष्ट आहे. त्याच्या मते अगदीच स्पष्ट सांगायचे झाले तर प्रेम आणि भीती या दोन गोष्टी एकत्र आणून काहीही करता येत नसल्यामुळे प्रजेत प्रेमभावना निर्माण होण्याऐवजी भीतीची भावना निर्माण करणे केव्हाही श्रेयस्कर. प्रेम दाखवण्यापेक्षाही जो भय दाखवून आपले उद्दिष्ट साध्य करू शकतो, तो व्यावहारिकदृष्ट्या जास्त यशस्वी होऊ शकतो. राजाने एखादे राज्य अगदी ठरवून हिंसा करूनही आपल्या राज्याला जोडले तरीही प्रजेची क्षमा मागून पश्चात्ताप व्यक्त करावा, लोक जयजयकार करून स्वीकारतात. थोडक्यात, राजनीतीच्या बाबतीत मॅकियाव्हेली हा यश मिळते याच्या आधारांवर साधनांचे समर्थन करतो. नैतिक जगातच

नैतिकता पूजनीय मानावी असे त्याचे स्पष्ट मत दिसून येते.

पण असे असले तरीही राजाचे वर्तन प्रत्येकासोबत कसे असावे, याबाबतीत मॅकियाव्हेली अगदी सजग दिसतो. राजाने आपले वर्तन कसे ठेवावे, कितपत लोकांशी संबंध ठेवावेत, प्रधानांशी संबंध कसे असावेत, याबाबतीत तो सजग दिसतो. राजाने कुणालाही वचन दिले किंवा शब्द दिला तरीही तो कितपत खरा करावा, याबाबतीत विचार करण्याविषयी तो सांगतो. त्याने त्याविषयी नाव न घेता काही राजांची उदाहरणेही दिलेली आहेत. खुशमस्करी लोकांपासून दूर राहावे किंवा अगदीच औदार्य दाखवण्यात काही अर्थ नाही, हेही सूचित केले. हे सारे सामान्य वाटत असले तरीही एका राजाने आपले राज्य सांभाळत असताना वर्तनावर किती संयम ठेवणे आवश्यक आहे, हे सुचवले आहे. याबाबतीत आज्ञापत्रात अगदी स्पष्ट उल्लेख आहेत. सकल सृष्टी ईश्वरनिर्मित म्हणून 'ईश्वरें संपूर्ण कृपानुग्रहं आपणांस राज्य दिले आहे, लाभालाभ ईश्वराधीन,' असे सांगून राज्यप्रशासन सांभाळावे असे सांगितले आहे. यातून प्रजेच्या करुणेस्तव राज्य ईश्वरे दिल्याची भावना आहे, त्यामुळे सदैव कर्तव्य भावनेतून जागे राहून धर्मकार्य समजून कारभार आहे. अशाने कीर्तिलाभ होण्याची शक्यता आहे. सहानुभूती, संयम आणि सहिष्णुता या गोष्टी महत्त्वाच्या मानल्या आहेत.

मॅकियाव्हेली किंवा कौटिल्य वा शिवकालीन प्रशासनाच्या बाबतीत एकच शब्द जास्त महत्त्वाचा वाटतो, तो म्हणजे राजाजवळ 'राज्यविवेक' (Reason of the state) असणे अत्यंत आवश्यक आहे. राज्याचा विवेक वा राज्यविवेकवाद ही विकसित होत गेलेली संकल्पना आहे. प्रथमतः ही संकल्पना ऑगस्त कोम्त याने वापरल्याने त्याचे श्रेय त्याच्याकडे जाते. फ्रेडरिक मिनेक याने 'राज्याचा विवेक' या संकल्पनेचा अर्थ सांगताना असे म्हटले आहे की, 'राज्याचा विवेक हे राष्ट्रीय चारित्र्याचे एक मूलतत्त्व असून, तो राज्याच्या गतीचा पहिला कायदा आहे. राज्याचे सामर्थ्य तसेच राज्याचे आरोग्य टिकविण्यासाठी राष्ट्रपुरुषांनी नेमके काय केले पाहिजे हे त्यावरून कळते. राज्य ही एक सेंद्रिय रचना असून, त्याचे संपूर्ण सामर्थ्य टिकविण्यासाठी ती रचना ताजी आणि प्रवाही ठेवणे आवश्यक आहे. 'राज्याचा विवेक' ही संकल्पना राज्याच्या विकासाची पथदर्शक असते.'[२०] मॅकियाव्हेलीच्या दृष्टीने तसे राज्याचे अंतिम ध्येय किंवा अंतिम मूल्य हे प्रजेचे रक्षण, प्रजेचा योगक्षेम व एकंदर कल्याण हेच असते. त्यासाठी साधन असते ते सत्तासंपादन करणे, सत्तासंवर्धन करणे आणि मिळवलेल्या सत्तेचा प्रजेच्या कल्याणार्थ उपयोग करणे. राज्याचे कल्याण हे अंतिम ध्येय असले तरीही त्यापलीकडेही महत्त्वाची साध्ये असल्याचे मॅकियाव्हेलीला वाटते. उदाहरण द्यायचे झाले तर नैतिक कायदा आणि न्यायाचे देता येईल. केवळ सत्ता आणि सामर्थ्य यामुळे राज्याचे कल्याण होते असे नाही, तर नीती आणि न्यायही तितकेच महत्त्वाचे घटक असतात. अशा साध्यांचा वा मूल्यांचा भंग झाल्यास सत्तासंवर्धन धोक्यात येऊ शकते.

काही लेखनवैशिष्ट्ये :

- द प्रिन्स या निकोलो मॅकियाव्हेलीलिखित पुस्तकाचा अनुवाद मराठीमध्ये करून रियासतकार सरदेसायांनी एक महत्त्वाचा राजकीय विचार मराठीमध्ये आणला आहे. पंधरा-सोळाव्या शतकामध्ये होऊन गेलेल्या मॅकियाव्हेलीच्या राजकीय विचारांमुळे रोमन कालखंड ते आधुनिक कालखंड यामधील राजकीय स्थित्यंतराचा एकंदर अनुभव येतो. राजकीय तत्त्वज्ञानाचा एकंदर अदमास येतो.
- मॅकियाव्हेलीला राजकीय तत्त्वज्ञ म्हणण्यापेक्षा राजकीय विचारवंत म्हणणे जास्त श्रेयस्कर ठरते, कारण त्याने विशिष्ट्ये, ध्येय सांगून राजनीतिशास्त्राची सैद्धान्तिक, तात्त्विक वा ज्ञानात्मक बाजू न मांडता आपल्या अनुभवाच्या आधारे एकंदर राजकीय विचार मांडले आहेत.
- किमान 'द प्रिन्स' या ग्रंथाच्या लेखनामागचा उद्देश तरी राजाला आपली कर्तव्ये कशी पार पाडावी यासाठीचे लेखन असा आहे. अर्थात् ही ग्रंथलेखनाची भेट आहे. कौटिल्य आणि अमात्य यांच्या लेखनामागची भूमिकाही अशीच आहे.
- रियासतकारांनी अगदी शब्दशः अनुवाद केलेला नसला तरीही आशय मात्र व्यवस्थित पोहोचतो. अनुवाद करताना इतर अनुवादकाप्रमाणे भारतीय साहित्यातील ठरावीक शब्द वा राजनीतिशास्त्रातील पारिभाषिक संज्ञा वापरण्याचा मोह टाळला आहे.
- मॅकियाव्हेलीच्या केवळ या ग्रंथाचा अभ्यास करता येतो; पण त्याच्या अनेक विषयांवरच्या मतासाठी त्याच्या इतर ग्रंथांचा अभ्यास करणे आवश्यक होऊन बसते. या ग्रंथामध्येही केवळ आणि केवळ राजा आणि राजाची कर्तव्ये, वा शासनप्रणाली, त्याने आपले राज्य वाढवणे, आक्रमण करणे, प्रजेशी संवाद साधणे, राजाचे वर्तन, प्रधानाची निवड अशाच गोष्टी सुस्पष्टपणे कळतात; पण अठरा वर्षे प्रजासत्ताकाच्या बाजूने असूनही त्याची त्याबद्दलची मते या ग्रंथात कळत नाहीत. त्यासाठी त्याचे इतर ग्रंथ पाहावे लागतात.
- मॅकियाव्हेलीच्या एकंदर लेखनशैलीचा परिचय रियासतकारांच्या अनुवादातून होतो हे मात्र नक्की! तरीही तुलनात्मक विचार करता मॅकियाव्हेली, कौटिल्याइतकेच महत्त्व रामचंद्रपंत अमात्यांच्या शिवकालीन प्रशासनाचा आरसा असलेल्या 'आज्ञापत्रा'ला द्यावे लागेल. आज्ञापत्राकडे अभ्यासकांचे लक्ष जात नाही, हे खरे!
- नीतिशास्त्रीयदृष्ट्या पाहायचे झाल्यास मॅकियाव्हेली राजा, राजाची सत्ता याला साध्य मानतो, कारण त्याच्या भरवशावरच प्रजेचे कल्याण अवलंबून असते. म्हणून साध्य जे साधून देईल तेच साधन उत्तम असे त्याचे मत स्पष्टपणे दिसते.
- धर्मसत्ताक राज्याची संकल्पना मांडलेली असली तरीही तो धर्माचा हस्तक्षेप राज्यप्रशासनात महत्त्वाचा मानत नाही असे एकंदरीत त्याच्या लेखनावरून दिसते.

- राज्याची वृद्धी करण्यासाठी युद्धे करणे किंवा मोहिमा आखणे तो गरजेचे मानतो, त्यासाठी शस्त्रसज्जता गरजेची मानतो. राजाने स्वतःचे सैन्य बाळगल्यास हे जास्त सोपे जाऊ शकते या मताचा तो आहे.
- मॅकियाव्हेली हा राज्यातील प्रजेच्या कल्याणार्थ अंतिम ध्येय म्हणून राज्यसंपादनाकडे पाहतो.

शंभर वर्षांपूर्वी रियासतकारांनी एक महत्त्वाचा ग्रंथ मराठीत आणून अभ्यासकांसमोर ठेवला ही बाब अधोरेखित व्हावी अशीच आहे.

इंग्लंडातील राज्यकारभार व्यवस्थेच्या इतिहासाची मूलतत्त्वे :
शिवराम गोविंद फाळके, त्र्यंबककर.
(The Elements of English Constitutional History...
F. C. Montegue M.A. 1897 या मूळ इंग्रजी ग्रंथाचा अनुवाद)

राजकीय विचारवंत आणि त्यांच्या विचारांचे अनुशीलन सर्वत्र होत गेलेले असले तरीही काही देशांनी मात्र आपल्या राष्ट्राची रचना कशी केली आणि त्यामागे कोणकोणत्या तत्त्वांचे अनुशीलन केले हे बघणे हा अभ्यासाचा एक भाग आहे. कुठल्याही राष्ट्राच्या तात्त्विक धारणा या स्वभावतः विशिष्टच असतात, त्यामुळे त्या त्या राष्ट्राने आपल्या राष्ट्रहितासाठी घेतलेले निर्णय हे समकालातील प्रजाजन आणि एकसंघ राष्ट्र यांच्या हितार्थ असतात. 'इंग्लंडातील राज्यकारभार व्यवस्थेच्या इतिहासाची मूलतत्त्वे' या ग्रंथाच्या निमित्ताने आपण हे बघणार आहोत. इंग्लंडातील सत्तास्थापना आणि देशहितार्थ घेतलेल्या कार्याचा अभ्यास आपल्या राजकीय जाणिवांमध्ये वर्धन करणारा ठरू शकतो. The Elements of English Constitutional History... F. C. Montegue या मूळ इंग्रजी ग्रंथावर बेतलेला असल्याने कुठल्याही पूर्वग्रहाशिवाय किंवा टिकाटिपणीशिवाय इंग्लंडातील राज्यप्रशासनातील स्थित्यंतरांचे कंगोरे आपण पाहू शकतो. ग्रंथाचा मराठी अनुवाद श्री. शिवराम गोविंद फाळके, त्र्यंबककर यांनी केल्याची नोंद आहे. प्रस्तुत ग्रंथ एकंदर तेरा भागामध्ये विभाजित केलेला असून इंग्लंडातील प्रशासकीय राज्यकारभाराची मूलतत्त्वे समजावण्यासाठी जवळपास दीड हजार वर्षांच्या कालखंडातील ठळक घटनांचा आढावा घेतला आहे. एकंदर घटनांच्या साहाय्याने इंग्लंडसारख्या देशामध्ये कोणकोणती तत्त्वे अमलात आणली गेली, याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकंदर तेरा भागामध्ये केलेली ग्रंथांची रचना अशी...

भाग पहिला : इंग्लंडच्या राज्यकारभार व्यवस्थेच्या इतिहासाचा प्रारंभ इ.स. ४५०-८०२.

भाग दुसरा : अँग्लो सॅक्सन राज्याची राज्यकारभार व्यवस्था

भाग तिसरा : वेसेक्स राज्याच्या वर्चस्वाच्या प्रारंभापासून तो इंग्लंड नॉर्मन लोकांनी जिंकून घेईतोपर्यंत इ.स. ८०२-१०६६

भाग चौथा : नॉर्मन राजे इ.स. १०६६-११५४

भाग पाचवा : दुसरा हेन्री व त्याचे मुलगे इ.स. ११५४-१२१६

भाग सहावा : तिसरा हेन्री व पहिला एडवर्ड इ.स. १२१६-१३०७

भाग सातवा : प्लॅन्टजेनेट घराण्यातील शेवटचे राजे इ.स. १३०७-१४८५

भाग आठवा : ट्यूडर घराण्यातील राजे इ.स. १४८५-१६०३

भाग नववा : पहिला जेम्स, वहिला चार्ल्स आणि लोकसत्ताक राज्य इ.स. १६०३-१६६०

भाग दहावा : दुसरा चार्लस, दुसरा जेम्स, राज्यक्रांती आणि तिसरा विल्यम्स इ.स. १६६०-१७०२

भाग अकरावा : ॲन, पहिला जॉर्ज आणि दुसरा जॉर्ज इ.स. १७०२-१७६०

भाग बारावा : तिसरा जॉर्ज इ.स. १७६०-१८२०

भाग तेरावा : चौथा जॉर्ज, चौथा विल्यम्स आणि व्हिक्टोरिआ इ.स. १८२०-१९०१

असा साधारणपणे साडेचौदाशे वर्षांच्या इतिहासातील राज्यकारभारातील स्थित्यंतरांचा आलेख या ग्रंथामध्ये आहे. खरे तर १८९७ सालच्या उपलब्ध प्रतीमध्ये केवळ १८८८ पर्यंत तयार करण्यात आलेल्या कायद्यांविषयाचाच इतिहास आहे; पण अनुवादित पुस्तकामध्ये मात्र तेराव्या प्रकरणाचा कालखंड म्हणून इ.स. १८२०-१९०१ असे देण्यात आले आहे. शिवाय अनुवादामध्ये मात्र शेवटच्या भागात स्थानिक राज्यव्यवस्थेचा कायदा १८९४ विषयीची माहिती समाविष्ट करण्यात आलेली आहे, ती १८९७ च्या प्रतीमध्ये समाविष्ट दिसत नाही. एकंदर फाळके यांनी सुधारित कायद्याचा समावेश करणे इष्ट मानले असावे किंवा अनुवादासाठी सुधारित आवृत्ती त्यांना मिळाली असावी. तरीही एकंदर अनुवादाची जी बाजू आहे, ती चांगली आहे.

इंग्लंड देशाचा इतिहास पाहता काही गोष्टी लक्षात येतात, त्याच या पुस्तकातून लेखकाने अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. एक तर ज्यांच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नव्हता, अशा या देशाच्या मूळ स्वरूपाची आणि त्यानंतर विकसनशीलतेच्या टप्प्यावरून जात असताना त्यांत कोणकोणती स्थित्यंतरे होत गेली, याचे रेखाटन या पुस्तकामध्ये आहे. इंग्लंड आणि भारताचे नाते एकेकाळी मालक आणि गुलामाचे असले तरीही तो काळ आता संपला आहे. भारतासारख्या खंडप्राय देशाला आपल्या ताब्यात ठेवताना इंग्रजांना कूटनीतीचा अभ्यास नक्कीच करावा लागला असेल. शिवाय या गोष्टी केवळ अभ्यासाने प्राप्त होत नाहीत, तर त्या त्या क्षणी त्या तशा परिस्थितींना तोंड देण्यासाठी काय करावे लागते याचा अनुभव गाठीशी असणेही गरजेचे असते. इंग्लंडच्या बाबतीत एक महत्त्वाची

बाब अशी आहे, की या देशाचा जन्म एक बेटाच्या स्वरूपामध्ये झालेला आहे. त्या बेटावर राहणारे लोक किती विकसित असणार? आणि असले तरी बाहेरील राजांच्या आक्रमणांना तोंड देण्याची ताकद त्यांच्याकडे असणार तरी किती? अशा वेळी सतत हल्ले होत राहणे आणि झालेल्या हल्ल्यांना तोंड देत आपले अस्तित्व टिकवणे भाग असते. अशा वेळी एखादी वेळ अशीही येऊ शकते, की एखादी बलाढ्य सत्ता देशावर आक्रमण करेल आणि आपल्या हाती कारभार घेईल. अशी जर वेळ आली तर मूळ रहिवासी असलेल्या भूमिपुत्रांचे अस्तित्व हे सगळ्याच बाजूने धोक्यात येऊ शकते. त्याच्या रूढी विचारांवर तर आक्रमण होतेच, त्याखेरीज धर्म, आचरण, हक्क सगळ्याच बाबतीत ते रहिवासी वंचित राहू शकतात. अशा वेळी वेळोवेळी लढा देणे क्रमप्राप्त होऊन बसते किंवा दुसरा कुणी हल्ला करणारा असेल तर त्याला बोलावले जाऊ शकते किंवा त्याची वाट पाहिली जाते. अशा स्थित्यंतराच्या परिस्थितीत एखाद्या देशाला स्वावलंबी आणि विकसित होण्याला एखादे सहस्रकही अगदी सहजपणे लागू शकते. मॉन्टेग्यू याने नेमके हेच केले आहे. इंग्लंडचा इतिहास मांडणे ही बाब वेगळी आणि इतिहासातील काही महत्त्वाच्या घटनांच्या साह्याने त्या देशाच्या विकासाच्या टप्प्यामध्ये आलेली तत्त्वे शोधणे आणि त्याची पुनर्मांडणी करणे ही बाब वेगळी! म्हणूनच इंग्लंडचा इतिहास व त्याची मूलतत्त्वे असे विभिन्न लेखन लेखकाने केलेले आहे. त्यातून इंग्लंड म्हणजे ब्रिटन बेटाला स्वातंत्र्य कसे मिळाले आणि त्यानंतर त्या देशाचा विकास होण्यापूर्वीच्या स्थित्यंतराचा आलेख बघणे म्हणजे एका महासत्तेचा भूतकाळ बघणे आहे. जवळपास इ.स. ४५०-१८८८ असा चौदाशे वर्षांच्या इतिहासातील महत्त्वाच्या घटनांचे अन्वयार्थ आपण बघू.

प्रारंभामध्येच खरे तर ब्रिटन हे एक बेट असल्याचे सांगितले आहे. मुळात जूट, अँगल आणि सॅक्सन लोकांच्या वसाहतीचे हे बेट! आता हे त्रिभाजन अगदी स्पष्टपणे दिसून येते; पण एक मात्र खरे की, त्रिभाजन जरी असले तरी बेट आपले आहे हा भाव मूळ रहिवाशांमध्ये असावा. जूट, अँगल आणि सॅक्सन लोकांच्या टोळ्या इथे कधी वस्तीला आल्या होत्या हे काही सांगता येत नाही; पण एक नक्की की त्यांच्यामध्येही जी टोळी युद्धे व्हायची, ती इतर काही कारणास्तव असेल पण कुणीही कुणाला हुसकावून लावण्याचा प्रयत्न तर नक्कीच करीत नसेल. हे बेट जवळपास चारशे वर्षे रोमन सम्राटाच्या ताब्यातच होते. जूट, अँगल आणि सॅक्सनांपेक्षा रोमन नक्कीच सुधारलेले आणि विचारवंत होते. इसवी सनाचे चौथे अथवा पाचवे शतक म्हणजे रोमन तत्त्वज्ञांचा बहराचा काळखंड! स्टॉईक विचारांचा उदय करून देणाऱ्या झिनोनंतर तिकडे ज्यांना रोमन इरा फिलॉसॉफर म्हणून गौरवले गेले अशा सिसेरो, एपिक्टेटस, मार्कस ऑरेलियसचा कालखंड अगदी याच्या थोडा पूर्वीचा आहे. सेक्स्टससारखा संशयवादी, प्लोटिनससारखा नवप्लेटोवादी, ऑगस्टीनसारखे धर्म प्रचारक, प्रोक्लॅससारखा नवप्लेटोवादी यांचा उदय झालेला असणार. याच काळामध्ये रोमनांची

सत्ता ब्रिटनसारख्या लहानशा बेटावर असणे आणि त्यांचे काही विचार बेटावर पसरणे अगदी सहज शक्य आहे; पण रोमनांनी सत्ता असूनही आजूबाजूचे टोळीवाले सतत हल्ले करीतच राहिले आणि या दूरस्थ बेटाचे केवळ संरक्षण करू शकत नाही, म्हणून रोमनांनी त्या बेटावरचा हक्क सोडला आणि एका अर्थाने ब्रिटनला आयते स्वातंत्र्य मिळाले. इथून पुढे एकाकी आणि कुणीही वाली नाही अशा स्थितीत राहिलेल्या बेटावरल्या माणसांनी स्वतःच्या जगण्याच्या संकल्पनांना भोवतालातील परिस्थितीनुरूप पुढे नेत एक राष्ट्र म्हणून त्याला कसे पुढे नेले आणि 'ज्या साम्राज्यावर सूर्य मावळत नाही,' अशी कीर्ती कशी प्राप्त केली असेल हे समजून घेण्यासारखे आहे.

जर्मनांच्या आणि ब्रिटिशांच्या राजकीय संस्थांची रचना सुरूवातीला अगदी सारखीच दिसते. त्यांची जीवनपद्धतीही अगदी सारखी होती. एक तर स्वतंत्रपणे जगणारी माणसे आणि दुसरे गुलाम. त्यातही गुलामांचे दोन प्रकार, एक म्हणजे स्वतः उत्पन्न काढून त्यातला काही भाग सत्ताधिकाऱ्यांना देणारे आणि दुसरे केवळ गुलामी करणारे. ब्रिटिशांमध्ये त्यांना अनुक्रमे सर्फ आणि स्लेव अशा संज्ञा आहेत. एकंदरीत ब्रिटनमध्येही सुरुवातीला गुलामी होती, हे दिसून येते. भारतामध्ये आल्यावर काही प्रमाणात खंडप्राय देश असलेल्या आणि एकमेकांवर कुरघोडी करण्याऱ्या संस्थानिकांना फितवून काही जणांकडून वार्षिक कर घेणे आणि इतरांना गुलाम बनवण्याची कल्पना इंग्रजांनी राबवली ती एकाएकी त्यांच्या डोक्यामध्ये आलेली नव्हती. त्यांनी अनुभवून लढा देऊन ज्यातून ते बाहेर आले तीच पद्धती इथे राबवण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

काही विशिष्ट जाती आणि त्यांच्या टोळ्या व राजे ही संकल्पना जर्मनांमध्ये दिसते. म्हणजे राजा आणि त्याची राजसत्ता मान्य केली, की मग त्यानंतर आपले सारे जीवन घालवणे सोपे दिसते. राजाने आज्ञा द्यायची आणि बाकीच्यांनी तसे करायचे, एकंदर राजेशाही पद्धतीत रुळलेले जीवन ब्रिटिशांच्या इतिहासामध्ये दिसते. ही राजा निवडीची प्रक्रियाही सहसा जातीसंख्येवर ठरे. युद्धासाठी राजे सैन्य कराराने आणीत असत किंवा काही जण स्वतःचेही बाळगत असत. काही जण स्वतःच्या जमिनी बाळगून असत, तर काही जनसामान्यांसाठी असलेल्या भूमीवर वसती करीत असत. ब्रिटनमध्ये आजही बुकलँड आणि फोकलँड असे शब्द आहेतच.

सेंट ऑगस्टाईनच्या केंट येथील आगमनानंतर इ.स. ५९७ पासून ब्रिटनच्या ख्रिस्तीकरणाला सुरुवात झाली असे मॉंटेग्यू यांनीही लिहिले आहे. हा सेंट ऑगस्टाईन म्हणजे ऑगस्टाईन ऑफ हिप्पो नव्हे. तो इ.स. ३५४-४३० दरम्यान होऊन गेला. तर सेंट ऑगस्टाईन हा इटलीतील रोम इथे जन्मलेला मुलगा. तो इंग्लंड येथे कँटरबॅरी येथील पहिला आर्चबिशप म्हणून नेमला गेला (इ.स. ५९७) आणि त्यानेच पुढील शंभर वर्षात जवळ जवळ सर्व ब्रिटन ख्रिश्चनमय केले. कँटरबॅरी येथेच तो इ.स. २६ मे ६०५ रोजी मृत्यू पावला. खिश्चन

धर्म प्रसाराचा आणि एकंदर जीवनशैलीचा फार मोठा प्रसार बेटावर झाला. त्यात दोन गोष्टी अधोरेखित झाल्या. एक म्हणजे सुधारणेच्या मार्गावर असलेल्या बाह्य राष्ट्रांशी ब्रिटनचा संपर्क वाढला आणि दुसरी बाब, एकछत्री, राष्ट्रीय ऐक्य निर्माण होण्यावर भर घातला गेला. मॅकियाव्हेलीने पुढे धर्मसत्ताक राष्ट्रांबद्दल हेच उद्गार काढले आहेत, की धर्मसत्ताक राष्ट्र बनवणे जिकिरीचे आणि वेळखाऊ असले तरी ते निर्माण झाल्यानंतर मात्र जतन करणे सोपे जाते, कारण प्रजा प्रत्येक गोष्ट सांभाळण्याचा प्रयत्न करीत असते.

ब्रिटनच्या या पहिल्या कालखंडामध्ये काही बाबी महत्त्वाच्या ठरतात. एक तर रोमनांनी सत्तात्याग केल्यानंतर बेटावरच्या लोकांनी लगेच एकत्र येण्याचा विचार केल्याचे दिसत नाही. तसा प्रयत्न झाला असेल तरीही तो यशस्वी नसेल; आणि दुसरा महत्त्वाचा भाग, हे धर्मांतरानंतर शक्य झाले. धर्म हे राष्ट्र एकसंध बांधण्यासाठी महत्त्वाचे कारण ठरू शकते, हे मॉंटेग्यू यांना सुचवायचे होते, की काळ तसे ठरवत होता, हे सांगता येत नाही. ब्रिटनचा हा कालखंड स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उदयाचा आहे, त्यामध्ये पॅरिशसारख्या ग्रामसंस्थांचा उदय झाल्याचे लक्षात येते. गेमॉट हे ग्रामपंचायतीचेच रूप! सर्वसाधारण सभांचे आयोजन करून काही ठराव मंजूर करून काम पुढे सरकवणे, काही नियमावली तयार करणे किंवा काही कलह असतील तर ते ग्रामपातळीवरच मिटवणे अशा प्रकारचे कार्य चालत असे. काही वेळा धर्मविषयक काही स्थानिक निर्णयही याच स्तरावर घेतले जात. हंड्रेड, वार्ड, वापेनटेक असे विभाग असत. एक विशेष बाब म्हणजे राष्ट्रीय स्तरावर शासन प्रणाली म्हणून राजा असे आणि त्याची निवड हे किमान जर्मन लोकांमध्ये तरी निवडणुकीसारखी प्रक्रिया होऊन असे. अर्थात् कुलीन घराणे आणि श्रीमंत लोक त्यात असत. बहुधा राजाची निवड म्हणजे राष्ट्र सांभाळू शकणाऱ्या आणि ज्याच्या नावावर एकमत होऊ शकेल अशा व्यक्तीची म्हणजे देवाच्या अंशाची निवड असे. राजा हा देवाचाच अंश आहे,[२१] ही कल्पना जर्मनांमध्ये होती, अशी नोंद मॉंटेग्यू यांनी दिली आहे. भारतातही राजा हा विष्णूचा अवतार मानला जात असे, असे कितीतरी संकल्पनात्मक साम्ये मिळतील. हे सारे धर्मांतरापूर्वी असलेल्या ब्रिटिशांमध्येही असावे. अर्थात् यातून त्याचे निर्विवाद असलेले श्रेष्ठत्व सांभाळले जावे, हा हेतू नक्कीच असावा. अँग्लो सॅक्सनांची राजवट इतकी साधी होती, की त्यांच्या काळामध्ये फार काही होऊ शकले नाही, पुढे डेन्मार्कने हल्ला करून ब्रिटन जिंकलेही होते.

मुळात इंग्लंडच्या इतिहासामध्ये भूमिपुत्र विरुद्ध आक्रमक असा संघर्ष दिसत असला तरीही त्यात विविध वर्गही दिसून येतात. कारण आठव्या-नवव्या शतकापासून पुन्हा एकवार यामध्ये विविध वर्गांचा समावेश असल्याचे दिसून येते. पुढचा काळ भूपती राजा, जमीनदार आणि त्यांच्या हाताखाली असलेल्या सामान्य माणसांचा होता हे दिसून येते. सगळी जमीन देशाच्या राजाची, त्यात जमीनदारांनी आपापल्या पद्धतीने ती कसायची आणि खालच्या वर्गाला पोसायचे. या इंग्रजीतील जमीनदारी पद्धतीला फ्यूडलिझम असे म्हटले गेले आहे.

हा प्रकार म्हणजे भूमी आणि त्याचा मालकी हक्क असलेल्या लोकांच्या राजकीय हक्क आणि कर्तव्याचे दर्शन घडवणारा होता.[२२] ब्रिटनची आजची स्थिती जरी सर्वांना समसमान समजणारी असली तरीही तेव्हा यातून उच्चनीच भावांचे दर्शन घडत होते हे मात्र नक्की! यामध्येही कर देणे आणि तोही जमिनीच्या विनियोगावर अवलंबून असणार. फ्यूडलिझमला आपल्याकडचा मोकासा असा शब्द फाळके यांनी दिला आहे. तो तितकासा तंतोतंत नसला तरीही एकंदर वसुली करून राजाकडे सोपवणे व प्रशासनाला हातभार लावणे एवढ्यापुरता समजायला हरकत नाही. शेतजमिनी आणि वहिवाटीचे प्रकार असले तरीही अत्यंत श्रेष्ठत्वाचा भाव नसावा, केवळ राज्य चालवण्यापुरते हे विभाजन असावे.

अकराव्या-बाराव्या शतकाच्या काळामध्ये नॉर्मनांनी इंग्लंड जिंकल्यामुळे फ्यूडलिझमचा प्रकार तसाही वाढला; पण जमीनदार बळकट होऊ नये म्हणून उपाय केले गेले. विविध ग्रामसंस्था निर्माण केल्या गेल्या, जेणेकरून अधिकारांचे विभाजन होईल. एकाच भागामध्ये एकाच व्यक्तीला जास्त प्रमाणात जमीन देणे बंद झाले. शिवाय राजावर निष्ठा असावी म्हणून शपथही घेण्याचा प्रघात निर्माण झाला. अँग्लोसॅक्सन राजवटीमध्ये इंग्लंडची शासनपद्धती इतकी बळकट नव्हती. ती बळकट करण्याचा प्रयत्न झाला. थोडक्यात, इथे सत्तेचे केंद्रीकरण करण्याचा प्रयत्न झाला. राज्य प्रशासनासाठी राजा, मंत्रिमंडळ, अशी विभागणीही याच काळात झाल्याचे दिसून येते. इनाम जमिनीतून मिळणाऱ्या उत्पन्नांवर कर, कुळांकडून कर, वगैरे पौंडात रक्कम घेण्यात येई. अपराधी लोकांना शासन करण्यासाठी न्यायव्यवस्थाही निर्माण झाली; पण याच कालखंडामध्ये धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्यातील संघर्ष पाहायला मिळतो. कारण शेवटी राजा हा प्रशासनाच्या निमित्ताने का होईना, धर्मसत्तेपासून दूर जात असलेला बहुधा धर्मगुरूंना सहन होत नसावे किंवा राष्ट्र संपूर्ण आपल्या हातात असावे, ही सुप्त इच्छा असावी. अन्स्लेम[२३] (इ.स. १०३४-११०९) जो स्कोलॅस्टिक आणि धर्मतत्त्वज्ञानी म्हणून ओळखला जातो, त्याने राजाचे अधिकार आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न केल्याचा एक उल्लेख इथे सापडतो. अर्थात् ते शक्य झाले नाही. काही तडजोडीवर ते मिटले. धर्माधिष्ठित राज्यव्यवस्था निर्माण झाली तर तिची बहुमतावर पकड किती मजबूत असू शकते, याचा हा दाखलाच होता. धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्यातील एक मोठा संघर्ष पुढे झालाच. त्याचे परिणाम इंग्लंडच्या एकंदर राजकीय तत्त्वज्ञानावर किती झाला असेल याचा आपण विचारही करू शकत नाही.

नॉर्मनांच्या राज्यकारभारावर त्यांचेच फारसे नियंत्रण असे नव्हते. त्यामुळे फ्यूडल पद्धतीतील लोकांना नियंत्रणात ठेवणे अत्यंत अवघड जात होते, त्यांच्यातील युद्धे नियंत्रणात ठेवणे जमत नसे. त्यामुळे राज्यभर संघर्ष, बंडाळीचे वातावरण, त्यांचा बीमोड करणे, त्यात नॉर्मनांची शक्ती कायम कमी पडत असे, हळूहळू ते विनाशाकडे जाऊ लागले. बाराव्या शतकामध्ये दुसरा हेन्री सत्तेवर आला तेव्हा त्याने राजसत्ता बळकट करण्यासाठी जमेल तेवढे

प्रयत्न सुरू केले. वास्तविक बघता तो काही इंग्रज नव्हता; पण तसा हुशार, दीर्घोद्योगी, कामे तडीस नेणारा होता. मोजक्या मोठ्या लोकांची सत्ता राखत बसण्यापेक्षा साधारण माणसांच्या संरक्षणासाठी काय काय करता येईल, हे पाहणारा होता. त्याने जिंकणारे लोक आणि जिंकलेले लोक हा भेदच नाहीसा केला आणि इंग्लिश व नॉर्मन लोकांना एकत्र आणून एकसंध राष्ट्र तयार केले. हेन्री तसा दूरदर्शी होता, त्याने राष्ट्राची संपत्ती आणि ज्ञान यांच्यामध्ये वाढ केली. पहिल्या हेन्रीने ज्या सुधारणा आणि हक्क जनसामान्यांना दिले होते तेच देण्याची सनद त्याने राज्यारोहणप्रसंगी प्रसिद्ध केली आणि राज्याचा बंदोबस्त करण्याचे काम हाती घेतले.

दुसऱ्या हेन्रीच्या काळातच धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्यातील संघर्ष एका टोकाला गेल्याचे दिसून येते. या संघर्षाचा बराच दूरगामी परिणाम केवळ राजकारणावरच नाही तर साहित्य क्षेत्रावरही झाल्याचे दिसून येते. केवळ इंग्रजी साहित्यच नव्हे तर मराठी साहित्यावरही त्याचे पडसाद दिसून येतात. मुद्दा केवळ कर लावण्याचा झाला. क्लरेंडन येथील कलमबंदीचे (constitutions of clarendon 1164) प्रकरण घडले आणि सारे काही ढवळून निघाले. राजसत्ता आणि धर्मसत्ता यांच्या काहीतरी मर्यादा असाव्यात या हेतूने हेन्रीने इ.स. ११६४ ला क्लॅरेंडन येथे सभा बोलावून सभेसमोर घटनात्मक मसुदा ठेवला. यामध्ये राजसत्ता आणि धर्मसत्ता यांचे एकमेकांवर कोणते अधिकार असावेत वा नाही, यावर चर्चा होती. आणि राजाने इतरांना फ्यूडल नियमानुसार जे कर जमीनधारकांना द्यावे लागत, तेच आर्चबिशप व इतर धर्माधिकारी यांनीही द्यावेत असे ठरवण्यात आले होते. तसेच धार्मिक विवादांवरील न्यायनिर्णय आधी राजाकडे न्यावेत, त्याने पाठवल्यास मगच पोप यांच्याकडे जावेत. बिशप आणि आर्चबिशप यांच्या निवडी राजाच्या समोर व्हाव्यात असे नियमात घातले गेले होते, अर्थात् राजसत्तेला काही अधिकार देऊन थोडेसे प्रबळ करण्यात आले होते. आर्चबिशप वा इतर धर्मगुरूने देश सोडून जाताना राजाला विचारून जावे, राज्याचे नुकसान करणार नाही, असे लेखी द्यावे वगैरे धार्मिक क्षेत्रातील लोकांचे अधिकार जरा कमी करण्यात येऊन राजसत्तेला बळकट करण्यात आले होते. नाखुशीने जरी धर्मगुरूंनी मान्य केली असली तरीही त्यांचा विरोध होताच. बेकेट हा राजाचा पूर्वीचा मित्र आणि चॅन्सेलर जरी होता, तरी आता तो धर्मगुरू होता. त्याने तेव्हा होकार दिला असला तरी पुढे प्रत्यक्षात मात्र नकार दिला. त्यामुळे अर्थात् कायदा अमलात येण्यास अडथळा निर्माण झाला. कायदा आला असता तर धर्मखात्यावर राजाची पूर्णपणे सत्ता राहिली असती. अर्थात पुढे वाद वाढला, हेन्रीच्याही मांडणीमध्ये काही चुका झाल्याच. त्यात बेकेटचाही खून[२४] केला गेला[२५]. धर्मोपदेशक जिंकले. धर्मोपदेशकांनी आपली सहज सुटका करून घेतली. मला मागच्यापेक्षा जरा जास्त अधिकार मिळाले म्हणून हेन्रीही खुश झाला. केवळ एवढेच झाले की धर्मसत्तेवर अंकुश ठेवण्याचा राजसत्तेचा पहिला प्रयत्न ११६४ इ.स. मध्येच झाला, ही बाब जमेची ठरली.

या घटनेचे तेव्हा आणि पुढेही काय काय परिणाम विविध धार्मिक आणि राजकीय सत्तेवरून घडून आले असतील यांचा अदमासही लावण्याची फारशी गरज नाही, कारण प्रत्येक वेळी धर्म आणि धर्माचे राष्ट्र वा राष्ट्रातील एकंदर धर्म व त्यातील धार्मिक माणसे याभोवतीच सत्तांतर फिरले आणि फिरत राहिले आहे, हे अगदी स्पष्ट आहे. याच बेकेट आणि हेन्री यांच्यातील मैत्री आणि संघर्षावर आधारित पुढे टी. एस. इलियट (इ.स. १८८८-१९६५) याने 'द मर्डर इन द कॅथेड्रल' (बेकेट) या नावाचे नाट्यही लिहिले. एक अजरामर कलाकृती या निमित्ताने जन्माला आली. १९३५ साली युरोपामध्ये फॅसिझमचा उदय होत असतानाच ही नाट्यकृती रंगमंचावर सादर होत गेली. त्यावर जागतिक स्तरावर चर्चाही झाली. हिंदी नाट्यसृष्टीत त्याचे प्रयोग झाले. मराठीतही प्रा. वसंत कानेटकरांचे 'बेईमान' हे नाटक आले, अजूनही अशा बऱ्याच कमअस्सल कलाकृती निर्माण होत गेल्या. मुद्दा राज्यसत्ता व धर्मसत्ता यांच्यातील कायम असलेल्या संघर्षाचा आहे, तोही अधोरेखित होत गेला. मॉंटेग्यू यांच्या इ.स. १८९७ च्या या पुस्तकामध्ये टी. एस. इलियट यांच्या नाटकाचा तसाही उल्लेख असण्याची शक्यता नाही, कारण इलियट तेव्हा केवळ आठ-नऊ वर्षांचे असणार, द मर्डर इन द कॅथेड्रल हे उत्तरकालीन लेखन आहे हे नक्की!

यानंतर खरे तर जॉन राजाची राजवटही आली. या काळात फ्रान्सने इंग्लंडवर हल्ला करून काही जमीनही बळकावली होती; पण जॉनने पॉपकडे शरणागती पत्करून ती परत मिळवली. काही प्रमाणात गेली ती मिळवण्यासाठी जॉनने सैन्याची जमावाजमवही केल्याची नोंद मिळते; पण उत्तर इंग्लंडमधल्या बॅरन लोकांनी लढण्यासच चक्क नकार दिला. शेवटी बॅरनांच्या मागणीला मान्य करण्यापलीकडे दुसरा पर्याय नसल्याने इंग्लंडच्या इतिहासातील सगळ्यात मोठी सनद - जी त्रेसष्ट कलमांची होती - ती इ.स. १२१५ मध्ये जाहीर केली गेली. ज्यामध्ये धर्मखाते एक वेगळे धरून काही हक्क देण्यात आले. मुख्य कुठे, शहरांचे आणि गावांचे हक्क, न्याय व्यवस्था, जंगले वगैरे किरकोळ गोष्टींचीही तरतूद करण्यात आली. अर्थात् इथेही आश्वासन दिले गेले; पण ते पाळणे काही होत नव्हते, म्हणून बॅरनांनी फिलिप ऑगस्टसच्या मुलाला म्हणजे लुईला ब्रिटनचा राजा होण्यासाठी आमंत्रण दिले. अर्थात आपले राज्य वाचवण्यासाठी जॉनही कसाबसा युद्धाला लागला खरा; पण युद्धाचा निकाल लागण्याच्या आतच तो मृत्यू पावला. एकंदर इंग्लंडच्या इतिहासातील राजघराण्याचे स्थान हे तसे सन्माननीय मानण्यात येते हे खरे! प्रत्येक देशाची एक राजकीय मान्यता किंवा धारण असाव्यात ज्यांचा पगडा त्या त्या देशाच्या जनसामान्यांवर दिसून येतो.

जॉनचा मुलगा आणि त्याच्यानंतर गादीवर आलेला तिसरा हेन्री यांच्यापैकी कुणीही सनदेतील वचने पाळली नाहीत, हेही तितकेच खरे. झाले एवढेच की, युद्धाचा निकाल लागण्यापूर्वीच जॉनचा मृत्यू झाल्याने इंग्लंडवरील मोठे संकट टळले. वास्तविक लुईला राज्य करण्यासाठी हल्ला करावा, असेच सुचवले होते; पण जॉन गेल्यामुळे ते कारण संपले.

परक्या राजापेक्षा आपल्या राजाचा वारस बरा म्हणून पुन्हा एकवार सनद प्रसिद्ध करून कारभार सुरू झाला. हेन्री वचने देत असे, फक्त पाळत नसे आणि न पाळण्यामागची कारणेही यथासांग सांगत असे. १२५८ मध्ये लोकांच्या असंतोषाचा कडेलोट झाला आणि त्या वर्षीच्या एप्रिल महिन्यात झालेल्या सभेत मागण्या मान्य होत नसतील तर कर बंद करण्याचा नागरिकांनी निश्चय जाहीर केला. पार्लमेंट अर्थात् तहकूब झाली आणि ऑक्सफर्ड येथे जूनमध्ये पुन्हा झाली. त्या सभेला बॅरन लोक संतापून सशस्त्र आल्याची नोंद आहे; पण एवढे होऊनही राजा दबला नाही हे विशेष! नव्या राज्यकारभार व्यवस्थेत संकुचितपणा होता. मग पुरवणी मागण्यांचेही काम असेच झाले. शेवटी फ्रान्सच्या राजाने बॅरन आणि इंग्लंडचा राजा यांच्यात मध्यस्थी केली. प्रोव्हिजन ऑफ ऑक्सफोर्ड १२५८ च्या तरतुदी वगैरे सगळे रद्द केले. राजाविरुद्ध गेलेल्या लोकांच्या शिक्षाही रद्द करण्यात आल्या. तरीही हेनरीचा बदअंमल थांबेना म्हणून शेवटी बॅरनांनी हल्ला केला आणि मे १२६४ मध्येच राजा, त्याचा मुलगा एडवर्ड व सचिव वगैरेंना कैद केले. शेवटी राजाने मागण्या मान्य केल्या; पण पुढे फार काही न होता, गोंधळ चालूच राहिला. हेन्री मरण पावल्यावर एडवर्ड सत्तेवर बसला. एडवर्डने पुढे काम केलेही, अगदीच केले नाही अशातला काही भाग नाही; पण एकंदरीतच त्यालाही बॅरनांचे प्रश्न काही सोडवता आले नाही, हे खरे! एडवर्डने ब्रिटन इंग्रजांच्या ताब्यात राहण्यासाठी विशेष प्रयत्न केले आणि दुसरी बाब म्हणजे इंग्लंडातील सर्व संस्था परिपूर्ण अवस्थेला कशा आणता येईल हे पाहिले. अगदीच सांगायचे झाले तर सनदांचा भडिमार होतच होता; पण काम होत नव्हते. अगदीच फ्यूडल पद्धतीप्रमाणे बॅरन आणि धर्मगुरूंच्याच सभेऐवजी जेव्हा तिन्ही वर्गांच्या प्रजाजनांच्या प्रतिनिधिची सभा निर्माण झाली तेव्हा मात्र खरोखर लोकांच्या हाती सत्ता येत असल्याचे चित्र इंग्लंडमधे दिसून येते. एकंदर वैचारिक विकासासाठी आवश्यक तेवढा कालखंड इंग्लंड देशाला व्यवस्थित मिळाला, तोही औद्योगिक क्रांती होण्याचे आधी मिळाला व त्याचा सदुपयोग देशाने केला

पुढच्या काळामध्ये खरे तर लोकप्रतिनिधी आणि पार्लमेंट यांच्या सत्तेत फार मोठी वाढ झाल्याचे दिसून आल्याचे मॉंटेग्यू यांनी नोंदवले आहे. चौदाव्या-पंधराव्या शतकांमध्ये प्लॅन्टॅजेनेट घराण्याची सत्ता इंग्लंडवर राहिली. पार्लमेंटची दोन सभागृहे सांभाळणे आणि त्याचे नियोजन करणे ही बाब वेगळीच वाटते. खरे तर मध्ययुगातील पार्लमेंट म्हणजे राष्ट्रातील वेगवेगळ्या लोकांच्या सभाच जणू. इंग्लंडातील जनसमूहाची तीन वर्गाची सभा तयार होई. त्यात बडे लोक म्हणजे उमराव वा जमीनदार तर असणारच. धर्मगुरूंनाही विशेष जागा असेच. शिवाय सामान्य जनांचेही प्रतिनिधी त्यामध्ये घेतले जात. त्याखेरीज, गुलाम वा भूमिहीन, शहराच्या सुव्यवस्थेमध्ये ज्यांचे फारसे काही योगदान नाही, असेही काही इंग्लंडमध्ये होतेच, त्यांना प्रतिनिधित्व नसे. लोकप्रतिनिधीची निवड होऊन ते पार्लमेंटमध्ये जात असले तरीही त्यासाठी त्याचीही काही पात्रता हवीच. चाळीस शिलिंग, तीस पौंड

उत्पन्नाचा मालक सहसा त्या निवडणुकीत भाग घेऊ शके किंवा नाईट पदवी प्राप्त असलेले त्यात जात म्हणजे जवळ जवळ सरदार घराण्यातील लोकांना त्यामध्ये प्रवेश असे. बऱ्याच काळापर्यंत इंग्लंडमधले काही नियम त्या त्या भागातील लोक एकत्र येऊन ठरवत असत. कर बसवणे वा कायदे करणे असे चाले. बॅरनांची संख्या वरचेवर घटत चालली. त्याच कारणामुळे बॅरन इतरांपेक्षा श्रीमंत ठरू लागले. अखेरीस शेतकरी बंड करून उठले. कारण जवळपास त्यांच्यामध्ये गुलामांची संख्याच जास्त होती. शेतकऱ्यांच्या या बंडानंतर मात्र गुलामगिरी संपली.

प्लॅन्टॅजेनेट घराण्यातील शेवटच्या राजाच्या कारकीर्दीत विशेष लक्षात ठेवण्यासारखी बाब म्हणजे पार्लमेंटच्या सत्तेत वाढ झाली; पण चौथा एडवर्ड सत्तेवर आला आणि त्याने पार्लमेंटचे अधिकार बंद केले. थोडक्यात म्हणजे काय, की देशाच्या एकंदर बहुमताचा मार्ग होता, तोच बंद करण्यात आला. त्यामुळे झाले ते हेच, की राजनीतीचा झोका दुसऱ्या बाजूला गेला. जोपर्यंत ट्यूडर घराण्यातील राजे होते म्हणजे पंधराच्या शतकाच्या शेवटापासून ते थेट सतराव्या शतकापर्यंत असेच चालू राहिले. आठव्या हेन्रीच्या सततच्या चुका, पोपाला झुगारून उभी केलेली राजनीती या गोष्टींचा सततचा होणारा परिणाम म्हणजे इ.स. १५३२ ते १५८८ पर्यंत इंग्लंडचा आतून बाहेरून सतत ऱ्हासच होत होता. राजाचे वर्चस्व अमलात आणण्यासाठी आठव्या हेनरीनेही काही उपाय करून पाहिले. पार्लमेंटमध्ये कायदा आणून पोपकडे जाण्याचे बंद करून टाकले. जमिनी लोकांत वाटल्या आणि पोपची सत्ता इतकी निर्मूळ करून टाकली की हद्द नाही. सहाव्या एडवर्डने धर्मसंबंधी काही सुधारणा केल्या. इंग्रजी अनुवाद केलेल्या बायबलच्या प्रती ठेवण्यात आल्या. बेचाळीस कलमांची धर्माची शिक्षा ठेवण्यात आली. पाद्री लोकांजवळ पाप कबूल करणे बंद केले. धर्मगुरूंचे अविवाहित राहणे अंधश्रद्धा ठरवण्यात आली, यज्ञवेदी काढून टाकल्या, पुतळ्यांचा नाश केला, रंगीत खिडक्या, चित्रे, नकाशे असलेली पुस्तके फाडली गेली; पण लोकांना हा विध्वंस पाहून राग आला. धर्माविषयी आस्था असणे ही बाब वेगळी आणि हे वेगळे![२६] या साऱ्या भानगडी अमलात आणणाऱ्या मेरीच्या कारकीर्दीचा शेवट झाला आणि ही कामे पुढे एलिझाबेथने हाणून पाडली. पुढे धर्म संस्थांवर राज्यकर्त्यांच्या श्रेष्ठत्वाविषयी कायदाही आला आणि विशिष्ट भजन म्हटले जावे असाही नियम करण्यात आला.

ट्यूडर घराण्याची सत्ताही अखेरीस संपत गेली. बड्या लोकांचे बस्तान इंग्लंडमध्ये चांगलेच बसले होते. धर्मोपदेशक म्हणून एक स्वतंत्र वर्ग असे आणि त्याची सत्ताही असे, तीही नाहीशी होऊन गेली. पोप यांच्याशी संबंध तुटल्यामुळे राजाची सत्ता स्थिर राहावी म्हणून पोपही काही करेनासे झाले. ट्यूडर काळामध्ये राजांवर कितीही संकटे आली तरीही लोक व्यापार आणि धंदा करण्यासाठी पुढे सरसावले होते. मुख्यत्वेकरून एलिझाबेथ राणी राज्य करीत असताना इंग्लंडातील लोक हे युरोपातील सर्व राष्ट्रांपेक्षा जास्त संपन्न झाले

होते. मुद्रणाचा शोध लागला होता, लॅटिन आणि ग्रीक भाषा शिकवणाऱ्या शाळांची संख्या भरपूर झाली होती. इंग्रजी भाषेच्या वाङ्मयामध्ये लाक्षणिक गुणवत्ता निर्माण होऊन सभ्यतेचे एक नवे आयाम तयार होत होते. या साऱ्या गोष्टींमुळे इंग्लंडमधील मध्यमवर्गीयांची बुद्धी झपाट्याने विकास करीत होती. धर्मसुधारणेची धांदल, सामुद्रिक साहसाची प्रगती, राष्ट्रीय सत्ता आणि ती कशी असावी याविषयी ज्ञानाचा प्रसार, या गोष्टींमुळे या वर्गाचे धैर्य आणि आत्मविश्वास वाढत होता. काही निर्णायक गोष्टींसाठी याच लोकांच्या मताचे महत्त्व वाढत होते.[२७]

इंग्लंड विकासाच्या दिशेने जात असताना जे परिवर्तन अपेक्षित आणि गरजेचे होते ते होत होते असे मानायला हरकत नाही. संघर्ष जरी निर्माण होत होते तरीही परस्पर विरोधी चिंतनातून राष्ट्र, धर्म, व्यक्ती, समूह यांच्या गरजांविषयी एक सुनिश्चित असे दिशादर्शन केले जात होते. त्याचबरोबर केवळ भौतिक समृद्धी येत होती असेही नाही तर वैचारिक समृद्धीही या देशामध्ये येत होती. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या घटना पंधराच्या शतकाचा शेवट ते सतराव्या शतकाच्या आरंभीच्या आहेत, यातील उल्लेखानुसार सामुद्रिक साहसामध्येही प्रगती होतच होती. व्यापाऱ्यांचे पाय तेव्हा आशियाकडे विशेषतः भारतासारख्या खंडप्राय देशाकडे वळले नसते तर नवल!

ट्यूडर घराण्याची सत्ता होती तेव्हा इतर गोष्टींपेक्षाही त्यांनी धर्म संस्थेच्या संबंधाने स्वेच्छाचाराचे वर्तन केले होते, असे स्वतः मॉंटेग्यू यांनी म्हटलेले आहे. तिथून पुढे सातत्याने धर्मसत्ता आणि राजसत्ता यांचा संघर्ष चालूच राहिला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. पहिला जेम्स गादीवर बसल्यापासून ते दुसरा चार्ल्स गादीवर येईपर्यंत राजनीतीच्या संबंधात धर्म ही प्रबळ शक्ती होऊन बसली होती. अर्थात् त्याचे परिणाम म्हणून राज्यकारभार व्यवस्थेवर एक अगदी अपरिहार्य असा परिणाम होणे साहजिक होतेच. त्यात कॅथॉलिक आणि प्रेसबिटेरियन यांच्यातील संघर्षही होताच. पहिला जेम्स हा तसाही हुशार वगैरे नव्हता; पण त्याने काही प्रमाणात प्रगती करून दाखवली हे नक्की! याने मनुका व्यापार करणाऱ्यांवर जकात बसवली. पार्लमेंटमध्ये गोंधळ घातला तरी त्याने कमी केली नाही, उलट बेनेव्होलन्स म्हणजे परोपकाराच्या नावानेही देणग्या गोळा केल्या. कायद्यातही काही बदल केले गेले, मंत्र्यांवर काही प्रमाणामध्ये जबाबदारी टाकण्यात आली. त्याच्या नंतर आलेल्या चार्लसकडे हुशारी नव्हती तरीही धैर्य मात्र होते. त्याचे स्पेनबरोबर युद्ध सुरूच होते, पैशांची गरज होती म्हणून पार्लमेंटमध्येच प्रस्ताव आणला; पण तेही जमले नाही. मग उसनवारीने पैसा घेऊन फ्रान्ससोबत युद्ध सुरू केले. त्यातही अपयश आले. शेवटी लोकांचा राग वाढत गेला. इ.स. १६२९ मध्ये भरलेल्या पार्लमेंटला मोडून त्याने विरोधक सगळे कैदेत टाकले. पार्लमेंट न भरवताच राज्यकारभार केला. तोही थोडा नाही तर अकरा वर्षे चालला. हा कालखंड म्हणजे इ.स. १६२९-१६४० असा होय. त्याने असा कारभार

चालवताना कर बसवणे, गलबतांवर कर बसवणे हेही केले. शिकारीच्या रानाचा विस्तार केला. अपराध्यांवर जबरा दंड बसवून तिजोरीत पैसा जमा केला. पुढे स्कॉटलंडमधील लोकांचे बंड झाल्याने आणि राजा प्रतिकार करण्याच्या तयारीत नसल्याने शॉर्ट पार्लमेंट तयार झाली. तिच्या भरवशावर एकंदर वीस वर्षे कारभार चालल्यावर लाँग पार्लमेंट बोलावण्यात आली. काही प्रमाणामध्ये थोड्याफार सुधारणा झाल्या असे वाटत असले तरीही पार्लमेंटमध्ये हाऊस ऑफ कॉमन्समध्येही दुही माजतच होती. राज्यकारभार कसा असावा आणि धर्मविषयक धोरणे कशी असावीत यात सतत मतभेद होतच गेले. याचा परिपाक म्हणून देशांतर्गतच लढाई सुरू होत गेली. हाईड लोक आणि फोकलँड प्रतिनिधी राजास जाऊन मिळाले, तर पिम व हॅम्पडन यांच्या हाती पार्लमेंट गेली. लाँग पार्लमेंट आणि राजा अशी लढाई सुरू झाली. सुरुवातीला राजाला यश मिळाले तरीही अंतिमतः राजा हरलाच. राजाने दोन पक्षांमध्ये भांडण लावून यश मिळवण्याचाही प्रयत्न केला; पण जमले नाही. चार्लस राजाला त्याच्या कृत्याची चौकशी व्हावी म्हणून न्यायसभेसमोर आणले गेले, त्यास दोषी ठरवून देहान्ताची शिक्षाही दिली. बड्या लोकांची उपसभा मोडून काढली आणि इंग्लंड हे स्वतंत्र प्रजासत्ताक राष्ट्र आहे,[२८] असे घोषित करून टाकले. सर्व राजकीय सत्ता सैन्य आणि लाँग पार्लमेंटपैकी शिल्लक सभासदांच्या म्हणजे रंप पक्षाच्या हाती आली. कायद्याने त्यांनी व एकेचाळीस मंत्रिगणांनी राज्यकारभार चालवावा, असे ठरले; पण रंप यांना आपली सत्ता असावी असे वाटत होते. ऑलिव्हर क्रॉमवेल याने एप्रिल १६५३ मध्ये त्यांना हुसकावून लावून पुढे कारभार नेला. इंग्लंडातील राजधर्म आणि प्रजातंत्रधर्म हे कसे बदलत गेले हे बघण्यासारखे आहे. कारण पुढे सर्व पक्षांच्या लोकांच्या एकमताने पुन्हा एकवार राजाला सत्तेवर बसवण्यात आले. यामागचे कारणही हेच होते, की सैन्याच्या हातात राज्य जाण्याची भीती होती. अर्थात् कायदेशीर राजा गादीवर बसल्यावर पन्हा एकवार धर्मखात्याविषयी व राज्यकारभाराविषयीच्या संस्था सुरू केल्या गेल्या. मागच्या राजाला जनतेच्या न्यायालयामध्ये शिक्षा झाल्याने आता शांततेने राज्य करणे व ठरलेल्या गोष्टींचे उल्लंघन न करणे आवश्यक होते. स्टुअर्ट घराण्यातील लोकांमध्ये तेवढे शहाणपण नव्हते ही खेदाची बाब! दुसरा चार्लसला मनमानी करता आली असती; पण तो दबून राहिला. त्याचा भाऊ जेम्स हा राजकारणात हुशार नव्हता तरीही धैर्य जास्त होते. कायद्याला आपण जुमानत नाही, अशा प्रकारचे वर्तन त्याने सुरू केले. शेवटी सत्ता पूर्णपणे जाऊन हाऊस ऑफ कॉमन्सकडे आली. या काळात मात्र काही महत्त्वाचे निर्णय झाल्याची नोंद आहे. बीअर या पेयावर कर बसले, धर्मोपदेशकांच्या सत्तेवर चर्चा झाली, टॉलरेशन ॲक्ट हा कायदा १६८९ मध्ये मंजूर करण्यात आला. मुद्रणस्वातंत्र्यावरही चर्चा झाली.

अठराव्या शतकाच्या कालखंडामध्ये इंग्लंड राष्ट्र बलिष्ठ होऊन त्याच्या एकंदर कार्याच्या आकारात वाढ झाली असे म्हणता येईल. पहिल्या एडवर्डच्या काळात मंजूर

झालेला 'कनर्फेशन ऑफ द चार्टर्स' हा महत्त्वाचा ठरला. तिसऱ्या विल्यम्सच्या काळातला बिल ऑफ राईटस् आणि इतर कायदे महत्त्वाचे ठरले. लोकांमधील तंटे मिटून शांतता प्रस्थापित होऊ लागली. अठराव्या शतकामध्येच तिसरा जॉर्जचे राज्यारोहण झाल्यानंतर थोडी गटबाजी झाली होतीच.

पण तरीही तिसऱ्या जॉर्जच्या कारकीर्दीत कायद्यांच्या आत्यंतिक फेरफारापेक्षाही सामाजिक आणि राजकीय बाबतीत महत्त्व वाढत होते. त्याचा फायदा हाच झाला, की लोकसत्तेकडे समाजमन झुकत चालले होते. ही गोष्ट अधोरेखित करावी अशी आहे. मॉंटेग्यू यांनी याचे श्रेय कुठल्या एका राष्ट्राला न देता चार महत्त्वाच्या गोष्टींना दिले. एक म्हणजे अठराव्या शतकातील फ्रेंच लेखकांचे कार्य, दोन, अमेरिकेतील संयुक्त संस्थानामध्ये लोकसत्तात्मक राज्यांची स्थापना, तीन, फ्रेंच राज्यक्रांती आणि चार इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती![२९] याचे सारे वर्णन अनुवादकाने अतिशय चांगले केलेले असून ते पुस्तकातच वाचणे गरजेचे आहे. एका देशाच्या विकासामध्ये औद्योगिक क्रांतीने किती स्थिरता आणली हेही समजून घेणे आवश्यक आहे. इंग्लंडच्या इतिहासामधली परिवर्तनाची वळणे ही कायमच देशाला पुढे नेत राहिली. देश कायमच सशक्त आणि सबळ होत गेला हे विशेष आहे.

एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभापासून इंग्लंड देशाचा रोख अजूनच सुधारणेकडे लागला असे म्हणावे लागेल. वॉटरींच्या लढाईनंतर तर फ्रेंचांसोबतचे सततचे युद्धाचे कारणही संपले आणि देश सुधारू लागला. प्राचीन काळातील धर्मविरोधही नाहीसे झाल्याने आपले फायदे करून घेण्यासाठी लोकांना हव्या त्या पक्षात जाण्यास व कार्य करण्यास स्वातंत्र्य मिळू लागले. ग्रामीण अंधश्रद्धातून सुटका झाली, शहराकडे लोक वळले, औद्योगिक क्रांतीनंतर मजुरांच्या संख्येत वाढ झाली तरी कायम काम मिळू लागले. लेखन-वाचनाचा प्रसार झाला, वृत्तपत्रांची संख्या वाढली, पत सांभाळण्यातील कुशलताही वाढली, बहुसंख्येचे राजकारणही वाढले, लोकशाही मतांचा प्रभाव अर्थात इंग्लंडच्या विकासाच्या दिशेने कार्य करण्यावर होता. त्यामध्ये धार्मिक समता वाढली, पार्लमेंट सुधारली, कॅबिनेट राज्यव्यवस्था सुधारली, स्थानिक कारभारामध्येही सुधारणा झाली. या चार महत्त्वाच्या गोष्टींतील सुधारणांमुळे इंग्लंडमध्ये विकासाचे वारे वाहू लागले. अंमलबजावणीसाठी विविध खाती निर्माण झाली. राजाचा चिटणीस वा सेक्रेटरी ऑफ स्टेट या नव्या नेमणुका झाल्या. इंग्लंड आणि स्कॉटलंड हे एकत्र होईपर्यंत राजाचे दोन चिटणीस असत. पुढे एकीकरण झाल्यावर स्कॉटलंडच्या कामाकरिता तिसरा नेमला. पुढे त्याचेही कामे संपली. मग एकाने स्वदेश, दुसऱ्याने परराष्ट्रसंबंध, फ्रान्स युद्ध आणि वसाहत व सैन्य यासाठी तिसरा, क्रिमियन युद्धाला चौथा असे नेमले. पुढे इ. स. १८५८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीकडून राणीकडे हिंदुस्थानचा कारभार गेल्यावर पाचवा चिटणीस नेमण्यात आल्याची नोंद मॉंटेग्यू देतात.[३०] बस, इतकाच भारताचा उल्लेख यात दिसतो. बाकी इंग्लंडच्या विकासाला आणि सभ्यतेला त्यानंतर कुठे बाधा आल्याचे दिसत नाही.

एकंदर मॉंटेग्यू यांनी रेखाटलेल्या इंग्लंडच्या जवळपास दीड हजार वर्षांच्या कालखंडातील इतिहासामध्ये अधोरेखित कराव्यात अशा काही बाबी आहेत, त्या लक्षात घेणे आवश्यक आहेत. एक तर एका बेटाचे एका सार्वभौम राष्ट्रामध्ये रूपांतरण करण्यासाठी एकसंघ होणे गरजेचे होते ती गरज ख्रिश्चन धर्माने निभावली. दुसरी बाब, असे असले तरीही धर्माला राष्ट्राचे सर्वेसर्वा होऊ न देण्याची खबरदारी राजसत्तेने घेतली, त्यामुळे धर्मसत्ता आणि राजसत्ता हा संघर्ष जवळपास एकोणीसाव्या शतकाच्या उदयापर्यंत दिसून येतो. धर्मसत्ता आणि राजसत्ता दोन्हीही प्रबळ असल्या तरीही जनसत्ताही प्रबळ होत गेली, हे नाकारण्याचा वा तिला शक्तिहीन करण्याचा प्रयत्न उर्वरित दोन्ही सत्तांकडून झाला नाही, हे खरे! साक्षरता, मुद्रणकलेचा शोध, विविध विज्ञान शोध आणि औद्योगिक क्रांती यांचा मोठा फायदा राष्ट्राला झाला आणि तो तिन्ही सत्तांनी सारखाच स्वीकारला. अंतिमतः जनसत्ता प्रबळ होऊन लोकशाही कार्यपद्धतीनुरूप देश चालत राहिला तरीही राजसत्ता आणि धर्मसत्ता यांचा यथायोग्य सन्मान राखला गेल्याचे आणि जात असल्याचे आपण निश्चितपणे सांगू शकतो. श्री. शिवराम गोविंद फाळके यांनी एफ. सी. मॉंटेग्यू यांच्या पुस्तकाच्या अनुवादामागे निश्चित अशी भूमिका आहे ती अशी की, भारतासारख्या खंडप्राय देशानेही धर्मसत्ता, राजसत्ता आणि जनसत्ता यातील समतोल राखणे आवश्यक आहे.

काही लेखनवैशिष्ट्ये :

- पुस्तक केवळ इतिहासाचे किंवा राजकीय घडामोडीचे रेखाटन करणारे नाही, तर तत्त्वांचा परिचय करून देणे हे आवश्यक असल्याचे भान लेखकाला आहे. मॉंटेग्यू यांनी इंग्लंडच्या इतिहासाविषयी स्वतंत्र पुस्तक लिहिलेले आहे.
- या पुस्तकाच्या निमित्ताने सामाजिक स्थित्यंतराचा वेध घेतला गेला आहे.
- इंग्लंडच्या राजकारभारामागील मूलतत्त्वे सांगायची असल्याने इंग्लंडला केंद्रस्थानी ठेवून बाकीच्या राष्ट्राचे संदर्भ दिलेले आहेत, ज्यात भारताचा उल्लेखही आहे. समाजक्रांती, राज्यक्रांती, धर्मक्रांती अशा विविध वळणातून गेलेल्या आणि विकासाची कास धरून बाहेर पडलेल्या ब्रिटिशांना हिंदूस्थानामध्ये प्रशासकीय व्यवस्था उभारणे बहुधा त्यामुळेच सोपे गेले.
- धर्माचा राष्ट्राच्या घडामोडीत मोठा सहभाग आहे. इंग्लंड देशाचे ख्रिस्तीकरण हे राष्ट्राला एकसंधतेकडे घेऊन गेले, हे नक्की!
- पार्लमेंट तयार होत गेल्या वा मोडत गेल्या; पण प्रतिनिधीसभा आणि राजघराणे या दोन्हीविषयी जनसामान्यांच्या मनातील आदर कमी झाला नाही.
- एक राष्ट्र म्हणून विकसित करीत नेण्याची प्रक्रिया हळुवारपणे रुजत गेली. मुख्य म्हणजे सत्ता, सत्तांतर व प्रगती यांची सांगड बसत असताना जनता सजग राहिली.

- आधुनिक विज्ञान, विकास व औद्योगिक क्रांतीशी जुळवून घेतले.
- व्यापार, धर्मप्रसार आणि इतर गोष्टींसाठी इंग्रज बाहेर पडल्याचे दिसते. ब्रिटिशांच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नव्हता असे म्हणतात, तेव्हा इंग्लंडमध्ये अंतर्गत कलह असूनही साम्राज्याचे धोरण राबवण्यात ब्रिटिश कुठे कमी पडले नाही, असे दिसते. त्याचे कारण आपल्या ताब्यातील राष्ट्राची मानसिकता, धर्मधारणा, संस्कृती आणि अंतर्गत कलह याचे भान सांभाळून त्यांना राज्य करता आले.
- राष्ट्रीय एकात्मता, भाषा, सांस्कृतिक मूल्ये न हरवू देता हे सारे घडले हे विशेष!

केवळ राजकीय इतिहास नव्हे तर त्यातील स्थित्यंतरामागील मूलतत्त्वांचे आकलन हे उत्तम राजकीय समज येण्यास सहाय्यक आहे, हे नक्की! पुस्तकाच्या समावेशामागची प्रस्तुतता हीच आहे.

नीतिशास्त्रविचार :

(लेखक : श्री विनायक सदाशिव गोगटे)

श्री. विनायक सदाशिव गोगटे यांनी लिहिलेले नीतिशास्त्रविचार हे तसे एका दृष्टीने पाहिल्यास स्वतंत्र पुस्तक आहे असे समजायला काहीही हरकत नाही. दुसऱ्या बाजूने नीट पाहिले तर ते केवळ भारतीय नीतिमीमांसेच्या दृष्टिकोनातून लिहिलेले पुस्तक नव्हे, तर सोबतच काही पाश्चात्त्य विचारवंतांच्या विचारांचा एकंदर घेतलेला आढावा आहे, हे अगदी सहज लक्षात येते. अगदी स्पष्टपणे त्याचे पुरावे आहेत. त्यातला पहिला पुरावा हा प्रस्तावनेचा आहे. पुस्तकांस प्रस्तावना ही गुरुदेव रा. द. रानडे यांची आहे. त्यात त्यांनी अगदी स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, पाश्चात्त्य व पौरस्त्य या उभय तत्त्वज्ञानांच्या अभ्यासाने पुस्तकातील विचारांची दिशा ठरवली आहे. तसेच पुस्तकाचा हेतू सांगताना गुरुदेव म्हणतात, की सदसद्विवेकबुद्धीची व्यतिरेकान्वयात्मक चर्चा केलेली आहे आणि ऐतिहासिक पद्धतीने नीतिशास्त्राच्या अभ्यासाचा विचार मांडून आत्मस्वातंत्र्य, समता, शासन वगैरे गोष्टींवर चर्चा करून अंतिमतः 'राजाने तत्त्वज्ञानी बनले पाहिजे' व 'तत्त्वज्ञान्याने राज्य मिळविले पाहिजे' या प्लेटोच्या उपदेशात अध्ययनाचे ध्येय लेखकाने व्यक्त केले आहे. या बाजून पाहिले, की लेखकाच्या लेखनामागचा हेतू स्पष्ट होतो.

त्याखेरीज स्वतः लेखकाने आधारभूत ग्रंथांची यादी दिलेली आहेच. ते सारे विचारवंत पाहता एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभापासून ते उत्तरार्धापर्यंत महत्त्वाच्या नीतिविचारवंतांचा आढावा घेतल्याचे लक्षात येते. त्यात जेम्स मार्टिनो, एफ.एच. ब्रॅडले, ई.डब्ल्यू. हॉपकिन्स, हेस्टिंग रॅशडेल व जे.एस. मॅकेन्झी आहेत. याखेरीज गीतारहस्याचा आधार घेतला आहेच. यातील - एडवर्ड वॉशबर्न अर्थात ई.डब्ल्यू. हॉपकिन यांचा विशेष आदराने उल्लेख करावा लागेल, कारण ते अमेरिकन असूनही संस्कृत स्कॉलर होते. इथल्या संस्कृतीशी त्यांचा

चांगला परिचय होता. अनेक ग्रंथांचे त्यांना झालेले आकलन पुढे त्यांच्या लेखनातून स्पष्ट झाले. त्यामुळे पुस्तक केवळ नीतिशास्त्रावरचे नाही, तर भारतीय नीतिशास्त्र आणि पाश्चात्त्य नीतिशास्त्र यांचा तुलनात्मक अभ्यास मांडण्याचा एक प्रयत्न नक्कीच केलेला आहे.

पुस्तकामध्ये काही महत्त्वाचे विषय हाताळलेले आहेत. एकंदरीत बारा प्रकरणे आणि दोन लहानशी परिशिष्टे पुस्तकात घातली असून विषयाला आकार देण्याचा प्रयत्न केला आहे. ज्यात सदसदविवेकबुद्धी म्हणजे नेमके काय, तिचे स्वरूप, नैतिक प्रामाण्य आणि नैतिक स्वातंत्र्य. आत्मोन्नती आणि स्वार्थत्याग, व्यवसायाची निवड, समता, ती कशात आहे, शासन आणि क्षमा, नीतिशास्त्र आणि तत्त्वज्ञान व धर्म आणि आत्मस्वातंत्र्य यांच्यातील तुलना, नीतिशास्त्राची उपयुक्तता, ऐतिहासिक पद्धती अशा अनेक विषयांचा ऊहापोह आहे, तर परिशिष्टात नीतिशास्त्र व इतर शास्त्रे, रेव्हरंड मॅकेन्झी वा भारतीय नीतिशास्त्र असा साधारण चर्चेचा भागही आहे. एकंदर मागील खंडामध्ये समाविष्ट असलेल्या सर्व नीतिशास्त्रीय संकल्पना आणि त्यावर झालेली चर्चा यांचा हा ग्रंथ समारोपाचा आहे, असे समजायला हरकत नाही, कारण सदसद्विवेकबुद्धिसोबतच समता, शासन, क्षमा, धर्म, आत्मस्वातंत्र्य आणि नीतिशास्त्राच्या अभ्यासाची उपयुक्तता अशा सामाजिक आशयांच्या बाबींचाही विचार प्रस्तुत ग्रंथामध्ये केलेला आढळतो.

ग्रंथाचे वाचन करताना एक गोष्ट गोगटे यांच्या लेखनाच्या बाबतीत आढळते ती म्हणजे नेमकेपणा आणि नेटकेपणा. तसेच दुसरे वैशिष्टे सांगता येईल ते असे की, लेखनापूर्वी अभिकल्पाचा (Design) पूर्णपणे विचार केलेला आढळतो. त्याशिवाय ग्रंथ इतक्या सुव्यवस्थितपणे लिहिता येणे अशक्य आहे. अजून एक महत्त्वाची बाब म्हणजे केवळ पाश्चात्त्य वा पौर्वात्य तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र यांचा लेखकाने अभ्यास केला आहे, असे नाही तर त्यावरचे चिंतनही अगदी सखोल आहे. त्याचा प्रत्यय ग्रंथवाचन करताना जागोजागी आल्याशिवाय राहत नाही.

सदसद्विवेकबुद्धी म्हणजे नेमके काय? या चर्चेपासून ग्रंथाला आरंभ लेखकाने केलेला आहे. व्यक्तीची सदसद्विवेक बुद्धी म्हणजे नेमके काय असू शकते, यावर विचार मांडले आहेत. खरे तर हा नीतिनिर्णयाचा निकष आहे. नीतिनिर्णय हे अनेकदा बाह्य नियमाद्वारे घेतले जात असतात, कारण अनेकदा व्यक्तीला तसे वागण्याची इच्छा असो वा नसो केवळ कायदा आहे म्हणून किंवा कायद्याचे पालन न झाल्यास शासन होऊ शकते म्हणून त्याच नीतीच्या नियमाप्रमाणे चालावे लागते. इथे हा खरे तर वादाचा विषय आहे, कारण केवळ शासन होण्याचे भय माणसाला नैतिक बनवू शकेल का? पण कायद्याच्या वा नियमांच्या भीतीमुळे खरी नीतिमत्ता मिळत नसली तरीही नीतिमत्तेचा विकास होण्यासाठी व्यक्तीमध्ये आवश्यक असलेली भूमिका तर नक्कीच तयार होत असते. अगदीच उदाहरण द्यायचे झाले तर प्रार्थनेचे देता येईल. शाळेत प्रार्थना आणि प्रतिज्ञा या रोजच घेतल्या जातात. त्यामुळे

खरेच विद्यार्थी नैतिक होईल की नाही, हे सांगता येत नाही; पण एक नक्की, नैतिक भूमिकेशी त्याचा परिचय मात्र नक्की होतो आणि कठोर नैतिक वर्तनाची भूमिकाही तयार होत असते. Fear of law is the beginning of morality असे म्हटले जाते ते उगाच नाही; पण बाह्यनियमवादापेक्षाही आंतरनियमवादाची शक्ती ही मनुष्याला नक्कीच निसर्गाकडून लाभलेली असते. तिच्याकडून येणारे निर्णय हे अव्याहतपणे अंतःस्फूर्तीच्या स्वरूपात जन्मास येत असतात आणि ते भाषेद्वारे प्रकट होत असतात. ही अशी शक्ती ही इंद्रियांची नसून आंतरिक असते; पण तरीही यावर लेखकाने भरपूर चर्चा केलेली आढळते. केवळ अंतःस्फूर्ती असणे हा काही निकष असू शकत नाही, कारण ती कोणत्या व्यक्तीची आहे, त्यालाही मूल्य असतेच. मिलसारख्या उपयुक्ततावादी व्यक्तीने निकृष्ट व्यक्तीच्या सदसद्विवेक बुद्धीला अर्थात् नाकारले आहे. गाढवाच्या सदसद्विवेकाचे करायचे काय? शिवाय ही बुद्धी म्हणजे केवळ त्या व्यक्तीच्या लहरीवर वा इच्छेवर अवलंबून नसून ती पूर्णपणे निरुपाधिक, निरपेक्ष, सार्वत्रिक व शाश्वत असावी लागते, अन्यथा ही सदसद्विवेकबुद्धी सापेक्ष असल्यास तिला काय मूल्य आहे? गरिबाला मदत करण्याची वृत्ती सापेक्ष असेल तर त्याचा काय उपयोग? कोणत्याही गोष्टीच्या युक्त वा अयुक्ततेच्या विचारामागे आपल्या तार्किक वा शांत विचारांखेरीज आणखी एक शक्ती आपले काम करीत असते ती म्हणजे आपली वैयक्तिक भावना वा आपला मनोविकार! मनुष्याची अंतःस्फूर्ती ही स्वयंभू, कोणत्याही शारीरिक वा बाह्य रचनेवर वा मनोरचनेवर वा उपाधीवर अवलंबून नसते तर मनोभावना ही पूर्णपणे वैयक्तिक व खाजगी असतात.

ढोबळ मानाने लेखकाने त्याचे विश्लेषण केलेले असले तरीही सदसद्विवेकबद्धीच्या स्वरूपाची काही सामान्य लक्षणेही सांगितली जातात. प्रथम म्हणजे ही बुद्धी अतिशय साधी आणि असाधित (simple and underived) असावी. म्हणजे एक तर त्या बुद्धीचा जन्म हा साधा सोपा आणि निरवयव असावा, तुकडातुकड्याने नसावा. दुसरे लक्षण, ही बुद्धी स्वयंस्फूर्तपणे आणि अव्यवहितपणे (Intutitively and immediately) निर्णय देणारी असते. एखादी वस्तू जाणवते तेव्हा कसे तिचा पोत, आकार, रंग, वजन वा स्पर्श अशा घटकांच्या विचारप्रक्रियेचा आधारही न घेता ती आपल्याला स्पष्टपणे जाणवते, विचार आपण मागाहून करतो. त्याप्रमाणे कृतीतील योग्यायोग्यता, बरेवाईटपणा वगैरे कोणत्याही विचारप्रक्रियेच्या आधाराविना आपल्याला अगदी सहज जाणवते तिला सद्सदविवेकबुद्धी म्हणता येईल. तिसरे लक्षण असे सांगितले जाते की, ही अशी बुद्धी मानवता समकक्ष आहे, म्हणजे सर्वांमध्ये आहे. ज्याला मानवप्राणी म्हणून संबोधणे शक्य आहे. अशाच्या ठायी ही आहेच. चौथे लक्षण म्हणजे अशी बुद्धी ही केवळ ज्ञानात्मक (cognitive) नाही तर ती अधिकारात्मकही (authoritative) आहे. बटलरमते, ही बुद्धी केवळ नियम समजून घेत नाही, तर त्यावर आक्षेपही घेऊ शकते, तसेच अंतर्मुख होऊन त्यातील दोषही शोधून

काढू शकते. शिवाय अंतिम चिंतनावर येऊन ती निवाडाही करू शकते, म्हणून ही बुद्धी अधिकारवाणीने त्याचा निर्णय देऊ शकते. आणि पाचवे लक्षण असे की, ही निरपेक्ष स्वरूपाची (unconditioned) असते.

काही जणांनी अशा सदसद्विवेकबुद्धीला आंतरिक तर्कशक्ती मानले असले तरीही ते तितकेसे बरोबर नाही, कारण मग तर्कशास्त्र आणि नीतिशास्त्र हे एकच मानावे लागेल. कांट हा तार्किक बुद्धीला विचारून युक्तायुक्तता ठरवावी असे सांगतो; पण ते तितकेसे बरोबर नाही. भावनाही हवीच. परोपकार, एकपत्नीव्रत, ज्ञानसाधना या केवळ तर्कावर विसंबून राहून निश्चित करता येत नाही, त्यात भावना हव्यातच. म्हणून तार्किक बुद्धी आणि सदसद्विवेक बुद्धी एक नव्हेच. एक मात्र खरे, या शक्तीच्या स्वरूपाबद्दल भिन्न भिन्न मते व्यक्त केली तरीही तिच्या स्वरूपाचा अर्थ नीट लागतच नाही; परंतु याचा अर्थ तिचे अस्तित्व नाही असे काही म्हणता येणार नाही. आत्म्यामध्ये दोन घटक मानले जातात, त्यातील भावना हा घटक कार्यप्रवर्तक असला तरी विवेकशून्य मानला जातो, तर बुद्धी हा घटक विवेकयुक्त पण निष्क्रिय असा मानला जातो; पण सदसद्विवेक बुद्धी ही कार्यशील आणि विवेकशीलही असते, म्हणून तिला नकार देता येत नाही. विचारवंतांच्या मते, ही शक्ती म्हणजे आत्म्याच्या स्वतःच्या अभिव्यक्तीचे शील होय. शीलरूप ठरल्याने शक्तीची नैतिक अनिवार्यता आपोआप स्पष्ट होते.

लेखकाने याखेरीज सदसद्विवेकबुद्धीचे स्वरूप नेमके कसे असते हे अतिशय सोप्या शब्दांमध्ये चिंतन करून मांडले आहे. मार्टिनीच्या म्हणण्याप्रमाणे सदसद्विवेकबुद्धी ही मनुष्याच्या सहाव्या इंद्रियाप्रमाणे असते; पण याचा अर्थ लगेच ती सौंदर्यविषयक वा सुखविषयक भावनेप्रमाणे असते, असे मात्र नाही, तर त्याहूनही भिन्न व स्वतंत्र शक्ती असल्याप्रमाणे असते. एक वेगळा मुद्दा लेखकाने असा मानला आहे, की बरेवाईटपणा ही पायाखालच्या वाटेप्रमाणे सवयीने समजतो. थोडक्यात, सदसद्विवेकबुद्धी ही अनुभवाने प्राप्त होऊ शकते, असे म्हणायचे असावे. शिवाय सौंदर्यविषयक भावना म्हणजे सदसद्विवेक बुद्धी नव्हेच, तरीही त्यात साम्य आहेच.

एखादे फूल आवडल्यास त्या आवडण्याच्या निर्णयामध्ये कुठला स्वार्थ असतो? कुठलाही नाही. पण तरीही सदसद्विवेकबुद्धी म्हणजे सौंदर्यविषयक भावना नव्हे. सदसद् यामध्ये कुठलाही स्वार्थ नसतो, तसेच स्वार्थत्यागही नसतो. यावरून सुखवाद्यांनी एक वेगळा दृष्टिकोन मांडण्याचा प्रयत्न केला आहे तो म्हणजे एकाला सुखकर वाटते ते दुसऱ्यालाही दुःखकर असू शकते; पण सुखकर आणि दुःखकर त्या त्या व्यक्तीच्या भावनेवर अवलंबून असते, असा याचा अर्थ निघतो. मग असे असेल तर एकपत्नीव्रत हे चांगले की वाईट असे प्रश्न कोणत्या निकषावर सोडवावेत? थोडक्यात सांगायचे झाले तर सदसद्विवेकबुद्धीसाठी केवळ भावनेचा आविष्कार योग्य नाही.

सारांशामध्ये असे सांगता येते, की तार्किक बुद्धी ही नीतिअनीतीच्या कल्पनेवर चर्चा करू शकते, भावना केवळ अंध आहे. भावना आणि तार्किक बुद्धी यांचा समन्वय केला तरीही सापेक्ष निर्णय होऊ शकतो, कारण वैयक्तिक स्वभाव त्यात येऊ शकतो. शिवाय त्यामुळे भावनेने तार्किक बुद्धी पछाडली जाऊ शकते. त्यामुळे त्या निर्हेतुक असा सौंदर्यविषयक दृष्टिकोन हवा. या चर्चेच्या आधारावर असे म्हणता येईल, की सदसद्विवेकबुद्धी म्हणजे तार्किकबुद्धी, भावना आणि निर्हेतुकता यांच्या मदतीने अंतःस्फूर्तीने घेतलेला निर्णय!

सदसद्विवेकबुद्धीने वागायचे असले तरीही तेवढ्यावर भागते असे मात्र नाही. मनुष्य केवळ आपल्या अंतःस्फूर्तीच्याच संदर्भाने जगतो असे नाही. मनुष्य हा सामाजिक, राजकीय, धार्मिक व नैतिक अशा विविध संस्थांच्या नियमनाने आपले वर्तन करीत असतो. मनुष्य व्यवहार करायला शिकतानाच त्याला काही धार्मिक, सामाजिक कंगोरे असतातच. पुढे राजकीय संदर्भानेही त्याला जगावेच लागते. अशा विविध संस्थांच्या नियमनाचे एक बंधन सतत मनुष्याला शिकवण्यात येत असते. हे सगळे मनुष्य पाळत कसे जगतो, हेही महत्त्वाचे आहे. काही नियम तो श्रद्धेने पाळतो तर काही भयापोटी पाळत असतो. या प्रशिक्षणानेच मनुष्याचा खरे तर स्वभाव बनतो. म्हणून बुद्धीपेक्षा स्वभाव हा दुरतिक्रम असल्याने नीतिमत्ता ही बुद्धिपेक्षा स्वभावावर अवलंबून असते. म्हणजे स्वभाव योग्य बनण्यास नीतिशिक्षण आवश्यक असतेच. थोडक्यात, नीतिनियमनासाठी नीतिशिक्षण आवश्यक असतेच. नैतिक प्रामाण्याचे ध्येय नैतिक स्वातंत्र्य हेच आहे. भौतिकशास्त्रात एखादा सिद्धांत चुकीचा मांडला गेला तरीही त्याचा समाजावर फारसा परिणाम होत नाही, तर केवळ काही प्रमाणामध्ये संशोधनावर होतो किंवा असेही म्हणता येते, की संशोधनामध्ये अशा प्रकारच्या चुका झाल्या तरीही प्रगती होतच राहते. नवा शोध लागण्याचीही शक्यता नाकारता येत नाही; पण नैतिकतेच्या बाबतीत असे म्हणता येणार नाही. कुणीही नैतिकतेच्या बाबतीत असे केले तर समाजाच्या नीतिमत्तेवर याचे दूरगामी परिणाम होणे सुरू दार्शनिक विचारांच्या आधारावर ब्रॅडलेने आत्मपूर्णतावाद उभा केला आहे. आत्मसाक्षात्कार हाच मनुष्याचा अंतिम असा नैतिक आदर्श असला पाहिजे, जो समाजात राहून आत्मज्ञानाद्वारे प्राप्त करता येऊ शकतो. त्यामुळे ब्रॅडलेने हे अगदी आवर्जून मांडले आहे, की समाजातच मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाचा पूर्ण विकास होणे शक्य आहे आणि सामाजिक जीवनाच्या संदर्भानेच त्याच्या नैतिक आचरणालाही महत्त्व आहेच.

आत्मोन्नती आणि स्वार्थत्याग ही संकल्पना ब्रॅडलेने जास्त सुस्पष्टपणे मांडली आहे. ब्रॅडलीच्या मतानुसार समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपले कर्तव्य अगदी योग्य पद्धतीने पार पाडलेच पाहिजे. याच विचाराने त्यांनी 'माझे स्थान आणि माझे कर्तव्य' (My station and my duties) अशा संज्ञाचा उपयोग केला आहे. त्यांच्या विचारानुसार प्रत्येक व्यक्तीमध्ये योग्यता आणि क्षमता याबाबतीत एकसारखेपणा अजिबात असू शकत नाही. त्यामुळे

समाजस्तरावर काम करतानाही त्यांची कर्तव्ये ही भिन्न भिन्न असणे अगदीच साहजिक आहे. प्रत्येकाने समाजामध्ये आपल्याला प्राप्त झालेल्या उचित स्थानानुसार आपापली कर्तव्ये अगदी योग्य पद्धतीने पार पाडली पाहिजेत. अर्थात ब्रॅडले यांनी हेही मान्य केलेलेच आहे, की प्रत्येक व्यक्तीला आपापल्या आवडीनुसार आणि क्षमतानुसार समाजामध्ये आपले स्थान आणि पद निवडण्याचा आणि त्याप्रमाणे जगण्याचा अधिकार नक्कीच आहे; पण एकदा का त्याने त्या स्थानावर स्वतःला बसवले, की मग मात्र त्या निश्चित स्थानासंबंधित समस्त कर्तव्ये त्याने पाळलीच पाहिजेत. ब्रॅडलेच्या मते, प्रत्येक व्यक्तीने आपल्या प्राप्त झालेल्या स्थान व पदानुसार समग्र कर्तव्यांचे निष्ठापूर्वक पालन करणे यातच त्याचे नैतिक उत्थान शक्य आहे आणि समाजाची उन्नतीही शक्य आहे. म्हणजे एकीकडे आपले कर्तव्य पार पाडता येते आणि दुसरीकडे प्राकृतिक शक्तींचा विकासही शक्य आहे. ब्रॅडलेच्या मते, प्रत्येक व्यक्ती संपूर्ण मानव समाजाच्या कल्याणासाठी अगदी महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकेल असे काही नाही, तर आपल्या कर्तव्यामुळे काही व्यक्तींचे कल्याण मात्र करू शकतो. अशाप्रकारे ब्रॅडले आपल्या कर्तव्याच्या पालनामध्ये प्रत्येक व्यक्तीसाठी एक उच्चतम नैतिक जीवन व महत्त्वपूर्ण व्यवहार असल्याचे मानतात. तसेच दुसऱ्यांच्या कल्याणामध्येच आपल्या स्वार्थाचा त्याग असेल तरीही तो उचित मानतात, जेणेकरून समाजकल्याण होईल आणि त्यातच आपलेही कल्याण गृहीत आहेच. आत्मोन्नती आणि स्वार्थत्याग या दोन विभिन्न वाटणाऱ्या पारिभाषिक संज्ञांची नैतिक जीवनामध्ये सांगड बसते ती अशी...!

काही महत्त्वाच्या वाटणाऱ्या संज्ञांचाही विचार लेखक करतात, उच्च आणि इष्ट वृत्तींना जागा असते, तसेच नीच वृत्तींनाही महत्त्वाचे स्थान असू शकतेच. गुलामगिरी वाईट असली तरीही शत्रूना गुलाम करणे ही फार अनैतिक बाब नाही. शिवाय आत्मोन्नती म्हणजे सर्वच आत्म्यांची उन्नती नव्हे. स्वार्थत्याग पूर्णपणे शक्य आहे का, असाही प्रश्न पडतो; पण त्याचे उत्तर असे, की स्वार्थत्याग म्हणजे केवळ कनिष्ठ वृत्तींचा त्याग. अगदी क्षुल्लक कारणासाठी स्वार्थत्याग करणे योग्य नाही आणि शक्यही नाही.

व्यवसायाची निवड आणि नैतिकता असा सहसा न पडणारा प्रश्न हाताळला आहे, हे विशेष! व्यवसायामागील नीतिशास्त्र असे असावे, याविषयी चिंतन मांडण्यात आलेले आहे. व्यवसाय मनुष्य कशासाठी करतो, हे सर्वचजण जाणतात; पण केवळ आपले अर्थकारण व्यवस्थित राहावे आणि जास्तीतजास्त नफा मिळून आपण श्रीमंती भोगावी एवढेच कारण त्यामागे असू नये, म्हणून खरे तर नीतिशास्त्रीय विचारातून व्यवसायाकडे बघण्याचा एक दृष्टिकोन दिला आहे. मनुष्याने नैतिक उन्नतीसोबतच बुद्धी, कलाकौशल्य व शरीरसामर्थ्याचीही यथायोग्य अशी वाढ केली पाहिजे, अर्थात तीही नैतिक कक्षेत राहूनच केली पाहिजे. अर्थकारणाच्या स्वतःच्या उन्नतीसोबतच सामाजिक उन्नतीतही आपला

हातभार लागला पाहिजे; पण समाजकारण हे बहुआयामी आहे, त्यामुळे कोणत्या प्रकारचे हित करणे आपल्याला शक्य आहे, हेही बघावे लागते. मुळात यासाठी मनुष्याच्या संबंधाच्या बाबतीत विचार करणे भाग आहे. कौटुंबिक संबंध आणि व्यावसायिक संबंध यांच्यामध्ये स्वरूपतःच भेद असतो. कौटुंबिक संबंध हे मनष्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीवर म्हणजे... मैत्री, स्नेह, नाते अशांवर अधिष्ठित असतात, तर व्यावसायिक संबंध हे मानवातील करारांवर अवलंबून असतात. कौटुंबिक संबंध हे समतेवर अवलंबून असतात, तर व्यावसायिक संबंध हे कमी अधिकपणावर अवलंबून असतात. अकुशल, फारशा बुद्धिमान नसलेल्या घरातील माणसाकडून कामे करून घेतानाही त्याचे संगोपन हा हेतू त्यामागे असतोच; पण व्यवसायामध्ये जास्तीत जास्त फायदा कसा होईल हाच हेतू राबवण्यामागे असू शकतो. म्हणून योग्य मोबदला मिळावा, ही इच्छा असते, त्यासाठी कायदे बनतात; पण ते ज्यांनी अमलात आणायचे असा सुशिक्षित समाजही त्यांना बाजूला ठेवून समोरच्याला राबवत राहतो. दुसरी बाब, व्यवसाय जर इतर समाजाच्या म्हणजेच मानवाच्या संरक्षण वा संवर्धनासाठी असेल तर ठीक; पण जर मानवता धोक्यात आणणारा असेल तर त्या व्यवसायाची नैतिक बाजू चांगली नाही, असे म्हणावे लागेल. काही काही बाबतीत असेही म्हणता येते, की काही व्यवसायांमध्ये फायदे असतात; पण दुसऱ्या काही गोष्टींचा त्याग करावा लागतो. शेती करणाऱ्या व्यक्तीला शुद्ध हवा, अन्न, पाणी मिळू शकते; पण एकंदर विकास, समाज व रंजन, साहित्य वगैरे गोष्टींपासून तो दूर राहू शकतो.

मार्टिनोच्या मते, उच्च ध्येय जर अंतःस्फूर्ती देत असेल तर तेच स्वीकारले पाहिजे. परिस्थिती व वातावरणाचा प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे. कौटुंबिक प्रेमापेक्षा विश्वबंधुत्व श्रेष्ठ मानावे; पण याचा अर्थ आपला प्रपंच वाऱ्यावर सोडू नये. मार्टिनोच्या मते, व्यवसायानुरूप येणारे मनोविकार वा दोष हेही स्वीकारावे लागतात. उदाहरणार्थ, वकिलीमध्ये खोटे बोलावे लागते. व्यवसायामध्ये नैतिक ध्येय जरूर असावे; पण ते अतिउच्च नसावे. आपल्या ध्येयानुसार उत्साह टिकवावा, व्यवसाय म्हणजे केवळ कृती नसते, त्या अंगभूत अशी काही कौशल्येही हवी असतात. योग्य हित लक्षात ठेवावे लागते. खरे तर नव्वद वर्षापूर्वीच्या या पुस्तकामध्ये ही चर्चा आहे; पण ती आजही करणे प्रस्तुत आहे. अनेक मोठमोठे व्यवसाय आणि वैद्यकीय व्यवसायांसारख्या संस्थावर नीतिशास्त्रीय मार्गदर्शनासाठी तत्त्वज्ञांची निवड होणे गरजेचे आहे.

लेखकाने समता या विषयावरही चर्चा केलेली आहे, हे विशेष! न्यायबुद्धी वा समता या शब्दांचे अर्थ अत्यंत सुलभ आहेत; पण त्यांचे आचरण करणे अत्यंत कठीण आहे. बेंथामच्या सुखवादाचा इथे विचार करावा लागतो. बेंथामने अधिकांचे अधिक सुख असा निकष लावला आहे; पण यालाही मर्यादा आहेच. सर्वांचे हित हे सारखे नसते, तसेच सर्वांच्या सुखाच्या कल्पनाही सारख्या असू शकत नाहीत. हं, उन्नतीची संधी सर्वांना सारखी

देणे शक्य आहे; पण त्या संधीचा उपयोग करणे सर्वांना शक्य होईल असेही नाही. बेंथामच्या मते, व्यक्तीव्यक्तीच्या सुखामध्ये गुणात्मक भिन्नता तशी नसते, गुणशः सर्व सुखे सारखीच असतात; पण आधुनिक मानसशास्त्र ते स्वीकारत नाही, कारण सर्व सुखे सारखी असण्याचा संभव नाही. दुसरी गोष्ट, बेंथामने सुचवलेली सुखाची मोजमापे ही तशी व्यावहारिक नाहीत, त्याच्या कृतीमध्ये वापर शक्य नाही. बेंथामने सुखाची सात परिमाणे दिलेली आहेत, तीव्रता, कालावधी, निकटता, निश्चितता, शुद्धता, फलद्रूपता, विस्तृतता अशा निकषांवर बेंथाम सुख मोजतो. त्याच्या मते, या निकषांवर सुख मोजा, दुःखही मोजा, मग जे शिल्लक असेल त्यावरून कृतीच्या योग्य आणि अयोग्यतेचा प्रश्न सुटेल. आता असे परिणाम असले तरीही सामान्य माणसाला ना ते वापरता येणार ना त्यातून कृतीची निवड करता येणार, म्हणून न्यायबुद्धी वा समता ही अशी वापरता येणारच नाही. मग अगदी निरूपाधिकपणे समता देता येईल का, हाही प्रश्न महत्त्वाचा आहे; पण एखाद्या व्यक्तीला गुणवत्ता प्राप्त नसतानाही पद तर देता येणार नाही. तशी समता शक्य नाही. त्यामुळे शेवटी योग्य तेवढ्या समतेवर यावे लागते. लेखकाने अतिशय सोप्या शब्दांमध्ये याविषयी चर्चा मांडली आहे.

शासन आणि क्षमा याविषयीही चिंतन मांडणे क्रमप्राप्तच आहे, कारण समता आणि न्यायाविषयीही लेखकाने आस्थेने विचार मांडले आहेत. व्यवसायाची निवड काय किंवा समता वा न्यायबुद्धी काय किंवा शासन आणि क्षमा काय, हे सारे विषय सामाजिक आणि राजकीय नीतिशास्त्राच्या परिप्रेक्ष्यातून पाहण्याचे कळीचे मुद्दे आहेत. समतेचे नीतिविचार मांडताना आपण पाहिले, की सर्वांना किमान समान संधी देणे तरी न्यायाचे ठरते; पण एखाद्या व्यक्तीने अनैतिक कृत्ये केले वा गुन्हा केला तर त्याला शासन केव्हा करावे आणि क्षमा केव्हा करावी हेही ठरवणे महत्त्वाचे काम आहे. कारण गुन्हा केला, की शासन झालेच पाहिजे, हे जितके महत्त्वाचे आहे तितकेच महत्त्वाचे हेही आहे, की गुन्हेगाराच्या हिताला धक्का लागू नये. कारण अंतिमतः शिक्षा ही त्याला सुधरवण्यासाठी असावी, केवळ गुन्ह्याचा सूड घेण्यासाठी नसावी. जर्मन विचारवंत कांट याचे तर असे म्हणणे आहे, की शिक्षा हे इतर कोणत्याही ध्येयाचे साधन नसून तेच शासन करणाराचे ध्येय असले पाहिजे. शिक्षा ही नेहमी भूतकाळाकडे बघून - म्हणजे घडलेल्या अपराधाकडे बघून - करायची असते. त्याच्या पुढील हिताकडे बघून करायची नसते. शिक्षा करताना गुन्हेगाराच्या अगर समाजाच्या हिताचा विचार करणे अत्यंत अन्यायाचे आहे. थोडक्यात, शासन व्हावे याचेच समर्थन हे आहे. खरे तर शासन वा शिक्षेच्या समर्थनासाठी काही महत्त्वाचे मुद्दे आहेत. त्यासाठी महत्त्वाचा मुद्दा हा आहे, की सद्गुणी जीव हा सर्वोच्च म्हणून सर्वसंमत अशा नैतिक मूल्याच्या म्हणजे आत्मकल्याणाच्या साक्षात्करणात सतत गुंतलेला असतो. ही प्रक्रिया हळुवारपणे चालणारी आहे. त्याला विरोध करणाऱ्या दुर्गुणी जीवांपासून त्याला वाचवणे हे एक खरे तर शासन करण्यामागचे एक समर्थन आहे. त्याचबरोबर नीतिनियम म्हणजे

काय, त्यांचे सार्वभौमत्व व प्रतिष्ठा हे दुर्गुणी जीवांना पटावे हे पण एक उद्दिष्ट यामागे असते. थोडक्यात, सद्गुणी जीवांच्या संरक्षणाकरता आणि दुर्गुणी जीवांना दुष्ट प्रवृत्तीपासून परावृत्त करून सद्गुणी बनवण्यासाठी आणि नीतिनियमांची प्रतिष्ठा राखण्यासाठी शासन करणे हे न्याय्य व समर्थनीय ठरते. याला 'शासनाचे नैतिक समर्थन' (Moral Justification of Punishment) असे म्हणतात. कांटच्या म्हणण्याप्रमाणे शिक्षेपासून व्यक्ती शिकून अनैतिक विचारांपासून परावृत्त झाली पाहिजे. ब्रॅडलेने कांटच्या व्याख्येत सुधारणा केली आहे. त्यांच्या मते, शिक्षा प्रमाणाबाहेर नको. पण गंमत अशी होते की, व्यक्ती गुन्हा करताना पकडली गेली तर राग तीव्र होतो म्हणून तर कडक शिक्षा होते आणि जरा उशिरा पकडली गेली तर मात्र राग मावळतो. पण म्हणून शिक्षा सौम्य होते का? तसे काही नाही. शिवाय शिक्षा ही सुखकारक नसावी हे नक्की! कारण सुखकारक शिक्षा असेल तर त्याचे भय वाटणे बंद होईल. म्हणून शिक्षा तर अनैतिक कृत्याच्या भयासाठीच हवी, पण तीही इतकी दाहक नको की त्यातून नवा गुन्हेगार जन्माला येईल. शिक्षेमागील हेतू जर व्यक्तीत सुधारणा करणे, समाजहित व पर्यायाने राष्ट्रहित सांभाळणे हे असेल तर शासन करण्यामागची तत्त्वे कोणती असावीत यावरही नीतितत्त्वज्ञानाने विचार केला आहे. त्यातील प्रत्येक तत्त्वाची चिकित्सा ही नीतिशास्त्राच्या हिशेबाने केलेली आहे.

प्रतिबंधात्मक सिद्धांत (Preventive Theory) : या सिद्धांताचा मूळ उद्देश हा गुन्ह्याची पुनरावृत्ती टाळणे, त्या गुन्ह्याच्या प्रवृत्तीला टाळणे असा असल्याने त्याला 'प्रतिबंधात्मक सिद्धांत' असे म्हणतात. आपण पुन्हा हा गुन्हा केला तर कोणते शासन होईल हे त्या गुन्हेगाराला समजावे आणि इतर प्रवृत्त लोकांनाही समजावे म्हणून खरे तर या सिद्धांताचा उपयोग केला जातो; पण यावरही आक्षेप असा घेतला जातो, की केवळ नैतिक बदल व्हावेत म्हणून केला जातो; पण अशी प्रवृत्ती केवळ दबेल. समूळ नाहीशी होण्याची शक्यता नाही. गुन्हेगार हा मानव असल्यामळे त्याला सुधारण्यासाठी काय केले जावे, याचा मागमूसही यात नाही. केवळ नीतिनियमांची प्रतिष्ठा सांभाळली जावी या प्रयत्नामध्ये व्यक्तीच्या कल्याणाचा विचारच सोडून दिला जातो, म्हणून हा विचार एकांगी ठरतो.

सुधारणात्मक सिद्धांत (Reformative Theory) : या सिद्धांताचा उद्देश मात्र गुन्हेगारामध्ये सुधारणा घडवून आणावी असा आहे, त्यामुळे त्याला सुधारणात्मक सिद्धांत असे म्हणतात. गुन्हेगार हा माणूस आहे, त्यामुळे त्यालाही सुधारणेची संधी दिली जावी आणि त्याच्या आयुष्याला नैतिक वळण लावावे, अशी साधारण इच्छा असते; पण यावरही महत्त्वाचा आक्षेप घेता येतो तो हा की, गुन्हेगार हा वेडा किंवा मूर्ख किंवा अज्ञानी असावा असे गृहीत धरून मगच सुधारण्याची भाषा करता येते. प्रत्यक्ष गुन्हेगार या गृहीत कल्पनेचा धिक्कार करतात. अनेक गुन्हेगार हे अतिशय सुशिक्षित, विचारशील असतात, अशा गुन्हेगारांना सुधरवण्याची भाषा बोलणे हास्यास्पद ठरते किंवा शारीरिक न्यूनता, मानसिक

विकृती, सामाजिक विषमता ही गुन्ह्याची कारणे मानली जातात; पण जर तसे नसून केवळ नियमांना तुडवण्यासाठी वा काही हेतूपुरस्सर गुन्हे केले जात असतील तर त्याची संगती लावून गुन्हेगारांना सुधरवण्याचे कसे आणि कोणत्या निकषावर ठरवावे?

प्रतिकारात्मक सिद्धांत (Retributive Theory) : या सिद्धांताचा उद्देश हा नीतिनियमांची प्रतिष्ठा आणि सार्वभौमत्व अबाधित राखणे आणि गुन्ह्याचा यथायोग्य प्रतिकार करणे असा आहे. म्हणन त्याला प्रतिकारात्मक सिद्धांत असे म्हणतात नीतिनियम हे सार्वभौम आहेत. समाजाचे स्वास्थ्य सांभाळणे हे त्याचे उद्दिष्ट आहे व म्हणून ते कोणत्याही व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ आहेत. त्यासाठी नीतिनियमांचे पालन करणे हे आपले कर्तव्य आहे, ते मोडले तर शिक्षा ही होणार, याची जाणीव गुन्हेगाराला झालीच पाहिजे. गुन्हा हा शिक्षेकडेच नेतो. गुन्हेगाराला शासन झाले नाही तर नीतिनियमांचा अवमान तर होतोच होतो, त्या व्यतिरिक्त गुन्हेगारांनाही प्रोत्साहन मिळत राहते, त्याचा परिणाम म्हणून नीतिनियम हे वास्तविक आदेश नसून केवळ सूचना असतात, त्यांचे पालन नाही केले तरी चालेल, असा गुन्हेगारांचा आणि सामान्यांचाही गैरसमज होत राहतो.

शासनाचे काम हे अशा गुन्ह्यांसाठी गुन्हेगारांना शासन करणे तर आहेच; पण त्यासोबतच त्याला गुन्ह्याची आणि त्यासापेक्ष नैतिकता सोडल्याची जाणीव करून देणे गरजेचेही आहे. गुन्हेगारांना शिक्षा मिळाली तरच नीतिमत्तेची बूज राखली जाते व प्रतिष्ठा कायम राखली जाते.

असे असले तरीही काही काही गुन्हेगारांना क्षमा केली जाते, तेव्हा ते गुन्हे काय आणि क्षमा का केली जावी याविषयीही काही निकष आहेतच. कोणत्याही गुन्ह्याला क्षमा करणे योग्य नाही.

नीतिशास्त्र आणि तत्त्वज्ञान यांच्यात काय संबंध आहे, आहे किंवा नाही याविषयीही अनेक प्रश्न सतत उपस्थित होतच असतात. लेखकाने असे लिहिले आहे, की श्रमविभागणीच्या तत्त्वानुसार, मूलतत्त्वांचा शोध लावण्याचे काम तत्त्वज्ञानाकडे सोपवून प्रत्येक शास्त्र हे आपापल्या मर्यादेत व त्या मूलतत्त्वांच्या आधाराने कार्य करीत असते. नीतिशास्त्र हेही काही मूलभूत तत्त्वांच्या पायावरच रचलेले असते आणि ती मूलतत्त्वे सिद्ध करण्याचे कामही तत्त्वज्ञानाचे असल्यामुळे इतर शास्त्रांप्रमाणेच नीतिशास्त्राचे अस्तित्वही तत्त्वज्ञानावरच अवलंबून आहे. इतर शास्त्रे... म्हणजे विज्ञानादी वगैरे यांचा प्रत्येक मनुष्याच्या जीवनाशी तसा निकटचा संबंध येत नाही; पण नीतिशास्त्र हे तसा परिणाम घडवत असल्यामुळे त्यातील तत्त्वे अमान्य केल्यास त्याचा दूरगामी परिणाम दिसून येतो. नीतिशास्त्र हे अंधश्रद्धा वा व्यावहारिक अशा उपयुक्ततेवर अवलंबून नसू नये. नीतिशास्त्राने आपल्या तत्त्वविचारांचा विस्तार करायला हरकत नाही; पण किमान ती तत्त्वे तत्त्वज्ञानाच्या कसोटीस तरी उतरतात की नाही, हे पाहूनच विस्तार करावा. त्याचे कारण म्हणजे नैतिक सत्य हे अंतिम सत्याचेच

एक अंग आहे, त्यामुळे कुणी नीतितत्त्वांची मांडणी करीत असताना अंतिम सत्याशी प्रतारणा करीत असेल तर त्याला नीती वा अनीतीचे अजिबात ज्ञान नाही, असेच म्हणावे लागेल.

तत्त्वज्ञानातील संकल्पनांचा नीतिशास्त्रावर होणारा परिणाम हा तसा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. विशेषतः भौतिकवादी आणि अध्यात्मवादी याचे नैतिक निकष हे पूर्णपणे वेगवेगळे आहेत. भौतिकवादी हे जडसृष्टीलाच विश्वातील अंतिम परमसत्ता मानत असतात आणि ईश्वर वा आत्मा या गोष्टींचा निषेध करतात. अर्थात् मृत्यूनंतर काहीही शिल्लक राहत नाही, हे सिद्धच आहे. त्यामुळे पुनर्जन्माचा प्रश्नच येत नाही. त्यामुळेच अनात्मवादी किंवा भौतिकवादी हे आपल्या वर्तमान जीवनामध्येच मनष्याने अधिकात अधिक सख मिळवण्याचा प्रयत्न करणे हेच ध्येय असल्याचे सांगतात; पण अध्यात्मवादी दार्शनिक मात्र भौतिक सुखाच्या तुलनेमध्ये आध्यात्मिक उन्नतीला जास्त महत्त्व देतात. त्यामुळेच नीतिशास्त्रीय संकल्पनांचा आणि तत्त्वज्ञानाचा जास्त जवळचा संबंध आहे असे म्हणावे लागते. कारण केवळ अधिकांचे अधिक सुख असे म्हणून चालणार नाही तर ते नीतिशास्त्रीयदृष्ट्या कितपत योग्य आहे आणि कितपत नाही हेही पाहून घ्यावे लागेल.

परंतु तत्त्वज्ञानाचा एक भाग म्हणून धर्माचे तत्त्वज्ञान वा अध्यात्माकडे जरी पाहिले तरीही नीतिशास्त्र आणि त्यामध्ये भेद आहेच. आत्मा, ईश्वर, विश्व यांच्याशी संबंधित अनेक विषयांवर विवेचन त्यामध्ये केले जाते, नीतिशास्त्रावर मात्र नाही. नीतिशास्त्र हे मनुष्याच्या आचरणशील जीवनाविषयी चिंतन मांडते, तर अध्यात्म वा धर्माचे तत्त्वज्ञान त्याकडे वेगळ्या दृष्टीने पाहते. नीतिशास्त्राच्या अभ्यासाचा मूळ हेतू हा मनुष्याला शुभ-अशुभ, उचित-अनुचित यांचे यथार्थ ज्ञान करून देणे हा आहे, तर धर्माचे तत्त्वज्ञान आणि इतर समग्र तत्त्वज्ञानही समस्त वस्तुजात, विश्वाचे स्वरूप, परमसत्ता आणि त्यासंबंधी प्रश्नांवर चर्चा करते.

काही महत्त्वाचे साम्यही त्यामध्ये आहे, ते म्हणजे तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र यांच्यामध्ये एक साम्य आहे ते म्हणजे आत्मस्वातंत्र्यावरची चर्चा! व्यक्तीला कृतीचे आत्मस्वातंत्र्य आहे का?

हा कळीचा प्रश्न आहे. नीतीचे शिक्षण देऊन जर व्यक्तीला नैतिकदृष्ट्या परिपूर्ण बनवायचे असेल तर त्याला आत्मस्वातंत्र्य तर हवेच. जर ठरलेल्या पाऊलवाटेवरून जायचे असेल, म्हणजे मार्ग जर नियत असेल तर आत्मस्वातंत्र्याचा प्रश्न येतोच कुठे? पण अशाने व्यक्ती नियतीवादी होऊन गप्प बसणे भाग आहे. तसेच तत्त्वज्ञानाचेही आहे. मोक्षसाधना करायची असेल तर कशी? जर मोक्ष वा निःश्रेयस हे कसे आणि केव्हा द्यायचे हे ठरलेले असेल तर साधनेची गरज काय? यावरही चर्चा होणे गरजेचे आहे. मनुष्याला कृतीचे स्वातंत्र्य आहे आणि त्यामागे नैतिक अधिष्ठान ठेवण्याचेही आहे, हेच दोन्ही शास्त्रे सांगतात.

ब्रह्मज्ञानाची स्थिती ही नीती आणि अनीतीच्या पलीकडची जर असेल तर अनीतीला सोडून नैतिक होणे; आणि मगच नीतीअनीतीपलीकडे जाता येणे शक्य आहे. यासाठी चित्तशुद्धी होणे तर आवश्यकच आहे आणि चित्तशुद्धी ही नीतिमत्तेच्या मार्गाने जाते. याचा दुसरा अर्थ असाही होतो, की आत्मस्वातंत्र्य, ईश्वराचे वा परमतत्त्वाचे अस्तित्व, आत्म्याचे अमरत्व या गोष्टी नीतिशास्त्रालाही गृहितकामध्ये घ्यावीच लागतात. लेखकाने एक महत्त्वाचा विचार पुस्तकामध्ये मांडला आहे तो असा की, नैतिक सत्य हे अंतिम सत्याचे एक अंग असल्यामुळे अंतिम सत्याचे आविष्करण करणाऱ्या शास्त्रास ज्याप्रमाणे इतर सत्यास स्थान द्यावे लागते त्याचप्रमाणे त्याने नैतिक सत्यासही स्थान दिले पाहिजे. कार्डिनल न्यूमनने असे म्हटले आहे की, सदसद्विवेकबुद्धीचे अस्तित्व हेच ईश्वराचेही अस्तित्व सिद्ध करण्यास पुरेसे आहे. कार्डिनल न्यूमनच्या या वचनावर गंभीरपणे विचार केला तर तो दुसऱ्या शब्दांमध्ये वैदिक ऋताची संकल्पनाच सांगत असल्याचे लक्षात येते. कारण ऋत् ही संकल्पनाच विश्वव्यवस्थापनेच्या मुळाशी आहे. याच ऋताचे मानवी जीवनामधील आविष्करण म्हणजे सत् होय. कार्डिनल न्यूमन तरी दुसरे काय सांगत आहे?

काही व्यक्ती या धर्मनिष्ठ असूनही नीतिनिष्ठ नसतात, तर काही व्यक्ती या नैतिक असूनही धर्मनिष्ठ नसतात. नेमके काय असावे, हा प्रश्न आहे. मुळात त्यांच्यामध्ये परस्परपूरकता हवी असते. धर्मजीवनाचा प्रारंभ होतानाचा काळ पाहता धार्मिक कल्पना या फार नैतिक होत्या असे म्हणवत नाही; पण मुळात नीती व धर्म यांत बाह्यतः विरोध दिसत असला तरीही ते तसे आहे, असे काही नाही. मुळात काही धार्मिक गृहितके ही चुकीची असू शकतात; पण सत् तत्त्वास व ईश्वरास प्रिय असेल ते अनैतिक कसे असेल?

काही तत्त्वज्ञांच्या मते धर्मशास्त्र हे नीतिशास्त्राला आधारभूत आहे. तर काहींच्या मते नीतिशास्त्र हेच धर्मशास्त्राला आधारभूत आहे. देकार्त, लॉक वगैरे पहिल्या मताचे पुरस्कर्ते आहेत तर कांटसारख्यांनी दुसऱ्या मताचा पुरस्कार केला. देकार्त प्रभृतींचे म्हणणे असे आहे, की नीतिशास्त्र हे धर्मशास्त्रातून उपजते, ईश्वराला प्रिय ते नैतिकदृष्ट्या योग्यच आणि ईश्वरास अप्रिय ते नैतिकदृष्ट्या अयोग्य समजावे. ईश्वर हाच नीतिशास्त्राला जन्म देत असल्याने ईश्वराचा कायदा हाच नीतिनिर्णयाचा निकष आहे. कांटप्रभृतीचे म्हणणे असे आहे, की सद्गुणांचा सुखाशी आणि दुर्गुणांचा दुःखाशी निकटचा संबंध आहे ही जाणीव आपल्याला नैतिक अनुभूतीद्वारेच प्राप्त होऊ शकते. लौकिकात मात्र याविरुद्ध अनुभव येऊ शकतो सद्गुणी मनुष्यास दुःख आणि दुर्गुणी मनुष्यास सुख प्राप्त होताना दिसते. याची संगती लावावी कशी? यासाठी ईश्वरास मानावे लागते. मग हाच ईश्वर सद्गुणी मनुष्यास सुख व दुर्गुणी मनुष्यास दुःख देऊ शकतो. अशा रीतीने आपल्या नैतिक अनुभूतीतून ईश्वराचे अस्तित्व सिद्ध होते. म्हणून नीतिशास्त्र धर्मशास्त्राचा आधार आहे, असे मानावे लागते; पण सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर असे काही नसून दोन्हीही शास्त्रे समान दर्जाचीच मानावी लागतात. भारतीय तत्त्वज्ञान दोन्हीलाही समान दर्जाचे मानते.

नैतिक मनुष्य आणि धार्मिक मनुष्य यांच्यातील भेदाचा एक वेगळा विचार मांडल्याचे दिसून येते. आस्तिक्यबुद्धी ही नैतिक उन्नतीस आवश्यक आणि पोषकच असल्याने तशी श्रद्धा असलेला धार्मिक माणूसच केवळ नैतिक असलेल्या माणसापेक्षा अधिक आत्मविश्वासाने, उत्साहाने व जबाबदारीने आपले कर्तव्य करील, असे स्वतः लेखकानेच सारांश देताना म्हटले आहे. तसेच आत्म्याच्या अमरत्वावरील विश्वास हे धर्मनिष्ठेचे दुसरे अंग म्हणता येईल. कारण या जन्माच्या सत्कृत्याचे फळ पुढच्या जन्मी भोगायचे असेल तर ते आवश्यकच आहे; पण असा विचार कर्तव्यनिष्ठेपेक्षा सुखवादाचा द्योतक वाटतो, असे नमूद केले आहे; पण ते तसे नाही. या जन्मी दुःखे भोगून सत्कृत्ये करून पुढील जन्मी मी सुख भोगू शकेल, अशी अनिश्चितता बाळगण्यापेक्षा मनुष्य याच जन्मी सुख भोगण्याविषयी उत्सुक असू शकतो. याविषयी अनेक मते असून त्यावरही विस्तृत चर्चा यानिमित्ताने केलेली आहे. अर्थात् धर्मशास्त्रामध्येही याविषयी मतमतांतरे असून अनेक विचारवंत व संतांनी पुनर्जन्माच्या संकल्पनेचा स्वीकार केलेला असला तरीही त्यामागील भूमिका ही स्वर्गस्थ सुखाची आहे असे मात्र नव्हे.

आत्मस्वातंत्र्याचा हा धागा पुढे नेत लेखकाने पुनश्च एकवार त्यावर चर्चा केलेली आहे. त्यासाठी पुन्हा स्वतंत्र प्रकरण लिहून चर्चा केलेली आढळते. पूर्वकर्मानुसार सारे काही प्राप्त होते असे म्हटले मी मनुष्य बांधला जातो; पण त्याने केलेली कर्मे, त्यावर आधारित त्याला मिळालेला जन्म किंवा आता या जन्मी तो करणार असलेली कृत्ये यांना किमान एक ठराविक आकार तरी प्राप्त होतो. जर ते सारे काही नाकारले तर मनुष्य कुठलेच चारित्र्य घेऊन जन्माला येत नाही, असा त्याचा अर्थ होता. इतके कोरेपण तर उत्क्रांती तत्त्वही मान्य करणार नाही. त्यासाठी आत्मस्वातंत्र्य स्वीकारले तर बंधन नाकारले असा त्याचा अर्थ होतो, कोणताही मनुष्य कुठल्याही हेतूशिवाय वा प्रेरणेशिवाय आचरण करू शकतो, असे साधारणपणे स्वीकारले आहे असे दिसते. मनुष्य स्वतःच्याच इच्छेने वा हेतूने कार्य बांधला गेलेला आहे, असेही म्हणता येऊ शकते; पण तसे म्हणजे तो अगदीच पूर्णपणे स्वतंत्र आहे, हे मान्य करण्यासारखेच आहे. यावर कांटच्या एका मताचा दाखला लेखक देतात. जी कृत्ये सदसद्विवेक बुद्धीला धरून असतात, तेवढ्यापुरता मनुष्य स्वतंत्र असतो. कारण वाईट गोष्टी करताना मनुष्य हा कुवासनांनी बांधलेला असतो, त्यामुळे त्याला सन्मार्ग दिसत असतानाही तो मार्ग त्याला स्वीकारताच येत नाही; पण असे म्हटले म्हणजे मनुष्य स्वभावतः नैतिक क्रिया करणारा आणि सद् तत्त्वांच्याच मार्गाने जाणारा आहे, असा त्याचा अर्थ होतो. लेखकाने आत्मस्वातंत्र्यास काही मर्यादा आहेत का, असा प्रश्न उपस्थित केला आहे. त्यासाठी आत्मस्वातंत्र्यावर कोणते आक्षेप आहेत, यांचा विचार मांडलेला आहे, त्यावरून त्यातील दोष लक्षात येऊ शकतील.

पहिला आक्षेप... हा आक्षेप उत्क्रांतीवादी लोकांकडून आणला जातो. हा आक्षेप आहे आनुवांशिक गुणांविषयी! आत्मस्वातंत्र्य जर असेल तर आईवडिलांकडून आलेल्या संस्कारांचा आणि भोवतालातील परिस्थितीचा परिणाम होतो, हे नाकारता येईल का? चांगल्या घराण्यातील मुलगा जर वाईट कृत्ये करू लागला तर त्याला आपण दोष देऊ शकतो; पण तेच वाईट घराण्यातील म्हणजे दरोडेखोराचा मुलगा वाईट वागल्यास आपल्याला फारसे वाईट वाटत नाही. कारण आपण हे आनुवांशिकतेने आले असे समजतो. अर्थात् त्यामुळे आत्मस्वातंत्र्यावर बाधा येते हे नक्की.

दुसरा आक्षेप हा मानसशास्त्र आणि शरीरशास्त्राच्या प्रगतीमुळे येतो. शास्त्राच्या विकासामुळे आणि आधुनिक संशोधनामुळे मेंदू, मज्जारज्जू आणि मनुष्याचे मन यांचा परस्पर संबंध काय आहे हे सहज समजले आहे. म्हणजे अमुक मनुष्याचा मेंदू कसा आहे हे समजून घेतल्यास तो पुढे काय करू शकेल हे आता सांगता येईल, असे मानसशास्त्रज्ञ म्हणत आहेत. प्रस्तुत पुस्तक शंभर वर्षांपूर्वीचे आहे. आता तर अशी स्थिती आहे, की कोणत्या रसायनाच्या आधिक्यामुळे माणूस उत्तेजित होतो वा नैराश्य येते हेही सांगता येते. वर्तनातील सुनिश्चितता जर अशी सांगता येणार असेल तर आत्मस्वातंत्र्य कसे स्वीकारावे, हा मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. शिवाय आधुनिक काळात शास्त्रात झालेल्या संशोधनानंतर त्याला बरीच पुष्टीही मिळालेली आहे. मनुष्याचा मेंदू आणि त्याचा स्वभाव हे एकमेकांशी अगदी बांधले गेलेले आहेत, असे जरी म्हणता येत नसले तरीही थोडे सत्य त्यामध्ये आहे हे नाकारता येतच नाही. मनुष्याचे बौद्धिक आणि नैतिक वर्तन जर अशा रीतीने त्याच्या मेंदूच्या रचनेवर अवलंबून असेल तर आत्मस्वातंत्र्यावर अंशतः का होईना, गदा येणारच की नाही?

तिसरा आक्षेप आहे तो असा, की आत्मस्वातंत्र्य मान्य केले तर सृष्टीतल्या कार्यकारणभावाचे काय करायचे? कारणाशिवाय कुठलेही कार्य होत नाही. असे जर असेल तर सृष्टीतील सर्व कर्मे ही नियत कारणाशिवाय घडू शकत नाही, असाच त्याचा अर्थ झाला. मग आत्मस्वातंत्र्याचा प्रश्न येतो कुठे? या सर्व विवेचनाचा विचार केला की हे लक्षात येते, की आत्मस्वातंत्र्याचा काही प्रमाणात संकोच होत असला तरीही अगदीच ते इतर बाबींवर अवलंबून आहे, असे म्हणता येणार नाही. भारतीय तत्त्वज्ञानामध्ये कर्मसिद्धांताची चर्चा मोठी आहे. त्यातही हा प्रश्न तसा हाताळला जातोच; पण किमान याक्षणी मी काय करायला हवे, याचा निर्णय घेण्याचा म्हणजे क्रियामाण कर्म करण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला आहेच हे सिद्ध होते. आता या क्षणी कुठल्याशा विवक्षित प्रसंगावर मी काय प्रतिक्रिया द्यावी आणि कृती करावी हे ठरण्यासाठी किमान माझे नैतिक ज्ञान तर परिपूर्णच हवे. किमान एवढ्यापुरते का होईना नीतिशास्त्राच्या अभ्यासाचे स्थान अगदी अढळ आहे हे नक्की! बाकी नीतिशास्त्राचा अभ्यास म्हटला, की किमान मनुष्याने नैतिक होऊनच कर्म करायचे असे ठरत आले, की व्यक्तिस्वातंत्र्याचा आणि आत्मस्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित होतोच, त्याला काही पर्याय नाही.

दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा यावर असाही मांडता येतो, की आत्मस्वातंत्र्य असतानाही म्हणजे व्यक्ती नियत कर्माच्या हिशेबाने बांधलेली नसताही ती व्यक्ती खरेच नैतिकता पाळून आचरण करेल का? इथे आचरण हाच शब्द महत्त्वाचा आहे, कारण केवळ कुठल्याही कृतीला आचरण म्हणता येणार नाही. हेतूमूलक कृती असेल तरच त्याला आचरण म्हणता येईल तर अशा वेळी व्यक्ती कृतीवर जोर देईल म्हणजे साधनशुचिता पाळेल की साध्यसाधनासाठी काय वाट्टेल ते करेल? व्यक्ती असो वा समाज यापैकी जे निवडेल त्यावरच अंतिमतः नैतिकतेचे मूल्य अवलंबून राहते.

अर्थात् नीतिशास्त्राची उपयुक्तता काय आहे, यावरही लेखकाने चर्चा केलेली आहेच. याविषयी खरे तर 'तत्त्वज्ञान आणि नीती' या दुसऱ्या खंडाच्या संपादकीयात नीतिशास्त्राचा परिचय करून घेताना आपण चर्चा केलेली आहे. त्यामुळे त्यावर पुन्हा काही चर्चा करावी असे नाही. काही महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत, तेवढे आपण बघूयात. नीतिशास्त्र हे मुख्यत्वेकरून तात्त्विक शास्त्र आहे, म्हणून त्यास रसायनशास्त्र वा वैद्यकशास्त्र यांच्याप्रमाणे उपयुक्तता नसली तरीही उच्च प्रकारच्या गणितशास्त्रास वा ज्योतिषशास्त्राचा जो उपयोग आहे, तोच नीतिशास्त्राचाही आहे, असे स्वतः लेखकाने नमूद केले आहे. त्याचसोबत ब्रॅडले यांनी नीतिशास्त्राची उपयुक्तता सर्वस्वी अमान्य केलेली आहे, हे सांगायला लेखक विसरलेले नाही. केवळ एखाद्या शास्त्राला कलेचे स्वरूप देणे हे सर्वस्वी अयोग्य असल्याचे सांगितले आहे. कारण अनेकदा नीतिशास्त्राचा अभ्यास नसलेली माणसेही तशी बिनचूकपणे नैतिक निर्णय घेऊ शकतात. अर्थात ज्याप्रमाणे तर्कशास्त्र शिकलेल्या माणसाला तर्कशुद्ध बोलता येईलच असे काही नसते, त्याप्रमाणे नीतिशास्त्र शिकल्याने लगेच नैतिकतेने निर्णय घेता येण्याची कला त्यास पूर्णपणे अवगत होऊ शकेल असे काहीही नसते; पण याचा अर्थ त्याला किंचितही उपयोग होणार नाही, असे मानणेही चुकीचे आहे; पण ब्रॅडले हे स्वतः चिद्वादी असल्याने त्यांनी जरा वेगळेच म्हणणे मांडले आहे. नैतिक निर्णय हे काही अनुमानाने किंवा वादविवाद करून घेतलेले अर्थात तर्काने घेतलेले नसतात, तर अंतःस्फूर्त असतात, त्यामुळे विनाकारण त्यांना शास्त्राच्या कसोट्यात गुंतवणे फारसे योग्य होणार नाहीच.

पण असे असले तरीही नीतितत्त्वे ही सार्वत्रिक आणि निरूपाधिक असावी असे जर ठरलेले असेल तर आणि व्यक्तीच्या अज्ञानामुळे वा अनुभव नसल्यामुळे जो संकोच होतो तो दूर होण्यास नीतिशास्त्र गरजेचे ठरते; पण असेही अनेकदा होते, की नैतिक निर्णय हे त्या त्या प्रसंगी घ्यावयाचे असतात. एका प्रसंगी घेतलेला निर्णय दुसऱ्या प्रसंगी तशाच नैतिकतेने घेता येईल असे काही नाही; पण असे असले तरी निर्णयाचे तारतम्य तर नक्कीच नीतिशास्त्र शिकवते, त्यामुळे या आक्षेपालाही फारसा काही अर्थ उरत नाही. विविध प्रसंगी नीतिशास्त्र कसे काम करू शकते, हाही कळीचा मुद्दा आहे; पण यापेक्षाही एक मुद्दा महत्त्वाचा आहे, तो लेखकाने हाताळला आहेच आणि नीतिशास्त्राच्या अभ्यासाची ती

फलश्रुती मानावी असेच आहे. ते म्हणजे नीतिशास्त्राचा अभ्यास केवळ करायचा नसून एक तर त्याचे जीवनामध्ये अवतरण कसे झाले पाहिजे याचा विचार केला गेला पाहिजे. कारण नीतिशास्त्राचा उपयोग समाजाला तर होतोच त्यापेक्षा जास्त व्यक्तीला होतो. केवळ धर्म जाणून मनुष्य धार्मिक होईलच असे काही नसते, तसेच नीती जाणून तो नैतिक होईल, असेही काही असू शकत नाही; पण किमान नीती आणि सद्गुणांचे अवतरण आयुष्यामध्ये होणे हेही काही कमी नाही. नीतिशास्त्र शिकण्यामागच्या एका प्रयोजनाविषयी लेखकाने स्मरण करून दिलेले आहे की, 'प्लेटो म्हणतो त्याप्रमाणे राजा हा तत्त्वज्ञानी असला पाहिजे.' ही गोष्ट समकाळात अत्यंत कठीण वाटत असली तरीही अशक्य मात्र नक्कीच नाही. तत्त्वज्ञ व्यक्ती सत्तेत असेल तर राज्यही नैतिक होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यासाठी किमान राजनीतिशास्त्रासोबतच नीतितत्त्वज्ञानाचाही अभ्यास होणे गरजेचे आहे.

अंतिमतः लेखकाने नीतिशास्त्राच्या ऐतिहासिक पद्धतीचा विचार केला आहे. आपण मागील खंडामध्ये उत्क्रांतिवादाच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे नीतिशास्त्राचा अभ्यास पाहिला. आता ऐतिहासिक पद्धतीने नीतिशास्त्राचा अभ्यास कसा केला आहे, याविषयी संक्षिप्त चिंतन मांडले आहे. खरे तर हाच या पुस्तकाचा हेतू असावा. सामान्यतः कुठलीही पद्धती ही अगदी पूर्णपणे निर्दोष आहे, असे म्हणता येत नाही. लेखकाने त्यासाठी आधीच स्पष्ट केले आहे, की ऐतिहासिक पद्धतीचा प्रारंभ उत्क्रांतिवादासोबतच सुरू झाला. स्नेन्सरनेच उत्क्रांतिवाद सिद्ध करण्यासाठी ज्या ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब केला ती कितपत योग्य आहे वा नाही याचा सारासार विचार मांडला आहे.

ऐतिहासिक पद्धती आणि त्याचसोबत स्पेन्सर याने उत्क्रांतितत्त्वासोबतच नीतिशास्त्राचा विचार समांतर कसा मांडला हे पाहिले. लेखकाने त्यावर चांगली चर्चा केलेली आहे. ऐतिहासिक पद्धतीने अभ्यास करण्याचा एक फायदा मात्र सांगितला आहे तो म्हणजे काळासोबत सारे काही उत्क्रांत होत असतानाच नीतितत्त्वांच्या बाबतीतही काही बदल होत गेले, याचा अभ्यास करता येतो. गुलामगिरी ही नैतिक मानली जात होती किंवा देवतेपुढे मनुष्याचा बळी देणे सामान्य बाब होती. अशा नैतिक रूढी आता मात्र अनैतिक ठरल्या आहेत. प्लेटोच्या रिपब्लिकमध्ये स्त्रिया या सामाईक मालमत्ता ठरल्या आहेत किंवा बालविवाह वा सतीसारख्या अनेक प्रथा आता अनैतिक ठरल्या आहेत. त्यामुळे बदल होतच आहेत; पण त्याचा अभ्यास होणे तितकेच गरजेचे आहे. लेखकाने यावर चांगली चर्चा मांडली आहे, ती मुळातूनच वाचणे गरजेचे आहे.

नीतिशास्त्र आणि इतर शास्त्रे यांचा संबंध आणि रेव्हरंड मॅकेन्झी व भारतीय नीतिशास्त्र यांच्यावरही लेखक मत मांडायला विसरले नाहीत, हे तितकेच खरे! एकंदर भारतीय नीतिशास्त्र आणि पाश्चात्त्यांचा अभ्यास यावर एक प्रकाश टाकला आहे. काही मूलभूत बाबी नोंद कराव्या अशाच आहेत.

काही लेखनवैशिष्ट्ये :

- पाश्चात्त्य नीतिशास्त्राचा प्रदीर्घ अभ्यास करून अतिशय विचारपूर्वक ग्रंथ लिहिल्याचे जाणवते. लेखकाची चिंतनशीलता त्यातून व्यक्त होते. भारतीय नीतिशास्त्राचा उल्लेख ग्रंथामध्ये तौलनिकदृष्ट्या आलेला असला तरीही पुरेसा आहे. एकंदर तुलनात्मक अभ्यासाचे दर्शन प्रस्तुत ग्रंथातून होत जाते.
- हेस्टिंग्ज रॅशडेल, एफ.एच. ब्रॅडले, जेम्स मार्टिन, जे. एस. मॅकेन्झी, ई. डब्ल्यू हॉपकिन्स वगैरे पाश्चात्त्य नीतितत्त्ववेत्त्यांचा अभ्यास असूनही मराठीमध्ये लेखन जास्तीत जास्त सुलभतेने आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. भाषा सहज असली आणि क्लिष्टता नसली तरीही आशयात कुठलीही तडजोड केल्याचे जाणवत नाही. तसेच सर्व विचारवंतांच्या लेखनाचे गुणदोषासह तटस्थ विवेचन लेखनात आढळते. कुठेही भारावलेपण वा असत्यालाप आढळत नाही.
- तत्त्वचिंतन हे केवळ व्यक्तिगत स्तरावर नसते तर त्याचे उपयोजन व्यक्तिगत तसेच सामाजिक स्तरावरही व्हायलाच हवे या अपेक्षेने लिहिलेला हा ग्रंथ आहे. त्यामुळे व्यक्तीच्या नैतिक निर्णयापासून लेखनाचा प्रारंभ केलेला आहे. सदसद्विवेकाशिवाय कुठलाही निर्णय घेणे योग्य नव्हे. म्हणून सदसद्विवेकबुद्धीची व्याख्या करून, तिचे स्वरूप निश्चित केले आहे. मनुष्याला नैतिक स्वातंत्र्य किती आहे यावर चर्चा करून नैतिक प्रामाण्यांचा विचार केला आहे.
- व्यक्तीने व्यवसायाची निवड कशी करावी, यावर सहसा नैतिक दृष्टीने विचार केला जात नाही; पण त्यावरही यथाशक्य विचार मांडलेले आहेत.
- सामाजिक स्तरावर आवश्यक असलेली समता, तिच्या अस्तित्वासाठी गरजेची असलेली न्याय करणारी नीतितत्त्वे, शासन व क्षमा यांचाही विचार मांडला आहे. थोडक्यात, व्यक्तिगत नैतिकतेकडून सामाजिक नैतिकतेकडे प्रवास केला आहे. त्याद्वारे समाजामध्ये समानता कशी आणता येईल, याचा विचार केला आहे.
- समाज आणि राष्ट्रही ज्या संस्थांशी संबंध ठेवून असतात त्याच्याशी नीतिशास्त्राची तुलना केली आहे. नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान, नीती व धर्म, नीती व आत्मस्वातंत्र्य वगैरे विषय हाताळून चिंतनाला एक वेगळा आयाम दिला आहे.
- ऐतिहासिक पद्धतीवर चर्चा केली आहे. तसेच इतर विचारवंतांच्या मूलभूत चिंतनाचा विचार केला आहे.
- मनुष्याच्या आयुष्यामध्ये केलेल्या नैतिक चिंतनाचे एकंदर त्याच्या जीवनावर काय परिणाम होऊ शकतात, हे सुचवण्याचा प्रयत्न केला आहे. मुख्य म्हणजे यात कुठेही

भौतिक जीवनाकडे पाठ फिरवून जगण्याची पराङ्मुखता नाही. तर आयुष्यामध्ये नैतिक संपन्नता आणण्याचा एक प्रयत्न नक्कीच आहे.

- नैतिकपूर्णता प्राप्त झालेल्या मनुष्याने सत्ताधीश व्हायला हरकत नाही. कारण त्याच्यामुळे समाज, ल. प्लेटोच्या तत्त्वज्ञ राजाची संकल्पना मान्य केली आहे.
- पाश्चात्त्य आणि पौर्वात्य अशा दोन्ही नीतिशास्त्रीय संकल्पनांचा अभ्यास लेखकाने अतिशय समर्पक शब्दांमध्ये आणि सुलभतेने मांडला आहे, केवळ हेच लेखनाचे कौशल्य नसून अनेक पाश्चात्त्य संकल्पना मांडताना त्याला भारतीय विचारांच्या आणि शब्दरचनेच्या प्रभावळीत इतके सहज मांडले आहे, की मुळात हे विचार पाश्चात्त्यांचे अनुवादित आहे असे वाटणेही शक्य नाही. आचरणाच्या परीक्षणाचे अनेक मार्ग सांगितले आहेत. नैतिक व्यक्तीच्या आचरणाचे समायोजन कुटुंबात आणि समाजात कसे होते याचे विश्लेषण केले आहे.

एकंदर नीतिशास्त्राला केवळ व्यक्तिगत स्तरावर न ठेवता समाज आणि राष्ट्रस्तरावर नेऊन एक आकार देण्याचा प्रयत्न केला आहे, कारण केवळ नीतिशास्त्रीय संकल्पना सांगत बसणे हा लेखनामागचा हेतू नसून साधारणपणे राष्ट्र उभारणीसाठी तत्त्वज्ञाने पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. लेखनामागचे हेच अंतिम ध्येय असल्याचे श्रीगुरुदेव रानडे यांनीही प्रस्तावनेत म्हटले आहे.

उपसंहार

'नीतितत्त्वज्ञान : राजकीय आणि सामाजिक, खंड तिसरा' यामध्ये समाविष्ट असलेल्या तीन ग्रंथांचा आपण समग्र परिचय करून घेतला आहे. पाश्चात्त्य तत्त्वजगतातील वास्तववादी राजनीती विचारांची आणखी करणारा निकोलो मॅकियाव्हेली याच्या 'प्रिंस' या पुस्तकाचा रियासतकार सरदेसाई यांनी केलेला अनुवाद 'राजधर्म', एफ.सी. मॉंटेग्यू यांच्या ग्रंथावर आधारित व श्री. शिवराम गोविंद फाळके लिखित 'इंग्लंडातील राज्यकारभार व्यवस्थेच्या इतिहासाची मूलतत्त्वे' आणि श्री. विनायक सदाशिव गोगटे लिखित 'नीतिशास्त्रविचार' या ग्रंथांचा आढावा आपण घेतला आहे. पहिले दोन्ही ग्रंथ म्हणजे गेल्या दीड हजार वर्षांचा पाश्चात्त्य राजकीय आणि सामाजिक नीतितत्त्वज्ञानाचा घेतलेला एक आढावाच आहे, तर तिसरा ग्रंथ हा पाश्चात्त्य विचारवंतांच्या परिप्रेक्ष्यातून भारतीय राजकीय आणि सामाजिक नीतिवास्तवाकडे बघणारा आहे.

राजधर्म या ग्रंथापासून जरी आपण या खंडाचा प्रारंभ केलेला असला तरीही प्रस्तुत ग्रंथ हा पंधराव्या शतकामध्ये जन्मलेल्या निकोलो मॅकियाव्हेली याचा मूळ ग्रंथ प्रिन्स हा आहे. मूळ इटलीमध्ये आणि त्यानंतर इंग्रजीमध्ये आलेल्या या ग्रंथाचा अनुवाद आणि प्रकाशन एक मोठे औचित्य साधून करण्यात आले आहे. मुळात बडोद्याच्या महाराजा सयाजीराव गायकवाडांकडे असलेल्या रियासतकार सरदेसायांसारख्या गृहस्थाने याचा अनुवाद केला

यातच सारे काही आले. तेव्हाचा कालखंड, महाराजा सयाजीरावांच्या प्रशासन पद्धतीवर असलेला पाश्चात्त्य शिस्तीचा प्रभाव आणि पौर्वात्य संस्कृतीविषयी असलेली कणव यांचा विचार करूनच ही सारी पुस्तके निवडलेली असावीत हे अगदी स्पष्ट आहे. रियासतकारांनी हे पुस्तक मराठीमध्ये आणून तेव्हाच्या आणि आताच्या अभ्यासकांवर एक उपकार केले आहे, हे खरे! तेव्हाच्या काही अभ्यासकांना वा चिकित्सकांना रियासतकारांचा अनुवाद आवडला नसण्याची शक्यताही आहे किंवा मॅकियाव्हेलीचा प्रिंस मराठीमध्ये अनुवादित करण्यामागचा हेतू काय असावा, हे कदाचित अनेकांच्या लक्षातही आले नसावे; पण यात अप्रस्तुत असे काहीही नाही. कारण प्रशासकीय आणि राजनैतिक जीवनप्रवास केलेल्या पाश्चात्त्य विचारवंतांपैकी एकाचा हा ग्रंथ तेव्हा उपलब्ध झाला असेल आणि तो तेव्हाच्या राजनैतिक संबंधात एक आधार ग्रंथ म्हणून वापरला जावा हाही एक हेतू असू शकतो. यावर खरे तर प्रारंभीच चर्चा केलेली असल्याने ती करणे आता गरजेचे नाही. शिवाय रियासतकारांनी हा अनुवाद कोणत्या शब्दांत व कसा केला किंवा त्याच्या प्रस्तावनेमध्ये इतर भारतीय विचारवंतांचा उल्लेख का केला नाही, यापेक्षाही महत्त्वाचा मुद्दा हा आहे, की एक अमूल्य असा राजकीय विचार व्यक्त करणारा ग्रंथ तेव्हा मराठीमध्ये आणला गेला. हे काम त्यानंतरही कुणी केल्याचा साधा उल्लेखही सापडत नाही, हेही तितकेच खरे! केवळ यासाठीच रियासतकारांच्या राजधर्माचे मूल्य आहे, हे नक्की!

मॅकियाव्हेलीच्या प्रिंसमधील सव्वीसाव्या प्रकरणामध्ये त्याने केलेल्या आवाहनाचा वा व्यक्त केलेल्या इच्छेचा अनुवाद पाहिला, की तीच अपेक्षा रियासतकार एतद्देशीय राजांकडून वा साक्षात् सयाजीरावांकडून करीत होते की काय, अशी शंका येते. सारा उपदेश केल्यानंतर काय आणि कुठे राजा कमी पडतो हे सांगून त्यावर सुधारणा होईल, अशी अपेक्षा करून मॅकियाव्हेलीने म्हटले आहे की, '.. ही संधी फुकट न घालविता इटलीचे दैव तुम्ही उदयास आणावे व जो कुणी असा मनुष्य या देशाची सुटका करील, त्याजबद्दल सर्व देशभर लोकांस किती आनंद होईल, ते किती उतावीळ होतील, ते कसे प्रामाणिक राहतील व ते अशा पुरुषाशी किती ममतेने वागतील, याची कल्पनाच करणे अशक्य आहे. अशा पुरुषास आत येऊ देणार नाहीत, त्याची आज्ञा पाळणार नाहीत, त्याचा हेवा करून त्यास त्रास देतील, खरे इटलियन असून त्यास साहाय्य करणार नाहीत, असे लोकच नाहीत. हल्लीची रानटी स्थिती ज्यास भयंकर वाटत नाही, असा एकही मनुष्य नाही. न्यायाच्या मार्गाने हे केवळ आपले कर्तव्यच आहे असे मानून हे कृत्य आपणच हाती घ्यावे, अशी आमची आपल्यास सविनय विनंती आहे...' [३१] हे सारे वाचल्यानंतरही रियासतकारांनी हे पुस्तक मराठीमध्ये का आणले असावे, हा प्रश्न उपस्थित होऊ नये.

मागच्या दीड शतकामध्ये भारतामध्ये झालेल्या एकंदार राजकीय उलथापालथीकडे नीट पाहिल्यास एक गोष्ट लक्षात येते, की ब्रिटिशांविरुद्धचा लढा अगदी निर्णायकतेकडे

झुकत चालला होता. केवळ सामान्य प्रजाजनच त्यामध्ये होते असे नाही, अनेक राजे आणि राज्येही यामध्ये सामील झालेली होती. कारण शेवटी कुठेतरी समोर एखादा नायक असेल तरच सामान्य प्रजाजन त्याच्या मागे जाऊ शकत, निर्नायकीची वेळ प्रजाजनावर येऊ नये म्हणून समोरचे नेतृत्व हे खंबीर असणे अत्यंत गरजेचे असते. अशा वेळी जी व्यक्ती नेता म्हणून समोर असेल आणि ती जर विचारवंत, देशाचे भले चिंतणारी आणि सांस्कृतिक वारसा असलेली असेल तर प्रश्नच नाही. अशा वेळी त्याला राजकारणाचे विविध पैलू, येणारे प्रसंग, त्याला तोंड कसे द्यावे याची उदाहरणे वगैरे ऐतिहासिक घटनांच्या द्वारे सप्रमाण माहिती असतील तर नक्कीच नेतृत्व फुलते.

बहुधा रियासतकारांच्या डोळ्यांसमोर सयाजीरावांची प्रतिमा आधुनिक भारतासाठी योग्य असा नायक म्हणून असावी.

इंग्लंडातील राज्यकारभार व्यवस्थेच्या इतिहासाची मूलतत्त्वे हा एफ.सी. मॉंटेग्यू यांचा ग्रंथ म्हणजे जवळपास पाचव्या शतकापासूनच्या युरोपाच्या इतिहासातील पडघम होय. मॉंटेग्यू यांनीच इंग्लंडचा इतिहास हा ग्रंथही अगदी स्वतंत्रपणे लिहिलेला आहेच. या ग्रंथाच्या निमित्ताने पाचव्या शतकापासून इंग्लंडमध्ये काय काय घडले याचे साद्यंत वर्णन तर वाचावयास मिळतेच; पण त्याहीपेक्षा जास्त म्हणजे इंग्लंडसारख्या लहानशा बेटावर झालेल्या सामाजिक, राजकीय तसेच धार्मिक बदलाचे काही अंशही समजून घेण्याची संधी मिळते. एकेकाळी अतिशय मागास समजल्या जाणाऱ्या या बेटाने भविष्यामध्ये महासत्ता बनण्यासाठी स्वतःला किती दिव्यातून तपासून पाहिले होते, याची खात्री पटते. प्रस्तुत पुस्तक हे एकोणिसाव्या शतकाच्या अंतिम दशक दीड दशकामध्ये तयार झालेले असल्याने आणि भारताचा दीडशे वर्षांचा ब्रिटिशांविरुद्धच्या लढ्याचा तो पूर्वार्ध असल्याने त्याला विशेष महत्त्व आहे. परिवर्तनाच्या दीड हजार वर्षांच्या काळखंडातच आपल्या देशातून बाहेर पडलेल्या व्यापारी म्हणून आलेल्या ब्रिटिशांनी भारतासारखा महाकाय द्वीपखंड कसा काबीज केला असेल, याचा विचार करणे आवश्यक आहे. भारतासारख्या देशाला इसवी सन ७१२ ला महंमद इब्न कासिम याच्या आक्रमणानंतर पराक्रमणाचे ग्रहणच लागले. त्यानंतर सतत पठाण, मोगल वगैरे मुस्लिम शासकांच्या स्वाऱ्या भारतावर होतच राहिल्या. डच, पोतुर्गिजांनीही येथे येऊन बस्तान बसवले होते आणि अशा स्थितीतच मराठी राज्याच्या उत्तरार्धामध्ये इंग्रजांचा या सत्ताकारणामध्ये प्रवेश झाला.

व्यापार करता करताच इंग्रजांनी आपले बस्तान भारतीय उपखंडामध्ये कसे बसेल याकडे बहुधा लक्ष दिले असावे. कारण व्यापार वाढवणे, त्यासाठी स्थानिक संस्थानांशी संधान सांधणे, त्यांना भेटी देऊन मित्रता वाढवणे या सगळ्या नैतिक खेळी केल्यानंतर ब्रिटिशांनी सामाजिक आणि राजकीय नीतीही अगदी चपखलपणे वापरल्या. एतद्देशीय लोकांपैकी शक्य तेवढ्यांना फोडून आपल्याकडे समानतेची वागणूक आहे, हे कसोशीने दाखवण्याचा

प्रयत्न केला. पगारी चाकरी दिली. आधी व्यापाराच्या वखारीच्या सुरक्षेसाठी काही सैन्य ठेवले. मग स्थानिक राजकारणात त्याचा उपयोग करून शिरकाव केला. दोघांच्या संघर्षांमध्ये मध्यस्थी करणे, दोघांवरही आपल्या अटी लादणे, काही सोयी आणि सवलती मिळवणे हेही केले. सोयींचा उपयोग करून घेत व्यापार वाढवला आणि सवलतींचा उपयोग करून घेत सैन्यात वाढ केली. मग संस्थानांच्या आणि प्रजेच्या संघर्षांमध्ये... इथल्या स्थानिक संघर्षांमध्ये इथलेच सैनिक असलेले सैन्य वापरून व्यवस्थित राजकारणात घुसखोरी केली. स्वतः बलाढ्य होत संस्थानांना बलहीन करीत आणि आपल्यावर अवलंबून ठेवत अखेरीस एकेक संस्थाने गिळत देश हाती घेतला. एकंदर भारतीय उपखंडामध्ये हे चालू असताना इंग्रजांची संख्या पाहिली तर ती एकंदर भारतीयांच्या संख्येच्या दृष्टीने मूठभरच असावी; पण तरीही त्यांना यश मिळत गेले, कारण त्याआधी साक्षात् मायदेशातच त्यांनी विविध सत्ताकारणाचे पट बसताना आणि उधळताना पाहिले होते. तोडा, फोडा आणि राज्य करा, समूह फोडा आणि धर्म लादा, सवलती द्या आणि सवयी लावा, सवयी लावा आणि गुलाम बनवा, गुलाम बनवा आणि सुखाने राज्य करा या नीतींचा उपयोग भारतामध्ये अगदी सुयोग्य पद्धतीने केला तर हा देश ताब्यात घेण्यास फार वेळ लागणार नाही, हे त्यांनी हेरले होते, कारण मुळात ब्रिटनच्या भूमीवर हे सारे होऊन गेले होते. एका मन्वंतराचा काळ ब्रिटनला शहाणपण देऊन गेला होता. ते शहाणपण केवळ पुस्तकी नव्हते तर त्याचे उपयोजन अगदी सहज करण्यासाठी त्यांना नवनवे प्रांतही उपलब्ध होत होते. इंग्लंडच्या इतिहासामध्ये डोकावून पाहिले की याची खात्री पटते. एका लहानशा बेटावर वसतीला असलेले ज्यूट, अँगल आणि सॅक्सन लोक आणि मूळ रहिवासी असलेल्या ब्रिटन बेटावरच्या नागरिकांच्या दीडशे वर्षांच्या संघर्षाला या इतिहासाचे उगमस्थान मानता येईल. मुळात तेथे असलेल्या सत्तांतरणाचे अनेक दाखलेही आहेत. काही वर्षे जर्मनांचा हस्तक्षेप तर कधी फ्रेंचाचा तर कधी रोमन राजाच्या अखंड चालू असलेल्या राजवटीचा हस्तक्षेप पाहायला मिळतो. रोमनांनी केवळ प्रशासकीय यंत्रणा नसल्याने सोडून दिलेले हे बेट आयते स्वतंत्र होते आणि सुरू होतो सत्तांतराच्या नाट्यासोबतच विकासाचा प्रवास! हा विकास म्हणजे केवळ आर्थिक किंवा सामाजिक किंवा बौद्धिक नव्हता तर अनेकांगी होता. इथे मूळ नैतिक विचारधारा विरुद्ध आक्रमकांची विचारधारा, मूळ धर्माची नैतिकता विरुद्ध ख्रिश्चन धर्मांतरणाची नैतिकता, त्यातून देश एकसंध होणे, राजसत्तेला किंचित धर्माधिष्ठित आधारस्तंभ मिळणे, राजसत्ता आणि धर्मसत्ता यांच्यातील काही संघर्ष समोर येणे, त्यातून होणाऱ्या हत्या आणि इतर सर्व गोष्टी या इंग्लंडच्या अंगवळणी पडत गेल्या. त्यासोबतच विज्ञान, तंत्रज्ञान, तत्त्वज्ञान, पर्यटन, व्यापार वगैरे अनेक आयामांनी समृद्ध होत असलेले इंग्रज अर्थातच जगावर राज्य करण्याच्या मिषाने बाहेर पडले ते या अनुभवांच्या जोरावरच! मॉंटेग्यू यांच्या या पुस्तकाचे

महत्त्व आहे ते इथेच आहे.

श्री. विनायक सदाशिव गोगटे लिखित 'नीतिशास्त्रविचार' या ग्रंथाकडे बघताना आपण या दोन्ही ग्रंथातील सामाजिक आणि राजकीय विचारांचा सारांश म्हणून बघू शकतो. कारण त्यामध्ये केवळ व्यक्तिगत नैतिकतेचे प्रश्न उपस्थित केलेले नाही, तर सामाजिक नैतिकता आणि राजकीय नैतिकता कशी असावी याचाही विचार मांडला आहे. कारण नीतितत्त्वज्ञान हे सामाजिक आणि राजकीय स्तरावर आणून काय करायचे आहे याचे सुनिश्चित असे उत्तर या ग्रंथामध्ये आहे. केवळ व्यक्तिगत स्तरावर नैतिक होणे इतकाच हेतू त्यामध्ये नाही तर त्याचे उपयोजन सामाजिक स्तरावर होण्यासाठी तत्त्वज्ञ माणसाने राजा होणे गरजेचे आहे, हे प्लेटोच्या सूत्रांच्या आधारे त्यांनी सचवलेले आहे. इथे केवळ सत्तेसाठी सत्ता हा हेत नाही तर समाजधारणेसाठीचा हा सत्ताप्रपंच आहे हे आपल्या लक्षात येते आणि केवळ समाजधारणेच्या नावाखाली सत्ता काबीज करून भागणार नाही तर त्याप्रमाणे राजाने वा सत्ताधिशाने जगणेही आवश्यकच आहे. मॅकियाव्हेलीचा राजधर्म जाणून घेताना हे आपण पाहिले, तौलनिक विचार करताना आपण कौटिल्याच्या अर्थशास्त्राचा आणि रामचंद्रपंत अमात्यांच्या आज्ञापत्राचा उपयोग केला. त्यामागचे कारण हेच आहे, की प्रशासनावर असलेला सत्ताधीश हा सत्तेने उन्मत्त होऊ नये, तर त्यावरही अंकुश असलाच पाहिजे. हा अंकुश केवळ धर्माच्या रूपाने असावा की नीतीच्या रूपाने असावा हा मूलभूत भेद आहे. त्यातूनच धर्मसत्ताक राज्य आणि प्रजातंत्रासारखे विविधांगी सत्ताप्रयोग झालेले आहेत आणि अजूनही होतात. धर्म जेव्हा सर्वंकष असतो तेव्हाच धर्मसत्ताक राज्यपद्धती विकासाला मदत करते, अन्यथा राज्याची शकले उडतात, कारण आक्रमक धर्म इतरांना जगू देत नाहीत. प्रजातंत्रामध्येही धर्माचे स्वातंत्र्य असतेच. कुणी कुणाचे स्वातंत्र्य हिरावून घेतले तर संघर्ष होणारच. इथे प्रशासनावर असलेल्यांच्या नैतिकतेचा प्रश्न आहे, की ते सर्वांना समान हक्क वा न्याय कसा देऊ शकतात, शासन कसे होते. ती तारेवरची कसरत जर जमली नाही तर राज्य अस्थिर व्हायला वेळ लागत नाही. या साऱ्या गोष्टीतून जो राष्ट्राला सांभाळतो आणि नैतिकतेच्या आधारावर पुढे नेतो, तोच स्वतःची आणि राष्ट्राची नैतिक प्रगती करू शकेल.

पण नैतिक प्रगती कशाला म्हणावे आणि त्याचे निकष कोणते?

प्रगती म्हणजे काही केवळ बदल नव्हेत. बदलाला स्थित्यंतर असे म्हणता येईल. केवळ गतिमान होणे म्हणजे प्रगतीचे लक्षण नक्कीच नाही. गती या शब्दाला प्र हा उपसर्ग लागतो

तेव्हाच प्रगती असा शब्द बनतो आणि प्र या उपसर्गाचा अर्थ पुढे जाणे, उन्नत होणे वा करणे असा आहे. म्हणून प्रगती म्हणजे केवळ कुठल्याही दिशेला निर्माण झालेली विकासाची गती नव्हे, तर योग्य दिशेने पुढे जाणे होय. ध्येयापुढे जाणे, ध्येयाभिमुख होणे म्हणजे प्रगती होणे असा एक सामान्यपणे अर्थ लावला जाऊ शकतो. अगदीच उत्क्रांतिवाद्यांच्या भाषेत

बोलायचे झाले तर 'एकविधतेतून जाणे; पण ते जात असताना अनेकविध अंगांमधील परस्परावलंबित्व अधिकाधिक दृढ करीत नेणे याला प्रगती म्हणता येईल.'[३२] प्रगती म्हणजे केवळ जीवनाचा एकाच बाजूने होणारा विकास नव्हे, तर विविधांगांनीही विकास होणे गरजेचे असते. विकास होत असताना केवळ एकाच बाजूचा होत नसतो. तर त्यातन विविधांगांचा परस्पर संबंध आणि एकमेकांवर केवळ एकाच बाजूचा होत नसतो, तर त्यातून विवि अवलंबून असणे हे वाढणे हेही गरजेचे असते. या विविधांगांच्या विकासाने एकता नष्ट होत नसते तर एकताही वृद्धिंगत होत असते. थोडक्यात, विविधतेतून एकतेचे संगोपन होणे आणि संवर्धन होणे, याला प्रगती म्हणता येईल. आता असाच निकष नैतिकतेला लावला जावा.

'समाज हा एक संघात आहे आणि व्यक्ती ही त्या संघातातील एक घटक आहे. अशा संघातरूप समाजातील घटकांमध्ये वसत असलेल्या परस्परावलंबित्वाला बाधा न येऊ देता व्यक्ती स्वतःचे नैतिक ध्येय जे आत्मकल्याण किंवा नैतिक पूर्णता सिद्ध करण्याचा प्रयत्न करते. अशा प्रयत्नांद्वारा जे संपादले जाते त्याला नैतिक प्रगती (moral progres) असे म्हणतात.' आधनिक नीतिशास्त्रामध्ये नैतिक प्रगतीची सर्वसाधारणपणे अशी व्याख्या करण्यात आलेली आहे. महत्त्वाचे म्हणजे नैतिकपूर्णता ही जितकी वैयक्तिक बाब मानण्यात आलेली आहे तितकीच ती सामाजिकही मानण्यात आलेली आहे. कुणीही व्यक्ती समाजातील घटकांकडे दुर्लक्ष करून आपली नैतिक पूर्णता साधू शकत नाही. कारण व्यक्ती आणि उरलेला समाज यांच्यामध्ये परस्परावलंबित्व असते. त्यामुळे तुमची सामाजिक जबाबदारी ओळखून तुम्ही वैयक्तिक नैतिक कल्याण साधण्याचा प्रयत्न करू शकता. तिची प्रगती ही नैतिक प्रगती होय.

आधुनिक नीतिशास्त्रामध्ये नैतिक प्रगतीची काही लक्षणे सांगण्यात आलेली आहेत. ती अत्यंत महत्त्वाची अशी आहेत; पण त्यासोबतच हे सारे केवळ लक्षणांमध्ये न मांडता ती अंगीकारता कशी येतील, याकडे भारतीय धर्म आणि आचरणसंहितेने कसे लक्ष पुरवले आहे, हे आपल्या सहज लक्षात येईल. आधुनिक नीतिशास्त्राने नैतिक प्रगतीची तीन महत्त्वाची लक्षणे अशी सांगितलेली आहेत.

- बहिर्मुख वृत्तीचे हळूहळू अंतर्मुख वृत्तीत रूपांतर होणे हे नैतिक प्रगतीचे पहिले लक्षण आहे.
- शक्तीरूप सद्गुणांपेक्षा बुद्धिरूप सद्गुण अधिक उच्च वाटणे हे प्रगतीचे दुसरे लक्षण आहे.
- सद्गुणांचे क्षेत्र व्यापक बनणे हे नैतिक प्रगतीचे तिसरे लक्षण आहे.

यातला पहिला मुद्दा हा अतिशय महत्त्वाचा असा आहे. आयुष्यभर कुठलीही व्यक्ती ही कुठल्याही बाह्य सत्तेद्वारा नियंत्रित राहू शकतच नाही. केव्हा तरी त्याच्या मनामध्ये

कर्मस्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित होतोच. मला कराव्याशा वाटणाऱ्या कुठल्याही कर्मावर माझे नियंत्रण नसेल तर त्याच्या बऱ्या किंवा वाईट अशा कुठल्याही फळाबद्दल मला का दोषी धरण्यात येते? हा प्रश्न सहजच कुणासमोरही उपस्थित होतो. त्यामुळे मी माझ्या कर्माच्या बाबतीत स्वतंत्रपणे संकल्प करीन आणि माझ्या कर्माचे फळ... जे असेल ते मिळवीन, स्वनियंत्रित कर्म करणे, हे मी माझे कर्तव्य समजतो, अशी विचारधारा अर्थातच मनामध्ये निर्माण होते. या विचारांमुळे माणसाचे विचार बदलत जाऊन तो कुठल्याही कृतीपेक्षा त्या कृतीमागील हेतूला जास्त महत्त्व देऊ लागतो. असा हेतू प्रत्येक कृतीमागे दडलेला असावा, हीच नीतिशास्त्राची इच्छा असते.

नैतिक प्रगती ही कशासाठी हवी असते हा प्रश्न महत्त्वाचा आहे आणि माझ्या मते आपण त्याचे उत्तर आधीच पाहिलेले आहे. मागील दुसऱ्या खंडाच्या संपादकीयात आपण मानवी आत्म्याच्या अभिव्यक्तीविषयी चर्चा केलेली आहेच.

मानवी जीवनाचा एकंदर इतिहास पाहिला तर एक गोष्ट लक्षात येते, की मानवी जीवन जसे जसे विकसित होत गेले तसे तसे त्या त्या प्रत्येक अवस्थेमध्ये मानवाने आपल्या आचारासाठी काहीतरी उदात्त ध्येय समोर ठेवलेले आहे. मानवाच्या आचारासाठी सर्वंकष मार्गदर्शक व निर्णायक असे ध्येय हवे, असे मानवाने ठरवल्याचे एकंदर आपल्या लक्षात येते. ते ध्येय कोणते असावे, कसे असावे आणि त्याची प्राप्ती कशी करावी हे साधारणपणे मानवाने वेळोवेळी चर्चिले आहे. असे ध्येयविषयक गृहीत कल्पनेचे मूळ हे मानवी स्वभावातच आहे की काय असा प्रश्न पडतो. कारण मानवी आत्म्याला स्वतःला कोणत्या तरी ध्येयाने वा आदर्शाने वा उद्दिष्टाने प्रकट होण्याची इच्छाच असते. स्वतः निवडलेल्या ध्येयाप्रत पोहोचून व्यक्त होण्यात मानव स्वतःच्या जीवनाची इतिश्री मानतो.

पाश्चात्त्य विचारवंतांनी आपल्या नीतिशास्त्रामध्ये विभिन्न स्थळकाळसापेक्ष विभिन्न ध्येये वा आदर्श सूचित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. कधी सुखवाद्यांनी उत्तम नैतिक जीवनासाठी कधी व्यक्तिगत सुख तर कधी सर्वांचे सुख हेच ध्येय ठेवल्याचे आढळते, तर कधी कुणा बुद्धिवाद्याने काही आध्यात्मिक तत्त्वांचा विकास हेच गृहीत धरलेले आहे. कधी यांचा समन्वय करून सर्वकल्याणवाद उभा केला आहे. त्या अनुषंगाने मांडलेली चिंतने ही एका वेगळ्या टप्प्यांवर जाऊन पोहोचली आहेत. त्या तुलनेमध्ये भारतीय तत्त्वचिंतकांनी नैतिक जीवनाचा आदर्श म्हणून एक अशी स्थिती वा अवस्था गृहीत धरली आहे जेथे जन्ममरणाचाही अंत होतो, दुःख समूळ विनाशाला जाते, मानवी आत्मा हा जन्म, मृत्यू, जरा, व्याधी वगैरे भौतिकतेच्या दुःखातून कायमचा सुटतो. यालाच मोक्ष वा मुक्तीची अवस्था मानले जाते. अंतिम सत्ता म्हणजे काय हे जसे सांगता येत नाही, तसेच मोक्षवर्णनही करता येत नाही.'

मनुष्य... मग तो भारतीय असो वा पाश्चात्त्य देशातील असो, त्याच्यासमोर अगदी

कळत वा नकळतपणे का होईना असे ध्येय हे असतेच. अगदी तत्त्वज्ञ म्हटला तरीही केवळ तत्त्वज्ञानाच्या कोरड्या शब्दांनी तो आपले उद्दिष्ट गाठू शकेल असे काही नसते, मग ते तत्त्वज्ञान भारतीय असो वा पाश्चात्त्य! अगदी मोक्ष असे ध्येय जरी ठेवले तरीही ते गाठण्यासाठी केवळ धर्माचे तत्त्वज्ञान वा धर्माचरण पुरेसे नाही. त्यासाठी आधी स्वतःला आचारशील बनवावे लागते. मगच विचारपूर्वक आपल्या साधनमार्गाची निवड करून ध्येयाच्या दिशेने साधना करावी लागते तेव्हाच उद्दिष्ट साध्य होऊ शकते, हे जगभरातील विचारवंतांनी मान्य केलेले आहेच. 'आधी राखावा आचार । मग पाहावा विचार । आचारविचारें पैलपार । पाविजेतो ॥'[३३] ही महाराष्ट्रीय संतांचीही वैचारिक पार्श्वभूमी आहेच. ध्येयाच्या दिशेने पाहीले पाऊल टाकण्यापूर्वीच केलेला जाते

विचार म्हणजे नीती... यालाच आपण आचारधर्म म्हणून ओळखतो. साधनामार्गावर चालताना नैतिक शुचिता पाळली तरच यश मिळू शकते, म्हणजे नीती आणि तत्त्वज्ञान यांचा समन्वय झाला तरच अशी शक्यता आहे.

केवळ नीतिशास्त्राचा अभ्यास करून भागत नाही, तर नैतिक प्रगतीसाठी काही गोष्टी कराव्याच लागतात. अर्थात त्यांनाच नैतिक प्रगतीचे साधन असे म्हणतात. त्यातील वैयक्तिक साधनामध्ये अभ्यास, वैराग्य, एकांतसेवन, सत्संग, उच्च आदर्शाची जोपासना वगैरे असतात. हा भाग वैयक्तिक आचरणाचा भाग असल्याने आणि तत्त्वज्ञान वा धर्माच्या अखत्यारीतला प्रश्न असल्याने त्याचा काही प्रमाणातच इतरांवर प्रभाव पडतो; पण सामाजिक साधनामध्ये मात्र त्याचा सांगोपांग विचार केला जातो; आणि केवळ विचार केला जात नाही, तर नैतिकतेची सूत्रे समाजात कशी रुजवली जाऊ शकतील याचाही विचार केला जाऊ शकतो. समाजाची नैतिक प्रगती होण्यासाठी सामाजिक परिस्थितीमध्ये नैतिक आदर्श, सामाजिक संस्था व सामाजिक चालीरीती या तीन घटकांचा समावेश होतो.

मानवी जीवन हे तसे स्थिर असते असे समजण्याचे कारण नाही. मानवी जीवनामध्ये सतत काही ना काही परिवर्तन होणे सुरूच असते. गतिशीलता हा जीवनाचा धर्म मानला जातो. अशावेळी केवळ गतीमुळे मानवी जीवनातील अनेक गोष्टींबद्दल संघर्ष निर्माण होत राहतो. विशेषतः नैतिक आदर्श, सामाजिक संस्था आणि सामाजिक चालीरीती यामध्ये काही ना काही संघर्षाची स्थिती निर्माण होते. असा संघर्ष निर्माण झाला असला तरीही या तिन्ही गोष्टी तकलाद वा अगदीच त्याज्य असतात. असे समजण्याचे काहीही कारण नसते. कारण समाजामध्ये प्रसार पावत असलेले आधुनिक शिक्षण वा नवे शिष्टाचार किंवा इतरही गोष्टी या जुन्या आणि पारंपरिक गोष्टींना त्याज्य ठरवण्याचा प्रयत्न करीत असतात. बदलती परिस्थिती आणि बदलता समाज यामुळे माणसाचा आणि अर्थात त्यापेक्षा समाजाच्याही गरजा या बदलतच जात असतात. नव्या गरजांची परिपूर्ती करण्यासाठी जुन्या गोष्टी कायमच आहे त्या स्वरूपामध्ये स्वीकारल्या गेल्याच पाहिजे असे काहीही नसते. अशा वेळी एक

संधी म्हणून काही बदल घडवून आणण्याची व्यक्तीच्या मनाची आणि समाजमानसाचीही तयारी असणे गरजेचे असते. त्यामुळे अशा स्थितीत जो नव्या जुन्याचे सामंजस्य घडवून आणू शकतो आणि समाजाला दिशा देऊन समाजस्वास्थ्य निर्माण करण्याची जबाबदारी स्वतःवर घेतो अशा माणसांनाच सुधारक म्हणता येते. नीतिशास्त्रातील आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील सर्व विचारवंत हेही एका दृष्टीने नव्या काही गोष्टी मांडतच असतात आणि बदलत्या काळाप्रमाणे समाजाला एक नवी दिशा देण्याचा प्रयत्न करीतच असतात. मुद्दा येतो तो सांस्कृतिक, वैचारिक संचिते सांभाळण्याचा ! अशा वेळी एक गोष्ट नक्की असते, की कालबाह्यता कशालाच नसते. नीतिशास्त्र काय किंवा तत्त्वज्ञान काय किंवा मनुष्याचे सांस्कृतिक वैभव उभे करणारे कुठलेही विचारधन काय हे कालबाह्य कधीही असू शकत नाही. महत्त्व प्राप्त होते ते संचित सांभाळण्याला, तेवढे केले पाहिजे. आणि मला वाटते, या साऱ्या अभ्यासामागचा हेतू हाच असू शकतो.

प्रथम खंड, 'पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आणि विचारदर्शन' यामध्ये आपण जवळपास आठशे सव्वाआठशे वर्षांचा पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा कालखंड पाहिला होता. प्राचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान कालखंड (इ.स.पू. ६२५ ते इ.स. ४७६) हा पाहून आपण त्याच्या दोन्हीही भागामध्ये म्हणजे पाहिल्या भागातील ग्रीक तत्त्वज्ञानाचा आढावा (इ.स.पू. ६२५ ते इ.स.पू. ३२२) घेतला. दुसऱ्या ग्रीकोरोमन तत्त्वज्ञानाच्या (इ.स. पू. ३२२ ते इ.स. ४७६) कालखंडात रोमचा पाडाव होईपर्यंतचा भाग पाहिला. यातील पहिल्या भागाचे तीन उपविभाग म्हणजे विश्वरचनावादी तत्त्वज्ञान (Naturalistic Philosophy इ.स.पू. ६२५ ते इ.स.पू.४८०), दुसरा मानववंशशास्त्रीय तत्त्वज्ञान (Anthropologic Philosophy इ.स.पू. ४८० ते इ.स.पू. ३९७), तर तिसरा योजनाबद्ध तत्त्वज्ञानाचा (Systematic Philosophy इ.स.पू. ३९९ ते इ.स.पू. ३२२) हेही आपण पाहिले. दुसऱ्या ग्रीकोरोमन तत्त्वज्ञानाचेही ढोबळमानाने केलेले दोन भाग... एक म्हणजे नीति तत्त्वज्ञान (Ethical Philosophy इ.स.पू. ३३२ ते इ.स.१००) आणि दुसरा धर्म तत्त्वज्ञान (Religious Philosophy इ.स. १०० ते इ.स. ४७६) असे आपण सलगपणे पाहत गेलो. पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आणि विचारदर्शन या पहिल्या खंडामध्ये सॉक्रटिसच्या मृत्यूपर्यंत म्हणजे इ.स.पू. ३९९ इथपर्यंतचा काळ रेखाटला आहे, म्हणजे जवळ जवळ योजनाबद्ध तत्त्वज्ञानाचा (Systematic Philosophy)... प्लेटोचा कालखंड सुरू होईपर्यंतचे विचारदर्शन त्यात आहे, अर्थात तत्त्वज्ञानाला अगदी सुव्यवस्थित स्वरूप येण्यास सुरुवात होत असतानाचाही कालखंड यात आहे. श्री. द.गो. केतकरलिखित 'पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, पुष्प पहिले आणि दुसरे' या पहिल्या ग्रंथामध्ये आपण हा सारा कालखंड पाहिला. नीतिविषयक आणि धार्मिक तत्त्वज्ञानाचा आरंभ आपण त्याच खंडातील 'मार्कस ऑरेलियस बादशहाची बोधवचने' (अर्थात 'मेडिटेशन्स ऑफ मार्कस ऑरेलियस' या सिमियन बेंजमिन अनुवादित ग्रंथापासून) सुरू केला. मार्कस ऑरेलियसचा

कालखंड इ.स. १२१-१८० असा आहे. ग्रंथलेखन साधारणपणे इसवी सन १७१ ते १८० याच कालखंडातील आहे. पहिल्या खंडामध्ये आपला प्रवास हा (इ.स.पू. ६२५-इ.स. १८०-२००) पाश्चात्त्य तत्त्वज्ञान ते धर्म आणि नीतितत्त्वज्ञान असा झाला आहे. याचाच पुढचा कालखंड आपण दुसऱ्या खंडामध्ये घेण्याचा प्रयत्न केला.

'तत्त्वज्ञान आणि नीती : पौर्वात्य आणि पाश्चात्त्य' या दुसऱ्या खंडामध्ये आपण धर्म आणि नीतितत्त्वज्ञान हे दोन्ही कधी परस्परपूरक होत तर कधी समांतर राहत पुढे कसे सरकत गेले हे पाहिले. पाश्चात्त्य आणि पौर्वात्य अशा दोन्ही नीतिशास्त्रांशी परिचय करून घेताना आपण तीन ग्रंथांचा समावेश या खंडामध्ये केला आहे. 'नीतिशास्त्रप्रबोध' आणि 'सुलभ नीतिशास्त्र' (लेखक दाजी नागेश आपटे) आणि 'नीतिमीमांसा अथवा नीतिशास्त्राची मूलतत्त्वे' (लेखक चिं. गं. भानु) असे तीन ग्रंथ असून त्यामध्ये नीतिशास्त्रीय संकल्पनांचा परिचय प्रथम दोन ग्रंथामध्ये असून पाश्चात्त्य आणि पौर्वात्य अशा दोन्हीचा तुलनात्मक अभ्यास मांडण्यात आलेला आहे. तिसरा ग्रंथ 'नीतिमीमांसा अथवा नीतिशास्त्राची मूलतत्त्वे' हा नीतिशास्त्रीय संकल्पनांचे स्पष्टीकरण ऐतिहासिक, भौतिक आणि जैविक स्तरावर करून देणाऱ्या हर्बर्ट स्पेन्सर यांच्या "The Data of Ethics" या ग्रंथाचा मराठी अनुवाद आहे, असे लक्षात येते. नीतिशास्त्राकडे बघण्याचा स्पेन्सर यांचा वेगळा दृष्टिकोन विज्ञान, तत्त्वज्ञान आणि त्याचसोबत नीतिशास्त्राच्या अभ्यासकांसाठीही उपयुक्त आहे. या तीनही ग्रंथांचे अध्ययन आपल्याला अगदी परिपूर्णपणे भारतीय तत्त्वचिंतनातील ज्ञानमीमांसा, तत्त्वमीमांसा व नीतिमीमांसा यासोबतच पाश्चात्त्य नीतिशास्त्राचाही परिचय आपल्याला करून देतो. अध्ययनातून आपण नीतितत्त्वे आणि त्यांची कालातीतता याकडे तटस्थपणे बघू शकतो. दुसऱ्या खंडात प्रारंभी आपण अभ्यासाकडे वळण्यापूर्वी नीतिशास्त्र म्हणजे नेमके काय, धर्मशास्त्र व त्यातील भेद, नीतिशास्त्राची व्याप्ती, त्याच्या अभ्यासाच्या विविध पद्धती कोणत्या हे थोडक्यात समजून घेतले. प्रथम खंडामध्ये जी धर्म आणि नीतिशास्त्राच्या अभ्यासाची परंपरा पाश्चात्त्य देशांमध्ये सुरू झाली होती, त्याचा पुढचा भाग आपण दुसऱ्या खंडामध्ये पाहिला. मार्कस ऑरेलियसनंतर जवळपास हजार वर्षे धर्म आणि नीतिशास्त्रीय तत्त्वज्ञानाचा सुकाळ पाश्चात्त्य राष्ट्रांमध्ये होता, असे समजायला हरकत नाही. एकीकडे ख्रिश्चन धर्म स्टॉईक आणि इतर पूर्वाश्रमीच्या धर्मांना बाजूला सारत पुढे प्रसार करीत गेला, तर दुसरीकडे नीतिशास्त्रातील काही प्रमाण सिद्धांत विचारवंत मांडत गेले. इसवी सनाच्या चौथ्या-पाचव्या शतकापासून विविध राष्ट्रांमध्ये नीतिशास्त्रे आणि धर्मशास्त्रे यांचा प्रसार होतच गेला. जवळपास दीड हजार वर्षे हेच चालू राहिले, ज्या काळामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक स्तरावर बरेच स्थित्यंतर घडून आले.

प्रस्तुत 'नीतितत्त्वज्ञानः राजकीय आणि सामाजिक' या तिसऱ्या खंडामध्ये आपण तीन ग्रंथांच्या आढाव्याने त्यांच्यातील स्थित्यंतराचा परिचय करून घेत आहोत. पंधराव्या

शतकातील पाश्चात्त्य राजनीती तत्त्वज्ञानाची आखणी करणारा निकोलो मॅकियाव्हेली याच्या 'प्रिंस' या पुस्तकाचा रियासतकार सरदेसाई यांनी केलेला अनुवाद 'राजधर्म', एफ.सी. मॉंटेग्यू यांच्या ग्रंथावर आधारित व श्री. शिवराम गोविंद फाळके लिखित 'इंग्लंडातील राज्यकारभार व्यवस्थेच्या इतिहासाची मूलतत्त्वे' व अंतिमतः श्री. विनायक सदाशिव गोगटे लिखित 'नीतिशास्त्रविचार' असे तीन ग्रंथ आपण बघताना गेल्या दीड हजार वर्षांतील राजकीय आणि सामाजिक स्तरावरच्या नैतिक स्थित्यंतराच्या इतिहासातील महत्त्वाच्या नोंदी आपण पाहणार आहोत.

गेल्या सहस्रकात आणि या नव्या सहस्रकातील या पहिल्या शतकातील प्रारंभीच्या दोन दशकातच आपण विविध क्षेत्रांमध्ये चालू असलेली उलथापालथ पाहत आहोत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील सत्तासंघर्ष, त्यातून निर्माण झालेली युद्धपिपासा, प्रचंड मोठ्या प्रमाणांवर चालू असलेले धार्मिक आणि वांशिक उद्रेक, धर्मजिज्ञासेतून धर्मसंस्कार होण्याऐवजी धर्मभयातून चाललेले अनाचार, अनाठायी अंधश्रद्धा आणि तेवढीच अंध विज्ञाननिष्ठता, जगण्याच्या संघर्षातून हरवत चाललेली नीतीची वास्तविक लक्षणे, शिक्षण असूनही चुकीच्या आकलनाने अश्रद्ध झालेली पिढी आणि त्यांच्यातील प्रचंड अविश्वास, धर्म, संप्रदाय, उपासना पद्धती, वर्ग, समूह, जात, लिंग यांच्या भेदावर आधारित निर्माण होत चाललेली अस्वस्थता यातून माणसाला सुटण्यासाठी काही आश्वासक असे उपाय हवेत, तरच सांस्कृतिक वैभव टिकून राहू शकेल.

तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्राचा एक अखंड प्रवाह मानवाच्या ठायी असलेल्या उच्च नैतिकतेला जागवत त्याला त्या ध्येयाप्रत घेऊन जाऊ शकेल, एवढी खात्री आहे. हे सारे विचारवैभव वाचकांच्या हृदयात नैतिकपूर्ण निःश्रेयसाचा दीप चेतवेल अशी खात्री आहे.

- वसु भारद्वाज

संदर्भ

1 To the magnificent Loranzo di Piero De' Medict: (The Prince, By Niccolo Machiavelli, Dedication)

2 Desiring therefore to present myself to your Magnificence with some testimony of my devotion towards you, ... (The Prince, By Niccolo Machiavelli, Dedication)

3 Nor do I hold with those who regard it as a presumption if a man of low and humble condition dare to discuss and settle the concerns of princes; because... (The Prince, By Niccolo Machiavelli, Dedication)

4 And if your magnificence from the summit of your greatness will sometimes turn your eyes to these lower regions, you will see how unmeritedly I suffer a great and continued malignity of fortune. (The Prince, By Niccolo Machiavelli, Dedication)

5 But when states are acquired in a country differing in language, customs, or laws, there are difficulties, and good fortune and great energy are needed to hold them, and one of the greatest and most real helps would be that he who has acquired them should go and reside there. (The Prince, By Niccolo Machiavelli, chapter 3)

6 From this a general rule is drawn which never or rarely fails; that he who is the cause of another becoming powerful is ruined; because that predominancy has been brought about either by astuteness or else by force, and both are distrusted by him who has been raised to power. (The Prince, By Niccolo Machiavelli, chapter 3)

7 When these things are remembered no one will marvel at the ease with which Alexander held the Empire or Asia, or at the difficulties which others have had to keep an acquisition, such as Pyrrhus and many more; this is not occasioned by the little or abundance of ability in the conqueror, but by the want of uniformity in the subject state. (The Prince, By Niccolo Machiavelli, chapter 4)

8 He who believes that new benefits will cause great personages to forget old injuries is deceived. (The Prince, By Niccolo Machiavelli, chapter 7)

9 Therefore a wise prince ought to adopt such a course that his citizens will always in every sort and kind of circumstance have need of the state and of him,and then he will always find them faithful. (The Prince, By Niccolo Machiavelli, chapter 9)

10 It only remains now to speak of ecclesiastical principalities, touching which all difficulties are prior to getting possession, because they are acquired either by capacity or good fortune, and they can be hold without either; for they are sustained by the ordinences of religion, which are so all-powerful, and of a character that the principalities may be held no matter how their princes behave and live. (The Prince, By Niccolo Machiavelli, chapter 11)

11 ..... it will be found that something which look like virtue, if followed, would be his ruin; whilst something else, which looks like vice, yet followed brings him security and prosperity. (The Prince, By Niccolo Machiavelli, chapter 15)

12 One prince of the present time, whom it is not well to name, never preaches anything else but peace and good faith, and to both he is most hostile, and either, if he had kept it, would have deprived him of reputation and kingdome many a time. (The Prince, By Niccolo Machiavelli, chapter 18)

13 .....princes ought to leave affairs of reproach to the management of others, and keep those of grace in their own hands. And further, I consider that a prince ought to cherish the nobles, but so as to make himself hated by the people. (The Prince, By Niccolo Machiavelli, chapter 19)

14 .....except Marcus; he alone lived and died honoured, because he had succeded to the throne by hereditary title, and owed nothing either to the soldiers or the people; and afterward, being possessed by many virtues which made him respected, he always kept both orders in their places whilst he lived, and was neither hated nor despised. (The Prince, By Niccolo Machiavelli, chapter 19)

15 Thereforea prince,.....ought to take from Severus those part which are necessary to found his state, and from Marcus those which are proper and glorious to keep a state that may already be stable and firm. (The Prince, By Niccolo Machiavelli, chapter 19)

१६ कौटिल्याच्या यथार्थ तुलनेत मॅकियाव्हेली ... डॉ विजय देव, प्रास्ताविक, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, २०१८

१७ आज्ञापत्र, संपादन विलास खोले, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, प्रस्तावना. पाचवी आवृत्ती, जुलै २००८

१८ आज्ञापत्र, प्रकरण आठवे, दुर्ग, 'राज्याचे सार ते दुर्ग' संपादन विलास खोले, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, प्रस्तावना. पाचवी आवृत्ती, जुलै २००८

१९ आज्ञापत्र, प्रकरण चौथे, प्रधान, संपादन विलास खोले, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, प्रस्तावना. पाचवी आवृत्ती, जुलै २००८

२० कौटिल्याच्या यथार्थ तुलनेत मॅकियाव्हेली ... डॉ. विजय देव, प्रकरण तिसरे, राज्यविवेकवाद, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, २०१८

21 Before the conversion off the English to christinity, the kingly families used to claim a divine origin thus Cerdic, the founder of the kingdom of Wessex, and the ancestor of Alfred and Queen Victoria, was ninth in descent from Woden, the supreme god of the Germans. (The Elements of the English Constitutional History, by F. C. Montegue, Chapter 2, page 11)

22 Feudalism was a system under which the political rights and duties of every man were determined by his relation with land. (The Elements of the English Constitutional History, by F. C. Montegue, Chapter 3, page 15)

23 Anselm, Archbishop of Canterbury, now wished to deprive the king of all power in the matter. Henry asserted his authority with great firmness. At last a compromise was attained. The ring and crozier were henceforwards to be given by the archbishop, but the king was still to receive homage for the lands. (The Elements of the English Constitutional History, by F. C. Montegue, Chapter 4, page 37)

२४ २९ डिसेंबर ११७० मध्ये थॉमस बेकेट यांचा खून कँटरबॅरी येथील कॅथेड्रलमध्ये झाल्याची नोंद मिळते.

25 In the struggle which ensued, Henry's mistakes and the murder of Becket gave the advantage to the clergy. Control over the election of bishops was renounced by John, although never quite lost to the Crown. The prohibition against appeals to Rome was neglected. The clergy contrived to withdraw themselves from the criminal jurisdiction of the State. In fact, Henry had claimed as current usage somewhat more power over the clergy than his ancestors had enjoyed, and was reduced to be content with far less. But the Constitutions of Clarendon are memorable in English history as the first formal claim of the State to control the ecclesiastical authorities. (The Elements of the English Constitutional History, by F. C. Montegue, Chapter 5, page 45, 46)

26 the doctrine of the Church of England was set out in forty-two articles, not essentially different from the Thirty-nine articles of Elizabeth. The doctrine of Transubstantiation was rejected. The obligation of confessing to a priest was denied. The celibacy of the clergy was declared to be superstitious. Altars were taken down, statues destroyed, stained windows broken, and illuminated ooks of devotion were torn or burnt. The havoc thus made offended many who cared little about doctrinal disputes. Others were shocked by the worldly and greedy character of some who professed themselves most zealous for the Reformation. (The Elements of the English Constitutional History, by F. C. Montegue, Chapter 8, page 109)

27 Under Elizabeth especially the English had become the most prosperous people in Europe. The invention of printing, the multiplication of grammarschools, the development of English literature, had greatly improved the intelligence of the mi ‘die class. The tumult of the Reformation, the progress of maritime adventure, and the exhilarating sense of national power, had raised

their courage and self-confidence. The spread of Puritan ideas in this class tended to sever them from the nobles and the clergy, whom they had formerly followed, and to render them an independent force in politics. In the conflicts of the seventeenth centur it is the middle class, led by the lawyers and country gentlemen, which plays the grand and decisive part. (The Elements of the English Constitutional History, by F. C. Montegue, Chapter 8, page 112)

28 The king tried to set the one against the other. At last the army lost patience. Having defeated a Royalist invasion from Scotland, they purged the House of Commons of all Presbyterian members, brought Charles to a public trial, condemned and executed him, suppressed the House of Lords, and proclaimed England a free Commonwealth. (The Elements of the English Constitutional History, by F. C. Montegue, Chapter 9, page 131)

29 These ideas have not been peculiar to any one nation; they have been the common property of the peoples of Europe. Their progress was partly due to general causes which cannot be stated here, but it was also due in part to causes of a more definite kind. These were (1) the influence of the great French writers of the eighteenth century; (2) the foundation of the Republic of the United States; (3) the outbreak of the French Revolution;(4)the industrial revolution in England. It is necessary to know something about the operation of these causes, if we would understand thecourse of English constitutional history in the nineteenth century. (The Elements of the English Constitutional History, by F. C. Montegue, Chapter 12, page 189)

30 A fifth Secretary of State for India was added in 1858, when the government of that country passed from the East India Company to the Queen. Thus there are now five Secretaries of State for Home, for Foreign Affairs, for War, for the Colonies, and for India. (The Elements of the English Constitutional History, by F. C. Montegue, Chapter 13, page 218)

31 This opportunity must not, therefore, be allowed to pass, for letting Italy atlength see her liberator. I cannot express the love with which he would be received in all those provinces which have suffered under these foreign invasions, with what thirst for vengeance, with what steadfast faith, with what love, with what grateful tears. What doors would be closed against him? What people would refuse him obedience? What envy could oppose him? What Italian would rebel against him? this barbarous domination stinks in the nostrils of every one. May your illustrious house therefore assume this task with that courage and those hopes which are inspired by a just cause, so that under its banner our fatherland may be raised up... (Prince, By Niccole Machiavelli, Edit. Luigi Ricci, chapter 26, last paragraph)

32 Progress is one from incoherent homogeneity to coherent heterogeneity.

33 SCT4IT, HHPT Thalit, &. 269, H. 20, 311.34

❍❍❍

संपादकांचा परिचय

डॉ. वसु भारद्वाज

डॉ. वसु भारद्वाज हे वैद्यकीय व्यावसायिक असूनही त्यांनी पुणे विद्यापीठातून संस्कृत आणि तत्त्वज्ञान या विषयातून बी.ए., तर तत्त्वज्ञान या विषयातून एम.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे.

गेली तीस वर्षे लेखनक्षेत्रात असून विविध वृत्तपत्रे, साप्ताहिके यांत स्तंभलेखन केलेले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून विविध माध्यमांवर समाजचिंतन, अध्यात्म वगैरे विविध विषयांवर सातत्याने लेखन करीत आहेत. मार्मिक या व्यंगचित्रसाप्ताहिकात व लोकसत्ता या दैनिकामध्येही सातत्याने स्तंभलेखन, ललित साहित्यातही विशेष कार्य केलेले आहे. विविध दिवाळी अंक व मासिकांतून अनेक कथा व दीर्घकथा प्रकाशित झालेल्या आहेत.

वैद्यकीय क्षेत्र, ललित साहित्यातील जवळ जवळ वीस ग्रंथांचे इंग्रजीतून मराठीमध्ये अनुवाद. तसेच संत साहित्य व समीक्षा यासाठी विशेष लेखन!

स्वलिखित दहा पुस्तके प्रकाशित व अनेक प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. 'एणें वरें ज्ञानदेवो' हा संतश्रेष्ठ ज्ञानदेवांच्या साहित्यावरील समीक्षाग्रंथ, शुनःशेप, उत्तंक आणि अष्टावक्रसारखा पौराणिक कथांचा संग्रह व सामाजिक आशयावर आधारित कादंबरी 'क्ष' ही पुस्तके विशेष उल्लेखनीय.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अनुवाद मिशनतर्फे तत्त्वज्ञान कोशावर सदस्य म्हणून काम केलेले आहे. महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार, पद्मश्री विखे पाटील राज्य पुरस्कार, कै. व. दि. कुलकर्णी संतसाहित्य समीक्षा पुरस्काराव्यतिरिक्त अनेक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित.

अनुक्रम

राजधर्म ... ११९ ते २१८

इंग्लंडातील राज्यकारभार व्यवस्थेच्या इतिहासाची मूलतत्त्वे... २१९ ते ४४९

नीतिशास्त्रविचार... ४५१ ते ५७४

सूची... ५७५ ते ५८१

रा ज ध र्म

लेखक
गोविंद सखाराम सरदेसाई

राजधर्म या मूळ पुस्तकाचे स्कॅन केलेले पहिले पान वाचकांसाठी

श्रीमंत महाराज सरकार सयाजीराव गायकवाड सेनाखासखेल
समशेर बहादूर यांच्या आज्ञेनें तयार होणारी

महाराष्ट्र ग्रंथमाला

ग्रंथ १

राजधर्म.

हें पुस्तक

माकिआव्हेलि यांच्या "प्रिन्स" नांवाच्या पुस्तकावरून

गोविंद सखाराम सरदेसाई

यांणीं तयार केलें

तें

बडोदें येथें,

"बडोदावत्सल" छापखान्यांत छापिलें.

संवत १९४६; सन १८९० इसवी.

अनुक्रमणिका

ग्रंथकारांचे चरित्र...१२४
अर्पणपत्रिका... १३२
भाग १ - राज्यांचे निरनिराळे विभाग...१३४
भाग २ - वंशपरंपरागत राज्ये... १३५
भाग ३ - संकीर्ण राज्ये...१३७
भाग ४ - अलेक्झांडर बादशहाने हिरावून घेतलेले डरायस
राज्याचे राज्य अलेक्झांडर वारल्यावर त्याच्या
मागून जे राजे झाले त्याजकडे कसे टिकले याविषयी...१४५
भाग ५ - स्वतःच्याच अमलाखाली स्वतंत्र चालत आलेली
राज्ये व शहरे जिंकली असता कशी राखावी याविषयी...१४८
भाग ६ - स्वतः योग्य वर्तनाने व शस्त्रांच्या जोरावर मिळवलेल्या राज्यांविषयी...१५०
भाग ७ - इतर लोकांच्या साह्याने सहजरीत्या मिळालेल्या राज्यांविषयी...१५४
भाग ८ - दुष्ट आणि अन्यायी मार्गांनी ज्यांनी राज्ये मिळवली अशा राजांविषयी...१६०
भाग ९ - लोक आपखुशीने आपसातीलच ज्या कोणा एकास
आपले राज्यपद देतात अशा राजांविषयी...१६४
भाग १० - राज्यांची शक्ती कशी समजावी याविषयी...१६७
भाग ११ - धर्मसत्ताक राज्ये...१६९
भाग १२ - सैन्य किती प्रकारचे असते आणि भाड्याचे सैन्य
म्हणजे काय याविषयी ...१७१
भाग १३ - मदतनीस, मिश्र व स्वतःच्या सैन्याविषयी...१७६

भाग १४ - स्वतःच्या सैन्यासंबंधी राजाचे कर्तव्य...१८०
भाग १५ - लोक व विशेषकरून राजे लोक स्तुतीस व दोषास
कसे पात्र होतात याविषयी...१८३
भाग १६ - औदार्य आणि कृपणता याविषयी...१८५
भाग १७ - दया आणि निर्दयता याविषयी व राजाविषयी प्रजेच्या
मनात प्रीती असणे चांगले किंवा भीती असणे चांगले याबद्दल...१८८
भाग १८ - राजाने आपले वचन कितपत खरे करावे याविषयी...१९१
भाग १९ - प्रजेस अप्रिय अगर त्रासदायक न होण्याबद्दल
राजाने फार जपले पाहिजे याविषयी...१९३
भाग २० - किल्ले वगैरे जे कित्येक राजे आपल्या राज्यात
बांधतात त्यांचा कितीसा उपयोग आहे याविषयी...२००
भाग २१ - राजा कोणत्या तहेने वागला असता लौकिकास
चढतो याविषयी...२०४
भाग २२ - राजांच्या प्रधानांविषयी...२०७
भाग २३ - खुशामती लोकांस दूर कसे ठेवावे याविषयी...२०९
भाग २४ - इटलीतील बहुतेक राजांची राज्ये कशी नाश
पावली याविषयी...२११
भाग २५ - ऐहिक विषयांसंबंधी दैवाची अनुकूलता कितपत
पाहिजे याविषयी...२१३
भाग २६ - रानटी लोकांच्या हातून इटली देश सोडविण्याचे उपाय...२१६

माकिआव्हेली यांचे चरित्र

माकिआव्हेली या नावाचे घराणे इटली देशात फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध होते. त्याचा मूळ पुरुष टस्कनीचा मार्किस होता, असे म्हणतात. पुढे काही दिवसांनी या घराण्यातील पुरुष फ्लारेन्स शहरी राहण्यास आले. त्या शहरीही या घराण्याचा मोठा मान राहत असे. प्रस्तुत ग्रंथाचे कर्ते यांचे नाव निकोलो माकिआव्हेली असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव बर्नार्डो असून ते न्याय करण्याच्या कामात फार निपुण होते. निकोलो यांची आई बार्टोलोमिआ नेली हीसुद्धा एका नामांकित कुळात जन्मली होती. जरी हे घराणे फार नामांकित होते, तरी फारसे श्रीमंत नव्हते व त्यांची नेमणूक वगैरे अगदी लहान असल्यामुळे त्यांचे बहुतेक दिवस गरिबीतच गेले होते व या चरित्राचे नायक निकोलो हे जरी फार प्रसिद्धीस आले व जरी त्यांची कीर्ती अगदी अजरामर होऊन राहिली आहे, तरी त्यांचे बहुतेक आयुष्य त्यांस अगदी गरीब स्थितीतच काढावे लागले. द्रव्याची मदत नसताना स्वतःच्या बुद्धिबळावर एवढी मोठी कीर्ती मिळविता आली, यावरून मोठेपणा मिळण्यास द्रव्याची मदत पाहिजेच असे नाही, हे उघड आहे.

इसवी सन १४६९ या वर्षी ३ मे रोजी निकोलो यांचा जन्म फ्लारेन्स शहरी झाला त्यांच्या लहानपणासंबंधी विशेष हकीकत उपलब्ध नाही. त्यांची आई मोठी विद्वान असून तिला कवितेची अभिरुची असे. यावरून निकोलो यांचा अभ्यास लहानपणी मातोश्रींपाशीच झाला असावा असे वाटते. एवढी गोष्ट त्यांच्या मनात कोणी कशी भरवून दिली असेल ती असो. फार अल्पवयी असताच स्वदेशसेवेस आपला देह अर्पण करण्याची त्यांस अतोनात उत्कंठा झाली होती व राजकीय विषयांवर जे इतके परिश्रम करून निकोलो यांनी आपल्या ग्रंथांतरी अनुपम स्वानुभव भांडार रचून ठेवले आहे, ते या उत्कंठेचाच परिणाम होय असे म्हणण्यास हरकत नाही.

निकोलो यांच्यावेळी इटली देशात जिकडे तिकडे अस्वस्थता होती. सर्व देशाचे विभाग होऊन लहान-लहान राज्ये स्वतंत्र झाली होती. एकमेकांत नेहमी कलह उत्पन्न होऊन लढाईचे प्रसंग वारंवार येत असत. कित्येक वेळा परकीय राजे मदतीस येत, तेही बखेडा केल्याशिवाय परत जात नसत. त्यावेळेच्या अस्थिरतेस आणखीही कारण असे, की धर्मसंबंधाची सत्ता त्यावेळी राजकीय प्रकरणात अतोनात होती. पोप हा एक स्वतंत्र व बलाढ्य प्रतिबादशहाच होता, असे म्हणण्यास हरकत नाही. यामुळे वरील भांडणे चेतण्यास भर पडत असे. अशी भांडणे सुरू असली म्हणजे एका दरबाराकडून दुसऱ्या दरबाराकडे तक्रारीचे समर्थन करण्याकरिता वकील वगैरे पाठविण्याची आवश्यकता फार होती व अशाच प्रकारच्या वकिलीचे मोठे धोक्याचे काम फार दिवस निरनिराळ्या प्रसंगी व निरनिराळ्या ठिकाणी निकोलो यांनी मोठ्या नेकीने केले असल्यामुळे, राजकीय प्रकरणाची पूर्ण माहिती मिळण्यास त्यास जसा योग आला तसा इतरास क्वचितच येतो व असा योग आला म्हणूनच त्यांनी त्या विषयांवर इतके ग्रंथ लिहून आम्हा सर्वांवर महदुपकार करून ठेवले आहेत.

निकोलो लहान असताना फ्लारेन्सचे राज्य मेडिसाय वंशाकडे चालत होते. यांच्या घराण्यात लारेन्झो म्हणून मोठा राजा झाला. तो इसवी सन १४९२ या वर्षी वारला. त्यास तीन मुले होती. पहिल्याचे नाव पायरो. हा लारेन्झोच्या मागून गादीवर बसला. दुसरा गिओव्हनी हा पुढे इसवी सन १५०५ या वर्षी दहावा लिओ नावाचा पोप झाला व तिसरा गिलियानो म्हणून होता. पोप सातवा इनोसन्ट इसवी सन १४९२ या वर्षी वारल्यावर त्याच्यामागून कोणी पोप व्हावे, याविषयी तक्रारी सुरू झाल्या. त्यामध्ये पोपांचे व फ्लारेन्सचा राजा पायरो यांचे वाकडे पडून पोपास मदत करण्याकरिता फ्रान्सचा राजा इटलीत आला. अशा घालमेलीत फ्लारेन्सच्या लोकांनी आपल्या राजावर फार नाखुश होऊन बंड केले व राजास पदच्युत करून राज्यातून हाकलून लाविले आणि इसवी सन १४९४ या वर्षी प्रजासत्ताक राज्य स्थापन केले. हे प्रजासत्ताक राज्य पुढे अठरा वर्षांपर्यंत टिकले. माकिआव्हेली यांचा फार उत्कर्ष झाला तो याच अठरा वर्षांत होय. इसवी सन १४९४ या वर्षी एका वकिलाच्या हाताखाली ते काम करू लागले. या पायरोचा मोड होताच प्रजासत्ताक राज्य चिरस्थायी व विस्तृत होण्याविषयी निकोलो यांनी फार खटपट केली व त्यांच्या खटपटीस यशही आले. या कामी त्यांनी इतकी कुशलता दाखविली, की इसवी सन १४९८ तारीख १९ जून या वर्षी दुसरे जास्त हक्काचे उमेदवार असतानाही या प्रजासत्ताक राज्याचे निकोलो यांस सर्वानुमते सेक्रेटरी नेमण्यात आले व हे काम थोडे दिवस केले नाही तोच त्यांस तेथेच मुख्य सेक्रेटरी नेमण्यात आले. हे काम त्यावेळी मोठ्या जबाबदारीचे होते. लढाईचे प्रसंग वरचेवर येत असल्यामुळे सैन्याची तयारी निकोलो यास ठेवावी लागत होती. स्वराज्यातील सर्व राजकीय संबंधांचे काम व परकीय राष्ट्रांशी तह वगैरे करण्याचे काम त्याच्याकडेच होते व हल्ली जे कागद त्यावेळचे उपलब्ध आहेत त्यावरून असे दिसते, की निकोलो यांच्या हुकमाशिवाय त्यावेळी लहानशी सुद्धा गोष्ट होत नव्हती.

यावेळी माकिआव्हेली यांचा बहुतेक काळ एका राष्ट्राकडून दुसऱ्याशी वकिलीचे काम करण्यात गेला. एकंदर त्यांनी तेवीस वेळा वकिलीचे काम केले. त्याच्याशिवाय पंचाइतीने वगैरे मोठमोठी राजकीय कामे चालत. त्यातही पुष्कळ वेळा निकोलो हे पंच नेमण्यात येत असत. वकिलीच्या प्रसंगात दोन-तीन वेळा शिवाय करून त्यास नेहमी यशच आले. ते मोठे धूर्त असल्यामुळे वकिलीचे काम फार सावधगिरीने दुसऱ्यास दुखावल्याशिवाय करीत असत व त्यांची मध्यस्थी सर्वांस चांगली पसंत पडत असे. फ्रान्सचा राजा बारावा लुई याच्याकडे इसवी सन १५०० या वर्षी ते फ्लारेन्स दरबाराकडून वकील म्हणून गेले. तसेच इसवी सन १५०३ या वर्षी सीझर बॉरजिया यांजकडे गेले. नवीन पोप नेमणे झाला म्हणजे त्या कामी यांचे अंग असेच. नंतर पीसा शहर आपल्या ताब्यात परत घेण्याचा फ्लारेन्स दरबारचा निश्चय होऊन त्या कामी निकोलो यांची नेमणूक झाली. ते शहर लढाई करून घेण्याचे ठरले होते; परंतु फ्लारेन्स लोकांचे सैन्य केवळ भाड्याने आणले असल्यामुळे त्यांचा बेत सिद्धीस गेला नाही. आपले सैन्य कसे असावे, याचा या गोष्टीने त्यांस पूर्ण अनुभव आला. भाड्याने सैन्य आणून जय मिळवण्याची आशा करणे हे अगदी मूर्खपणा होय व प्रत्येक राज्याच्या बळकटीस स्वतःचे सैन्य असणेच अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांस पक्के कळून आले व त्याप्रमाणे त्यांनी दरबारास सूचना करताच ती पसंत होऊन, अमलात आणण्याचे कामही त्याजकडेच सोपले गेले. इटलियन लोकांची लष्करची पद्धत फार वाईट होती. शिक्षण व शौर्य यास त्यावेळी मान नसे, यामुळेच अशा सुंदर देशाचा नाश करण्याचे धाडस परकीयांस सहज करता आले. --- सैन्य आणण्याची रीती एकदम मोडून टाकणे कदाचित धोक्याचे असून सर्वास एकदम पसंत पडण्यासारखे नव्हते. म्हणून दरबाराच्या परवानगीने त्यांनी एक युक्ती काढली. ती अशी - फ्लारेन्स राज्यात जितकी घरे होती, त्या प्रत्येक घरातून सैन्यांत एक असामी यावा असा त्यांनी कायदा केला. पुढे काही दिवसांनी हा कायदा बदलून त्यांनी त्याठिकाणी दुसरा कायदा असा केला, की शस्त्र वापरण्यास योग्य असे जितके पुरुष राज्यात असतील, त्या सर्वांनी सैन्याच्या पटावर आपले नाव घातलेच पाहिजे. असे झाल्यावर थोड्या वेळात दहा हजार फौज नेहमी उत्तम रीतीने तयार राहील अशी तजवीज झाली. शिवाय स्वतःचे सैन्य असल्यापासून काय काय फायदे होतात, या विषयावर ते आपल्या सर्व लोकांस नेहमी उपदेश करीत असत. असे करता करता सैन्याची सर्व व्यवस्था पाहण्यास नऊ असामी कामगार लोकमताने निवडण्याची पद्धत त्यांनी घातली. तसेच घोडेस्वारांपेक्षा पायदळ जास्त उपयोगाचे आहे, हे त्यांनी लोकांच्या मनात चांगले भरवून दिले.

इतक्या काळात इकडे त्यांची वकिली थांबली नव्हती. इसवी सन १५०६ या वर्षी त्यांस रोम शहरी वकील म्हणून जावे लागले. इसवी सन १५०७ च्या डिसेंबर महिन्यात त्यांस माक्सिमिलिअन बादशहाकडे वकील होऊन जावे लागले. याचवेळी त्यांनी जर्मनी देशातील रीतीभाती व राज्यव्यवस्था यांचा शोधपूर्वक अभ्यास करून त्यासंबंधी सुरेख ग्रंथ लिहून

ठेवलेले अद्याप उपलब्ध आहेत. त्यानंतर पीसा, मांच्युआ, लाम्बर्डी व आणखी कित्येक ठिकाणी त्यांनी वकिलीचे काम केले. इसवी सन १५१० तारीख २४ जून रोजी फ्रान्सच्या दरबारी स्थाईक वकिलीच्या कामावर माकिआव्हेली यांची नेमणूक झाली. त्यावेळी त्यांनी फ्रान्स येथी राज्यव्यवस्थेसंबंधी पुस्तक लिहून ठेवले आहे. फ्रान्समध्ये त्यांस फार दिवस काम करण्यास सापडले नाही. कारण दुसऱ्या कामाच्या नडीमुळे त्यांस लवकरच फ्लारेन्स येथे परत यावे लागले. नंतर मिलन, पीसा आदी ठिकाणी तह वगैरे करण्याची कामे त्यांनी केली. अशा गोष्टी घडून येत आहेत तोच पोप दुसरा जूलिअस याच्या समत्तीने मेडिसाय घराण्यातील पुरुषांनी प्रजासत्ताक राज्य मोडून आपली सत्ता पुनरपि स्थापित करण्याचे गुप्त बेत चालवले व त्यांच्या बेतास अखेरीस यश येऊन तारीख ३० ऑगस्ट सन १५१२ या वर्षी प्रजासत्ताक राज्य मोडून फ्लारेन्सची गादी पायरोचा मुलगा लारेन्झो यास मिळाली. लारेन्झोचे वय या वेळी एकवीस वर्षांचे असून त्याजबरोबर त्याचा चुलता पायरोचा कनिष्ठ बंधू गिलियानो हाही परत फ्लारेन्समध्ये आला. मेडिसाय घराण्यास राज्यप्राप्ती करून देण्याविषयी ज्या खटपटी चालल्या, त्यांत निकोलो यांचे अंग होते असे म्हणतात, ते मिथ्या होय. कारण फ्लारेन्समध्ये घडामोडी होऊ लागल्या त्याचे पूर्वीच पुष्कळ दिवस माकिआव्हेली हे दुसऱ्या कामावर परगावी गेले होते व त्यांनी लिहिलेली पत्रे वगैरे जी हल्ली आढळून येत आहेत, त्यांजवरून असे दिसते की, फ्लारेन्स येथे चाललेल्या खटपटीची त्यांस बिलकुल माहिती नव्हती व उलट आणखी असे लेख आढळत आहेत की, फ्लारेन्सवर अगर तेथील राजावर संकट न येऊ देण्याविषयी त्यांनी फार प्रयत्न केले व जर ते या घडामोडीच्या प्रसंगी फ्लारेन्स येथे हजर असते तर या गोष्टी त्यांनी इतक्या विकोपास जाऊ दिल्या नसत्या. तथापि त्यांजवर संशय आल्याचा परिणाम होणे तो झालाच. नवीन राजे गादीवर येताच त्यांस नोकरीतून कमी करण्यात आलेच होते; परंतु पुढे थोडे दिवसात त्यांस एक वर्षपर्यंत राज्याबाहेर जाण्याची बंदी झाली व राजवाड्यात येण्याचीही बंदी झाली.

पुढील वर्षी त्यांजवर दुसरेच संकट येऊन पडले. लारेन्झो आणि गिलियानो यांस ठार मारण्याबद्दलचा एक बेत उघडकीस येऊन त्यात पुष्कळ लोक संशयावर धरले गेले. त्यात निकोलो यांजवरही संशय आला. त्यांस तुरुंगात टाकले व पुष्कळ हालही केले. त्यांच्या पायात बेड्या घातल्या. इतके झाले तरी एकंदर प्रकरणाचा शोध केला, तर असे दिसून येते की, वरील गुप्त बेतात माकिआव्हेली यांचे अंग अगदी नव्हते. फ्लारेन्स मधील कोणी एका मानांकित गृहस्थाने हा गुप्त बेत करण्यामध्ये जे कोणी लोक असावेत असे त्यास वाटले, त्यांची एक यादी स्वतःच्याच अदमासाने व केवळ स्वतःच्याच माहितीकरिता केली होती. ती यादी दुसऱ्या एका गृहस्थास पडलेली सापडून, त्याने ती सरकारात नेऊन गुदरली. त्या यादीत निकोलो यांचे नाव होते, म्हणून त्यांजवर हा वरील प्रसंग विनाकारण गुदरला. इतक्यामध्ये पोप दुसरा जूलिअस वारला व त्याचे मागून दहावा लिओ पोप झाला. त्याने

माकिआव्हेली व इतर जे लोक वरील गुप्त बेत केल्याबद्दल तुरुंगात होते, त्या सर्वांस सोडून देण्याविषयी हुकूम केला. त्याप्रमाणे माकिआव्हेली यांची सुटका झाली. सुटका झाल्यावर ज्या राज्याच्या सेवेस त्यांनी आपले सर्व तन, मन अर्पण केले होते, त्याठिकाणी इतकी कृतघ्नपणाची वागणूक त्यांस मिळाली. याजबद्दल त्यांस अत्यंत खेद वाटला व फ्लारेन्स सोडून जाण्याचा निश्चय करून ते एका खेडेगावात त्यांची काही मालकी होती त्या ठिकाणी जाऊन राहिले. त्या ठिकाणी गेल्यावर ते आपला बराच वेळ गावंढळ खेळ खेळण्यात वगैरे घालवीत असत. सायंकाळी चार तासांपर्यंत मात्र ते अभ्यास करीत असत. याच वेळी त्यांनी राजा या विषयावर ग्रंथ लिहिला. त्यात राज्य म्हणजे काय, त्याचे किती प्रकार आहेत, राज्य मिळवावे कसे, राखावे कसे, वाढवावे कसे आणि ते नाहीसे होण्यास कारणे काय, या सर्व विषयांचे चांगले विवरण केले. हेच पुस्तक माकिआव्हेली यांच्या ग्रंथात मुख्य असून त्याच्याच आधाराने प्रस्तुत पुस्तक 'राजधर्म' हे तयार केलेले आहे. इसवी सन १५१६ या वर्षी हे पुस्तक त्यांनी लारेन्झो यांस अर्पण केले. पुढे नवीन राज्यव्यवस्थेत आपल्यास कोठेच नेमण्यात न आल्यामुळे स्वदेशाची नोकरी करण्याची त्यांची इच्छा कुंठित झाली, हे पाहून त्यांस फार वाईट वाटले. तरी त्यांनी आपला वेळ फुकट न घालविता नाना तहेचे ग्रंथ लिहिले. एक लहानशी शाळा काढून तीत फ्लारेन्स येथील तरुण मुलांस कित्येक कठीण विषय शिकवण्याचा क्रम चालवला.

टायटस लिव्हिएस यांच्या विख्यात ग्रंथावर त्यांनी एक सुरेख टीका लिहिली, ती याच वेळी. ती टीका राजधर्म या पुस्तकाचाच उत्तर भाग आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. राजधर्म पुस्तकाच्या शेवटच्या भागात सांगितल्याप्रमाणे नवीन राज्य मिळवून ते राखावे कसे, याचे विवरण ग्रंथकारांनी लारेन्झो यांस करून दिले. तसेच वर निर्दिष्ट उत्तर भागात राज्यास बळकटी आणण्यास काय काय उपाय केले पाहिजेत, त्यांचे निरूपण केले आहे. त्यात त्यांनी असे प्रतिपादन केले आहे की, मुख्य पाया राजा, सरदार आणि सामान्य लोक, या तिन्हीवर रचला असला पाहिजे व हा पाया बळकट ठेवणे म्हणजे हे तीन नेहमी सुस्थित व बळकट राहतील असे केले पाहिजे. शाळेत काम चालवीत असताना त्यांनी भाषा या विषयावर एक ग्रंथ लिहून ठेविला आहे व त्याच वेळी 'लढाईची कला' या विषयावर सात भागांचे एक पुस्तक लिहिले आहे. हे पुस्तक केवळ त्यांनी स्वदेश प्रीतीने लिहिले असावे. कारण फ्लारेन्सचे राज्य चिरकाल वृद्धिंगत होत जावे व निर्धोर व्हावे म्हणून त्यांस फार कळकळ होती, असे पदोपदी या पुस्तकावरून दिसून येते.

निकोलो माकिओव्हेली यांजवर जे कित्येक आरोप आहेत त्यापैकी एक असा आहे, की ते फक्त शास्त्रज्ञच होते. प्रत्यक्ष कृत्य करून दाखवयाची वेळ आली म्हणजे त्यांस काही उपाय सुचत नसे व हे म्हणणे विशेष करून त्यांच्या लष्करसंबंधी विचारांस विशेष लागू होते असे कित्येकांनी म्हटले आहे. लष्करच्या संबंधाने जरी त्यांनी इतके परिश्रमपूर्वक

फार शोध करून ग्रंथ लिहिले आहेत, तरी समरांगणी सैन्य घेऊन शत्रूशी सामना करण्यास निकोलो कधीही गेले नाहीत व लढाईवर जाण्याची त्यांस आवश्यकताही लागली नाही. यांच्या विरुद्ध लिहिताना कित्येक ग्रंथकारांनी असे लिहिले आहे की, एका प्रसंगी 'तुम्ही काय म्हणता ते प्रत्यक्ष करून दाखवा' असे अरबिनोच्या ड्यूकने त्यांस सांगितले असता ते घोटाळयात पडले. तसेच ३००० पायदळ लढाईच्या तयारीने उभे करण्यास सांगितले असता त्यांस पुष्कळ वेळ श्रम करूनही ते करता आले नाही व वरील ड्यूकने ते एकदम करून दाखविले. या वरील लिहिण्यात किती तथ्य आहे, याचा विचार त्यांचे ग्रंथ वाचून वाचकांनी आपल्याशीच करावा. अमुकच पक्ष खरा व अमुकच खोटा, याचा खास निर्णय करणे कठीण आहे.

इतक्या वेळात माकिआव्हेलीच्या ग्रंथांची वगैरे विशेष प्रसिद्धी होऊन इ. सन १५२० च्या सुमारास मेडियास मंडळीच्या मनातील त्याजविषयीचा राग कमी झाला व त्यांचा उपयोग राज्यास करून घेण्याची त्यांस इच्छा झाली. गिलियानो यास त्याजविषयी फार अभिमान वाटून त्यांस पुन्हा वकिली संबंधाचे काही काम त्याने सांगितले. लारेन्झो मरून गेला होता, म्हणून त्यास राजा इटली देश परकीयांच्या दास्यत्वातून मुक्त करण्याविषयी जी निकोलो यांची अत्यंत उत्कंठा होती व ज्या उत्कंठेचे प्रदर्शन प्रस्तुत पुस्तकात व विशेषकरून त्यातील शेवटच्या भागात आहे. ती अगदी नाहीशी झाली व प्रजासत्ताक राज्यच फ्लारेन्स येथे असावे, असे त्यांस वाटू लागले व त्या राज्याच्या बळकटीकरिताच यापुढे ते उपाय योजू लागले. लारेन्झो याजवर आपण पूर्ण विचार न करता विश्वास ठेवल्याबद्दल त्यांस फार पस्तावा झाला व आपले सर्व प्रयत्न निष्फळ झाल्याचे त्यांस अत्यंत वाईट वाटले. नंतर फ्लारेन्सचा इतिहास लिहिण्याचे काम दरबाराकडून त्यांजकडे सोपले गेले. त्यांची वकिलीची कामे थोडीबहुत सुरू होतीच; परंतु पूर्ववत् भरपूर अधिकार पुन्हा त्यांच्या हाती येण्यास चार वर्षे अवकाश लागला. इ. सन १५२६ या वर्षी पोप सातवा क्लेमंट याने फ्लारेन्सची तटबंदी तपासून रिपोर्ट करण्याचे काम माकिआव्हेली यांस सांगितले. हे काम करण्यास माकिआव्हेलि इतका लायक दुसरा मनष्य पोप यास मिळेना. ते काम मोठ्या हुशारीने माकिआव्हेली यांनी तडीस नेले. नंतर आणखी कित्येक लष्करी कामेही त्यांस पोपकडून सांगण्यात आली. एकंदर सरकारी कामे त्यांनी सुमारे तारीख २२ मे सन १५९७ पर्यंत केली व नंतर ते सर्व धंदा वगैरे सोडून आपल्या गावी परत आले.

त्यानंतर ते फार दिवस जगले नाहीत. तारीख २२ जुलै इसवी सन १५२ रोजी आपल्या गावी ते मरण पावले. त्या वेळी त्यांचे वय ९८ वर्षांचे होते. मरेपर्यंत ते खिस्ती धर्म पाळत होते. त्यांच्या मरणाची कारणे निरनिराळ्या गृहस्थांनी निरनिराळी लिहून ठेवली आहेत. कोणी म्हणतात की, दरबारचे चीफ सेक्रेटरी न नेमल्यामुळे त्यांस वाईट वाटून ते आपल्या गावी आले व त्यामुळे जो त्यांस धक्का बसला त्यानेच त्यांचा अंत झाला; परंतु त्यांचा

मुलगा पायरो म्हणून होता त्याने असे लिहून ठेवले आहे की, तारीख २० जून रोजी त्यांनी पोटांत काही औषध घेतले होते, त्याचा परिणाम बरोबर न होऊन पोट दुखू लागले व त्याजपासून त्यांचा अंत झाला. तसेच कित्येकांनी असे लिहून ठेवले आहे की, त्यांच्या कुटुंबाचे आणि त्यांचे चांगले जमत नसे; परंतु हे खरे नाही. कारण जरी कामाच्या नडीमुळे कुटुंबास एकीकडे ठेवून त्यांस पुष्कळ वेळ एकटेच राहावे लागत असे, तरी त्यांनी आपल्या दोन्ही मृत्युपत्रांत आपल्या कुटुंबाविषयी जी इतकी प्रीती, अभिमान व कळकळ दाखविली आहे, त्यावरून वरील अपवाद खरा आहे असे वाटत नाही. त्यांस चार मुलगे व एक मुलगी अशी पाच मुले होती. मरण काळी ते अगदी गरीब होते. त्यांचे उत्पन्न अगदी मोठी कामे करीत असतानासुद्धा दरदिवसास दहा लायर[१] पेक्षा जास्त नव्हते. फ्लारेन्स दरबारास त्यांनी पैशाकरिता वेळोवेळी विनवण्या केल्याची पत्रे प्रसिद्ध आहेत.

फ्लारेन्स शहरी त्यांचा मोठा मान असे. ते नेहमी आनंदी व मनमिळाऊ असून सहज बोलण्यात सुद्धा त्यांचे विद्वत्व व कोटी शक्तीही दिसून येत असत. ते क्याथोलिक धर्माचे होते, तरी राजकीय संबंधांत जी सत्ता त्यावेळचे पोप वापरीत असत, ती त्यांस बिलकूल आवडत नसे, त्यामुळे धर्मसंबंधात त्यांचे कोणाशीच जमले नाही. शेवटी इतकेच म्हणणे बस आहे की, 'धी ग्रेट सेक्रेटरी' म्हणून जी त्यांस पदवी मिळाली होती ती अगदी यथार्थ होती. इटलीतील लहान लहान राज्ये मोडून जाऊन सर्व देश पूर्ववत् एका राजाच्या अमलाखाली येऊन राजास व प्रजेस सुखी होण्याचे जे त्यांनी उपाय सांगून ठेवले, ते कितपत खरे झाले व त्यांचे भविष्य कसे बिनचूक सिद्धीस गेले, हे इटली देशाच्या पुढील इतिहासावरून सर्वांस व्यक्त होणार आहे. 'राजकीय विषयांचा भविष्यवादी' म्हणून जे कोणी त्यांजबद्दल लिहून ठेवले आहे ते अगदी खरे आहे.

- गोविंद सखाराम सरदेसाई

---

१. लायर हे त्यावेळचे इटलीतील नाणे असावे. याची बरोबर किंमत किती होती हे समजत नाही.

ग्रंथकारांची अर्पण पत्रिका

पायरो दी मेडिसाय यांचे विख्यात चिरंजीव लारेन्झो यांस -
निकोलो माकिआव्हेली यांजकडून.

जे लोक राजकृपा संपादण्याची इच्छा करतात, तो बहुतकरून अतिशय मौल्यवान अथवा संतोषकारक अशा वस्तू त्यांस नजर करून त्यांची ओळख करून घेतात, ह्या करिताच राजे लोकांना घोडे, हत्यारे, सुवर्णमय वस्त्रे, रत्ने आणि राजवैभवानुरूप अशा दुसऱ्या कित्येक वस्तू नजर येत असतात. आपल्यापुढे येऊन माझी राजनिष्ठा प्रदर्शित करण्याची उत्कट आकांक्षा माझ्या मनात उत्पन्न झाली व आपल्यास नजर करण्याकरिता म्हणून माझ्या कपाटातील वस्तु पाहू लागलो, तो माझ्या मते तरी त्यात एकही मौल्यवान् वस्तू मिळेना. फक्त अर्वाचीन गोष्टींची पुष्कळ दिवस माहिती करून घेऊन व प्राचीन गोष्टींचा सतत शोध करून संपादन केलेले, मोठ्या लोकांची कृत्ये व वर्तन यांचे ज्ञान, एवढेच काय ते माझ्यापाशी आहे असे मला वाटले. बहुत कालपर्यंत श्रम व शोध करून ते सर्व मी या लहानशा पुस्तकात आणले आहे व तेच हे लहानसे पुस्तक मी आपल्यास अत्यादरपूर्वक नजर करण्याचे धाडस करतो आणि जरी आपल्या पुढे आणण्याजोगे हे साधले आहे असे नाही, तरी आपल्या औदार्याविषयी माझी इतकी खात्री आहे की, जी माहिती पुष्कळ वर्षांपर्यंत अपरिमित श्रम आणि संकट सोसून मी एक ठिकाणी केली आहे, ती थोड्या वेळात समजून घेण्याची सोय करून देण्यापेक्षा जास्त होणे माझ्याच्याने अशक्य आहे, असे समजून याचा आपण स्वीकार कराल अशी आशा आहे. भाषा वैचित्र्य वगैरे गोष्टींनी मी या पुस्तकाला कोणतीच शोभा आणली नाही व वर्णन करताना सांप्रदायिक बाह्य सौंदर्यही मी आपल्या पुस्तकात आणले नाही. विषयाची सत्यता आणि प्रौढता याविषयी दुसऱ्या गोष्टींच्या योगाने पुस्तक लोकांस

पसंत पडण्यापेक्षा तसे ते पसंत न पडलेलेच बरे, असे मला वाटते. माझ्या सारख्या कनिष्ठ प्रतीच्या मनुष्याने राजे लोकांसारख्यांच्या वागणुकीचे फक्त निरूपणच नाही, तर त्याला निबंध करून नियम लावून दिल्याने कदाचित् अत्याचाराचा आरोप मजवर येईल; परंतु तो येणे रास्त नाही. कारण ज्यांना एखाद्या देशाचा नकाशा काढणे असतो, त्यात पर्वत आणि उच्च प्रदेश यांचे स्वरूप नीट कळण्याकरिता खाली मैदानात उभे राहावे लागते, तसेच खालील दरी खोयांचे स्वरूप कळले पाहिजे, तर उच्च पर्वतावर उभे राहावे लागते, तद्वतच सर्वसाधारण लोकांचा स्वभाव उच्च प्रतीच्या राजे लोकांस सहज कळेल, तसेच राजे लोकांचा स्वभाव कनिष्ठ प्रतीच्या लोकांसच लवकर कळण्याचा जास्त संभव आहे. म्हणून ज्याप्रमाणे हे पुस्तक मी आपल्यास नजर केले आहे त्याप्रमाणेच याचा आपण स्वीकार करावा आणि जर दृढ निश्चय करून या पुस्तकातील विषयांचा आपण नीट जरूर विचार केला, तर आपले गुण व दैवानुकूलता यांनी साध्य असे वैभव आपल्यास प्राप्त व्हावे, अशी माझी उत्कटेच्छा या पुस्तकात आपल्यास दिसून येईल आणि या वैभवोच्चतेपासून जर कधी महाराजांनी आपली नजर या खालील नीच वस्तूंकडे फेकली तर दैवप्रतिकूलतेमुळे मला अनुचित विपत्ती कशी सतत भोगावी लागत आहे, हे आपल्यास सहज दिसून येईल.

भाग-१

राज्यांचे निरनिराळे विभाग

ज्या राज्यांमध्ये एकाचा अंमल दुसऱ्यावर चालतो, अशा प्रकारची राज्ये जगामध्ये फक्त दोनच तहेची असल्याचे आजपर्यंत आढळून आले आहे - (१) राजसत्ताक आणि (२) प्रजासत्ताक. राजसत्ताक राज्ये दोन प्रकारची आहेत. (१) वंशपरंपरागत, म्हणजे ज्यांमध्ये राजे वंशपरंपरेने बहुतकालपर्यंत राज्य करीत असतात ती आणि (२) नूतन. नूतन राज्ये दाने प्रकारची. एक तर ती नेहमी तशीच विसंगत राहतात किंवा ज्याने ती जिंकली असतील त्याच्या वंशपरंपरागत राज्याला जोडलेली राहतात. (उदाहरणार्थ, नेपल्सचे राज्य स्पेनच्या राज्याला जोडलेले होते). अशा प्रकारे जिंकलेला मुलूख एका राजाच्या अमलाखाली राहू शकतो. जिंकला नसेल तर स्वतंत्र राहील आणि दैवानुसार स्थित्यंतराप्रमाणे स्वजातीयांकडून अथवा परकियांकडून तो जिंकला जाईल.



○○○

भाग-२

वंशपरंपरागत राज्ये

प्रजासत्ताक राज्यांविषयी दुसऱ्या ठिकाणी विस्तृत्वाने वर्णन केले असल्यामुळे या ठिकाणी त्यांजविषयी आम्ही काहीच सांगत नाही. फक्त एकराजसत्ताक राज्यांविषयी वर केलेल्या विभागाप्रमाणे ती कशी चालवावी व राखावी या विषयीच येथे सांगावयाचे आहे. मला असे वाटते की, जी राज्ये एका राजवंशाच्या अंमलाखालीच चालत आलेली असतात, अशी राज्ये राखणे फारसे कठीण नाही; परंतु नवीन कमावलेली राज्ये राखणेच अवघड आहे. कारण वाडवडिलांच्या पद्धतीचे उल्लंघन न करता प्रसंगानुसार अनकरण करण्याशिवाय आम्हास दुसरा तरणोपाय नाहीसा झाला आहे व या अनुकरणास सहायभूत असे इंग्रजी भाषेतील अनेक ग्रंथ आमच्या भाषेत येणे अत्यंतावश्यक आहे. या ग्रंथाच्या शेवटच्या भागात इटलीविषयी सांगितल्याप्रमाणे हिंदुस्थानचीही स्थिती हल्ली काही चमत्कारिकच झालेली आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. जिकडे-तिकडे सामाजिक व राजकीय सुधारणेशिवाय विषय नाही, सारखा झाला आहे. राजकीय सुधारणेचा पाया तर 'काँग्रेस'ने घातलाच आहे. त्याजवर इमारत आता कशी कोणत्या प्रकारची उभी करता येते हे पाहणे आहे. अशा प्रसंगी युरोपातील एका अतिशय नामांकित ग्रंथकाराचे या विषयावर काय विचार होते, हे आमच्या लोकांस कळल्यापासून काही तरी फायदा होईल असे आम्हास वाटते. या ग्रंथाचे मूळ कर्ते 'माकिआव्हेली' मोठे नामांकित असून त्यांची मतेही प्रसिद्ध आहेत. त्यांचे चरित्रही या ठिकाणी दिलेच आहे. त्यावरून त्यांची साधारण माहिती आमच्या वाचकांस होईल. राजकीय सुधारणा या विषयावर माकिआव्हेली यांनी फार परिश्रम केले असल्याचे दिसते. त्यांची मते आम्हास कशीही वाटोत, प्रस्तुत आमचा उद्देश फक्त माकिआव्हेली यांचे म्हणणे वाचकांपुढे आहे तसे ठेवणे, इतकाच असल्यामुळे ती मते चांगली आहेत किंवा वाईट आहेत याचा विचार येथे करीत बसण्याची आम्हास जरूर नाही.

या पुस्तकाचे मूळ नाव इंग्रजीत 'प्रिन्स' म्हणजे 'राजकुमार' असे आहे. ते तसेच महाराष्ट्र भाषेत ठेवण्याचा आमचा मानस होता; परंतु त्याजपासून आतील विषयाचा एकदम बोध होणार नाही असे वाटल्यावरून थोडा बदल करून पुस्तकाचे नाव 'राजधर्म' असे ठेवले आहे व हा शब्द अत्यंत व्यापक असल्यामुळे ज्या-ज्या अडचणी येतील त्या मात्र सांभाळून घेतल्या म्हणजे बस्स आहे. अशा रीतीने राजा बेताबाताचा उद्योग करणारा असला म्हणजे त्याचे राज्य सुरक्षित चालण्यास फारशी नड येत नाही. जेव्हा एखादे मोठे प्रचंड अरिष्ट येऊन गुदरेल तेव्हाच काय तो त्यास धोका येण्याचा संभव आणि असे झाले असताही प्रालब्ध त्याजला कधीही प्रतिकूल होत नाही. कारण परकीयांकडे गादी जाण्यापेक्षा मूळच्या राजालाच ती पुन्हा मिळणे स्वाभाविक आहे. याचे उदाहरण इटलीमध्ये घडलेले आहे. फेरारा येथील ड्यूक वंशपरंपरागत अंमल करीत आला असल्यामुळे, इसवी सन १४८४ या वर्षी व्हेनिशीअन लोकांनी स्वारी केली त्यावेळी आणि पुढे पोप दहावा जूलियस याच्या विरुद्ध त्यांनी मोठ्या शौर्याने आपल्या देशाचे संरक्षण केले; कारण इतकेच, की जो मूळचा राजा असतो त्याला आपल्या प्रजेस त्रास देण्याचे फारसे प्रयोजन पडत नाही, म्हणून तो बहुतकरून लोकांना जासत प्रिय असतो आणि काही तरी विलक्षण दुर्गुण असल्याशिवाय तो लोकांस अप्रिय होत नाही व त्याजविषयी त्यांची श्रद्धा कायम राहते. पुष्कळ दिवस चालत असलेल्या परिपाठामुळे एखाद्या स्थित्यंतराचे स्मरण न होता प्रयोजनही राहत नाही व (इमारतीतल्या प्रमाणे) एकदा एखादा फेरबदल केला असता लागलीच दुसऱ्या फेरबदलाची जरूर व संभव दिसून येतात.

○○○

भाग-३

संकीर्ण राज्ये

संकीर्ण राज्यांविषयी मात्र विशेष अडचणी आहेत. संकीर्ण राज्ये म्हणजे अगदी नूतन नसतात, तर थोडे दिवसांपूर्वी जिंकलेली असून ती राज्यापहारकांच्या मुलखास जोडलेली असतात. कोणतेही नवीन राज्य जिंकणे म्हटले म्हणजे त्यास फारच अडथळे आणि संकटे असतात व त्यांजपासून तंटे उपस्थित होऊन वरचेवर मोठ-मोठ्या घडामोडी होण्याचा संभव असतो. कारण आपली स्थिती सुधारण्याच्या आशेने लोक आपल्या राजाला सोडण्यास तयार होतात व ही आशाच त्यांस बंड करण्यास प्रवृत्त करते; परंतु बहुशः ही त्यांची चुकी असते आणि आपली स्थिती आपण होऊनच जास्त वाईट करून घेतली, असा त्यांस मागाहून पस्तावा होतो.

हे तंटे वगैरे होण्याचे दुसरे एक सहाजिक कारण असे आहे, की नवीन राज्यापहारकाला आपले पूर्वीचे सैन्य नवीन देशात आणून ठेवावे लागते, त्या लोकांवर कर वगैरे बसवावे लागतात यामुळे व देश जिंकिल्याचे सतत परिणाम-ज्या कित्येक दुसऱ्या हजारो अडचणी-त्यामुळे लोकांना नवीन राजाचा फार त्रास होतो. असे झाले म्हणजे ज्या लोकांना अशा प्राकरचा त्रास भोगावा लागतो, ते सहजच त्या नवीन राजाचे शत्रू बनतात व जरी काही मित्रांनी त्या राजास मुद्दाम बोलावून आणला असला, तरी त्याचा सांभाळ करणे सोपे नाही. कारण त्याची इच्छा तृप्त करणे शक्य नाही. वातावरण बंदिस्त केले असल्यामुळे त्यांच्याशी जबरीचे उपाय योजणेही अशक्यच होते, म्हणून राज्यापहारक कितीही प्रबळ असला आणि त्याचे सैन्य कितीही मोठे असले, तरी एखादा देश त्यास जिंकणे असेल, तर तेथील लोकांची त्यास चांगली माहिती पाहिजे. या वरील गोष्टीमळेच फ्रान्सचा राजा बारावा लाई ह्याने मिलनचे राज्य थोड्या अवधीत जिंकले व ते लागलीच गमावलेही. कारण ज्या लोकांनी त्यास शहरचे दरवाजे उघडून आत घेतले, त्यांस आपली आशा निष्फळ झाली व जे भावी लाभ करून

घेण्याचा त्यांचा इरादा होता तो फुकट गेला, असे पाहून आपल्या नवीन राजाचा उद्धटपणा सहन झाला नाही. ही गोष्ट निर्विवाद आहे, की ज्या देशांतील लोक बंड करून दोन वेळ जिंकिले गेले, त्या लोकांस पुनः आपल्या ताब्यात घेणे जास्त कठीण आहे. कारण लोकांत फाटाफूट झाल्यामुळे राज्यापहारकाविषयी त्यांची पूज्यबुद्धी व उपकारित्व नाहीसे होते व तो राज्यापहारक गुन्हेगार लोकांस शिक्षा करून, वहिमदार लोकांस उघडकीस आणून आणि जरूर असेल त्याठिकाणी तटबंदीचा वगैरे बंदोबस्त करून, आपले संरक्षण करण्याविषयी हरएक प्रयत्न करीत असतो. म्हणूनच काऊंट लोडोव्हिक मिलनच्या सरहद्दीवरच्या लोकांस उपद्रव देऊन ते त्याने एकवेळ फ्रेंचांकडून परत घेतले खरे, तरी दुसऱ्या वेळी जेव्हा त्यास ते परत घ्यावे लागले, तेव्हा वरील राजा (१२ वा लुई) शी लढण्याकरिता इतर सर्व लोकांस हत्यारबंद करून आपलेसे करून घ्यावे लागले व त्या राजाचे सैन्य इटली देशातून त्यास हाकून द्यावे लागले. या सर्व गोष्टी वर सांगितलेल्या नियमांस अनुसरूनच झाल्या. असे असूनही फ्रेंच लोकांच्या हातून मिलन दोन वेळ गेले.

येथपर्यंत पहिल्या गोष्टीविषयी साधारण नियम झाले. आता दुसरीविषयी सांगावयाचे आहे. वरील लुई राजाला अथवा त्याच्या स्थितीतल्या दुसऱ्या एखाद्या राजाला नवीन जिंकिलेल्या मुलखांचा बचाव करण्यास त्या राजाने केले त्यापेक्षा निराळे काय काय उपाय होते, त्यांचा आता विचार कर्तव्य आहे. जो मुलूख नवीन जिंकला असून जिंकणाराच्या वंशपरंपरागत राजाला तो जोडला गेला असेल, त्या मुलखातील व ज्यास तो जोडला त्या मुलखातील भाषा वगैरे सर्व एकच असेल अगर नसेल, जर ते दोन्ही लोक एक देशीयच असले व जर विशेषकरून त्यास स्वातंत्र्याचा फारसा अनुभव नसला, तर त्यांस राखणे असेल तर पूर्वी राज्य करीत असलेल्या राजाचा वंश नाहीसा करून टाकला म्हणजे पुरे आहे, जास्त काही करण्याचे कारण नाही. कारण त्या लोकांची पूर्वस्थिती कायम राहून, त्यांच्या रीतिभातीत काही फेरबदल न झाल्यामुळे ते लोक निमूटपणे सर्व सहन करून शांत राहतात. उदाहरणार्थ बर्गंडी, बेटेन, गासकायन आणि नार्मंडी ही आजपर्यंत फ्रान्स देशाच्या अमलाखाली चालत आली आहेत. जरी भाषेमध्ये थोडासा फरक असला तरी त्यांचे कायदे, कानून व रीतिभाती एकच असल्यामुळे सर्व नीट नांदते. म्हणून यावरून असे दिसून येते, की ज्या कोणास नवीन राज्य जिंकून ते राखण्याची इच्छा असेल, त्याने दोन गोष्टी विशेषकरून ध्यानात घेतल्या पाहिजेत, पहिली ही की, पूर्वीच्या राजाचा वंश नाहीसा करून टाकला पाहिजे व दुसरी ही की, नवीन कायदा अथवा कर बसवू नये. असे केले म्हणजे थोड्याच वेळात तो नवीन जिंकलेला मुलूख जिंकणाराच्या जुन्या राज्याशी एक होऊन जाईल; परंतु नवीन जिंकलेल्या मुलखाचे भाषाभिन्नत्व ज्या ठिकाणी असेल व रीतिभाती, कायदेकानूनसुद्धा निराळेच असतील, त्या ठिकाणी मात्र विशेष अडचण आहे. अशा वेळी नशीब बलवत्तर असून चांगला उद्योग होईल तरच निभाव व असे होण्यास अति उत्तम

व उपयोगी असा एक मार्ग हा आहे की, जिंकणाराने जिंकलेल्या मुलखात स्वतः जाऊन राहावे, यायोगाने त्याचा ताबा निर्भय होऊन पुष्कळ काळपर्यंत टिकेल. तुर्की लोकांचा जो मोठा राजा होऊन गेला त्याने ग्रीस देशाचा भाग जिंकला, त्यावेळी तो आपल्या ताब्यात ठेवण्याविषयी त्याने कितीही प्रयत्न करून अक्कल लढवली असती, तरी जर तो तेथे जाऊन राहता ना, तर तो त्याच्या ताब्यात कदापिही राहिला नसता. स्वतः तेथे हजर असले म्हणजे एखादी अव्यवस्था त्याला फक्त ऐकीव माहितीवरून कळते व ती एकदा शिखरास जाऊन पोहोचली म्हणजे मग बहुतकरून सुधारणे कठीण. शिवाय आणखी असे आहे की, राजा नेहमी जवळ हजर असल्यामुळे कामदार लोकही त्या मुलखात काही गडबड करीत नाहीत व जे चांगले लोक असतात त्यांची त्याजवर श्रद्धा बसते व जे लबाड असतात त्यांस दहशत बसते आणि जर एखाद्या परकीय राजाने त्या मुलखावर हल्ला केला, तर राजा त्या मुलखात हजर असल्यामुळे त्यास तो हल्ला फार सावधगिरीने जपूनच करावा लागेल व इतके करूनही यश येईल किंवा नाही याची भ्रांतीच आहे.

दुसराही आणखी एक असा उपाय आहे की, नवीन जिंकलेल्या मुलखाची नाकी म्हणून जी काही तेथे ठाणी असतील त्यामध्ये आपले लोक नेऊन वसाहत करावी. ही गोष्ट करणे जरूर आहे; तथापि घोडेस्वार आणि पायदळ त्या प्रांतात नेऊन ठेविले तरी चालेल; परंतु वरच्यापेक्षा हा उपाय बराच वाईट आहे. कारण वसाहत करणे हे फारसे खर्चाचे नाही. राजाने त्यांना पाठविले म्हणजे त्यांच्या उपजीविकेस फार खर्च लागत नाही. कारण या नवीन येऊन राहणाऱ्यांकरिता जरूर तितकीच तेथील लोकांची घरे व जमीन हिसकावून घेतली म्हणजे पुरे होते व ज्या लोकांपासून ही हिरावून घेतली असतील ते कितीही रागावले तरी ते गरीब व इकडे तिकडे पसरले असल्यामुळे त्यांच्याने काही अपकार करवत नाही व इतर लोकांस काही त्रास झाला नसून त्यांचे नुकसान नसल्यामुळे ते काही गडबड करीत नाहीत. गडबड केल्यास इतरांप्रमाणे आपलीही स्थिती खास होईल हे त्यांस पक्के माहीत असते.

यावरून असे सिद्ध होते की. ज्या वसाहतीतील लोकांवर परकीयांचे ओझे फार थोडे पडते, ते फार प्रामाणिक असून निरुपद्रवी असतात आणि ज्या थोड्या लोकांवर जुलूम फार होतो ते गरीब असून वर सांगितल्याप्रमाणे पसरून राहिलेले असतात, म्हणून त्यांच्या हातून काही उपद्रव होण्याचा संभव नसतो. दुसरे असे ध्यानात ठेवले पाहिजे की, लोकांना एकतर खुश करून पाहिजे तसे राहू द्यावे अथवा मुळीच नाहीसे करून टाकावे. कारण त्यांस थोडीशी इजा पोहोचली असता ते सूड उगवून घेण्यास उद्युक्त होतात; परंतु त्यांस अतिच दुःख दिले अस त्यांच्या हातून काही होणे नाही. म्हणूनच इजा देणे झाल्यास तिचा सूड घेता येणार नाही अशीच दिली पाहिजे.

परंतु वसाहत न करता सैन्यच जर नवीन जिंकलेल्या प्रांतात नेऊन ठेवले, तर त्यास खर्च लागून त्या प्रांताचा सर्व वसूल त्या सैन्याच्या खर्चाकडेसच खपून जाईल व असे झाले

म्हणजे नवीन प्रांत जिंकल्याचा काय उपयोग? शिवाय सैन्याचा तळ वरचेवर खाली-वर बदलावा लागतो, यामुळे लोक नाखुश होतात. अशा त्रासाने प्रत्येक मनुष्यास चीड येऊन तो सूड घेण्यास प्रवृत्त होतो व प्रत्यक्ष स्वतःच्या ठिकाणात येऊन परक्यांकडून ज्या लोकास उद्धटपणाची वागणूक सोसावी लागते, ते लोक फार भयंकर व अपरिहार्य शत्रू बनून जातात. यावरून सर्व गोष्टींचा विचार करिता परदेशात आपले सैन्य नेऊन ठेवणे फायदेशीर नाही असे दिसते व वसाहत करणे फार उपयोगाचे दिसते. शिवाय जो राजा नवीन जिंकलेल्या परमुलखात जाऊन राहील त्याने जे कोणी इतरशेजारी लहानसहान राजे थेथे असतील त्यांचा मुख्य व संरक्षणकर्ता झाले पाहिजे व होईल तो प्रयत्न करून आपल्यापेक्षा बलिष्ठ असतील त्यांची शक्ती मोडली पाहिजे व स्वतःइतका बलाढ्य त्याच प्रांतात दुसरा कोणी न राहू देण्याविषयी फार जपले पाहिजे. कारण जे कोणी असंतोषी असतील ते इर्षेने अगर भीतीने अशा बलिष्ठ मनुष्याचे साहाय्य घेऊन गडबड करण्यास प्रवृत्त होतील. ही गोष्ट इटालिअन लोकांवरून चांगली दिसून येईल. कारण या लोकांनी रोमन लोकांस ग्रीसमध्ये बोलावून आणले व हे रोमन लोक दुसऱ्यांनी काही तरी आशा दाखविल्याशिवाय जाणारे नव्हते. अशा प्रसंगी साधारण मार्ग म्हटला म्हणजे हा आहे की, परकीय राजा एखाद्या प्रांतात शिरताक्षणीच जे कोणी शक्तिहीन असतात, ते आपल्यापेक्षा वरिष्ठ असतील त्यांच्याशी वैरभाव धरून व त्यांचा हेवा करून नवीन आलेल्या राजास मिळतात. अशा या हलक्या लोकांस आपल्याकडे वळवून घेण्यास हयगय करू नये आणि असे त्यांनी त्यासवळवून घेतले म्हणजे ते मोठ्या खुशीने सर्व जण जिंकलेल्या राज्याकरिता काम करण्यास उद्युक्त होतील. फक्त ज्याने तो मुलूख जिंकला, त्याने अशा लोकांस वरचढ होऊ देण्याविषयी अथवा त्याच्या हातात फारसा अधिकार न राहू देण्याविषयी फार जपले पाहिजे. असे केले तर तो त्यांच्या मदतीने आपल्या सैन्याच्या जोरावर, शेजारी राजाचा वरचढपणा चालू देता त्या सर्व मुलखामध्ये आपणच मुख्य होऊन बसेल. ही गोष्ट जो शहाणपणाने करणार नाही तो मिळवलेले सर्व थोड्याच वेळांत घालवून टाकील आणि त्याचा उपभोग करीत असताही त्यास फार त्रास आणि गैरसोई सोसाव्या लागतील. आपल्या नवीन जिंकलेल्या मुलखाच्या संबंधाने या सर्व गोष्टी रोमन लोकांनी ध्यानात ठेवल्या. त्यांनी नवीन वसाहती केल्या. लहानलहान सरदारांचे संरक्षण करून त्यांना फार प्रबळ होऊ दिले नाही. जे कोणी बलवान होते त्यांस नेहमी आपल्या कह्यात ठेवले आणि एखाद्या परकीय राजास आपल्या मुलखात कोणत्याही प्रकारे संबंध ठेवू दिला नाही. इटोलिअन्स आणि एकिअन्स यांचे संरक्षण केले. म्यासडोनिअन लोकांचे राज्य धुळीस मिळवले आणि ॲन्टिओकसला हाकलून दिले. तथापि एकिअन्स आणि इटोलिअन्स यांचा प्रमाणिकपणा आणि योग्यता यांच्यामुळे त्यांच्या हातात जास्त सत्ता आली नाही. फिलिपने पुष्कळ उपाय व खटपटी केल्या, तरी त्याचा पूर्ण मोड होईपर्यंत रोमन लोक त्याचे स्नेही झाले नाहीत. तसेच ॲन्टिओकसला अधिकार मोठा

असतानाही त्या प्रांतातील त्याच्या हातात काही एक सत्ता ठेवण्याचे त्यांनी कबूल केले नाही. या सर्व गोष्टी करताना एखाद्या शहाण्या राजाप्रमाणे केवळ प्रस्तुत फायद्याकडेच लक्ष न देता भावी गैरसोईकडे सुद्धा त्याचे लक्ष होते व त्याप्रमाणे होईल तितके त्यांनी प्रयत्नही केले. कारण ज्या अडचणी फार लांबच्या दिसतात त्या लवकर नाहीशा करता येतात; परंतु आरंभी त्याजकडे दुर्लक्ष केले असता त्याजविषयीचे उपाय वेळेवर न झाल्यामुळे त्या नाहीशा होणे कठीण पडते. ही गोष्ट वैद्यकशास्त्रातल्या क्षयज्वरासारखीच आहे. ज्याप्रमाणे तो आरंभी एकदम कळत नाही व कळला तर लवकर बरा होतो; परंतु पूर्वी कळला नसून तसाच जाऊ दिला तर आरंभीच काही उपाय न झाल्यामुळे पुढे तो एकदम नजरेस येतो खरा; परंतु मग तो बरा होणे दुर्घट. तद्वतच ही राज्यस्थिती आहे. ज्या गोष्टी आरंभीच दिसून येतात व त्या शहाण्यासच लवकर दिसतात. त्यांजविषयी लवकर तजवीज करता येते; परंतु त्या ढळढळीत दिसून येण्याजोग्या निष्काळजीपणाने तशाच राहू दिल्या असता मग काही उपाय करता येत नाही व त्या असाध्य होऊन जातात. या गोष्टीला अनुसरूनच रोमन लोकांनी पुढे येणाऱ्या अडचणीची योग्य वेळीच तरतूद करून ठेवली आणि लढाई टाळण्याकरिता कोणतेही संकट सोसून घेतले नाही. कारण त्यांस पक्के माहीत होते की, लढाई ही अजिबात न टळता फक्त लांबणीवर जाईल आणि यामुळे शत्रूला मात्र फायदा मिळेल. या सर्व गोष्टी ध्यानात आणून फिलिप आणि ॲन्टिओकस यांस इटली देशावर हल्ला करू देण्यापेक्षा ग्रीस देशात त्यांच्याशी लढाई करणे त्याने पत्करले आणि वास्तविक पाहिले असता एकाचीही त्यावेळी जरूर नव्हती. दोन्ही गोष्टी त्यावेळी त्यांना टाळता आल्या असत्या; परंतु तसे करणे त्यांस बरे वाटले नाही. कारण अलीकडचे नवीन मुत्सद्दी जे वारंवार म्हणतात की 'होता होई तोपर्यंत प्रस्तुतच्या फायद्याकडे लक्ष देऊन चालावे,' असे करणे त्यास कधीही बरे वाटले नाही. तर आपल्या शहाणपणाचा आणि धैर्याचा उपयोग करणे त्यांस बरे वाटले. कारण कालेकरून सर्व गोष्टी घडून येतात. ज्याप्रमाणे दुःख त्याप्रमाणे सुख व ज्याप्रमाणे सुख त्याप्रमाणे दुःख ही दोन्ही कालेकरूनच येतात. आता आपण फ्रान्स देशाचे उदाहरण घेऊ. फ्रेंच लोकांनी जे काही केले ते वरील नियमास अनुसरून होते किंवा नाही ते पाहू आणि या गोष्टीच्या प्रत्यंतराकरिता आठव्या चार्लसचे उदाहरण न घेता बाराव्या लुईचे घेऊ. कारण त्या राजाची वर्तणूक आणि कामे ही (त्याची सत्ता इटली देशामध्ये फार दिवस असल्यामुळे) सर्व लोकांस जास्त माहीत होती आणि त्यावरून असे दिसून येईल की, इतके भिन्न राज्य राखण्याकरिता ज्या ज्या काही गोष्टी

करणे जरूर होत्या, त्या सर्वांच्या उलट तो वागला. या लुई राजाला व्हेनीशियन लोकांनी आपला अर्धा लांबर्डी प्रांत परत घेण्याच्या इच्छेने इटलीमध्ये बोलावून आणिला. तिकडे त्याने जाण्याचे पत्करिले हे गैर केले असे आमचे म्हणणे नाही आणि त्या देशामध्ये आपले कोणी स्नेही असताना तेथे आपली सत्ता स्थापित करण्याचा उद्देश तेथे होता असेही नाही; परंतु त्याच्या पूर्वीचा राजा चार्लस् त्याने इटलीतील जे कोणी सरदार फ्रेंचांचे मित्र होते त्यास वाईट रीतीने वागवल्यामुळे त्याला (लुईला) सारेच प्रतिकूल झाले आणि जे कोणी मिळतील त्यासच स्नेही मानत जावे, इतके असूनही आणखी इतर दुसऱ्या गोष्टीमध्ये त्याने जर काही चुका केल्या नसत्या तर ही वरील गोष्टही त्याला बरीच फायदेशीर झाली असती. कारण लांबर्डी प्रांत त्याने जिंकला नाही तोच जो मान आणि वैभव चार्लस राजाने घालवला होता तो त्याने सर्व परत मिळविला. जिनोवा त्याच्या स्वाधीन झाले. फ्लारेन्स येथील राजा त्याचा स्नेही होण्याची इच्छा धरू लागला. म्यान्चुआ येथील मार्किस, फेराराचा ड्यूक, पेंटिव्होलिओ म्याडम डी फरली, फेंझा पेसोरो रायमिनी क्यामेरिनो, पायोंबिनो या सर्व ठिकाणचे सरदार आणि बाकी सर्व लोक लुईचे सख्य आणि स्नेहभाव संपादन करण्याविषयी त्याच्याशी बोलणी लावू लागले. असे झाले तेव्हा व्हेनिशियन लोकांना आपली चूक कळू लागली. कारण लांबर्डी मधील दोन शहरे मिळविण्याच्या आशेने फ्रेंच राजाला त्यांनी सर्व दोनतृतीयांश इटलीचा राजा करून सोडले. अशा प्रसंगी त्या राजाने वरील नियम ध्यानात ठेऊन जर स्नेही म्हणवलेले लोकांचे संरक्षण केले असते, तर सर्व त्याने मिळवलेले लौकिक राखणे किती सोपे होते. हे प्रत्येकाला सहज कळन येण्यासरखे आहे. कारण त्याने मिळवलेले स्नेही जरी पुष्कळ होते तरी ते निर्बळ आणि काहींना पोपाची आणि काहींना व्हेनिशियन लोकांची भीती असल्यामुळे त्यालाच साहाय्य करण्यास उद्युक्त असणे त्यांस जरूर होते आणि इतकी मदत असता कोणी कसाही शत्रू आला तरी त्यास आपले संरक्षण करता आले असते; परंतु तो मिलनमध्ये आला नाही तोच त्याने धरसोड आरंभली व आपली मदत मागण्यास आलेल्या लोकांशी कृतघ्नपणा करून व त्यात आपलेच नुकसान आहे, इकडे लक्ष न देता पोप आलेक्झांडर यांच्या ताब्यात रोमाना प्रांत आणून देण्याविषयी तो त्यास मदत पाठवू लागला व पोपाचा धर्मसंबंधी इतका जबरदस्त अधिकार होता त्यात या राजकीय अधिकाराची त्याने भर घातली आणि एक चुकी केली असतानाही,तेथेच न थांबता तो पोप अलेक्झांडरच्याच विरुद्ध जाऊन टस्कनी प्रांत ताब्यात घेण्याची जी पोपाची इच्छा होती, तिच्या आड तो येऊ लागला. यामळे इटलीमध्ये त्यास पुन्हा यावे लागले. आपल्या स्नेह्यांस सोडून देऊन व पोपाचा अधिकार वाढवून इतक्यावरच तो थांबला असे नाही, तर नेपल्सचे राज्य मिळविण्याची उत्कट इच्छा धरून तो स्पेनच्या राजांशी नेपल्सचा भागीदार झाला. असे करण्याने पूर्वी जो, तो इटलीमध्ये एकटाच होता, त्याऐवजी त्याला आता एक

भागीदार होऊन बसला. म्हणजे त्या देशातील जे कोणी महत्त्वाकांक्षी लोक होते व जे कोणी लुईविषयी असंतुष्ट होते, त्या सर्वांस आता स्पेनचा आश्रय मिळण्याची सहज सवड झाली आणि नेपल्सचा राजा जो खुशाल लुईकडून असामी खाऊन बसला असता, त्यास त्यांनी हाकलून दिल्यामुळे तो त्याचा शत्रू बनून स्वतःलाच इटली सोडून निघून जाण्याची पाळी येऊन ठेपली.

राजांनी आपले राज्य वाढविण्याची इच्छा धरणे हे केवळ साहजिक असून उघड आहे आणि जेव्हा ते कोणतेही काम शक्यनुसार हाती घेतात तेव्हा त्यांची तारीफ होते. निदान त्यांना दूषण तरी कोणी देत नाही; परंतु आपणास न तोलण्याजोगे काम ते हातात घेऊन बसले म्हणजे, त्यांना लोकांकडून दूषण मिळते व हे दूषण मिळणे अयोग्य आहे असे नाही.

यावरून असे दिसते की, फ्रान्सच्या राजाने फक्त आपलेच सैन्य बरोबर घेऊन शक्तीप्रमाणे जर नेपल्सवर हल्ला केला असता तर ते करणे योग्य होते; परंतु जर आपली शक्ती फार नव्हती, तर तिचा दुसरीकडे व्यय करणे रास्त नव्हते आणि जर लांबींमध्ये जाऊन व्हेनिशियन लोकांस मदत करण्याचे त्याने कबूल केले हे बरोबर आहे असे आम्ही वर म्हटले असेल, तर त्याचे कारण इतकेच की. इटलीमध्ये कसा तरी प्रवेश करून घेणे वावगे नव्हते. परंतु स्पेनचा राजा व आपण मिळून नेपल्स विभागून घेतले हा त्याने मोठा प्रमाद केला; कारण वरच्या प्रमाणे असे करण्याची काही एक जरूर नव्हती. म्हणून या स्वारीमध्ये लुई राजाने पाच चुका केल्या. त्याने हाताखालच्या सरदार लोकांचा नाश केला. त्याने शेजारी राजाचा मुलूख वाढू दिला. आपल्या इतकाच बलिष्ठ असा दुसरा राजा त्याने आपल्याबरोबर त्या देशात आणला. त्याने स्वतः तेथे हजर राहण्याचे केले नाही आणि नवीन वसाहती केल्या नाहीत. इतक्या सर्व चुकांच्या योगानेही तो जिवंत असेपर्यंत फारशी अडचण त्यास येणार नव्हती; परंतु आणखी एक त्याने मोठी सहावी चूक केली. ती ही की, त्याने व्हेनिशियन लोकांचीच शक्ती अगदी कमी करून टाकली. जर त्याने पोपाला मदत दिली नसती व स्पेनच्या राजाला इटलीमध्ये आणले नसते, तर मात्र व्हेनिशियन लोकांची शक्ती कमी करणे वावगे झाले नसते; परंतु प्रथम ठरल्याप्रमाणे त्याने व्हेनिशियन लोकांचा नाश करणे वाजवी नव्हते. कारण जोपर्यंत व्हेनिशियन लोकांना काही धक्का लागला नव्हता, तोपर्यंत लांबर्डीमध्ये दुसऱ्या कोणाचा त्यांनी शिरकाव होऊ दिला नसता व 'लांबर्डी सबंध सोडून तुमचे हवाली करतो,' असे त्यांस वचन मिळाल्यावाचून त्यांनी ही गोष्ट पत्करली नसती. फ्रेंचाकडून हा प्रांत सोडवून देण्यास बहुतकरून कोणीही तयार झाले नसते, कारण फ्रेंचांशी सामना करण्यास त्यावेळी फारशी कोणात ताकद नव्हती. कोणी असे म्हणतील की, लढाई टाळण्याकरिताच लुईने रोमाना प्रांत पोपाला देऊन नेपल्स स्पेनच्या राजाला दिले, तर त्यास वरप्रमाणेच माझे असे उत्तर आहे की, लढाई टाळण्याकरिता प्रस्तुत अडचण सोसणे बरोबर नाही, कारण लढाई अगदी टळणे दुरापास्तच आहे. फक्त ती काही दिवस लांबणीवर जाईल आणि जेव्हा ती करण्याचा पुढे

प्रसंग येईल, त्यावेळी पूर्वीपेक्षा जास्त नुकसान झाल्यावाचून राहणार नाही.

असेही कदाचित् कोणी म्हणतील की, पोपाला साह्य करण्याचे वचन लुईने दिले. त्याचा हेतू काही निराळाच होता. पोपाने लुईला लग्नाची काडी मोडून देण्यामध्ये मदत केली होती व लुईच्या मध्यस्थीवरून पोपाने आंब्रासच्या लेगेटाला धर्मसंबंधात मोठा अधिकार दिला होता. या पोपाने केलेल्या उपकाराची काही तरी फेड करणे लुईला जरूर होते, म्हणून त्यास साह्य करण्याचे लुईने पत्करले असे कोणी म्हणतील, तर त्यांस माझे उत्तर पुढील एका भागी 'राजाचा प्रामाणिकपणा' या विषयावर सापडेल व राजाने आपले वचन कोठवर राखावे हेही तेथेच सविस्तर सांगण्यात आले आहे. यावरून हे सिद्ध आहे की, लुईच्या हातून लांबर्डी प्रांत जो गेला तो केवळ परकीय मुलूख जिंकून तो आपल्या ताब्यात राखण्याचे जे काही नियम आहेत, ते त्याने पाळले नाहीत म्हणून. बरे, हे नियम तरी अगदी अपरिचित आहेत असे बिलकूल नाही. दररोज याच नियमाचे अनुकरण केलेले आपण पाहतो. ज्यावेळी व्हालेंटाईनने रोमाना प्रांत बळकावला त्यावेळी आंब्राझचा कार्डिनल याजबरोबर माझे या विषयावर संभाषण झाल्याचे मला आठवते. आमचा वादविवाद फार जोराने चालला असता कार्डिनलने जेव्हा मला सांगितले की, इटालियन लोक लढाईमध्ये वाकबगार नाहीत, तेव्हा मी उत्तर दिले की, 'फ्रेंच लोकसुद्धा राज्य कारभार चालविण्यामध्ये तितकेच हुशार आहेत, कारण जर त्यांना राजनीतीचे थोडेसे तरी ज्ञान असते, तर त्यांनी धर्माची सत्ता जी इतक्या उच्चतेस कळसास नेऊन पोहोचवली ती पोहोचवली नसती.' आणि अनुभवावरून असे सिद्ध झाले आहे की, पोपाचे वैभव आणि स्पेनची इटलीमध्ये सत्ता वाढण्याचे कारण फ्रान्सच होय व याचमुळे फ्रेंचांचा मोड होऊन त्यांस इटली सोडून जावे लागले.

या सर्व गोष्टींवरून एक सर्वसाधारण नियम असा दिसतो की, जो कोणी दुसऱ्यास मोठा करण्यास कारणीभूत होतो, तो स्वतःचाच नाश करतो. कारण दुसऱ्यास मोठा करणे म्हटले म्हणजे स्वतःच्या अंगी काही तरी तशी शक्ती अथवा वर्तन असले पाहिजे व जो मोठेपणास चढला असेल त्यास ही मोठी शक्ती अथवा वर्तन सहजच सहन होणार नाही.

○○○

भाग-४

अलेक्झांडर बादशहाने हिरावून घेतलेले डेरिअस राजाचे राज्य अलेक्झांडर वारल्यावर त्याच्या मागून जे राजे झाले त्यांजकडे कसे टिकले याविषयी

नवीन मिळविलेले राज्य राखण्यामध्ये काय काय अडचणी आहेत याविषयी विचार झाला. आता अलेक्झांडर बादशहा थोड्याच वर्षांत एशिआ काबीज करून लागलीच मरण पावला, तरी त्या राज्यात बंडे वगैरे काहीच झाली नाहीत. हे असे कसे झाले, याविषयी या ठिकाणी विचार करणे होणार नाही. अलेक्झांडरच्या मागून जे राजे झाले त्यांनी काही दंगेधोपे झाल्याशिवाय पुष्कळ दिवसपर्यंत मोठ्या शांततेने ते राज्य चालवले. मात्र, त्या राजांचा लोभ आणि महत्त्वाकांक्षा हीच काय ती त्यांस जाचक झाली. या वरील प्रश्नास माझे असे उत्तर आहे की, सर्व एकसत्ताक राज्ये फक्त आजपर्यंत दोन रीतीनींच चालू आहेत. पहिली, राजाने केवळ स्वतःच्या इच्छेने प्रधान म्हणून काही नोकर ठेवून त्यांच्या सल्लामसलतीने राज्यकारभार चालवणे व दुसरी राजाने आपल्या सरदारांच्या मदतीने राज्यकारभार चालवणे. हे सरदार पदवीस चढले ते त्या राजाच्या मेहरबानीने अथवा काही शर्तीवर चढले असे नव्हे, तर जन्मतःच ते बडे घराण्यातील असन पिढीजादे असतात. या सरदारांस त्यांचे मुलुख व प्रजा वाटून दिलेल्या असतात. या प्रजा त्या सरदारांचीच सत्ता कबूल करून त्यांसच सर्व मानपान वगैरे देतात. ज्या राज्यामध्ये एक राजा व प्रधान इत्यादी त्याने ठेवलेले नोकर राज्य चालवितात त्याठिकाणी तो राजा जास्त स्वतंत्र व जुलमी असतो. कारण त्यांचे वर्चस्व सर्वांवर सारखे असते आणि जर दुसऱ्या कोणाचे वर्चस्व लोकांनी मानले, तर ते केवळ जो प्रतिनिधी अथवा प्रधान असेल त्या व्यक्तीकरिता असे नव्हे. या दोनही पद्धतीची उदाहरणे आमच्या इकडे हल्ली सापडतील. ग्रांडसीनिअरचे उदाहरण पहिल्या पद्धतीचे व फ्रान्सच्या राजाचे उदाहरण दुसऱ्या पद्धतीचे. टर्कीच्या सर्व राज्यावर एकच राजा असून बाकीचे त्याने ठेवलेले नोकर, गुलाम वगैरे आहेत. त्याने आपल्या राज्याचे प्रांत, महाल असे विभाग केले आहेत. (या विभागांस सांगिआकी म्हणतात.) व त्याजवर ज्या-ज्या वेळी जे कोणी

कामदार योग्य दिसतील, त्यांस त्यावेळी तेथील कारभार पाहण्यास तो पाठवतो व वाटेल तेव्हा त्यांची बदलीही करतो; परंतु फ्रान्सची गोष्ट अशी नाही. तो राजा पुष्कळ सरदारांतच राहत असतो. या सरदारांच्या प्रजा पुष्कळ दिवसापर्यंत त्यांचाच वंश कबूल करीत असून त्यांच्याशी अनुरक्तही असतात. यामुळे त्या सरदारांचे महत्त्व राहते. त्यांची सत्ता राजाने हिसकावून घेतली तर स्वतःवरच संकट आल्याशिवाय राहत नाही. या दोन्ही राज्यांची तुलना केली असता असे सहज दिसून येई की, टर्कीचे राज्य जिंकण्यास कठीण खरे; परंतु एकदा जिंकल्यावर ते राखणे फारसे कठीण नाही. ते जिंकण्यास कठीण जाण्याचे कारण, त्या राज्यातील बडे लोक परकीय राजास जाऊन मिळणार नाहीत अथवा मोठमोठे कामदारही त्यास मदत करणार नाहीत. हे वर सांगितलेल्या नियमांप्रमाणे साहजिकच आहे. कारण सर्वच गुलाम असून राजाच्या बंधनामध्ये असल्यामुळे त्यांची मने वाईट गोष्टींकडे लवकर प्रवृत्त होत नाहीत आणि जर ते वाईट मार्गाकडे प्रवृत्त झालेच, तर त्यांस कोणी साहाय्यकर्ता नसल्यामुळे त्यापासून यांस काही एक फायदा होणे नाही. म्हणून जो जो कोणी टर्कीवर हल्ला करण्यास प्रवृत्त होईल त्यास तो देश अविभक्त व एकीभूत असाच दिसेल. याकरिता तो जिंकण्यास मदत काय ती स्वतःचे सैन्य असेल तेवढीच. त्या देशातील अव्यवस्थेचा जिंकणाऱ्यास काही उपयोग होणे नाही; परंतु एकवार त्यांना जिंकून त्यांचे सर्व सैन्य नाहीसे करून टाकले म्हणजे पुरे; मग पुढे भीती नाही. कारण जिंकलेल्या राजाच्या वंशीयांशिवाय दुसऱ्या कोणास त्या देशांतील लोकांची कळकळ असत नाही. तो वंश नाहीसा केला म्हणजे झाले. इतर लोकांचा जसा लढाईच्या पूर्वी काही उपयोग नव्हता, तद्वतच लढाईनंतर त्यांची भीतीही नाही; परंतु फ्रान्ससारखा राज्यकारभार जेथे चालतो तेथे निराळेच घडून येते. कारण काही सरदारांस आपलेसे करून घेतले म्हणजे राज्यामध्ये प्रवेश होण्यास उशीर नाही. नेहमी कोणी ना कोणीतरी सरदार असंतुष्ट असून काही तरी फेरफार होण्याची इच्छा करीत असतात. ते परकीयांचा प्रवेश सहज करू शकतात व त्यांस जय मिळविण्यास त्यांचे साहाय्य उपयोगी पडते; परंतु एकदा जिंकल्यावर त्याचे संरक्षण करणे म्हणजे फार त्रासाचे आणि संकटाचे काम आहे व हे संकट आपणावर व आपल्या शत्रूवरही सारखेच येते. तेथील राजाचा वंशच नाहीसा करून परेसे होत नाही. कारण ज्या अर्थी दसरे सरदार प्रबळ असतात, त्या अर्थी कोणताही बखेडा झाला असता, प्रसंगानुसार ते त्यामध्ये मुख्य होतील व त्यांस संतुष्ट राखणे अथवा अगदी नाहीसे करून टाकणे या दोनही गोष्टी अशक्य असल्यामुळे प्रथम जे बंड होईल, त्यातच त्या जिंकणाराचा नाश होऊन जाईल.

बरे, डेरिअसच्या राज्यपद्धतीचा विचार केला असता, असे दिसून येईल की. ती तर्क लोकांसारखी होती. म्हणनच अलेक्झांडरास त्यांच्याशी लढाई करून त्यास जिंकणे भाग पडले. डेरिअस मरण पावल्यावर वर निर्दिष्ट कारणामुळे पर्शियन लोक अलेक्झांडराच्या अमलाखाली शांतपणे राहिले व पुढेही अलेक्झांडराच्या मागून जे राजे झाले ते जर एकीने

राहते, तर पर्शियन लोकांवर त्यांस पुष्कळ दिवस शांतपणे राज्य करता आले असते, कारण त्या राज्यांत पुढे जी बंडाई झाली ती लोकांकडून झाली नव्हती, तर राजांची आपसातलीच होती; परंतु फ्रान्स देशासारखी जेथे राज्यपद्धती आहे त्या ठिकाणी निराळाच प्रकार दिसून येतो. अशी राज्ये शांतपणे चालविणे अशक्य आहे. या मुळेच स्पेन, फ्रान्स आणि ग्रीस ही राज्ये रोमन लोकांपासून स्वतंत्र झाली; कारण या राज्यांमध्ये दुसरी लहान लहान पोट राज्ये पुष्कळ होती व जोपर्यंत ही लहान लहान राज्ये कायम होती, तोपर्यंत रोमन लोकांची सत्ता कशी तरी चालली; परंतु रोमन लोकांचे राज्य जसजसे वृद्धिंगत होत गेले तसतशी ती नाहीशी झाली व रोमन लोकांचे राज्य निर्भय झाल्यामुळे ते आपसातच तंटे करू लागले. प्रत्येक रोमन अंमलदारास त्याच्या सत्तेच्या मानाने लोक जमा करून समरांगणी येणे सुलभ पडू लागले. याचे कारण इतकेच की, तेथील मूळचे राजवंश नाहीसे झाल्यामुळे, रोमन शिवाय दुसरे कोणीही राजे म्हणून मानण्यास राहिले नव्हते. या सर्व गोष्टी ध्यानात घेतल्या म्हणजे अलेक्झांडरला सुदैवाने एशिआचे राज्य राखता आले व पिरस आणि दुसरे राजे यांस ते राखणे कठीण पडले, यात आश्चर्य नाही. ज्याने एवढे राज्य जिंकले त्याच्या केवळ अंगच्या गुणामुळेच ते राज्य त्याजकडे राहिले असे नाही, तर याचे कारण विषयभिन्नत्वाचे होय.

❍❍❍

भाग-५

स्वतःच्याच अमलाखाली स्वतंत्र चालत आलेली राज्ये व शहरे जिंकली असता कशी राखावी याविषयी

जी राज्ये स्वतःच्याच अमलाखाली फार दिवस स्वतंत्रतेने चालली असतात, ती जिंकली असता राखण्याचे तीन मार्ग लक्षात ठेवले पाहिजेत - एक तर त्यांस समूळ नाहीशी करणे, दुसरा, जिंकणाराने स्वतः जाऊन तेथे राज्य करणे व तिसरा हा की (त्याजपासून खंडणी घेऊन स्वस्थ बसणे) त्याठिकाणी आपल्या तर्फेच व काही इतर लोक मिळून एक राज्यसभा स्थापित करून जिंकलेल्या लोकांस आपल्या पर्वस्वतंत्रतेचा व कायद्यांचा उपभोग घेत आनंदाने आपल्या ताब्यात राहू देणे हा होय व ही राज्यसभा आपणच स्थापित केली असून आपली कृपा आणि सत्ता असली तरच कायम राहता येईल, असा तिचा समज असल्यामुळे ही कृपा आणि अधिकार जेणेकरून वाढतील ते प्रयत्न करण्यास ती कधीही चुकणार नाही. पूर्वापार स्वतंत्रता भोगत आलेल्या शहरास आपल्या ताब्यात राखण्यास सुलभ मार्ग हा आहे की, त्या शहरवासी लोकांस तेथची कामे द्यावी. ही गोष्ट स्पार्टन्स आणि रोमन्स यांच्या उदाहरणांवरून व्यक्त होईल. स्पार्टन्स लोकांनी अथेन्स आणि थीब्स हस्तगत करून घेऊन आपल्या मर्जीप्रमाणे त्यांनी त्याठिकाणी अल्पजनाधिपत्य'[१] स्थापित केले. तरी ही शहरे त्यांच्या हातातून लवकरच गेली. रोमन लोकांनी क्यापुवा, कार्थेज, न्युम्यानशिया, ही शहरे आपल्या अमलाखाली राखण्याकरिता अगदी नाहीशी करून टाकली म्हणूनच ती त्याजकडे राहिली; परंतु पुढे स्पार्टन्स लोकांप्रमाणेच त्यांनी ग्रीस देशाला तेथील स्वतंत्रता व मूळचे कायदे वगैरे कायम राखून आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला; परंतु ही त्यांची चुकी त्यांस लवकरच कळून आली व आपल्या ताब्यात ठेवण्याकरिता ग्रीस देशातील पुष्कळ शहरांचा त्यांस नाश करून टाकावा लागला. खरोखर पाहिले असता माझ्या मते हाच काय तो एक उत्तम मार्ग आहे. कारण जो कोणी एखादे स्वतंत्र शहर जिंकून त्याचा नाश करून टाकीत नाही. त्याची ही चूक होऊन स्वतःचाच नाश होण्याची पाळी येते. तेव्हा शहरवासी

लोक बंड करण्याविषयी उद्युक्त होतात, तेव्हा आपल्या पूर्वजांनी केलेल्या कायद्याच्या व स्वतंत्रतेच्या मंगल नावावर त्यांस निर्भय राहता येते व हे कायदे आणि ही स्वतंत्रता कितीही काल गेला तरी अथवा परकीयांकडन चांगली वागणूक मिळाली तरी नाहीशी होणारी नसते आपण कितीही काळजीपुरस्सर खटपट केली, तरी तेथील लोकांमध्ये आपसात भिन्नभाव झाल्याशिवाय अथवा त्यांनी देशत्याग केल्याशिवाय त्याच्या पूर्वीच्या स्वतंत्रतेचा बाणा त्यांच्या मनातून कधीही निघून जाणार नाही. उलट हरएकप्रसंगी तो वाढवण्याकडेच त्यांचे प्रयत्न चालतील. पीसाचेच उदाहरण पाहा की, फ्लारेन्टाईन्सच्या अमलात पुष्कळ दिवस राहूनही ते शहर पुनः पूर्व स्थितीवर आले; परंतु ज्या देशातील व शहरातील मूळच्या राजघराण्याचा नाश झाला आहे तेथील गोष्ट निराळी असते. अशा लोकांस दुसऱ्याची आज्ञा पाळण्याची सवय झाली असल्यामुळे व पूर्वीचे राजघराणे नाहीसे झाल्यामुळे त्यांना दुसरा नवीन राजा करणेही कठीण पडते आणि राजाशिवाय स्वतंत्रपणे राहणेही कठीण पडते, म्हणून ते बंड करणस सहसा उद्युक्त होत नाहीत व नवीन जिंकणाऱ्याला त्यांस सहज खुश ठेवता येते व तसे ठेवले म्हणजे तो निर्भय असतो; परंतु प्रजासत्ताक राज्यांमध्ये लोकांचा द्वेष जास्त दृढ झालेला असतो.कितीही सूड घेतला तरी त्यांची तृप्ती होत नाही व पूर्वीच्या स्वतंत्रतेविषयी त्यांचे स्मरण प्रखर असल्यामुळे त्यांना शांतपणे राहणे अशक्य आहे. या सर्व गोष्टी ध्यानात घेतल्या म्हणजे असे दिसून येईल की, एक तर अशा लोकांचा पुरा विध्वंस करून टाकला पाहिजे किंवा आपण स्वतः जाऊन त्यांच्यामध्ये राहिले पाहिजे, तरच जिंकलेले राज्य आपल्याकडे चालेल.

१ Oligarchy - ज्या राज्यपद्धतीत काही थोड्या निवडक लोकांच्या हाती राज्यसत्ता दिलेली असते त्या पद्धतीस 'अल्पजनाधिपत्त्य' असे म्हणतात.

❍❍❍

भाग-६

स्वतः योग्य वर्तनाने व शस्त्रांच्या जोरावर मिळवलेल्या राज्यांविषयी

नवीन मिळविलेल्या राज्यांचे अगर संस्थानांचे विवेचन करताना आम्ही विशेष प्रख्यात अशी उदाहरणे देतो. याजबद्दल कोणास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. लोक बहुतकरून गतानुगतिक असतात व कोणतेही महत्कृत्य करताना, तशा प्रकारचे एखादे उदाहरण त्यांच्या समोर असते. तथापि ज्या उदाहरणाचे अनुकरण करण्याचे त्यांच्या मनात असते, त्याच्याशी सर्वांशीच बरोबरी करणे अशक्य असल्यामुळे महत्कृत्ये करून जे नामांकित झाले आहेत, अशांचीच उदाहरणे शहाण्या मनुष्याने नेहमी देत असले पाहिजे. म्हणजे त्या उदाहरणाप्रमाणे पूर्णपणेच जरी कोणाला वागता आले नाही, तरी त्याच्याप्रमाणे होईल तितके करण्यास लोक झटत असतात व थोडीशी तरी त्याची प्रतिमा उठल्याशिवाय राहत नाही. अनुभविक जे तीरकमठेवाले असतात, ते आपली तीर मारण्याची जागा फार लांब आहे असे पाहून आपल्या धनुष्याच्या प्रमाणाने तीर किती लांब जाऊन पडेल याचा विचार प्रथम करतात व नंतर खरोखर पाहिजे त्यापेक्षा जास्त लांबीवर आपला नेम धरतात. असे करण्यात त्यांचा हेतू ठरलेल्या ठिकाणापेक्षा जास्त लांबीवर तीर जाऊन पडावा असा नसतो, तर जरासा जास्त धरला म्हणजे तरी ठरलेल्या ठिकाणी नेम जाण्यास हरकत येऊ नये असा असतो. म्हणून असे दिसून येईल की, एखाद्या अपहारकाने, एखादे राज्य नवीन जिंकले असता ते केवळ दैवयोगानेच जर त्यास मिळाले असेल, तर ते राखणे फार कठीण आहे. अशा प्रकारे एखाद्या हलक्या मनुष्यास उच्च पदवीस येण्यास नशीब अथवा उत्तम गुण यांपैकी एकाची तरी निखालस जरूर आहे. म्हणून ज्याच्या अंगी ही दोन्ही असतात, त्याजकडे नवीन मिळवलेले राज्य नीटपणे राहण्यास फारशी हरकत पडत नाही. तथापि नशीब बलवत नसतानाही राज्य फार दिवस टिकल्याची उदाहरणे आहेत, तसेच एखाद्या राजास दुसरीकडे राहण्यास स्थान नसल्यामुळे नवीन मिळवलेल्या मुलखातच जाऊन राहावे लागते, यामुळे त्याचा पुष्कळ त्रास सहजी कमी होतो.

परंतु नशिबावरच केवळ हवाला न टाकता आपल्या शहाणपणाच्या जोरावर जे मोठेपणास चढले आहेत अशा लोकांची उदाहरणे पाहता उत्तम आणि जगप्रसिद्ध अशी म्हटली म्हणजे मोझेस्, सायरस, राम्युलस्, थीसस् इत्यादी होत. यांपैकी मोझेसचे उदाहरण येथे सांगणे कदाचित रास्त होणार नाही. कारण त्याने जे काय केले ते फक्त ईश्वराचे हुकूम अमलात आणले, तथापि ईश्वराशीच त्याचा परिचय होण्यास तरी त्याच्या अंगी काही अलौकिक गुण असला पाहिजे, म्हणून त्याचे उदाहरण येथे सांगणे अप्रशस्त होणार नाही. तसेच सायरस् वगैरे जे इतर मोठमोठे योद्धे झाले व ज्यांनी नवीन राज्ये स्थापित केली, त्यांच्याविषयी विचार केला असता ते अलौकिकच होते असे दिसून येईल व त्यांच्या चरित्रावरून त्यांचे पराक्रम पाहिले असता ते मोझेसच्या पराक्रमाहून फारसे भिन्न दिसून येणार नाहीत. कारण त्यांची कृत्ये पाहिली असता असे दिसून येईल की, ते केवळ नशिबाच्याच जोरावर मोठे झाले असे नाही. जे काय त्यांनी केले ते राज्यपद्धती स्थापन करते समयी जी संधी अगर योग जमून आला तो त्यांनी फुकट जाऊ दिला नाही. ही संधी आली नसती तर त्यांच्या शौर्याचे प्रयोजनही राहिले नसते व जर ते शहाणे नसते तर अशी संधी येऊनही व्यर्थ गेली असती. मोझेसने तरी इझरायलचे लोक इजिप्त लोकांच्या प्रतिबंधात राहू दिले. याचे कारण इतकेच की त्यांची तेथून सुटका करण्यास गेले असता आपला हुकूम पाळण्यास ते तयार होतील. राम्युलस हा आलबो येथून निघून लहान असतानाच हिंस्त्र पशूच्या तडाख्यात सापडला, ही गोष्ट त्याच्या पुढील पराक्रमाला अगदी जरूरी होती. कारण पुढे त्याने रोमन लोकांचे विस्तृत राज्य स्थापित केले. त्याप्रमाणेच मीडीस याने जुलूम चालविला. त्यावेळी पर्शियन लोकांनी बंड केले, ही गोष्ट सायरसच्या फायद्याचीच झाली. पुष्कळ दिवस राज्यात शांतता असल्यामुळे मीडीस हा अगदी निर्बल व निरूपद्रवी होऊन राहिला होता. म्हणून पर्शियन लोकांनी बंड करताच सायरस यास आपला पराक्रम गाजवण्यास संधी सापडली. अथीनियन लोकांवर संकटे येऊन जर त्यांच्यात गडबड सुरू झाली नसती, तर थीसस यास आपले शहाणपण आणि औदार्य प्रगट करण्यास सवड मिळाली नसती. असे जे मोठे योग घडून आले त्यांच्या योगानेच हे महान पुरुष प्रसिद्धीस आले. आपल्या लोकास सुधारून देशाची कीर्ती आणि मर्यादा वाढवण्यात ते चांगले निपुण होते. यावर सांगितलेल्या महान पुरुषांप्रमाणे जे आपल्या शहाणपणाच्या जोरावर उच्च पदास चढतात, त्यांसही आपला कार्यभाग साधण्यापूर्वी बहुत संकटे भोगावी लागतात; परंतु ती अनुभवाने त्यांच्या आटोक्यातली असल्यामुळे त्यांस त्यांचे सहज निवारण करता येते. आता नवीन मुलूख जिंकला म्हणजे त्याच्या संरक्षणार्थ नवीन रीतीभाती सुरू कराव्या लागतात व नवीन कायदेही अमलात आणावे लागतात, यामळे कधी कधी नवीन अडचणी उत्पन्न होतात व ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, स्वतःच्या पराक्रमावर राज्यपदप्राप्ती करून नवीन कायदे स्थापित करणे यासारखी कठीण गोष्ट दुसरी नाही. कारण अशी गोष्ट सिद्धीस जाणे बरेच अनिश्चित असून

सिद्धीस गेली असताही पुढे ती नीट राखणे बहुत धोक्याचे काम आहे. कारण ज्या लोकांची प्रवृत्ती जुने कायदे कायम राखण्याकडेच असते, ते सर्व लोक नवीन कायदे सुरू करणाऱ्याचे शत्रू बनतात आणि नवीन कायदे जरी कोणाला आवडत असले तरी असे लोक ते नवीन कायदे कायम राखण्यास मनापासून झटत नाहीत. कारण एक तर अशा लोकांस आपल्या इतर बांधवांची भीती असते आणि दुसरे असे की, एखादी नवीन गोष्ट अनुभवाने जोपर्यंत हितावह अशी ठरली नाही तोपर्यंत ती अमलात आणण्याकडे बहुधा फारशी प्रवृत्ती लोकांची होत नाही. यावरून असे सिद्ध होते, की जुने कायदे संमत असलेले लोक संधी सापडताच मोठ्या निकराने नवीन राजाच्या विरुद्ध बंड करतात व ते बंड मोडण्यास नवीन राजाकडून प्रयत्न होणे तो फारसा झटून न होता, तो राजा आणि त्याचे अनुयायी हे बहुतकरून एकदमच लयास जातात. म्हणून या गोष्टीचे निरूपण करताना असा विचार केला पाहिजे की, जो नवीन कायदे सुरू करतो तो आपल्या शहाणपणाच्याच जोरावर करतो किंवा त्यास पाठबळ इतर लोकांकडून असते. म्हणजे विचार करावयाचा की, तो केवळ आपल्या शब्दांनीच लोकांची मने वळवण्यास पाहतो अगर तो आपल्या शौर्यावर अवलंबून राहतो. जर तो केवळ आपल्या शब्दावरच अवलंबून राहील तर त्याचे हेतू सिद्धीस जाणार नाहीत; परंतु जो खरोखर शूर असून ज्यास नवीन कायदे लोकांकडून अंमलात आण्ण्याची शक्ती असते, त्यास काही संकट आड येत नाही व तो आपल्या म्हटल्याप्रमाणे सर्व गोष्टी करतो. याविषयी आणखी प्रत्यंतरे धर्मशास्त्रातही आहेत. धर्मशास्त्रावरून असे समजते की, जे साधू हातात शस्त्र घेऊन जुलमाने धर्मप्रसार करू लागले, त्यांचे इष्ट हेतू लवकर तडीस गेले; परंतु जे केवळ गोड गोड शब्दांनी उपदेश करीत फिरत गेले, ते मृत्यूच्याच तोंडी पडले अथवा हद्दपार झाले. याचे कारण वरील कारणाशिवाय आणखी असे आहे की, लोक बहुतकरून अस्थिर असतात व जरी एखाद्या नवीन मताकडे त्यांची मने वळली, तरी ते मत स्थापित करण्यास ते झटून प्रयत्न करीत नाहीत. अशा प्रसंगी लोकांचा विश्वास कमी होत आहे असे दिसताच जोराने तो कायम राखण्याविषयी प्रयत्न केला पाहिजे. मोझेस्, थीसस्, राम्युलस्, सायरस यांना जर आपले नवीन कायदे जुलमाने सुरू करण्याची शक्ती नसती, तर त्यांना कधीच यश आले नसते. याचे उलटपक्षी उदाहरण अलीकडच्या इतिहासावरून दिसते, ते हे की फ्रायर जेरोम साव्होना रोला याला फ्लारेन्स येथील लोकांनी सोडताच त्याचे नवीन कायदे स्थापित न होऊन त्याचा नाश झाला. कारण जे त्याच्या पक्षाचे होते, त्यांचा विश्वास त्यास कायम राखता येईना आणि जे त्याच्या उलट पक्षाचे होते, त्यांस आपल्या पक्षाचे करून घेण्याचीही त्यास शक्ती नव्हती. म्हणून अशा लोकांस आपले हेतू सिद्धीस नेत असता फार अडचणी येतात. ही सर्व संकटे दूर करण्याचे साधन अलौकिक शहाणपण किंवा दुसरे असेच काही असले पाहिजे. असे आहे तरी एकवार ते संकटातून पार पडताच, त्यांस लोक चाहू लागतात आणि ज्या लोकांस त्यांचा उत्कर्ष सहन होत नाही, ते लोक जिंकले गेल्यामुळे त्याचा अंमल

चिरकाल जागृत राहून त्यांचा बहुमान होतो व ते सुख पावतात. या संबंधाचे आणखी एक उदाहरण येथे देतो व ते जरी वरच्याप्रमाणे फारसे प्रसिद्ध नाही, तरी बाकीच्या सारखेच योगय असून या ठिकाणी ग्राह्य आहे. सायराक्यूझचा हायरो हा एक लहानसा गृहस्थ असता तेथील राजा झाला व असे होण्यास त्यास केवळ नशिबाचे साह्य होते असे नाही, तर आलेला योग त्याने वाया जाऊ दिला नाही, म्हणून त्यास यश आले. ज्यावेळी सायराक्यूझच्या लोकांवर जुलूम होऊ लागला, त्यावेळी हायरोला त्यांनी आपला सेनाध्यक्ष नेमले व हे काम त्याने इतके चांगले बजावले की, त्यास राज्यपद मिळाले ते यथायोग्य झाले. तो फार सद्गुणी, शहाणा व सर्वगुणसंपन्न होता. ज्यांनी ज्यांनी म्हणून त्याचा इतिहास लिहिला आहे, ते असे म्हणतात की, तो लहानसा गृहस्थ असतानासुद्धा त्याच्या मोठेपणास उणीव काय ती राज्यपदाचीच होती. कारण राज्यपद मिळाल्या बरोबर तो सर्वोत्कृष्ट राजा होईल, यात कोणास संशय वाटला नव्हता. या हायरोने जुने सैन्य जिंकून, नवीन स्थापित केले, जुन्या राजांचा स्नेह सोडून, नवीन राजांचा स्नेह संपादन केला व स्वतःचे सैन्य आणि स्नेही या पायावर पाहिजे तेवढी इमारत त्यास रचता आली. म्हणून त्यास ते राज्य आपल्या ताब्यात आणण्यास जरी प्रयास पडले, तरी ते ताब्यात आल्यावर त्याजकडे फारशा खटपटीशिवाय चालत गेले.

❍❍❍

भाग-७

इतर लोकांच्या साह्याने सहजरीत्या मिळालेल्या राज्यांविषयी

काही लोक अगदी साधारण गृहस्थ असताना केवळ नशिबाच्याच जोरावर फारसा त्रास न पडता मोठ्या योग्यतेस चढतात आणि जरी तो मोठेपणा राखण्यास त्यांस बरीच अडचण पडते तरी अशा प्रकारे मोठेपण मिळवण्यास त्यांस फारसा त्रास पडत नाही; परंतु जेव्हा तो मोठेपणा कायम राखण्याचा ते प्रयत्न करतात, तेव्हा त्यांस बरीच अडचण पडते. असे लोक म्हटले म्हणजे बहुधा लाच देऊन अथवा दुसऱ्या एखाद्या राजाच्या मेहेरबानीने मोठेपणास चढतात. याची उदाहरणे ग्रीस देशात, आयोनिया प्रांतातील शहरात आणि हेलेस्पांटमध्ये प्रसिद्ध आहेत. येथील मुख्य अंमलदार यास डेरियस याने स्वसंरक्षणार्थ व आपले वैभव वाढावे म्हणून मोठे मोठे अधिकार देऊन ठेवले होते. शत्रूचे सैन्य फितूर झाल्यामुळे राज्यपदवीस चढलेल्या राजांचीही आणखी कित्येक उदाहरणे आहेत. असे राजे केवळ ज्या लोकांनी त्यांस राज्यपद दिले असेल त्यांच्या मर्जीवरच अवलंबून असतात व ही मर्जी फार अनिश्चित असून त्या राजास आपले राज्य राखण्यास लागणारे ज्ञान व शक्तीही नसतात. ज्ञान नसण्याचे कारण इतकेच की, तो राजा अलौकिक सद्गुणी असल्याशिवाय लोकांवर कसे राज्य चालवावे हे त्यास माहीत नसते. कारण पूर्वी तो राजा नसताना इतर साधारण लोकांप्रमाणेच एक गृहस्थ असतो. त्याला शक्ती नसते. त्याचे कारण इतकेच की, त्याच्याशी विश्वासू आणि साह्य करण्यास उद्युक्त असे सैन्य नसते. शिवाय जी राज्ये एकाएकी जिंकली जातात, ती सृष्टीतील इतर गोष्टींप्रमाणे अनिश्चित असतात. म्हणजे त्यांचा उदय आणि प्रसार फार जलद झालेला असतो. त्याची मुळे फार खोल गेलेली नसतात. म्हणून लहानसे अरिष्ट आले असतानाही ती लवकर मोडून जाण्याचा संभव असतो. आता अशा वेळी जो एकाएकी उच्च पदवीस चढला असेल, तो जर फार शहाणा असला व हातात आलेल्या वस्तूचे रक्षण करण्याची युक्ती त्यास चांगली माहीत असली, तर मात्र गोष्ट निराळी. असे

असेल तर मागील भागात सांगितल्याप्रमाणे त्यास आपल्या राज्यास बळकटी आणण्याचे सामर्थ्य असते. नशिबाच्या अथवा शहाणपणाच्या जोरावर जे उच्च पदवीस चढले आहेत अशांची दोन उदाहरणे खाली देतो. एक फ्रान्सिस फोरझा याचे आणि दुसरे सीझर बारजिया याचे. फोरझा हा योग्य उपाय करून मोठ्या शहाणपणाने मिलनचा ड्यूक झाला आणि जरी ते मिळवण्यास त्यास प्रयास पडले, तरी ते त्याजकडे फार दिवस सुरळीत चालले. उलट पक्षी व्हॅलेंटाइनचा ड्यूक जो बारजिया याला त्याचा बाप पोप अलेक्झांडर यापासून पुष्कळ मोठमोठे मुलूख मिळाले खरे; परंतु बाप मरण पावल्यावर त्याने कितीही प्रयत्न केले, तरी ते सर्व व्यर्थ जाऊन हाती आलेला मुलुख नाहीसा झाला. कारण वर सांगितल्याप्रमाणे वेळेवर पाया न घालता इमारत उभी केल असता इमारतीला व इमारत उभी करणाऱ्याला सहज अपाय घडेल, यात संशय नाही. म्हणून ड्यूक बारजियाने मिळवलेला मुलूख कब्जात राहण्याकरिता जे जे उपाय केले त्याचे निरूपण येथे करणे अयोग्य होणार नाही, कारण एखाद्या नवीन राजाला ग्रहण करण्यास वरील ड्यूकच्या उदाहरणाशिवाय दुसरे चांगले उदाहरण सापडणे मला कठीण दिसते आणि जरी त्याचे स्वतःचे उपाय आणि व्यवस्था यामुळे त्याला यश आले नाही, तरी तो दोष त्याचा नसताना केवळ नशीबच फिरले म्हणून त्यास अपयश आले असे म्हटले पाहिजे.

पोप सहावा अलेक्झांडर याची आपला मुलगा ड्यूक व्हॅलेंटाईन याने मोठेपणास चढावे अशी फार इच्छा होती; परंतु असे होण्यास प्रस्तुत आणि भावी अशा फार अडचणी त्यास दिसू लागल्या. एकतर असे होते की, धर्मखात्यात मोडत नाही असा मुलूख त्यास आढळून येईना आणि जे प्रांत त्याच्या ताब्यात होते, ते मिलनचा ड्यूक आणि व्हेनिशियन लोक यांनी आपल्या ताब्यातून सहसा जाऊ दिले नसते. कारण फेंझा आणि रिमीनम हे व्हेनिशियन लोकांच्या आश्रयास जाऊन राहिले होते. दुसरीही त्या पोपाला अशी अडचण दिसून आली की, आपले उपयोगी पडण्याजोगे सर्व सैन्य दुसऱ्याच्या ताब्यात होते. शिवाय, इटलीतील कोणताही प्रांत आपल्या ताब्यात घेतला असता आपसातील परस्पर स्नेहसंबंध आणि व्यवस्था बिघडून जातील, अशी त्यांस भीती होती. नाहीतर एखादा प्रांत आपल्या ताब्यात घेणे पोपाला फारसे कठीण झाले नसते. इकडे तर व्हेनिशियन लोक आपल्या मदतीकरिता फ्रेंच लोकांना इटलीमध्ये बोलवित होते व या गोष्टीस पोपाने काही हरकत आणली नाही इतकेच नाही तर लुई राजाच्या पूर्वीच्या कुटुंबाची काडी तोडून देऊन फ्रेंच लोकांस इटलीमध्ये येऊ देण्यास त्याने एक रीतीने मदतच केली. असे झाले तेव्हा पोपाच्या परवानगीने आणि व्हेनिशियन लोकांच्या मदतीने लुई हा आल्फ्स् पर्वत उतरून आला आणि मिलनमध्ये येऊन पोहोचला नाही तोच रोमाना काबीज करण्याकरिता त्याने पोपाला मदत दिली. रोमाना शहराचे लोक तर लुईचे नाव ऐकूनच हस्तगत झाले. याप्रमाणे रोमाना हस्तगत होऊन कलोनेसाय लोकांचा पराभव झाल्यावर, त्या ड्यूकाला मिळविलेल्या मुलखावरच

तृप्त न राहता जास्त मुलूख जिंकण्याची इच्छा झाली; परंतु या उद्योगास दोन हरकती आल्या. पहिली, त्याच्या सैन्याचा बेभरवसा आणि दुसरी फ्रेंच लोकांचा विरुद्धपणा. अरसिनाय लोक त्याच्या चाकरीस होते. त्यांच्या खरेपणाविषयी त्याची खात्री नव्हती. त्याला असे वाटे की, जरूरीच्या प्रसंगी ते आपल्यास मदत न करता अडथळा करतील अथवा एखादा मुलूख जिंकल्यावर तो ते आपल्यापासून हिरावून घेतील अशा प्रकारचीच भीती त्यास फ्रेंच लोकांविषयीही होती. पुढे फेंझा याने बलोनावर हल्ला केला असता, त्याच्याशी लढाई करण्याचा प्रसंग ड्यूकला आला तेव्हा त्याच्या सैन्याने झटून काम न करता माघार घेतली. यावरून त्यांच्या अविश्वासाविषयी त्याचा संशय दृढ झाला. तसेच जेव्हा अरबिन काबीज करून त्याने टस्कनीवर हल्ला केला, तेव्हा फ्रेंच लोकांनी त्यास माघार घेण्यास भाग पाडले, तेव्हाच फ्रेंच राजाचा हेतु त्याला कळून आला. त्यानंतर परकीय मदतीवर अवलंबून न राहता नशिबावरही हवाला टाकावयाचा नाही. असा त्या ड्यकने निश्चय केला व त्या निश्चयानुरूप प्रथम त्याने रोम येथील कलोनय आणि अरसिनाय यांच्या पक्षाकडे जे लोक होते, त्यातील काही गृहस्थांना नोकऱ्या वगैरे देऊन त्यांच्या मान इतमामाप्रमाणे त्यांस आपल्या अधिकारातल्या मोठमोठ्या जागा व पदव्या दिल्या. याप्रमाणे त्यांची मने आपल्या पक्षाकडे वळवून घेतली. इतके केल्यावर लवकरच ते आपला मूळचा पक्ष सोडून ड्यूकच्या पक्षास येऊन मिळाले. अशा युक्तीने वर निर्दिष्ट दोन लोकांचा मोड होत चालला. पुढे कलोनाय लोकांप्रमाणेच सर्व अरसिनाय लोकही मोठ्या युक्तीने आपलेसे करून घेतले. ते असे - त्या लोकांना पुढे असे दिसू लागले की, ड्यूकचे वर्चस्व होऊ दिले तर आपल्यालाच हानिकारक होईल, म्हणून त्यांनी पेरुजियामध्ये मेनीओन या ठिकाणी आपली एक सभा भरवली. त्या योगाने त्यांचे बंड झाले व रोमानामध्येही गडबड चालू झाली. इतक्यात आणखीही कित्येक संकटे ड्यूकावर आली. ही सर्व बंडे ड्यूकने फ्रेंच लोकांच्या साह्याने मोडून टाकली व आपला पगडा पूर्ववत् बसवला. तथापि परकीय लोकांनी आपल्यास वेळोवेळी मदत करणे त्यास आवडले नाही. म्हणून त्याने एक युक्ती योजली. तिच्या योगाने सर्व अरसिनाय लोक त्याच्या ताब्यात आले. सीनियार पालो म्हणून एक कोणी मोठा गृहस्थ होता, त्यास त्याने मोठमोठ्या देणग्या वगैरे देऊन आपलासा करून घेऊन आपली छाप त्याजवर बसवली; तेव्हा त्याने आपण होऊनच अरसिनाय लोकांस तेथे नेऊन ड्यूकच्या हवाली केले. याप्रमाणे त्याने सर्व शत्रूचा व त्यांच्या साथीदारांचा नाश केला. रोमाना आणि अरविनचे ड्यूकपद मिळवले व लोकांस मोठ्या खुशीत ठेवून आपल्या राज्याचा पाया तर चांगला मजबूत घातला. या पुढे त्याने काय काय गोष्टी केल्या त्याही फार अनुकरणीय असल्यामुळे त्या सोडून देणे प्रशस्त नाही म्हणून येथे सांगतो. रोमाना प्रांतातील सरदार लोक फार जुलमी असून प्रजेस पुष्कळ त्रास देत असत व प्रजेची स्थिती सुधारण्याकडे लक्ष न देता त्यांस नाडण्याचा मात्र प्रयत्न करीत. यामुळे त्या प्रांतांत नेहमी बंडावे, गडबड आणि अव्यवस्था माजून राहिली होती. ही स्थिती पाहून ती सुधारण्याचा त्याने यत्न केला.

आरको नावाचा कोणी दुष्ट व हेकेखारे असा एक गृहस्थ होता, त्यास त्याने पूर्ण अधिकार देऊन रोमानाचा सर्व कारभार करण्यास नेमले. आरकोने थोडक्या वेळातच मोठे नाव करून जिकडे तिकडे शांतता केली. पुढे आरकोच्या हातात मोठा अधिकार आहे व तो लोकांस जाचेल असे ड्यूकला वाटून त्याने त्या प्रांतात एक न्यायसभा स्थापन केली. त्या न्यायसभेत सर्व भागातील निवडलेले सभासद नेमले होते व एक उत्तम गृहस्थ त्या सभेचा अध्यक्ष नेमला. नंतर त्याला असे आढळून आले की, पूर्वी प्रांत जिंकतेवेळी जो आपण लोकांस त्रास दिला, त्या योगाने आपणास शत्रू फार उत्पन्न होऊन लोक नाखुश झाले, तर अशा लोकांच्या मनात आपल्याविषयी पूज्यबुद्धी उत्पन्न व्हावी, म्हणून त्याने असे प्रसिद्ध केले की, लोकांना जो त्रास झाला तो स्वतःकडून झाला नसून प्रधान जो आरको त्याचीच ही सर्व कृत्ये होत व हे लोकांस खरे वाटण्याकरिता त्या प्रधानास त्याने धरून भरबाजारात एक दिवशी त्याचा शिरच्छेद केला. या दुष्ट कृत्याच्या योगाने सर्व लोक शांत झाले. इतकेच नाही, तर ते ड्यूकच्या चांगुलपणाविषयी फार आश्चर्य करू लागले. पुढे सर्व सुरळीत चालू लागले असे पाहून आणखी नवीन मुलूख जिंकण्याचा तो प्रयत्न करू लागला व या हेतूस प्रतिकूल काय काय आहे याविषयी विचार करिता त्यास असे कळून आले की, फ्रान्सच्या राजाची मात्र आपल्यास भीती आहे. कारण प्रसंगी त्याची मदत तो आपण घेतली असून त्याचा बदला त्यास मिळालेला नाही. म्हणून तो नवीन स्नेही मिळवून फ्रान्सशी लढाई करण्याचा विचार करू लागला. स्पेन लोकांनी कनेटास वेढा दिला होता, तो उठविण्याकरिता फ्रेंच लोक नेपल्स प्रांतात आले. ही संधी साधण्याचा ड्यूकने विचार करून फ्रेंच लोकांपासून आपल्यास निर्भय करून घेण्याचा बेत केला; परंतु त्याचा बाप अलेक्झांडर निवर्तल्यामुळे हा त्याचा बेत तडीस गेला नाही. प्रस्तुतच्या संकटाची त्याने तरतूद चांगली करून ठेवली होती; परंतु पुढे येणारी संकटे बरोबर न समजली गेल्यामुळे त्यांजविषयी त्याला काही तजवीज करून ठेवता आली नाही. प्रथम त्याला अशी भीती पडली की, आपला बाप, पोप अलेक्झांडर नंतर जो दुसरा पोप होईल तो कदाचित् आपल्याला अनुकूल न होता अलेक्झांडरने दिलेले सर्व परत हिरावूनही घेईल. असे होऊ न देण्याविषयी त्यास चार गोष्टी सुचल्या. पहिली अशी की, ज्या सरदारांचा मुलूख हिरावून घेतला होता, त्यांस तो नवीन पोपाकडून परत मिळू नये म्हणून त्या सर्व सरदारांचा नाश करणे, दुसरी रोमच्या सर्व सरदारांस लालूच दाखवून आपल्याकडे वळवून घेणे म्हणजे सहजच नवीन पोपावर दाब ठेवता यावा. तिसरी, ज्या ज्या धर्माध्यक्षांस पोपाची गादी मिळण्याचा संभव होता, त्या सर्वांस आपले स्नेही बनविणे व चवथी ही की, आपला बाप मरण्यापूर्वीच पुढे येणाऱ्या संकटाच्या निवारणार्थ आपल्या पक्षास चांगली बळकटी आणणे. अलेक्झांडर मरण्याच्या पूर्वीच पहिल्या तीन गोष्टी त्याने करून ठेवल्या होत्या व चौथी करण्याच्या बेतात तो होता. सर्व सरदार लोकांचा त्याने नाश केला. रोमच्या सरदारांस आपल्याकडे वळवले.

सर्व कार्डिनल मंडळींशी स्नेह संपादला व स्वतःच्या बळकटीविषयी तर टस्कनी आपल्या ताब्यात आणण्याचा बेत करून त्याप्रमाणे पेरुजिया, पायांविनो वगैरे प्रांत सर केले. स्पेनच्या लोकांनी फ्रेंचांस नेपल्समधून हकलून दिल्यामुळे दोघांनी ही या ड्यूकचा स्नेह संपादला होता. ही संधी साधून त्याने पिसा शहरावर एकदम हल्ला करून ते घेतले, त्याबरोबर ल्यूका आणि माएन्नाही आपोआप त्यास प्राप्त झाली. कारण त्यांस फ्लारेन्सची फार भीती होती व फ्लारेन्टाइन लोक अगदी निकरावर येऊन निराश झाले होते. या सर्व गोष्टी ज्या वर्षी त्याचा बाप मेला त्याच वर्षी घडून आल्या. जर या गोष्टी बापाच्या मरणापूर्वी घडल्या असत्या, तर हा ड्यूक निःसंशय बलिष्ट सत्ताधीश व अगदी निर्भय होऊन राहिला असता; परंतु तसा योग आला नाही. अलेक्झांडर वारला त्यावेळेस सर्व अनिश्चितच होते. रोमाना प्रांत मात्र काय तो पूर्णपणे ड्यूकच्या ताब्यात होता. बाकी सर्व प्रांतांत काहीना काही तरी गडबड व चळवळ सुरू होतीच. स्पेन आणि फ्रान्स यांची जबरदस्त भीती त्यास होती. त्यांचा त्यास मुळीच भरवसा येत नव्हता. त्याचा पाया खरोखर चांगला मजबूत झाला होता व तो कोणतीही गोष्ट फार दूरवर दृष्टी देऊन मोठ्या शहाणपणाने व दमाने करीत होता; परंतु वरील दोन भयंकर सैन्यांपुढे त्याचे काही चालण्यासारखे नव्हते. इतर कित्येक लोकांस रोम येथे आश्रय मिळाला होता. बाप निवर्तल्यावर पोपाच्या गादीवर अमक्यासच बसवण्याची जरी त्याची शक्ती नव्हती, तरी मर्जी वाटल्यास आमक्यास त्या गादीवर न बसू देण्यापूर्वी त्यास खास शक्ती होती व बाप मरण्यापूर्वी सर्व गोष्टी जर त्याच्या मनाप्रमाणे घडल्या असत्या, तर पुढे त्यास भीती उरली नसती; परंतु तसे घडून आले नाही. अकरावा जूलियस जेव्हा पोप झाला त्यावेळी तो ड्यूक असे म्हणाला होता की, 'बापाच्या मरणानंतर काय काय अडचणी येतील त्या सर्वांविषयी मी विचार करून त्या दूर करण्याची तजवीजही ठेवली होती. तरी त्या अडचणी म्हणजे इतक्या लवकर - बाप वारल्यावर -लागलीच येतील असे मला वाटले नव्हते.' या सर्व गोष्टींवरून असे दिसून येईल की, ड्यूक व्हालेन्टाईनची मोठीशी चूक झाली नव्हती व सर्व कृत्ये तो शहाणपणाने करीत होता. मला तर असे वाटते की, जेजे लोक नशिबाच्या जोरावर आणि इतर लोकांच्या साह्याने मोठेपणास चढले आहेत, अगर चढण्याचा विचार करीत आहेत, त्या सर्वांनी या ड्यूकचा कित्ता घेण्यासारखा आहे. तो विशाल व फार खोल बुद्धीचा होता आणि जर तो शरीरसंपत्तीने अशक्त नसता व त्याचा बाप इतक्या लवकर वारला नसता, तर त्याचे सर्व बेत नीटपणे तडीस गेले असते. ज्याची ज्याची म्हणून राज्याचा पाया घालतेवेळी शत्रूपासून आपल्याला सुरक्षित राखून स्नेही जोडण्याची इच्छा असेल, कपटाने अथवा बळाने विजयी होण्याची आणि आपल्या लोकांस प्रिय होऊन त्याजवर जरब बसवण्याचा हेतू असेल, आपल्या सैन्याकडून मान मिळवून घेण्याचे व जे आपल्यास उपद्रव करीत असतील त्यांचा नाश करण्याचे मनात असेल, जुने कायदे कानून मोडून त्या ठिकाणी नवीन सुरू करण्याचे असतील, कडक, परोपकारी, उदार, सौम्य

असा स्वभाव धारण करून लबाड लोकांचे पारिपत्य व चांगल्यांचे रक्षण करावे असे वाटत असेल, इतर शेजारी राजे व सरदार एकतर आपल्या पक्षाचे होऊन आपल्यास साह्यकारी व्हावेत अथवा निर्बल होऊन आपल्यावर हल्ला करण्यास असमर्थ व्हावेत, असे वाटत असेल, तर या ड्यूकपेक्षा दुसरे चांगले उदाहरण वाचकांपुढे ठेवण्यास सापडणे कठीण असे मला वाटते. जी काय त्याची चूक झाली ती अकरावा ज्यूलियस याला पोप होऊ दिले ही होय. ही गोष्ट त्याला फार अपायकारक झाली. जरी पोप करण्याचे त्याचे सामर्थ्य नव्हते, तरी अमुक एक गृहस्थास पोप करू न देणे त्याच्या शक्तीतले होते. ज्यूलियस याला पूर्वी त्याने बरेच दुखावले होते व तो पोप झाल्यावर ड्यूकशी स्पर्धा करण्यासारखा असल्यामुळे त्याला पोप होऊ दिले ही त्याची मोठी चूक झाली. मनुष्य भित्रे असोत अथवा प्रबल असोत, कसेही असले तरी मोठे उपद्रविक असावयाचेच. ज्या कार्डिनल मंडळीला या ड्यूकने नाखुश केले होते, त्यांपैकी सेन्टपीटर, व्हिंकुला, कलोनो, सेन्टजार्ज आणि आसलोनिअस हे होत. इतर कार्डिनल जरी पोप झाले असते, तरी ते या ड्यूकला भिऊन वागले असते. फक्त स्पेनचा कार्डिनल ड्यूकच्या विरुद्ध जाण्याचे कारण स्पेनचा आणि फ्रान्सचा स्नेहसंबंध दृढ होता व रोमच्या विरुद्ध जाण्याचे कारण फ्रन्सशी सल्ला करून त्याचा फायदा होण्यासारखा होता. म्हणून फार तर स्पेनच्या कार्डिनलला पोप होऊ द्यावयाचे होते. ते शक्य नसते तर त्याने सेन्ट पीटर आणि व्हिंकुला यांजपेक्षा रोमच्या कार्डिनलला पोप होऊ दिले असते तरी बरे. कारण बलवान लोकांवर उपकार केले तरी ते आपला पूर्वीचा द्वेषभाव व मानहानी विसरून जातील असे मानणे ही चूक होय. या सर्व गोष्टींवरून हे उघड आहे की, अकरावा ज्यूलियस याला पोप होऊ दिले, हीच ड्यूक व्हालेन्टाईनची मोठी चूक होऊन ती अंती त्याच्या सर्वस्वी नाशास कारण झाली.

○○○

भाग-८

दुष्ट आणि अन्यायी मार्गांनी ज्यांनी राज्ये मिळवली अशा राजांविषयी

शहाणपणाच्या अथवा नशिबाच्या जोरावर जे लोक राज्य कमावतात त्यांविषयी मागील भागात विवेचन झाले. आता या शिवाय इतर साधनांनी जे राज्य मिळवितात, त्यांजविषयी विवेचन करणे आहे. अशा तहेने राज्य मिळवण्याचे दोनच मार्ग आहेत व त्यापैकी एकाचे इत्थंभूत वर्णन प्रजासत्ताक राज्यांचे विवरण करताना करण्यात येईल. तरी त्या दोहोंविषयीही येथे थोडेसे सांगणे जरूर आहे. या दोहोंपैकी पहिला मार्ग म्हटला म्हणजे जेव्हा एखादा मनुष्य अन्यायाने फार घोर कृत्ये करून राज्य मिळवतो तो व दुसरा - जेव्हा एखाद्या मनुष्याला इतर लोक आपखुशीने व आनंदाने आपला राजा करतात तो. यापैकी पहिल्या मार्गाविषयी या भागात विचार करण्याचा आहे. एक प्राचीन इतिहासातून व एक अर्वाचीन इतिहासातून अशी एक-दोन उदाहरण घेऊ. त्या उदाहरणांविषयी प्रत्येक बारीक गोष्टीचा निरर्थक विचार करीत न बसता, प्रस्तुत प्रसंगी उपयुक्त व जरूर तेवढ्याच गोष्टी येथे सांगतो. आगा-थोल्कीस म्हणून एक फार हलक्या कुळातील (कुंभार जातीतला) मनुष्य होता. तो पुढे सायराक्यूझचा राजा झाला व त्याच्या जन्माची जी वागणूक होती ती त्याने कोणत्याही स्थितीत सोडली नाही. तो जरी दुर्गुणी होता, तरी लढाईत मोठा धीट आणि चपळ होता व मोठमोठ्या लढाया मारून अविश्रांत उद्योगाच्या योगाने तो सायराक्यूझ येथील प्रीटर झाला. या पदवीस चढल्यावर त्याने राज्यपद मिळवण्याचे मनात आणले व कोणाचे साह्य घेतल्याशिवाय जबरदस्तीने ते चालवायाचे असा त्याने निश्चय केला. अमिलकार नावाचा कार्थेज येथील एक गृहस्थ सिसिली मध्ये एका सैन्यावर मुख्य होता. त्याच्याशी आगाथोल्कीसने स्नेह संपादन केला. एके दिवशी सकाळी सायराक्यूझ येथील काही बडे लोक व सेनेट सभा यांस त्याने काही जरुरीच्या दरबारी कामाकरिता म्हणून एकत्र जमा केले. सर्व लोक जमल्यावर, इशारा करताच सैन्यातील लोकांनी पुढे येऊन सर्व सभासदांस

आणि श्रीमंत गृहस्थांस एकदम ठार मारले. या प्रमाणे सर्व लोक दूर झाल्यावर त्याने त्या शहराचे राज्य अनायासाने बळकावले. पुढे कार्थेजिनियन लोकांची व याची लढाई सुरू झाली व आगाथोक्लीसचा दोन वेळ पराभव झाला. कार्थेजिनियन लोकांनी शहरास वेढा दिला, तरी त्याने मोठ्या चतुराईने शहराचे संरक्षण करून काही लोक तेथे बंदोबस्ताकरिता ठेवले व आपण काही सैन्य घेऊन आफ्रिकेवर हल्ला केला. तेव्हा अर्थात्च कार्थेजिनियन लोक सायराक्यूझ सोडून देऊन आफ्रिकेच्या संरक्षणार्थ धावले व आगाथोक्लीस याच्याशी त्यास तह करणे भाग पडले. या प्रमाणे आगाथोक्लीसचे चरित्र पाहता असे दिसून येईल की, त्याला कोणाचेही साह्य नव्हते व तो केवळ नशिबानेच वर चढला असेही नाही, तर हजारो संकटे आणि अडचणी सोसून स्वपराक्रमानेच केवळ त्याने ते राज्य कमावले व पुढे त्याचे रक्षणही त्याने मोठ्या धिटाईने केले. असे केले तरी बंधुवर्गास ठार मारून स्नेह्यांचा विश्वासघात करणे आणि विश्वास, दया व नीती यांस अजिबात फाटा देणे, या गोष्टी म्हणजे नीतिपर आहेत असे कधीही होणार नाही. अशा कारणाने एखाद्याला राज्यपद मिळेल खरे; परंतु त्याजविषयी लोकांच्या मनात पूज्यबुद्धी उत्पन्न व्हावयाची नाही. तथापि शहाणपण, संकट समयी चतुरता आणि अडचणी दूर करण्याविषयी धैर्य, या गोष्टींचा विचार केला असता, त्यावेळच्या इतर सरदारांपेक्षा आगाथोक्लीस कमी होता असे म्हणता येत नाही. तरी अमर्याद क्रौर्य आणि दुष्टपणा आणि इतर लाखो दुर्गुण त्याच्या अंगी असल्यामुळे उत्तम मनुष्यांमध्ये त्यास कदापि गणता येणार नाही.

अर्वाचीन उदाहरण साहवा पोप अलेक्झांडर याच्या वेळचा फरमो येथील आलिव्हरोटो याचे होय. याचे आई-बाप लहानपणीच वारल्यामुळे तो आपल्या मामाच्या घरी लहानाचा मोठा झाला. त्या मामाचे नाव जान फागलीएनाय असे होते. लहान असतानाच पालोव्हिटेली याच्या हाताखाली सैन्यात त्याने नोकरी पत्करली. काही दिवस कवाईत शिकून तो सैन्यामध्ये मोठ्या कामगिरीच्या लायक झाला. पालो मरण पावल्यावर तो त्याचा भाऊ व्हिटेलेझोच्या हाताखाली राहिला आणि थोड्याच वेळात मोठा हुशार, चपळ व धीट असल्यामुळे त्या सैन्यात जे कोणी उत्तम कामगार होते, त्यांत त्याची गणना होऊ लागली; परंतु दुसऱ्याच्या हाताखाली नोकरी करण्याचे न आवडून त्याने फरमो येथील लोकांशी काही गुप्त बेत चालवले. या फरमो येथील लोकांची अशी एक गोष्ट होती की, त्यांना स्वातंत्र्यापेक्षा दुसऱ्याच्या ताब्यात राहणे बरे वाटत असे. नंतर व्हिटेलेस्को नावाच्या एका गृहस्थाच्या साह्याने फरमो काबीज करण्याचा त्याने विचार केला. ही गोष्ट सिद्धीस जाण्याकरिता त्याने जान फागलीएनाय मामा यास एक पत्र लिहिले. ते असे की, 'फार दिवस बाहेर राहिल्यामुळे मला आपली जन्मभूमी जो फरमो देश तेथे येऊन आपणास भेटण्याची फार इच्छा आहे. मी सैन्यामध्ये नोकरी करीत आहे हे एक मला व माझ्या देशबांधवांना मोठे भूषण आहे व आजपर्यंतचा मी आपला वेळ फुकट घालवला नाही असे मी आपल्या बंधुवर्गास दाखवू

इच्छित आहे. याकरिता मी येताना आपल्या बरोबर स्नेही वगैरे एकंदर १०० स्वारांचा लवाजमा आणीन. त्यांचे आपण मेहेरबानीने चांगले आदरातिथ्य करावे. त्यांस चांगल्या रीतीने वागवल्याने मलाच मोठेपण आहे असे नाही, तर मला आपण लहानाचा मोठा करून या दशेस आणले याजबद्दल आपलाही त्यात मोठेपणा आहे.' जान हा आपल्या भाच्यावर चांगली प्रीती करीत असे, म्हणून तो फरमो येथे आल्यावर त्याचे त्याने चांगले स्वागत केले. आपल्या घरामध्ये सर्वांस ठेवून घेतले. तेथे तो काही दिवस तसाच राहिला व गुप्त रीतीने आपला दुष्ट हेतू सिद्धीस नेण्याचा प्रयत्न करू लागला. त्याने एक मोठ्या मेजवानीची तयारी करून आपल्या मामास व शहरातील इतर मोठमोठ्या गृहस्थांस आमंत्रणे दिली. मेजवानीस बसलेले लोक मोठ्या आनंदात असताना, आलिव्हरोटो याने पोप अलेक्झांडर व त्याचा मुलगा सीझर याजविषयी काही विषयावर संभाषण सुरू केले. जान आणि दुसरे कित्येक लोक मोकळेमनाने वादविवाद करू लागले. आलिव्हरोटोने हसून म्हटले, 'अशा गोष्टी प्रसिद्धपणे बोलणे प्रशस्त नाही.' असे म्हणून तो जवळच्या एका खोलीत गेला. त्याचे मागून जान आणि दुसरे कित्येक गृहस्थही गेले. त्या खोलीत शिपाई गुप्त रीतीने बसविले होते. ही मंडळी आत जाऊन बसते इतक्यात त्या शिपायांनी सर्वांची कत्तल करून टाकली. त्याबरोबर जान ही मारला गेला. हे खून झाल्यावर आलिव्हरोटो घोड्यावर बसून शहरात गेला व मुख्य अंमलदारास त्याने धरले म्हणून भीतीने सर्व लोक त्यास शरण आले. तेव्हा त्याने तेथे राज्य स्थापन करून आपण सर्वांचा मुख्य झाला. जे लोक नाखुश व आपणाला उपद्रव करण्यासारखे होते, त्या सर्वांस त्याने ठार मारले आणि दिवाणी व लष्करी नवीन कायदे सुरू करून सर्व भीती नाहीशी केली. या प्रमाणे तो फरमोमध्ये प्रबळ झाला. इतकेच नाही, तर शेजारच्या इतर लोकांसही अरसिनाय आणि व्हायटेलाय यांस गाबीज केले, त्यावेळी सीझर बारजिया याने त्यास घेरून टाकले. ते जर त्याने करू दिले नसते, तर आगाथोक्लीस प्रमाणे त्यास काढून टाकणे दुरापास्त झाले असते. मामाला ठार मारल्यावर एक वर्षाने तो धरला गेला व ज्या व्हिटोलोझोने त्यास ही सर्व बरी-वाईट कसबे शिकवली होती त्यासहित त्यास मृत्यूच्या तोंडी पडावे लागले.

आगाथोक्लीस आणि त्याच्या सारखे इतर गृहस्थ इतका विश्वासघात आणि दुष्टपणा करूनसुद्धा आपल्या देशात शांततेने राहत होते व परकीय शत्रूपासून आपले नेहमी रक्षण करीत होते. त्यांच्या प्रजेपैकी कोणीही त्यांच्याविरुद्ध उठण्यास धजले नाहीत. या सर्व गोष्टींपासून काही लोकांना आश्चर्य वाटेल खरे. तरी याची कारणे निराळीच आहेत. ज्याप्रमाणे अशा लोकांचा दुष्टपणा चांगल्या किंवा वाईट हेतूकरिता असेल त्याप्रमाणे पुढे परिणाम घडतात. 'चांगल्या हेतूकरिता दुष्टपणा' करणे काहीसे असंभवनीय वाटेल, तर तसे नाही. जेव्हा केवळ स्वसंरक्षणार्थ नाइलाजामुळे एखादे वेळेस दुष्टपणा कोणा एखाद्याच्या हातून घडतो, तरी तो त्याने वारंवार न करता एकवार केला असेल व तोही प्रजेच्या फायद्याकरिता

होता होईतोपर्यंत केला असेल, तर त्यास चांगल्या हेतूकरिता दुष्टपणा म्हणता येईल; परंतु वाईट हेतूनेही दुष्टपणा पुष्कळ वेळा दृष्टोत्पत्तीस येतो. तो असा की,हळुहळू वाईट कृत्ये करीत जाऊन पुढे ती कमी करीत न जाता तशीच वाढवत जाणे. पहिल्या प्रकारचा दुष्टपणा ज्यांच्या हातून घडला असेल, त्यांस ईश्वराकडून व मनुष्यांकडूनही बहुतकरून माफी मिळते. याचे उदाहरण आगाथोक्लीस हेच होय; परंतु दुसऱ्या प्रकारचा दुष्टपणा आचरणारे लोक फार दिवस टिकत नाहीत. या गोष्टीवरून असे

समजावयाचे की, ज्या कोणाला दुसऱ्याचे राज्य अपहरण करून घ्यावयाचे असेल, त्याने जरूर तितका अनाचार एकदम आरंभीच करून घ्यावा व पुढे पुनः तसे करण्याचे प्रयोजन राहू देऊ नये. असे केले असता लोकांची मने दूषित न होता, ही सर्व कृत्ये आपल्या हिताकरिताच आहेत, असे त्यास वाटून ते आपल्या पक्षास आनंदाने येऊन मिळतील; परंतु वरप्रमाणे न करिता, भीतीमुळे अथवा गैर सल्ला मिळाल्यामुळे ज्या कोणास नेहमीच हातात शस्त्र बाळगावे लागेल, त्याचा विश्वास आपल्या लोकांवर कधीही बसणार नाही व प्रजाही तो नेहमीच वाईट आचरण करीत असल्यामुळे कधीही निर्भय राहणार नाहीत. म्हणून जी काय इजा लोकांस करणे भाग पडेल ती त्यांनी एकदम करून घ्यावी; कारण ती एकवार करून पुढे बंद पडल्यावर तिजविषयी लोकांच्या मनात पुढे वाईटपणा राहणार नाही; परंतु लोकांवर जे उपकार करावयाचे असतील ते मात्र हळूहळू थोडथोडे करीत जावे म्हणजे त्या चांगुलपणाची रुची फार दिवस टिकेल. जसे एखादा वाईट पदार्थ खाणे भाग पडले तर तो एकदम खाऊन टाकणे बरे; परंतु चांगला असला तर थोडथोडा चाखला म्हणजे तोंडास रुची फार वेळ चांगली राहील. एकंदरीने पाहता राजाने आपले वर्तन प्रजेशी असे ठेवावे की, ते चांगल्या अगर वाईट प्रसंगी केव्हाही बदलावे लागणार ङ्केनाही. कारण एकवार एखादा वाईट प्रसंगा येऊन ठेपला, म्हणजे तो दूर करणे कठीण जाते. आणि चांगली कृत्येही कोणी जमेस धरीत नाही. वाईट कृत्यांबद्दल मात्र मनुष्य जबाबदार हातो व चांगल्याबद्दल बक्षीस मिळतेच असे नाही.

○○○

भाग-९

लोक आपखुशीने आपसातीलच ज्या कोणा एकास आपले राज्यपद देतात, अशा राजांविषयी

मागील भागाच्या आरंभी राज्यपद मिळण्याचे दोन मार्ग सांगितले आहेत. त्यांपैकी कपटाने राज्य मिळवणे हा जो पहिला मार्ग त्याजविषयी विवेचन गेल्या भागात झाले. आता दुसऱ्या विषयी या भागात सांगावयाचे आहे. जेव्हा प्रजा आपल्या स्वसंतोषाने आपणातीलच कोणास तरी राज्यपद देतात, तो दुसरा मार्ग अशा प्रकारे राज्यपद मिळवणे ते केवळ शहाणपण अथवा नशिबानेच मिळते असे नाही, तर त्यास काही तरी युक्ती करावी लागते. बहुतकरून प्रत्येक शहरामध्ये बडे लोकांचा वर्ग निराळा असून सर्वसामान्य लोकांचा वर्ग निराळा असतो. या दोन वर्गात नेहमी बरीच फाटाफूट असते. एखादा मनुष्य राजा होतो, तो बडे लोकांकडून होतो अथवा सामान्य लोकांनी केला जातो. बडे लोकांचा पगडा आपल्यावर असणे सामान्य लोकांस सहन होत नाही व बडे लोकांसही अशा प्रकारचा पगडा सामान्य लोकांवर चालवल्याशिवाय बरे वाटत नाही. या भिन्नत्वाच्या योगाने तीन परिणाम घडून येतात. पहिला, सर्वांमध्ये मिळून एकच असामी राजा होणे, दुसरा, प्रत्येक असामीने कोणाच्या ताब्यात न राहता मोकळेपणाने वागणे व तिसरा सर्वांनी नीतिभ्रष्ट होणे. यापैकी पहिल्याविषयी येथे वर्णन करणे आहे. प्रसंगानुसार बडे लोक अथवा सामान्य लोक कोणास तरी राज्यपद देतात. कधी कधी सामान्य लोकांचा त्रास व बंडाई बडे लोकांस सहन न होऊन ते आपल्या सर्वांच्या संमतीने एकाच्याच हवाली सर्व सत्ता करून त्याच्या अमलाखाली निर्भयतेने राहण्यास तयार होतात. तसेच बडे लोकांकडून सामान्य लोकांवर जुलूम झाल्यामुळे आपल्या संरक्षणाकरिता आपणातीलच एखाद्यास आपला मुख्य करून, त्याची आज्ञा पाळण्यास ते तयार होतात. बडे लोकांस सर्वांचे हक्क सारखे आहेत, असे नेहमी वाटत असते. म्हणून आपणातीलच जरी त्यांनी कोणास राजा केले असले, तरी त्याच्या हुकूमतीने ते नेहमी चालतातच असे नाही. यामुळे बडे लोकांनी राजा केलेल्या मनुष्यास जितकी भीती असते, तितकी सामान्य लोकांनी निवडलेल्या राजास नसते. कारण

सामान्य लोक जात्या गरीब असून फारसे दुष्ट नसतात व साधारणपणे आपले रक्षण झाले म्हणजे निवडलेल्या इसमाची आज्ञा पाळण्यास ते तयार होतात. बडे लोकांच्या इच्छा मोठ्या कठीण असून, त्या बहुतकरून दुसऱ्यास त्रास झाल्याशिवाय भागणाऱ्या नसतात. सामान्य लोकांची गोष्ट तशी नसते. बडे लोकांसारख्या त्यांच्या इच्छा अमर्याद व अयोग्य नसतात. फक्त स्वसंरक्षण झाले म्हणजे ते संतुष्ट असतात. आणखी असे आहे की, सामान्य लोकांची संख्या जास्त असल्यामुळे तेच विरुद्ध असल्यास राजास स्वस्थता प्राप्त होत नाही; परंतु बडे लोकांची संख्या थोडी असल्यामुळे त्याजपासून फारसा उपद्रव होण्याचा संभव नसतो. सामान्य लोक राजास त्रासून चवताळले असल्यास फार तर ते त्याचा पक्ष सोडून जातील; परंतु बडे लोक जर नाखुश झाले, तर ते राजाचा पक्ष सोडतील इतकेच नाही, तर त्याच्या विरुद्ध गुप्त बेत करून बंडावा उत्पन्न करतील. कारण ते लबाड असून जो कोणी दुसरा वरचढ होण्याजोगा असेल, त्यासच जाऊन मिळतात. दुसरे असे आहे की, सामान्य लोक कधीही बदलले जात नाहीत; परंतु बडे लोकांविषयी तसे नाही. लहानाचा मोठा करणे व मोठ्याचा लहान करणे हे राजाच्या हातचे नसते. प्रस्तुत विषयाच्या जास्त स्पष्टीकरणार्थ बडे लोकांविषयी दोन तऱ्हेने विचार केला पाहिजे. एकतर ते सर्व व्यवस्थेमध्ये राजाच्या मताप्रमाणेच चालतील अथवा त्याचे विरुद्ध जातील. जर आपल्या इच्छेप्रमाणेच ते वागले, तर राजाने त्यांचा मान ठेवून त्यांस नेहमी संतुष्ट राखावे. त्यांच्या विरुद्धच जर ते जात असतील, तर ते दोन प्रकारांनी असतील. अंगी शक्ती नसून भित्रे असतील अथवा महत्त्वाकांक्षी असून स्वतःच्या फायद्याकरिता पाहिजे तसे राजाचे नुकसान करण्यास प्रवृत्त होतील. जर ते भित्रे असून विरुद्ध जात असले, तर त्यांजविषयी फारशी पर्वा करण्याचे कारण नसून त्यांचा सल्ला घेण्यास हरकत नाही. कारण जर त्यांच्या सल्ल्याने चांगल्या गोष्टी घडून आल्या, तर त्यांचा सल्ला घेतल्याबद्दल आपला मोठेपणा राहतो. जर त्यांचा सल्ला चांगला नसला, तर तो न घेतल्याबद्दल ते भित्रे असल्यामुळे त्यांची भीती बाळगण्याचे कारण नाही. वर सांगितलेले जे महत्त्वाकांक्षी लोक असतील त्याजला मात्र राजाने विशेष जपले पाहिजे व ते आपले पक्के शत्रूच आहेत असे समजून आपली नेहमी व्यवस्था ठेवत जावी. कारण प्रसंग आल्यास ते कधीही नुकसान केल्याशिवाय राहणार नाहीत व शक्यनुसार राजाचा नाश करण्यास तयार असतील. या सर्व गोष्टींवरून असे स्पष्ट होते की, सामान्य लोकांनी ज्याला राजा केले असेल, त्यांच्याशी त्याने नेहमी स्नेह भावानेच वागावे व कोणत्याही प्रकारचा जुलूम नसला म्हणजे ते खुश राहत असल्यामुळे, त्यांच्याशी स्नेह ठेवणेही कठीण नसते; परंतु सामान्य लोकांच्या इच्छेविरुद्ध बडे लोकांनी ज्यास राजा केले असेल, त्याने सुद्धा त्या सामान्य लोकांस खुश ठेवण्याचा यत्न केला पाहिजे व वरप्रमाणेच तो यत्न सिद्धीसही जाईल. आपल्यावर जुलूम होईल असे ज्या ठिकाणी लोकांस वाटत असते, त्या ठिकाणीच जर त्याजला चांगली वागणूक मिळाली, तर त्यांना आश्चर्य वाटून, एकदम ते त्या राजाच्या पक्षाकडचे इतके बनतात की, स्वतः आपण होऊन निवडलेल्या राजास सुद्धा ते इतके भजणार नाहीत. लोकांस खुश ठेवण्याचे पुष्कळ उपाय आहेत. त्यांजविषयी नियम बांधता

येणार नाही. कारण ते विषयभिन्नतेप्रमाणे बदलत जातात म्हणून त्यांजविषयी येथे जास्त विचार करण्याचे प्रयोजन नाही. फक्त एवढे मात्र सांगण्याची जरूर आहे की, काही झाले तरी राजाने सामान्य लोकांस नेहमी संतुष्ट राखले पाहिजे. नाही तर संकटसमयी त्यास काहीच उपाय राहणार नाही. नेबिडीस म्हणून स्पार्टन लोकांचा राजा होता, त्याच्यावर सर्व ग्रीस आणि रोमन लोक उठले असतानाही त्याने आपला टिकाव धरून स्पार्टाचे चांगल्या रीतीने रक्षण केले. या वेळी त्याने बडे लोकांच्या कपटास दाद न देता, सामान्य लोकांची मात्र मर्जी संपादन करून राहिला होता. तसे जर त्याने केले नसते, तर शबूंबरोबर त्यास सामना करता आला नसता. या माझ्या लिहिण्याचा अर्थ न समजन कदाचित कोणी असे म्हणतील की, किवळ सामान्य लोकांवर भरवसा टाकून राहणे म्हणजे वाळवेच्या पायावर इमारत उभारणे होय.' परंतु हे त्यांचे म्हणणे सर्वांशीच खरे आहे असे नाही. ही गोष्ट एखाद्या लहानशा गृहस्थाच्या संबंधाने खरी असेल कारण तो जर लोकांवरच भरवसा टाकून बसेल तर खचीत फसेल; परंतु वरील गोष्ट राजाच्या संबंधाने मात्र खरी होणार नाही. राजा जर धैर्यवान् असून आणीबाणीच्या प्रसंगी डगमगणारा असेल व दुसरी इतर साधने असून राज्य कसे करावे, हे त्यांस चांगले माहीत असेल, तर तो आपल्या सद्वर्तनाने आणि शौर्याने सर्व लोकांवर आपल्याविषयी असा काही ग्रह करून सोडील की, ते संकट समयी त्यास कधीही अंतर देणार नाहीत व त्याने त्याजवर चुकीने भरवसा टाकला असेही होणार नाही.

परंतु वरील राजाविषयी असे लक्षात ठेवले पाहिजे की, जो मनुष्य लोकांकडून राजा झाला असेल, त्याने एकाएकी सर्वच सत्ता बळकावण्याचा प्रयत्न करू नये. तसे केल्यास त्याचे राज्य फार दिवस टिकणार नाही. कारण त्याचा अंमल एक तर स्वतःकडून चालेल अथवा प्रतिनिधीच्या द्वारा चालत असेल, तर खऱ्या राजाची सत्ता फक्त नावाचीच असते. कारण त्याला प्रतिनिधीच्या मर्जीवर अवलंबून राहावे लागते आणि संधी आली असता प्रतिनिधी त्या राजास अजिबात काढून टाकण्याचा प्रयत्न करील व त्याच्या हातात सर्व लोक असल्यामुळे त्याचा बेत कदाचित् तडीसही जाईल. अशा प्रसंगी या राजास जुलूमही करता येत नाही. कारण हाताखालील सर्व अंमलदार पूर्वीप्रमाणेच कामावर असतात म्हणून एखादा जुलुमाचा हुकूम ते सहन करणार नाहीत आणि भरवसेलायक लोकांची नेहमी राजास जरूर असतेच, म्हणून शांततेच्या प्रसंगी जे काय चांगले म्हणून दिसेल, त्याजवरच भरवसा ठेवून, राजाने स्वस्थ बसता कामा नये. जोपर्यंत प्रसंग आला नाही, तोपर्यंत सर्व जिवास जीव देण्यास किंवा पाहिजे ती गोष्ट करण्यास तयार असतात; परंतु एकदा जर गडबड होऊन वादळ सुरू झाले, तर ते आवरण्याचे कठीण जाते. मग कोणी पुढे मदतीस येणार नाही व एकवार हातातून गोष्ट गेली म्हणजे ती फिरून यावयाची नाही. या सर्व गोष्टींवरून हे उघड आहे की, कोणत्याही राजाने दूरवर दृष्टी देऊन शहाणपणाने सर्व ठिकाणी सर्व प्रसंगी वर्तनामध्ये सारखेपणा ठेवून आपल्या अमलाची आणि व्यवस्थेची लोकांस नेहमी जरूर राहील असे वागत असावे, तसेच लोक एकनिष्ठतेने आपल्यास भजतील अशी तजवीज नेहमी ठेवावी.

❍❍❍

भाग-१०

राज्यांची शक्ती कशी समजावी याविषयी

एखाद्या राज्याची शक्ती समजण्याची ज्याची इच्छा असेल, त्याने प्रथम असा विचार केला पाहिजे की, त्या राजाची सत्ता आणि मुलूख हा राज्याचे रक्षण करण्यापुरता आहे किंवा नाही आणि राजास मदतीकरिता दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते किंवा कसे? मला वाटते की, जे राजे संपत्तीच्या जोरावर अगर आपल्या प्रजेच्या जोरावर मोठे सैन्य बाळगू शकून शत्रूबरोबर पाहिजे तेव्हा टक्कर घेण्यास तयार असतात, ते राज्य करण्यास समर्थ आहेत, असे म्हणण्यास हरकत नाही; परंतु ज्यांना राज्याच्या बाहेर शत्रूबरोबर लढाई करण्याचे सामर्थ्य नसते व जे कसे तरी आपलाच मुलूख संरक्षण करीत बसतात, त्यांना स्वतःची शक्ती मुळीच नसते. पहिल्या प्रकारच्या राजांविषयी इतकेच सांगितले पाहजे की. त्यांनी आपले राजधानीचे शहर तट वगैरे बांधून मजबूत करावे आणि सर्व देशभर पसारा करीत बसू नये. असे करूनही आणखी जर तो प्रजेच्या संबंधाने वर सांगितलेले नियम ध्यानी बाळगील, तर त्याजवर हल्ला करण्याची शत्रूची सहसा छाती होणार नाही; कारण लोक बहुतकरून एखादे कठीण काम मोठ्या विचारपूर्वकच हाती घेतात आणि आपले राजधानीचे शहर बळकट करून जो राजा प्रजेच्या मर्जीत असतो, त्याजवर हल्ला करण्याचे काम सहसा सोपे नसते.

जर्मनी देशातील बहुतेक शहरे स्वतंत्रच आहेत. जरी प्रत्येकाचा मुलूख अगदी लहान आहे, तरी मुख्य बादशहाचा हुकूम पाळणे केवळ त्यांच्या मर्जीवरच असते आणि ती सर्व शहरे चांगली मजबूत असल्यामुळे बादशहाची अगर दुसऱ्या राजाची त्यास कधीच पर्वा वाटत नाही. प्रत्येकास असे वाटते की, अशा प्रकारची शहरे हस्तगत करणे मोठ्या धोक्याचे व विलंब लागणारेच काम आहे. कारण त्यांचे किल्ले मोठे मजबूत, खंदक खोल, तोफखाना व्यवस्थीशीर आणि त्यांची सामुग्री निदान वर्षभर तरी पुरणारी, असे त्यांचे साहित्य नेहमी तयार असते. याशिवाय गरीब लोकांची जोखीम इतरांवर पडू नये, म्हणून त्यांजकरिता

उद्योगशाळा वगैरे तयार असतात व त्यामध्ये श्रम करून गरीब लोक आपला उदरनिर्वाह आपणच करतात. त्यांच्या सैन्यास कवाईत चांगली शिकवलेले असून पुष्कळ हितावह कायदे आणि चांगल्या रीती सुरू केलेल्या असतात.

यावरून हे उघड आहे की, ज्या राजाचे राजधानी शहर मजबूत असून प्रजेचे त्यास साह्य आहे, त्यास सहसा शत्रूकडून उपद्रव पोहोचत नाही आणि पोहोचलाच तर तो विफल जातो. कारण या जगातील व्यापार इतके भिन्न आहेत की, एखाद्या शहरास वेढा देऊन वर्ष वर्ष जरी राहिले तरी शत्रूस मुळीच धक्का पोहोचत नाही. कदाचित कोणी असे म्हणतील की, 'शहराबाहेर जे लोक राहत असतील त्यांची घरे वगैरे शहरास वेढा पडला असता लुटली जाऊन त्यांस हर एक प्रकारची उणीव होईल. असे झाले म्हणजे अर्थातच ते लोक आपले संरक्षण न झाल्यामुळे राजास सामील राहणार नाहीत.' यास इतकेच उत्तर आहे की, शहाणा व युक्तिवान जो राजा असेल त्यास या अडचणी फारशा येणार नाहीत. तो आपल्या लोकांस उत्तेजन देऊन शत्रूचा उपद्रव फार वेळ टिकणार नाही, वगैरे सांगून त्यांची मने आपल्याकडे वळवून घेईल. त्यास तो असे सांगेल की. 'शत्र फार क्रर आहेत म्हणन तम्ही त्यांस मिळाल्यास तमचे फार हाल होतील.' कधीकधी तर तो त्यांपैकी जे बंडखोर असतील, त्यांस युक्तीने दूर करील, अशा रीतीने हरएक अडचण सहज भागवता येतात. कदाचित असे घडेल की, शत्रू बहुतकरून एखाद्या शहरावर हल्ला करताच तेथील होक शहराचा बचाव करण्यात गुंतले असता, ते तो लुटून फस्त करील व जाळून टाकील. असे झाले तरी राजास फारशी भीती असते, असे नाही. कारण संकटाची वेळ टळून जाऊन थोडे दिवस होऊन शांतपणे विचार करू लागल्यावर त्यास असे वाटू लागते की, 'राजाकरिता आपण आपली घरे दारे शत्रूला अर्पण केली म्हणून आता राजास आपल्या प्रजेचे संरक्षण करणे भागच आहे.' असा विचार करून खुशीने ते पुनः आपल्या राजास येऊन मिळतात. मनुष्यास आपल्यावर दुसऱ्याचे उपकार झाले म्हणजे जितका आनंद होतो, तितकाच आपण दुसऱ्यावर केले म्हणजे होतो. म्हणून आपले राजावर उपकारच आहेत, असे मानून त्यास ते अंतर देण्यास धजत नाहीत.

या सर्व गोष्टींवरून हे उघड आहे की, राजाला प्रजेची मर्जी संपादणे व ती कायम राखणे कठीण आहे असे नाही. मात्र, फार दिवस वेढा पडून ते जेरीस आले असतील, तर त्यांच्या उपजीविकेची पंचाईत पडू न देता मोठ्या युक्तीने संकट टाळण्याचा प्रयत्न करून त्यांचा त्याने बचाव केला पाहिजे.

❍❍❍

भाग-११

धर्मसत्ताक राज्ये

येथवर निरनिराळ्या प्रकारच्या राज्यांविषयी विवेचन झाले. आता धर्मसत्ताक राज्यांविषयी मात्र लिहिणे राहिले आहे. अशा राज्यांविषयी अडचण काय ती आरंभीच ती मिळवताना असते. कारण, ती मिळविण्यास शहाणपणाची अगर नशिबाची अवश्य जरूर आहे; परंतु एकदा हाती आल्यावर (ख्रिस्ती धर्मामध्ये धर्मसत्ता सर्वांस पूर्वापार पूज्य असल्यामुळे) ती राखणे अगदी सोपे आहे. आपोआप लोक धर्माधिकारी राजाची सत्ता कमी होऊ देत नाहीत. मग त्या राजाची वागणूक कशीही असली तरी चालते.

चमत्कार काय तो हाच की, अशा राजाच्या ताब्यात पुष्कळ मुलूख असतो व त्याचे रक्षण त्याने नाही केले तरी चालते. पुष्कळ प्रजा त्याच्या ताब्यात असते; परंतु तिजवर अंमल करण्याची जरूर नसते. असे आहे तरी, त्याचा मुलूख त्याजकडून कोणी हिरावून घेत नाही आणि प्रजेच्या कल्याणाकडे राजाचे लक्ष नसतानाही ती असंतुष्ट राहत नाही. अशी राज्ये सर्व जगात मोठी सुखी आणि निर्भय आहेत, असे म्हटल्यास काय चिंता आहे? जसे काय विलक्षण अमानुष शक्तीच्या योगानेच ती चालत असतात. त्यांची सत्ता जणू काय ईश्वरापासूनच प्राप्त झाली असल्यामुळे, आमच्या सारख्याने त्याचे वर्णन करणे म्हणजे एक प्रकारचे धाडसच होईल; तथापि राजकीय प्रकरणात धर्माचे इतके वर्चस्व कसे वाढले अशी कोणास शंका येईल व ही शंका येणे साहजिक आहे. कारण पोप अलेक्झांडरच्या पूर्वी इटली देशाचे राजे, सरदार, मानकरी वगैरे सर्व मोठे लोक धर्माचे फारसे वर्चस्व मानीत नव्हते; परंतु पुढे तर धर्माची सत्ता इतकी वाढत गेली की, तिच्या योगाने फ्रान्सच्या राजाला इटली सोडून जावे लागले व व्हेनिशियन लोकांचा नाश झाला. या सर्व गोष्टी ध्यानात घेतल्या म्हणजे धर्मसत्तेविषयी येथे विचार करणे अप्रशस्त होणार नाही. फ्रान्स देशाचा चार्लस् याने इटलीवर हल्ला केला त्याच्यापूर्वी तो देश पोप व्हेनिशियन् , नेपल्सचा राजा, मिलनचा ड्यूक आणि फ्लाटेन्टाईन्स वगैरे सर्वांच्या अमलाखाली होता. हे सर्व जण दुसऱ्या शत्रूला

इटलीमध्ये न येऊ देण्याविषयी चांगली खबरदारी घेत होते आणि आपसामध्ये कोणासही वरचढ न होऊ देण्याविषयी जपत होते. या सर्वांमध्ये पोप आणि व्हेनिशियन्स काय ते प्रमुख होते व इतरास यांचा वचक होता. व्हेनिशियन लोकांचे प्राबल्य न वाढू देता फेराराचे रक्षण करण्याविषयी बाकीचे सर्व एकत्र होत असत. रोमन सरदार पोपची सत्ता वाढू न देण्याविषयी प्रयत्न करीत असत. रोमन सरदारांमध्ये नेहमी दुफळी असे व पोपाच्या डोळ्यासमोर त्यांच्या नेहमी धडधडीत झटपटी चालत असत. या भांडणामुळे पोपाला आपले डोके वर काढता येत नसे. क्वचित् सेक्स्टस सारखा एखादा जबरदस्त पोप होई खरा, तथापि तो कितीही धीट, शहाणा, नशीबवान असला तरी त्याला वरील अडचणी दूर करता येत नसत. प्रत्येक पोपकडे अधिकार फक्त दहा वर्षेच राही. या थोडक्या काळात वरील सरदारांची भांडणे मोडण्यास अवकाश नसे. एखाद्या वेळेस एका पक्षाचा पराभव झाला, तर लागलाच कोणी तरी दुसरा त्यांना येऊन मिळे आणि पुनः भांडणे सुरू होत. यावर सांगितलेल्या कारणामुळे पोपाची सत्ता लोकांस फारशी महत्त्वाची वाटत नसे. या नंतर सहावा अलेक्झांडर पोप झाला आणि त्याने मात्र सत्ता आणि द्रव्य हातात असल्यावर काय पराक्रम करता येतील, हे लोकांस दाखवले. फ्रेंच लोकांनी स्वारी केल्याची संधी साधून ड्यूक व्हालेंटाईनच्या संबंधाने त्याने काय काय गोष्टी केल्या ते मागे एकवार सांगण्यात आलेच आहे. जरी त्याची इच्छा धर्माचे वर्चस्व वाढवण्याची नसून वरील ड्यूकलाच मोठेपणास आणण्याची होती, तरी एका गोष्टीकरता केलेला प्रयत्न दुसऱ्या गोष्टीमध्ये फळास आला. कारण तो मरण पावल्यावर ड्यूक व्हालेन्टाईनही मरण पावला आणि सर्व सत्ता धर्माचेच ताब्यात आली. त्यानंतर जूलियस पोप झाला, तेव्हा त्यास धर्माची सत्ता मोठी अवाढव्य असल्याचे दिसून आले. रोमाना प्रांत त्याच्या ताब्यात होता. रोमचे सरदार नाहीसे होऊन त्यांची दुफळीही बंद झाली होती व लोकांपासून द्रव्य उपटण्याचाही नवीन प्रघात पडला होता. हे सर्व मार्ग ज्यूलियसनेही सुरू ठेवले आणि बलोना शहर जिंकून, व्हेनिशियन लोकांचा पराभव करून फ्रेंच लोकांना इटलीतून घालवून देण्याचा त्याने प्रयत्न केला. हे सर्व त्याचे बेत सफल झाले व स्वतःकडे काही न घेता धर्माच्याच बढतीकरिता हे सर्व आहे, असे लोकांस भासवून दिल्यामुळे त्याची मोठी वाहवा झाली. रोमन सरदारांची भांडणे बंद होण्याचे एक कारण असे की, त्यांना धर्माचा मोठेपणा त्रासदायक वाटू लागला होता आणि दुसरे त्यांच्यामध्ये कार्डिनल्स नव्हते व कार्डिनल्स त्यांच्यामध्ये होईपर्यंत, ते कधीही स्वस्थ बसले नाहीत. हे कार्डिनल्स लोकच सर्व सरदारांस सल्ला मसलत देत असत व यामुळे ते सरदारही त्यांचे चांगले रक्षण करीत. म्हणून या धर्माधिकाऱ्यांच्याच चढाओढीमुळे या सरदारांमध्ये नेहमी कलह सुरू असत.

हल्ली अधिकारावर असलेले पोप लिओ धर्माची सत्ता अति विस्तृत असतानाच गादीवर आले व हे प्रामाणिक आणि फार सद्गुणी असल्यामुळे धर्माची सत्ता आणखी जास्त वाढून लोकांच्या मनात पूज्य बुद्धी उत्पन्न होईल अशी आशा आहे.

❍❍❍

भाग-१२

सैन्य किती प्रकारचे असते आणि भाड्याचे सैन्य म्हणजे काय, याविषयी

पुस्तकारंभी सांगितल्याप्रमाणे निरनिराळ्या प्रकारच्या राज्यांविषयी येथपर्यंत वर्णन झाले. त्यांच्यामध्ये गुणदोष कोणते आहेत व त्यांचे संपादन आणि रक्षण कोणत्या उपायांनी करावे याविषयी विचार झाला. आता परराज्यापहरण अथवा स्वराज्य संरक्षण या करिता इतर कोणत्या गोष्टींची विशेष जरूरी आहे, त्यांचा सर्वसामान्य विचार कर्तव्य आहे.

वर एकवार असे सांगण्यात आले आहे की, राजाने आपल्या राज्याचा पाया चांगला मजबूत घातला पाहिजे; नाहीतर त्याजवर उभारलेली इमारत लवकरच ढासळून खाली पडेल.

हरएक राज्याचा मुख्य पाया म्हटला म्हणजे चांगले कायदे आणि चांगली फौज. ज्या ठिकाणी फौज चांगली नसेल, त्या ठिकाणी चांगले कायदे होऊ शकणार नाहीत आणि ज्या ठिकाणी फौज चांगली, तेथे कायदेही चांगले. म्हणून कायद्याविषयी येथे विचार न करता फौज कशी असावी याबद्दल विचार करू.

बहुशः राजाला उपयोगी असे सैन्य चार प्रकारचे असते. स्वतःचे, भाड्याने आणलेले, मदतनीस आणि मिश्र.[१] दुसऱ्या प्रकारचे सैन्य निरुपयोगी असून बाधक असते. जो राजा

---

१. टीप : पुढील विषयाच्या स्पष्टीकरणार्थ या चार शब्दांचा अर्थ ज्ञात हवा तो देण्याची आवश्यकता आहे'स्वतःचे सैन्य' म्हणजे काय, हे सर्वांस माहीत आहेच. स्वतः पगार देऊन कवाईत वगैरे शिकवून नेहमी तयार ठेवलेले जे सैन्य ते. 'भाड्याने आणलेले सैन्य' म्हणजे प्रसंग येईल त्यावेळी परकीयांचे सैन्य जितके दिवस जरूर असेल तितक्यापुरता पगार देऊन आणलेले असते ते. अशाप्रकारच्या सैन्यावर स्वतःचा ताबा नसतो व कवाईत वगैरे चांगली त्यांना येत असतेच असे नाही. 'मदतनीस सैन्य' म्हणजे स्नेही राजापासून अगर सरदारांपासून प्रसंगापुरती मदत मागून जे सैन्य आणले असते ते. वरील कोणत्याही दोन प्रकारचे सैन्य एक ठिकाणी करून झालेले जे ते 'मिश्र सैन्य' होय.

स्वराज्य संरक्षणाकरिता अशा प्रकारच्या सैन्यावर अवलंबून राहील, त्याची गादी कधीही निर्भय राहणार नाही. कारण अशा प्रकारच्या सैन्यातील लोक महत्त्वाकांक्षी असतात. ते कवाईत चांगले शिकलेले नसतात. त्यांच्यात आपसांत फूट असून स्नेह्यांशी कृतघ्नपणा व शत्रूशी नीचपणा आचरण्यास ते मागे पुढे पाहत नाहीत. त्यांना भीती म्हणून - ईश्वराची अथवा मनुष्याची - कोणाचीच नसते. याजमुळे जो राजा अशा लोकांवर भरवसा टाकून स्वस्थ बसतो, त्याचा नाश होण्यास फार दिवस लागणार नाहीत, हे खचित आहे. शांततेच्या वेळी हे लोक कलह माजवतात व लढाईवर जाताना त्यांच्या मनामध्ये स्वदेशप्रीती अगर स्वदेशाभिमान यांचा लेशही नसतो. त्यांची नजर काय ती पैशावर व जो पैशाच्या पाठीस लागला त्याच्या हातून महत्कृत्य घडणे अशक्य आहे. जोपर्यंत शिपाईगिरी गाजविण्याचा प्रसंग आला नाही, तोपर्यंत ते फार चांगले दिसतात; परंतु कोणताही प्रसंग आला की, लागलीच त्यांच्यामध्ये खरे काय आहे, हे सहज दिसून येते.

या गोष्टीच्या उदाहरणार्थ फारसे दूर जाण्यास नको. इटलीचा नाश होण्यास कारण तरी हेच की, तेथील राजे पुष्कळ दिवस भाड्याने आणलेल्या सैन्यावर अवलंबून राहत असत. ही गोष्ट खरी आहे की, पूर्वी कधी अशा लोकांकडूनही क्वचित प्रसंगी एखादी चांगली मदत झाली असेल व ते आपसांतही प्रसंगानुसार चांगले वागले असतील; परंतु परकीयांकडून जोराचा हल्ला इटलीवर येताच त्यांच्यामध्ये कितपत खरेपणा होता, हे लोकांस सहज दिसून आले. सातव्या चार्लसने तरी इटलीवर स्वारी केली त्याचे कारण हेच. कोणी ग्रंथकाराने असे म्हटले आहे की, आम्हावर संकटे येण्यास कारणीभूत आमच्याच चुका होत. ही गोष्ट सर्वथैव खरी आहे. आता या चुका कोणत्या हे ठरवणे मात्र कठीण आहे. त्यावेळच्या राजाला मताप्रमाणे असे खचीत आहे की, वर निर्दिष्ट चुका इटलीच्या राजांच्या हातून घडल्या म्हणून त्यांजबद्दल त्यांस पुढे अशी कडक शिक्षा भोगावी लागली. या गोष्टीबद्दल आणखीही खोल विचार करून काय निष्पन्न होते ते पाहू.

भाड्याने आणलेल्या सैन्याचे मुख्य अंमलदार शूर असतील अथवा शूर नसतील. जर ते शूर असले तर सहजच ते ज्याला मदतनीस आले असतील त्याचा नाश करण्याविषयी प्रयत्न करून अथवा इतर प्रजेस त्रास देऊन, सर्व सत्ता स्वतःच बळकावण्याचा यत्न करतील. म्हणून त्यांजवर विश्वास ठेवणे गैरशिस्त होईल आणि जर ते शूर नसले, तर आपले नुकसान होणारच. या वरील गोष्टीसंबंधाने कोणी अशी हरकत घेतील की, भाड्याने आणलेल्या सरदारांचीच काय, इतर सर्व सरदारांची चाल अशीच आहे; परंतु या अशा म्हणण्यास इतकेच उत्तर आहे की, लढाईवर बहतकरून राजा स्वतः जात असतो. प्रजासत्ताक राज्यांमध्ये मात्र लढाईवर मख्य सेनापती असेल, तो जातो. राजाला सर्वांचा पुढारी स्वतःच झाले पाहिजे. प्रजासत्ताक राज्यांची गोष्ट निराळी. तथापि जो सेनापती सर्वानुमते नेमला गेला असेल, त्याने आपले काम चांगले न बजावल्यास, त्याच्या हातातून सेनाधिपत्य जाण्याचा संभव असतो

व इतरही पुष्कळ तऱ्हेची बंधने त्याला असतात. म्हणून त्याच्याकडून फारशी दगलबाजी होण्याचा संभव नाही व हे आमचे म्हणणे इतिहासावरून स्पष्ट होईल. लढाईमध्ये तलवार बहादरी आजपर्यंत राजांकडून अथवा प्रजासत्ताक राज्यांमध्ये असलेल्या सेनापतींकडूनच घडली आहे. भाड्याने आणलेल्या लोकांकडून कधीही घडलेली नाही. त्यांच्या हातून उपद्रव मात्र झाले आहे, तसेच जे प्रजासत्ताक राज्य स्वतःच्या सैन्यावर अवलंबून राहून, लढाईच्या प्रसंगी दुसऱ्यांच्या मदतीची जरूर ठेवत नाही, ते बहुतकरून चिरायु असून, त्यास कोणाचीही भीती नसते; परंतु भाड्याच्या लोकांचीच जेथे जरूर, ती राज्ये फार दिवस टिकली नाहीत. रोम आणि स्पार्टा ही पुष्कळ वर्षेपर्यंत टिकली. ती स्वपराक्रमावरच चालत आली होती. शेजारच्या राजांपेक्षा स्विस लोक जास्त शूर आहेत, म्हणूनच जास्त स्वतंत्रता भोगीत आहेत. भाड्याच्या सैन्यापासून काय अपाय घडतात, याचे उदाहरण कार्थोजियन लोकांचे चांगले लक्षात ठेवण्यासारखे आहे. कारण रोमन लोकांची त्यांची पहिली लढाई संपण्याच्या वेळी परकीय सैन्याकडूनच त्यांचा नाश झाला. त्यावेळी त्यांचे स्वतःचे सैन्य लढाईत नव्हते असे नाही, तरी परकीयांनी आपला कार्यभाग साधण्याचा यत्न केला, त्याजपुढे त्यांचे काही चालले नाही.

इपामिनोंडास मरण पावल्यावर थीबन लोकांनी मासिडोनचा फिलिप यास आपले सैन्याधिपत्य दिले. त्याने त्यांच्या शत्रूचा नाश केला खरा; परंतु त्यांसही त्याने आपले गुलाम करून सोडले. ड्यूक फिलिप मरण पावल्यावर मायलेनीस लोकांनी व्हेनिशियन लोकांचा पराभव करण्याकरिता फ्रान्सिस्को फोरझा याची मदत मागितली. त्याने शत्रूचा पराभव केला खरा; परंतु तो मायलेनीस लोकांना सोडून त्यांच्या शत्रूलाच जाऊन मिळाला. नेपल्सची राणी जोन म्हणून होती, तिच्या जवळ फ्रान्सिस्कोचा बाप नोकरीस होता; परंतु एकाएकी तो आपल्या सैन्यासह तिला सोडून गेला. म्हणून तिला आरागानच्या राजाची मदत मागणे भाग पडले. पुढे व्हेनिशियन आणि फ्लारेन्टाईन या दोघांनीही परकीय सैन्याच्या साह्याने आपली राज्ये बरीच वाढवली. तरी फ्लारेन्टाईनच्या संबंधाने केवळ त्यांचे नशीब चांगले म्हणूनच त्यांस यश आले. कारण अक्यूटोसारख्या सरदारांची त्यांस खरोखर भीती असतानाही, त्यांस जय प्राप्तीस जागाच नसल्यामुळे, त्याजपासून फ्लारेन्टाईन्स् यांना काही उपद्रव झाला नाही. जर त्यास जय मिळला असता तर तो त्याच्याशी विश्वासाने वागला असताच ना. फारेझासारखे दुसरे सरदार होते; परंतु त्यासही इतर शत्रू असल्यामुळे काही हालचाल करता आली नाही. फ्रान्सिस्को ब्राक्सिओ सारखे जे आणखी कित्येक सरदार होते, त्यांचे लक्ष लांबर्डी, नेपल्स इकडे लागले असल्यामुळे त्यांच्याही हातून फ्लारेन्टाईन्स् लोकांना त्रास झाला नाही. अर्वाचीन इतिहासातसुद्धा पुष्कळ उदाहरणे सापडतील. पॉल व्हिटेलाय म्हणून एक शहाणा गृहस्थ होता. त्याचा चांगला लौकिक असे. त्यास फ्लारेन्टाईन्स लोकांनी मुख्य सेनापती केले. त्याने जर पिसा शहर घेतले असते, तर फ्लारेन्टाईन्स लोकांस गप्प बसावे

लागले असते. कारण नोकरी सोडून शत्रूस तो जाऊन मिळला असता, तर थोड्याच वेळात सर्व फ्लारेन्टाईन्स लोकांना त्याने आपल्या ताब्यात आणले असते. व्हेनिशियन लोकांनी मात्र चांगली सावधगिरी ठेवली होती. सर्व कारभार व भरवसा ते आपल्याच सैन्यावर टाकत असत व स्वतःवरच अवलंबून राहिल्यामुळे त्यांस मोठमोठ्या गोष्टीकरिता आल्या. त्यांच्या शौर्याचा आणखी थोडासा विचार करणे सर्वांस मोठा दरारा असे व बरेच दिवस त्यांनी शहाणपणाने वर्तन केले; परंतु पुढे यास त्यांनी आपला सरदार नेमले व राज्य वाढवण्याचा प्रयत्न करू लागले. हा सरदार असताना मिलनच्या ड्यूकबरोबर त्यांनी बऱ्याच लढाया मारल्या; परंतु तोच सरदार पुढे त्यांच्या कल्याणाविषयी दुर्लक्ष करू लागला. तेव्हा त्याच्या हातून यापुढे काही पराक्रम व्हावयाचे नाहीत, असे त्यांस कळून आले; परंतु त्याजकडून त्याचे काम काढून टाकण्याची सत्ता या लोकांच्या हातात नव्हती व तसे करते, तर कदाचित् मिळालेलेही सर्व गेले असते. म्हणून त्यास ठार मारणे त्यांस भाग पडले. त्यानंतर दुसरे कित्येक सरदार त्यांनी नेमले; परंतु त्यांनीही काही विशेष म्हणण्यासारखे केले नाही. इतकेच नाही, तर सुमारे ८०० वर्षांपर्यंत जे काही त्यांनी मिळवले होते ते सर्व वेळाच्या लढाईत नाहीसे झाले. न यात फारसे आश्चर्यही नाही. कारण परकीय अंमलदारांकडून जय मिळणे ते थोडथोडेच मिळतात; परंतु तोटे होणे ते मात्र लवकर लवकर होत जातात. ज्याअर्थी इटलीतील उदाहरणे सांगण्याचा आमचा इरादा मुळपासून आहे, त्याअर्थी त्यासंबंधाने आणखी थोडासा विचार करणे अयोग्य होणार नाही. रोमन बादशाहीचा जेव्हा इटली देशात हास होत चालला, तेव्हा पोप हा राजकीय कामात हात घालू लागला. इटलीमध्ये लहान लहान राज्ये स्वतंत्र झाली. पूर्वापार चालत आलेले सरदार व बडे लोक यांजवर बादशहाची मेहरबानी असे, म्हणून हे लोक बहुशः रयतेवर फार जुलूम करीत असत. ही संधी साधून सर्व लोक सरदार लोकांवर शस्त्र घेऊन उठले व त्यांस पोपने मदत दिली व दुसरी कित्येक शहरे काबीज करून जे ते स्वतंत्र लहान लहान राजे झाले. इटलीचे राज्य लयास जाऊ लागले. सर्व सत्ता पोपच्या हातात आली व काही प्रजासत्ताक राज्येही स्वतंत्र झाली. अर्थातच नवीन पदवीस चढलेले राजे हत्यार वापरण्यात तयार नव्हते व राज्यपद्धतही त्यांस माहीत नव्हती, म्हणून परकीयांची मदत मागणे त्यांस जरूर पडले. ब्राक्सिओ फोरझा वगैरे कित्येक मोठमोठे सरदार इटलीत येऊन पाहिजे तशी बंडाळी करू लागले. या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला की, चाल राजाने इटलीवर स्वारी केली. लुईने इटली देश लुटून टाकला. फोरझा याने सर्व राष्ट्र धुळीस मिळवले आणि शेवटी स्विस लोकांनी त्यांची सर्व कीर्ती लयास नेली. या स्विस लोकांनी क्रमाक्रमाने खाली लिहिल्याप्रमाणे गोष्टी केल्या. प्रथम इटलीचा सर्व नावलौकिक नाहीसा केला. उघडच आहे. स्वत:चे राज्य लहान असून लोकसंख्या फार असली, म्हणजे जास्त देश मिळवल्याशिवाय सुटकाच नाही. नंतर त्यांचे जे पायदळ होते, त्याच्या ठिकणी त्यांनी स्वार तयार केले व नंतर पलटणीच्या पलटणी तयार झाल्या व

पुढे-पुढे त्यांचे सैन्य इतके मोठे झाले की २० हजार सैन्यामध्ये पायदळ फार झाले, तर दोन हजारांचे वर नसे. त्यांची लढाईची पद्धतही चमत्कारिकच होती. स्वतःला किंवा आपल्या सैन्याला कोणताही उपद्रव ते होऊ देत नसत. लढाईमध्ये कोणालाही ते ठार मारत नसत. फक्त लढाईमध्ये लोक धरून कैद मात्र करीत असत; परंतु त्यांसही काही शिक्षा केल्याशिवाय अथवा पैसा घेतल्याशिवाय सोडून देत असत. जेव्हा ते एखाद्या शहरास वेढा देऊन बसत, तेव्हा रात्रीच्या वगैरे वेळी शहरातील लोक बेसावध असताना त्याजवर तोफा, बंदुकी वगैरे सोडीत नसत किंवा त्यांजवर एकाएकी जाऊन छापा वगैरे घालत नसत. भलत्याच वेळी जाऊन गुप्त रीतीने ते लोकांस त्रास देत नसत व हिवाळ्याच्या दिवसात लढाईसुद्धा बंद ठेवत असत. बरे अशी कृत्ये त्यांनी केली, ती त्यांच्या अंमलदारांच्या निष्काळजीपणाने केली असे नाही, तर असे करण्याची त्यांची रीतीच होती व ही रीती बुध्या स्वीकारण्याचे कारण तरी इतकेच की, जे शिपाई समरांगणांत लढण्यास आणावयाचे, त्यांचे श्रम व भीती होईल तितकी कमी केली पाहिजे, असे त्यांस निरंतर वाटत असे. अशा युक्तीने त्यांनी सर्व इटली देश गुलामाप्रमाणे आपल्या ताब्यात आणला.

○○○

भाग-१३

मदतनीस, मिश्र व स्वतःच्या सैन्याविषयी

मदतनीस सैन्यसुद्धा अपायकारक सैन्याचाच एक प्रकार आहे. जेव्हा एखाद्या बलिष्ठ राजास सैन्य घेऊन आपण आपल्या संरक्षणाकरिता मदतीस बोलावतो, तेव्हा त्या सैन्यास मदतनीस सैन्य असे म्हणतात. पोप ज्यूलियस च्या उदाहरणानेच हे व्यक्त होईल. कारण त्याने फेरारावर स्वारी केली, त्यावेळी प्रथम त्याने भाड्याचे सैन्य आणले होते; परंतु त्याजपासून काही उपयोग होत नाही असे वाटल्यावरून, त्याने मदतनीस सैन्य बोलावण्याचा विचार करून, त्याप्रमाणे स्पेनचा राजा जो फेरंड यास आपले सैन्य घेऊन मदतीस येण्याविषयी विनंती केली. अशाप्रकारे मदतीस बोलावलेले सैन्य वाईट असते असे नाही; तथापि जो त्यांस मदतीस बोलावतो त्याचे नुकसान झाल्याशिवाय राहणार नाही. कारण त्यांचा पराभव झाला तर, अर्थातच स्वतःचे नुकसान व पराभव न होता जय झाला, तर त्यांच्या मर्जीवरच स्वतःला अवलंबून राहावे लागते. अशाप्रकारची उदाहरणे प्राचीन इतिहासात पुष्कळच सापडतील. तथापि अलीकडचेच एक ताजे उदाहरण पोप अकरावा ज्यूलियस याचे घेऊ. या पोपने फेरारावर स्वारी केली हे अगदी अविचाराचे व उतावीळपणाचे कृत्य होय. कारण त्या योगाने त्याचे सर्व राज्य परकीयांच्या हाती मात्र गेले. तथापि त्याचे नशीबच त्याला अनुकूल असल्यामुळे अशी काही गोष्ट घडून आली की, त्याच्या मूर्खपणाचे फळ त्यास भोगावे लागले असते, ते लागले नाही. कारण त्याच्या मदतीस आलेल्या स्पेन लोकांचा राव्हेना येथे पराभव झाला. नंतर स्विस लोकांनी स्पेन लोकांवर हल्ला करून पराभव केला. म्हणून पोपास शत्रूच्या स्वाधीन व्हावे लागले नाही.

फ्लारेन्टाईन्स लोकांनी स्वतःजवळ सैन्य नसल्यामुळे पिसा हस्तगत करून घेण्याकरिता १० हजार फ्रेंच लोक मदतीस आणले; परंतु आजपर्यंत कधी इतके वाईट प्रसंग आले नाहीत, असे प्रसंग त्यांच्यावर फ्रेंच मदतीमुळे आले. कान्स्टान्टिनोपलच्या बादशहाने त्याचे

शेजारी जे ग्रीस लोक राहत होते, त्यांजवर हल्ला करण्याकरिता १० हजार टर्क लोक ग्रीस देशात पाठवले. लढाई संपल्यावर हे लोक तो देश सोडून जाईनात व मुसलमान लोकांनी दुसऱ्या राष्ट्राचे स्वातंत्र्य नष्ट करून त्यांस अगदी गुलाम करून सोडण्याचा जो पुढे क्रम चालविला, त्याचा आरंभही या वेळीच झाला. ज्याला लढाई करणे नसेल, त्याने अशा लोकांची मदत घेतल्यास हरकत नाही; परंतु लढाईच्या प्रसंगी मदतनीस सैन्य भाड्याने आणलेल्या सैन्यापेक्षा जास्त उपद्रवकारक होते व ते केव्हा स्वतःवर उठेल याचा नियम नाही. कारण ते सर्व लोक एकजुटीचे असतात व त्यांच्यावर अधिकार दुसऱ्याचा असतो. भाड्याने आणलेल्या लोकांची गोष्ट अशी नाही. जय प्राप्त झाल्यावर त्यांच्याकडून उपद्रव होण्यास बराच काळ लागेल; कारण त्यांच्यामध्ये एकी नसते व ते भिन्न भिन्न प्रकारचे असून पैशावरच नजर देऊन लढाईस आलेले असतात. त्यांजवरच एक आपला सेनापती नेमून दिला म्हणजे त्यांच्याकडून फारसा उपद्रव होण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी राहत नाही. भाड्याने आणलेल्या लोकांपासून नुकसान, ते भित्रे व आळशी असल्यामुळेच काय होणे ते होईल; परंतु मदतनीस आणलेल्या सैन्यापासून नुकसान, ते शूर व चलाख असल्यामुळे होईल. म्हणून जे कोणी शहाणे राजे होऊन गेले, त्यांनी या दोन्ही प्रकारच्या सैन्याचा कधीही उपयोग केला नाही. ते स्वतःवरच अवलंबून राहत असत. त्यांना असे वाटत असे की, दुसऱ्याची मदत घेऊन जय मिळवण्यापेक्षा स्वतःचेच सैन्य घेऊन पराभव जरी झाला तरी बरा. कारण दुसऱ्याच्या साहाय्याने मिळवलेल्या जयास जय असे कसे म्हणता येईल? सीझर बॉरजियाचेच उदाहरण पाहा - या ड्यूकाने फ्रेंचाचे सैन्य मदतीस घेऊन रोमनावर स्वारी केली व त्यांच्याच मदतीने त्याने इमोला आणि फरली हे दोन प्रांत घेतले; परंतु ते पुढे अविश्वासी दिसून आल्यामुळे आपल्या संरक्षणार्थ म्हणून, मदतनीस सैन्यापेक्षा बरे असे समजून भाड्याचे सैन्य त्याने आणण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणे अरसिनाय आणि व्हायटेलाय यांस आपल्या नोकरीस ठेवले. काही दिवस गेल्यावर हे लोकही फार अस्थिर, अविश्वासी व भयंकर आहेत, असे त्यास आढळल्यावरून त्यांस त्याने रजा दिली व यापुढे त्याने स्वतःच्याच सैन्यावर अवलंबून राहण्याचा निश्चय केला. या उदाहरणावरून वरील दोन्ही सैन्यांमधील अंतर सहज दिसून येईल. व्हायटेलाय आणि अरसिनाय त्याच्या नोकरीस असता जी त्याची कीर्ति होती, त्यापेक्षा स्वतःचे सैन्य त्याने ठेवल्यावर ती फारच वाढली. लोकांमध्ये त्याचा दरारा वाटू लागला व स्वतःच्या सैन्यावरच पूर्णपणे तो जेव्हा विश्वास टाकून राहू लागला, तेव्हा तर त्याच्यासारखा सरदार त्यावेळी नाव घेण्यासही कोणी नव्हता.

इटलीमधीलच उदाहरणे विशेषतः देण्याचे कारण ती अगदी आपल्या सर्वांच्या दृष्टीसमोर आहेत. तरी सायराक्युझ् येथील हायरो याचेही उदाहरण येथे ग्रहणीय आहे, असे आम्हास वाटते. त्याने सायराक्युझ् येथील सेनाधिपत्य पत्करताच त्यास असे दिसून आले की, भाड्याचे लोकांवर विश्वास ठेवणे अगदी गैर आहे. त्यास आपल्या जवळ ठेवणेही

भयंकर व एकदम काढून टाकणेही फार धोक्याचे. मिळून दोहोंकडूनही त्यास पंचाईत पडली. त्यास त्याने चतुराईने एक युक्ती काढली ती अशी - त्याने त्या सर्वांची कत्तल करून टाकली व स्वतःचेच सैन्य घेऊन लढाई करू लागला. ख्रिस्ती धर्मशास्त्राच्या पूर्व खंडांत एक अलंकारिक गोष्ट आहे व ती येथे सांगितल्यास अप्रासंगिक होणार नाही. गोली म्हणून फिलिस्टाईन लोकांचा मुख्य होता. त्याच्याशी लढाई करण्याकरिता डेव्हिड याने साल यास मदत करण्याचे कबूल केले. मदतीस आलेला डेव्हिड यास खुश ठेवावे म्हणून त्यास साल याने आपली सर्व हत्यारे वगैरे दिली; परंतु लढाईमध्ये डेव्हिडास असे कळून आले की, दुसऱ्याने दिलेली हत्यारे आपल्या उपयोगाची नाहीत. म्हणून त्याने साल यास सांगितले की, माझीच हत्यारे मला पाहिजेत. त्याची हत्यारे काय ती, तरवार आणि गोफीण हीच होती. यावरून असे उघड होते की, दुसऱ्याने दिलेली हत्यारे बहुतकरून दुरुपयोगी, बोजड अशी असून, स्वतःच्या हत्यारांप्रमाणे चांगली नसतात.

अकराव्या लुईचा बाप जो सहावा चार्लस याने मोठ्या शहाणपणाने फ्रान्स देश इंग्लिश लोकांच्या ताब्यातून सोडवला. तेव्हा त्यास स्वतःचेच सैन्य पाहिजे, असे वाटू लागले व त्याप्रमाणे त्याने पायदळ, स्वार वगैरे स्वतःचे सैन्य जमवले. त्यानंतर त्याचा मुलगा लुई याने स्वतःच्या लोकांस रजा दिली व स्वीस लोकांस नोकरीस ठेवले. हीच काय ती मूळ चुकी झाली व ती दुरुस्त करण्याचा पुढील राजांनी प्रयत्न न केल्यामुळे, आजपर्यंत फ्रान्स देशावर नाना त-हेची संकटे येत गेली व हल्लीही येत आहेत. स्वीस लोकांशिवाय आपले काहीच होणे नाही असे सर्व राजांस वाटू लागले. यामळेच स्वीस लोकांस फ्रेंचांकडून काहीच इजा आजपर्यंत पोहोचली नाही. इतकेच नाही, तर स्वीस लोकांच्या मदतीशिवाय त्यांस कोणतीच गोष्ट करता येत नव्हती. म्हणून फ्रेंचांचे सैन्य मिश्र आहे. मिश्र म्हणजे काही लोक स्वतःचे व काही बाहेरील पगारदार आणलेले. आता मदतीस आणलेले सैन्य आणि परकीय पगारदार सैन्य, या दोहोंपेक्षाही मिश्र सैन्य बरे खरे; तथापि स्वतःच्या सैन्यापेक्षा मिश्र सैन्य फारच वाईट यात संशय नाही व हे वरील उदाहरणावरून चांगले व्यक्त होत आहे. सहाव्या चा राजाने जो पाया घातला, त्याचा उपयोग जर पुढील राजांनी केला असता, तर फ्रान्स देश खचित अजिंक्य होऊन गेला असता; परंतु मनुष्याचे चुकीचे परिणाम पुष्कळ होतात. आरंभी त्यापैकी काही चांगलेसे वाटतात; परंतु पुढचे वाईट परिणाम प्रत्यक्ष घडून येईपर्यंत जर पूर्वीच राजास त्याची कल्पना करता आली नाही, तर तो राजा राज्य करण्याच्या लायक नाही. दूरदृष्टिपणा हा थोड्यांसच असतो. रोमन लोकांचे जे अवाढव्य राज्य होते, त्याचा तरी नाश का झाला? याचा विचार केल्यास असे दिसून येईल की, त्यांनी गॉथ लोक सैन्यात नोकरीस ठेवले, त्यामुळे स्वतःचे सैन्याचे बळ सहज कमी झाले व तात्काळ एकंदर राष्ट्राचा नाश झाला.

या सर्व गोष्टींवरून तात्पर्य म्हणून इतकेच घ्यावयाचे की, स्वतःचे सैन्य सुस्थित असल्याशिवाय कोणाही राजास निर्भय राहता येणार नाही. शहाणे लोकही असे म्हणत आले आहेत की, हातात सत्ता असून तिचा पाया परकीय सैन्याचा असणे, या सारखी अस्थिर व शोचनीय दुसरी गोष्ट नाही. स्वप्रजा आणि परकीय प्रजा यात नेहमी भेद आहेच. म्हणून परकीय पगारदार सैन्य आणि मदतनीस सैन्य ही दोन्ही अगदी अपायकारक होत.

आता आपल्या सैन्यास तरी कोणत्या प्रकारचे शिक्षण द्यावे व त्यास कोणती शिस्त लावावी. हेही समजलेच पाहिजे. अलेक्झांडराचा बाप फिलिप याने व इतर प्रबळ राजांनी आपली सैन्ये नेहमी कशी ठेवली होती, याचाही विचार केला पाहिजे. तेव्हा याजबद्दल निराळ्या प्रकरणी विवेचन करू.

○○○

भाग-१४

स्वतःच्या सैन्यासंबंधी राजाचे कर्तव्य

राजाच्या मनात लढाईशिवाय दुसरा विचार अगर हेतू असता..... अनुरूप त्याचा धंदा म्हटला म्हणजे लढाई व हा धंदा इतका उपयुक्त आहे की, त्याच्या योगाने जे मूळचेच राजे असतात, त्यांचे तर राज्य सुरळीत चालतेच; परंतु जे मूळचे राजे नसतात, त्यांसही लढाईच्या पराक्रमावर राज्य कमाविता येते. तसेच याच्या उलट, जे राजे लढाईचा उद्देश सोडून देऊन सुखाच्या व ऐषआरामाच्या पाठीस लागले, त्यांची राज्ये तर नाहीशी झाल्याची उदाहरणे आहेत. जे आपले कर्तव्य, ते चुकले म्हणजे अर्थात्च मनुष्य पदभ्रष्ट होतो व तेच कर्तव्य बजावीत असला म्हणजे तो निर्भयपणे स्वस्थानीच वास करतो. फ्रान्सिस्को फोरझा हा स्वपराक्रमावर मिलनचा ड्यूक झाला; परंतु त्याचेच वंशज लढाईचा त्रास सोडून दिल्यामुळे राज्यभ्रष्ट झाले. नेहमी लढाईची तयारी न ठेवता आळशी राहिल्याने एक मोठा वाईट परिणाम असा होतो की, लोकांच्या मनात राजाविषयी तिरस्कार बुद्धी उत्पन्न होते व काही झाले तरी अशी तिरस्कार बुद्धी आपल्याविषयी लोकांत उत्पन्न न होऊ देण्याविषयी राजाने फार जपले पाहिजे.

एखादा राजा प्रबळ व नेहमी जपून वागणारा असतो, त्याची व निर्बळ आणि निष्काळजी राजाची तुलनाच होणे नाही. उघडच आहे की, जो राजा उदार आणि शूर असतो, तो निर्बळ आणि भित्र्या राजाला कधीही नमून असणार नाही आणि सभोवती धाडशी व चपळ राजे असून मध्येच एखादा गरीब व निर्बळ राजा असला, तर त्यास कधीही निर्भय वागता येणार नाही. कारण पहिल्याच्या हातून फार उद्दामपणाची कृत्ये घडली, तर दुसऱ्याचे हातून काहीच प्रतिकार होत नाही. या वरून असे दिसते की, ज्या राजास लढाईची टापटीप माहिती नाही, त्यास इतर संकटे तर पुष्कळ आहेतच; तरी त्याजवर त्याच्या सैन्याचा कधीही भरवसा व पूज्यबुद्धी बसणार नाही. म्हणून राजाने आपले सैन्य नेहमी लढाईस तयार ठेवलेच

पाहिजे. आता जिकडे तिकडे शांतता असली म्हणजे गोष्ट निराळी. अशा वेळी राजाचे लक्ष प्रजापालनाकडे व शांतता राखण्याकडे विशेष लागले पाहिजे. त्याने आपल्या शरीराचा व मनाचा असा दोहोंचाही सद्व्यय केला पाहिजे. शरीराचा सद्व्यय करणे म्हणजे नुसती सैन्याचीच नेहमी तयारी ठेवणे इतकेच नाही, तर नाना तऱ्हेचे खेळ, शिकार, पारध वगैरे सर्व काही गोष्टींकडे शांततेच्या वेळी नजर देणे अवश्य आहे. शरीर नेहमी कंटक ठेवून भूक-तहान सोसण्याची सवय केली पाहिजे, तसेच सर्व प्रदेशांत फिरून आपल्या देशाचे कानेकोपरे वगैरे पाहून ठेवले पाहिजेत. कोणत्या ठिकाणी उंचनीच जमीन आहे. कोणत्या ठिकाणी मोठमोठ्या दऱ्या खोरी वगैरे आहेत. सपाट मैदाने कोठे व किती मोठी आहेत, कोठे कशा नद्या आहेत, या सर्व गोष्टी फार शोधक बुद्धीने शांततेच्या प्रसंगी पाहून ठेवल्या पाहिजेत. असे करण्यापासून दोन फायदे आहेत. एकतर स्वदेशस्थिती समजल्याने कोणत्या तऱ्हेने आपले संरक्षण करता येईल हे सहज कळून येते व त्या प्रमाणे तयारी करता येते. दुसरा फायदा असा आहे की, आपल्या देशावरून दुसऱ्या देशाची कल्पना करता येते. कारण एक देशातले पर्वत नद्या, मैदाने, दलदली, दऱ्या, या सर्व बऱ्याच अंशी दुसऱ्या देशातल्या प्रमाणेच असतात. म्हणून एका देशाचे ज्ञान चांगले झाले असता दुसऱ्याचीही बरीच कल्पना करता येते व दुसऱ्या देशाचे ज्ञान असणेही फार आवश्यक आहे. जो राजा अशा प्रकारचा शोधक नसतो, त्यास शूर सरदाराचे एक अत्यंतावश्यक अंग कमी आहे असे समजले पाहिजे. आपले सैन्य कोणत्या बाजूस कसे उभे करावे, हल्ला कोणाकडून करावा, वेढा देणे असल्यास तो कसा द्यावा, वगैरे सर्व देशस्थितीचे ज्ञान असल्याने चांगले साधते. एकिआचा राजा फिलापोमेनिस याची अशी गोष्ट सांगतात की, शांततेच्या वेळी त्याच्या मनात लढाईशिवाय दुसऱ्या गोष्टीच नसत व जेव्हा काही स्नेही घेऊन तो देशामध्ये सहल करीत असे, तेव्हा त्यांच्याशी तो अनेक वेळा पुष्कळ वादविवाद करीत असे, ते असे- 'जर शत्रू पलीकडच्या टेकडीवर असून आमचे सैन्य हल्ली आम्ही आहो येथेच असले, तर लढाईमध्ये त्याचा परिणाम काय होईल, आपल्यास त्यांच्यावर उत्तम रीतीने कसा हल्ला करण्यास सापडेल? जर आम्हास एका बाजूस जाणे असले, तर ते कसे जाता येईल? जर शत्रू माघार घेऊ लागले, तर आम्हास त्यांचा पाठलाग कसा करता येइल?' याप्रमाणे लढाईस सैन्ये उभी राहिली म्हणजे त्यास कोणकोणत्या अडचणी येतात, त्या सर्वांचा विचार तो चालता चालताच करीत असे. तो आपल्या स्नेह्यांचा सल्ला विचारी आणि आपला त्यांस सांगे व आपल्या मताच्या पुष्टीकरणार्थ सबळ प्रमाणेही तो दाखवी. असे वारंवार करून तो त्यामध्ये इतका घडला गेला की, पुढे पुढे तर त्यास कोठलीही अडचण अशी बिलकूल वाटत नसे. कोणतेही संकट आले तरी त्यातून पार पडण्यास त्याजवळ उपाय नेहमी तयार असत.

येथपर्यंत शरीराचा सद्व्यय कसा करावा या विषयी विवेचन झाले. आता मनाचा सद्व्यय

कसा करावा या विषयी सांगणे आहे. पूर्वीचे इतिहास लक्षपूर्वक वाचून, जे कोणी मोठे योद्धे होऊन गेले, ते लढाईच्या प्रसंगी कसे वागत गेले, त्यांच्या जयापराजयांची काय कारणे आहेत, याचा नीट विचार केला पाहिजे. एकदा विचार करून मनात गोष्ट ठरवून ठेवली, म्हणजे प्रसंगी तिचा उपयोग एकदा करता येतो. नेहमी कोणतातरी पूर्वीचा मोठा सरदार उदाहरणासारखा डोळ्या समोर त्याने हजर ठेवला पाहिजे. म्हणजे ज्या प्रमाणे प्रसंगोपात तो वागत गेला असेल, त्या प्रमाणे आपल्यासही वागता येते. असे सांगतात की, अलेक्झांडर नेहमी अकिलिसचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवत असे, सीझर अलेक्झांडरचे ठेवत असे व सिपियो सायरसचे ठेवत असे. झेनोफन म्हणून जो विख्यात इतिहासकार होऊन गेला त्याने जे सायरसचे चरित्र लिहून ठेवले आहे, ते जर कोणी वाचील, तर त्यास असे आढळून येईल की, सिपियोने जी आपली इतकी कीर्ति वाढवली, ती केवळ सायरसचा कित्ता लक्षात ठेवूनच वाढवली. नम्रता, भूतदया, औदार्य, मनमिळाऊपणा या सर्व गुणांमध्ये सिपियोने सायरसचाच मासला उतरला होता, असे दिसून आल्याशिवाय राहणार नाही. यावरून इतकेच घ्यावयाचे की, जो कोणी शहाणा राजा असेल, त्याने वरील सर्व नियम लक्षात ठेवून शांततेच्या वेळी रिकामे न बसता, फार झटून उद्योग करून सर्व तयारी करून ठेवली पाहिजे म्हणजे प्रसंग येताच संकट निवारण्याचा उपाय त्यास करता येईल आणि जरी एखादे अरिष्टच येऊन कोसळले, तरी तो डगमगणार नाही.

○○○

भाग-१५

लोक व विशेषेकरून राजेलोक, स्तुतीस व दोषास कसे पात्र होतात या विषयी

आता प्रजेशी व इतर स्नेही मंडळीशी राजाने कसे वागावे या विचार कर्तव्य आहे. या विषयावर आजपर्यंत पुष्कळ ग्रंथकर्त्यांनी विशेष चर्चा केली आहे; परंतु इतर लोकांच्या विरुद्धच आमचे मत असल्यामुळे, ते तेथे सांगण्याचे धाडस केल्याबद्दल वाचकांनी मला दोष देऊ नये. आमचा पुस्तक लिहिण्याचा खरा हेतू म्हटला म्हणजे ज्याकरिता ते लिहिणे, त्यांस त्याचा उत्कृष्ट उपयोग व्हावा हा आहे. इतर ग्रंथकारांचा हा हेतू आहे, असे दिसत नाही. त्यांनी तर काल्पनिक राज्ये व राजे यांचा विचार केला आहे. अशा राज्यांचे अस्तित्व त्यांच्या कल्पनेनेच केलेले आहे. खरोखरी त्यांनी विचार केलेली राज्ये आजपर्यंत झाली नाहीत. मला तर असे वाटते की, जे हल्ली आपल्या समोर आहे, त्यांचाच विचार करून बरे वाईट कोणते ते यथाशक्ती निवेदन करावे म्हणजे त्यातच लोकांचा फार फायदा आहे. इतर ग्रंथकारांनी अत्युत्तम गोष्टींचा विचार केला खरा, तरी उत्तम उपयोगी गोष्टींचा विचार केला नाही व तो आम्ही करणार आहो. आम्ही काय केले पाहिजे व आम्ही काय करतो, या दोन वाक्यांत फार भेद आहे व जे केले पाहिजे ते करण्याच्या बुद्धीने 'आपण काय करतो याचा विचार न करणे. म्हणजे आपण होऊनच आपला फायदा करण्याचे सोडून नुकसान करणे आहे. या जगात असे चालत आले आहे की, कोणीही यःकश्चित गरीब मनुष्य प्रामाणिकपणाने नेहमी वागत गेला तर, त्यास प्रसंगानुसार फार अडचणी सोसाव्या लागतील. म्हणून जर आपले राज्य फार दिवस सुरक्षित चालावे, अशी राजाची इच्छा असेल, तर त्याने आपले मन निष्ठुर करून, प्रसंग येईल तसे वर्तन ठेवले पाहिजे. नेहमीच सरळ मार्गाने जाऊन चालणार नाही. म्हणून नेहमीच खरेपणा आणि चांगुलपणा असावा, असे म्हणणे केवळ काल्पनिक आहे. त्याप्रमाणे चालणे या जगात होणे नाही. म्हणून राजा व राज्य यांच्या विषयी इतर ग्रंथकारांनी जे मनःपूत काल्पनिक लिहून ठेवले आहे, ते येथे

उपयोगी नाही. या वरून त्यांच्याहून माझी दिशा अगदी भिन्न आहे, हे उघड आहे. खरोखर या जगात कसे वागता येईल, याचा विचार करू लागले असता असे दिसते की, सर्व लोक व विशेषतः राजे, हे मानार्ह किंवा अपमानार्ह होतात, यास त्यांच्या अंगचेच काही ठळक गुण किंवा अवगुण कारणीभूत होतात. याच कारणांमुळे काही उदार म्हटले जातात व काही कृपण म्हटले जातात, काही दिलदार असतात व काही अपहारकुशल असतात, काही क्रूर व काही दयार्द्र असतात, काही प्रामाणिक व काही अविश्वासी असतात, काही निःसत्त्व व निर्बल असतात, काही उग्र व काही महत्त्वाकांक्षी असतात, काही सभ्य असतात व काही उद्दाम असतात. कोणी निष्काम व कोणी सकाम असतात, काही खऱ्या अंतःकरणाचे व काही लबाड असतात, कोणी दांडगे व दुर्मुख असतात, कोणी सभ्य आणि सुगम असतात, कोणी गंभीर व कोणी उतावीळ असतात, कोणी आस्तिक व कोणी नास्तिक असतात. मिळून प्रत्येकास काही ना काहीतरी बरेवाईट असतेच. आता वर जे चांगले गुण निर्दिष्ट केले ते सर्वच राजाच्या अंगी असणे फार चांगले, हे कोणीही कबूल करील; परंतु मनुष्य स्वभावच चंचल आणि दाष्ट आहे, म्हणून हे सर्वच गण एक ठिकाणी राहणे कठीण व राहिले तरी ते सर्व तशा कृत्यांनी उघडकीस येणे तर अशक्यच समजले पाहिजे. याकरिता वर निर्दिष्ट वाईट गुणांपैकी जेवढे राज्यास अपायकारक असतील, तेवढे आपल्या अंगात न शिरू देण्याविषयी प्रत्येकाने जपले पाहिजे व इतर वाईट गुणांचे परिणाम जरी फारसे अपायकारक नसले, तरी त्यांजविषयीही जपूनच वागले पाहिजे. आता ज्या ठिकाणी इलाजच नाही, त्या ठिकाणी मग होईल तसेच वागले पाहिजे, हे सांगावयास नको. केव्हा केव्हा तर वाईट आचरण करूनच आपले राज्य राखावे लागते म्हणून राज्यसंरक्षणार्थ जरूर असे जे वाईट आचरण करावे लागत असेल, त्याजविषयी फारशी पर्वा करण्याचे कारण नाही. खरे पाहू गेले असता बरे-वाईटाची निवड करणे फार कठीण आहे. ज्यास आपण चांगले म्हणतो, तेच परिणामांती वाईट ठरते. केव्हा केव्हा तर जे वाईट असे दिसते त्यापासूनच पुढे पुष्कळ फायदे घडून येतात. म्हणून या सर्व गोष्टींचा सारासार विचार करून त्याप्रमाणे आपले वर्तन ठेवणे हेच राजाचे कर्तव्य आहे.

○○○

भाग-१६

औदार्य आणि कृपणता याविषयी

आता हे वरील दोन गुण राजांचे अंगी कितपत असले पाहिजेत याचा विचार करू. औदार्याविषयीच पाहू गेले असता असे दिसते की, राजाच्या उदारपणाची लोकांत ख्याती असणे हे फार फायदेशीर आहे. तथापि त्या औदार्याच्या योगाने राजाचा प्रजेवर धाक कमी आहे असे दिसणे चांगले नाही. आता औदार्यापासून उलट नुकसान मात्र आहे. वास्तविक म्हटले असता, खरोखर जो उदार असतो, त्याचे औदार्य लोकांत माहीत असतेच असे नाही व ते माहीत नसले म्हणजे उदार असतानाही असा मनुष्य कित्येकांस कृपणही वाटेल. अशा अडचणींमुळे आपण उदार आहो, असे लोकांत प्रसिद्ध व्हावे म्हणून सहजच राजाला थोडेसे छानछोकीपणाने असावे लागते. अनेक वेळा असे घडते की, खरे औदार्य आणि छानछोकीपणा, यामध्ये काय अंतर आहे ते लोक पाहत नाहीत. राजा चैनी झाला म्हणजे देशाची बरीच जमा त्याच्या चैनीकडे खर्च होऊ लागते. असे होता होता शेवटी तो पश्चात्ताप पावू लागतो व अर्थातच मग लोकांवर थोडासा जुलूम होऊ लागतो. पाहिजे तसा लोकांकडून पैसा काढावा, असे त्यास वाटू लागते आणि एकदा जर देशाची पुंजी खलास झाली, तर मग मात्र त्याची अवस्था कठीण होते. सर्व प्रजा त्यास त्रासून जातात व इतर लोकांतही त्याचा मान राहत नाही. आपल्या दांभिक औदार्याने फायदा थोडक्यासच होऊन नुकसान मात्र पुष्कळांचे झाले, असे त्यास कळू लागते व अशा प्रकारचे औदार्य हानिकारक आहे असे नंतर त्यास समजून येते; परंतु हे मग समजून उपयोग काय? जरा काही संकट आले, की याचे भरलेच दिवस म्हणून समजावे. कदाचित त्यातून तो निभावला म्हणजे पूर्वीच्या चुकीच्या दुरुस्तीकरिता नंतर तो अगदी कृपण होऊ लागतो; परंतु कृपणतेनेही लोक फार नाखुश होतात. या वरून हे उघड आहे की, खऱ्या उदारपणाची लोकांत प्रसिद्धी न होईल, तर कृपणपणाची मनात भीती राजाने बाळगू नये. आरंभी कृपण दिसेल खरा; परंतु त्यापासून

एक तरी फायदा हा होईल की, पैशाचा निरर्थक व्यय न होता काही वर्षांनी देशाचा पैसा वाढून प्रसंगोपात त्याचा चांगला उपयोग होईल व त्यामुळे लोकांवर जुलूम होण्याचे कारण राहणार नाही व आपल्या उदारपणास्तव दुसऱ्या कोणास त्रास न मिळाल्यामुळे सर्व लोक त्यास चांगलाच मानतील. थोडेबहुत त्यास कृपण म्हणणारेही निघतील खरे, तरी ते अगदी थोडे असून त्यांची पर्वा फारशी करण्याचे कारण नाही.

अर्वाचीन काळच्या इतिहासावरून असे दिसते की, महत्कृत्ये म्हणून जी काय झाली, ती कृपण म्हणून प्रसिद्ध असलेल्या गृहस्थांकडूनच झाली. उदार म्हणून नावाजलेल्या लोकांचा नेहमी नाशच होत आला आहे. अकरावा ज्यूलियस हा पोप होईपर्यंत मात्र तो पुष्कळ उदार असा लोकांस दिसला; परंतु पोप झाल्यावर मग त्याने आपला हात अगदीच आवरून धरला. त्यामुळे त्यास पुष्कळ दिवसपर्यंत फ्रेंच लोकांशी लढाई करण्याचे सामर्थ्य येऊन त्या लढाईचे ओझे लोकांवर बिलकूल पडले नाही. त्याने पुष्कळ दिवस संचय केलेल्या पैशाचा त्यास पुढे व्यय करता आला. हल्लीचा स्पेनचा राजाही जर उदारपणा मिरवण्याची खटपट करू लागला असता, तर त्याचे बेत साधले नसते व जे त्यास इतके मोठमोठे जय मिळत गेले, तेही मिळाले नसते. राजाने नेहमी इतकी खबरदारी ठेवली पाहिजे की, आपल्या कृत्यांनी प्रजेस कोणताही जुलूम न होता स्वतःचे संरक्षण करण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी आहे व लोकांमध्ये आपल्याविषयी पूज्य बुद्धी आहे, असे असून मग जरी तो कृपण असा लोकांस वाटला, तरी हरकत नाही. कारण अशा कृपणतेने राज्यास बळकटी तरी येते. कोणी अशी हरकत घेतील की, सीझर वगैरे मोठमोठे लोक केवळ आपल्या औदार्याच्याच जोरावर सार्वभौम राष्ट्र कमावून त्याचा चिरकाळ उपभोग घेऊ लागले. मग औदार्याविषयी इतके वाईट का लिहावे? तर त्यास आमचे इतकेच उत्तर आहे की, एकवार मनातील हेतू सिद्धीस जाईपर्यंत औदार्याची जरूर आहे खरी; परंतु एकदा तो सिद्धीस गेल्यावर पुढेही आपले वर्तन पूर्ववतच ठेवल्याने अपाय घडल्याशिवाय राहणार नाही. सीझरचा मूळ पासून बेत काय तो राज्य कमावण्याचा, तो सिद्धीस गेल्यावर मग जर तो जगला असता, तर पूर्वीचे औदार्य कायम राखण्याने त्यास खचीत फायदा झाला नसता. आणखीही कोणी असे म्हणतील की, पुष्कळ लोक राजे झाले आहेत व सैन्याच्या बळावर महत्कृत्येही त्यांजकडून प्रसंगानुसार घडली आहेत. असे असूनही ते फार उदार होते असे म्हणणे असेल तर त्यांस इतकेच उत्तर आहे की,राजा जो खर्च करतो तो स्वतःच्या पैशाचा करील अथवा आपल्या प्रजेच्या पैशाचा करील; अथवा इतर लोकांच्या पैशाचा करील. स्वतःच्या पैशाचा व्यय फार न करणे चांगले. उदारपणाकडे प्रजेचा पैसा पाहिजे तितका खर्च करण्यास हरकत नाही; परंतु ज्या राजांच्या सैन्याचा निर्वाह केवळ लुटीवर व इतर लोकांवर जुलूम करून काढलेल्या पैशावर चालतो, त्यास तर हात सैलच ठेवला पाहिजे, नाहीतर त्याचे सैन्य त्यास सोडून जाईल आणि स्वतःचे व आपल्या प्रजेचे नुकसान न होता इतर लुटीचा वगैरे पाहिजे तसा व्यय केला, म्हणून फारशी

हरकत नाही. सीझर, सायरम्, अलेक्झांडर या सर्वांनी असेच केले. दुसऱ्यांचा पैसा व्यय केला असता उदारपणाची ख्याती कमी न होता वाढतच जाते. स्वतःचाच खर्च करणे मोठे हानिकारक होते. स्वतःला नाशकारक असे उदारपणासारखे दुसरे काही नाही. कारण उदार कृत्य करता करता जवळचे सर्व संपून जाऊन मनुष्य अगदी निर्धन होऊन त्याजबद्दल लोकांत तिरस्कार उत्पन्न होतो. बरे स्वतःजवळचे संपले म्हणून जास्त उत्पन्न करण्यास जावे, तर लोकांवर जुलूम होऊन द्वेषभाव उत्पन्न होतो. तिरस्कारबुद्धी व द्वेषभाव या दोहोंचाही उगम औदार्यापासूनच होतो, म्हणून या दोहोंबद्दल फार जपले पाहिजे. कृपण असल्यामुळे लोकांत फारसा मान राहणार नाही खरा, तरी त्यामुळे द्वेषभाव तरी उत्पन्न होणार नाही. म्हणून राजाने उदारपणा व कृपणता या दोहोंविषयी चांगला दूरवर विचार करून बेताबेताने सर्वांस संतोषकारक असे आपले वर्तन ठेवले पाहिजे.

○○○

भाग-१७

दया आणि निर्दयता यांविषयी व राजाविषयी प्रजेच्या मनांत प्रीती असणे चांगले किंवा भीती असणे चांगले याजबद्दल

आता दुसरे कित्येक गुणावगुण आहेत, त्या विषयी विचार करणे आहे. राजा कठीणहृदयी आहे, असे लोकांनी मानण्यापेक्षा तो दयाशील आहे, हेच त्यांनी मानणे चांगले. तरी आपल्या चांगुलपणाचा लोक दुरुपयोग न करतील, अशी तजवीज राजाने केली पाहिजे. सीझर बॉरजिया याला लोक निर्दय समजत असत खरे, तथापि तो कठोर होता म्हणूनच त्याने रोमाना प्रांत जिंकून आपल्या ताब्यात आणला व तेथे सर्वत्र शांतता केली. यावरून एकंदरीने पाहता फ्लारेन्टाईन्सपेक्षा सीझरच जास्त दयार्द्र होता, असे म्हणावे लागते. कारण फ्लारेन्टाईन्स यांनी आपल्यास लोकांनी दुष्ट म्हणू नये या हेतूने पिस्टोयाचा मात्र नाश होऊ दिला. जर प्रजा राजनिष्ठ राहून त्यामध्ये एकी होईल,तर मग राजा जरी निर्दय दिसला तरी हरकत नाही. कारण सर्वांवरच कृपादृष्टी ठेवण्याचा प्रयत्न केला असता, पुष्कळ अडचणी व संकटे येतात व अशा कृपेचा सहजच दुरुपयोग लोकांकडून घडतो; परंतु तीच दया जर थोडीच पण प्रसंगोपात दाखवली, तर तिची लोकांस गोडी लागून तिजपासून घडणारे वाईट परिणाम होत नाहीत. म्हणून सर्वांवर सारखी भूतदया ठेवण्यापेक्षा काही विशिष्ट जणांवरच प्रसंगानुसार कृपादृष्टी ठेवली म्हणजे कार्यभाग होतो. असे जरी आहे, तरी प्रथमच ज्याला नवीन राज्य मिळते, त्याने मात्र काही अयुक्त आचरण करता कामा नये. तो थोडा जरी लोकांस उपद्रवकारक झाला, तरी हा नवीनच असल्यामुळे त्यांजकडून पुष्कळ उपद्रव घडून येण्याचा संभव असतो. व्हरजिल नामक जो प्रसिद्ध कवी ग्रीस देशामध्ये होऊन गेला, त्याचेही मत असेच आहे. राजा नवीन असला म्हणजे जो कोणी काही सांगेल त्याजवर त्याने एकदम विश्वास ठेवता नये. कोणतेही कृत्य विचार करून पुष्कळ वेळ जाऊ दिल्याशिवाय एकदम ठरवू नये. विनाकारण मनात भीती बाळगू नये व आपल्या विषयी द्वेषभाव लोकांच्या मनात उत्पन्न होऊ देऊ नये. भूतदया आणि दूरदृष्टी यांस आपल्या अंतःकरणात सदोदित जागा

दिली पाहिजे. असे केले असता तो कोणावरही एकदम विश्वास टाकून बेसावध राहणार नाही व अगदीच अविश्वासीही न होता लोकांस उपद्रवकारक होणार नाही.

यावरून असा सहज प्रश्न निघतो की, राजाविषयी लोकांस नेहमी भीती वाटत असणे चांगले, की त्याचे ठायी त्यांची प्रीती असणे चांगले? दोन्ही असणे चांगले, हे यास सहज उत्तर मिळेल खरे, तरी पुष्कळ वेळा या दोन्ही गोष्टी एकदम घडणे कठीण पडते. म्हणून राज्यच जर चालवणे आहे, तर प्रीती असण्यापेक्षा प्रजेच्या मनात राजाविषयी भीतीच असणे चांगले. बहुशः सर्व लोक अनुपकारी, अनिश्चित, दांभिक, भित्रे व लोभी असतात. जोपर्यंत राजाकडून त्यांस फायदा होत आहे व वाईट प्रसंग आला नाही, तोपर्यंत ते आपलेसे दिसतात. त्यांची धनदौलत मुले माणसे, जिन सर्व काही राजाचेच असे ते दाखवतात; परंतु जर का काही संकट येऊन त्यांच्या मदतीची जरूर लागली, तर त्यांनी आपल्याला सोडलेच म्हणून समजावे. अशा प्रसंगी जो राजा केवळ त्यांच्या मदतीवर अवलंबून राहील व स्वतःची काही तरतूद करून ठेवणार नाही, त्याचे भरलेच म्हणण्यास हरकत नाही. किंमत देऊन घेतलेली जी प्रीती तिची योग्यताही किंमतीइतकीच; प्रसंग आला की तिचा काही उपयोग नाही. नेहमीच सैल हात सोडून वागणारा जो गृहस्थ असेल, त्याच्या विरुद्ध बंड करण्यास लोक फारसे मागेपुढे पाहत नाहीत; पण तोच जर जरा कडक असून त्याचा लोकांस दरारा असला, तर त्याच्या वर उठण्याची त्यांस छाती होत नाही. अनुरागबंधन म्हणजे परोपकास्मरणच होय व स्वार्थी लोकांत दुःस्वभाव कदाचित् बलवत् झाला, तर त्याजपुढे ते बंधन फारसे टिकणार नाही हे साहजिक आहे; परंतु भीतीचे बंधन केवळ शिक्षेवरच अवलंबून असते व शिक्षेची भीती लोकांच्या मनातून लवकर नाहीशी होत नाही. असे आहे तरी लोकांवर जरब ठेवणे, त्यांस असंतुष्ट करून ठेवू नये. त्यांच्या मनातील आपल्याविषयी प्रीती कायम राहील, इकडे राजाचे लक्ष पोहोचले पाहिजे. दाब ठेवूनही लोकप्रिय होणे कोणास अशक्य वाटेल. तर तसे नाही प्रजेची मालमत्ता सर्व सरक्षित राहन त्यांचे मानपान सर्व ठेवले गेले पाहिजे. तसेच कोणास फाशी देणे झाले तरी ते सार्वजनिक हिताकरिता म्हणून न्यायदृष्ट्याच केले पाहिजे. विशेषकरून एक मालमत्ता सुरक्षित राहिली म्हणजे बरेच काम होते. दुसऱ्याची मालमत्ता विनाकारण हिरावून घेण्याची इच्छा धरली असता, स्वतःचा फारसा फायदा होत नाही. असे आहे तरी लढाईवर जाऊन सेनाधिपत्य पत्करले म्हणजे तेथे दया वगैरे दाखवून उपयोगी नाही. त्या ठिकाणी लष्करी कायदा असेल तसा अमलात आणलाच पाहिजे. कारण असे केल्याशिवाय सैन्य चांगल्या स्थितीत कधीच राहणार नाही.

हानीबॉलने जी एवढी अचाट कृत्ये केली, त्यांचे तरी मूळ हेच. त्याच्या सैन्यात निरनिराळ्या जातीचे व देशाचे लोक होते, तथापि असलेही सैन्य घेऊन तो शत्रूच्या मुलखात जाऊन लढाई करीत असे व प्रसंग आले तरी त्याचे लोक त्याच्याशी कधीही फितुर झाले नाहीत, अगर बंड वगैरे काही त्यांनी केले नाही. याचे कारण तो अतिशय क्रूर असूनही

इतर सद्गुण त्याच्या अंगी फारच होते, म्हणून लोकांवर त्याचा दाब उत्तम प्रकारचा राहून तो सर्वांस प्रिय होता. हे सद्गुण त्याच्या अंगी नसून, नुसता क्रूरपणा मात्र असता, तर त्यास यश येणे दुरापास्त झाले असते. काही ग्रंथकारांनी त्याच्या पराक्रमाची स्तुती केली आहे, तरी त्या पराक्रमांची साधने फार वाईट होती, म्हणून ते त्यास दोष देतात; परंतु यास उत्तर देणे फारसे कठीण नाही. नुसत्या सद्गुणाच्याच जोरावर त्यास अशी कृत्ये करता आली नसती, हे दाखवण्याकरिता आपण सिपिओचे उदाहरण घेऊ. सिपिओ हा सर्व इतिहासात फार मोठा नामांकित सद्गृहस्थ वर्णिला आहे. तथापि त्याच्या सैन्याने स्पेन देशात बंड केले, याचे तरी कारण त्याचा फाजील चांगुलपणा हेच होय. लष्करी कायद्यास विरुद्ध अशी स्वतंत्रता त्याने आपल्या सैन्यास दिल्यामुळे वरील प्रसंग घडून आला. फेबियस माक्सिमस याने भर सेनेट सभेत त्यास दोष देऊन रोमन लोकांचे सैन्य खराब केल्याबद्दल त्याजवर आरोप आणला. सिपिओच्या हाताखालील एका सरदाराने लोक्रीस येथील लोकांस लुटून त्यांचा नाश केला, याजकडे सिपिओने काहीच लक्ष दिले नाही. त्याजबद्दल दुसऱ्याही एका गृहस्थाने सेनेट सभेमध्ये असे बोलून दाखवले की, (काही लोकांना स्वतःचे आचरण कसे ठेवावे हे चांगले समजते; परंतु दुसऱ्यांकडून तसे वर्तन घडवून आणणे त्यांस होत नाही.) याच दोषामुळे इतिहासामध्ये सिपिओचे नाव सुद्धा प्रसिद्ध राहिले नसते; परंतु सेनाधिपतित्व त्याजकडून काढून घेतल्यामुळे सेनेट सभेमध्येच त्यास कामगिरी मिळून पूर्वीचा त्याचा जो दोष होता, तोच पुढे त्याच्या कीर्तीस कारणीभूत झाला. या वरील उदाहरणावरून असे स्पष्ट दिसून येते की, राजाने आपल्या राज्याचा पाया घालणे तो आपली सत्ता किती आहे व तिला लोकांकडून अपाय होण्याचा किती संभव आहे, याचा विचार करूनच घातला पाहिजे व होईल तितके करून त्याने प्रजेस नाखुश ठेवता कामा नये.

○○○

भाग-१८

राजाने आपले वचन कितपत खरे करावे याविषयी

राजाने तर काय; पण साधारण मनुष्यानेदेखील बोलल्याप्रमाणेच चालले पाहिजे व बोललेला शब्द खोटा होऊ देता कामा नये, ही गोष्ट तर सिद्धच आहे. तथापि अनुभवावरून असे दिसते की, जे कोणी नामांकित म्हणून राजे झाले व ज्यांच्या हातून काही महत्कृत्ये घडून आली, ते राजे म्हणजे प्रत्येक शब्द बोलल्याप्रमाणेच करीत होते असे नाही. पुष्कळ वेळा असेही घडून आले आहे की, नेहमीच खरेपणाने वागत गेल्यामुळे चांगले राजे नाश पावून प्रसंगानुसार वेळ येईल तसे खरे खोटे वागल्यानेच पुष्कळांचा जय होऊन नामांकित होऊन बसले आहेत. ज्या कारणांकरिता वचन दिले असेल ती कारणे संपली म्हणजे आपल्यास अनिष्ट असेल. तर राजाने आपले वचन पाळणे बरोबर होणार नाही. जगामध्ये सर्वच लोक चांगले असते, तर असे खोटे करण्याचा प्रसंग ना येता; परंतु बहुतेक लोक खोडसाळ व दुष्ट असल्यामुळे आपणही त्यांच्याशी थोडेसे तसेच वागले पाहिजे. वचन मोडण्यास काही ना काही तरी कारण देता येतेच. यास उदाहरणे ही इतिहासप्रसिद्ध पुष्कळ देता येतील. वचन मोडताना तरी आपला खरा हेतू कोणास प्रगट करू नये. मनुष्यांची वागणूक बहुतकरून साधी असते व प्रस्तुत प्रसंगास हार देऊन त्यास चालावे लागते, म्हणून राजा जर फार खोल असेल, तर लोकांस त्याजविषयी सहसा संशय येणार नाही. सहावा अलेक्झांडर याने लोकांस फसविण्याशिवाय दुसरे काही केले नाही व ती फसवणूक त्यास फारशी कठीणही गेली नाही. वचन देताना तो फार उदार व सत्यवक्ता दिसे व त्याच्या सत्यतेच्या पुष्टीकरणार्थ शपथाही तो घेत असे. तरी ती वचने तो फारसा पाळीत नसे व जगाची त्यास चांगली ओळख असल्यामुळे त्याजवर कधीही बिकट प्रसंग आला नाही.

यावरून उघड दिसते की, पूर्वी जे चांगले गुण राजाचे अंगी असावे म्हणून सांगितले आहे, ते सर्व खरोखरच त्याच्या अंगी असले पाहिजेत असे नाही. ते आहे तसे लोकांस

दिसले म्हणजे बस्स आहे. उलट असे आहे की, जर ते गुण खरोखरीच अंगी असून त्यांचा तो नेहमी उपयोग करू लागेल, तर त्यापासून फारच नुकसान होईल व ते नुसते दिसण्यापुरतेच त्याच्या अंगी असले म्हणजे त्यांचा खरा उपयोग त्यास होतो. आपण नम्र, दयाळू, सभ्य, धार्मिक आणि प्रामाणिक आहोत असे सर्वांस दिसणे चांगले व खरोखरी तसे असणेही चांगले. मात्र, पाहिजे तेव्हा आपल्यास पाहिजे तसे स्वरूप धारण करता येईल इतकी आपल्या अंगात शक्ती आलेली असली पाहिजे. हे ध्यानात ठेवले पाहिजे की,ज्यास राज्य नवीनच मिळाले असेल, अशा राजास नेहमीच फार चांगुलपणाने वागता येणे कठीण पडते. पुष्कळ वेळा राज्यसंरक्षणार्थ त्यास दुष्टपणा धारण करावा लागतो व धार्मिकताही सोडावी लागते. म्हणून प्रसंगानुसार आपले मन वळवण्याजोगी शक्ती त्याच्या अंगी असली पाहिजे. प्रसंग नाही तोपर्यंत बुध्या वाईट वागण्याचे कारण नाही; परंतु जर तसा प्रसंग येईल, तर वाईट वागताही आले पाहिजे. तोंडातून जो म्हणून शब्द जाईल तो वरील सांगितलेल्या पाच गुणांनी परिपूर्ण असला पाहिजे. धर्मावर तर विशेष श्रद्धा दाखवली पाहिजे. पुष्कळ लोक खरे काय आहे, ते न पाहता फक्त बाह्य दिसण्यावर आपले मत ठरवून ठेवतात. दिसते सर्व लोकांना;परंत कळते थोडक्यांनाच. अमक एक मनुष्य कसा दिसतो हे सांगणे फार कठीण आहे. सर्वसामान्य लोकांची चाल अशी आहे व त्या चालीच्या उलट कोणतीही गोष्ट करणे बरे नाही. परिणामावरून लोक आपले मत बांधतात. खरा प्रकार पाहण्यास कोणीच प्रवृत्त होत नाहीत. स्वसंरक्षण करून हाती असलेली सत्ता राजाने सांभाळली म्हणजे सर्वांकडून त्यास मान मिळून तो स्तुतीस पात्र होतो. हल्ली एक राजा असा आहे की, त्याच्या तोंडात खरेपणा आणि शांतता यांशिवाय दुसरे काही नाही; आणि जर त्याने त्या खरेपणाचा व शांत स्वभावाचा खरोखरी उपयोग केला असता, तर त्याचा कधीच नाश होऊन गेला असता.

❍❍❍

भाग-१९

प्रजेस अप्रिय अगर त्रासदायक न होण्याबद्दल राजाने फार जपले पाहिजे याविषयी

येथपर्यंत राजांच्या अंगी मोठमोठे गुण कोणते असले पाहिजेत, याविषयी विस्तारपूर्वक वर्णन झाले. आता आणखी काही लहानसहान सूचना करणे अवश्य वाटल्यावरून या भागाचा विषय थोडासा सामान्यच ठेवून सर्व समावेश होण्याजोगा घेतला आहे. राजाने आपल्या प्रजेस अप्रिय अगर त्रासदायक न होण्याविषयी जितके जपावे तितके थोडेच. कारण जितका तो जपेल तितकी त्यास निर्भयता प्राप्त होत जाईल व आणखी जरी त्याच्या अंगी दुसरे काही दुर्गुण असले तरी ते मग लपून जातील. अप्रिय होण्याचे तरी मुख्य कारण म्हटले म्हणजे प्रजेची मालमत्ता राजाने हिरावून घेणे आणि त्यांच्या बायकापोरांवर जुलूम करणे हेच होय. म्हणून या दोन गोष्टी न करण्याविषयी राजाने फारच जपले पाहिजे. जोपर्यंत प्रजेची मालमत्ता राजाकडून संरक्षित राहते व कोणताही अनीतीचा प्रकार त्यांच्याशी राजाकडून घडत नाही, तोपर्यंत बहुतेक लोक शांततेनेच राहतात व राजाला भांडण्याचा प्रसंग आलाच, तर तो अगदी थोडक्याच लोकांशी येतो व शत्रू थोडे असले म्हणजे त्यांचे पारिपात्य करणे फारसे कठीण जात नाही; परंतु जेव्हा राजा निर्बल, हलकट, अनिश्चयी व नामर्द होऊन जातो, तेव्हा सहजच तो लोकांकडून तिरस्कारार्ह होतो. म्हणून वरील अपशब्द राजाने आपल्याविषयी टाळले पाहिजेत व नेहमी विशालान्तःकरण, धैर्य आणि गंभीरता ठेवून आपले वर्तन प्रजेशी असे ठेवले पाहिजे की, त्यांच्या संबंधाने आपला अभिप्राय आणि निश्चय हे नेहमी दृढ ठेवत जावे. आपण कधीही झालेला निश्चय फिरविणार नाही अथवा कधीही फसणार नाही, असे खात्रीपूर्वक आपल्याविषयी लोकांच्या मनात बिंबलेले असावे. याप्रमाणे वागला तर राजाविषयी लोकांच्या मनात पारच मोठी पूज्यबुद्धी उत्पन्न होईल व त्याजविषयी लोकांच्या मनात भीती असली म्हणजे त्याच्यावर उठण्यास कोणीही धजणार नाही व त्याजवर कोणीही हल्ला करण्यास प्रवृत्त होणार नाही. राजाविषयी भीती

त्याच्या प्रजेच्या मनात असावी तशीच इतर परकीय राजांच्याही मनात असावी हे इष्ट आहे. परकीयांपासून संरक्षण होणे ते शूरत्वाच्या आणि मित्रांच्या जोरावरच होते. जर राजाची सत्ता प्रबल असली, तर त्यास पाहिजे तितके स्नेही मिळतात आणि स्वराज्यात शांतता असली म्हणजे परराजांपासून भीती फारशी राहत नाही. असे असताही प्रसंगानुसार एखादा गुप्त बेत राजाच्या विरुद्ध चालण्याचा संभव आहे खरा; तरी वरप्रमाणेच जर नेहमी तो वागत असला, तर त्याजला त्याची फारशी पर्वा करण्याचे कारण नाही. स्पार्टा येथील नेबिसेचच उदाहरण ज्यास माहीत असेल, त्यास वरील गोष्टींचे प्रत्यंतर चांगले येईल. आता राजद्रोही लोकांचा गुप्त बेत जर राजाच्या विरुद्ध झाला. तर त्यास उपाय सांगून ठेवला पाहिजे. लोकांस नेहमी आपल्या सद्‌वर्तनाने संतष्ट राखणे व आपल्याविषयी त्यांच्या मनात तिरस्कार उत्पन्न न होऊ देणे यासारखा दुसरा चांगला उपाय नाही. कारण कोणीही राजाचे विरुद्ध गुप्त बेत करू लागला, तर तो बऱ्याच लोकांस पसंत पडेल, अशी बेत करणाराची खात्री असल्याशिवाय तो तसला बेत करणारच नाही, कारण विनाकारण असा बेत करून तो सिद्धीस जाणे फार प्रयासाचे असते व ही गोष्ट अनुभवांतीच सिद्ध झालेली आहे. बंड करणारे लोक असंतुष्ट असले पाहिजेत. एरव्ही बंड करणार नाहीत. शिवाय असले बंड उघडकीस आले, तर फार वाईट परिणाम होतील अशी भीती बंडखोरास असतेच. बरे गुप्त बेत बाहेर फोडणारे तरी जपतच असतात. बेत फोडला तर आपल्यास बक्षीस मिळेल व न फोडला तर फायदा होईलच, असा नियम नाही. म्हणून बेत बाहेर फुटण्याचाच संभव जास्त असतो. यासाठी बंडखोरांचे साथीदार चांगले दृढ स्नेही तरी असले पाहिजेत किंवा राजाचे हाडवैरी तरी असले पाहिजेत. असे नसेल तर, बेत बाहेर फुटल्याशिवाय राहणारच नाही. बंडखोर लोकांना शिक्षा होईल ही भीती असते. बरे, राजाची मदत तरी कमी असतेच असे नाही. बरेच दिवस चालत आलेले राज्य एकाएकी मोडणेही कठीण असते. कायदेकानू असतात व त्यांच्या विरुद्ध चालण्यास लोकांची प्रवृत्ती एकदम होत नाही. इतक्या सर्व गोष्टी असून लोक बिथरले नसले, म्हणजे राजास मुळीच भीती नाही. हानिबाल म्हणून बलोनियाचा राजा होता. कानेस्काय लोकांनी त्याच्या विरुद्ध गुप्त बेत चालवून त्यास व त्याच्या घराण्यातील इतर सर्वांस ठार मारले. फक्त जॉन म्हणून एक हानिबालचा वंशज जिवंत राहिला. त्यावेळी जॉन अगदी लहान होता. हा खून होताच सर्व लोक कानेस्काय लोकांवर उठले व त्यांनी सर्वांचा नाश करून सोडला. इतके तरी होण्याचे कारण म्हटले, तर बलोनियाच्या राजावर प्रजेची चांगली निष्ठा होती हे होय व ही निष्ठा इतकी होती की, या राजघराण्यातील कोणी एक राखेचा पुत्र फ्लारेन्स येथे होता. त्याजकडे मद्दाम वकील पाठवन लोकांनी त्यास आणवन आपले राज्यपद दिले व जॉन मोठा होईपर्यंत त्याने ते फार चांगल्यारीतीने चालविले. या दोन गोष्टीवरून असे उघड दिसते की, प्रजेची निष्ठा जोपर्यंत राजावर दृढ आहे, तोपर्यंत त्यास भीती नाही; परंतु जर का प्रजाच नाखुश असली, तर मात्र काय परिणाम होतील, याचा

नियम नाही. म्हणून जे कोणी आजपर्यंत मोठमोठे शहाणे राजे होऊन गेले, त्यांनी आपल्या सरदारांस कधीही निराश होऊ दिले नाही अथवा लोकांस नाखुश होऊ दिले नाही. हल्ली जी काही पृथ्वीवर चांगली चाललेली राज्ये आहेत, त्यामध्येच फ्रान्स हे एक आहे. त्या देशातील कायदेकानू व रीतिभाती यामुळेच राजाचे संरक्षण होऊन त्यास स्वतंत्रता मिळते. फ्रान्स देशातील सरदार लोक नेहमी द्वाड असून कधीही थोडक्यात तृप्त असणारे नव्हते म्हणून त्यांस नेहमी दाबातच ठेवणे भाग होते. तसेच फ्रान्स देशातील इतर सामान्य लोकांचे व सरदारांचे नेहमी वाकडेच असे. कारण सरदाराची लोकांस मोठी भीती असे. या सर्व गोष्टी लक्षात घेऊनच ज्या कोणी पुरुषाने फ्रान्सची राज्यपद्धती स्थापित केली, त्यानेच पार्लमेंट म्हणजे सर्व लोकांच्या मुखत्यारांची सभा करून ठेवली. या सभेच्या हाती सत्ताही चांगली ठेवली. यामुळे असे झाले की,राजाने जर सामान्य लोकांचा पक्ष घेतला, तर सरदारांस नाखुश राहण्यास कारण राहत नाही व सरदारांचाच पक्ष घेऊन चालला, तर तिऱ्हाइताप्रमाणे आपोआप लोकांचे संरक्षण होते. लोकांस व राजास हितकारक अशा दुसऱ्या व्यवस्थेची कल्पनाच करता येणार नाही व यावरून दोन गोष्टी उघड दिसतात, त्या या की, लोक नाखुश होतील असा जो काही राजकर्तव्याचा वाईट न्याय असेल, तो आपल्या अंमलदारांकडूनच राजाने अमलात आणावा व कृपा आणि दयाभूतपणाची जेवढी कृत्ये असतील, तेवढी मात्र त्याने स्वतः करावी. राजाने आपला मोठेपणाच राखला पाहिजे; परंतु तो मोठेपणा राखताना लोकांस आपण अप्रिय होऊ देता कामा नये.

रोमन लोकांमध्ये पुष्कळ बादशहा झाले. त्यांपैकी कित्येक तर मोठेपणा, शांती, दया यांजबद्दल नामांकितच होते. तरी प्रजेकडून गुप्त बेत वगैरे होऊन त्यांपैकी बरेच असामीस लोकांनी पदच्युत केले अथवा ठार मारले. यावरून आमच्या वरील म्हणण्यास बाध येतो असे कित्येकांस वाटेल, तर तसे मानण्याचे कारण नाही. प्रत्येकाचे गुणदोष काय होते व आम्ही वर लिहिल्याप्रमाणेच त्यांचा अंत झाला किंवा नाही हे निरनिराळ्या उदाहरणांचा निरनिराळा विचार करून पाहिले पाहिजे. म्हणून प्रत्येक बादशहाचे उदाहरण घेऊन त्याजबद्दल विचार करू. मारकस बादशहा तत्त्ववेत्ता होऊन गेला. त्याजपासून ते माक्सिमिनसपर्यंत जे बादशहा होऊन गेले, त्यांचा प्रत्येकाचा विचार करणे आहे. या बादशहांची नावे- मार्कस् त्याचा मुलगा कमोडस् परटिनाक्स्, जूलियन, सेव्हरस्, आंटोनायनस्, त्याचा पुत्र कराकला, माक्रिनस्, हिलियोगबालस्, अलेक्झांडर आणि माक्सिमिनस्.

इतर राज्यांमध्ये राजेलोकांस अडथळे काय ते दोनच असतात. सरदार लोकांची महत्त्वाकांक्षा आणि सामान्य लोकांचा दुष्टपणा; परंतु रोमन राज्यामध्ये तर हे उपद्रव असून, शिवाय सैन्यातील लोक क्रूर व लोभी होते, हे एक तिसरेच विघ्न होते. सैन्यास व इतर लोकांस एकाच वेळी तृप्त राखणे कठीण पडल्यामुळे, बऱ्याच राजांचा नाश होण्यास कारण हे तिसरे विघ्नच झाले. प्रजेस शांतता आवडते, म्हणून जो राजा शांत स्वभावाचा व गरीब

असतो तो त्यांस आवडतो; परंतु सैन्यास नेहमी लढाई आवडते म्हणून जो राजा युद्धप्रिय, क्रूर, कडक व दुसऱ्याचे अपहरण करणारा असतो तोच त्यांस आवडतो व असा राजा असला म्हणजे सहजच सैन्यातील लोकांची तृप्ती होते. म्हणून आपल्या शहाणपणाच्या योगाने जे राजे, सैन्यास व इतर सामान्य लोकांस, दोघांसही नेहमी दाबात ठेवत नाहीत, त्यांचे राज्य चांगले चालत नाही. त्यातही राज्यपद जर नवीनच प्राप्त झाले असेल, तर लोकांची फारशी पर्वा न करता सैन्यासच संतुष्ट ठेवण्याचा यत्न केला पाहिजे. जरी अप्रिय होणे सुटत नाही, तरी सर्वांसच अप्रिय होणे बरोबर नाही. बरे, जर बहुतेकांसच अप्रिय झाल्याशिवाय भागत नसेल, तर मग त्यांपैकी जे कोणी प्रबळ असतील त्यांस तरी अप्रिय होऊ नये. या गोष्टीवरून वरील रोमन बादशहांची गति कशी झाली हे सहज समजेल. मारकस्, आरेलियस्, परटिनाक्स् आणि अलेक्झांडर हे बादशहा फार गरीब असून न्यायप्रिय होते. दुष्टपणा त्यांस आवडत नसून सभ्य व उदार होते म्हणून त्या सर्वांचा परिणाम वाईटच झाला. मारकस्ला मात्र फारसा त्रास पडला नाही. कारण त्याला बापाचीच गादी मिळाली व राज्य मिळण्यात त्याजवर लोकांचे अथवा सैन्याचे मुळीच उपकार झाले नव्हते व त्याच्या अंगी पुष्कळ चांगले गुण असल्यामुळे सर्वांमध्ये त्याचा सारखा मान राहत असे. त्याने सर्वांस अशा काही दाबात ठेवले होते की, त्याजबद्दल कधीही कोणी नाखुशी दाखवली नाही; परंतु परटिनाक्स् याला सैन्यातील लोकांच्या इच्छेविरुद्ध इतर लोकांनीच बादशहा केला होता व कमोडसच्या वेळी त्यांस हवे तसे राहण्याची सवय झाली असल्यामुळे, परटिनाक्स् याने जे नियम त्यांस करून दिले, त्या नियमांप्रमाणे वागण्यास ते राजी नव्हते. म्हणून सहजच तो लोकांस अप्रिय झाला व त्याजबद्दल पूज्यबुद्धी नाहीशी झाली. यामुळे राज्य प्राप्त होताच त्याचा नाश झाला. यावरून असे दिसते की, अप्रियता जशी वाईट कृत्यांनी प्राप्त होते, तशी चांगल्या कृत्यांनीही होते. म्हणून आपली सत्ता कायम राहण्याकरिता राजाला कधी कधी वाईट आचरण करावे लागते. सरदार, सैन्य अथवा लोक यांपैकी जे कोणी प्रबळ असून वाईट आचरण करीत असतील, त्यांचे वाईट आचरण एकदम मोडून टाकण्याचा प्रयत्न करणे प्रशस्त होणार नाही.

आता अलेक्झांडरविषयी विचार करू. अलेक्झांडर पष्कळ न्यायी व चांगला होता. त्याजविषयी कोणी एकाने असे म्हटले आहे की, त्याच्या चौदा वर्षांच्या कारकीर्दीत चांगला न्याय झाल्याशिवाय एकही मनुष्य मारला गेला नाही. तरी तो भित्रा होता व नेहमी आपल्या आईच्या सल्ल्याने चालत असे म्हणून सैन्यास तो अप्रिय होऊन त्यांनी गुप्तरीतीने बेत करून त्यास ठार मारले. तसेच कमोडस्, सेव्हरस्, आंटोनायनस्, कराकला आणि माक्सिमिनस् यांजविषयी विचार केला, तर असे दिसते की, ते सर्व क्रूर व परद्रव्यापहारी होते. त्यांनी सैन्यातील लोकांस खुश ठेवण्याकरिता पाहिजे तसा जुलूम इतर लोकांवर केला, म्हणूनच सेव्हरस् शिवाय करून इतर सर्वांचा परिणाम वाईटच झाला. सेव्हरस् धीट व मोठ्या मनाचा होता. लोकांवर जुलूम करून सैन्याचा इतका स्नेह त्याने संपादिला होता की, त्याच्या योगाने

सर्वांस सौख्यच झाले. त्याचे गुण सैन्यास व इतर लोकांस इतके ढळढळीत दिसत की, लोकांस त्याचे आश्चर्य वाटून ते स्तब्ध बसले व सैन्य त्यास नेहमी अनुकूल राहिले. सेव्हरस् याची कृत्ये विचार करण्यासारखी आहेत. जूलिअन बादशाह हा आळशी असल्यामुळे त्याजवर जाऊन हल्ला करण्याकरिता सेव्हरस् याजपाशी जे सैन्य होते, ते त्याने पाठवले व परटिनाक्स् याच्या मृत्यूचा सूड उगविण्याचे काम त्यास त्याने सांगितले. असे मिष करून त्याने आपले सैन्य घेऊन रोम शहरावर चाल केली आणि इटलीमध्ये येऊन पोहोचेपर्यंत तो काय करतो,याची कोणास दाद लागली नाही. तो रोममध्ये येताच सेनेट सभेला त्याची भीती पडून त्यांनी जूलियन यास ठार मारले व सेव्हरस् यास बादशहा केले. इतके झाल्यानंतर सर्व राज्यपद हाती येण्यास त्यास दोन अडचणी होत्या. एशियामध्ये नायजर म्हणून रोमन सरदार होता, त्याने आपणच बादशहा म्हणून जाहीर केले होते. दुसरे आल्बिनस् म्हणून एक सरदार होता, तोही बादशहा होण्याविषयी झटत होता. दोघांबरोबर एकदम लढाई सुरू करण्याचे सामर्थ्य अंगी नसल्यामुळे, नायजरशी मात्र लढाई करण्याचा त्याने बेत करून आल्बिनस् यास त्याने असे लिहिले की, 'मला सेनेट यांनी बादशहा केले आहे, तरी आपणही माझे विभागी व्हावे अशी माझी इच्छा आहे.' त्यास सीझर ही पदवी दिली आणि सेनेटच्या परवानगीने आपला साथीदार म्हणून त्यास आपल्या जवळ घेतले. आल्बिनस् यास ते सर्व खरे वाटले व तो भुलून गेला. नायजरचा पराभव करून त्यास ठार मारले व पूर्वेकडील राज्याचा बंदोबस्त करून तो रोम शहरी परत आला. नंतर सेनेट सभेमध्ये त्याने असे जाहीर केले की, आम्ही केलेले उपकार न स्मरता आल्बिनस् हा परत माझा खून करण्यास प्रवृत्त झाला आहे. असे सांगून त्याजवर त्याने हल्ला केला व फ्रान्सपर्यंत त्याचा पाठलाग करून त्यास शेवटी ठार मारले. या प्रमाणे या राजाची सर्व कृत्ये जो कोणी पाहील, त्यास असे दिसेल की, तो सिंहाप्रमाणे भयंकर असून कोल्ह्याप्रमाणे कपटी होता. सर्वांस त्याजबद्दल दरारा व - पूज्यबुद्धी होती आणि सैन्यास तर मुळीच अप्रिय नव्हता. थोडेच दिवसात तो इतका नामांकित झाला की, राज्यापहरणाबद्दल लोकांच्या मनात त्याजविषयी काही एक वाईटपणा राहिला नाही; परंतु त्याचा मुलगा आंटोनायनस हा जरी बापाप्रमाणेच सर्व कसबांत हुशार व शहाणा होता,तरी तो फार रागीट व क्रूर होता व रागाच्या सपाट्यात पुष्कळ लोकांस त्याने ठार मारले. यामुळे सहजच तो सर्वांस दुष्ट असा वाटू लागला व जे त्याचे नेहमीचे विश्वासू नोकर होते, त्यांसही तो आवडेनासा झाला. यामुळे त्याच्या सैन्यातील एका सरदारानेच त्यास भर कँपात ठार मारले. या प्रमाणे मागचा पुढचा विचार करूनही जे खून राजाकडून केले जातात, त्यास इलाज नाही. ज्याला म्हणून जिवाची पर्वा नाही त्याने खुशाल काय पाहिजे ते करावे. आंटोनायनस् हा पुढे गादीवर आल्यावर त्याने आपल्या जवळच्या लोकांपैकीच म्हणजे ज्या सरदारांस ठार मारले म्हणून वर सांगितले, त्याचे भावास सैन्यात राहू दिले, ही त्याची मोठी चूक झाली व तिचे त्याला शेवटी फळही मिळाले. यानंतर कमोडस्

बादशहा झाला, तो मार्कसचा मुलगा असल्यामुळे त्यास गादी प्राप्त झाली, ती यथायोग्य हक्कानेच झाली म्हणून त्यास फारशी भीती असण्याचे कारण नव्हते. तथापि तो फारच क्रूर व निर्दय असल्यामुळे त्याने लोकांवर पाहिजे तसा जुलूम चालवला व सैन्यासही हवी तशी मोकळीक दिली. शिवाय दुसरी पुष्कळ हलकट कृत्ये तो करीत असे. नाटक गृहात जाऊन बादशहास अयोग्य अशी तरवार खेळणे व अशी आणखी इतर कृत्ये केल्यामुळे लोकांस तो तुच्छ वाटू लागला व सैन्यासही त्याचा त्रासच झाला. त्यामुळे त्यांनी गुप्त बेत करून त्यास ठार मारले. माक्सिमिनस् सुद्धा मोठा शूरच बादशहा होता व अलेक्झांडर गरीब असल्यामुळे त्यास त्रासून लोकांनी माक्सिमिनस् हा बादशहा केला होता; परंतु तोही फार दिवस टिकला नाही. दोन गोष्टींनी तो लोकांस आवडेनासा झाला. एकतर तो नीच कुळात जन्मलेला होता. तो पूर्वी मेंढराख्याचा धंदा करीत असे व हे सर्वांस विदित होते. दुसरे असे की, बादशहा झाल्यावरही त्याने एकदम रोम शहरी येऊन गादी हस्तगत केली नाही व आपल्या सरदारांस व अमलदार लोकांस पाहिजे तसे वागण्यास मोकळीक दिली असल्यामुळे सर्व लोकांस तो आवडेनासा होऊन, सेनेटमध्येसुद्धा त्याचे विरुद्ध बेत चालले व त्याचे सैन्याचीही त्यास मदत नसल्यामुळे सर्वत्रांनी त्यास त्रासून शेवटी त्याचा खून केला.

हिलियोगबालस्, माक्रिनस् आणि जूलियन हे सर्व भित्रे व गरीब असल्यामुळेच त्या सर्वत्रांचा लवकर नाश झाला. म्हणून त्यांविषयी येथे विशेष सांगत बसण्याची जरूर नाही. हल्लींच्या काळाची गोष्ट अगदी निराळी आहे. रोमन लोकांच्या सैन्याची स्थिती व हल्लींच्या राजांच्या सैन्याची स्थिती यात महदंतर आहे. रोमन लोकांच्या सैन्यास खुश ठेवण्यास प्रयास पडत व त्यांस खुश ठेवणेही जरूर असे. हल्लीचे सैन्य पुष्कळ दिवस एक ठिकाणी एका राज्यात मोठमोठे पराक्रम करूनच वाढलेले असते असे नाही. म्हणून त्यांस खुश ठेवण्याचे विशेष प्रयत्न करणे जरूर नाही. पूर्वी इतर लोकांपेक्षा सैन्यातील लोकांस खुश ठेवणे जास्त जरूरी होते. याचे कारण सैन्य जास्त प्रबळ असे; परंतु हल्ली सैन्यापेक्षा लोकच जास्त प्रबळ असल्यामुळे त्यांसच खुश ठेवण्याची आवश्यकता विशेष आहे. तथापि हल्लीही टर्क व सोल्डन यांची गोष्ट निराळी आहे. टर्कीमध्ये सैन्य फार असून सर्व देशाचे संरक्षण सैन्यावरच होत आहे. सोल्डनचीही काही चमत्कारिकच स्थिती आहे. इतर राज्यव्यवस्थेसारखी सोल्डनची राज्यव्यवस्था नाही. ख्रिस्ती धर्मामध्ये पोपाची जशी सत्ता आहे, त्याहून सोल्डनची राज्यव्यवस्था फारशी भिन्न नाही. हे राज्य नवीनही म्हणता येणार नाही, अगर पूर्वापार चालत आले असेही म्हणता येणार नाही. कारण प्रत्येक वेळेस नवीनच राजा निवडला जातो व ही चालच जुनी असल्यामुळे प्रत्येक खेपेस नवीनपणा काही वाटत नाही व नवीन राजांस भीती असते, ती यात राहत नाही. याप्रमाणे कायदे, रीतिभाती वगैरे सर्व जुनेच असतात. नवीन काय तो एक राजा मात्र. असो, मुद्दा काय तो इतकाच आहे की, नवीन राजाच्या नाशास कारण म्हटले तर राजाबद्दल लोकांच्या मनात द्वेष

अथवा तिरस्कार बुद्धी असणे हेच होय. काही राजांची पद्धत निराळी असल्यामुळे त्यांचा परिणाम एक प्रकारचा झाला व इतरांचा दुसऱ्या प्रकारचा असल्यामुळे त्यांचा परिणाम काही निराळाच झाला. मार्कस् हा हक्कानेच बादशहा झाला होता, म्हणून त्याची पद्धत परटिनाक्स व अलेक्झांडर यांनी उचलणे रास्त नव्हते. कारण ते लोकांच्या मर्जीनेच बादशहा झाले होते. तसेच कराकला, कमोडस् आणि माक्सिमिनस् यांनी सेव्हरस् सारखे वागण्याचे नव्हते. कारण त्याच्या इतके सद्गुणी अथवा शक्तिमान् ते नव्हते. म्हणून सेव्हरस्च्या उदाहरणावरून त्यांनी घ्यावयाचे काय ते राज्याच्या पायाच्या मजबुतीस लागणारे त्याचे उपाय व मारकस् पासून घ्यावयाचे काय ते एकदा राज्य प्राप्त झाल्यावर त्याचे चांगले रीतीने कसे संरक्षण करावे इतकेच.

○○○

भाग-२०

किल्ले वगैरे जे कित्येक राजे आपले राज्यात बांधतात त्यांचा कितीसा उपयोग आहे याजविषयी

आपले राज्य सुरक्षित चालावे म्हणून कित्येक राजांनी प्रजेकडील सर्व हत्यारे काढून घेतल्याची उदाहरणे आहेत. कित्येकांनी सर्व देशभर किल्ले बांधले आहेत. कित्येकांनी सर्व प्रजेमध्ये भांडणे, कज्जे माजविले आहेत. काहीतर जे आपल्यास शत्रुसे वाटतील, त्यांची खुशामत करून राहतात. काही किल्ले बांधतात. काही असलेले किल्ले नाहीसे करून टाकतात. या सर्व गोष्टींबद्दल एकच नियम बांधता येणे कठीण आहे. कारण अमुक एक राजाने अमुक एकावेळी काय गोष्ट केली पाहिजे, हा प्रश्न निराळा व सर्व राजांस सर्वकाळ कोणते उपाय योजणे चांगले हा प्रश्न निराळा. तरी जरूरीपुरता या प्रश्नांचा येथे विचार कर्तव्य आहे. साधारणतः पाहिले तर प्रजेकडील हत्यारे काढून घेणे हे शहाणपणाचे कृत्य नव्हे. उलट शहाणे म्हणून जे राजे झाले, त्यांनी प्रजेला जास्त हत्यारे बाळगण्याचाच सल्ला दिला आहे. कारण आपल्या लोकांच्या हाती शस्त्र देऊन त्यांचा उपयोग करण्यास त्यांस शिकवले असता, ती हत्यारे परकीयांची असे कोण म्हणेल? ती आपलीच आहेत असे राजाने मानण्यास काय हरकत आहे? जे कोणी भरवसेलायक पूर्वी दिसत नाहीत ते हत्यारे दिली म्हणजे चांगले विश्वासू बनतात. जे विश्वासू असतात ते दृढ निश्चयी बनतात आणि सर्व प्रजा आपलीच होऊन जाते. आता सर्वांसच हत्यारे देणे शक्य होत नाही म्हणून जेवढ्यांस देववतील तेवढ्यांसच नेहमी संतुष्ट ठेवून आपलेसे करून घेतलेले असले म्हणजे बरे. व या युक्तीने ज्यांस शस्त्रे वापरता येतात, त्यांजकडूनच आपले संरक्षण होईल असे म्हणून इतर शस्त्रहीन लोकही संतुष्ट असतात; परंतु असलेली हत्यारे काढून घेण्याने आपण लोकांस अप्रिय होतो. लोकांवरील आपला भरवसा नाहीसा झाल्यासारखे त्यांस दिसते. काहींना वाटते राजा भित्रा आहे व काहींना वाटते राजा विश्वासघातकी आहे. भित्रेपणा अगर विश्वासघात या दोहोंपैकी एक जरी राजाविषयी लोकांच्या मनात असले, तरी त्याजमुळे

सर्वांच्या मनात द्वेष उत्पन्न सहज होतो. सैन्याशिवाय राज्य चालणे कठीण असल्यामुळे आपल्यास लोकांनी जर हत्यारे द्यावयाची नाहीत, तर दुसरे बाहेरील सैन्य पैसा देऊन आणणे प्राप्त आहे व अशा प्रकारे आणलेल्या सैन्यापासून होणारे परिणाम पूर्वी सांगण्यात आलेच आहेत. नवीन राज्यप्राप्ती झाली असता, लोकांना हत्यारबंद करणे हे राजाचे कर्तव्य आहे व त्याजबद्दल इतिहासातही पुष्कळ उदाहरणे सापडतील; परंतु एखादे नवीन राज्य जिंकून ते जर आपल्या मूळच्या राज्यास जोडले, तर नवीन जिंकलेल्या प्रजेजवळ हत्यारे राहू न देणे हेच बरोबर आहे. तथापि त्यातही ज्या लोकांनी आपल्यास नवीन राज्य जिंकण्यास मदत केली असेल, त्यांची हत्यारे एकदम काढ़न घेता नये. अशा लोकांस हळूहळूच नरम केले पाहिजे. अशा प्रकारे करून नवीन जिंकलेली सर्व प्रजा अगदी निर्बल करून स्वकीय सैन्यावरच संरक्षणाकरिता अवलंबून राहिले असता, ते सर्व राज्य चिरकाळ चालेल. इटलीमध्ये पूर्वीचे नामांकित शहाणे लोक असे म्हणत असत की, पिस्टोया प्रांत ताब्यात राहण्यास चांगला उपाय म्हणजे तेथील लोकांमध्ये भांडणे लावून देणे हा होय आणि पिसा ताब्यात राखण्यास मुख्य उपाय किल्ले वगैरे बांधणे हा होय व हेच उपाय वेळोवेळी सर्व राजांनी अंमलात आणले असल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. ही गोष्ट खरी आहे की, वरील उपाय हल्लीच्या इटलीच्या स्थितीस उपयोगी पडणार नाहीत. इटलीमध्ये पूर्वी सर्व फाटाफूट असून सर्व लोक स्वतंत्र होते; परंतु हल्लीची तशी स्थिती नाही. जर मुद्दाम आपली फाटाफूट केली आणि शत्रूचा हल्ला बाहेरून आलाच, तर ज्या दोन पक्षांमध्ये फाटाफूट झाली असेल त्यापैकी जे लोक कमी बलवान असतील, ते एकदम शत्रूस जाऊन मिळतील व दुसऱ्यांच्याने एकटे असल्यामुळे देशाचे संरक्षण होणार नाही. गेल्फ आणि गिबिलिन अशी दोन संस्थाने व्हेनिशिअन लोकांच्या ताब्यात होती व ती कदाचित आपल्यावर उठतील या भीतीस्तव त्यांजमध्ये व्हेनिशिअन लोकांनी आपसांत कलह माजवून दिला; परंतु त्याचा परिणाम व्हावा तसा झाला नाही. कारण व्हालिया येथे जेव्हा व्हेनिशिअन लोकांचा पराजय झाला, तेव्हा वरील दोहोंपैकी एकाने व्हेनिशिअन लोकांस राज्याबाहेरच काढून लाविले. म्हणून अशाप्रकारचे उपाय राजाने योजणे म्हणजे स्वतःचेच निःसत्त्व लोकांत प्रगट करण्यासारखे आहे. जोपर्यंत राज्यामध्ये शांतता आहे, तोपर्यंत अशा प्रकारच्या युक्त्या उपयोगी पडतील खऱ्या, तरीपण एकदा जर लढाई सुरू झाली तर लागलीच संकटे प्राप्त होतील. कदाचित कोणी असे म्हणतील की, जास्त अडचणी मुद्दाम उत्पन्न करून त्यातूनही जो पार पडेल त्याची चांगली कीर्ती होऊन तो फार शहाणा ठरतो ही गोष्ट खरी आहे; परंतु केवळ कीर्तीच्याच आशेकरिता नशिबावर हवाला ठेवून वागणे म्हणजे फारसे प्रशस्त आहे असे नाही. मुद्दाम शत्रू उत्पन्न करणे व नंतर त्याचा पराभव करणे यातही एक प्रकारे राजास भूषण आहे, त्यामुळे तो राजा जास्त शूर व शहाणा ठरतो तरी अशाप्रसंगी जय सदोदित मिळतोच असे नाही व नशीबच जर त्याचे बळावले तर मग दुसरा तरी कोण काय करणार?

पुष्कळ वेळा असे आढळून आले आहे की, राज्य प्रकरणात अथवा इतर व्यवहारातसुद्धा आरंभी जे आपल्यास अविश्वसनीय दिसतात, ते पुढे विश्वासू ठरून जे प्रथम फार विश्वासी असे दिसतात तेच पुढे घातक होतात. सियेना येथील पेट्रसाय राजा अविश्वासू नोकरांकडूनच राज्यकारभार चालवून घेत असे; परंतु ही गोष्ट सामान्य नियमासारखी लागू पडणार नाही व निरनिराळ्या ठिकाणच्या स्थितीप्रमाणे बदलतही जाईल. तरीपण एवढी गोष्ट खरी आहे की, एखादे राज्य नवीन जिंकले असता केवळ संरक्षणाकरिताच म्हणून जे नवीन राजाच्या विरुद्ध जातात, त्यांस एकदा सोईने आपलेसे करून घेतले म्हणजे ते चांगले प्रामाणिक राहतात. कारण जर आपण प्रामाणिकपणे वागलो नाही तर आपले संरक्षण राजाकडून न होता नाश मात्र होईल, अशी त्यांस नेहमी भीती असते; परंतु जे म्हणून स्वतःच्या संरक्षणार्थ बरेच बेपर्वा असतात व म्हणून प्रथम प्रामाणिकसे दिसतात, तेच कदाचित राजावर उठण्याचा संभव जास्त असतो.

दुसरी एक सूचना नवीन झालेल्या राजेलोकांस करणे या ठिकाणी जरूर आहे. आपल्याशीच लोकांनी स्नेह करून आपणास राजा करण्याचे कारण काय असावे, याचा विचार राजाने नेहमी आपल्या मनात केला पाहिजे. फक्त जुन्या राजास त्रासून त्याचा नाश करण्याच्या उद्देशानेच जर नवीन राजास ते लोक येऊन मिळाले असतील, तर अशा लोकांस नवीन राजाने संतुष्ट ठेवणे फार कठीण जाईल; परंतु जे जुन्या राजस फारसे कंटाळले नसतील व राज्यकारस्थानात फारसे लक्ष न देता आपले धंद्याकडेच विशेष लक्ष देणारे असतील, तेच लोक शेवटी नवीन झालेल्या राजाचेही स्नेही बनतील व आरंभीच जे जुन्या लोकांशी तक्रारी करून नवीन राजास राज्यपद देतील, ते प्रसंगी त्याजवरही उठण्यास कां कू करणार नाहीत.

राज्यास बळकटी यावी म्हणून किल्ले वगैरे बांधून ठेवण्याचा प्रघात पुष्कळ ठिकाणी आहे. किल्ले वगैरे असले म्हणजे शत्रूचा प्रवेश होणे कठीण जाते व बंडाचे वगैरे वेळी किल्ल्यांचा उपयोग चांगला होतो व हा मार्ग वाईट आहे असे आमचे म्हणणे नाही, तरी इतिहासात उलट उदाहरणेही आहेत. निकोलो व्हिटेलो याने राज्यास बळकटी यावी म्हणून असलेले किल्ले मोडून टाकवले. गिडोबाल्डो या राजास एकवार शत्रूने राज्यातून हाकून दिले होते; परंतु संधी साधून त्याने पुन्हा राज्यपद प्राप्त करून घेतल्यानंतर राज्यातील सर्व किल्ले व मजबुतीच्या जागा जमीनदोस्त करून टाकल्या. बेंटिहोलि याने सुद्धा राज्यात फिरून प्रवेश झाल्यानंतर वरप्रमाणेच केले. यावरून दिसते की, किल्ले वगैरे हे उपयोगी आहेत किंवा नाहीत, हे प्रसंगावर अवलंबून आहे. एका प्रसंगी जर यांचा फार उपयोग झाला, तर दुसऱ्या प्रसंगी त्यांजपासून नुकसानही होण्याचा संभव आहे. तथापि ज्या राजास परकीयांपेक्षा आपल्याच प्रजेपासून जास्त भीती असेल, त्याने किल्ले वगैरे शाबूत ठेवणे बरे. फ्रान्सिस्को फोरझा याने मिलनचा किल्ला बांधला, तरी फोरझा घराण्यातील राजास या किल्ल्यापासून जितका उपद्रव होईल, तितका दुसरा कशापासूनही होणार नाही. राष्ट्राची

उत्तम मजबुती म्हटली म्हणजे किल्ले वगैरे नव्हेत, तर लोकांची राजाविषयी निष्ठा व पूज्यबुद्धी ही होत. जर लोकांचा राजावर भरवसा नसला तर या किल्ल्यांपासून राजाचे संरक्षण होणार नाही. प्रजा प्रतिकूल असली म्हणजे शत्रू त्या किल्ल्याचे मालक एकदम बनतील. हल्लीच्या काळी किल्ल्यापासून राजांचे संरक्षण झाल्याची उदाहरणे नाहीत. फक्त एकच आमच्या आढळात आहे. फरली येथील काउन्टेसने नवरा वारल्यानंतर किल्ल्यांमध्ये राहून आपला बचाव केला, नंतर मिलनहून तिला मदत येऊन मिळाली व मुलखात शांतताही झाली. कारण परकीयांनी येऊन त्यावेळी त्या लोकांचा बचाव करणे शक्यही नव्हते; परंतु पुढे काही काळाने सीझर बॉर्जियाने ज्यावेळी हल्ला केला, त्यावेळी सर्व लोक त्यासच जाऊन मिळाले व वरील काउन्टेस निराधार झाली. म्हणून किल्ल्यांची वगैरे फारशी पर्वा न करता लोकांसच जर आपलेसे करून घेण्याचा तिने प्रयत्न केला असता, तर तिचा पराभव झाला नसता. या सर्व गोष्टींवरून असे दिसते की, लोक प्रतिकूल असले तरी, त्यांची पर्वा न करता जे राजे केवळ किल्ले वगैरे बांधून त्यांजवरच संरक्षणार्थ अवलंबून राहतात, ते शेवटी फसतात. म्हणून सारासार विचार करूनच काय करणे ते केले पाहिजे.

○○○

भाग-२१

राजा कोणत्या तऱ्हेने वागला असता लौकिकास चढतो याविषयी

राजाने मोठमोठे पराक्रम करून शौर्य व सद्वर्तन यांजबद्दल लोक स्तुतीच करतील, असे वागले असता, तो जितका नामांकित होईल, तितका दुसऱ्या कोणत्याही उपायांनी होणार नाही. हल्लीचा स्पेनचा राजा नवीनच आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. कारण तो पूर्वी लहान असून थोड्याच काळात सर्व ख्रिस्ती राष्ट्रांमध्ये फार थोर म्हणून प्रसिद्ध झाला आहे. त्याचे पराक्रम पाहिले तर केवळ शौर्यानेच पूर्ण आहेत, इतकेच नाही,तर त्यांपैकी काहीतर अगदी विलक्षणच आहेत. राज्यपद प्राप्त होताच त्याने ग्रनाडा येथील राज्यावर हल्ला करून ते काबीज केले. यामुळे त्याची कीर्ती वाढण्यास आरंभ झाला. आपल्याला कोणताही अडथळा येईल, असे तो कोणास कधीही दाखवीत नसे व जसा काय हा पराक्रम आपोआपच घडून आला, असे त्याने बाह्यतः लोकांस दर्शविले. कास्टिलचे सरदारांस त्याचा मुळीच संशय आला नव्हता. धर्माकडे व लोकांकडे फारसे लक्ष न देता, होईल ती खटपट करून त्याने आपले सैन्य सुधारले आणि एकदा सुरू झालेली लढाई बंद न ठेवता सैन्यात अशी काही व्यवस्था ठेवली की,त्यांनी हुरूप येऊन पुष्कळ जय मिळवले. तो कोणतीही गोष्ट करू लागला, तरी धर्माच्या सबबीवर करी. त्याने मराणी नावाचे जे ज्यू लोक होते, त्या सर्वांचा नाश करून टाकला. त्याने आफ्रिकेवर हल्ला केला, इटलीवर स्वारी केली, फ्रान्सवर चाल केली, मिळून सर्व लोक कसे अगदी चकित होऊन याचा काय परिणाम होतो, त्याची वाट पाहत बसत असत व हे सर्व इतके जलदी चालले होते की, कोणास त्याजबद्दल असंतोष प्रगट करण्यासही वेळ मिळत नसे. वरप्रमाणेच स्वराज्यात सुधारणा करीत असल्याचे लोकांस दाखविणेही राजास जरूरीचे आहे. प्रसंग येईल तेव्हा आपल्या राज्याची अंतःस्थ व्यवस्था कशी आहे व त्यात काय काय गोष्टी केल्या पाहिजेत वगैरे सर्व विचार राजाच्या मनात असून त्याजबद्दल त्याने उपायही योजिले पाहिजेत. राजाची ख्याती दोन प्रकारची

असावी. एक राज्य करण्यात कुशल व त्याचे संरक्षण करण्यात पराक्रमी, तसेच राजा जेव्हा दुसऱ्याशी आपला स्नेहभाव दृढ राखतो व शत्रूशीही उदार बुद्धीने वागतो, तेव्हा त्याची फारच वाहवा होते. बाहेर एक लढाई चालू असून आपण कोणता पक्ष घेणे तो एकदम राजाने ठरवला पाहिजे. तटस्थ राहणे बरोबर नाही. कारण तसे राहिल्याने दोहोंकडूनही त्यास भीती आहे. कोणाचाच पक्ष न स्वीकारला असता लढाईत ज्याचा जय होईल तो त्याच्यावर चाल करून येईल व त्याचा नाश करण्याचा प्रयत्न करील व अशा गोष्टीच्या आड, ज्याचा पराभव झाला असेल, तो येणार नाही. तसेच तटस्थ राहिल्याने दुसरे कोणी लोक आपल्यास मदतीस येणार नाहीत. कारण ज्यास जय मिळाला असेल त्यासच ते मदत करण्यास जाण्याचा संभव जास्त आहे. इटोलियन लोकांनी बोलावल्यावरून आंटिओकस् हा रोमन लोकांवर चाल करण्याकरिता ग्रीस देशात गेला. एकिअन लोकांचा रोमन लोकांशी स्नेहभाव होता व त्यांनी कोणासही जाऊन मिळू नये म्हणून आंटिओकस् याने एकिअन लोकांकडे वकील पाठवले. तसेच रोमन लोकांनीही आपल्यास मदत करण्याविषयी त्यांजकडे मागणी केली. एकिअन लोकांचा भर सभेत वादविवाद चालला असता रोमन वकील म्हणाला, 'आंटिओकस् यांचे वकील कोणासच न मिळण्याविषयी जो सल्ला देत आहेत तो फारच गैर आहे. जर कोणासच तुम्ही न मिळाला, तर ज्यास जय मिळेल, त्याच्या अमलाखाली तुम्हास जावे लागेल. ज्यांस तुमच्याबद्दल काळजी नसेल ते असा भलता सल्ला तुम्हाला देतील; परंतु जे म्हणून तुमचे स्नेही आहेत, तेच तुम्हांस हत्यादबंद होऊन मदत करण्यास बोलावतील.' नजीकचे संकट टाळण्याकरिता जे भलताच मार्ग पत्करतात, त्यांचा शेवट बरा होत नाही. बरे, ज्या पक्षास आपण मदत केली त्याचाच जय झाला, ते आपल्यास काही त्रास देणार नाहीत. जरी तो जास्त प्रबळ असला तरी त्यास मदत केली असल्यामुळे त्याच्या मनातला स्नेहभाव कायम राहतो. बरे, अशा लढाया तरी थोडक्याच होतात की, ज्यांत एकास जय अगदी पूर्णपणे मिळून दुसऱ्याचा अगदीच पूर्णपणे नाश होतो. बरे, आपण ज्यास मदत केली असेल त्याचा जरी पराभवच झाला, तरी तो आपल्यास सोडून जाणार नाही व शक्ती असेल तेथपर्यंत तो आपल्यास मदत करीलच. दुसरे असे की, लढाईच्या परिणामाकडे दुर्लक्ष करण्याजोगी जरी आपली शक्ती असली, तरी कोणता तरी एक पक्ष आपल्यास संमत आहे असे एकदम सांगणे बरे. कारण, तसे सांगितल्याने दुसऱ्या पक्षाचा पराभव एकदम होतो. जी लढाई केवळ स्वसंरक्षणार्थ सुरू झाली नसून दुसऱ्याचे विनाकारण हरण करून घेण्याकरिता चालू झाली असेल, त्या लढाईत जो जास्त प्रबल असेल, त्याजपाशी स्नेह करणे कधीही रास्त होणार नाही. कारण त्या योगाने आपण त्या प्रबळ राजाच्या हातामध्ये जाऊन पडण्याचा संभव असतो. फ्रान्सचा राजा व मिलनचा ड्यूक यांची लढाई चाल असता व्हेनिशिअन लोक जरूर नसताना फ्रान्सला जाऊन मिळाले व त्याचमुळे व्हेनिशिअन लोकांचा नाश झाला; परंतु ज्या ठिकाणी कोणता तरी पक्ष घेणे जरूरच आहे, त्या ठिकाणी मात्र वर सांगितल्याप्रमाणे एकदम

एक पक्ष स्वीकारला पाहिजे. अमुक प्रसंगी अमुकच करावे, असा नियम बांधता येणार नाही; परंतु मनुष्याच्या अंगी स्वभावतः इतके शहाणपण आहे की, बरे वाईट त्यास निवडून काढता येईल. मात्र, कोणत्याही विषयांत जे चांगले म्हणून दिसेल, त्याजविषयी राजाने नेहमी आपली प्रीतीच दाखवीत असले पाहिजे. प्रजेने शांततेने स्वस्थ असावे असा राजाने त्यांस धीर दिला पाहिजे. व्यापार वाढला असता कर जास्त बसेल अशी भीती राजाने घालू नये व प्रजेपैकी कोणीही आपला धंदा सुधारून त्यात विशेष फायदा करून घेऊ लागला, तर त्याजवर राजाने आपली आशा ठेवता कामा नये. इतकेच नाही, तर अशा प्रकारच्या लोकांस राजाने चांगले उत्तेजनच दिले पाहिजे. म्हणजेच राज्यास बळकटी येईल, तसेच आपल्या लोकांस मेजवान्या देणे, खेळ दाखवणे आणि दुसरे कित्येक मनोरंजनाचे विषय त्यांस दाखवून देणे, हेही राजाचे कर्तव्यच आहे. देशामध्ये निरनिराळ्या जातीचे व भिन्न भिन्न तऱ्हेचे लोक असतात, त्या सर्वांविषयी राजाने आपली दया व उदार बुद्धीच प्रगट केली पाहिजे. इतके केले तरी राजाने कोणत्याही कृत्याने आपल्या मोठेपणास व्यत्यय येईल अशी गोष्ट करू नये.

○○○

भाग-२२

राजांच्या प्रधानांविषयी

राजाने आपला प्रधान नेमणे हे काम सोपे नाही. राजास जी काही बातमी कळते, ती त्या जवळ जे नेहमी राहणारे लोक असतात त्यांजकडून कळते. जर ते शहाणे आणि प्रामाणिक असले, तर तो राजाच शहाणा आहे, असे म्हटले पाहिजे. कारण त्यांस प्रामाणिक कसे ठेवावे, हे त्यास चांगले कळत असते; परंतु जर प्रधान चांगले नसले,तर त्यांची निवडणूक करण्यामध्ये त्याची चुकी झाली असेच म्हटले पाहिजे. सियेनाचा राजा जो पेट्रसाय त्याचा कारभारी आंटोनिओ म्हणून होता, हे कोणासही माहीत नव्हते. तरी पेट्रसाय वाईट मनुष्यास आपला कारभारी करणार नाही अशी लोकांची खात्री होती. मनुष्यांची बरे वाईटांची प्रमाणे तीन प्रकारची आहेत. पहिल्या प्रतीचे मनुष्य आपण स्वतः बरे वाईट जाणतात, दुसऱ्या प्रकारचे मनुष्य दुसरा सांगेल तेव्हा बरे वाईट समजतात, व तिसऱ्या प्रकारचे मनुष्य स्वतः समजत नाहीत व दुसऱ्याने सांगितलेलेही समजत नाहीत. पहिले उत्तम दुसरे बरे व तिसरे अगदी निरुपयोगी होत. पेट्रसाय जरी पहिल्या प्रतीचा मनुष्य नसला, तरी दुसऱ्या प्रतीचा खचित होता व दुसऱ्या प्रतीचा असला, तरी लोक काय म्हणतात व त्यात बरे वाईट काय आहे, ते त्यास कळण्याचा मार्ग राहतो व बरे वाईट कळले म्हणजे त्याप्रमाणे त्यास वागता येते आणि इतके ज्ञान असले म्हणजे मग कारभारी व इतर लोक त्यास फसवू शकत नाहीत; परंतु चांगला प्रधान निवडणे असेल तर तर तो नीट ओळखण्यास एक नियम जरूर पाहिजे व तो नियम अगदी बिनचूक असा आहे की, 'जो मनुष्य स्वतःविषयीच नेहमी सावध असून ज्याची सर्व कृत्ये स्वहिताकडेच वळलेली दिसतात, तो मनुष्य चांगला प्रधान नव्हे' असे समजले पाहिजे. अशा मनुष्यावर भरवसा टाकणे धोक्याचे आहे. कारण जो राजाचा प्रधान असतो त्याने राजाचे हितच नेहमी पाहत असले पाहिजे व स्वतःच्या हिताचे विचार आड आणता नये, तसेच राजानेही त्यास काही विशेष रीतीनेच वागवले पाहिजे. त्यास मान दिला

पाहिजे, त्यास धन दिले पाहिजे, त्याची प्रतिष्ठा वाढेल असे केले पाहिजे. सारांश प्रधानास स्वतःच्या कल्याणाविषयी विचार करण्याची जरूरच राजाने पडू दिली नाही म्हणजे तो आपोआप आपले सर्व लक्ष राजाच्याच हिताकडे पोहोचवील. त्यास असे वाटेल की, राजास नाखुश ठेवले असता आपले बरे होणार नाही. म्हणून वर प्रमाणे उभय पक्षी राजा व प्रधान यांची वर्तणूक असली म्हणजे एकमेकांनी एकमेकांवर स्वस्थपणे भरवसा टाकण्यास हरकत नाही आणि जेव्हा हा मार्ग उभयपक्षी सोडून दिला जातो तेव्हा कोणाचा केव्हा नाश होईल याचे काहीच सांगता येणार नाही.

ooo

भाग-२३

खुशामती लोकांस दूर कसे ठेवावे याविषयी

राजांनी एक गोष्ट विशेष लक्षात ठेवण्याजोगी आहे; पण बहुतेक राजे हे विसरून जातात व त्यामुळे अनर्थही घडतात. ती ही की, प्रत्येक राजाची खुशामत करणारे लोक फार असल्यामुळे त्यांजविषयी त्याने सावध असले पाहिजे. मनुष्याला आपल्या कृत्यांची स्तुती केलेली आवडत असते. म्हणून खुशमस्करे जे काय अनर्थ घडवतील, ते टाळणे फारसे सोपे नाही व त्यांच्या म्हणण्याकडे राजा जर अगदीच दुर्लक्ष करू लागला, तर ते त्यास अगदी तुच्छ मानू लागतात. यास एक उत्तम उपाय असा आहे की, राजाने आपली सत्याची आवड लोकांत प्रगट केली पाहिजे. खरे सांगितले तरच आपला फायदा आहे, असे लोकांस पक्के ठाऊक असले म्हणजे मग ते खोटी खुशामत तरी करणार नाहीत. व खरे सांगण्यासही, पाहिजे त्यांस परवानगी देणे बरोबर नाही. म्हणून राजा शहाणा असेल तर त्याने तिसराच मार्ग स्वीकारला पाहिजे. म्हणजे आपल्याच राज्यापैकी काही चांगले लोक निवडून काढून ते त्याने आपल्याजवळ ठेवावे, तितक्यांशीच नेहमी जरूर तितके मोकळपणाने वागत असावे. तथापि राजाने नेहमी फार चौकस असले पाहिजे. लोक काय म्हणत असतात, ती बातमी काढून त्यांचेही म्हणणे ध्यानात घेऊन ठेवले पाहिजे व नंतर त्याने कोणतीही गोष्ट करणे ती करावी. लोकांचे म्हणणे ऐकताना त्यांस असे वाटू द्यावे की, ते जितके मोकळेपणाने सांगत जातील, तितके आपल्यास जास्त आवडेल, आपल्याशी बोलत असेल, त्याचेच काय ते आपण ऐकू व दुसऱ्याचे ऐकणार नाही, असे आपण नेहमी लोकांस भासवीत असावे. तरी कोणताही निश्चय पूर्ण विचार केल्याशिवाय आपण करीत नाही व एकदा निश्चय केला म्हणजे तो कधीही ढळणार नाही, असे पक्केपणी लोकांस ठाऊक असावे. अशा प्रकारे न वागेल तो खुशमस्कऱ्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून उतावळीने काम करीत जाईल किंवा पुष्कळ लोकांनी निरनिराळ्या तहेचे सांगितल्यामुळे त्याचा निश्चय बदलेल व एकदा निश्चय बदलला

म्हणजे राजा लोकांच्या मनातून उतरतो. याचे एक उदाहरण लखात ठेवण्यासारखे आहे ते असे

माक्सिमिलिअन बादशहाचा ल्युकस म्हणून एक नोकर होता. तो त्या बादशहाविषयी असे सांगत असे की, हा बादशहा कधीही कोणाची मसलत घेत नसे व स्वतःच्या मनास जे उत्तम असे वाटे, तसेही करीत नसे. याचे कारण उघड आहे की, तो वर लिहिलेल्या नियमास अनुसरला नाही. हा बादशहा फार खोल होता खरा. तो आपले मन सहसा दुसऱ्यास कळू देत नसे व दुसऱ्याचेही ऐकत नसे; परंतु त्याचा निश्चय एकदा लोकांत कळला व त्याप्रमाणे वागण्याची पाळी आली, की मग तो माघार घेत असे. म्हणून त्याने जे निश्चय आज केले, ते उद्या मोडले. कोणीही त्याजवर विश्वास टाकून राहणे कठीण होते व त्याच्या मनात काय आहे हेही कळणे मुश्किलच होते. यावरून असे दिसते की, राजाने दुसऱ्याचा सल्ला घेतलाच पाहिजे; परंतु तो घेणे तो आपल्यास वाटेल तेव्हा घ्यावा. दुसरा देतो म्हणून तो घेऊच नये. विचारल्याशिवाय जो सल्ला देण्यास येईल, त्याचा तिरस्कारच राजाने करावा. तथापि सल्ला विचारणे तो पुष्कळ प्रसंगी विचारावा. एकदा विचारला म्हणजे मग खरे काय असेल ते स्वस्थपणे ऐकून घ्यावे व राजास राग येईल म्हणून कोणी खऱ्याचे खोटे सांगू लागला तर त्याजबद्दल आपली नाखुशी एकदम प्रगट केली पाहिजे. काही लोक असे मानतात की, राजा जर शहाणा म्हणून लोकांत प्रसिद्ध असला, तर ते शहाणपण खरोखरी राजाचे नसता, त्याच्या जवळच्या लोकांचे होय; परंतु हा समज चुकीचा आहे. राजाच जर धर्त नसेल तर त्यास खऱ्या गोष्टी कधीही कळणार नाहीत. जर सर्व राज्यकारभारच फार सज्जन अशा काही निवडक गृहस्थांकडेच सोपवून राजा स्वस्थ बसला, तर मात्र गोष्ट निराळी. अशा प्रकारे राज्यकारभाराचा बोजा दुसऱ्यावर टाकण्याने काही दिवस राज्य चांगले चाललेसे वाटेल; परंतु फार दिवस टिकणार नाही. तसेच स्वतःच्या मतावरच राजाचा भरवसा नसला, तर दुसऱ्यांचे विचार घेऊन तरी काय उपयोग? लोकांस विचारले तरी सर्वांची मते सारखीच पडतील असा नियम नाही व निरनिराळी मते पडली, म्हणजे मग त्यांचे एकीकरण करणे फार कठीण आहे. प्रत्येक मनुष्याचे मत, काहीतरी निराळाच डाव मनात धरून दिलेले असते. तो डाव राजाने मनात ओळखून ठेवला म्हणजे मग त्या मताची किती किंमत आहे, ती सहज कळून येते. सारांश काय की, प्रामाणिक व चांगला उपदेश लोकांकडून मिळणे हे राजाच्या अंगी शहाणपण असेल तरच घडेल. लोकांच्या उपदेशाने राजाचे शहाणपण वाढते असे नाही.

○○○

भाग-२४

इटलीतील बहुतेक राजांची राज्ये कशी नाश पावली याविषयी

वर लिहिलेल्या सर्व गोष्टी ध्यानात धरून त्या प्रमाणे राजा चालेल, तर मग तो नवीन जरी असला तरी त्याच्या राज्यास बळकटी येऊन ते राज्य जुनेसेच दिसू लागते व ते इतके की, पिढीजाद चालत आलेली राज्ये तितकी सुरक्षित असत नाहीत. याचे कारण असे आहे की, नवीन राजाच्या प्रत्येक कृत्यावर लोक टीका करीत असतात म्हणून ती चांगली असल्याशिवाय लोक खुश राहणारच नाहीत व ती चांगलीशी लोकास वाटली म्हणजे त्यांचा राजावर एकदम चांगला भरवसा बसतो. सर्वांची चाल अशी आहे की, प्रस्तुत विषयासंबंधी मात्र ते विशेष पर्वा करीत असतात म्हणून त्यांची सद्यःस्थिती चांगली अशी त्यास वाटली म्हणजे मग राजा नवीन आहे किंवा जुना आहे, हे पाहण्यास ते बसत नाहीत व राज्यसंरक्षणाचेच प्रयत्न करण्यास ते लागतात. आता दुसराच काही दोष राजामध्ये असेल तर गोष्ट निराळी. वर प्रमाणे नवीन राज्य नीटपणे चालले, तर राजास दोहो प्रकारे फायदा होतो. एकतर राज्य नवीन मिळवल्याबद्दलचा आणि दुसरा थोड्या वेळात कायदे चांगले करून सैन्य बळकट केले, स्नेही संपादन केले, व चांगले उदाहरण लोकांस घालून दिले याबद्दलचा. तसेच उलटपक्षी राज्य वंशपरंपरागत चालत आले असून मूर्खपणाने अव्यवस्था करून घालवले असता, त्या राजाचे दुप्पट नुकसान मात्र होते. म्हणून नेपल्स, मिलन आणि दुसरी कित्येक इटलीतील राज्ये मोडली, ती सर्वांमध्ये एक दोष मुख्य होता, त्यामुळेच मोडली. सैन्याचे संबंधाने मागे जे आम्ही गुणदोष वर्णन केले आहेत, त्याकडे या राजाचे लक्ष पूर्णपणे पोहोचले नाही. काही राजे लोकांस आवडत नव्हते. इतरांस आपल्या सरदारांशी सांभाळून वागता येत नव्हते. कारण अंगी दोष नसतील, तर सैन्य व पैसा असताना राज्ये लयास का बरे जावी? मासिडोनचा फिलिप राजा (हा फिलिप अलेक्झांडरचा त्याजवर हल्ला करणाऱ्या ग्रीक व रोमन लोकांची तुलना केली असता, काहीच साम्य नव्हते,

असे म्हणावे लागते. असे असूनही त्याने सरदारांस व इतर खुश ठेवून कित्येक दिवसपर्यंत बिनधोक लढाई चालू ठेवली. शेवटी जरी काही शहरे त्याच्या ताब्यातून गेली, तरी त्याने राज्य गमावले नाही. म्हणून पुष्कळ दिवस चालत आलेली जर शेवटी मोडली, तर ती केवळ दैव फिरले म्हणूनच मोडली नाही, तर ती राजांच्या हयगयीमुळे व मूर्खपणामुळेच मोडली असे समजले पाहिजे. जेव्हा त्यांचे दिवस चांगले होते, तेव्हा आपल्या काय अडचणी येतील याचा त्यांनी बिलकूल विचार केला नाही. त्यांचे सर्व लक्ष राज्य संरक्षणाकडे नसता आलेला प्रसंग कसा टाळावा इकडे लागलेले असे व दुसऱ्याने जरी राज्य हिरावून घेतले तरी त्यांस असे वाटत असे की, नवीन राजास एकदा लोक म्हणजे आपल्यास फिरून बोलावतील, हाही एक प्रकारचा आहे. परंतु दुसरे उपाय नसतील तेव्हा याची मातबरी. दुसरे असताना त्याजवर अवलंबून राहणे बरोबर नाही. दुसरा मान वर काढील म्हणून आपण खाड्यात उडी टाकणे रास्त नाही.राजाच्या अंगीच जर सदगुण व शहाणपण नसेल, तर राज्यसंरक्षणासाठी दुसरे कितीही उपाय केले तरी ते व्यर्थ होत.

○○○

भाग-२५

ऐहिक विषयांसंबंधी दैवाची अनुकूलता कितपत पाहिजे याविषयी

पुष्कळ लोकांचे पूर्वापार असे म्हणणे आहे की, या जर सर्व गोष्टी दैवाधीन आहेत व त्यांत मनुष्याच्या शहाणपणानेसुद्धा कमी-जास्त करता येण्यासारखे नाही, यावरून मनुष्याने श्रम करण्याचे कारण नाही व कोणतीही गोष्ट पाहिजे तशी होवो त्याची पर्वा करावयाची नाही, असे ते प्रमाण बांधतात. हल्ली ज्या राज्यक्रांती वरचेवर होत आहेत व ज्यांची कल्पनासुद्धा करणे अशक्य आहे, त्यांच्या योगाने या वरील मतास बळकटी आली आहे व आम्हास सुद्धा एखादे प्रसंगी तसेच वाटते. तथापि आमचे असे नक्की म्हणणे आहे की, मानुषेच्छा अबाधित असल्यामुळे तिच्या प्रवत्तीस आडकाठी नाही. सारासार पाहिले तर जगातील अर्धी कत्ये दैवाधीन आहेत व अर्धी कृत्ये स्वेच्छापर आहेत. दैवाला एखाद्या मोठ्या नदीची उपमा देता येईल. नदी जशी अतिशय भरून जाते व प्रलय करून सोडते, तशी दैवाची गती आहे. नदीच्या योगाने सर्व मुलूख पाणीमय होऊन जातो, झाडेमाडे, घरेदारे उलथून पडतात. एक ठिकाणची माती दुसरीकडे जाऊन पडते व कोणासही काही सुचेनासे होऊन जाते; परंतु पाणी निघून गेल्यावर मग जे मनुष्य पूर्वी भीत असत, तेच तिची गती सुधारतात. बांध वगैरे घालतात, मजबुती करतात व त्यामुळे पुन्हा पूर आला तर नाशही कमी होतो. तशीच दैवाचीही गती आहे. जेव्हा पूर्वसंकल्पित गुण दैवास आड येत नाही, तेव्हाच काय तो त्याचा पगडा चालतो व पाहिजे तसा नाश होतो. इटलीचीच जर गोष्ट पाहिली, तर त्या ठिकाणी इतक्या राज्यक्रांत्या होण्याचे कारण तरी हेच. इटली अगदी एक मैदान आहे, संरक्षणार्थ किल्ले,तट, काही नाहीत व जर्मनी, स्पेन, फ्रान्स यांप्रमाणे लोकांच्या अंगी देशाचे संरक्षण करण्याचे धैर्यही नाही. इतकेच दैवासंबंधी येथे लिहिणे पुरे आहे, असे आम्हास वाटते. तरी आणखी थोडे जास्त लिहिणे अयोग्य होणार नाही. आपण असे पुष्कळ वेळा पाहतो की, आज एखादे राज्य सुरळीत चालून सुखी आहे व उद्या तेच लयास गेलेले

आहे. याचे कारण येथपर्यंत जे आम्ही या पुस्तकात सांगितले आहे, त्यातच आहे. जो राजा केवळ दैवावर भरवसा टाकून स्वस्थ बसतो, त्याचा नाश झाल्याशिवाय कसा राहील? आणखी असे आहे की, प्रसंगानुसार जो वर्तन बदलत जाईल, त्यास कधी माघार सोसावी लागत नाही व तसे वर्तन ज्यास ठेवता येत नाही, त्याचा नाश होतो. संपत्ती, कीर्ती वगैरे जी आपल्यास मिळावी अशी कित्येकांची इच्छा असते, ती मिळण्याची साधने तरी प्रत्येकाची निरनिराळीच दिसतात. काही लोक नीट विचार करून कोणतीही गोष्ट करू लागतात. काही ती एकदम उतावळीने करण्यास धावतात व कदाचित् दोघांचेही हेतू पूर्ण होतील. तसेच दोन मनुष्य सारखेच सावध असता, एकास जयप्राप्ती होते व दुसऱ्यास अपयश येते. दोन मनुष्य सारखेच सुखी आपण पाहतो. एक असतो शांत व विचारी व दुसरा असतो गडबड्या आणि उतावीळ आणि या सर्वांचे कारण त्या-त्या वेळेस त्या-त्या प्रकारचेच वर्तन पाहिजे, हे होय, दुसरे काही नाही. जसजसा वेळ बदलत जाईल, तसतशी आपली वागणूकही जो बदलेल, तो शहाणा ठरून त्यास कधी नुकसान लागत नाही; परंतु ज्याच्या अंगी समयानुसार वर्तण्याचे कसब नसते, त्याचे हेतू सिद्धीस न जाता त्यास फार संकटे प्राप्त होतील. तसेच जसा प्रसंग येईल, तशी आपली वर्तणूक फिरवणे हे सर्वांस साधत नाही. आपला वागणुकीचा एक मार्ग पूर्वापार ठरलेला असतो. तो सोडणे फार कठीण आहे. तसेच अमुक एका मार्गाने जाऊन जर आजपर्यंत एका मनुष्याचे कल्याण होत आले आहे, तर या पुढे त्याच मार्गाने चालल्यास त्याचे कल्याण होणार नाही अशी त्याची समज पाडणे दुरापास्त आहे. पोप ज्यूलियस हा सर्व गोष्टींमध्ये मोठा तडाक्याने वागत असे व त्या वेळची अशी स्थिती होती की, त्यास कधीही माघार आली नाही. बेंटिव्होली याच्या वेळी त्याने बलोनियावर स्वारी केली. व्हेनिशिअन लोक त्याच्या विरुद्ध होते. फ्रान्स आणि स्पेनचा तह असून दोघांचाही डोळा बलोनियावर होता; परंतु पोपाने स्वारी केली, ती इतक्या जोराने व सपाट्याने केली की, व्हेनिशिअन लोक भिऊन गप्प बसले व स्पॅनिश लोकही सर्व नेपल्स जिंकण्याच्या जोरावर बसले. व्हेनिशिअन लोकांची खोड मोडण्याची फ्रान्सची इच्छा असल्यामुळे फ्रेंच लोक सहजच पोपास येऊन मिळाले. पोपाने इतकी काही उतावळी केली की, जर दुसरा कोणी विचार करीत स्वस्थ बसता अथवा दुसरे कोणतेही खरे खोटे उपाय योजता, तर त्याचा हेतू साधला नसता. जिकडे तिकडे शांतता होण्याची वाट पाहत बसता, तर त्यास कधीही विजय मिळाला नसता. आणखी जे त्याने दुसरे पराक्रम केले, त्यांचे विशेष वर्णन येथे करण्याचे कारण नाही. ते सर्व मोठे असून सर्वांमध्ये यासच जय मिळत गेला. पुढे तो लवकरच मरण पावल्यामुळे त्यास कोणताही वाईट प्रसंग आला नाही. ज्या प्रसंगी फार वेळ विचार करूनच काय करणे ते केले पाहिजे, असे प्रसंग त्यास आलेच नाहीत व ते येते तर त्यास खचित वाईट दशा प्राप्त झाली असती. कारण विचार करून कोणतीही गोष्ट करण्याची त्यास सवयच नव्हती. म्हणून आमचे असे मत आहे की, जसजसे प्रसंग येतील, तसतसे वर्तन ठेवत गेल्याने

दैवावर हवाला टाकून बसण्याचे कारण नाही; परंतु जर का तसे न केले तर मरणाची पाळी येते. राजाची वृत्ती नेहमीच सावध व संशयी असण्यापेक्षा एकदम सपाट्याने कोणतीही गोष्ट करणे बरे, असे आम्हास वाटते. दैवाची गोष्ट एखाद्या बायकोसारखी आहे. बायकोला ताब्यात ठेवण्याकरिता तिच्याशी वर्तन जोराचे पाहिजे. तिच्याशी शांतपणा व विचार दाखवू लागले, तर कब्जात राहत नाही. तरुण पुरुष फारसा विचारी नसतो. म्हणून ज्याप्रमाणे तरुण पुरुषाचे ताब्यात बायको नरमपणाने वागते तसेच दैवाचेही आहे.

❍❍❍

भाग-२६

रानटी लोकांच्या हातून इटली देश सोडवण्याचे उपाय

येथपर्यंत जे सर्व सांगण्यात आले आहे, त्याचा नीट विचार करून हल्लीची इटलीची स्थिती कशी आहे व नवीन राज्य स्थापित करता येईल किंवा नाही या प्रश्नासंबंधाने आमचे असे म्हणणे आहे की, नवीन राज्य स्थापनेस हल्लीची संधी जितकी उपयोगी आहे, इतका दुसरा चांगला समय मिळणे कठीण आहे. राजाचे व प्रजेचे दोहोंचेही कल्याण होण्याची संधी आली आहे. इजिप्त देशांत इझरलाइट लोक कैदेत होते म्हणूनच मोझेस यास आपले शौर्य पुढे गाजवता आले. पर्शियन लोकांवर मीडीसने फार जुलूम केला म्हणूनच सायरस राजाचे औदार्य बाहेर आले. अथिनिअन लोक हद्दपार होऊन चारही दिशेस फाकले, म्हणूनच थिसियसचा चांगुलपणा लोकांस दिसून आला असे जर आहे, तर सर्व इटलीचा खरा पराक्रम दिसून येण्याकरिताच ही संधी ईश्वराने घडवून आणली नसेल हे कशावरून? इटलीची हल्लीची स्थिती तरी काही विलक्षणच आहे. वर जे इझरलाइट लोक सांगितले, त्यांजपेक्षा हल्लीच्या पर्शियन लोकांकडून यांच्यावर जास्त जुलूम होत आहे आणि अथिनिअन लोकांपेक्षा हे फारच पसरले गेले आहेत. कोणी यजमान नाही, काही व्यवस्था नाही, पाहिजे त्याने यावे, हल्ला करावा, लुटावे, मारावे, अशी पाहिजे ती अरिष्टे यावी. पूर्वी काही शहाणे लोक होऊन गेले व त्यांच्या शहाणपणावरून त्यांस हा देश तारण्याकरिताच ईश्वराने पाठवले आहे. असेही कित्येकास वाटले असेल. तथापि ते लोक अगदी पराक्रमाच्या शिखरावरच असता खाली पडले. दैवाचे बळ त्यांस नव्हते. इटालियन लोक जसे काय मृतप्राय होऊन पडले व अशा प्रकारची अरिष्टे कोण नाहीशी करील ती करो, असे शेवटी होऊन गेले. लांबर्डीमध्ये पाहिजे तशी लूट व नाशधूळ चालू होती. नेपल्स आणि टस्कनी येथे पाहिजे तसे कर व जुलूम सुरू होते. अशी हवी ती अंदाधुंदी सुरू होती आणि हल्ली तरी रानटी लोकांच्या हातून आपल्यास सोडवण्यास ईश्वराने कोणी तरी पाठवावा अशी इटली देशाची त्याजपाशी प्रार्थना

आहे, यात संशय नाही. कोणी जरी पुढारी झाला, तरी सर्व लोक त्यास एकदम मिळतील अशी संधी आली आहे व ही संधी साधून इटलीला मुक्त करण्याविषयी समर्थ असा आज तुमच्या (लारेन्झो ज्यास हे पुस्तक आरंभीच कर्त्याने समर्पण केले आहे) शिवाय दुसरा कोण बरे आहे? तुम्ही धैर्यवान आहा, ईश्वर तुम्हांस अनुकूल आहे, धर्माचेही साह्य आहे व शेवटी यात तुमचेच कल्याण आहे व वर जी इतका वेळ उदाहरणे वगैरे देऊन विषय परिस्फुटता करण्यात आली आहे, ती सर्व नीट ध्यानात ठेवली म्हणजे आपल्यास काही अशक्य आहे असे नाही. आजपर्यंतच्या लोकांस तुमच्या सारखी संधी आली असे झाले नाही व त्यांनी कशीही अचाट कृत्ये केली, तरी ते मनुष्यच होते. ईश्वराचे साह्य त्यांना जास्त होते व तुम्हास कमी होईल, असे बिलकुल नाही. शिवाय तुम्हास जी गोष्ट कर्तव्य आहे, ती केवळ न्यायमार्गास अनुसरूनच आहे. सर्व लोकांची इच्छा त्रासापासून मुक्त होण्याची आहे म्हणून तुमच्याविरुद्ध फारसे काही दिसत नाही. ईश्वर म्हणजे तरी आपोआप येऊन तुम्हास साह्य करील असे नाही. तुमची इच्छा त्याने अबाधित ठेवून, तुम्हास आपले नाव गाजवण्यास त्याने मोकळेच ठेवले आहे. आजपर्यंत जी गोष्ट कोणी केली नाही, तीच तुम्हांस करण्यास सांगणे म्हणजे विशेष आश्चर्य आहे असे नाही. आजपर्यंत इतक्या राज्यक्रांत्या होऊन लढाई, लूट, दाणादाण असे प्रकार घडले याचे कारण पूर्वी सैन्यामध्ये व्यवस्था नव्हती व ती कशी लावावी हेही कोणास चांगले समजत नव्हते. लोकहितासाठी चांगले नवीन कायदे करून सर्वास सुखावह असे नवीन नवीन हुकूम सोडल्याने राजास जितका मान लोकांकडून मिळतो तितका दुसऱ्या कोणत्याही कृत्यापासून मिळत नाही व इटलीमध्ये नवीन कायदे वगैरे केले, तर ते सर्वास ग्राह्यच होतील. सैन्य व सैन्यातील अधिकारी हे दोघेही हल्ली मोठे धीट व शूर आहेत. कुस्त्या खेळ वगैरे होतात, त्यावेळी इटालियन लोकांसारख्या युक्त्या आणि कसब इतरांच्या ठायी दिसत नव्हते. असे असून लढाईमध्ये त्यांचा पराभव होई, याचे कारण पूर्वी सैन्यातील अंमलदार हुशार नव्हते. जो तो आपण हुशार असे मानत असे व असे एकदा मनुष्य मानू लागला म्हणजे मग तो कोणाचेच ऐकणार नाही. याच कारणामुळे आजपर्यंत इटालियन सैन्याचा पराभव होत असे. याजकरिता ज्यांनी ज्यांनी म्हणून आजपर्यंत आपल्या देशास दास्यत्वातून सोडवून लौकिक मिळवला त्यांची उदाहरणे ध्यानात धरून जर तुम्हास चालणे असेल, तर प्रथम तुम्ही सर्व सैन्य आपल्याच लोकांचे बनवले पाहिजे. तुमच्या लोकांसारखे प्रामाणिक व शूर असे दुसरे लोक नाहीत व राजानेच आधिपत्य स्वीकारल्यावर त्यांस लढाईत हुरूप येऊन जय मिळाल्याशिवाय खचित राहणार नाही. याकरिता आपले सैन्य नीट व्यवस्थित करण्याची तुम्हास फार जरूर आहे. स्वीस व स्पेन लोकांचा सर्वांस दरारा वाटतो; परंतु त्यांच्यातही दोष आहेतच. म्हणून आपण त्यांच्याहीपेक्षा उत्तम सैन्य बनवले पाहिजे. स्पेन लोकांस घोडे स्वारांबरोबर टिकाव धरवत नाही व स्वीस लोकांस सामनेवाले चांगले भेटले म्हणजे मग त्यांचे काही एक चालत नाही. फ्रेंच घोडेस्वार निकराने लढू लागले

म्हणजे त्यांच्यापुढे स्पेनच्या पायदळाचा टिकाव लागत नाही, हे तर प्रसिद्धच आहे आणि स्पेनच्या पायदळाने स्वीस लोकांचा पराभव केला, हेही विदित आहेच. जर्मनी यांची कशी झटापट झाली ते प्रसिद्धच आहे. म्हणून या दोन्ही सैन्यांतील दोष आपल्यास समजले म्हणजे तेवढेच काढून टाकून त्यांच्यासारखे तिसरेच एक सैन्य तयार करणे फारसे कठीण नाही व दोष काढून टाकणे म्हणजे सैन्यातील कवाईत सुधारणे या पलिकडे काही नाही व ज्या गोष्टींमध्ये थोडक्यातच नवीन सुधारा केला असता, राजा चांगला म्हणून प्रसिद्धीस येतो, त्यापैकीच ही एक गोष्ट आहे. ही संधी फुकट न घालवता इटलीचे दैव तुम्ही उदयास आणावे व जो कोणी असा मनुष्य या देशाची सुटका करील, त्याजबद्दल सर्व देशभर लोकांस किती आनंद होईल, ते किती उतावीळ होतील, ते कसे प्रामाणिक राहतील व ते अशा पुरुषांशी किती ममतेने वागतील, याची कल्पनाच करणे अशक्य आहे. अशा पुरुषास आत येऊ देणार नाहीत, त्याची आज्ञा पाळणार नाहीत, त्याचा हेवा करून त्यास त्रास देतील, खरे इटालियन असून त्यास साह्य करणार नाहीत असे लोकच नाहीत. हल्लीची रानटी स्थिती भयंकर वाटत नाही, असा एकही मनुष्य नाही. न्यायाच्या मार्गाने हे केवळ आपले कर्तव्यच आहे असे समजून हे कृत्य आपणच हाती घ्यावे, अशी आमची आपल्यास सविनय विनंती आहे व हा इटली देश भाग्यास चढून पेट्रार्क याने जे

'न्यायाचि अन्यायासी करण्या संग्राम सज्ज होईल ।।
जागृत रोम पराक्रम आहे हे सर्व लोक पाहील ।।'

हे भविष्य करून ठेवले होते, ते आपल्या हातून तडीस जावो.

○○○

.

इंग्लंडातील राज्यकारभार व्यवस्थेच्या इतिहासाची मूलतत्त्वे

लेखक
शिवराम गोविंद फाळके

अनुक्रमणिका

भाग १ ला

इंग्लंडच्या राज्यकारभारव्यवस्थेच्या इतिहासाचा प्रारंभ, इ.स. ४५० ते इ.स.८०२

उपोद्धात - जर्मनी देशातील पूर्वीच्या संस्था, जर्मन लोकांचे वर्ग, जर्मन जातीतील राज्यकारभारव्यवस्था, ब्रिटन जिंकून घेतल्यामुळे झालेले परिणाम-जमिनीची वाटणी, समाजातील वर्गांचा एकमेकांशी संबंध, राजसत्तेचा प्रारंभ, इंग्लिश लोकांचे धर्मांतर, सुधारलेल्या देशांशी घडून आलेला संयोग, राष्ट्रीय ऐक्याची वाढ, धर्मोपदेशकांचे वजन, अँगल आणि सॅक्सन राज्यांची पक्क्या पायावर रचना....२२९ ते २३५

भाग २ रा

अँग्लो-सॅक्सन राज्याची राज्यकारभार व्यवस्था

उपोद्धात - स्थानिक संस्था-ग्राम संस्था, हंड्रेड, वार्ड किंवा वापोनटेक, शायर, राष्ट्रीय शासनपद्धती, राजा व त्याची निवड, राजाचे अधिकार, अँग्लो सॅक्सन राजाच्या सत्तेची परिसीमा, विटेनागेमोद, विटेनागेमोट सभेची उत्पत्ती, विटेनागेमोट सभेची रचना, विटेनागेमोट सभेचे अधिकार, समाप्ती....२३६ ते २४३

भाग ३ रा

वेसेक्स राज्याच्या वर्चस्वाच्या प्रारंभापासून तो

इंग्लंड नॉर्मन लोकांनी जिंकून घेईतो पर्यंत इ.स. ८०२-१०६६

उपोद्धात - फ्यूडॅलिझम म्हणजे काय, फ्यूडॅलिझमची वाढ ही केव्हा व कोठे झाली, वेनिफीस देणे, कॉमेन्डेशन, अँग्लोसॅक्सन राज्याचा फ्यूडॅलिझमकडे कल, राजा, बडेलोक, कुलीन बडेलोक, राजसेवक बडेलोक, संपन्न बडेलोक, अँग्लोसॅक्सन बडेलोक हे सर्वस्वी

फ्यूडल पद्धतीचे नव्हते, स्वतंत्र लोक, राजकीय हक्क, लष्करी चाकरी, जातस्वातंत्र्य, धर्मसंस्था, साधारण अनुमाने ....२४४ ते २५०

भाग ४ था

नॉर्मन राजे, इ.स. १०६६-११५४

उपोद्धात - नॉर्मन लोकांनी इंग्लंड जिंकून घेतल्यामुळे फ्यूडॅलिझम या संस्थेची वृद्धी कशी झाली, नॉर्मन विजयाने फ्यूडॅलिझम या पद्धतीचा अवरोध कसा झाला, ग्रामसंस्था, केंद्रस्थ राज्यव्यवस्था, बलिष्ठ केंद्रस्थ राज्यव्यवस्थेची आवश्यकता, नॉर्मनराजे बलिष्ठ केंद्रस्थ राज्य व्यवस्थापन करण्यात कसे यशस्वी झाले, राजा, महामंत्रिमंडळ, राजकीय कारभार, राज्यातील मोठमोठाले अधिकारी, जस्टिशिअर, चॅन्सेलर, ट्रेझरर, राजाने नेमलेल्या अधिकाऱ्यांची कामे, नॉर्मन राजांचा वसूल,डूम्सडे बुक, राजपदाबरोबर चालत असणारी इनामी जमीन, फ्यूडल पद्धतीतील बाबींपासून होणारे उत्पन्न, डेनगेल्ट, शायरावरील फर्म, राजाचे न्यायसभेचे उत्पन्न, नॉर्मन राजांचे वेळची न्यायदानपद्धती, राजन्यायसभा, राजाचे मुखत्यारांची फेरणी, नॉर्मन लोकांची लष्करी पद्धती, स्थानिक संस्था, ग्रामसंस्था, हंड्रेड, शायर, शेरीफ, वसुलाची कामे, न्यायाची कामे, लढाईची कामे, गावे, राजसत्ता व धर्मसत्ता यांचा परस्परसंबंध, जनसमाजाचे वर्गीकरण ...२५१ ते २६७

भाग ५ वा.

दुसरा हेन्री व त्याचे मुलगे, इ.स. ११५४-१२१६.

उपोद्धात - दुसऱ्या हेन्रीचे राज्यारोहण - (१) दुसऱ्या हेन्रीची बड्या लोकांचे संबंधी राजनीती - स्कूटेज या कराची सुरुवात - (२) दुसऱ्या हेन्रीची धर्मसंस्थासंबंधी राजनीती - अपराधी धर्मोपदेशकांवरील सत्तेविषयी तंटा-क्लॅरेंडन येथील कलम बंदी, इ.स. ११६४, (३) दुसऱ्या हेनरीची साधारण लोकांसबंधी राजनीती, (४) दुसऱ्या हेन्रीची वसुलासंबंधी राजनीती, (५) दुसऱ्या हेन्रीची न्यायपद्धतीविषयीची राजनीती, (१) क्युरिआ रेजिस न्यायसभेसंबंधी सुधारते धोरण, (२) फेरणीच्या व्यवस्थेविषयी सुधारणा (३) पंचांच्या मदतीने न्याय देण्याच्या कामाविषयी सुधारते धोरण, (६) दुसऱ्या हेन्रीची लष्करीपद्धतीविषयी राजनीती - दुसऱ्या हेन्रीच्या कारकीर्दीपासून झालेले परिणाम- पहिल्या रिचर्डाची कारकीर्द - जॉन राजाची कारकीर्द - फ्रान्स देशातील परगणे गेल्यामुळे झालेले परिणाम-धर्मखात्याशी झालेल्या भांडणाचा परिणाम जॉन राजाचे बॅरन लोकांशी भांडण - स्वातंत्र्याची मोठी सनद, १२१५ - (१) धर्मखाते, (२) मुख्यकुळे, (३) मोठमोठी शहरे व गावे यांचे हक्क, (४) न्यायपद्धती, (५) जंगलखाते, (६) किरकोळ - या मोठ्या स्वातंत्र्याच्या सनदेसंबंधाने सुचलेले विचार- जॉन राजाचा मृत्यू. २६८-२८५

भाग ६ वा.

तिसरा हेन्री व पहिला एडवर्ड, इ.स. १२१६-१३०७

उपोद्धात : तिसऱ्या हेन्रीच्या कारकीर्दीचा पूर्वभाग-तिसऱ्या हेन्रीचा बदअंमल-सुटी देणे हेन्रीला भाग पडले-प्रोव्हिजन्स ऑफ ऑक्सफर्ड, सन १२५८- प्रोव्हिजन्स ऑफ वेस्ट मिनिस्टर, १२५९ - असंतोष तसाच चालू राहिला - फ्रान्सच्या राजाची मध्यस्थी-बॅरन लोकांचे युद्ध व डिमॉन्टफर्ड यांचे पार्लमेंट-पहिल्या एडवर्डाचे राज्यारोहण-पहिल्या एडवर्डाची राज्यकारभारपद्धती - (१) पहिल्या एडवर्डाची बड्या लोकांसंबंधी राजनीती, (२) पहिल्या एडवर्डाची धर्मसंस्थांसंबंधी राजनीती, (३) सामान्य जनसमूहाशी पहिल्या एडवर्डाची राजनीती, (४) पहिल्या एडवर्डाची वसुलासंबंधी राजनीती, (५) न्यायासंबंधी पहिल्या एडवर्डाची राजनीती, (६) लष्करासंबंधी पहिल्या एडवर्डाची राजनीती- अनुभवादाखल पार्लमेंट - सन १२९५ तील नमुनेदार पार्लमेंटसनदांची बहाली.....२८६ ते २९९

भाग ७ वा.

प्लॅन्टॅजेनेट घराण्यातील शेवटचे राजे, इ.स. १३०७-१४८५

उपोद्धात : मध्ययुगातील इंग्लिश पार्लमेन्ट सभेची लक्षणे - राष्ट्रातील लोकांचे वर्ग - मध्ययुगातील पार्लमेन्ट म्हणजे वेगवेगळ्या वर्गाचे पार्लमेन्ट होय - मध्ययुगातील पार्लमेन्ट म्हणजे स्थानिक समाईक संस्थांचे पार्लमेन्ट होय-मध्ययुगातील पार्लमेन्ट सभेची व्याख्या-इंग्लंडमधील जनसमूहाच्या तीन वर्गांची रचना- (१) धर्मोपदेशकांचा वर्ग, (२) ऐहिक बड्यालोकांचा वर्ग, (३) लोकांच्या वर्गांच्या प्रतिनिधींचा वर्ग - हे असे का होते याची कारणे-कॉमन्स वर्गांत ज्या लोकांचा समावेश होत नाही ते लोक-लोकांच्या प्रतिनिधींची वाटणी-पार्लमेन्ट सभेस प्रतिनिधी निवडून पाठविण्याच्या कामी कोणास योग्यता होती-पार्लमेन्ट सभेस प्रतिनिधी होऊन जाण्यास कोण इसम योग्य असत- प्रतिनिधी निवडण्याविषयीचे स्वातंत्र्य-प्रतिनिधानाच्या हक्काची किंमत फार थोडी मानण्यात येत असे-पार्लमेन्ट सभेत बसण्याची किंमत फार थोडी वाटत असेपार्लमेन्ट सभेच्या बैठकीची मुदत- पार्लमेन्ट सभेच्या सत्तेची वाढ - (१) कर बसविण्यावर पार्लमेन्टचा ताबा, (२) पार्लमेन्ट सभेचा कायदे करण्याच्या कामात वाटा, (३) प्रधानांची पार्लमेन्ट सभेला जोखीमदारी- या वेळची राज्याधिकाराची स्थिती - या वेळची धर्मखात्याची स्थिती- या वेळची बड्या लोकांची स्थिती-या वेळची लोकप्रतिनिधींची स्थिती-शेतकऱ्यांचे बंड व गुलामगिरीचा लय लोकांच्या स्थितीमधील कमी-जास्तीपणाची वाढ. .....३०० ते ३१८

भाग ८ वा.

ट्यूडर घराण्यातील राजे, इ.स. १४८५-१६०३.

उपोद्धात : ट्यूडर घराण्यातील राजांचा व त्यांच्या पार्लमेन्टचा संबंध - ट्यूडर घराण्यातील राजे राज्य करीत असता कर बसविण्याच्या कामावर पार्लमेन्ट सभेचा दाब-जप्त्या-ट्यूडर घराण्यातील राजे राज्य करीत असता कायदे करण्याच्या कामावर पार्लमेन्ट सभेचा दाब-ट्यूडर घराणे राज्य करीत असता पार्लमन्ट सभेच्या संबंधाने प्रधानांची जबाबदारी-ट्यूडर घराणे राज्य करीत असता हुकमतीचे शासन कोणाकडे होते-प्रिव्हिकौन्सिलचे न्यायसभा या नात्याने काम प्रिव्हिकौन्सिल हे न्यायसभा या नात्याने इतके सोईस्कर कसे झाले- स्थानिक वहिवाट-कौंटीपॅरिश-गावे-धर्मसंस्थांचे नियमन-राजाचे वर्चस्व अमलात आणण्यासाठी आठव्या हेनरीने योजिलेले उपाय-सहाव्या एडवर्डाने धर्मसंबंधी जास्ती केलेल्या सुधारणा-मेरीच्या कारकीर्दीतील प्रतिक्रियाधर्माची सुधारणा पूर्णपणे सिद्धीस नेण्याकरिता एलिजाबेथने योजिलेले उपाय-धर्मसंस्थांवरील राज्यकर्त्यांचे श्रेष्ठत्वासंबंधी कायदा, सन १५५९ (ॲक्ट ऑफ सुप्रीमसी) - भजनपद्धतीच्या एकसारखेपणाविषयीचा कायदा, सन १५५९ (ॲक्ट ऑफ युनिफॉर्मिटी), प्युरिटन लोकांचा उदय-हाय कमिशन या नावाची न्यायसभा-ट्यूडर घराण्याची अखेर- बडे लोक- धर्मोपदेशकलोकप्रतिनिधी.....३१९ ते ३३९

भाग ९ वा.

पहिला जेम्स, पहिला चार्लस आणि लोकसत्तात्मक राज्य, इ.स. १६०३-१६६०

उपोद्धात : पहिल्या जेम्सचा स्वभाव व कारकीर्द- पहिल्या जेम्सची कारकीर्दीत राज्यकारभारव्यवस्थेत झालेली प्रगती - (१) कर, (२) कायदेकानून, (३) मंत्र्यांची जबाबदारीन्यायपद्धती-धर्मसंस्था-पहिल्या चार्लस राजाचा स्वभाव व त्याच्या कारकीर्दीची पहिली वर्षेपहिल्या चार्लस राजाचा स्वतंत्र राज्यकारभार, सन १६२९-१६४० कर बसविणे-गलबतांवरील कर- पैसे वसूल करण्याच्या दुसऱ्या युक्त्या-डिस्ट्रेट ऑफ नाईटहुड-शिकारीच्या रानांचा विस्तारमक्ते-जबर दंड- न्यायदानपद्धती- धर्माची स्थिती-स्कॉटलंडमधील लोकांचे बंड व शॉर्ट पार्लमेन्टलाँग पार्लमेंट - (१) सुधारणेच्या संबंधाने एकवाक्यतेचा काळ, (२) ज्या दुहीमुळे अखेरीस देशातले देशात लढाई सुरू झाली तो काळ-राज्य कारभारासंबंधी मतभेद-धर्मसंबंधी मतभेद, (३) लाँग पार्लमेन्टची व राजाची लढाई-सैन्य व रंप-ऑलिव्हर क्रॉम-वेल याची कारकीर्द-लिटल पार्लमेन्ट - धी इन्स्टुमेंट ऑफ गर्व्हमेन्ट (राज्यकारभार व्यवस्थेचे अखत्यारपत्र), संरक्षकाच्या कारकीर्दीत भरलेली पार्लमेन्ट - पुनःस्थापना.....३४० ते ३६१

भाग १० वा.

दुसरा चार्लस, दुसरा जेम्स, राज्यक्रांती आणि तिसरा विल्यम, सन १६६०-१७०२

उपोद्धात : कन्व्हेन्शन पार्लमेन्ट-शिपाईगिरीसाठी दिलेल्या जमिनीची महकुबी-हायचर्चाची उलट सरशी, (१) ॲक्ट ऑफ युनिफॉर्मिटी, (२) धी कॉर्पोरेशन ॲक्ट, (३) कॉन्व्हेन्टिकल ॲक्ट, सन १६६४, (४) फाईव्ह माईल ॲक्ट, सन १६६५- राजपक्षीय लोकांची उलटराजभक्तीचा हास-कॅबॉल आणि डिक्लेरेशन ऑफ इन्डल्जन्स- सन १६७३ मधील टेस्ट ॲक्ट - डॅन्बीवरील दोषारोप- पोपच्या अनुयायांनी केलेला गुप्त बेत - धी पार्लमेन्टरी टेस्ट, सन १६७८- व्हिग आणि टोरी - धी एक्सक्ल्युझन बिल - हॅबिअस कार्पस ॲक्ट, सन १६७९एक्सक्ल्युझन बिन पुनः पार्लमेन्ट सभेपुढे आणिले जाते- लोकांची देशामध्ये पुनः उलट - सनदांचे काढून घेणे - दुसऱ्या जेम्स राजाचे राज्यारोहण- राजा चर्च ऑफ इंग्लंडवर गदा आणितो- डिक्लेरेशन ऑफ इन्डलजन्स- सन १६८८ तील बंड - डिक्लेरेशन ऑफ राईटस् आणि बिल ऑफ राईटस् - बिल ऑफ राईटस्चे महत्त्व-भरण्याचा विनियोग-बंडाचा कायदा - (१) भरण्याचा विनियोग. (२) बंडाचा कायदा-टॉलरेशन ॲक्ट, सन १६८९-मद्रण स्वातंत्र्यट्रायेनिअल ॲक्ट- राजघातासंबंधी चाललेल्या खटल्यांच्या चौकशीचे रीतीत सुधारणा-ॲक्ट ऑफ सेटलमेन्ट (व्यवस्थापनाचा कायदा), सन १७०१- (१) गादीवरील इसम हा इंग्लंडमधील धर्मसंस्थेचा अनुयायी असला पाहिजे, (२) प्रिव्हिकौन्सिलचे पुनरुज्जीवन करण्याचा यत्न, (३) हौस ऑफ कॉमन्समधून अधिकारी व बैठा पगार खाणाऱ्या लोकांचे वर्जन - न्यायाधीशांचे स्वातंत्र्य-उपसंहार-तिसऱ्या विल्यमचे जातवजन.....३६२ ते ३८४

भाग ११ वा.

ॲन, पहिला जॉर्ज आणि दुसरा जॉर्ज,

इ.स. १७०२-१७६०

उपोद्धात : ॲन राणीची कारकीर्द - इंग्लंड व स्कॉटलंड या देशातील पार्लमेन्ट सभांचे एकीकरण - (१) या एकीकरणासंबंधाने व्यर्थ गेलेले यत्न, (२) इंग्लंड व स्कॉटलंड या दोन्ही देशांतील पार्लमेन्ट सभा एकत्र करण्याविषयींचा कायदा, सन १७०७-हायचर्च पंथाची उलट सरशी - हॅनोव्हर घराण्यातील राजास गादी मिळणे- व्हिग पक्षाची सरशी - व्हिग पक्षाने केलेली कायद्यांची रचणूक-सेप्टोनिअल ॲक्ट-बड्या लोकांसंबंधी कायद्याचा खर्डा कॅबिनेटची प्रगतीएक पक्षामार्फत चालणारा राज्यकारभार - कॅबिनेटचे दोन प्रकार - कॅबिनेटचे पूर्वस्वरूपमळच्या स्वरूपात कॅबिनेट असता तिची अप्रियता- कॅबिनेट कौन्सिलची पनः पनः झालेली वाढकॅबिनेटचे अलीकडील स्वरूप-मुख्य प्रधान (१) अंमलदारीच्या खात्यांवर ताबा चालविणारा या नात्याने मुख्यप्रधान, (२) राजा व मंत्रिमंडळ यामध्ये चालणाऱ्या व्यवहारांचे साधन या नात्याने मुख्यप्रधान, (३) पार्लमेन्ट सभा व कॅबिनेट सभा यांच्यामध्ये

चालणाऱ्या व्यवहाराचे साधन या नात्याने मुख्यप्रधान- मुख्यप्रधानाचे कॅबिनेटच्या निरनिराळ्या सभासदांशी असणारे नातेकॅबिनेट सभेची विचारपद्धती कॅबिनेट पद्धतीच्या कामकाजाची तहा-कॅबिनेट पद्धतीनुसार मंत्रिजनांवरील जबाबदारी-कॅबिनेट पद्धतीची अखेरची अंमलवारी-कॅबिनेट पद्धतीविरुद्ध चळवळराजदरबारच्या श्रेष्ठ अधिकारातील फेरफार....३८५ ते ४००

भाग १२ वा.

तिसरा जॉर्ज, इ.स. १७६०-१८२०

उपोद्धात : तिसऱ्या जॉर्जचे राज्यारोहण -व्हिग पक्षाचा पाडाव- राजाचे मित्र- कॅबिनेट पद्धतीवर हल्ला-कॉमन्ससभा व राजाचे वजन - (१) कॅबिनेट पद्धत ही तेव्हाही नवीन होती - (२) सर्वसाधारण जनसमूहाची उदासीनता, (३) पार्लमेन्ट सभेचा लाचखाऊपणा, (४) पार्लमेन्टच्या लोकनियुक्ततेसंबंधींची स्थिती-जॉन बिल्किसचा खटला-पार्लमेन्ट सभेतील वादविवादाचे प्रकाशन फॉक्सचा बेअब्रुसंबंधी कायदा, १७९२- अमेरिकेतील युद्ध - राजा व त्याचे मंत्रीजन यांमध्ये पुनः उपस्थित झालेले तंटे - राजाचा कॉमन्ससभेशी विरोध-राजाच्या कारकीर्दीच्या उत्तर भागातील राजाचे वजन-पार्लमेन्टच्या सुधारणेबद्दलची प्रबलतर होत चाललेली मागणी - धार्मिक स्वातंत्र्याची प्रगती-ग्रेटब्रिटन व आयर्लंड यांच्या पार्लमेन्टांचे एकीकरण - लोकसत्तात्मक कल्पनांची वाढ - (१) अठराव्या शतकातील प्रमुख फ्रेंच लेखकांचे वजन, (२) संयुक्त संस्थानांची स्थापना, (३) फ्रेंच राज्यक्रांतीचा उद्भव, (४) औद्योगिक क्रांती....४०१ ते ४१८

भाग १३ वा.

चवथा जॉर्ज, चवथा विल्यम आणि व्हिक्टोरिआ, इ.स. १८२०-१९०१

उपोद्धात : (१) धार्मिक समतेची वाढ- सॅनमेंटल टेस्ट काढून टाकणे, १८२८ - कॅथोलिक मंडळीस नालायक ठरविणाऱ्या गोष्टींच्या दुरीकरणाचा कायदा, १८२९- क्वेकर, मोरे-व्हिअन व सेपॅरेटिस्टपंथी यांचा पार्लमेन्ट सभेत प्रवेश वगैरे- यहुदी मंडळींचा पार्लमेन्ट सभेत शिरकाव इत्यादी-विश्वविद्यालयातून नॉन कन्फॉर्मिस्टपंथी यास घेण्याची मोकळीकप्रार्थनालयासंबंधांत जबरीने द्यावे लागणारे कर कमी करण्यात आले, १८६८ - आयरिश चर्चाची नेमणूक व कारखाना कमी करण्यात येतो, १८६९-कॅथोलिक व नॉनकन्फॉर्मिस्टपंथी यांची लग्ने व दफने-न्याय कचेऱ्यांतून पुरावा घेणे, (२) पार्लमेन्टची सुधारणा - (१) जागांची वाटणी, (२) मतदारांची योग्यता - कौंटीतील मत देण्याची योग्यता-बरोमधील मत देण्याची योग्यता-निवडणुकीच्या व्यंगांचे परिणाम-पार्लमेन्ट सभेची सुधारणा घडवून आणणारी प्रवर्तक कारणे - सन १८३२ चा सुधारणेचा कायदा - सन १८३२ च्या

सुधारणेच्या कायद्याची कलमे - सन १८३२ च्या सुधारणेच्या कायद्याचे परिणाम - (१) राजाच्या व जमीनदारांच्या महत्त्वाचा हास, (२) कॉमन्ससभा व लार्डसभा यांच्यामधील मतविरोध, (३) सुधारलेल्या पार्लमेंटचा नेमस्तपणा-सन १८६७ च्या सुधारणेच्या कायद्यास घडवून आणणारी कारणे - सन १८६७ चा लोकनियुक्ततेचा कायदा-सन १८८४ चा लोकनियुक्ततेचा कायदा व १८८५ चा जागांच्या पुनः वाटणीचा कायदा - लोकनियुक्तेचा कायदा १८८४ - जागांच्या पनः वाटणीचा कायदा. सन १८८५ - निवडणकीच्या वेळी चाल असलेल्या लाचखाऊपणाचे कमी मान-निवडणुकीच्या वेळचे अयोग्य वजन-बॅलट ॲक्ट, १८७२-पार्लमेन्ट सभेच्या सभासदांची भ्रष्टता- कॉमन्ससभा व लोकमत - पक्षरचना - विशिष्ट राजकीय उद्देश सिद्धीस नेण्यासाठी उत्पन्न झालेल्या संस्था - कॅबिनेट राज्यकारभाराची उन्नती आणि अंमलबजावणी खात्यातील फेरफार-कॅबिनेट आणि कायदे करणे-कॅबिनेटची अंतर्बंधने-अंमलदारीची खाती-सेक्रेटरी ऑफ स्टेट-अरमार खात्याचा मुख्याधिकारी-व्यापारी मंडळाचा अध्यक्ष-स्थानिक राजव्यवस्था पाहणाऱ्या मंडळाचा अध्यक्ष-कौन्सिलचा उपाध्यक्ष-इतर अंमलदारीची खाती-खात्यांच्या वाढीचा कॅबिनेटवर झालेला परिणाम-स्थानिक कारभाराची सुधारणा-पॅरिस-कायदेशीर रीतीने व्यक्तीविषयक हक्क संपादन केलेली शहरे -कौंटी - सन १८३४ चा पुअर लॉ दुरुस्तीचा कायदा- सन १८३५ चा म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट-सार्वजनिक आरोग्यासंबंधी कायदे, १८४८ - १८७५ - स्थानिक राज्यव्यवस्थेचा कायदा, १८८८- स्थानिक राज्यव्यवस्थेचा कायदा, १८९४ -- उपसंहार.....४१९ ते ४४९

भाग १ला

इंग्लंडच्या राज्यकारभारव्यवस्थेच्या इतिहासाचा प्रारंभ इ.स.४५० ते इ.स.८०२

उपोद्घात : ब्रिटन देशात जूट, अँगल व सॅक्सन लोकांनी जेव्हापासून वसाहत करण्यास सुरुवात केली तेव्हापासून इंग्लंड देशाच्या राज्यकारभाराच्या इतिहासाचा प्रारंभ होतो. इ.स. ४५० पासून इ.स. ६०० अखेर या जातीचे लोक वेळोवळी जर्मनी देशातून जर्मन समुद्र ओलांडून इंग्लंडवर स्वाऱ्या करीत असत. त्यावेळेस हे बेट ब्रिटन लोकांच्या ताब्यात आहे असे त्यांना आढळून आले. हे ब्रिटन लोक सुमारे ४०० वर्षे रोमन लोकांच्या ताब्यात होते आणि त्यांच्यापैकी काही थोड्या लोकांनी तरी रोमन लोकांच्या सुधारणा घेतल्या होत्या. इ.स. ४०० नंतर थोड्याच दिवसांनी रोम येथील बादशहांनी ब्रिटन देशाचे त्यास संरक्षण होईनासे झाल्याने त्यावरील आपले स्वामित्व सोडून दिले. हे असे झाल्याने ब्रिटन लोकांस आपोआप स्वातंत्र्य प्राप्त झाले; पण त्यांच्या अंगी एखादे स्वतःचे बलाढ्य राज्य स्थापन करण्याचे किंवा जर्मनी देशातून येऊन त्याजवर स्वाऱ्या करणाऱ्या लोकांस हुसकून देण्याचे सामर्थ्य नव्हते.

जूट[१], अँगल[२] व सॅक्सन[३] यांचा व ब्रिटन लोकांचा हा स्वामित्वकलह एकसारखा १५० वर्षे चालूच होता. या मुदतीच्या अखेरीस या स्वाऱ्या करणारांच्या ताब्यात ब्रिटन बेटाचा बहुतेक भाग व त्यातील अधिक सुपीक प्रांत आला होता. या क्रूर व फार दिवस चालू राहिलेल्या लढाईत पुष्कळ ब्रिटन लोक मारले गेले किंवा पश्चिमेकडील प्रदेशांत हाकलून दिले गेले आणि जे आपल्या वडिलोपार्जित घरात राहिले त्यापैकी बहुतेकास गुलामगिरी प्राप्त झाली. जो ब्रिटन बेटाचा भाग या स्वाऱ्या करणाऱ्या लोकांच्या ताब्यात गेला होता त्या भागातील ब्रिटन लोकांच्या राजकीय संस्था नाहीशा झाल्या. या स्वाऱ्या करणाऱ्या लोकांच्या राजकीय संस्था जर्मनी देशातील दुसऱ्या जातीच्या संस्थांसारख्याच होत्या. म्हणून ज्याला इंग्लंडच्या राज्यकारभार व्यवस्थेचा आरंभ कसा झाला, हे समजून घेण्याची

इच्छा असेल त्यांने जर्मनी देशातील अत्यंत पूर्वीच्या कायद्यांची व रीतिभातींची जी माहिती आज आपणास आहे तिकडे वळले पाहिजे.

जर्मनी देशातील पूर्वीच्या संस्था : जेव्हा जर्मन लोक अत्यंत रानटी स्थितीत होते व ते त्या स्थितीत असल्यामुळे त्यांच्या जवळ ग्रंथ असण्याचा संभव नव्हता तेव्हाच्या त्यांच्या कायदे व रीतिभातींची पुष्कळ माहिती दोन मोठ्या रोमन ग्रंथकारांपासून आपणास मिळाली आहे. यांपैकी पहिला प्रसिद्ध सेनाधिपती व राजकार्यधुरंधर जुलिअस सीझर हा होय. यांने आपल्या [४]'कॉमेन्टरीझ' नामक चरित्रात जर्मन लोकांची माहिती दिली आहे. दुसरा कार्नेलिअस टॅसिटस हा होय. याने 'जर्मनी' या नावाचे पुस्तक लिहिले आहे; त्यात त्याने जर्मनी देशाचे व तेथील लोकांचे वर्णन केले आहे. या लेखकांच्या म्हणण्याप्रमाणे हे लोक आडमुठे व उग्र स्वभावाचे असत व मुख्यत्वेकरून ते मांस आणि दूध यावर आपला निर्वाह चालवीत असत. ते आळशी असून जमीन लागवडीस आणण्याच्या कामात अगदी अडाणी असे असत. त्यांच्या जवळ पाहिजे त्यापेक्षा जास्त जमीन असे व त्यांचे पुढारी त्यांस वेळोवळी नवीन शेते वाटून देत असत; पण त्यांचा आवडता धंदा लढाई हा होता.

जर्मन लोकांचे वर्ग : प्रत्येक जर्मन जातीचे स्वतंत्र व गुलाम या दोन वर्गांचे लोक असत. गुलाम दोन प्रकारचे होते; काही गुलामांची स्वतःची घरे असत व त्यास बायकामुले असत. हे आपल्या धन्याच्या जमिनीची लागवड करून त्यास उत्पन्नातून भाग देत असत. हे गुलाम म्हणजे ज्यांना सर्फ असे म्हणत असत, त्या प्रकारचे असावेत, असे वाटते. हे खरोखर ज्यांना स्लेव्ह असे म्हणत असत त्यापैकी नव्हते. दुसऱ्या प्रकारचे जे गुलाम असत, ते यांच्यापेक्षा कमी योग्यतेचे असत व ज्यांना आपण खरोखर गुलाम म्हणून संज्ञा देतो ते ते असत. जे लोक स्वतंत्र असत त्यात काही कुलीन असत व बाकीचे नसत. जे मोठ्या कुळातले असत त्यास इतरांपेक्षा जमिनीची वाटणी जास्त मिळत असते; जेव्हा एखादा पुढारी निवडून काढावयाचा असे तेव्हा तो याच लोकांतून काढीत; तरीपण प्रत्येक स्वतंत्र मनुष्याच्या हातात राजकीय सत्ता असे व जर त्याची योग्यता दिसून आली तर त्याला मोठमोठे अधिकार मिळविता येत असत. या लोकांचे पुढारी नोकरचाकरांच्या टोळ्यांच्या टोळ्या आपल्या पदरी ठेवीत असत. हे लोक व त्यांचे धनी यांमध्ये एक विशेष तहेचे इमानीपणाचे बंधन असे व त्यामुळे लढाईच्या प्रसंगी हे चाकरलोक आपल्या धन्यासाठी लढत असत.

जर्मन जातीतील राज्यकारभार व्यवस्था : काही जर्मन जातींमध्ये राजे असत; अँगल्स व सॅक्सन लोकांना जर्मनी सोडण्यापूर्वी जसे राजे नव्हते तसे काही जातींमध्ये ते नव्हते. ज्या जातींमध्ये राजे होते त्या जाती त्यांना एखाद्या मोठ्या कुळातून पसंत करून घेत असत. ज्या जातींमध्ये राजे नसत त्या जाती स्वतः पसंत केलेल्या पुढाऱ्यांच्या अमलाखाली राहत असत व ते आपापल्या प्रदेशांवर (हंड्रड) अंमल चालवीत असत. या जाती लढाईचा प्रसंग आला असता आपल्यामधून एखादा पुढारी नेमीत असत; परंतु राजाची व पुढाऱ्याची

सत्ता कमी-जास्त करणे हे जातीच्या सभेच्या हातात असे. या सभेला जाण्याची मोकळीक प्रत्येक स्वतंत्र मनुष्याला असे. या सभेत महत्त्वाच्या सर्व सार्वजनिक कामांचा विचार होत असे. हीच सभा राजास व पुढाऱ्यास निवडून काढीत असे. याच सभेपुढे देहांत शिक्षेसपात्र अशा अपराध्यांची चौकशी होत असे व हीच सभा लढाई सुरू करावी किंवा तह करावा, हे ठरवीत असे.

ब्रिटन जिंकून घेतल्यामुळे झालेले परिणाम :

अँगल व सॅक्सन लोकांनी ब्रिटन देश जिंकून घेतल्यामुळे वर ज्या संस्थांचे वर्णन आले आहे, त्याजवर फार महत्त्वाचे परिणाम घडून आले.

१. जमिनीची वाटणी : या विजयी लोकांनी ब्रिटन लोकांपासून जी जमीन काबीज करून घेतली होती तिची वाटणी त्यांनी आपसात कशी करून घेतली त्यासंबंधाने पुष्कळ तऱ्हेच्या हकीकती प्रसिद्ध आहेत. त्यानंतर बराच काळ लोटल्यावर म्हणजे अलीकडे आपल्या वाचनात फोकलँड[५] (सार्वजनिक जमीन) व बुकलँड[६] (खात्याची अगर खाजगी) अशा दोन तऱ्हेच्या जमिनी आलेल्या आहेत. पुष्कळ इतिहासकार फोकलँड (लोकांची जमीन) हीच सार्वजनिक जमीन असे मानतात. हिच्या अगदी विरुद्ध जमिनीची वाटणी म्हटली म्हणजे जी जमीन व्यक्तिमात्राला किंवा थोड्याशा व्यक्तींच्या समदायाला एकदम वाट्न दिलेली असते ती होय. जेव्हा या फोकलँड (सार्वजनिक) जमिनीमधून एखाद्याला जमिनीची देणगी देत असत, तेव्हा त्याला ती एखादा लेख लिहून देऊन किंवा सनद देऊन देत असत आणि म्हणूनच अशा जमिनीला बुकलँड (खात्याची किंवा खाजगी) जमीन म्हणत असत. सरते शेवटी बुकलँड (खात्याची जमीन) ही संज्ञा जितकी म्हणून खाजगी जमीन होती तिला प्राप्त झाली. दुसऱ्या कित्येक इतिहासकारांचे, फोकलँड ही सार्वजनिक जमीन नसून ती लोकांस त्यांच्या हक्क वहिवाटीवरून मिळालेली जमीन होय, असे मत आहे. या प्रकारच्या जमिनींच्या विरुद्ध प्रकारची जमीन म्हटली म्हणजे सनदेने मिळालेली जी जमीन ती होय. हे कसे का असेना, प्रत्येक राज्यात राजाला त्याच्या स्थितीस साजेल अशा रीतीने राहता यावे म्हणून व त्याची चाकरी कोणी केल्यास त्यास बक्षीस देता यावे म्हणून राजाच्या नावावर बरीच मोठी जमीन बाजूला काढून ठेवीत असत, हे मात्र निर्विवाद आहे.

२. समाजातील वर्गांचा एकमेकांशी संबंध : जर्मनी देशातील लोकांच्या समाजातील वर्गांचा जो एकमेकांशी संबंध होता त्यामध्ये ब्रिटन देश जिंकून घेतल्यामुळे बहुतकरून फेरफार झाला असावा; कारण अँगल व सॅक्सन लोकांच्या ताब्यात आता त्यांनी सोडून आलेल्या देशापेक्षा जास्त विस्ताराचा व सुपीक प्रदेश आला होता. आता ते पूर्वीपेक्षा जास्त संपन्न झाले असले पाहिजेच होते. त्यांच्या ताब्यात पूर्वी असलेल्या मालमत्तेपेक्षा हल्ली मालमत्ता जास्त आली असल्यामुळे समाजातील वर्गांची एकमेकांशी तफावत पूर्वीपेक्षा

जास्तच पडली असली पाहिजे. जिंकून घेतलेल्या ब्रिटन लोकांपैकी पुष्कळ ब्रिटन लोक आपल्या जिंकणाऱ्यांचे दास व गुलाम होऊन गेले होते. याप्रमाणे स्वतंत्र नसणाऱ्यांची संख्या जास्तच झाली असली पाहिजे; परंतु जर्मन लोकांमध्ये, ते जर्मनीत राहत असताना जे वर्ग समाजाचे होते, तेच वर्ग, ते जर्मन लोक, ब्रिटन येथे वसाहत करून राहिले होते, त्यांच्यातही होते.

३. राजसत्तेचा प्रारंभ : अँगल व सॅक्सन लोकांमध्ये ते जर्मनीत राहत असताना राजे नसत; परंतु ब्रिटन देशातील याच लोकांमध्ये त्यांनी ब्रिटन बेटावर पाय टाकला त्याच दिवसापासून राजे होते असे दिसून येते. या लोकांना त्यानंतर जे एकसारखे युद्धच करावे लागले, त्याचा हा साहजिक परिणाम झाला असला पाहिजे. एक बेत व एक विचार झाल्याशिवाय, लढाईत जय प्राप्ती होणे शक्य नाही. राज्य करण्यास राजा नेमील्याशिवाय अडाणी लोकांस हे ऐक्य प्राप्त होत नाही. ज्या जर्मन जातींमध्ये शांततेच्या वेळी राजा नसे, त्या जातींतील लोकांस देखील लढाईच्या प्रसंगी शत्रूवर चाल करून नेण्यास एखादा नाईक पसंत करावा लागत असे. ब्रिटन देशात या अँगल व सॅक्सन लोकांना जे युद्ध करावे लागले ते इतके उग्र व फार दिवस चालणारे होते की, अशा पुढाऱ्यांची त्यांना पुष्कळ वर्षांपर्यंत एकसारखी जरूर राहिली व याप्रमाणे त्यांनी ज्यांना पुढारी म्हणून पसंत केले होते तेच पुढे त्यांचे राजे होऊन बसले.

इंग्लिश लोकांचे धर्मांतर : जेव्हा सेंट ऑगस्टाईन हा केट येथे इ.स. ५९७ मध्ये येऊन उतरला तेव्हापासून इंग्लिश लोकांचे ख्रिस्ती धर्मात धर्मांतर होण्यास सुरुवात झाली. हे धर्मांतर संपूर्ण घडून येण्यास सुमारे १०० वर्षे लोटली गेली, इंग्लंडच्या राज्यव्यवस्थेचे इतिहासावर या धर्मांतराचे परिणाम फार महत्त्वाचे घडून आले.

१. (इंग्लंडचा) सुधारलेल्या देशांशी घडून आलेला संयोग : जर्मनी देशातील अत्यंत अडाणी जातींपैकी अँगल व सॅक्सन हे असत. या नवीन देशात आल्यावर त्यांनी जे सुधारलेले लोक जिंकले होते, त्यांजपासून ते काहीच शिकले नव्हते. जर ते मूर्तिपूजक राहिले असते, तर ते फार वर्षे रानटीच राहिले असते. ते ख्रिस्ती धर्माचे झाल्यामुळे त्यांना सुधारलेल्या देशाचा समागम घडण्याचा योग आला. इतर देशातील ख्रिस्ती लोकांशी त्यांचे दळणवळण पडले. युरोप खंडामध्ये जे कायदे व ज्या संस्था होत्या त्यांचा परिणाम त्यांच्या (अँगल व सॅक्सन यांच्या) कायद्यांवर व संस्थांवर होण्यास पहिल्यानेच प्रारंभ झाला.

२. राष्ट्रीय ऐक्याची वाढ : इंग्लिश लोकांच्या या धर्मांतरामुळे त्यांचे ऐक्य दोन भिन्न भिन्न मार्गांनी झाले. पहिल्याने, ते सर्व एका धर्माचे म्हणजे ख्रिस्ती धर्माचे अनुयायी झाले. राजकीय संबंधाने बघितले असता लहान लहान राज्ये असल्यामुळे त्यांचे पुष्कळ विभाग झाले होते. बहुतकरून या राज्यांची एकमेकांशी भांडणे चाललेली असत; परंतु या सर्व राज्यातील लोक नावाने तरी आता ख्रिस्ती झालेले होते. या त्यांच्या स्थित्यंतरामुळे

त्यांच्यामधील होणाऱ्या लढायात क्रौर्य कमी झाले होते. दुसऱ्याने, इंग्लिश लोकांनी खिस्ती धर्माचा उपदेश ब्रिटन देशातील दुसऱ्या लोकांपासून घेतला नव्हता. जे ब्रिटन लोक स्वतंत्र राहिले होते त्यांनी आपला ख्रिस्ती धर्म सोडला नव्हता; पण त्यांनी अँगल किंवा सॅक्सन लोकांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्याचा यत्न केला नाही. आयर्लंड येथील मिशनऱ्यांनी पिक्टस् लोकांनी ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली व त्यांना इंग्लंडच्या उत्तर भागात याच कामात बरेचसे यश आले होते; पण त्यांना पुढे रोमन (रोम येथील) मिशनऱ्यांपुढे हार मानावी लागली. याप्रमाणे सर्व इंग्लिश लोक रोमन मिशनऱ्यांचे शिष्य झाले. या एका गोष्टीवरून इंग्लिश राष्ट्र व त्याच्याजवळील इतर राष्ट्रे यांच्यात भेद दिसून येत असे.

रोमन मिशनऱ्यांनी ऐरिशमिशनरी हुसकावून दिल्यानंतर थोड्याच काळाने कैंटरबरी येथील एक प्रसिद्ध आर्चबिशप, टारसस येथील थिओडोर याने इंग्लंडात ख्रिस्ती (धर्माची) पाया शुद्ध स्थापना केली. ज्या शहरात सेन्टपालाचा जन्म झाला होता, त्याच शहरांतून थिओडोर हा आला होता. तो इ.स. ६७०मध्ये आर्चबिशप झाला. त्यांने इंग्लंडचे डायोसीस (प्रत्येक बिशपाच्या ताब्यात राहावयाचा प्रांत) पाडण्याचे काम शेवटास नेले. त्याने सर्व बिशपांना (धर्म संस्थेच्या) व्यवस्थेसंबंधाने वादविवाद करण्यास वर्षातन एकवेळ जमावे असा नियम करून दिला. सर्व इंग्लंडमध्ये एकच राजाचा अंमल चालू होण्यापूर्वीच अशा रीतीने धर्माचे एक छत्र चालू झाले होते. धर्मसंस्थेची व्यवस्था लावण्याचे काम सुरळीत वाढविताना इंग्लंड देशातील वेगवेगळ्या राज्यांतील लोकांना एकमताने काम करण्याचा धडा याप्रमाणे पहिल्यानेच मिळून राहिला होता.

३ धर्मोपदेशकांचे वजन : इंग्लिश लोक ज्या वेळेस मूर्तीपूजक होते त्या वेळेस त्यांच्या धर्माचार्यांच्या हातात फारशी राजसत्ता नव्हती असे दिसून येते; परंतु ख्रिस्ती धर्मगुरू हे एकदम राजसत्ता मिळवून बलिष्ट होऊन बसले. त्यांचे काम पवित्र (मानले गेले) असल्यामुळे त्यांच्यावर कोणी जुलूम करीत नसे. राजे आणि श्रीमंत लोक यांना त्यांस इतकी जमीन दिली की. ते संपन्न होऊन बसले. ते मोठे विद्वान असत. त्यांना लॅटीन वाचता येत असे, म्हणून त्या वेळच्या सर्व ज्ञानभांडाराच्या किल्ल्या त्यांच्या स्वाधीन असत. कायदे आणि कारभार यांच्या संबंधी त्यांना काही माहिती होती; परंतु इंग्लंडमधील लोकांना या गोष्टी अगदी नव्या होत्या. इंग्लंडच्या धर्मांतरापासून तो तहत रिफॉर्मेशन होईपर्यंत राज्यकारभार चालविण्याचे बहुतेक काम या धर्मोपदेशकांकडेच होते.

अँगल आणि सॅक्सन राज्यांची पक्या पायावर रचना : इंग्लिश जातीची जी लहान लहान राज्ये होती ती मोडून त्या सर्वांपासून एक राज्य होऊन जो फेरफार झाला त्याने या जातींच्या संस्थांवर एक मोठा महत्त्वाचा परिणाम घडला.

१. पहिल्याने लहान लहान पुष्कळ राज्ये होती- असे होण्याचे कारण इंग्लंड देश एकाच मोठ्या सैन्याने येऊन जिंकून घेतला नसून तो लोकांच्या लहान लहान टोळ्या येऊन

त्यांनी जिंकून घेतला होता, हे होय. पुष्कळ दिवसांपर्यंत या राज्यांना ब्रिटन लोकांशी लढाया करण्यातच पूरे वाट झाली; पण पुढे ते आपापसातच लढाया करू लागले

२. ब्रेटवाल्डा या नावाचे राजे (ब्रेटवाल्डा या शब्दाचा अर्थ ब्रिटनचा राजा असा कदाचित होईल) हे युद्ध चालू असता एका मागून एका राज्यास पहिले पद प्राप्त होत गेले. त्यावेळी जो राजा सर्वांत जास्त पराक्रमी असे, त्यास ब्रेटवाल्डा असे म्हणत असत; इतिहासकारांनी अशा सात ब्रेटवाल्ड्यांची नावे लिहून ठेविली आहेत. या सातमध्ये केंट, पूर्वेकडील अँग्लिया, नॉर्दब्रिया आणि मर्शिया येथील राजांची नावे आहेत. हे ब्रेटवाल्डे सर्व ब्रिटनवर राज्य करीत होते किंवा निदान सर्व इंग्लिशांवर तरी ते राज्य करीत होते. असे मात्र समजावयाचे नाही. दुसरी राज्ये बहुतकरून आपापल्या राजांच्या अमलाखाली त्यांच्या कायद्यांत किंवा रीतीभातींत काहीएक फरक न होता तशीच चालू होती. युद्धाच्यावेळी ती सर्वात बलाढ्य राजाचे अनुयायी होत असत. त्यांचे परावलंबन काय ते एवढेच होते. मोठमोठाल्या राज्यांस हे एवढेदेखील वर्चस्व फार दिवस ठेवता येत नसे.

३. वेसेक्स राज्याचे वर्चस्व सरते शेवटी वेसेक्स येथील राजांना सर्व इंग्लिश लोक आपल्या ताब्यात आणण्याच्या कामी यश आले. इ.स. ८०२ मध्ये जेव्हा एल्बर्ट हा वेसेक्सचा राजा झाला, तेव्हा त्याने मर्शिया व नॉर्दब्रिया येथील राजापासून आम्ही तुमचे ताबेदार आहोत असे कबूल करून घेतले. याचे अगोदर होऊन गेलेल्या ब्रेटवाल्डांना जे वर्चस्व असे यात आणि यास (एल्बर्टास) असलेल्या वर्चस्वात काहीएक फारसा फरक नव्हता. या जुन्या राज्यांवर पिढीजात अल्डरमनांचा अंमल चालत होता; या अल्डरमनांपैकी काही जुन्या राजघराण्याचे वंशज होते. डेन्मार्क येथील लोकांनी मर्शिया आणि नॉर्दब्रिया या राज्यांतील बहुतेक प्रदेश ओसाड करून टाकल्यानंतर जेव्हा तो सर्व प्रदेश आलफ्रेड राजाच्या मागून गादीवर बसलेल्या राजांनी काबीज करून इंग्लिशांच्या ताब्यात आणला, तेव्हा मात्र सर्व इंग्लंड एका राजाच्या अमलाखाली आले, असे म्हटले असता चालेल.

संदर्भ :

१. जूट - जर्मनीतील जटलंट प्रांतातील एका जातीस जूटस् किंवा जटलंडर्स म्हणत. पाचव्या शतकात हे इंग्लंडमधील केंट परगण्यात वसाहतीकरिता आले.
२. अँगल - जर्मनीतून अँग्लिआ ज्यास सांप्रत खालचा हॅनोव्हर म्हणतात त्या प्रांतातील जे लोक इंग्लंडमध्ये आले त्यास अँगल्स म्हणत; यांच्या नावावरूनच ब्रिटन देशास इंग्लंड नाव पडले आहे.
३. सॅक्सन - उत्तर जर्मनीतील साक्सनी प्रांतातील रहिवाशांस सॅक्सस्न् म्हणत. ते इतर ट्युटानिक जातीबरोबर इंग्लंडवर स्वारी करून आले.

४. जर्मन स्वारी करणारांनी ब्रिटन लोकांचे कितपत निर्मूलन केले, (२) देश पूर्ण जिंकल्यावर स्वतंत्र लोकांचे दासजनाशी काय परिणाम होते व (३) अँग्लोसॅक्सन जमीनदारीची पद्धती कोणत्या प्रकारची होती, या तीन गोष्टींबद्दल फार मोठा मतभेद आहे. याबद्दल निश्चितता क्वचित होते व याबद्दल ऊहापोह येथे करता येत नाही. इतिहासकारास सामान्यतः मान्य अशी मते येथे नमूद केली आहेत.

५. फोकलँड - ज्या जमिनी वरिष्ठ प्रतीचा जमीनदार वाटेल त्या वेळी कुळापासून काढून घेऊ शकतो व वाटेल त्यास देऊ शकतो, त्या व्यक्तिशः लोकांची नियत मालकी नसणाऱ्या जमिनी.

६. बुकलँड - दस्त करून देऊन एखाद्यास दिलेली जमीन. अशा जमिनी मिराशीच्या असत. वरिष्ठ प्रतीचा जमीनदार असल्यास त्यास त्या स्वेच्छेप्रमाणे वाटून घेता येत नसत.

○○○

भाग २रा

अँग्लो-सॅक्सन राज्याची राज्यकारभार व्यवस्था

उपोद्घात : हल्लीच्या इंग्लंडमधील राज्यकारभार व्यवस्थेचे जर आपणास एखाद्या परकी मनुष्याला वर्णन करून सांगणे झाले तर पहिल्याने आपणास तेथील राष्ट्रीय नियमन, राणी, पार्लमेंटसभा, मंत्रीवर्ग व न्यायाधीश यांचा उल्लेख करावा लागेल व नंतर आपल्यास तद्देशीय राज्यव्यवस्था व कौंटी, पॅरिस व ज्या गावांत म्युनिसिपालिटी आहे अशा गावांत अधिकारी वर्ग कोण आहे, याचे वर्णन करावे लागेल.

परंतु आल्फ्रेड किंवा आथेलस्टन यांच्या वेळच्या इंग्लंडमधील राज्यकारभार व्यवस्थेचे जर वर्णन करणे झाले तर वरील क्रमाच्या उलट आपणास ते करावे लागेल. हे असे करणे असेल तेव्हा स्थानिक संस्थांचे वर्णन पहिल्याने करून नंतर राष्ट्रीय राज्यव्यवस्थेचे वर्णन करणे बरे.

पुष्कळ स्थानिक संस्थांच्या संबंधाने शोध केला असता असे आढळून येईल की, त्या इंग्लंडमध्ये राज्य स्थापन होण्याचे पूर्वीच अस्तित्वात होते आणि म्हणूनच त्यांचे वर्णन आरंभी केले असता बरे पडेल. ब्रिटन देश हा कित्येक स्वतंत्र पुढाऱ्यांनी थोडथोडा असा काबीज केला होता, हे आपण लक्षात ठेवले असता हे आमचे वरचे म्हणणे सहज लक्षात येण्यासारखे आहे.

ज्या काळाविषयी हल्ली आपण विवेचन करीत आहोत त्याकाळी दुसऱ्या सर्व संस्थांपेक्षा स्थानिक संस्था या जास्त महत्त्वाच्या होत्या, हे एक असे असण्यास दुसरे कारण आहे. जर्मनी येथील ज्या जाती इंग्लंडमध्ये येऊन वसाहती करून राहिल्या होत्या त्या सर्वांना स्वराज्य प्रिय असे आणि म्हणूनच प्रत्येक स्वतंत्र मनुष्याला सार्वजनिक कामात आपला हात असावा हे साहजिकरीत्या वाटत असे; परंतु तो सर्व इंग्लंडातील लोकांच्या कामकाजापेक्षा आपापल्या स्वतःच्या प्रदेशातील कामकाजाला जास्त महत्त्व देत असे. तो

आपल्या रोजच्या आयुष्यक्रमातील बहुतेक कामाचा निकाल स्थानिक सभेकडून करून घेत असे आणि त्या कामात तो आपल्या शेजाऱ्यांची मदत घेत असे. राष्ट्रीय कामे तो बहुतकरून राजा व त्यांचे मंत्री याजकडे सोपवीत असे. लोकनियुक्त सभासदांच्या पार्लमेंट सभेची स्थापना होण्यापूर्वी एखाद्या मोठ्या राज्याच्या कारभारात श्रीमंताशिवाय दुसऱ्यास वाटा घेण्यास मिळणे हे बहुतेक दुरापास्तच होते.

स्थानिक संस्था - ग्रामसंस्था : अँग्लोसाक्सन राज्यातील सत्ता चालविणारी अतिशय लहान संस्था म्हटली म्हणजे ग्रामसंस्था ही होय. अजून ही ग्रामसंस्था अस्तित्वात आहे; कधी कधी तिला या जुन्या नावाने ओळखतात; पण पुष्कळ वेळा ती पॅरिस या नावाखाली मोडते. ब्रिटन देश जिंकण्याचे काम चालू असता ही संस्था हळूहळू व निरनिराळ्या रस्त्यांनी अस्तित्वात आली. कधी कधी एखादे कुटुंब आपल्या जबाबदारीवर थोडीशी जमीन आपल्या कबजात घेई किंवा ज्या पुढाऱ्याचे ते कुटुंब अनुयायी असे तो त्यास राहण्यास जमीन देई. कधी कधी एखाद्या उत्तम कुळातील गृहस्थ अशा आपल्या जमिनीवर आपल्या चाकर-नोकरांकडून किंवा गुलामांकडून अशी गावे वसवीत असे. या ग्रामसंस्था कशा का स्थापन होईनात त्यांचा तीन तहेने उपयोग मोठा महत्त्वाचा असे.

(१) शेतकरी मंडळी म्हणून - या विषयासंबंधाने विद्वान लोकांनी रगड लिहून ठेवले आहे व अजून यासंबंधाने संशय घेण्यास पुष्कळ जागा राहिली आहे. प्रत्येक ग्राम संस्थेच्या ताब्यातील काही जमीन सामाईक कुरणासाठी व काही याच संस्थेने केलेल्या उपनियमाप्रमाणे सामाईक शेतकी करण्यासाठी राखून ठेवलेली असे हे मात्र निर्विवाद आहे. हल्ली इंग्लंडमधील कित्येक भागात ज्या इतक्या सामाईक जमिनी आढळतात त्या याच सामाईक कुरणातून शेष राहिलेल्या होत.

(२) कारभाराचा आदिभाग म्हणून या ग्रामसंस्थेच्या रूपाने एकत्र राहणाऱ्या लोकांची गेमॉट या नावाची एक साधारण सभा असे व ती नियमाने दर महिन्याला भरत असे. या सभेमध्ये हे ग्रामलोक आपल्याला लागणारे कायदे करून घेत असत व जेरिफा किंवा रीव्ह व वायडेल किंवा बीडल या अधिकाऱ्यांची निवडणूक करीत असत; हंड्रेड व शायर सारख्या मोठमोठ्या देश विभागांत भरणाऱ्या सभांमध्ये आपल्या तर्फे प्रतिनिधी म्हणून काम करण्यास निवडून पाठविण्याचे काम ते याच सभेचे बळी करीत असत. याच सभेमध्ये ते लहान लहान कज्जांचा निकाल लावून घेत असत व कर बसविण्यासंबंधी किंवा अपराध्यांचा पाठलाग करण्यासंबंधी मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या हुकुमांचीही ते अंमलबजावणी करीत असत.

(३) धर्म प्रकरणसंबंधी विभाग म्हणून - इंग्लंडमधील धर्मप्रकरणसंबंधी अतिशय लहान विभाग म्हटले म्हणजे पॅरिस हे होत. या विभागाची रचना फार हळूहळू होत गेली व इंग्लंडमध्ये धर्मांतर होऊन गेल्यानंतर कित्येक शतके तर त्यांच्या हद्दी नक्की ठरविण्यास लागली; पण इंग्लंडमधील दक्षिण भागात जेव्हा जेव्हा एखाद्या पॅरिसची रचना होत असे तेव्हा तेव्हा

तेथे पूर्वी असलेल्या ग्रामसंस्थेच्या ताब्यात जितकी जमीन असे तितकीच बहुतकरून या पॅरिसच्या हद्दीत असे. तथापि या आमच्या म्हणण्यास पुष्कळ अपवादही आहेत. हा नियम बहुतकरून इंग्लंडच्या उत्तर भागास लागू पडत नाही.

गावे : हल्ली ज्याला आपण गाव असे म्हणतो ते व आमची ग्रामसंस्था ही एकच आहेत असे आपणास म्हणता येणार नाही. बहुतकरून गावे ही शेतकऱ्यांचीच ठिकाणे असत. यावेळी इंग्लंडची लोकसंख्या थोडी होती व इंग्लिश लोकांना गावात राहणे आवडत नसे आणि म्हणूनच ब्रिटन देशात जी रोमन लोकांचे वेळची गावे त्यांना आढळली ती त्यांनी मोडकळीस जाऊ दिली; परंतु जेव्हा एखाद्या देशात शांतता असते तेव्हा तेथे गावे ही अवश्य वाढली जावयाचीच रोमन लोकांच्या वेळची काही गावे अजिबात सोडून दिलेली नव्हती. काही गावांत पुन्हा लोकांनी वस्ती केली व काही गावे नव्या नव्या ठिकाणी वसली. हल्ली ज्यांना आपण केवळ खेडी मानू त्यांनाच पूर्वी गावे समजत असत. ज्याला आता आपण एखादे मोठे शहर समज असे त्यावेळेस एकही गाव नव्हते. बाकीच्या सर्व इंग्लिश लोकांपेक्षा हल्ली मोठमोठाल्या शहरांत व गावांत राहणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे व ते जास्त बलाढ्यही आहेत; परंतु अँग्लोसॅक्शन लोकांच्या वेळी गावे फार थोडी असत व त्यात राहणाऱ्या लोकांस सत्ताही थोडी असे. गावाच्या कामाची व्यवस्था दुसऱ्या एखाद्या ग्रामसंस्थेसारखीच असे. तेथे जरीफा नावाचा अधिकारी असे. कधी कधी या अधिकाऱ्यास पोर्टजरीफा असेही म्हणत असत. प्रत्येक गावचे सामाईक करण असे. अजनदेखील काही गावांची अशी कुरणे आहेत. ऑक्सफर्ड येथील 'पोर्टमेडो' या नावाचे कुरण याच प्रकारचे आहे.

हंड्रेड, वार्ड किंवा वापेनटेक : पुष्कळ ग्रामसंस्था मिळून हंड्रेड हा विभाग होत असे. बर्मिंगहाम शायरमधील चिलटून-हंड्रेडस व मिडल एसेक्समधील हंड्रेड ऑफ आईलवर्थ ही दोन नावे पूर्वीच्या हंड्रेड या नावाच्या विभागाचीच शिल्लक राहिलेली नावे होत. एखाद्या मनुष्याच्या घरास किंवा माल मिळकतीस दंग्याचेवेळी जर इजा झाली तर ती भरून घेण्याविषयी त्याला त्या हंड्रेडवर फिर्याद करिता येत असे असे म्हणतात. दुसऱ्या बाकीच्या कामासंबंधाने हंड्रेड या विभागास आता कोणी मानीत नाही आणि आपण कोणत्या हंड्रेडच्या विभागात राहत आहोत हे हल्ली फारच थोड्या इंग्रज लोकांना सांगता येईल; परंतु अँग्लोसॅक्सन लोकांच्या वेळी या हंड्रेडास स्वराज्य कारभारामध्ये बराच मोठा भाग मिळत असे. या हंड्रेड नामक विभागांची रचना कशी झाली असेल हे सांगता येत नाही. एड्गार राजाच्या वेळी (इ.स. ९५१-९७५) झालेल्या कायद्यात हे नाव पहिल्याने आढळून येते; परंतु हा राजा होऊन जाण्याचे पूर्वी बहुतकरून शेकडो वर्षे हे विभाग प्रचारात असावेत असे वाटते. या विभागाचा आकार एकसारखा मुळीच नाही. शंभर जर्मनयोद्ध्यांच्या ताब्यात असलेल्या प्रदेशास कदाचित हंड्रेड हे नाव प्राप्त झाले असावे. इंग्लंडमधील काही भागात या

पोटभागास वार्ड किंवा वापेनटेक असे म्हणत असत. हंड्रेड विभागाची सभा जिला हंड्रेडमोट असे नाव असे ती महिन्यातून एकवेळ भरत असे. या सभेत मुख्य मुख्य जमीनदार किंवा त्यांचे कारभारी व त्या (हंड्रेड) विभागातील प्रत्येक ग्रामसंस्थेने पाठविलेले प्रतिनिधी म्हणजे एक धर्मोपदेशक, एक रीव्ह व याच कामासाठी पसंत केलेले उत्तम चार असे सभासद हजर राहत असत. ही हंड्रेड मोट सभा दिवाणी फौजदारी काम चालवीत असे. ज्या ज्या लोकांना या सभेस येण्याचा हक्क असे त्या त्या लोकांना न्यायाधीश म्हणून काम पाहण्याचा अधिकार प्राप्त होत असे; परंतु इतके सर्व जर न्यायाधीशाचे काम करू लागले तर ते फार होतील म्हणून न्यायसभेच्या कामासाठी यातून बारा इसमांची निवडणूक करीत असत.

हंड्रेड या विभागावरही लोकांनी पसंत केलेला अधिकारी असे. त्याला हंड्रेडमॅन किंवा हंड्रेडस् एल्डर असे म्हणत असत.

शायर : शायर या विभागाची रचना वेगळाल्या वेळी वेगळाल्या प्रकारांनी झालेली होती. हे विभाग अगदी पहिल्याने लहानशी राज्ये होती; पण पुढे यांचे स्वातंत्र्य नष्ट झालेले होते. याच पैकी केंट, ससेक्स, सरे, मिडल एसेक्स व एसेक्स हे विभाग होत. काही त्यावेळेस अस्तित्वात असलेल्या मोठाल्या राज्यांचे भाग होते; उदाहरणार्थ ईस्ट अँग्लिया या राज्याचे नार्फक व सफक हे उत्तर व दक्षिणेकडील भाग होते; मर्शिया व नार्दब्रिया या दोन राज्यांचे जे पूर्वी भाग होत. त्याहून हल्लीचे मध्य इंग्लंड व उत्तर इंग्लंड यात असलेले शायर बहुतेक अगदी वेगळे आहेत. दहाव्या शतकात मर्शिया जेव्हा डेन लोकांपासून परत जिंकून घेतला तेव्हा त्यातील हल्ली असलेल्या शायरांची रचना करून त्यास नावे दिली गेली होती. उत्तर इंग्लंडमधील फक्त यॉर्क शायरास मात्र नॉर्मन लोकांनी इंग्लंड जिंकून घेण्याचे पूर्वी हल्ली असलेला बहुतेक आकार प्राप्त झाला होता. बारावे शतक लागे तोपर्यंत लँकाशायर या शायरच्या मर्यादा ठरल्या गेल्या नव्हत्या. पुष्कळ हंड्रेड मिळून एक शायर होत असे. हंड्रेडमोट प्रमाणे शायरमोट या नावाची प्रत्येक शायरच्या लोकांची साधारण सभा असे. ही सभा वर्षातून दोन वेळा भरत असे. या सभेस प्रत्येक ग्रामसंस्थेचे तर्फेने येणारे सभासद, मोठमोठाले जमीनदार व अधिकारी येत असत. या सभेस दिवाणी व फौजदारी कामांचा निकाल लावण्याची सत्ता होती; परंतु सर्व सभासदांच्या तर्फेने हे काम बाराथेन नामक अधिकाऱ्यास सोपलेले असेल असे दिसते. सर्व शायरचा मुख्य अधिकारी एल्डरमॅन (आल्डरमॅन) या नावाचा असे. याची निवडणूक शायरच्या सभेकडून न होता ती राष्ट्रसभेकडून होत असे; परंतु या अधिकाराचा कल तो पुढे वंशपरंपरेचा होण्याकडे झुकू लागण्यास सुरुवात झाली. ज्यावेळी शायर हे एक स्वतंत्र राज्य होते त्या वेळच्या राजघराण्याच्या कुटुंबापैकी कोणा एकाकडे हा एल्डरमॅनचा अधिकार पुष्कळ वेळा असे. शायरमोटमध्ये हा एल्डरमॅन व धर्माध्यक्ष (बिशप) हे दोघेही सभासद म्हणून बसत असत; पहिल्याकडे स्थानिक कायद्याचा निर्णय करण्याचे काम असे, व दुसऱ्याकडे धर्मासंबंधी कायद्याचा निर्णय करण्याचे काम असे; परंतु या शायरमोटचा

अध्यक्ष शायरीफ किंवा शेरीफ हा असे. या अधिकाऱ्याची नेमणूक राजाकडून होत असे व त्याच्याकडे त्या शायरात कायद्याचा अंमल बरोबर होतो आहे किंवा नाही हे पाहण्याचे व त्या शायरातील राजाच्या खाजगी जमिनीची व्यवस्था करण्याचे काम असे. लढाईच्या प्रसंगी शायरमधील लढवय्ये लोकांस एकत्र करून त्यांचे पुढारीपण घेण्याचे काम एल्डरमॅन यांच्याकडे असे.

राष्ट्रीय शासनपद्धती : इंग्लिश राष्ट्राचा राज्यकारभार ते एका राजाच्या सत्तेखाली आल्यानंतर राजा व बिटेन किंवा शहाणे लोक यांच्या हातात असे.

राजा व त्याची निवड : जर्मन लोकांमध्ये राजपद हे निवडणुकीवर अवलंबून असे; परंतु निवडणुकीच्या वेळी कुलीन घराण्यातील मनुष्यास जास्त पसंत करीत असत हे आपण पाहिलेच आहे. ही पद्धत अँग्लोसॅक्सन राज्यामध्ये अव्याहत चालू होती; परंतु राज्याधिकाराचा कल एकसारखा वंशपरंपरेने चालण्याकडे लागून राहिला होता. राजाची निवड बहुतकरून एकाच कुटुंबातून होत असे. या कुटुंबातून गुणांनी व वयाने राज्य करण्यास जो सर्वांत योग्य असे त्यासच निवडीत असत. उदाहरणार्थ, एथट्रेड याच्या मुलास पसंत न करीता त्याचा चुलता जो आल्फ्रेड यासच लोकांनी राज्यपदासाठी पसंत केले होते. स्वतंत्रलोकांच्या साधारणसभेकडून जर्मनी येथील राजाची निवड होत असे. शास्त्रीयदृष्ट्या इंग्लंडमध्ये हे असे करणे बरोबर आहे, अशीच लोकांची समजूत झाली असावी; कारण तेथे ही निवड करण्याच्या वेळी जे स्वतंत्रलोक येण्यास खुश असत व ज्यांना येववत असे त्यांच्या समोर (बिटेन) शहाण्या लोकांनी राजाची निवड करण्याची वहिवाट असे.

इंग्लिश लोकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याच्या पूर्वी त्यांची राजकुटुंबे आपण देव-संभूत आहोत असे मानीत असत; उदाहरणार्थ, वेसेक्स राज्याचा मूळपुरुष व आल्फ्रेड आणि व्हिक्टोरिया राणीचा पूर्वज जो राजा सर्डिक तो जर्मन लोकांचा मुख्य देव जो वोडन याजपासून मी नववा पुरुष आहे असे मानीत असे. धर्मांतर झाल्यावर या दंतकथांवर कोणी भरवसा ठेवीनासे झाले; पण निवडणुकीच्या संस्कारात राज्याभिषेकाचा संस्कार येऊन मिळाला तेव्हा राजा हा ईश्वराने अभिषिक्त केला आहे व त्याचा अधिकार मानणे हे धर्माचरण आहे अशी लोकांची समजूत झाली. राजाला अभिषेक होण्याच्या पूर्वी मी न्यायाने व कायद्याप्रमाणे राज्य करीन अशी शपथ घ्यावी लागत असे.

राजाचे अधिकार : राज्य जितके मोठे असे तितके ते राष्ट्रीय साधारणसभेच्या साह्याने चालविणे कठीण पडत असे. राज्याच्या विस्ताराच्या मानाने राजाला त्याच्या प्रजेपैकी अत्यंत उंच कुळातील मनुष्यापेक्षा व अत्यंत श्रीमंत मनुष्यापेक्षा अधिकच मान मिळत असे; तेव्हा जर्मनी देशातील लहान लहान राजापेक्षा इंग्लंडच्या राजाची सत्ता जास्त असे हे साहजिकच आहे. अँग्लोसॅक्सन राजांने अधिकार थोडक्यात खाली लिहिल्याप्रमाणे होते :

लढाईच्यावेळी राजा प्रजेचा पुढाकार घेत असे शांततेच्या वेळी तो सर्वात श्रेष्ठ न्यायाधीश व कायदे करणारा असे; परंतु त्याला या कामात (बिटेन) शहाण्या लोकांची संमती घ्यावी लागत असे. राजाने प्रजेवर प्रत्यक्ष कर बसविणे हे अगदी माहीत नव्हते असे म्हटले तरी चालेल; परंतु जेव्हा कर बसविणे अवश्य असे त्यावेळी राजा व बिटेन तसे ठरवीत असत. राजाचा वसूल अंशतः जमिनीच्या उत्पन्नापासून येत असे. राजघराण्याच्या खाजगी मालमिळकतीशिवाय राजगृहाच्या संन्निधानास असलेली खुद्द भोगवट्याची पुष्कळ जमीन ही जो गादीवर बसत असे त्याजकडे चालत असे. बिटेनच्या संमतीने राजाला जमीन देण्याचा अधिकार असे. फोकलँड या नावाची जमीन जर सार्वजनिक होती हे म्हणणे खरे असेल तर ही इनामे या जमिनीतून दिली जात असत. जर ही जमीन सार्वजनिक नव्हती असे मानले तर अशी इनामे राजाच्या खुद्द भोगवट्याच्या जमिनीतून दिली जात असावी. राजाला त्याच्या जमिनीबद्दल खंडादाखल मुख्यत्वेकरून रोकड न येता हरत-हेच्या जिनसा येत असल्या पाहिजेत; या जिनसा जे त्याच्या पदरी पुष्कळ नोकरचाकर असत त्यांच्या निर्वाहासाठी उपयोगी पडत असत. राज्याधिकाराच्या अंगभूत राजभाग म्हणून राजाला न्यायसभेत दस्तुरी व दंड वसूल करण्यात येत असत. ते खाणी, मिठागरे यापासून झालेले उत्पन्न, समुद्रात फुटलेल्या गलबतातून वाहून आलेले जिन्नस व पुरून ठेवलेले द्रव्य हे मिळत असे; परंतु नॉर्मन राजापेक्षा अँग्लोसॅक्सन राजाचे उत्पन्न फार कमी असे. प्राचीन जर्मन राजाप्रमाणे त्यांचे पदरी स्वतंत्र सोबत्यांचा मोठा लवाजमा असे. यांना जेसिथ किंवा थेन असे म्हणत असत; हे लोक त्यांची लढाईच्या व शांततेच्या वेळी सेवा करीत असत व तो फोकलँडमधून त्यांचा खर्च पुरवीत असे.

अँग्लोसॅक्सन राजाच्या सत्तेची परिसीमा : वर दिलेल्या वर्णनावरून जितकी कल्पना होते, तिजपेक्षा अँग्लोसॅक्सन राजाची सत्ता खरोखर पाहू गेले असता फार कमी असे. त्याचे उत्पन्न थोडे असे; त्याच्या पदरी कायमची फौज मुळीच नसे; त्याला राज्य चालविण्यास मदत करण्यास पुष्कळसे कामदार व कारभारी नसत; कारभाराचे बहुतेक साधारण काम वेगवेगळाले स्थानिक अधिकारीच करीत असत. त्यावेळेस कायदेबंदी नव्हती असेच म्हटले तरी चालेल. एथलबर्ट व इने यांनी केलेले कायदे आणि त्यांच्या नंतर जे राजे झाले त्यांनी जे कायदे म्हणून करून ठेवले आहेत ते, ज्या जुन्या वहिवाटी चालत असत त्यात थोडीशी भर घालून व सुधारणा करून त्यांची काढलेली नवी आवृतिरूपच होते असे म्हटले तरी चालेल. प्रत्येक स्वतंत्र मनुष्य योद्धा असे. लोकांना आपल्यावर जुलूम होत आहे असे वाटले तर त्यांना त्याचा प्रतिबंध करण्याची शक्ति व इच्छाही असे. याप्रमाणे राजाचा अधिकार त्याच्या स्वतःच्या आचरणावर बराच अवलंबून असे. जर तो शहाणा आणि शूर असला तर लोक त्याला मान देत व त्याची आज्ञा पाळत; पण तोच जर भित्रा आणि मूर्ख असला तर लोक त्याला मुळीच मानीत नसत.

विटेनागेमोट : अँग्लोसॅक्सन राजे राज्य करीत असता त्यास विटेनागेमोटचा किंवा शहाण्यांच्या सभेचा प्रत्येक महत्त्वाच्या कामात सल्ला घेणे, जे रिवाजाने भाग पडत असे, हेच काय ते त्यांच्या सत्तेवर फार महत्त्वाचे असे नियतबंधन असे.

विटेनागेमोट सभेची उत्पत्ती : मूळच्या जर्मन लोकांमध्ये महत्त्वाच्या कामात निकाल सर्व स्वतंत्र मनुष्याच्या सभेकडून होत असे. या सभेत वादविवादांचे काम मुख्यत्वेकरून लोकांच्या पुढाऱ्यांकडून होत असले पाहिजे. जेव्हा अँग्ल आणि सॅक्सन लोक ब्रिटन देशात वसाहत करून राहिले तेव्हा त्यांच्या ताब्यात जसजसा जास्त मुलूख येऊ लागला तसतसे राष्ट्रीय सभेस लोक थोडथोडे येऊ लागले. या सभेस राजा व लोकांचे पुढारी हे मात्र नेहमी येत असत; पण साधारण लोकांपैकी जे जवळ जवळ राहत असत त्यांचाच काय तो येण्याचा संभव जास्त असला पाहिजे अशा रीतीने त्यांची संख्या लहान असल्याने त्यांचे वजनही फारसे पडत नसले पाहिजे. याप्रमाणे राष्ट्रीय सभेच्या ऐवजी पुढाऱ्यांच्या सभेची स्थापना हळूहळू झाली असली पाहिजे.

विटेनागेमोट सभेची रचना : ही सभा नेहमी लहान असे. या सभेचा राजा अध्यक्ष असे, कधी कधी राणी व राजपुत्र राजाबरोबर या सभेस जात असत. त्याचप्रमाणे राजाचे मित्र, प्रधान, खानगीतील मुख्य अधिकारी, राजाचे थेन व जेसिथ, हे ही या सभेस जात असत. वेगवेगळ्या शायरचे आल्डरमॅन व बिशप या सभेतील सभासदांपैकी असत. इ.स. ९६६ मध्ये एजगर राजाचे विटेनागेमोट सभेत त्याची आई, दोन आर्चबिशप, सात बिशप, पाच आल्डरमेन आणि पंधरा राजाचे नोकर, इतके सभासद होते. यावरून ही सभा लोकनियुक्त सभासद आपण ज्यास म्हणतो त्यांची नव्हती हे उघड आहे. नॉर्मन लोकांनी इंग्लिश लोक जिंकून घेतल्यावर याच सभेचे नॉर्मनराजांनी महन्मंत्रिमंडळ बनविले आणि यासच पुढे बड्या लोकांची सभा हे स्वरूप प्राप्त झाले. विटेनागेमोट सभेची कामे केल्याचे जे दाखले आहेत, त्यात मधून मधून सर्व लोकांची संमती घेतली असे लिहिले आहे. ज्या स्वतंत्र लोकांना विशेष त्रास न पडता ते त्या सभेच्या जागेवर राहणारे असल्यामुळे जाता आले असले पाहिजे, त्या लोकांची ही संमती बहुतकरून असावी असे वाटते.

विटेनागेमोट सभेचे अधिकार : राजा जी मोठाली महत्त्वाची सार्वजनिक कामे करीत असे, त्या सर्व कामात विटेनागेमोट सभेचे अंग असे. राजा या सभेच्या सल्ल्याप्रमाणे व अनमतीने कायदे करीत असे, इनामी जमीन देत असे, इनसाफ करीत असे व लढाई करणे किंवा तह करणे वगैरे राजनीतीच्या ठोकळ धोरणाची काम करीत असे; म्हणजे राजाला निवडणे किंवा पदच्युत करणे ही कामे ही सभा साधारण राष्ट्रसभा भरवून करीत असे; परंतु शांततेच्या वेळी राजावर या सभेचा खरोखर किती दाब असे हे सांगणे मात्र कठीण आहे.

समाप्ती : याप्रमाणे अँग्लोसॅक्सन लोकांची राज्यव्यवस्था होती. ती साधी असून जुलमी नव्हती. राष्ट्रीयशासन पद्धतीतील ढिलाई हेच तिच्या मधील मोठे व्यंग होते. ज्यावेळेस

डेन्मार्क देशांतील लोकांनी इंग्लंडवर स्वाऱ्या केल्या त्यावेळेस ही ढिलाई व्यक्त झाली व अखेरीस डेन लोकांनी इंग्लंड हस्तगत केले. या राज्यव्यवस्थेतील मोठा गुण म्हटला म्हणजे तिच्यातील स्थानिक संस्थांमधील जोम हा होय. नॉर्मन लोकांनी इंग्लंड जिंकून घेतल्यावरही या संस्था अस्तित्वात होत्या आणि याच संस्थांनी इंग्लिश पार्लमेंट सभेची स्थापना होई तोपर्यंत लोकांमध्ये स्वातंत्र्य प्रेम जागृत ठेवले होते.

○○○

भाग ३रा

वेसेक्स राज्याच्या वर्चस्वाच्या प्रारंभापासून तो इंग्लंड नॉर्मन लोकांनी जिंकून घेई तोपर्यंत इ.स. ८०२-१०६६

उपोद्घात : मागील भागात सांगितलेली राज्यव्यवस्था इंग्लंड नॉर्मन लोकांनी जिंकून घेई तोपर्यंत चालली; परंतु हा विजय होण्याच्यापूर्वी पुष्कळ दिवस, इंग्लंडच्या सामाजिक आणि राजकीय स्थितीत हळूहळू अंतर पडत चालले होते, या स्थित्यंतरास खरे नाव देणे म्हणजे फ्यूडॅलिझमची वाढ म्हणणेच बरोबर होईल.

फ्यूडॅलिझम् म्हणजे काय : या संस्थेच्या नियमाप्रमाणे प्रत्येक मनुष्याचा राजकीय हक्क आणि कर्तव्याचा संबंध, त्याचा जमिनीशी जसा संबंध असेल, त्याप्रमाणे ठरविलेला असे. या अशा प्रकारच्या फ्यूडल राज्यांमध्ये प्रत्येक इसमाला ज्या धन्यापासून त्याला जमीन मिळाली असे, त्या धन्याची सेवा करण्यास व त्याच्याशी इनाम राखण्यास तो बांधलेला असे व त्याच्या ऐवजी त्याच्या धन्याला त्याचे संरक्षण करावे लागत असे. सर्व राज्याचा अतिशय मोठा जमीनदार राजा असे. ज्या लोकांना खुद्द राजापासून जमीन मिळालेली असे ते लोक सर्वात श्रेष्ठ वर्गाचे मानले जात असत. या वर्गाला टेनटइनचीफ म्हणजे मुख्य कुळे असे नाव असे व याजपासून दुसऱ्या लोकांना कुळे म्हणून जमिनी दिलेल्या असत. ते लोक अर्थात् या मुख्य कुळांहून कमी दर्जाचे मानले जात असत. प्रत्येक अमीर त्याचे खालच्या दर्जाच्या वर्गाचा न्याय निवडीत असे, त्यास त्यावर कर बसविण्याचा हक्क असे व त्या वर्गाचा तो सेनाधिपती असे. खुद्द राजाच्या अमलाखाली सर्वात उच्चवर्गाचे मात्र लोक असत; या वर्गातील प्रत्येकजण एक छोटेखानी राजा असे; त्याच्या ताब्यात मुलूख असे. त्याच्या स्वाधीन किल्ले असत, त्याचे स्वतःचे सैन्य असे, त्याच्या न्यायसभा असत व त्याचा खजिना असे. या लोकांची जी कुळे असत त्यांनाही आपल्या धन्याप्रमाणे लहानसा राजा बनता येत असे. जे जमिनीची स्वतः लागवड करीत असत त्यांचा वर्ग सर्वांच्या खाली असे. प्रस्तुत प्रसंगी राष्ट्रीय शासन ज्या लोकांच्या हाती असे त्यांच्या हातात जी सत्ता एकवटून

राहिलेली होती ती या फ्यूडल (जहागीरदारी) व्यवस्थेमुळे पुष्कळशा एकाहून एक अधिक अशा दर्जाच्या राजकर्त्यांमध्ये वाटली गेली. त्यावेळी अमीर हे बलाढ्या असल्यामुळे राजा निर्बल होऊन गेला होता व उद्धट लोकांवर दाब ठेवण्यास समर्थ असा कोणी निःपक्षपाती सत्ताधीश नसल्यामुळे अगदी खालच्या प्रतीच्या लोकांना जुलूम भोगावा लागत असे; परंतु वरच्या प्रतीच्या लोकांना राजकीय स्वातंत्र्य भोगावयास सापडत असे व ते त्याला उत्तम रीतीने चाहत असत. फ्यूडॅलीझम या व्यवस्थेने चांगल्या राज्यव्यवस्थेस हरकत येत असे तरी; पण ती अमलात असल्याने अनिर्बंध शासनास ही प्रतिबंधक होत असे.

फ्यूडॅलिझमची वाढ ही केव्हा व कोठे झाली : ही व्यवस्था रोमन लोकांच्या साम्राज्याच्या वेळी प्रचारात नव्हती किंवा जर्मन लोक ज्या वेळी जर्मनीत राहत होते तेव्हाही त्यांच्यात नव्हती. जर्मन जातींनी जेव्हा रोमन लोकांचे प्रांत हस्तगत केले तेव्हा या संस्थेचा उदय पश्चिम युरोपात झाला. पूर्वी बेनिफीस व कॉमेन्डेशन या दोन ज्या वहिवाटी चालू होत्या त्यांजपासून फ्यूडॅलिझम या व्यवस्थेचा उगम झाला असावा असे वाटते.

१. बेनिफीस देणे : येथे बेनिफीस या शब्दाचा धर्मसंस्थेशी काही एक संबंध नाही. रोमन लोकांचे प्रांत जिंकून घेण्याचे कामी ज्या योध्यांनी जर्मन राजास साह्य केले होते त्यास त्यांनी ज्या जमिनी इनाम दिल्या होत्या त्यास हे नाव असे. याप्रमाणे हे योद्धे जिंकलेल्या लोकांनी आबादीत आणलेल्या मोठमोठाल्या प्रांताचे एकदम जमीनदार व सुभे बनले. जिंकलेले लोक हे त्यांची कुळे व प्रजा बनले.

२. कॉमेन्डेशन : एकाने दुसऱ्याचे स्वामित्व कबूल करावे व त्याजबद्दल त्याने त्याचे संरक्षण करण्याचे कबूल करावे या वहिवाटीस कॉमेन्डेशन म्हणत; रोमन साम्राज्य नाहीसे झाल्यावर जी बेबंदशाही सुरू झाली तिजमुळे ही वहिवाट सुरू झाली. ही बेबंदशाही कित्येक शतके अशीच चालू होती; जेव्हा एखादा मधूनमधून मोठा राजकर्ता उत्पन्न होई तेव्हा मात्र हिला खंड पडत असे. बहुतकरून जे बलाढ्य असत ते त्यांना वाटेल ते करीत व त्यामुळे गरीब लोकांचे हाल होत असत आणि म्हणूनच ज्या स्वातंत्र्यापासून त्यास सुखोत्पत्ती होत नसे ते स्वातंत्र्य दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यास लोक खुश असत. मुळीच राजा नसण्यापेक्षा मग जुलमी का असेना, तो बरा वाटत असे. ज्याला एखाद्या अमिराचे स्वामित्व कबूल करावयाचे असे तो त्याजपुढे गुडघे टेकून आपले हात त्याच्या हातात घाली व मी तुमच्याशी इमानाने वागेन अशी शपथ घेई. या त्याचे स्वामित्व कबूल करण्याबद्दल तो अमीर मी सर्व शत्रूंपासून तुझे रक्षण करीन असे कबूल करी.

याप्रमाणेच मुख्यत्वेकरून सर्व पश्चिम युरोपभर अशा लहान लहान शेकडो मंडळ्या बनून राहिलेल्या होत्या व प्रत्येक मंडळीचा फ्यूडॅलिझम संस्थेच्या पद्धतीप्रमाणे एक एक प्रभू असे व त्याची आज्ञा मानण्यास ती मंडळी बांधली गेली असे. बहुधा या लहान मंडळीचा मुख्य त्याच्याही पेक्षा मोठ्या अशा अमिराचा आज्ञांकित असे. याप्रमाणे या लहान लहान

मंडळया मिळून मोठमोठ्या मंडळया होत व मोठमोठ्या मंडळया मिळून मोठमोठाली राज्ये होत असत; परंतु असे त्यांना बंधन जितक्या मोठ्या प्रमाणावर असेल तितके ते ढिले असावयाचेच. राजे फक्त नामधारी असत व बेकायदेशीर बेबंदशाही फार असे. एका मनुष्याने काढलेल्या राजकीय धोरणाचे किंवा कायद्याचे फ्यूडॅलिझम हे फळ नव्हते. ती हळू हळू व वेगवेगळया रूपांनी वाढत गेली; परंतु नवव्या शतकाच्या शेवटी फ्यूडॅलिझमचे ठाणे सर्व पश्चिम युरोपभर बसून राहिले होते.

अँग्लोसॅक्सन राज्याचा फ्यूडॅलिझमकडे कल : दुसऱ्या देशापेक्षा पुष्कळ उशिराने फ्यूडॅलिझमचा पूर्णपणे अंमल इंग्लंडवर बसला. जर्मन लोकांनी जिंकून घेतलेल्या दुसऱ्या प्रदेशातील मूळच्या राहणाऱ्या लोकांच्या संख्येपेक्षा ब्रिटन देशात तशा प्रकारच्या लोकांची संख्या लहान होती हे एक असे होण्यास कारण होते. गॉल देशात फ्रँकलोक व स्पेन देशात गॉथ हे नुसते बडे लोक होऊन बसले होते; पण इंग्लंडमध्ये अँगल व सॅक्सन लोकांची मोठी संख्या तेथील रहिवाशांत समावून गेली होती; म्हणून इंग्लंडमध्ये स्वातंत्र्य व समानपणा यासंबंधींच्या जुन्या जर्मन लोकांच्या कल्पना जास्त दृढ झाल्या होत्या. इंग्लिश लोकांमध्ये व त्यांच्या शेजारच्या लोकांमध्ये समुद्र असल्यामुळे त्यांना शेजारच्या रीतिभातीचे अनुकरण करणे म्हणजे बरेच कमी संभवाचे होते, म्हणून वर प्रमाणे इंग्लंडमध्ये स्थिती असण्याचे आणखी एक कारण होते. फ्यूडॅलिझम ही संस्था इंग्लंडमध्ये उशिरा आली असल्याने ती नॉर्मन लोकांनी इंग्लंड जिकले तेव्हा तेथे आली असे मानीत असत; परंतु असे मानणे चुकीचे होय. नॉर्मन लोकांनी इंग्लंड जिंकून घेण्याच्या पूर्वीच या संस्थेचा प्रसार तेथे पुष्कळ झालेला होता. नॉर्मन लोकांनी एकसारख्या वाढत आलेल्या या संस्थेला पूर्णत्वाचे स्वरूप मात्र आणले. यावेळी इंग्लंडमध्ये जी स्थित्यंतरे झाली ती फार सावकाश झाली, त्यासंबंधी दफ्तरी पुरावा आपल्याजवळ फारच कमी आहे; परंतु त्या वेळचे समाजाचे वेगवेगळया वर्गावर जे एकामागून एक परिणाम घडून आले ते सर्व लक्षात घेतले म्हणजे त्या सर्वांचा कल फ्यूडॅलिझम संस्थेचा पाया इंग्लंडमध्ये पडावा इकडेच होता, असे आपणास वाटेल.

राजा : या सुमारास पहिल्याने राजाला सत्ता मिळाली व नंतर ती त्याची गेली. अँग्लोसॅक्सन राजे आपल्या प्रजेचे सेनानायक असत. इंग्लिश लोकांची व डेन्मार्क येथील लोकांची फार वर्षे लढाई चालू होती तिजमुळे इंग्लिशलोकांना कोणीतरी एक पुढारी नेमण्याची सारखी जरूर पडून राहिली होती व ही अशी स्थिती असल्यामुळे राजा व प्रजा यांचे बंधन दृढ होऊन राहिले होते. आल्फ्रेड व त्याचे मागून जे राजे गादीवर बसले ते मोठे लढवय्ये व राजकारस्थानी पुरुष होऊन गेले व त्यांनी आपल्या राजपदाला मोठी शोभा आणिली. आल्फ्रेड मेल्यानंतरही पुष्कळ वर्षे त्याचे राज्य एकसारखे वाढतच होते आणि एजगार (इ.स. ९५७-९७५) याला तर सर्व ब्रिटनचा चक्रवर्ती मानीत असत. हे असे झाल्याने सर्व राजसत्ता अधिकच वाढत गेली. यामुळे विटेन सभेचा राजावरील अंमल बराच कमी झाला व त्यामळे तो मख्येत्वेकरून या सभेच्या मताशिवाय लोकांस जमिनी इनाम देऊ

लागला.

परंतु एजगार राजाच्या नंतर वाईट आणि निर्बल राजे गादीवर बसले. डेन लोकांनी इंग्लंडवर पुन्हा स्वाऱ्या सुरू करून त्यांनी तेथे फार नासाडी केली. राजाला बिटेन सभेचे मताशिवाय जमिनी इनाम देण्याची जी ही सत्ता मिळाली होती तिजमुळेच त्याची सत्ता कमी होत गेली; कारण जमीन इनाम द्यावयाची म्हणजे तिजवर जे लोक राहत असतील त्या सर्वांवरची सत्ताही देऊन टाकण्याची त्यावेळेस राजांची वहिवाट असे; याप्रमाणे या वेळच्या राजेलोकांनी ज्यांची आपल्या जमिनीवर राहणाऱ्या लोकांवर पूर्ण सत्ता होती अशा प्रकारच्या जमीनदारांचा एक नवा वर्गच स्थापन केला; खरोखर हे जमीनदार म्हणजे फ्यूडल पद्धतीतील अमीरच होत असे म्हटले तरी चालेल. जेव्हा कॅन्यूट राजाने इंग्लंड जिंकून घेतले तेव्हा त्याने त्याची चार मोठी अर्लडम्स् (अर्ल या नावाच्या बडे लोकांच्या ताब्यातील प्रांत) पाडिली. या भागाच्या व पूर्वीच्या वेसेक्स, मर्शिआ, नार्दब्रिया व पूर्वअँग्लिया या राज्यांच्या मर्यादा एकच होत्या. कॅन्यूट राजाच्या मरणानंतर हे चार भागांवरील अर्लस् राजापेक्षाही बलवान होऊन बसले. एडवर्ड घी कनफेसर याच्या सर्व कारकीर्दीभर या चौघा बड्या सरदारांमध्ये एक सारखे तंटे चालूच होते. एडवर्ड मेल्यानंतर वेसेक्सचा अर्ल जो गॉडविन त्याच्या मुलाने म्हणजे हॅरोल्ड याने गादी बळकाविली. बाकीच्या इंग्लंडच्या लोकांना गॉडविन याचे घराणे विशेषसे आवडत नसल्यामुळे त्याचा हेस्टिंग्स येथे पराभव झाला.

बडे लोक : अँग्लोसॅक्सन राजाच्या वेळी कुलीन घराण्यातील लोक, थेन व अर्ल हे कालमानाने फार बलाढ्य होत गेले. ही बलाढ्यता तीन तऱ्हेने म्हणजे (१) कुलीन वंशांत जन्म घेतल्याने, (२) उत्तम राजसेवा केल्याने व (३) रगड पैसा जवळ असल्याने प्राप्त झालेली होती.

कुलीन बडे लोक : पहिल्यापासूनच जर्मन जातीत उच्च कुळांची कुटुंबे असत; परंतु जेव्हा अगोदरची ब्रिटनमधील लहान लहान राज्ये मोडून सात मोठमोठाली राज्ये झाली व ही मोडून जेव्हा एकच मोठे राज्य झाले तेव्हा या पदच्युत झालेल्या राजकुटुंबांनी कुलीन बडे लोकांची संख्या अधिकच वाढली.

राजसेवक बड़े लोक : अँग्लोसॅक्सन राजाचे पदरी स्वतंत्र जन्मलेल्या अनुयायांचा मोठा भरणा असे व ते त्यांच्या खानगीत किंवा युद्धप्रसंगी त्यांची चाकरी करीत हेही आपणास माहीत आहेच. या अनुयायांना जेसिथ किंवा थेन असे म्हणत असत. जो जो राजाचे वैभव वाढत गेले तो तो यांचेही वैभव वाढत गेले. राजा यांच्या चाकरीबद्दल त्यास बहुतकरून जमिनी इनाम देत असे व त्यामुळे हे श्रीमंत व बलाढ्य होऊन राहिले होते.

संपन्न बडे लोक : राजे लोकांची चाकरी करून जे लोक बडे झाले होते त्यास राजे लोक जमिनी इनाम देत असत, हे वर सांगितलेच आहे; परंतु दुसऱ्या लोकानांही जमिनी मिळवून बडे होणे संभवनीय होते. चर्ल म्हणजे अगदी खालच्या वर्गाचे स्वतंत्र लोक होत.

याजपैकी जर कोणी पाच हाईड (किंवा ५०० एकर) जमीन मिळविली तर तो थेन होत असे व जो चर्ल ४० हाईड जमीन संपादन करी तो अर्ल होत असे. व्यापार धंद्यात यश मिळविलेल्या मनुष्यासही थेन होता येत असे; पण अशा स्थितीत तो बहुतकरून जमीनदार होण्याचा यत्न करीत असावा. अशा प्रसंगी राजाची चाकरी करूनच मनुष्याला बडेपणा मिळविण्याची योग्यता प्राप्त होते ही गोष्ट नावाला मात्र शिल्लक राहिली होती.

सरते शेवटी ज्या बडे लोकांच्या तीन वंशातीलच लोक असत त्यात आता जमीनदारांचाच भरणा होऊन राहिला. कुलीन बडे लोकांच्या ऐवजी जमीनदार बडे लोक झाले. राजा ज्या अर्थी पुष्कळ वेळा जमिनीबरोबर सर्व सत्ताही देऊन टाकीत असे, त्याअर्थी हे जमीनदार बड़े लोक म्हणजे बहुतेक फ्यूडल (मोकाशी) बडे लोकांसारखेच होत असे म्हटले तरी चालेल. कॅन्यूट राजाने जेव्हा राजाची बहुतेक सत्ता देऊन इंग्लंडच्या चार भागांवर चार अर्ल नेमले तेव्हा हे स्थित्यंतर अधिकच झाले.

अँग्लोसॅक्सन बडे लोक हे सर्वस्वी फ्यूडल पद्धतीचे (मोकासपणाचे) नव्हते : अँग्लोसॅक्सन राज्याच्या शेवटी शेवटी देखील बडे लोक सर्वस्वी फ्यूडल पद्धतीचे नव्हते. प्रत्येक बडा मनुष्य हा राजाचे कूळ आहे किंवा राजा हा सर्व जमिनीचा मालक आहे अशी त्या वेळेस लोकांची समजूत नव्हती. जमिनीचे लागवड करणारे हे मोठमोठाल्या बडे लोकांची कुळे आहेत असेही सर्वांचे एक मत नव्हते; पुष्कळ बड्या लोकांची त्यांच्या जमिनीवर राहणाऱ्या लोकांवर सत्ता होती; परंतु जुन्या लोकन्यायसभांवर व मुख्यत्वेकरून शायरच्या न्यायसभेवर त्यांचा अंमल नसे. बडे लोकच काय ते सत्ताधारी आहेत अशी लोकांची समजूत नव्हती.

स्वतंत्र लोक : या काळी स्वतंत्र लोकांपैकी बहुतेकांचा मान फार कमी झाला होता असे वाटते. जेव्हा जर्मन जाती ब्रिटन येथे वसाहत करून राहिल्या तेव्हा प्रत्येक स्वतंत्र मनुष्याला राजकीय सत्ता असे; त्याला राष्ट्रीय सभेस जाण्याचा व प्रत्येक सार्वजनिक कामात आपले मत देण्याचा अधिकार असे. या शिवाय तो योद्धा असे आणि म्हणूनच त्याला लढावयाचा हक्क असे व त्याला रणक्षेत्रावर चाकरी करणे भाग पडत असे. त्याची मालकीची जमीन असो वा नसो तो जातीने पूर्णपणे स्वतंत्र असे. नॉर्मन लोकांनी जिंकून घेण्यापूर्वी इंग्लंडमध्ये या सर्व गोष्टीत फार फरक पडला होता.

राजकीय हक्क : संयुक्त अँग्लोसॅक्सन राज्यामध्ये लोकसभा ही संस्था फक्त नावाचीच होऊन राहिली होती हे आपण पाहिले आहे. राजाच्या सत्तेवर दाब म्हटला म्हणजे विटेनागेमोट या सभेचाच होता. याप्रमाणे स्वतंत्र मनुष्यांपैकी बहुतेकांचे बहुतेक राजकीय हक्क नाहीसे झाले होते; परंतु या लोकांनी ग्राम संस्थेच्या हंड्रेडच्या व शायरच्या सभांमध्ये आपले हक्क उत्तम राखले होते व या सभाही या कालपर्यंत पूर्ण जोमात होत्या. अजून पावेतो जरी त्यांना राष्ट्रीय राज्यकारभारात वाटा मिळत नसे तरी स्थानिक राज्यकारभारात

त्यांना वाटा मिळत असे.

लष्करी चाकरी : अजूनही कायद्याप्रमाणे प्रत्येक स्वतंत्र मनुष्याला सैन्यामध्ये चाकरी करणे भाग होते. गरज लागेल त्यावेळी मात्र लढावे नाहीतर आपला धंदा असेल तो करावा अशी फौज कायद्याने कमी केली नव्हती; परंतु जसजशी सुधारणा जास्त वाढत चालली तसतसा शिपायांचा सरंजामही जास्त किमतीचा होत चालला; त्यामुळे शिपाईगिरीचा लोक कंटाळा करू लागले. बहुतेकप्रसंगी फक्त जमीनदारांनाच अशी चाकरी करणे भाग पाडलेले असे. जमीनदारांना प्रत्येक हाईड जमिनीबद्दल एक सशस्त्र शिपाई याप्रमाणे लढाईचे वेळी शिपाई पाठवावे लागत असत. यामुळे बाकीचे सर्व लोक बिन लढाऊ झाले व याच स्थित्यंतरामुळे नॉर्मन व डेन लोकांना इंग्लंड सहज हस्तगत करून घेता आले.

जातस्वातंत्र्य : काल गतीने स्वतंत्र लोकांपैकी बहुतेक लोक हळूहळू परावलंबी होत गेले. नवव्या शतकामध्ये डॅनिश लोकांनी स्वाऱ्या केल्यामुळे जो घोटाळा झाला त्यावेळी इंग्लंडात परकी मनुष्याचे स्वामित्व कबूल करण्याची वहिवाट झपाट्याने प्रचारात आली. याप्रमाणे पुष्कळ स्वतंत्र मनुष्यांनी मोठमोठ्या लोकांच्या स्वाधीन होऊन आपले संरक्षण पूर्वीपेक्षा चांगले करून घेतले. जेव्हा डेन लोकांचा पराभव झाला तेव्हा शांतता व बंदोबस्त राखण्यासाठी जे कायदे अँग्लोसॅक्सन राजांनी केले ते गरीब लोकांच्या स्वातंत्र्याला प्रतिकूल होते. ज्या मनुष्याची स्वतःच्या मालकीची जमीन नसेल त्याने आपला मोसबा देण्यास कोणी तरी धनी उभा केला पाहिजे असा अथेल्स्टनच्या वेळचा एक कायदा होता. याप्रमाणे ज्या स्वतंत्र मनुष्यांची जमीन नव्हती अशा स्वतंत्र लोकांना एखाद्या जमीनदाराचे दास बनावे लागले.

धर्मसंस्था : अलीकडील अँग्लोसॅक्सन राजांच्या वेळी धर्मसंस्था या फार श्रीमंत झाल्या होत्या व त्यामुळे धर्मोपदेशक लोकांचा उत्साहही कमी झाला होता. राज्याच्या कारभारात धर्मोपदेशकांचे वजन फार असे; परंतु डन्स्टनच्या नंतर त्या वेळच्या आलेल्या संकटांचा परिहार करणारा एकही धर्मोपदेशक राजकार्यधुरंधर निपजला नाही. इंग्लंड हे (रोमशी) दुसऱ्या देशापेक्षा जास्त स्वतंत्रपणे वागत असे आणि म्हणून ज्या वेळेस विल्यम धी नॉर्मन याने इंग्लंडवर आपली स्वारी करण्याचा बेत केला त्या वेळेस पोपने आपली त्याला संमती दिली.

साधारण अनुमाने : या काळाच्या शेवटी इंग्लिश लोकांच्या मूळच्या ज्या संस्था होत्या त्यांनी त्यांच्या गरजा भागेनाशा झाल्या होत्या व सर्व गरजा भागतील अशा संस्था त्यांना त्यावेळेस सापडल्या नव्हत्या. एखाद्या लहानशा जर्मन लोकांच्या जातीत सर्व स्वतंत्र मनुष्यांच्या सभेला राज्यकारभार चालविता आला असता; परंतु जेथे लोकसमुदाय मोठा आहे तेथे हे असे होणे शक्य नव्हते; पण कोणत्याही तऱ्हेच्या प्रतिनिधी संस्थेला तिच्याऐवजी स्थळ मिळाले नव्हते. साधारण स्थितीच्या लोकांस अपाय करणारी अशी फ्यूडॅलिझम

(मोकासगिरी) मात्र एकसारखी वाढत होती; पण तिच्या अंगी असणारा जो मुख्य गुण म्हणजे लढवय्येपणा त्याची मात्र कोठेही जरूर लागत नव्हती. राजाला राज्याधिकार चालविण्याची पुरती सत्ता नसे. धर्मसंस्था आळशी होऊन बसली होती. चोहोबाजूंनी हुरूप येण्यास काही तरी नवे कारण उत्पन्न व्हावे, असे लोकांना वाटू लागले होते. इंग्लंड देश नॉर्मन लोकांनी जिंकून घेतल्यामुळे हे नवे कारण लोकांना हुरूप येण्यास आयतेच मिळाले.

❍❍❍

भाग ४ था

नॉर्मन राजे

इ.स. १०६६-११५४

उपोद्धात : फ्यूडॅलिझम म्हणजे काय हे आपण पाहिलेच आहे. या संस्थेची नॉर्मन लोकांनी इंग्लंड जिंकून घेण्यापूर्वी इंग्लंडात बरीच प्रगती झाली होती हेही आपण पाहिलेच आहे. नॉर्मन लोकांनी इंग्लंड जिंकून घेतल्यामुळे तेथे फ्यूडॅलिझम या संस्थेवर दोन तऱ्हेचा परिणाम झाला. एक या संस्थेची वृद्धी झाली व दुसरे तिचा हासही झाला.

नॉर्मन लोकांनी इंग्लंड जिंकून घेतल्यामुळे फ्यूडॅलिझम या संस्थेची वृद्धी कशी झाली : हेस्टिंग्सची लढाई ज्यावेळी झाली त्यावेळी इंग्लंड हे अर्धे फ्यूडल होते. विजयी विल्यम ज्या देशातून आला तो देश पूर्ण फ्यूडल होता म्हणून त्याने व त्याच्या अनुयायांनी इंग्लंडमध्ये जमिनीवरच्या सत्तेच्या संबंधाने आपली (फ्यूडल) मततत्त्वे झपाट्याने स्थापित केली. या मततत्त्वाप्रमाणे प्रत्येक मनुष्य जमिनीवरील स्वामित्वासंबंधाने राजाचे किंवा दुसऱ्या कोणत्या तरी बड्या मनुष्याचे कूळ आहे, असे होते. त्या नॉर्मन विजयामुळे इंग्लंडातील बहुतेक जमीन जी इंग्लिश जमीनदारांच्या हाती होती, ती जप्त झाली. ही सर्व जमीन विल्यमने आपल्या अनुयायांना त्यांनी त्याची नोकरी केली म्हणून फ्यूडल संस्थेप्रमाणे आम्ही तुमची कुळे आहोत असे त्याजपासून कबूल करवून व त्याचप्रमाणे तुमच्या राज्यात आम्ही आपल्या खर्चाने एक सैन्य ठेवू असे कबूल करवून त्यास इनाम देऊन टाकिली होती. याप्रमाणे इंग्लंड देशापेक्षा जेथे फ्यूडॅलिझम या संस्थेचा अधिक जोर होता त्या ठिकाणचे नॉर्मनवकील राहणारे असल्यामुळे ते जमीन कुळांकडे कशी का असेना, मग ती इंग्लिशांच्या ताब्यात असो वा नॉर्मन लोकांच्या ताब्यात असो ती फ्यूडल संस्थेप्रमाणेच त्यांच्या कब्जात आहे असे मानीत असत. नॉर्मन विजयामुळे इंग्लंडात फ्यूडल संस्थेची वाढ झपाट्याने झाली व पूर्वीपेक्षा इंग्लिश लोकसमाज जास्त फ्यूडल झाला.

नॉर्मन विजयाने फ्यूडॅलिझम या पद्धतीचा अवरोध कसा झाला : फ्यूडल पद्धतीप्रमाणे बडेलोक जर बलवान झाले तर ते नेहमी शिरजोर असत, असा अनुभव विल्यम राजाला येऊन चुकला होता. नॉर्मंडीचा ड्यूक या नात्याने त्याचा फ्यूडल पद्धतीप्रमाणे धनी जो फ्रान्स देशचा राजा याच्याशी त्याने लढाई करून त्याचा पराभव केला होता. त्याला स्वतःला आपल्या बंडखोर फ्यूडल कुळांचा बंदोबस्त करण्यास फार त्रास पडला होता, म्हणून त्याने आपली इंग्लंडातील कुळे वाजवीपेक्षा जास्त बलवान न होऊ देण्याचा निश्चय केला होता व त्यासाठी त्याने पुढील उपाय योजिले होते :

१. ग्रामसंस्था : हंड्रेड व शायर यांच्यामध्ये ज्या जुन्या स्थानिक सभा होत्या त्यांचा नाश न करिता त्याने मान ठेवून त्यांचे रक्षण केले. इंग्लिश लोक या सभांस येऊन आपापली स्थानिक कामे करीत व आपल्या तंट्यांचा निकाल करून घेत. याप्रमाणे इंग्लिश लोकांच्या सहकार्य करण्याविषयीच्या व स्वराज्याच्या संबंधांच्या सवयी कायम राहिल्या व त्यामुळे ते केवळ दरिद्री व निराधार शेतकरीच होऊन बसले नव्हते. त्यांचे राष्ट्रीयत्व कायम होते. जेव्हा नॉर्मन राजा आपल्या बड्या नॉर्मन लोकांबरोबर लढू लागला तेव्हा त्यांना पारडे फिरविता आले.

२. विल्यमने इंग्लंडच्या एकाच भागात एकाच मनुष्यास पुष्कळ जमीन न देण्याविषयी खबरदारी ठेविली होती. जेव्हा एखाद्या मित्राला किंवा अनुयायाला त्याला पुष्कळ जमीन द्यावयाची असे तेव्हा तो ती त्यास पुष्कळ पण वेगवेगळ्या ठिकाणी मिळून देत असे. या त्याच्या नियमाला सरहद्दीवरील दिलेल्या जमिनी मात्र अपवादभूत होत्या. डाम येथील बिशपला त्याने उत्तर प्रांताचे स्कॉट लोकांपासून रक्षण करावे म्हणून मोठी सलग जमीन जहागीर दिली होती. त्याचप्रमाणे चेशायर व श्रॉपशायर येथील अर्ल यांनाही त्यांनी पश्चिम इंग्लंडचे वेल्स लोकांपासून रक्षण करावे म्हणून मोठमोठ्या जहागिरी दिलेल्या होत्या. ज्याअर्थी, बहुतकरून सर्व नॉर्मन बडे लोकांना ज्या जमिनी दिल्या होत्या त्या चोहोकडे फाकलेल्या होत्या. त्यामुळे त्यांना जलदीने व गुप्त रीतीने सैन्य गोळा करिता येत नसे व त्यामुळे राजाविरुद्ध बंड करण्याचा संभवही विशेष कमीच असे.

३. इंग्लंडमधील सर्व लहान-मोठ्या जमीनदारांनी आपले स्वामित्व कबूल करावे व त्यांनी आपल्या आज्ञेशिवाय दुसऱ्या कोणाचीही आज्ञा मानू नये अशी विल्यमची इच्छा होती, म्हणून त्याने राजनिष्ठेची शपथ सर्वांपासून स्वतः घेतली. आपल्याला हे त्याचे करणे स्वाभाविक आहे असे वाटते; पण दुसऱ्या फ्यूडल देशामध्ये असे करण्याचा रिवाज नव्हता. जो बडा मनुष्य ज्या इसमास जमीन देईल त्या इसमाने फक्त त्या बड्या मनुष्याशी इमानाने वागण्याची शपथ घेण्याची दुसऱ्या देशात चाल असे. राज्यातील मुख्य कुळांना राजापासून जमीन मिळत असल्यामुळे ते त्याजपाशी इमानाने वागण्याची शपथ वाहत असत; परंतु त्यांची जी कुळे असत ती त्याजपाशी इमानाने वागण्याची शपथ वाहत, राजापाशी वाहत

नसत. जे त्यांच्या कुळांपासून जमिनी घेत ते त्या कुळांपाशी इमानाने वागण्याची शपथ घेत. उदाहरणार्थ नॉर्मंडीचा ड्यूक फ्रान्सच्या राजापाशी इमानाने वागण्याची शपथ घेई; पण नॉर्मंडीचे बॅरन इमानाची शपथ फक्त ड्यूकाजवळ घेत. जेव्हा नॉर्मंडीच्या ड्यूकाने राजाशी लढाई सुरू केली तेव्हा त्याच्या बॅरनांनी त्याच्याबरोबर लढाईस जाण्यास मुळीच मागे-पुढे पाहिले नाही. असे प्रकार आपल्या राज्यात घडू नयेत, असे विल्यमच्या मनात होते. इ.स. १०८६ मध्ये विल्यमने सॅलिसबरी येथे सर्व जमीनदारांची एक मोठी सभा भरविली होती व तीत सर्व जमीनदारांपासून त्यांनी आपल्या धन्याजवळ इमानाच्या घेतलेल्या शपथा रद्द व्हाव्यात, म्हणून त्यानेही शपथ घेवविली होती

केंद्रस्थ राज्यव्यवस्था : इंग्लंड देशात एक बलिष्ट केंद्रस्थ राज्यव्यवस्था स्थापन झाली हा एक दुसरा नॉर्मन विजयापासून फायदा झाला. अँग्लोसॅक्सन राजांचे वेळची इंग्लंडची शासन पद्धती म्हणण्यासारखी जोमदार नव्हती, राज्यात असलेली मनुष्ये व पैसा जितका म्हणून एकत्र होण्यासारखा होता तितका त्यांना कधीही एकत्र करिता आला नव्हता आणि त्यामुळे इंग्लंड हे दुसऱ्या लोकांच्या हस्तगत झाले. इंग्लंडात असलेल्या सर्व सैन्याचा उपयोग करण्याइतकी नॉर्मन राजांची शासन पद्धती समर्थ होती आणि ती अशी असल्यामुळे इंग्लंडचे त्यापुढे परचक्रापासून संरक्षणही झाले होते.

बलिष्ठ केंद्रस्थ राज्यव्यवस्थेची आवश्यकता : आपल्याला जर इंग्लंडावर राज्य करणे आहे, तर आपल्यास जोमदारपणाने राहिले पाहिजे, असे नॉर्मन राजांना कळून आले होते. त्यांना भय दोहो बाजूंनीही होते. ज्या इंग्लिश लोकांना त्यांनी जिंकले होते व ज्यांवर ते मोठ्या क्रूरतेने आपला राज्यकारभार चालवीत होते त्याजपासून त्यांना एका बाजूने भय होते. आपण इंग्लंड जिंकून त्यास मदत केली आहे तेव्हा आपणासही इंग्लंडावर धनीपणाचा हक्क सांगता येईल, असे नॉर्मन बडेलोकांस वाटत असल्यामुळे त्याजपासूनही त्यांना दुसऱ्या बाजूने भय होते.

नॉर्मनराजे बलिष्ठ केंद्र राज्यव्यवस्था स्थापन करण्यात कसे यशस्वी झाले : नॉर्मन राजांना या कामात यश येण्यास पुष्कळ कारणे झाली, एक कारण म्हटले तर त्यांचे अंगचे गुण होत. विजयी विल्यम, तांबडा विल्यम व पहिला हेन्री हे राजे बुद्धिमान, धैर्यवान व दृढनिश्चयी पुरुष होते. विजयी विल्यम व पहिला हेन्री हे राजे जरी लोभी होते तरी ते समजूतदार होते व जे आपल्याला शरण आलेले आहेत त्यांचे रक्षण कसे करावे हे ते जाणून होते. इंग्लिश व नॉर्मन लोकांत जी दुफळी होती तेही नॉर्मन राजास यश येण्यास दुसरे कारण झाले होते. नॉर्मन बडे लोकांच्या जुलमापासून आपले रक्षण करण्यास राजाशिवाय दुसरा त्राता कोणी नाही हे जेव्हा इंग्लिश लोकांना खास कळून आले तेव्हा ते राजाचे अनुयायी होऊन राहिले. कोणतेही फ्यूडल कूळ वाजवीपेक्षा फाजील व बलिष्ठ न होऊ देण्यास विल्यमने विजयानंतर जे उपाय योजिले होते तेही त्याला यश येण्यास तिसरे कारण झाले.

या केंद्रस्थ राज्यव्यवस्थेत कोण कोण लोक होते हे आपणास कळले म्हणजे तिची शक्ती कशी होती हे आपणास सहज कळण्यासारखे आहे, म्हणून आपण राजा, महामंत्रिमंडळ व राजाने नेमलेले कारभारी, यांची काय काय कामे होती ती पाहू या.

राजा : इंग्लंडात जे राजे होऊन गेले त्या सर्वांपेक्षा नॉर्मन राजांचे शासन हे जास्त अनिर्बंध होते. हे या राजांचे अनिर्बंध शासन कोणत्याही एका कायद्यापासून त्यास प्राप्त झालेले नव्हते. एडवर्ड धी कन्फेसर या राजाचा वारस म्हणून विजयी विल्यम आपला हक्क इंग्लंडचे गादीवर सांगत असे; पण नॉर्मन विजयाने, ज्या जुन्या कल्पनांनी व वहिवाटीनी अँग्लोसॅक्सन राजांची सत्ता मर्यादित झाली होती त्या अगदी क्षीण होऊन गेल्या होत्या. आणखी ज्या फ्यूडल कल्पनांनी व वहिवाटींनी राजाचे सत्तेला आळा पडत असे त्यांचा जोर विल्यम व त्याचे मागून झालेल्या राजांनी चालू दिला नाही आणि म्हणूनच या नॉर्मन राजांवर कोणत्याही व्यवस्थित राज्यव्यवस्थेचा पगडा बसला नाही; पण जरी ते मनाला वाटेल तसा राज्यकारभार चालविणारे होते तरी दुसऱ्याच्या मदतीशिवाय राज्य चालविणे त्यांना कठीण पडू लागले, म्हणून त्यांच्या प्रजेपैकी जे बलिष्ठ होते त्यांचा सल्ला घेणे त्यांना हितावह वाटले.

महामंत्रिमंडळ : अँग्लोसॅक्सन लोकांची जशी विटेनागेमोट सभा होती तसे नॉर्मन लोकांचे हे महामंत्रिमंडळ (ग्रेट कौन्सिल) होय. विटेनागेमोट सभेमध्ये राज्यातील व धर्मसंस्थेतील मुख्य अधिकारी असत व त्याजशिवाय राजाच्या खास विश्वासातील मनुष्ये असत. या ग्रेट कौन्सिलातही आर्चबिशप, बिशप व मोठमोठे ॲबट (मठाधिकारी) होतेच; या सभेतील बाकीचे सभासद बहुतकरून राजाची मुख्यकुळे या नात्याने बसत असत. परंतु या मुख्यकुळांच्या जहागिरी, सत्ता व मानमरातब यात अत्यंत अंतर असे. राजाची मोठमोठाली मुख्यकुळे, अर्ल व बॅरन, यासच बहुतकरून राजाला सल्ला मसलत देण्यास बोलावीत असत. सर्व स्वतंत्र लोकांनीही एक-दोन वेळा बोलविल्याचे आढळून येते. खरोखर पाहू गेले तर आपल्या मुख्य कुळांपैकी ज्यास वाटेल त्यास राजाचा बोलविण्याचा रिवाज असे.

विटेनागेमोट सभेमध्ये जे काम चालत असे तशाच बहुतेक प्रकारचे काम या ग्रेट कौन्सिलात चालत असे. कायदे करतेवेळी या ग्रेट कौन्सिलाचे मत अव्याहत घेण्यात येत असे व कधी-कधी कर बसवावयाचे वेळी या सभेचे मत घेत असत. लढाई करणे किंवा तह करणे वगैरे सार्वजनिक राजकीय गोष्टींचाही या सभेत ऊहापोह होत असे. कधी-कधी दिवाणी व फौजदारी कामात ही सभा वरिष्ठ न्यायाधीशाचेही काम करी.

या मोठ्या मंत्रिमंडळात जे वादविवाद होत असत ते बहुतकरून औपचारिक रीतीचे होत असत; परंतु या सभेतील कोणीही सभासदाने राजाचे इच्छेविरुद्ध आपले मत प्रकट केले असे कोठेही आढळून येत नाही. राजाला वाटल्यास त्यांचा तो सल्ला घेत असे; पण त्याप्रमाणेच त्याने चालावे अशाबद्दल काही तो बांधला गेला नसे. सर्व नॉर्मन बडे लोकांच्या तर्फेने किंवा

सर्व इंग्लिश राष्ट्राचे तर्फेने या सभेत येणारे सभासद नसल्यामुळे ही सभा कमजोर असे. तथापि, राजा अशी एक सभा (ग्रेट कौन्सिल) भरवितो व मी त्या सभेच्या सल्ल्याप्रमाणे वागतो असे म्हणतो ही जी काही गोष्ट आहे, त्या गोष्टीने राजा केवळ आपल्या इच्छेप्रमाणेच वागत नाही हा जो लोकांच्या मनातील ग्रह तो जागृत राहिला व त्याजमुळे अलीकडील नियम शासनबद्ध राज्यव्यवस्था स्थापन होण्याचा मार्ग खला राहिला.

राजकीय कारभार : नॉर्मन राजांनी इंग्लंडात राज्यकारभार करण्याची जी नवी तऱ्हा सुरू केली ती या विजयाचे एक लक्षात ठेवण्यासारखे फळ होय आणि म्हणूनच या कारभार पद्धतीत मुख्य मुख्य कोण होते व ते काय काय कामे करीत असत हे आपण पाहिले पाहिजे.

राज्यातील मोठमोठाले अधिकारी : नॉर्मन राजाचे कारकीर्दीत राजाचे खाजगी नोकरांपैकी स्टुअर्ड, बटलर व चेंबरलेन व फौजेतील मुख्य अधिकारी मार्शल आणि कॉन्स्टेबल हे, ज्यास आपण आता प्रधान म्हणून म्हणतो, त्याजबरोबर राज्यकारभार चालविण्याचे काम करीत असत. त्यावेळेसदेखील हे प्रधान म्हणजे जस्टिशिअर (मख्य प्रधान), चॅन्सेलर (चिटणीस) व ट्रेझरर (खजिनदार) हे बाकीच्या सर्व मुलकी अंमलदारांपेक्षा वजनदार असत. तेराव्या शतकात ही जस्टिशिअरची जागा रद्द झाली. अठराव्या शतकात ट्रेझररची कामगिरी कमिशनरांकडे सोपविली. चॅन्सेलरचे काम बहुतेक बदलून गेले आहे, म्हणून त्यावेळेस या प्रधानांकडे काय काय कामे होती ती आपण पाहू.

जस्टिशिअर (मुख्य प्रधान) : हा सर्व प्रधानांत मुख्य असे. विजयी विल्यमचे वेळी जेव्हा राजाला इंग्लंड सोडून जाणे भाग पडत असे तेव्हा हा अधिकारी त्याच्या मुतालिकाप्रमाणे काम करी. रुफस विल्यमच्या वेळी हा कायमचा मुख्य प्रधान झाला व त्याच्या ताब्यात सर्व राज्यकारभार आला. पहिल्या हेन्रीच्या वेळीही असेच चालले. हा अधिकार बहुतकरून एखाद्या धर्मोपदेशकाला देत असत. कारण या कामात बुद्धिमत्तेची जरूर विशेष लागत असे व धर्मोपदेशकाला लग्न करण्याचा प्रतिबंधच असल्याने त्याला मुलाबाळांचा पाश नसणे हे साहजिकच होते. त्यामुळे त्याला या अधिकाराबरोबर प्राप्त होणाऱ्या सत्तेचा व संपत्तीचा दुरुपयोगच करिता येत नसे, हे आणखी एक या अधिकारावर धर्मोपदेशक नेमण्याचे कारण होते.

चॅन्सेलर (चिटणीस) : नॉर्मन राजांच्या वेळचा चॅन्सेलर व अलीकडील चॅन्सेलर यात फार भेद आहे, अलीकडील चॅन्सेलर हा एक मोठा न्यायाधीश असे व त्याजकडे मुख्य काम न्यायाचे असे. नॉर्मन राजाच्या वेळचा चॅन्सेलर म्हटला म्हणजे राज्याच्या चिटणिसासारखा होता. त्याच्या हाताखाली पुष्कळ कारकून असत व तो त्यांच्या साहाय्याने राजाचा सर्व पत्रव्यवहार चालवी, न्यायाच्या कामास लागणारी सर्व कागदपत्रे तयार करी व राजाचा सर्व जमाखर्च ठेवी. हल्लीप्रमाणे त्यावेळी देखील, त्याचे स्वाधीन राजाची मोहोर असे. इंग्लंडच्या राजांपैकी एडवर्ड धी कनफेसर याने पहिल्याने चॅन्सेलर ठेविला व पहिली मोहोर

करविली. हा चॅन्सेलर नेहमी एखादा राजाच्या पदरच्या धर्मोपदेशकांपैकी एक असे. ज्या पडद्यामागे बसून या अधिकाऱ्याचे मदतनीस काम करीत असत, त्या पडद्यास लॅटीन भाषेत कॅनसेल्ली असे म्हणतात व याच शब्दापासून चॅन्सेलर या शब्दाची व्युत्पत्ती आहे.

ट्रेझरर (खजीनदार) : नॉर्मन राजांच्या वेळी या अधिकाऱ्याचे मुख्य काम म्हटले म्हणजे राजाचे खजिन्याचे रक्षण करणे हेच होते. त्यावेळी सार्वजनिक मत म्हणजे काय हे कोणास माहीत नव्हते. हल्ली सराफ्यात एखाद्या लहानशा संस्थानिकाला जितका पैसा उसना मिळतो त्याचा शतांशदेखील त्या वेळच्या अत्यंत बलिष्ठ राजास कोणी देत नसे, म्हणून प्रत्येक राजा आपणाजवळ रोकडीचा भरणा ठेवीत असे. हा भरणा या खजीनदाराच्या ताब्यात असे, परंतु त्याच्याकडे आणखी राज्यकारभाराचेही बरेच पुष्कळ काम असे.

राजाने नेमलेल्या अधिकाऱ्यांची कामे : जरी नॉर्मन राजांनी इंग्लंडच्या राज्यकारभार सुयंत्रित स्थापन केला होता तरी हल्ली सरकारला जी पुष्कळ कामे करावी लागतात त्यापैकी दोहो तीहीपेक्षा जास्त कामे त्यावेळी करावी लागत नसत, हे आपण लक्षात ठेविले पाहिजे. त्या वेळच्या सर्व कामांचा समावेश जमाबंदी, न्याय व युद्ध या तीन सदरांखाली होण्यासारखा होता. त्या वेळच्या राज्यव्यवस्थेप्रमाणे एक कायमची मंडळी असे. या मंडळीची दोन नावे असत. जमाबंदी कामे जेव्हा ही मंडळी करी तेव्हाचे एक व ती जेव्हा न्यायाचे काम करी तेव्हाचे एक. जमाबंदीच्या कामासंबंधीने ही मंडळी एक्सचेकर म्हणून प्रसिद्ध असे (ही मंडळी काम करण्यास ज्या मेजावर बसत असत त्या मेजावर चेकर्ड (चित्र विचित्र रंगाचे) कापड टाकिलेले, असे म्हणून चेकर्ड या शब्दावरून एक्सचेकर या शब्दाची उत्पत्ती झाली आहे. याच मंडळीला ती जेव्हा न्यायाचे काम करी तेव्हा क्युरिआ रेजिस असे म्हणत असत (क्युरिआ रेजिस या दोन लॅटीन शब्दांचा अर्थ राजाची न्यायसभा असा आहे); या दोन्ही मंडळ्यांचे सभासद एकच असत. या मंडळीचे वर सांगितलेले राज्यातील मोठे मोठे अधिकारी व राजाला पसंत पडतील ते लोक सभासद असत.

वर सांगितलेच आहे की, एक्सचेकर म्हणजे जमाबंदीचे खाते होय. ही मंडळी ईस्टर व मायकेलमास या दोन सणांच्या वेळी एकत्र होत असे व त्याचवेळी प्रत्येक शायरचे शेरिफापासून वसूल गोळा करीत असे. या शेरिफांवर त्यांचे शायरमधून येणारे जमाबंदीची जोखम असे. यावेळी चालणाऱ्या कामाचे तीन वेगळे वेगळे दाखले राखीत असत. एक दाखला खजीनदाराकडे राहत असे त्याला पाईपचा (नळीचा) मोठा तक्ता म्हणत असत (कारण या तक्त्याची गुंडाळी केली म्हणजे तिचा आकार मोठ्या नळीसारखा दिसत असे), दुसरा चॅन्सेलर जवळ राहत असे त्याला चॅन्सरीमधील मोठा तक्ता म्हणत असत, तिसरा दाखला राजाचा एक लहानसा अधिकारी ठेवीत असे. पहिल्या हेन्रीच्या वेळचा एक नळीचा मोठा तक्ता अजून शाबूत आहे. नॉर्मन लोकांच्या जमाबंदीसंबंधाने आपली बहुतेक सर्व माहिती यात तक्त्यावरून घेतलेली आहे.

(१) नॉर्मन राजांचा वसूल : विजयी विल्यम व त्याचे मुलगे हे कठोर व लोभी असत. संपत्ती म्हणजेच सत्ता हे त्यास पूर्णपणे माहीत होते. या पैशापासून संकटाच्यावेळी युद्धसामग्रीचा साठा करून ठेवता येईल व नॉर्मन किंवा इंग्लिश यांची पर्वा न करणारे परदेशातील शिपाई चाकरीस ठेवता येतील हे ते जाणून होते. नॉर्मन विजयाचे अगोदरचे इंग्लंडातील राजे द्रव्य नसल्यामुळे निर्बल असत म्हणन नॉर्मन राजांनी न्यायाने म्हणा किंवा अन्यायाने म्हणा खुप पैसा गोळा केला. त्यांच्या या जुलमाने प्रजेला फार दुःख झाले; पण त्यांनी आपल्या प्रजेचे बाहेरील लोकांच्या स्वाऱ्यांपासून आणि फ्यूडल बंडखोरांपासून रक्षण केले.

डूम्सडे बुक : विजयी विल्यम यास राज्यातील लोकसंख्या व उत्पन्न ही जर राजाला माहीत असली तर जो नफा आहे तो पूर्णपणे माहीत होता. त्याने ज्यास आपण देशस्थितिरीतीसंबंधाची पाहणी म्हटले तरी चालेल- ती करण्याविषयी व्यवस्था केली. त्याने इ.स. १०८५ मध्ये राजकीय अखत्यार दिलेली माणसे प्रत्येक शायरमध्ये पाठविली व त्यांना शपथेवर तेथील शेरीफ, बॅरन व त्यांचे फ्रेंच लोक, हंड्रेडमोट सभेचे सभासद, धर्मोपदेशक, रीव्ह व प्रत्येक ग्रामसंस्थेतील सहा मनुष्यांची जबानी घेण्याचा हुकूम केला. त्यांना एडवर्ड धी कनफेसर याच्यावेळी प्रत्येक शेताचा खातेदार कोण होता व त्याच्यावेळी खातेदार कोण होता याची चौकशी करण्यास हुकूम केला होता. त्याचेप्रमाणे प्रत्येक खात्यात शेतजमीन किती होती, गुलाम किती होते व क्षेत्रदास (सर्फ) व स्वतंत्र मनुष्ये किती होती, कुरणाखाली, गायरानाखाली व जंगलाखाली जमीन किती होती, पाणचक्क्या व मासे धरण्याची तळी किती होती आणि एकंदर या जमिनीची किंमत त्या वेळेस किती होती व ती विल्यमने ज्या वेळेस इनाम दिली त्या वेळेस आणि एडवर्ड धी कनफेसर याच्या कारकीर्दीत किती होती, तीही काढण्यास हुकूम केला होता. *

नॉर्मन राजांच्या उत्पन्नाच्या बाबी मुख्यत्वे करून खाली दिल्याप्रमाणे होत्या :

(१) राजपदाबरोबर चालत असणारी इनामी जमीन : या नॉर्मन विजयाचे पूर्वीपासूनही प्रत्येक राजाला तो गादीवर बसला म्हणजे फार मोठी स्वतःचे भोगवट्यासाठी जमीन मिळत असे, हे आपण पाहिलेच आहे. पहिला विल्यम व त्याच्या मागून जे राजे गादीवर बसले त्यांच्या वेळी जी जी बंडे झाली व त्याच्याबरोबर ज्या ज्या जमिनी प्राप्त झाल्या त्या सर्वांची भर या जमिनीत पडून ही जमीन फार विस्ताराची झाली होती. ही सर्व

---

*या ठिकाणी ही एक गोष्ट ध्यानात ठेवण्यासारखी आहे की स्थानिक राज्यकारभाराची प्राचीन पद्धती अद्यापही चालू आले व तिचा उपयोगही चौकशी करण्याचे कामी अद्यापही होत आहे. (२) तसेच स्थानिक प्रतिनिधीचे जबाब घेण्याकरिता जे राजाधिकारी पाठवीत असत त्या पद्धतीतच जूरी कडून न्याय व पार्लमेंटातील लोक प्रतिनिधीत्व या व अशाच आणखीही काही लोकप्रिय संस्थांचा उगम आहे.

जमीन व तिजवर बसणारी सर्व गावे यांचा राजा हा मालक व शासनकर्ता होता, असे म्हटले तरी चालेल. एखाद्या बॅरनला त्याच्या खाजगी माल मिळकतीचे जसे उत्पन्न घेता येत असे त्याचप्रमाणे राजाला त्याच्या या खास भोगवट्याच्या जमिनीच्या उत्पन्नाचा उपयोग घेता येत असे.

(२) फ्यूडल पद्धतीतील बाबींपासून होणारे उत्पन्न : फ्यूडल पद्धतीच्या समजीप्रमाणे राजाला देशातील जमिनीचा मुख्य मालक मानीत असत. इंग्लंडातील सर्व जमीन त्याजपासून कुणबाव्याने कुळांनी करावयाची असे. ज्या लोकांना खास राजापासून जमिनी मिळाल्या होत्या व ज्यांना खास किंवा मुख्य कुळे म्हणत असत त्यांना त्या जमिनीबद्दल फ्यूडलपद्धतीप्रमाणे काही एका प्रकारची चाकरी करावी लागत असे व पैसाही भरावा लागत असे. राजाने आपल्या दरबारात सल्ला-मसलत पुसण्याकरिता किंवा न्यायाधीशांचे काम करण्याकरिता त्यास बोलविले असता त्यांना जाणे भाग पडत असे, तसेच लढाईच्या प्रसंगी राजाने त्यास बोलविले असता ज्यास जितकी जमीन कुणबाव्याने दिली असेल त्यास तिच्या मानाने लढवय्ये लोक घेऊन सशस्त्र हजर राहावे लागत असे. याशिवाय त्यांना राजाला परोपरीच्या दस्तुऱ्या व लागती द्यावा लागत असत. जर एखादे मुख्यकूळ मृत्यू पावले तर त्याच्या मुलाला राजास रिलीफ (नावाचा मोबदला करतेवेळी सरकार सुटीचा दाम,) दिल्याशिवाय जमिनीचा ताबा मिळत नसे. हा दाम प्रत्येक नाईटाने ५ पौंड व बॅरनने १०० पौंड द्यावा, असे पुढे ठरले गेले होते. जर अशा प्रकारचे एखादे मुख्यकूळ मरण पावले व त्यास असलेला मुलगा अल्पवयी असला तर त्याचा पालक राजा होई व त्याच्या खाण्यापिण्याचा व विद्येचा खर्च तो करी; पण तो वयात येईपर्यंत खर्चवेच जाऊन त्याच्या उत्पन्नातून जी रक्कम उरे ती राजा घेत असे. जर अशा मृत कुळास मुलगा नसून मुलगी असेल तर तीदेखील राजाची पाल्य होई व तो तिला नवरा पसंत करून देई. जर अशी वारसदारीण मुलगी श्रीमंत असली तर ज्याला तिच्याशी लग्न लावण्याची इच्छा असेल त्याजपासून राजाला भली मोठी रक्कम मिळत असे. हे पाल्यत्वाचे व विवाहाचे हक्क होत. या मुख्यकुळांना एड (मदतीदाखल हक्क) या नावाचे आणखी एक तहेचे हक्क राजाला द्यावे लागत असत. आपल्या कुळांच्या संमतीशिवाय, जमीनदाराची, हे असे एड नावाचे हक्क पुढील तीन प्रकारचे वेळी, म्हणजे (१) राजाच्या वडील मुलाला नाईट ही पदवी देण्याच्या समारंभाच्या वेळी, (२) राजाच्या वडील मुलीच्या लग्नाच्या वेळी व (३) राजाला कैद केले असता त्यास खंडणी देऊन सोडविण्याच्या वेळी, घेण्याची वहिवाट असे.

जर एखाद्या मुख्यकुळाने बंड केले तर राजा त्याची जमीन त्याजपासून घेत असे या हक्काला 'फॉरफीचर'चा (जप्तीचा) हक्क म्हणत असत. जर एखादे मुख्यकुळ वारसाशिवाय मृत्यू पावले तर राजाला त्याची जमीन मिळत असे, या हक्काला 'एसचीट'चा (बिनवारशी मिळकतीचा) हक्क म्हणतात, हा हक्क अजूनही अमलात आहे. जर राजा लोभी असला तर

वरील प्रकारच्या फ्यूडल हक्काचा गैरउपयोग करून त्याला रग्गड पैसा बळजबरीने काढता येण्यासारखे होते, हे आपल्या सहज लक्षात येईल. जर राजा आपल्या मुख्य कुळांना पिळून काढू लागला तर तीही आपल्या कुळांना पिळून काढतील ही गोष्ट निर्विवाद होती. याप्रमाणे जरी खुद्द राजाला फ्यूडल हक्क फार थोड्या लोकांना द्यावे लागत असत, तरी त्यांच्या सर्व बोजाचा भार सर्व राष्ट्राला कष्टदायक वाटत असे.

(३) डेनगेल्ट : प्रारंभी हा कर प्रत्येक हाईड (१०० एकर) जमिनीवर दोन शिलिंगप्रमाणे बसविला होता. हा कर बसवून वसूल झालेल्या रकमेचा उपयोग पूर्वीचे इंग्लिश लोकांचे राजे डेन लोकांना लाच देण्यात किंवा त्यांचा पराभव करण्याचे कामी करीत असत. पहिल्या विल्यमने इ.स. १०८४ मध्ये जेव्हा डेन लोकांनी इंग्लंडवर स्वारी करण्याची धमकी दिली, तेव्हा ती संधी साधून हा कर पुन्हा बसविला व तो प्रत्येक हाईड जमिनीवर जो पूर्वी दोन शिलिंगाप्रमाणे होता तो सहा शिलिंगाप्रमाणे बसवून वाढविला. खरे पाहू गेले असता हा कर राज्यातील सर्व जमिनींवर बसवावयास पाहिजे होता. पण पष्कळ ठिकाणी या कराची माफी देण्यात आली होती

(४) शायरावरील फर्म : प्रत्येक शायरातून राजाच्या हक्काच्या ज्या बारीक सारीक महसुलाच्या बाबी असत, त्या सर्वांऐवजी जी एक रक्कम प्रत्येक शायरचा शेरीफ राजास भरीत असे, त्या रकमेस शायरवरील फर्म असे म्हणत असत. राजाच्या खास भोगवट्याच्या वेगवेगळाल्या असलेल्या जमिनींचे भाडे, शायरच्या न्यायसभेने केलेल्या दंडाचा व दस्तुऱ्यांचा राजाचा हिस्सा व सुखवस्तू गृहस्थ किंवा काही काम करण्यासाठी कायद्याची परवानगी मिळवून एकव्यक्तिभूत झालेल्या मंडळयांपासून घेण्याचे बारीक सारीक हक्काचा या फर्ममध्ये समावेश होत असे. ही 'डूम्सडे'ची पाहणी पूर्ण झाल्यानंतर या सर्व बाबींबद्दल प्रत्येक शायरापासून एकच विवक्षित रक्कम घेण्याचे ठरले. या सर्व बाबींचे उत्पन्न सरकारात भरावयाच्या ऐवजापेक्षा कमी होवो अगर जास्त होवो, ही रक्कम सरकार देण्याची शायरमधून ठरलेली असे ती भरण्याबद्दल शेरिफावर सर्व जोखीम असे; परंतु राजासाठी जो त्याने वास्तविक खर्च केला असेल तो बाद करण्याची त्यास परवानगी असे.

(५) राजाचे न्यायसभेचे उत्पन्न : हंड्रेड किंवा शायर यातील न्यायसभांतून जे खटले राजाचे न्यायसभेत वर्ग होऊन जात असत त्या खटल्यापासून मिळणारे दंड व हक्क या सर्वांचा या उत्पन्नात समावेश होतो. जेव्हा आपण न्यायदान कोणत्यारीतीने होत असे याविषयी विवेचन करू तेव्हा या प्रकारची पद्धती एकसारखी का वाढत होती तिची कारणे आपल्या सहज लक्षात येतील. नॉर्मन राजांनी या न्यायदानाची पद्धती आपल्या स्वतःला रग्गड पैसा प्राप्त होईल अशाच प्रकारची घालून ठेविली होती. त्यांनी आपल्या न्याय सभा, ज्या लोकांना तेथे वकिली करावी असे वाटत असे त्याजपासून अशा हक्काबद्दल बरीच मोठी रक्कम घेऊन मोकळ्याकरून दिल्या होत्या; त्याचप्रमाणे श्रीमंत अपराध्यांपासून ते

जबरदस्त दंडही घेत असत. रानखात्याच्या कायद्याप्रमाणे जी दंडाची रक्कम वसूल होत असे, तीच फार मोठी असे.

ज्यांना मानमरातबीच्या किंवा किफायतीच्या जागा हव्या असत त्याजपासून आणि ज्यांना बिनपगारी त्रासदायक सार्वजनिक कामांपासून मुक्त होण्याची इच्छा होती त्याजपासून हे नॉर्मन राजे भल्या मोठ्या रकमा घेत असत हेही आपण लक्षात ठेवले पाहिजे.

(२) नॉर्मन राजांच्या वेळची न्यायदान पद्धती : ही पद्धती विजयापूर्वी ज्याप्रमाणे होती त्याचप्रमाणे बहुतेक अंशी चालत असे. विजयी विल्यमने, ग्रामसंस्था, हंड्रेड आणि शायर याजमधील स्थानिक न्यायसभा जशाच्या तशाच राहू दिल्या होत्या. रूफस विल्यमने बळजबरीने पैसे काढण्याकडे या स्थानिक सभांचा दुरुपयोग केला. एडवर्ड राजाच्या वेळी ज्या वहिवाटीप्रमाणे या न्यायसभा भरत असत त्याचप्रमाणे त्या भराव्यात व दुसऱ्या कोणत्याही रीतीने त्या भरू नयेत, असे पहिल्या हेन्रीने ठरविले होते. पुष्कळ सुखवस्तू गृहस्थांच्या व एका कामासाठी सरकारची परवानगी घेऊन एकव्यक्तिभूत झालेल्या जनसमूहाच्या खाजगी न्यायसभा असत. विजयी विल्यमाचे अगोदरचे इंग्रजी राजाच्या वेळी फ्यूडॅलिझममधील हा जो विशेष गुण तो दृष्टीस पडू लागला होता. एकंदरीत राजा हा सर्व प्रजेचा वरिष्ठ न्यायाधीश होता व तो मोठ्या महत्त्वाच्या दिवाणी व फौजदारी खटल्यात स्वतः न्याय देत असे.

जरी या दोन्ही पद्धतीत पुष्कळ साम्य दिसते तरी दिवसानुदिवस नॉर्मन न्याय पद्धतीत व अँग्लोसॅक्सन लोकांच्या वेळच्या चालत असलेल्या न्याय पद्धतीत बरेच अंतर पडत गेले होते. राजाच्या न्यायसभा आपापल्या हद्दी सोडून स्थानिक न्यायसभेचे अधिकारात हात घालीत गेल्याने हा भेद झाला होता. या अधिकारात हात घालण्याची कारणे पुष्कळ होती. स्थानिक न्यायसभांतून अशिक्षित न्यायाधीश असत व ते प्रत्येक मनुष्याला माहीत असलेल्या एकसारख्या व साध्या वहिवाटीच्या कामाचा निकाल करीत. विजयापासून इंग्लिश लोकांच्या दस्तुरामार्फत चालत आलेल्या कायद्यांचा मोड होत चालला होता व त्यात फक्त नॉर्मन वकिलांनाच समजतील असे नवीन नियम दाखल करण्यात आले होते. आणखी फ्यूडॅलिझमचा अंमल जो- जो जास्त बसत चालला तो-तो स्थानिक न्यायसभांना त्यांनी केल्या ठरावांचा अंमल बलिष्ठ बड्या लोकांपासून करून घेणे जास्त जास्त कठीण पडू लागले. याप्रमाणे या स्थानिक न्यायसभा आपापली कामे करण्यास निर्बळ होत चालल्या. हे इकडे चालू असता आपल्या न्यायसभांत कामे यावीत अशी नॉर्मन राजांना फार उत्कंठा होत चालली, ही अशी त्यास उत्कंठा होण्यास दोन कारणे झाली. पहिले, ज्या बड्या लोकांवर स्थानिक न्यायसभांचा अंमल बसेना त्या आपल्या कुळांना ताब्यात आणावे व दुसरे हक्क व दंड यांच्या रूपाने आपले उत्पन्न वाढवावे. आपला अंमल जास्त वाढवावा म्हणून नॉर्मन राजांनी दोन उपाय योजले, एक राजाच्या न्यायसभा व दुसरा राजाने नेमलेल्या मुखत्यारांच्या फेरण्या.

राजन्यायसभा : (क्यरिआ रेजिस) एक्सचेकर सभेत जे लोक असत तेच या सभेत असत हे मागे सांगितलेच आहे. ज्या खटल्यांमध्ये राजाचा खास हितसंबंध असे, ज्या खटल्यांमध्ये स्थानिक न्यायसभेकडून न्याय मिळाला नसेल, दुसऱ्या कोणत्याही न्यायसभेस न जुमानणाऱ्या मुख्य कुळामधील खटले व ज्या खटल्यामधील पक्षकारांनी मेहेरबानी खातर आपली फिर्याद या सभेपुढे आणण्याची परवानगी मिळाली असेल, असेच काय ते खटले या न्यायसभेपुढे येत असत.

राजाचे मुखत्यारांची फेरणी : या फेरणीस पहिल्या हेन्रीच्या कारकीर्दीत सुरुवात झाली; पण दुसऱ्या हेन्रीच्या कारकीर्दीपर्यंत तिची पद्धतवार व्यवस्था लागली नव्हती. हे राजाचे मुखत्यार क्युरिआ रेजिस या न्यायसभेचे सभासद असत व ते न्यायाची कामे करण्याकरिता एका कौंटीतून दुसऱ्या कौंटीत जात. कौंटीतील न्यायसभा हे मुख्यत्यार आले म्हणजे त्यास भेटण्यास भरत असत. हे मुखत्यार (कमिशनर) उत्तम शिकलेले वकील असत व त्यास राजाचा अधिकार मिळालेला असे. शायरातील न्यायसभेतील लोकांस कज्जाची कधी हकीकत माहीत असे. अपराध्यास हजर करण्यास व कज्जातील गोष्टीसंबंधाने साक्षी देण्यास या लोकांपैकी काहींना शपथ देऊन पसंत करीत असत.

या मोठ्या फेरफारामुळे अतिशय महत्त्वाचे परिणाम घडून आले.

(१) ज्या न्यायधीशांच्या फेरणीमुळे सर्व इंग्लंडभर एकच कायद्याचा अंमल जारी राहिला व ज्यामुळे सर्व इंग्लिश लोकांचे ऐक्य दृढ झाले त्या फेरणीला आरंभ या राजाचे मुख्यत्यारांच्या फेरणीपासून झाला.

(२) त्यामुळे कौंटीमधील न्यायसभांचा म्हणजे बहुतेक समाजाचा व खुद्द राजाचा समागम झाला. या फेरफारामुळे फ्यूडल बड्या लोकांची सत्ता मर्यादित झाली आणि राजाला लोकांचे मुखत्यारांना बोलाविणे झाल्यास मार्ग खुला झाला.

(३) खटल्याच्या जागेच्या शेजारचे लोक पसंत करून त्याजला शपथ देऊन त्यांचा पुरावा घेण्याची जी वहिवाट सुरू झाली तिजमुळे ज्युरी नेमून न्याय करण्याचाही रस्ता मोकळा झाला.

३. नॉर्मन लोकांची लष्करी पद्धती : लष्करी चाकरीसाठी आपल्या मोठमोठ्या कुळांवरच फक्त अवलंबून राहणे हे धोक्याचे आहे, असे नॉर्मन राजांना माहीत होते. नॉर्मन बडे लोक शूर असत; पण ते दांडगे व विश्वासपात्र नसत, म्हणून प्रत्येक स्वतंत्र मनुष्याने राजाने बोलाविले असता लढाईस हजर होण्याची जुनी फीर्ड नावाची वहिवाट नॉर्मन राजांनी अमलात आणली. जेव्हा नॉर्मन बडे लोक बंड करीत तेव्हा नॉर्मन राजे हे इंग्रजांचे शिबंदी सैन्य त्यांचा पराभव करण्यासाठी उपयोगात आणीत. दुष्ट श्रूसबरीच्या अर्जाला त्याच्याच ब्रिजनार्थ किल्ल्यामध्ये पहिल्या हेन्रीने वेढून टाकले तेव्हा त्याला अनुकूल अशा अटीवर सोडावे, असे नॉर्मन बडे लोकांचे मनात होते; पण त्याचा उच्छेद करावा, अशी इंग्लिश

शिपायांची इच्छा होती. नॉर्मन राजे श्रीमंत असत व त्यामुळे फ्ल्यांडर्स, गॅस्कनी किंवा इतर देशांतून शिपाई आणून त्यास त्यांना नोकरीत ठेवता येत असे. हे शिपाई इंग्लिशांची किंवा नॉर्मन लोकांची कोणतीही पर्वा करीत नसत. हे फक्त आपल्या धन्याचे हित पाहत असत. याप्रमाणे नॉर्मन राजाच्या पदरी तीन प्रकारचे सैन्य असे.

स्थानिक संस्था : नॉर्मन विजयाचा केंद्रस्थ राज्यव्यवस्थेवर जितका परिणाम झाला तितका स्थानिक संस्थांवर झाला नाही. या संस्थांवर इंग्लिश लोकांचे फार प्रेम असे. फ्यूडल बड्या लोकांपासून आपले रक्षण करून घेण्याचे साधन म्हणून नॉर्मन राजेही त्यांचा प्रेमाने प्रतिपाळ करीत, म्हणून ग्रामसंस्था, हंड्रेड आणि शायरमधील जुन्या मंडळ्या व रीतीभाती यांचे नॉर्मन राजाच्यावेळी संरक्षण झाले होते. परंतु नॉर्मन विजयामुळे या सर्व संस्थांवर एक तहेचा परिणाम घडून आला. एका बाजूने पाहिले तर त्यामुळे फ्यूडल पद्धतीचे पाऊल पुढे पडले व दुसऱ्या बाजूने केंद्रस्थशासन अधिक जोरदार झाले व त्याचा हात चोहीकडे शिरकू लागला.

ग्रामसंस्था : पूर्वी जी ग्रामसंस्था म्हणून असे, तिचे आता मॅनॉर बनून राहिले होते. पूर्वीच्या ग्रामसंस्थांच्या शासनाऐवजी तेथे एकाधिपत्य एकसाहा सुरू झाले. शेतकऱ्यांची सभा बदलून त्याचे तेथील बड्या गृहस्थाचे दरबार झाले. जे शेतकरी होते तेच त्यांची कुळे होती व त्यापैकी बहुतेक स्वतंत्र नव्हती. ग्रामसंस्थेची जी जमीन पडीत असे तिजवर तेथील बड्या गृहस्थांचे स्वामित्व सुरू झाले. शेतकऱ्यांची सभा त्याचे दरबार म्हणून मानण्यात आले. हे सर्व फेरफार बहुतेक ठिकाणी बरेचसे अमलात आले होते, असे मानल्यास चालेल; पण नॉर्मन विजयानंतर । तर त्यांचा पूर्ण अंमल बसला.

हंड्रेड : नॉर्मन विजयापूर्वी किंवा नंतर ज्या मॅनॉरांवरील हंड्रेडची सत्ता विशेष हक्कांनी काढून घेतली होती त्याशिवाय बाकी हंड्रेडांची पूर्वीची व्यवस्था बहुतेक कायमच होती; परंतु या हंड्रेडांच्या न्यायसभेत जी कामे चालत असत ती दिवसानुदिवस कमी महत्त्वाची होत चालली होती.

शायर : शायरचा बंदोबस्त हा जसाच तसाच नॉर्मन विजयानंतरही होता हे आपण मागे पाहिलेच आहे; पण त्यात शेरीफ याला जे काही नवे अधिकार मिळाले व राजाचे न्यायाधीशांच्या फेरफारणीस जी सुरुवात झाली, हेच काय ते मुख्य फेरफार नॉर्मन विजयाने झालेले आढळून आलेले आहेत.

शेरीफ : पूर्वीच्या अँग्लोसॅक्सन राजांच्या वेळी शायरमध्ये राष्ट्राच्या अधिकाराचा मुखत्यार अल्डरमन हा असे व शेरिफावर राजाच्या कामाचा हवाला असे. यानंतर पुष्कळ शायरांवर अधिकार चालविणारे असे मोठमोठे अर्ल या अल्डरमनऐवजी आले. नॉर्मन विजयानंतर थोड्याशा अलाँशिवाय बाकी सर्व अलांना ज्या शायरांपासून त्यास पदव्या प्राप्त झाल्या होत्या त्या शायरांमध्ये मुळीच अधिकार राहिला नाही. कौंटीमध्ये शेरीफ हा राजाचा

प्रतिनिधी होऊन राहिला होता. ज्याअर्थी, राजाची सत्ता बहुतेक अमर्यादित होती. त्याअर्थी, शेरीफ हादेखील मोठा बलाढ्या अधिकारी असे.

शेरीफ याची मुख्य कामे म्हटली म्हणजे वसूल, न्याय आणि लढाई या तीन गोष्टींसंबंधी असत.

१. वसुलाची कामे : शेरिफाकडे शायरचा इजारा असे व त्यास दरवर्षी त्याजबद्दल ठरीव रक्कम सरकारात भरावी लागत असे व ही रक्कम त्याची वसूल होवो वा न होवो तिची सर्व जोखील त्याजवर असे, हे आपणास माहीतच आहे. बळजबरीने पैसा काढण्यास त्यास कारणेही असत व प्रसंगही येत असत, तो आपल्या अधिकाराचा वारंवार दुरुपयोगच करीत असे व त्यामुळे तो लोकप्रिय नसे.

२. न्यायाची कामे : शायरच्या न्यायसभेत तो राजाचा प्रतिनिधी म्हणून बसत असे व त्या सभेचा तो अध्यक्ष असे. स्थानिक न्यायसभांतून जी कामे काढून टाकलेली असत ती कामे तो कधी-कधी राजाचा न्यायाधीश म्हणून पाहत असे.

३. लढाईची कामे : कौंटीमध्ये असलेले सर्व सैन्य बोलावून एकत्र करणे हे शेरिफाचे काम असे. मोठमोठ्या बड्या लोकांकडे त्यांच्या अनुयायांचेच फक्त पुढारीपण असे; पण शेरिफाकडे बाकीच्या सर्व सैन्याचे पुढारीपण असे.

गावे : नॉर्मन राजे असता गावांची वाढ लक्षात येण्यासारखी झाली. अँग्लोसॅक्सन राजांच्या वेळी मोठमोठ्या गावांची हंड्रेडे बनत गेली होती, बाकी सर्व फक्त गावेच राहिली होती. नॉर्मन विजयानंतर सर्व गावे ही एखाद्या बड्या मनुष्याच्या खास भोगवट्याच्या जमिनीखालची किंवा राजाच्या खास भोगवट्याच्या जमिनीखालची आहेत. असे मानीत असत. तेथील बडा मनुष्य किंवा राजा तेथील न्यायाचे काम पाही व सर्व वसूल घेई. आपल्यावरील बसलेल्या कराची रक्कम ठरवून टाकणे हा प्रत्येक शहरवासी मनुष्याचा मुख्य हेतू असे. डूम्सडे पाहणी पत्रकात प्रत्येक गावाच्या वसुलाची अमुक रक्कम ठरलेली आहे, असे लिहिले आहे. शेरिफाला जुलूम करून पैसे काढण्याचा प्रसंग येऊ नये, म्हणून वार्षिक देण्याची रक्कम आपापसात गोळा करून देणे हे दुसरे काम शहरवासी मनुष्याचे होते. त्यांना जितकी रक्कम भरावयाची असे तितक्याच रकमेला ते सर्व गाव आपल्या नावावर राजापासून सनद मिळवून करून घेत असत. या रकमेबद्दल ते फक्त राजाला जबाबदार असत व ही रक्कम ते आपापसात वाटून घेत असत. जी गावे राजाच्या खास भोगवट्याच्या जमिनीत नसून दुसऱ्या बड्या लोकांच्या ताब्यात असत त्या गावांच्या अशा प्रकारच्या सनदा तेथील लोक तेथील बड्या लोकांपासून मिळवीत असत. ही गावे तेथील स्थानिक न्यायसभास कामे चालविण्याचा अधिकार असल्याबद्दल मंजुरी व्यवस्था बरोबर चालावी, म्हणून ज्या मंडळ्या स्थापन झाल्या असत त्यासही आपापल्यापरीने विशेष अधिकार असल्याबद्दल मंजुरी मिळवीत असत. लंडन शहरास जे हक्क प्राप्त झाले होते ते तसे आपणास मिळावेत,

म्हणून प्रत्येक शहर सारखा यत्न करीत असे. पहिल्या हेन्रीने लंडन शहरास एक सनद दिली होती. तिजप्रमाणे लंडन शहर हे शायरसारखे मानावे, तेथील लोकांनी आपला शेरीफ पसंत करावा, तेथील तटाबाहेर असलेल्या कोणत्याही न्यायसभेचा तेथील रहिवाशांवर अंमल नसावा व सर्व राज्यात जितक्या दस्तुऱ्या किंवा बंदरहक्क असतील तितके सर्व त्यांना (लंडन येथील रहिवाशांना) माफ असावे असे ठरले होते; पण यावेळीदेखील लंडन शहराला एक व्यक्तीभूत सनदी मंडळाचे स्वरूप प्राप्त झाले नव्हते.

राजसत्ता व धर्मसत्ता यांचा परस्परसंबंध : विजयी विल्यमने 'मी धर्मासाठी युद्ध करीन.' असे प्रसिद्धपणे कबूल केले होते आणि दुसरा अलेक्झांडर पोप याने, विल्यमने जेव्हा इंग्लंडवर स्वारी केली तेव्हा तीत 'तुझा जय होईल.' असा आशीर्वाद दिला होता, म्हणून आपली स्वतःची सत्ता कमी होऊ न देता धर्मासाठी जे करवेल ते करण्यास तो तयार असे. त्याने इंग्लंडची धर्मसंस्था एकंदर युरोपामध्ये जी प्रचलित धर्म संस्था होती तिच्याशी नेऊन मिळविली. त्याने इंग्लंडमधील सर्व बिशपांच्या जागा इटालियन किंवा फ्रेंच लोक यांनी भरून काढिल्या. त्याने लिटर्जी (सर्वांनी मिळून करण्याची प्रार्थना) मध्ये फेरफार करू दिला व धर्मोपदेशकांनी अविवाहित राहण्याच्या कामात त्यास प्रोत्साहन दिले. मुख्य धर्मगुरूला बरे वाटावे म्हणून त्याने एक मोठी महत्त्वाची गोष्ट केली.

त्याने मुलकी व धर्माच्या न्यायसभा वेगवेगळ्या केल्या. नॉर्मन विजय होण्याच्या पूर्वी बिशप हा शेरिफाबरोबर कौंटीच्या न्यायसभेत बसत असे. तेथे गृहस्थास व धर्मोपदेशकांस सारखाच न्याय मिळत असे; परंतु विल्यमने प्रत्येक बिशपाला स्वतंत्र न्यायसभा स्थापन करून दिली व या न्यायसभेत त्यांनी धर्मासंबंधी खटल्यांचाच निकाल करावा असे ठरविले. पुढे तर जर धर्मोपदेशकांवर ते अपराधी म्हणून त्याजवर खटला चालवावयाचे ठरले, तर ते खटले फक्त याच न्यायसभेत चालत असत. या न्यायसभांत इंग्लंडातील सर्वसाधारण कायद्याप्रमाणे काम चालत नसे; तेथे कॅनन कायद्याप्रमाणे काम चालत असे.

या धर्मोपदेशकांवर आपला पगडा कायम राहावा म्हणून विजयी विल्यमने पुढीलप्रमाणे तजविजी केल्या होत्या :

पोपाकडून आलेली पत्रे स्वतः पाहून पसंत केल्याशिवाय तो कोणाही धर्मोपदेशकाला परस्पर निर्णय घेऊ देत नसे. त्याची संमत्ती घेतल्याशिवाय तो बिशपांना धर्मसंस्था नीट चालविण्यासाठी कोणतेही नवीन नियम करू देत नसे. त्याच्या हुकुमाशिवाय कोणाही बिशपाला एखाद्या बॅरनाला किंवा त्याचे नोकराला तो बहिष्कार घालू देत नसे. त्याच्या परवान्याशिवाय तो पोपाच्या वकिलास इंग्लंडात काहीही करू देत नसे. इतकेच नाही तर तो त्यास इंग्लंडच्या किनाऱ्यावर उतरूही देत नसे.

गृहस्थ लोकांच्या जमिनीवर जितके करभार त्याने बसविले होते तितकेच बहुतेक त्याने धर्मोपदेशकांच्या जमिनीवरही बसविले होते. आर्चबिशप व बिशप यांच्याजवळ जी

मालमत्ता असे तिजवर व बहुतेक मठाच्या मालमत्तेवर त्याने शिपाई पाठविण्याची जबाबदारी लादली होती. आणखी अशाच रीतीने त्याने धर्मोपदेशकांवर बरेच कर लादले होते.

पुष्कळ दिवसपर्यंत धर्म संस्थेला नॉर्मन राजांच्या समोर टिकाव धरता आला नाही. कारण त्यांच्यामध्ये एक उणीव होती ती ही की, जे लहान-लहान धर्मोपदेशक असत ते बहुतकरून इंग्लिश लोक असत व त्यांच्या जे बरेच अधिकारी असत ते परदेशातील लोक असत. त्यामुळे या दोन वर्गांमध्ये परस्परांविषयी प्रेम मुळीच नसे. इतकेच नव्हे तर कित्येक वेळा तर या उच्च पदवीच्या धर्मोपदेशकांना इंग्लिश भाषाही बोलता येत नसे. तथापि, हळूहळू या धर्मोपदेशकांमध्ये एकी होण्यास सुरुवात झाली व जेव्हा आर्चबिशप व बिशप यांची योजना इंग्लिश लोकांतून पुनः होऊ लागली तेव्हा त्यांना प्रतिबंध शासनाधिकारी राजांच्या जुलमापासून रक्षण करण्यास समर्थ काय ते हेच आहेत, असे लोक मानू लागले.

जोपर्यंत पहिला विल्यम यात होता तोपर्यंत राजसत्ता व धर्मसत्ता यांच्यात कलह नव्हता; परंतु दुसऱ्या विल्यमने बाकी सर्व लोकांप्रमाणे धर्मोपदेशकांनाही लुटले. तो बिशपांच्या व धर्मोपदेशकांच्या जागा वर्षानुवर्षे रिकाम्या ठेवी व त्यांचे उत्पन्न आपण घेई. कधी-कधी तर या जमिनी तो निरंतरच्या देऊन टाकीत असे. जर त्याने अशा रिकाम्या जागा भरण्याची परवानगी दिलीच, तर तो ती देण्याबद्दल भली मोठी रक्कम घेई.

जेव्हा पहिला हेन्री गादीवर बसला तेव्हा त्याने जी एक सनद लोकांस करून दिली होती तीत धर्म संस्थांच्या हक्कास मी मान देईन, असे जे त्याने वचन दिले होते त्या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या तर त्याने पाळिले असे म्हणता येईल; पण त्याचे व धर्माधिकाऱ्यांचे जे भांडण झाले त्या भांडणास वस्त्रे देण्याचे भांडण असे म्हणतात. बिशपाची त्याच्या अधिकारावर स्थापना होते तेव्हा त्याच्या अधिकाराची चिन्हे त्यास कोणी, द्यावी याबद्दल हे भांडण होते. बिशप हा धर्म संस्थेमध्ये जसा एक अधिकारी असे तसाच तो राजाच्या पदरचा एक बॅरनही असे, कॅथिड्रल (बिशपाचे देऊळ) मधील कॅनन नावाचे धर्माधिकारी त्याची निवडणूक करीत असत; परंतु जो मनुष्य निवडण्याविषयी राजाकडून सूचना मिळत असे तोच मनुष्य ते बहुतकरून निवडीत असत. बिशपाची निवड झाल्यानंतर त्याला राजाकडून धर्मसत्तेची चिन्हे म्हणून एक अंगठी व एक टोकास बाक असलेली काठी मिळत असे व त्याच्या अधिकाराच्या संबंधाने ज्या जमिनी त्याजकडे असतील त्याजबद्दल तो राजाचे स्वामित्व कबूल करीत असे. याप्रमाणे वस्तुतः बिशप लोकांच्या जागा भरणे हे राजाच्या हातात होते. ॲन्सेलम, कॅन्टरबरिचा आर्चबिशप याच्या मनात ही सर्व सत्ता राजापासून हिरावून घेण्याचे आले. राजाही आपला अधिकाराविषयींचा हट्ट दृढ धरून बसला. अखेरीस हे प्रकरण तडजोडीवर मिटले, यापुढे बिशपाच्या अधिकाराची चिन्हे जी अंगठी व टोकास बाक असलेली काठी, ती आर्चबिशपाने त्यास द्यावी; पण बिशपाने त्याच्या अधिकारासंबंधाने ज्या जमिनी त्याजकडे असतील त्याजबद्दल राजाचे स्वामित्व कबूल करावे, असे ठरले.

जनसमाजाचे वर्गीकरण : या काळात जनसमाजाच्या वर्गाची साधारण स्थिती कशी होती हे आता आपल्या सहज ध्यानात येईल. पहिले जनसमाजाचे मोठे भाग म्हटले म्हणजे नॉर्मन व इंग्लिश लोक. इंग्लिश हे जिंकलेले लोक होते. राष्ट्र या नात्याने त्याचे सर्व मार्ग दुसऱ्यांच्या हाती गेले होते. त्यांच्यातील श्रीमंत लोकांच्या जमिनी, पदव्या व राजकीय सत्ता ही नष्टी झाली होती. विजयापूर्वी गरीब लोकांची जी स्थिती होती तिजपेक्षाही आता त्यांची स्थिती निकृष्ट झाली होती. त्या वेळेस बहुतेक इंग्रज लोक व्हिलन होऊन बसले होते. त्यांना सर्फ (क्षेत्रदास) म्हटले तरी चालेल. वास्तविक पाहता व्हिलन हा गुलाम नव्हे. त्याला बायका, मुले व स्वतःचे घर असे. त्याच्या धन्याला कायद्याने त्याला ठार मारता किंवा त्याचे हातपाय तोडता येत नव्हते. त्याचा जमिनीवरील कब्जा त्याच्या कामापुरता सुसंरक्षित असे. कारण त्यावेळी जमिनीच्या मानाने शेतकरी फारच थोडे होते. जर त्याची कब्जा जमीन एखाद्या धर्म संस्थेच्या माल मिळकतीतील जमिनीपैकी असेल तर त्याचे निर्दयतेने हाल होत नसत. धर्मसंस्थांच्या ताब्यात त्या वेळेस फार मोठाल्या मालमिळकती असत. त्याला त्याच्या गावचा कारभार करण्याची मोकळीक असे. त्याला व्हिलन स्थितीतून धन्यापासून मुक्तता मिळविण्याचा संभव असे किंवा तो जर पळून जाऊन एखाद्या शहरात एक वर्ष आणि एक दिवस राहिला. तर त्याला स्वातंत्र्य मिळत असे किंवा धर्मोपदेशकही बनता येत असे. तरी एकंदरीने त्याची स्थिती दुःखाची व अपमानाची असे. कारण तो जमिनीला जोडलेला असे व जमीन जर दुसऱ्याच्या ताब्यात गेली तर तोही तिजबरोबर दुसऱ्याच्या ताब्यात जात असे. धन्याने त्याजपासून बळजबरीने पैसा घेतला किंवा त्याला निर्दयतेने वागविले तर कायद्याने त्याजविरुद्ध काहीएक चालत नसे. त्याला राजकीय हक्क मुळीच नसत व स्वतंत्र लोक त्याचा तिरस्कार करीत असत.

बहुतेक इंग्लिश जनसमूहाची स्थिती याप्रमाणेच होती; पण खाली दिलेल्या तीन वर्गांच्या इंग्लिश लोकांची स्थिती याजपेक्षा बरी होती. ते इंग्लिश लोकांचे तीन वर्ग म्हणजे (१) स्वतंत्र जमीनदार ज्यास सोकेज धारेकरी असेही कधी-कधी म्हणतात, (२) शहरात राहणारे लोक (३) व धर्मोपदेशक, या तीन वर्गांतील लोकांना पूर्ण जातस्वातंत्र्य असे व स्वतःचे काम करण्यापुरते अधिकार असत. धर्मोपदेशकांशिवाय राजकीय सत्ता या शब्दाने जे काही आज आपण पूर्णपणे समजतो ते इतर वर्गांना प्राप्त झाले नव्हते.

नॉर्मन लोकांकडे आपण वळलो तर ते राज्य करणारेच होते. इंग्लिश लोकांचे जे काही गेले होते ते म्हणजे राजकीय सत्ता, जातस्वातंत्र्य, जमिनी, पदव्या आणि राज्यातील व धर्म संस्थांतील मोठमोठ्या जागा. ही सर्व त्यांच्या ताब्यात होता; परंतु राजा व बडे लोक यांच्यामध्ये जो एकसारखा विरोध चालू होता त्यामुळे नॉर्मन लोक बलहीन झाले होते. राजाला सर्व प्रकारच्या लोकांवर आपला अंमल बसावा असे वाटत असे व बड्या लोकांना पाहिजे ते करण्याची मुभा आपणास असावी असे वाटत असे. पहिल्या व दुसऱ्या विल्यमने

आणि पहिल्या हेन्रीने बड्या लोकांना आपल्या ताब्यात ठेवले होते व त्यांच्यात जे बंडखोर असत त्यांच्या त्यांनी जमिनी व पदव्या जप्त करून टाकल्या होत्या. स्टीफनच्या कारकीर्दीत बड्या लोकांना मनास वाटेल ते करण्याची मोकळीक मिळाली; पण तिजमुळे त्यांनी आपापसात लढाया करून एकमेकांचे जीव मात्र घेतले. या काळाच्या अखेरीचे मूळचे नॉर्मन बडे लोक बहुतेक नष्ट झाले होते व त्यांच्या ऐवजी जे बडे लोक नवे झाले होते ते पुष्कळ अंशी इंग्लिश होते. यातील उत्तम लोक देशभक्त होते व स्वातंत्र्य मिळविण्याच्या कामात राजा व लोक यांच्यामध्ये जो लढा पडला होता त्या लढ्यात ते लोकांचे पुढारी झाले होते.

○○○

भाग ५ वा

दुसरा हेन्री व त्याचे मुलगे
इ.स. ११५४-१२१६

उपोद्घात : नॉर्मन राजे राज्य करीत असताना त्यांना बहुतकरून कोणाला न विचारता वाटेल त्याप्रमाणे राज्य करण्याचा अधिकार प्राप्त झाला होता. इतकी जरी त्यांची सत्ता वाढली होती तरी तिजमुळे त्यांना फ्यूडल पद्धतीतील बडे लोक आपल्या ताब्यात ठेवणे कठीण पडत असे. स्टीफन आणि मॅटिल्डा यांच्यामध्ये इंग्लंडातले इंग्लंडात लढाई सुरू झाली. तिजमुळे पहिल्या हेन्रीने जी व्यवस्था मोठ्या कडक रीतीने राखिली होती ती मोडून जाऊन सर्व इंग्लंडभर गोंधळच होऊन गेला. बड्या लोकांनी एकमेकांशी लढाया सुरू केल्या. साधारण रयतेला अत्यंत निर्दयपणाचा जुलूम सोसावा लागला. या बंडाळीचे वेळी सर्व संस्थानांतून धर्मसंस्था मात्र काही इजा न होता बाहेर पडली, बंडाळीचे अत्यंत माजणे हेच ते मोडण्यास कारण झाले. ही लढाई इंग्लंडमधील लोकातल्या लोकात चालू राहिल्यामुळे बहुतेक नॉर्मन बडे लोक तीत नाहीसे झाले. कायद्याचा अंमल पुरा बसविणारा राजा असावा, असे लोकांना मनापासून वाटू लागले व धर्मोपदेशक पूर्वीपेक्षा यावेळी अधिक बलिष्ठ झाले असल्यामुळे त्यांना शांतता व व्यवस्था असावी, असे वाटू लागले होते.

दुसरा हेन्री जरी इंग्रज नव्हता तरी तो इंग्लंडचा शहाणा राजा निघाला. तो मोठा हुशार, उद्योगी व हातात धरलेले काम शेवटास नेणारा असा होता. त्याला बाताबेताची मोठी आवड असे व तो मोठा व्यवस्था करणारा कायदे करणारा होता. बड्या लोकांची सत्ता कमी करून साधारण लोकांचे रक्षण करण्याचा त्याचा निश्चय होता. हे करण्यामध्ये जिंकणारे लोक व जिंकलेले लोक हा भेद नाहीसा करून इंग्लिश व नॉर्मन हे लोक मिळून त्याने एक राष्ट्र केले. हेन्रीच्या जोरदार व दूरदर्शी राज्यकारकीर्दीत या नव्या राष्ट्रात संपत्ती व ज्ञानही झपाट्याने वाढले.

हेन्रीच्या मुलांत त्यांच्या बापाच्या अंगाचे शहाणपण नव्हते. रिचर्डमध्ये काही चांगले गुण होते; पण ते नेहमी कोठून तरी अंगावर जोखीम आणून त्यात आपली शक्ती दाखविण्यात गुंग असे. तो योद्धा होता, राजकारणी पुरुष नव्हता. त्याचा लोकांशी संबंध फार थोडा असे व त्याजवर कर बसविण्याचे काम त्याने आपल्या प्रधानाकडे सोपविले होते. रिचर्डपेक्षा जॉन अधिक वाईट होता. तो राजा म्हणून जे कर्तव्यकर्म करावयाचे त्याच्याकडे दुर्लक्ष करी इतकेच नव्हे, तर तो सर्व लोकांवर सपाटून जुलूम करी, असे झाल्यामुळे नॉर्मन विजयानंतर पहिल्यानेच सर्व वर्गांचे इंग्लिश लोक एक होऊन राजाविरुद्ध उठले. हा सर्व इंग्लिश लोकांनी एकत्र होऊन राजाची सत्ता कमी करण्याचा जो पहिला यत्न केला त्यामुळे त्यास ग्रेट चार्टर ऑफ लिबर्टीज (स्वातंत्र्याची बडी सनद) मिळाली ही गोष्ट घडून आल्यामुळे इंग्लिशांच्या इतिहासात एका नव्या स्थित्यंतरास सुरुवात झाली.

दुसऱ्या हेन्रीचे राज्यारोहण : हेन्रीने आपली कारकीर्द लोकांना एक सनद देऊन सुरू केली. पहिल्या हेनरीने जे हक्क व अधिकार लोकास दिले होते तेच मंजूर राखण्याचे अभिवचन त्याने या सनदेने आपल्या रयतेस दिले व तिच्यामध्ये स्टीफनच्या नावाचा उल्लेखही त्याने केला नाही. हे करून नंतर तो राज्याचा बंदोबस्त करण्याच्या कामी लागला.

(१) दुसऱ्या हेन्रीची बड्या लोकांसंबंधी राजनीती : बड्या लोकांची सत्ता जितकी कमी होईल तितकी कमी करण्याचा दुसऱ्या हेन्रीचा मुख्य हेतू होता. ज्या बड्या लोकांनी स्टीफनला किंवा मॅटिल्डेला मदत केली होती व ती करण्याबद्दल त्यांनी राजाच्या खासगी जमिनीपैकी ज्या जमिनी त्यांना दिल्या होत्या त्या त्याने परत घेतल्या. राजाच्या परवानगीशिवाय जे किल्ले बड्या लोकांनी बांधिले होते ते त्याने बळजबरीने त्यांच्याकडून मोडविले. या त्याच्या उपायांना अडथळे आलेच; परंतु दोन वर्षांच्या आतच हेन्रीने सर्व इंग्लंडात शांततेचा अंमल बसवून दिला.

स्कूटेज या कराची सुरुवात : फ्यूडल बड्या लोकांची सत्ता आणखीही कमी करावी म्हणून हेन्रीने आपल्या मुख्य कुळांवरील त्याजपासून लष्करी चाकरी घेण्याचा आपला हक्क पैसे घेऊन त्यास माफ करण्याच्या वहिवाटीस सुरुवात केली. ही नोकरी करणे त्यांना एकंदरीने मोठे त्रासदायक होते; पण मुख्यत्वेकरून या चाकरीसंबंधाने परदेशात म्हणजे फ्रान्स देशात जो मुलूख राजाच्या ताब्यात असे त्याचे रक्षण करण्यास जेव्हा त्यांना जावे लागत असे तेव्हा तरी ती त्यास विशेष त्रासदायक वाटत असे, अशा नोकरीतून जर आपण त्यास मुक्त केले तर ते त्याबद्दल आपणास आनंदाने पैसे देतील हे हेन्रीच्या लक्षात येऊन चुकले होते. इतःपर जर आपण आपल्या मुख्य कुळांपासून लष्करी सेना घेतली नाही तर त्यांचा लढाईसंबंधी काहीसा नादही कमी होईल व त्यांचा व त्यांच्या अनुयायांना जो निकट संबंध आहे तोही कमी होईल, असेही हेन्री कळले होते. ही चाकरी न घेता तिजबद्दल जो आपण पैसा घेऊ त्या पैशाने शिपाईगिरीचा धंदा करणारे लोक आपणास चाकरीस ठेवता

येतील व जोपर्यंत आपण त्यास वेळच्यावेळी पगार देऊ तोपर्यंत त्यास सांगू तेथे ते जातील व सांगू ते करतील, हेही त्यास माहीत होते.

इ.स. ११५९ साली जेव्हा टूलूझ येथे लढाई सुरू झाली तेव्हा त्याने आपला हा बेत सिद्धीस नेला. या लढाईस आपल्या मुख्य कुळांना जातीने न जाण्याची परवानगी त्याने स्कूटेज हा कर त्याजपासून घेऊन दिली (स्कूटेज या शब्दाचा अर्थ ढालकर असा आहे); फ्यूडॅलिझमचा अंमल इंग्लंडात कमी करण्याच्या कामी ही नवी यक्ती फार चांगली उपयोगी पडली.

राजाचे न्यायाधीश ज्यावेळी फेरणीस निघतील त्यावेळी प्रत्येक मनुष्याने त्यांच्या अधिकारास मान दिलाच पाहिजे, असे ठरवून हेन्रीने आणखी एका रीतीने बड्या लोकांची सत्ता कमी करण्याची युक्ती योजिली. हंड्रेड किंवा कौंटी यातील न्यायसभांशिवाय ज्या बड्या लोकांच्या स्वतंत्र स्वतःच्या न्यायसभेत येतील तेव्हा त्याचा आदर सत्कार करण्यासाठी तेथे हजर व्हावे, असे त्याने ठरविले होते. एखाद्या गुन्हेगाराच्या मागे लागून त्याला पकडण्यासाठी जेव्हा कौंटीचा शेरीफ एखाद्या बड्या लोकांच्या हद्दीत जाई तेव्हा त्याला आपल्या हद्दीत येऊ देऊन त्याला त्यास मदत करावी लागत असे. याप्रमाणे कोणाला कसेही खास हक्क दिले असले तरी त्यांच्यापेक्षा राजाचा न्याय जास्त महत्त्वाचा आहे, असे लोकांस सहज समजून देण्यात येत असे.

(२) दुसऱ्या हेन्रीची धर्मसंस्थांसंबंधी राजनीती : जेव्हा बेबंदशाही चालू होती तेव्हा धर्मसंस्था या अधिक बलवान झाल्या होत्या. न्याय आणि सुधारणेच्या त्याच काय त्या दर्शक होत्या. गादीवर वारसा सांगणाऱ्या लोकांमध्ये समतोलपणा राखण्याचे काम यांच्याकडे होते. पूर्ववत् व्यवस्था लावण्याच्या कामी यांचीच मदत होती. नॉर्मन विजयाच्या वेळी धर्मोपदेशकांमध्ये जी फाटाफूट झाली होती ती हळूहळू कमी होच चालली होती. नॉर्मन विजयानंतर पुष्कळ वर्षे पावेतो धर्म खात्यातील मुख्य मुख्य जागा परदेशी लोकांस मिळत असत. या लोकांचे व त्यांच्या हाताखालील धर्मोपदेशकांचे प्रेम नसे; पण आता इंग्लिश लोकांना धर्मखात्यात मोठमोठ्या जागा मिळू लागल्या होत्या. वरिष्ठ व कनिष्ठ धर्मोपदेशकांमध्ये एक भाव झाला होता. धर्मोपदेशक म्हणून जितके होते तितके लोकांना प्रिय होते, त्यांची लोकप्रियता व अधिकार ही पहिल्या पहिल्याने देशात व्यवस्था करण्याच्या कामी हेन्रीस उपयोगी पडली; परंतु जेव्हा धर्मोपदेशकांवर तो आपला पगडा बसवू लागला तेव्हा ते त्याजवर उलटले. या प्रतिपक्षाचा पुढारी आर्चबिशप बेकेट जो पूर्वी हेन्रीचा चॅन्सेलर व मित्र होता, तो होता. कर बसविण्याच्या एका कामात पहिल्याने त्यांच्या वादास सुरुवात झाली. प्रत्येक हाईड जमिनीवर जो दोन शिलिंगाचा कर असे व ज्याची व्यवस्था शेरिफांकडे असे व जो ते घेत असत तो कर आपल्या खास राजकीय वसुलात जमा करावा, अशी इच्छा हेन्रीला इ.स. ११६३ मध्ये झाली. या फेरफाराबद्दल बेकेटने आपले प्रतिकूल मत दिले

व धर्मखात्याकडे ज्या जमिनी असतील त्यांच्याबद्दल तर या करासंबंधाने राजाला काही एक देऊ नये, असे त्याने स्पष्ट सांगितले. कर बसविण्याच्या बाबतीत राजाच्या मर्जीविरुद्ध गेल्याचे इंग्लंडच्या इतिहासात हे पहिलेच उदाहरण होय. अशाच प्रकारची आणखी दोन उदाहरणे या वेळच्या इतिहासात आढळून आली आहेत व या दोन्ही वेळा धर्मोपदेशकच प्रतिपक्षी होते. यावरून धर्मोपदेशकांची सत्ता किती होती हे आपणास सहज कळून येईल.

अपराधी धर्मोपदेशकांवरील सत्तेविषयी तंटा : हेन्री अपराधी धर्मोपदेशकांवर आपली सत्ता आहे असे जेव्हा साफ सांगितले तेव्हा जो तंटा सुरू झाला तो याहीपेक्षा अधिक गंभीर प्रकारचा होता. हा तंटा समजण्यास आपल्याला अधिक माहिती देणे जरूर आहे.

हल्ली चोहोकडे न्याय देण्याचे काम राजाकडे आहे. हल्लीच्या न्यायसभा या राजाच्या न्यायसभा आहेत. न्यायाधीश आहेत तेही राजाचेच आहेत. शांतता सारखी राहावी म्हणून सनदा देऊन ज्या फौजदारी न्यायाधीशांची नेमणूक होते तीही राजाकडूनच; परंतु धर्म सुधारणा होण्यापूर्वी ही व्यवस्था अगदीच वेगळी होती. धर्मसंस्थांचे स्वतःचे अधिकार फार मोठे होते. राजाच्या न्यायसभांहून धर्मखात्याच्या न्यायसभा अगदी वेगळ्या होत्या. राजाने दिलेल्या सनदेवरून त्या काम करीत नसत; परंतु त्यांना अधिकार अगदी स्वतंत्र रीतीने मिळालेला आहे, असे त्या सांगत.

खाली दिलेल्या कामांत धर्मसंस्थांचा अंमल चालत असे :

(अ) धर्म व नीतीविरुद्ध काही गुन्हे, मग ते धर्मोपदेशकांनी केले असोत वा इतरांनी केलेले असोत. उदाहरणार्थ- पाखंडवाद, ईश्वराची निंदा, व्यभिचार व चहाडी.

(ब) धर्मोपदेशकांनी आपापल्या कर्तव्यविरुद्ध वागणे. उदाहरणार्थ - परमेश्वराची उपासना ज्या विधीने करावयाची ती करण्यास चुकणे.

(क) धर्मोपदेशकांनी केलेले फौजदारी गुन्हे. उदाहरणार्थ - चोरी किंवा खून. विजयापूर्वी या धर्मोपदेशकांच्या अपराधाबद्दलची चौकशी, ज्या न्यायसभेत इतर लोकांची अशा अपराधांबद्दल चौकशी होत असे, त्याच न्यायसभेत होत असे. दुसरा हेन्री ज्या वेळेस गादीवर बसला त्या वेळेस अशी चौकशी फक्त धर्मखात्याच्या न्यायसभेत होत असे.

या शेवटच्या वर्गातील अपराध्यांच्या चौकशीचे अधिकारासंबंधाने दुसरा हेन्री व बेकेट याजमध्ये तंटा उपस्थित झाला होता. या धार्मिक न्यायसभांस बहिष्कार किंवा स्थानभ्रष्ट करणे या फक्त धार्मिक शिक्षाच देता येत असत. अशा धार्मिक न्यायसभेने फौजदारी गुन्ह्याबद्दल जर एखाद्या धर्मोपदेशकास स्थानभ्रष्ट केले असेल व त्याने त्यानंतर जर पुनः एखादा गुन्हा केला असेल, तर दुसऱ्या एखाद्या साधारण मनुष्याप्रमाणे त्यासही शिक्षा एखाद्या मुलकी न्यायसभेकडून होत असे, हे मात्र खरे आहे. तरीपण व्यावहारिक रीतीने पाहू गेले असता त्यास शिक्षेची माफीच असे, निदान ती पहिल्या गुन्ह्याबद्दल तरी होतीच.

या गोष्टीचा परिणाम असा झाला की, पुष्कळ मोठमोठे अपराध धर्मोपदेशकांकडून घडले. धर्मोपदेशकांनी (क्लार्क लोकांनी) जर फौजदारी गुन्हे केले असले तर धर्मखात्याच्या न्यायसभेने त्यास स्थानभ्रष्ट करण्याची शिक्षा देऊन नंतर त्यास इतर साध्या गृहस्थांप्रमाणे शिक्षा होण्यासाठी मुलकी न्यायसभेच्या हवाली करावे, असा हेन्रीने आग्रह धरला होता.

हेन्रीची ही मागणी न्यायाची होती, असे आम्हास वाटते; परंतु आर्चबिशपाने जो हा विरुद्ध पक्ष पत्करला होता त्यासही लोक अनुकूल झाले असावेत, असाही संभव आहे. हल्ली एकंदर लोकसमूहामध्ये जितके धर्मोपदेशक आहेत त्यापेक्षा त्या वेळेस ते फार होते हे आपण ध्यानात ठेवले पाहिजे. ज्यांना क्लार्क म्हणून म्हणत असत त्या लोकांमध्ये पुष्कळ लोक खरोखर धर्मोपदेशकाची दीक्षा घेतलेले नसत; पण त्यापैकी पुष्कळ पुढे ते धर्मोपदेशक व्हावयाचे म्हणून टॉनशरचा विधी मात्र केलेले असत (टॉनशरचा विधी म्हणजे जेथे आपली शेंडी असते तेथील केस वस्त्याने काढणे हा होय.) धर्मोपदेशकांना जो मान व ज्या मोकळिकी असत त्या आपणास मिळाव्यात म्हणून हजारो लोक, ज्यांचा पुढे खरोखर धर्मोपदेशक होण्याचा मुळीच हेतू नसे, तसे लोक टॉनशरचा विधी मात्र करून घेत असत.* ज्यांना म्हणून लिहिता व वाचता येत असे त्यातील बहुतेक लोक या क्लार्क वर्गात असावेत, असा संभव आहे. पुढे-पुढे तर ज्यांना म्हणून वाचता येत असे त्या लोकांवर जर आतताईपणाचा दोषारोप झाला, तर त्यास धर्मोपदेशकाची सूट मागण्याचा हक्क असे, म्हणजे त्यांना मुलकी न्यायसभेत होणाऱ्या शिक्षा माफ होत असत. शिवाय त्या वेळेस राजाच्या जुलमांतून लोकांचे स्वातंत्र्य सोडविणारे काय ते हे धर्मखातेच आहे असे लोक मानीत असत. त्या वेळेचा फौजदारी कायदा व मुख्यत्वेकरून जंगलासंबंधी घडणाऱ्या गुन्ह्यांविषयींचा कायदा तर अत्यंत निर्दयपणाचा होता. ठार मारणे, डोळे काढणे व हात पाय तोडणे या शिक्षा तर पुष्कळ अपराधांना असत. या कडक कायद्यांचा बोजा जिकडून कमी होईल ती बाजू लोकप्रिय झाली असलीच पाहिजे. यावरून दुसऱ्या हेन्रीसारख्या बलाढ्य राजाच्या न्यायाच्या मागणीविरुद्धदेखील धर्मोपदेशकांना टिकाव कसा धरता आला हे आपल्या लक्षात सहज येईल.

क्लॅरेंडन येथील कलमबंदी इ.स. ११६४ : राजसत्ता व धर्म यांच्या अधिकारांची मर्यादा स्पष्ट ठरवून टाकण्याचा हेन्रीचा निश्चय झाला होता आणि म्हणूनच त्याने इ.स. ११६४ ते क्लेरेंडन येथे एक मोठी सभा भरविली व तिजपुढे कॉन्स्टिट्युशन्स ऑफ क्लेरेंडन (क्लेरेंडन येथील कलमबंदी) या नावाचा दस्तऐवज ठेविला. धर्मसत्ता व राजसत्ता या दोहोचे एकमेकांवर कोणकोणते हक्क होते त्या संबंधाने त्या वेळेपर्यंत इंग्लंडच्या राज्यात जे कायदे व ज्या वहिवाटी चालत होत्या त्यांचा या दस्तऐवजात समावेश केला होता, असे सांगण्यात

---

* टॉनशरचा विधि हा धर्मोपदेशक होण्याच्या दीक्षेचा पहिला संस्कार होता, व ज्याच्यावर संस्कार झाला असेल तो धर्मोपदेशकाचे वर्गातील आहे असे लोक मानीत असत.

आले होते. राजाच्या मुख्य गृहस्थकुळांनी फ्यूडल पद्धतीप्रमाणे जे कर वगैरे द्यावे लागत असत तेच कर आर्चबिशप व इतर धर्माधिकारी ज्यांना राजापासून जमीन मिळालेली असे त्यांनी द्यावे असे ठरविण्यात आले होते. धार्मिक न्यायसभांच्या फैसल्यावरील विवाद पहिल्याने राजाकडे दाखल करावेत व त्याच्या परवानगीशिवाय ते पोपाकडे नेऊ नयेत. आर्चबिशप किंवा बिशप यांची निवडणूक राजाच्या सल्ल्याने व राज्याच्या खाजगी देवळात करावी. या कलमाने या धर्मगुरूंची नेमणूक करण्याची सत्ता वास्तविक राजाच्याच हाती आली. ज्या धर्मोपदेशकांवर गुन्हा केल्याचा दोष आला असेल, त्यांनी पहिल्याने राजाचे न्यायसभेपुढे आपली जबानी द्यावी व नंतर त्यांना धर्मखात्याच्या न्यायसभेत चौकशीसाठी पाठवावे. या न्यायसभेत त्यांच्यावर अपराध शाबीत होऊन जर त्यास स्थानभ्रष्ट करण्यात आले तर त्यांचे रक्षण पुढे धर्मखात्याने करू नये. राजाच्या परवानगीशिवाय कोणाही आर्चबिशपाने किंवा बिशपाने राज्य सोडून जाऊ नये व गेल्यास राजाचे किंवा राज्याचे कोणतेही नुकसान करण्याचा यत्न करणार नाही अशाबद्दल जामीन द्यावा. राज्याच्या, अगर राजा राज्याबाहेर असेल तेव्हा जस्टीशिअरच्या परवानगीशिवाय कोणाही मुख्य कुळाला किंवा प्रधानाला बहिष्कार घालू नये. ही व याशिवाय आणखी काही कमी महत्त्वाची कलमे धर्मोपदेशकांनी बॅरन लोकांसमक्ष नाखुशीने कायद्याप्रमाणे कबूल केली. जरी बेकेटने पुढे आपली या कायद्यास दिलेली संमती काढून घेतली तरी ती या वेळेस त्यानेही त्यास दिली होती. जर हा कायदा अमलात आला असता तर राजाची पूर्ण सत्ता धर्मखात्यावर बसली असती. आठव्या हेन्रीला जे काम पुढे करावे लागले ते काम दुसऱ्या हेन्रीला याचवेळी करावे लागले असते; परंतु तशी सत्ता चालविण्याचा काल तेव्हा आला नव्हता. यापासून पुढे तो वाद उपस्थित झाला. त्या वादात हेन्रीच्या चुकांमुळे व बेकेटच्या खुनामुळे धर्मोपदेशकांचीच सरशी झाली. बिशपांच्या निवडणुकीवरील सत्ता जरी जॉन राजाने सोडून दिली होती तरी ती राजांच्या हातून सर्वस्वी सुटली होती, असे नाही. पोपाकडे विवाद घेऊन जाण्यासंबंधी जो प्रतिबंध होता त्याकडे लोक दुर्लक्ष करू लागले. राजाच्या फौजदारी अधिकारातून धर्मोपदेशकांनी आपली सुटका युक्तीने करून घेतली. खरोखर पाहता चालू वहिवाटीप्रमाणे माझ्या पूर्वजांपेक्षा धर्मोपदेशकांवर माझी सत्ता थोडीशी तरी अधिक आहे. असे जे हेन्री म्हणत होता तसे काही घडन न येता त्यास त्याजपेक्षाही फारच थोडी सत्ता घेऊन संतोष मानून राहावे लागले होते. धर्मोपदेशकांवर अधिकार चालविण्याची राजसत्तेची ही रीतसर पहिली मागणी म्हणून इंग्लंडच्या इतिहासात ही क्लॅरेडन येथील कलमबंदी लक्षात ठेवण्यासारखी आहे.

(३) दुसऱ्या हेन्रीची साधारण लोकांसंबंधी राजनीती : सर्वसाधारण जनसमूहाला दुसऱ्या हेन्रीने कायदे व व्यवस्था याजपासून मिळणाऱ्या सर्व सुखांचा अनुभव घेऊ दिला. त्याने पुष्कळशा शहरांना सनदा दिल्या नाहीत किंवा ज्या सनदा त्याने दिल्या त्यातील

सुटींचा फैलाव फारसा झाला नाही खरा; पण त्याने हंड्रेड व शायर याजमध्ये चालत असलेले स्थानिक स्वराज्याचे संगोपन केले व पंचांच्या मदतीने न्याय देण्याची पद्धती विकासाला आणून उलटे त्याला नवीन महत्त्व आणले. राजकीय न्यायधीशांच्या फेरण्या वारंवार करावयाच्या ठरवून व शेरिफांचे अखत्यार कमी करून गरीब पण स्वतंत्र मनष्यांवर जे फार जलम पर्वी होत असत त्या बहतेकांपासन त्याने त्यांचे रक्षण केले. त्याबद्दल या लोकांनी आपली दृढ राजभक्ती त्याच्या निदर्शनास वारंवार आणून दिली. जेव्हा पुष्कळ बॅरनांनी त्याच्या वडील मुलाचा पक्ष घेऊन हेनरी विरुद्ध बंड केले तेव्हा या बंडवाल्यांशी सामना देण्यामध्ये या वर्गाचे व मुख्यत्वेकरून शहरात राहणारे लोक पुढारी होते.

(४) दुसऱ्या हेन्रीची वसुलासंबंधी राजनीती : स्टीफनाच्या यातायातीच्या कारकीर्दीत राज्याच्या महसुलासंबंधी कामात अत्यंत अव्यवस्था माजून राहिली होती. राज्यात चोहोकडे शांतता करून व ज्या राजाच्या खासजमिनी अवाच्यासवा देऊन टाकल्या होत्या त्या परत घेऊन हेन्रीने हा महसूल सुधारण्याचा पाया घातला. नॉर्मन राजांच्या इतिहासासंबंधी लिहिताना ज्या महसुलाच्या पद्धतीसंबंधाने वर्णन वर येऊन गेले आहे ती पद्धत त्याने हळूहळू पुनः सुरू केली. इ.स. ११६२ मध्ये डेनगेल्ड नावाच्या कराचा अखेरचा उल्लेख आढळतो; पण हा कर काढून टाकून त्याच्याऐवजी कॅरुकेज या नावाचा नवीन कर जमिनीवर बसविण्यात आला. कॅरुकेज या शब्दाचा कॅरुकेट या शब्दाशी संबंध आहे व या शब्दाचा अर्थ एका जोडीला जितकी नांगरिता येईल तितकी जमीन. या कराची आकारणी या वरील प्रमाणाच्या जमिनीच्या मानावर करण्यात येत होती. धर्मगुरू व मठाधिकारी यांच्या मालमत्तेवरील आपले फ्यूडल हक्क गोळा करण्याच्या कामात हेन्री दक्ष होता हे आपण पाहिलेच आहे. स्कूटेज हा कर बसवून त्याने आपली संपत्ती वाढविण्याचा आणखी एक मार्ग खुला केला हेही आपण वर पाहिलेच आहे; पण त्याच्या शहाणपणाने राज्य करण्यामुळे इंग्लंड भरभराटीस आले व त्यामुळेच त्याचा महसूल मुख्यत्वेकरून वाढला.

त्याच्या कारकीर्दीचा उत्तर भाग महसलाच्या कामात झालेल्या एका महत्त्वाच्या नवीन फेरफारामुळे ध्यानात ठेविण्यासारखा झाला आहे. सालादीन याने ख्रिस्ती लोकांपासून त्या वेळेस नुकतेच जरुसलेम हे शहर घेतले होते. इ.स. ११८१ सालात सालादीनटाईथ या नावाचा नवीन कर जरुसलेम शहर परत घेण्याकरिता वर्गणी म्हणून बसविण्यात आला. हा कर म्हणजे प्रत्येक मनुष्याच्या जंगम मिळकतीच्या दशांश भागाइतका भाग सरकारात देणे हा होता. हा असा कर म्हणजे जातमिळकतीवरील कर इंग्लंडचे इतिहासात पहिल्यानेच घेण्यात आला होता. इंग्लंडात या वेळेपर्यंत जे प्रत्यक्ष कर बसविण्यात आले होते व सर्व जमिनीवर असत. जंगम मिळकतीवर हा कर बसविल्यावरून त्या वेळेस इंग्लंड बरेच भरभराटीस आले होते व तेथे ऐषआराम बराच वाढला होता, असा आपल्याला खुशाल तर्क करीता येईल.

(५) दुसऱ्या हेन्रीची न्यायपद्धतीविषयींची राजनीती : मॅटिल्डा व स्टीफन यांच्यामधील देशातले देशात युद्ध सुरू असता नॉर्मन राजांनी जी न्यायाची पद्धती सुरू केली होती ती नाहीशी झाली होती. त्या वेळेस मोठमोठाल्या सणांच्या दिवशी राजा जी मोठी थाटमाटाची सभा भरवीत असे ती भरविणे बंद पडले होते. एक्सचेकर व क्युरिआरेजिस या न्यायसभांचा अंमल बंद पडला होता. राजाचे प्रतिनिधी फेरणीवर जाईनासे झाले होते. हेन्री गादीवर बसल्यावर त्याने पहिल्याने जी कामे हातात घेतली त्यात जुनी न्याय पद्धती अमलात आणण्याचे काम हे एक होते. तो जुनी पद्धतच अमलात आणून थांबला नाही, तर त्याने तीत नवीन सुधारणा पुष्कळ केल्या. त्या सुधारणांचे परिणाम अजूनही इंग्लंडात आढळून येत आहेत. या सुधारणा तीन सदरांखाली आपणास एकत्र करता येतील. (१) क्युरिआरेजिस न्यासभेसंबंधी सुधारते धोरण, (२) फेरणीच्या व्यवस्थेविषयी सुधारणा, (३) पंचांच्या मदतीने न्याय देण्याच्या कामविषयी सुधारते धोरण..

(१) क्युरिआरेजिस न्यायसभेसंबंधी सुधारते धोरण : क्युरिआरेजिस या न्यायसभेचे पुनरुज्जीवन झाल्याने पुन्हा सर्व न्यायाची कामे दुसऱ्या कोणत्याही न्यायसभेत न जाता त्याच्या न्यायसभेकडे जाऊ लागली. या न्यायसभेतील कामाची पद्धती न्याय देण्याचे कामास विशेष योग्य होती. तेथील न्यायाधीश हे मोठे चतुर वकील असत व या न्यायसभेला आपल्या हुकुमांची अंमलबजावणी देशातील कितीही मोठ्या मनुष्यावर करण्याचा अधिकार असे. या न्यायसभेत हेन्री हा स्वतः कधी-कधी बसून काम पाहत असे. इ.स. ११७६ मध्ये या न्यायसभेत १८ न्यायाधीश काम पाहत असत, असे आढळून येते. इ.स. ११७८ मध्ये हेन्रीने या न्यायसभेतील सगळ्या सामान्य कामांचा निकाल लावण्यासाठी पाच न्यायधीशांची एक मंडळी नेमली व या सभेत जी कामे विशेष महत्त्वाची किंवा कठीण येतील तेवढी मात्र राजाने पाहावीत असे ठरविले. कॉमन लॉ (रूढ कायदा व सामान्य कायदा) प्रमाणे ज्या न्यायसभांत न्याय देण्यात येतो, अशा ज्या तीन न्यायसभा आहेत त्या न्यायसभांपैकी अतिशय जुन्या न्यायसभेचा, म्हणजे जिला कोर्ट ऑफ किंगस् बेंच म्हणतात तिचा, याप्रमाणे जन्म झाला. ही न्यायसभा इ.स. १८७३ पर्यंत अस्तित्वात होती; पण त्यासाठी तिच्या रचनेत फेरफार करून तिला डिव्हिजन ऑफ दी हायकोर्ट हे नाव देण्यात आले. ही न्यायसभा स्थापन केल्यामुळे हेन्रीने, राजा म्हणून, त्यास दुसऱ्या रीतीने जे न्याय देण्याचे अधिकार होते, ते सर्व सोडून दिले, असे मात्र समजावयाचे नाही.

(२) फेरणीच्या व्यवस्थेविषयी सुधारणा : जी पहिल्या हेन्रीने फेरणीची व्यवस्था सुरू केली होती व जी स्टीफनने मागे पडू दिली होती ती व्यवस्था पुनः अमलात आणून दुसऱ्या हेनरीने तीत सुधारणा केली. हा वेळपर्यंत फेरणीच्या कामाचा संबंध महसुलाशी व न्याय देण्याशी असे. हे न्यायाधीश सर्व देशभर फिरून राजाच्या वसुलाचे व न्यायाचे, अशी दोन्ही कामे करीत.

राजाचे न्यायाधीश ज्या वेळेस कौंटी येथील न्यायसभेत येतील व त्यांचा आदरसत्कार करण्यास ती न्यायसभा भरेल, तेव्हा प्रत्येक स्वतंत्र मनुष्याने तेथे हजर असले पाहिजे, असे हेन्री राजाने ठरविले होते. एखादा शेरीफ एखाद्या गुन्हेगाराच्या पाठीस लागून पकडण्याच्या कामी गुंतला असता मग तो हे काम कोठेही करीत असला तरी त्यास कोणाच्याही विशेष अधिकाराची बाध येऊ नये, असेही हेन्रीने ठरविले होते. या फेरण्या जसजशा वारंवार होऊ लागल्या तसतशी शेरिफाची सत्ता कमी होऊ लागली. दोघेही राजाचे मुखत्यार म्हणून असत; पण न्यायाधीशांचा व राजाचा संबंध प्रत्यक्ष असल्यामुळे राजाचा विश्वास त्याजवर जास्त असे, असे वाटते. शेरिफांनी कौंटीमध्ये जे त्यांना मोठमोठे अधिकार होते त्यांचा दुरुपयोग केला असावा व त्यामुळे ते लोकास अगदी आवडेनासे झाले असावेत असे वाटते. इ.स. ११७० मध्ये हेन्रीने इंग्लंडातील सर्व शेरीफ कमी केले. इ.स. ११९४ मध्ये पहिला रिचर्ड गादीवर असताना त्याने कोणाही शेरिफाने आपल्या कौंटीत न्यायाधीशाचे काम करू नये, असे ठरवून टाकले होते. फार मोठ्या देत कोणाही शेरिफाने न्यायाधीशाचे काम मुळीच करू नये, असे ठरविण्यात आले होते.

(३) पंचाच्या मदतीने न्याय देण्याच्या कामाविषयी सुधारते धोरण : ही पद्धत कशी सुरू झाली असावी हे समजणे दुर्जेय आहे. फार प्राचीन काळापासून जर्मन लोकांच्या सामान्य लोकांसाठी न्यायसभा होत्या हे आपणास माहीत आहेच; परंतु या सभांमधून जे लोक येत असत ते न्यायधीशाचे काम करीत, पंचाचे करीत नसत. अमुक एक गोष्ट कायद्याप्रमाणे बरोबर आहे किंवा नाही व ती कशी काय घडली आहे हे ते न्यायाधीश पाहत असत. एखादी गोष्ट कशी घडली आहे व ती अमुकच प्रकाराने घडली आहे, असे ठरल्यानंतर न्यायधीशाने त्या गोष्टीसंबंधी जे कायद्याचे निरूपण केले असेल ते लागू पडते किंवा नाही हे पाहण्याचे काम ज्युरी (पंचाचे)चे आहे. नॉर्मन विजयाचे पूर्वी इंग्लिश लोक ज्याला काँपरगेशन असे म्हणतात, त्याचा न्यायाने कामात उपयोग करीत असत, म्हणजे प्रत्येक पक्षाचे लोक वादी किंवा प्रतिवादी हा प्रामणिक व सच्चा आहे, अशी शपथ घेऊन सांगण्यासाठी काही लोक आणत असत. या लोकांची संख्या हमेशा १२ असे. हे काँपरगेटर्स आणि जूरर्स एकच आहेत, असे चुकीने कधीकधी समजतात; पण खरोखर हे साक्षीदार लोक असत. प्रत्येक हंड्रेडमध्ये जे १२ थेन पसंत केलेले असत. त्यांनी आम्ही कोणाला अन्यायाने तू अपराधी आहेस असे म्हणणार नाही, अशी शपथ घ्यावी, असे दुसऱ्या एथेरेडच्या एका कायद्याने ठरविले होते. यावरून काही लोकांची हे १२ थेन मोठ्या ज्यूरीचे काम करीत असत, अशी कल्पना झाली आहे; परंतु हे वास्तविक असे होते याबद्दल काही पुरावा नाही. या सर्व गोष्टींवरून नॉर्मन विजयाच्या अगोदर ज्युरी म्हणून ज्या संस्थेस आपण समजतो ती अस्तित्वात नव्हती, असे मानती येईल. आल्फ्रेड राजाने ज्युरीची पद्धती स्थापन केली या म्हणण्यास काही आधार नाही.

नॉर्मन विजयानंतर "इन्क्रेस्ट' हा शब्द वाचण्यात येतो. राजाच्या अधिकाऱ्यांनी एखाद्या खटल्यातील झालेल्या गोष्टीविषयी ज्यास खास साधनांनी माहिती मिळण्याचा संभव असेल, अशा बऱ्याचशा लोकांस, त्यांना खरे सांगण्याविषयी शपथ देऊन जी चौकशी केली असे, तीस 'इन्क्वेस्ट' असे म्हणतात. या अशा चौकशांच्या योगाने मिळालेली माहिती डूम्सडे बुकात दाखल केलेली आहे. दुसऱ्या हेन्रीच्या कारकीर्दीत या शपथ देऊन केलेल्या चौकशांचा उपयोग फक्त न्यायाच्या कामात करीत असत. नॉर्मन विजयापासून जमिनीवरील हक्कांच्या खटल्यांचा निकाल द्वंद्वयुद्ध पद्धतीने होत असे. हेन्रीने, ग्रँड ॲसाईझ या नावाच्या कायद्याने, अशा तहेच्या खटल्याचा निकाल ज्युरीचे मताप्रमाणे करावा, असे ठरविले. हा ग्राँड ॲसाईझ नावाचा कायदा कधी अमलात आला हे नक्की सांगता येत नाही. या कायद्याप्रमाणे ज्या कौंटीमध्ये कज्जातील जमीन असेल त्या कौंटीतील चौघा नाईटांनी आसपासचे १२ नाईट पसंत करावे व त्यांनी शपथ घेऊन कोणाचा हक्क जास्त आहे हे ठरवावे, असे ठरले होते. दिवाणी खटल्यांचा निकाल ज्युरीने करावा असे स्पष्टपणे पहिल्याने याच वेळी सांगण्यात आले आहे.

ग्रँड ज्युरी (मोठी ज्युरी)ने राजाच्या न्यायाधीशासमोर अपराध्यास हजर करावे किंवा त्याजवर दोषारोप करावा ही वहिवाट इ.स. ११६६ मध्ये असाईस ऑफ क्लॅरेंडन या नावाचा जो कायदा अमलात आला तेव्हापासून पडली. (ॲसाईझ ऑफ क्लॅरेडन व कॉन्स्टिट्यूशन्स ऑफ क्लॅरेडन (हा कायदा स. ११६४ अमलात आला) हे कायदे वेगवेगळाले आहेत, हे लक्षात ठेविले पाहिजे.) प्रत्येक हंड्रेडमधील १२ कायदेशीर (म्हणजे लायक) मनुष्यांनी व प्रत्येक गावातील चौघा लायक मनुष्यांनी अनुक्रमाने आपले हंड्रेडात किंवा गावात गुन्हेगार मनुष्य आहेत किंवा नाहीत हे शपथेवर राजाच्या न्यायाधीशांसमोर सांगितलेच पाहिजे, असे ॲसाईझ ऑफ क्लॅरेंडन या कायद्याने ठरले होते. ज्या लोकांची नावे सांगण्यात येत असत त्या लोकांना दिव्य करावे लागत असे. जर त्यांना दिव्यात यश आले नाही तर त्यांच्या अपराधास योग्य अशी शिक्षा त्यास भोगावी लागत असे. जर या अशा लोकांस दिव्यात यश आले; पण ते वाईट चालीचे आहेत, अशी जर त्यांची प्रसिद्धी असली, तर त्यास राज्य सोडून जावे लागत असे.

इ.स. १२१५ या साली लॅटेरन कौन्सिल या नावाची धर्मखात्याची जी सभा भरली होती तिने दिव्य करणे हे गैर कायदेशीर आहे, असे ठरविले व त्यामुळे दिव्य हे बंद करण्यात आले. ही दिव्याची पद्धती बंद करून तिच्याऐवजी एक दुसरी ज्युरी नेमण्यात आली व तीसच आपण हल्ली पेटी ज्युरी किंवा छोटी ज्युरी असे म्हणतो. ग्रँड ज्युरीने (मोठ्या ज्युरीने) ज्या लोकांवर दोषारोप केला असेल ते लोक निर्दोष किंवा सदोष आहेत हे ठरविण्याचे काम या ज्युरीचे शपथ घेऊन करावे, असे ठरलेले असे. पहिल्या पहिल्याने दुसऱ्या ज्युरीतील लोकांप्रमाणे या पेटी ज्युरीतील लोकांचीही निवड त्यांना चालू असलेल्या खटल्यातील काही गोष्टीची खास साधनांनी माहिती असल्याचा संभव आहे म्हणूनच होत असे.

(६) दुसऱ्या हेन्रीचीची लष्करी पद्धतीविषयी राजनीती : नॉर्मन राजाजवळ तीन वेगवेगळ्या तहांचे सैन्य असे आपण मागेच पाहिले आहे. (१) फ्यूडल पद्धतीप्रमाणे असलेल्या कुळांचा जमाव, (२) गरज असलेल्यावेळी मात्र लढणारे, नाही तर आपला असेल तो धंदा करणारे राष्ट्रीय सैन्य व (३) प्रसंग पडेल तेव्हा पगार घेऊन लढाईस येणारे परदेशी शिपाई. आपल्या फ्यूडल कुळांपासून जातचाकरी घेण्यापेक्षा रोकड पैसे घेणे हे दुसऱ्या हेन्रीला आवडत असे हे आपण पाहिलेच आहे. परदेशात ज्या लढाया त्याला कराव्या लागत असत त्यासाठी तो परदेशी शिपाई चाकरीस ठेवीत असे. हे परदेशी शिपाई इ.स. ११७३ साली जे भयंकर बंड झाले त्यावेळी मात्र त्याने इंग्लंडात आणिले होते व त्यास ती लढाई संपल्याबरोबर त्याने रजा दिली होती. असाईझ ऑफ आर्मस या कायद्याने वर सांगितलेल्या राष्ट्रीय सैन्याची त्याने सुधारणा केली होती. हा कायदा इ.स. ११८१ त अमलात आला. या कायद्याप्रमाणे देशातील प्रत्येक स्वतंत्र मनुष्याने आपापले मालमत्तेच्या प्रमाणानुरूप आपणापाशी हत्यारे ठेविली पाहिजेत, असे ठरविण्यात आले होते. याच कायद्याने कोणाही मनुष्याने आपल्या सरंजामास जितकी हत्यारे लागतील त्यापेक्षा जास्त आपलेपाशी ठेवण्याची व राजाची परवानगी घेतल्याशिवाय परदेशात हत्यारे पाठविण्याची बंदी केली होती. ज्या धोरणाने हेन्रीने आपल्या फ्युडल सैन्याकडे दुर्लक्ष करण्यास सुरुवात केली होती, त्याच धोरणाने त्याने राष्ट्रीय सैन्याची जोगवण मांडिली होती. बड्या लोकांच्या महत्त्वाकांक्षेस आळा घालण्यास आपल्या प्रजेपैकी स्वतंत्र मनुष्यांच्या समुदायांची राजनिष्ठा पुरेशी आहे, असा त्याचा विश्वास होता.

दुसऱ्या हेन्रीच्या कारकीर्दीपासून झालेले परिणाम : या सर्व उपायांनी स्टीफनच्या वेळी राज्यास जे नुकसान सोसावे लागले होते ते हेन्रीने भरून काढीले इतकेच नव्हे, तर त्यांचे त्याने पुष्कळ कल्याणही केले. त्याने बॅरन लोकांची सत्ता कमी केली, सर्वसाधारण जनसमूहाचे रक्षण केले, सर्व देशभर उत्तम बंदोबस्त केला व व्यापार व संपत्ती अधिकाधिक वाढण्यास जागा करून दिली. त्याच्या आजाच्या वेळी जितकी सत्ता राजाच्या हाती होती तितकी बहुतेक सत्ता त्याने आपल्यास प्राप्त करून घेतली होती. इंग्लंडात तर ही त्याची सत्ता फारच अधिक होती. कारण इंग्लंड हे त्याच्या राज्याचा एक भाग होते. तो फक्त इंग्लंडचा राजा होता असे नाही, तर त्याचे स्वामित्व आयर्लंडावरही होते आणि हल्ली ज्यास फ्रान्स असे म्हणतात. त्यातील एकतृतीयांश भागावर अधिकाराच्या वेगवेगळाल्या किताबांनी तो अमल चालवीत असे. त्याचा राज्यविस्तार, त्याचा वार्षिक वसूल, त्याची बुद्धी व त्याची हिंमत लक्षात घेतली असता त्याच्या जोडीचा त्या वेळेस पश्चिम युरोपात एकही राजा नव्हता, असे आपणास म्हणावे लागेल. जरी तो पराजित व भग्नहृदय होऊन मृत्यू पावला होता तरी हेन्रीने राजसत्तेसंबंधाने इंग्लंडात वाद उत्पन्न होऊच नयेत अशी व्यवस्था केली होती, असे दिसून येईल. तरीपण त्याच्या मृत्यूपासून पंचवीस वर्षांच्या आतच या राजसत्तेला एका नवीन आणि कडक प्रकारच्या दाबात राहण्याची पाळी आली.

पहिल्या रिचर्डाची कारकीर्द : या कादकीर्दीत राज्यकारभार व्यवस्थेत मुळीच फेरफार झाला नाही. रिचर्ड हा राजकारणी पुरुष नव्हता. त्याने आपल्या प्रजेची हेळसांड केली व तिजवर आपल्या लढायांचा व खंडणीच्या खर्चाचा बोजा मात्र घातला. हेन्रीने उत्तम रीतीने जे राज्य चालविले होते, त्याचे फळ रिचर्डास भोगावयास मिळाले. त्याच्या वेळेस राजसत्ता इतकी प्रबळ झाली होती की, तिजविरुद्ध प्रजेतील कोणत्याही वर्गाचा जोर चालण्यासारखा नव्हता. हेन्रीच्या वेळेस तयार झालेले प्रधानमंडळ रिचर्डाच्या वेळेस राज्यकारभार चालवीत होते. हे प्रधान राज्यकारभार लोकांपासून मोठमोठ्या रकमा काढून, मग जितका चांगला चालविता येईल तितका चांगला, चालवीत असत. बॅरन लोकांना रिचर्ड हा मोठा योद्धा आहे अशाबद्दल मोठे आश्चर्य वाटे व त्यामुळे ते त्यास भीतही असत. सर्व ख्रिस्ती लोकांच्या वतीने रिचर्डाने मुसलमानांशी युद्ध केले होते, म्हणून सर्व धर्मोपदेशक त्याचे मोठे आभारी होऊन राहिले होते. सर्वसाधारण जनसमूहातील लोक शांततेचा व संपत्तीचा उपभोग घेत पडले होते. मोठमोठ्या सुटी देऊन पुष्कळशा शहरांना व सनदा देण्यात आल्या होत्या. ज्युरीच्या मार्फत चौकशी करण्याच्या पद्धतीस प्रोत्साहन मिळून ती नव्या नव्या कामांकडे लावण्याची सुरुवात झाली होती. उदाहरणार्थ प्रत्येक शायरमधील जमिनीसंबंधाने राजाचे फ्यूडल हक्क काय-काय होते हे पाहण्याचेही काम याच चौकशी करणाऱ्या मंडळीकडे सोपवण्यात आले होते. कोणीही शेरिफाने आपल्या कौंटीमध्ये न्यायधीशाचे काम करू नये हा नियम करून रिचर्डाने शेरिफांची सत्ता कमी केली होती. इ.स. ११९४ तील एका कायद्याने कोरोनर हा हुद्दा अस्तित्वात आला व त्या कायद्याप्रमाणे प्रत्येक कौंटीमध्ये तीन नाईट व एक क्लार्क अशा चौघाजणांची निवड, राजाने ज्या फौजदारी गुन्ह्यांचा स्वतः निकाल करावयाचा, अशा गुन्ह्यांचा निकाल करण्याकरिता, करावी असे ठरविण्यात आले होते.

जॉन राजाची कादकीर्द : या राजाने प्रारंभापासूनच वाईट रीतीने राज्य चालविण्यास सुरुवात केली होती. यास लढाईत आलेल्या अपयशाने बॅरन लोकांस त्याचा कंटाळा आला होता व त्याच्या कुटुंबातील माणसांची तो जी मोठी अवहेलना करी तिजमुळे त्यांना त्याचा राग ही आला होता. सर्व राष्टावर त्याने मोठमोठे कर बसविले होते. तो मोठा क्रर व विषयी जलमी राजा होता, अशी त्याची ख्याती होती. त्यावेळी फिलिप ऑगस्टस्, फ्रान्सचा राजा व तिसरा इनोसंट, या नावाचा पोप, हे दोघे अत्यंत बुद्धिमान व बलिष्ट राजकारणी पुरुष होते. या दोघा पुरुषांशी जर कालगतीने जॉनचा लढा सुरू झाला नसता तर त्याने पुष्कळ वर्षेपर्यंत इंग्लंडचे राज्य अशाच कुनीतीने केले असते. अँजोचे घराण्याकडे जितके म्हणून फ्रान्सदेशातील परगणे होते तितके बहुतेक फिलीपने सर करून घेतले व जॉनाने धर्मसंस्थांशी तंटा केला असल्यामुळे त्याला इनोसंटाने अत्यंत मानहानिकारक रीतीने आपल्यास शरण येणे भाग पाडिले. या दोन्ही गोष्टींचा परिणाम इंग्लंडच्या राज्यकारभार व्यवस्थेच्या इतिहासावर घडून आला.

फ्रान्स देशातील परगणे गेल्यामुळे झालेले परिणाम : हे फ्रान्स देशातील परगणे गेल्याने तीन महत्त्वाचे परिणाम घडून आले : (१) राजाला इंग्लंडातील प्रजेच्या प्रेमावर अवलंबून राहणे भाग पडले. (२) ज्या मार्गाने जॉनाने आपल्या हाताने हे परगणे घालविले होते तो मार्ग जॉनाला फार लाजिरवाणा असल्यामुळे व त्याच्या अंगी लढाईच्या कामात लागणारा दृढनिश्चय किंवा राजकार्यधुरंधरपणा मुळीच नाही हे लोकांना कळन आल्यामळे. जे लोक अन्यपक्षी निराशेने त्याचा जुलूम सहन करते त्याच लोकांनी याच्या जुलमाचा प्रतिकार करण्याचे धैर्य केले. (३) नार्मंडी हा प्रांत हातातून गेल्यामुळे या नॉर्मन विजयी लोकांना आपल्या पूर्वजांच्या भूमीस मुकावे लागले. या वेळेपासून इंग्लंडातील बडे लोक हे इंग्रज झाले. नॉर्मन व इंग्लिश या दोन जातींचे एकीकरण करण्याच्या कामी हेन्रीचे शहाणपण पुष्कळ अंशी कामी आले होते. दोन जातींचे एकीकरण जॉन राजाचे मूर्खत्वाने पूर्णपणे घडवले.

धर्मखात्याशी झालेल्या भांडणाचा परिणाम : ज्या वेळेस पोपांची सत्ता अत्यंत वाढली होती त्याच वेळेस जॉन राजाने अविचाराने पोपाशी भांडण करण्यास सुरुवात केली होती. त्याने प्रजेवर बहिष्कार पाडून घेतल्यामुळे त्याच्या प्रजेस फार दुःखे सोसावी लागली. तो पोपाला सर्वस्वी शरण गेल्यामुळे व त्याचे स्वामित्व त्याने कबूल केल्यामुळे लोकांना त्याचा फार राग आला. पोपाशी समेट करून आपली सत्ता कायम राखण्याची त्याला आशा होती; परंतु या मिलाफापासून ज्या एका कार्यपरंपरेस प्रारंभ झाला तिचा शेवट जॉन राजाला ग्रेट चार्टर (स्वातंत्र्याची मोठी सनद) लोकांना देण्यात झाला.

जॉन राजाचे बॅरन लोकांशी भांडण : पोपास शरण जाऊन जॉन राजाने फ्रान्समधून इंग्लंडावर येणारी स्वारी कशीबशी टाळली व फ्रान्स मधील गेलेले परगणे पुन्हा जिंकून घेण्यासाठी सैन्य उभे करण्याच्या उद्योगास तो लागला. उत्तर इंग्लंडातील बॅरन लोकांनी 'आम्ही इंग्लंड सोडून परदेशात चाकरी करण्यास बांधलेलो नाही व त्यामुळे आम्ही तुजबरोबर लढाई करण्यास येत नाही.' असे जॉन राजास साफ सांगितले. जॉन व पोप यांच्यामध्ये जो तंटा नुकताच होऊन गेला होता त्यामुळे धर्माधिकाऱ्यांचे किती नुकसान भरून द्यावे लागेल ते समजण्याकरिता सेंट ॲलबन्स येथे एक मोठी सभा भरली होती. या सभेत राजाच्या वतीने जस्टिशिअर याने मोठमोठ्या सुधारणा करण्याचे वचन दिले. या सभेत राजाच्या खास भोगवट्याच्या प्रदेशातील गावातून प्रत्येकी चार-चार असे लोकनियुक्त सभासद आले होते, ही गोष्ट मोठी आश्चर्याची आहे. मोठ्या सभेच्या वेळी लोकनियुक्त सभासद-मग ते थोडे लोकांच्या वतीने का होईनातआल्याचे हे पहिलेच उदाहरण होय. याच वर्षी पुढे काही दिवसांनी लंडन येथे सेंट पॉलच्या देवळात एक सभा भरली होती, तीत आर्चबिशप स्टीफन लँगटन याने पहिल्या हेनरीने दिलेली सनद आपल्या हातात घेऊन आपल्या श्रोत्यांस तिजप्रमाणे राजाला वागावयास लावण्याविषयी उपदेश केला. ही सभा भरून गेल्यानंतर पुढे

काही दिवसांनी जॉनाने पुन्हा एक सभा भरविली व प्रत्येक शायरमधून चार-चार शहाणे नाईट आपल्याशी राज्यव्यवस्थेविषयी बोलावयासाठी पाठविण्याकरिता त्याने प्रत्येक शेरिफाला आज्ञा केली. या आज्ञेप्रमाणे जर घडून आले असते तर लोकनियुक्त सभासदांचे पाऊल आणखी पुढे पडले असते; पण ही सभा भरली किंवा नाही हेच सांगता येत नाही.

इ.स. १२१४ या बहुतेक सालभर जॉन हा फ्रान्समध्येच होता. ज्या बॅरन लोकांनी त्याच्याबरोबर जाण्याचे नाकारिले होते त्यांनी सेंट ॲलबन्स येथे जमून आपले म्हणणे ख्रिस्मस झाल्यानंतर राजाचे कानावर घालण्याचा निश्चय केला. मोठमोठाले पाद्री नेमण्याच्या कामी जी मोकळीक दुसऱ्या हेन्रीने धर्माधिकऱ्यास देण्याचे नाकारले होते त्या नेमणुकीबद्दल आपला हक्क काढून घेऊन जॉन राजाने धर्माधिकाऱ्यास आपलेसे करण्याचा यत्न केला. जेव्हा इ.स. १२१५ चे प्रारंभी बॅरन लोकांनी आपल्या मागण्या राजापुढे ठेवल्या तेव्हा त्याने ईस्टर सणापर्यंत मुदत मागितली व त्यास ती मिळाली; पण जेव्हा ईस्टर होऊन गेला व आपल्या मागण्यांविषयी जॉन काही करणार नाही, असे त्यास वाटले, तेव्हा बॅरन लोकांनी दक्षिणेस लंडनकडे कूच केले व त्यांचे तेथील राहणाऱ्यांनी अभिनंदन केले. अशा स्थितीत आपणास कोणी मदत करीत नाही, असे जेव्हा जॉन राजाला दिसून आले तेव्हा त्याने आपल्या थोड्याशा असलेल्या मित्रांच्या उपदेशावरून बॅरन लोकांनी ज्या मागण्या केल्या होत्या त्या स्वीकारील्या. इ.स. १२१५ च्या जून महिन्याच्या १५ वे तारखेस त्याने आपली मोठी मोहोर त्या स्वातंत्र्याच्या मोठ्या सनदेवर ठोकली.

स्वातंत्र्याची मोठी सनद, १२१५ : इंग्लंडच्या राज्य कारभार व्यवस्थेविषयीचा इतिहास म्हणून जो आहे तो फक्त या मोठ्या सनदेवरील व्याख्यारूप होय असे म्हणतात. या सनदेतील मागण्यांची ६३ कलमे आहेत; यांचा लांबलचकपणा व महत्व यातही बरेच अंतर आहे व यांची रचनाही अनुक्रमवार केलेली नाही; परंतु यातील मुख्य बाबी थोड्याशा सदराखाली आणता येण्यासारख्या आहेत.

(१) धर्मखाते : धर्माधिकाऱ्यांच्या निवडणुकीचा हक्क जॉन राजाने धर्माधिकाऱ्यास देऊन टाकलेला आपण पाहिलाच आहे. ती त्याची देणगी या सनदेने त्याने बहाल केल्यामुळे नॉर्मन विजयापासून त्याच्या वाडवडिलांनी ज्या हक्काचा उपभोग घेतला होता तो मात्र त्याने घालवला. धर्मसंस्थांना ज्या इतर गोष्टी करण्याविषयी स्वातंत्र्य होते ते त्याने या सनदेन त्यांना पुन्हा बहाल केले. ज्या धर्मोपदेशकांनी बॅरन लोकांस या कामात मदत केली होती त्या धर्मोपदेशकास यापेक्षा कमी सत्ता देणे हे त्यांना (बॅरन लोकांना) बरे वाटेना, व जॉन राजालाही पोपच्या मदतीची जरूर असल्यामुळे त्यानेही हे त्यांचे अधिकार कमी न करता कायम ठेवले.

(२) मुख्यकुळे : आपल्या मुख्यकुळांपासून जितके योग्य घेणे असेल तितकेच घेऊन आपल्या फ्यूडल पद्धतीने मिळालेल्या अधिकाराचा दुरुपयोग न करण्याबद्दल राजाने कबूल

केले. (१) कोणत्याही मुख्यकुळापासून नेहमी जितकी चाकरी घ्यावयाची तिजपेक्षा जास्त चाकरी घेणे भाग पाडावयाचे नाही. (२) ठरविलेला रिलीफ नावाचा हक्क घेऊन मृत झालेल्या कुळाच्या वारसास त्याच्या वारसाचे हक्क द्यावयाचे.

(३) जर एखादा वारस अज्ञान असेल तर राजाने प्रामाणिकपणाने त्याचे पालकत्व चालवावयाचे व त्या वारसाच्या जमीनजुमल्यावर जे कोणी लोक राहत असतील त्याजपासून शिरस्त्याप्रमाणे जास्त चाकरी किंवा देणे घ्यावयाचे नाही व त्यांची घरे किंवा कुंपणे यांचा नाश करावयाचा नाही. (४) जर राजाला अशा वारसासाठी नवरा किंवा बायको पसंत करावयाची झाली तर ती त्या वारसाच्या दर्जाची असावी व राजाने कोणाही विधवेला लग्न करावयास भाग पाडावयाचे नाही.

(५) नेहमीच्या शिरस्त्यातील तीन गोष्टींशिवाय म्हणजे (१) राजा कैदेत पडला असल्यास सोडवून आणावयास लागणारी रक्कम, (२) राजाच्या सर्वांत वडील मुलीच्या लग्नाबद्दल देण्याची रक्कम, किंवा (३) त्याच्या सर्वांत वडील मुलाला नाईट ही पदवी देण्याबद्दल लागणारी रक्कम, राजाने स्कुटेज किंवा एड या नावाचे कर राष्ट्राच्या सर्वसाधारण सभेच्या मताशिवाय घ्यावयाचे नाहीत.

एड या नावाचा एखादा विशेष कर बसविण्यासाठी राष्ट्राचे सर्वसाधारण सभेचे मत घेण्याची वेळ आली तर राजाने आपल्या सर्व मुख्यकुळांस येण्याकरिता आव्हान पत्रे पाठवावी. या मुख्य कुळांपैकी जे आर्चबिशप, बिशप, अर्ल किंवा मोठमोठे बॅरन असतील त्या प्रत्येकास स्वतंत्र आव्हानपत्रे पाठवून बोलावणे करावे व इतर मुख्यकुळांस बोलावणे करावयाचे ते प्रत्येक कौंटीचे शेरिफाकडे एक सामान्य आव्हानपत्र धाडून करावे. या बोलावण्याच्या व हजर होण्याच्या मुदतीत चाळीस दिवसांचा अवकाश असावा व या बोलावण्याच्या आव्हानपत्रात कोठे व कोणत्या कारणासाठी हजर व्हावयाचे, त्याचा उल्लेख असावा.

(३) मोठमोठी शहरे व गावे यांचे हक्क लंडन व इतर सर्व शहरे, सनदी गावे व बंदरे यास असलेले जुने हक्क कायम ठेविण्याबद्दल राजाने जिम्मा घेतला.

(४) न्यायपद्धती - (१) न्यायदान ही राज्याच्या वसुलाची एक बाब आहे, असे इतउत्तर मानले जाणार नाही, असे राजाने वचन दिले. 'आम्ही कोणाही मनुष्याला इन्साफ किंवा न्याय विकणार नाही किंवा तो देण्याचे नाकबूल करणार नाही किंवा देण्यास उशीर लावणार नाही.' या संबंधाने राजाने आणखीही पुढील वचने दिली होती : (२) कोणाही मनुष्याला योग्य चौकशी केल्याशिवाय शिक्षा दिली जाणार नाही. 'कोणाही स्वतंत्र मनुष्याला त्याच्या बरोबरीच्या मनुष्यांच्या कायदेशीर संमतीशिवाय किंवा देशातील चालू असलेल्या कायद्याच्या प्रमाणाशिवाय कबज केले जाणार नाही किंवा कैदेत घातले जाणार नाही किंवा त्याच्या मालमत्तेचे अपहरण केले जाणार नाही, अगर तो कायद्याच्या संरक्षणास मुकला

जाणार नाही, अगर त्यास हद्दपार केले जाणार नाही, अगर त्याचा कोणत्याही प्रकारे उच्छेद केला जाणार नाही किंवा आम्ही त्याजवर चालून जाणार नाही किंवा त्याला धरून आणण्यास बोलावणे पाठविणार नाही.' हॅबिअस कार्पूस कायद्याने बहाल राखलेल्या लोकांची लवकर चौकशी करून न्याय देण्याच्या हक्काचा व ज्युरीच्या मदतीने चौकशी करण्याच्या हक्काचा या कलमात बीजारोप झालेला आहे. (३) गैरशिस्त व जुलमाचे दंड यानंतर घेतले जाणार नाहीत. अपराधाच्या मानाने दंड घेण्यात येईल व हा दंड वसूल करताना त्याच्याऐवजी जमीनदारापासून त्याची जमीन, व्यापाऱ्यापासून त्याच्या व्यापाराच्या जिनसा किंवा एखाद्या दासापासून त्याच्या शेतकीची औते वगैरे घेऊ नयेत. (४) जर कोणी पक्षकार आपल्या खाजगी फिर्यादीचा निकाल राजाच्या न्यायसभेत करून घेण्यास आले. तर त्यास जेथे राजा असेल तेथे जाण्याचा त्रास पाडू नये. या अशा खाजगी फिर्यादीचा निकाल एखादी जागा नक्की करून तेथे करण्याचे ठरवावे, या अशा फिर्यादीस कॉमनप्लीझ असे म्हणतात. हे असे ठरल्यामळे राजाच्या न्यायसभेची आणखी एक शाखा स्थापन करावी लागली व या शाखेस कोर्ट ऑफ कॉमनप्लीझ हे नाव देण्यात आले. या शाखेशिवाय पूर्वीची किंग्स बेंच या नावाची राजाच्या न्यायसभेची शाखा होतीच. ही नवी न्यायसभा इ.स. १८७३ सालापर्यंत अस्तित्वात होती. (५) मालमिळकतीच्या हक्कांसंबंधी फिर्यादींचा निकाल करण्यासाठी न्यायधीशांनी वर्षातून चार वेळा फिरावयास जावे असे ठरविण्यात आले.

(५) जंगल खाते - जॉन राजा गादीवर बसल्यापासन जी जंगले नवी राखण्यात आली होती ती मोकळी करून द्यावीत व जंगल खात्याच्या संबंधाने ज्या अनिष्ट चाली अमलात होत्या त्यांची चौकशी करण्यासाठी प्रत्येक कौंटीमधून १२ नाईट निवडून त्यांच्याकडून शपथ घेववावी आणि ज्या दुष्ट चालींविषयी ते हकीकत लिहून पाठवितील त्या दुष्ट चाली चाळीस दिवसांच्या आत बंद कराव्यात.

(६) किरकोळ : (१) शांततेच्या वेळी सर्व व्यापाऱ्यांपासून कोणताही जुलमाने कर न घेता त्यास इंग्लंडात येण्याची, राहण्याची व सोडून जाण्याची मुभा असावी. (२) राजाच्या कोणत्याही नोकराने खुद्द राजाच्या कामासाठी कोणाही स्वतंत्र मनुष्याचे घोडे किंवा गाड्या त्यांच्या परवानगीशिवाय घेऊ नयेत किंवा कोणाही मनुष्यापासून योग्य किंमत दिल्याशिवाय धान्य किंवा इतर माल घेऊ नये. (३) सर्व राज्यात एकच प्रकारची वजने व मापे चालू असावीत.

या सनदेप्रमाणे राजाकडून वागणूक व्हावी म्हणून या सनदेच्या शेवटी एक मोठे चमत्कारिक कलम आहे. ते असे की, या सनदेप्रमाणे सर्व कामे चालत आहेत किंवा नाहीत हे पाहण्यासाठी बॅरन लोकांनी आपल्यापैकी पंचवीस गृहस्थ निवडावे, व जर या सनदेतील कलमांविरुद्ध वागणूक झाली तर या पंचवीस बॅरनापैकी चौघा बॅरनांनी राजापाशी दाद मागावी व जर तो गैरहजर असेल तर जस्टिशिअरपाशी ती मागावी. जर चाळीस दिवसांच्या

आत ती त्यांना मिळाली नाही तर त्या पंचवीस बॅरनांनी राजाच्या जमिनी आणि किल्ले जप्त करण्याचा किंवा असेच इतर उपाय योजण्याचा त्यास अधिकार देण्यात आला होता. पण हे असे करण्याचा प्रसंग आला तर राजाचे, राणीचे किंवा राजाच्या मुलाबाळांचे जातस्वातंत्र्यास हरकत येईल असे मात्र त्यांना करावयाचे नव्हते.

या मोठ्या स्वातंत्र्याच्या सनदेसंबंधाने सुचलेले विचार : खालील मुद्यांकडे आपण विशेष लक्ष दिले पाहिजे.

(१) या सनदेची मागणी कार्यदृष्टीने पाहता सर्व राष्ट्राने एकमताने केली होती. या कामात बॅरनलोकांनी पुढारीपण घेतले होते तरी त्यास लंडन व इतर शहरांची मदत होती. पूर्वी बॅरनलोकांविरुद्ध साधारण जनसमाज राजास मदत करीत असे; पण या वेळेस राजाच्या विरुद्ध त्यांनी बॅरनलोकांना मदत दिली होती. या गोष्टीवरून दुसऱ्या हेनरीने बॅरनलोकांची किती सत्ता कमी करून गादीची सत्ता कशी वाढविली होती हे आपणास ताडता येईल. यावेळी आपल्या स्वतःच्या नव्हे तर सर्व राष्ट्राच्या हिताकरिता बॅरनलोक भांडत होते हेही अनुमान आपल्यास करता येईल. जॉन राजाने पोपचे स्वामित्व कबूल केले होते व तो त्याचा मांडलिक बनून राहिला होता म्हणून धर्मोपदेशक लोकांना उघडपणे बॅरनलोकांना यावेळी मदत करता येत नव्हती; पण आर्चबिशप लँगटन याने बॅरन लोकांना त्यांच्या दुःखापहाराच्या मागण्यास ठाम स्वरूप आणून देण्यासाठी पहिल्या हेन्रीचे सनदेचे पालन व्हावे अशी मागणी करण्याचे सुचवून मदत केली होती. यावरून धर्मोपदेशकांची साधारण लोकसमूहाशी आतून सहृदयता होती, यात काही संशय नाही. जे थोडे बडे लोक अखेरपर्यंत जॉन राजास धरून राहिले होते त्यांनीदेखील या मोठ्या स्वातंत्र्याच्या सनदेस आपले अनुकूल मत दर्शविले होते.

(२) ज्याअर्थी, बॅरनलोकांनी सर्व राष्ट्राची वकिली पत्करली होती त्याअर्थी जो इन्साफ मिळण्याविषयी त्यांनी मागणी केली होती ती त्यांच्या स्वतःसाठी नव्हती; पण सर्व स्थितीतील लोकांसाठी होती. या सनदेने ज्या सुटी राजा आपल्या मुख्यकुळास देईल त्या त्यांनी आपल्या कुळास द्यावयाच्या होत्या. सर्व स्वतंत्र मनुष्यांचे अन्याय व जुलमापासून रक्षण व्हावे असा बंदोबस्त करण्यात आला होता. जे लोक स्वतंत्र नव्हते, म्हणजे दास वर्गात होते, त्याजविषयीदेखील या सनदेने त्यांची शेतकीची साधने दंड वसूल करताना जप्त करू नयेत, असे ठरविण्यात आले होते. शहरांना जे काही स्वातंत्र्याचे हक्क देण्यात आले होते त्यामुळे व राजाची जंगले कमी करण्यात आली होती त्यामुळे मुख्यत्वेकरून मध्यम व कनिष्ठ स्थितीतील लोकांना फायदा झाला होता.

(३) बॅरनलोकांच्या मागण्या मंजूर करणे म्हणजे आपली गादी त्यांच्या हवाली करण्यासारखे आहे असे जरी जॉन राजा म्हणत असे, तरी या त्यांच्या मागण्या विलक्षण नेमस्त होत्या. त्यांच्या मागण्यांपैकी जिला मागला दाखला नाही अशी मागणी क्वचितच

होती. त्यांनी ज्या दादींबद्दल मागणी केली होती त्या दादींचा पाया पहिल्या हेन्रीसारख्या मनमानेल अशा वागणाऱ्या राजाने दिलेल्या सनदेवरच रचलेला होता. नवी राज्यव्यवस्था उभी करण्याचा त्यांचा यत्नच नव्हता. जुन्या पद्धतीप्रमाणे न्यायाचे राज्यशासन असावे असेच फक्त त्यांचे मागणे होते. जॉन राजाने ही मागणी त्यास हातात हत्यारे घेऊन करावयास लाविले होते, ही गोष्ट खरी आहे व या राजाविरुद्ध जाण्यात त्यास यश आल्याचा दाखला पडला त्याजपासून परिणाम अमित झाले; परंतु ही हत्यारे, जेव्हा आपली दाद जॉन राजाकडून इतर कोणत्याही मार्गाने लागावयाची नाही अशी बॅरन लोकांची खात्री झाली, तेव्हा त्यांनी हातात घेतली होती.

(४) या मोठ्या सनदेने राज्यात राजाचे वर्चस्व अजूनही कायमच राहिले होते. जर एखादा एड (मदत) नावाच विशेष कर घ्यावयाचा प्रसंगच आला तर मात्र राजाला मोठी सभा भरवावी लागत असे. या सभेची रचनाही सख्त फ्यूडल पद्धतीप्रमाणे होती. या सभेत मुख्यकुळेच काय ती येण्याचे ठरले होते. ही मोठी सनद दिल्याच्या अगोदर किंवा नंतर अशी सभा क्वचितच भरविण्यात आली असावी. अशी सभा भरविल्यास कामकाज करण्यास ती अत्यंत मोठी पडली असती व प्रतिनिधित्वाचे संबंधाने ती अत्यंत संकुचित झाली असती. चालू रिवाजाप्रमाणे सभा भरवून सल्ला घेण्यासाठी इंग्लंडचे राजे आपल्या मोठमोठ्या कुळासच बोलावीत असत. या मोठ्या सनदेप्रमाणे वेगवेगळाल्या आव्हानपत्रिका येऊन सभेस हजर होण्याचा हक्क या मोठमोठ्या कुळांचाच असे. जॉन राजा मरण पावून जेव्हा तिसरा हेन्री गादीवर बसला तेव्हा त्याच्या कारकीर्दीत आपल्यास राजाला जर ताब्यात ठेवणे आहे तर साधारण लोकसमाजाच्या मुखत्यारांशी मिळून वागले पाहिजे, असे बॅरन लोकांना कळून आले. या मोठ्या सनदेप्रमाणे वागणूक असली पाहिजे म्हणून जो तंटा उपस्थित झाला त्यातच इंग्लिश पार्लमेंटाचा जन्म झाला.

जॉन राजाचा मृत्यू : जॉन राजाने ही सनद त्याच्यावर बळजबरी झाली म्हणून दिली होती. त्याचा हेतू आपल्या वचनाप्रमाणे चालविण्याचा नव्हता. पोपाने त्याला आवश्यक कर्तव्यतेपासून मुक्त केल्यानंतर, त्याने बॅरन लोकांशी लढण्याची तयारी चालविली. तेव्हा बॅरन लोकांनी निराशेने फिलिप ऑगस्टसाचे वडील मुलास म्हणजे लुईस यास आपला राजा होण्यासाठी आमंत्रण पाठविले. लुईस याने इंग्लंडवर स्वारी केली; पण या लढाईचा शेवट होण्यापूर्वीच, एक नऊ वर्षांचा वारस मागे ठेवून, जॉन राजा मरण पावला.

○○○

भाग ६ वा

तिसरा हेन्री व पहिला एडवर्ड

इ.स. १२१६ पासून १३०७

उपोद्घात : ही मोठी स्वातंत्र्याची सनद देणे झाल्यानंतरची ८० वर्षे हल्लीच्या आपल्या पार्लमेंट सभेच्या उदयाविषयी प्रसिद्ध आहेत. आपली दुःखे सांगण्यास व दाद लावून घेण्यास जोपर्यंत कायमचे द्वार राष्ट्रास प्राप्त झाले नव्हते तोपर्यंत त्या मोठ्या सनदेतील दिलेली वचने पाळण्याबद्दल कोणालाही जबाबदार धरता येण्यासारखे नव्हते. जॉनचा मुलगा व त्याच्या मागे त्याच्या गादीवर बसणारा तिसरा हेन्री हा नेहमी या सनदेत दिलेली वचने, कोणी काही त्यास देण्याचे कबूल केल्यास पाळण्यास तयार असे; परंतु ती पाळण्याबद्दल वचन दिल्याबरोबर ती मोडण्यासही तो तयार असे. त्याच्या बापाच्या विरुद्ध ज्या एकीचा जय उत्तम झाला की एकी पुनः पुनः करण्याचा यत्न बॅरन लोकांनी केला; परंतु या बॅरन लोकांचा पुढारी जो सायमन डी मॉन्टफर्ड नामक लिस्टरचा अर्ल होता त्यास अशी एकी डळमळीत पायावर असते व ती मोडण्यास परस्पर विरोध हा पुरा होतो, असे अनुभवावरून पक्के कळून आले होते. राजाच्या विरुद्ध जो तंटा चालला होता, त्या तंट्याच्या कामी सर्वसाधारण जनसमूहाची मनापासून मदत मिळावी म्हणून लिस्टर याने इंग्लिश लोकांना त्यावेळी बरेचसे माहीत झालेले जे प्रतिनिधित्वाचे तत्त्व ते हाती घेण्याचा यत्न केला. जरी त्या कामात लिस्टर यास यश आले नाही तरी त्याचा शत्रू जो पहिला एडवर्ड याने त्याने घालून दिलेला कित्ता वळविला. जो राजा आपल्या प्रजेच्या साहाय्याने राज्य करतो, तो आपल्यास एकट्याच्या मताप्रमाणे राज्य करणाऱ्या राजापेक्षा अधिक मोठा व बलवान होतो, असे सर्व प्लॅन्टेजेनेट घराण्यातील राजांपेक्षा शहाणा राजा जो पहिला एडवर्ड याच्या लक्षात येऊन चुकले होते आणि म्हणून राज्यातील लोकांचे जे मोठे तीन विभाग होते त्यांचे व जागजागी सर्व राज्यभर त्या स्थानिक संस्था होत्या त्यांच्या प्रतिनिधित्वाचा जीत समावेश होईल अशा तऱ्हेचे एक पार्लमेंट त्याने बनविले. पार्लमेंटची शक्ती जरी कमी-जास्त होत असे व ती ज्या भागांची

बनलेली असे, त्या भागांची परस्परांच्या मानाने सत्ता जरी कमीजास्त होत असे, तरी पहिल्या एडवर्डच्या मृत्यूच्या काळापासून तो थेट इ.स. १८३२ मधील रिफार्म ॲक्ट (सुधारणेचा कायदा) होई तोपर्यंत पार्लमेंटच्या बाह्य स्वरूपात म्हणण्यासारखा फेरफार झाला नाही. आज जी इंग्लंडची राज्यकारभार पद्धती आपल्या दृष्टीस पडत आहे तिचा उदय पहिल्या एडवर्डाच्या कारकीर्दीत झाला असे म्हणण्यास काही हरकत नाही.

पार्लमेंटचा उदय कसा झाला याचा शोध लावत असता गादीची सत्ता किती जबरदस्त होती हे आपण ध्यानात ठेवले पाहिजे. मोठ्या स्वातंत्र्याच्या सनदेत नमूद केल्याप्रमाणे एखादा कर बसवावयास राजाला मुख्यकुळांची संमती घ्यावी लागत असे, यावरून राजाची सत्ता एकदम पुष्कळ कमी झाली होती अशी कल्पना करणे बरोबर होणार नाही. उलट पक्षी देशभर खरा अंमल राजाचाच चालत होता. सर्व राज्यकारभाराचे केंद्रस्थान तोच होता, राज्याचे धोरण कसे ठेवावयाचे हे तोच ठरवत असे, प्रधान नेमणे किंवा काढणे त्याच्याच हातात असे, राज्यातील सर्व फौजेचा तोच नायक होता, न्यायाचे आदिस्थानही तोच होता व मुख्य कायदे करणाराही तोच असे, दंतकथा त्यालाच अनुकूल होत्या. कारण त्याच्या अगोदर होऊन गेलेले राजे बहुतेक स्वेच्छ होते. लोकमताचेही पाठबळ त्यालाच होते. कारण इंग्लंडाचा राज्यकारभार कडकडीत असावा, अशी सर्व शहाण्या मनुष्यांची इच्छा असे. वकील मंडळी त्याला अनुकूल असत. कारण राजाची सत्ता व आपली चलती यांच्या मर्यादा एकच आहेत, असे त्यास कळून चुकले होते. राजाला पोप अनुकूल असे. कारण आपल्या मांडलिकावर दुसऱ्या कोणा राजाची सत्ता असावी, असे त्यास वाटत नसे.

तिसऱ्या हेन्रीच्या कादकीर्दीचा पूर्वभाग : जॉन मरण पावल्यामुळे इंग्लंडावरील एक मोठे संकट टळले. इंग्लिश लोकांना आता एखाद्या परकीय राजाला मदत करण्याचे काही कारण राहिले नव्हते. राजप्रतिनिधी पेंब्रोक याने व त्यास मदत करणाऱ्या मंडळीने ताबडतोब स्वातंत्र्याची सनद पुनः प्रसिद्ध केली. एकंदरीने पोक्तपणे विचार करण्याची संधी मिळे तोपर्यंत त्यांनी कर बसविण्यासंबंधी, राज्यातील मोठ्या सभेसंबंधी व जंगलासंबंधी कलमे गाळली होती हे मात्र खरे. ही शहाणपणाची युक्ती योजल्यामुळे लुईसचे इंग्लंडातील मित्र त्यास हळूहळू सोडू लागले. लिंकन येथे त्याच्या सैन्याचा मोड झाला व त्याच्या आरमाराचा सँडविचच्या किनाऱ्याजवळ नाश झाला. लँबेथ येथे झालेल्या तहाप्रमाणे लुईसने इंग्लंड सोडून जाण्याचे कबूल केले व त्याच्या इंग्लंडातील मित्रांनी राजप्रतिनिधिशी सलोखा केला. स्वातंत्र्याची मोठी सनद पुनः एकदा प्रसिद्ध करण्यात आली. तेव्हा ही सनद पहिल्याने प्रसिद्ध केली होती तेव्हा मूळच्या सनदेतील जंगलासंबंधी कलमे गाळली होती, तीच कलमे आता एका स्वतंत्र सनदेच्या स्वरूपाने प्रसिद्ध करण्यात आली. हीच प्रसिद्ध जंगलाची सनद होय (चार्टर ऑफ दी फॉरेस्टस). राजप्रतिनिधी या नात्याने पेंब्रोक याने व त्याच्या मरणानंतर ह्युबर्ट डी वर्ग याने जस्टिशिअर म्हणून इंग्लंडचा राज्यकारभार मोठ्या शहाणपणानेव धैर्याने

चालविला. इ.स. १२३२ मध्ये जेव्हा ह्युबर्ट पदभ्रष्ट झाला तेव्हा पुनः देशातले देशात तंटे होण्याची सुरुवात झाली.

तिसऱ्या हेन्रीचा बदअंमल : तिसऱ्या हेन्रीच्या वाईट वागणुकीमुळे राज्यातील लोकांना पुनः त्याच्याविरुद्ध जाण्याची पाळी आली. हेन्री हा कमअक्कल, लपंडावी व उधळ्या असा होता. स्वतःच्या खर्चासाठी त्याला पैका लागत असे व त्याचे परदेशातील जे मित्र होते त्यास व पोपासही तो रग्गड पैसे देत असे. याप्रमाणे लोक असंतुष्ट होण्यास मुख्य तीन कारणे झाली होती. त्याच्या उधळपट्टीपणाचा व पुळपुळीत राज्यकारभाराचा लोकांना राग येऊन राहिला होता. तो आपल्या परदेशी प्रीतिपात्रांना मानमरातब, पदव्या, मोठेमोठे अधिकार, किल्ले व मालमिळकती देई म्हणून इंग्लंडातील बडे लोक त्याचा द्वेष करीत असत. पोप इंग्लंडातील धर्माधिकाऱ्यांच्या मोठमोठ्या जागा इटाली देशातील धर्मोपदेशकास देत असे व परदेशातील आपली राज्यकारस्थाने चालविण्यासाठी पैसा मिळवावा म्हणून इंग्लंडातील धर्मसंस्थांवर कर बसवीत असे, म्हणून इंग्लंडातील धर्माधिकारी त्याजवर रागावले होते. हे सर्व असंतोषाचे मनोधर्म दंग्याधोप्यांच्या लांबचलांब अशा मालिकारूपाने बाहेर पडू लागले होते.

सुटी देणे हेन्रीला भाग पडले : हेन्रीला पैशाची नेहमी इतकी गरज पडत असे, की त्याला अखेरीस लोकांना आपल्या पैशाबद्दल हक्क घ्या, असे म्हणणे भाग पडले. या त्याच्या बोलण्यावागण्याबद्दल त्याच्या पूर्वजांना तर आश्चर्यच वाटले असते. इ.स.१२३७ मध्ये मोठ्या सभेने एड या नावाचा कर कोणास त्रास न होता कसा बसविता येईल हे ठरवावे इतकेच नव्हे; पण त्याचा व्यय योग्य रीतीने करण्यासाठी एक सभादेखील नेमावी, असे बोलणे त्याने आपल्या प्रजेकडे लाविले. इ.स. १२३८ मध्ये राज्यकारभार सुधारण्यासाठी पंधरा इसमांची सभा नेमून तिच्या सांगण्याप्रमाणे वागण्यास आपण तयार आहे, असे त्याने कबूल केले. तो गॅसकनी येथे गेला असता त्याच्या गैरहजरीत त्याची राणी व भाऊ ही राजप्रतिनिधीचे काम करीत असता त्यांनी इसवी सन १२५४ मध्ये एक मोठी सभा भरविली व त्या सभेस प्रत्येक शायरमधून चार नाईट व प्रत्येक डायोसीझ (बिशपाच्या अधिकाराखालचा प्रदेश) मधून एक असे मुखत्यार बोलाविले होते. मोठ्या सभेमध्ये शायरमधील मुखत्यार खरोखर पाहिल्याने याचवेळेस बसले असावे असे वाटते. हेन्री वचने जरी हवी तेवढी देत असे व त्याप्रमाणे थोडा थोडा वागतही असे, तरी तो लोकांना असंतुष्ट होण्याला नवी नवी कारणे नेहमी होऊ देत असे.

प्रोव्हिजन्स ऑफ ऑक्सफर्ड, सन १२५८ : इसवी सन १२५८ मध्ये लोकांच्या असंतोषाची सीमा झाली होती. यावर्षी एप्रिलमध्ये लंडन येथे जी सभा भरली होती तिने केलेल्या सर्व मागण्या राजाने कबूल केल्याशिवाय त्यास पैसा देण्याचे साफ नाकारिले. या वर्षाच्या ख्रिसमसपूर्वी राज्यकारभारात योग्य त्या सुधारणा करण्यास राजमंत्री मंडळीतून १२

इसम व मोठ्या सभेच्या वतीने १२ इसम नेमावेत, असे मोठ्या सभेने मागणे केले. हे त्यांचे मागणे राजाने कबूल केले व पार्लमेंट सभा तहकूब करून ती ऑक्सफर्ड येथे भरविण्याचे त्याने ठरविले.

ऑक्सफर्ड येथे जूनमध्ये ही पार्लमेंट सभा पुनः भरली. सभेस बॅरनलोक हत्यारबंद होऊन आले. या पार्लमेंटमध्ये जे कामकाज झाले त्यात इतकी अव्यवस्था झाली की, या सभेला मॅड पार्लमेंट हे नाव लोकांनी दिले. बॅरन लोकांनी आपली दुःखे परिहार होण्यासाठी पुनः ती राजापुढे आणली. ही त्यांची दुःखाची यादी वाचून पाहिली म्हणजे स्वातंत्र्याच्या मोठ्या सनदेतील प्रत्येक कलमाची हेळसांड होत होती, असे दिसून येते. हे असे झाल्यावर चोवीस इसमांच्या सभेची नेमणूक करण्यात आली. ही मंडळी जमल्यावर तिने प्रोव्हिजन्स ऑफ ऑक्सफर्ड या नावाची एक नवीन राज्यकारभाराची कलमबंदी लिहून तयार केली.

सर्व राजकारणी कामात राजास सल्ला देण्याकरिता व सर्व प्रधानांवर व मोठमोठ्या अधिकाऱ्यांवर ताबा चालविण्याकरिता या सभेने एक पंधरा इसमांचे मंत्रिमंडळ कायमचे स्थापन केले. सार्वजनिक कामासंबंधी वादविवाद करण्यासाठी बॅरन लोकांनी पसंत करून दिलेल्या बारा इसमांची संमती या (१५ जणांच्या) सभेने वर्षातून तीन वेळा घेण्याचे ठरविले. हे असे केल्याने राज्यातील मोठ्या सभेस आपणास वारंवार जावे लागणार नाही व राजावर आपला दाब बसेल असे बॅरन लोकांस वाटले होते; परंतु ही जी नवीन राज्यकारभार व्यवस्था त्यांनी स्थापन केली होती तीत दोन चुका होत्या. (१) ती अत्यंत बारकाईने तयार केली होती व (२) ती अत्यंत संकुचित होती. असावे तितके तिच्यात प्रतिनिधित्व नव्हते.

प्रोव्हिजन्स ऑफ वेस्टमिनिस्टर इ.स. १२५९ : पुढील वर्षी राजाचा मुलगा जो एडवर्ड याने आग्रह केल्यावरून बॅरन लोकांनी आपल्या संकटांचा परिहार होण्यासाठी योजिलेल्या उपायांची यादी पुढे आणली. याच यादीस प्रोव्हिजन्स ऑफ वेस्टमिनिस्टर असे म्हणतात. प्रोव्हिजन्स (उपाय) ऑफ ऑक्सफर्ड या कायद्याचा प्रोव्हिजन्स ऑफ वेस्टमिनिस्टर कायदा पुरवणी रूपाचा होता. त्या कायद्यामधील अत्यंत महत्त्वाचे कलम म्हटले म्हणजे शेरीफ लोकांच्या नेमणुकीसंबंधाने जे नियमन केले होते ते होय. प्रत्येक कौंटीमधील न्याय सभेने ४ नाईट पसंत करावे व त्यापैकी एकास एक्सचेकर सभेच्या बॅरन लोकांनी कौंटीचा शेरीफ म्हणून निवडावे, असे त्या कलमात ठरविले होते. या कायद्याअन्वये कौंटीमधील सर्व लष्करी व वसुलासंबंधी व्यवस्था लोकांच्या वतीच्या मंडळीच्या हाती आली असती; पण या कलमाप्रमाणे अंमलबजावणी कधी झाली किंवा नाही याविषयी आपल्यास माहिती मिळत नाही.

असंतोष तसाच चालू राहिला : इंग्लंडात या वेळेपर्यंत सारखी धामधूम चालली होती. ज्या सुधारणा लोकांनी त्यांच्यावर बळजबरीने लादल्या होत्या व ज्यांच्यामुळे त्याची सत्ता कमी होण्यासारखी होती तशा सुधारणा हेन्रीच्या मनातून खरोखरी करण्याच्या नव्हत्या.

बॅरन लोकांमध्ये फूट पाडण्याचा मात्र त्याचा यत्न काहीसा चालू होता. हल्ली उपलब्ध असलेल्या माहितीप्रमाणे बॅरन लोकांचे दोन तट झाले होते. एका तटाचा पुढारी सायमन डी मॉन्टफर्ड, लिस्टरचा अर्ल व दुसऱ्या तटाचा पुढारी रिचर्ड डी क्लेर, ग्लूस्टरचा अर्ल हा होता. राजाच्या विरुद्ध चालू असलेल्या भांडणात लोकांची मदत असावी, अशी सायमनची मनापासून इच्छा होती. बॅरन लोकांचा नफा होण्यासाठी राजाच्या सत्तेला मर्यादा असावी, अशी रिचर्डाची इच्छा होती. सन १२६१ मध्ये हे दोघे बडे लोक एकत्र झाले व त्या दोघांनी प्रत्येक शायरमधून लोकांच्या तर्फेने ४ नाईट निवडून त्या सर्वांची सभा सेंट आलबन्स येथे भरविण्याचे ठरविले. जेव्हा राजाला ही बातमी कळली तेव्हा त्याने प्रत्येक शेरिफाला हे नाईट सेंट आलबन्स येथे न पाठविता विंडसर येथे तो जी सभा भरविणार होता त्या सभेस पाठवून देण्याची एकदम आज्ञा केली. याप्रमाणे राजाचा जो बॅरन लोकांबरोबर तंटा चालला होता, त्याच्या योगाने प्रतिनिधित्वाच्या तत्त्वास अधिकच रिघाव मिळाला.

फ्रान्सच्या राजाची मध्यस्थी : अखेरीस राजा व बॅरन यांनी आपला तंटा नववा लुईस जो फ्रान्सचा राजा होता, त्याच्या मध्यस्थीने तोडण्याचे ठरविले. सन १२६४ च्या जानेवारी महिन्यात लुईसने आपला फैसला प्रसिद्ध केला. या निवाड्यास माईस ऑफ ॲमीन्स असे म्हणतात. त्याने प्रोव्हिजन्स ऑफ ऑक्सफर्ड हा कायदा व त्याच्या आधाराने केलेले सर्व कायदे रद्द केले. सनद, कायदा किंवा रीतभात, यांच्या योगाने लोकांना इंग्लंडमध्ये या वेळेस जे स्वतंत्र हक्क प्राप्त झाले होते, त्यास या फैसल्याने बाध येणार नाही व त्या वेळेस राजाच्या विरुद्ध चाललेल्या खटपटीत जे लोक सामील होते त्यास शिक्षा दिली जाणार नाही, असेही त्याने ठरविले होते.

बॅरन लोकांचे युद्ध व डी मॉन्टफर्ड याचे पार्लमेंट : या फैसल्यावरून स्वातंत्र्याची मोठी सनद दिल्यानंतर जी स्थिती राज्यकारभारास प्राप्त झाली होती ती पुनः त्यास प्राप्त झाली. ही मोठी सनद दिल्यानंतरही ज्याअर्थी हेन्रीने पुष्कळ वर्षेपर्यंत आपला बदअंमल चालविलाच होता, त्याअर्थी या फैसल्याने म्हणजे बॅरन लोकांचे समाधान झाले असावे, असे मानणे कठीण आहे. मध्यस्थीचा असा जेव्हा निरुपयोग झाला तेव्हा बॅरन लोकांना हातात शस्त्रे घेणे भागच पडले. लुईस येथील लढाईत मे महिन्याच्या १४ व्या तारखेस बॅरन लोकांना यश प्राप्त झाले व त्यांनी राजा, त्याचा मुलगा एडवर्ड व त्याचे मुख्य मुख्य पाठिंबे यांना कैद केले.

राजाला बॅरन लोकांच्या मागण्या कबूल करणे आता भाग पडले. या दोन पक्षांमधील तहास माईस ऑफ लईस असे म्हणतात. हा तह झाल्यानंतर जे पार्लमेंट भरले त्यात प्रत्येक शायरमधन ४ नाईट आले होते. कौंटीतील लोकांनी आपल्या मुखत्यारास पार्लमेंटमध्ये पाठविल्याचे हे दुसरे उदाहरण होय. त्या पार्लमेंटने राज्य करण्याची एक नवी पद्धती मंजूर केली. या पद्धतीप्रमाणे बॅरन लोकांनी तीन निवडून येणारे इसम पसंत करावे ते व त्यांनी नऊ

मंत्री पसंत करावेत व या नऊ जणांच्या सल्ल्याने राजाने राज्यकारभार चालवावा, असे ठरले होते. हे नऊ इसम इंग्लंडमध्ये जन्मलेले असावेत असेही ठरले होते.

पण ही नवीन राज्यकारभार करणारी मंडळी फार डळमळीत स्थितीत होती. राणी इंग्लंडवर स्वारी करण्यासाठी फ्रान्स देशात सैन्य जमवीत होती. राजा व त्याचे मित्र हाती शस्त्र घेण्यास त्या सैन्याचीच येण्याची वाट पाहत होते, म्हणून सन १२६५ मध्ये जानेवारी महिन्यात सायमन डी मॉन्टफर्ड याने दुसरे पार्लमेंट भरविण्याचे ठरविले. या पार्लमेंटास जे धर्मगुरू व बॅरन त्यास अनुकूल होते तेवढेच त्याने बोलाविले होते; परंतु या पार्लमेंटमध्ये त्याने पहिल्यानेच शहरे व सनदी गावे यातून मुखत्यार नेमून पाठविण्यास हुकूम दिला होता. हेच सायमन डी मॉन्टफर्ड यांचे प्रसिद्ध पार्लमेंट होय. याच पार्लमेंटमध्ये ज्यात मुखत्यार निवडून आल्याची उदाहरणे आपल्या पाहण्यात आली आहेतच. शहरे व सनदी गावे यास मुखत्यार नेमून पार्लमेंट सभेत पाठविण्याचा अधिकार यापुढे ३० वर्षांनी पक्का प्राप्त झाला. काहीही असो, सायमन डी मॉन्टफर्ड याने भरविलेली ही पहिली पार्लमेंट सभा सुधारणेच्या संबंधाने ध्यानात ठेवण्यास योग्य आहे, यात काही संशय नाही.

सायमनाने जरी इंग्लंडच्या लोकांची अशा रीतीने मोठी सेवा केली होती तरी तिजमुळे त्याचे पराजय व मृत्यूपासून रक्षण झाले नाही. ग्लूस्टरचा तरुण अर्ल जो गिल्बर्ट याच्या मत्सराचा व एडवर्डच्या बुद्धीचा अखेरीस जय झाला. सन १२६५ च्या ऑगस्ट महिन्याच्या ४ थ्या तारखेस इव्हिॅम येथे जी लढाई झाली तीत सायमन मरण पावला. त्याच्या अनुयायांनी लढाई काही दिवस लांबविली; परंतु डिक्टम डी केनिलवर्थ या नावाच्या कायद्याने ही बॅरन लोकांची लढाई संपली जरी नाही, तरी संपल्यासारखीच झाली. केनिलवर्थ हा किल्ला राजाच्या स्वाधीन अगदी अखेरीस झाल्यावरून या कायद्यास या किल्ल्यावरून नाव पडले आहे. या कायद्याप्रमाणे सायमनाने केलेले सर्व कायदे रद्द करण्यात आले; परंतु राजाने सनदांप्रमाणे वागलेच पाहिजे हे मात्र कबूल करण्यात आले. हेन्री आता वृद्ध झाला होता व त्याला संकटे भोगून शहाणपण प्राप्त झाले होते. डिक्टम डी केनिलवर्थ हा कायदा प्रसिद्ध झाल्यानंतर तो सहा वर्षांनी शांततेने मरण पावला.

पहिल्या एडवर्डाचे राज्यारोहण : ज्या वेळेस हेन्री मरण पावला त्या वेळेसदेखील एड्वर्ड पुण्यभूमीतच होता. तरी लोकांनी त्यास ताबडतोब राजा म्हणून कबूल केले. याच वेळेस ज्याचा पसंत करण्याचा आणि राज्याभिषेकाचा विधी झालेला नाही अशा राजापाशी लोकांनी राजनिष्ठेची शपथ पहिल्याने घेतली.

पहिल्या एडवर्डची राज्यकारभार पद्धती : ब्रिटन देश इंग्लिश लोकांच्या पूर्ण अमलाखाली आणणे व इंग्लंडमधील संस्था परिपूर्ण दशेला आणणे हेच काय ते एडवर्डाचे मुख्य दोन हेतू होते. आपल्याला फक्त या दुसऱ्या हेतुसंबंधाने या ग्रंथात विवेचन करणे आहे. इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यास राज्यकारभारात सुधारणा करणारा या नात्याने एडवर्ड

राजाची दोन स्वरूपे दृष्टोत्पत्तीस येतात. एका दृष्टीने पाहू गेले असता तो दुसऱ्या हेन्रीसारखा दिसतो. तो शहाणा, उद्योगी व धीराने काम करणारा असा राजा होता. त्याच्या अगोदर होऊन गेलेल्या राजाच्या नेभळाईने जी संकटे आली होती ती वारण्याचा व राजाच्या सत्तेला बळकटी आणून पुनः असा प्रसंग न येऊ देण्याचा त्याने निश्चय केला होता. दुसऱ्या हेन्रीप्रमाणे एडवर्डाच्याही मनात धर्मोपदेशकांवर आपला ताबा असावा, बड्या लोकांमध्ये शांतता राखावी व साधारण जनसमूहाचे रक्षण करावे, असे होते; पण या दोघांच्या परिस्थितीत बरीच तफावत होती. इंग्लंड हे हेन्रीच्या राज्यविस्ताराच्या अर्ध्याइतकेही नव्हते. इंग्लंडबाहेर जे मुलुख एडवर्डच्या ताब्यात होते त्याच्या योगाने त्याचे सामर्थ्यात भर पडेल असे मुळीच नव्हते. शिवाय ज्यावेळी दुसरा हेन्री इंग्लंडच्या गादीवर बसला त्या वेळेस राजाला अनियंत्रितपणाने राज्यकारभार चालविल्याशिवाय सुटकाच नव्हती. पहिला एडवर्ड ज्या वेळेस गादी चालविण्याजोगा झाला होता. खरी स्थिती काय आहे ती समजून घेऊन त्याप्रमाणे उपाय करण्याचे एडवर्डच्या अंगी शहाणपण होते, या त्याच्या गुणामुळे आपल्याला त्याच्या दुसऱ्या स्वरूपाकडे वळावे लागत आहे. हे त्याचे स्वरूप म्हटले म्हणजे नियमशासनबद्ध राज्यकारभार स्वातंत्र्याचा कैवारी व इंग्लंडमधील पार्लमेंट सभेचा जनक या नात्याचे होय. यादृष्टीने एडवर्डकडे पाहिले असता तो सायमन डी मॉन्टफर्ड याला जे सुचविण्यासच फक्त वेळ मिळाला होता, तेच त्याने पद्धतवार जुळवून तयार केले. स्वातंत्र्याचे वारे एडवर्डच्या जोपासनेने इतके फैलावून बळकट झाले की, त्याच्या योगाने एडवर्डला सन १२९७ मध्ये कन्फर्मेशन ऑफ दी चार्टर्स (सनदांची बहाली) या नावाची प्रसिद्ध सनद देणे भाग पडले.

पहिल्याने एडवर्डची आपल्या प्रजेच्या प्रत्येक वर्गाशी व राज्यातील प्रत्येक खात्याशी राज्यकारभारपद्धती कशी होती हे आपण पाहू.

(१) पहिल्या एडवर्डची बड्या लोकांसबंधी राजनीती : बॅरन लोकांची लढाई एडवर्ड विसरला नव्हता. फ्यूडल पुढाऱ्यांची सत्ता कमी करण्याची त्याची इच्छा होती. हे सिद्धीस नेण्याकरिता त्याने क्वो वारान्टो (कोणत्या हक्काने) या नावाची चौकशी करण्याची युक्ती योजिली. बॅरन लोकांची सत्ता अंशतः त्यास सरकाराने दिलेल्या अधिकारत्मक असे, म्हणजे काही प्रांतांवर व जागांवर त्यांना अंमल चालविण्याचा हक्क असे. सन १२७८ मध्ये एडवर्डने स्टॅट्यूट ऑफ ग्लूस्टर या नावाचा कायदा मंजूर करवून घेतला. फिरणाऱ्या न्यायाधीशांनी बड्या लोकांना सरकाराने जे अधिकार दिले होते ते त्यांना कोणत्या हक्काने मिळाले होते याबद्दल चौकशी करण्याचे या कायद्याने ठरविण्यात आले होते. ही चौकशी इतक्या कडक रीतीने करण्यात आली होती की, बॅरन लोकांना तिचा पुरा तिरस्कार आला होता. अर्ल वॉरेनला जेव्हा तुमचा कबाला कोठे आहे असे विचारण्यात आले तेव्हा त्याने एक गंजलेली तलवार बाहेर काढली व सांगितले की, "या तलवारीच्या जोराने माझ्या वाडवडिलांनी आपली जहागीर मिळविली आहे आणि मी तिच्याच जोरावर तिचे रक्षण

करीन.'' एडवर्डने ही चुणूक लक्षात ठेवून ही चौकशी फार कडक रीतीने करण्याची बंदी केली.

याच हेतूने एडवर्डने एक दुसरा उपाय शोधून काढला, त्याला 'डिस्ट्रेट ऑफ नाइटहूड' असे म्हणतात. त्याने ज्या जमीनदारांचे सालीना २० पौंड (हल्ली या रकमेचे सालीना तीनशे पौंड होतात) उत्पन्न होते त्यांना नाईटहूड घेण्याचा हुकूम केला व या हुकमाची अमान्यता केल्यास त्याजपासून जबरदस्त दंड घेण्याचे ठरविले. ही युक्ती अंशतः पैसे मिळविण्यासाठी तर होतीच; पण मुख्यत्वेकरून त्याचा हेत मोठमोठ्या बड्या लोकांचा डौल लढाईच्या वेळी नाईट या नात्याने लढणारे व नाईट ही पदवी ज्यांना आहे असे पुष्कळ लोक तयार करून कमी करावा हा होता.

'स्टॅट्यूट क्विआ एम्पटोर्स' (या कायद्याचे प्रारंभाचे लॅटिन शब्द हे आहेत व त्यावरून या कायद्यास हेच नाव प्राप्त झाले आहे.) हा कायदा सन १२९० मध्ये एडवर्डने करून वर दिलेला हेतु सिद्धीस नेण्यास तिसरा उपाय योजिला. या कायद्याने त्याने फ्यूडल (मोकाशाची) पद्धतीप्रमाणे जमिनी धारण करण्याच्या संबंधाने फेरफार अमलात आणले. पूर्वी ज्या मनुष्यापासून ज्याला जमीन मिळत असे तो मनुष्य जमीन देणाऱ्याचा आश्रित बनत असे. वरच्या कायद्याने ज्याला जमीन मिळाला असेल तो ज्याने जमीन दिली असेल त्याचा आश्रित न होता जमीन देणारा धनी ज्या बड्या मनुष्याचा आश्रित व्हावयाचे असे ठरले. उदाहरणार्थ जर एखाद्या मुख्यकुळाने काही स्थावर मिळकत आपल्या एखाद्या मित्रास दिली, तो तो मित्र त्याचे कूळ न होता या कायद्याप्रमाणे राजाचे कूळ व्हावयाचे. या अशा कायद्याने खास राजाच्या कुळाची संख्या मात्र वाढावयाची असे होते. 'स्टॅट्यूट डी डोनीस कंडीशनॅलिबुस' (या कायद्याचे प्रारंभीचे लॅटिन शब्द हे आहेत त्यांच्यावरून या कायद्यास हेच नाव पडले आहे. या शब्दांचा अर्थ 'काही अटींवर दिलेल्या जमिनीसंबंधी' असा होतो.) हा कायदा सन १२८५ मधून करून एडवर्डने आपल्या बड्या बड्या उमरावास खुश केले होते. या कायद्याने वंशपरंपरागत भोग्य स्थावर मिळकती कायमच्या केल्या गेल्या व त्यामुळे त्या विकण्यास किंवा विकत घेण्यास आडकाठी उत्पन्न झाली.

(२) पहिल्या एडवर्डची धर्मसंस्थासंबंधी राजनीती : धर्मगुरूंची सत्ता व संपत्ती नियमित करण्याचा व त्याजपासून योग्य तितका वसूल घेण्याचा एडवर्डचा हेतू होता.

सन १२७९ मध्ये ''स्टॅट्यूट ऑफ मॉर्टमेन' हा कायदा करण्यात आला. या कायद्याप्रमाणे जर कोणी मनुष्याने आपली जमीन एखाद्या धर्मसंस्थेला बक्षीस दिली तर त्याच्या या कृत्याबद्दल ती जमीन त्याच्या धन्याने जप्त करावी किंवा त्याने आपला हक्क न जाणून ती जप्त न केल्यास राजाने ती जप्त करावी, असे ठरविण्यात आले होते. असा कायदा करण्याची कारणे पुढीलप्रमाणे होती : धर्म खात्याचे ताब्यात पूर्वीचीच मालमिळकत अवाढव्य होती. ही त्या खात्यातील मालमिळकत एकसारखी वाढतच होती. धर्मखात्यात जसजशा

जमिनी जास्त जाऊ लागल्या तसतसा राजाचा व बड्या लोकांचा फ्यूडल पद्धतीप्रमाणे वसूल कमी होऊ लागला. कारण रिलीफ, वॉर्डशिप, मॅरेज, एसचीट आणि अशाच दुसऱ्या फ्यूडल हक्काचा अंमल देऊळ किंवा मठासारख्या एक व्यक्तिभूत सनदी मंडळीवर चालत नसे. एखादा मनुष्य आपली जमीन एखाद्या मठाला ती पुनः त्याजपासून आपल्यास खंडाने मिळावी या बोलीने बक्षीस करीत असे. कारण असे केल्याने फ्यूडल पद्धतीने बसणारे सारे त्याजवर बसत नसत. हेही एक कारण हा 'मॉर्टमेन'चा कायदा करण्याचे होते. एखाद्याला धर्मसंस्थेला जमीन देणे असेल तर त्याला राजाकडून परवानगी मिळत असे; पण ही अशी परवानगी देण्याबद्दल राजा काहीतरी पैसे हक्काबद्दल घेत असे.

सन १२८५ मध्ये धर्मसंस्थांच्या न्यायसभांचा अंमल मर्यादित करण्यात आला होता. या न्यायसभा जितके अधिक अधिक खटले येतील तितके आपल्या अधिकाराखाली आणण्याचा सारखा यत्न करीत असत. पूर्वी सांगितलेल्या पारमार्थिक किंवा नैतिक खटल्यांशिवाय या न्यायसभांनी लग्ने व मृत्युपत्रे याजपासून होणारे खटले तपासावे असे एडवर्डन ठरविले होते. तथापि, या कायद्याने धर्मन्यायसभांना धर्मोपदेशकांनी अपराध केला असल्यास त्यांची चौकशी करण्याच्या हक्कास बाध आणिला नव्हता.

धर्मगुरूंवर कर बसविल्याने मोठा तंटा उत्पन्न झाला. सातव्या बॉनीफेस नामक पोपाने सन १२९६ मध्ये कोणाही प्रापंचिक अधिकाऱ्याला कोणाही धर्मोपदेशकाने कर देऊ नये, अशी आज्ञा केली. दुसऱ्या वर्षी जेव्हा एडवर्डने धर्मोपदेशकांपाशी वर्गणी मागितली तेव्हा त्यांनी आम्हास पोपाची आज्ञा मोडवत नाही, असे साफ उत्तर दिले. सरकारास होणाऱ्या खर्चाला जर ते हातभार लावणार नाहीत तर सरकाराच्या संरक्षणास ते पात्र होणार नाहीत, असे एडवर्डने ठरविले व त्यास कायद्याच्या संरक्षणापासून दूर केले. त्यामुळे त्यांचे जर कोणी काही नुकसान केले तर त्यांची दाद लागत नसे; पण त्यांनी केलेल्या दुसऱ्यांच्या नुकसानी मात्र त्यांना भरून द्यावा लागत असत. यामुळे त्यांना फार त्रास होऊ लागला व त्यांनी राजाला करभार देण्याचे कबूल केले.

(३) सामान्य जनसमूहाशी पहिल्या एडवर्डची राजनीती : पहिला एडवर्ड हा दुसऱ्या हेन्रीप्रमाणे राज्यात चोहोकडे व्यवस्था व न्याय देण्याची कडक पद्धती स्थापन करून एकंदर जनसमूहाचा हितकर्ता बनला होता. सामान्य जनसमूहाला पार्लमेंट सभेमध्ये जागा देऊन व त्यास प्रतिनिधानाची कायदेशीर पद्धत लावून देऊन त्याने त्याची अत्यंत मोठी कामगिरी बजाविली होती. एकंदर पार्लमेंटसभेविषयी जेव्हा आपण विवेचन करू त्या वेळेस या संबंधाने लिहिणे विशेष सोईस्कर होईल.

(४) पहिल्या एडवर्डची व मुलासंबंधी राजनीती : एडवर्ड हा त्याच्या बापासारखा उधळ्या नव्हता; पण त्याच्या फार लांबवर जाऊन पोहोचणाऱ्या परदेशासंबंधी राजनीतीच्या मसलती त्याला फार मोठ्या खर्चात आणीत असत. स्वातंत्र्याच्या मोठ्या सनदेने पूर्वी ज्या

जोरतलबी घेण्यात येत असत, त्या बंद करण्यात आल्या होत्या व नुसत्या पतीवर मोठमोठ्या रकमा उभ्या करणे कठीण काम झाले होते, म्हणून एडवर्डला पैसा काढण्यासाठी कधी-कधी नवे व जबरदस्तीचे उपाय योजावे लागत असत. एका नवीन धर्मयुद्धासाठी लंडन शहरात टेम्पल या स्थळी जो खजिना एकत्र केलेला होता तो त्याने सन १२८२ मध्ये वेल्स देशाशी लढाई करण्यासाठी एकदम काबीज केला. सन १२९४ मध्ये त्याने देवळे व मठ यात जो सर्व द्रव्यसंचय होता तो हस्तगत करून घेतला त्याच वर्षी त्याने त्या वेळचा अत्यंत मौल्यवान निर्यातीचा माल जी लोकर ती सर्व जप्त केली व जेव्हा प्रत्येक पोत्यामागे त्यास व्यापाऱ्यांनी ३ पासून ५ मार्क दिले तेव्हा ती त्याने त्यांचे स्वाधीन केली. सन १२९७ मध्ये पुनः त्याने सर्व लोकर जबरदस्तीने आपल्या ताब्यात घेतली व ती परत देण्यासाठी पूर्वीपेक्षाही जास्ती दस्तुरी घेतली. त्याच्या कारकीर्दीच्या उत्तर भागात जो लोकांचा असंतोष उघडकीस आला गेला त्याची वाढ होण्यास हे त्याचे जबरीचे आचरण बऱ्याच अंशी कारणीभूत झाले होते.

(५) न्यायासंबंधी पहिल्या एडवर्डची राजनीती : प्राचीन काळच्या क्युरिआ रेजिस नावाच्या न्यायसभेपासून कॉमन प्लीझ व किंग्सबेंच या न्यायसभा कशा विभक्त झाल्या, हे आपण वर पाहिलेच आहे. एक्सचेकर या न्यायसभेत फक्त राजाच्या वसुलाच्या संबंधाची कामे चालत असत. पहिल्या एडवर्डच्या कारकीर्दीपासून या सर्व न्यायसभा एकमेकांपासून अलग व स्वतंत्र झाल्या. प्रत्येकाचा मुख्य अधिकारी वेगवेगळाला असे. किंग्सबेंच व कॉमन प्लीझ यात मुख्य न्यायाधीश असत आणि एक्सचेकर ही न्यायसभा एका मुख्य बॅरनाचे ताब्यात असे. अशाच रचनेच्या या न्यायसभा सन १८७३ पर्यंत होत्या. पहिल्या एडवर्डच्याच कारकीर्दीपासून या न्यायसभा फक्त न्यायाचेच काम करू लागल्या व त्यांचा श्रेष्ठ राज्यकारभाराशी संबंध अगदी तुटला; म्हणून त्यांचा इतिहासाचा माग काढण्याचे आपणास काही कारण नाही. परंतु राजाने न्याय देण्याचे काम सोडून दिले नव्हते. कोणत्याही कारणाने साधारण न्यायसभात जर कोणाची दाद लागत नसेल, तर राजाला वाटेल त्या नुकसानीची दाद लाविता येते अशी लोकांची अजूनही समजूत असे. कोणाचे काही नुकसान झाले असल्यास त्याने राजाकडे अर्ज करावा व राजाने वाटल्यास मेहेर नजर करून त्याच्या दुःखाचा परिहार करावा. ही अर्जे निकाल करण्याचे काम चॅन्सलरासच सांगण्यात आले. याप्रमाणे कोर्ट ऑफ चॅन्सरी या न्याय सभेचा जन्म झाला. न्याय देण्याच्या कामात राजाला एक नवीन सल्ला देणारी मंडळी मदत करू लागली. या मंडळीतील सभासद काहीसे जुन्या क्युरिआ रेजिस या न्यायसभेतील सभासदांसारखे होते. या सल्ला देणाऱ्या मंडळीत राजाच्या खानगीपैकी व राज्यातील मोठमोठाले अधिकारी, न्यायाधीश व राजाला वाटतील ते लोक असत. अलीकडे हीच मंडळी प्रिव्ही कौन्सिल (खास मंत्रिमंडळ) हे नाव पावली आहे व हिनेच इंग्लंडचे राज्यकारभारात आपल्याला मोठी महत्त्वाची जागा मिळवून ठेविली आहे.

(६) लष्करासंबंधी पहिल्या एडवर्डची राजनीती : एडवर्डला वारंवार लढाया कराव्या लागत असत आणि त्यामुळे जेवढे सैन्य मिळवेल तितक्याची त्याला जरूर लागत असे; परंतु तो दुसऱ्या हेन्रीप्रमाणे परदेशातून पगार देऊन शिपाई आणीत नसे. सन १२८५ मध्ये त्याने स्टचॅटूट ऑफ विंचेस्टर हा कायदा अमलात आणला. या कायद्याने त्याने दुसऱ्या हेन्रीचा असाईझ ऑफ आर्स हा कायदा ताजा केला व शिबंदी शिपायांमध्ये जे राष्ट्रीय सैन्याचे वास्तविक कार्यसाधकत्व असले पाहिजे ते आणण्याची त्याने व्यवस्था केली. त्याने डिस्टेंट ऑफ नाईटहूड या कायद्याने श्रीमंत जमीनदारास पंच हत्यारी घोडेस्वारांची चाकरी करणे भाग पाडले. या त्याच्या चाकरीशी व त्याच्या ताब्यातील जमिनीच्या पट्ट्यांतील करारांशी काही एक संबंध नसे. सन १२९७ मध्ये युरोप खंडात चाकरी करण्यासाठी त्याने सर्व प्रकारच्या लोकांची भरती करून सैन्याची जमवाजमव करण्याचा यत्न केला. या त्याच्या जुलमाच्या कृत्यामुळे लोक संतापून या कायद्याविरुद्ध उठले आणि त्यामुळे तो एडवर्डास सोडून देणे भाग पडले. लष्करी कामकाजात व त्याचप्रमाणे दुसऱ्या एकंदर राज्यकारभाराच्या कामात एडवर्डचा कल फ्यूडल विचारकोटी धाब्यावर बसविण्याकडे असे. त्याच्या मुख्यकुळांवर व त्याच्या अनुयायांवर तो विश्वास ठेवत नसे. त्याचा कल एकंदर राष्ट्राच्या शक्तीचा उपयोग करून घेण्याकडे असे.

यानंतर आपल्याला एडवर्डने पार्लमेंटास जे पूर्ण स्वरूप आणले त्याजकडे वळले पाहिजे.

अनुभवादाखल पार्लमेंट : एडवर्डने राज्य करण्यास सुरुवात केल्यापासून पार्लमेंट सभा बोलविण्याचा रिवाज ठेवला होता; पण या पार्लमेंटच्या रचनेत पुष्कळ फेरफार असे. सन १२७५ मध्ये जी पार्लमेंट सभा भरली होती तीत धर्मोपदेशक आणि बॅरन यांच्याशिवाय साधारण जनसमाजही होता असे म्हणतात. याचा अर्थ सनदी गावोगावचे प्रतिनिधी जरी नव्हते तरी प्रत्येक शायरचे प्रतिनिधी त्या सभेत होते इतकाच घ्यावयाचा आहे. सन १२८३ मध्ये एडवर्डला वेल्स प्रांताशी लढाई करण्यासाठी पैशाची जरूर पडली. तो त्या वेळेस बहुतेक बॅरन लोकांसह वेल्स प्रांतातच होता, म्हणून त्याने दोन सभा भरविण्याचा अपूर्व उपाय योजिला. एक यॉर्क प्रांतातील लोकांची सभा त्याने यॉर्क येथे भरवली व दुसरी कॅन्टरबरी येथील लोकांची सभा त्याने नॉर्दहॅम्टन येथे भरवली. या सभांमध्ये धर्मगुरूंचे व जनसमूहाचे प्रतिनिधी मात्र होते. राजाच्या विरुद्ध बंड केल्याबद्दल वेल्स प्रांताचा राजपुत्र जो डेव्हिड याचेवर चाललेला खटला पाहण्याकरिता त्याने याच वर्षाच्या अखेरीस एक पार्लमेंट सभा बोलाविली होती. या पार्लमेंटासाठी त्याने सर्व बॅरन लोक, प्रत्येक शायरमधून दोन नाईट (सरदार) आणि प्रत्येक शहराचे किंवा सनदीगावांचे सभासद इतके लोक बोलाविले होते. धर्मगुरूंपैकी कोणासही या पार्लमेंटास बोलाविले नव्हते. कारण ज्या खटल्यात प्राणांत दंडाची शिक्षा होणे आहे तेथे ते येतील अशी संभूती नव्हती. सन १२९० मध्ये एडवर्डने पहिल्याने फक्त बॅरन व बिशप यासच पार्लमेंट सभेत बोलाविले होते. त्यांना काम करावयास

लागून काही काळ गेल्यावर शायरांच्या तर्फेने नाईट यास बोलाविणे पाठविले होते. यावरून आपल्यास एडवर्डची कारकीर्द अर्धी होऊन जाईतोपर्यंत पार्लमेंट सभेची रचना नक्की नव्हती असे दिसून येईल. ज्या वेळेस काही विशेष कारणासाठी एक्स्ट्रा आडिनरी नावाचा कर घेणे असेल त्या वेळेस मुख्य कुळांच्या संमतीशिवाय तो घेऊ नये हे मोठ्या सनदेतील कलम लक्षात ठेवून जोपावेतो राजा आपले काम करीत असे तोपर्यंत त्याने वाटेल त्या वेगवेगळ्या वर्गांच्या लोकांचा सल्ला घेतल्यास चालण्यासारखे होते. साधारण जनसमूहाच्या तर्फेच्या लोकांची संमती सार्वजनिक कामाच्या संबंधाने घेतलीच पाहिजे, हा त्यांचा हक्क पुष्कळ वेळा राजाने कबूल केला होता; परंतु तो अजूनपर्यंत राज्यकारभारातील एक आवश्यक भाग होऊन राहिला नव्हता.

सन १२९५ तील नमुनेदार पार्लमेंट : सर्वसाधारण जनसमूहाचे कल्याणच व्हावे असा त्या वेळेस घडणाऱ्या सर्व गोष्टींचा कलच होऊन बसला होता. बड्या लोकांवर व धर्माधिकाऱ्यांवर आपला दाब असावा अशी एडवर्डची इच्छा होती आणि म्हणूनच त्याने या दोघांच्या सत्तेच्या समतोलीची जी सर्वसाधारण जनसमूहाची सत्ता ती आपलीशी करून घेण्याचा यत्न चालविला होता. एड्वर्डाला पैशाची जरूर वारंवार लागत असे आणि तेवढ्यासाठी तो त्याच्या कडक हुकमतीमुळे ज्या खेड्यापाड्यांतील लहानसहान शेतकऱ्यांचे व शहरातील व्यापाऱ्यांचे कल्याण झाले होते त्यांजवर अवलंबून राहत असे. मी राज्यकारभारात निष्णात आहे अशी त्याची खात्री असल्यामुळे लोकांची मदत मिळवून आपली सत्ता अधिक प्रबळ करावी, अशी त्यास उमेद होती. तो स्वभावाने व्यवस्थित व कायदेशीर होता आणि म्हणूनच राज्यातील मोठ्या सभेस (पार्लमेंटास) अत्यंत विचार करून कायमचे स्वरूप आणावे, अशी त्याची इच्छा होती. या हेतूला अनुसरून त्याने इसवी सन १२९५ मध्ये इंग्लंड देशात पहिली व जीस पूर्ण स्वरूप आले आहे, अशी पार्लमेंट सभा भरविली. जुन्या रीतीप्रमाणे त्याने बॅरन लोकांना व धर्मगुरूस एक खास आव्हानपत्र पाठविले होते; परंतु त्याने हलक्या दर्जाच्या धर्मगुरूचे प्रतिनिधी म्हणून बिशपाची गादी ज्या देवळात आहे त्या देवळातील पात्र्यांच्या वतीने एक व बिशपांच्या ताब्यातील मुलखातील पात्र्यांच्या वतीने दोन, असे प्रतिनिधी घेऊन येण्यास आर्चबिशप व बिशप यास हुकूम केला होता. प्रत्येक शायरमधून दोन नाईट, प्रत्येक मोठ्या शहरातून दोन रहिवासी व प्रत्येक गावातून (ज्या गावास पार्लमेंट सभेस प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क आहे त्या गावास बरो असे म्हणतात) दोन गृहस्थ असे पसंत करून पाठविण्याविषयी त्याने शेरीफ यास हुकूम पाठविले होते. याप्रमाणे राज्यातील तिन्ही वर्गांच्या लोकांच्या प्रतिनिधींनी परिपूर्ण असे हे पार्लमेंट भरविण्यात आले होते. काही काळाने पुढे हलक्या दर्जाच्या धर्मगुरूंचे प्रतिनिधी पार्लमेंटास येण्याचे बंद झाले खरे; परंतु या वेळेपासून पुढे लोकांच्या तर्फेने येणारे मुखत्यारांचे पार्लमेंटसभेस येणे कधीही बंद झाले नाही.

सनदांची बहाली : आता सन १२९७ मध्ये या स्वातंत्र्याच्या सनदांची जी अखेरची बहाली झाली तिच्यासंबंधाने उल्लेख करणे बाकी राहिले आहे.

काही काळापर्यंत एडवर्डची पैशाची ओढ फारच होऊन राहिली होती. त्याची फ्रान्स व स्कॉटलंड देशाशी जी लढाई चालू होती त्या लढाईस मनुष्ये व पैसे पुरविण्याची फार जरूरी होती; परंतु हा पुरवठा करण्याचे इंग्लंड देशाचे मनात नव्हते. याच वर्षाच्या प्रारंभाचे सुमारास त्याने धर्मगुरूच्या कायद्याच्या संरक्षणाबाहेर, त्याच्या खर्चास हातभार लावण्याचे नाकबूल केल्याबद्दल, ठेविले होते. नंतर त्याने सर्व बॅरन लोक एकत्र करून त्याजजवळ फ्रान्स देशाशी लढाई करण्यास मदत मागितली. मी फ्लॅण्डर्स या प्रांतात सैन्य घेऊन जातो, तुम्ही गॅस्कनी प्रांतात सैन्य घेऊन जा, असे एड्वर्डाने रोगर बायगॉड नॉर्फकचा अर्ल व हंप्रे बोव्हन हरफर्डचा अर्ल, जे अनुक्रमे इंग्लंड देशातील मार्शल व कॉन्स्टेबल होते, त्यास सांगितले. राजा बरोबर असल्याशिवाय परदेशात आम्ही चाकरी करण्यास बांधले गेलो नाही, असे म्हणून त्यांनी तेथे जाण्याचे नाकारले. हे उत्तर मिळाल्यावर सर्व सभा मोठ्या गडबडीने बरखास्त झाली. नंतर एडवर्डने हे सर्व काम स्वतःच करण्याचा निश्चय केला. त्याने व्यापारी लोकांची लोकर जप्त केली, प्रत्येक कौंटीला सैन्याला लागणारी बेगमी पुरविण्याविषयी हुकूम केला व परदेशात लढाईस जाण्यास तयार राहण्यास राज्यातील प्रत्येक जमीनदारास बोलावून आणून हुकूम केला. नंतर त्याने धर्मोपदेकांशी समेट केला. मार्शलने व कॉन्स्टेबलने आपले मित्र गोळा केले व सार्वजनिक संकटांची एक यादी तयार करून राजाला सादर केली. एडवर्डने उडवाउडवीचे उत्तर दिले व फ्लॅण्डर्स देशास तो गलबतात बसून चालता झाला.

एडवर्ड गेल्याबरोबर मार्शल व कॉन्स्टेबल यांनी लंडन शहराकडे कूच केले. सर्व शहरवासी त्यास येऊन मिळाले. एडवर्डचा थोरला मुलगा जो राजप्रतिनिधीचे काम करीत होता त्याने मोठी सभा बोलाविली. या सभेत मार्शल व कॉन्स्टेबल यांनी सनदांची पुनः बहाली राखण्याविषयी आपली मागणी पुढे केली. या सनदांच्या बहालीबरोबर काही पुरवणीची कलमेही त्यांनी मंजूर व्हावी म्हणून तयार करून आणली होती. धाकट्या एडवर्डचा काही उपाय न चालल्यामुळे त्याने त्या मंजूर केलेल्या सनदा व ती नवे कलमे आपल्या बापाच्या मंजुरीसाठी घेट येथे पाठवून दिली. ही मंजूरी एडवर्डने नोव्हेंबरच्या ५ व्या तारखेस दिली.

ही नवी कलमे फ्रेंच व लॅटीन भाषेत लिहिलेली हल्ली उपलब्ध आहेत. या दोन भाषांत लिहिलेल्या कलमांत पुष्कळ ठिकाणी फेरफार आहे. फ्रेंच भाषेत लिहिलेली कलमे खरी असावीत, अशी समजूत आहे. एडवर्डने अलीकडे लोकांकडून जो पैसा बळजबरीने वसूल केला होता त्याचा आधार घेऊन पुढे तसाच पैसा लोकांकडून काढू नये व जुन्या वहिवाटीत असलेल्या एड, प्राईझ आणि कस्टम (हे तिन्ही ए प्रकारचे कर आहेत) या करांशिवाय नवा कर राज्यातील सर्व लोकांच्या मताशिवाय बसवू नये, ही कलमे या नव्या कलमात अत्यंत महत्त्वाची होती.

कोणताही नवा कर बसविण्यास पार्लमेंट सभेचा सल्ला अवश्य आहे हे तत्त्व मान्य करण्यात आले होते.

ज्यादिवशी बॅरन लोकांनी जॉनच्या विरुद्ध शस्त्रे उचलली, त्या दिवसापासून तो थेट एडवर्डने या स्वातंत्र्याच्या सनदा ज्यादिवशी मंजूर केल्या त्या दिवसापर्यंत राजाचा अधिकार कमी करण्याबद्दलचा तंटा कधीही मिटला नव्हता. कधी-कधी तो तहकूब ठेवण्यात येत असे एवढेच काय ते. राज्यातील एकंदर जनसमुदायाचे काय म्हणणे होते ते या मोठ्या स्वातंत्र्याच्या सनदेवरून कळून येण्यासारखे आहे; परंतु हे त्यांचे म्हणणे पुष्कळ अंशी निरर्थक झाले होते. कारण एकंदर जनसमूहाला आपले म्हणणे काय आहे हे दर्शविण्यास कायमचे द्वार राजाशिवाय दुसरे कोणतेही नसे. कारण राजाला मनाप्रमाणे वागण्याचा अधिकार असल्यामुळे त्याला वाटेल तेव्हा तो तसा वागत असे आणि म्हणून या त्याच्या स्वेच्छाचारावर जलद व खात्रीने चालणाऱ्या एखाद्या अंकुशाची जरूरी होती. जेव्हा फ्यूडल पद्धतीप्रमाणे एकत्र जमणाऱ्या बॅरन व धर्मगुरूंच्या सभेऐवजी राज्यातील तिन्ही दर्जाच्या प्रजाजनांच्या वर्गाचे झालेले पार्लमेंट अमलात आले तेव्हा मात्र हा अंकुश लोकांच्या हाती खरोखर आला, असे म्हटले असता चालेल. सर्वांत अलीकडे जी मंजुरी या सनदास मिळाली तिची योग्यता हा कालपर्यंत मिळालेल्या सर्व मंजुऱ्यांपेक्षा जास्त महत्त्वाची होती. कारण या मंजुरीच्या योगाने मंजूर झाल्याप्रमाणे सनदांच्या कलमांचा अंमल होतो आहे किंवा नाही हे पाहण्यास एक नियम शासनबद्ध चालणारी संस्था त्या वेळेस अस्तित्वात आली होती

○○○

भाग ७ वा

प्लॅन्टॅजेनेट घराण्यातील शेवटचे राजे

इ.स. १३०७-१४८५

उपोद्घात : इंग्लंडच्या राज्यकारभारव्यवस्थेच्या इतिहासात ही १२९७ तील सनदांची बहाली अत्यंत ध्यानात ठेवण्यासारखी गोष्ट होऊन गेली आहे. या तारखेपासून तो प्लॅन्टॅजेनेट घराण्यातील शेवटच्या राजाच्या मृत्यूपर्यंत इंग्लंडातील राज्यकारभारव्यवस्थेत जरी फारच थोडे स्वरूपांतर झाले होते तरी तिच्या घटनेत व तत्त्वांत हळूहळू बराच फरक पडत गेला होता. हा फरक खास कायदे करून नव्हे; पण लोकसमाजाची जी गुपचूप वाढ होत होती तिजमुळे पडला होता. धर्मोपदेशकांमधील आस्था व उत्साहाचा हास, रक्तपाताच्या व बॅरन लोकांच्या कुटुंबांचा क्षय करणाऱ्या देशातील लढाया, मध्यस्थितीतील लोकांची वाढती संपत्ती, बुद्धी व सत्ता, शेतकऱ्यांचा असंतोष आणि व्हिलनेज (क्षेत्रदास्यत्व पद्धती) पद्धतीचा क्षय, या सर्वांचा उलट परिणाम इंग्लंडातील राज्यकारभारव्यवस्थेवर घडून आला आणि तिची पुढे जी वाढ झाली ती सदर करणामुळेच झाली. ती इतकी कितीही कायदे केले असते किंवा सनदा दिल्या असत्या तरी झाली नसती.

आपण जितक्या कालासंबंधाने या भागात विचार करणार आहो त्या कालाच्या सुमारे मध्यावस्थेत पार्लमेंटची व त्यात मुख्यत्वेकरून लोकप्रतिनिधींच्या सभेची सत्ता बरीच वाढत गेली होती. ज्या हक्काच्या संबंधाने कोणालाही शंका घेता आली नसती अशा हक्काच्या जोरावर जोपर्यंत इंग्लंड देशाचे राजे राज्य करीत होते तोपर्यंत पार्लमेंट सभेला राजाच्या विशेष अधिकारांसंबंधाने टक्कर मारण्याच्या कामी अत्यंत प्रयास करावे लागले. अशा प्रकारचा आपला राज्य करण्याचा अधिकार आहे, अशी फुशारकी प्लॅन्टॅजेनेट घराण्यातील दुसऱ्या रिचर्डपर्यंतच राजांना मारता येण्यासारखी होती. चौथा हेन्री व त्याचे वंशज यांनी जे राज्य केले ते वंशपरंपरागत हक्काच्या जोरावर नाही; पण लोकमताच्या जोरावर केले. या राजांना पार्लमेंट सभेने राज्य करण्याची परवानगी दिली असल्यामुळे त्यांना या सभेस

खुश ठेवणे भाग पडत असे आणि म्हणूनच लँकॅस्टर घराण्यातील राजे राज्य करीत असता पार्लमेंट सभेला रगड सत्ता मिळाली; परंत ही सत्ता थोडा वेळ टिकली. गलाबांच्या होड्याखाली ज्या लढाया झाल्या त्यात बड्या लोकांच्या सत्तेचा नाश झाला. धर्मासंबंधी नवी मते निघाल्यामुळे धर्मगुरूंचीही सत्ता क्षीण झाली होती. दुसऱ्या प्रजागणांच्या वर्गातून लोकप्रतिनिधींना पुढारी न मिळाल्यामुळे त्यांनाही आपले स्वातंत्र्य राखणे कठीण झाले होते. चौथा एडवर्ड गादीवर बसल्यापासून पार्लमेंट सभेची सत्ता कमी कमी होत व राजाची सत्ता वाढत वाढत गेली.

मध्ययुगातील इंग्लिश पार्लमेंट सभेची लक्षणे : या काळच्या राज्यकारभारव्यवस्थेच्या इतिहासाचे पुरे ज्ञान करून घेण्यासाठी आपणास मध्ययुगातील पार्लमेंट सभेची रचना कशी होती, हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे. हे करावयाच्या अगोदर हल्ली ज्या स्थितीत पार्लमेंट आहे त्या स्थितीचे अवलोकन करून जे काही विचार आपल्या मनात येतात ते आपल्याला एका बाजूला ठेवले पाहिजेत. हे आमचे म्हणणे एक दोन उदाहरणे देऊन स्पष्ट करू.

ज्याअर्थी इंग्लंडातील पार्लमेंट दोन सभा मिळून सहजरीत्या बनले आहे व ज्याअर्थी इतर देशातील पार्लमेंटे इंग्लंड देशाच्या पार्लमेंट सभेच्या धर्तीवर रचली गेली आहेत, त्याअर्थी हल्ली असलेल्या बहुतेक पार्लमेंटच्या दोन उपसभा असतात, म्हणून पार्लमेंट सभेच्या दोनच उपसभा असल्या पाहिजेत, त्या या संख्येपेक्षा कमी किंवा अधिक नसाव्यात अशी आपली समजूत होण्याचा संभव आहे; पण कोण जाणे कदाचित इंग्लंडच्या पार्लमेंट सभेच्या तीन किंवा चारदेखील उपसभा असण्याचा संभव आहे आणि ही संख्या खरोखर काही मध्ययुगात अस्तित्वात असलेल्या देशात तर होतीच होती.

पुनः ज्याअर्थी बहुतेक कायद्यासंबंधी मागण्यांचा ऊहापोह पहिल्याने लोकप्रतिनिधींच्या सभेत होतो व त्यांच्या फेरतपासणीच्या वेळेस त्या बड्या लोकांच्या सभेत जातात. त्याअर्थी असा श्रमविभाग असावा म्हणूनच पार्लमेंट सभेच्या दोन उपसभा झाल्या आहेत, अशी आपली समजूत होणे साहजिक आहे. हल्ली या दोन्ही उपसभा उपयोगात का आहेत याचे कारण व या दोन्ही उपसभा अस्तित्वात कशा आल्या याचे कारण, ही अगदी एकमेकांपासून भिन्न आहेत. पार्लमेंट सभेला हे असे स्वरूप कसे आले हे नीट समजण्यासाठी मध्ययुगात 'एस्टेटस्' या शब्दाचा अर्थ काय होतो, हे आपण पाहू.

राष्ट्रातील लोकांचे वर्ग : पूर्वापार संबंध पाहू गेले असता 'एस्टेटस्' या शब्दाचा अर्थ मनुष्यांची जात, स्थिती किंवा वर्ग असा आहे. या शब्दाच्या अर्थाचा मालमिळकतीशी काही संबंध नाही. प्रत्येक मोठ्या जनसमुदायाचे असे पुष्कळ वर्ग झालेले असतात; परंतु पश्चिम युरोपात मध्ययुगात जी राज्ये होती त्यात काही श्रेष्ठ वर्गांना विशेष महत्त्व देत असत. रोमन साम्राज्य मोडून पडल्यानंतर जी बेबंदशाही सुरू झाली त्यावेळी मुख्य मुख्य जमीनदारांस प्राबल्य प्राप्त झाले होते. फ्यूडल पद्धत सुरू असताना जेवढे लोक राजकीय अंमल गाजवीत

व लढाया करीत ते मूळचे हेच लोक होत. या बड्या लोकांच्या अमलाखाली राहून साधारण स्थितीतील लोक शेतकी व व्यापारधंदा करून आपला काळ घालवीत असत. या दोन वर्गांपासून तयार झालेला तिसरा वर्ग धर्मोपदेशकांचा होय. त्या वेळेस धर्मोपदेशकांचाच काय तो एक मोठा, ज्यात विद्वत्तेची जरूरी आहे, असा धंदा होता. हे धर्मोपदेशक आपला धंदा सांभाळून शिवाय शाळाशिक्षक, अध्यापक, ग्रंथकार, शिल्पशास्त्री, मुलकी काम पाहणारे, वकील व मुत्सदी यांचीही कामे करीत असत. त्यांचा एक स्वतंत्र वर्गच होऊन राहिला होता. त्यांची हुकमत, हक्क व कायदेही अगदी वेगळ्याच तहेचे होते. याप्रमाणे हल्लीच्या जनसमूहातील वर्गात जितका भेदाभेद दृष्टीस पडत आहे. त्याजपेक्षा फारच अधिक भेद या तीन वर्गांत म्हणजे बडे लोक, मध्यस्थितीतील लोक व धर्मोपदेशक याजमध्ये या वेळेस दृष्टीस पडत असे.

परंतु काही देशांत तर एकंदर साधारण जनसमूहाचे आणखी पोटभेद झालेले असत. खालच्या प्रतीचे जे लोक शहरातून मेळयामेळयाने राहत असत त्यांची सत्ता त्यांच्या प्रतीचे जे लोक खेड्यापाड्यांत एकमेकांपासून दूर-दूर अंतरावर राहत असत, त्याजपेक्षा जास्त असे आणि म्हणूनच शहरातील हे लोक आपल्या ताब्यात शहर सुधराईसंबंधी अधिकार युक्तिप्रयुक्तीने आणत असत. या करण्यात त्यांना यश आल्यानंतर ते फ्यूडल बडे लोकांच्या ताब्यातून निघून जाऊन खास राजाच्या ताब्याखाली जाण्याचा प्रयत्न करीत. काही देशांत या शहरवासी, लोकांचा खेड्यापाड्यात रहाणाऱ्या लोकांहून अगदी भिन्न असा वर्ग बनून रहात असे, अगर ते आपले धन्याचे इतके अंकित होऊन रहात असत की त्यांची स्वतंत्र मोजदाद घेण्याची कोणाला आवश्यकताच वाटत नसे.

मध्ययुगातील पार्लमेंट म्हणजे वेगवेगळाले वर्गांचे पार्लमेंट होय : मध्ययुगातील प्रत्येक पार्लमेंट म्हणजे वेगवेगळाले वर्गाचे पार्लमेंट होय. सर्व राष्ट्राचे प्रतिनिधित्व या एकट्या संस्थेकडे होते असे म्हणता येत नाही किंवा तिच्याकडे एका व्यक्तीचे जितके प्रतिनिधित्व होते तितकेच बाकी राहिलेल्या व्यक्तीचे होते, असेही म्हणता येणार नाही. ज्या जनसमूहाच्या वर्गाचे वर्णन देण्याचा आपण वर यत्न केला आहे, त्या तिन्ही वर्गातील प्रत्येक वर्गाचे प्रतिनिधित्व पार्लमेंट सभेकडे होते; पण हे त्याचे प्रतिनिधित्व वेगवेगळाले होते. म्हणूनच एखाद्या राष्ट्रात जितके जनसमूहाचे वर्ग असत तितक्या पार्लमेंट सभेच्या उपसभाही असण्याचा संभव असे. फ्रान्स देशातील स्टेटस जनरल नावाच्या सभेच्या तीन उपसभा असत- एक धर्मोपदेशकांची, एक बड्या लोकांची व एक शहरवासी लोकांची. स्वीडन देशातील रिग्सडॅग सभेच्या चार उपसभा असत. कारण फ्रान्स देशात शेतकऱ्यांचा वर्ग स्वतंत्र मानत नसत; पण स्वीडन देशात शेतकरी लोकांना स्वतंत्र वर्ग म्हणून मानण्यात येत असे, स्कॉटलंड देशात हे तिन्ही वर्ग म्हणून मानण्यात येत असे; परंत तेथे लहान-लहान धर्मोपदेशक, मुख्यकुळांशिवाय इतर जमीनदार व राजाचे खुद्द भोगवट्याच्या प्रदेशातील

जहागीर गावांशिवाय गावांचे प्रतिनिधी या सभेत नसत. खरोखर पाहू गेले असता स्कॉटलंड देशातील पार्लमेंट म्हणजे फ्यूडल पद्धतीतील मुख्य कुळांचीच सभा असे. इंग्लंड देशात या तिन्ही वर्गांची वाढ जास्त चांगली झाली होती. पहिल्या एडवर्डला जर राज्यकारभारव्यवस्था नक्की करण्याचा प्रसंग आला असता, तर पार्लमेंट सभेच्या तीन उपसभा झाल्या असत्या.

मध्ययुगातील पार्लमेंट म्हणजे स्थानिक समाईक संस्थांचे पार्लमेंट होय : राष्ट्रातील एखाद्या वर्गाने जर पार्लमेंट सभेस सर्वांनी एकत्र होऊन जाण्याचे मनात आणले तर त्यांची संख्या या कामासाठी वाजवीपेक्षा फाजील होईल हा एक नियमच आहे. बहुतेक वेळा बड्या लोकांची संख्यादेखील याच कामासाठी हवी त्यापेक्षा फार जास्त आहे, असे आढळून आले आहे. धर्मोपदेशक व साधारण जनसमूह तर त्यांच्या प्रतिनिधींद्वारेच हजर राहत असे; परंतु मध्ययुगातील प्रतिनिधित्वाचा व संख्येचा मेळ कधीच बसविलेला नसे. एक व्यक्तिभूतसनदी मंडळीला सारखे प्रतिनिधान असावे हे मध्ययुगातील प्रतिनिधानाचे तत्त्व असे. याच तत्त्वाला अनुसरून इंग्लंड देशातील पार्लमेंट सभेस प्रत्येक कौंटीला व एक-दोन शिवाय करून प्रत्येक शहरास, दोन-दोन प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क असे. हे प्रतिनिधी निवडण्याच्या वेळी त्या शहरांचा विस्तार, लोकसंख्या किंवा संपत्ती या गोष्टींचा विचार कधीही केला जात नसे. हौस ऑफ कॉमन्स हे जे पार्लमेंट सभेतील एका उपसभेस नाव पडले आहे ते ती सभा साधारण (कॉमन) किंवा अडाणी लोकांच्या प्रतिनिधींची सभा म्हणून पडले आहे असे नाही, तर त्या सभेत इंग्लंड देशातील प्रत्येक कम्युनिटीचे प्रतिनिधी असत म्हणून पडले आहे. (कम्युनिटी हा शब्द लॅटीन भाषेतील कॉम्युना व फ्रेंच भाषेतील कॉम्युने या शब्दापासून झालेला आहे.)

मध्ययुगातील पार्लमेंट सभेची व्याख्या : मध्ययुगातील पार्लमेंट सभा म्हणजे राष्ट्रातील लोकांच्या वेगवेगळाल्या वर्गांची सभा होय. जर एखादा वर्ग संख्येच्या मानाने पार्लमेंट सभेत स्वतः जाण्यास असमर्थ असेल, तर त्या वर्गाच्याऐवजी ज्या एक व्यक्ती भूतसनदी मंडळ्यांचा तो वर्ग बनलेला असेल त्या मंडळ्यांनी पसंत केलेले इसम पार्लमेंट सभेस जात असत.

इंग्लंडातील जनसमूहाच्या तीन वर्गांची रचना : इंग्लंडातील तिन्ही वर्गांची म्हणजे बडे लोक, धर्मगुरू व सामान्य जनसमाज यांची रचना पुष्कळ अशी विशेष तहेची असे, म्हणून या प्रत्येक वर्गाची थोडीशी सविस्तर माहिती देणे जरूर आहे.

(१) धर्मोपदेशकांचा वर्ग : आर्चबिशप आणि बिशप हे अँग्लोसॅक्सन राजांची जी विटॅनेगेमोट नावाची सभा असे तिचे सभासद असतच. नॉर्मन विजयानंतर त्यांच्या धार्मिक हुद्यांच्या जागांमुळे व बॅरन लोकांकडे ज्या शर्तीने जमिनी असत त्याच शर्तीच्या त्यांच्याकडेही जमिनी चालत असल्यामुळे त्यांना मोठ्या सभेमध्ये सभासदांचा मान मिळत असे. धर्मोपदेशकांच्या स्वतंत्र सभा असत; एक कैंटरबरी प्रांताची सभा व दुसरी यॉर्क

प्रांताची सभा. जेव्हा पहिल्या एडवर्डने साधारण जनसमूहाच्या प्रतिनिधीसंबंधाने व्यवस्था लावली तेव्हा त्याने लहान दर्जाच्या धर्मोपदेशकांच्या प्रतिनिधीसंबंधानेही व्यवस्था लावली होती. बिशपाची गादी ज्या देवळात असे त्या देवळातील लहान दर्जाच्या धर्मोपदेशकांनी व बिशपाच्या ताब्यातील असणाऱ्या प्रदेशातील लहान दर्जाच्या धर्मोपदेशकांनी आपले प्रतिनिधी पसंत करून पार्लमेंट सभेस पाठवावे, असे त्याने ठरविले होते. या मिळालेल्या संधीचा जर त्यांनी उपयोग करून घेतला असता तर त्यांचे प्रतिनिधी, धर्मोपदेशक व मठाधिकारी हे सर्व मिळून त्यांची एक निराळी उपसभा झाली असती. फ्रान्समध्ये जी धर्मोपदेशकांची निराळी उपसभा होती ती अशाच रीतीने अस्तित्वात आली होती; पण इंग्लंडातील धर्मोपदेशकांना सारा स्वतः बसवून घेणे व सभा (कॉन्व्होकेशन) भरवून आपले स्वतःबद्दलचे कायदे (धर्मसंस्थासंबंधी) करून घेणे आवडत असे, म्हणून त्यांचे प्रतिनिधी पार्लमेंट सभेतून हळूहळू नाहीसे होत गेले. मोठ्या दर्जाचे धर्मोपदेशक आणि मठाधिकारी यांजकडे, बॅरन लोकांकडे ज्या शर्तीने जमिनी चालत असत त्याच शर्तीने जमिनी चालत असल्यामुळे त्यांना, बॅरन लोकांना पार्लमेंटास ज्याप्रमाणे येण्यास खास बोलावणे पाठवीत असत. त्याचप्रमाणे बोलावणे पाठवून बोलावीत असत व ते त्यांजबरोबर पार्लमेंट सभेत बसत असत; पण त्यांची वेगळी सभा कधीही बनली नाही.

(२) ऐहिक बड्या लोकांचा वर्ग : या वर्गासंबंधी लिहिताना इंग्लंडच्या इतिहासासंबंधी आपणास एक मोठी महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. फ्रान्स किंवा जर्मनी या देशात ज्याप्रमाणे बड्या लोकांचा वर्ग असे तसा इंग्लंडात कधीही नव्हता. म्हणजे केव्हा-केव्हा जिला जात असे म्हणतात तशी बड्या लोकांची जात इंग्लंडात नव्हती. फ्रान्स व जर्मनी या देशात जो जन्मतः बडा मनुष्य असेल त्याशिवाय इतर मनुष्यास बडामनुष्य होणे महा मुष्किलीचे काम असे, इतकेच नव्हे तर जो जातीचा बडा मनुष्य असे त्याची सर्व मुलेही बडीच असत. प्रत्येक बड्या मनुष्यास पुष्कळ हक्क असत व हे हक्क जो जातीचा बडा नसेल त्यास कधीही प्राप्त होत नसत. इंग्लंडात साधारण प्रतीच्या मनुष्याला बड्या लोकांच्या वर्गात शिरणे इतके कठीण पडत नसे. इंग्लंडातील बड्या लोकांची सर्व मुले, आपल्या बापाप्रमाणे त्याच्या गादीवर बसणाऱ्याशिवाय, साधारण प्रतीच्या लोकांत मोडत असत. इंग्लंडात ज्या लोकांना पीअर ही पदवी असे, त्याच लोकांना काही विशेष अधिकार असत. याप्रमाणे इंग्लंड देशात कधीही मोठा व ज्यात कोणालाही घेत येत नव्हते असा बड्या लोकांचा वर्ग नव्हता. उत्तम कुळातील जन्मलेल्या मनुष्याचा लोक फार सत्कार करीत असत; परंतु उत्तम कुळात जन्म झाला म्हणूनच कोणाला कायद्यासंबंधी किंवा राज्यकारभारासंबंधी विशेष हक्क प्राप्त होत नसत. पीअर ही पदवी मिळणे जन्मावर अवलंबून नसे; पण ती कोणत्याही इसमास जमीनधारणाच्या संबंधाने किंवा राजाकडून पार्लमेंट सभेस बोलावणे आल्याने प्राप्त होत असे.

फ्यूडल पद्धतीच्या उपपत्तीप्रमाणे वास्तविक पाहू गेले असता जेवढी म्हणून राजाची मुख्य कुळे होती तेवढ्या सगळ्यांना राजाने पार्लमेंट सभेला बोलाविले पाहिजे होते. स्वातंत्र्याच्या मोठ्या सनदेत याप्रमाणे केले जाईल असे स्पष्ट नमूद केलेले होते; परंतु याप्रमाणे इंग्लंडचे राजे क्वचितच करीत असत. ते बहुतेक वेळी आपल्या मुख्य कुळांपैकी अतिशय मोठी कुळे काय ती पार्लमेंट सभेत बोलावीत असत. कारण लहान दर्जाच्या मुख्य कुळांची संख्या इतकी पुष्कळ होती की, त्यांची सभा भरविणे मोठे कठीण काम झाले असते. त्या कुळांनादेखील राजदरबारात जाण्यास जो लांबलचक प्रवास करावा लागत असे त्याचा कंटाळा येत असे. शिवाय मोठमोठ्या बॅरन लोकांसमोर आपला मान कमी होतो, असे त्यांना वाटे. याप्रमाणे फ्यूडल पद्धतीच्या उपपत्तीप्रमाणे राजाकडून अक्षरशः आचरण होत नसे. कोणाही मनुष्याला खास राजापासून जमीन प्राप्त झाली असली, म्हणून राजाने त्याचा जातीने सल्ला घेतलाच पाहिजे, असा हक्क त्यास प्राप्त होत नसे.

याप्रमाणे ज्यांना खास राजाकडून पार्लमेंट सभेस येण्यास बोलाविणे होत असे त्याच लोकांना इंग्लंडमध्ये बड्या लोकांचा वर्ग म्हणून मानत असत. जर राजाकडून पार्लमेंट सभेस येण्यास कोणा बड्या मनुष्यास बोलावणे आले तरच त्याला बड्या लोकांच्या उपसभेत बसण्याचा हक्क प्राप्त होत असे, नुसते त्याच्याकडे बॅरन या पदवीची जमीन असल्याने त्यास हा हक्क प्राप्त होत नसे, असे पहिल्या एडवर्डच्या वेळेपासून कायद्याच्या भाषेने म्हणण्याची चाल असे. यावरून बड्या लोकांची उपसभा ही फ्यूडल पद्धतीच्या उपपत्तीप्रमाणे बनलेली नाही. जेव्हा फ्यूडल पद्धतीसंबंधाने कल्पना अंधुक होण्यास प्रारंभ झाला तेव्हाच बड्या लोकांच्या उपसभेस खरे स्वरूप प्राप्त झाले असावे (असे वाटते).

(३) लोकांच्या वर्गाच्या प्रतिनिधींचा वर्ग : दुसऱ्या देशातील या वर्गात ज्या जातीचे लोक असत त्या जातीच्या लोकांपेक्षा इंग्लंडमधील या वर्गांच्या जातीतील लोक फारच वेगवेगळ्या प्रकारचे असत. या वर्गात फक्त शहरवासी लोक किंवा शहरवासी लोक आणि शेतकरी मिळूनच काय ते लोक नसत. ज्यांना दुसऱ्या देशात बडे लोक म्हणून मान मिळाला असता व ज्यांच्यामुळे दुसऱ्या वर्गाची (बड्या लोकांची) संख्या बरीच वाढली असती, असे पुष्कळ लोक या वर्गात मोडत असत.

हे असे का होते याची कारणे : बड्या लोकांच्या उपसभेत ज्यांना राजा खास बोलावणे पाठवून पार्लमेंटमध्ये येण्यास बोलावीत असे तेच लोक बसण्यास पात्र असत. हे एक ही विशिष्ट स्थिती असण्याचे कारण होते. ज्या लहान-लहान मुख्यकूळांना व मोठमोठ्या कुटुंबातील लोकांना याप्रमाणे राजाकडून बोलावणे येत नसे ते सर्व जाऊन तिसऱ्या वर्गास (लोकप्रतिनिधींच्या वर्गास) मिळत असत. दुसरे कारण इंग्लंडातील स्थानिक संस्थांची बळकटी हे होते. वर आम्ही सांगितले आहे की 'कॉमन्स' म्हणजे 'कॉम्युनिटीझ्' होत, म्हणजे ज्या सांगोपांग बनलेल्या मंडळ्यांचा लोकसमाज बनलेला असे त्या मंडळ्या होत. पश्चिम

युरोपात या प्रकारच्या मंडळ्या म्हटल्या म्हणजे फक्त मोठमोठी शहरे होती; परंतु इंग्लंडमध्ये प्रत्येक शायराने आपले स्थानिक स्वराज्य कायम राखले होते. प्रत्येक शायरातील न्यायसभेत तेथील सर्व स्वतंत्र मनुष्यांना एकमताने कसे काम करावे याचे शिक्षण मिळत असे. जेव्हा राजाचे न्यायाधीश फिरावयास निघत असत तेव्हा त्यांचा आदरसत्कार करण्यासाठी हे सर्व लोक कौंटीतील न्यायसभेत एकत्र होत असत. राजाजवळ बोलणे लावण्यासाठी मुखत्यार पसंत करून पाठविण्याकरिता या सर्वांनी एकत्र मिळणे हे साहजिकच होते. राष्ट्रातील शहरवासी लोकांचा एक व खेड्यापाड्यांत राहणाऱ्या लोकांचा एक, असे दोन वर्ग इंग्लंडमध्ये का झाले नव्हते याचे कारणही वर दिलेल्या कारणांवरून स्पष्ट होण्यासारखे आहे. जरी काही थोड्याशा मोठमोठ्या शहरांना कौंटीची पदवी प्राप्त झाली होती तरी बहुतेक शहरे ज्या कौंटीमध्ये होती त्या कौंटीचा भाग म्हणूनच ती अस्तित्वात असत. या शहरातील लोक कौंटीच्या न्यायसभेस जात असत व तेथे खेड्यापाड्यातील लोकात मिसळून त्यांच्याबरोबर कामकाज करीत असत. या तिसऱ्या वर्गातील वेगवेगळाले लोकांचे सुखावह झालेले संमेलन, सभ्यलोकांचा स्वाभिमान व राज्यकारभारासंबंधी अनुभव, शेतकऱ्यांचे धैर्य व शहरातील लोकांची उद्योगशील बुद्धी या सर्व गोष्टीत इंग्लंडातील या तिसऱ्या वर्गाच्या दांडग्या जीविताचे व एकसारख्या वाढणाऱ्या धमकेचे बीज आहे.

कॉमन्स वर्गात ज्या लोकांचा समावेश होत नाही ते लोक : या तिसऱ्या वर्गातून एकंदर प्रजेपैकी पुष्कळ मोठा भाग आपणास बाद केला पाहिजे म्हणजे खाली लिहिलेले वर्गाचे लोक आपणास बाद केले पाहिजेत.

(ग) गुलाम - या वर्गात अगोदर जरी लोक पुष्कळ होते तरी या लोकांची संख्या यावेळी बरीच कमी व्हावयास लागली होती. या वर्गातील लोकांस कौंटीच्या व्यवस्थेत किंवा पार्लमेंट सभेस जे सभासद पाठवावयाचे त्या कामात काही एक अधिकार नसत.

(२) ज्यांच्या मालकीच्या जमिनी नसत असे स्वतंत्र लोक कुळ या वर्गातील लोक मग ती कोणाची मालकीची असोत किंवा नुसते मजूर असोत.

(३) ज्या शहरातील लोकांना शहराच्या व्यवस्थेत हात घालण्याचा काही अधिकार नसल्यामुळे त्यास पार्लमेंट सभेस जे सभासद नेमन पाठवावयाचे त्यास नेमण्याच्या कामात काही अधिकार नसे - ते लोक.

चौदाव्या शतकात या वर निर्दिष्ट केलेले वर्गांपैकी प्रत्येक वर्गात किती लोक होते हे समजण्याचे हल्ली आपणाजवळ काही साधन नाही. प्रत्येक शहरातील तिसऱ्या वर्गातील लोकांची संख्या जसजशी त्या शहराची रचना असेल त्या प्रमाणाने कमी-जास्त असण्याचा संभव होता.

लोकांच्या प्रतिनिधींची वाटणी : प्रत्येक शायराला दोन, लंडन शहराला चार व बाकीच्या बहुतेक शहरांना व ज्या गावास पार्लमेंट सभेस प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार

असे त्या गावांना प्रत्येकी दोन-दोन प्रतिनिधी पार्लमेंट सभेस पाठविण्याचा हक्क असे. इंग्लंडमध्ये फक्त ३७ कौंटी होत्या. शायर आणि डरहॅम याजवरील अंमलदारी अजूनपर्यंत स्वतंत्रच होती (म्हणजे या कौंटी *"कौंटीझ पॅलेंटाईन' या सदराखाली मोडत असत.) वेल्स प्रांताला अजूनपर्यंत ताब्यातील प्रांत असेच मानत असत. त्याला इंग्लंड देशाचा तो एक भाग आहे असे मानत नसत व त्याच्या अजनपर्यंत कौंटी पाडणे झाले नव्हते. आठव्या हेन्रीच्या कारकीर्दीपर्यंत या प्रांतातील प्रतिनिधी पार्लमेंट सभेत फक्त दोन वेळाच बसले होते. ज्या गावास पार्लमेंट सभेस प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क असे तशा गावांची संख्या वेगवेगळाल्या वेळी वेगवेगळी असे. मध्ययुगातील पार्लमेंट सभेस अशा गावांतून आलेल्या प्रतिनिधींची अधिकात अधिक संख्या म्हटली म्हणजे ३२८ असे. ही संख्या नेहमीची २०० असे. हाऊस ऑफ कॉमन्स या सभेत बहुतकरून नेहमी शायरांमधून आलेले ७४ नाईट व शहरे वगैरे मिळून २००, असे २७४ लोक त्यावेळी असत. त्यावेळी जमीनदारांचा वर्ग जरी सर्व राज्यांत प्रबळ होता व जरी एकंदर लोकसंख्येपैकी पुष्कळ लोक खेड्यापाड्यांतून राहत असत तरी शहरातील प्रतिनिधींच्या संख्येपेक्षा शायरातील प्रतिनिधींची संख्या फारच थोडी असे. यावरून मध्ययुगात प्रतिनिधी निवडण्याच्या कामी गणतीकडे लोकांचे किती थोडे लक्ष असे हे सहज ध्यानात येण्यासारखे आहे. तरी हाऊस ऑफ कॉमन्समध्ये अतिशय वजनदार प्रतिनिधी म्हटले म्हणजे शायरांतून आलेले नाईटच असत व शहरातील लोकांचे प्रतिनिधी पुष्कळ वेळा त्यांच्या राजनीतीचे अनुकरण करीत असत.

पार्लमेंट सभेस प्रतिनिधी निवडून पाठविण्याच्या कामी कोणास योग्यता होती : ज्या लोकांना कौंटीतील न्यायसभेत कामकाज करण्याचा हक्क असे त्या लोकांना पार्लमेंट सभेस निवडून प्रतिनिधी पाठविण्याच्या कामी हक्क असे, असे साधारण राजनीतीचे धोरण ठरलेले होते. हे तत्त्व कायद्यात दाखल होण्याच्या पूर्वी एक शतकपर्यंत अमलात होते. कौंटीतील न्यायसभेत सर्व लोक हजर असता प्रतिनिधी निवडण्याचे काम चालावे असे सन १४०६ मध्ये चौथ्या हेन्रीच्या एका कायद्याने ठरविण्यात आले होते. सहाव्या हेन्रीच्या एका कायद्याने सन १४३० मध्ये हा हक्क ज्यांचे मिराशीचे उत्पन्न किमानपक्षी सालीना ४० शिलिंग (हल्ली त्याच रकमेची किंमत ३० पौंड होते) होते, त्यासच फक्त देण्यात आला होता. हा जो प्रतिबंध ठेवण्यात आला त्या प्रतिबंधामुळे पार्लमेंट सभेच्या गुणदोषांवर बराच परिणाम घडून आला, असे कित्येक ग्रंथकारांचे मत आहे; पण हे असे घडून आल्याचे कोणत्याही गोष्टीवरून सिद्ध होत नाही. सन १८३२ मध्ये रिफॉर्म ॲक्ट अमलात येईतोपर्यंत ज्या गावास पार्लमेंट सभेस प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क असे तो हक्क कोणत्या तऱ्हेच्या व्यक्तीस असावा याबद्दल सर्वसाधारण कायदा करण्यात आला नव्हता.

---

* या कौंटीचे जे धनी असत त्यास राजाला आपल्या राजवाड्यात जे अधिकार असत ते असत, म्हणजे त्याचे व राजाचे अधिकार एक असत.

पार्लमेंट सभेस प्रतिनिधी होऊन जाण्यास कोण इसम योग्य असत : कौंटीमधून जे प्रतिनिधी नेमून येत ते बहुतकरून उत्तम कुळातील व ज्यांची मालमत्ता मोठी होती अशाच तऱ्हेचे असण्याचा संभव विशेष असे. कौंटीतून येणारे प्रतिनिधी हे ज्यांना नाईट पदवीचा पट्टा मिळाला असेल तसेच लोक असावे असे सहाव्या हेन्रीच्या एका कायद्याने ठरविण्यात आले होते आणि म्हणूनच कौंटीच्या सभासदाला 'नाईट ऑफ दी शायर' असे म्हणण्याचा परिपाठ पडला होता. हा कायदा अमलात येण्यापूर्वी व तो अमलात आल्यावरही पुष्कळ नुस्ते 'एस्क्वायर' (नाईटापेक्षा एक कमी वर्गाचा दर्जा आहे. त्याचे नाव अलीकडे या शब्दाचा अर्थ सभ्य गृहस्थ असा झाला आहे.) कौंटीच्या लोकांनी आपले प्रतिनिधी म्हणून पार्लमेंटास पाठविल्याची पुष्कळ उदाहरणे आहेत. सन १७११ पर्यंत ज्या गावास पार्लमेंट सभेस प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क असे त्या हक्काप्रमाणे प्रतिनिधी निवडावयाचे ते किती लायकीचे असावेत हे सर्वसाधारण कायदा करून ठरविण्यात आले नव्हते.

प्रतिनिधी निवडण्याविषयीचे स्वातंत्र्य : या स्वातंत्र्याचे पुष्कळ वेळा उल्लंघन केले जात असे. आपण योजिलेल्या इसमास पार्लमेंट सभेस जाता यावे म्हणून कधी कधी एखादा मोठा बडा मनुष्य या कामात अडथळा आणत असे. राजा सांगेल त्याप्रमाणे वागणाऱ्या मनुष्यास पार्लमेंट सभेस जाता यावे म्हणून कधी-कधी शेरीफ या कामात हात घालत असे. कधी-कधी कौंटीच्या न्यायसभेत एखादा बेबंद लोकसमुदाय एकदम आत घुसे व आम्हाला वाटेल त्याला आम्ही पसंत करू, असा आपला हक्क सांगे. इ.स. १३७७ मध्ये जेव्हा जॉन ऑफ गॉन्ट हा राज्यकारभार पाहत असे तेव्हा त्याने गुड पार्लमेंटने जी जी कामे केली होती ती ती रद्द करून घेण्यासाठी आपल्या मोठेपणाचा गैरशिस्त उपयोग करून फक्त तोंडपूजा लोकप्रतिनिधींची सभा भरविली होती. निवड होतेवेळी कोणी-कोणी गृहस्थ आपल्या वजनाचा गैरउपयोग करतात अशी लोकप्रतिनिधींच्या सभेने कागाळी केल्यावरून वर सांगितलेला सन १४०६ मधील कायदा अमलात आणण्यात आला होता.

प्रतिनिधानाच्या हक्काची किंमत फार थोडी मानण्यात येत असे : हल्ली इंग्लिश लोक आपले प्रतिनिधी पार्लमेंट सभेत असले पाहिजेत या गोष्टीचा जितका नेट धरून बसतात तितका नेट ते १४ व्या किंवा १५ व्या शतकात धरत असत, अशी गोष्ट मात्र नव्हे. पैसे काढण्याचा सगळ्यात सोपा मार्ग म्हणून राजाने प्रथमारंभी साधारण जनसमाजातील लोकांना प्रतिनिधी नेमून पाठविण्याविषयी सांगितले होते; परंतु लोकप्रतिनिधींना राजाला पैसे देणे आवडत नसे. शहरांवर इतर खेड्यापाड्यांतील प्रदेशांपेक्षा जास्त कर लादलेले असत आणि यामुळे आम्हाला याउपर पार्लमेंटास प्रतिनिधी पाठविण्याची माफी असावी, असे पुष्कळ शहरांनी राजाला केलेले अर्ज दफ्तरखान्यात आहेत. प्रतिनिधी पाठविण्याचे लोकांस जड जात असे याचे दुसरे कारण सर्व प्रतिनिधीलोकांना पगार द्यावा लागत असे हे होते.

पार्लमेंट सभेत बसण्याची किंमत फार थोडी वाटत असे : पार्लमेंट सभेत बसण्याबद्दल जरी पगार मिळण्याची लालूच असे तरी त्याने नेहमी लोक लोभावत असत असे नाही. याकाळी लोकांत ज्यांना मानमान्यता असे, असे लोक आपले लक्ष ते राज्यकारभाराच्या कामात पुढे जितके घालू लागले तितके त्यावेळी न घालता स्थानिक कारभाराकडेच लावीत असत. आपल्याला ज्यांनी पसंत करून पार्लमेंट सभेस पाठविले आहे त्या लोकांस राग येऊ न देता राजाच्या मागण्या पुऱ्या पाडण्याचे त्रासदायक काम करण्याचा त्यांना पुष्कळ वेळा कंटाळा येत असे. पुढे पार्लमेंट सभेच्या सभासदांना जी सत्ता प्राप्त होत असे व कीर्ती मिळविण्याचा जो संभव असे ती सत्ता व तो संभव त्यावेळी अस्तित्वात नसल्यामुळे त्यावेळी पार्लमेंटाच्या सभासदांना जी दु:खे भोगावी लागत असत त्यांचा वचपा भरून येत नसे. ऑक्सफर्ड शायरांतून पसंत करून पाठविलेले सभासद तर एकदा पळून गेले व त्यांच्या मागे जसे एखाद्या चोराच्या किंवा खुनी मनुष्याच्या मागे लागावे तसे ओरडाओरड करीत शेरीफ मागे लागला असे सांगतात. दोघांपैकी एक तर पळालाच व दुसरा जो पकडला त्याचा पार्लमेंट सभा जेव्हा वेस्टमिस्टर येथे भरले तेव्हा येण्याबद्दल जामीन घेण्यात यावा, असे ठरविण्यात आले.

पार्लमेंट सभेच्या बैठकीची मुदत : मध्ययुगात पार्लमेंट सभा बहुतकरून एक बैठकभरच राहत असे. या बैठकीचा काल बहुतकरून थोडाच असे. पार्लमेंट सभेची बैठक सरासरी सहा महिने चालल्याचे एक उदाहरण आहे; परंतु बहुतकरून पार्लमेंट सभेची बैठक एका महिन्यापेक्षा जास्त दिवस चालू राहत नसे. दरवर्षी पार्लमेंट भरविण्यात येत असे. इ.स. १३३० व १३६१ या साली जे कायदे करण्यात आले त्या कायद्यांनी या रूढीला तर कायद्याचे स्वरूप आणले. एका वर्षी चार वेळा पार्लमेंट सभा भरविण्यात आल्याचेही आपणास एक उदाहरण माहीत आहे.

पार्लमेंट सभेच्या सत्तेची वाढ : मध्ययगात इंग्लंडमध्ये पार्लमेंट सभेचे स्वरूप कसे होते याची आता आपल्याला कल्पना करता येईल. राष्ट्रात या सभेला कोणकोणत्या महत्त्वाच्या क्रमाने सत्ता प्राप्त झाली या गोष्टीचा याउपर आपल्याला विचार करणे आहे. (१) कर बसविणे, (२) कायदे करणे व (३) राजाच्या प्रधानांची जोखमदारी, या तीन गोष्टीसंबंधाने पार्लमेंट सभेला जे अधिकार प्राप्त झाले होते त्यांच्याविषयी आता आपणास विचार करणे आहे.

(१) कर बसविण्यावर पार्लमेंटचा ताबा : पार्लमेंट सभेच्या उदयाचे मख्य कारण म्हटले म्हणजे राजाला असलेली पैशाची वाण होय आणि राजाला लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा करून पार्लमेंट सभेने आपली सत्ता विकत घेतली आहे, असे म्हटले तरी चालेल. पार्लमेंटचा कर बसविण्यावर ताबा या शब्दांचा अर्थ हल्ली आहे त्याहून चौदाव्या शतकात अगदी वेगळा होता, हे म्हणणे खरे आहे. हल्ली राज्याचा खर्च अवाढव्य आहे व हा बहुतेक

खर्च पार्लमेंट सभा दरवर्षी जी महसुलाची रक्कम मंजूर करते तिच्यातून होतो. चौदाव्या शतकात राज्याचा खर्च इतका थोडा होता की, जर राजा काटकसर करणारा असला व लढाई करण्यापासून दूर राहिला तर तो सर्व खर्च, त्याला त्याच्या वंशपरंपरागत व फ्यूडल (मिराशीच्या) पद्धतीप्रमाणे होणारे उत्पन्न बरेच मोठे असल्यामुळे त्यातून सहज करिता येण्यासारखा असे. अशी स्थिती असल्यामुळे त्या वेळचे जे सुधारक असत त्यांचे राजाजवळ त्याने आपल्या उत्पन्नाबाहेर खर्च करू नये म्हणजे लोकांजवळ प्रत्यक्ष कर मागू नयेत, असे वारंवार मागणे असे; परंतु त्या वेळच्या राजास दरबारी डामडौल व शिपाईगिरीच्या बाण्याने वागून कीर्ती मिळविणे आवडत असे आणि म्हणूनच त्यांना त्यांच्या पार्लमेंटांपासून वारंवार (पैशाची) मदत मागणे भाग पडत असे. याप्रमाणे कर बसविण्यावर आणि पर्यायेकरून एकंदर राज्यकारभारावर पार्लमेंट सभेचा ताबा जास्त जास्त वाढत जाऊ लागला.

दुसऱ्या एडवर्डच्या कारकीर्दीतदेखील लोकांच्या सल्ल्याशिवाय कर बसविल्याच्या पुष्कळ फिर्यादी झाल्या होत्या व एक-दोन वेळा तर असे कर बेकायदेशीर आहेत असे ठरविण्यात आले होते. तिसऱ्या एडवर्डच्या कारकीर्दीत इंग्लंड देशाने फ्रान्स देशाशी 'शंभर वर्षांचे' युद्ध सुरू केले व त्यामुळे राजाचा खजिना नेहमी रिकामा राहू लागला. इ.स. १३४० तिसऱ्या एडवर्डच्या फारच मोठ्या रकमेची जरूर लागल्यामुळे त्याला एका मोठ्या महत्त्वाच्या कायद्यास आपला रुकार देणे भाग पडले. या कायद्याने पार्लमेंट सभेत एकत्र झालेले धर्मगुरू, अर्ल, बॅरन व दुसरे मोठमोठे लोक, त्याचप्रमाणे इंग्लंड देशातील लोकप्रतिनिधी यांच्या सल्ल्याशिवाय राजाने कोणताही (चार्ज किंवा एड या नावाचा) कर याउपर बसवू नये, असे ठरविण्यात आले होते. आपल्या खास भोगवट्याच्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांवर टॅलेज किंवा विशेष प्रकारचा कर बसविण्याचा अधिकार राजाने या कायद्याने आपल्या हाताने घालविला. कारण 'कन्फर्मेशन ऑफ दी चार्टर्स' (सनदांची बहाली) या कायद्यानेदेखील हा अधिकार राजाच्या हातून उदमेखून काढून घेण्यात आला नव्हता. पहिल्या एडवर्डप्रमाणेच तिसऱ्या एडवर्डनेदेखील लोकरीच्या व्यापाऱ्यांपासून एकापेक्षा अधिक वेळा बळजबरीने पैसे काढण्याचा यत्न केला; परंतु सन १३६२ व १३७१ मध्ये पार्लमेंट सभेच्या मताशिवाय लोकरीच्या व्यापाऱ्यांवर कर बसवू नये, अशा अर्थाच्या कायद्यास त्याला आपले अनुमोदन देणे भाग पडले. सन १३७३ पासून पुढे दरवर्षी नेमाने पार्लमेंट सभा राजाला टनेज (दारूच्या प्रत्येक टनावर ठरविलेली जकात) व पौडेज (हरतहेच्या मालाच्या एक पौंड भर वजनाच्या किंमतीवर बसविलेला कर) या करांचे उत्पन्न देत असे.

दुसऱ्या रिचर्डलाही तिसऱ्या एडवर्डप्रमाणेच पैशाची जरूर नेहमी लागत असे आणि त्याचा स्वभाव त्याजपेक्षा जास्त जुलमी असे. सन १३९७ ते रिचर्डने पार्लमेंट सभेपासून कातडी व लोकर यापासून होणारे कराचे उत्पन्न आपल्यास पैशाची कुमक म्हणून तहहयात मंजूर करून घेऊन पैशासंबंधी स्वातंत्र्य मिळविण्याचा एक उपाय योजिला होता; परंतु त्याला

दुसऱ्या वर्षी पदच्युत करण्यात आले. कर बसविण्याच्या संबंधात पार्लमेंट सभा आपलीशी करून घेण्याविषयी लॅंकॅस्टर घराण्यातील राजे उत्सुक होते. कारण त्यावेळी पार्लमेंट सभेच्या मताशिवाय कोणताही नवा कर राजाला बसविता येत नाही हे तत्त्व खास ठरून राहिले होते. यॉर्क घराण्यातील राजे गादीवर बसल्यानंतर मात्र या नियमास बाध येऊ लागला होता. सन १४७३ मध्ये चौथ्या एडवर्डने श्रीमंत लोकांपासून 'बेनीव्होलन्स' या नावाच्या देणग्या बळजबरीने काढण्याची सुरुवात केली. या 'बेनीव्होलन्सेस' नावाच्या मात्र खुशीने दिलेल्या देणग्या होत्या; पण वास्तविक पाहिले तर त्या बळजबरीने घेतलेल्या जोरतलबीच होत. पार्लमेंट सभेच्या सल्ल्याशिवाय वसूल घेण्याच्या ज्या नव्या युक्त्या काढण्यात आल्या होत्या, त्यापैकी ही पहिली युक्ती होती. सतराव्या शतकात राज्यकारभारासंबंधी जो मोठा झगडा उत्पन्न झाला तो होण्यास याच युक्त्या कारणीभूत झाल्या.

पार्लमेंट सभा कर बसविण्यावर आपला ताबा बसवीत असता मुख्यत्वेकरून तो ताबा 'हाऊस ऑफ कॉमन्स'कडे येऊ लागला होता. हे असे होणे साहजिकच होते. कारण, या उपसभेकडे राज्यातील अत्यंत श्रीमंत लोकांचे प्रतिनिधित्व नव्हते खरे; पण तिच्याकडे राज्यात जितकी एकंदर संपत्ती होती तिचे प्रतिनिधित्व होते. पैशाच्या कोणत्याही देणगी संबंधाने, दोन्ही उपसभांचे एकमत झाल्याशिवाय, त्यांनी राजाला हकीकत जाहीर करू नये व जी हकीकत जाहीर करणे असेल, ती लोकप्रतिधींच्या सभाध्यक्षाच्या मार्फत जाहीर करावी, असे चौथ्या हेन्रीने सन १४०७ मध्ये कायद्याने ठरविले. लोकप्रतिनिधींच्या सभेने पैशासंबंधी खर्डा तयार करून बड्या लोकांच्या सभेकडे पाठविला असता त्यात फेरफार न करिता तो जशचातसाच मंजूर करावा किंवा नामंजूर करावा हा जो नियम हल्ली अमलात आहे, त्यास वरील कायद्याचाच आधार असावा असे वाटते.

(२) पार्लमेंट सभेचा कायदे करण्याच्या कामात वाटा : इंग्लंडच्या मध्ययुगातील इतिहासात तारतम्याने पाहिले असता कायदे करण्याचे काम फार थोडे होते. त्या वेळेस लोकसमाजाचे रूपांतर फार धीमेपणाने व हळू हळू होत असल्यामुळे त्या वेळच्या मामूली कायद्यावरच लोकसमाजाचे बहुतेक काम भागत असे. एखाद्या सार्वजनिक वाचनालयात जाऊन एकंदर मंजूर झालेल्या कायद्यांच्या पुस्तकांची आवृत्ती पाहिली तर हल्लींच्या कारकीर्दीच्या पहिल्या दहा वर्षांत जितके तिचे भाग तयार झालेले दृष्टीस पडतील तितकेदेखील ग्रेटचार्टरा (स्वातंत्र्याची मोठी सनद) पासून तो थेट रिफॉर्मेशन (धर्मक्रांती) होई तोपर्यंत तिचे तयार झालेले भाग आढळून येणार नाहीत. पार्लमेंट सभेनेच जर कायदा केलेला असला तरच मात्र तो व्यवहारोपयोगी होतो हे तत्त्व फार पूर्वीपासून लोकमान्य झालेले आहे. दुसऱ्या एडवर्डच्या नेभळ्या कारकीर्दीत जे कुव्यवहार अमलात आले होते ते नाहीसे करण्याच्या हेतूने नियम तयार करण्याकरिता सन १३१० मध्ये राज्यातील मोठ्या लोकांच्या एका सभेने काही धर्मोपदेशक व बॅरन लोक यांची एक मंडळी नेमली होती. या

धर्मोपदेशकांनी व बॅरन लोकांनी, ज्यांस 'लॉर्डस् ऑर्डेनर्स' असे म्हणत असत त्यांनी, काही नियम प्रसिद्ध केले व त्यास पार्लमेंट सभेने मंजुरी दिली; पण सन १३२२ मध्ये एडवर्डने आपल्या शत्रूचा नाश केल्यानंतर व आपली सत्ता पूर्णपणे पुनः मिळविल्यानंतर, हे नियम रद्द करण्यासाठी एक पार्लमेंट सभा भरविली. हे कायदे प्रारंभी पार्लमेंट सभेत केले नव्हते याच मुद्यावर मुद्दाम रद्द करण्यात आले होते. यानंतरचे सर्व कायदे, आजपर्यंत चालत आलेल्या वहिवाटीप्रमाणे, पार्लमेंट सभेमध्ये बसून धर्मगुरू, अर्ल, बॅरन व राज्यातील लोकप्रतिनिधी यांच्या सल्ल्याने राजाने रीतीप्रमाणे वाटाघाट करून तयार करावेत, नक्की करावेत व कायम करावेत, असे यावेळी ठरविण्यात आले होते. हे असे ठरवून घेण्यामध्ये एडवर्डचा हेतू काहीही असो; पण त्यावरून पार्लमेंट सभेची सत्ता कशी वाढत होती, हे मात्र व्यक्त होते.

चौदाव्या शतकात कायदे करण्याची जी पद्धत होती ती त्यानंतर जी सुरू झाली तीन अगदी वेगळी होती. हाऊस ऑफ कॉमन्स सभेतच आधी पुष्कळशी कायद्याची कामे सुरू व्हावयास लागली होती. परंत ही जी सुरुवात होत असे. ती अर्जीच्या रूपाने होत असे. कायद्याच्या खर्ड्याच्या रूपाने होत नव्हती. राजा जसा लोकप्रतिनिधींजवळ पैशाची मागणी करी तसे ते ज्या गोष्टींपासून त्यांना दुःख होत असे त्या नाहीशा करण्यासाठी त्याला अर्जी करीत. लोकप्रतिनिधींच्या मागणीवरून व धर्मगुरू व बॅरन यांच्या उपदेशाप्रमाणे व सल्ल्याप्रमाणे राजाने कायदा केला आहे असे साधारणपणे म्हणण्याची चाल असे. या घडणीतील भेदाचे व तत्त्वार्थांतील भेदाचे साम्य असे. जर कायद्याची मागणी अर्जीच्यारूपाने असली तर तो कायदा मंजर करतेवेळी त्यात फेरफार करण्याचा राजाला अधिकार असे; पण हीच मागणी जर कायद्याच्या खरड्याच्या रूपाने असली तर ती राजाला फेरफार केल्याशिवाय जशीच्या तशीच मंजूर करावी लागत असे किंवा नामंजूर करावी लागत असे. याप्रमाणे कायदे करण्याचा राजाच्या अधिकाराचा मोठासा भाग नाहीसा झाला. कारण जेव्हा एखादा कायदा राजाला आवडत नसे व त्यात फेरफार करण्याची त्याला सत्ता नसे तेव्हा त्याला जो जसाचातसाच सबंध नामंजूर केल्यापासून होणाऱ्या वाईट परिणामांचे भीतीमुळे, मंजूर करावा लागत असे.

सन १४०१ मध्ये लोकप्रतिनिधींच्या सभेने राजाला पैसे देण्यापूर्वी आमच्या अर्जीस जे उत्तर मिळावयाचे ते आम्हास अगोदर कळवावे असा चौथ्या हेन्रीला अर्ज केला. चौथ्या हेन्रीने जरी त्याला पार्लमेंट सभेला खुश करावयाचे होते तरी या अशा अर्जीस असे उत्तर देण्याचा पूर्वीचा दाखला नाही, म्हणून ती नामंजूर केली. सन १४१४ मध्ये लोकप्रतिनिधींनी आमच्या अर्जीवरून जो कायदा करण्यात येईल तो मूळ अर्जीत जसा असेल त्याप्रमाणे काही एक कमी जास्ती न करिता मंजूर करण्यात यावा असा पाचव्या हेन्रीस अर्ज केला. राजाने तो अर्ज बहाल राखला. ही सूट मिळाल्यानंतर अर्जाच्या ऐवजी कायद्याचा मसुदा राजापुढे ठेवणे हे फक्त पुढे काही त्रास होऊ नये म्हणून कायदेशीरपणाचा एक उपाय योजण्यासारखे

मात्र होते. पंधराव्या शतकात कायद्याचे मसुदे राजापुढे ठेवून ते मंजूर करून घेण्याचाच नियम अमलात आला आणि त्यामुळे असा कायदा सबंध नामंजूर करण्याचा जरी हक्क राजाला होता तरी त्यात फेरफार करण्याचा त्याचा हक्क कायमचा नाहीसा झाला.

(३) प्रधानांची पार्लमेंट सभेला जोखीमदारी : हल्ली खरोखर पार्लमेंट सभा राजाच्या प्रधानास नेमते व काढून टाकते; परंतु सन १६८८ तील राज्यक्रांती होण्याचे पूर्वी राजा आपल्या प्रधानास नेमीत असे व काढून टाकत असे. मध्ययुगात अजूनपर्यंतच्या देखील अंमलदारीची सर्व कामे खरोखर राजाच्याच हाती असत. ही राजाची सत्ता कमी करण्याविषयी पार्लमेंट सभेने पुष्कळ यत्न केले. उदाहरणार्थ, त्याचे प्रधान त्यास पार्लमेंट सभेने पसंत करून देऊनही पाहिले. त्या वेळेस पार्लमेंट सभेच्या सभासदांमध्ये जितके ऐक्य असावे तितके नसल्यामुळे व राजास हुकमतीची जी कामे करावी लागत असत त्याच्यावर देखरेख राखण्याइतके त्यास ज्ञान नसल्यामुळे हे त्यांचे सर्व यत्न निष्फळ झाले. राजाच्या प्रधानांनी जर मोठ्याशा बदचालीचा काही अपराध केला तर त्यास चौकशी करून शिक्षा देण्याचा अधिकार पार्लमेंट सभेकडे असणे हे वरील स्थिती असल्यामुळे फार आवश्यक होते. सन १३७६ मध्ये अशा प्रकारचा अधिकार पार्लमेंट सभेने पहिल्याने बजाविला. तिसऱ्या एडवर्डच्या कारकीर्दीची शेवटली वर्षे फार अनर्थात्मक निवटली फ्रान्स देशाशी लढाई रडतखडत तशीच चालू होती, तिजपासून देशाला फायदा तर काही होत नव्हता; पण लोकांवर दुःखे मात्र सारखी ओढवत होती. राजा दिवसानुदिवस जखड बनत चालला होता; त्याचा मुलगा जॉन ऑफ गॉन्ट हा कारभार पाहत होता आणि म्हणून त्याच्या नोकरास, राज्यात जो बदअंमल माजला होता त्याजबद्दल, जबाबदार धरण्यात आले होते. लोकांनी न भिता गुड पार्लमेंटमध्ये आपला यासंबंधी असंतोष दर्शविला. जे अपराधी धरण्यात आले होते त्यामध्ये राजाचा खानगीकडील कारभारी लॉर्ड लॅटिमर हा होता. या बड्या सरदारावर त्याने आपल्या सत्तेचा दुरुपयोग करून सार्वजनिक पैसा खाल्ला असा आरोप लोकप्रतिनिधींनी ठेवल्यामुळे त्यास चाकरीवरून काढून टाकून कैदेत घालावे, अशी शिक्षा बड्या लोकांच्या सभेने दिली. दुसऱ्या रिचर्डच्या वेळेस याच मार्गाचा स्वीकार करून पाहिल्याने राजाची प्रीतिपात्रे व नंतर त्याचे शत्र नाहीसे करण्यात आले. सन १४५० मध्ये सहाव्या हेन्रीचा प्रधान व त्याच्या राणीच्या प्रीतीतील जो ड्यूक ऑफ सफक यांच्यावर लोकप्रतिनिधींनी बड्या लोकांच्या सभेत दोषारोप केला.

या वेळची राज्याधिकाराची स्थिती : यावेळी राज्य चालविण्याच्या कामात वाटेल तसे वागणे हे इंग्लंडच्या राजाचे सुटले होते, तो नियम शासनबद्ध राज्यपद्धतीप्रमाणे राज्य करणारा राजा बनून राहिला होता. या फेरफारामुळे इंग्लंडच्या राजाची जुनी सत्ता पुष्कळ नाहीशी झाली होती. हल्लीच्या इंग्लंडच्या राजाची सत्ता जशी नियमित होऊन गेली आहे तशी प्लॅन्टेजेनेट घराण्यातील शेवटच्या राजाची सत्ता संकुचित झाली होती, असे

मात्र आपण समजावयाचे नाही. नावाने म्हणा किंवा अधिकाराने म्हणा यावेळी राजा हा राज्याचा मुख्य चालक होता तो होताच. त्याने आपला अधिकार आपल्या मुख्य प्रधानाच्या स्वाधीन करून टाकला नव्हता. पार्लमेंट सभेत राजा या नात्याने तो कायदे करण्याचे कामात आपला स्वतःचा वाटा उचलत असे आणि मंत्रिसभेमध्ये (कौन्सिलात) राजा म्हणून तो राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हातात ठेवत असे, राज्यातील प्रधान तो नेमत असे व काढून टाकत असे. त्यांना फक्त राजाशीच इमानाने वागावे लागत असे. हल्लीप्रमाणे त्यांना राजाशी इमानाने वागून एकमेकांशीही इमानाने वागावे लागत नसे. राजाकडे अजूनदेखील नावाचे नाही; पण खरोखर सेनाधिपतीत्व असे. राजाच्या वंशपरंपरागत असलेल्या व फ्यूडल पद्धतीने होणाऱ्या वसुलातून राज्याचा मामूल शिरस्त्याचा सर्व खर्च भागत असे. जेव्हा त्याला या वसुलाशिवाय अधिक रकमेची जरूर लागत असे तेव्हा मात्र त्याला सरकारी नोकरांच्या नेमणुकीत व सरकारी कामात पार्लमेंट सभेला हात घालू द्यावा लागत असे. एखाद्या पार्लमेंट सभेला आपला अंमल गाजवावा असे वाटेल तर ती थोडेच दिवसांपुरती भरत असल्यामुळे व राज्यकारभाराचा तपशील समजून घेण्याचा प्रसंग तिला क्वचितच येत असल्यामुळे तिला तसे करणे शक्य नसे. थोडक्यात, म्हटले तर सर्व राज्यकारभार अजूनपर्यंत राजाच्याच हाती असे. तथापि, कधी कधी राज्यातील तिन्ही वर्गांच्या प्रजा एकत्र होऊन राजाला कधी कधी उपदेश करीत, कधी कधी दोष देत व कधी कधी आडही येत असत.

यावेळची धर्मखात्याची स्थिती : अजूनपर्यंत धर्मखात्याची सत्ता जबरदस्त होती; पण ती हळूहळू कमी होऊ लागली होती. हे असे होण्याची कारणे पुष्कळ होती. पहिल्याने धर्मगुरूंनी आपले लोकनायकत्व आपल्या हातांनी घालविले होते. जॉन राजाच्या कारकीर्दीपर्यंत राज्यव्यवस्था चांगली करण्याच्या कामात व स्वातंत्र्य मिळविण्याच्या कामात सर्व देशाचे पुढारीपण धर्मगुरूंनी पत्करले होते. जॉनच्या कारकीर्दीपासून तो पहिल्या एडवर्डच्या कारकीर्दीपर्यंत ते पोपचे ताबेदार असल्यामळे त्यांच्यावर अडचणींवर अडचणी येऊ लागल्या होत्या व त्यामळे लोकांचे पुढारीपणाचे काम हळूहळू बॅरन लोकांचे हाती आयतेच येऊ लागले होते. पहिल्या एडवर्डच्या कारकीर्दीपासून लोकप्रतिनिधी हळूहळू आपल्या स्वातंत्र्याचा हक्क सांगू लागले होते. याप्रमाणे धर्मगुरूंचे राज्यकारभारतील वर्चस्व बरेच नाहीसे झाले होते. हळूहळू ज्ञानाबद्दलचे वर्चस्वही त्याच्या हातातून जात चालले होते. चॉसरसारख्या गृहस्थाने लिहिलेले मोठमोठे ग्रंथ पाहिले म्हणजे फक्त धर्म गुरूचाच वर्ग विद्वान व शिष्टाचारसंपन्न होता असे नाही, असे आपणास दिसून येईल. जसे जसे त्यांच्या ज्ञानाबद्दलचे वर्चस्व नाहीसे होऊ लागले त्याचप्रमाणाने धर्मशिक्षक या नात्याचा त्यांचा अधिकारही कमी होत गेला. आपणास जे धर्मशिक्षण मिळत आहे ते बरोबर आहे किंवा नाही याविषयीची चर्चा हजारो लोकांच्या मनात येऊ लागली, हे लोलार्डींचा जो प्रसार झाला त्याचे पहिले चिन्ह होय. धर्माच्या मतावर लोकांनी टीका केल्यामुळे धर्मगुरूंची छळ

करण्याची बुद्धि जागृत झाली व त्यांचे लोकांवरील प्रेम कमी होऊ लागले. याप्रमाणे धर्मगुरू व गृहस्थ लोकांपैकी अत्यंत बुद्धिवान लोक यांच्यामध्ये हळूहळू फूट पडत चालली.

धर्मगुरूंमध्येही धर्मावरील आस्था कमी होऊ लागली. अत्युत्साह हा हटकून फार थोडे दिवस टिकतो. बाराव्या शतकात सिस्टरशियनांनी व तेराव्या शतकात बैराग्यांनी (फ्रायर) जो चेव आणला होता तो आता नाहीसा झाला होता. अत्यंत संपत्ती, सत्ता, अब्रू आणि मानमरातब यांच्या फार दिवसांच्या उपभोगामुळे धर्मगुरूंची धमक शिथिल झाली होती व ते भित्रे, आळशी व स्वसुखोपभोगी बनून राहिले होते. चौदाव्या शतकात ॲव्हिग्रॉन येथे जे पोप राहत असत त्यापैकी बहुतेक निर्बल व बदचालीचे लोक होते व त्यांनी धर्मखात्याच्या सुधारणेविषयी काहीएक केले नाही. धर्माच्या मतांविषयी शंका घेण्याची जी प्रवृत्ती सुरू झाली होती तिचा परिणाम खुद्द धर्मगुरूंवरही व्हावयास लागला होता. धर्मगुरूंचा आपल्या स्वतःवरील विश्वास उडू लागला होता आणि म्हणूनच लोकांचाही त्यांच्यावरील विश्वास कमी कमी होऊ लागला होता.

याप्रमाणे धर्मगुरूंची सत्ता कमी होत चालली असता गृहस्थ लोकांची मने त्यांच्याविषयी कलुषित होण्यासही कारणे अस्तित्वात होतीच. धर्मगुरूंची संपत्ती अतिशयच होती हे एक कारण त्यापैकी आहे. धर्मखाते अमर असल्यामुळे त्यास पैसा एकसारखा मिळतच जात होता; त्यास पैशाचे नुकसान मुळीच लागत नसे. धर्मखात्याकडे जितक्या जमिनी होत्या तितक्याच त्या खात्याकडे राखण्याविषयी पहिल्या एडवर्डने यत्न केला होता. सन १४०४ मध्ये काही शायरांच्या प्रतिनिधींनी धर्मखात्याचा एक वर्षाचा वसूल राजाने आपल्या खर्चास घ्यावा, अशी सूचनाही केली होती. बिशपांच्या व मठांकडे चालत असलेल्या सर्व मालमिळकती जप्त कराव्यात अशी सूचना सन १४१० मध्ये लोकांच्या प्रतिनिधींनी केली होती असे म्हणतात. पाचव्या हेन्रीला सन १४१४ मध्ये पार्लमेंट सभेने 'परदेशातील मठ' (ॲलियन प्रायरीझ) जे इंग्लंडात होते त्यांची सर्व मालमत्ता खरोखर देऊन टाकिली होती. हे परदेशातील मठ एखाद्या तिकडील मोठ्या मठाच्या (मोनॉस्टरीच्या) शाखा असत व त्यांचे उत्पन्न त्या मोठ्या मठाकडे जमा होत असे.

धार्मिक न्यायसभांच्या जलमांबद्दलही गहस्थ लोकांचे गाहाणे होते. ज्या अनीतीच्या गुन्ह्यास फौजदारी कायद्याने शिक्षा होत नसे असे गुन्हे दाबून टाकण्याचे काम या न्यायसभा पत्करीत असत; या न्यायसभांतील काम पुष्कळ वेळा अन्यायाने होत असे आणि म्हणूनच रगड टेहळणी, अदावतीच्या फिर्यादी व जाणूनबुजून खोट्या साक्षी देणे, ही अवश्यमेव पैदा होत असत. अशी जरी स्थिती होती तरी या न्यायसभा धर्मक्रांती (रिफॉर्मेशन) झाल्यावरही अस्तित्वात होत्या व त्याजपासून लोकांना त्रास होणे पुढे पहिल्या चार्लसाचे वेळेस बंद झाले.

जॉन राजा पोपला शरण गेल्यापासून पोप जो एकसारखी दुःसह परिस्थिती होण्यासारखी राज्यात ढवळाढवळ करीत असे, ती लोकांना अत्यंत दुःखद झाली होती. इंग्लंड देशाचा राजा भूमंडळावर कोणाचाही ताबेदार नाही असे बॅरन लोकांनी सन १३०१ मध्ये लिंकन येथील पार्लमेंट सभेमध्ये जाहीर केले होते. सन १३६६ मध्ये पोपाचे स्वामित्व व त्यास देण्याची खंडणी ही यथाविधी सोडून देण्यात आली होती. रोम शहरी फिर्यादी घेऊन जाऊन तेथून त्यांचा न्यायकरून आणण्याचा जो प्रघात पडला होता त्याजविरुद्ध एकामागून एक आशा भरणाऱ्या पार्लमेंट सभांनी आपले प्रतिकूल मत प्रदर्शित केले होते. सन १३५३, १३६५ आणि १३९३ मध्ये वरप्रमाणे जर कोणी आचरण करील तर त्याची सर्व मालमत्ता जप्त करून त्यास राज्यरक्षणाच्या बाहेर टाकिले जाईल, अशा अर्थाचे कायदे करण्यात आले होते. या कायद्यास 'प्रिम्युनायर'चे कायदे असे म्हणतात. (प्रिम्युनायर या शब्दाचा अर्थ ताकीद देणे असा आहे.) पोपाने इंग्लंडात धर्मखात्यामध्ये मोठमोठ्या जागा देऊ नये म्हणून सन १३५१, १३६२ व १३९० मध्ये पार्लमेंटसभेने 'स्टॅट्यूट ऑफ प्रोव्हायझर्स' या नावाने कायदे केले.

या वेळची बड्या लोकांची स्थिती : प्लॅटजेनेट घराण्यातील शेवटच्या राजाच्या कारकीर्दीत बड्या लोकांच्या (बॅरोनेजच्या) स्थितीत बरेच अंतर पडले होते. तिसऱ्या हेन्रीच्या कारकीर्दीत त्याप्रमाणे दुसऱ्या एडवर्डच्या वेळेसही एखाद्या निर्बळ व गैरमार्गाने जाणाऱ्या राज्याच्या या प्रतिपक्षाचे बॅरन लोक पुढारी असत. तिसऱ्या एडवर्डला दुसऱ्या एडवर्डपेक्षा बड्या लोकांना आपल्या ताब्यात बरेच आणता आले. थाटमाटाचा राजा व प्रसिद्ध योद्धा या नात्याने त्याने त्यांची मर्जी संपादन केली होती. त्यांची धमक जिरविण्यासाठी त्याने फ्रान्सच्या विजयाचे द्वार त्यांना मोकळे करून दिले. आपल्या मुलांसाठी म्हणून जितक्या जहागिरी त्याला गोळा करिता आल्या तितक्या त्याने एकत्र केल्या; परंतु या त्याच्या राज्यनीतीमुळे त्याच्या वंशजास निरुपसर्ग पारंपरीय प्राप्त झाले नाही. बॅरन लोक जसचेतसे बेआराम व बलिष्ठ राहिले. बॅरन लोकांची कुटुंबे फार थोडी होती व त्यांची तर आता पूर्वीपेक्षाही मालमिळकत जास्त वाढली होती. खानगी लढाया करण्यासाठी त्यांना आपल्या कुळास मदत करण्यास सांगता येत नसे; परंतु आपल्या पदरी या कामासाठी पुष्कळशी कुटुंबे बाळगण्याची त्यांची इच्छा व ऐपतही असे. या लोकांस ते आपले नोकर आहेत असे इतर लोकांस समजावे म्हणून एक तऱ्हेचा पोशाख ते घालण्यात देत असत व हे नोकर त्यांचा हुकूम मिळताच लढाई करण्यास तयार असत. सहाव्या हेन्रीच्या कमजोर कारकीर्दीत हे दंगेखोर बडे लोक त्यांच्या पदरी शेकडो लोक असल्यामुळे अनिवारा होऊन गेले. या जुन्या कुटुंबांपैकी जेव्हा काही कुटुंबे कालगतीत नाहीशी झाली व काही 'वॉर्स ऑफ दी रोझेझ' या युद्धात नाश पावली तेव्हा मात्र हे वरील राजाचे संकट नाहीसे झाले.

जोपर्यंत ही जुनी बॅरन लोकांची घराणी हयात होती तोपर्यंत लोकांचे पुढारीपण त्यांनी

अजिबात सोडून दिले होते असे नाही. जेव्हा एखादा राजा वाईट रीतीने राज्य करी व त्यामुळे लोकांवर आणीबाणीचा प्रसंग येई तेव्हा या बॅरन लोकांपैकी काहीतरी बडे लोक लोकांच्या पक्षास येऊन मिळत असत. जरी साधारण जनसमाजाच्या लोकप्रतिनिधींना राज्यकारभाराच्या कामात अनुभव व सत्ता हळूहळू मिळत चालली होती तरी त्यांना दुसऱ्याच्या साहाय्याशिवाय आपल्या स्वतःच्या जोरावर दरबारी पक्षाशी टक्कर देण्याची शक्ती अजूनपर्यंत आली नव्हती. जेव्हा बड्या लोकांचे स्वातंत्र्य नाहीसे झाले तेव्हा लोकप्रतिनिधींना नाही; पण राजाला ताबडतोब अधिक सत्ता प्राप्त झाली.

या वेळची लोकप्रतिनिधींची स्थिती : प्लॅन्टेजेनेट घराण्यांतील शेवटच्या राजांच्या कारकीर्दीत या तिसऱ्या वर्गाची प्रगती हळूहळू पण नेटाने होत होती. लॅंकॅस्टर घराण्याचे राजे राज्य करीत असता राज्यव्यवस्था चालविण्याच्या कामात बडे लोक जितका भाग घेत असत तितकाच किंबहुना अधिक भाग लोकप्रतिनिधी घेत असत. वॉर्स ऑफ दी रोझेझ या लढायांनी त्यांच्या संख्येस किंवा संपत्तीस काहीएक नुकसान झाले नाही. बडे लोक व त्यांचे नोकर लढाईत गुंतलेले असत तेव्हा व्यापारी व शेतकरी हे आपापली शांततेची, नफ्याची व उद्योगाची कामे करण्यात मग्न असत. मध्यस्थितीतील लोकांना कसे वळवावे हे यॉर्क घराण्यातील राजांना चांगले माहीत होते. कारण जरी हा वर्ग राज्य चालविण्याइतका समर्थ झाला नव्हता तरी या वर्गाच्या मदतीशिवाय कोणालाही निर्भयपणे राज्य चालविता आले नसते. हा वर्ग आपली मदत कोणत्याही राजाला मग तो किती कडक स्वेच्छाचारी असला तरी, जर हरएक प्रकारची अंदाधुंदी नाहीशी करण्याचा त्याचा दृढनिश्चय आहे असे दिसून आले तर, देण्यास तयार असे. लॅंकॅस्टर घराण्यातील नियम शासनबद्ध राज्यपद्धतीच्या योगाने ज्यामध्ये असावी तशी व्यवस्था राहिली नव्हती व ज्या राजकीय पारतंत्र्यात व्यक्तिविषयक निर्भयपणा नाही तशा राजकीय स्वातंत्र्यासंबंधाने लोकप्रतिनिधी उदास होऊन राहिले होते.

शेतकऱ्यांचे बंड व गुलामगिरीचा लय : बाराव्या शतकापासून पुढे गुलामांची संख्या एकसारखी कमी कमी होत जात होती. स्वतंत्र मनुष्यांची संख्या एकसारखी वाढत जात होती ही गोष्ट संभवनीय आहे. गुलामगिरीतून सुटून जाण्यास गुलामास पुष्कळ मार्ग अवलंबून त्याला आपले स्वातंत्र्य विकत घेता येत होते. एखादा गुलाम एखाद्या सनदी शहरात एक वर्ष आणि एक दिवसभर राहिला व इतक्या अवकाशात जर त्याच्या धन्याने त्याजवर आपला हक्क सांगून परत नेले नाही तर अशा गुलामाला स्वातंत्र्य मिळत असे. (तथापि, अशी दीक्षा त्याला घेता येऊ नये म्हणून कायदे करण्यात आले होते.) गुलामांना स्वातंत्र्य देणे हे धर्मसंस्थांच्या ईश्वरास फार प्रिय असे आणि त्याप्रमाणे आपल्या आत्म्याचे कल्याण व्हावे म्हणून पुष्कळ बड्या लोकांची मने या कृत्याकडे वळविण्यात येत असत. जरी यथाविधी एखाद्या गुलामाला स्वातंत्र्य दिलेले असले तरी पुष्कळ वेळा अशा गुलामांपासून काही नक्की रक्कम घेण्याचे ठरवून त्यास जी त्रासदायक जातनोकरी, आपल्या धन्याची करावी

लागत असे, तिजपासून मुक्त करीत असत; परंतु सन १३४९ मध्ये 'ब्लॅक डेथ' या नावाच्या रोगाने जेव्हा पुष्कळशी लोकसंख्या कमी झाली तेव्हा गुलामांचे स्वतंत्र मनुष्ये या नात्याने जे सुखाने स्थित्यंतर होत असे, त्यास तडाख्याने बंदी झाली. मजूर थोडे असल्यामुळे मजुरीचे दर वाढले, तेव्हा अर्थातच धन्यांनी पीछेहाट घेतली व ते आपल्या गुलामांपासून पैशाच्या ऐवजी जातनोकरी घेण्याचा यत्न करू लागले. मजुरीचे दर वाढू नयेत म्हणून कायदे करण्यात आले. या व अशाच दुसऱ्या संकटांमुळे सन १३८१ मधील शेतकऱ्यांचे बंड उद्भवले. बंडाचा साक्षात हेतू सिद्धीस गेला नाही. तथापि, त्याजमुळे गुलामगिरी पुनः सुरू करणे किती कठीण व भयंकर आहे हे मात्र स्पष्ट दिसून आले. यानंतर गुलामगिरीचा पहिल्यापेक्षा झपाट्याने अस्त होऊ लागला. वॉर्स ऑफ दी रोझेस् या लढाईच्या अखेरीस गुलामगिरी नाहीशी झाल्यासारखीच होती. बहुधा प्रत्येक इंग्रज यावेळी स्वतंत्र मनुष्य असे.

लोकांच्या स्थितीमधील कमी जास्तीपणाची वाढ : जेव्हा एखादी मोठी सामाजिक सुधारणा अस्तित्वात येते तेव्हा तिच्याबरोबर काही सामाजिक अडचणीही उदभवतात. यावेळी ज्याअर्थी सर्व इंग्रज लोक स्वतंत्र झाले होते त्याअर्थी पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात या बहुतेक स्वतंत्र मनुष्यांना मालमिळकत मुळीच नव्हती. जोपर्यंत गुलाम अस्तित्वात होते तोपर्यंत त्यांच्या धन्यास त्यास आपल्या मिळकतीवरून हुसकून देणे म्हणजे मोठी नुकसानीची बाब होती, पण त्यांच्या मागून त्याच जमिनीवर जे धारेकरी व मजूर म्हणून कामाला लागले होते, त्यास, जेव्हा कधी जर एखाद्या नव्या रस्त्याने त्या जमिनीचा थोड्याशा खर्चाने अधिक किफायतवार उपयोग होऊ लागला. मजुरांना जमिनीवरून सहज हुसकावून देता येण्यासारखे होते. याच वेळी इंग्लंडातील लोकरीस तेजी आल्यामुळे सावकारांनी मोठमोठ्या जमिनी खरेदी केल्या व त्यांचा उपयोग त्यांनी मेंढरे राखण्याकडे केला. जमिनी मेंढरे राखण्याचे कामी लागल्या गेल्यामुळे त्यांची मशागत करण्याची जरूर क्वचितच राहिली; याप्रमाणे इंग्लंडातील पुष्कळ भागात दुर्दशा उत्पन्न झाली. इंग्लंडातील मध्यवर्गातील लोकांना आजपर्यंत कधीहि जितकी संपत्ती प्राप्त झाली नव्हती तितकी संपत्ती लोकरविके, शहरातील व्यापारी व कारखानदार यास मिळाली. याप्रमाणे मागील शतकापेक्षा पंधराव्या शतकात संपत्ती व दारिद्र्य यामधला भेद अधिक अधिक जास्त दिसू लागला. तथापि, बिन ऐषोआरामाच्या वस्तूंची रेलचेलही चोहोकडे पसरली होती. दुसऱ्या प्रातांतील लोकांपेक्षा इंग्लंडातील लोकांचा मुख्य भाग जास्त संपन्न झाला. काही इतिहासकार ज्या दुःखावस्थांचा आपण वर उल्लेख केला आहे त्याकडेच लक्ष देऊन या पंधरावे शतकास 'राष्ट्रीय दैन्याचा काळ' असे म्हणतात व काही इतिहासकार या पंधराव्या शतकात जी स्वातंत्र्याची वाढ व उद्योगधंद्यांची प्रगती झाली या गोष्टींकडेच लक्ष वेधतात. या काळास 'सुवर्णयुग' असे म्हणतात.

○○○

भाग ८ वा

ट्यूडर घराण्यातील राजे
इ.स. १४८५-१६०३

उपोद्घात -प्लॅन्टॅजेनेट घराण्यातील शेवटच्या राजाच्या कारकीर्दीत विशेष लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे पार्लमेंटसभेच्या सत्तेची वाढ ही होय; परंतु ही वाढ चौथा एडवर्ड गादीवर बसल्याबरोबर बंद पाडण्यात आली होती. नंतर राजनीतीचा कल एका नव्याच दिशेकडे वळला, जोपर्यंत ट्यूडर घराण्यातील राजे राज्य करीत होते तोपर्यंत तो असाच भासत होता; म्हणजे पुनः एकदा राजाची सत्ता वाढू लागली.

वॉर्स ऑफ दी रोझेस् या लढाईच्या शेवटी राज्यरचनात्मक बांधणीचा तोल ढासळून गेला होता. बॅरन लोकांचा बहुतेक निर्वंश झाला होता. राष्ट्रातील लोकांच्या धर्माच्या समजुतीवरील धर्मोपदेशकांचा आळा नाहीसा झाला होता व लोक त्यांच्या गर्वाबद्दल व संपत्तीबद्दल त्यांचा द्वेष करीत असत. पूर्वी राजा व प्रजा यांची मध्यस्थी त्यांच्याकडे असे. आता रक्षण व्हावे म्हणून ते राजाला धरून बसले होते. मधल्यावर्गातील जे लोक हाऊस ऑफ कॉमन्स या सभेत आपले प्रतिनिधी पाठवीत असत त्यांचे या देशातील लढाईने काही एक नुकसान झाले नव्हते व त्याजवळ पैसाही बराच झाला होता; परंतु राष्ट्रीय राजनीतीचे धोरण अमुक एक प्रकारचे असावे असे अधिकाराने सांगण्यापुरती त्यास शक्ती आली नव्हती. दुसऱ्या सर्व गोष्टींपेक्षा सार्वजनिक स्वास्थ्य असावे या गोष्टीकडे त्याचे लक्ष विशेष असे आणि म्हणूनच त्यांचा कल राजसत्तेसंबंधी काही एक तक्रार उपस्थित न करता तिचा बडेजाव वाढवावा इकडे असे. याप्रमाणे सर्व राष्ट्र ट्यूडर घराण्यातील निःशंक आणि स्वेच्छाचारी पण शूर आणि शहाण्या राजांच्या हुकूमतीसाठी तयार होऊन राहिले होते.

सातव्या हेन्रीने लॅन्कॅस्टर आणि यॉर्क या दोन्ही घराण्यांचा वारससंबंध जोडून टाकला होता. बंडाचे जे जे यत्न त्याच्या कारकीर्दीत झाले ते सर्व त्याने आपल्या चातुर्याने पालथे पाडले. बड्या लोकांना त्याने आपल्या कह्यात आणले, मध्यवर्गातील लोकांचे प्रेम

संपादिले व या वेळेपर्यंत कोणत्याही इंग्लंडच्या राजाजवळ कधीही जितका पैसा नव्हता तितका त्याने गोळा केला. आठव्या हेन्रीला गादीवर बसल्यानंतर बापाने केलेल्या परिश्रमाचे फळ आयतेच प्राप्त झाल्यामुळे व त्याला वुलसेसारखा लायर नोकर मिळाल्यामुळे पहिला एडवर्ड होऊन गेल्यापासून जितके राजे आपल्या अगोदर इंग्लंडच्या गादीवर बसून गेले त्या सर्वांपेक्षा आपण जास्त बलवान आहोत असे त्यास दिसून आले. त्याने पोपचा अधिकार झुगारून दिला व त्यामुळे इंग्लंडला अशा संकटात गोवले की, त्याला सर्व राज्यकारभार स्वतःच्या हातात घ्यावा लागला. ज्या वर्षापासून इंग्लंडमधील धर्मोपदेशकांनी पोपची सत्ता झुगारून दिली त्या वर्षापासून तो तहत स्पेन देशातील आरमाराचा पराभव ज्या साली झाला त्या सालापर्यंत (१५३२-१५८८) इंग्लंड देशाचा आतून व बाहेरून नाश होत होता, म्हणजे देशातल्या देशात लढाया सुरू होत्या व बाहेरून एकसारख्या त्याच्यावर स्वाऱ्या होत होत्या. अशी संकटे स्वेच्छेप्रमाणेच बहुतेक राज्य करण्याच्या अधिकाराचा अंमल केल्याशिवाय टळण्यासारखी नव्हती.

आठव्या हेन्रीने धर्माच्या कामात मधला मार्ग पत्करण्याचा यत्न केला. सहाव्या एडवर्डने व प्रोटेक्टर (राजरक्षक) सॉमर्सेटाने प्रॉटेस्टंट लोकांचा पक्ष स्वीकारला होता व मेरीने कॅथलिक लोकांचा पक्ष स्वीकारला होता. एलिझाबेथने सर्व पक्ष आपल्या ताब्यात ठेवण्याचे आपल्या बापाचे काम पत्करीले. शहाण्या मंत्र्यांच्या साहाय्याने तिला प्रॉटेस्टंट धर्माची राष्ट्रधर्म म्हणून संस्थापना करण्यात व इंग्लंडवर झालेल्या सर्व स्वायांचा पराभव करण्यात यश आले; परंतु तिला या कामात जे यश मिळाले तेच सुधारलेल्या धर्मसंस्थेमध्ये नवे नवे तंटे उपस्थित होण्यास कारणीभूत झाले. राज्यकर्त्यांनी बिशपांचा पक्ष स्वीकारल्यामुळे प्युरिटन लोकांचा राजनीतीच्या संबंधाने एक विरोधी जनसमूह होऊन राहिला. एलिझाबेथच्या मरणानंतर व ट्यूडर घराणे नाहीसे झाल्यावर, याच विरोधी पक्षाने राजकर्त्यांचा पराजय केला व राजसत्तेला या वेळपर्यंत कोणी कधीही मर्यादित केले नव्हती इतक्या कडक रीतीने मर्यादित केले.

ट्यूडर घराणे राज्य करीत असता राजसत्तेचे जे पुनरुज्जीवन झाले त्याचे आपणास फुगवून वर्णन करणे बरोबर होणार नाही. ट्यूडर घराण्यातील राजे जणू काय खरोखर मनास वाटेल तसे राज्य करणारे होते, असे पुष्कळ लेखकांनी वर्णन केले आहे; पण या त्यांच्या लिहिण्याचा अर्थ, ते लोकांच्या मनोधर्माकडे दुर्लक्ष करण्यास समर्थ असत, असा जर असेल तर ती त्यांची चूक आहे. या राजांच्या पदरी कायमचे सैन्य नसे व त्यांना लढवय्ये लोकांवर राज्य करणे असे. त्यांच्याकडून जी पुष्कळ निष्ठुर व बेकायदेशीर कामे झाली ती त्यांच्या प्रजेने दुर्लक्ष करून त्यास करू दिली म्हणून झाली. लोकमत कसे बदलते या गोष्टीकडे ट्यूडर घराण्यातील राजांचे विशेषकरून लक्ष असे आणि जी राजनीती लोकांना आवडत नाही असे त्यांना स्पष्ट दिसून येई तिला ते क्वचित धरून बसत असत. जर वरील लेखकांचा ट्यूडर घराण्याचे राजे कायदेशीर रीतीने मनास मानेल तसे वर्तत असत अशा लिहिण्याचा

झोक असेल, तर ते खऱ्यापासून अधिक अधिक लांब जात आहेत, असे आपल्यास म्हणावे लागेल. ज्या जुन्या संस्थांच्या योगाने राजनीतीसंबंधी स्वातंत्र्याचे किंवा जातस्वातंत्र्याचे रक्षण होत असे अशी एकही संस्था त्यांनी नाहीशी केली नव्हती. या राजांनी अत्यंत जुलमाची म्हणून जी कृत्ये केली ती सर्व कायदेशीर रीतीने केली. परंपरागत चालत आलेल्या राजनियमानुसार राज्य पद्धतीचा त्यांनी कधीही भंग केला नाही.

ट्यूडर घराण्यातील राजांचा व त्यांच्या पार्लमेंटचा संबंध : ट्यूडर घराण्यातील राजे राज्य करीत असता राजसत्तेचे जे पुनरुज्जीवन झाले त्यामुळे पार्लमेंट सभेची सत्ता साहजिक रीतीने थोडीशी कमी झाली हे गर्भित आहेच. नियमशासनबद्ध पार्लमेंट सभेस जी जी कामे करण्याचा अधिकार होता तीती कामे तिच्या हातून काढून न घेता उलट आपली कामे पार्लमेंट सभेकडून करवून घेण्याकडे ट्यूडर घराण्यातील राजांचा कल असे.

वार्स ऑफ दी रोझेस या लढाईमुळे बड्या लोकांच्या सभेची शक्ती व स्वातंत्र्य नाहीसे झाले होते. लढाईत पडून व देहान्त शिक्षा होऊन बॅरन लोकांची संख्या इतकी कमी झाली होती की, सातव्या हेन्रीच्या पहिल्या पार्लमेंट सभेत सहाव्या हेन्रीच्या भरगच्च पार्लमेंट सभेत जितके बडे लोक होते त्यांच्या निम्मेही नव्हते. सातव्या व आठव्या हेन्रीच्या कारकीर्दीत त्या आधीच कमी झालेल्या बड्या लोकांच्या संख्येतून पुष्कळास देहान्त शिक्षा व जप्त्या झाल्यामुळे या बड्या लोकांची संख्या आणखीही कमी झाली. धर्मखात्यातील बडे लोकदेखील राजकर्त्यांच्या म्हणण्याप्रमाणे चालण्यास तयार होते. कारण त्यांना राज्यातील जनसमूहापासून आश्रय मिळण्याची खात्री नव्हती. हेन्रीने मठांची मोडतोड करून वरिष्ठ सभा आपल्या ताब्यात पूर्णपणे आणली. या मठांच्या मोडीमुळे पार्लमेंट सभेतून मोठमोठे मठाधिकारी आपोआप नाहीसे झाले. हे असे झाल्याने धर्मखात्यातील बड्या लोकांची संख्या अर्धी झाली व त्यामुळे गृहस्थ बड्या लोकांस जे संख्येच्या मानाने मोठेपण आले ते अजूनपर्यंत तसेच कायम आहे. हे मठ मोडल्यामुळे राजाच्या हाती फार मोठा जमीनजुमला आला. या जमीनजुमल्यातून नेमणुका करून देऊन त्याने एक बड्या लोकांचा वर्गच बनविला. या बड्या लोकांची पाळेमुळे अजून जमिनीत फार खोल गेली नसल्यामुळे ते राजाच्या पूर्ण ताब्यात असत. राजाने पोपाशी मिलाफ केला तर या नव्या बड्या लोकांच्या नेमणुकी जाण्याचा संभव असल्यामुळे हे लोक धर्मक्रांतीलाही अनुकूल होते. कॅथलिक धर्माविषयी आस्थेवाईक अशा मेरी राणीलादेखील तिने आपल्या राज्याचा व पोपाचा धर्मसंबंधी जोडल्यावर, या मठांकडे असलेल्या जमिनी, ज्या जहागीर म्हणून देण्यात आल्या होत्या त्या या बड्यालोकांकडे बहाल राखाव्या लागल्या. बहुत करून बड्या लोकांची सभा लोकप्रतिनिधींच्या सभेपेक्षा राजाच्या तंत्राने जास्त चालणारी असते, असे आपल्याला दिसून येईल.

ज्या कारणामुळे मध्यवर्गातील लोकांचे राजावरील प्रेम जास्त वाढले त्याच कारणामुळे

लोकप्रतिनिधींची सभा राज्यकर्त्यांच्या मागण्यास अनुकूल झाली. लोकप्रतिनिधींच्या सभेवर आपले वजन राहावे म्हणून ट्यूडर घराण्यातील राजांनी पुष्कळ प्रयत्न केले. कोणकोणत्या सनदी शहरांनी पार्लमेंट सभेस प्रतिनिधी पाठवावेत हे नक्की करण्याचा अधिकार नेहमी खास राजाकडे असे. सहाव्या एडवर्ड, मेरी आणि एलिझाबेथ या राज्यकर्त्यांनी कारकीर्दीत कमीत कमी साठ गावांना हा अधिकार नवीन देण्यात आला होता. या नव्या शहरांपैकी काही शहरे प्रतिनिधी पाठविण्यास बरीचशी योग्य होती, बाकीची बहुतेक ठिकाणे अगदीच क्षुल्लक होती. आपल्या धोरणाच्या तंत्राने चालणारे लोक पार्लमेंट सभेत असावेत या हेतूने राज्यकर्त्यांनी ही गावे नक्की केली होती. सन १८३२ साली रिफॉर्म ॲक्ट अमलात आल्यामुळे ज्या प्रतिनिधानाच्या संबंधाने अतिशय विलक्षण गोष्टी उघडकीस आल्या त्यापैकी काही लोकसंख्येच्या स्थलांतरामुळे व काही ट्यूडर घराण्यातील राजांच्या निःशंक वर्तनसरणीमुळे घडून आल्या होत्या.

दुसऱ्या बाजूने पाहू गेले तर आठव्या हेन्रीने वेल्स प्रांतातील कौंटी, मॉन्मथ या कौंटीसह नक्की करण्याचे काम पुरे केले आणि या सर्व कौंटीस व चेशायर या कौंटीस पार्लमेंट सभेस प्रतिनिधी पाठविण्याची सूट दिली. लोकप्रतिनिधींची सभा आठव्या हेन्रीच्याही विरुद्ध कधी कधी जाण्याचे धैर्य करीत असे; पण या सभेचा चिरडखोरपणा जो पुढे स्ट्युअर्ट घराण्यातील राजास इतका हानिकारक झाला, तो एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीच्या अखेरी अखेरीसही ही सभा दाखवू लागली.

ट्यूडर घराण्यातील राजे राज्य करीत असता कर बसविण्याच्या कामावर पार्लमेंट सभेचा दावा : ट्यूडर घराण्यातील राजांनी किंवा त्यांच्या प्रधानांनी पार्लमेंट सभेलाच फक्त कर बसविण्याचा हक्क आहे याविषयी कधीही तक्रार केली नाही; परंतु या तत्त्वाला अनुसरून राहिल्यामुळे पार्लमेंट सभेवर जे त्यांना अवलंबून राहणे भाग पडे तेवढे टाळण्यासाठी त्यांनी नाना तऱ्हेचे उपाय योजावयाची सुरुवात केली. सातव्या हेन्रीने राजाचे पारंपरिक जे हक्क होते, मग ते कितीही लुप्त झालेले जरी असले तरी ते सख्त रीतीने अमलात आणून व बेकायदेशीर लोकांस मोठमोठे दंड करून अशाच प्रकारच्या दुसऱ्या पण खरोखर बेकायदेशीर नव्हे अशा उपायांनी - पैसा वसूल केला. लढाईपासून दूर राहून व खूप काटकसर करून त्याने आपला खर्च चालविला, एवढेच नाही; पण त्याने पुष्कळ पैशाचा संग्रह करून ठेविला.

आठवा हेन्री उधळ्या होता, त्याने थोड्याच वर्षांत बापाने साठवून ठेवलेला सर्व पैसा उडवून टाकला. सन १५२३ मध्ये वूल्सीने लोकप्रतिनिधींच्या सभेजवळ मोठ्या अशा ८,००,००० पौंडांची मागणी केली. पुष्कळ हो ना झाल्यावर त्यांनी त्याला बरीच लहानशी रक्कम ४ वर्षांच्या मुदतीने देण्याचे कबूल केले; पण त्याने ही सर्व रक्कम एकदम देण्याचे कर भरणारास भाग पाडले. सन १५२२ आणि सन १५२५ मध्ये वूल्सीने यापेक्षाही जास्त

धाडसाचा उपाय योजिला. प्रत्येक मनुष्याजवळच्या एकंदर मालमिळकतीची काय किंमत आहे. हे शपथेवर सांगितलेले लिहून घेण्यासाठी व किमतीप्रमाणे जो कर बसविला असेल तो वसूल करण्यासाठी त्याने मुखत्यार नेमले; परंतु दुसऱ्या खेपेस लोकांनी उघडपणे बंड केले. त्यामुळे राजाला आपली मागणी परत घ्यावी लागली व त्यास त्याच्या अधिकाऱ्यांच्या विरुद्ध ज्या लोकांनी वर्तन केले होते त्यास माफी द्यावी लागली.

त्याला बेनीव्होलेन्सेस किंवा श्रीमंत लोकांनी आपण होऊन वरपांगी दिलेल्या देणग्या वसूल करण्याच्या कामात जास्त यश आले. या बेनीव्होलेन्सेस घेण्याची रीत चौथ्या एडवर्डने पाडली होती; पण हे असे करणे तिसऱ्या रिचर्डच्या एका कायद्याने गैर ठरले गेले होते. रिचर्ड हा कायदेशीर राजा नसून त्याने गादी बळकाविली होती, या सबबीने ट्यूडर घराण्यातील राजघराणे कायदा रद्द आहे असे मानीत असत. सातवा हेन्री कधी कधी बेनेहोलर्स हा कर मागत असे; पण आठवा हेन्री वारंवार मागत असे. जो कोणी हे देण्यास नाकबूल करीत त्यास प्रिव्हीकौन्सिलासमोर बोलावून आणून धमकी देण्यात येत असे. इतके करूनही जर त्यांनी आपला हेका सोडला नाही, तर त्यास कैदेत घालीत किंवा साध्या शिपायाप्रमाणे चाकरी करावयास लावीत असत.

आठव्या हेन्रीला बळजबरीने लोकांपासून पैसे उसने घेण्यावरही अवलंबून राहावे लागत असे. आठव्या हेन्रीने दोन वेळा पार्लमेंट सभेकडून कायदा करून घेऊन आपल्याला कर्जमुक्त करून घेतल्यामुळे या पैसे उसने देणारे लोकांची स्थिती जास्त संकटाची झाली. दुसऱ्या वेळच्या कायद्याने तर राजाने आपल्या सावकारास काही पैसे दिले असले तर ते त्या सावकाराने त्यास परत दिले पाहिजेत इतकेही ठरवून दिले होते. एलिझाबेथ कधी कधी बळजबरीने व्याजी पैसे घेत असे; पण ती मुद्दल परत करी व व्याजाच्याऐवजी आपल्या सावकारास एखादी नाईटची (सरदाराची) पदवी देई किंवा त्याशी गोडगोड बोलत असे.

प्रत्यक्ष कर बसविण्याच्या कामी पार्लमेंट सभेच्या संमतीची जशी खास जरूर असे तशी आयात मालावर जकात बसविण्याच्या कामी तिची तितकी स्पष्ट आवश्यकता नसे. राजकर्त्यांपासून बळजबरीने कर बसविण्याचा हक्क ज्या महत्त्वाच्या कायद्यांनी काढून घेतला होता त्या कायद्यांची शब्दरचना जरी तशी नव्हती तरी त्याचा खरोखर भावार्थ पाहिला तर राजे लोकांना प्रत्यक्षच नव्हे; पण अप्रत्यक्ष रीतीने देखील कर बसविण्याची त्यांनी बंदी केली होती; काही अप्रत्यक्ष करांविषयी व मुख्यत्वेकरून लोकरीवरील कराविषयी बंदोबस्त करण्यात आला होता व काही कायद्याने काढून टाकण्यात आले होते, ही गोष्ट खरी आहे, मालावरील सर्व जकाती उदिमाचे मुख्य जिन्नस (लोकर, मेंढरांची कातडी, कमावलेली कातडी व कथील) जेव्हा बाहेर पाठविण्यात येत असत तेव्हा त्याजवर जी जकात घेण्यात येत असे ती जकात, परदेशांतून इंग्लंडमध्ये जे मद्य येत असे त्या मद्याच्या प्रत्येक टनावरील जकात व दुसरा जो सर्व माल परदेशांतून येत असे त्या मालाच्या किमतीवर जी टक्केवारीने

वजनावर जकात घेण्यात येत असे ती जकात (पौडेज), याप्रमाणे सर्व जकाती कायदा करून राजाला देण्याचा प्रघात पार्लमेंट सभेने १४ व्या व १५ व्या शतकात पाडिला होता, ही गोष्ट खरी आहे; परंतु त्या वेळेस पार्लमेंट सभेच्या संमत्तीशिवाय राजाने कोणतीही जकात बसवू नये, असा कोणत्याही कायद्यात स्पष्ट उल्लेख केलेला आढळून येत नाही; ज्या कायद्यांनी कर बसविण्याविषयी राजाची सत्ता मर्यादित करण्यात आली होती त्या कायद्यांचा अर्थ अलीकडेदेखील जितक्या सूक्ष्मरीतीने करवेल तितक्या सूक्ष्मरीतीने करण्यात येत असे. हरत-हेने चुकविण्याचा यत्न करूनही जो टाळता येणार नाही अशीच कडक रीतीने ज्याची शब्दरचना झाली आहे, अशा तऱ्हेच्या शब्दांनी जे हक्क काढून घेतले नाहीत. त्याशिवाय प्रत्येक हक्क राजाला आहे, असे मानीत असत. शिवाय इंग्लंडशी परदेशांचा जो व्यापार होता त्यासंबंधात राजाला काही विशेष हक्क आहेत असे वकील म्हणत असत व पार्लमेंट सभाही त्यासंबंधाने आपली अमान्यता दाखवीत नसे. बंदरांवर राजाचे स्वामित्व असे, त्याला ती व्यापारासाठी खुली ठेविता येत असत व वाटेल तेव्हा बंदही करिता येत असत. मग बंदरांतून काही प्रकारचा माल येऊ देण्याबद्दल आपण काही मोबदला का बरे मागू नये? अशाच विचाराने मेरीने परदेशातून येणाऱ्या कापडावर दस्त बसविला आणि एलिझाबेथने गोड मद्यावर बसविला; पण मागचापुढचा विचार करून ट्यूडर राजांनी असे दस्त पुष्कळ बसविले नाहीत.

जप्त्या : हे राजे राज्य करीत असता जप्त्यांपासून पुष्कळ उत्पन्न होत असे. सातव्या हेन्रीला देशातील लढाईतून बाकी राहिलेला ऐवज सगळा टिपावयास सापडला होता. आठव्या हेन्रीला मठातून मिळालेली लूट व राजद्रोहाच्या कायद्यास बळी पडलेल्या लोकांची मिळकत सापडली होती. सहाव्या एडवर्डने सनदी मंडळयांस ज्या जमिनी वगैरे स्वास्थ्याकरिता दिलेल्या होत्या त्यापैकी काही तरी जप्त केल्या होत्याच. याप्रमाणे जी संपत्ती अनायासे मिळाली होती ती बहुतेक त्यांनी उडवून टाकली. तथापि, ट्यूडर घराण्यातील राजांना हे आणि अशीच दुसरी पैसे मिळविण्याची वर सांगितलेली साधने असल्यामुळे कायद्याप्रमाणे व शिरस्त्याप्रमाणे जितके लवकर पार्लमेंट सभा भरविण्याचे ठरविले होते. त्याजपेक्षा उशिराने भरविता येत असे. सातव्या हेन्रीने आपल्या कारकीर्दीच्या शेवटील पाच वर्षांत पार्लमेंट सभा मुळीच भरविली नाही. आठव्या हेन्रीने इ.स. १५२३-१५२९ पर्यंत पार्लमेंट सभेशिवायच राज्य केले. एलिझाबेथ राणीनेदेखील एकदा पार्लमेंट सभा भरविल्याशिवाय पाच वर्षे जाऊ दिली.

ट्यूडर घराण्यातील राजे राज्य करीत असता कायदे करण्याच्या कामावर पार्लमेंट सभेचा दाब : पार्लमेंट सभेच्या सल्ल्याशिवाय राजाला कायदा करीता येत नाही हे तत्त्व प्लॅन्टेजेनेट घराणे राज्य करीत असता इतके पक्के रूढ होऊन राहिले होते, की ट्यूडर घराण्यातील राजांना त्याजविषयी शंका घेण्यास जागाच राहिली नव्हती. हुकमतीचे

कायदे करून प्रसिद्ध करण्याचा जो हक्क ट्यूडर घराण्याच्या अगोदर होऊन गेलेल्या राजांना होता तो अमलात आणून जितका त्याचा उपयोग करीता आला तितका त्याचा उपयोग या घराण्यातील राजांनी केला. राजाच्या जाहीरनाम्याला कायद्याप्रमाणे मानण्यात यावे, अशा अर्थाचा एक कायदा आठव्या ने पार्लमेंटकडून इ.स. १५३९ मध्ये मंजूर करून घेतला; पण या अशा जाहीरनाम्याच्या रूपाच्या कायद्याने सर्वसाधारण कायद्याला किंवा एखाद्या मनुष्याच्या जात स्वातंत्र्याला किंवा त्यांच्या मालमिळकतीवरील हक्काला बाध येऊ नये. असे या कायद्याने ठरविण्यात आले होते. सहावा एडवर्ड गादीवर बसल्याबरोबर हा कायदा रद्द करण्यात आला होता; परंतु या राजाच्या प्रधानांनी देवळातील संस्कार, खाण्यापिण्याच्या जिनसांचे भाव, वगैरे सार्वजनिक हिताच्या बाबतींसंबंधी पुष्कळ जाहीरनामे प्रसिद्ध केले. खोटी बातमी पसरवणाऱ्या लोकांस जस्टिस ऑफ दी पीस या नावाच्या न्यायाधीशांनी पकडून त्यास गलबतात गुलामाप्रमाणे वल्हविण्याची शिक्षा द्यावी, असे एका जाहीरनाम्याने ठरविण्यात आले होते. या जाहीरनाम्यापेक्षाही अधिक जुलमाचा जाहीरनामा मेरी राणीने आपल्या कारकीर्दीच्या शेवटल्या वर्षी प्रसिद्ध केला होता. या जाहीरनाम्याने ज्या ज्या लोकांच्या संग्रहास पाखंडी मताची व बंडाव्याची पुस्तके सापडतील, त्या सर्व इसमांस काही एक न्याय न करीता एकदम देहान्तशिक्षा देण्यात येईल, अशी धमकी देण्यात आली होती. एलिझाबेथ राणीने दंगे करणाऱ्यास व रिकामटेकडेपणे फिरणाऱ्यास देहान्तशिक्षा देण्यात येईल, अशा धमकीचे जाहीरनामे काढिले होते. हा जाहीरनामा लोकांस भिवविण्याच्या हेतूने प्रसिद्ध केला असावा असे वाटते. कारण या जाहीरनाम्याप्रमाणे खरोखर किती लोकांस शिक्षा झाली याचा कोठे उल्लेख आढळून येत नाही; परंतु असे हे जाहीरनाम्याच्या स्वरूपाचे कायदे करण्याचा हक्क म्हटला म्हणजे नियमित एकसत्तात्मक राज्यव्यवस्थेच्या अगदी विरुद्ध आहे. कारण जर एखादा राजा आपल्या अपराधी प्रजाजनास त्याच्या अपराध देहान्तशिक्षेला योग्य नसताही कायद्याप्रमाणे चौकशी केल्याशिवाय देहान्तशिक्षा देण्याची भीती घालील तर तो राजा अनिर्बंध शासन करणाऱ्या राजांच्या अगदी जवळच्या पंक्तीत जाऊन बसतो आहे, असे म्हटल्यास चालेल.

जे हुकमतीचे कायदे १५८५ मध्ये प्रसिद्ध झाले आहेत ते पाहिले असता या अशा प्रकारच्या बेकायदेशीर कायदेबंदीचे ढळढळीत उदाहरण दृष्टीस पडेल. या कायद्याप्रमाणे छापखानेवाल्यांना आपला धंदा फक्त लंडन शहरात व दोन्ही* युनिव्हर्सिट्यांच्या ठिकाणी मात्र करण्याची परवानगी होती. ज्याला आपला धंदा करू लागून सहा महिने झाले नसतील त्याने पुढे धंदा चालवू नये व या धंदेवाल्यांची संख्या अतिशय वाढली असल्यामुळे त्यांची संख्या कॅन्टरबरीच्या आर्चबिशपाच्या व लंडनच्या बिशपाच्या मताप्रमाणे मर्यादित झाली आहे असे ठरल्याशिवाय कोणीही नव्या मनुष्याने हा धंदा करण्यास लागू नये, असेही या

* केम्ब्रिज व ऑक्सफर्ड.

कायद्याने ठरविण्यात आले होते. या कायद्यान्वये प्रत्येक छापखान्यावाल्याने आपल्या जवळ छापखान्याची यंत्रे किती आहेत हे स्टेशनर्स कंपनीला जाहीर करणे भाग होते व कॅन्टरबरीचा आर्चबिशप व लंडनचा बिशप यांनी पसंत केल्याशिवाय कोणतेही पुस्तक त्यांनी छापून प्रसिद्ध करू नये, असेही ठरविले होते. या कायद्याविरुद्ध आचरण करणारास कैदेची शिक्षा देण्याचे ठरले होते. इंग्लंडमध्ये छापखान्याचे स्वातंत्र्य कधीही कबूल करण्यात आले नव्हते; परंतु या स्वातंत्र्यप्रतिबंधाची पहिली कलमबंदी म्हणजे इ.स. १५८५ मध्ये प्रसिद्ध झालेले हुकमतीचे कायदे हे होत.

ट्यूडर घराणे राज्य करीत असता पार्लमेंट सभेच्या संबंधाने प्रधानांची जबाबदारी : ट्यूडर घराणे राज्य करीत असता राजाचे प्रधान राजाशिवाय आपल्या कृत्याबद्दल दुसऱ्या कोणास खरोखर जबाबदार होते, असे म्हणता येणार नाही. प्लॅन्टेजेनेट राजे राज्य करीत असता लेंटीमर किंवा सफक व स्ट्युअर्ट राज्य करीत असता बेकन आणि स्टॅफर्ड या मोठमोठ्या अपराध्यांवर ज्या पार्लमेंट सभेने फिर्यादी केल्या होत्या तशा फिर्यादी ट्यूडर राजे राज्य करीत असता व्यवहारात लोकांस माहीत नव्हत्या; परंतु प्रधानांना राज्यकर्त्यांस पूर्वीपेक्षाही फार कडक रीतीने आपल्या कामाचा जाब देणे भाग पडत असे. मध्ययुगातील इंग्लंडचे राजे मर्जीतून उतरलेल्या प्रधानास शिक्षा त्याचा अधिकार व पैसा काढून घेण्याच्या पलीकडे क्वचितच अधिक करीत असत; परंतु आठव्या हेन्रीचा तरी राग घातक असे; त्याचा एकटा रागच भयंकर होता असे नाही; त्याचा कितीही विश्वासू नोकर असला तरी तो लोकांस आवडेनासा होऊ लागताच त्यास तो सोडून देत असे. कोणीही नोकराने सरकारी नोकरी करीत असता व सरकारच्या हितासाठी काही काम करीत असता तरी काम केल्याबद्दल त्यास शिक्षा करण्यास तो पार्लमेंट सभेला उत्तेजन देऊन लोकप्रियता मिळविण्याचा यत्न करीत असे. त्याने आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभी त्याच्या बापाने जे जुलमाने पैसे काढले होते त्या कामातले त्याचे हस्तके जे एंपसन आणि डड्ले यास एका असमंजसपणाच्या राजद्रोहाच्या दोषारोपावरून खुशाल गुन्हेगार ठरवू दिले. त्याचप्रमाणे ज्या वूल्सीने राजाची सत्ता इंग्लंडमध्ये व इंग्लंडबाहेरदेखील वाढावी म्हणून आस्थापूर्वक इतके श्रम घेतले त्या वूल्सीवर फिर्याद व्हावी म्हणून त्याने पार्लमेंट सभेस चिथवले. याचप्रमाणे मठ मोडून टाकण्याच्या व आपले धर्मखात्यात वर्चस्व स्थापन करण्याच्या कामी क्रॉमवेलचा उपयोग करून घेऊन त्याला कॅथलिक पक्षाच्या सुडास खुशाल बळी पडू दिले. याच धोरणाने वागून त्याने सत्ता आपल्या हातात राखली व त्या सत्तेचा दुरुपयोग केल्याचे अपयश खुशाल दुसऱ्यास सहन करावयास लागू दिले. त्याच्या कारकीर्दीत जे मोठमोठ्या लोकांवर खटले झाले त्या सर्वांस खरोखर कारण तोच होता; ज्या मनुष्यांचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा असे त्यांचाच नाश करण्याचे धैर्य पार्लमेंट सभा करीत असे. सहाव्या एडवर्डच्या कारकीर्दीत राजरक्षकास जे मरण प्राप्त झाले होते ते पार्लमेंट सभेच्या हाताने नव्हे; पण त्याच्याच प्रतिस्पर्ध्याच्या

हाताने आले होते. एलिझाबेथने आपले प्रधान इतक्या दूरदर्शीपणाने पसंत केले होते की, ते कधीही सार्वजनिक द्वेषास पात्र झाले नाहीत आणि म्हणूनच तिला त्यांना लोकमतास बळी द्यावे लागले नाही. तिने काम करून करून थकलेल्या व लोकांस आवडेनासा झालेल्या प्रधानाचा नाश करण्यास पार्लमेंट सभेला कधीही उत्तेजन दिले नाही व आपण जे जे करतो त्याजबद्दल आपल्याला फक्त एका राणीलाच जबाब द्यावयाचा आहे हेही तिने त्यास कधी विसरू दिले नाही.

ट्यूडर घराणे राज्य करीत असता हुकमतीचे शासन कोणाकडे होते : प्राचीन काळी पार्लमेंट सभेने इंग्लंडच्या राजास ज्या नियमनात ठेवले होते त्या नियमनातून सुटण्याचा त्यांचा यत्न कितपत सिद्धीस गेला हे वर दाखविण्यात आले आहे. आता हा हुकमतीचे शासनाचा अधिकार या राजाच्या हातात आल्यावर इतका जबरदस्त व वाटेल तसा वाकणारा कसा झाला या गोष्टीचे कारण शोधून काढणे बाकी आहे. राजाच्या हुकुमाखाली हुकमतीचे शासन मुख्यत्वे प्रिव्हिकौन्सिल करीत असे. ट्यूडर घराण्यातील राजे राज्य करीत असता जे प्रिव्हिकौन्सिल अस्तित्वात होते त्याचा पत्ता जर लावावयास लागले तर त्याची उत्पत्ती प्लॅन्टेजेनेट घराण्याच्या जे अगोदरचे राजे झाले त्यांच्यावेळेस जे कौन्सिल होते त्याजपासून आहे, असे आढळून येईल, परंतु काही फार महत्त्वाच्या बाबतीत त्या कौन्सिलात व या प्रिव्हिकौन्सिलात भेद होता.

नॉर्मन विजय झाल्यापासून इंग्लंडचे राजे एका कायमच्या कौन्सिलाच्या मंत्रिमंडळाच्या मदतीने आपले राज्य चालवीत असत. या सभेमध्ये राज्यातील मोठाले अधिकारी व राजाच्या खानगीकडील अधिकारी व ज्याच्यावर राजाचा विश्वास असे, असे लोक असत हे वर येऊन गेले आहेच. या सभेला सर्व प्रकारची कामे करण्याचा अधिकार असे. तथापि, कधी कधी कायदे करण्यासाठी किंवा कर बसविण्यासाठी ही सभा मुख्य कुळांच्या मोठ्या सभेत किंवा बॅरन लोकांच्या सभेत तरी मिळवून टाकीत असत. सुधारणा जसजशी वाढू लागली तसतशा नॉर्मन राजांच्या वेळच्या जुन्या क्युरिआरेजिस सभेच्या विशेष कामांचा हवाला घेण्यासाठी नव्या नव्या सभा अस्तित्वात येऊ लागल्या. तेराव्या शतकात कॉमन लॉच्या न्यायसभा आणि चौदाव्या शतकात चॅन्सरीची न्यायसभा, या कौन्सिलाहून अगदी निराळ्या पडल्या व त्या साधारण न्यायासंबंधी सर्व कामे करू लागल्या.

याच सुमारास इंग्लिश पार्लमेंट सभेस स्वरूप प्राप्त झाले व तीस वर सांगितलेल्या मोठमोठ्या कौन्सिलाच्या हाती असलेले कर बसविण्यासंबंधी व कायदे करण्यासंबंधी अधिकार प्राप्त झाले. जेव्हा हे फेरबदल पुरे झाले तेव्हा प्राचीन काळापासून असलेली क्युरिआरेजिस ही सभा नाहीशी झाली, असे म्हटल्यास चालेल; परंतु राजा हा अजूनही हुकमतीच्या शासनाचा मुख्याधिकारी असे व अजूनही त्याला मदत व सल्ल्याची जरूर ही लागतच असे. याप्रमाणे पंधराव्या शतकातदेखील राज्यातील मोठमोठे अधिकारी, काही बॅरन

व काही धर्मोपदेशक, यांचे बनलेले, एक राजमंडळ आपणास आढळून येते. हल्ली प्रधान मंडळाकडे जी कामे आहेत त्यापैकी पुष्कळ कामे ही सभा करीत असे. ही सभा अजूनही बॅरन लोकांच्या सर्वसाधारण सभेत वेळोवेळी मिसळलेली आपल्या दृष्टिस पडते; परंतु ही अशी सभा काही कठीण प्रसंग आला असता तो टाळण्याचा विशेष उपाय म्हणून आता भरविण्यात येत असे. नेहमीचा रिवाज म्हटला म्हणजे राज्यनियमन करण्याचा अधिकार हा कौन्सिलकडेच होता. त्याची सत्ता इतकी जबरदस्त होती, की ती कमी करण्यासाठी पार्लमेंट सभेने या मंत्रिमंडळाचे सभासद नेमण्याचे काम आपल्या हाती घेऊन त्यास शपथ घेण्याचे भाग पाडून, त्यांना पगार देण्याचे कबूल करून, त्यांची काम करण्याची पद्धत नक्की करून देऊन व अशाच तऱ्हेचे पुष्कळ उपाय योजून ते आपल्या ताब्यात आणण्याचे सारखे प्रयत्न चालविले होते.

पंधराव्या शतकातील कागदपत्रांत पहिल्याने प्रिव्हीकौन्सिल हा शब्द आढळून येतो; परंतु लॅंकॅस्टर घराण्यातील राजे राज्य करीत असता जे प्रिव्हीकौन्सिल होते व ट्यूडर घराणे राज्य करीत असता जे प्रिव्हीकौन्सिल होते ते व हे अगदी निरनिराळी होती. त्याच्यावर मागे सांगितल्याप्रमाणे पार्लमेंट सभेचा पुष्कळ तऱ्हेने दाब असे इतकेच नव्हे तर ते बड्या लोकांचे व बिशपांचेच बहुतेक बनलेले असे. हे लोक स्वतः बलवान असल्यामुळे केवळ राजाच्या मनाप्रमाणे चालून त्याचे हस्तक बनून राहणारे नसत. याप्रमाणे पुष्कळ वेळा ते आपले स्वतंत्र मत प्रदर्शित करीत आणि त्यामुळे राजाच्या सत्तेवर त्यांचा एक प्रकारचा दाब पडत असे. 'वॉर्स ऑफ दी रोझेस्' समाप्त झाल्यावर त्यांचे स्वातंत्र्य नष्ट झाले. पार्लमेंट सभेने कौन्सिलच्या कामात हात घालणे सोडून दिले. कारण कौन्सिलमध्ये राजाची सत्ता आता पूर्णपणे स्थापन झाली होती. आता स्वतःच्या मताप्रमाणे चालण्याइतके या कौन्सिलच्या सभासद समर्थ नव्हते. मठ मोडून टाकल्यानंतर (प्रिव्हीकौन्सिलमध्ये) फार थोडे धर्मोपदेशक असत. या सभेत बरेच गृहस्थ बडे लोक असत; पण त्यांना मध्ययुगातील बॅरन लोकांना जी स्वतंत्रता होती ती आता नव्हती. या कौन्सिलमध्ये चॅन्सेलर व ट्रेझरर हे असत; पण त्यांचे वजन सेक्रेटरीपेक्षाही कमी असे. पूर्वी सेक्रेटरी हा एक वरच्या दर्जाचा कारकून असे; परंतु आता तो सर्व मंत्र्यांमध्ये अत्यंत विश्वासपात्र व सत्तावान बनून राहिला होता. हा अधिकारी नेहमी लोकप्रतिनिधींपैकी एक बुद्धिवान व महत्त्वाकांक्षी इसम असे. त्याची इच्छा आपणास सधन बनवून घेण्याची असे व तसे आपल्यास राजाचीच फक्त मर्जी संपादन केल्याने होता येईल, अशी त्याची खात्री असे. रोमची सत्ता निर्मूल करणारा क्रॉम्बेल व स्पेनची सत्ता आपल्या ताब्यात आणणारा जो सेसील हे दोघेही सेक्रेटरीच्याच हुद्यावर होते.

राजा हा नेहमी प्रिव्हीकौन्सिलमध्ये अध्यक्षत्व पत्करीत नसे; पण ज्यावेळी काही महत्त्वाचे काम या सभेत चालत असे तेव्हा मात्र तो या सभेत येत असे. कौन्सिलमध्ये त्याची सत्ता अनिर्बंध असे. प्रिव्हीकौन्सिलातील सभासद अत्यंत विरुद्ध पक्षाचे जरी असले

किंवा त्यांचे एकमेकांशी कितीही जातवैर असले तरी ते राजाचे बंदे गुलाम असत. हल्ली जे काम कॅबिनेटमध्ये चालते ते सर्व काम त्यावेळी प्रिव्हीकौन्सिलमध्ये होत असे. दोहोपैकी प्रत्येक सभेत कायद्याचे कोणते मसुदे आणावयाचे, किती पैशाची मागणी करावयाची व राज्यकारभार कोणत्या धोरणाने चालवावयाचा ही सर्व कामे हे कौन्सिल नक्की करीत असे. ते राज्यातील सर्व लहानसहान अधिकाऱ्यांवर पक्की नजर ठेवीत असे. वकिलांस व सेनाधिपतीस हेच हुकूम सोडीत असे. ते न्यायसभेचेही काम करीत असे; परंतु न्यायसभा या नात्याने ते काय काम करीत असे त्याचे वर्णन यानंतर करणे सोईचे पडेल.

प्रिव्हीकौन्सिलचे न्यायसभा या नात्याने काम : राजा हे न्यायाचे मूळ आहे हे तत्त्व इंग्लंडमधील राज्यकारभार व्यवस्थेसंबंधाने सर्व कालमान्य होत आले आहे. सर्व न्यायसभांस राजापासून सत्ता प्राप्त झाली आहे. जर कोणाला काही अन्याय होत असेल व त्यास न्याय देण्याचे कोणत्याही न्यायसभेचे हाती नसेल, तर त्याला राजाकडून हर तऱ्हेचे न्याय मिळण्याची तजवीज होईल, अशी लोक आशा करीत असत. उदाहरणार्थ, जेव्हा कॉमनलॉ न्यायसभांनी सांकेतिक नियमांनी आपणास इतके जखड बांधून घेतले, की त्यांच्यानी काही अन्यायाचे परिमार्जन होईनासे झाले, तेव्हा ज्या पक्षकारांना अन्याय झाला होता त्यांनी चॅन्सेलरास याबाबतीत अर्ज केला व त्यावरून कोर्ट ऑफ चॅन्सरी ही सभा स्थापन झाली. राजापाशी नेहमी न्यायासंबंधी काहीतरी सत्तेचा साठा ठेविलेला असे. ट्यूडर घराण्यातील राजे गादीवर बसण्याच्या पूर्वीही या सत्तेचा उपयोग कौन्सिल द्वारे राजेलोक कधी कधी करीत असत; परंतु ट्यूडर घराण्यातील राजे गादीवर असता प्रिव्हीकौन्सिल हे सर्व राज्यात अत्यंत सत्ताधारी न्यायसभा होऊन बसले.

प्रिव्हिकौन्सिल हे न्यायसभा या नात्याने इतके सोईस्कर कसे झाले : सर्व सभांपेक्षा प्रिव्हिकौन्सिल हे इतके सोईस्कर होण्याचे कारण त्याजपाशी जी जबरदस्त सत्ता असे हे होय. हे कौन्सिल न्यायसभा म्हणून जे निवाडे करीत असे ते निवाडे अमलात आणण्याच्या कामी त्यांच्या अंगी सरकार या नात्याने जी सर्व राजसत्ता असे तिचा ते उपयोग करीत असे. साधारण न्यायसभांना ज्या अपराध्यांवर आपला अंमल बसविता येत नसे तशा अपराध्यास हे बळजोरीने आपल्या ताब्यात आणीत असे. जरी राजाचे न्यायाधीश फार दिवसांपासून सर्व देशभर न्याय देण्याचे काम करीत असत तरी त्यावेळी कायद्याची अंमलबजावणी आपल्याच हाती बुचाडून घेण्याची ज्यांना सवय लागली होती असे बडे लोक व गृहस्थ इंग्लंडमध्ये पुष्कळ होते. या लोकांना फिर्यादी, साक्षी, पंच हे सर्व थरथर भीत असत. या गृहस्थांच्या विरुद्ध जर कोणी चुकून माकून निवाडा केला तर हे लोक त्याला जुमानण्यासारखे नसत. या अशा दांडग्या व बेकायदेशीरपणाचे वर्तन करणाऱ्या लोकांना ताळ्यावर आणण्यास ट्यूडर घराण्यातील राजांनी निश्चय केला होता व त्यांनी कौन्सिलपुढे या अशा लोकांना बोलावून आणून व त्यास कैदेच्या व दंडाच्या शिक्षा ठोकून वाटेवर आणले.

दोषारोप ज्या मनुष्यावर झालेला आहे अशा मनुष्याचे रक्षण ज्या व्यवहाराच्या नियमांनी

होत असे ते नियम न्यायसभा म्हणून या कौन्सिलास लागू नसत हा एक दुसरा फायदा असे. कॉमनलॉ ज्या न्यायसभांत चालत असे तशा न्यायसभांत प्रतिवादीला आपल्या स्वतःस अपराधी म्हणवून घेण्याचे भाग पाडता येत नसे. कौन्सिल हे प्रतिवादीस प्रश्न करी व त्याने उत्तर न दिल्यास ते त्यास कैदेत टाकी. पुरावा मिळण्यासाठी कॉमनलॉ न्यायसभेत कोणाचे हाल करीत नसत. राज्याच्या सुरक्षितपणास ज्या कामात धोका येईल असे कौन्सिलला वाटे तशा कामात ते कधी कधी लोकांचे हालहालही करीत असे. कॉमनलॉच्या न्यायसभेत कोणास शिक्षा देणे झाले तर सर्व पंचांचे एकमत झाल्यास तसे करीत असत; परंतु कौन्सिलमध्ये फक्त बहुमताने कोणास अपराधी किंवा निरपराधी ठरविता येत असे किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रश्नाचा निकाल लावता येत असे.

कौन्सिल हे राजकर्त्यांच्या पूर्णपणे कह्यात असे, हा तिसरा व सर्वांत मोठा फायदा असे. पुष्कळ वेळा न्यायाधीशदेखील राजा सांगेल तसे वागणारे असत; परंतु त्यांच्या अधिकाराच्या संप्रदायाप्रमाणे व ज्या कॉमनलॉ* ला ते प्रायः पवित्र म्हणून मानीत असत व त्यातील सूत्रांनी ते काहीसे बांधलेले असत. राजाच्या मंत्र्यांच्या मनात कायद्याप्रमाणे वागण्यासंबंधाने कधी किंतुही येत नसे. ज्या धन्याने त्यांना उदयास आणले होते व ज्यास त्यांना पुन्ही नीच स्थितीत टाकण्याची शक्ती होती त्या आपल्या धन्यास ते खुश ठेवण्याविषयी नेहमी काळजी घेत असत, म्हणून ज्या मनुष्यावर राजाची गैरमर्जी असेल अशा मनुष्याला कौन्सिलाच्या तडाख्यातून सुटणे दुरापास्त होत असे.

कौन्सिलची सत्ता सर्व राज्यभर असे; पण अव्यवस्था जलद मोडता यावी म्हणून आठव्या हेन्रीने या कौन्सिलपेक्षा खालच्या पायरीच्या दोन शाखा स्थापन केल्या. एकीचे नाव उत्तरेकडील कौन्सिल व एकीचे नाव वेल्स प्रांताचे कौन्सिल. ज्याप्रमाणे राजमंत्रिमंडळ सर्व राज्यातील न्याय देण्याचे काम करीत असे त्याचप्रमाणे ही कौन्सिले आपापल्या हद्दीत न्याय देण्याचे काम करीत असत.

याप्रमाणे ट्यूडर घराण्यातील राजांनी जुन्या व कायदेशीर सभा बंद न करीता किंवा त्यांच्या कामाच्या पद्धतीत फेरफार न करीता आपल्या मर्जीविरुद्ध जाणाऱ्या इसमास चिरडून टाकण्याचे काम करणारे साधन शोधून काढले. प्रिव्हीकौन्सिल किंवा वस्तुतः त्यातील सभासदांची मंडळी, कोर्ट ऑफ स्टारचेंबर, उत्तरेकडील कौन्सिल व वेल्स देशातील कौन्सिल, या सर्वांस देहान्त शिक्षा करता येत नसे हे खरे; परंतु त्यास देहान्त शिक्षेखेरीज वाटेल ती शिक्षा देता येत असे. म्हणजे त्यांना दंड, फटके मारणे, हातपाय वगैरे अवयव

---

* लोकांच्या चालत आलेल्या रीतीभातीवरून न्यायसभांनी ठरवून दिलेली न्यायाची कलमे. हा कायदा विविक्षित मनुष्याने किंवा विविक्षित काळी तयार केलेला नाही. हा वेळोवेळी झालेल्या निवाड्यावरून त्यातील कलमे एकत्र करून आपोआप बनलेला आहे.

तोडणे किंवा अनियमित काळपर्यंत कैदेत टाकणे हे सर्व अधिकार असत. त्यांच्या हाती अशी काही सत्ता असे, की तिजविरुद्ध रयतेतील कोणालाही जाता येत नसे. त्यांची काम करण्याची पद्धत अशी काही असे, की तिजमुळे पुष्कळ वेळा निरपराध्याचा घात होत असे; पण अपराध्यास तीतून सुटण्याचा संभव कधीही नसे. राजाच्या मर्जीप्रमाणे वागण्याच्या कामात मागे-पुढे न पाहता व मनात काही किंतु न बाळगता चालण्यासाठी त्यांनी आपले तनमन अर्पण केले होते. धर्मक्रांतीच्या गोंधळातून ट्यूडर घराण्यातील राजांना आपली सत्ता जी राखता आली ती पुष्कळ अंशी याच न्यायसभांच्या योगाने.

स्थानिक वहिवाट : ट्यूडर घराण्यातील राजे राज्य करीत असता इंग्लंडमधील स्थानिक वहिवाटीला एक नवेच रूप आले. कौंटी आणि हंड्रेड यात ज्या पूर्वी न्यायसभा होत्या त्या कधीच मोडकळीस जाऊन पोहोचल्या होत्या. राजकीय न्यायसभांनी त्यांचे न्यायाचे काम हळूहळू शोषून घेतले होते. जमीनदारांची जसजशी हळूहळू फ्यूडल पद्धतीची लक्षणे नाहीशी होत गेली तसतसा त्यांच्या न्यायसभांचाही हास होत गेला. जे गुलाम होते ते जमिनीपासून वेगळे झालेले स्वतंत्र मनुष्य झाले व मेंढरांना चरण्यास जागा पाहिजे म्हणून या स्वतंत्र मनुष्यास हुसकून देण्यात आले. सुधारणेचे पाऊल पुढे पडत असल्यामुळे पूर्वीपेक्षाही आता स्थानिक वहिवाट कडक असण्याची जास्त जरूरी होती आणि म्हणून कौंटी आणि पॅरिश यात एक नवीन स्थानिक वहिवाट अमलात आणण्यात आली.

कौंटी : ट्यूडर घराण्यातील राजे राज्य करीत असता शेरीफ आणि कौंटीतील न्यायसभा यांच्याऐवजी लॉर्ड लेफ्टनंट व जस्टिस ऑफ दी पीस यांची स्थापना झाली.

तेराव्या व चौदाव्या शतकात शेरिफाची सत्ता नाहीशी होत गेली होती तरी पण त्यांच्याकडे राजाचे प्रतिनिधित्व व शायरमधील फौजेवरची मुख्यत्यारी ही असत. आठव्या हेन्रीच्या कारकीर्दीत नागरिक सैन्यावरील अधिकार कधी कधी खास नेमलेल्या लोकांना देण्यात येत असे. फिलिप आणि मेरी यांच्या कारकीर्दीत एका कायद्याने लॉर्ड लेफ्टनंट नामक हुद्याची जागा नवीन उत्पन्न करण्यात आली व त्याचवेळी हा घडत येणारा फेरफार पुरा झाला, असे म्हटल्यास चालेल. या अधिकाऱ्याकडे शायरमधील फौजेचा अधिकार असे आणि नागरिक सैन्यातील लोकांची जिम्मेदारीही त्याजवर असे. या वेळेपासून शेरिफांकडे मुख्य कामे म्हटली म्हणजे कौंटीत ॲसाईजचे काम करण्यासाठी जेव्हा राजाचे न्यायाधीश येत असत तेव्हा त्यांची बरदास्त ठेवणे,देहान्तशिक्षा देण्यासाठी लागणारी तजवीज करून देणे व ज्या वेळेस पार्लमेंट सभेत प्रतिनिधी पाठविण्याची वेळ येई तेव्हा ती सर्व व्यवस्था लावणे, एवढीच काय ती बाकी राहिली होती.

जस्टिस ऑफ दी पीस हा हुद्दा ट्यूडर घराण्यातील राजे गादीवर येण्याच्या अगोदरपासून अस्तित्वात होता. सन ११९५ मध्येदेखील आपापल्या कौंटीमध्ये शांतता ठेवण्याविषयी ज्यांनी शपथ घेतली आहे अशा सरदारांची नावे आढळली आहेत. तेराव्या शतकात

कॉन्झरवेटर ऑफ पीस (शांतिरक्षक) या नावाच्या अधिकाऱ्यांचा पुष्कळ वेळा उल्लेख केलेला आढळतो. तिसऱ्या एडवर्डच्या कारकीर्दीत ३४ व्या वर्षी एक कायदा अमलात आला होता. या कायद्याने कौंटीमध्ये शांतता राहावी म्हणून जस्टिस ऑफ दी पीस या नावाचे अधिकारी नेमण्याची व्यवस्था लावण्यात आली होती व त्यांनी घोर अपराध व हुकमावाचून गृहप्रवेश या अपराधांसंबंधी खटल्यांची चौकशी करून शिक्षा करावी, असे ठरविण्यात आले होते. ट्यूडर घराण्यातील राजे राज्य करीत असता कौंटीची व्यवस्था पाहण्याचे काम या जस्टिस नावाच्या अधिकाऱ्यांकडे असे. सन १८८८ मधील स्थानिक स्वराज्याचा कायदा अमलात येईपावेतो तो अधिकार त्यांच्याकडेच असे.

पॅरिश : पॅरिशची रचना बहुतेक अंशी ग्रामव्यवस्थेप्रमाणे केलेली असे, हे आपण मागे पाहिलेच आहे. ग्रामव्यवस्थेत असलेला स्वराज्याचा अधिकार मोडकळीस आलेला होता, तरी धर्मसंबंधी कामांसंबंधाने पॅरिशचे महत्त्व यावेळीदेखील कमी झालेले नव्हते. हल्लीपेक्षा पुष्कळ पटीने जास्त त्यावेळी लोक देऊळ या जागेसही शिक्षणाची जागा म्हणून, लोक एकत्र होण्याची जागा म्हणून व जेथे स्थानिक हित समावलेले आहे अशी जागा म्हणून व जेथे स्थानिक हित समावलेले आहे अशी जागा म्हणून, मान देत असत. पॅरिशचे लोक वेळोवेळी वर्गणी काढून देवळाची मरामत करीत असत व त्यास सुशोभित करीत असत व धर्मोपदेशकांबरोबर देवळांच्या इमल्याचे रक्षण करण्यासाठी चर्च वॉर्डन (देवळाचे दिम्मतदार) या नावाचे अधिकारी नेमीत असत. पॅरिश या संस्थेचे क्षेत्रफळ देशाचे जे भाग केलेले असत, त्या सर्वांत लहान असल्यामुळे, ही संस्था सरकारी वहिवाट चालविण्याच्या कामी ट्यूडर घराण्यातील राजे राज्य करीत असता, पसंत व्हावी हे साहजिक आहे. पॅरिशमध्ये राहणाऱ्या प्रत्येक कुटुंबनायकावर देवळाचा कर या नावाचा कर कायदेशीर रीतीने बसविलेला असे. आठव्या हेन्रीच्या कारकीर्दीत पुष्कळ कायदे करून पॅरिशकडे गरीब लोकांना मदत करण्याचे काम पहिल्याने सोपविण्यात आले होते. धर्मोपदेशक व चर्चवॉर्डन यांनी गरीब लोकांसाठी वर्गणी गोळा करावी व जे त्यांच्या सत्तेखालील धर्मसमाजातील लोक कृपण असतील त्यास वर्गणी देण्याविषयी उपदेश करावा, असे या कायद्यांनी ठरविण्यात आले होते. सन १६०१ मध्ये एलिझाबेथने जो गरीब लोकांसाठी महत्त्वाचा कायदा केला त्यात प्रत्येक पॅरिशात गरीब लोकांवर देखरेख करण्यासाठी दोन ओव्हरसीयर (देखरेख करणारे) नेमावे असे ठरविण्यात आले होते. त्यांनी लोकांवर वर्गणी बसवावी व जे पैसे गोळा होतील त्या पैशांद्वारे जे अशक्त व गरीब लोक असतील त्यांना मदत करावी व जे गरीब लोक काम करण्यासारखे सशक्त असतील त्यांना त्यांच्या कामास लागणारे साहित्य व हत्यारे घेऊन द्यावीत असेही या कायद्याने ठरविण्यात आले होते. फिलिप व मेरी यांच्या कारकीर्दीतील एका कायद्याने पॅरिशमध्ये असलेले रस्ते लोकांनी दुरुस्त ठेवावेत व त्यांची देखरेख करण्यासाठी एक सर्व्हेअर लोकांनी पसंत करून नेमावा, असे ठरविण्यात आले होते. याप्रमाणे ट्यूडर घराण्यातील

राजांच्या कारकीर्दीच्या अखेरीस स्थानिक वहिवाटीला जे स्वरूप प्राप्त झाले होते ते सन १८३४ मध्ये गरीब लोकांच्या संबंधाने असणाऱ्या कायद्यात जी सुधारणा करण्यात आली तेथपर्यंत कायम ठेवण्यात आले होते.

गावे : प्लॅन्टेजेनेट घराण्यातील शेवटील राजे राज्य करीत असता इंग्लंडमधील बहुतेक गावांतील लोकसंख्या व संपत्ती वाढली होती. काही बंदरे व काही कारखान्यांची गावे फारच भरभराटीस आली होती. ब्रिस्टल आणि नॉर्विच या शहरांत जी मोठमोठी व भव्य देवळे पंधराव्या शतकात बांधली गेली व जी अजून आहेत त्यावरून त्या शहरात त्या वेळेस किती संपत्ती होती त्याची साक्ष सहज पटण्यासारखी आहे: पण जसजशी शहरातील लोकसंख्या व संपत्ती वाढ लागली तसतशी तेथील कामाची व्यवस्था स्वतःच्या फायद्यापुरती व संकुचित धोरणाची अशी होत गेली. हा असा फेरफार का होत गेला याची कारणे स्पष्ट दिसत नाहीत. मोठमोठ्या विद्वान लेखकांनी या कारणांचा उल्लेख फार वेगवेगळ्या तऱ्हांनी केला आहे; परंतु हा फेरफार मात्र खरा झाला हे मत सर्वांचे आहे. पूर्वी नागरिक होणे फार सोपे होते. एखादा मनुष्य एखाद्या शहरात जाऊन राहिला व त्याने तेथील कर दिले म्हणजे नागरिक होण्यास अवश्य त्या गोष्टी त्याने केल्या असे मानीत असत; परंतु पंधराव्या शतकानंतर नागरिकांचे हक्क मिळविण्याच्या कामात नव्या नव्या अडचणी घालण्याची सुरुवात झाली. हे हक्क ज्याचे त्याचे जातहक्क होऊन बसले. हे हक्क नागरिकांच्या कुळात जन्म घेतल्याने किंवा ते विकत घेतल्याने किंवा त्याजबद्दल एखाद्याची फार दिवस शागिर्दी केल्याने, प्राप्त होत असत. यामुळे सनदी नागरिकांचे प्रमाण शहरात राहणाऱ्या सर्व लोकांच्या प्रमाणाच्या मानाने कमी होत चालले. या मंडळीतसुद्धा (नागरिकांचे ज्यांना हक्क होते अशा शहरवाशींच्या मंडळीतसुद्धा) सत्तेच्या वाटणीत फरक पडत चालला. ज्या गरीब मनुष्यास फुकट चाकरी करण्याचे आवडत नसे त्यांची अप्रीती व ज्या श्रीमंत शहरवाशींना सर्व सत्तेचा मक्ता आपल्याकडे असावा असे वाटत असे त्यांची महत्त्वाकांक्षा, या दोघींची सांगड पडली आणि म्हणून शहर सुधराईसंबंधी व्यवस्था लोकांच्या हाती असण्याचे बंद झाले. ही व्यवस्था जीत दुसऱ्यांचा प्रवेश होणे नाही अशा एका शहरमंडळीकडे सोपविण्यात आली. ही मंडळी श्रीमंत शहरवासी पसंत करून नेमीत असत किंवा ही मंडळी आपल्या स्वतःला पसंत करून पुन्हा पुन्हा भरत असे. ही उलथापालथ जी पंधराव्या शतकात सुरू झाली ती ट्यूडर घराण्यातील राजे राज्य करीत असता सारखी सुरू होतीच. ज्याअर्थी शहरसुधारणेसंबंधी हक्क व पार्लमेंटासंबंधी हक्क यांचा फार जवळचा संबंध असे, त्याअर्थी या उलथापालथीचा परिणाम पार्लमेंट सभेच्या रचनेवर फार महत्त्वाचा घडून आला. सन १८३२ मधील रिफार्म ॲक्ट व सन १८३५ मधील म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट हे अमलात येईतोपर्यंत बहुतेक शहरात तेथे राहणाऱ्या लोकांपैकी पुष्कळांस म्युनिसिपालिटी व पार्लमेंटसंबंधी हक्क नसत.

धर्म संस्थांचे नियमन : मुख्यत्वेकरून ट्यूडर राजांच्या मनास वाटेल त्याप्रमाणे

वर्तण्याचा कल धर्मसंस्थांच्या संबंधातच दिसून आलेला आहे. आठव्या हेन्रीने व एलिझाबेथने पूर्वी व नंतरही कोणी चालविला नाही इतका कडक अंमल धर्मसंस्थांवर चालविला. धर्मोपदेशकांवर अंमल चालविण्याच्या कामात प्लॅन्टेजेनेट राजांचा पाडाव पोप नेहमी करीत असत. स्टुअर्ट घराण्यातील राजांच्या मनाचा कल हाय चर्च किंवा कॅथोलिक पंथाकडे असे आणि म्हणून त्यांच्या मनात धर्मोपदेशकांसंबंधी काही थोडासा पूज्यभाव असे. आर्चबिशप, बिशप व हलक्या दर्जाच्या धर्मोपदेशकांबरोबर जे राजाचे नोकर आहेत या नात्याने हेन्री व एलिझाबेथ वर्तत असत. कारण हे अधिकार त्यांनी त्यास दिलेले असत व त्यास पाहिजे त्यावेळी हे अधिकार त्याजपासून काढून घेण्याची सत्ता त्यांच्या हाती असे. कॅथोलिकांपैकी किंवा प्रॉटेस्टंटांपैकी जर कोणी उघडपणे प्रस्थापित व प्रचलित धर्माविरुद्ध चालताना त्यांच्या दृष्टीस पडले तर ते त्यास कडक शिक्षा देत असत, परंतु ही शिक्षा अपराध्यांच्या आत्म्यास घातुक असा पारमार्थिक रोग बरा करण्याच्या हेतूने न करता हे असे करणे म्हणजे कायद्याच्या विरुद्ध व राजसत्तेच्या विरुद्ध अपराध करणे घडते, या समजुतीने ते त्यास शिक्षा करीत असत. एलिझाबेथ व तिचे मंत्री 'आम्ही कोणाची मते कशी काय आहेत याची चौकशी कधीही करीत नाही, व कोणाचे मतस्वातंत्र्य हरण करावे, अशी आमची इच्छा नाही,' असे पुष्कळदा म्हणत असत. असे म्हणण्याचा त्यांना हक्क नव्हता, तरी पण एलिझाबेथ ही धर्मवेडी नव्हती, हे मात्र खरे आहे. ती जेव्हा जेव्हा कोणाचा छळ करी तेव्हा तेव्हा तसे करण्यास मुख्यत्वेकरून काही ऐहिक गोष्टीच कारण असत.

कोणा एका विशिष्ट धर्ममताविषयी जर इंग्लंडमधील बहुजनसमाज कळकळ बाळगणारा असता तर हेन्रीला व एलिझाबेथला हा मार्ग स्वीकारता आला नसता. त्यांना कोणत्या तरी एका मताचे कैवारी व्हावे लागले असते. कट्टे प्रॉटेस्टंट व कट्टे कॅथोलिक यांच्यामध्ये कोणत्या मुद्यांविषयी तंटा आहे यासंबंधी बहुतेक इंग्रज लोक विशेषशी काळजी करीत नसत. रोमच्या ताब्यातून मुक्तता मिळविणे, रोमच्या करांपासून सुटका होणे, रोमचा अंमल उडवून देणे व हुद्यांच्या जागा देण्याच्या कामी पोपाकडून जो अन्याय होत असे तो दूर करणे, एवढेच काय ते त्यांना मनापासून आवडत असे.

धर्मसंस्थांवर राजाचे जे श्रेष्ठत्व इंग्रज लोकांनी कबूल केले होते व या श्रेष्ठत्वस्थापनास ते जी मदत करीत असत त्याचे कारण त्यांची मते वर दर्शविल्याप्रमाणे होती हेच आहे. स्वातंत्र्याविषयी प्रजाजनांची इच्छा व अधिकारप्राप्तीविषयी राजाची इच्छा या दोन्ही इच्छा एकत्र झाल्यामळे हेन्रीला व एलिझाबेथला धर्मसंस्थांच्या बाबतीत बहुतेक पोपासारखेच वर्चस्व प्राप्त झाले होते. राज्यकारभाराचे धोरण जोपर्यंत आपण समतोल राखतो तोपर्यंत आपले वर्चस्व राहील, असे हेन्रीला व एलिझाबेथला पुरे माहीत होते. हेन्री, एलिझाबेथ व इंग्रज लोक यापैकी कोणाच्याही डोक्यात धर्मासंबंधी अप्रतिबंध असणे हे रास्त आहे ही कल्पनाच आली नाही. कदाचित धर्मासंबंधी अप्रतिबंध ठेवणे हे त्या घातुक युद्धाच्या काळी

शक्य नसले पाहिजे. हेन्री व एलिझाबेथ यांनी धर्मासंबंधी मते व आचार यांच्यासंबंधाने तडजोडीचा मार्ग काढून ज्यांची धर्माची मते बेताबाताचीच असत किंवा जे त्या कामी भित्रे असत किंवा जे धर्मासंबंधी निष्काळजी असत, त्यांना म्हणजे बहुतेक सर्व प्रजेला खुश करण्याचा प्रयत्न चालविला होता. आपण केलेल्या धर्मासंबंधी आज्ञा जे थोडे लोक न मानता बंडाळी उठवितील त्यांचा मोड करण्याच्या कामी ही बहुजन समाजाची संगती आपल्या उपयोगी पडेल, अशी त्यांची समजूत होती.

राजाचे वर्चस्व अमलात आणण्यासाठी आठव्या हेन्रीने योजलेले उपाय : पोपाचा प्रतिनिधी म्हणून वूल्सीकडे जो अधिकार असे तो धर्मोपदेशकांनी कबूल करून ते त्याप्रमाणे चालले असा त्यावर आरोप आणून हेन्रीने त्यांना एक जबरदस्त दंड देण्यास लावले. धर्मसंस्थेमध्ये ज्याला म्हणून काही नोकरी असे त्याचे पहिल्या वर्षाचे उत्पन्न तो पोपाला देत असे. हे उत्पन्न आपल्याला मिळावे अशासाठी आठव्या हेन्रीने पार्लमेंट सभेकडून एक कायदा मंजूर करवून धर्माच्या न्यायसभांवरील विवाद पोपाकडे जाण्याचे बंद करविले. आठव्या हेनरीने इंग्लंडमधील धर्मसंस्थांवरील आपले वर्चस्व कॉन्व्होकेशन (धर्मोपदेशकांची पार्लमेंटाप्रमाणेच असणारी सभा)मध्ये पहिल्याने धर्मोपदेशकांकडून कबूल करून घेतले व नंतर ते पार्लमेंटकडून कबूल करविले. त्याने पहिल्याने लहान लहान व नंतर मोठाले मठ नाहीसे केले व त्यांच्याकडे चालत असलेली बहुतेक जमीन गृहस्थ लोकांना वाटून दिली. या अशा उपायांनी त्याने पोपांची सत्ता इतकी निर्मूळ करून टाकिली होती, की मेरीलादेखील ती पुनः स्थापता आली नाही.

सहाव्या एडवर्डने धर्मासंबंधी जास्ती केलेल्या सुधारणा -मेरीच्या कारकीर्दीतील प्रतिक्रिया : धर्मासंबंधी मते किंवा संस्कार यांच्या बाबतीत आठव्या हेन्रीने अमुक एका निखालस तत्त्वाचे अवलंबन केले होते असे नाही. ट्रान्ससबस्टॅन्शिएशन (पदार्थांतर) सारख्या रोमन कॅथोलिक धर्मातील पुष्कळ चमत्कारिक मतांवर विश्वास ठेवण्यास तो लोकांना नेहमी भाग पाडीत असे. बरे दुसरीकडून पाहिले तर त्याने देवळात चालणाऱ्या विधि ग्रंथांच्या काही भागांचे इंग्रजीत भाषांतर करविले व प्रत्येक पॅरिशातील देवळात एक इंग्रजीत भाषांतर केलेल्या बायबलची प्रत ठेवविली. सहावे एडवर्डच्या कारकीर्दीत हल्ली चालत आहे तिच्याप्रमाणेच लिटर्जी (समाजभजनपद्धती) रचविण्यात आली. एलिझाबेथच्या ३९ कलमांच्या धर्मशिक्षेहून मुख्य मुख्य गोष्टीत विशेषशी वेगळी नाही, अशी ४२ कलमांची इंग्लंडमधील धर्माची शिक्षा प्रसिद्ध करण्यात आली. ट्रान्ससबस्टॅन्शिएशन मत त्याज्य ठरविण्यात आले. पात्र्याजवळ पापे कबूल करण्याची आवश्यकता अमान्य करण्यात आली. धर्मोपदेशकांनी लग्नाशिवाय राहणे हे धर्मवेडेपणा आहे, असे प्रसिद्ध करण्यात आले. यज्ञवेदी काढून टाकल्या. पुतळ्यांचा नाश केला. रंगीबेरंगी (देवळातील) खिडक्या फोडून टाकल्या व रंगारंगाच्या शाईची चित्रे, नकाशे वगैरे काढलेली धर्म पुस्तके फाडून किंवा जाळून टाकली.

जे धर्माच्या मतांविषयी वादविवादाची मुळीच पर्वा करीत नसत, तशा लोकांना ही नासधूस पाहून राग आला. धर्मात सुधारणा व्हावी म्हणून आपली आस्था अत्यंत आहे असे जे लोक सांगत असत त्यांचा लोभ व प्रापंचिक दृष्टी पाहून दुसऱ्या कित्येकांच्या मनास फार वाईट वाटले. अखेरीस एडवर्डचे मागून लेडी जेन ग्रे हीस गादीवर बसविण्याची जी खटपट झाली त्या खटपटीने जे राजनिष्ठ व कायद्याने चालणारे इंग्लिश लोक होते त्यातील बहुतेक नाखुश झाले. या सर्व गोष्टींमुळे मेरी राणीच्या कारकीर्दीत सहाव्या एडवर्डच्या वेळच्या सर्व सुधारणा मोडून टाकण्यास व प्रॉटेस्टंट लोकांचा क्रूर रीतीने छळ करण्यास कठ्या कॅथोलिक पंथाच्या पक्षास सोपे पडले. पुष्कळ प्रॉटेस्टंट लोकांनी भिऊन कॅथोलिक धर्म स्वीकारिला; परंतु या छळणुकीचा पुरा परिणाम घडून येण्याच्या पूर्वीच मेरी मृत्यू पावली आणि तिने आरंभिलेली सर्व कामे एलिझाबेथने हाणून पाडिली..

धर्माची सुधारणा पूर्णपणे सिद्धीस नेण्याकरिता एलिझाबेथने योजिलेले उपाय : काही बाबतीत फेरफार करून एलिझाबेथ राणीने सहाव्या एडवर्डची धर्मशिक्षा व भजन पद्धती पुन्हा छापून प्रसिद्ध केली. राणी एलिझाबेथ हिचे धर्मसंस्थांवर वर्चस्व आहे याबाबतीचा व सार्वजनिक भजनपद्धती ही चोहोकडे एकसारखी असावी अशा बाबतीचा, असे दोन प्रसिद्ध कायदे एलिझाबेथ राणीचे पहिल्या पार्लमेंट सभेने मंजूर केले.

धर्मसंस्थांवरील राजकर्त्यांचे श्रेष्ठत्वासंबंधी कायदा सन १५५९ (ॲक्ट ऑफ सुप्रिमसी) : (१) ज्या ज्या धर्मोपदेशकास वृत्ती असे किंवा ज्या ज्या गृहस्थास सरकारी नोकरी असे त्यांनी सर्वांनी राजकर्त्यांचे धर्मसंस्थांवर श्रेष्ठत्व आहे अशाविषयी शपथ घेतली पाहिजे, असे या कायद्याने ठरविण्यात आले होते; अशी शपथ घेतल्यामुळे परदेशातील राजा किंवा धर्मोपदेशक यांची ऐहिक गोष्टींविषयी व त्याचप्रमाणे पारमार्थिक गोष्टींविषयी सत्ता त्यास नाकबूल करणे सहजच भाग पडत असे. (२) अशी पारमार्थिक सत्ता परदेशातील एखाद्या राजास किंवा एखाद्या धर्मोपदेशकास आहे, असे जर कोणी लिहिण्याने किंवा जाणूनबुजून बोलून प्रतिपादन करील तर त्या इसमास पहिल्या दोन खेपेस शिक्षा द्यावी व अशा प्रकारचा तिसऱ्याने अपराध केल्यास त्याजवर राजद्रोहाचा आरोप लागू करावा, असेही या कायद्याने ठरविण्यात आले होते. तीन वर्षांनंतर, जे कोणी दोहोंपैकी कोणत्याही एका युनिव्हर्सिटीतून पदवी मिळवतील किंवा वकिलीचा धंदा करतील किंवा लोकप्रतिनिधींच्या सभेचे सभासद होतील, त्या सर्वांसही धर्मसंस्थांवरील राज्यकर्त्यांच्या श्रेष्ठत्वासंबंधी शपथ घेणे भाग पाडण्यात आले होते.

भजन पद्धतीच्या एकसारखेपणाविषयीचा कायदा,
सन १५५९ (ॲक्ट ऑफ युनिफॉर्मिटी) :

(१) या कायद्याने कोणाही धर्मोपदेशकाने ठरीव भजन पद्धतीशिवाय कोणत्याही दुसऱ्या भजन पद्धतीचा उपयोग करू नये, असे ठरविण्यात आले होते. या कायद्याविरुद्ध आचरण केल्यास पहिल्या खेपेस अशा अपराध्याची दरोबस्त मालमत्ता जप्त करावी. दुसऱ्या खेपेस

त्यास एक वर्षाच्या कैदेची शिक्षा द्यावी, असे ठरविण्यात आले होते. (२) जर कोणी इसम रविवारी किंवा एखाद्या सणाच्या दिवशी देवळात हजर राहिला नाही तर त्यास १ शिलिंग दंड करावा, असेही या कायद्याने ठरविण्यात आले होते.

प्युरिटन लोकांचा उदय-हाय कमिशन या नावाची न्यायसभा : ॲक्ट ऑफ युनिफॉर्मिटी व ॲक्ट ऑफ सुप्रिमसी या दोन कायद्यांचा रोख पहिल्याने रोमन कॅथोलिक लोकांच्या विरुद्ध होता; परंतु एलिझाबेथ राणीच्या या धर्म पद्धतीने काही कठ्या प्रॉटेस्टंट लोकांमध्येदेखील असंतोष उत्पन्न झाला. मेरी राणीचा छळ सुरू असता इंग्लंडमधील पुष्कळ धर्मोपदेशक स्वित्झर्लंड व जर्मनीतील प्रॉटेस्टंट लोकांच्या आश्रयास जाऊन राहिले होते. तेथे जाऊन ते प्रसबिटीरिअन मतांप्रमाणे धर्मसंस्थाशासन असणे हे चांगले आहे, असा विचार करण्यास व एलिझाबेथने जे धर्मसंस्कार राखले होते त्यापैकी पुष्कळांना ते दोष ठेविण्यास शिकले होते. पहिले प्युरिटन जे ते हे होत. एलिझाबेथ त्यांना कोणतीही सूट देईना आणि म्हणन साहजिक रीतीने ते तिच्या धर्मसंस्थांवरील श्रेष्ठत्वाविषयी शंका घेऊ लागले. टॉमस् कार्टराईट या नावाचा जो प्युरिटन लोकांकडील मुख्य लेखक होता त्याने तर धर्माच्या बाबतीत सरकारच्या फौजदारी न्यायधीशाने धर्मोपदेशकांचे ऐकिले पाहिजे, असेदेखील ठरविण्याची मजल मारली होती.

एलिझाबेथ राणीचे काही मंत्री प्युरिटन लोकांच्या बाजूचे असत. सन १५७१ पासून पुढे हाऊस ऑफ कॉमन्स हे बहुतकरून प्युरिटन पक्षाचेच असे. कॅथोलिक राजकर्त्यांच्या हल्ल्याशी टक्कर देण्यास इंग्लंडमधील प्रॉटेस्टंट लोकांना आपल्या सर्व शक्तीचा उपयोग करावा लागत असे म्हणून पुष्कळ वर्षेपर्यंत प्युरिटन लोकांना फारसा त्रास भोगावा लागला नाही; पण सन १५८३ मध्ये व्हिटगिफ्ट या नावाचा हा धर्म पंथाचा जो धर्मवेडा शत्रू होता तो कँटरबरीचा आर्चबिशप झाला. ॲक्ट ऑफ सुप्रिमसी या कायद्यान्वये राणीने जी हाय कमिशनची नावाची न्यायसभा स्थापन केली होती ती त्याच्या हाती आयतेच शस्त्र सापडले. याच वर्षी या न्यायसभेची रचना पुनः करण्यात आली होती व तीत ४४ सभासद असावेत, असे ठरविण्यात आले होते; परंतु या सभासदांपैकी कोणाही तीन सभासदांना काम चालविण्याचा अधिकार देण्यात आला होता. या सभेतील गृहस्थलोक फारच थोडे काम करीत असत; पण तिचे सर्व काम बिशप व धर्मासंबंधी काम चालविणारे वकीलच करीत असत.

या न्यायसभेस ॲक्ट ऑफ युनिफॉर्मिटी व ॲक्ट ऑफ सुप्रिमसी या दोन कायद्यांविरुद्ध जे लोक अपराध करतील त्यांची चौकशी करण्याचा अधिकार होता. या दोन्ही कायद्यांच्या विरुद्ध जर कोणी काही पुस्तक लिहिले किंवा काही पाखंडी मत प्रदर्शित केले तर हेही अपराध वरील अपराधातच येतात, असे मानीत असत. या न्यायसभेस सर्व प्रकारचे व्यभिचार, अगम्यागमने व दुसरे अनीतीचे अपराध यांची चौकशी करण्याचा अधिकार

होता. या न्यायसभेला एक्स ऑफिशिओ (अधिकारपरत्वे करून) तऱ्हेची शपथ घेण्यास लावण्याचा अधिकार असे. ही शपथ घेतली असता साक्षीदाराला आपल्या स्वतःलादेखील अपराधात सापडविण्याजोग्या प्रश्नासही जबाब देणे भाग पडत असे. या न्यायसभेला एखाद्या धर्मोपदेशकाची वृत्ती काढून घेता येत असे व सभेस वाटल्यास अपराध्यास दंड किंवा कैदेची शिक्षाही देता येत असे.

ज्या भयंकर न्यायसभेने प्युरिटन पंथाच्या धर्मोपदेशकांचा व गृहस्थांचा पुष्कळ वर्षेपर्यंत छळ चालविला होता ती न्यायसभा अशा प्रकारची होती.

ट्यूडर घराण्याची अखेर : अखेर अखेरच्या प्लॅन्टेजेनेट राजांच्या वेळी जी इंग्लंडमधील समाजाची स्थिती होती तिचे ट्यूडर घराण्याच्या अखेरीस अगदी रूपांतर होऊन गेले होते.

बडे लोक : नव्या बड्या लोकांचा समाज, जो बहुतेक आठव्या हेन्रीच्या कारकीर्दीत स्थापन झाला होता, त्याचा पाया या सुमारास इंग्लंडात पक्का होऊन बसला होता. जी बड्या लोकांची कुटुंबे त्यावेळी अस्तित्वात होती त्यांच्याशी लग्ने करून या नव्या बड्या लोकांनी आपले वैभव ताजे करून घेतले होते व जो व्यापाऱ्याचा वर्ग यावेळी भरभराटीस येत चालला होता त्या वर्गातील कुटुंबांशी लग्ने करून त्यांनी खुप नवी संपत्ती मिळविली होती. याप्रमाणे या वर्गाला पूर्वीपेक्षा राजनीतीच्या कामात अधिक स्वातंत्र्याने वागण्याजोगी स्थिती प्राप्त झाली होती. वार्स ऑफ दी रोझेस या युद्धात जे बडे लोक नाहीसे झाले होते त्या बडे लोकांपेक्षा हे नवे बडे लोक अगदीच वेगळ्या तहेचे होते. युद्धकलेमध्ये सुधारणा झाल्यामुळे बड्या लोकांचे शौर्याविषयीचे वर्चस्व कायमचे नाहीसे होऊन गेले होते. नवी बडी मंडळी आडमुठ्या शिपाई गड्यांची बनलेली नव्हती; पण ती सभ्य व शांत गृहस्थांची झालेली होती. द्रव्य, उत्तम कूळ, विद्या व स्थानिक व राष्ट्रीय कारभाराला हातभार लावण्याची सवय, या गोष्टींमुळे या नव्या बड्या लोकांचे वजन बाकीच्या जनसमूहावर उत्तम पडत असे; पण या बड्या लोकांना राजाच्या मर्जीला न जुमानण्याचे झाले तर मात्र सार्वजनिक मदतीशिवाय तसे करीता येण्याचा संभव नव्हता.

धर्मोपदेशक : या काळी जनसमुदायाचा एक स्वतंत्र वर्ग म्हणून जी धर्मोपदेशकांस सत्ता असे ती अजिबात नाहीशी होऊन गेली होती. मुद्रणकला निघाल्यामुळे त्यांच्याकडील विद्येचा मक्ता त्यांच्या हातून नाहीसा होऊन गेला होता. धर्मोपदेशकांशिवाय बाकीच्या सर्व लोकांस ईश्वरी प्रसाद दुसऱ्या कोणासही प्राप्त करून देता येत नाही ही समजूत धर्मसुधारणा झाल्यामुळे नाहीशी होऊन गेली होती. धर्मसुधारणेमुळे या वर्गाची बहुतेक संपत्ती नाहीशी झाली होती व बड्या लोकांच्या सभेतील या धर्मसंबंधाच्या बडे लोकांच्या बहुतेक सर्व जागा काढून टाकण्यात आल्या होत्या. या धर्मसुधारणेमुळे रोम येथील पोपाचा व इंग्लंडमधील धर्मोपदेशकांचा संबंध तुटला गेला म्हणून यापुढे राजाची सत्ता समतोल राखण्यासाठी त्यांना पोपाच्या सत्तेचा उपयोग करता येईनासे झाले होते. याप्रमाणे धर्मगुरूंना केवळ राजाच्या

सत्तेवर अवलंबून राहण्याची पाळी येऊन ठेपली होती. राजाकडे धर्मसंस्थेचे वर्चस्व असल्यामुळे धर्मसंस्थेवर पोपाकडून परदेशातून व प्युरिटन लोकांकडून देशातल्या देशात जे हल्ले होत असत, त्याजपासून तिचे रक्षण करण्याकरिता त्यांना आपली भिस्त त्याजवर ठेवून बसावे लागत असे आणि म्हणूनच १७ व्या शतकात सर्व शतकभर इंग्लंडमधील धर्मोपदेशक राज्यकर्त्यांची इतकी थोरवी गात असत; हीच त्यांची स्तुति जर त्यांच्या माजी मध्ययुगातील धर्मोपदेशकांनी ऐकली असती तर ती नुस्ती आर्जवाचीच नव्हे; पण किंबहूना ईश्वर निंदात्मक आहे, असे त्यांनी खास मानले असते.

लोकप्रतिनिधी : सातवा हेन्री गादीवर बसला त्या वेळेस लोकप्रतिनिधींना जी सत्ता होती तिच्यापेक्षा यावेळी फारच जास्त सत्ता त्यास प्राप्त झाली होती. पुष्कळ वेळा लोकांवर जरी भयंकर संकटे आली तरी ट्यूडर घराण्यातील राजे राज्य करीत असता व्यापार व धंदा हे फार पुढे सरसावले होते. मुख्यत्वेकरून एलिझाबेथ राणी राज्य करीत असता इंग्लंडमधील लोक युरोपातील सर्व राष्ट्रांपेक्षा जास्त संपन्न झाले होते. मुद्रणकलेचा शोध, लॅटीन व ग्रीक भाषा शिकविणाऱ्या पाठशाळांची वाढ व इंग्लिश भाषेच्या वाङ्मयाची विवृद्धी या सर्व गोष्टींनी इंग्लंडमधील मध्यस्थितीतील लोकांची बुद्धी पुष्कळच सतेज होत चालली होती. धर्मसुधारणेची धांदल, समुद्रावरील साहसांची प्रगती व राष्ट्रीय सत्तेसंबंधी उल्हास देणारे ज्ञान, या सर्व गोष्टींनी या वर्गाचे धैर्य व स्वतःवरील विश्वासही जास्त वाढला होता. ज्या बड्या लोकांचे व धर्मोपदेशकांचे हे पूर्वी अनुयायी असत त्यांचा व यांचा, या लोकांध्मये प्युरिटन लोकांच्या मताचा जास्त प्रसार होत चालल्यामुळे संबंध तुटत गेला व ते एक स्वतंत्र राजकीय शक्ती होऊन बसले. सतराव्या शतकातील ज्या लढाया झाल्या त्या सर्वांत, वकील लोकांच्या व खेड्यापाड्यांत राहणाऱ्या गृहस्थांच्या पुढारीपणाखाली, श्रेष्ठ व निर्णायक भाग काय तो याच वर्गातील लोकांनी घेतला होता.

○○○

भाग ९ वा

पहिला जेम्स, पहिला चार्लस आणि लोकसत्ताक राज्य

इ.स. १६०३-१६६०

उपोद्घात : ज्या वेळेस ट्यूडर घराण्यातील राज्यकर्त्यांना राज्यधिकार प्राप्त झाला त्या वेळेस राजसत्ता जितकी बलवान होती तिच्यापेक्षा फारच जास्त बलवान ती ज्या वेळेस स्ट्युअर्ट घराणे गादी सोडून गेले त्या वेळेस होती; पण ही राजसत्तेची अत्यंत बलवान अवस्था आहे, असे मानत असत व देशातल्या देशात पाहू गेले तर चोहोकडे व्यवस्था लागून राहिली होती, असे दिसून येत असे. प्रायः मनास वाटेल त्याप्रमाणे राज्य करण्याच्या पद्धतीची आवश्कता नाहीशी झाली होती व लोकांच्या मनात स्वातंत्र्येच्छा बरीच जोरावत चालली होती.

ट्यूडर घराण्यातील राज्यकर्त्यांनी बाकीच्या सर्व गोष्टींपेक्षा धर्मसंस्थेच्या संबंधाने स्वेच्छाचाराचे वर्तन केले होते. राज्यकर्ते या नात्याने पाहू गेले तर ट्यूडर घराण्यातील राजांना कायदे व मागले दाखले यांचे बंधनान्वये वागावे लागत असे; परंतु धर्मसंस्थेचे मुख्य अधिकारी या नात्याने पाहिले तर ते पोपाला जी एकाकाळी अपरिमित सत्ता होती तिचे मालक होऊन बसले होते. एलिझाबेथने ही सत्ता प्युरिटन लोकांचा पाडाव करण्याच्या कामी लावली; पण तिने त्यांचा मनःपूर्वक छळ न केल्यामुळे उलटे ते तिच्या कारकीर्दीत अधिक बलवान झाले. एलिझाबेथचे हे राज्यधोरण पहिल्या जेम्सने पुढे चालू ठेवले. प्युरिटन लोकांनाही आपले विरोधी वर्तन चालू ठेवले होतेच. पहिल्या चार्लसने व आर्चबिशप लॉर्ड याने हे सर्व प्रकरण निकरावर आणले. राजाला व लॉर्डला सर्व लोकांना आपल्या पद्धतीप्रमाणे धर्माच्या कामी चालावयास लावावे हे आपले कर्तव्य आहे, असे वाटत असे व प्युरिटन लोकांना त्यांच्या धर्म पद्धतीप्रमाणे न चालणे हे आपले कर्तव्य आहे, असे वाटत असे. लाँग पार्लमेंट (पुष्कळ दिवस चालू राहिलेली) सभेमध्ये सभासदांत मुख्यत्वेकरून प्युरिटनच फार होते आणि त्यामुळे प्युरिटन लोकांचा छळ होणे आपोआपच बंद झाले; पण

प्युरिटन लोकदेखील धर्माच्या बाबतीत आपल्या शत्रूइतकेच असोशीक होते. बिशप हा हुद्दा काढून टाकावा, सार्वजनिक भजन पद्धतीचे पुस्तक नाहीसे करावे व एकंदर इंग्लंडमधील धर्मसंस्था आपल्या धर्मतत्त्वाप्रमाणे पुनः रचावी, अशी प्युरिटन लोकांची इच्छा होती. याप्रमाणे राष्ट्रातील पुष्कळ लोकांना त्यांनी राजा व धर्मसंस्था यांच्या रक्षणासाठी हत्यारे घेण्यास भाग पाडले. ही देशातल्या देशात जी लढाई सुरू झाली तिच्यामध्ये प्युरिटन लोकांना जय प्राप्त झाला; पण त्यांच्यातल्या त्यांच्यात यावेळी दोन पक्ष उत्पन्न झाले - एक प्रेसबिटेरिअन व दुसरा इंडिपेंडंट. प्रेसबिटेरिअन लोकांची वस्ती खेड्यापाड्यांत फार होती व फौजेमध्ये मुख्यत्वेकरून इंडिपेंडंट होते. प्रेसबिटेरिअन लोकांचा प्रसिद्ध असा एकच नायक नव्हता; पण इंडिपेंडंट पक्षाचा नायक जो क्रॉमवेल हा फार मोठा सेनापती व त्याचप्रमाणे फार मोठा राजकारणी पुरुष होता. सरतेशेवटी सैन्यातील लोकांनी पार्लमेंट सभेतील आपले सर्व प्रतिपक्षी काढून टाकून ती शुद्ध करून घेतली, राजाला ठार मारून टाकले व तिन्ही राज्यांचे स्वामित्व इंडिपेंडंट पक्षाच्या स्वाधीन करून दिले.

नंतर क्रॉमवेलाने आणखी एक पाऊल पुढे टाकले व त्याने सैन्यावर आमची हुकमत आहे असे म्हणणारा पार्लमेंट सभेचा जो काही भाग शिल्लक होता त्याची धूळधाण करून टाकली. आपल्या जातअधिकाराच्या जोरावर इंग्लंडमध्ये चोहोकडे शांतता स्थापता येईल अशी त्यास आशा होती आणि याच हेतूने त्याने धर्मासंबंधी आचरणाच्या बाबतीत बहुतेक कोणालाही अडचण पडू नये, अशी परवानगीही खुशीने दिली असती; परंतु त्याच्या राज्यकारभाराविषयी एकंदर जनसमूहाचे मत त्याला कधीही अनुकूल करून घेता आले नाही. प्रेसबिटेरिअन त्याचप्रमाणे ॲंग्लिकन व रोमन कॅथोलिक या सर्व पंथांचे लोक त्याचा दीर्घ द्वेष करीत असत. जेव्हा तो मरण पावला तेव्हा सैन्यावर दाब ठेवण्यासारखा किंवा सर्व राष्ट्राला दरारा वाटेल असा सगळ्या देशात एकही इसम उरला नव्हता. त्याचा मुलगा जो रिचर्ड त्यास लवकरच गादीवरून काढून टाकण्यात आले. नंतर स्टुअर्ट घराणे पुनः राज्याधिकारावर आणण्यास व इंग्लंडमधील राज्यकारभाराची व्यवस्था पूर्वीप्रमाणे अमलात आणण्यास सर्व पक्षांचे लोक एकत्र झाले. तेव्हापासून निदान अँग्लिकन व प्रेसब्रिटेरिअन पंथांच्या लोकांना तरी मानसिकस्वातंत्र्य असले पाहिजे, असे गर्भित रीतीने मानण्यात येत असे.

याप्रमाणे पहिला जेम्स गादीवर बसल्यापासून तो दुसरा चार्लस गादीवर बसेतोपर्यंत राजनीतीचे संबंधाने धर्म ही एक अत्यंत प्रबळ शक्ती होऊन बसली होती. या गोष्टीमुळेच त्या वेळेच्या राज्यकारभारव्यवस्थेच्या इतिहासास एक विलक्षण स्वरूप आले आहे.

पहिल्या जेम्सचा स्वभाव कारकीर्द : जेम्स हा एक हुशार पण शहाणा इसम नसे. त्याच्या राजनीतीचे धोरण देशात शांतता राखणे व आपल्या अधिकाराची स्थापना करणे या मुख्य दोन गोष्टींकडे होते. त्याने आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभी स्पेन देशाशी तह केला

आणि तेव्हापासून नेहमी पुढे धर्मासंबंधी लढाया टाळण्याचा त्याचा निश्चय झाला होता. कॅथोलिक राजांशी आपला अधिक निकट संबंध असावा म्हणून आपल्या मुलाला एखादी स्पेन देशातील राजकन्या बायको मिळावी या हेतूने त्याने फार दिवस तेथील राजांशी बोलणे लावले होते आणि अखेरीस त्याने आपल्या मुलासाठी एक फ्रेंच राजकन्या नक्कीही केली. ही त्याची सर्व कृत्ये त्याने अवेळी केली असल्यामुळे ती वेडेपणाची होती, कारण त्यामुळे इंग्लंडच्या दरबारात कॅथोलिक धर्माचा रिघाव जास्त झाला आहे, असा सर्वसाधारण लोकांना संशय मात्र येऊ लागला.

जेम्सच्या मनात कॅथोलिक लोकांना प्रतिबंध करण्याचे नव्हते; परंतु स्कॉटलंडमधील प्रेसबिटेरिअन धर्मोपदेशकांच्या सत्तेचा जो त्यास अनुभव आला होता त्यामुळे प्युरिटन लोकांशी तो द्वेष करीत असे. त्यांचा छळ करण्याकडे जो त्याचा नेहमी कल असे त्यामुळे त्याचे व पार्लमेंट सभेचे नेहमी भांडण होत असे. कारण एलिझाबेथच्या कारकीर्दीपेक्षा हल्लीच्या कारकीर्दीत सभा जास्तच प्युरिटन बनली होती.

प्रत्येकाने आपले शिष्यत्व पत्करावे असे जेम्सला वाटत असे. रोमन धर्मसंस्था व सुधारलेल्या धर्मसंस्था यांच्यामध्ये तडजोड व्हावी म्हणून त्याने ज्या अत्यंत विद्वत्तेचे प्रचुर अशा कल्पना काढल्या होत्या, त्या ग्रहण करण्याच्या संबंधाने पोपाने किंवा कॅथोलिक राजांनी इतके मठ्ठपण का दाखवावे हे त्यास मोठे गूढ वाटे. त्याला जी सेवा पद्धती अयोग्य वाटत असे त्या सेवा पद्धतीने त्याच्या रयतेपैकी कोणी हट्टाने ईश्वरोपासना का करावी किंवा त्याला जे धर्मसंस्थाशासन अव्यवस्थित वाटे तेच कायम असावे असे त्याच्या रयतेपैकी कोणास का वाटावे हेही त्यास समजत नसे. लोकांना ताब्यात ठेवण्यास जे शहाणपण अंगी असावे लागते किंवा त्यांना ताब्यात ठेवण्यास जे सामर्थ्य लागते हे जरी जेम्सच्या अंगी नव्हते तरी आपले वर्चस्व सर्वांवर असावे, असे त्यास वाटत असे. त्याचा स्वभाव असा चमत्कारिक असल्यामुळे त्याच कारकीर्दीतील काही उत्तमांपैकी कल्पना वाया गेल्या. उदाहरणार्थ त्याच्या मनात इंग्लंड व स्कॉटलंड या दोन राष्ट्रांची एक पूर्ण जोड करावी, असे होते खरे; पण लोकप्रतिनिधींच्या सभेच्या सभासदांना आळस व त्यांच्या मनातील पीळ त्यास काढता येईना. त्याचप्रमाणे जुने व त्रासदायक हक्क, फ्यूडल पद्धतीप्रमाणे मुख्यकुळांपासून घेऊ देण्याऐवजी, हौस ऑफ कॉमन्स, या सभेच्या मनात राजाला एक वार्षिक कायमची नेमणूकच करून देण्याचे होते; परंतु ही रक्कम किती घ्यावी यासंबंधी जेम्स राजाचे व त्या सभेच्या सभासदांचे एकमतच होईना.

पहिल्या जेम्सच्या कारकीर्दीत राज्यकारभारव्यस्थेत झालेली प्रगती : या कारकीर्दीत राज्यकारभारव्यवस्थेत काय प्रगती झाली यासंबंधाने पुढे दिलेल्या सदराखाली विचार करता येण्यासारखे आहे :

१) कर : जेम्स हा फार उधळ्या होता. पार्लमेंट सभेचे व त्याचे क्वचितच सख्य असल्यामुळे त्या सभेपासून त्याला पुष्कळसा पैसा मिळत नसे. म्हणून त्याला राज्यकारभार व्यवस्थेविरुद्ध उपाय घ्यावे लागत असत. त्याच्या पहिल्या पार्लमेंटकडून त्याला त्याच्या हयातीपावेतो टनेज व पौडेज हे हक्क मिळाले होते; परंतु आयात मालावर नव्या जकाती बसविण्याचा हक्क मला आहे, असे त्याने प्रतिपादन केले होते. सन १६०६ मध्ये बेट नावाच्या एका तुर्कस्थानाशी व्यापार करणाऱ्या मनुष्याने मनुकांवर अशा रीतीने बसविलेली जकात देण्याचे नाकारले. तेव्हा ही अशी जकात देणे कायदेशीर आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी हा प्रश्न कोर्ट ऑफ एक्सचेकर या न्यायसभेपुढे आला. तेव्हा जे सर्व कायदे पार्लमेंट सभेच्या संमतीशिवाय राजाने कोणताही कर बसवू नये असे सांगतात त्यापैकी एकदेखील परदेशातून इंग्लंडमध्ये आलेल्या मालावर जकात बसविण्याच्या कामी लागू पडत नाही, असे मत त्या न्यायसभेने दिले. या निवाड्यावरून जेम्सने या जकाती अधिक वाढविण्याची संधी मात्र साधून घेतली. या त्याच्या करण्याविरुद्ध जितक्या म्हणून पार्लमेंट सभा त्याच्या कारकीर्दीत एका मागून एक भरल्या त्या तितक्या सगळ्यांनी ओरड केली; पण ती सर्व व्यर्थ गेली. जेम्स इतकेच करून थांबला नाही. त्याने सन १६१४ एक व सन १६२० एक याप्रमाणे दोन बेनिव्होलन्स नामक देणग्या उकळल्या. ही देणगी देण्याविषयी कोणावरही जोर नाही, असे राजाचे मंत्री बजबजावून लोकांना सांगत असत; पण ही देगणी देण्याचे नाकारीले तर आपल्यावर राजाची अवकृपा होईल, असे प्रत्येक जण मनात समजून होता.

२. कायदेकानून : या कारकीर्दीत राजाला जाहीरनामे काढण्याची सत्ता किती आहे हे पहिल्याने बारकाईने ठरविण्यात आले. जी कृत्ये कायद्याने न करण्यास सांगितली नाहीत, ती कृत्ये आपण काढलेल्या जाहीरनाम्यांनी बंद करण्यात आली आहेत, ज्या गुन्ह्यास कायद्याने शिक्षा सांगितली आहे त्यापेक्षा जास्त शिक्षा आपल्या जाहीरनाम्यांनी देण्यात आली आहे व ज्या न्यायसभांना ज्या अपराध्यांची चौकशी करण्याचा अधिकार दिलेला नाही त्या न्यायसभेस असा अधिकार आपल्या जाहीरनाम्यांनी देण्यात आला आहे, अशी हाऊस ऑफ कॉमन्स या सभेने राजापुढे सन १६१० मध्ये मांडली. किंग्सबेंच या न्यायसभेचा मुख्य न्यायाधीश असलेला कोक व त्याच्या बरोबरीचे दुसरे न्यायाधीश यांच्याकडे या फिर्यादीची चौकशी करण्यासाठी राजाने हे प्रकरण पाठवून दिले. या सर्वांनी विचार करून ज्या प्रकारच्या जाहीरनाम्याबद्दल कॉमन्स सभेने फिर्याद मांडली आहे, तसे जाहीरनामे आपल्याला प्रसिद्ध करण्याचा अधिकार नाही, असे राजास कळविले. अमुक एका कायद्याकडे लोकांनी लक्ष द्यावे किंवा अमुक एक कायदा सक्तीने अमलात आणण्यात येईल अशा तहेचे राजाने वाटेल तर जाहीरनामे काढावे, यापेक्षा जास्त त्याने काही करू नये, असेही त्यांनी ठरविले. असे जरी न्यायाधीशांचे मत होते, तरी त्यांनी जे कृत्य अन्यायाचे आहे म्हणून ठरविले होते, ते अजिबात बंद झाले नाही.

३. मंत्र्यांची जबाबदारी : पहिल्या जेम्सच्या कारकीर्दीत हाऊस ऑफ कॉमन्स हे पुन्हा मंत्री आपल्या कामाबद्दल जबाबदार आहेत हे तत्त्व लागू करू लागले; पण जर मंत्र्यांनी कायद्याविरुद्ध आचरण केले तरच मात्र ते त्यांच्यावर फिर्यादी घेत असे. लॉर्ड चॅन्सलर बेकर याने आपल्या कामात पैसे खाल्याबद्दलचा आरोप ठेवून ते काम कॉमन्स सभेने लॉर्ड सभेकडे पाठविले तेव्हा त्याला चाकरीवरून दूर करण्यात आले व त्यास शिक्षाही देण्यात आली. थोडक्या वर्षांनंतर, राजाचा खजिनदार जो लॉर्ड मिडलसेक्स त्याजवर कॉमन्ससभेने लॉर्ड सभेच्या न्यायासनापुढे त्याने आपल्या कर्तव्यकर्मात अन्यायाचे आचरण केल्याचा दोषारोप आणला. या बड्या गृहस्थाने आपल्या कामात लबाडी केली होती खरी. तरी पण मनात आणील ते करणारा सर्वशक्तिमान असा राजाच्या प्रेमातील जो ड्यूक ऑफ बकिंगहॅम याच्याशी जर त्याने तंटा केला असता तर त्याला त्याच्या अपराधाचे शासन क्वचितच मिळाले असते.

न्याय पद्धती : पहिल्या जेम्सच्या व पहिल्या चार्लसच्या कारकीर्दीत इंग्लंडमधील राज्यकारभार व्यवस्थाविषयक लढे पुष्कळ वेळा न्यायसभांसमोर येत असत. कारण हे राजे आपली राजा या नात्याने सत्ता वाढविण्याविषयी नेहमी यत्न करीत असत. स्वातंत्र्याच्या भक्त मंडळीची सर्व भिस्त स्वातंत्र्याच्या मोठ्या सनदेपासून झालेल्या पुढील राजाची सत्ता कमी करणाऱ्या सर्व कायद्यांवर असे; परंतु या कायद्याची भाषा पुष्कळ वेळा अस्पष्ट किंवा दुर्बोध अशी असे. हल्लीच्या काळी असा प्रसंग आल्यास नवे कायदे करून ही अडचण दूर करता आली असती; परंतु ज्या काळाविषयी आपण लिहीत आहोत त्याकाळी आपली सत्ता कमी करणाऱ्या व्याख्यात्मक कायद्याला राजाने कधीही सल्ला दिला नसता व ज्या व्याख्यात्मक कायद्याने प्रजेच्या स्वातंत्र्यात कमीपणा येईल असा कायदा पार्लमेंट सभेनेही मंजूर केला नसता. म्हणूनच जेव्हा एखादा कायद्याचा अर्थ संशयात्मक असे तेव्हा ते प्रकरण न्यायसभेपुढे नेऊन त्यासंबंधी न्यायधीशांचा निवाडाच घ्यावा लागत असे.

याकाळी न्यायाधीश नेमण्याचे व काढण्याचे राजाचे मर्जीवर अवलंबून असे. हा असा अधिकार राजाला असल्यामुळे जेम्स राजाने न्यायाधीशांवर आपली छाप बसविण्याचा यत्न सुरू केला. जेथे राजाच्या हक्काचा संबंध येईल तेथे न्याय देण्यापूर्वी न्यायधीशांनी आपला सल्ला घेतला पाहिजे, असे त्याने ठरविले. सन १६१६ मध्ये लॉर्ड चीफ जस्टिस कोक याला, त्याने चॅन्सरी न्यायसभा व धर्मन्यायसभा यांच्यापेक्षा आपल्या न्यायसभेने दिलेले निवाडे जास्त महत्त्वाचे आहेत, असे प्रतिपादन केल्यावरून चाकरीवरून काढून टाकले.

धर्मसंस्था : प्युरिटन लोकांच्या विरुद्ध जेम्स पहिला याने बिशप लोकांचा पक्ष उचलला होता. गादीवर बसल्यावर दोन्ही पक्षांच्या प्रतिनिधीस हॅम्पटन कोर्ट येथे सभा करण्याचे ठरवून बोलाविले होते; परंतु या सभेच्या अध्यक्षाचे काम त्याने निःपक्षपात बुद्धीने बजावले नाही. थोड्या दिवसांनी पुढे कॉनव्होकेशनने धर्मासंबंधी नवी शासने प्रसिद्ध केली. जो मनुष्य

भजन पद्धतीने सर्व पुस्तक हे बायबलास अनुसरून केले आहे असे मानणार नाही, त्यास बहिष्कार घालावा, असे या नव्या अनुशासनात ठरविले होते. याकाळी बहिष्कार घातलेल्या मनष्यास तो आपला अपराध कबूल करून शरण येईतोपर्यंत कैदेत ठेवीत असत. या अशा कायद्यांनी प्युरिटन मताच्या पुष्कळ धर्मोपदेशकांच्या वृत्त्या काढून घेण्यात आल्या; पण सन १६११ मध्ये ॲबट हा जेव्हा कॅन्टरबरीच्या आर्चबिशपाच्या गादीवर बसला तेव्हा त्याची मते या पंथाला अनुकूल असल्यामुळे त्याने पहिल्या जेम्सच्या बाकी राहिलेल्या कारकीर्दीत प्युरिटन लोकांचा छळ कमी करण्याच्या कामात यश संपादिले.

पहिल्या चार्लस राजाचा स्वभाव व त्याच्या कारकीर्दीची पहिली वर्षे : चार्लस राजाला बापापेक्षा शहाणपण कमी होते; पण धैर्य जास्त होते. लहानपणापासून त्याच्या मनात राजाच्या हक्कांविषयीचा फाजील अभिमानाच्या कल्पना भरवून देण्यात आल्या होत्या व तो कट्टा एपिस्कोपल मतानुयायी होता. मी जे करतो ते बरोबर आहे, अशी त्याची नेहमी कल्पना असल्यामुळे त्याच्या प्रजेपैकी जर कोणी त्याच्या राजनीतीच्या व धर्मासंबंधी मतांच्या विरुद्ध आपले मत प्रदर्शित केले तर त्याचे करणे इमानीपणाचे आहे, असे त्यास वाटत नसे. आपल्याला पुढे काय करावयाचे ते अगोदर नक्की करून ठेवण्याची त्याच्या अंगी शक्ती नसून व प्रसंग आल्यास 'एक घाव व दोन तुकडे,' करून टाकण्याचेहि सामर्थ्य त्याचे अंगी नसून तो हट्टी व कोणाचेही न मानणारा असा असे. काही कामात तो जरी अत्यंत नेकीने चालणारा असे तरी तो अत्यंत धरसोड्या व कपटी असे. या उलथापालथीच्या वेळी राजपद धारण करण्यास इंग्लंडमध्ये चार्लसपेक्षा अधिक अयोग्य मनुष्य कोणीही नव्हता.

त्याच्यावरची संकटे त्याच्या पहिल्या पार्लमेंटपासूनच सुरू झाली (१६२५). बापापासून स्पेन देशाशी लढाई करणे त्यास प्राप्त झाले असल्यामुळे त्याला पैशाची फार जरूर होती. पार्लमेंट सभा त्याला पैसा देण्यास नाखुश होती; परंतु धर्मासंबंधी व्यवस्था लावण्यास मात्र काय ती उत्सुक होती. म्हणून त्याने असली ही पार्लमेंट सभा दोन महिने झाल्याबरोबर मोडून टाकली. त्याच्या दुसऱ्या पार्लमेंट सभेत (१६२६), सर जॉन एलिएट याने ड्यूक ऑफ बकिंगहॅम याजवर त्याने स्पेन देशाशी जी लढाई चालू होती तीत अपयश आले या अपराधाबद्दल व लोकांवर आलेल्या त्या वेळच्या बाकीच्या सर्व आपदांबद्दल दोषारोप करण्यास कॉमन्स सभेचे मन वळविले. ही पार्लमेंट सभा विसर्जन करवूनच काय ते राजाला या आपल्या प्रेमपात्राचे रक्षण करता आले.

फ्रान्स देशाशी लढाई करण्याचे काम त्याने यावेळी मूर्खपणाने सुरू केले. पार्लमेंट सभेकडून पैसा न मिळाल्यामुळे त्याने बळजोरीने पैसा उसना काढला. हा असा पैसा काढणे कायदेशीर नव्हे. असे जरी न्यायधीशांचे मत पडले तरी ज्यांनी पैसे देण्याचे नाकबूल केले त्या लोकांना प्रिव्हीकौन्सिलने कडक रीतीने शिक्षा दिल्या. पैसे न देणारे बडे लोक व संभावित गृहस्थ यास कैदेत टाकण्यात आले व गरीब लोकांना बळजोरीने शिपायाची

नोकरी करण्याकरिता सैन्यात दाखल करण्यात आले. ज्या गृहस्थास कैदेत घालण्यात आले होते त्यापैकी ५ इसमांनी आपणास हॅबिअर कॉरपुसचा परवाना मिळावा म्हणून अर्जी दिली; पण न्यायधीशांनी थोडीशी का कू करून अशा रीतीने तुमची सुटका होणार नाही, असे त्यास साफ सांगितले. या खटल्याला पुष्कळ वेळा फाईव्ह नाईटस् केस (पाच सरदारांचा खटला) या नावाने ओळखतात.

फ्रान्स देशच्या विरुद्ध लढाई करण्याचे कामी राजाला सर्वस्वी अपयश आले व पुढील दोन गोष्टींवरून लोकांना त्याचा राग जास्त आला. (१) खेड्यापाड्यांत राहणाऱ्या लोकांच्या घरी चिठ्या देऊन शिपायास राहण्याची परवानगी देणे व (२) शिपायांना लष्करी कायदा लागू करणे. जर लष्करी नियमनाचे उल्लंघन करण्याच्या कामी कोणी मुलकी अमलदार आढळण्यात आला तर त्यासही हा कायदा लागू करण्यात येत असे. कारण प्रत्यक्ष लढाईच्या जागेशिवाय दुसऱ्या ठिकाणी लष्करी कायदा लागू करणे हे त्या वेळेस इंग्लंडमधील राज्यकारभार व्यवस्थेस मुळीच माहीत नव्हते.

पैसा नसल्यामुळे चार्लसला सन १६२८ मध्ये तिसरे पार्लमेंट बोलाविणे भाग पडले. पुष्कळ आढेवेढे घेतल्यानंतर व पुष्कळ पैसा देऊ करून या पार्लमेंट सभेने 'पिटिशन ऑफ राईटस्' या नावाचे कायद्यास चार्लस राजाची संमती मिळविली. (१) पार्लमेंट सभेच्या सल्ल्याशिवाय कर बसविणे, (२) अन्यायाने कैदेत घालणे, (३) लोकांच्या घरी चिठ्या देऊन शिपायास राहण्यास पाठविणे व (४) लष्करी कायदा अमलात आणणे या सर्व गोष्टी 'पिटिशन ऑफ राईटस्' या कायद्याने गैरशिस्त ठरविण्यात आल्या होत्या. पार्लमेंटला ही फार मोठी सूट दोनशे वर्षांच्या अवधीत पहिल्याने मिळाली होता आणि सन १२९७ मध्ये 'कन्फर्मेशन ऑफ दी चार्टर्स' ही सनद मिळाल्यानंतर पार्लमेंट सभेला याहून जास्त महत्त्वाची सूट केव्हाही मिळाली नव्हती.

पण 'पिटिशन ऑफ राईटस्' (हक्कासंबंधी अर्ज) हा कायदा मंजूर झाल्यापासूनच नव्या तंट्यास प्रारंभ झाला, असे म्हटले पाहिजे. पार्लमेंट सभेच्या सल्ल्याशिवाय कर बसविण्याची जी मनाई करण्यात आली होती तीत हरएक तऱ्हेच्या जकातीचा व इतर मागण्यांचा समावेश होतो, असे पार्लमेंट सभेचे म्हणणे पडले. राजाचे म्हणणे, असा अर्थ होत नाही असे पडले व त्याने पार्लमेंट सभा विसर्जन करून ती लांबच्या मुदतीवर नेऊन टाकली. सर टॉमस वेंटवर्थ जो हाऊस ऑफ कॉमन्स सभेतील प्रतिपक्षाचा नायक होता, तो राजाच्या पक्षास या संधीस येऊन मिळाला व त्याला यानंतर लवकरच उत्तरेकडील कौन्सिलचा अध्यक्ष नेमण्यात आले.

पार्लमेंट सभा सन १६२९ मध्ये पुनः भरली. टनेज व पौडेज या कराच्या संबंधाने पुनः वाद सुरू करण्यात आला. लोकप्रतिनिधींनी बिशपांवर हल्ला करण्याचा निश्चय केला. यामुळे चार्लस राजाने पार्लमेंट सभा मोडून प्रतिपक्षाच्या पुढाऱ्यांना कैदेत टाकले. इलियट हा टॉवरमध्ये मरण पावला व व्हॅलेंटाईन आणि स्ट्रोड हे सन १६४० मध्ये शॉर्ट पार्लमेंट भरले

तेथपर्यंत तेथे कैदेतच होते. आता पार्लमेंट सभा भरविल्याशिवायच चार्लस राजाने राज्य चालविण्याचा निश्चय केला. त्याने हे असे ११ वर्षे राज्य केले. या अवधीत राज्यकारभाराच्या कामात त्याचा मुख्य मंत्री वेंटवर्थ हा होता.

पहिल्या चार्लस राजाचा स्वतंत्र राज्यकारभार सन १६२९-१६४० : ज्याअर्थी, चार्लस राजाने पार्लमेंटच्या मदतीशिवाय राज्य चालविण्याच्या मनात आणले होते त्याअर्थी त्याला तऱ्हेतऱ्हेच्या बेकायदेशीर पद्धतींनी पैसा काढावा लागे. हे असे करण्यात यश यावे म्हणून त्याला आपली संशय घेण्याजोगी कृत्ये कायदेशीर आहेत, असे धमकी देऊन न्यायाधीशांकडून जाहीर करवावे लागत असे. या अशा कृत्यांनी लोकांमध्ये जी अस्वस्थता उत्पन्न होत असे ती नाहीशी करण्याकरिता ट्यूडर घराण्यातील राजे राज्य करीत असता जी तात्पुरती कोर्ट (न्यायसभा) काढण्यात आली होती त्याचा त्याला नेहमी उपयोग करावा लागत असे. आपल्या स्वतःच्या अधिकारापेक्षाही चार्लस राजा एका गोष्टीविषयी जास्त काळजी बाळगत असे. ती गोष्ट म्हटली म्हणजे त्याच्या मताप्रमाणे धर्मसंस्थेचे नियमन व त्याने ठरवून दिल्याप्रमाणे सार्वजनिक भजन पद्धती ही होत. याप्रमाणे यावेळी जी लोकांची गाऱ्हाणी आलेली होती ती बहुतेक सर्व (१) कर, (२) न्याय पद्धती व (३) धर्म या तीन सदरांखाली येण्यासारखी होती.

कर बसविणे : पहिल्या चार्लस राजाच्या पहिल्या पार्लमेंट सभेने त्याला टनेज व पौडेज ही फक्त एक वर्षाच्या मुदतीनेच दिली होती. या देणगीची मुदत पुरी होण्यापूर्वीच ही पार्लमेंट सभा मोडून टाकण्यात आली होती. तेव्हापासून चार्लस राजा टनेज, पौडेज व इतर सर्व जकाती व मालावरील कर आपल्या एकट्याच्याच अधिकाराने वसूल करीत असे. पिटिशन ऑफ राईट, या कायद्याने या अशा जकाती वसूल करण्याचा राजाचा अधिकार नष्ट होतो असे नाही, असे तो म्हणत असे.

गलबतांवरील कर : यावेळी राजकीय आरमार फार लहान होते. लढाईच्या वेळी खलाशांसह व्यापाऱ्यांची गलबते राजाच्या आरमारास मदत म्हणून वेठीने धरीत असत व प्रत्येक बंदरापासून अमुक गलबते घ्यावीत असे ठरवत असत व ती गलबते लढाऊ होण्यास लागणाऱ्या सर्व साहित्याबद्दलचा सर्व पैसाही त्याच्यापासून वसूल करून घेत असत. या कराला गलबतांवरील कर असे म्हणत असत. सन १६३४ मध्ये अटर्नी जनरल नॉय याने त्या वेळेस लढाई कोठेही चालू नसता गलबतांवरील कर वसूल करावा, अशी राजास सूचना केली. त्याप्रमाणे त्याच वर्षाच्या हिवाळ्यापासून गलबतांवरील कराची मागणी करण्याविषयीचे हुकूम राजाने सोडले. काही बंदरांनी दुसऱ्या बंदरांच्या मानाने आमच्यावर या कराचा बोजा जास्त बसला आहे, अशी कागाळी केली; परंतु एक लंडन बंदराने ही मागणी बेकायदेशीर आहे, असे साफ सांगितले. लंडन बंदरासदेखील साफ नाही असे म्हणण्याचे धैर्य आले नाही. पुढील वर्षी फक्त समुद्रकिनाऱ्यावरील कौंटीपासूनच नाही; परंतु सर्व राज्यापासून हा

कर वसूल करण्याविषयी हुकूम निघाला. पुनः लोकांनी या कराबद्दल बोभाटा केला; पण त्यांनी पुनः कराचे पैसे दिले. सन १६३६ मध्ये तिसरा हुकूम याच बाबतीत निघाला. यावेळी मोठ्या धैर्याने जॉन हॅम्पडन याने हा कर देण्याचे साफ नाकारिले. बकिंगहॅम शायरमधील हा एक मोठा श्रीमंत गृहस्थ होता आणि त्याच्यावर फक्त २० शिलिंग दस्त बसविला होता. पार्लमेंट सभेच्या सल्ल्याशिवाय जर राजाला २० शिलिंग घेता येत आहेत तर त्याला वाटेल त्या मनुष्याची मालमिळकतही घेता येईल, असे त्याला वाटले. पुढल्या वर्षी हॅम्पडनचा खटला न्यायधीशांसमोर आला. राजाला गलबतांवरील कर घेण्याचा अधिकार आहे असे तर ते ठरवून बसले होते; परंतु आता हा कर घेणे कायदेशीर नव्हे असे दोघा न्यायधीशांनी सांगितले व तिघांनी हॅम्पडनच्या खटल्यासंबंधी काही विशेष कारणे असल्यामुळे त्याच्या बाजूला अनुकूल असे मत दिले. सात न्यायाधीशांनी राजाला अनुकूल मत दिले. मताधिक्य, इतकी थोडी मते मिळून होणे, म्हणजे पराजय झाल्यासारखेच होते; तरी पण राजाने हा कर घेणे सुरू ठेवले होतेच. सन १६३९ मध्ये हा कर वसूल करण्याचा चौथा व शेवटला हुकूम सुटला.

पैसे वसूल करण्याच्या दुसऱ्या युक्त्या - डिस्टेंट ऑफ नाईटहूड : गादीचे संदिग्ध हक्क व व्यवहारातून गेलेले कायदे अमलात आणणे हे दुसरे पैसे काढण्याचे त्याने साधन शोधून काढले होते. ज्या प्रत्येक जमीनदाराच्या ताब्यात दर साल २० पौंड उत्पन्नाची जमीन असेल त्याने नाईटहूड घेतलीच पाहिजे व ती न घेतल्यास काही तरी तडजोड केली पाहिजे, असे पहिल्या एडवर्डने ठरविले होते. हे असे करून राज्यातील सैन्य वाढवावे व बड्याबड्या उमरावांची शक्ती कमी करावी, असा एडवर्डचा हेतू होता. तो काळ बदलून गेला होता व त्यापैकी एकही हि कारण सतराव्या शतकात लागू होण्यासारखे नव्हते. तरी ज्या कोणास नाईटहूड घेण्याची इच्छा नव्हती अशा लोकांपासून तडजोडीबद्दल जो पैसा मिळेल तो वसूल करण्याकरिताच फक्त चार्लस राजाने हा व्यवहारात नसलेला कायदा पुनः अमलात आणला होता. याप्रमाणे त्याला पुष्कळ वेळा मोठमोठ्या रकमाही मिळाल्या होत्या.

शिकारीच्या रानांचा विस्तार : राजाची शिकारीची राने वाढविणे हा याच वर्गातील आणखी एक उपाय होता. त्याने या जंगलाच्या हद्दी नक्की करण्याकरिता व पूर्वी कधी या जंगलात असलेली जमीन, मग ती तशी होती, याबद्दलचा पुरावा जरी कितीही निर्बल असला तरी पुनः ती जंगलात सामील करण्याकरिता खास हुकूम देऊन, शिकारीच्या रानात मुखत्यार पाठविले. या अशा जंगलात गेलेल्या जमिनीवर शिकारीसाठी राखून ठेवलेल्या रानांसंबंधीच्या कायद्यांच्या व न्यायसभांचा अर्थातच अंमल बसे. जरी हे कायदे व न्यायसभा यांची अंमल बजाविण्याची मर्यादा चार्टर ऑफ दी फॉरेस्टस् या कायद्याने संकुचित करण्यात आली होती तरी ही फार जुलमाची असत. म्हणून त्या जमिनी शिकारीच्या रानाच्या हद्दीतून काढून घेण्याकरिता तेथील राहणाऱ्या लोकांना मोठमोठ्या रकमा देणे भाग पडले. कारण

असे केल्याशिवाय या जमिनीस सर्वसाधारण कायदे, जे कडक नसत, ते लागू करण्याचा संभव नव्हता.

मक्ते : नव्या नव्या बाबतीचे मक्ते देणे या बाबतीविषयी लोकांची फार दिवसांची ओरड होती. एलिझाबेथ राणीने हे असे मक्ते इतके दिले होते की, त्याबद्दल त्यावेळी सार्वजनिक असंतोष उत्पन्न झाला होता. सन १६०७ मध्ये पार्लमेंट सभेने जेव्हा या गोष्टीविषयी आपली नाखुशी जोरदार शब्दांनी स्पष्ट करून दाखवली तेव्हा राणीने मोठ्या सौजन्याने त्यांना मला मक्त्यांची संख्या इतकी वाढली आहे असे कोणी सांगितले नव्हते, असा निरोप पाठविला व सर्व मक्ते रद्द केले. पहिल्या जेम्सने नवेनवे मक्ते इतके दिले की, पूर्वीपेक्षा लोकांचा असंतोष फारच वाढला. सन १६२४ मध्ये मक्ते देणे हे बेकायदेशीर आहे, असे पार्लमेंट सभेने कायदा करून ठरविले होते; पण या कायद्याने एकाच व्यक्तीस असा मक्ता देता येत नाही; पण असा मक्ता एखाद्या मंडळीस देण्यास काही हरकत नाही. अशी सबब सांगण्यात आली होती आणि म्हणूनच चार्लस राजाने हे असे मक्ते मंडळीस विकून पैसे गोळा केले. आपणास पैसे मिळावेत म्हणून लोकांनीही एकत्र होऊन मक्ते मिळविण्यासाठी सनदी मंडळ्यांची स्थापना करण्याचे चालविले होतेच. अशा प्रकारचे खालील एक उदाहरण आहे - चार्लस राजाने साबण करणाऱ्यांची एक मंडळी सनद देऊन तक्रार करवली आणि या मंडळीपासून प्रत्येक टनामागे ४ पौंड घेऊन तिला बाकीच्या साबण करणाऱ्या लोकांचे साबण तपासण्याचा अधिकार देऊन ते तीस पसंत न पडल्यास बाजारात विकू न देण्याचाही हक्क त्याने तिला दिला. राजाच्या प्रिव्हीकौन्सिलाच्या सभासदांनी तर या मंडळीचे साबण आपण घ्या अशा प्रकारच्या शिफारशीची पत्रे जस्टिस ऑफ दी पीस यांच्याकडे पाठविली. असे झाल्यावर जे स्वतंत्र साबण करणारे होते ते सर्व एकत्र झाले व त्यांनी प्रत्येक टनामागे ८ पौंड देण्याचे कबूल करून या मंडळीचे सर्व हक्क राजापासून आपल्याकडे घेतले. याप्रमाणे राजाच्या खजिन्यात एका नादान रकमेचा भरणा व्हावा म्हणून असल्या वेडगळ अटींनी व्यापारास अडथळा केला जात असे.

जबर दंड : अपराध्यांपासून त्यांना शिक्षा व्हावी याच शुद्ध बुद्धीने नव्हे तर सरकारी तिजोरीत पैसा यावा म्हणूनच जबर दंड घेण्यात येत असे. ही चाल तर मक्ते देण्यापेक्षाही जास्त वाईट होती. हे असे अपराधी राजाला शरण आले तर त्यांचा सर्व किंवा अंशतः दंड पुष्कळ वेळा माफ करण्यात येत असे, हेही येथे सांगणे न्यायाने उचित आहे.

न्यायदान पद्धती : बापाप्रमाणे चार्लस राजाही न्यायाधीशांवर बळजोरी करीत असे. बळजोरीने पैसे उसने घेणे हे कायदेशीर नव्हे, असे सांगण्याबद्दल त्याने लॉर्ड चीफ जस्टिस क्रयू यास सन १६२६ मध्ये चाकरीवरून काढून टाकले. आपल्याला अनुकूल असा खटल्याचा निकाल व्हावा म्हणून तो पुष्कळ वेळा न्यायधीशांना आपल्याजवळ बोलावून नेऊन आपल्या जातवजनाचा उपयोग करीत असे. अशा प्रसंगी त्यास बहुत करून यश येत

असे; पण याचा परिणाम असा झाला की, जेव्हा लोकांना न्यायधीश हे स्वतंत्र रीतीने न्याय देत नाहीत असे कळले तेव्हा न्यायसभांच्या निवाड्यांना पूर्वी इंग्रज लोक मान देत असत त्याच न्यायसभांना निवाड्यांचे बहुतेक वजन नाहीसे झाले.

याप्रमाणे कायद्याच्या अर्थाचा अनर्थ करण्याचे कॉमनलॉचे न्यायसभास भाग पाडिले असता जे सर्व लोक राजाच्या धर्मासंबंधी किंवा राजनीतीसंबंधी आचारावर टीका करीत असत किंवा त्यास अडथळा आणत, त्यास शिक्षा करण्याचे काम स्टारचेम्बर किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या न्यायसभांकडे सोपविण्यात आले होते. अशा अपराध्यास मान खाडो घालून भर रस्त्यावर उभे करणे, फटके मारणे, डाग देणे, कान कापणे, वाटेल तितके दिवस कैदेत टाकणे व जबर दंड करणे, अशा प्रकारच्या शिक्षा होत असत.

धर्माची स्थिती : सन १६३३ मध्ये ॲबॉट मरण पावल्यानंतर चार्लस राजाने लॉड यास कॅन्टरबरीचा आर्चबिशप नेमले. लॉड हा वाईट मनुष्य नव्हता. त्याच्या पुष्कळशा प्युरिटन शत्रूप्रमाणे त्याचे विचार कोते नसत. विद्वान गृहस्थास विचारस्वातंत्र्य पुष्कळ देण्यास तो कबूल असे. पण धर्मासंबंधी वादविवाद लोकांनी करणे त्यास मळीच आवडत नसे. सर्व लोकांनी ईश्वराची उपासना एकाच ठरीव पद्धतीने करावी व तीत कोणी फेरबदल करू नये किंवा तिजवर टीका करू नये, असे त्यास वाटत असे. भपकेदार पोशाखांची व इमारतीची त्यास फार आवड असे. त्याचा आग्रह सर्व धर्मसंस्कारविधी यथासांग असावेत, असा असे. बिशप लोकांच्या अधिकारांचे काही झाले तरी रक्षण करावे हा त्याचा सर्वांत मोठा हेतू होता. या सर्व गोष्टी राजाला ज्याअर्थी मान्य असत त्याअर्थी राजाच्या अधिकाराचे माहात्म्य वाढविण्याच्या कामात लॉड एकसारखा तत्पर असे. राजाकडे धर्माचे संबंधाने सर्व श्रेष्ठत्व असल्यामुळे कॅथोलिक आणि प्युरिटन या दोन्ही पंथांच्या लोकांपासून त्याचे रक्षण करण्याचे काम त्याचेच होते. धर्माचे असे संरक्षण झाले म्हणजे राजाच्या इच्छेप्रमाणे सर्वथैव वागणे हेच काय ते आपले कर्तव्य कर्म आहे, असे धर्मसंस्थेने आपल्या अनुयायास शिकविणे साहाजिकच होते.

ही अशी कृत्ये करून चार्लस व लॉड हे प्युरिटन लोकांच्या दीर्घ द्वेषास पात्र झाले. प्युरिटन लोक यांना सत्य धर्माचे लोप करणारे प्रजापीडक व त्याच धर्माला फसवून हळूहळू रोमन कॅथोलिक पंथाचे स्वरूप देणारे देशाचे शत्रू, असे मानीत असत; परंतु या अशा प्युरिटन मताच्या वादकर्त्यांनी स्टारचेम्बर या न्यायसभेपुढे आणून पुष्कळ वेळा घोर निर्दयपणाच्या शिक्षा देण्यात येत असत. हाय कमिशन या न्यायसभेपुढे प्युरिटन पंथाच्या धर्मोपदेशकांना बोलावून आणून त्यास तोंडी ताकीद देण्यात येत असे किंवा त्यास अधिकारावरून बातल करण्यात येत असे. प्युरिटन पंथांच्या लोकांना ज्या धर्मोपासनेचा तिटकारा असे ती धर्मोपासना करण्यास भाग पाडण्यात येत असे. गांजून गेलेले खरे तरी पण हारी न जाणारे प्युरिटन लोक पूर्वीपेक्षाही अधिकच एककल्ली व असहिष्णू बनले. पूर्वी काही विधी व

संस्कार याच्याच संबंधाने त्यांची हरकत असे; पण आता तर ते बिशप लोकांनी केलेल्या धर्मनियमनाचे कट्टे शत्रूच बनून राहिले होते. काही लोक तर याच्याही पुढे गेले व धर्मनियमन हे एकसारखे नसलेच पाहिजे, असे म्हणू लागले. त्यांच्या मताप्रमाणे प्रत्येक धर्मपंथाच्या कृत्यास अनियंत्रता असावी असे होते.

स्कॉटलंडमधील लोकांचे बंड व शॉर्ट पार्लमेंट :

सन १६३७ मध्ये चार्लस राजाने जर इंग्लंडमधील सामाजिक भजन पद्धतीप्रमाणे स्कॉटलंडमधील लोकांना ईश्वरोपासना करण्यास भाग पाडले नसते तर ज्या राज्य पद्धतीचे वर्णन वर करण्यात आले आहे त्या राज्य पद्धतीने चार्लस राजाला आणखी काही दिवस राज्य करता आले असते. या त्याच्या यत्नाने खरोखर पाहू गेले असता एक बंडच उद्भवले; पण त्या बंडाला राजभक्तीचे स्वरूप मात्र देण्यात आले होते. सर्व स्कॉटलंडमधील लोकांनी एकत्र होऊन प्रसिद्ध नॅशनल कॉव्हेनंट या नावाच्या कराराप्रमाणे चालण्याचे कबूल केले. या कराराप्रमाणे (सन १६३८) त्यांनी प्रेसबिटेरिअन पंथाचे व राजाच्या सत्तेचे रक्षण करण्याचे ठरविले व आपला हेतू सिद्धीस नेण्याकरिता एक सैन्य गोळा गेले. चार्लस राजाने हे बंड मोडण्याचा यत्न केला; पण पार्लमेंट सभेच्या मदतीशिवाय आपल्याला तसे करण्याची शक्ती नाही, असे त्याच्या लक्षात आले, म्हणून सन १६४० च्या उन्हाळ्यात त्याने आपले चौथे पार्लमेंट भरविले. या पार्लमेंटच्या मनातून पहिल्याने जे अन्याय होत होते ते बंद करण्याचे उपाय योजावेत असे होते व चार्लस राजाच्या मनातून पहिल्याने तिने आपल्यास पैसे द्यावे असे होते. अशा रीतीने लढा उत्पन्न झाल्यामुळे चार्लस राजाला ही पार्लमेंट सभा मोडण्याचे भाग पडले. ही पार्लमेंट सभा फक्त दोनच महिने काम करीत होती आणि म्हणून हीस शॉर्ट पार्लमेंट (थोड्या दिवसांची पार्लमेंट) असे म्हणतात. चार्लस राजाने पुनः पार्लमेंटाच्या मदतीशिवाय स्कॉटलंड देशातील बंड मोडण्याचा यत्न चालविला; परंतु लोकांनी उलट इंग्लंडवर स्वारी केली व ते यॉर्क शहर हस्तगत करून घेतील असा रंग दिसू लागला. चार्लस राजाने शेवटचा उपाय म्हणून एक बड्या लोकांची मोठी सभा याच वर्षाच्या सप्टेंबर महिन्यात भरविली. ही अशी सभा नॉर्मन घराण्यातील राजाच्या वेळेपासून सुमारे २०० वर्षांत कोणीही राजाने भरविली नव्हती; परंतु या बड्या लोकांना राजाने धर्माच्या कामात व राज्यकारभाराच्या कामात केवळ आपल्याच मताप्रमाणे जी व्यवस्था चालविली होती ती मुळीच आवडत नव्हती आणि म्हणूनच त्यांनी त्याला दुसरे पार्लमेंट भरविण्याविषयी सल्ला दिला. चार्लस राजाला त्याच्या मताप्रमाणे चालणे भाग पडले. लोकांनी प्रतिनिधी निवडून पाठवावेत, असा त्याने हुकूम सोडला. या वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यात हे नवे पार्लमेंट भरले. इतिहासात या पहिल्या चार्लस राजाच्या पाचव्या व शेवटल्या पार्लमेंटास लाँग पार्लमेंट (फार दिवसांचे) असे म्हणतात.

लाँग पार्लमेंट : ही सभा सुमारे २० वर्षे काम केल्यानंतर म्हणजे सन १६६० यावर्षी मोडली; पण तिची खरी सत्ता जेव्हा या सभेतील बहुतेक (प्रेसबिटेरिअन) सभासद हुसकून

देण्यात आले (सन १६४८) तेव्हाच समाप्त झाली, असे म्हटल्यास चालेल. या आठ वर्षांच्या इतिहासाचे आपणास पुष्कळ भाग पाडता येण्यासारखे आहेत.

(१) सुधारणेच्या संबंधाने एकवाक्यतेचा काळ : ही मुदत फारच थोड्या महिन्यांची म्हणजे सन १६४० च्या नोव्हेंबरपासून सन १६४१ च्या ऑगस्टपर्यंतचीच काय ती होती; पण इतक्या थोड्या मुदतीत फार महत्त्वाची कामे घडून आली. पार्लमेंटने पहिले काम चार्लस राजाच्या मंत्र्यांच्या कामाची झडती घेण्याचे केले. आपल्याला आता देहान्त शिक्षा खास होणार, अशी त्यांची पूर्ण खात्री झाली. विंडबँक जो सेक्रेटरी ऑफ स्टेट या हुद्यावर होता व फिंच जो लॉर्ड कीपरच्या हुद्यावर होता. या दोघांनी पळून जाऊन आपला जीव बचाविला. वेंटवर्थ जो यावेळी अर्ल ऑफ स्टॅफर्ड या पदवीवर चढला होता. त्याजवर हाऊस ऑफ कॉमन्स या सभेने खरोखर दोषारोपही केला होता; पण या दोषारोपापासून काही निष्पन्न होणे नाही असे जेव्हा या सभेस आढळून आले तेव्हा त्याजवर ॲक्ट ऑफ ॲटेण्डर या कायद्याने दोष शाबीत करून त्यास देहान्ताची शिक्षा देण्यात आली. त्याजवर राजद्रोहाचा दोष ठेवण्यात आला होता; परंतु इंग्लंड देशातील कायद्याप्रमाणे खास राजाच्या विरुद्धच जर कोणी आचरण केले तर त्याच्यावर राजद्रोहाचा गुन्हा शाबीत होत असतो; परंतु हा अशा प्रकारचा गुन्हा वेटवर्थ याने कधीही केला नव्हता. राजाचा तर तो बंदा नोकर होता. त्याने राजाला पार्लमेंटच्या मदतीशिवाय राज्य कसे करावे हे शिकविण्याच्या कामात फार मेहनत घेतली होती. गेल्या १२ वर्षांतील बहुतेक बेकायदेशीर कामे करण्यात त्याने राजाला सल्ला दिला होता किंवा आपली संमती दिली होती. इंग्लंडमधील राज्यकारभार पद्धतीचे व लोकांच्या हक्काविरुद्ध जाण्याचा त्याने अपराध केला होता. संधी सापडल्याबरोबर राजा त्याला पुनः अधिकारसंपन्न करील अशी जर हाऊस ऑफ कॉमन्स या सभेची खात्री नसती तर त्यांनी त्याला देहान्ताइतकी जबर शिक्षा दिली नसती. स्ट्रॅफर्डला जीवदान मिळावे म्हणून जेव्हा त्याचा एक मित्र अर्ल ऑफ एसेक्स या बड्या गृहस्थाकडे गेला तेव्हा स्ट्रॅफर्डला देहान्त शिक्षा दिल्याशिवाय गत्यंतरच नाही, असे त्याने त्यास उत्तर दिले.

याचवेळी कॅन्टरबरीचा आर्चबिशप जो लॉड याजवरही राजद्रोहाचा दोषारोप करण्यात आला. त्याचा खरा अपराध म्हणजे स्ट्रॅफर्डचा जो अपराध तोच होता. स्टॅफर्ड ज्याप्रमाणे राजाच्या राजकीय बाबतीत मसलत देणारा होता त्याचप्रमाणे धर्मसंबंधी कामात लॉड हा होता. त्याने राजाला जो सल्ला दिला तो एकंदर राष्ट्राच्या मताविरुद्ध होता. याच्याही संबंधाने निर्दयपणाने वागण्याकडे कॉमन्स सभेचा कल होताच. कारण त्यांनी ज्याला राजद्रोही म्हणून ठरविले होते त्याला आपला पुनः सल्लागार केल्याशिवाय राजा कधीही राहणार नाही, असे त्यास माहीत होते; परंतु ते याला स्ट्रॅफर्डपेक्षा कमी भीत असत आणि म्हणूनच त्यांनी त्यास कैदेतच राहू दिले होते.

राजाला आपल्या प्रजेच्या मताविरुद्ध कोणत्याही बहाण्याने पैसा काढता येऊ देऊ नये या गोष्टीसंबंधाने या लाँग पार्लमेंटमधील प्रत्येक सभासदाचे एक मत होते. या पार्लमेंटाने एक कायदा करून फार थोड्या मुदतीपर्यंत टनेज व पौडेज या जकातीच्या दोन बाबी राजाला दिल्या; पण पार्लमेंटच्या सल्ल्याशिवाय राजाने कोणतीही बंदर जकात बसवू नये असे याच कायद्याने त्यांनी ठरवून टाकले होते. याच पार्लमेंटने गलबतावरील कर घेणे हे गैरकायदेशीर आहे हे कायदा करून ठरवून टाकले, व आणखी दोन कायदे करून एकाने शिकारीच्या रानाच्या मर्यादा ठरवून टाकल्या व एकाने डिस्टेंट ऑफ नाईटहूड हा कर बंद केला. पिटिशन ऑफ राईट व हे वरील चार कायदे मिळून हाऊस ऑफ कॉमन्स या सभेच्या मर्जीविरुद्ध राज्य चालविणे हे काम दुस्तर होऊन बसले होते.

पूर्वीच्या राजकर्त्यांनी ज्या विशिष्ट न्यायसभा स्थापन केल्या होत्या त्या सर्व बंद करण्याच्या कामीही या लाँग पार्लमेंटमधील सर्व सभासद एक मताचे होते. या पार्लमेंट सभेने स्टार चेम्बर या नावाची जी न्यायसभा होती ती बंद करून टाकली. ही न्यायसभा बंद केल्याने किंग्स कौन्सिल या न्यायसभेकडील फौजदारी काम चालविण्याचा सर्व अधिकार अर्थात्च नाहीसा झाला. या स्टार चेम्बर न्यायसभेबरोबर कौन्सिल ऑफ दी नार्थ व कौन्सिल ऑफ दी वेल्स याही बंद करण्यात आल्या. या सभेने कोर्ट ऑफ हाय कमिशन ही न्यायसभा बंद केली व राजाच्या प्रजेपैकी कोणाही मनुष्यास कोणत्याही अपराधाबद्दल कैद, दंड किंवा कोणत्याही प्रकारची शारीरिक शिक्षा करण्याचा धर्मन्यायसभेचा अधिकार काढून घेतला.

हे महत्त्वाचे फेरफार करीत असता आपले रक्षण व्हावे म्हणून या पार्लमेंट सभेने राजाला एक कायदा मंजूर करण्यास लाविले होते. या कायद्याने पार्लमेंट सभेच्या मताशिवाय राजाला ती मोडून टाकण्याचा किंवा ती मोडून टाकून लांब नेण्याचा किंवा ती तहकूब करण्याचा अधिकार नाही, असे ठरविण्यात आले होते. राजाने पुढे कधीही पार्लमेंट सभेच्या मदतीशिवाय राज्य करण्याचा यत्न करून देशावर संकट आणू नये म्हणून या पार्लमेंटने पहिला ट्रायेनिअल ॲक्ट मंजूर केला. मागील पार्लमेंट सभा भरल्याच्या शेवटच्या दिवसाच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत नवी पार्लमेंट सभा भरविली पाहिजे, असे या कायद्याने ठरविण्यात आले होते. या कायद्याची मुख्य कलमे खाली दिल्याप्रमाणे होती : कोणाही पार्लमेंट सभेच्या शेवटच्या बैठकीच्या शेवटल्या तारखेपासून ती मोडून लांबच्या मुदतीवर टाकून किंवा तिला तहकूब करून तिची मुदत तीन वर्षांपेक्षा जास्त वाढवू नये. तिसऱ्या वर्षाचे सप्टेंबर महिन्याच्या १० च्या तारखेनंतर एका आठवड्याच्या आत लॉर्ड चॅन्सेलर याने प्रतिनिधी निवडून काढण्याकरिता हुकूम काढावे. या अधिकाऱ्याने जर हे असे हुकूम काढले नाहीत तर बड्या लोकांनी एकत्र जमून असे हुकूम काढावेत; जर हे असे हुकूम काढण्याचे बड्या लोकांकडून घडले नाही तर प्रत्येक कौंटीच्या शेरिफाने व प्रत्येक पार्लमेंट सभेस सभासद पसंत करून पाठविण्याचा हक्क ज्या गावास आहे त्या गावाच्या

मेअराने अशा हुकमांची वाट न पाहता सभासद पसंत करावेत. अखेरीस जर हे मेअर व शेरीफ आपल्या कर्तव्यास चुकले तर सरकारी सूचना आल्याशिवाय शहरवासी लोकांनी व जमीनदारांनी सभासद निवडण्याच्या कामास सुरुवात करावी.

याप्रमाणे जेव्हा सन १६४१ मध्ये लाँग पार्लमेंट तहकूब करण्यात आले, तेव्हा इंग्लंडमधील राज्यकारभाराच्या व्यवस्थेचे स्वरूप हल्लीच्या तिच्या स्वरूपाजवळ येऊन ठेपले होते. राजाचे मंत्री आपापल्या कामांबद्दल पार्लमेंट सभेस जबाब देण्यास पात्र आहेत, पैसा देणे (राजाला खर्चावयास) हे हाऊस ऑफ कॉमन्स या सभेच्या स्वाधीन आहे, कॉमन लॉ व कायदेशीर स्थापन केलेल्या न्यायसभा यांचा अधिकार सर्वस्वी मान्य आहे, या गोष्टी निःशंक व निर्विवाद रीतीने त्यावेळी सिद्ध होऊन बसल्या होत्या.

ज्या दुहीमुळे अखेरीस देशातल्या देशात लढाई सुरू झाली तो काळ : वास्तविक रीतीने पाहू गेले असता ही सर्व कामे होईतोपर्यंत हाऊस ऑफ कॉमन्सचे सर्व सभासद एकमताचे होते, असे म्हटले पाहिजे. या सर्व कामांच्या विरुद्ध मताचे जरी त्या सभेत काही सभासद होते असे धरून चालले तरी त्यांची संख्या इतकी थोडी होती, की त्यांच्या तोंडातून या कामाच्याविरुद्ध एक चकार शब्दही कधी निघाला नाही; परंतु हा एकोपा संपण्याची वेळ आता आली होती. ज्यांनी त्यांच्या जुलमी राज्यकारभाराबद्दल चार्लस राजाला दोषी ठरविले होते व ज्यांनी लॉर्डला त्याच्या धर्मखात्यासंबंधी जुलमी कृत्यांबद्दल दोषी ठरविले होते, त्या सभासदांचे हळूहळू दोन तट पडू लागले. हल्ली जे पार्लमेंट सभेमध्ये मुख्य दोन पक्ष आहेत त्या पक्षांचे हे पक्ष जनक होत, असे म्हटल्यास चालेल. या पक्षांचे मतभेद मुख्यत्वेकरून दोन बाबतीचे होते. (१) राज्यकारभारासंबंधी व (२) धर्मासंबंधी.

राज्यकारभारासंबंधी मतभेद : ज्या पुष्कळ लोकांनी चार्लस राजाची कृत्ये बेकायदेशीर आहेत म्हणून त्यास दूषण लावले होते, त्यास आता सुधारणा व्हावी तितकी झाली आहे असे वाटू लागले. त्यांच्या मनात इंग्लंडमध्ये चालत आलेली राज्यकारभारव्यवस्था बदलून टाकावी असे नव्हते. राजाच्या हाती पुरेशी सत्ता राहू दिल्याशिवाय त्याला राज्य चालविता कसे येईल, याची त्यास कल्पना करता येईना. एखाद्या मनुष्याचे आपल्या कुटुंबातील मनुष्यांवर जितके प्रेम असते किंवा धर्माविषयी जितकी पूज्य बुद्धी असते तितकी बहुतेक या गृहस्थांची खास राजाविषयी स्वामिभक्ती होती. लंडन व इतर ठिकाणी त्यांच्या दृष्टीस जी अव्यवस्था व धामधूमीची चिन्हे पडू लागली होती त्यामुळे त्यांना भय वाटू लागले होते. या सर्व कारणांमुळे त्यांच्या मनात राजकीय बाबतीत आणखी फेरबदल करण्याचे नव्हते. या पक्षाचे हाईड व फॉकलंड हे अत्यंत प्रख्यात पुरुष होते.

हा पक्षापेक्षा ज्या पक्षात लोकांची संख्या अधिक होती त्या पक्षातील लोकांचे समाधान इतक्याच गोष्टींवरून होईना. ते चार्लस राजावर विश्वास ठेविनात. ते त्याला असत्यवादी व लटपट्या समजत असत. पार्लमेंट सभा मोडल्याबरोबर चार्लस राजा आपल्या जुन्या वाईट

मार्गाने वागू लागेल, आपल्या ज्या दिवाणास शिक्षा करण्यात आली आहे त्याच्याऐवजी जुलूम करण्यास साधनीसूत अशी नवीन पात्रे पसंत करील व जे कायदे त्याने मान्य केले होते ते मोडण्यास नवे मार्ग शोधून काढील, असे त्यास भय वाटत होते. जोपर्यंत पार्लमेंट सभेची बैठक चालू असे, तोपर्यंत तिच्या अंगी सामर्थ्य असे; पण एकदा का ती मोडली म्हणजे तिचे सभासद व इतर सभ्यगृहस्थ यांच्यात काहीही भेद राहत नसे. त्या दिवसांत पार्लमेंट सभेच्या बाहेर कोणत्याही पक्षाची कामगिरी करण्यासाठी व्यवस्था लावलेली नसे व सर्व देशभर जलदीने बातमी पोहोचण्याची काहीही साधने नसत. अशा स्थितीत खरा राज्यकारभार राजाच्याच हाती असणार व तो आपल्या सर्व शत्रूस एकामागून एक चिरडून टाकणार, म्हणून त्या लोकांना असे वाटले की, इतके जर हाऊस ऑफ कॉमन्स या सभेने केले आहे तर तिला शहाणपणाच्या दृष्टीने आणखी काही जास्त काम करणे भागच आहे. या सभेने राज्यकारभार आपल्या ताब्यात आणला पाहिजे व राजाचे मंत्री कोण असावेत हे ठरविले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. त्यांच्या मनात चार्लस राजाच्या बापास व ट्यूडर घराण्यातील राजास जी सत्ता होती ती चार्लस राजापासून हिसकावून घ्यावी, असे होते व सन १६८८ मध्ये झालेल्या राज्यक्रांतीच्या योगाने चार्लस राजानंतरच्या राजास जी स्थिती प्राप्त झाली होती ती स्थिती चार्लस राजाची करावी असे होते. हे विचार ज्या पक्षाचे होते त्या पक्षाचे पुढारी हॅम्पडन व पिम हे होते.

या वेळेस चार्लस राजाने जो उपाय योजला होता व त्याप्रमाणे जर तो चालला असता तर, सर्व पक्षांच्या लोकांना संकटातून सहज मोकळे होण्यास सापडले असते. आपल्या पार्लमेंटच्या मतास आपली संमती आहे असे तो दाखवू लागला. सन १६४२ च्या प्रारंभी हाऊस ऑफ कॉमन्समधील प्युरिटन पक्षाचा पुढारी जो पिम त्यास त्याने चॅन्सेलर ऑफ दी एक्सचेकर या हुद्याचे काम करण्यास सांगितले; पण त्याच्या या सांगण्यापासून काहीही फळ निष्पन्न झाले नाही. नंतर ही जागा त्याने सर जॉन कलपेपर यास दिली व लॉर्ड फॉकलंड यास सेक्रेटरी ऑफ स्टेटची जागा दिली हे दोघेही गृहस्थ प्युरिटन पंथाचे नव्हते; परंतु राज्यकारभारासंबंधी स्वतंत्रता असावी अशासाठी त्यावेळी चाललेल्या झगड्यात ते पुढारी होते. हेच जर चार्लस राजाने अगोदर केले असते तर त्याला स्वतःला पीडा पुष्कळ कमी झाली असती. हाऊस ऑफ कॉमन्स या सभेचा आपल्यावर पुनः भरवसा बसवून घेण्याची त्याची वेळ पार निघून गेली होती व नव्या दिवाणावर चार्लस राजाचा विश्वास मुळीच नव्हता. त्यामुळे त्याच्या राज्यकारभाराच्या पद्धतीवर त्यांचे वजन मुळीच पडत नव्हते.

धर्मासंबंधी मतभेद : धर्मासंबंधी मतभेद जर नसते तर हे राज्यकारभारासंबंधी असलेले मतभेद अजूनही नाहीसे करता आले नसते. या मतभेदाची वाढ पुढे लिहिल्याप्रमाणे झाली :

हाऊस ऑफ कॉमन्स सभेतील जरी सर्व नाही तरी बहुतेक सभासद कट्टे प्रॉटेस्टंट पंथाचे होते. खऱ्या धर्माचे संरक्षण करणे व खोटा धर्म नाहीसा करणे हे प्रत्येक राष्ट्राचे

मुख्य कर्तव्य आहे, असे त्या सभेतील बहुतेक सभासदास वाटत असे. सर्व राष्ट्रातील प्रजेची धर्मसंस्था एक असावी व त्या धर्मसंस्थेविरुद्ध हरत-हेने वागणाऱ्यांचा बीमोड झाला पाहिजे, असेही मत त्या बहुतेक सर्व सभासदांचे होते. त्या बहुतेक सर्व सभासदांनी रोमन कॅथोलिक पक्षाच्या लोकांचा छळ करणे हे न्यायाचे आहे असे कबूल केले असते- निदान या लोकांना कोणतीही अधिकाराची जागा, सत्ता किंवा सूट नसावी, असे तरी त्या सर्वांचे एकमत झाले असते. ज्याप्रमाणे त्यांनी रोमन कॅथोलिक लोकांना वागविले असते, त्याचप्रमाणे यावेळी जे नवे नवे लहान पंथ ॲनाबॅप्टिस्ट, सेपॅरॉटिस्ट वगैरे उत्पन्न होत होते त्या सर्व त्यांच्या मताप्रमाणे पाखंडी मताच्या लोकांना त्यांनी वागविले असते. ज्याप्रमाणे प्राचीनकाळी राष्ट्रीय धर्मसंस्था एक होती, त्याचप्रमाणे ती पुढेही असावी असे जरी त्या सर्वांचे एक मत होते तरी धर्मासंबंधी शासन कसे असावे, भजन पद्धती कशी असावी, याविषयी त्यांची मते वेगवेगळाली असत व या सर्व कृत्यांच्या मुळाशी मत काय असावे या गोष्टीसंबंधी त्यांचा फारसा कडक वाद नसे. ज्या पुष्कळ लोकांनी लॉर्डच्या धर्मासंबंधी कारभाराच्या लुडबुडीला, त्याच्या संस्काराच्या भपक्याच्या आवडीला व त्याच्या मतांहून ज्यांची मते वेगळी असत त्यांना तो ज्या निर्दयतेने वागवत असे त्या निर्दयतेला, जरी दोष दिला होता तरी तेच लोक प्रेसबिटेरिअन धर्मशासनापेक्षा एपिस्कोपेलिअन धर्मशासन जास्त पसंत करीत. कॉमन प्रेअरच्या (सार्वजनिक भजन पद्धतीच्या) पुस्तकावर ते प्रेम करीत व प्युरिटन धर्मपंथाच्या करडेपणाचा व साधेपणाचा ते द्वेष करीत असत. लॉर्डला पदच्युत केल्यापासून जरूर त्या धर्मासंबंधी सुधारणा करण्यास फक्त प्रारंभ झाला असे कित्येकांचे मत होते. त्यांच्या मनात बिशप लोक नाहीसे करावेत, लिटर्जीचा त्याग करावा व इंग्लंडच्या धर्मपद्धतीचे स्वरूप स्कॉटलंडमधील धर्म पद्धतीच्या स्वरूपास नेऊन मिळवावे असे होते.

हे जे धर्मासंबंधी मतभेद होते ते फार हळूहळू अगदी परस्पर विरुद्ध असे झाले. चार्लस राजा जर मोठा मुत्सदी असता तर त्याने थोड्या दिवसांसाठी तरी काही तडजोड काढली असती; परंतु चार्लस राजाने आपल्याला पुनः सत्ता मिळावी म्हणून आपल्या शत्रूंना एकमेकांशी भांडावयास लावले आणि अशा रीतीने हे भांडण विकोपास जाऊन त्याजमुळे अखेरीस देशातल्या देशात लढाई सुरू झाली.

(३) लाँग पार्लमेंटची व राजाची लढाई : जेव्हा ही लढाई देशातल्या देशात सुरू झाली तेव्हा अनतिक्रमी पक्षाचे लोक हाईड व फॉकलंड यांच्या पुढारीपणाखाली राजाचे पक्षास येऊन मिळाले, तेव्हा अर्थात्च पार्लमेंट सभाही पिम आणि हॅम्पडन ज्या सरसावलेल्या पक्षाच्या पुढारी होते त्या पक्षाचे हाती लागली. या दोन्ही पक्षांतील उत्तम लोक ज्याअर्थी त्यांना वाईट वाटत असताही लढत होते त्याअर्थी शांतता व्हावी म्हणून पुष्कळ प्रयत्न करण्यात आले; पण ज्या दोन अडचणींचे पूर्वीच वर्णन करण्यात आले आहे त्या अडचणींमुळे हे सर्व यत्न व्यर्थ गेले. राजा आपले मंत्री पसंत करण्याची व

देशावर राज्य चालविण्याची सत्ता सोडून देण्यास कबूल होईना व प्रेसबिटेरिअन पंथाच्या धर्मव्यवस्थेप्रमाणे इंग्लंडच्या धर्मव्यवस्थेची रचना तो किंवा त्याचे पक्षाचे कॅव्हेलिअर हे करू देईनात. पार्लमेंट सभेच्या पुढाऱ्यांच्या मनात राजाच्या हातात सत्ता राहू द्यावी असे नव्हते. पार्लमेंट सभेच्या पुढाऱ्यांचे व त्यांच्या अनुयायांच्या मनात इंग्लंडमधील धर्मसंस्था कसे तरी करून प्रेसबिटेरिअन पद्धतीवर आणून ठेवावी असे होते. धर्मासंबंधी सर्वांचे हक्क सारखे आहेत असे एकही पक्ष कबूल करीत. प्रत्येक पक्ष याप्रमाणे कधी न मिळणारे श्रेष्ठत्व मिळावे या हेतूने लढाई करण्यास प्रवृत्त झाला.

राजाला पहिल्याने लढाईत जय येत गेला. तेव्हा पार्लमेंट सभेने सॉलेम लीग आणि कॉव्हेनंट या नावाच्या एका कबुलायतनाम्यावर सह्या केल्या व स्कॉटलंड देशातील फौजेस इंग्लंडमध्ये शिरण्यास आमंत्रण दिले. या उपायांनी इंग्लंडचा सर्व उत्तर भाग त्यांनी काबीज केला. आता प्रेसबिटेरिअन पक्षाचा जय होईल असे सर्वांना खास वाटू लागले. राज्यक्रांती ज्या वेळेस होत असते ते वेळी जो पक्षा कोणतीही गोष्ट थडीस नेऊन लावण्यास सिद्ध असतो. त्याच्या हाती सर्व सत्ता येते असा सर्वसाधारण नियम आहे. इंडिपेंडेंट या नावाचा जो नवा पंथ निघाला होता त्यातील मनुष्यांची संख्या जरी थोडी होती तरी ते लोक फार बुद्धिवान व शूर होते. आपल्या स्वतःच्या मतांविषयी त्या लोकांना अत्यंत वेड असल्यामुळे प्रेसबिटेरिअन लोकांचा जुलूम, बिशपांच्या जुलमापेक्षा कमी आहे, असे त्यांना वाटेना. जी धर्मशासन पद्धती तो अधर्माची व निंद्य आहे असे मानित असे तीच धर्मपद्धती चार्लस आपला सर्व अधिकार खर्च करून इंग्लंडमध्ये स्थापन करील अशा आशेने त्यास इंग्लंड देशाच्या गादीवर राहू देण्याविषयीचा प्रेसबिटेरिअन लोकांचा मूर्खपणा त्यांच्या लक्षात येऊन चुकला होता. म्हणून ऑलिव्हर क्रॉम्वेलाचे अनुयायी, इंडिपेडेंट पंथाचे लोक, आपल्या स्वतःच्या कल्पनेप्रमाणे कामास लागले. सेल्फ डिनाईंग ऑर्डिनन्स हा कायदा सन १६४५ मध्ये मंजूर करून घेऊन त्यांनी अगोदर सर्व सैन्य आपल्या ताब्यात घेतले. या कायद्याने पार्लमेंट सभेतील दोनही उपसभांच्या सभासदांचे सैन्यातील अधिकार काढून घेण्यात आले होते. नंतर त्यांनी सैन्याची रचना पुनः केली व नेसबी येथे चार्लस राजाचा जंगी मोड केला. या वेळेपासून सैन्य व पार्लमेंट सभा यांच्यामध्ये सत्तेविषयी भांडण सुरू झाले. या दोन पक्षांपैकी प्रत्येक पक्षातील लोकांनी राजाशी कोणत्या तरी तहेने तडजोड करण्याचा यत्न सुरू केला. राजाने एका पक्षाचे दुसऱ्या पक्षांशी भांडण लावण्याचे सुरू केले. सरतेशेवटी सैन्यास दम धरवेना. स्कॉटलंडमधून राजाच्या पक्षाने इंग्लंडवर केलेल्या स्वारीचा पराजय केल्यानंतर त्यांनी हाऊस ऑफ कॉमन्स सभेतील जितके प्रेसबिटेरिअन पंथाचे लोक होते ते सर्व हुसकावून काढले, चार्लस राजाला त्याच्या कृत्यांची चौकशी करण्यासाठी न्यायसभेपुढे आणले, त्यास दोषी ठरविले व देहान्ताची शिक्षा दिली, बड्या लोकांची उपसभा मोडून टाकली व इंग्लंड हे स्वतंत्र प्रजासत्ताक राज्य आहे, असे जाहीर केले.

सैन व रंप : सर्व राजकीय सत्ता आता सैन्याच्या व लाँग पार्लमेंटपैकी जे सभासद शिल्लक होते, म्हणजे ज्यांना रंप असे म्हणत असत, त्यांच्या हाती आली. एकेचाळीस सभासदांच्या एका राष्ट्रमंत्रिमंडळीने व हाऊस ऑफ कॉमन्स या सभेने सर्व राज्यकारभार चालवावा, असे कायद्याने ठरविण्यात आले. ज्या सभासदांना प्रतिबंध करण्यात आला होता त्यापैकी थोड्या सभासदांना पार्लमेंट सभेत बसण्याची परवानगी देण्यात आली व ज्या नियोजक लोकसमूहांकडून ज्या पक्षाच्या हाती सत्ता होती त्या पक्षास अनुकूल असे सभासद निवडून येण्याची खात्री होती त्या समूहास सभासद निवडून पाठविण्याची परवानगी मिळाली. यावेळी सैन्य व हाऊस ऑफ कॉमन्स यांचे एक मत होते. या नव्या प्रजासत्ताक राज्याला चोहोबाजूंनी शजूंनी वेढून घेतले होते; पण कॉम्वेलाच्या बुद्धीपुढे व शहाणपणापुढे कोणाचेही काही चालेनासे झाले. आयर्लंड व स्कॉटलंड हे दोन्ही देश जिंकून घेण्यात आले व कॅव्हेलिअर पक्षाचे तुकडेतुकडे होऊन गेले; परंतु संकटाची वेळ निघून गेल्याबरोबर सैन्य व रंप यांच्यामध्ये भांडण सुरू झाले. थोड्याच दिवसांपूर्वी हाऊस ऑफ कॉमन्स या सभेपुढे ॲग्रीमेंट ऑफ दी पीपल (लोकसमूहाचा करारनामा) या नावाचा जो करारनामा सैन्यातील अधिकाऱ्यांनी ठेवला होता त्या करारनाम्यात लिहिल्याप्रमाणे एक व्यवस्थित राज्यकारभार पद्धती असावी व नवे पार्लमेंट असावे असे सैन्याचे मागणे होते. रंप या नावाच्या पक्षाला सर्व सत्ता आपल्या हातात असावी असे वाटत होते. सरते शेवटी सन १६५३ च्या एप्रिल महिन्यात हाऊस ऑफ कॉमन्स या सभेतील सभासदांस हुसकावून देऊन क्रॉम्वेलने हा तंटा मिटविला.

ऑलिव्हर क्रॉम्वेल याची कारकीर्द : या वेळेपासून तो त्याच्या मृत्यूपर्यंत क्रॉम्वेल हाच इंग्लंडचा खरोखर राजा होता. त्याचे फार मोठे धैर्य व बुद्धी ही दिसून आली व त्याने कीर्तीही पुष्कळ मिळविली; पण त्याने राज्यकारभार पद्धतीचा कायदेशीर रीतीने पाया घालण्याचे जे जे यत्न केले ते ते सर्व व्यर्थ गेले. जो पुष्कळांशी कॉन्झरव्हेटिव्ह पक्षाच्या लोकांच्या मतांचा होता. जर त्याला राजाप्रमाणे अंमल चालविण्यास अधिकार आहे असे लोकांनी पूर्णपणे कबूल केले असते, तर एखाद्या राज्यकारभार पद्धतीच्या बंधनासदेखील तो कबूल झाला असता. इंग्लंडचे कायदेशीर राजे राज्य करीत असताना जी सार्वजनिक कामे बडे लोक व गृहस्थ लोक करीत असत ती आपल्या कारकीर्दीत त्यांनी करावी अशी क्रॉम्वेलची इच्छा होती. त्याच्या मनात टाईथ (दशांशकर) हा कर सर्वांपासून घेऊन व्यवस्थित रीतीने धर्मोपदेशकांच्या नेमणूका कराव्या व कोणत्याही धर्मोपदेशकावर एका अमुक प्रकारच्याच पद्धतीप्रमाणेच वागले पाहिजे, असा जोरा नसावा, असे त्याला वाटत असे. कोणत्याही धर्माचे शांततेने राहणारे लोक आपल्या राज्यात राहू देण्यास तो तयार होता. योग्य असे फेरफार करून कॉमन लॉचा अंमल सुरू करावा, अशी त्याची दृढ इच्छा होती. राज्यक्रांती करणाऱ्या पक्षाचा नायक हा व्यवस्थित राज्यकारभार पद्धतीने ज्याचा

अधिकार नियंत्रित झालेला आहे असा राजा कधीही व्हावयाचा नाही, असे आता त्यास कळून आले. कॅव्हेलिअर पक्षाचे लोक क्रॉम्वेलाचा तो नवा झालेला श्रीमंत असल्यामुळे द्वेष करीत असत व चार्लस राजाचा तो खून करणारा म्हणून त्यास तुच्छ मानीत असत. जितका त्याचा द्वेष कॅव्हेलिअर करीत असत तितकाच बहुतेक प्रेसबिटेरिअन पंथाचे लोक, त्याने त्यांचे संकुचित पाया उभारलेले वर्चस्व मोडून टाकल्यामुळे, त्यांचा द्वेष करीत असत. तो शांतता राखी म्हणून लेव्हलर्स, ॲनाबॅपटिस्ट वगैरे पंथांचे धर्मवेडे लोक त्याचा द्वेष करीत. त्याच्या पक्षाचे पुष्कळ इसम म्हणजे इंडिपेंडेंट पक्षाचे लोकदेखील ते स्वतः बहुतेक लोक सत्ताकराज्याचे प्रवर्तक असल्यामुळे, क्रॉम्वेलाच्या मनात राजा व्हावयाचे आहे, अशी त्याजविषयी शंका घेऊन त्याला फितुरी म्हणूनच बहुतेक मानीत असत.

लिट्ल पार्लमेंट : क्रॉम्वेलने व सैन्याने रंप हा पक्ष नाहीसा करून एक नवी सभा भरविली. या सभेला इतिहासात लिट्ल पार्लमेंट किंवा बेअरबोन्साचे पार्लमेंट असे म्हणतात. या सभेतील सभासदांची नेमणूक क्रॉम्वेल व सैन्याचे अधिकारी यांच्या हाताने झाली होती व तीत १४४ सभासद होते. या सभेत आयर्लंडच्या वतीने ६ व स्कॉटलंडच्या वतीने ५ सभासद होते. त्या वेळेस प्रामाणिक व धर्मशील म्हणून ज्या लोकांना मानीत असत त्यापैकीच हे सभासद बहुतेक होते. ही सभा तारीख ४ जुलै सन १६५३ रोजी काम करू लागली व जे अन्याय होत होते ते बंद करण्याचे काम तिने पहिल्याने हाती घेतले. या सभेच्या काही कल्पना शहाणपणाच्या होत्या व काही कल्पना वेडगळपणाच्या होत्या. या सभेच्या सभासदांना जेव्हा हाती घेतलेले काम आपल्या शक्तीच्या बाहेर आहे असे वाटू लागले तेव्हा त्यांनी आपले सर्व अधिकार क्रॉम्वेलच्या हवाली केले. (ता. १२ डिसेंबर १६५३).

दी इन्स्टुमेंट ऑफ गव्हर्नमेंट (राज्यकारभार व्यवस्थेचे अखत्यारपत्र) : सैन्यातील मुख्य अंमलदारांनी आता राज्यव्यवस्था नवी करण्याचे मनात आणून तिची रचना कशी असावी हे सदरहू अखत्यारपत्रात नमूद करून ठेवले. या अखत्यारपत्राप्रमाणे क्रॉम्वेलला लॉर्ड प्रोटेक्टर ऑफ दी कॉमनवेल्थ (प्रजासत्ताक राज्याचा मुख्य संरक्षक) ही पदवी देण्यात आली. त्याच्या मदतीला एक कौन्सिल (मंत्री सभा) नेमण्यात आली. या कौन्सिलला कौन्सिलात ज्या जागा रिकाम्या पडतील त्या जागा भरण्याचा व क्रॉम्वेलच्या मागून त्याच्या जागी दुसरा इसम नेमण्याचा अधिकार देण्यात आला होता. फक्त एकच उपसभा ज्यात आहे असे स्वतंत्र व नवे पार्लमेंट भरविण्याचे या अखत्यारपत्राने ठरविण्यात आले होते. या पार्लमेंटमध्ये इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड या तिन्ही देशांतून निवडलेले सभासद यावयाचे होते. ज्या लोकांचे हे सभासद निवडून पाठविण्याचे काम होते त्यांच्या योग्यतेची सत्ता बरीच वाढवून ती एकसारखी करण्यात आली. जी शहरे मोडकळीस आली होती त्यांचा पार्लमेंट सभेस सभासद पाठविण्याचा हक्क काढून घेण्यात आला व जी शहरे भरभराटीस येऊ

लागली होती त्यास हा हक्क नवीन देण्यात आला. पार्लमेंट सभा दर तीन वर्षांनी भरविण्यात यावी व तिची बैठक निदान पाच महिने तरी बिनहरकत चालावी, असेही या अखत्यारपत्रात ठरविले होते. क्रॉम्वेलने या अखत्यारपत्रकास आपली संमती दिली व त्याप्रमाणे त्यास मोठ्या समारंभाने तारीख १६ डिसेंबर रोजी लॉर्ड प्रोटेक्टरच्या जागेवर बसविण्यात आले.

संरक्षकाच्या कारकीर्दीत भरलेली पार्लमेंटे : या कारकीर्दीतील पहिले पार्लमेंट सन १६५४ च्या सप्टेंबर महिन्यात भरले होते व त्यातून राजपक्षीय लोकांना वगळण्यात आले होते; पण त्यात प्रजासत्ताक राज्यप्रवर्तक मंडळीचा भरणा फार होता. त्यास असलेल्या अधिकारासंबंधी ज्यांनी ज्यांनी म्हणून शंका घेतल्या त्या सर्वांना क्रॉम्वेलास हुसकावून देणे भाग पडले. हे केल्यानंतरदेखील जेव्हा या सभेचे काम सुरळीत चालेना तेव्हा ती होईल तितक्या जलद त्याने मोडून टाकली.

सन १६५६ मध्ये सप्टेंबर महिन्यात त्याने पुनः पार्लमेंट भरविले. या सभेतूनदेखील जहाल प्रजासत्ताक राज्यप्रवर्तकास त्याला काढून लावावे लागले. बाकी राहिलेल्या सभासदांच्या मनात या सभेला अधिक राजसत्ताक बनवावे असे होते. सन १६५७ च्या मार्च महिन्यात त्यांनी हंबल पिटिशन ॲण्ड ॲडव्हाईस (नम्र अर्ज आणि मसलत) या नावाचे एक विनंतीपत्र तयार करून क्रॉम्वेलकडे पाठविले. या पत्राने काम्वेलला आपल्या मागून वाटेल त्याला गादीवर बसविण्याचा व एक बड्या लोकांची सभा भरविण्याचा अधिकार देण्यात आला होता; परंतु ही सभा जेव्हा सन १६५८ च्या प्रारंभी पुनः भरली तेव्हा क्रॉम्वेलच्या हाती त्यावेळी जी साधने होती त्यांच्या साह्याने त्याने जी बड्या लोकांची उपसभा भरविली होती तिचे व या सभेचे जुळेना, म्हणून त्याला ही पार्लमेंट सभा मोडून टाकणे भाग पडले व पुढे याच वर्षाच्या सप्टेंबर महिन्यापावेतो म्हणजे त्याच्या मृत्युकालापावेतो त्याने पार्लमेंट शिवायच राज्यकारभार चालविला.

त्याच्या मागून त्याचा मुलगा गादीवर बसला व त्याने सन १६५९ मध्ये तिसरे पार्लमेंट भरविले. ही सभा सैन्याच्या मर्जीप्रमाणे न वागल्यामुळे सैन्यास राग आला व ती मोडण्याचे तिने त्यास भाग पाडले. नंतर सैन्याने रंप पक्षास पुनः बोलाविले, हे पाहून रिचर्डने आपला संरक्षकाचा अधिकार सोडून दिला.

पुनःस्थापना : सैन्य व रंप यांच्यामध्ये लागलीच तंटा सुरू झाला व पुनः एकदा रंप या पक्षाच्या लोकांना हुसकावून देण्यात आले. आता सर्वच गोंधळ माजून राहिला होता. सैन्याचे वर्चस्व अजून कायम होते; पण त्यास मार्गाला लावावयास कोणी जबरदस्त बुद्धिवान पुरुष राहिला नव्हता. या वर्षाच्या अखेरीस अगोदर सैन्याने रंप पक्षाला बोलावून आणून त्यास पूर्वीच्या जागी पुनः स्थापिले. सन १६६० च्या प्रारंभी जे सैन्य स्कॉटलंडमध्ये ठेवले होते ते घेऊन जनरल मंक याने दक्षिणेकडे कूच केले. त्याने लंडन शहरात आल्याबरोबर पूर्वीप्रमाणे कोणत्याही रीतीचा प्रतिबंध न होता पार्लमेंट सभा भरावी, असे प्रसिद्ध केले. या

जाहिरातीप्रमाणे सन १६४८ मध्ये ज्या कॉमन सभेच्या सभासदांना घालवून दिले होते, ते सभासद व गृहस्थ बडे लोक हे आपल्या जागांवर हजर झाले. याप्रमाणे पुनः एकत्र झालेल्या लाँग पार्लमेंटने अखेरीस आपल्या स्वतःचे विसर्जन करून घेतले.

एप्रिल महिन्याच्या अखेरीस एक कनव्हेशन (राजाच्या हुकमाशिवाय भरलेले) पार्लमेंट भरले. या पार्लमेंटमधील बहुतेक लोकांचे मत पुनः राजाला गादीवर बसवावे असे होते. खरे पाहता बेबंदशाही मोडण्यास दुसरा उपायच राहिला नव्हता. जनरल मंक याने तर चार्लस जो परागंदा होऊन ब्रुसेल्स येथे राहत होता त्याच्याशी पत्रव्यवहाराची सुरुवातही केली होती. चार्लस हा डच लोकांच्या ताब्यातील ब्रेडा येथे गेला व तेथून त्याने सर्वांस आपापल्या मताप्रमाणे धार्मिक बाबतीत वागण्याची मोकळीक, मागील अपराधांची माफी व सैन्याच्या मागील पगाराचा अदा या सर्व गोष्टींचा बंदोबस्त करण्यास मी तयार आहे, असा एक जाहीरनामा पार्लमेंट सभेत पाठवून दिला. हा जाहीरनामा पार्लमेंट सभेस पोहोचल्याबरोबर तिने चार्लस याला राजा म्हणून कबूल केले व तो मे महिन्यात इंग्लंडात परत आला.

○○○

भाग १० वा

दुसरा चार्लस, दुसरा जेम्स, राज्यक्रांती आणि तिसरा विल्यम

इ.स. १६६०-१७०२

उपोद्घात : सर्व पक्षांच्या लोकांच्या एकोप्याने राजाला पुनः गादीवर बसविण्यात आले होते. कारण त्यांना सैन्याचा अंमल चालू राहण्याचे भय वाटत होते व ठरीव राज्यकारभार पद्धतीप्रमाणे राज्यकारभार चालावा अशी त्यास उत्सुकता होती. राजा कायदेशीर गादीवर बसल्याबरोबर राज्यकारभारासंबंधी व धर्मखात्यासंबंधी ज्या जुन्या संस्था होत्या त्या पुनः सुरू झाल्या. एखाद्या लक्षपूर्वक न पाहणाऱ्या मनुष्यास प्रजासत्ताक राज्याची स्थापना झाल्याने व देशातल्या देशात चाललेल्या लढाईने जो गोंधळ उडून गेला होता त्याचा काही एक परिणाम इंग्लंडवर घडला नाही असे वाटले असते; परंतु वास्तविक असे नव्हते; जे घडून गेले होते ते मोडून टाकण्यासारखे नव्हते. एलिझाबेथ किंवा पहिला जेम्स यास जो राज्याधिकार होता तो या नव्या गादीवर बसलेल्या राजास नव्हता. बंड करून त्यात जय मिळविणे, राजासारख्या गृहस्थाची चौकशी करून त्यास देहान्त शिक्षा देणे व यानंतरचे जे पुष्कळ राज्यकारभाराविषयीचे अनुभव राष्ट्रास आले होते त्या सर्वांच्या योगाने आपल्याला किती शक्ती आहे हे ओळखण्याचा धडा राष्ट्रास मिळून गेला होता. शहरातील व खेड्यापाड्यांतील मध्यस्थितीच्या लोकांना आपणास राज्यविषयक व युद्धविषयक किती शक्ती आहे हे कळून चुकले होते. पूर्वी जे त्यांच्यावर जुलूम होत होते तशाच प्रकारचे जुलूम यावेळी त्यांच्यावर कोणी करू गेल्यास ते सहन करतील हे शक्य नव्हते. ज्या इंग्लंडच्या राजाला शांततेने राज्य करणे असेल त्याने ठरीव राज्यपद्धतीच्या मर्यादेचे उल्लंघन न करण्याच्या कामात फार दक्ष राहिले पाहिजे हे मात्र आता नक्की ठरले गेले होते.

परंतु स्टुअर्ट घराण्यातील राजास अनुभवजन्यज्ञान ग्रहण करण्याची शक्तीच नव्हती. त्यांना राजसत्ता पुनः मिळताच ते आपल्या जुन्या महत्त्वाकांक्षेच्या सिद्ध्यर्थ यत्न करावयास लागले. दुसऱ्या चार्लस राजाने स्वैरवृत्तीने राज्य चालविण्याचे काम मोठ्या आनंदाने केले

असते. तथापि, राष्ट्रीय मनोवृत्तीचा कडक रीतीने स्फोट होऊ देण्यापूर्वीच माघार घेण्याचा त्याच्या अंगी समंजसपणा असे. त्याचा भाऊ जो दुसरा जेम्स याच्या अंगी अक्कल कमी होती; पण धमक मात्र जास्त होती. कायद्यांविषयी किंवा लोकमताविषयी आपल्या मनात काही पूज्यभाव नाही, असे तो उघड दाखवी. याप्रमाणे सर्व पक्षांतील लोकांना आपल्याला गादीवरून काढण्याविषयी एकत्र होण्यास त्याने चिथावले. लाँग पार्लमेंट सभेने ज्या कामास सुरुवात केली होती ते काम या सन १६८८ मध्ये घडलेल्या राज्यक्रांतीने शेवटास नेले. याप्रमाणे राजाच्या हातून सर्व सत्ता अजिबात निघून जाऊन या दोन्ही उपसभांच्या हाती गेला; पण विशेषकरून ती हाऊस ऑफ कॉमन्स या सभेसच प्राप्त झाली.

कन्व्हेन्शन पार्लमेंट : हे पार्लमेंट सर्व पक्षांचा समेट होऊन नंतर भरलेले असल्यामुळे राज्यकारभार नेमस्तपणाने चालवू लागले. सैन्याचा पगार देऊन त्यास वाटेस लावले. मागील २३ वर्षांत काही थोड्या गुन्ह्यांशिवाय जे म्हणून गुन्हे घडले होते ते ॲक्ट ऑफ इन्डेम्निटी या कायद्याने माफ करण्यात आले. राज्यक्रांतीच्या वेळी सरकारातून ज्या गादीच्या, धर्मसंस्थेच्या व कॅव्हेलिअर लोकांच्या जमिनी विकण्यात आल्या होत्या त्या त्यांच्या त्यांना परत देण्यात आल्या. पुढे राज्यकारभार चालविण्यास लागणाऱ्या पैशाची व्यवस्था करण्यात आली. राजाच्या हयातीपावेतो त्यास टनेज व पौडेज नावाच्या जकातीचे उत्पन्न पार्लमेंट सभेच्या संमतीने देण्यात आले.

शिपाईगिरीसाठी दिलेल्या जमिनींची तहकुबी : कन्व्हेंशन पार्लमेंटच्या हाताने शिपाईगिरीच्या कामासाठी दिलेल्या जमिनींची तहकुबी करण्याचे फार मोठे व कायमचे असे सुधारणेचे काम झाले. जातचाकरी घेण्याऐवजी जेव्हा दुसऱ्या हेन्रीने स्क्युटेज घेण्याचे ठरविले तेव्हापासून शिपाईगिरीच्या कामासाठी लोकांना पूर्वी जमिनीचे जे पट्टे दिलेले होते त्यात काही तथ्यांश राहिला नव्हता. तिसऱ्या एडवर्डच्या कारकीर्दीच्या अगोदरपासूनदेखील मुख्य मुख्य कुळांचे व त्यांच्या पोटकुळांचे फ्यूडल पद्धतीप्रमाणे बनलेल्या सैन्याच्या ऐवजी ज्यांचा धंदा शिपाईगिरीचा आहे त्यांचे बनलेले सैन्य राजा आपले पदरी ठेवीत असे. आता एवढे मात्र खरे असे की, या सैन्याचे अधिकारी बडे लोक व गृहस्थ लोक असत; परंतु हे सैन्य आपखुशीने नोकरीस राहिलेल्या शिपायांचे बनलेले असे. ट्यूडर घराण्यातील राजे गादीवर बसल्यापासून हे लष्करी पट्टे राजास दरसाल थोडीशी जमाबंदी मिळविण्याचे साधन होऊन बसले होते; परंतु त्यांच्यापासून मुख्य कुळांचा मात्र फार तोटा होत असे. पालकासंबंधी व लग्नसंबंधीच्या जुन्या हक्कांपासून फार जुलूम होत असे. कोर्ट ऑफ वॉर्डस (अज्ञान मुलांचे संरक्षण करण्याकरिता स्थापन केलेली संस्था) या संस्थेच्या स्वाधीन अज्ञानांची सर्व मालमिळकत असे; पण ही संस्था म्हणजे केवळ दुष्कृत्यांची खाण होती. या मालमिळकतीची व्यवस्था बरोबर ठेवली जात नसे व मूल अज्ञान असता त्याच्या मिळकतीच्या किमतीला बहुतकरून धक्का बसत असे. शिवाय ज्या गोष्टींमुळे फ्यूडल

पद्धतीची जरूरी होती त्या गोष्टी नाहीशा झाल्यावर राजाने आपल्यास प्रजेच्या बापाच्या जागी समजून आपल्या अज्ञान मुलांकरिता पालक व नवरे पसंत करावे ही गोष्ट लोकांना रुचेनाशी झाली होती. या गोष्टींबद्दल लोकांना इतके वाईट वाटत असे, की पहिला जेम्स गादीवर बसल्यानंतर थोड्याच दिवसांनी या हक्कांबद्दल राजाने काही वार्षिक रक्कम घ्यावी असे पार्लमेंट सभेने बोलणे लावले. ही मागणी कबूल करण्याचे जेम्स राजाच्या मनात होते; परंतु किती रक्कम घ्यावी हे त्याचे व हाऊस ऑफ कॉमन्स या सभेचे नक्की ठरेना. लाँग पार्लमेंटांने एक कायदा करून हे लष्करी कुळांचे पट्टे काढून टाकले होते. या पट्ट्यांच्या त्रासातून पुष्कळ वर्षे सुटल्यानंतर पुनः हे पट्टे सुरू करू देऊ नयेत असा बडे लोकांचा व गृहस्थ लोकांचा निश्चय झाला होता व त्याप्रमाणे कन्व्हेंशन पार्लमेंटने एक कायदा करून ही गोष्ट मंजूर करून ठेवली. या पट्ट्याच्याऐवजी त्यांनी राजास एक नेमकी व वंशपरंपरेने चालू राहील अशी रक्कम देण्याचे ठरविले. ज्या जमिनीवरील हा फ्यूडल बाबींचा बोजा कमी झाला असेल त्या जमिनींवर ठरविलेली रक्कम लादणे बरोबर झाले असते; पण तसे न करता ही रक्कम वसूल करण्याकरिता बीअर वगैरे पदार्थांवर कर बसविण्यात आला. ही रक्कम फार मोठी नव्हती; पण शेतकीचे ज्या अन्यायाच्या गोष्टींपासून इतके पुष्कळ नुकसान होत होते त्या नाहीशा झाल्यामुळे उलट राष्ट्रास फायदा मात्र झाला. इंग्लंडमध्ये सर्व जमीन राजाच्या मालकीची आहे हे अजूनही मानीत असत; परंतु आता लोक त्या सोकेज पट्ट्याने राखीत असत. या पट्ट्यांच्या योगाने जमीनदारांस नावाचा कर द्यावा लागत असे हे आपण पाहिलेच आहे. इंग्लंडमधून फ्यूडल पद्धती नाहीशी करण्याच्या कामात मोठ्या महत्त्वाचे शेवटचे काम म्हणजे हे लष्करी पट्टे काढून टाकणे हे होते.

हाय चर्चची उलट सरशी : अँग्लिकन आणि प्रेसबिटेरिअन या दोन्ही पक्षांच्या संयुक्त यत्नाने राजाला गादी प्राप्त झाली होती. धर्मस्वातंत्र्य सर्वांस मिळेल अशी आशा प्रजेला चार्लस राजाने लावून ठेवली होती. या दोन्ही पक्षांचा समावेश होईल इतके मोठी राष्ट्रीय धर्मसंस्थेचे क्षेत्र वाढवावे अशा आशयाचा चार्लस राजाने गादीवर परत आल्यावर एक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. सन १६६१ मध्ये लंडन येथील सॅव्हॉय राजवाड्यात एक निरुपयोगी सभा भरविण्याच्या पलीकडे या जाहीरनाम्यापासून दुसरे काही एक निष्पन्न झाले नाही. ही देशातल्या देशातील लढाई मुख्यत्वेकरून धर्मासंबंधी होती. या कट्ट्या हाय चर्च (एपिस्कोपल पंथाचे अनुयायी) पंथाच्या लोकांच्या मनात प्यरिटन लोकांचा कायमचा पाडाव करावा असे होते. पार्लमेंट आपले संरक्षण करणार नाही व आपणास संरक्षणासाठी राजाचे मर्जीवर अवलंबून राहावे लागेल, असे प्युरिटन लोकांना वाटावे म्हणून चार्लस राजाने या भानगडीत हात घातला नाही.

सन १६६१ मध्ये जे नवे पार्लमेंट भरले त्याने म्हणूनच प्युरिटन लोकांचा छळ करणाऱ्या कायद्यांची एक माळची माळ मंजूर केली.

(१) ॲक्ट ऑफ युनिफॉर्मिटी : सन १६६१ मध्ये या कायद्याप्रमाणे प्रत्येक धर्मोपदेशकास, कॉलेजातील फेलोस व शालागुरूस सार्वजनिक भजन पद्धतीचे पुस्तकात जे जे लिहिले आहे ते ते मला मान्य आहे, असे कबूल करावे लागले. हा कायदा अमलात आल्यामुळे २००० धर्मोपदेशकांना आपापल्या जागा सोडून देणे भाग पडले.

(२) दी कॉर्पोरेशन ॲक्ट : सन १६६१. या कायद्याप्रमाणे ज्या शहरास सनदा मिळाल्या असत, त्या शहरातील अधिकाऱ्यांना (या अशा शहरात प्युरिटन लोकांची वस्ती फार असे) कॉव्हेनन्ट आम्हाला कबूल नाही, असे म्हणावे लागे, त्यास चर्च ऑफ इंग्लंड (इंग्लंडमधील धर्मसंस्था)च्या पद्धतीप्रमाणे प्रभू-भोजनाचा संस्कार करून द्यावा लागे व कोणत्याही प्रसंगी राजाच्या विरुद्ध आचरण करणे हे पाप आहे, असे शपथेवर सांगणे भाग पडत असे.

(३) कॉन्व्हेन्टिकल ॲक्ट, सन १६६४ : चर्च ऑफ इंग्लंडच्या भजन पद्धतीप्रमाणे ज्या पंथाची भजन पद्धती नाही अशा पंथाची, एका कुटुंबातील नाहीत अशी जर पाच मनुष्ये भजन करण्यास एकत्र झाली तर त्यास जबर शिक्षा देण्यात येईल, असे या कायद्याने ठरविण्यात आले होते.

(४) काइव्ह माईल ॲक्ट, सन १६६५ : ज्या धर्मोपदेशकाने ॲक्ट ऑफ युनिफॉर्मिटी या कायद्यास आपली संमती दिली नसेल किंवा काही विचारपूस केल्याशिवाय राजाची आज्ञा मानण्याविषयी शपथ घेतली नसेल, त्या धर्मोपदेशकाने कोणत्याही शाळेत शिकवू नये किंवा ज्या गावास सनद मिळाली असेल त्या गावाचे आसपास ५ मैल येऊ नये, असे या कायद्याने ठरविण्यात आले होते.

हे असे उपाय योजून प्युरिटन लोकांचा बीमोड करण्याची व पुनः एकदा सर्व राष्ट्र एपिस्कोपल धर्मसंस्थेच्या अमलाखाली आणण्याची कॅव्हेलिअर लोकांची इच्छा होती; परंतु त्यांचे हे सर्व उपाय निष्फळ झाले.

राजपक्षीय लोकांची उलट : ही जी पार्लमेंट सभा भरली, तिच्या सभासदांचे राजावर अत्यंत प्रेम व लोकसत्ताक राज्य असावे, असे म्हणणाऱ्यांविषयी अत्यंत तिरस्कार, ही प्रसिद्ध होती. पार्लमेंट सभेच्या दोन्ही उपसभांना राजाशिवाय कायदे करण्याचा अधिकार नाही व राज्यात जे सर्व सैन्य जमिनीवर आहे व जे सर्व आरमार समुद्रावर आहे त्या सर्वांचे आधिपत्य राजाकडे आहे, असे त्यांनी मोठ्या समारंभाने प्रसिद्ध केले. ही देशातली लढाई जेव्हा सुरू झाली तेव्हा पहिल्याने दंगेखोर लोकांच्या मोठ्ठाल्या टोळ्या एकत्र जमून अर्ज देण्याची सुरुवात झाली होती म्हणून अर्ज देण्याच्या संबंधाच्या हक्काविषयींचे नियम फार कडक करण्यात आले. दहा इसमांपेक्षा जास्त इसमांनी अर्ज देण्यास येऊ नये व कौंटीतील ग्रॅन्ड ज्युरीतील बहतेक लोकांनी किंवा तीन जस्टिस ऑफ दी पीस या अंमलदारांनी अगोदर पसंत केल्याशिवाय धर्मसंस्था किंवा राजसंस्था यांच्यासंबंधाने फेरफार करण्याविषयीच्या अर्जावर विसांपेक्षा अधिक लोकांनी सह्या करू नयेत, असेही ठरविण्यात आले होते. सन

१६४१ मध्ये मंजूर झालेला ट्रायेनियल ॲक्ट रद्द करण्याविषयीचा खरडा पार्लमेंट सभेपुढे दाखल करण्यात आला; पण तो तसाच पडून राहू देण्यात आला. अखेरीस सन १६६४ मध्ये ज्याप्रमाणे या कायद्याने सभा भरविण्याचे ठरविले आहे त्याप्रमाणे मी कधीही पार्लमेंट सभा भरू देणार नाही, असे म्हणून राजाने हा कायदा रद्द झालाच पाहिजे, अशी मागणी केली. राजाच्या या मागणीप्रमाणे हा कायदा बंद करण्यात आला; पण जास्तीत जास्त तीन वर्षांपेक्षा पार्लमेंट सभा भरल्याशिवाय राहू देऊ नये, अशी एक मोघम शर्त त्याच वेळेस नमूद करण्यात आली होती.

राजभक्तीचा ऱ्हास : या पार्लमेंट सभेतील जरी सर्व सभासद राजभक्त होते तरी मध्यंतरी झालेल्या मोठ्या बंडाने जी त्यास हुकूमत मिळाली होती ती घालविणे हे त्यास आवडत नसे. प्रत्येक गोष्टीसंबंधाने टीका करावी व प्रत्येक गोष्टीवर आपला ताबा असावा असे या सभासदांना वाटत असे. दरबारातील लोकांची बदफैली, मोठमोठाल्या अधिकारी लोकांची लाच खाण्याकडे प्रवृत्ती व हॉलंडशी चाललेल्या लढाईपासून उद्भवलेले अनर्थ (सन १६६५ ते १६६७) या सर्व गोष्टींमुळे त्यांची ही इच्छा अधिकच दृढ झाली. सन १६६५मध्ये हाऊस ऑफ कॉमन्स सभेने एक मोठी बेगमीसाठी रक्कम मंजूर केली; पण ती सर्व रक्कम लढाई चालू ठेवण्याकडे लावावी, असे तिने स्पष्ट ठरवून घेतले होते. हा असा बंदोबस्त लँकॅस्टर घराण्यातील राजे गादीवर बसल्यापासून दोन वेळाच करण्यात आला होता. अशीच व्यवस्था पुनः याच्या पुढील वर्षी करण्यात आली. पार्लमेंट सभेने वेळोवेळी ज्या बेगमीसाठी रकमा मंजूर केल्या होत्या त्यांची व्यवस्था कशी काय लावण्यात येते या गोष्टींची चौकशी करण्यासाठी सन १६६७ मध्ये पार्लमेंट सभेने एक कायदा मंजूर केला. या कायद्यान्वये सार्वजनिक हिशोब तपासण्यासंबंधी व चौकशी करण्यासंबंधी फार मोठाले अधिकार देऊन हिशोब तपासणारे अंमलदार पार्लमेंट सभेने नेमले. या अधिकाऱ्यांनी जी हकीकत रुजू केली तिच्यावरून योग्य हुकूम दिल्याशिवाय पैसे दिल्याबद्दल, आरमाराकडील खजिनदार सर जॉर्ज कार्टरेट यास हाऊस ऑफ कॉमन्स या सभेतून काढून टाकले. हाईड, ज्याला आता अर्ल ऑफ क्लेरेंडन ही पदवी मिळाली होती व जो लॉर्ड चॅन्सेलर या अधिकारावर होता त्याने हाऊस ऑफ कॉमन्स सभेच्या या दडपशाहीला अडथळा आणण्याचा प्रयत्न केला; पण १६६७ मध्ये कॉमन्स सभेने त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप आणून त्याला इंग्लंडमधून पळून जाण्यास लावले.

कॅबॉल आणि डिक्लेरेशन ऑफ इंडलजन्स : पहिला जेम्स गादीवर बसल्यापासून प्रिव्हीकौन्सिलमधील राजाचे जे विश्वासू सभासद असत त्यांचा राज्यकारभारातील अतिशय महत्त्वाचे कामी सल्ला घेण्याचा राजाचा परिपाठ पडला होता. तथापि, हा परिपाठ बेकायदेशीर आहे, असे मानीत असत. क्लरेंडन पळून गेल्यानंतर काही दिवसांनी चार्लस राजाने या सभेतील पाच सभासदांना आपल्या मसलतीत घेतले. या सर्वांत ॲन्थनी ॲशले कपर हा

फार प्रसिद्ध असे. या सभासदांना कॅबॉल म्हणत असत. कॅबॉल या शब्दाची उत्पत्ती या पाच सभासदांच्या नावांच्या इंग्रजी शब्दवटिकेप्रमाणे येणाऱ्या पहिल्या अक्षरांवरून झाली आहे, असे चुकीने मानतात; पण हा शब्द फार जुना आहे व याचा अर्थ एकमताने गुप्तरीतीने काम करणारे कूट असा आहे. या कॅबॉलाच्या मदतीने आपल्याला वाटेल त्या रीतीने राज्यकारभार चालविण्याचा चार्लस राजाने यत्न चालविला. परराष्ट्रांशी व्यवहार ठेवण्यात त्याला फ्रान्स देशाशी सख्य जोडावे असे वाटत असे व देशातल्या देशात कॅथोलिक व नॉन कन्फॉर्मिस्ट पंथांच्या लोकांचे आपणास साहाय्य असावे, असे त्यास वाटत असे. सन १६७२ मध्ये त्याने एक डिक्लेरेशन ऑफ इंडलजन्स प्रसिद्ध केले. या जाहीरनाम्याने धर्मासंबंधी मतभेदासाठी ज्या कायद्यान्वये शिक्षा देण्यात येत असत ते सर्व कायदे बंद करण्यात आले; पण या त्याच्या करण्याने कठ्या धर्माभिमानी लोकांना व त्याचप्रमाणे धर्मस्वातंत्र्यप्रिय लोकांनाही भय वाटू लागले. सन १६७३ मध्ये जेव्हा पार्लमेंट सभा पुनः भरली तेव्हा तिने हा जाहीरनामा त्यास रद्द करण्यास लाविले.

सन १६७३ तील टेस्ट ॲक्ट : चर्च ऑफ इंग्लंड या पंथाचा नसेल, अशा कोणाही मनुष्यास सरकारी चाकरीवर नेमावयाचे नाही, असे आता पार्लमेंट सभेने निश्चित केले. सन १५५९ मध्ये ॲक्ट ऑफ सुप्रिमसी या नावाचा जो कायदा मंजूर करण्यात आला होता त्या कायद्यान्वये कोणाही मनुष्यास, मग तो धर्मखात्यात किंवा राज्यकारभारात चाकरी पत्करो, त्याला 'मला पोपाचे पारमार्थिक श्रेष्ठत्व कबूल नाही.' असे शपथ घेऊन सांगावे लागत असे; पण या कायद्यात अशी शपथ न घेणाऱ्यास काही शिक्षा सांगितली नव्हती व त्यातच अशी शपथ घेणे बड्या लोकांस अवश्य नाही, असे मुद्दाम ठरविण्यात आले होते; परंतु आता जो टेस्ट ॲक्ट (कसोटीस लावून पाहण्याचा कायदा) मंजूर करण्यात आला होता त्या अन्वये चर्च ऑफ इंग्लंडच्या संस्काराप्रमाणे प्रभुभोजनाचा संस्कार करवून घेतल्याशिवाय व रूपांतर (प्रभुभोजनाच्या वेळी येशूचे मांस व रक्त याचेच रूपांतर होऊन त्याची भाकर व मध ही बनली आहेत असे मानणे) मत खोटे आहे, असे जाहीर केल्याशिवाय कोणाही मनुष्यास राज्यात चाकरी देता येत नव्हती. या कायद्याने कॅथोलिक लोकांना व नॉन्कन्फॉर्मिस्ट लोकांना राज्यात चाकरी करण्याची बंदी झाली होती; पण मुख्यत्वेकरून या कायद्याचा रोख कॅथोलिक लोकांवर होता आणि म्हणून त्यास नॉन्कन्फॉर्मिस्ट लोकांची मदत होती. या त्यांच्या मदतीबद्दल मोबदला देण्याच्या हेतूने या पंथाचा छळ करण्याकरिता जितके कायदे करण्यात आले होते तितके सर्व रद्द करण्याच्या संबंधाने एक कायद्याचा मसुदा घडून पार्लमेंटमध्ये रुजू करण्यात आला; पण तो नामंजूर झाला. याप्रमाणे सरकारी नोकरीच्या प्रत्येक शाखेस या पंथाचे लोक मुकले. हा कायदा अमलात आल्यामुळे जेम्स ड्युक ऑफ यॉर्क जो लॉर्ड हाय ॲडमिरल या हुद्यावर होता त्यास व क्लिफर्ड जो खजिनदाराच्या जागेवर होता त्यास आपापले हुद्दे सोडून देणे भाग पडले. याप्रमाणे कॅबॉल जे लयास गेले.

डॅन्बीवरील दोषारोप : कॅबॉल लयास गेल्यावर सर टॉमस ऑसबोर्न ज्याला पुढे लॉर्ड डॅन्बी ही पदवी मिळाली होती तो खजिनदार झाला. त्याची स्वतःची मर्जी नसता चार्लस राजाचा खास हुकूम झाल्यामुळे फ्रान्सचा राजा जो १४ वा लुई याज बरोबर इंग्लंडच्या इभ्रतीस कमीपणा आणणारे असे बोलणे लावावे लागले. जेव्हा ही गोष्ट कॉमन्स सभेला कळली तेव्हा तिने डॅन्बीवर राजद्रोहाचा आरोप आणला. मी जे केले ते राजाच्या हुकमाने केले अशी सबब डॅन्बीने पुढे आणली; परंतु कॉमन्स सभेने या त्याच्या तक्रारीकडे दुर्लक्ष्य केले. राजाचे प्रधान हे आपापल्या कृत्यांबद्दल पार्लमेंट सभेला जबाबदार आहेत हे तत्त्व तिच्या या कृत्याने कॉमन्स सभेने प्रतिपादित करून दाखविले. तेव्हा डॅन्बी याने राजाने मला गुप्त रीतीने क्षमा केली आहे, अशा सबब पुढे आणली; तेव्हा कॉमन्स सभेने राजाचा क्षमा करण्याचा हक्क शिक्षा सांगण्याच्या पूर्वीच एखाद्या दोषारोपाचे काम बंद ठेवण्याकडे पोहोचत नाही असे आपले मत प्रदर्शित केले. डॅन्बीचे रक्षण व्हावे म्हणून चार्लस राजाने पार्लमेंट सभा पहिल्याने मोडून लांबच्या मुदतीवर नेऊन टाकली व नंतर ती मोडूनच टाकली. परंतु दुसरी जी पार्लमेंट सभा भरली तिने एका पार्लमेंटने दोषारोप केला असल्यास ती पार्लमेंट जरी मोडली तरी तो दोषारोप रद्द होत नाही असे ठरविले. या प्रश्नांपैकी पहिल्या प्रश्नाचा निकाल सन १७०१ मध्ये जो ॲक्ट ऑफ सेटलमेंट मंजर करण्यात आला त्या अन्वये कॉमन्स सभेच्या तर्फे झाला व त्याच वेळी दुसराही प्रश्न, वरन हेस्टिंग्ज याची चौकशी चालू असता, या उपसभेच्याच तर्फेचा झाला.

पोपाचे अनुयायांनी केलेला गुप्त बेत दी पार्लमेंटरी टेस्ट, सन १६७८ : राजाला मारून इंग्रज लोकांना पोपाचे गुलाम करून टाकण्यासाठी एक गुप्त बेत चालला आहे, अशी कंडी याच सुमारास टायटस ओऍटीस या गृहस्थाने उठविली. बहुतेक सर्व लोकांना ही गप्प खरी आहे असे वाटले व लोक समुदाय भीतीने वेडा होऊन गेला. या पार्लमेंट सभेचे सभासद सन १६६१ पासून एकसारखे काम पाहत असल्यामुळे त्यांची राजाविषयी द्वेषबुद्धी एकसारखी वाढत्या प्रमाणावर होती व त्यांचे प्रॉटेस्टंट पंथाविषयीचे वेड हेही एकसारखे बळावत चालले होते. दोन्ही उपसभांतील प्रत्येक सभासदाने आपल्या जागेचे काम करू लागण्याच्या अगोदर मी राजाज्ञेप्रमाणे वागेन व धर्मसंस्थेच्या संबंधाने राजाशिवाय दुसऱ्या कोणास श्रेष्ठ मानणार नाही, अशी शपथ घ्यावी व रूपांतराचे मत खोटे आहे व साधुपुरुषांची पूजा करणे हेही खोटे आहे, असे मी शपथ घेऊन सांगतो, अशा मजकुराचा कायदा या पार्लमेंट सभेने मंजूर केला याच कायद्यास पार्लमेंटरी टेस्ट ॲक्ट असे म्हणतात. याप्रमाणे कॅथोलिक पंथाच्या लोकांना - गादीशिवाय बाकी सर्व अधिकारांच्या जागांची बंदी करण्यात आली. हा कायदा मंजूर करण्यात आल्यावर लवकरच चार्लस राजाने ही पार्लमेंट सभा मोडून टाकली

व्हिग आणि टोरी - दी एक्सक्लयुझन बिल : सन १६४० मध्ये ज्याप्रमाणे राजनीतीसंबंधाने लोकमत क्षुब्ध झाले होते त्याप्रमाणे ते आताही जागृत झाले होते. दरबारी पक्षाला याच वेळी पहिल्याने 'टोरी' हे पद प्राप्त झाले, चोरांचा धंदा पत्करून आयर्लंडमधील मूळचे राहणारे जे काही लोक प्रॉटेस्टंट धर्माच्या लोकांचा छळ करीत असत त्यांचे हे मूळचे नाव होते. प्रजा पक्षालादेखील याच वेळी 'व्हिग' ही संज्ञा पहिल्याने मिळाली. स्कॉटलंडमधील कॉव्हेनंटचे जे अनुयायी होते त्यापैकी अत्यंत धर्मवेड्या लोकांचे हे नाव लोकांत प्रसिद्ध असे. यानंतर जी सर्वसाधारण निवडणूक पार्लमेंटाच्या सभासदांची झाली तीत निवडून आलेले बहुतेक सभासद राजपक्षाच्या विरुद्ध मताचे होते. या पक्षाच्या पुढाऱ्यांनी प्रसिद्ध 'एक्सक्लयुझन बिल' (विवर्जनाच्या कायद्याचा खर्डा) या सभेपुढे आणले. या कायद्याने राजाचा भाऊ व गादीचा वारस जो जेम्स ड्यूक ऑफ यॉर्क यास तो रोमन कॅथोलिक पंथाचा असल्यामुळे गादीवर बसण्याचा प्रतिबंध करण्यात आला होता. हा कायदा कॉमन्स सभेत मंजूर होण्यापूर्वीच चार्लस राजाने पार्लमेंट सभा मोडून टाकली.

हॅबिअस कार्पस ॲक्ट, सन १६७९ : ही पार्लमेंट सभा जरी थोडे दिवस काम करीत होती तरी तिने तितक्या थोड्या वेळात अतिशय महत्त्वाचा जो हॅबिअस कार्पस ॲक्ट तो मंजूर करून घेतला. कोणाही मनुष्यास त्याची चौकशी केल्याशिवाय अनियमित काळपर्यंत कैदेत ठेवू नये या संबंधाने योग्य तो बंदोबस्त या कायद्याने प्रथमच करण्यात आला. कोणाही स्वतंत्र मनुष्याचा त्याच्या बरोबरीच्या लोकांनी कायदेशीर इन्साफ केल्याशिवाय त्यास कैदेत ठेवले जाणार नाही, हे तत्त्व स्वातंत्र्याच्या मोठ्या सनदेत स्पष्ट ठरवून टाकले होते. कोणाही मनुष्यास चौकशी केल्याशिवाय कैदेत ठेवले असल्यास त्यास कैदेत ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर किंग्स बेंच या न्याय सभेतून हॅबिअस कार्पस (लॅटीन भाषेत 'तुमच्या ताब्यात याचे शरीर आहे' असा अर्थ या शब्दांचा होतो) चा हुकूम मिळविण्याचा हक्क असे. हा मनुष्य कैदेत आहे ही गोष्ट व ज्या कारणांवरून त्यास कैदेत ठेवले आहे ती कारणे न्यायसभेच्या लक्ष्यात यावीत म्हणून या हुकमाप्रमाणे (हॅबिअस कार्पसच्या) कैदेत ठेवलेला मनुष्य व ज्या हुकमावरून त्यास कैदेत ठेवले असेल तो हुकूम हे घेऊन त्या कैदेत ठेवणाऱ्या अधिकाऱ्यास हजर व्हावे लागत असे. अशा प्रकारच्या हुकमाची कोणी केव्हाही मागणी केली तरी तो त्यास देणे हे सदरहू न्यायसभेचे कर्तव्य होते; परंतु जरी लोकांचे स्वातंत्र्य कायम राहावे म्हणून कायद्याने याप्रमाणे इतकी काळजीने व्यवस्था केली होती तरी राजे लोक कधी कधी हा कायदा गुंडाळून ठेवून त्यास जे लोक आवडत नसत त्यास चौकशी केल्याशिवाय कैदेत ठेवत असत. अराबेला स्टुअर्टसारख्या गादीच्या भावी वारसास किंवा राजाच्या मर्जीविरुद्ध वागणाऱ्या इलियट, व्हॅलेंटाईन आणि स्ट्रोड यासारख्या लोकांच्या पुढाऱ्यांना मृत्यूने किंवा राजकीय स्थित्यंतराच्या योगाने सुटका होईतोपर्यंत कैदेत कुजत पडून राहावे लागले होते. या गोष्टीवरून प्रत्येक मनुष्यास जातस्वातंत्र्य आहे या गोष्टीची लोकांस प्रचीती

यावी म्हणून आणखी काही कायदे करणे जरूरीचे होते. कोणा मनुष्यास राजद्रोह किंवा दुसऱ्या एखाद्या थोर अपराधावरून कैदेत घातले असेल तर व सरकारतर्फेच्या साक्षीदारास येण्याची सवड आहे असे नक्की होत असेल तर त्यास कैदेत घातल्यानंतर ताबडतोब जे ॲसाईज (न्यायसभेची बैठक) भरेल त्यावेळी त्याच्यावर लेखी आरोप ठेवावा किंवा त्याचा जामीन घेऊन त्यास सोडून द्यावे; आणि याच प्रमाणे लागलेच भरणाऱ्या ॲसाईजचे वेळी त्याजवर लेखी आरोप ठेवण्यात आला नाही तर त्या मनुष्यास अजिबात सोडून द्यावे, असे हॅबिअस कार्पस ॲक्ट व तो सुधारण्याकरिता जे अलीकडे दुसरे कायदे करण्यात आले आहेत त्यात ठरविले आहे व त्याप्रमाणे हल्ली वहिवाटही चालत आहे. या कलमाशिवाय पढील कलमही या कायद्यात आहेत : जर कोणा मनुष्यास राजद्रोह किंवा एखाद्या दुसऱ्या घोर अपराधावरून कैदेत घातले नसेल तर त्यास जामीन घेऊन सोडून दिले पाहिजे. जर एखाद्या मनुष्यावर कोणताही आरोप न ठेवता त्यास कैदेत घालण्यात आले असेल तर त्याच्या कामाची चौकशी करण्यासाठी त्यास पुनः न्यायसभेची बैठक भरेल तेव्हा हजर होण्याविषयीचा जामीन घेऊन सोडून द्यावे. जर तुरुंगातील एखादा अधिकारी आपल्या ताब्यातील कैद्यास हजर करण्यास चुकेल किंवा एखादा न्यायधिश हॅबिअस कार्युसचा हुकूम देण्यास ना म्हणेल तर या दोघांही अधिकाऱ्यांस कडक शिक्षा देण्यात येतील, असे या कायद्यात ठरविले होते. त्याचप्रमाणे इंग्लंडबाहेर कोठेही इंग्लंडमधील रहिवाशास जर कोणी कैदेत ठेवील तर त्यासही फार कडक शिक्षा या कायद्याप्रमाणे ठेवल्या आहेत.

हॅबिअस कार्पस कायदा नेहमी अमलात आणणे हे व्यवहारात अशक्य आढळून आले आहे. ज्यांनी खरोखर बंड केले नाही व ज्यांची बंड करण्याची इच्छा आहे असे सिद्ध करीता येत नाही, अशा लोकांना राजकीय धामधुमीच्या वेळी कैदेत ठेवणे कधी कधी जरूर पडते. अशा प्रसंगी सरकार हॅबिअस कार्पस कायदा बंद ठेवण्याविषयी (पार्लमेंटजवळ) मागणी करते व हा कायदा तहकूब ठेवण्यात आला आहे अशा अर्थाचा हंगामी कायदा मंजूर करते.

एक्सक्लयुझन बिल पुनः पार्लमेंट सभेपुढे आणले जाते -लोकांची देशामध्ये पुनः उलट : सन १६७९ मध्ये दुसरी एक पार्लमेंट सभा भरली. एक्सक्लयुझन बिल पुनः पार्लमेंट सभेपुढे रुजू झाले व ते कॉमन्स सभेने मंजूर केले; पण त्यास लॉर्ड सभेने फेटाळून दिले. चार्लस राजाने आता ही पार्लमेंट सभा मोडून टाकली. सन १६८१ मध्ये ऑक्सफर्ड येथे दुसरी एक पार्लमेंट सभा भरविण्याविषयीचा हुकूम सुटला. हीही पार्लमेंट सभा जबर व मागे-पुढे न पाहणारी निपजेल इतके निदर्शनास आणून देण्यापुरतीच काय ती या सभेची बैठक लांबली. सर्व देशभर लोकमत विरुद्ध दिशेने फैलावू लागले आहे, असे चार्लस राजास दिसून आले. निरपराधी कॅथोलिकांचे न्यायाच्या नावाने जे खून होत होते त्याबद्दल लोकांना वाईट वाटण्यास सुरुवात झाली होतीच व पार्लमेंट सभेतील विरुद्ध पक्षाच्या लोकनायकांच्या

जुलमांचाही त्यांना तिरस्कार वाटू लागला होता. ही पार्लमेंट सभा चार्लस राजाने मोठ्या छातीने मोडून टाकली व पुनः कधीही त्याने पार्लमेंट सभा भरविली नाही.

पार्लमेंट सभेतील प्रतिपक्षांच्या पुढाऱ्यांना आपणास पार्लमेंट सभेत यश येणे नाही असे वाटल्यावरून त्यांनी आता गुप्त कट करण्याचा निश्यच केला; परंतु हे सर्व गुप्त कट फुटले व विल्यम लॉर्ड रसेल, ॲलगरनॉन सिडने व दुसऱ्या कित्येकांना देहान्ताची शिक्षा भोगावी लागली.

सनदांचे काढून घेणे : ज्याअर्थी, या प्रतिपक्षांचा जमाव लंडन व इंग्लंडमधील ज्या शहरास पार्लमेंट सभेस सभासद निवडून पाठविण्याचा अधिकार असे अशा शहरांत अतिशय होता. त्याअर्थी, या शहरांनी आपापल्या सनदांतील कलमांच्या विरुद्ध आचरण केले आहे अशी तोहमत या शहरांवर सरकारने आणवली आणि तिच्यावरून जुन्या सनदा काढून घेणे झाल्यावर ज्या नव्या सनदा देण्यात आल्या त्यात प्रत्येक शहरात म्युनिसिपल हक्क फार थोड्या लोकांना देण्यात आले. राजाचा ज्या इसमांवर भरवसा असे अशाच इसमांच्या हातात चोहोकडे म्युनिसिपल हुद्दे दिले गेले. जर पार्लमेंट सभा नवीन भरविण्याचा प्रसंग आला तर हाऊस ऑफ कॉमन्समध्ये बहुजनसमाज राजाच्या पक्षाचा होईल असा जरी बंदोबस्त ठेवण्यात आला होता तरी राजाने या उपर पार्लमेंट सभा भरवावयाचीच नाही, असा निश्चय केला होता. सन १६८५ मध्ये जेव्हा राजा मरण पावला तेव्हा त्याची शेवटची पार्लमेंट सभा मोडून तीन वर्षे होऊन गेली होती.

दुसऱ्या जेम्स राजाचे राज्यारोहण : जकातीचे उत्पन्न मागील राजाच्या मृत्युबरोबर बंद पडावयाचे असल्यामुळे जरी कायद्याने ते राजाकडे सुरू ठेवणे अन्यायाचे होते तरी ते तसेच चालू ठेवण्याबद्दलचा हुकूम दुसऱ्या जेम्सने गादीवर बसल्याबरोबर पहिल्याने केला. तरी पण पार्लमेंट भरविण्यास काही हरकत येणार नाही, अशी जेम्स राजाची खात्री होती म्हणून त्याने पार्लमेंट सभा भरविली. ही पार्लमेंट सभा अत्यंत राजभक्त निवटली व तिने राजास त्याचे तहहयात सालीना २०००००० पौंड देण्याचा ठराव केला. आईल व मॅन्मोथ यांना बंडात अपयश आल्यामुळे जेम्स राजाची सत्ता अधिकच जोरावली; पण या पार्लमेंटची जेव्हा दुसरी बैठक सुरू झाली तेव्हा जे दोन बेत सिद्धीस नेण्याचा जेम्स राजाचा मनापासून हेतू होता त्या बेताविरुद्ध जाण्याचा हा पार्लमेंटने हट्ट धरला. आपल्या पंथाच्या लोकांना धर्मसंस्थेपैकी पुष्कळशा हुद्यांच्या जागा व उत्पन्न मिळावे इतकाच जेम्स राजाचा बेत नव्हता तर त्याच्या मनात या दोन्ही गोष्टी सर्वस्वी आपल्या पंथाच्या लोकांचे हातात याव्यात असे होते. हे साध्य होण्यासाठी त्याच्या मनात टेस्ट ॲक्ट रद्द करावा असे होते. पार्लमेंटला त्याच्या मनातील इंगित कळून आले व त्यांनी हा कायदा रद्द करण्याचे नाकबूल केले. एखाद्या जबरदस्त कायमच्या सैन्याशिवाय आपल्याला आपल्या इच्छेप्रमाणे वागता येणार नाही, असे जेम्स राजास कळून चुकले होते आणि म्हणून मागील राजाच्या पदरचे

जे थोडेसे कवायती सैन्य त्याच्या स्वाधीन होते तेच पुष्कळसे वाढवावे असे त्याच्या मनात होते; परंतु कॉमन्स सभेस कायमच्या सैन्याचा कंटाळा आला होता व म्हणून प्रधानांनी या कामासाठी जी अधिक पैशाची मागणी केली होती ती तो मंजूर करीत नव्हता, म्हणून जेम्स राजाने पार्लमेंट सभा पुष्कळ दिवस तहकूब ठेवली व आपल्या स्वतःचे अकलेप्रमाणे राज्यकारभार चालविण्याचा निश्चय केला.

राजा चर्च ऑफ इंग्लंडवर गदा आणतो : आपला स्वतःचा जो धर्म तोच सर्व प्रजेचा धर्म करण्याचा जेम्स राजाने निश्चय केला होता. हे साधण्यासाठी त्याच्याकडे असलेल्या धर्मखात्याच्या श्रेष्ठत्वाचा उपयोग करण्याचा त्याने निश्चय केला. त्याने धर्मखात्यातील पुष्कळ मोठमोठ्या जागा रोमन कॅथोलिक पंथाच्या प्रसिद्ध लोकांना किंवा जे या पंथाचे आहेत अशी लोकांना शंका होती अशा लोकांना दिल्या. लाँग पार्लमेंट सभेने खास कायदा करून हाय कमिशन या नावाची जी न्यायसभा काढून टाकली होती तिच्यासारखीच, या कायद्याकडे दुर्लक्ष करून, जेम्स राजाने एक्लेझिॲस्टिकल कमिशन या नावाची दुसरी न्यायसभा स्थापन केली. या सभेस, धर्मोपदेशकांवर त्यांनी दुराचरण केले आहे असे आरोप येऊन जे खटले होत असत अशा खटल्यांची पूर्णपणे चौकशी करून धर्मोपदेशकांस त्यांच्या कामावरून थोडी मुदत बातल करण्याचा किंवा अजिबात काढून टाकण्याचा अधिकार असे. या न्यायसभेने जी पुष्कळ जुलमांची कामे केली त्यात ऑक्सफर्ड येथील कॅथोलिक बिशप पार्कर यास तेथील मॅकडालेन कॉलेजचा त्या कॉलेजमधील फलो मंडळीने अध्यक्ष नेमण्याचे नाकारले म्हणून सर्व फेलो मंडळीस हाकलून देणे, हे एक होते.

याचवेळी जेम्स राजाने मुलकी व फौजखात्यात पुष्कळ रोमन कॅथोलिक पंथाच्या लोकांना जागा दिल्या. मला कायदे रद्द करण्याचा अधिकार आहे व त्या अधिकारान्वये मी हे केले आहे, असे तो म्हणत असे. पुष्कळ न्यायाधीशांना काढून टाकून न्यायसभा जेव्हा त्याने आपल्या अंकित करून घेतल्या तेव्हा सर एडवर्ड हेल्स या नावाच्या रोमन कॅथोलिक गृहस्थाने फौजखात्यात चाकरी करण्याबद्दलचे राजाचे आज्ञापत्र मान्य केले, असा त्याजवर एका तोतया फिर्यादीकडून आरोप आणवून ते काम न्यायसभेपुढे चौकशी करण्यास त्याने आणविले. तेव्हा हेल्स या गृहस्थाने राजाच्या आज्ञापत्रावरून फौजखात्यात चाकरी धरली हे काही त्याने बेकायदेशीर काम केले नाही, असा त्यांनी निकाल दिला. कारण हे कृत्य ज्या कायद्यांनी गैरशिस्त मानले होते ते कायदे रद्द करण्याचा अधिकार पूर्णपणे राजास आहे असे त्यांचे मत होते. याप्रमाणे एकदाचा निकाल मिळवून घेऊन जेम्स राजाने या पुढे टेस्ट ॲक्टकडे दुर्लक्ष करण्याचा क्रम चालू ठेवला.

डिक्लेरेशन ऑफ इंडलजन्स : आपल्याला मनसोक्त राज्य चालविणे झाल्यास, त्यावेळी इंग्लंडमध्ये कॅथोलिक लोकांची संख्या फार लहान असल्यामुळे, एकट्या रोमन कॅथोलिक लोकांवर अवलंबून राहून चालणार नाही, असे जेम्स राजास वाटल्यावरून

त्याने नॉन कन्फॉर्मिस्ट लोकांनाही आपलेसे करून घेण्याचा यत्न चाल ठेवला आणि म्हणून त्याने सन १६८७ मध्ये एक व सन १६८८ मध्ये एक असे सुटीचे (डिक्लेरेशन ऑफ इंडलजन्स) दोन जाहीरनामे प्रसिद्ध केले. त्याने या जाहीरनाम्यांनी रोमन कॅथोलिक किंवा नॉन कॅन्फॉर्मिस्ट लोकांना शिक्षा करण्याविषयीचेच कायदे तहकूब ठेवले असे नाही तर या पंथाच्या लोकांना नोकरीत न दाखल करण्याविषयींचे ही सर्व कायदे तहकूब ठेवले. सर्व लोकांस धर्मासंबंधी मोकळीक देण्याची जरी जेम्स राजाची मनापासून इच्छा असती तरी पण तो या जाहीरनाम्यांबद्दल दोषपात्र झाला असता. मला कोणत्याही कायद्याचा प्रतिबंध नाही व सर्व कायदे करण्याची सत्ता माझे एकट्यातच आहे असे निश्चयाने सांगणे व हे जाहीरनामे प्रसिद्ध करणे एकसारखेच आहे. धर्मस्वातंत्र्य देण्याची जेम्स राजाची खरोखर इच्छा नव्हती. त्याच्या मनात प्रॉटेस्टंट पंथाच्या लोकांत आपापसात लढे लावून देऊन तो पंथ बुडवून टाकावा असे होते. नॉन कॅन्फॉर्मिस्ट लोकांना जेम्स राजाचे हे कृत्य सचोटीचे नाही हे कळून चुकले होते आणि म्हणूनच त्यांनी त्याच्या हातून मिळालेली ही धर्मासंबंधी माफी स्वीकारण्याचे नाकारले.

आपला दुसरा (सन १६८८ मधील) जाहीरनामा राज्यातील प्रत्येक देवळात मोठ्याने वाचून दाखवावा, अशी जेम्स राजाची आज्ञा झाली होती. असा हुकूम करणे रास्त होणार नाही, अशा अर्थाची एक अर्जी कॅन्टरबरीचा आर्चबिशप सॅन्क्रॉफ्ट व आणखी सात बिशप यांनी राजाकडे पाठविली. तिजवरून जेम्स राजाने त्याजवर राजद्रोहमूलक निंदालेखनाचा आरोप ठेवून खटला चालविण्याचा हुकूम केला; परंतु पंचांनी त्याजवर काही अपराध लागू होत नाही, असे म्हणून त्यास सोडून दिले व या त्यांच्या करण्याने सर्व लोकांना मोठा आनंद झाला.

सन १६८८ मधील बंड : जोपर्यंत जेम्स राजाला मुलगा झाला नव्हता तोपर्यंत त्याचा जुलमाचा राज्यकारभार सहन करून त्याची मुलगी मेरी जी मोठी कट्टी प्रॉटेस्टंट पंथाची होती व जिचे लग्न ऑरेंजचा राजपुत्र जो विल्यम याच्याशी झाले होते ती गादीवर बसण्याची वाट पाहण्याकडे सर्व राष्ट्राचे लक्ष लागून राहिले होते; पण ही त्यांची आशा जेव्हा सन १६८८ मध्ये जेम्स राजाला मुलगा झाला तेव्हा नाहीशी झाली. इंग्लंडमधील मुख्य मुख्य अशा सात गृहस्थांनी इंग्लंड देशाचा धर्म व स्वतंत्रता याचे रक्षण करण्याकरिता ऑरेंजच्या राजपुत्रास बोलाविले. त्याने या त्यांच्या बोलाविण्यास मान देऊन तो इंग्लंडात सैन्य बरोबर घेऊन येऊन उतरला. जेम्स राजास सर्वांनी सोडल्यामुळे त्याने पळून जाण्याचा यत्न केला; पण त्याला शीअरनेस येथे काही कोळ्यांनी ओळखून अडवून ठेवले. तेथून त्याला लंडन शहरास परत आणले. तथापि, विल्यमने त्याला पुनः कसे तरी करून भेवडावले व त्यास पळून जाण्याची संधी होईल तितकी मिळू दिली. तो दुसऱ्यावेळेस पळून गेला, तेव्हा विल्यमने एक कन्व्हेंशन पार्लमेंट भरविले.

डिक्लेरेशन ऑफ राईटस् आणि बिल ऑफ राईटस् : दुसरा जेम्स जर इंग्लंडमध्ये राहता तर त्यास गादीवरून काढून टाकणे कठीण पडले असते. आजपर्यंत जे त्याच्या विरुद्ध आचरण करीत आले होते त्यापैकी पुष्कळांचा राजा हा ईश्वरांश आहे असा समज होता आणि म्हणूनच त्याला त्यांनी गादीवरून बळजबरीने काढून टाकले नसते; पण ज्याअर्थी तो फ्रान्स देशात पळून गेला होता त्याअर्थी त्याने आपण होऊन आपल्या गादीचा राजीनामा दिला अशी कंडी पिकविणे शक्य होते. या कन्व्हेंशन पार्लमेंटने पुष्कळ वादविवाद करून आपल्या हक्कांचा एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. डिक्लेरेशन ऑफ राईटस् या जाहीरनाम्यात जेम्स राजाने आपल्या गादीचा राजीनामा दिला असे सांगण्यात आले होते व त्याने जी मुख्य मुख्य कामे करून देशास राग आणला होता ती बेकायदेशीर होती म्हणून त्यास दोष देण्यात आला होता. नंतर लोकांनी विल्यम आणि मेरी यांना गादीवर बसण्याविषयी विनंती केली व त्यांच्या विनंतीस त्यांनी मान दिला. नंतर या कन्व्हेंशन सभेचेच पार्लमेंट बनविण्यात आले व ही पार्लमेंट सभा सन १६८९ मध्ये जानेवारी महिन्यात भरली. हक्कांच्या जाहीरनाम्यात जी कलमे दिली होती त्यातीलच मुख्ये कलमे घेऊन एक हक्कांच्या कायद्याचा खरडा (बिल ऑफ राईटस्) या पार्लमेंट सभेपुढे ठेवण्यात आला. या खरड्यातील मुख्य मुख्य कलमे खाली दिल्याप्रमाणे होती :

१) पार्लमेंटच्या सल्ल्याशिवाय राजाला कोणताही कायदा तहकूब ठेवण्याचा किंवा त्याची अंमलबजावणी करण्याचा अधिकार पोहचतो अशी जी बतावणी करण्यात येते ती गैरकायदेशीर आहे.

२) वरील कलमात सांगितलेला अधिकार राजाला आहे असे मानून मागील कारकीर्दीत जे आचरण झाले आहे ते गैरकायदेशीर आहे.

३) कमिशनर्स फॉर एक्लेझिॲस्टिकल कॉझेझ या नावाची माजी न्यायसभा स्थापन करण्यासाठी जी मंडळी नेमण्यात आली होती ती मंडळी आणि तिच्यासारख्याच दुसऱ्या मंडळ्या किंवा न्यायसभा नेमणे हे बेकायदेशीर व अपायकारक आहे.

४) पार्लमेंटने मंजूर करून दिल्याशिवाय किंवा तिने ज्या मुदतीपर्यंत अशी रक्कम देण्याचे कबूल केले असेल त्या मुदतीपेक्षा जास्त मुदत किंवा ती ज्या कोणत्याही तऱ्हेने अशी रक्कम मंजूर करून देत असेल किंवा देईल या शर्तीतून कोणत्याही वेगळ्या तहेने असा पैसा गोळा करण्याचा राजहक्क आहे, अशा सबबीवर राज्यासाठी किंवा राजाच्या उपयोगी पडावा म्हणून पैसा गोळा करणे हे बेकायदेशीर आहे.

५) राजाला अर्ज करण्याचा प्रजेला हक्क आहे व अशा प्रकारचा अर्ज करण्यासाठी जर कोणास कैदेत टाकण्यात आले किंवा कोणावर खटला करण्यात आला तर हे कृत्य गैरकायदेशीर आहे.

६) पार्लमेंट सभेच्या सल्ल्याशिवाय शांततेच्या वेळी राज्यात कायमचे सैन्य बाळगणे किंवा नवे ठेवणे हे बेकायदेशीर आहे.

७) जी प्रजा प्रॉटेस्टंट पंथाची आहे, त्यातील लोकांना, संरक्षणासाठी त्यांच्या योग्यतेप्रमाणे व कायद्यात ठरविले आहे त्याप्रमाणे हत्यारे बाळगण्याची परवानगी देणे.

८) पार्लमेंट सभेस सभासद निवडून पाठविण्याच्या कामी लोकांना स्वातंत्र्य असावे.

९) पार्लमेंट सभेत जी आपखुशीने भाषणे झाली असतील किंवा जे वादविवाद झाले असतील किंवा जी कामे करण्यात आली असतील, त्यांच्या संबंधाने पार्लमेंट सभेबाहेर कोणत्याही ठिकाणी किंवा कोणत्याही न्यायसभेत कोणीही दोषारोप करू नये किंवा शंका काढू नये.

१०) कोणाही मनुष्यापासून बेसुमार रकमेचा जामीन घेऊ नये किंवा अत्यंत मोठा दंड वसूल करू नये किंवा कोणाही मनुष्याला क्रूर व गैरवहिवाटीची शिक्षा करू नये.

११) पंचांच्या यादी बरोबर ठेवून त्यासंबंधी योग्य ती व्यवस्था करावी व ज्या पंचांस राजहत्या करणाऱ्यांची चौकशी करण्याच्या कामी नेमणे असेल ते जमीनदार वर्गातील असावेत.

१२) काही विवक्षित इसमांच्या, त्याजवर अपराधस्थापन होण्याच्या पूर्वी दंड आणि जप्तीच्या संबंधीच्या, देणग्या व वचने, बेकायदेशीर व निरर्थक आहेत.

१३) प्रजेच्या सर्व दुःखांचा परिहार करण्यासाठी व कायद्यांची दुरुस्ती, बळकटी व रक्षण करण्यासाठी पार्लमेंट सभा या वारंवार भरविण्यात याव्यात.

वरील हक्क इंग्रज लोकांचे आहेत असे प्रतिपादन केल्यांनतर या मसुद्यात गादी विल्यम आणि मेरी व त्यांच्या मुलांना देण्याविषयी व्यवस्था लावण्यात आली होती व त्या मुलांच्या अभावी ती राजकन्या ॲन व तिच्या मुलांना देण्याविषयी व तिच्या मुलांच्या अभावी विल्यमच्या मेरीशिवाय दुसऱ्या कोणत्याही बायकोपासून झालेल्या मुलांना देण्याचे ठरविले होते.

बिल ऑफ राईटचे महत्त्व : स्टुअर्ट घराणे राज्य करीत असता ज्या मुख्य मुद्यांबद्दल एकसारखा वादविवाद चालू होता त्या सर्व मुद्यांचा या मसुद्याने लोकांच्या वतीने व राजाच्या विरुद्ध निकाल करण्यात आला, म्हणून इंग्लंड देशात जे कायदे अत्यंत महत्त्वाचे आहेत त्यापैकी हा एक आहे. जॉन राजाचा ग्रेट चार्टर (स्वातंत्र्याची मोठी सनद), एडवर्डचे कन्फर्मेशन ऑफ दी चार्टर्स (सनदांची बहाली) आणि पहिल्या चार्लस राजाच्या वेळी मंजूर झालेली पिटिशन ऑफ राईटस् (हक्कासंबंधी अर्ज) या तिहींची योग्यता व या कायद्याची योग्यता एकसारखी आहे; परंतु या कायद्याने गादीवर बसणाऱ्यांचा क्रम बदलल्यामुळे व फक्त पार्लमेंट सभेच्याच सनदेवरून राजकर्त्यांची एक परंपरा नक्की झाल्यामुळे हा कायदा

अधिकच महत्त्वाचा समजला पाहिजे. विल्यम, ॲन आणि पहिला जॉर्ज ही ईश्वरांश म्हणून गादीवर बसली असे ढोंग कोणालाही करता आले नसते. राजा हा ईश्वरांश आहे असा ज्यांचा पूर्ण भरवसा होता ते या राजास गादी बळकावणारे असेच समजत असत. टोरी पक्षाच्या लोकांना राजाधिकारांविषयी अत्यंत पूज्यभाव जरी असे तरी ते यांच्याशी त्यांना पार्लमेंट सभेने गादी प्राप्त करून दिली होती म्हणून मित्रभावाने वागत नसत. व्हिग पक्षाचे लोक पार्लमेंट सभेने गादी दिलेल्या राजांशी मित्रभावाने वागत असत खरे; . परंतु त्यांना राजाधिकारांविषयी फार थोडा पूज्यभाव असे. याप्रमाणे सतराव्या शतकात राजसत्ता जी इतकी मोठी होती ती अठराव्या शतकात त्या मानाने अगदी क्षुल्लक होऊन गेली. यापुढे इंग्लंडचा राज्यकारभार पार्लमेंट सभेच्या टीकेच्या अनुरोधाप्रमाणे राजाच्या हातून न होता राजाच्या नावाने पार्लमेंट सभेचे पुढारी करू लागले. हा काळ पावेतो राजसत्तेवर पार्लमेंट सभा ही एक प्रकारच्या दाबासारखी असे; पण ती आता राजसत्ताच होऊन बसली, असे म्हटले तरी चालेल.

भरण्याचा विनियोग-बंडाचा कायदा : बिल ऑफ राईटस् मंजूर झाल्यानंतर थोड्याच दिवसांनी जे दोन नवे परिपाठ पाडण्यात आले त्यामुळे पार्लमेंटाला नवी मिळालेली सत्ता अधिकच वाढली. या पहिल्या परिपाठाला भरण्याचा विनियोग असे म्हणतात.

(१) भरण्याचा विनियोग : प्राचीन काळी सर्व राज्यकारभार राजाच्या हाती असल्यामुळे तो आपल्या विचाराप्रमाणे त्याच्या वाडवलिडांपासून चालत येणारे उत्पन्न व पार्लमेंट सभेने त्यास दिलेला पैसा यांचा खर्च करीत असे. राजाच्या प्रधानांनी मागितलेला पैसा देणे न देणे पार्लमेंट सभेच्या मर्जीवर असे; पण तिने एकदा पैसा दिला म्हणजे तो कोणत्या रीतीने खर्च करावा हे सांगणे तिच्या हाती नसे. या नियमास अपवादरूप म्हणून जेव्हा कॉमन्स सभेचा राजावर किंवा त्याच्या प्रधानांवर विश्वास बसेना तेव्हा मात्र तिने, दिलेल्या पैशाचा व्यवस्थित रीतीने खर्च व्हावा म्हणून, एक दोन वेळा उपाय योजिले; पण १६८८ मध्ये जी पार्लमेंट सभा भरली ति भरण्याचा विनियोग कशा रीतीने व्हावा म्हणजे राज्यातील वेगवेगळाल्या खात्याकरिता किती खर्च व्हावा हे ठरविण्याचा नवा परिपाठ सुरू केला. पार्लमेंट सभेने विल्यम राजाल सालीना १२००००० पौंडाचे उत्पन्न द्यावे असे ठरविले होते खरे; पण त्या रकमेपैकी निम्म्या रक्कम दिवाणी खात्यांकडे लावावी व निम्म्या रक्कम फौज व आरमार खात्यांकडे लावावी, असे तिने ठरवून दिले होते. या वेळेपासून ही विनिमयाची व्यवस्था पार्लमेंट सभेने आपल्या हाती घेण्याचे काम अधिकच चालविले. आज मितीला सार्वजनिक खर्चाची प्रत्येक बाब कॉमन्स सभा ठरवून देत आहे. याच पार्लमेंट सभेने राजाला पूर्वीप्रमाणे तहहयात नव्हे; पण ४ वर्षांच्या मुदतीने जकातीचे उत्पन्न देण्याचे ठरविले. याच वेळी फ्रान्स देशाशी एक मोठी लढाई सरू झाली व तिच्यामुळे लोकांवर कराचा बोजा जास्त बसला व राष्ट्रीय कर्जास सुरुवात झाली. याप्रमाणे सर्व राज्यकारभार चालविणाऱ्या मंडळीस कॉमन्स

सभेने दिलेल्या पैशावरच अवलंबून राहणे भाग पडू लागले. या वेळेपासून पुढे राष्ट्राचा सर्व पैसा हाऊस ऑफ कॉमन्स या सभेच्या ताब्यात पूर्णपणे राहू लागला.

(२) बंडाचा कायदा : बिल ऑफ राईटस् या कायद्यान्वये पार्लमेंट सभेच्या सल्ल्याशिवाय राजाला कायमचे सैन्य ठेवता येत नव्हते. कायमचे सैन्य मुळीच काढून टाकावे असा या कायद्याचा हेतू होता. कायमचे सैन्य ठेवल्यामुळे पहिल्या चार्लस राजाला देहान्त शिक्षा भोगावी लागली व प्रजासत्ताक राज्याची स्थापना त्याच्याच पायी झाली म्हणून टोरी पक्षाच्या लोकांना अशा प्रकारचे सैन्य आवडत नसे. दुसऱ्या जेम्स राजाने असेच सैन्य ठेवून आपल्या मर्जीप्रमाणे राज्य चालविण्याचा यत्न केला होता म्हणून व्हिग पक्षाच्या लोकांनाही असे सैन्य ठेवणे आवडत नसे. राष्ट्राच्या रक्षणाचे काम नागरिक लोकांच्या शिबंदीकडे सोपावे असे दोन्ही पक्षांच्या लोकांच्या मनात होते; पण यावेळी असे होणे शक्य नव्हते. कारण सर्व जगात अति उत्तम कवाईत शिकलेले सैन्य ज्या फ्रान्स देशात होते त्या फ्रान्स देशाच्या राजाशी लढाई सुरू करण्याच्या बेतात इंग्लंड होते. म्हणून दुसऱ्या जेम्स राजाने जे कायमचे सैन्य एकत्र केले होते तेच कायम ठेवणे जरूर होते; पण अशा सैन्याचा बंदोबस्त करण्यासाठी व त्याची व्यवस्था लावण्यासाठी विशिष्ट कायदे करणे व त्यांचा अंमल करण्यासाठी विशिष्ट न्यायसभा नेमणे भाग होते; पण इंग्लंडचे राज्यकारभारव्यवस्थेत असे कायदे व अशा न्यायसभा यांची काही व्यवस्था लाविलेली नव्हती. काही शिपायांनी आपले निशाण टाकले व ते पळून गेले. या अपराधाबद्दल दुसऱ्या जेम्स राजाने त्यांना फाशी दिले. हे त्याचे कृत्य गैरकायदेशीर होते. याचप्रमाणे जेव्हा इप्सिच येथे छावणीस ठेविलेल्या एका स्कॉटलंड देशातील लोकांच्या पलटणीत पुंडावा सुरू झाला तेव्हा असे प्रसंग पुनः न यावे म्हणून पहिला बंडाचा कायदा मंजूर करण्यात आला. या कायद्याचा अंमल एक वर्षभर चालेल असे ठरविले होते. ही मुदत संपल्यावर हा कायदा पुनः अमलात आणण्याचे ठरविले होते; पण त्याही वेळेस ही मुदत १ वर्षाचीच ठेवली होती. पहिल्या पहिल्याने अशी फौज ठेवण्याचे कारण पडणार नाही असे लोकांना वाटल्यावरून व नंतर पार्लमेंट सभेच्या मनात हे असे सैन्य आपल्या ताब्यात राहावे म्हणून ही अशी मुदत ठेवण्यात येत असे. सन १८८१ मध्ये हा बंडाचा कायदा रद्द करून त्याच्या ऐवजी सैन्याच्या शिक्षणासंबंधी व नियमनासंबंधी कायदा अमलात आणण्यात आला; पण हाही कायदा दरसाल ताजा करावा लागतो. हा कायदा जर ताजा करण्यात आला नाही तर सैन्यामध्ये व्यवस्था राखण्याचे साधन काहीच राहणार नाही. एखादा शिपाई जर आपली चाकरी सोडून पळून गेला तर, एखादा मजूर आपला करार मोडून पळून गेल्यास, त्यास जी शिक्षा व्हावयाची, तीच शिक्षा या अशा शिपायास होईल व एखाद्या शिपायाने जर आपल्या अंमलदारास मारले तर त्याजवर फक्त दंडपारुष्याचा खटला करता येईल. याप्रमाणे कायमचे सैन्याला पार्लमेंट सभेच्याच मदतीने ताब्यात ठेवता येते. सन १६८८ मध्ये झालेल्या बंडाच्या वेळेपासून पार्लमेंट सभेच्या हातात राज्यातील सर्व पैसा व सर्व सैन्यही येऊन राहिले आहे.

टालरेशन ॲक्ट १६८९ : दुसऱ्या जेम्स राजाने चर्च ऑफ इंग्लंड या संस्थेवर आपला हात जेव्हा उचलला तेव्हा नॉनकन्फॉर्मिस्ट लोकांपैकी बहुतेकांनी त्यास मदत करण्याचे मोठ्या सचोटीने नाकारले व मनापासून बंडास मदत केली. यामुळे दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकीर्दीत या लोकांचा जो छळ झाला होता तशा प्रकारच्या छळापासून सुटका होण्यास आपण पात्र आहोत असे त्यांनी निदर्शनास आणून दिले होते. बंड होऊन गेल्यावर राष्ट्रीय धर्मसंस्थेत नॉन कन्फॉर्मिस्ट पंथांच्या लोकांचा समावेश व्हावा म्हणून शेवटचा यत्न करण्यात आला होता; पण त्यास कोणत्याही पक्षाच्या लोकांपासून मदत न मिळाल्यामुळे तो निष्फळ झाला. तथापि, सन १६८९ मध्ये टॉलरेश ॲक्ट (अप्रतिबंधाचा कायदा) मंजूर करण्यात आला. मोठ्या श्रमाने स्पष्टीकरण केल्याशिवाय या कायद्याच्या कलमांचे ज्ञान पूर्णपणे होणार नाही; परंतु युनिटेरिअन पंथाच्या लोकांशिवाय बाकीच्या सर्व प्रॉटेस्टंट लोकांना आपापल्या मताप्रमाणे ईश्वरोपासना करण्याची मोकळीक मिळाली, हा या कायद्याचा व्यावहारिकदृष्ट्या उपयोग झाला. युनिटेरिअन किंवा रोमन कॅथोलिक पंथांचे लोकांशिवाय बाकी सर्व पंथांच्या लोकांचा याप्रमाणे जो छळ होत होता तो आता बंद झाला. इंग्लंडमधील लोकसंख्येपैकी ज्यांचा आता छळ होण्याचा संभव होता त्यांची संख्या एकंदर संख्येच्या मानाने फार थोडी होती.

राजा व प्रजा यांच्या एकमेकांशी असणाऱ्या संबंधाच्या इतिहासात बिल ऑफ राईटस् या कायद्याला जी जागा मिळाली आहे तीच जागा टॉलरेशन ॲक्ट या कायद्यास धर्मसंस्था व राजसंस्था यांच्या परस्पर संबंधाच्या इतिहासात मिळाली आहे. हा कायदा इतिहासात एका मोठ्या उलटापालटीचा दर्शक आहे. या उलटापालटीने एका काळाचा अंत व दुसऱ्या काळाच्या प्रारंभास सुरुवात झाली आहे. इंग्लंड देशात ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाल्यावर पुष्कळ शतकेपर्यंत इंग्लंडमध्ये एकच धर्मसंस्था असे व ती राज्यसंस्थेशी समव्यापक असे. राज्यातील प्रत्येक इसम एका खऱ्या धर्मसंस्थेचा अनुयायी आहे किंवा नाही हे पाहणे राजाचे कर्तव्य आहे असे सर्वांचे एक मत होते. जेव्हा इंग्लंडमधील धर्मसंस्थेने प्रॉटेस्टंट पंथ स्वीकारला तेव्हा तिने कॅथोलिक धर्मातील मतैक्याच्या तत्त्वाचा त्याग केला नव्हता. त्याचप्रमाणे प्युरिटन किंवा लॅडिअन पंथाच्या लोकांचाही मतांतर राहू न देण्याविषयी निश्चय झाला होता. या पंथांच्या लोकांनी आपापल्या कल्पनांप्रमाणे धर्मसंस्थेत सुधारणा करण्याकरिता व दुसऱ्या लोकांकडून त्या सुधारणा कबूल करवून घेण्याकरिता लागणारी सत्ता मिळविण्यासाठी धुमाकूळ मांडला होता. याप्रमाणे लोकांचा छळ होणे अपरिहार्य झाले होते. हा छळ बंद करण्यास सर्व पंथांचा राष्टीय धर्मसंस्थेत समावेश करून घेण्याशिवाय दुसरा मार्गच राहिला नव्हता; पण हे असे करणे नेहमी निष्फळ होत असे.

धर्मासंबंधी लोकांची मते वेगवेगळाली असणे शक्य आहे. ही गोष्ट कायद्याने पहिल्याने या सन १६८९ तील टॉलरेशन ॲक्टने कबूल केली आहे. राज्यातील बहुजन समाजाची

(धर्मासंबंधी) मते, शिक्षण व संस्कार कबूल करण्यास ज्या लोकांची मने होईनात त्या लोकांनी आपापल्या धर्मसंस्था वेगळाल्या काढाव्या व त्यास कायद्याप्रमाणे संरक्षण मिळेल, असे ठरविण्यात आले होते. त्याप्रमाणे इंग्लंडमध्ये कायद्याने ज्या राष्ट्रीय धर्मसंस्थेची स्थापना करण्यात आली होती त्याच धर्मसंस्थेशेजारी या नॉन कन्फॉर्मिस्ट लोकांच्या अतिविरुद्ध संस्था गुण्यागोविंदाने राहू लागल्या. याप्रमाणे धर्मसंस्थेची जी व्यवस्था हल्ली पाहण्यात येत आहे तिचा उगम झाला; परंतु धर्मसंस्थेस हे स्वरूप येण्यास किती कालावधी लागला हे मात्र बहुतेक लोक विसरून गेले आहेत. या अप्रतिबंधाची सीमा अजून बरीच अकुंचित होती, हे मात्र खरे आहे. कायद्याने या धर्मसंस्थेस अप्रतिबंधता मात्र प्राप्त झाली होती, तीस समता प्राप्त झाली नव्हती हेही खरे आहे. या सूट दिलेल्या नॉन कन्फॉर्मिस्ट लोकांना कायद्याप्रमाणे कोणतेही हुद्याचे काम किंवा बढती मिळवायाची नव्हती. राज्यातील वाटेल ती जागा मिळविण्याचा हक्क वाटेल त्या धर्माच्या मनुष्यास पुढे सुमारे १५० वर्षांनी प्राप्त झाला.

मुद्रणस्वातंत्र्य : वर सांगितलेल्या फेरफारांपेक्षा एक अधिक महत्त्वाचा फेरफार हे बंड होऊन गेल्यानंतर थोड्याच वर्षांनी सहजगत्या घडून आला. हा फेरफार म्हणजे छापखान्याची मोकळीक हा होय. ट्यूडर घराण्यातील राजांनी, म्हणजे पहिल्या जेम्स राजाने व पहिल्या चार्लस राजाने छापखान्यास कडक दाबात ठेविले होते. लाँग पार्लमेंट या राजांपेक्षा अधिक उदार मनाचे नव्हते. बंड मोडून राजसत्ता पुनः इंग्लंडमध्ये स्थापन झाल्यावर थोड्याच दिवसांनी छापखान्यात छापावयास येणारे लेख व पुस्तके छापावयास योग्य आहेत किंवा नाहीत हे पाहण्याकरिता एका अधिकाऱ्याची योजना कायदा करून करण्यात आली. हा कायदा वेळोवेळी ताजा करण्यात येत असे; पण त्याची ताजा न केल्यामुळे सन १६७९ मध्ये शेवटची मुदत संपली. त्या वेळेस दुसऱ्या चार्लस राजाचे व त्याच्या पार्लमेंटाचे भांडण चालले होते. दुसरा जेम्स गादीवर बसे तोपर्यंत या संबंधात पुनः कायदा करण्यात आला नाही. सन १६८५ मध्ये लायसेन्सिंग ॲक्ट हा ताजा करण्यात येऊन त्याची सात वर्षांची मुदत ठेवण्यात आली. सन १६९२ मध्ये पार्लमेंट सभेच्या दुसऱ्या बैठकीच्या अखेरपावेतो हा कायदा अमलात होता; पण १६९३ मध्ये जेव्हा त्याची मुदत सरली तेव्हा ही त्यास पुनः देण्यात आली नाही. निंदालेखाच्या कायद्याशिवाय या वर्षापासून पुढे छापखान्यांवर इतर कोणत्याही प्रकारच्या कायद्याचा दाब नव्हता. सरकारी कारभारविषयी ज्या प्रतिकूल टीका होत असत त्यांचा समावेश या कायद्याची ओढाताण करून त्यात करून घेत असे, हे मात्र खरे आहे. तथापि स्वातंत्र्याच्या दृष्टीने पाहू गेले असता शेवटील लायसेन्सिंग ॲक्टची मुदत सरली व तो पुनः ताजा करण्यात आला नाही ही गोष्ट खरोखर मोठ्या नफ्याची झाली. याच वेळेपासून पुढे छापखान्यांच्या हाती फार मोठी सत्ता, राजनीतिसंबंधाने आली. ॲन राणीचे कारकीर्दीत बहुतेक सर्व विद्यानुरागी लोक राजनीतिविषयक लहान -लहान पुस्तके लिहीत असत. वर्तमानपत्रांची संख्याही या वेळेपासून पुष्कळ वाढली. लोक वर्तमानपत्रात खऱ्या

गोष्टी व आपली मते दर्शवू लागले. पूर्वीपेक्षा यावेळी जास्त लोक सार्वजनिक कामाकडे आपले लक्ष लावू लागले.

ट्रायेनिअल ॲक्ट : आता राष्ट्रात मुख्य सत्ता हाऊस ऑफ कॉमन्स सभेकडे आल्यामुळे पार्लमेंट सभेच्या मदतीशिवाय राजा राज्य चालवील ही धास्ती मुळीच राहिली नव्हती. सन १६४१ मध्ये नवी पार्लमेंट भरल्याशिवाय, तीन वर्षांपेक्षा जास्त मुदत जाऊ देऊ नये, अशा आशयाचा जो ट्रायेनियल ॲक्ट मंजूर करण्यात आला होता तसा कायदा करण्याची आता जरूर - राहिली नव्हती. हे जरी खरे होते तरी राज्यनीतिसंबंधाने राज्यातील लोकांचे मत काय आहे हे राजाच्या निदर्शनास आणून देण्याचे काम पार्लमेंट सभेतील सभासदांकडून होण्याचे बंद पडल्यावरदेखील, याच सभासदांची बनलेली पार्लमेंट सभा वाटेल तितके दिवस कायम ठेवण्याचे राजाच्या हाती होते आणि म्हणूनच काही वाजवी मुदतीनंतर नवी पार्लमेंट सभा भरविलीच पाहिजे अशा अर्थाचा कायदा करणे जरूर होते. दरवर्षी नवी पार्लमेंट सभा भरवावी अशा अर्थाचे जे जुन्या काळचे कायदे होते ते यावेळी अमलात नव्हते. पार्लमेंट सभा भरल्यानंतर तिच्या बैठकीच्या पहिल्या दिवसापासून तीन वर्षांच्या आत तिने आपले काम संपवावे व बरखास्त व्हावे, असे सन १६९४ तील मंजूर झालेल्या ट्रायनियल ॲक्टने ठरविण्यात आले होते. या कायद्याने पुनः एकदा तीन वर्षांपेक्षा जास्त काळ पार्लमेंट सभा भरल्याशिवाय जाऊ नये, असे ठरविण्यात आले होते.

राजघातासंबंधी चाललेल्या खटल्यांच्या चौकशीच्या रीतीत सुधारणा : इंग्लंडमधील जुन्या फौजदारी कायद्याप्रमाणे आरोपीस पुष्कळ अडचणी सोसाव्या लागत असत. त्यांच्या खटल्याची चौकशी करण्यापूर्वी त्यास त्याजवर जो आरोप ठेवण्यात आला असेल त्याची नक्कल मिळत नसे; त्यांच्या तर्फेच्या साक्षीदारास शपथ देऊन त्यांची जबानी घेत नसत व त्यांना आपल्या तर्फेने वकील देण्याची परवानगी नसे. या अन्यायी नियमांचा परिणाम राजद्रोहाच्या खटल्यातील आरोप्यांवर विशेषकरून निर्दयपणाचा घडत असे. कारण न्यायाधीश बहुतकरून राजाच्या कह्यात असत व सरकारतर्फेचे वकील हुशारातले हुशार असत. सहाव्या एडवर्डच्या वेळच्या एका कायद्याने कोणाही राजद्रोहाच्या आरोपीस शिक्षा देण्यापूर्वी दोन साक्षीदार घेतले पाहिजेत, असे ठरविले होते. एवढीच काय ती सवलत अशा आरोप्यास असे. सर्व सतराव्या शतकभर राजद्रोहांच्या खटल्यांच्या जितक्या चौकशा झाल्या तितक्या सर्व चौकशांमध्ये घोर अन्याय व निर्दयता ही दिसून येत आहेत. असे खटले चालविण्याची जी रीत होती तीत सन १६९५ मधील एका कायद्याने दुरुस्ती करण्यात आली. या कायद्यात पुढे दिल्याप्रमाणे कलमे घातली होती : आरोपीस त्याची चौकशी होण्यापूर्वी त्याजवर जो आरोप ठेवण्यात आला असेल त्याची व त्याच्या खटल्याची चौकशी करण्याच्या कामी जे पंच नेमले असतील त्यांच्या यादीची नक्कल देण्यात यावी, त्यास आपल्या तर्फेने वकील देण्याची परवानगी द्यावी व त्याच्या साक्षींच्या जबान्या शपथ

देऊन घेण्यात याव्यात. कोणाही आरोपीवर राजद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला असेल व तो अपराध घडून जर तीन वर्षे झाली असतील तर त्या अपराधाबद्दल, जर तो अपराध राजवधाचा नसेल तर त्याजवर खटला चालविण्यात येऊ नये.

ॲक्ट ऑफ सेटलमेंट (व्यवस्थापनाचा कायदा) १७०१ : विल्यम किंवा ॲन या दोहोंपैकी एकाचीही संतती त्यांच्या मागे राहून गादीवर असेल असे होणे जेव्हा असंभाव्य आहे, असे लोकांना वाटू लागले त्या वेळेस गादीवर कोणी कोणत्या क्रमाने बसावे या संबंधाने मुख्यत्वेकरून व्यवस्था लावण्याच्या हेतूने हा कायदा करण्यात आला होता, असे त्याच्या नावावरून स्पष्ट होते आहे; परंतु या कायद्यात राज्यकारभार व्यवस्थेसंबंधी महत्त्वाच्याही गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे.

(१) गादीवरील इसम हा इंग्लंडातील धर्मसंस्थेचा अनुयायी असला पाहिजे : यानंतर ज्याला इंग्लंडची गादी मिळेल त्याने चर्च ऑफ इंग्लंड (इंग्लंडमधील धर्मसंस्थे) च्या मताशी तादात्म्यसंबंध जोडून कायद्याने ठरवून दिल्याप्रमाणे वागले पाहिजे, असे या कायद्याने ठरविले होते. जे लोक चर्च ऑफ इंग्लंडच्या धर्मतादात्म्याचा अंगीकार करीत नसतील त्यास राज्यकारभार प्राप्त होऊ नये अशा संबंधाच्या कायद्यांची जी एक मालिका तयार करण्यात आली होती ती हा कायदा झाल्याने परिपूर्ण झाली. हा वर्जावर्जी करण्यासंबंधी कायदा, दुसरे अशाच प्रकारचे कायदे जसे बंद करण्यात आले आहेत तसा आला नसून अजूनपर्यंत अमलात आहे. त्या कायद्यापासून कधीही अडचण उपस्थित झाली नाही इतकेच नाही तर तो राजा गादीवर असेल तो धर्मसंस्थेचा मुख्य असल्यामुळे असा कायदा असणे अवश्य आहे, असे म्हणता येईल. जो राजा इंग्लंडमधील धर्मसंस्थेने ठरवून दिल्याप्रमाणे तिच्याशी तादात्म्य भावाने वागत नाही तो धर्मसंस्थेचा मुख्य होण्यास योग्य नाही असे दुसऱ्या जेम्स राजाच्या उदाहरणावरून सिद्ध झाले आहे.

गादीवर बसण्याचा हक्क हा वंशोपभोग्य आहे अशी जी लोकांची समजूत होती ती यावेळी लयास जाऊ लागली होती, असे हा कायदा करण्याने सिद्ध होत आहे. मागील पिढ्यांत जे असे वर्जनाचे खड़े करण्यात आले होते ते लोकांचा वरीलप्रमाणे विश्वास असल्यामुळे त्याच्या जोरावर निरुपयोगी होत होते. जर गादीवर असणारे राजाचे मागून येणारा वारस इंग्लंडमधील धर्मसंस्थेच्या मताशी तादात्म्य पावून आचार विचार करणारा नसेल तर त्याचा गादीवरील वंशोपभोग्यत्वाचा हक्क खुशाल बाजूला ठेवावा अशा अर्थाचा यावेळी असलेल्या टोरी पार्लमेंटने एक कायदा मंजूर केला.

(२) प्रिव्हीकौन्सिलाचे पुनरुज्जीवन करण्याचा यत्न : ॲक्ट ऑफ सेटलमेंटच्या कायद्याच्या आणखी एका कलमाने प्रिव्हीकौन्सिलास पुनः अस्तित्वात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. पूर्वी राज्यकारभाराची जी कामे प्रिव्हीकौन्सिलात होत होती ती पुनः तेथे चालवावी व या कौन्सिलाने केलेल्या ठरावांवर जे कौन्सिलर या ठरावास अनुकूल

असतील त्यांनी सह्या कराव्यात, असे या कलमाने ठरविले होते. सर्व राज्यकारभारावर प्रिव्हीकौन्सिलाचा अधिकार चालत असे, असे ट्यूडर घराण्यातील राजांच्या वेळी होते हे आपण पाहिलेच आहे. स्टुअर्ट घराण्यातील राजे राज्य करीत असता ही सत्ता राजाच्या अतिशय विश्वासातील एका लहानशा मंडळीच्या हाती हळूहळू गेली होती हेही आपण पाहिलेच आहे. बंडाची समाप्ती झाल्यानंतरही हीच स्थिती कायम होती. राजा काही ठळक लोकांची काय ती मसलत घेत असे व बाकीच्या बहुतेक कौन्सिलरास सार्वजनिक कामात नावाचाच भाग मिळत असे. जुन्या राज्यकारभार व्यवस्थेचे जे कट्टे अभिमानी होते त्यांना या नव्या चालीचे भय वाटू लागले. राजाला तर अन्याय करणे शक्यच नव्हते; पण अशा अन्यायाबद्दल राजाच्या सल्लागारास जबाबदार धरता येत होते, म्हणून राजाचे सल्लागार कोण हे कळणे मुद्याचे होते. जर का एकदा राजा सर्व कौन्सिलातील सभासदांचे मत न घेता त्यातील एखाद्या कुटाच्याच उपदेशाप्रमाणे चालू लागला तर बदअमलाबद्दल जबाबदारी कोणावर राहणार?

निःसंशय अशाच प्रकारच्या विचारांवरून व्यवस्थापनाच्या कायद्यात हे कलम घातले असावे; पण असे केल्याने एकंदर गोष्टींचा जो स्वाभाविक कल होता तो बदलणे शक्य नव्हते. राज्यकारभारात हात घालण्याची ज्या लोकांची इच्छा नसे किंवा ज्यास सामर्थ्य नसे अशा लोकांना 'प्रिव्हीकौन्सिलर' ही पदवी बहुमानाचे चिन्ह पुष्कळ वेळा देण्यात येत असे. कोणत्याही गोष्टीचा ताबडतोब निश्चय करण्याच्या कामी हे प्रिव्हीकौन्सिल फार अवजड होऊन राहिले होते. ज्यास आपण आता प्रतिपक्षाचे नायक म्हणू तसे लोक व प्रधानमंडळ हेही प्रिव्हीकौन्सिलात असत म्हणजे सर्व पक्षांचे लोक त्या प्रिव्हीकौन्सिलात असत; पण राजाच्या खऱ्या सल्लागारांची संख्या फारच थोडी असे. या शतकाच्या पुढील शतकात कॅबिनेट पद्धतीने राज्यकारभार चालविण्याची रीत प्रचारात आल्यामुळे बिनजोखीमदारीने राज्य चालविण्यापासून वाईट परिणाम होतील असे जे लोकांना भय वाटत होते ते टळले.

(३) हाऊस ऑफ कॉमन्समधून अधिकारी व बैठापगार खाणाऱ्या लोकांचे वर्जन : जो मनुष्य सरकारी अंमलदार असेल किंवा ज्यास राज्यात किफायतीची जागा मिळालेली असेल किंवा ज्यास सरकारातून बैठापगार मिळत असेल त्या मनुष्यास सभासद या नात्याने हाऊस ऑफ कॉमन्स या सभेत बसून सार्वजनिक नोकरी बजाविता येणार नाही असे व्यवस्थापनाच्या कायद्यात ठरविले होते. यावेळी राज्यातील सत्ता हाऊस ऑफ कॉमन्स या सभेच्या हाती आली होती. आता हाऊस ऑफ कॉमन्स या सभेवर कोणाची बळजबरी चालेल, अशी स्थिती राहिली नव्हती; पण अशीच तिची स्थिती असल्यामुळे ही सभा द्रव्यवश होण्याचा मात्र संभव रगड होता. नेहमी सावध असणाऱ्या सार्वजनिक लोकमताचा तिजवर ताबा नव्हता. ज्या नियोजक समूहावर एखाद्या सामर्थ्यवान मनुष्याचा किंवा राजाचा पूर्ण ताबा चालत असे अशा नियोजक समूहांनी नेमलेले पुष्कळ सभासद

हाऊस ऑफ कॉमन्स सभेत असत. या वेळेस या सभेत झालेले वादविवाद किंवा अनुकूल व प्रतिकूल मतांची संख्या प्रसिद्ध करण्याचा रिवाज पडला नव्हता. ज्यावेळी ज्या पक्षास बहुमत मिळालेले असे, त्या पक्षाच्या पुढाऱ्यास अधिकाऱ्याच्या जागा देण्याचा रिवाज त्यावेळी पडला नसल्याने, या उपसभेतील सभासद पुष्कळ वेळा दांडगाई करीत व मंत्री मंडळीस घोटाळ्यात घालण्याचा यत्न करीत, म्हणून मंत्री मंडळीस या सभासदांना आपल्या ताब्यात आणण्यासाठी त्यास सन्मार्गापासून भ्रष्ट करण्याचा उपाय योजण्याचा मोह पडत असे. हे भ्रष्ट करण्याचे मार्ग म्हटले म्हणजे एक त्यास प्रत्यक्ष पैसा लाचेऐवजी देणे व दुसरा त्यास अधिकाराच्या जागा व बैठापगार देणे. हा शेवटचा भ्रष्ट करण्याचा मार्ग बंद व्हावा म्हणून ॲक्ट ऑफ सेटलमेंट या कायद्यात हे कलम घालण्यात आले होते; पण हे कलम वाजवीपेक्षा फाजील कडक मात्र झाले. राज्यात अतिशय महत्त्वाच्या जागा ज्या लोकांना दिल्या होत्या त्यासही हे कलम लागू झाले व त्यामुळे राज्यकारभार कसा चालला आहे हे प्रत्यक्ष रीतीने हाऊस ऑफ कॉमन्स सभेस समजण्याचे बंद झाले. थोड्या वर्षांनंतर हे कलम रद्द करावे लागले व त्यावेळी, सन १७०६ नंतर ज्या जागा निर्माण केल्या असतील व अशा जागांवर जे लोक ठेवण्यात आले असतील, त्या लोकांना मात्र कॉमन्स सभेमध्ये सभासद म्हणून बसता येणार नाही, असे ठरविण्यात आले होते. या सभेतील एखाद्या सभासदाने फौजखात्यातील अंमलदारीच्या जागेशिवाय दुसरी एखादी सरकारी जागा पत्करली तर त्याने आपल्यास पार्लमेंट सभेत बसण्याची लोकांची संमती आहे हे सिद्ध करण्याकरिता आपल्याला पुनः लोकांकडून पसंत करून घेतले पाहिजे हेही याचवेळी या कायद्याने ठरविले होते. हे नियम अजूनपर्यंत अमलात आहेत.

न्यायाधीशांचे स्वातंत्र्य : न्यायाधीशास अधिकार चालविण्याविषयी ज्या सनदा देणे त्या तह्यात किंवा जोपर्यंत ते सन्मार्गाने वागतील तोपर्यंत हा अधिकार त्याजकडे राहील अशा अर्थाच्या देणे व त्यांचा पगार नक्की करून तो कायमचा करून देणे हे या कायद्याने ठरविले होते. तथापि, जर पार्लमेंटच्या दोन्ही उपसभांनी मिळून कोणाही न्यायाधीशाच्या विरुद्ध अर्ज केल्यास त्यास अधिकारच्युत करता येईल असेही या कायद्यात कलम होते. स्टुअर्ट घराण्यातील राजे राज्य करीत असता न्यायाधीशांवर ते जो दाब ठेवीत असत त्या दाबापासून याप्रमाणे न्यायाधीशांची सुटका झाली व इंग्लंडमधील न्यायाधीशांची पत पुरतेपणी उन्नतीला जाऊन पोहोचली.

उपसंहार : राजा व प्रजा यामधील ज्या कलहाची सुरुवात जॉन राजाविरुद्ध अमीर लोकांनी करून दिली होती व जो पिढ्यान पिढ्या जेम्स राजाला पदच्युत करी तोपावेतो एकसारखा चालूच होता त्या कलहाची अखेर वर वर्णन केलेल्या सधारणेच्या मालिकेत झाली. यापढे राजसत्तेस पार्लमेंट सभेत दृग्गोचर होणाऱ्या लोकमताच्या स्वाधीन होऊन बसावे लागले म्हणजे इंग्लंड हे 'राजा असलेले लोकसत्तात्मक राज्य' झाले असे म्हटले

तरी चालेल. राजाचा सर्व डामडौल व पदव्या काय त्या राहिल्या व त्याच्या अगोदर होऊन गेलेल्या अत्यंत बलिष्ठ राजास जे खरोखर अधिकार होते ते बाहेरून मात्र त्याच्या हाती राहिले. राजसंस्था व धर्मसंस्था यांचे श्रेष्ठत्व अजूनही राजाकडेच होते. न्यायाचे मूळ तोच होता व राष्ट्राच्या जमिनीवरील व समुद्रावरील सर्व सैन्याचे आधिपत्य त्याच्याकडेच होते; परंतु या वर्णनामध्ये ज्या सत्तेचे वर्णन गर्भित आहे ती सत्ता हाऊस ऑफ कॉमन्सच्या परवानगीने व ज्या लोकांवर या सभेचा विश्वास होता त्या लोकांच्या सल्ल्याप्रमाणेच या वेळेपासून पुढे राजाला चालविता येण्याची होती.

तिसऱ्या विल्यमाचे जातवजन : यासमयी राजनीतिसंबंधी फेरफारांची खरी मर्यादा विल्यमच्या उद्योगीपणाने झाकून गेली होती. त्याचे सामर्थ्य व उत्साह इतका जबरदस्त होता, की नुसती नावाची गादी मिळवून त्याचे समाधान झाले नसते. तो ज्या वेळेस गादीवर बसला ती वेळ इतकी आणीबाणीची होती की त्या वेळेस खरोखर राजेपणा ज्याच्या अंगी आहे अशाच राजाची फार जरूर होती. परदेशांशी त्याचा कारभार चालविणारा चिटणीस आजपर्यंत इंग्लंड देशाला कधीही प्राप्त झाला नाही. त्याचा तो स्वतःच होता. त्याच्या पाठीमागे असा जबरदस्त लायक चिटणीस सेनाधिपतीही तोच होता व जरी पुष्कळ वेळा त्याला यश येत नसे तरी तो मोठमोठाली सैन्ये घेऊन मोठ्या हुरमत्तीने स्वाऱ्या करीत असे. बंड झाल्याने गादीची सत्ता किती कमी झाली होती हे त्याचा अंत होई तोपर्यंत कोणासही दिसून आले नाही.

○○○

भाग ११ वा

ॲन, पहिला जॉर्ज आणि दुसरा जॉर्ज

इ.स. १७०२-१७६०

उपोद्घात : पहिल्या एडवर्ड राजाने कनर्फेशन ऑफ दी चार्टर्स या नावाचा कायदा ज्यावेळी मंजूर केला तो काळ इंग्लंडमधील राज्यकारभार व्यवस्थेच्या इतिहासात जसा महत्त्वाचा आहे त्याचप्रमाणे तिसऱ्या विल्यमने बिल ऑफ राईटस् आणि दुसरे कायदे ज्यावेळी मंजूर केले तो काळही इतिहासदृष्ट्या महत्त्वाचा आहे. राष्ट्रातील लोकांच्या वेगवेगळाल्या तटांमध्ये जो कलह एकसारखा फार दिवस चालू होता तो एकदाचा मिटला व एका शांततेच्या काळास सुरुवात झाली. बिल ऑफ राईटस् या कायद्याने दुरुस्त केलेल्या इंग्लंडमधील राज्यकारभार व्यवस्थेत सुमारे १४० वर्षे पावेतो वस्तुतः फेरफार मुळीच झाला नाही. या अवधीत फार मोठमोठाल्या गोष्टी घडून आल्या. इंग्लंडने हॉलंड देशाला मागे हटविले व समुद्रावरील स्वामित्व संपादन केले व जगातील एकंदर मालाची ने-आण करण्याचे काम आपले एकट्याच्या हाती घेतले. हिंदुस्थानावरील व उत्तर अमेरिकेवरील वर्चस्व इंग्लंड देशाने फ्रान्सपासून हिरावून घेतले. अखेरीस इंग्लंड देशाने विलक्षण शोधांची माळचीमाळ लावून पूर्वी कधीही न झालेला अशी उद्योगधंद्याच्या कामात विलक्षण क्रांती करून टाकली. इंग्लंड देशाच्या आंतरइतिहासावर या सर्व मोठमोठ्या कृत्यांचा परिणाम घडला. त्यामुळे एका नवीन राज्यक्रांतीच्या समयाचा मार्ग तयार होऊन राहिला होता; पण त्याचे येथे वर्णन करण्याचे आमचे काम नाही.

या शांततेच्या वेळीही राज्यकारभार व्यवस्थेत काही ध्यानात ठेवण्यासारखे फेरफार झाले. हे फेरफार अधिक बारकाईने ध्यानात यावे म्हणून ज्या काळाविषयी आपण लिहीत आहोत त्याचा एक भाग दुसऱ्या जॉर्जच्या मृत्यू समयाच्या सुमारास (सन १७६०) किंवा ज्या प्रधान मंडळात मोठा पिट मुख्य होता ते प्रधान मंडळ मोडले तेव्हा, पाडिला असता बरे पडेल. ॲन, पहिला जॉर्ज व दुसरा जॉर्ज यांच्या कारकीर्दीचा आपण वेगवेगळाला विचार करू हेच बरे.

जेव्हा ॲन राणी गादीवर बसली तेव्हा सन १६८८ मध्ये जे बंड झाले त्यापासून होणारे सत्परिणाम बहुतेक अंशी कायमचे कायम राहिले होते; पण त्या वेळेपावेतो राज्यकारभारात कोणत्या पक्षाकडे वर्चस्व येईल हे नक्की ठरले नव्हते. अनेचा जन्म स्ट्युअर्ट घराण्यात झालेला होता. राज्यकारभारासंबंधी तिची मते टोरीच्या बाजूची होती व धर्माची तिचे मते हाय चर्च या पंथाची होती. तिच्या प्रजेपैकी अत्यंत सामर्थ्यवान जो मार्लबरो तो टोरी किंवा व्हिग यापैकी अमक्या एका पक्षाचा होता असे म्हणता येण्यासारखे नव्हते. तिसऱ्या विल्यमप्रमाणे तो या पक्षांपासून अलग राहत असे आणि परराज्यांशी राजनीती कशी ठेवावी यासंबंधी जे त्याचे मोठमोठे बेत असत ते सिद्धीस नेण्यासाठी मात्र तो या पक्षाचा उपयोग करून घेत असे. पहिल्याने तो टोरी पक्षाकडील झाला; पण या पक्षातील लोक सांगितलेले ऐकणारे नाहीत, असे जेव्हा त्याने पाहिले तेव्हा या पक्षास अधिकारावरून काढून व्हिग पक्षास तो द्यावा, अशा रीतीने त्याने अनेचे मन वळविले. ॲनेला जेव्हा मार्लबरोचा व त्याच्या बायकोचा कंटाळा आला, तेव्हा तिने टोरी पक्षास पुनः अधिकारावर आणले; परंतु हॅनोव्हर घराण्यातील राजास इंग्लंडच्या गादीवर आणून बसविल्याने व्हिग पक्षास मोठा जय प्राप्त झाला व या नंतर पुढील ४८ वर्षे इंग्लंडचा राज्यकारभार याच पक्षाच्या हाती राहिला.

व्हिग पक्षात या सुमारास अत्यंत उच्च कुळातील व अत्यंत श्रीमंत असे कित्येक जमीनदार होते, इतिहासात यांना 'बंडाच्या वेळची कुटुंबे' असे नाव दिलेले आहे. पैसेवाले व व्यापारी वर्गही याच पक्षात होता, या वर्गाची संख्या व संपत्ती एकसारखी वाढत्या प्रमाणावर होती. या लोकांशिवाय राज्यातील जेवढे नॉनकन्फॉर्मिस्ट लोक होते तेवढे याच पक्षात होते. टोरी पक्षामध्ये मोठ्या जमीनदारांपैकी काही थोडे व लहान जमीनदार सर्व, हलक्याप्रतीचे धर्मोपदेशक व नॉनकन्फॉर्मिस्ट लोकांशिवाय बाकीचे सगळे गरीब वर्गातील लोक होते. व्हिग पक्षातील लोकांची संख्या टोरी पक्षातील लोकांपेक्षा कमी असण्याचा संभव आहे खरा; पण या पक्षातील लोकांपाशी इंग्लंड देशात असलेली संपत्ती अर्ध्यापेक्षा अधिक होती व लायक आणि साहसी लोकांचे प्राधान्य या पक्षात फारच होते, असे म्हटले तरी चालेल. पहिला व दुसरा जॉर्ज हे तात्त्विक दृष्टीने पाह गेले तर परदेशीच होते. त्यांच्या वेळी सर्व राज्यकारभार याच पक्षातील लोकांकडे होता. तिसरा जॉर्ज गादीवर बसल्यानंतर या पक्षाची सत्ता डळमळू लागली.

ॲन राणीची कारकीर्द : इंग्लंडमधील व स्कॉटलंडमधील वेगवेगळ्या असलेल्या पार्लमेंट सभांचे एकीकरण व दुसऱ्या चार्लस राजाच्या वेळी असह्य अशी धर्मासंबंधी नीती पुनः चालू करण्याचा यत्न, या मुख्य दोन गोष्टी या कारकीर्दीत घडल्या.

इंग्लंड व स्कॉटलंड या देशातील पार्लमेंट सभांचे एकीकरण :

(१) या एकीकरणासंबंधाने व्यर्थ गेलेले यत्न : आपल्या दोन्ही राज्यांतील पार्लमेंट एक करावी असा पहिल्या जेम्स राजाचा मनापासून हेतू होता; पण तो इंग्लंडमधील पार्लमेंट

सभेच्या निष्काळजीपणाने त्याला सिद्धीस नेता आला नाही. स्कॉटलंड जिंकून घेतल्यावर क्रॉम्वेलने या दोन्ही पार्लमेंट सभा एकत्र केल्या होत्या; पण त्याने इंग्लंड देशातील सैन्याचा ताबा स्कॉटलंड देशातील लोकांवर ठेवून व त्यांच्या संमतीशिवाय हे एकीकरण केले होते. राजसत्तेची जेव्हा पुनः स्थापना झाली तेव्हा या दोन्ही देशांतील पार्लमेंटांची वेगवेगळाली स्थापना झाली. इंग्लिश लोकांच्या बरोबरीने त्यांना जे व्यापारासंबंधी हक्क मिळाले होते ते आता गेल्याने स्कॉच लोकांना पश्चात्ताप वाटू लागला. सन १६७० स्कॉटलंड देशातील पार्लमेंट सभेने मंजूर केलेल्या कायद्याप्रमाणे राजाने स्कॉटलंड देशाच्या तर्फेने स्कॉटलंड व इंग्लंड या दोन्ही देशांतील पार्लमेंट एकत्र व्हावी म्हणून बोलणे लावण्यासाठी मुखत्यार नेमले होते. इंग्लिश लोकांच्या उदासीनतेमुळे पुनः काही या संबंधाने करण्यात आले नाही. सन १६८८ मधील बंड संपल्यावर थोड्याच दिवसांनी तिसऱ्या विल्यम राजाने या दोन्ही पार्लमेंट सभा एकत्र कराव्यात, अशी सूचना केली व स्कॉटलंड देशातील पार्लमेंट सभेने या कामासाही राजाने मुखत्यार नेमावे म्हणून एक कायदा मंजूर करून त्यास अधिकारही दिला होता; पण इंग्रज लोक या गोष्टीस कबूल होईनात. तो मृत्यू पावण्याच्या पूर्वी अशा काही गोष्टी घडून आल्या, की ज्याच्या योगाने या दोन्ही सभा ताबडतोब एकत्र तरी होतील किंवा कायमच्या विभक्त तरी राहतील, असे लोकांना वाटू लागले. स्पेन येथील लोकांच्या ताब्यातील प्रदेशाचे मध्यभागी असलेल्या डारिअन नामक संयोगभूमीवर वसाहत करण्याचा यत्न स्कॉटलंड येथील मंडळीने अविचाराने केला, तेव्हा या वसाहत करणाऱ्या लोकांना स्पेन येथील लोकांच्या सैन्याने हुसकून दिले. इंग्लंडमधील सरकारने या वसाहत करणारास मदत केली नव्हती व या वसाहत करणारास जी संकटे भोगावी लागली त्याबद्दल इंग्रज लोकांना आनंद वाटला आहे, असा त्याजवर स्कॉच लोकांनी आरोप आणला. या गोष्टीवरून आपणास स्कॉटलंडच्या लोकांना स्वातंत्र्यापासून होणाऱ्या सुखाऐवजी त्यापासून होणारी दुःखे मात्र भोगावी लागत होती, हे दिसून येईल. स्कॉटलंड देशाचे राज्य इंग्लंडचा राजा करीत होता, त्याचा सर्व कारभार इंग्रज लोकांच्या हाती होता व त्याला इंग्लंडमधील पार्लमेंटवर अवलंबून राहावे लागत असे, असे असूनही त्या देशाला इंग्लंडच्या व्यापाराचा किंवा वसाहत करण्याचा काही वाटा मिळत नसे व इंग्लंडमधील सैन्याची किंवा आरमाराची मदत मिळत नसे.

या दोन्ही सभा एकत्र करण्याचा विषय हाती घेण्यासाठी विल्यमने बडे लोकांच्या उपसभेस शिफारस केली व त्या सभेने इंग्लंडच्या तर्फेने मखत्यार नेमण्याविषयी एक कायद्याचा खर्डाही मंजूर केला; परंतु तो कॉमन्स सभेने केवळ चिरडीस जाऊन नामंजूर करून टाकला. ॲन राणी गादीवर बसल्यावर तिला या दोन्ही पार्लमेंट सभांनी आपापल्यातर्फे मुखत्यार नेमण्यास अधिकार दिला व त्याप्रमाणे सन १७०२ व १७०३ या सालात पुष्कळशा त्यांच्या सभाही भरल्या. या मुखत्यारास सलोखा करण्याच्या कामात यश येणार नाही, असे लवकरच दिसून

आले. सर्व व्यापार आपल्या एकट्याच्याच हाती राहावा व कोणाही प्रेसबिटेरियन मताच्या मनुष्यास राज्यात मोठी जागा मिळू नये अशाविषयी इंग्रज लोकांचे औत्सुक्य दिसून येऊ लागले. स्कॉटलंड येथील लोकांना आपल्या धर्मसंस्थेसंबंधी अस्वस्थता वाटू लागली व इंग्लंड देशातील व्यापारात आपणास हिस्सा मिळालाच पाहिजे, असा त्यांचा निश्चय स्पष्ट दिसू लागला आणि त्यामुळे या सभांपासून काही निष्पन्न झाले नाही.

(२) इंग्लंड व स्कॉटलंड या दोन्ही देशांतील पार्लमेंट सभा एकत्र करण्याविषयीचा कायदा, सन १७०७ - स्कॉच लोकांनी भय वाटण्यासारखे जेव्हा आपले स्वरूप दाखविले तेव्हा या त्रासदायक प्रश्नांचा एकदाचा निकाल लागला. काही अंशी डारियन येथे घडून आलेल्या गोष्टीमुळे राग आल्याने काही अंशी जाकोबाईट पक्षाच्या वजनाने व काही अंशी अत्यंत राष्ट्रीय अभिमानाने सन १७०४ मध्ये ॲक्ट ऑफ सिक्युरिटी (संरक्षणाचा कायदा) या नावाचा कायदा स्कॉटलंड देशातील पार्लमेंट सभेने मंजूर करून टाकला. स्कॉटलंड देशातील धर्मसंस्था व व्यापार यांची हमी घेतल्याशिवाय, ॲन राणी मरण पावल्यानंतर इंग्लंडच्या गादीवर तिच्या मागून जो कोणी बसेल, त्यास स्कॉटलंड देशाचे राज्य मिळणार नाही, असा या कायद्याने ठराव करण्यात आला होता. असा कायदा स्कॉटलंड देशाच्या पार्लमेंट सभेने केल्यावरून, इंग्लंडच्या पार्लमेंटने स्कॉटलंड देशातील लोकांना विदेशी मानावे व तेथील आयात माल बंद करावा, अशा तऱ्हेचा उलट कायदा केला. या कायदा झाल्याबरोबर स्कॉटलंड देशातील लोक बेतावर आले व दोन्ही पार्लमेंट एकत्र करावी किंवा नाही हे ठरविण्यासाठी त्यांनी एक सभा नेमली.

सन १७०६ मध्ये एकीकरणाचा तह नक्की झाला. या तहाप्रमाणे इंग्लंड व स्कॉटलंड मिळून एक राज्य समजावे व त्यास ग्रेटब्रिटन असे नाव द्यावे, या दोन्ही देशांचे झेंडे एकत्र करावेत व या दोन्ही देशांतील पार्लमेंट एकत्र करावी व स्कॉटलंडतर्फे बड्या लोकांच्या उपसभेत सोळा उमरावांनी बसावे व कॉमन्स सभेत पंचेचाळीस लोकनियुक्त सभासदांनी बसावे, असे ठरविण्यात आले होते. या तहाप्रमाणे या सोळा उमरावांना स्कॉटलंड देशातील सर्व उमरावांनी मिळून दर पार्लमेंटसभेत बसण्याकरता पसंत करावे व राजाने स्कॉटलंड देशातील म्हणून कोणासही नवीन उमराव करू नये, असेही ठरविण्यात आले होते. इंग्लंड देशाने स्कॉटलंड देशाचे कर्ज फेडावे व जेव्हा जेव्हा इंग्लंड २०००००० पौंड देईल तेव्हा तेव्हा स्कॉटलंड देशाने ४८००० पौंड जमिनीवरील कर म्हणून द्यावे आणि स्कॉटलंड देशातील कायदे व न्यायसभा कायम ठेवाव्यात अशीही कलमे या तहात होती. स्कॉटलंड देशातील पार्लमेंटने स्कॉटलंड देशातील धर्मसंस्था कायम राहावी, असा एक कायदा मंजूर केला व तशाच प्रकारचा एक कायदा इंग्लंडमधील पार्लमेंटने एकत्र करण्याविषयी जी कलमे पार्लमेंट सभेने मंजूर केली त्यात या कलमांचा समावेश करण्यात आला होता. हे एकीकरण सन १७०७ मध्ये घडून आले. इंग्लंड देशात जे पार्लमेंट होते त्याच पार्लमेंटमध्ये स्कॉटलंड

देशातील मुखत्यार येऊन मिळाल्याने जे एक पार्लमेंट झाले तेच ग्रेटब्रिटन या देशाचे पहिले पार्लमेंट होय.

प्रॉटेस्टंट धर्म कायम ठेवण्याविषयी उत्कट इच्छा व स्टुअर्ट घराण्यातील राजे पुनः गादीवर येतील हे भय, या दोन्ही गोष्टी हा एकीकरणाचा तह मंजूर होण्यास मुख्य कारण झाल्या. स्कॉटलंड देशात हा तह लोकांना प्रिय नव्हता व हजारवाटे जर स्कॉटलंड देशातील पार्लमेंट सभा पूर्णपणे लोकमताप्रमाणे निवडलेली असती तर तिने हा तह मंजूरही केला नसता; पण स्कॉटलंड देशातील खरोखर जी पार्लमेंट सभा होती ती लोकमत दर्शविणारी मुळीच नव्हती. स्कॉटलंड देश हा आपल्यापासून अगदी निराळा पडेल हे भय जर इंग्लंड देशातील लोकांना नसते तर इंग्लंडमध्येदेखील हा तह लोकप्रिय झाला नसता. काहीही असो या एकीकरणाने दोन्ही देशांचा नफा झाला हे मात्र खरे आहे. हद्दीवर असलेल्या एका स्वतंत्र राज्यापासून इंग्लंडला नेहमी भय वाटत असे त्यापासून ते मुक्त झाले व इंग्लंडच्या व्यापारात व वसाहत करण्याच्या कामात स्कॉटलंड देशास पुरा वाटा मिळाला. या एकत्र होण्याच्या वेळी जो स्कॉटलंड देश हल्ली जे देश अत्यंत भरभराटीस आले आहेत त्यापैकी एक होऊन बसला आहे.

हायचर्च पंथाची उलट सरशी : बंड झाल्यानंतर जेव्हा पुनः राज्यस्थापना झाली त्या वेळेस असलेल्या कॅव्हेलिअर लोकांची जशी मते होती तशीच ॲन राणीच्या वेळच्या टोरी लोकांची होती. बंडाच्या वेळी राज्यकारभारसंबंधी ज्या सुटी त्यांना मिळाल्या होत्या त्या कायम राहाव्या अशी मात्र त्यांची इच्छा होती; पण ज्या नॉनकन्फॉर्मिस्ट लोकांच्या मदतीने त्या त्यास मिळाल्या होत्या त्यांचा चुराडा करावा असा त्यांचा निश्चय झाला होता.

या हेतूने इंग्लंडमधील धर्मसंस्थेस आपले अनुमोदन कधीमधी आहे असे लोकांना दाखविता येऊ नये म्हणून टोरी पक्षाचे लोक पुष्कळ वेळा एक कायद्याचा खर्डा पार्लमेंट सभेपुढे दाखल करीत असत. नॉनकन्फॉर्मिस्ट पंथाचे लोक इंग्लंडमधील धर्मसंस्थेच्या पद्धतीप्रमाणे प्रभुभोजनाचा संस्कार एकदा करवून घेऊन राज्यात चाकरी मिळविण्यास योग्यता मिळाल्यानंतर पुनः आपल्या पंथाप्रमाणे भजन करून लागून टेस्ट ॲक्ट या कायद्याचे वारंवार उल्लंघन करीत असत. असे कोणी केल्यास त्यास शिक्षा व्हावी, असे पुष्कळांचे म्हणणे होते. या खास कॉमन्स सभा अनुकूल होती; परंतु बड्या लोकांच्या सभेत व्हिग लोकांचा भरणा जास्त असल्याने तेथे हा खर्डा नामंजूर करण्यात आला. अखेरीस सन १७१० मध्ये टोरी प्रधान मंडळ फ्रान्स देशाशी तह करील तसा व्हिग पक्षाच्या लोकांना धाक पडला. लढाई चालू ठेवण्यासाठी टोरी पक्षातील काही मते मिळवावी म्हणून व्हिग पक्षाच्या लोकांनी आपल्या मित्रास पाजीपणाने सोडून दिले व कधीमधी अनुमोदनाच्या विरुद्ध जो खर्डा पार्लमेंट सभेपुढे आला होता त्यास आपले अनुमोदन दिले. सन १७१३ मध्ये टोरी पक्षाच्या प्रधान मंडळीने या वरील कायद्यापेक्षाही एका वाईट कायद्यास मंजुरी

दिली. या कायद्याचे नाव शिझम ॲक्ट (मतभेदाचा कायदा) असे होते. या कायद्याचा हेत नॉनकन्फॉर्मिस्ट पंथाच्या लोकांना शालेय शिक्षकाचे काम करू देऊ नये हा होता. या वेळची स्थिती अशी काही चमत्कारिक झाली होती, की खुद्द टॉलरेशन ॲक्ट (अप्रतिबंधाचा कायदा)देखील रद्द करण्यात येईल की काय, अशी लोकांना भीती वाटू लागली होती.

हॅनोव्हर घराण्यातील राजास गादी मिळणे- व्हिग पक्षाची सरशी : ॲनेच्या मृत्यूबरोबर टोरी पक्षाचे बळ नाहीसे झाले. टोरी पक्षाचे लोक आपल्याशी बेपर्वाईने वागतील, अशी या नव्या घराण्यातील राजांची खात्री होती; पण स्वसंरक्षण करून घ्यावे हा मनुष्याचा अंगस्वभाव असल्यामुळे व्हिग पक्षातील लोकांना आपल्यास मदत करणे भाग आहे हेही ते जाणून होते. तिसऱ्या विल्यमला असाच प्रसंग आला होता; पण इंग्लंडमधील राजनीतीचे ज्ञान पहिल्या जॉर्जला तिसऱ्या विल्यमपेक्षा फार थोडे होते. पहिल्या जॉर्जला इंग्रजी बोलतादेखील येत नव्हते व सर रॉबर्ट वॉलपोल याच्याशी बोलण्याचा प्रसंग आला असता तो त्याच्याशी लॅटीन भाषेत संभाषण करी असे म्हणतात. ज्याप्रमाणे तिसरा विल्यम इंग्लंडबरोबर सर्व युरोप खंडातील देशांच्या राजनीतीकडे लक्ष लावीत असे, त्याप्रमाणे पहिला जॉर्ज न करता फक्त जर्मनी देशाच्या आणि त्यात मुख्यत्वेकरून हॅनोव्हर देशाच्याच राजनीतीकडे आपले मन लावीत असे आणि याच कारणासाठी आपला इंग्लंडच्या गादीवरील हक्क जो पक्ष उत्तम रीतीने संरक्षण करील असा त्याचा भरवसा असे त्या पक्षाकडे सर्व राज्यकारभार सोपण्यास तो राजी असे. त्याच्या इंग्लंडच्या राजनीतीवरील दुर्लक्षामुळे दोन महत्त्वाचे परिणाम घडून आले. त्यापैकी एक थोडा काळ राहणारा व एक कायमचा राहणारा असे होते. थोडा काळ राहणाऱ्या परिणामामुळे इंग्लंड देशात व्हिग पक्षाची सरशी झाली व कायमच्या राहणाऱ्या परिणामाचे फळ गादीची सत्ता जी बंडाच्या वेळेपासून पुष्कळच कमी झाली होती ती आणखी कमी झाली हे झाले.

व्हिग पक्षाने केलेली कायद्यांची रचणूक : व्हिग पक्षाला ज्या वेळेस सत्ता प्राप्त झाली त्या वेळेस त्यांनी ॲन राणीच्या कारकीर्दीत नॉनकन्फॉर्मिस्ट लोकांना छळण्यासाठी जे कायदे करण्यात आले होते त्यापासून त्यास मुक्त केले. ऑकेझनल कन्फॉर्मिटी (प्रासंगिक सहमती) चा कायदा व शिझम (मतभेदाचा) कायदा हे दोन्ही कायदे रद्द करण्यात आले. व्हिग पक्षाच्या पुढाऱ्यांनी टेस्ट व कॉर्पोरेशन हे कायदेही रद्द करून इंग्लंडच्या धर्मसंस्थेतील लोकांना सरकारी जागा मिळविण्याची जशी योग्यता होती तशी योग्यता मोठ्या आनंदाने नॉनकन्फॉर्मिस्ट लोकांना प्राप्त करून दिली असती; परंतु त्यांच्या मित्रांनी तुम्ही धर्माच्या बाबतीत अधिक स्वातंत्र्य दिल्यास फार जबरदस्त प्रतिक्रिया उत्पन्न होऊन तुमचा पाडाव होईल व कदाचित हॅनोव्हर घराणे राज्यास मुकेल अशी त्यास भीती घातली आणि म्हणून हे दोन्ही कायदे रद्द करण्याचा यत्न करण्याचे त्यांनी सोडून दिले. हे कायदे कायद्यांच्या नोंद पुस्तकात कायम राहिले; परंतु या कायद्याविरुद्ध अपराध करणारास शिक्षेतून

सोडविण्याकरिता दरवर्षी इण्डेम्निटीचा कायदा मंजूर करण्याचा रिवाज त्या वेळेस पडला होता.

सेप्टेनिअल ॲक्ट : पहिला जॉर्ज गादीवर बसल्यावर लवकरच जाकोबाईट पक्षाच्या लोकांनी स्कॉटलंडमध्ये व इंग्लंडच्या उत्तर भागात भयंकर बंड उपस्थित केले. त्यामुळे कदाचित स्टुअर्ट घराण्यातील पुरुष पुनः इंग्लंडच्या गादीवर येतील की काय, असे लोकांना भय वाटू लागले. त्या वेळेस लोक खिजून गेले होते आणि तशा वेळी ट्रायेनिअल (तीन वर्षांच्या) कायद्याप्रमाणेच जर खास वागण्याचे सरकाराने मनात आणले असते तर पार्लमेंट बरखास्त करणे भाग पडले असते आणि म्हणून पार्लमेंट सभेच्या बैठकीची शक्य मुदत जी तीन वर्षांची होती ती सात वर्षांची करण्याविषयी एक कायदा मंजूर करण्यात आला आणि याच कायद्याने त्या वेळेस जी पार्लमेंट सभा चालू होती तीच सात वर्षे चालू ठेवण्याविषयी तीस अधिकारही देण्यात आला आणि तेव्हापासून या कायद्याप्रमाणे पार्लमेंट सभेची बैठक सात वर्षांची ठरून राहिली आहे.

बड्या लोकांसंबंधी कायद्याचा खर्डा - दुसरा एक कायद्याचा मसुदा ज्यास कायद्याचे स्वरूप कधीही आले नाही तो लक्षात ठेवण्यासारखा आहे. त्यावरून राजाचे हीनबलत्व व पुष्कळशा व्हिग पक्षीय लोकांचा बड्या लोकांप्रमाणे स्वभावाचा कलही चांगला स्पष्ट दिसून येतात. सन १७१९ च्या बैठकीत प्रधान मंडळाने नवीन बडे लोक बनविण्याचा राजास जो अधिकार होता त्यास आळा घालणारा एक कायद्याचा मसुदा पुढे आणिला. त्या कायद्याने असे ठरविले होते, की त्यावेळी जी बड्या लोकांची संख्या खरोखर होती ती सहापेक्षा जास्त संख्येने राजाने वाढवू नये व याप्रमाणे ठराविक संख्या पुरी होईतोपर्यंत बड्या लोकांची संख्या वाढविण्याचा राजास अधिकार असावा व याच कायद्यान्वये स्कॉटलंडमधील १६ निवडून आलेल्या पार्लमेंटमधील बड्या लोकांच्या ऐवजी २५ वंशपरंपरेचे बडे लोक त्या सभेत सभासद झाले असते. या मसुद्याप्रमाणे कायदा मंजूर झाला असता तर बड्या लोकांची एक मोजकी मंडळी बनली असती व फारच थोड्याशा घराण्यांना विलक्षण मोठी सत्ता प्राप्त झाली असती. त्याचा अखेर परिणाम लॉर्डच्या सभेस विघातक झाला असता. या मसुद्यास कॉमन्स सभेतील पुष्कळ व्हिग पक्षीयांनी हरकत घेतली व विशेषतः ती वॉलपोलाने घेतली आणि म्हणूनच या मसुद्यास कायद्याचे स्वरूप केव्हाही प्राप्त झाले नाही.

कॅबिनेटची प्रगति - एक पक्षामार्फत चालणारा राज्यकारभार - या कालावधीत कायद्यासंबंधी ज्या सुधारणा झाल्या त्यापेक्षा जास्त महत्त्वाची सुधारणा म्हटली म्हणजे कॅबिनेटची प्रगती ही होय. सन १६८८ च्या बंडाचाच तो प्रत्यक्ष परिणाम होय; परंतु ज्या कोणा मुत्सद्यांचे सदरील बंडात अंग होते त्यांनादेखील या गोष्टीचा असा परिणाम होईल, असे अगोदर कळून आले नव्हते. कॅबिनेट ही कोणा व्यक्तीची क्लृप्ती नसून सुधारकांच्या परंपरेनेही ती घडवून आणलेली नव्हती. वस्तुस्थितीनुरूप क्रमशः तिचे स्वरूप बनत आलेले

आहे. इंग्लंडच्या राज्यव्यवस्थेसंबंधाने गेल्या शतकात लिहिणारे जे ग्रंथकार होऊन गेले त्यांनी कॅबिनेट अवाक्षरही काढले नाही. आजतागाईत कायदेशीर रीतीने कॅबिनेट मान्य झालेले नाही. तथापि, राज्यकारभारचक्राची ती आधारशलाका आहे, या कारणाने तिचा इतिहास सविस्तर सांगणे अगत्याचे आहे.

कॅबिनेटचे दोन प्रकार : इंग्लिश कॅबिनेटची व्याख्या करावयाची म्हटली म्हणजे कायद्याने मान्य न केलेली; परंतु राज्यकारभार चालविणारी मंत्र्यांची लहानशी सभा ही होय. आमच्या इतिहासाच्या भिन्न भिन्न कालात निरनिराळ्या प्रकारची ती बनलेली असे. सतराव्या शतकात राजा ती ज्या लोकांवर त्याचा पर्ण विश्वास असे असे लोक पसंत करून त्यांची बनवीत असे. अठराव्या शतकात कॉमन्स सभेचा बहुतेक सभासदांचा ज्या लोकांवर विश्वास असे अशा लोकांची ती बनत असे. सतराव्या शतकात ती सर्वस्वी राजावर अवलंबून असे व अठराव्या शतकात ती पार्लमेंट सभेवर सर्वस्वी अवलंबून असे. कॅबिनेट सभेस तिचे पहिले स्वरूप जाऊन जे दुसरे स्वरूप प्राप्त झाले आहे, ते बंडाचेच फळ होय.

कॅबिनेटचे पूर्वस्वरूप : सतराव्या शतकाच्या प्रारंभापासून कॅबिनेट याच स्वरूपाचे आहे. लॉर्ड बेकनच्या निबंधात कॅबिनेट हा शब्द आढळून येतो. प्रिव्हीकौन्सिलच्या हातून जे काम व्हावे असे वाटत होते ते ती फार मोठ्या अधिकाराची असल्यामुळे तिचे हातून झाले नाही हे आपण वर पाहिलेच आहे. प्रिव्हीकौन्सिलच्या पुष्कळ सभासदांना राज्यकारभार चालविण्यास लागणारा उद्योगीपणा, ज्ञान व कर्तृत्वशक्ती ही मुळीच नव्हती. जे काही थोडे इसम मोठमोठाले अधिकारी असत किंवा ज्यास बुद्धिमान अगर अनुभवी म्हणून लोक फार चाहत असत अथवा राजाच्या विशेष प्रीतीतले जे असत अशा लोकांबरोबर राजकारणिक विषयांची चर्चा स्टुअर्ट घराणे पदारूढ झाल्यावर पुढे आमचे राजे वाढत्याप्रमाणाने करीत असत. या लहानशा मंडळीत जे काही ठरे ते तिजपेक्षा मोठ्या प्रिव्हीकौन्सिलमध्ये शिरस्त्याप्रमाणे ठरवून घेतले जात असे.

मूळच्या स्वरूपात कॅबिनेट असता तिची अप्रियता : प्रिव्हीकौन्सिलच्या पोटात जी एक लहानशी मंडळी असे तिचे अस्तित्व कायद्याने कधीही कबूल केलेले नव्हते. सामान्य जनसमुदायास त्या मंडळीचे कोण कोण सभासद असत हे कळत नसे आणि म्हणून ती बेकायदेशीर आहे असे मानले जात असे. ज्या गोष्टीबद्दल जबाबदारी पत्करावी असे कोणाही दूरदर्शी मनुष्यास वाटणार नाही व ज्या गोष्टीसंबंधाने प्रामाणिक व स्वतंत्र विचाराचे मुत्सद्यांची टीका दुःसहच व्हावयाची अशा गोष्टींचा खल करून त्या तडीस नेण्याचे ती सभा एक साधन होय असे लोक मानीत असत. ज्या राजास सल्ला खरोखर पाहिजे आहे त्याने तो प्रिव्हीकौन्सिलातील अशा मूठभर मंडळीस विचारणे योग्य नाही. सल्ला विचारवयाचा तो खरे म्हटले असता प्रिव्हीकौन्सिलातील सर्व सभासदांना विचारला पाहिजे होता. कारण कायद्याच्या दृष्टीने राजास योग्य मसलत देण्याचे काम प्रिव्हीकौन्सिलाकडे

होते. प्रिव्हीकौन्सिलमधील सभासद कोण कोण असत हे सर्वांना माहीत असे. जरी प्रिव्हीकौन्सिलमधील सर्व सभासदांना आपापली कामे गुप्त ठेवावी लागत असत तरी राजा जर समजून उमजून घातुक मार्गाने जाऊ लागला तर पार्लमेंट सभेला सर्व प्रिव्हीकौन्सिलातील सभासदांचा जाब घेण्याचा अधिकर असे; परंतु हे असे हातातून निसटून जाणारे राजाचे गुप्तमंत्रिमंडळ पार्लमेंटच्या अगर न्यायसभेच्या तावडीत सापडणार तरी कसे?

कॅबिनेट कौन्सिलांची पुनः पुनः झालेली वाढ : हा वस्तुस्थितीचा ओघ बदलून टाकण्यास कोणी मनापासून यत्न केला आहे असे म्हणवत नाही. प्रिव्हीकौन्सिलास राज्यकारभार चालविता येईना म्हणून ही जी मंडळी राज्यकारभार आटोपीत असे तिची मदत यावेळीदेखील घेत असत. पुनः संस्थापनेनंतर प्रिव्हीकौन्सिलचा अवाढव्यपणा कमी करून त्याची उपयुक्तता वाढविण्याचा यत्न झाला. निरनिराळ्या खात्यांच्या कारभाराकरिता प्रिव्हीकौन्सिलाच्या कमिट्या केल्या. उदाहरणार्थ व्यापार व लागवड खात्याची कमिटी, परराष्ट्रीय कामाची कमिटी इत्यादी. अशी पद्धत अद्यापही चालू आहे; परंतु ज्या राजकीय सामान्य धोरणाच्या प्रश्नांचा निकाल सत्ता एकत्र झाल्याशिवाय होण्याचा संभव नव्हता, अशा प्रकारच्या प्रश्नांचा निकाल वरील योजनेने लावता येईना, असल्याही प्रश्नासंबंधात दुसरा चार्लस राजा काही थोड्या जणांचाच सल्ला घेत असे. त्याच्या कारकीदीच्या प्रारंभाच्या वर्षात क्लॅरेंडन, ऑरमंड, सौदहॅम्टन व निकोलस यांचे मिळून एक कसे तरी मंत्रिमंडळ असे. क्लॅरेंडन अधिकारावरून दूर झाल्यानंतर ज्यांचा 'कॅबाल' या नावाने इतिहासात निंदाव्यजनक उल्लेख झालेला आहे, अशा पाच मंत्र्यांच्या सल्ल्याने तो महत्त्वाच्या कामाचे निकाल लावीत असे. ते लोकांना अप्रिय झाल्यामुळे सर विल्यम टेंपल यास प्रिव्हीकौन्सिलची आणखीही सुधारणा करण्याची जरूर आहे, असे भासू लागले. या नव्या प्रिव्हीकौन्सिल सभेत स्वतंत्र ऐपतीचे तीस सभासद असावेत व त्यापैकी निम्मे सरकारी नोकर व निम्मे स्वतंत्र सभासद असावेत, असे त्याने ठरविले होते. प्रिव्हीकौन्सिलही असावे त्यापेक्षा मोठे असून त्यातील सभासदांचे मतैक्य नसल्यामुळे त्याचा व्हावा तसा उपयोग होईना आणि म्हणूनच लवकरच ते मोडले. चार्लस राजा पुनः पूर्वीप्रमाणे गुप्त कौन्सिलचा सल्ला घेऊ लागला. दुसऱ्या जेम्स राजानेही हाच कित्ता वळविला. बंडानंतर तिसरा विल्यम प्रिव्हीकौन्सिलची पर्वाच बाळगीत नसे. काही थोड्या विश्वासू मंत्र्यांच्या सल्ल्याने तो आपल्या कामाचा निकाल लावत असे आणि म्हणून प्रिव्हीकौन्सिल सभेने तिला सोपवलेले सर्व काम केलेच पाहिजे हे सेटलमेंट ॲक्टमधील कलम जागच्या जागीच राहिले.

कॅबिनेटचे अलीकडील स्वरूप : हा कालपावेतो कॉमन्स सभेमध्ये ज्या पक्षाचे बहुमत असे त्या पक्षाच्या सभासदांचेच काय ते कॅबिनेट बनत नसे. राजाला पसंत वाटतील त्या लोकांचा तो सल्ला घेतो ही जुनी उक्ती जारीने अमलात होती. जो पक्ष अत्यंत प्रबळ असे त्यापैकीच काय ते त्याचे सल्लागार असावेत, असे अजून ठरले नव्हते. कॉमन्स

सभेतील ज्या पक्षाचे बहुमत असेल त्या पक्षाच्या सभासदांच्या गैरमर्जीमुळे राजाची कोणाही सल्लागारावर दोषारोप आणण्याची भीती नसली म्हणजे पुरेसे होत असे. कॉमन्स सभेतील ज्या पक्षाचे बहुमत असेल त्या पक्षाच्या सभासदांचा राजाच्या सर्व सल्लागारांवर पूर्ण विश्वास असलाच पाहिजे, असे हा कालपावेतो ठरले नव्हते. कारण राजाने राज्य करावे व ते तो अन्यायाने करू लागल्यास त्यास कॉमन्स सभेने आळा घालावा हे तत्त्व हा काल पावेतो लोकमान्य होते; परंतु सन १६८० मध्ये झालेल्या बंडाच्या योगाने या तत्त्वास धरून चालणे अशक्य झाले होते. बंडाच्या योगाने वस्तुस्थिती अशी काही बदलून गेली होती, की कॉमन्स सभेच्या प्रत्यक्ष व अव्याहत मदतीवाचून राज्यकारभार चालविणेच मुश्किलीचे झाले होते. कॉमन्स सभेची मदत व्हावी म्हणून त्या सभेचा ज्यांच्यावर पूर्ण विश्वास असे अशा मुत्सद्दी मंडळीपैकी प्रधानांची निवड राजांना करावी लागे. अगर निराळ्या तहेने हीच गोष्ट सांगावयाची म्हटली म्हणजे कॉमन्स सभेतील ज्या पक्षाचे बहुमत असेल त्या पक्षाच्या पसंतीचे त्यास आपले प्रधान निवडावे लागत असत.

तिसऱ्या विल्यम राजाने काही काळ पावेतो या वरील सिद्धान्ताविरुद्ध झगडा चालविला होता. सर्व राष्ट्राचा आपण राजा असावे, केवळ एका पक्षाचा पुढारी नसावे, अशी त्याची इच्छा होती. त्यांच्या मतांकडे लक्ष न देता अत्यंत योग्य अशा मनुष्यांची योजना आपल्या मंत्रिमंडळात करून त्याने ही गोष्ट सिद्धीस नेण्याचा उपक्रम सुरू केला; परंतु अशा प्रकारचे मंत्रिमंडळ जात्याच दुर्बळ असते व त्यास पार्लमेंटात न्याय मिळण्याची आशा नसते, हे अनुभवाने त्याच्या प्रत्ययास आले.

कॉमन्स सभेतील प्रबळ पक्षातील मंडळीपैकी जर मंत्री पसंत केले तर राज्यकारभार चालविण्यात त्रास कमी पडेल असे लॉर्ड सदरलंड नावाच्या फार अनुभवी व सूक्ष्मदृष्टी मुत्सद्याने राजाच्या निदर्शनास आणून दिले. सन १६९३ आणि सन १६९६ यांच्या दरम्यान त्याने हळूहळू प्रजापक्षीय (व्हिग) मतवाल्यांचे मंत्रिमंडळ बनविले; परंतु जेव्हा पार्लमेंटमध्ये त्या पक्षाचे मताधिक्य कमी झाले तेव्हा त्याला पुनः अडचण पडली. कारण राजपक्षीय (टोरी) मंडळी त्याच्या धोरणाने वागण्यास व्हिग पक्षाप्रमाणे तयार नव्हती.

जेव्हा तिसरा विल्यम मरण पावला तेव्हा मार्लबरोने त्याचेच राज्य कारभाराचे धोरण पुढे चालू ठेविले. मार्लबरो हा हमेषचा टोरी पक्षाचा असल्यामुळे त्याने प्रथमतः आपल्या पक्षाच्या साहाय्याने राज्यकारभार चालविण्याचा यत्न केला. फ्रान्स देशाबरोबर युद्ध चालविण्यास स्वपक्ष उदासीन किंवा प्रतिकूल आहे असे जेव्हा त्यास आढळून आले तेव्हा स्वपक्षीयांच्या जागी त्यास हळूहळू प्रजापक्षीयांची योजना करणे भाग पडले. सन १७०८ मध्ये सर्व मंत्रिमंडळ व्हिग पक्षाचे बनले. दोन वर्षांनी पुढे झालेल्या निवडणुकीत टोरी यांची सरशी झाली म्हणून व्हिग मंत्रिमंडळाच्या ऐवजी टोरी मंत्रिमंडळ अधिकाररूढ झाले. ॲन राणीच्या मरणानंतर पुनः पारडे फिरले. पहिल्या जॉर्ज राजाचे सर्व मंत्री व्हिग पक्षाचे होते.

अशा रीतीने कोणीही विशेष खटपट न करता फक्त सोईच्याच दृष्टीने क्रमाक्रमाने कॉमन्स सभेत अत्यंत प्रबळ पक्ष असेल त्या पक्षापैकी मंत्रिमंडळ असावे ही पद्धत अमलात आली. एकदा ही पद्धत सुरू झाल्यावर तिच्यापासून महत्त्वाचे परिणाम घडून आले. पूर्वीच्या काळात मंत्रिजनांच्या ठिकाणी राजनिष्ठाच काय ती असावी लागे. आता त्यांना स्वपक्षावर निष्ठा ठेवावी लागते आणि त्यामुळे त्यांना एकमेकांशीही निष्ठेनेच वागावे लागते. स्वरूपतः ते राजाचे सेवक व सल्लागार असत व सांप्रतही ते तसेच आहेत. वस्तुतः ते कॉमन्स सभेतील ज्या पक्षाचे बहुमत असेल त्या पक्षाचे नोकर व सल्लागार बनले व तीच वहिवाट हल्लीही त्यांची चालू आहे.

राजास त्याच्या अधिकारान्वये एखाद्या विविक्षित पक्षाचे होता येत नसल्यामुळे राज्य चालविण्याच्या कामी राजास असलेली सत्ता हिरावून घेतल्याशिवाय पक्षनिष्ठ राजसत्ता पूर्णदशेप्रत येण्याचा संभव नव्हता. कारभारात राजाचे अंग बिलकूल नको होते. या कामी एका आकस्मिक गोष्टीचे बरेच साहाय्य झाले ती गोष्ट म्हटली म्हणजे पहिल्या जॉर्ज राजास इंग्रजी भाषा बोलता येत नव्हती ही होय आणि म्हणून कॅबिनेटच्या बैठका चालू असता अध्यक्षाचे काम करणे त्यास निरर्थक वाटत असे. सभांना न जाणारा असा इंग्लंड देशातील हा पहिलाच राजा होता. त्याचप्रमाणे राजाशिवायच कॅबिनेटने आपली खलबते चालवावी ही वहिवाट पडली व ती तशीच सांप्रत चालू आहे; अशी वहिवाट पडण्यास पहिला जॉर्ज राजा कारणीभूत झाला. राजा कॅबिनेटचा अध्यक्ष होण्याचे बंद झाल्यामुळे तिला साहजिकपणे दुसरा अध्यक्ष शोधणे प्राप्त झाले. ज्या पक्षाच्या हाती राज्यकारभार असे त्या पक्षास जो मंत्री मान्य असे त्यास स्वाभाविकतः अध्यक्षाच्या जागी निवडण्यात येई. अधिकृत पक्षाचा पुढारी, या रीतीने, मुख्य प्रधानाच्या प्रदाप्रत हळूहळू जाऊ लागला. मुख्य प्रधान (प्राईम मिनिस्टर) ही पदवी इंग्लंड देशात पुष्कळ काळ पावेतो लोकप्रिय नव्हती. मुख्य प्रधान हा एक महत्त्वाकांक्षी प्रजाजन असून तो राजा व त्याची प्रजा यांच्या आड येणारा इसम आहे, असे लोकांना फार दिवस वाटत असे. ज्या ज्या मंत्र्यास मुख्य प्रधानाचे अधिकार खरोखर प्राप्त होत असत ते ते सर्व मंत्री ही पदवी आपल्याला नको, असे मोठ्या उत्सुकतेने दाखवीत असत. सन १८७८ मध्ये बर्लिन येथील काँग्रेस होईपावेतो सरकारी कामाच्या कागदात या पदवीचा उल्लेख होत नसे.

मुख्य प्रधान - इंग्लंडच्या सांप्रतच्या राज्यव्यवस्थेच्या नियमानुसार मुख्य प्रधान हा सर्व राज्यात मोठा सत्ताधारी इसम आहे. कायद्याने त्याची कामे कधीही ठरलेली नाहीत; पण वहिवाटीने तो फार बारकाईने ठरवून टाकिली आहेत. अंमलदारीच्या सरकारी खात्यांवर सर्वसाधारण ताबा ठेवणे, कॅबिनेट व राजा, व कॅबिनेट व पार्लमेंट यांच्यामध्ये होणारा व्यवहार आपल्यामार्फत चालू देणे ही तीन मुख्यत्वेकरून त्याची कामे आहेत.

१ अंमलदारीच्या खात्यांवर ताबा चालविणारा या नात्याने मुख्य प्रधान - मुख्य प्रधानाने वाटल्यास एखादे विशिष्ट खाते आपल्याकडे घ्यावे, अगर घेऊ नये. एक

मुख्य प्रधान परराष्ट्रीय कामाकडील सरकारी चिटणीस होता, दुसरा एक चॅन्सेलर ऑफ दी एक्सचेकर या हुद्याचे काम करीत असे. दुसऱ्या कित्येकांकडे विशेष जबाबदारीचे नव्हते असे हुद्दे असत. बहुतकरून नेहमी आपल्याकडे फर्स्ट लॉर्ड ऑफ दी ट्रेझरी हा अधिकार ठेवत असत. आपण आपल्याकडे कोणते काम घ्यावे हे मुख्य प्रधानाच्या स्वतःच्या मर्जीवर अवलंबून आहे; परंतु प्रत्येकाचा सर्व खात्यांवर सर्वसामान्य ताबा हा असावयाचाच. हा त्याचा ताबा खात्याच्या मुख्य अधिकाऱ्याप्रमाणे सर्व बारीक सारीक कामांचे निकाल लावण्यापर्यंतच्या किरकोळ बाबींपर्यंत पोहोचतो असे नाही; परंतु अंमलदारीत कोणते धोरण राखावयाचे याबद्दल जेव्हा निर्णय ठरविण्याची वेळ येते तेव्हा खात्याच्या मुख्यास ही गोष्ट मुख्य प्रधानाच्या निदर्शनास आणावी लागते व त्याच्या निर्णयाप्रमाणे तिचा निकाल लागतो. सार्वजनिक खर्चाची जेव्हा एखादी बाब उत्पन्न होते तेव्हा तर ही गोष्ट मोठ्या अगत्याची आहे. कारण निरनिराळ्या खात्यांकडे सार्वजनिक पैशापैकी किती रक्कम खर्च करावयाची याबद्दल निर्णय मुख्य प्रधानासच करावा लागतो. परराष्ट्रीय कामकाजाकडे तर त्यास विशेष लक्ष पुरवावे लागते. परराष्ट्रीय खात्याच्या चिटणासाकडे जेवढा म्हणून महत्त्वाचा पत्रव्यवहार बाहेरून येतो किंवा बाहेर जातो त्यासंबंधाने निकाल, तो अगोदर मुख्य प्रधानास दाखविल्याशिवाय करण्यात येत नाही.

(२) राजा व मंत्रिमंडळ यांच्यामध्ये चालणाऱ्या व्यवहाराचे साधन या नात्याने मुख्य प्रधान - कॅबिनेटची मते व मनोविकार राजास कळविणे व राजाच्या कॅबिनेटास कळविणे हे दुसरे काम मुख्य प्रधानाचे असते. या कामात त्याच्या कोणाही मदतनिसास लुडबुड करू देत नाहीत. पुष्कळ वेळा राजा एखाद्या विविक्षित खात्याच्या मख्य अंमलदारास परभारे लिहन त्या खात्याची माहिती मागवितो हे खरे आहे; परंतु राजा जर एखाद्या खात्याच्यामुख्य अधिकाऱ्याकडून राज्य चालविण्याच्या एखाद्या सामान्य धोरणासंबंधाने किंवा राज्यकारभार एकंदरीने कसा चालला आहे याबाबतीत माहिती मागवील तर त्याचे हे कृत्य राज्यकारभार व्यवस्थे विरुद्ध आहे असे मानतात.

अशा प्रकारचा पत्रव्यवहार जर चालूच राहील तर राजाने एक तर असा पत्रव्यवहार चालविणाऱ्या आपल्या मदतनिसाचा राजीनामा घ्यावा, नाही तर आपला तरी राजीनामा मंजूर करावा, असा आग्रह मुख्य प्रधानास धरता येतो.

(३) पार्लमेंट सभा व कॅबिनेट सभा यांच्यामध्ये चालणाऱ्या व्यवहाराचे साधन या नात्याने मुख्य प्रधान - मुख्य प्रधानाचा व राजाचा जो संबंध असतो तोच त्याचा व पार्लमेंटचा असतो. कॅबिनेटची मते व मनोविकार खुद्द मुख्य प्रधानाने अगर त्याच्या माहितीने आणि पसंतीने इतर कोणाकडून पार्लमेंटला कळवावे लागतात. केवळ कचेरीतील माहिती एखाद्या विविक्षित खात्याच्या मुख्य अंमलदारास ज्या पार्लमेंट सभेच्या उपसभेचा तो सभासद असतो त्या उपसभेस देता येते. मुख्य प्रधानाकडे बहुतकरून तो ज्या पार्लमेंटच्या

उपसभेत तिचा सभासद म्हणून बसतो त्या सभेच्या धुरीणाचा महत्त्वाचा खरा; पण स्पष्ट निर्दिष्ट नाही असा हुद्द असतो आणि म्हणून वहिवाटीस अनुसरून सभेपुढे काही गोष्टी आणण्यास त्याचा हक्क असतो.

मुख्य प्रधानाचे कॅबिनेटच्या निरनिराळ्या सभासदांशी असणारे नाते - मुख्य प्रधानाचे कॅबिनेटच्या सभासदांशी जे नाते असते त्याची व्याख्या करणे फार कठीण आहे. मदतीस निवडण्याच्या काम राजा मुख्य प्रधानावरच सोपवितो. आपल्या पक्षातील जे लोक अतिशय कार्यक्षम व वजनदार असतील त्यांचीच तेवढी निवडणूक करावयाची एवढेच काय ते धोरण या त्याच्या कर्तव्यात त्यास राखावे लागते. हा जो निवडणुकीचे कामात एक निर्बंध ठेविलेला आहे त्याची मर्यादा फारच अल्प आहे, हे खरे आहे. मदतनिसांची निवडणूक झाल्यानंतर प्रत्येक महत्त्वाच्या विषयाच्या संबंधाने त्यांच्याशी त्यास वादविवाद करावा लागतो. जर कोणा एका मदतनिसाचे मत मुख्य प्रधान व कॅबिनेटचे इतर सभासद यांच्या मताहून भिन्न असेल तर त्याने आपल्या जागेचा एक तर राजीनामा द्यावा अगर आपला असंतोष बाहेरून न दाखविता इतरांच्या मतांप्रमाणे ठरलेली गोष्ट सिद्धीस नेण्यास मनःपूर्वक झटावे. जेव्हा कित्येक कॅबिनेटच्या सभासदांचे मत मुख्य प्रधान व इतर सभासद यांच्या मतांहून भिन्न पडते तेव्हाही हाच नियम लागू पडतो. कारण राज्यव्यवस्थापनेच्या वहिवाटीच्या अनुरोधाने मुख्य प्रधानास राज्यकारभार चालविण्याची पात्रता जोपावेतो कॉमन्स सभेत त्यास अनुकूल असे मताधिक्य असते तोपावेतो आहे. ज्या त्याच्या मदतनिसास त्याची (मुख्य प्रधानाची) वर्तणूक आवडणार नाही त्यांनी पाहिजे तर आपले राजीनामे द्यावे व पार्लमेंटमध्ये त्याचा पाडाव करण्याची खटपट होईल तेवढी करावी. ते जर वजनदार असले तर त्यास या खटपटीत यश येण्याचा संभव असतो व त्यामुळे मुख्य प्रधानास आपल्या जागेचा राजीनामा देणे भाग पडते; परंतु राज्यव्यवस्थेच्या वहिवाटीप्रमाणे जोपावेतो ते कॅबिनेटमध्ये असतील तोपावेतो त्यास मुख्य प्रधानास मनःपूर्वक मदत करावीच लागते व राजाचे किंवा पार्लमेंटचे त्याच्या विषयी मत कलुषित करण्याच्या कामापासूनही त्यास अलग राहावे लागते.

कॅबिनेट सभेची विचार पद्धती - कॅबिनेटचे सभासद हे नेहमी प्रिव्हीकौन्सिलचेही सभासद असतात. प्रिव्हीकौन्सिलर या नात्याने त्यास कौन्सिलमध्ये झालेली राजकीय विषयावरील चर्चा बाहेर न फोडण्याबद्दल शपथ घ्यावी लागते. कॅबिनेट कौन्सिलमध्ये जी कामे होतात त्यांचे लेखी टिपण ठेवीत नाहीत; परंतु ही सर्व कामे केवळ औपचारिक रीतीने चालत नसतात हे प्रसिद्ध आहे. पार्लमेंटमधील कामांप्रमाणे ती असत नाहीत. नेहमी ठरीव भाषणे झालीच पाहिजेत, असा नियम नसतो, तसेच एखाद्या गोष्टीबद्दल मतभेद होऊन मते घेऊन निर्णय करण्याइतका वादविवादही तेथे कधी चालत नाही. जो कोणी सभासद हजर असतो त्याचा उद्देश विशिष्ट विषयासंबंधाने सर्वांच्या मतांचा सामान्य झोक काय

आहे तो समजून घेऊन तद्नुसार आपले मत बनविण्याचा असतो. अखेर ठराव जो होतो तो कॅबिनेटच्या सर्व सभासदांच्या अनुमते झाला आहे असे समजतात. मुख्य प्रधान जर कार्यक्षम व उत्साहशील असला तर या वादविवादात तो आपल्या इच्छनुरूप ठराव करवून घेऊन, सर्वांवर आपली छाप राखतो.

कॅबिनेट पद्धतीच्या कामकाजाची तऱ्हा - जुलमी राजसत्तेच्या ठिकाणी वसणारी एकी, गुप्तपणा व एकदम निकाल लावण्याची रीत हे गुण पुष्कळांशी कॅबिनेट पद्धतीत असून तिला लोकनियुक्त एका मोठ्या सभेच्या सद्ग्रहावर आपली पूर्ण भिस्त ठेवावी लागते, ही गोष्ट वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे तीत विशेष आहे. ही सभा अलग किंवा ज्यांचा परस्परांशी काही संबंध नाही अशा इसमांची बनलेली असते. अगर तीत मनुष्यांच्या लहान लहान टोळ्या असत्या तर असल्या परावलंबी स्थितीत तिच्या हाती राज्यकारभार चालणे दुरापास्त झाले असते; परंतु कॉमन्स सभेची अशी स्थिती फारच क्वचित झालेली आढळते. या सभेतील सभासदांचे बहुतकरून दोन मोठे पक्ष झालेले असतात. जुन्या दंतकथा, मते, स्वार्थ व सख्त पक्षरचना या गोष्टींनी हा प्रत्येक पक्ष एकमेकाशी दृढबद्ध झालेला असतो. एखाद्या सामान्य सभासदाचे मत विशेषच बदलल्याशिवाय तो आपला पक्ष सोडीत नाही व एखादा पक्षही आपले मत पुष्कळच बदलेल तेव्हाच काय तो ज्या त्याच्या पुढाऱ्याच्या कार्यक्षमता, अनुभव व कीर्तीमुळे त्यास अतिशय फायदा झाला आहे त्या आपल्या पुढाऱ्यास सोडण्यास प्रवृत्त होतो. अशी स्थिती असल्यामुळेच कॅबिनेट सभा कॉमन्स सभेवर अवलंबून राहू शकते. पक्ष पद्धतीवरच कॅबिनेट पद्धतीची मुख्यत्वेकरून स्थापना झालेली आहे. जेव्हा जेव्हा एखाद्या पूर्वीच्या कमी मतवाल्या पक्षास मताधिक्य मिळून तो प्रबळ होतो, तेव्हा तेव्हा कॅबिनेट सभेचे धोरण बदलत जाते हा एक या पद्धतीवर मोठा गंभीर अपवाद आहे. जर या दोन्ही मोठमोठ्याला पक्षांची मते राज्यकारभाराच्या अत्यंत आवश्यक अशा पुष्कळशा बाबतीत एक नसतील तर वरील अपवाद खरोखर विघातक झाला असता. या दोन पक्षात जर सोळाव्या शतकातील कॅथोलिक व प्रॉटेस्टंट अथवा सतराव्या शतकातील कॅव्हेलिअर व राऊंडहेडस् याप्रमाणे मतभेद असते, तर पक्षनिष्ठ राज्यव्यवस्था म्हणजे सतत राहणारे एक बंडच होऊन राहिले असते. म्हणून ज्या देशात राजकीय बाबतीतील मतभेद नियमित असतात व राजकीय बाबीसंबंधांचे मनोविकार कह्यात असतात फक्त त्याच देशात कॅबिनेट पद्धतीने सुनियंत्रित राज्यकारभार चालविता येतो.

कॅबिनेट पद्धतीनुसार मंत्रिजनांवरील जबाबदारी - प्रधान मंडळीवर जी जबाबदारी असते तिला कॅबिनेट पद्धतीमुळे निराळे स्वरूप प्राप्त झाले. जोपावेतो प्रधान नेमणे किंवा त्यास काढून टाकणे हे खरोखर राजाच्या हाती असे तोपावेतो कॉमन्स सभा एखाद्या प्रधानास काढणे झाल्यास त्यावर स्पष्ट दोषारोप आणूनच काढीत असे. याप्रमाणे जेव्हा कॉमन्स सभेस एखाद्या प्रधानाचा कारभार आवडत नसे व त्यास काढून टाकावे अशी तीस इच्छा

होई तेव्हा त्या प्रधानावर फौजदारी गुन्ह्याचा आरोप तीस आणावा लागे व असे करिताना आपला हेतू सिद्धीस नेण्यास तीस पुष्कळ वेळा कायद्याचा व विशेषकरून राजद्रोहाच्या कायद्याचा मनमानेल तसा व अत्यंत लज्जास्पद रीतीने विपर्यास करावा लागत असे; परंतु ज्या वेळेपासून प्रधानाच्या मताविरुद्ध कॉमन्स सभेतील ज्या पक्षाचे मताधिक्य असेल त्या पक्षाचे मत पडल्यास प्रधानास राजीनामा दिल्याशिवाय गत्यंतरच राहीनासे झाले. त्या वेळेपासून खरोखर ज्यांनी कायद्याविरुद्ध आचरण केले असेल त्यास शिक्षा देण्याचेच वास्तविक कामी दोषारोपाचा फक्त उपयोग होऊ लागला. इतःपर पदभ्रष्ट प्रधानास आपल्या जीवित वित्ताचा नाश होईल हे भय राहिले नाही व कॉमन्स सभेतील तरुणबांड सभासदही राजाच्या मंत्र्यास शिरच्छेदाचा धाक घालीनासे झाले.

कॅबिनेट पद्धतीची अखेरची अंमलवारी - एकोणिसाव्या शतकापावेतो ज्या कॅबिनेट पद्धतीचे वर वर्णन झाले आहे ती पूर्ण दशेस आलेली नव्हती; परंतु पहिला जॉर्ज व दुसरा जॉर्ज राजा यांच्या कारकीर्दीत तिच्या सर्व महत्त्वाच्या बाबी अमलात येऊन चुकल्या होत्या. मुख्य प्रधान या ड्‌के हृद्याची जी सांप्रतची व्याख्या आहे ती बरहकूम पाहिले असता कदाचित सर रॉबर्ट वॉलपोतल हाच पहिला मुख्य प्रधान आपणास मानावा लागेल. सन १७२१ ते सन १७४२ पावेतो त्याच्या बऱ्याच लांबलचक कारकीर्दीत पार्लमेंट सभेतील प्रधान मंडळाचा व राजाच्या खासगी सल्लामसलतीतदेखील मुखरीणपणाचा आपला हक्क आहे असे त्याने सिद्ध करून दाखविले. आपल्या मदतनिसास तो आपल्या सांगण्याप्रमाणे अक्षरक्षः वागण्यास भाग पाडीत असे. पूर्वी मंत्र्यास व कौन्सिलरास जे स्वातंत्र्य असे ते आपणास मिळावे म्हणून जर कोणी त्याच्या एखाद्या मदतनिसाने यत्न केला तर त्यास तो त्याच्या कामावरून ताबडतोब दूर करी.

कॅबिनेट पद्धतीविरुद्ध चळवळ - इंग्लिश लोकास प्राईम मिनिस्टर या पदवीचा तिटकारा आहे असे वॉलपोलास ठाऊक असल्यामुळे त्याने आपल्यास ही पदवी न लावून घेण्याच्या कामी फार सावधगिरी ठेविली होती खरी; पण त्याच्या हाती असलेली सत्ता अनिर्बंध असल्यामुळे त्याच्याविरुद्ध लोकांमध्ये एक जबरदस्त प्रतिक्रिया उत्पन्न झाली. व्हिग व टोरी या उभयतांस कॅबिनेट पद्धत न आवडण्यास कारणे होती. व्हिग पक्षातील मख्य मख्य लोकांना आपल कुळाचा, पैशाचा व वंशपरंपरेने राज्यात असलेल्या त्यांच्या वजनाचा ताठा असल्यामुळे त्यांच्या सर्वांच्या हातातील सत्ता नाहीशी होऊन ती कॉमन्स सभेतील एका महत्त्वाकांक्षी सभासदाच्या हाती ज्या पद्धतीच्या योगाने जाऊन पडत असे ती पद्धत त्यास स्वभावतः आवडत नसे. राजा हा राज्यात नावाचा नसून सर्वश्रेष्ठ खरोखर आहे, अशी टोरी पक्षातील लोकांची फार दिवसांची समजूत असल्यामुळे ज्या पद्धतीच्या योगाने राजसत्ता केवळ छायारूप होऊन गेली होती ती पद्धत त्यास त्यांच्या उपजत बुद्धीप्रमाणे तिरस्करणीय वाटत असे. हॅनोव्हर घराण्यातील एखाद्या राजाचा अधिकार कमी करण्यास ते कबूल झाले असते; परंतु त्या गोष्टीबरोबरच त्यांचा जो राज्यातील अधिकारांच्या जागी

कायमचा व पुरा मज्जाव होणार होता तो त्यास व्हावयास नको होता. अशी वस्तुस्थिती असल्याने ज्या टोरी पक्षीयांना आपण मंत्री व्हावे अशी इच्छा होती ते मंत्रिमंडळातून काढून लावलेल्या व्हिग पक्षीयांना जाऊन मिळाले. लॉर्ड बॉलिंगब्रोकाने 'पेट्रिअट किंग' नावाच्या त्यांच्या प्रसिद्ध ग्रंथात विरुद्ध पक्षाच्या राज्यव्यवस्थापनामूलक उपपत्तीचे विवरण केले आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे पेट्रिअट किंग याने (स्वदेशाभिमानी राजाने) राजसत्तेची पुनः स्थापना इंग्लंडच्या वहिवाटीस अनुसरून करावयाची होती, पक्षांकडे दुर्लक्ष करावयाचे होते व सार्वजनिक हितासाठी जे त्याच्या हाताखाली काम करण्यास खुश असतील असे मंत्री जेथे जेथे म्हणून त्यास आढळतील तेथून आणून पसंत करावयाचे होते.

विरुद्ध पक्षाने अखेरीस वॉलपोलाला अधिकारावरून काढण्याचे यश संपादन केले; परंतु बॉलिंगब्रोकाच्या मताप्रमाणे यथार्थतः वागण्याचे त्यांनी मनावर घेतले नाही. एकमेकांशी झगडणाऱ्या महत्त्वाकांक्षेच्या योगाने उत्पन्न झालेल्या दुर्बलतेत व गोंधळात काही वर्षे लोटल्यानंतर पुनः गोष्टी स्वाभाविक मार्गाला लागल्या व कॅबिनेट पद्धत पुनः स्थापण्यात आली.

राजदरबारच्या श्रेष्ठ अधिकारातील फेरफार - प्रिव्हीकौन्सिलाच्या अधिकाराच्या हासाबरोबरच लॉर्ड प्रेसिडेंटाच्या अधिकाराचे महत्त्व कमी झाले. सांप्रतकाळी ती जागा काम न करता पगार मिळणारी बनली आहे व ती ज्याच्या हातून महत्त्वाची मंत्र्याची कामे होण्यासारखी नसतात; परंतु जो कॅबिनेटमध्ये सभासद होण्यास उपयोगी आहे, अशा इसमास देतात.

याच वेळी लॉर्ड ट्रेझररची जागाही रद्द झाली. ॲन राणीने मरणकाळी ज्याची नेमणूक केली होती तो श्रूसबरीचा ड्यूक शेवटचा लॉर्ड ट्रेझरर होता. त्याच वर्षाचे ऑक्टोबर महिन्यात जेव्हा त्याने आपल्या जागेचा राजीनामा दिला तेव्हा ती जागा कमिशनच्या (चार चौघांच्या) स्वाधीन करण्यात आली. तेव्हापासून ती त्याच स्थितीत आहे; परंतु ही कमिशनर मंडळी पैशाच्या व्यवस्थेत मुळीच पडत नाहीत. फर्स्ट लॉर्ड ऑफ दी ट्रेझरी हा हुद्दा बहुधा मुख्य प्रधान आपल्याकडे घेतो. कारण हा हुद्दा सन्माननीय असून त्याचे काम त्यास काहीच करावे लागत नाही. जुनिअर लॉर्डस् ऑफ दी ट्रेझरी नावाचे अधिकारी हिशेबी खात्यांखेरीज मुख्यत्वेकरून इतर खात्यातच नेमलेले असतात; हिशेबी खात्याची खरी सत्ता चॅन्सलेर ऑफ दी एक्सचेकर याच्या स्वाधीन असते. तिसऱ्या हेन्रीच्या कारकीर्दीपासून ही जागा अस्तित्वात आहे; परंतु मंत्री या नात्याने त्या जागेवरील अधिकाऱ्यांचे महत्त्व पहिल्या जॉर्जच्या कारकीर्दीपासून सुरू झाले आहे. हा अधिकारी नेहमी कॉमन्स सभेचा सभासद असतो. कमिशनकडे खजिन्याची व्यवस्था गेल्यापासून तो कॉमन्स सभेतच सारखा बसत आला आहे.

○○○

भाग १२ वा

तिसरा जॉर्ज

इ.स. १७६०-१८२०

उपोद्धात - तिसऱ्या जॉर्ज राजाची कारकीर्द प्रजापक्षीय बदलाचा काळ व व्हिग पक्षाच्या श्रेष्ठतेचा काळ यांच्यामधील अवधीत झाली. राज्यव्यवस्थापनेसंबंधाने या कारकीर्दीचे महत्त्व दुहेरी आहे. या राजाने आपल्या कारकीर्दीचा पूर्वभाग पार्लमेंटसभेच्या वाढत्या अधिकारास आळा घालण्यात, नवीन कॅबिनेट पद्धतीत ढवळाढवळ करण्यात व पुनः एकवार खरोखरीची राजसत्ता स्थापन करण्यात घालविला. या कारकीर्दीच्या उत्तर भागात ग्रेटब्रिटन व आयर्लंड यांच्या एकीकरणाशिवाय राज्यव्यवस्थापनेसंबंधाने कोणतीही महत्त्वाची गोष्ट घडली नाही; परंतु भावी होणाऱ्या अति महत्त्वाच्या राज्यव्यवस्थेसंबंधाच्या घडामोडी घडून येण्यास लागणारी तयारी याच काळात झाली. अमेरिकेत लोकसत्तात्मक राज्याची स्थापना, फ्रान्स देशातील राज्यक्रांतीचा उद्गम, फ्रान्स देशाशी मोठे युद्ध सुरू झाल्यामुळे लोकांचे झालेले हाल व सर्वांवर कडी म्हटली म्हणजे इंग्लंड देशाचा व्यापार व उद्योगधंदे यांची उत्तमोत्तम यांत्रिक शोधामुळे झालेली विलक्षण वाढ, या सर्व गोष्टींच्या योगे आंग्लसमाजाची घटना व इंग्लिश राजनीतीचे स्वरूप एकदम पालटून गेले. फ्रान्स देशाशी होत असलेले युद्ध पुरे होईतोपर्यंत व जॉर्जच्या मृत्युकालापर्यंत यद्यपि राज्यक्रांतीचा जोर तितक्या वेळेपुरता दबून गेला होता तरी त्याची वाढ सारखी सुरू होतीच. मग मात्र तो दुप्पट जोराने उसळला.

तिसऱ्या जॉर्जचे राज्याधिरोहण - व्हिग पक्षाचा पाडाव - हा तरुण राजा म्हणण्यासारखा योग्य पुरुष होता असे नाही; परंतु तो मेहनती, निश्चयी व स्वभावाने जुलमी असा होता. तो बाल्यावस्थेत असताना त्याचा बाप, फ्रेडरिक, प्रिन्स ऑफ वेल्स हा मरण पावला होता. त्याच्या आईने म्हणजे प्रिन्सेस ऑफ वेल्स हिने त्याला राजसत्तेच्या महत्त्वाविषयीच्या कल्पना शिकवून ठेवल्या होत्या. 'जॉर्ज तू राजा हो' असे तिचे त्याला वारंवार आग्रहपूर्वक सांगणे असे आणि म्हणूनच आपल्या घराण्यातील पहिल्या दोन राजांपेक्षा आपल्याला

राजसत्ता जास्त असावी, अशी त्याच्या मनाची प्रवृत्ती झाली होती. हॅनोव्हर घराण्यातील राजांकडे राजसत्तेची केवळ पडछाया व खरीखरी राजसत्ता व्हिग पक्षीय बड्या लोकांच्या हाती, अशा प्रकारच्या राजसत्तेच्या वाटणीने त्याचे समाधान होईना. पहिले जॉर्जप्रमाणे अगर दुसऱ्या जॉर्जप्रमाणे तो केवळ व्हिग पक्षीयांवरच अवलंबून नव्हता. तिसरा जॉर्ज राजा इंग्लंड देशात जन्म पावन तेथेच वाढला होता. ब्रिटन म्हणून घेण्यात मला धन्यता वाटत आहे, असे त्याला नवीन भरलेल्या पार्लमेंट सभेपुढे आपल्या पहिल्या भाषणात म्हणून दाखविता आले. त्याच्या प्रजाजनास तो प्रिय असे व विशेषतः तो टोरी पक्षीयांस फारच प्रिय असे. टोरी पक्षीयांपैकी बहुतेक लोक अंतःकरणपूर्वक जॅकोबाईट पक्षाचे कधीही नसत; सन १७४५ च्या बंडाची फसगत झाल्यावर जॅकोबाईट पक्ष निर्मूल झाल्यासारखाच झाला होता, म्हणून टोरी पक्षाच्या लोकांना या तरुण राजाभोवती त्यास मदत करण्यास जमून राजसत्तेला मदत करण्याविषयीच्या आपल्या नैसर्गिक आवडीस मुभा देता आली.

वाजवीपेक्षा फाजील भरभराटीचे दुष्ट परिणाम व्हिग पक्षातील लोकांवर झालेले दिसत होते. पहिला जॉर्ज व दुसरा जॉर्ज यांच्या कारकीर्दीत त्यांना आपल्या सत्तेबद्दल इतकी निर्धास्तता वाटत होती, की ते आपसातही खुशाल भांडत असत. यावेळी व्हिग पक्ष मोडून त्याच्या पुष्कळशा लहान लहान टोळ्या बनल्या होत्या व या टोळ्या मोठमोठ्या घराण्याच्या नावाखाली मोडत असत. त्यांचा संबंध कोणत्याही महत्त्वाच्या राजकारण तत्त्वाशी मुळीच राहिला नव्हता. मोठ्या पिटयाने इंग्लिश राजनीतीला खरोखर श्रेष्ठ पदवीला नेऊन बसविले होते. इंग्लिश राष्ट्राच्या राजकारणसंबंधी सदसद्विचार शक्तीस जागृत करण्याचा त्याने यत्न केला होता व त्या कामात त्यास चांगले यशही येऊन चुकले होते. तो यावेळी सेक्रेटरी ऑफ स्टेट या हुद्यावर होता म्हणजे खरोखरीचा मुख्य प्रधानच होता. मार्लबरोच्या वेळी इंग्लंड देशास त्याने जितक्या उच्च दशेस चढवले होते तितक्याच उच्चदशेस यावेळी पिटाने इंग्लंडास नेऊन बसविले होते; परंतु तिसऱ्या जॉर्जला स्वभावतः बुद्धिमान लोक आवडत नसत आणि म्हणूनच आपल्या राज्यकारभारात स्वतंत्र बाण्याच्या मनुष्य राहू न देण्याचा त्याने निश्चय केला होता आणि त्यामुळे पहिल्या प्रथम त्याने पिटाला काढून टाकले. सेक्रेटरी ऑफ स्टेटचा विचार घेतल्याशिवाय पार्लमेंट सभेपुढे वाचावयाचे आपले पहिले भाषण त्याने स्वतः तयार केले व नंतर पिटाच्या संबंधाने दुसऱ्या मंत्रिजनांस जो हेवा वाटत असे त्याचा त्याने आपल्या कामात उपयोग करून घेतला. फ्रान्सबरोबर संगनमत करून ग्रेटब्रिटनच्या विरुद्ध होण्याच्या तयारीत असलेले स्पेन देशाबरोबर युद्ध सुरू करण्याचा पिटाने निश्चय केला होता. त्याच्या बरोबरच्या मंत्रिमंडळीस अशा धाडसाच्या कामी पडण्याची छाती होईना. राजाने या इतर मंत्रिमंडळीस दुजोरा दिला. त्यामुळे पिटाला आपल्या जागेचा राजीनामा देणे भाग पडले. राजाने पिटाला पेन्शन व त्याच्या बायकोस बॅरोनेस ही पदवी दिली; परंतु या ममताळूपणाच्या प्रदर्शनाचा परिणाम पिटाच्या लोकप्रियतेवर मात्र घडून आला. नंतर लॉर्ड

ब्यूट सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या म्हणजे वास्तविक मुख्य प्रधानकीच्या मुद्यावर आला. राजाच्या मदतीने त्याने आपल्या मदतनीसास देववेल तितका त्रास दिला व आपण बलहीन आहो, असे त्यांच्या प्रचतीस आणून दिले. राज्यक्रांतिपक्षीय कुटुंबाचा धुरीण व फर्स्ट लॉर्ड ऑफ दी ट्रेझरी या हुद्यावर असलेल्या ड्यूक ऑफ न्युकॅसल यास पिटने राजीनामा दिल्यानंतर लवकरच राजीनामा देणे भाग पडले. नंतर लॉर्ड ब्यूट मुख्य दिवाण झाला. दिवाणगिरीवर येताच त्याने फ्रान्सबरोबर तह करण्याचा घाट घातला. ज्या सर्व लोकांनी या तहाच्या पूर्वयोजनांसंबंधी नापसंती दाखविण्याचे धैर्य केले त्या सर्वांस राजरोषाचा अनुभव घेणे भाग पडले. या गुन्ह्याबद्दल प्रिव्हीकौन्सिलर्स व लॉर्डस् लेफ्टेनंट या दर्जाच्या अंमलदारासच नव्हे त्याहून पुष्कळ हलक्या दर्जाच्या सरकारी नोकरास दूर करण्यात आले.

राजाचे मित्र - राज्यव्यवस्थेविरुद्ध राजाने चालविलेल्या धोरणानुरूप राज्यकारभार चालविण्यास अवश्य लागणारी शक्ती व निश्चय ही लॉर्ड ब्यूट याच्या अंगी नव्हती. लवकरच त्यालाही अधिकारावरून दूर करण्यात आले; परंतु राजा आपलाच हेका चालविण्याचा निश्चय धरून बसला होता. मुत्सद्यांमागून मुत्सदी त्याने हाती धरिले; परंतु त्यास पाहिजे होती तितकी अमर्याद नम्रता पुष्कळ मुत्सद्यांच्या अंगी दिसून आली नाही. जेव्हा जेव्हा मंत्रिजन आपल्या तःच्या विचाराने एखादे कार्य करण्याचा यत्न करीत तेव्हा तेव्हा राजाच्या मसलतीपासून त्यांना पीडा होई व त्यांचे यत्न निष्फळ होत असत. आपल्या मंत्रिजनांवर विश्वास ठेवण्याऐवजी जे राजकारणी पुरुष पार्लमेंट सभेस जबाबदार नसत, अशा राजकारणी पुरुषांवर तो आपला विश्वास ठेवीत असे. ते लोक मंत्रिमंडळाच्या धोरणाप्रमाणे आपली मते न देता राजाला जे धोरण प्रिय असे तयास मते देत असत. राजाला मंत्रिमंडळाची धोरणे नापसंत आहेत असे ते पार्लमेंटच्या इतर सभासदांस सांगत. हे लोक मंत्रिमंडळाच्या विरुद्ध मते मिळवीत व त्यांचा विरुद्ध पक्ष प्रबळ करण्यासाठी ते अभिवचने देत व धाकदपटशहाचाही उपयोग करीत. या लोकांना 'राजाचे' मित्र या नावाने प्रजावर्ग ओळखीत असे.

कॅबिनेट पद्धतीवर हल्ला : राज्यक्रांती होण्यापूर्वी होऊन गेलेल्या राजाच्या हाती जशी खरी राजसत्ता होती तशी आपल्या हाती असावी, असा यासमयी राजाचा हेतू होता. आपले मंत्रिजन आपण पसंत करावे, आपल्या धोरणाप्रमाणे त्यांनी राज्यकारभार चालवावा व याप्रमाणे ते जेव्हा न वागतील तेव्हा त्यास आपणास हुसकून देता यावे, अशी त्याची इच्छा होती; परंतु या त्याच्या धोरणास मागील भागात वर्णन केलेली नवीन कॅबिनेट राज्यव्यवस्था आड येऊ लागली. कारण त्या व्यवस्थेप्रमाणे कॉमन्स सभेचे हेतू सिद्धीस नेण्यासाठी मंत्रिमंडळाची खरोखर निवड त्या सभेतील मताधिक्यानेच होत असे व त्यास असलेले मताधिक्य नाहीसे झाले म्हणजेच ते अधिकारावरून दूर होत असत. इंग्लंडच्या त्या वेळच्या राजनीतिविषयक परिस्थितीला ही पद्धत फारच हितावह असल्यामुळे ती चांगलीच दृढमूल झाली होती. तिसऱ्या जॉर्जला ती मोडता येईना किंवा तिची वाढही त्यास कायमची थांबविता

येईना. लबाडीने व पुष्कळ वेळा हलकट साधनाच्या साहाय्याने या पद्धतीच्या साध्या व सरळ कार्यगतीस त्यास अडथळा मात्र आणता आला. इतकीही गोष्ट साध्य करण्यात त्याला आपले वजन कॉमन्स सभेवर खर्चावे लागले. याप्रमाणे पार्लमेंटच्या राज्यव्यवस्थेवर हल्ला करण्यासही त्यास पार्लमेंट सभेच्याच हत्यारांचा उपयोग करावा लागला.

कॉमन्स सभा व राजाचे वजन - ज्याअर्थी, कॅबिनेट पद्धतीचा पाया कॉमन्स सभेच्या वरचष्म्यावर अवलंबून होता. त्याअर्थी, त्या पद्धतीच्या बचावासाठी कॉमन्स सभा एकदिलाने काम करीत असे, असे वाटणे रास्त आहे; परंतु राजास सर्व सभाजनांच्या एक झालेल्या मताविरुद्ध जाण्याचा योग न येता त्यास कॉमन्स सभेत बहुतकरून मताधिक्यच मिळत गेले. या गोष्टीस बरीचशी कारणे होती.

(१) कॅबिनेट पद्धत ही तेव्हाही नवीन होती - कॅबिनेट पद्धत या वेळीही सर्व समाजास माहीत झालेली नव्हती व ती सर्वसंमतही नव्हती. कायदेपंडितांची भाषा, प्रचार व सामान्य समजूत ही तर कॅबिनेट पद्धतीचा मागमूसही लागू देत नसत; पण उलट राज्यव्यवस्थेचा प्रमुख चालक राजाच आहे हे दर्शविण्याकडे या सर्वांचा कल असे. विविक्षित पक्षाकडे लक्ष न देता 'स्वदेशाभिमानी राजा' गुणानुरूप लोकांची अधिकारावर योजना करतो हे जे बॉलिंगबोकचे मत होते ते राजपक्षीयास कबूल होते. प्रजापक्षीयास तर त्यांनी घडवून आणलेल्या बदलाच्या मर्यादेची स्पष्टशी कल्पनाच नव्हती.

(२) सर्वसाधारण जनसमूहाची उदासीनता - लंडन व दुसरी एक दोन शहरे खेरीजकरून इतर ठिकाणच्या साधारण जनसमूहास राजा व प्रजापक्ष यांच्यामधील भांडण ज्या मुद्यावर उपस्थित झाले होते त्याची पर्वाच नसे. व्हिग पक्षीय लोकांचे बहुतेक विचार यद्यपि प्रजासत्ताक मताचे असत तरी त्यांची राहणी बड्या लोकांची असे. कनिष्ठ प्रतीच्या लोकांवर त्यांचा फारसा पगडा नसे. एकेकाळी पिटचा अंमल लोकांवर बसला होता; परंतु तो कोणत्याही प्रकारे पाह गेले असता प्रजापक्षाचा पुढारी म्हणून नव्हता.

(३) पार्लमेंट सभेचा लाचखाऊपणा - आपल्या धोरणास सर्वसाधारण विरोध नाही असे जेव्हा तिसऱ्या जॉर्जला दिसून येई तेव्हा तो कॉमन्स सभेतील सभासदांना व्यक्तिशः धाकटपटशहा दाखवून अगर लाचरूस्वत देऊन कार्यभाग साधण्याची विद्या काही नवी नव्हती. पुनःसंस्थापनेपासून या साधनाचा उपयोग राजांनी व मंत्रिजनांनी एकसारखा चालविला होता. तिसऱ्या जॉर्ज राजाच्या राज्यारोहणाच्या अगोदरच्या शतकात कॉमन्स सभेने राष्ट्रास पूर्ण जबाबदार न होता सार्वजनिक कामावर आपला अंमल बसविला होता. या सभेतील वादविवाद व पक्षापक्षांतील मतसंख्या ही गुप्त ठेवीत असत. ज्या शहरात मतदारांचा विभाग फक्त नावाचाच असे, अशा शहरांमार्फत या सभेत पुष्कळ सभासद येत असत. ज्याअर्थी, या सभेवर लोकमताचा दाब नसे त्याअर्थी लाचरुस्वतीशिवाय तिच्यावर अंमल बसविण्याचे दुसरे साधनच नव्हते. सन १६८८ च्या राज्यक्रांतीनंतर पार्लमेंट सभेच्या

सभासदास लाचरुस्वतीने दूषित करण्याचा मोह जास्तच बळावत चालला. दूषित्वाची कला पूर्णत्वास नेल्याबद्दल वॉलपोलाने लौकिक संपादन केला; पण तो कदाचित अन्यायमूलक असेल. तिसरा जॉर्ज तर वॉलपोलापेक्षा या कामात एक केसभरदेखील कमी नव्हता. त्याने लाचरुस्वतीत इतका पैसा खर्च केला की, जरी त्याची आवक मोठी असून काटकसरही मोठी असे तरी त्याला जबर कर्ज झाले. तो धाकही घाली, लाचही देई. एखाद्या महत्त्वाच्या बाबीत मत देणारांच्या मतसंख्येशी आपला खास संबंध आहे असे तो मानीत असे आणि म्हणूनच अमुक गोष्टींसंबंधी माझे मत असे आहे असे तो सभासदांना कळवीत असे. तो मतदारांच्या मतसंख्येच्या यादी फार बारकाईने तपासून पाही व त्याप्रमाणे कोणावर बहाली व इतराजी करणे ती करी. सन १७६४ मध्ये राजेच्छेविरुद्ध मत दिल्यावरून जनरल कॉनवे व इतर काही लष्करी अधिकारी यांची कमिशने त्याने काढून घेतली.

(४) पार्लमेंटच्या लोकनियुक्ततेसंबंधीची स्थिती - यापूर्वीच ज्यांचा पुष्कळ वेळा उल्लेख झाला आहे अशा नानाविध कारणांनी पार्लमेंटमधील लोकनियुक्ततेची स्थिती फारच दूषित झालेली होती. उदाहरणार्थ, कौंटीतर्फे येणारे लोकनियुक्त सभासद व बरोजतर्फे येणारे लोकनियुक्त सभासद यांच्या संख्येत असणारी आरंभापासूनची विषमता, ट्यूडर व स्टुअर्ट घराण्यातील राजांनी उत्पन्न केलेल्या नावाच्या बरोजची मोठी संख्या, ज्या जुन्या भरभराटीच्या शहरांतून सभासद येत असत त्या शहरांची विपन्नदशा, या कारणांनी पुष्कळ सभासदांच्या जागा सामान्यतः राजाच्या हातातीलच होऊन राहिल्या होत्या व यापेक्षाही जास्त जागा खासगत गृहस्थांच्या होऊन बसल्या होत्या. काही प्रबळ कुटुंबांतर्फे तर सहा, आठ प्रसंगी दहाही सभासद निवडले जात; याप्रमाणे कॉमन्स सभेतील सुमारे एकतृतीयांश सभासद खासगत लोकांकडून व राजकडून निवडले जात असत. ज्याअर्थी, सांप्रतकाळी कॉमन्स सभा प्रबळ होती त्याअर्थी धनवान् लोक बरोजकरिता मोठाल्या रकमा खर्च करीत असत. त्यांना राजनीतिनियमांविषयी खरोखरीची काळजी मुळीच नसे; परंतु आपल्याला महत्त्व यावे हीच त्यांची इच्छा असे. असले लोक निवडून आले म्हणजे ते राजपक्षास मत देत. कारण हाच पक्ष संभावित आहे असे समजण्याचा प्रघात पडला होता. राजेच्छावलंबी बरोजशिवाय काहीशा स्वतंत्र विचाराचेही बरोज असत; परंतु त्यामध्ये मतदार थोडे असून ते लाचखाऊ असत. अशा ठिकाणचे मतदार आपली मते धडधडीत विकीत असत. लाच भरण्यास उपयोगी पडणाऱ्या साधनांचा भरपूर पुरवठा मिळाल्यास सरकारपक्षीय उमेदवारच निवडून येत. अशी परिस्थिती असल्यामुळे कॉमन्स सभा आपल्यास अनुकूल करून घेणे सरकार पक्षास बहुतेक नेहमी सुलभ पडे. काही झाले तरी राजास मदत करावयाचीच असे कॉमन्स सभेतील बहुतेकांचे मत होते. हे जॉन विल्किस याच्या फार दिवस चालू राहिलेल्या छळवादावरून सिद्ध होऊन राहिले होते.

जॉन विल्किसाचा खटला : जॉन विल्किस हा हुशार; परंतु वाईट चालीचा पुरुष होता व त्याची मते पूर्ण प्रजापक्षीय होती. आइल्सबरीतर्फे तो सभासद होता व 'नॉर्थ ब्रिटन' नावाच्या वर्तमानपत्राचा तो मालक असून तद्वारेच तो लॉर्ड ब्यूटवर आपली लेखणी कडक चालवीत असे. नंबर ४५ च्या अंकात फ्रान्स देशाबरोबर केलेल्या तहासंबंधात पसंतीदर्शक जो राजभाषणाचा भाग होता त्यावर त्याने कडक टीका केली होती व ही गोष्ट लॉर्ड ब्यूटने राजीनामा दिल्यानंतर घडून आलेली होती. बेअब्रू केल्याबद्दलच्या गुन्ह्यावरून त्याला पकडण्यात आले. पार्लमेंट सभेच्या कोणाही सभासदास त्याने राजद्रोह, अघोरकृत्य, अथवा स्वास्थ्यभंग अगर तत्तुल्य एखादा गुन्हा केल्याशिवाय पकडणे गैरकायदेशीर होते. शिवाय ज्या वॉरंटावरून त्याला पकडले ते सर्वसाधारण वॉरंट होते; म्हणजे त्यात व्यक्तिनिर्देश नसून त्याच्या वर्तमानपत्राचे मालक, छापणारे व प्रसिद्ध करणारे यास पकडावे, असा त्यात मोघम हुकूम होता. अशा वॉरंटांनी तोहमतीच्या गुन्ह्याशी काहीही संबंध नसणाऱ्या पुष्कळ इसमांना पकडणे शक्य होते. सन १७६५ मध्ये किंग्स बेंच कोर्टाने अशा प्रकारची वॉरंटे गैरकायदा आहेत, असे ठरवून टाकिले होते. सन १७६६ साली अधिकारारूढ असलेल्या व्हिग पक्षाच्या मंत्रिमंडळाने आपले वजन खर्च करून अशी (जनरल) वॉरंटे त्याज्य आहेत अशा अर्थाचा एक ठराव कॉमन्स सभेकडून मंजूर करवून घेतला होता.

सन १७६३ मध्ये बेअब्रूच्या गुन्ह्यावर न्याय कचेरीच्या निवाड्याची वाट न पाहता कॉमन्स सभेने नॉर्थ ब्रिटनचा ४५ वा अंक राजद्रोहात्मक गैरअब्रू करणारा आहे असे ठरवून जल्लादकडून तो जाळून टाकावा असा हुकूम फर्माविला व विल्कीस यास कॉमन्स सभागृहातून हाकून लावले. जनसमाज, निदान लंडन शहरातील, विल्कीसच्या पक्षाचा होता. कारण त्यास कडक रीतीने वागविले आहे, अशी त्यांची समजूत झाली होती. सरकार व कॉमन्स सभा आपल्या विरुद्ध इतकी खवळलेली आहे असे पाहून चौकशी पुरी होईपावेतो वाट पाहण्याइतके धैर्य विल्कीसचे अंगी नव्हते. तो इंग्लंडातून पळून गेला व त्यामुळे बेअब्रूच्या गुन्ह्याबदल चौकशीस उभे राहण्याचे टाळल्याबद्दल त्यास हद्दपारीची शिक्षा मिळाली. काही थोड्या वर्षांनंतर तो इंग्लंडमध्ये परत आला व मिडलसेक्सतर्फे तो कॉमन्स सभेत सभासद निवडून आला. त्या वेळेस असलेल्या लॉर्ड बेमाऊथ नावाच्या स्टेट सेक्रेटरी विरुद्ध गैरअब्रू करणारे लेख प्रसिद्ध केल्याच्या आरोपावरून त्यास सभेतून हाकून लावले. ज्यावेळी पुनः मिडलसेक्स कौंटीतर्फे सभासद म्हणून तो निवडून आला त्यावेळी कॉमन्स सभेने तो सभासद होण्यास अपात्र आहे व त्याच्या प्रतिपक्षी कर्नल लटरेल हा योग्य रीतीने सभासद निवडून आला आहे असे ठरविले. हे करणे राज्यव्यवस्थाघटनेविरुद्ध होते. कारण कॉमन्स सभेला आपले सभासद आपणच निवडण्याचा हक्क नाही.

पार्लमेंट सभेतील वादविवादाचे प्रकाशन - कॉमन्स सभेच्या सभासदांचा अनियंत्रितपणे वागण्याचा कल जरी कायम होता तरी त्यास एका नवीन गोष्टीचा स्वीकार

करणे भाग पडले व या त्यांच्या करण्याने लोकमताचा पगडा पार्लमेंट सभेच्या कृत्यावर अतिशय वाढला. ही नवीन गोष्ट म्हणजे पार्लमेंट सभेतील वादविवादांचे प्रकाशन होय. पूर्वकाळात वादविवाद गुप्त राखण्याच्या संबंधात कॉमन्स सभेने आपले शक्तिसर्वस्व खर्च केले होते व असे करणे तीस प्राप्त होते. गुप्तपणाशिवाय एखाद्या सभासदाने आपले हृद्गत प्रकट करणे बिनधोक नव्हते. जरी वादविवाद गुप्त ठेवण्यात अत्यंत दक्षता राखिली जात असे तरी स्पष्टवक्त्यावर राजावकृपा आणण्याइतके, काही नीच वृत्तीचे सभासद, गोपस्फोटाचे काम पुष्कळ वेळा करीत असत. या कारणाने कॉमन्स सभेच्या परवानगीवाचून त्या सभेतील कामकाजासंबंधी जी हकीकत बाहेर पडे तिजकडे राजाने लक्ष देऊ नये, अशी कॉमन्स सभेची राजापाशी नेहमीची मागणी असे. जो कोणी असे प्रकारची माहिती प्रसिद्ध करी तो कॉमन्स सभेच्या हक्काविरुद्ध अतिक्रमण करणारा गुन्हेगार ठरत असे.

परंतु छापण्याच्या कलेचा शोध लागल्यानंतर व कॉमन्स सभेच्या अधिकाराची वृद्धी ज्या फेरफारांनी झाली ते घडून आल्यानंतर राजा व राजमंत्री याशिवाय इतर लोकांनाही वादविवादात काय होते हे जाणण्याची जिज्ञासा उत्पन्न होऊ लागली. लाँग पार्लमेंटच्या सभानायकास या जिज्ञासेपासून आपणास फायदा आहे हे माहीत होते. सन १६४१ साली पार्लमेंट सभेने सभेत झालेली कामे प्रसिद्ध करण्यास परवानगी दिली; परंतु परवानगीशिवाय अशी कामे छापणे म्हणेज पार्लमेंट सभेच्या हक्काचे अतिक्रमण करणे आहे, असे मानले जात असे. या रीतीने राज्यक्रांतीनंतर पुढे लोकसमूहाच्या इच्छा व पार्लमेंटच्या इच्छा यांच्यात एकसारखे भांडण चालू होते. वादविवाद प्रसिद्ध केले जात असत खरे; परंतु त्याबद्दलची सर्व जबाबदारी बातमीदारावर असे व ते प्रसिद्ध करण्याच्या कामी अडचणी असल्यामुळे ते नेहमी अपूर्ण व एकदेशीय असत. ज्याअर्थी, लघुलेखन लेखकास कॉमन्स सभेत जाण्याची परवानगी नसे त्याअर्थी तेथे झालेल्या भाषणांची अक्षरशः नोंद होणे शक्य नसे. थोडी बहुतशी चुकीचीच आठवण व तीही पक्षाभिनिवेशाच्या छटेने नेहमी रंगलेली हेच त्यावेळच्या प्रसिद्ध होत असलेल्या संभाषणाचे काय ते आधारभूत साधन असे. या बातम्या अपुऱ्या असून, त्या यथायोग्य नसल्यामुळे पार्लमेंट सभेतील कोणतेही वादविवाद छापू न देण्याविषयीच्या मुद्यांत आणखी एका नवीन मुद्याची भर पडली.

परंतु सन १७७१ साली वक्त्यांच्या नामनिर्देशासह कॉमन्स सभेतील भाषणे प्रसिद्ध करण्यास विल्कीस याने कित्येक वर्तमानपत्रांना चिथावून दिले. कॉमन्स सभेने सदर छापणारास गिरफ्तार करण्याचा हुकूम फर्माविला. छापणारांनी या त्यांच्या हुकमास तुच्छ मानिले, त्यावरून कॉमन्स सभेने राजास त्यांना पकडण्याचा जाहीरनामा काढण्याविषयी विनंती केली; परंतु जाहीरनाम्यात नमूद केलेल्या इसमांपैकी मिलर व व्हेबल या दोघांना जेव्हा पकडले तेव्हा शहराचा आल्डरमन या नात्याने विल्कीसने व लॉर्ड मेअर या उभयतांनी जाहीरनाम्यात कायद्याच्या विरुद्ध केलेला एखादा गुन्हा नमूद केलेला नसल्यामुळे अशा

प्रकारे त्यास पकडणे कायदेशीर आहे, असे मानण्याचे नाकारिले आणि म्हणून त्यांनी कैद्यांनाही सोडून दिले. ते उभयता कॉमन्स सभेचे सभासद असल्यामुळे त्यांना आपापल्या जागेवर येऊन हजर होण्याचा हुकूम सुटला व त्याप्रमाणे ते हजर झाले असता त्यांची लंडनच्या किल्ल्यामध्ये रवानगी झाली; परंतु कॉमन्स सभेतील मंत्रिमंडळाविरुद्ध असलेल्या पक्षाने व सर्व लंडन शहराने या दोघांच्या वतीने इतका उत्साहपूर्वक अभिमान व्यक्त केला, की कॉमन्स सभेला हा विषयच सोडून देणे बरे वाटले. यापुढे कॉमन्स सभेतील झालेल्या भाषणाच्या चांगल्याशा हकीकतीविरुद्ध कोणीही तक्रार आणली नाही. तथापि, सामान्य प्रेक्षकांइतकीच विवाद प्रसंगी बातमीदारांची योग्यता असे व एखाद्या सभासदाने त्यांच्या संबंधाने हरकत घेतल्यास मात्र त्यास आत येऊ देत नसत. याकाळीदेखील सभागृहात टाचण करून घेणे हे नियमविरुद्ध असे आणि म्हणूनच विवादांच्या बातम्या अवश्यमेव अपुया असत. जुने पार्लमेंटगृह सन १८३४ साली अग्निमुखी पडेपावेतो बातमीदारांकरिता निराळा सज्जा राखून ठेवलेला नसे. जरी छापणारांविरुद्ध भांडणाच्या कामी एकट्या कॉमन्स सभेचाच संबंध होता, तरी याच वेळी लॉर्डच्या सभेतील होणाऱ्या गोष्टीही प्रसिद्ध करण्याची मोकळीक आहे ही गोष्ट स्थापित झाली; परंतु कॉमन्स सभेतील भिन्न मते देणाऱ्यांची यादी सन १८३६ पावेतो व लॉर्ड सभेतील याची यादी सन १८५७ पावेतो नियमितपणे प्रसिद्ध होत नसे.

राज्यकारभारव्यवस्थेसंबंधात लोकनियुक्ततेची सुधारणा ही अग्रस्थानी असून, तिच्या खालची दुसरी पायरी पार्लमेंट सभेतील वादविवादाच्या प्रकाशनाच्या मोकळीकीची आहे. पार्लमेंटमधील वादविवाद व भिन्न मते देणाऱ्यांची यादी यांचे प्रकाशन होऊ लागल्यापासून ज्याला ज्याला म्हणून वर्तमानपत्र वाचता येत आहे, त्याला त्याला राजकारण संबंधित विषयात आपले मन घालता येत आहे. पूर्वकाळापेक्षा सांप्रतकाळी राजकारणाचे ज्ञान व तत्संबंधी आस्था लोकांमध्ये पुष्कळ फैलावलेली आहे. कॉमन्स सभेचा अधिकार हल्ली कमी झाला आहे व छापखान्याचा वाढलेला आहे. पार्लमेंट सभेतील कामकाजाची पूर्ण हकीकत जेव्हा वर्तमानपत्रातून येऊ लागली तेव्हा वर्तमानपत्रे लोकांना जास्त मोहक वाटू लागली. टीका करण्यास विषय जास्त मुबलक मिळू लागल्याने वर्तमानपत्रात टीकात्मक लेखही चांगल्या प्रकारचे येऊ लागले.

फॉक्सचा बेअब्रूसंबंधी कायदा, १७९२ - पार्लमेंट सभेतील कामकाजाची हकीकत प्रसिद्ध करण्याची मोकळीक मिळून बरीच वर्षे लोटल्यानंतर पार्लमेंट सभेच्या एका कायद्याने वर्तमानपत्रातून राजकारणीक विषयांची चर्चा अधिक मोकळेपणाने व म्हणूनच जोराने होऊ लागली. छापखान्यातून बाहेर पडणाऱ्या कामावर नजर ठेवणाऱ्या अधिकाऱ्याची जागा कमी केल्यामुळे लेखकास इच्छेस येईल ते लिहिण्याची मोकळीक प्राप्त झाली होती; परंतु बेअब्रूकारक लेखाबद्दल मात्र ते शिक्षेस पात्र होत असत; पण बेअब्रूची व्याख्या मात्र

निश्चित नसे, तिची ओढाताण होई. मंत्रिमंडळाच्या विरुद्ध पक्षास जी योग्य म्हणून टीका वाटे तीच सरकार पक्षास बेअब्रूकारक आहे असे वाटण्याचा संभव असे. राजकारण संबंधित विषयांवर लेख लिहिणारांची मोकळीक व सुरक्षितपणा ज्या अधिकाऱ्याकडे अमुक एक विशिष्ट शब्दयोजना बेअब्रूकारक आहे अथवा नाही हे ठरविण्याचा अधिकार असे. त्याच्याच कलावर बहुत अंशी अवलंबून असे. बेअब्रूच्या फिर्यादीचे प्रसंगी जुरीने जो निर्णय द्यावयाचा तो केवळ आरोपीने अमूक मजकूर प्रसिद्ध केला किंवा नाही हा मुद्दा लक्षात धरून द्यावयाचा व प्रसिद्ध केलेली गोष्ट बेअब्रू करणारी आहे किंवा नाही याचा निर्णय न्यायाधीशाने करावयाचा, असे वारंवार नमूद केलेले आहे. न्यायाधीशाचा कल राजपक्षाकडे असावयाचाच असा सामान्यतः नियम असे आणि म्हणूनच राजकारण्यांवर लिहिणाऱ्या लेखकांना घातक असे. प्रसिद्ध ॲडव्होकेट अर्किन याने या कायद्यावर ताशेरा झाडला व फॉक्सच्या बेअब्रूच्या कायद्याने तो नियम रद्द करण्यात आला. प्रसिद्ध झालेला अमुक एक लेख बेअब्रूकारक आहे किंवा नाही याचा निर्णय जुरीनेच करावा, असे या कायद्याने ठरविण्यात आले होते. राजकारणिक चर्चा पूर्ण स्वातंत्र्याने होऊ लागली, हा या कायद्याचा परिणाम झाला. कायद्याचा भंग करण्यास जोपावेतो एखादा लेखक लोकांना चिथावीत नाही तोपावेता सद्हेतूने केलेली टीकाच नव्हे तर सरकारावर अमर्याद दोषारोप करणेही बिनधोकपणाचे आहे.

अमेरिकेतील युद्ध - राज्यसूत्रे सर्व प्रकारे आपल्या हाती यावीत याबद्दलचे राजाचे यत्न केव्हाही शिथिल झाले नव्हते. सरतेशेवटी आपणास पाहिजे आहे असा मुख्य प्रधान लॉर्ड नॉर्थ आहे, असे त्यास आढळून आले. लॉर्ड नॉर्थ हा हुशार, जातीचा प्रामाणिक व फारच सुस्वभावी पुरुष होता; परंतु त्याच्या अंगी नीतिधैर्याची उणीव अत्यंत असे. राजा व पूर्वीची प्रधान मंडळी यांनी तेथील लोकांच्या संमतीवाचून कर बसवून उत्तर अमेरिकेतील वसाहती व इंग्लंड देश यात तंटा लावून दिला होता. शांतता राखण्याकरिता एकही सवलत द्यावयाची नाही, असा राजाचा दृढ निश्चय झाला होता व त्यामुळे तलवारीच्या जोराने वसाहतवाल्यास जेरीस आणण्याचा त्याचा यत्न सुरू होता. लॉर्ड नॉर्थ यास स्वतः जरी हे राजकारण मान्य नव्हते तथापि ते सिद्धीस नेण्यास तो निमित्त झाला. वसाहतवाल्यांच्या मदतीस फ्रेंच लोक आले व आमचा पराभव झाला. इंग्लंडचे राष्ट्र लढाईला कंटाळून गेले, मंत्रिमंडळाच्या विरुद्ध पक्षाने दुप्पट जोराने टीकेचा भडिमार चालू केला व लॉर्ड नॉर्थ यास अधिकारावरून काढून टाकण्यात आले. बंड केलेल्या वसाहतवाल्यांबरोबर तह करण्यास नाकरण्याचा हट्ट धरल्यामुळे राजाने आपल्यावर त्याचे जुने शत्रु जे व्हिग (प्रजापक्षीय) लोक त्यांच्या हाती सापडण्याचे संकट मात्र ओढवून घेतले.

राजा व त्याचे मंत्रिजन यामध्ये पुनः उपस्थित झालेले तंटे - लॉर्ड नॉर्थच्या मागून लॉर्ड रॉकिंगहॅम याने प्रजापक्षीय मंत्रिमंडळ बनविले; परंतु एका वर्षाच्या आत तो मरण

पावला व त्यामुळे त्याने बनविलेले मंत्रिमंडळ मोडले. चार्लस फॉक्सच्या कट्टर प्रजापक्षीय अनुयायांनी आपले अंग कारभारातून काढून घेतले. लॉर्ड शेलबूनने नवीन प्रधान मंडळ बनविले. तो मोठा मुत्सदी होता खरा; परंतु त्याची मते कोणत्याही एका पक्षाची निश्चित नसल्याने उभय पक्षांचाही विश्वास त्याजवर नव्हता. व्हिग मंडळीने जर शहाणपणाने वाट पाहिली असती तर पूर्वीचे त्यांचे वर्चस्व त्यास प्राप्त झाले असते; परंतु त्या पक्षाचा पुढारी फॉक्स याने अधिकार प्राप्त करून घेण्यासाठी उतावीळ होऊन ज्या लॉर्ड नॉर्थचा हा वेळा पावेतो अत्यंत घातुक शब्दांनी तो पाणउतारा करीत असे, त्याच्याशीच जाऊन संगनमत केले. उभयता मिळून लॉर्ड शेलबूनला राजीनामा देण्यास भाग पाडले व प्रसिद्ध संगनमती मंत्रिमंडळ स्थापन केले. त्यांच्या अविचारी महत्त्वाकांक्षेचा राष्ट्रास अगदी वीट आला. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था सुधारण्यासंबंधाने त्यांनी तयार करून आणलेल्या कायद्याच्या मसुद्यातील काही कलमांमध्ये राजसत्तेवर कोरडे उडविलेले असल्यामुळे राजाचा त्याजवर अत्यंत क्रोध झाला. राजास या बिलाची प्रगती कॉमन्स सभेत थांबविता आली नाही; परंतु लॉर्डींच्या सभेत ते हाणून पाडण्याचा त्याने निश्चय केला. जे कोणी हिंदुस्थानची राज्यव्यवस्था सुधारण्यासंबंधाने तयार केलेल्या कायद्याच्या मसुद्यास अनुकूल मत देतील, त्यास मी शत्रू समजेन, असे बडे लोकांना सांगण्यास त्याने अर्ल टेम्पल यास फर्माविले. त्यामुळे लॉडर्डींनी ते बिल फेटाळून दिले व राजाचे नॉर्थ व फॉक्स यांना अधिकारावरून काढून लावले.

राजाचा कॉमन्स सभेशी विरोध - कॉमन्स सभेत नॉर्थ व फॉक्स यांच्यातर्फे प्रबळ पक्ष होता. जो कोणी प्रधान म्हणून पुढे येईल त्यास आम्ही हुसकावून लावू अशी त्यास खात्री वाटत असे. प्रसिद्ध लॉर्ड चॅथमचा दुसरा मुलगा विल्यम पिट, जो यावेळी फक्त २५ वर्षांचा होता, त्याची निवड करण्यात राजाने अपूर्व शहाणपणा दाखविला. पार्लमेंट सभा मोडून टाकण्यास अनुकूल संधी मिळण्याची पिटने काही महिने वाट पाहिली. या मध्यावधीत त्याने कॉमन्स सभेतील बहुमतास बाजूस ठेवून राज्यकारभार चालविला. असला हा प्रकार राज्यकारभारव्यवस्थेविरुद्ध आहे, असे लोकांना वाटू लागले होते व हा प्रकार पुढे एकवारच घडून आला आहे; परंतु मंत्रिमंडळाविरुद्ध पक्षाने राज्यातील लोकमताचा प्रवाह कोणत्या दिशेने वाहत आहे, हे पाहण्याचा यत्न केल्यास आपल्या पक्षास भय आहे, असे दाखविण्याची फार मोठी चूक केली. सन १७८४ च्या एकंदरीच्या निवडणुकीने कॉमन्स सभा पिटला अनुकूल अशी बनून आली. सन १६८८ च्या राज्यक्रांतीनंतर जो व्हिग पक्ष अस्तित्वात आला होता त्याचा हा नवीन निवडणुकीने पुरा मोड झाला. ४६ वर्षांत दोनदाच काय तो थोडे दिवस प्रजापक्ष अधिकारारूढ होता. इंग्लंड देशाच्या सामाजिक व राजकीय स्थितीत पूर्ण बदल झाल्यानंतर मात्र हा पक्ष पुनः अधिकाररूढ झाला.

राजाच्या कारकीर्दीच्या उत्तर भागातील राजाचे वजन - राजाने प्रजापक्षाचा मोड केला खरा परंतु या करण्यास त्यास नॉर्थ व ब्यूट यापेक्षा एका निराळ्या प्रकृतीच्या इसमाची

मदत घ्यावी लागली होती. पिट हा सांगून ऐकणारा नव्हता व ज्याने आपला बचाव केला अशा प्रधानास 'तू अमुकच कर' असा हुकूम करण्याचे धैर्यही राजाच्या अंगी नव्हते. केवळ एकाच प्रसंगी राजा हट्टास पेटला आहे, असे पिटला आढळून आले. इंग्लंड व आयर्लंड या दोन देशांची पार्लमेंट सभा एकत्र करण्याच्या कामी अडचण पडू नये म्हणून पिटने कॅथलिक लोकांना पार्लमेंट सभेत त्यांचाहि समावेश केला जाईल अशी आशा दाखविली होती. ही गोष्ट सिद्धीस नेण्याची जेव्हा तो खटपट करू लागला तेव्हा कॅथलिक लोकांस पार्लमेंट सभेत बसण्याची मोकळीक देण्याची गोष्ट राजा मुळीच ऐकेना. पिटने राजीनामा दिला; परंतु तो लवकरच परत अधिकारारूढ झाला व राजाचे डोके फिरून जाईल या भीतीने त्याने हा विषय पुढे मुळीच सोडून दिला. पिटच्या मृत्यूनंतर सन १८०७ मध्ये ग्रेनव्हिल मंत्रिमंडळापासून पार्लमेंट सभेत कॅथोलिकपंथी यास येऊ देण्याबद्दलचा प्रश्न पुढे न आणण्याचे वचन जबरीने घेण्याचा राजाने यत्न केला. हे वचन देण्याचे त्यांनी नाकारल्यामुळे त्यास अधिकारास मुकावे लागले; परंतु राजास वेड लागल्याने त्यास त्याच्या कारकीर्दीच्या अखेरच्या भागात राजकारणा अव्याहत पडता आले नाही.

पार्लमेंटच्या सुधारणेबद्दलची प्रबळतर होत चाललेली मागणी - राजाच्या हाताने व्हिग पक्षाची फजिती झाल्यामुळे त्यास पार्लमेंट सभेत लोकांकडून निवडून येणाऱ्या मुखत्यारांची संख्या अधिक प्रमाणावर असण्याची जरूर आहे, असे कळून आले. चॅथम व विल्कीस यांनी या सुधारणेबद्दलची मागणी केलेलीच होती. राज्यसूत्रे हाती घेतल्यानंतर लवकरच धाकट्या पिटने 'रिफॉर्म बिल' पुढे आणले. लहान गावांतर्फे येणारे शंभर सभासद कमी करून कौंटी व मोठमोठी शहरे यांच्यामध्ये ते वाटून द्यावे, अशी सूचना त्याने पुढे आणली. तथापि, खिशात ठेवता येतील इतक्या लहान गावांच्या मालकांना ती कमी झाल्यामुळे होणारी नुकसानी भरून देण्यास तो तयार होता. अशा प्रकारच्या अल्प सुधारणेस उघडपणे विरुद्ध जाण्याचे राजास धैर्य होईना; परंतु पिटचे धैर्य खचविण्याचा मात्र त्याने यत्न केला. पिटच्या अनुयायांना सदरील बिल मान्य नसल्याने त्यांनी ते नाकारले. प्रसंगानुसार पार्लमेंट सभेच्या सुधारणेबद्दलच्या सूचना पुढे कधी कधी येत गेल्या खऱ्या; परंतु फ्रेंच राज्यक्रांतीच्या दुष्कृत्यांच्या अतिरेकामुळे लोकमत प्रतिकूल झाल्याने या सुधारणांच्या विरुद्ध असलेले पक्षास त्या सहज हाणून पाडता आल्या.

धार्मिक स्वातंत्र्याची प्रगती - सतराव्या शतकात धर्मसहिष्णुतेचा जो सपाटून जोर होता तो अठराव्या शतकात अगदीच कमी झाला. कॅथोलिक व प्रॉटेस्टंट तसेच चर्चमेन व नॉन्कन्फॉर्मिस्ट यांच्या जुन्या विवादांकडे जनतेचे लक्ष ओढेनासे झाले होते. हॅनोव्हर घराणे राज्यारूढ झाल्या वेळेपासून नॉन्कन्फॉर्मिस्ट मंडळीस व्यवहारदृष्ट्या धर्मासंबंधी मोकळीक मिळून राहिली होती. पहिल्या जॉर्जच्या कारकीर्दीत कॅथोलिक मंडळीस छळक असे कायदे अखेर मंजूर करण्यात आले. तथापि, सामान्य जनसमूहामध्ये यावेळीही इतका

धार्मिक हेकेखोरपणा कायम होता की, हे कायदे रद्द करणेही धोक्याचे काम झाले असते. सन १७७८ च्या सर जॉर्ज सॅव्हीलच्या कायद्यान्वये कॅथोलिक मताच्या लोकांना जमिनी संपादन करण्याची मोकळीक मिळाली व कॅथोलिक पात्र्यांना त्यांच्या मताप्रमाणे धर्मविधी केल्यास जन्मठेपेची जी शिक्षा मिळत असे तीही कमी झाली. हा कायदा मंजूर झाल्यामुळे सन १७८० मधील प्रसिद्ध गॉर्डन दंगे उत्पन्न झाले. तथापि, धर्म सहिष्णुतेची प्रगती ही सारखी चाललीच होती. सन १७९३ च्या सुमारास रोमन कॅथोलिक व डिसेंटर यास शिक्षण, पूजन व मिळकत मिळविणे, या संबंधात जे सर्व प्रतिबंध असत त्यापासून ते मुक्त झाले होते. फ्रेंच राज्यक्रांतिविरुद्ध इंग्लंडमध्ये प्रतिकूल लोकमत होऊन गेल्यामुळे या गोष्टीसंबंधी पुढील प्रगती अगदीच बंद पडली.

ग्रेटब्रिटन व आयर्लंड यांच्या पार्लमेंटचे एकीकरण - ग्रेटब्रिटन आणि आयर्लंड यांच्या पार्लमेंटचे एकीकरण सन १८०० साली घडून आले. सन १७८२ पावेतो आयरिश पार्लमेंट पूर्ण पराधीनतेच्या अमलाखाली होते. सातव्या हेन्रीच्या कारकीर्दीत आयर्लंडच्या सर एडवर्ड पॉयनिंग्स नावाच्या लॉर्ड डेप्युटीने, इंग्लिश प्रिव्हीकौन्सिलने अगोदर पसंत केल्याशिवाय, पैशाशिवायचा एखादा कायद्याचा मसुदा विचारासाठीही घ्यावयाचा नाही, अशा आशयाचा आयर्लंडात एक कायदा मंजूर करून ठेविला होता. आयर्लंडकरिता कायदे करण्याचा अधिकार ग्रेटब्रिटनच्या पार्लमेंटास आहे, असे पहिल्या जॉर्जच्या कारकीर्दीत मंजूर झालेल्या एका कायद्याने ठरवून टाकले होते. आयर्लंडातील स्वयंसिद्ध सैनिकांच्या मदतीने हेन्री ग्रॅटन याने अमेरिकन वसाहतीबरोबर इंग्लंड दुर्दैवाने युद्ध करण्यात गुंतले आहे असे पाहून हे कायदे रद्द करण्याविषयी मागणी करण्याची संधी साधली. या रीतीने आयरिश पार्लमेंटचे कायदे करण्याचे अधिकार पूर्णपणे कबूल करण्यात आले. तथापि, राष्ट्र या नात्याने आयर्लंडास स्वातंत्र्य नव्हते. प्रथमतः पार्लमेंटचे सभासद निवडण्याच्या कामी मत देण्याचा अधिकार व पार्लमेंटमध्ये बसण्याचा अधिकार प्रॉटेस्टंट पंथाचे लोकास असे. दुसरे आयर्लंडच्या कॉमन्स सभेतील सभासदांच्या पुष्कळशा जागा राजाचे हातातच असत अथवा त्या बड्या बड्या प्रॉटेस्टंट पंथाच्या कुटुंबांच्या ताब्यात असत. अखेरीस लॉर्ड लेफ्टेनंट आणि त्याचा मुख्य सेक्रेटरी यासारख्या खरी राजसत्ता ज्यांच्या हातात आहे अशा अधिकाऱ्यांची सत्ता आयरिश पार्लमेंटवर अवलंबून न राहता राजावर म्हणजे त्या काही जे मंत्रिमंडळ अधिकारारूढ असे त्यावरच अवलंबून असे. याप्रमाणे आयर्लंडमधील राज्यकारभारावरील इंग्लंडचे वर्चस्व एकसारखे मोठ्या जारीने चाल राहिले होते.

कित्येक वर्षेपावेतो या दोन राष्ट्रांमधील हा संबंध बदलला नव्हता. आयरिश पार्लमेंटने कॅथोलिक मताच्या लोकांशी पूर्वीपेक्षा जास्त उदारतेच्या तत्त्वास अनुसरून वर्तन चालविले होते. त्या पार्लमेंटने जे कायदे त्यांच्या पूजन पद्धतीच्या स्वातंत्र्याच्या व शिक्षणाच्या आड येत व जे जमीन जुमला मिळविण्यास त्यास प्रतिबंधक असत ते रद्द करून टाकले. निवडून

येण्याचा हक्क जरी त्यास या पार्लमेंटाकडून प्राप्त झाला नाही, तरी निवडून देण्याचा हक्क त्यास तिने दिला; परंतु कॅथोलिक मंडळीची एकंदरीची स्थिती फारच असमाधानकारक होती. आयर्लंडच्या रहिवाशांमध्ये त्यांची संख्या फारच मोठी होती. इंग्लंड व स्कॉटलंडमधून येऊन वसाहत करणारांच्या संख्येच्या मानाने खरोखर पाहिले असता आयर्लंडचे जुने राष्ट्र याच रहिवाशांचे बनलेले होते. तथापि, त्यांच्या ताब्यातील (९/१०) नऊदशांश जमीन पूर्वीपासून एकसारख्या चालत आलेल्या जप्त्यांच्या योगाने त्यांच्या हातची गेलेली होती. सरकारी नोकरी व अधिकार, पार्लमेंटच्या दोन्ही सभा व म्युनिसिपालटी यात त्यांना मज्जाव असे. स्थापित धर्मसंस्थेस ती त्यांच्या मते धर्मबाह्य असताही तिच्या मदतीकरिता त्यास कर देणे भाग पडत होते. ज्या अगदी अलीकडे अमलात असलेल्या क्रूर शिक्षा देण्याचे कायद्यान्वये त्यास कोणताही धंदा करण्याच्या कामी मोकळीक नसे व जी थोडीबहुत मालमिळकत त्याजपाशी शिल्लक राहिली होती तिचे संरक्षण होणे ज्यामुळे कठीण झाले होते ते कायदे याच सुमारास रद्द करण्यात आले होते. आयर्लंडमधील कॅथोलिकांपैकी बहुतेकांना प्रॉटेस्टंटांचा व इंग्लंड देशाचा द्वेष करणे अगतिक बनून राहिले होते. प्रॉटेस्टंटाचे महत्त्व कमी करून कॅथोलिकांकडे त्यांचा नैसर्गिक अधिकार जर जाऊ दिला असता तर खात्रीने ब्रिटिश पार्लमेंटाबरोबर आयरिश पार्लमेंट साधारण सलोख्यानेही राहतेना. तथापि, स्वातंत्र्य व धर्मसहिष्णुतेसंबंधी जी अर्वाचीन मते प्रचलित झाली आहेत त्यांच्या वजनाने प्रॉटेस्टंटांचे वर्चस्व साहजिकच ढासळू लागले होते. ग्रॅटन ज्यांचा पुढारी होता अशा पुष्कळ प्रॉटेस्टंटांच्या मनातूनही हे वर्चस्व असह्य न वाटू देण्याबद्दल खबरदारी घ्यावी, अशी उत्कंठा होती. त्या काळच्या उत्तम मुत्सद्यांप्रमाणेच पिटचीही इच्छा कॅथोलिकांची स्थिती सुधारावी म्हणून होती. राजा व प्रॉटेस्टंट बडे लोक यांच्या कचाटीतून सुटण्याची वेळ आयरिश पार्लमेंटला येऊ लागली होती. असे झाले असता या दोन राज्यांमध्ये बंधन कोणते राहणार, हा एक प्रश्न होता.

फ्रान्स देशात राज्यक्रांतीस सुरुवात झाल्यापासून आयर्लंडमधील राजकारणास निराळेच स्वरूप प्राप्त झाले. आयर्लंडमधील लोकांना फ्रान्स देशातील स्वातंत्र्याचे विचार पसंत वाटू लागले. ग्रेटब्रिटनशी संबंध न ठेवता लोकसत्तात्मक तत्त्वानुसार आयर्लंडचे एक स्वसत्ताक राज्य स्थापावे म्हणून आयरिश नॉनकन्फॉर्मिस्ट व आयरिश कॅथोलिक यांचे एकमत करण्याचा यत्न करण्यात आला. या चळवळीचा सन १७९८ मध्ये एक बंड होऊन अंत झाला. बहुतेक नॉन्कन्फॉर्मिस्ट लोकांना फ्रान्स देशाची मदत घेऊन हेतू साध्य करण्यापेक्षा या चळवळीतून अंग काढून घेणे बरे वाटले. याकारणाने सन १६४१ साली व सन १६८८ साली जी बंडे उद्भवली होती त्या व १७९८ साली उद्भवलेल्या बंडात काहीएक फरक नव्हता. प्रॉटेस्टंट जेत्यांविरुद्ध हे आयरिश कॅथोलिकांचे बंड होते. या बंडाचे निर्मूलन केल्यानंतर प्रॉटेस्टंटांचे वर्चस्व व आयर्लंडचे कायदे करण्यासंबंधी स्वातंत्र्य ही नाहीशी करण्याचा पिटने निश्चय केला. आपला स्वतःचा अंत करणारा कायदा मंजूर करून टाकण्यास त्याने आयरिश

पार्लमेंटचे बहुत करून लाचरुस्वत देऊन मन वळवून घेतले.

युनियनच्या अटीप्रमाणे कॉमन्स सभेला आयर्लंडमधून शंभर सभासद जावे व लॉर्डींच्या सभेला चार धार्मिक बडे लोक व अठ्ठावीस गृहस्थ वर्गातील बडे लोक जावे, असे ठरले होते. जे गृहस्थ लॉर्डस् म्हणून निवडले जायचे ते सर्व बडे लोक मिळून निवडावयाचे व ते आजन्म सभासद राहायचे असेही ठरले होते. आयर्लंडाची स्वतंत्र स्थापित धर्मसंस्था होती ती कायम ठेवण्यात आली. इंग्लंडचे कायदे व आयर्लंडचे कायदे मुख्यत्वेकरून सारखेच असल्याने ते पुढे अबाधित चालावे म्हणून कोणतीही सार्वजनिक खबरदारी घेण्याची जरूर नव्हती. इंग्लंड व आयर्लंड यांच्यामध्ये चालणाऱ्या व्यापारास पूर्ण स्वातंत्र्य मिळाले. कॅथोलिक पंथाच्या लोकांना पार्लमेंट सभेत बसण्याची मोकळीक मिळावी व यायोगे सामान्य जनसमूहास एकीकरण मान्य व्हावे, अशी पिटची इच्छा होती. तिसऱ्या जॉर्जच्या हट्टीपणाने हा त्याचा हेतू सिद्धीस गेला नाही. यानंतर पुढे अठ्ठावीस वर्षांनी कॅथोलिक मंडळीस हा मार्ग मोकळा झाला व तोही आयरिष कॅथोलिक व इंग्लंड देश यांच्यामध्ये भांडण होऊन त्यांच्या पूर्वीच्या वैराचा पुनरुद्भव झाल्यानंतर झाला.

लोकसत्तात्मक कल्पनांची वाढ : तिसऱ्या जॉर्जच्या कारकीर्दीत कायदेकानूंच्या फेरफारापेक्षा अधिक महत्त्वाची प्रत्ययाय येणारी गोष्ट म्हटली म्हणजे सामाजिक व राजकीय बाबतींचे महत्त्व ही होय. त्याचवेळेपासून सांप्रतच्या लोकसत्तात्मक कल्पनांच्या वाढीचा प्रारंभ झालेला आहे. त्या कल्पना अमुक एका विशिष्ट राष्ट्राच्या म्हणून नव्हत्या; सर्वसाधारणपणे युरोप खंडभर लागू पडतील अशा त्या होत्या. त्या कल्पनांच्या वाढीस काही सर्वसामान्य गोष्टी अंशतः कारणीभूत झालेल्या होत्या, त्यांचा येथे उल्लेख करता येत नाही; परंतु काही विशेष गोष्टीही कारणीभूत होत्या त्या येणेप्रमाणे : १) अठराव्या शतकातील प्रमुख फ्रेंच लेखकांचे वजन, (२) अमेरिकेतील संयुक्त संस्थानांमध्ये लोकसत्तात्मक राज्याची स्थापना, (३) फ्रेंच राज्यक्रांतीचा उद्भव, (४) इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती. एकोणीसाव्या शतकातील इंग्लंडच्या राज्यकारभारव्यवस्थेच्या इतिहासाचा क्रम समजण्यासाठी या कारणांचे परिणाम कसकसे घडून आले हे कळणे अगत्याचे आहे.

(१) अठराव्या शतकातील प्रमुख फ्रेंच लेखकांचे वजन - अठराव्या शतकातील सामाजिक व राजकीय विषयांची चर्चा करताना फ्रेंच लेखकांवर, इंग्लंडबद्दल कौतुक वाटून बराच परिणाम झालेला होता. इंग्लंडमधील संस्थांचा अभ्यास नुकताच प्रचारात येऊ लागला होता. सन १६८८ ची राज्यक्रांती होईपावेतो व ती नंतरही आणखी काही कालपावेतो इंग्लंडमधील संस्थांचे महत्त्व परदेशातील लोकांत क्वचितच उत्पन्न झाले होते व त्या संस्था परदेशीयांना बहुतेक अज्ञातच होत्या. राज्यक्रांतीनंतरच्या वर्षांमध्ये झालेली इंग्लंडची जलदी भरभराट पाहून या संस्थांकडे त्यांचे मन वेधू लागले. तिसरा विल्यम आणि ॲन यांनी चालविलेल्या लढायांच्या योगाने फ्रान्सचा बलभंग झाला व इंग्लंड युरोपमध्ये

पहिल्या प्रतीचे राष्ट्र झाले. इतर देशीयांच्या व विशेषतः फ्रेंच लोकांच्या दुस्थितीशी तुलना केल्यास इंग्लिश लोकांची सुसंपन्नता विशेषच नजरेस येऊ लागली. आमचे पराभूत झालेले प्रतिस्पर्धी व अतिशय जवळचे शेजारी जे फ्रेंच लोक त्यांना तर ही विषमता विशेषच भासू लागली. त्या वेळेपासूनच फ्रेंच लोकांनी इंग्लिश समाज लक्षपूर्वक पाहण्याची सुरुवात केली, तेव्हा त्यांच्या लक्षात फ्रान्समध्ये नसणारी अशी इंग्लिश लोकांमध्ये राजकीय, धार्मिक आणि औद्योगिक स्वतंत्रता आहे असे आले. यावरून त्यास इंग्लंड देशाची जी भरभराट झाली आहे ती सर्वथैव स्वातंत्र्यतामूलकच आहे असे सहज वाटू लागले; परंतु या त्यांच्या सिद्धान्तात सत्यापलाप बराच आहे.

याप्रमाणे फ्रान्स देशात स्वातंत्र्यप्रीती इंग्लिश संस्थांच्या अभ्यासानेच प्रज्वलित झाली होती; परंतु फ्रेंच लेखकांनी इंग्लंडमध्ये कधीही न घडून आलेल्या गोष्टींच्याही फार पुढे स्वतंत्रतेची मागणी लवकरच दूरवर नेऊन पोहोचविली. फ्रेंच लोकांची वृत्ती इंग्लिश लोकांच्या वृत्तीपेक्षा तामस आहे. आपणावर येणाऱ्या संकटांचा उपशम केवळ स्वतंत्रतेने होत नाही ही गोष्ट फ्रेंच लोकांच्या दृष्टोत्पत्तीस न येण्यास कारणे फ्रान्स देशातील बेबंदशाहीमुळे उत्पन्न झालेला द्वेष व राजकीय अनुभवाची उणीव, हीच होत. स्वभावधर्मास अप्रतिहत राखल्यास धनाची समतेची वाटणी होते व धनोत्पादनही मोठ्या प्रमाणावर होते, असे गृहीत धरून फ्रेंच अर्थशास्त्रज्ञांनी अर्थशास्त्राचे सिद्धान्त रचण्यास सुरुवात केली. व्यापार व उद्योगधंदे यासंबंधाच्या कायद्यांच्या सर्व लडबडी अनर्थावह आहेत, असे ते प्रतिपादित. जन्मतः जिनेव्हीस असून फ्रेंचमन झालेल्या रूसो याचे सिद्धान्त तर मनुष्यजातीवर येणारी सर्व दुःखे त्यास सुधारणेच्या पायी भोगावी लागत आहेत, असे शिकविण्याच्याही पल्ल्यावर जाऊन पोहोचले होते. त्याच्या मताप्रमाणे रानटी मनुष्य हा चांगला शहाणा व सुखी होय. विद्यमान सर्व सुधारणांसह चालू असलेल्या सर्व राज्यसंस्थाही त्याज्य होत, असे त्याचे म्हणणे होते. एकंदरीची निवडणूक चालू असता मात्र काय ते इंग्लंड स्वतंत्रतेचा अनुभव घेत असते एरव्ही तेसुद्धा स्वतंत्र नाही, असे तो म्हणत असे. शासितांच्या पूर्ण अनुमतीने राज्यव्यवस्थेची स्थापना करण्याचा त्याने यत्न केला.

निरनिराळ्या काळात निरनिराळ्या देशांत राज्यव्यवस्थेचे भिन्न भिन्न प्रकार असणे हितावह असते या बाबतची ऐतिहासिक कारणे तो मुळीच विचारात घेत नसे. कारण मनुष्यमात्रास जे स्वाभाविक हक्क आहेत असे तो मानीत असे त्यास अविरोधक राज्यव्यवस्थाच काय ती चांगली राज्यव्यवस्था आहे, असे त्याचे मत होते.

(२) संयुक्त संस्थानांची स्थापना : इंग्लंडमधील राज्यकारणिक ओघावर परदेशात घडून येणाऱ्या गोष्टींचा परिणाम मुळीच घडून आलेला नाही. ज्याकाळी बहुतेक सर्व युरोपखंड अनियंत्रित राजसत्तेच्या अमलाखाली होते त्याकाळी समुद्राच्या वेष्टणाने शेजाऱ्यांपासून आम्ही अलग असल्यामुळे मध्ययुगात प्रचलित असलेल्या स्वतंत्र संस्था

आम्ही कायम राखल्या होत्या. हॉलंड व स्वित्झर्लंडची लोकसत्तात्मक राज्ये फारच लहान असल्याने त्यांच्या राजकीय कल्पनांचा परिणाम आम्हांवर मुळीच झाला नाही. राज्यकारभारव्यवस्थेने पाहिले असता त्यातले त्यात ती श्रेष्ठ लोकाधीनच होती; परंतु संयुक्त संस्थानांच्या संस्थापनेचा परिणाम मातृभूमीच्या राजकारणिक कल्पनांवर जबर घडून आला. अमेरिकन लोक आमच्या संबंधी होते व ते आम्हापासून विभक्तही नुकतेच झालेले होते व आमचे बहुतेक कायदे व संस्था त्यांनी आपल्यात अद्याप कायम राखल्या होत्या. राजा, बडे लोक, अथवा प्रस्थापित धर्मसंस्था, या सर्वांस झुगारून देऊन ज्यावेळी त्यांनी लोकसत्तात्मक राज्याची स्थापना केली त्यावेळेस त्यांनी कॉमनवेल्थच्या अपकर्षापासून इंग्लंडमध्ये लुप्त होऊन राहिलेल्या कल्पनांचे पुनरुज्जीवन केले. बहुतेक इंग्लिश लोकांना रुचणाऱ्या विशिष्ट धार्मिक मतांपासून या कल्पना अलग केलेल्या असल्यामुळे त्या फलद्रूप जास्त झाल्या. कारण अमेरिकेतील संयुक्त संस्थानांच्या संस्थापकांनी आधुनिक फ्रेंच वाङ्मयाचा व विशेषतः रूसोच्या लेखांचा अभ्यास केलेला होता व सर्वत्र लागू करता येतील अशा मानलेला मूलतत्त्वांवरच त्यांनी आपली नवीन राज्यस्थापनेची इमारत उभारलेली होती. इंग्लंडच्या लोकांचे स्वातंत्र्याचे हक्क ही एक विशेष प्रकारे परंपरागत चालणारी त्यांची मत्ताच आहे, असे मानिले जात असे व ते हक्क वहिवाटीने, सनदेने व कायद्याने एकसारखे सुरक्षित राखिले जात असत. अमेरिकन लोकांचे स्वातंत्र्याचे हक्क मनुष्यमात्रास स्वभावसिद्ध प्राप्त होणारे असून, ते एकापासून दुसऱ्याला न देता येण्यासारखे आहेत, असे खास सांगण्यात येत असे.

(३) फ्रेंच राज्यक्रांतीचा उद्भव - ही रूसो व इतर फ्रेंच तत्त्ववेत्ते यांनी प्रतिपादित मूल तत्त्वानुरूप घटना घडवून आणण्याचा फ्रेंच राज्यक्रांती एक यत्न होता. ती जलदीने घडून येण्यास संयुक्त संस्थानांचे संस्थापन कारणीभूत झाले. प्रथमारंभी इंग्लिश लोकांची या क्रांतीला सहानुभूती होती. कारण त्यांना तिच्या योगाने फ्रान्स देशात सुराज्यव्यवस्थापन होईल असे वाटत होते; परंतु राज्यक्रांती घडून येत असता प्रसिद्ध झालेले विलक्षण सिद्धान्त व घडून आलेली भयंकर कृत्ये पाहून बहुतेक इंग्लिश लोकांना तिचा वीट आला व त्यांनी तिच्याशी फारकत केली. चौदाव्या लुईप्रमाणेच फ्रेंच लोकसत्तात्मक अंमल अतिक्रमणशील आहे असे सिद्ध झाल्यामुळे यद्यपि पिटच्या मनात फ्रेंच राज्यकारणांपासून अलिप्त राहण्याची मनीषा होती तरी त्यासही लढाईस उभे राहणे भाग आले. फ्रान्सबरोबर सुरू झालेले हे युद्ध तेवीस वर्षे चालू होते. त्या युद्धाच्या योगाने इंग्लंडमध्ये भयंकर ददात उत्पन्न झाली, तिच्यायोगे असंतोष उत्पन्न झाला व त्या असंतोषाला दडपशाहीची गाठ पडली. यावेळी फ्रान्समधील झोटिंगबादशाहीची आठवण बुझली नसल्यामुळे इंग्लंडमध्ये उदारतत्त्वानुरूप कायदे मंजूर करणे बंद पडले होते. अत्यंत शहाणपणाची एखादी सुधारणा करणे म्हणजे अराजकत्वाकडे पाऊल टाकणे की काय, असे लोकांना वाटू लागले होते. तथापि, राज्यक्रांतीचा अंतिम परिणाम लोकसत्तात्मक मनाला अनुकूल असाच घडून आला

होता. आमच्या अगदी नजीकच्या मोठ्या देशात लोकसत्तात्मक मताला अखेर विजय प्राप्त झाल्यामुळे आमच्यामध्येही लोकसत्तात्मक मतांच्या प्रगतीला मदत झाली. एकोणिसाव्या शतकात इंग्लडमधील रॅडिकल पक्षीय मंडळीला नवीन विचारांच्या स्फूर्योत्पादनासाठी नेहमी फ्रान्स किंवा संयुक्त संस्थाने या देशांकडे पाहावे लागत असे.

(४) औद्योगिक क्रांती - अठराव्या शतकाच्या मध्यापासून औद्योगिक क्रांतीला प्रारंभ झाला होता. तावत्कालपावेतो इंग्लंडमधील लोक मुख्यत्वेकरून शेतकीत गुंतलेले होते. जरूरीपेक्षा ते जास्त धान्य पैदा करीत व बराचसा दाणागोटा ते बाह्य प्रदेशी पाठवीत. प्रायः खेड्यापाड्यांतूनच कारागिरांचे घरोघर हातकामाने कारखाने चालत असत. सामान्यतः मालक स्वतः कारखान्यात काम करी व त्याबरोबर पुष्कळ वेळा शेतीही करी. यंत्रांचा उपयोग म्हणण्यासारखा करीत नसत. मोठमोठाले कारखाने म्हणजे काय हे बहुतेकांना माहीत नव्हते, असे म्हटले तरी चालेल. खेड्यापाड्यांच्या विस्ताराकडे पाहिले असता शहरे फारच थोडी होती व तीही लहानच असत. मोठमोठ्या जमीनदारांच्या तोडीचे व्यापारी अथवा पेढीवाले लंडन व ब्रिस्टलसारख्या एखाद दुसऱ्या मोठ्या बंदरातच आढळून येत. हा वेळपावेतो द्रव्य व योग्यता मिळण्याचे साधन शेतजमीनच असे व जमीनदारांचा वर्गच काय तो राज्यात अतिशय प्रबळ असे.

अठराव्या शतकाच्या मध्यभागानंतर ही स्थिती बदलू लागली. महत्त्वाच्या सर्व उद्योगधंद्यात यंत्रांचा जास्त जास्त उपयोग होऊ लागला. यांत्रिक शक्तीच्या उत्कर्षाबरोबरच मोठमोठाले कारखाने स्थापन झाले. मालाची पैदास जी कमी प्रमाणावर होत असे ही आता मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. कारखानदारांच्या कारखान्यात मजुरांची संख्या पूर्वीपेक्षा आता जास्त वाढली. कारखानदार स्वतः कारखान्यात काम करीनासे झाले; पण ते आपला सर्वकाळ आपल्या धंद्याची व्यवस्था लावण्यात घालवू लागले. वाफेच्या शक्तीचा जास्त उपयोग यंत्रचालनाकडे होऊ लागल्यापासून हे स्थित्यंतर जास्तच निदर्शनास येऊ लागले. वाफेचा उपयोग प्रचारात आल्याकारणाने सरपणाने अत्यंत समृद्ध देश तोच काय तो निर्विवाद श्रेष्ठ असे ठरले. आणि म्हणूनच सर्व जगातील कारखाने असलेले देशांमध्ये इंग्लंड देश अग्रगण्य होऊन बसला. कारखानदार व व्यापारी जमीनदारांइतके किंबहुना त्यांच्यापेक्षा जास्तच श्रीमंत होऊ लागले व मध्यस्थितील लोकांना पूर्वी कधीच न मिळालेले राजकीय व सामाजिक महत्त्व प्राप्त झाले.

कारखाने, खाणी व दर्यावरील व्यापार यांच्या प्रगतीमळे शहरात राहणारे व खेड्यापाड्यांतील राहणारे लोक यांच्यामधील लोकसंख्येचे प्रमाण एकसारखे बदलत गेले. या वेळच्या उद्योगधंद्याच्या स्थित्यनुरूप उत्पादक लोकांचे जथेच्याजथे एकत्र राहणे अवश्य असल्यामुळे खेड्यापाड्यांतील वस्ती जरी या वेळीही वाढत्या प्रमाणावर होती तरी तिची वाढ शहरातील लोकांच्या वाढीपेक्षा फारच कमी जलद होत होती. याप्रमाणे इंग्लंडच्या उत्तर भागात व स्कॉटलंडच्या सखल भागात मुख्यतः मोठमोठाली शहरे वसली गेली. या

स्थित्यंतरामुळे ध्यानात ठेवण्यासारख्या गोष्टींचाही उद्भव झाला.

खेड्यापाड्यांतून राहणाऱ्या लोकांपेक्षा मोठमोठ्या शहरातील लोकांचा कल राजकीय उलथापालथीकडे नेहमी जास्त असतो. ते लोक जास्त चाणाक्ष आणि विचक्षण असतात. त्यांच्यावर रूढीचा अंमल कमी असतो व ते भित्रे व रागीट असतात. इंग्लंडमध्ये तेथील मोठमोठाली शहरे नवीन वसली असल्यामुळे हा भेदभाव जास्तच दृढ झाला होता. या नवीन शहरांतून जुन्या संस्था व रूढी परंपरा मुळीच नव्हत्या व शेकडो वर्षे शहरांतील इतर लोकांच्या पुढारीपणाची सवय असलेला त्यात लोकांचा वर्गही नव्हता. या कारणाने लोकसत्तात्मक मतांची ती शहरे स्वभावतः केंद्रस्थाने बनून राहिली होती.

औद्योगिक क्रांतीमुळे ज्यांचे महत्त्व वाढलेले होते अशी थोडीशी शहरे, पार्लमेंट सभेची ती जुनी बरोज होती म्हणून, कॉमन्स सभेस सभासद निवडून पाठवीत असत; परंतु या नवीन शहरांपैकी बहुतेक शहरे पूर्वी जेव्हा सभासद निवडून पाठविण्याची व्यवस्था लावण्यात आली तेव्हा जर कदाचित अस्तित्वात असतील तर ती खेडी अथवा खेड्याहून लहान असल्यामुळे त्यांच्यातर्फे पार्लमेंटमध्ये सभासद निवडून जात नसत. लीडस् व मँचेस्टर यासारख्या शहरांना यद्यपि एडवर्डच्या कारकीर्दीपासून काहीसे महत्त्व असे तरीही निवडणुकीचा हक्क नव्हता. बुद्धी, हिंमत व महत्त्वाकांक्षा यांचे प्राचुर्य असणाऱ्या व्यापार व उद्योगधंदे करणाऱ्या भल्या मोठ्या जनसमूहास पार्लमेंट सभेतील आपला भाग, ज्या थोड्याशा बड्या कुटुंबांच्या हाती खिशात राहतील इतकी लहान गावे रगड आहेत त्याजपेक्षा कमी आहे असे आढळन आले. म्हणन पार्लमेंट सभेची सुधारणा करून घेण्याचा त्याने निश्चय केला. पार्लमेंटची सुधारणा ही औद्योगिक क्रांतीचा पहिला राजकीय परिणाम होय, असे मानता येईल.

स्थानिक सुधारणा ही या क्रांतीचा दुसरा राजकीय परिणाम होय. कारण या भरभराटीस येणाऱ्या शहरी स्थानिकस्वराज्याची व्यवस्था बरोबर नव्हती. हंड्रेड, पॅरिश, शहर अथवा बरोजसारख्या जन्या संस्था या जबरदस्त बंदरांच्या व कारखाने असणाऱ्या शहरांच्या गरजा भागविण्यास फारच अपुऱ्या झाल्या होत्या. शहरांत राहता येण्यास अत्यंत सामान्य सोईचीही व्यवस्था लावण्याच्या साधनांशिवाय या ठिकाणी असंख्य लोक गर्दागर्दीने एकत्र राहत असत. शहरांतील फरसबंदीची योग्य व्यवस्था, घरांच्या सांडपाण्याचे चांगले निकाल, गुन्ह्यांच्या बंदोबस्तास लागणारी पुरीशी पोलीस शिपायांची संख्या व सार्वजनिक करमणुकीसाठी राया व बाग यांचा बंदोबस्त राखणाऱ्या अधिकाऱ्यांची तजवीज केलेली नव्हती. ज्या शहरच्या भागात कारागीर व मजूर लोकांची वस्ती असे ते अडचणी, रोग व घाण यांनी पूर्ण भरलेले असत. आरंभी आपापल्याच शहराची सुधारणा करण्यासाठी त्या त्या शहरांचे लोक पार्लमेंटकडून आपापल्या शहरांची अंमलबजावणी नीट राहण्यासाठी विशेष कायदे मंजूर करून घेत असत; परंतु कालांतराने सर्व इंग्लंड देशातील स्थानिक व्यवस्थेची सुधारणा करणे अगत्याचे आहे, असे आढळून आले.

○○○

भाग १३ वा

चौथा जॉर्ज, चौथा विल्यम आणि व्हिक्टोरिया

इ.स. १८२०-१९०१

उपोद्घात - राज्यव्यवस्थापनेच्या संबंधाने झालेल्या फेरफारांचा विस्तार व संख्या यादृष्टीने पाहिले असता तिसऱ्या जॉर्जच्या मरणापासून आजतागाईत जो कालावधी होऊन गेला आहे तत्तुल्य दुसरा कालावधी इंग्लंडच्या इतिहासात क्वचितच सापडेल. कायद्याच्या अभिनव सुधारणांत तर नॉर्मन विजयाचा काल या कालाशी बरोबरी करू शकत नाही व धर्मसुधारणेचा कालही साम्यता पावत नाही. या काळाच्या सुधारणांचा रोख एकाच दिशेस आहे. लोकसत्तात्मक राज्यव्यवस्थेच्या मार्गातील या निरनिराळ्या पायऱ्याच आहेत. जावत्कालपावेतो इंग्लिशांच्या व फ्रेंचांच्या स्वातंत्र्याकरिता व साम्राज्याकरिता भांडण चालू होते तावत्कालपावेतो लोकसत्ताप्रवर्तक सर्व शक्ती कोंडून राहिल्या होत्या; परंतु वॉटरलू येथील विजयाने फ्रान्स बरोबर चालू असलेल्या युद्धाचा शेवट झाल्यावर या शक्ती बाहेर पडण्यास द्वार पाहू लागल्या. त्या वेळपासून आतापावेतो त्या शक्तींची क्रिया राज्यकारभार व्यवस्थेवर अव्याहत चालूच आहे.

प्राचीन धार्मिक विरोध नाहीसे झाल्याने आपापल्या दृष्टीने सांसारिक फायदे करून घेण्यासाठी लोकांना वाटेल त्या पक्षास मिळण्यास अधिक स्वातंत्र्य मिळाले आहे. औद्योगिक क्रांतीने खेड्यापाड्यांत जेथे रूढीपरंपरा व दंतकथा यांचे साम्राज्य असते तेथून बहुतेक लोकसंख्या काढून शहरात नेऊन भरली; पण शहरांत पाहिले तर जो तो आपापली स्थिती सुधारण्यात गुंतून गेलेला असतो. त्याच क्रांतीने धनोत्पादनार्थ मजुरांची बरीच मोठी संख्या एकत्र करून त्यांना एकमेकांस मदत करण्याकरिता, जास्त मजुरी मिळविण्याकरिता व राजकीय फेरबदल घडवून आणण्याकरिता, शिस्तवार खटपट करण्यास साहाय्य केले. लेखन-वाचनाचा सर्वत्र प्रसार, वृत्तपत्रांची विलक्षण संख्या व पक्ष बनविण्यात दाखविली जाणारी कुशलता, या सर्वांनी मिळून जास्त संख्यावाल्यांचे राजकीय महत्त्व वाढविले.

इतर देशांतील लोकसत्तात्मक मतांच्या प्रगतीचा परिणाम इंग्लंडमधील राजकीय मतांवर चांगलाच पुनरपि घडून आला.

या काळात घडलेल्या कायद्यांचा वृत्तान्त या एका भागात त्यांच्या केवळ स्थूल रूपापेक्षा जास्त विस्ताराने सांगणे अशक्य आहे. राज्यव्यवस्थेच्या संबंधाने जे मुख्य फेरफार याकाळी घडून आले त्यांचे वर्गीकरण खालील सदरांखाली करता येईल :

१. धार्मिक समतेची वाढ.

२. पार्लमेंटची सुधारणा.

३. कॅबिनेट राज्यव्यवस्थेची पुढची प्रगती व अंमलबजावणी खात्यातील फेरफार.

४. स्थानिक कारभाराची सुधारणा.

धार्मिक समतेची वाढ : फ्रान्स देशाबरोबर युद्ध सुरू होण्याच्या सुमारास कॅथोलिक व नॉनकन्फॉर्मिस्ट पंथीय लोकांच्या संबंधाने ईश्वरोपासना, मुलांचे शिक्षण व स्थावर मालमत्ता मिळविणे, या बाबतचे जे कायदेशीर प्रतिबंध होते ते सर्व दूर झाले होते, हे आपण पाहिलेच आहे. मोठ्या युद्धाच्या प्रारंभापासून तो तिसऱ्या जॉर्ज राजाच्या मृत्युपावेतो धार्मिक समतेची वाढ बहुतेक बंद झालेली होती. काही थोड्याशा सवलती दिल्या गेल्या होत्या खऱ्या. सन १८१३ यावर्षी आयर्लंड देशातील कॅथोलिक पंथीयांस पार्लमेंटची एकी होण्याच्या पूर्वी, आयर्लंड देशात ज्या जागा मुलकी खात्यात किंवा फौजखात्यात त्यांना मिळत असत त्या इंग्लंडमध्ये त्यांना मिळू लागल्या. सन १८१७ मध्ये फौज व आरमार खात्यातील अधिकाऱ्यांच्या शपथेच्या कायद्या अन्वये कॅथोलिक व नॉनकन्फॉर्मिस्टपंथीयांस फौजेत व आरमारात सर्व दर्जाच्या जागा मिळण्याची मोकळीक मिळाली; परंतु टेस्ट व कॉर्पोरेशन ॲक्टअन्वये दरबारात, म्युनिसिपल कचेरीत जागा मिळविण्यास पात्रता येण्यासाठी इंग्लंडच्या स्थापित धर्मविध्यनुरूप संस्कार करणे अवश्य असे, ते अद्याप कायमच होते. तथापि, इण्डेम्निटी ॲक्टअन्वये अतिक्रमण करणारांचे रक्षण करण्याचे असल्याने ते निरुपयोगाचे झालेले होते. प्रभुत्वाची शपथ घेणे अगत्याचे ठेविले असल्याने म्युनिसिपालीटीत अगर सरकारी खात्यात शिरणे कॅथोलिकपंथीयांना फारच जास्त प्रतिबंधक झालेले होते. पार्लमेंट सभेच्या दोन्हीही सभागृहांत बसण्यास कॅथोलिकपंथीयांना साधुपूजनाविरुद्ध ट्रान्ससबस्टॅन्शिएशनविरुद्ध प्रतिज्ञा कबूल करावी लागत असल्यामुळे फार अडचण पडत असे. कॅथोलिकपंथीयांना पार्लमेंटमध्ये सभासद निवडून देण्यासंबंधीचे हक्क आयर्लंडमध्ये प्राप्त झालेले होते; परंतु ग्रेट ब्रिटनमध्ये ती सवलत त्यास प्राप्त झाली नव्हती. अखेरीस, कॅथोलिक व नॉनकन्फॉर्मिस्ट या दोन्ही पंथांच्या लोकाना कायद्याच्या ज्या विलक्षणपणामुळे फार त्रास सोसावा लागत असे त्याचे स्पष्टीकरण तत्प्रतिकारक उपयांचे वर्णन करीताना केले जाईल.

सॅनमेंटल टेस्ट काढून टाकणे १८२८ - टेस्ट ॲक्ट व कॉर्पोरेशन ॲक्ट काढून टाकावेत अशा सूचना वारंवार होत होत्या व यासंबंधाची शेवटची सूचना होऊन चाळीस वर्षे लोटली

होती. तथापि, चौथ्या जॉर्जच्या कारकीर्दीत, फ्रेंच राज्यक्रांतीच्या परिणामामुळे व फॉक्सच्या हूडपणामुळे ज्या दुर्बलस्थितीस व्हिग पक्ष जाऊन पोहोचला होता तीतून तो वर डोके काढू लागला होता. त्या पक्षाचा पुढारी लॉर्ड जॉन रसेल याने सन १८२८ यावर्षी टेस्ट व कॉर्पोरेशन ॲक्टचा विचार करण्यासाठी एक मंडळी नेमावी असा मुद्दा धरून धार्मिक समतेबद्दलचा लढा पुनः उपस्थित केला. वेलिंग्टन पक्षीयांनी या गोष्टी विरुद्ध जरी थोडासा अडथळा आणला होता तरी प्रबळ बहुमत मिळवून त्याने आपली गोष्ट मान्य करवून घेतली. हे केल्यानंतर लवकरच सरकारी अधिकार मिळविण्यास पात्रता येण्यास इंग्लिश चर्चच्या विध्यनुरूप संस्कार करून घेण्याची जी आवश्यकता होती ती दूर करून टाकावी अशा आशयाचे त्याने एक बिल पुढे आणले. त्या बिलाचे दुसरे वाचन कोणीही अडथळा न करता पार पडले. कॉमन्स सभेतील टोरी पक्षाचा पुढारी मि. पील (नंतर सर रॉबर्ट पील) यास अंतःकरणपूर्वक धार्मिक स्वतंत्रता असावी असे वाटत असे. लॉर्ड जॉन रसेल याच्या बिलास अतिशयविरुद्ध जी मंडळी होती त्यांची, त्याने, जो कोणी इसम अधिकारारूढ व्हावयाचा त्याने मी माझ्या सत्तेचा, अधिकाराचा व वजनाचा उपयोग स्थापित धर्माविरुद्ध करणार नाही, अशी कबुलायत दिली म्हणजे बस आहे, अशी समजूत पाडिली. या कबुलायतीच्या नमुन्यात 'ख्रिस्तीधर्मानुरूप खऱ्या विश्वासाने' हे शब्द वाढविले असल्याने यहुदी लोकांना या कायद्याचा उपयोग झाला नाही. या कायद्या अन्वये नॉनकन्फॉर्मिस्टपंथीयांना म्युनिसिपालिटीतील जागा व सरकारी चाकरीतील बहुतेक जागा मिळविण्याची मोकळीक मिळाली.

कॅथोलिक मंडळीस नालायक ठरविणाऱ्या गोष्टींच्या दूरीकरणाचा कायदा : सन १८२९ इंग्लंड व आयर्लंड यांच्या पार्लमेंटचे एकीकरण झाल्यानंतर लागलेच रोमन कॅथोलिक पंथाच्या लोकांना राजकीय समान हक्क द्यावे असा पिटचा हेतू असल्याबद्दल आपणास माहीत आहे; परंतु केवळ राजाच्या निगरगट्ट हट्टीपणामुळे त्यांचा हेतू सिद्धीस गेला नाही. पिटने रोमन कॅथोलिक लोकांना ज्या आशा लावून ठेवल्या होत्या त्या ते विसरले नव्हते. इंग्लंड व स्कॉटलंडमधील कॅथोलिक लोक समतेचे हक्क जबरीने घेण्यास संख्येच्या मानाने फारच कमी होते; परंतु आयरिश कॅथोलिक लोक 'आमचे न ऐकल्यास आम्ही बंड करू' असा धाक घालण्याइतके पुष्कळ होते. डॅनियल ओकोनेल नावाच्या एका आयरिश कॅथोलिक बॅरिस्टरने कॅथोलिक असोसिएशन नावाच्या मंडळीची स्थापना केली होती व तीत त्याने आपल्या देशाच्या बहुतेक कॅथोलिक देशबांधवांना सामील करून घेतले होते. सर्व आयर्लंड देशभर कॅथोलिकांच्या सभा होत होत्या व कॅथोलिक वक्ते आवेशयुक्त भाषणे करीत होते. सन १८२८ च्या जुलै महिन्यात क्लेअर नावाच्या कौंटीमध्ये जी निवडणूक झाली त्यावेळी झालेल्या निकालावरून कॅथोलिक असोसिएशनच्या शक्तीची चांगलीच परीक्षा झाली. व्हेसे फिट्झेरल्ड नावाच इसम जरी प्रॉटेस्टंट मताचा होता तरी तो आपल्या देशबांधवांना प्रिय होता व त्याने वेलिंग्टनच्या ड्यूकचा कारभार सुरू असता बोर्ड ऑफ

ट्रेडचे अध्यक्षत्व पत्करले होते. या वरील कारणावरून त्याची पुनः निवडणूक होणे प्राप्त होते. ओकोनेल त्याचा प्रतिस्पर्धी म्हणून उभा राहिला. जर कदाचित ओकोनेल निवडून आला असता तरीही त्यास पार्लमेंटसभेत बसला आले नसते; परंतु त्याची खात्री होती, की निवडणुकीच्या निकालाने कॅथोलिक मंडळीची शक्ती चांगलीच अजमावली जाईल व निवडून येऊन पार्लमेंटमध्ये बसण्यास आपल्यास मज्जाव झाला म्हणजे आपले अंगीकृत कार्य जलद शेवटास जाण्यास हे एक चांगलेच कारण घडून येईल. विलक्षण मताधिक्य पडून त्याची पार्लमेंटमध्ये निवडणूक झाली. यावरून ड्यूक ऑफ वेलिंग्टन व त्याचे सल्लागार यास प्रतिबंध राखला असता कसकशा अडचणी येतील या दिसू लागल्या. आयर्लंडमधील एकंदर कॅथोलिक लोकसमूह बंड उभारण्याच्या अगदी बेतात आहे असे त्यास स्पष्ट समजून आले. ते बंड मोडण्यास ग्रेटब्रिटनच्या संयुक्त संघशक्तीचीच जरूर लागली असती; परंतु या बाबतीत ग्रेटब्रिटनमध्ये मतभेद होता. ड्यूक ऑफ वेलिंग्टन व सर रॉबर्ट पील यास एकतर आपण देशातील युद्धास तयार झाले पाहिजे, नाहीतर कॅथोलिक पक्षीयांपुढे हार तरी खाल्ली पाहिजे, असे वाटू लागले. त्यांनी हार खाण्याचा निश्चय केला; परंतु इतरांची या बाबतीत समजूत घालणे त्यास फार कष्टप्रद झाले. चौथा जॉर्ज राजा सवलतीची गोष्ट ऐकेना. बहुतेक बिशप मंडळी हट्ट धरून बसली होती. बडे लोकांपैकी पुष्कळांनी त्यांचेच अनुकरण केले. पीलच्या मताने इंग्लिश लोकांचा बहुजनसमाज याच पक्षाचा होता; परंतु व्हिग (प्रजापक्षीय) मंडळी मंत्रिमंडळाच्या मताची असल्याने कॉमन्ससभेत मंत्रिमंडळाच्या मतासच मोठे जबर मताधिक्य मिळाले. हे जबर मताधिक्य व वेलिंग्टनचे जातवचन यांच्या योगे लॉर्ड सभेतील प्रतिबंध नाहीसा झाला. नकार चालविण्याइतके राजाचे अंगी सामर्थ्य नव्हते व सामान्य जनसमूह निवडून आला नव्हता. याप्रमाणे रिलीफ बिल मंजूर झाले. या कायद्यान्वये ग्रेटब्रिटनमधील कॅथोलिक मंडळीस निवडणुकीचा हक्क मिळाला; ग्रेटब्रिटन व आयर्लंडमधील कॅथोलिक मंडळीस पार्लमेंटच्या दोन्हीही सभांत बसण्याची मोकळीक प्राप्त झाली. सर्व म्युनिसिपल कचेऱ्यांतील हुद्दे धार्मिक न्यायसभाखेरीज इतर सर्व न्यायकचेऱ्यांतील हुद्दे, रिजेंटचा हुद्दा, आयर्लंडच्या लॉर्ड लेफ्टनंटचा हुद्दा व इंग्लंडमधील व आयर्लंडमधील लॉर्ड चॅन्सेलरचा हुद्दा या तीन हुद्यांखेरीज इतर सर्व राजकीय हुद्दे त्या मंडळीस खुले झाले. या कायद्यात जेसूटपंथी व इतर काही पंथांच्या लोकांविरुद्ध जी काही कलमे घुसविलेली आहेत ती मुत्सद्दी मंडळीस घालणे अगत्याचे वाटले म्हणून त्यांनी घुसविलेली आहेत असे नव्हे, तर काही कट्टर प्रॉटेस्टंट पंथाच्या लोकांच्या भीतीचा उपशय व्हावा म्हणूनच ती घातलेली आहेत. कॅथोलिक पंथाच्या व प्रॉटेस्टंट पंथाच्या लोकांमध्ये खरोखरीची राजकीय समता करून देणाऱ्या कलमांचा या कायद्यात समावेश झालेला होता. हा कायदा एका पिढीने उशिराने मंजूर झाला होता व तोही बंडाच्या वगैरे धमकीच्या जोराने, एवढीच काय ती दुःखाची गोष्ट होती. याच्या योगे असंतोष कमी न होता आयरिश

कॅथोलिक मंडळीच्या मागण्या मात्र जास्त वाढल्या. विद्यमान सरकारावर शह चालवून सुधारणा घडवून आणण्यास अगदी सोपा मार्ग म्हणजे एखादा समाज अगर मंडळी स्थापन करावी म्हणजे झाले, हा भयंकर धडा मात्र हा कायदा मंजूर झाल्याने लोकांना मिळाला.

क्वेकर, मोरेव्हिअन व सेपॅरिटिस्टपंथी यांचा पार्लमेंट सभेत प्रवेश वगैरे : एखादा विशिष्ट कायद्याने क्वेकर, मोरेव्हिअन व सेपरेटिस्ट नावाच्या धर्मपंथातील लोकांना पार्लमेंट सभेत सभासद होण्यास प्रतिबंध नव्हता; परंतु ज्याअर्थी प्रत्येक पार्लमेंटच्या सभासदास स्थानापन्न होण्यापूर्वी राजनिष्ठेची शपथ घ्यावी लागत असे, त्याअर्थी शपथ घेण्याच्या संबंधात त्यांच्या अंतःकरणात वसत असलेली अडचणच काय ती त्यास प्रतिबंधक होत असे. सन १८३३ मध्ये नवीन (रिफॉर्मड्) सुधारलेल्या पार्लमेंटने मि. पीझ नावाच्या एका क्वेकर पंथाच्या इसमास नेहमीच्या शपथेऐवजी साधी प्रतिज्ञा करण्याची मोकळीक दिली. या कायद्याने व सन १८३७ च्या कायद्याने ज्या नॉनकन्फॉर्मिस्ट मंडळीची मते या संबंधात क्वेकरपंथीयांच्या मताप्रमाणेच होती त्यांना पार्लमेंट सभेमध्ये व ज्या कचेऱ्यांत शपथ घेण्याची जरूरी असे अशा कचेऱ्यातून शपथ न घेता केवळ साध्या प्रतिज्ञेनेच त्यांचा कार्यभाग व्हावा, अशी सवलत मिळाली. अगदी अलीकडे म्हणजे सन १८८८ मध्ये ही सवलत जे कोणी कोणतेही कारणाने असो 'आम्ही शपथेला मानत नाही' असे सांगतात त्यासदेखील मिळाली.

यहुदी मंडळींचा पार्लमेंट सभेत शिरकाव इत्यादी - ज्या धार्मिक समजुतींवरून कॅथोलिक व नॉनकन्फॉर्मिस्ट मतांच्या लोकांना अधिकार व हुद्दे यांच्या जागा मिळण्यास प्रतिबंध झालेला होता तीच कारणे अनायासे यहुदी लोकांनाही प्रतिबंधक झाली होती; परंतु या गोष्टी काढून टाकल्या असताही यहुदी लोकांना सत्तेच्या अगर अधिकाऱ्यांच्या जागा मिळत नसत. पार्लमेंट सभेमध्ये या वेळपर्यंतही त्यास मज्जावच होता. कारण राजनिष्ठेची शपथ घेणे ती बायबल हातात घेऊन घ्यावी लागत असे. राजदरबारी व म्युनिसिपल कचेऱ्यांतून सांस्कारिक परीक्षेच्याऐवजी जी प्रतिज्ञा घ्यावी लागत असे, तीत 'ख्रिस्ती धर्मानुरूप खया विश्वासाने' असे शब्द वापरावे लागत असल्यामुळे हा वेळपावेतो यहुदी लोकांना या खात्यात जागा मिळत नसत. सन १८३० मध्ये मिस्टर ग्रॅन्ट याने यहुदी लोकांच्या अडचणी दूर करणाऱ्या कायद्यांचा पहिला खर्डा पुढे आणला. दुसऱ्या वाचनाच्या वेळी तो खर्डा नामंजूर झाला व तदुत्तरच्या खड्यांचीही तीच दशा झाली. सन १८४५ मध्ये एक कायदा मंजूर होऊन यहुदी लोकांचा म्युनिसिपल कचेरीत शिरकाव झाला. सन १८४७ यावर्षी बॅरन डी रॉयस्चाइल्ड यास लंडन शहराने आपल्यातर्फे कॉमन्स सभेमध्ये निवडून पाठविले; परंतु त्यास वहिवाटीनुरूप शपथ घेता न आल्याने पार्लमेंट सभेमध्ये सभासद या नात्याने बसता आले नाही. सन १८५८ साली जुईश रिलीफ ॲक्ट पास झाल्याने पार्लमेंट सभेत यहुदी मंडळींचा शिरकाव झाला व सन १८६७ साली 'खिस्तिधर्मानुरूप खया विश्वासाने' हे शब्द

सर्व ठिकाणचे गाळून टाकण्यात आले.

विश्वविद्यालयातून नॉनकन्फॉर्मिस्ट पंथीयांना घेण्याची मोकळीक : समतेच्या तत्त्वानुरूप धर्मभेद मनात न आणता प्रगतीची अखेरची पायरी म्हटली म्हणजे इंग्लिश विश्वविद्यालयांचा पूर्ण फायदा करून घेण्यास कॅथोलिक व नॉनकन्फॉर्मिस्ट मंडळीस दिलेली सवलत ही होय. सन १५८१ सालापासून जे लोक ऑक्सफर्ड येथील मॅट्रिकची परीक्षा देत असत त्यांना एकोणचाळीस कलमांच्या यादीवर अनुमतिदर्शक सह्या कराव्या लागत असत. सन १६१६ पासून केम्ब्रिज येथेही हीच वहिवाट सुरू करण्यात आली होती; पण भेद इतकाच होता की जे लोक प्रवेशपरीक्षेस येत त्यांना ही गोष्ट करावी लागत नसून जे पदवीकरिता पुढे शिकत त्यास अगत्याची ती ठरविलेली होती. केम्ब्रिज येथे व ऑक्सफर्ड येथे ज्या पगारी विद्यार्थ्यांच्या जागा, फेलोंच्या जागा, तशाच अधिकाराच्या जागा व सन्मानाच्या जागा असत, त्या सर्व, इंग्लिश चर्च मतानुयायांनांच फक्त मिळत असत. पहिला सुधारणेचा कायदा पास झाल्यानंतर दोन वर्षांनी ही वस्तुस्थिती बदलण्याचा प्रथमचा यत्न झाला; परंतु सन १८५४ पावेतो नॉनकन्फॉर्मिस्ट मंडळीस ऑक्सफर्ड व केम्ब्रिज येथे पदव्या मिळविता आल्या नाहीत. सन १८७१ च्या युनिव्हर्सिटी टेस्ट ॲक्टप्रमाणे या दोन ठिकाणच्या विश्वविद्यालयातील काही थोड्या अधिकाराच्या जागा खेरीजकरून बाकी सर्व जागा मिळण्याची या दोन्ही पंथांतील लोकांना मोकळीक मिळाली.

प्रार्थनालयासंबंधात जबरीने द्यावे लागणारे कर कमी करण्यात आले, १८६८ : ज्या काळात इंग्लंडमध्ये केवळ एकच धर्मपंथ असे त्यावेळी पॅरिशमधील प्रार्थनालयांची सुस्थिती कायम राखण्याकरिता व दुरुस्तीकरिता प्रत्येक पॅरिशमध्ये कर वसूल करून घेण्याची वहिवाट होती. पॅरिशव्हेस्ट्री नावाची मंडळी हा कर बसविण्याची मंजुरी देत असे व चर्चवॉर्डन नावाचे अधिकारी तो वसूल करीत असत. पॅरिशमधील प्रार्थनालयाचा नॉनकन्फॉर्मिस्ट पंथाचे लोक उपयोग करून घेत नसल्याने त्याचे संबंधाचा कर भरण्याच्या विरुद्ध ते असत. शिवाय त्यास आपली विशिष्ट मंदिरेही कायम ठेवण्याचा खर्च सोसावा लागत असे. असंतोष वाढता वाढता दंडेलीपर्यंत मजल येऊन ठेपली. सर्व पक्षीयांचा संतोष राखून हा दोष नाहीसा करणाऱ्या काही सवलती योजून काढण्याचा सरकाराने फार वर्षे यत्न केला; परंतु तो सर्व व्यर्थ गेला. अखेर सन १८६८ मध्ये ग्लॅडस्टन प्रधान मंडळाने एक कायदा मंजूर करून घेऊन हा जबरदस्तीचा कर काढून टाकला व स्वतः होऊन कर देण्यास जे तयार असतील त्यांच्यापासून तो वसूल करून घेण्याबद्दलची तजवीज करून दिली.

आयरिश चर्चची नेमणुक व कारखाना कमी करण्यात येतो. १८६९ - एकी करणाऱ्या कायद्याने आयरिश चर्च कायम ठेवण्याचे अभिवचन दिलेले होते; परंतु त्याच्या अस्तित्वाची शाश्वती नव्हती. आयर्लंडमध्ये कॅथोलिक प्रार्थनालयांमधील देणग्या काढून प्रॉटेस्टंटपंथीय धर्मालयास त्या दिल्या ही गोष्ट आयर्लंडमधील जनसमूहाच्या मताधिक्याने न

होता आयर्लंडमध्ये जाऊन वसाहत करणाऱ्या लोकांच्या इच्छेनुरूपच घडून आलेली होती. आयर्लंडमधील बराचसा मोठा जनसमूह कट्टा कॅथोलिक पंथाचा होता, व प्रॉटेस्टंटपंथीयांनी आपल्या मतास त्यांना ओढून घेण्याचा सतत असा जबर यत्नही केला नाही. प्रॉटेस्टंटांची लहान पक्षाची मंडळीही चर्चच्या बचावानिमित्त एकत्र झाली नाही. कारण प्रॉटेस्टंटपंथीय बहुतेक आयर्लंडमधील वसाहतवाले लोक स्कॉच वंशाचे होते व ते आपल्या वाडवडिलांच्या प्रेसबिटेरियन पंथास धरून होते. या रीतीने आयर्लंडमधील स्थापित चर्चचा उपयोग काय तो आयर्लंडमधील थोड्याशा लोकांना होत होता. ज्याअर्थी, सर्व राज्याकरिता म्हणून ती संस्था होती व जुन्या धार्मिक देणग्याही तिला मिळालेल्या होत्या त्याअर्थी कामाच्या प्रमाणाने पाहिले असता धर्मोपदेशकांची संख्या व तिची मिळकत पुष्कळच जास्त होती. अठराव्या शतकात चालू असलेल्या पुष्कळ अनाचारांनी ती अगदी नासून गेली होती. एकोणिसाव्या शतकात तिची सुधारणा झाली होती; परंतु कोत्या पायावर तिची जी रचना होती ती कायमच होती. कॅथोलिक मंडळी तिचा द्वेष करीत असत व प्रेसबिटेरिअन मंडळीस ती आवडेनाशी होती. ज्यावेळी कॅथोलिक मंडळींच्या अडचणी दूर केल्या त्या वेळेसच प्रॉटेस्टंट पंथांच्या धर्मसंस्थेच्या उतरत्या कळेस खरोखर आयर्लंडमधील प्रारंभ झाला. सन १८६७ च्या रिफॉर्म ॲक्टच्या योगे प्रजापक्षीय मंत्रिमंडळाकडे कारभार आला त्या वेळेस त्यांचा धुरीण मि. ग्लॅडस्टन असून, त्याने आयर्लंडमधील कॅथोलिक मंडळीस सवलती देऊन अनुकूल करून घेण्याचा क्रम सुरू केला. सन १८६९ मध्ये आयरिशचर्चांचे खाते कमी करून ते नाहीसे करण्याचा कायदा पास केला. या प्रकारचा कायदा इंग्लंडच्या राज्यव्यवस्थापनेच्या इतिहासात एकच झालेला असल्याने तो फार स्मरणीय झालेला आहे. धार्मिक बड्या लोकांची संख्या चोहोंनी कमी करणारा तो होता म्हणूनही त्या कायद्याची ख्याती आहे.

कॅथोलिक व नॉनकन्फॉर्मिस्टपंथीयांची लग्ने व दफने : ज्यावेळी इंग्लंडमध्ये धार्मिक मतभेद झालेले नव्हते तशावेळी तेथे कॉमन लॉचा प्रचार सुरू झाला असल्याने लग्नसंबंधात व अंत्यविधीसंबंधीत भिन्न भिन्न मतवाद्यांच्या सोई कशा करावयाच्या या बाबत त्यात मुळीच निर्देश नव्हता. शिवाय त्या कायद्यान्वये जन्म, मृत्यू व लग्ने याबद्दलची नोंद सिव्हिल खात्यातून ठेवण्याची व्यवस्थाही झालेली नव्हती. प्रत्येक पॅरिश चर्चमध्ये बाप्तिस्मा दिल्याची, लग्नांची व दफनांची बारनिशी असे. जोपावेतो सर्व देशभर एकाच धर्ममताचे लोक होते, तोपावेतो असंतोषास जागाच नव्हती; परंतु जेव्हा धार्मिक मतभेद उत्पन्न झाले तेव्हा वरील व्यवस्था कॅथोलिक व नॉनकन्फॉर्मिस्ट मंडळीस फारच दुःसह झाली. इतर आई-बापांप्रमाणे आपल्या मुलांच्या जननाची कायदेशीर नोंद असावी, असे त्यास फारच वाटत होते; परंतु असे करून घेण्यासाठी त्यांना आपल्या मुलांच्या बाप्तिस्म्याचा संस्कार पॅरिश चर्चमध्ये जाऊन करावा लागे. सर्व कॅथोलिकपंथीय व काही नॉनकन्फॉर्मिस्ट यांचे मत अशा बाप्तिस्म्याच्या अगदी विरुद्ध होते. लग्नसंबंधाने नॉनकन्फॉर्मिस्ट मंडळीची

स्थिती अलीकडील काळात फारच त्रासद झालेली होती. सन १७५३ मध्ये लॉर्ड हार्डविकचा लग्नसंबंधीचा कायदा पास होईपावेतो पॅरिश चर्चव्यतिरिक्त अन्य कोठेही लग्न लावून घेण्यास त्यास प्रतिबंध नव्हता. या लग्नसंबंधीच्या कायद्याने असे ठरविले, की यहुदी व क्वेकरपंथी मंडळीखेरीजकरून इतरांचे लग्नविधी पॅरिश चर्चमध्येच झाले पाहिजेत. या कारणाने स्थापित धर्माच्या पाद्री मंडळीस त्यांना आवडो अथवा न आवडो, ज्यांचा अँग्लिकन विवाह पद्धतीविषयी मुळीच आदर नसे अशा लोकांचीही लग्ने लावावी लागत. दुसरे पॅरिशमधील पवित्र स्मशान भूमी, पॅरिशच्या पारसन नावाच्या अधिकाऱ्याच्या ताब्यात असत व तेथे जी प्रेते पुरली जात ती केवळ स्थापित धर्माच्या दफनाच्या संस्कार पद्धतीनेच पुरली जात; इतर संस्कार पद्धतीने ती पुरण्याची मनाई होती.

या वर निर्देश केलेल्या अडचणींपैकी पहिली व दुसरी या अडचणी सन १८३६ मध्ये लॉर्ड जॉन रसेल याने दूर केल्या. जनन, मरण आणि विवाह यांची नोंद सिव्हिल अधिकाऱ्यांनी ठेवावी, असा त्याने कायदा पसा करून घेतला. या रीतीने पॅरिशचर्चमध्ये जाऊन बाप्तिस्मा देण्याची आवश्यकता न राहता आई-बापांना आपल्या मुलांच्या जननाबद्दलचा कायदेशीर दाखला मिळू लागला. त्याने दुसराही एक कायदा पास करून घेतला. त्याच्या योगाने लग्न करू इच्छिणारास वाटेल त्या धर्म पद्धतीने अगर इच्छा असल्यास कोणत्याही धर्म पद्धतीचा अंगीकार न करता लग्नविधी करून घेण्यास मोकळीक मिळाली. तथापि, सिव्हिल अधिकाऱ्याकडे विवाहाबद्दलची नोंद असलीच पाहिजे, असे त्यात ठरविले होते. जेव्हा एखादे लग्न प्रार्थनालयात होत असे तेव्हा तेथील अधिकाऱ्यास, त्याबद्दलची नोंद, बारनिशी बुकात राहण्यासाठी, सिव्हिल अधिकाऱ्याकडे दाखला पाठवावा लागत असे.

हे घडून आल्यानंतर पुष्कळ वर्षेपावेतो दफनासंबंधीची नॉनकन्फॉर्मिस्टांची अडचण दूर झाली नव्हती. ज्याठिकाणी त्यांचा भरणा मोठा असे तेथे ते आपली स्मशानभूमी करीत असत व त्यांना पसंत असत अशा संस्कारांनी ते दफनाचा विधी उरकीत असत; परंतु पुष्कळशा ठिकाणी असा या मार्गाचा अवलंब करण्याइतका त्यांचा भरणा नसे. आयर्लंडमध्ये ज्याप्रमाणे त्यांच्या उपाध्यायांस पॅरिशच्या स्मशानभूमीत जाण्याची पूर्ण मोकळीक असे तशी ती आम्हास इंग्लंडमध्ये मिळाली पाहिजे, असे त्यांचे मागणे होते. सन १८८१ मध्ये दफनाच्या कायद्याची दुरुस्ती होऊन ही सवलत अखेरीस त्यांना मिळाली. या ॲक्टअन्वये ज्यांच्या घरचे मर्तिक असेल, त्यांना आपल्या पसंतीच्या ख्रिस्तीधर्मप्रणीत योग्य विधीने, अगर कोणताही धर्मसंस्कार न करता, दफनाचा विधी उरकून घ्यावा, अशी परवानगी मिळाली होती.

न्यायकचेऱ्यांतून पुरावा घेणे : कायद्याप्रमाणे म्हटले म्हणजे न्यायकचेऱ्यांतून जो पुरावा ग्रहण करण्यात येत असे तो फक्त ठराविक नियमानुसार शपथ घेऊन दिलेला असे तेवढाच असे या कायद्याप्रमाणे पाहिले असता जे कोणी नियमानुसार शपथ घेण्यास नाखुश असत

अगर कोणत्याही प्रकारची शपथ घेणे ज्यास मान्य असे अशा लोकांना कायद्याचे रक्षण नसे. क्वेकर, मोरेव्हिअन व सेपेरेंटिस्ट हे अपवादाखाली येऊन बराच काळ लोटला होता लॉर्ड डेनमनच्या सन १८३९ च्या कायद्यान्वये ज्या इसमाच्या मनास जो शपथ घेण्याचा प्रकार इष्ट असेल तद्रूरूप शपथ घेण्यास परवानगी मिळाली. सन १८६१ मध्ये जो कोणी इसम असे सांगे की माझ्या धर्मसमजुतीप्रमाणे शपथ घेणे धर्मविरुद्ध आहे, त्यास फौजदारी खटल्यात शपथ घेण्याऐवजी प्रतिज्ञापूर्वक कबूल जबाब देण्याची परवानगी मिळाली. ज्याचा निर्देश केलेला आहे त्या सन १८८८ च्या कायद्याप्रमाणे कोणीही साक्षीदाराने शपथबिपथ मी काही समजत नाही असे सांगितले असता त्यास शपथ न देता त्याचा प्रतिज्ञालेख करून घेण्यास परवानगी मिळाली.

२. पार्लमेंटची सुधारणा - ज्या पार्लमेंटच्या निवडणुकीच्या पद्धतीतील दोष व व्यंगे यांचा निर्देश पूर्वीच होऊन गेलेला आहे ती चौथ्या जॉर्जच्या मरणापावेतो फारच वाढत गेलेली होती. ही व्यंगे व दोष दोन मुख्य सदरांखाली येतात (१) जागांची वाटणी, (२) मते देणाऱ्यांची योग्यता.

(१) जागांची वाटणी - पहिल्या एडवर्डच्या राज्यापासून प्रत्येक कौंटी व प्रत्येक बरो (शहर) पार्लमेंट सभेला दोन दोन सभासद पाठवीत असे. या नियमाला अपवाद फार थोडे होते. जेव्हा वेल्सातील कौंटी व बरो यांना निवडणुकीचा हक्क मिळाला तेव्हा त्यांचे क्षेत्रफळ व लोकसंख्या ही अल्प असल्याने त्यांनी एकेक सभासद प्रत्येकी पाठवावा, असा ठराव झाला. लंडन शहराचा विस्तार व लोकसंख्या व महत्त्वही मोठे असल्याने बऱ्याच काळापासून त्या शहरातर्फे चार सभासद निवडले जात. असले अपवाद नियमाला क्वचितच गौणता आणत. कौंटीच्या विस्तारात विशेष भेद असूनही निवडून जाणाऱ्या सभासदांची संख्या एकच राहत असल्याने नियमाची गैरशिस्तता दिसून येई; परंतु बरोजच्या संबंधाने पाहिले असता हा गैरशिस्तपणा फारच दिसण्यात येत असे. या गैरशिस्तपणाचा कळस कौंटीच्या सभासदांचा संख्येच्या मानाने बरोच्या सभासदांचे जे जास्त प्रमाण असे त्यात होता.

राजकृतीच्या योगाने बरोजच्या निवडणुकीतील दोष कमी न होता ते जास्तच वाढले. पहिल्या एड्वर्डच्या काळापासून काही थोडी यःकश्चित जी बरोज होती त्यांचा सभासद निवडून पाठविण्याचा हक्क नाहीसा झाला होता; परंतु पुष्कळ भिकार बरोज नवीन करण्यात आली होती. आठव्या हेन्रीच्या राज्यरोहणापासून तो दुसऱ्या चार्लस राजाच्या मरणापावेतोच्या कालावधीत कॉमन्स सभेत १८० नवीन बरोजचे सभासद आले. नवीन बरोजपैकी काही थोड्या महत्त्वाची ठिकाणे होती. बाकीची सामान्य खेडी होती व राजाचे वजन वाढविण्यासाठीच सभासद निवडून पाठविण्याचा त्यांना अधिकार दिलेला होता. यामधील कालावधीत जुनी बरोज जी होती ती उत्कर्षापकर्षाच्या स्थित्यंतरांतून गेलेली

होती. त्यापैकी काहींची मोठाली शहरे बनली. काही खरोखर खालावलेली नव्हती; परंतु इतरत्र लोकवस्ती व संपत्ती यांचा उत्कर्ष झाल्याने त्यांचे महत्त्व कमी झाले होते, काही अगदी विपन्नदशेस येऊन तेथील धंदे रोजगार बसून गेलेले होते व काहींच्या भागांवरून समुद्राचे पाणी फिरून ती अर्धवट नाशही पावली होती. एक दोघांचे तर तेथील घरांचे निराकार अवशेषांशिवाय काही एक दिसून येण्यासारखे राहिले नव्हते. याच अवधीत पुष्कळ खेड्यांची शहरे बनली होती. औद्योगिक क्रांतीस सरुवात झाल्यापासन ज्याठिकाणी पर्वी धनगर व शिकारराखे यांचीच वस्ती असे अशा दूरदूरच्या दरीकन्दरात व एकीकडील सागरतीरावर भर वस्तीची शहरे अस्तित्वात आली. या फेरबदलांच्या योगाने बरोजची निवडणूक इंग्लंडमधील शहरांच्या वतीने व्हावी तशी वास्तविक होत नसे.

ज्या कारणांनी इंग्लंडमधील निवडणुकीत फरक पडलेले होते त्याच कारणांनी स्कॉटलंड व आयर्लंडमधील निवडणुकीतही जास्तच फेरबदल झालेले होते. या राज्यात तर इंग्लंडपेक्षाही जास्तच असा निवडणुकीतील गैरशिस्तपणा घडून आलेल्या होता.

(२) मतदारांची योग्यता - मत देण्याच्या योग्यतेसंबंधात सामान्यतः फेरबदल झालेला नव्हता; पण आधुनिक इंग्लंड देशाच्या स्थितीत ती अयोग्य होती.

कौंटीतील मत देण्याची योग्यता - कौंटीमध्ये ज्या वतनदाराकडे ४०शिलिंग साऱ्याची जमीन असे त्याला पार्लमेंटाच्या निवडणुकीच्या वेळी मत देण्याचा अधिकार असे. नाण्याची किंमत कमी झाल्यामुळे ही मत देण्याची योग्यता त्याहीपेक्षा कमी झाली, बहुतेक वतनदारांकडे जो अधिकार आला; परंतु अठराव्या शतकात जमिनीच्या मिळकती मोठमोठ्या वाढून गेल्याकारणाने वतनदारांची संख्या फारच कमी झाली ती इतकी की कौंटीमध्ये लोकसंख्येच्या मानाने वतनदार फारच अल्प प्रमाणाने होते. या अवधीत खेड्यांतून राहणारे इतर वर्गाचे लोक, संख्येने व संपत्तीने वाढले होते; परंतु ते निवडणुकीच्या भानगडीत पडत नसत. कॉपीहोल्डर नावाचे दस्तदारही कौंटीतून असत. असा हा दस्तदार जमिनीचा मालक असतो; परंतु त्यास जमीनदार मोकाशास काही देणे द्यावे लागत असून, चाकरीही बजवावी लागत असे; या गोष्टी वतनदारास कराव्या लागत नसत. वर्षावर्षाच्या कबुलायतीने अथवा जास्त मुदतीच्या कबुलायतीने जमीन लावून घेऊन लागवड करणारे शेतकरी मंडळीचाही एक वर्ग होता व त्या वर्गाकडे यावेळी इंग्लंडमधील सुमारे नऊ दशांश जमीन लागवडीला होती. शिवाय मजुरीने काम करणारे मजूरदारही असत.

बरोमधील मत देण्याची योग्यता : शहरातून मत देणाऱ्यांना जी योग्यता लागत असे ती एक प्रकारची नव्हती व तीत विलक्षण विचित्रपणा होता. सामान्य कायद्याने त्याच्या योग्यतेचा निर्देश झालेला नसल्याने गावच्या ऐतिहासिक महत्त्वानुरूप व गावांनी मिळविलेल्या सनदानुरूप ती असे. काही काही शहरांतून प्रत्येक घरमालकास मत देण्याचा अधिकार असे व इतर शहरांत टाऊन कौन्सिलच्या सभासदांशिवाय इतरांना मत देण्याचा

अधिकार नव्हता. टाऊन कौन्सिल ही एक निवडक मंडळी असून, ती आपल्या पद्धती इतर काही शहरांतून सुरू होत्या. बरोमधील मत देण्याच्या संबंधाने बरेच फेरफार होऊन ट्यूडर घराण्यातील राजे राज्यारूढ झाल्यापासून तिला आळा बसला होता. या संबंधाने तिसरे एडवर्डचे कारकीर्दीपेक्षा तिसऱ्या जॉर्जच्या कारकीर्दीत उदारता फारच कमी होती. अलीकडील काळात काही बरोंमध्ये विलक्षण लोकवस्तीची वाढ झालेली असल्याने ही व्यंगे विशेषच दृष्टोत्पत्तीस येऊ लागली होती.

निवडणुकीच्या व्यंगांचे परिणाम - वर निर्दिष्ट केलेल्या व्यंगांचे परिणाम मुख्यत्वेकरून दोन प्रकारचे होते. पहिला परिणाम असा होता, की जमिनीच्या मालकांना जास्त सत्ता प्राप्त झाली. जमिनीच्या मालकांचे जमिनीची लागवड करणारांवर असलेल्या वजनाने ही सत्ता प्राप्त झाली होती असे नाही, कारण त्याकाळी लागवड करणारा कितीही जमीन लागवड करीत असला तरी त्यास मत देण्याचा अधिकार नसे. मोठमोठ्या जमीनदारांच्या हाती असलेला अंमल बरोजमधील निवडणुकीच्या वेळी दिसून येई. ड्यूक ऑफ रटलंड हा सहा सभासद, लॉर्ड लॉन्सडेल नऊ व नारफोकचा ड्यूक तर अकरांपेक्षा कमी नाहीत इतके सभासद निवडून पाठवीत असे, असे म्हणतात. दुसरा परिणाम असा झाला होता, की खेड्यातील निवडणुकीचा मोठासा भाग राजसत्तेखाली म्हणजे अर्थात् मंत्रिमंडळाच्या सत्तेखाली आला होता. ही गोष्ट इतक्या स्तराला पोहोचली होती, की जेव्हा पहिल्या रिफार्म बिलाला कायद्याचे स्वरूप आले तेव्हा पुष्कळ समंजस पुरुषांना भीती वाटत होती, की कोणतेही प्रधान मंडळ कॉमन्स सभेवर आपला अधिकार चालवू शकणार नाही व त्यास आपले मताधिक्य ठेवता येणार नाही.

पार्लमेंटसभेची सुधारणा घडवून आणणारी प्रवर्तक कारणे - शांततेच्या काळात ही विलक्षण निवडणुकीची तऱ्हा किती काळ टिकली असती हे सांगणे कठीण आहे. वाटले होते तितके यापासून झालेले परिणाम दुःखावह झाले नाहीत. बिनसुधारलेली पार्लमेंटसभा असताही जेव्हा जेव्हा लोकसमुदाय खळबळून जागा होई व त्याची चळवळ खोलवर जाई तेव्हा लोकसमुदाय आपल्या इच्छेप्रमाणे गोष्ट घडवून आणीत असे. शांततेच्या काळात पार्लमेंट सभेवर अशा प्रकारे अमर्याद अधिकार चालविणाऱ्यांच्या अंगी शहाणपण व परिमितपणा असल्याकारणाने केवळ झोटिंगबादशाहीच चालवावी असे त्यांच्या मनातही आले नाही; परंतु तिसरा जॉर्ज राजा राज्य चालवीत असता या संबंधांत फेरफार लवकरच होतील, अशी चिन्हे दिसू लागली होती. औद्योगिक क्रांतीने बरीचशी लोकवस्ती निर्माण झाली असून, तिच्यातर्फे मुखत्यार मुळीच निवडून येत नव्हते. पुष्कळ काळपावेतो चाललेले युद्ध, वाईट पिके आणि अविचाराने केलेला गरिबांसंबंधाचा कायदा यांच्यायोगे या लोकांना इतके दुःख सोसावे लागले, की ते अखेरीस संतापले व बेफाम झाले. लोकसत्तात्मक मतवाल्यांच्या संस्था व मते यांचा परिणाम लोकांवर होऊ लागला होता. आमच्या

पार्लमेंटाच्या पद्धतीत क्रांती घडून आणण्यास जी तयारी पाहिजे होती ती पूर्ण झालेली होती.

सन १८३२ चा सुधारणेचा कायदा - सन १८३० मध्ये चौथा जॉर्ज राजा मृत्युमुखी पडल्यामुळे नवीन निवडणुकीला कारण घडून आले व त्या वर्षाच्या फ्रान्समधील राज्यक्रांतीमुळे उत्तेजन मिळून कॉमन्स सभेत प्रजापक्षीय सभासद जास्त निवडून आले. राजपक्षीय सरकारी अधिकारी मंडळास राजीनामा द्यावा लागून अर्ल ग्रे व पार्लमेंटच्या सुधारणेबद्दलचा अनुवाद करणारी मंडळी अधिकारारूढ झाली. सन १८३१ च्या वसंत ऋतूत त्यांनी सुधारणेच्या कायद्याचा मसुदा पुढे आणला. कॉमन्स सभेत त्याचे दुसरे वाचनही झाले; परंतु कमिटीत गेल्यावर तो एका बाजूस ठेवावा लागला. पार्लमेंट सभा बरखास्त झाली व मतदार सुधारकांना अनुकूल झाले. नवीन सुधारणेच्या कायद्याचा खर्डा कॉमन्स सभेत पसार झाला; परंतु लॉर्डच्या सभेत त्यास अर्धचंद्र मिळाला. या कारणाने राज्याच्या पुष्कळ भागात बरीचशी अस्वस्थता व धांदल उत्पन्न झाली. पुढील बैठकीच्या वेळी तिसरा सुधारणेच्या कायद्याचा मसुदा पसार झाला. कारण जबर शह लावल्यामुळे बऱ्याचशा बड्या लोकांना आपली प्रतिकूलता काढून घ्यावी लागली.

सन १८३२ च्या सुधारणेच्या कायद्याची कलमे - सन १८३२ च्या कायद्यान्वये २००० पेक्षा कमी लोकवस्तीच्या ५६ शहरांचा (बरोजचा) निवडणुकीचा हक्क अजिबात काढून घेण्यात आला व ४००० पेक्षा कमी वस्तीच्या ३० बरोजचा प्रत्येकी एक एक सभासद कमी करण्यात आला. मेलकोंबी रेजिस व वेमाऊथ या दोन्ही ठिकाणांहून एकंदरीने चार सभासद निवडून जास्त असत, त्यातील दोन कमी केले. याप्रमाणे १४३ सभासदांच्या जागा खाली नमूद केल्याप्रमाणे भरून काढण्यात आल्या. लंडनचे विभाग अथवा काही दुसरी मोठाली शहरे मिळून नव्या २२ बरोस प्रत्येकी दोन दोन सभासद पाठविण्याची सवलत मिळाली, कमी महत्त्वाच्या २१ शहरांतून प्रत्येकातर्फे एकेक सभासद यावा असे ठरले आणि कौंटीतर्फे जादा ६५ सभासद निवडन येण्याची योजना झाली. राहिलेल्या तेरा जागांपैकी ८ स्कॉटलंडच्या वाट्यास आल्या व ५ आयर्लंडच्या. कौंटीमध्ये निवडणुकींचा हक्क दस्ताने शेतीधारण करणारे, कबुलायतीने शेती वाहणारे व ५० पौंड अगर त्यापेक्षा जास्त सारा भरणारे, यास मिळाला. बरोजमध्ये दहा पौंड अगर त्यापेक्षा जास्त कर भरणारे घरमालक यास निवडणुकीचा हक्क मिळाला व त्यांचे बाकीचे इतर स्थानिक निवडणुकींचे हक्क बहुतेक नाहीसे झाले. स्कॉटलंड व आयर्लंड याकरिता निराळे सुधारणेचे कायदे पसार झाले.

सन १८३२ व्या सुधारणेच्या कायद्याचे परिणाम.

(१) राजाच्या व जमीनदारांच्या महत्त्वाचा ऱ्हास : नामशेष झालेली बरोज कमी करून व मोठमोठ्या भरभराटीच्या नवीन शहरांस निवडणुकीचे हक्क देऊन, तसेच शहरांतून घरवाल्यांचे निवडणुकीचे हक्क स्थापित करून सन १८३२ च्या सुधारणेच्या कायद्याने मंत्रिमंडळाचे पार्लमेंट सभेत जे वजन होते ते कमी केले. तशीच त्याने जमीनदारांची

पार्लमेंटमधील पुष्कळच सत्ता कमी केली. कौंटीमधील निवडणुकीत भर पडल्याने जी शेतकरी कुळे पूर्वी जमीनदारांच्या अगदी कह्यात असत त्यास निवडणुकीचा नवीन हक्क मिळाला व त्यामुळे जमिनीच्या मालकांचे महत्त्व किंचित अंशाने वाढले ही गोष्ट खरी आहे. या मोबदल्यात नुकसानी भरून येण्याइतका नफा झाला नाही. रिफॉर्म ॲक्ट (सुधारणेचा कायदा) पसार होऊन गेल्यावर पुढील पस्तीस वर्षांत औद्योगिक क्रांतीने महत्त्वास चढविलेल्या मध्यम वर्गाच्या हाती मुख्यत्वे करून सत्ता होती.

(२) कॉमन्स सभा व लॉर्ड सभा यांच्यातील मतविरोध - मध्यमवर्गीय लोकांचे महत्त्व कॉमन्स सभेत होते व जमीन धारण करणारांचे महत्त्व लॉर्डींच्या सभेत होते, या कारणांनी या दोन्ही सभांत वरचेवर सार्वजनिक कामांच्या धोरणासंबंधाने मतविरोध होत असे. या तंट्यात लॉर्डच्या सभेला हार खावी लागली. लोकसत्तात्मक क्रांतीच्या युगात निवडून आलेल्या सभासदांच्या सभेपेक्षा वंशपरंपरागत सभासदत्वाचा हक्क असणाऱ्यांची अवश्यमेव फार दुर्बळता असणारच. भयंकर विरोध उत्पन्न होण्याच्या वेळी बडे लोक जी नेहमी माघार घेत, तिचे सर्व श्रेय ड्यूक ऑफ वेलिंग्टनाकडे आहे. राजकीय सत्तेच्या तराजूचा कल फिरलेला आहे ही गोष्ट त्याच्या पूर्ण लक्षात आलेली होती व धैर्य आणि राजनिष्ठा याबद्दल त्याची इतकी ख्याती असे, की न रुचणाऱ्या गोष्टीही प्रसंगविशेषी कबूल करविण्यात तो आपल्या अनुयायांवर सक्ती चालवीत असे.

(३) सुधारलेल्या पार्लमेंटचा नेमस्तपणा - पुष्कळ सावध राहणाऱ्या पुरुषांना भीती होती त्याप्रमाणे सन १८३२ च्या सुधारणेच्या कायद्याचा परिणाम विलक्षण जोराची क्रांती घडवून आणण्यात झाला नाही. त्यायोगे मजूर वर्गापैकी म्हणण्यासारख्या भागाला निवडणुकीचा हक्क मिळाला नाही. पूर्वकाळी ज्या बरोजमधील प्रत्येक घरवाल्यास निवडणुकीचा हक्क होता त्यामध्ये या कायद्यान्वये पुष्कळ मजूरदार लोक आपल्या मत देण्याच्या हक्कास मकले. या कायद्याने ज्या नवीन लोकांना निवडणुकीत अधिकार मिळाले होते ते बहुतेक संपन्न स्थितीत होते. त्यांची इच्छा पुष्कळ गोष्टीत बदल व्हावेत अशी होती; परंतु ते बेबंदशाही विरुद्ध होते. नवीन सुधारलेल्या पार्लमेंटसभेने पुराणप्रियता कायम राखल्याने उत्सुक सुधारकांची निराशा झाली. या नवीन पार्लमेंटने मोठासा लक्षात येण्याजोगा. अनियंत्रित व्यापाराची संस्थापना हा फेरबदल केला.

सन १८६७ च्या सुधारणेच्या कायद्यास घडवून आणणारी कारणे -सन १८३२ चा सुधारणेचा कायदा झाल्यानंतर कित्येक वर्षे पावेतो पार्लमेंटच्या सुधारणेच्या विषयाची अगदी विस्मृती पडली होती; परंतु तो कायदा घडवून आणणारी कारणे या वेळीही अस्तित्वात होती. औद्योगिक क्रांतीची प्रगती चालूच होती व १८३२ पासूनच या देशात आगगाडीचे मार्ग तयार करण्यात आलेले आहेत. सन १८४० ते १८६० यादरम्यान अनियंत्रित व्यापाराचे प्रस्थापन झाले व त्यामुळे शेतीपासून होणारे उत्पन्न कमी झाले खरे; पण व्यापार व कारखाने

यास विलक्षण उत्तेजन आले. खेड्यापाड्यांतील लोकवस्ती अगदी वाढेनाशी झाली; परंतु शहरे एकसारखी वाढतच चालली व खाणी व कारखाने, ज्या खेड्यांत होती अशा खेड्यांनी पुष्कळ प्रदेश व्यापून टाकला. याप्रमाणे ज्या राष्ट्राच्या भागाचा निर्वाह जमिनीच्या उत्पन्नाच्या योगाने होत होता तो ऱ्हास पावत चालला व जो भाग, व्यापाराने व कारखान्यांनी आपला निर्वाह चालवीत होता त्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत चालला.

त्याच सुमारास कारागीर वर्गास राजकीय सत्ता आपल्याकडे असावी अशी इच्छा झाली. शिक्षणाची मूलतत्त्वे अधिक विस्तृततेने प्रसार पावली. सुखासंबंधाची लोकांची इयत्ता फारच वाढली; लोकसत्तात्मकत्वाच्या कल्पनांची सर्वत्र प्रगती चालू होती. त्या कल्पनांनी सन १८४८ त सर्व खंडभर बहुतेक जिकडे तिकडे क्रांती घडवून आणली. इंग्लंडमध्ये चार्टिस्ट (सनदेचा अभिमान बाळगणारे) चळवळीमध्ये त्यास वाव मिळाला. या चळवळीचा हेतू लोकांच्या सनदेतील जे मुख्य पाच मुद्दे म्हणजे सर्व लोकांना मत देण्याचा अधिकार, चिठ्यांवर नावे लिहून मत देणे, वार्षिक पार्लमेंट सभा, प्रांतवार सारख्या निवडणुकींच्या समतेची स्थिती आणि सभासदांचे पगार, हे मिळविण्याचा होता. आपत्काळामुळे प्राप्त झालेली विपन्नावस्था चार्टिस्ट मंडळीस उत्तेजन येण्यास पुष्कळ कारणीभूत झाली व जेव्हा सुबत्ता झाली तेव्हा त्या मतवाद्यांचा जोर कमी झाला. तथापि, लोकसत्तात्मक मते वाढ पावत होतीच व चार्टिस्ट मंडळीचा नाश झाला तेव्हा जुलमाचे भय नाहीसे झाल्याने तर त्यांची वाढ फारच जोराची झाली.

सन १८३२ च्या सुधारणेच्या कायद्याने शेकडो वर्षांची वहिवाट मोडून टाकली होती व त्यामुळे लोक निवडणुकीतील गोंधळात हात घालण्यास नाखुश असत. लोकमान्यता संपादन करण्यास सुधारणेची एखादी नवीन पद्धत पुढे आणणे हे उत्तम साधनांपैकी एक होऊन बसले होते. सन १८३२ चा सुधारणेचा कायदा अमलात येण्यापूर्वीच्या पिढीत व्हिग पक्ष हा क्वचितच सामर्थ्यवान होता; पण हा कायदा अंमलात आल्यानंतर एक पिढी पावेतो व्हिग पक्षास सामर्थ्य नाही असे विरळाच घडून येत होते. या इष्ट साधनांवर नजर देऊन पार्लमेंटच्या सुधारणेचा प्रश्न पुनः एकवार लॉर्ड जॉन रसेल याने पुढे आणला; परंतु काही काळपर्यंत वादविवाद होऊन त्यापासून काही निष्पन्न झाले नाही.

सन १८६७ चा लोकनियुक्ततेचा कायदा - हा कायदा या जातीचा दुसरा असून, जनतेचा पाठिंबा मिळविण्यासाठी लिबरल व कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षांच्या झगड्याने त्याला सांप्रतचे स्वरूप आलेले होते. लॉर्ड डर्बीच्या प्रधान मंडळातील एक सभासद मि. डिझराइली याने तो पास करविला. त्याच्या योगे जागांची थोडी फेरबदली झाली. इंग्लिश बरोजच्या ३३ जागा काढून त्या इंग्लिश कौंटी, लंडन युनिव्हर्सिटी व स्कॉटलंड यात अनुक्रमे पंचवीस, एक व सात याप्रमाणे वाटून देण्यात आल्या. या कायद्याने काही थोड्या मोठ्या शहरांस प्रत्येकी तीन सभासद पाठवावेत, असा हक्क मिळाला. याच्या योगे असे ठरले की, ज्या कौंटीतर्फे

अगर बरोतर्फे तीन सभासद येत असत. त्यातील निवडणाऱ्यांनी तिघा उमेदवारांना मत न देता दोघांपेक्षा जास्त जणास मत देऊ नये. मत देण्याच्या योग्यतेबद्दलही त्यात पुष्कळ महत्त्वाचे फेरफार झालेले आहेत. कौंटीमध्ये दरसाल १२ पौंड जमिनीचा कर भरणाऱ्या सर्व कुळांना हा निवडणुकीचा हक्क प्राप्त झाला. वस्तुतः हा हक्क सर्व इंग्लिश शेतकरी कुळांना मिळाला. शहरांत हर कोणाही घरंदाज गृहस्थास व दरसाला १० पौंड भाडे भरणाऱ्या भाडेकऱ्यांसही हा निवडणुकीचा अधिकार प्राप्त झाला. याप्रमाणे शहरातील मोठ्या कुशल कारागीर वर्गास निवडणुकीचा हक्क दिला गेला. पहिल्या रिफॉर्म ॲक्ट अन्वये मोठ्या शहरांतील मध्यम वर्गातील लोकांना जे राजकीय महत्त्व मिळाले होते ते बहुतेक नाहीसे झाले. सन १८६८ मध्ये पसार झालेल्या निरनिराळ्या कायद्यांनी स्कॉटलंडमधील व आयर्लंडमधील बरोजमधील घरंदाज लोकांना निवडणुकीचे हक्क मिळाले.

सन १८८४ चा लोकनियुक्ततेचा कायदा व १८८५ चा जागांच्या पुनः वाटणीचा कायदा : सन १८६७ चा लोकनियुक्ततेचा कायदा अमलात येण्यास जी कारणे झाली त्यासारखी कारणे घडून अलीकडील काळातही मोठमोठाले फेरफार घडून आले आहेत. सन १८८४ च्या कायद्याने पार्लमेंट सभेत सभासद निवडून पाठविण्यास लागणारे योग्यतेच्या बाबतीत पुष्कळ सुधारणा घडवून आणल्या व त्यापुढील साली झालेल्या कायद्याने जागांच्या वाटणीतही पुष्कळ फेरबदल झाले.

लोकनियुक्ततेचा कायदा, सन १८८४ - या ॲक्टने तीनही राज्य भागात लोकांच्या निवडणुकीच्या हक्कावर परिणाम घडून आला. या कायद्याने सन १८६७ च्या कायद्यान्वये शहरातून घरमालकांना व भाडेकांना जे निवडणुकीचे हक्क प्राप्त झाले होते ते हक्क कौंटीना मिळाले. या रीतीने हे हक्क इंग्लंड व स्कॉटलंडामधील शेतकाम करणाऱ्या सर्व मजुरांना कधीच व आयर्लंडमधील लहान लहान शेतकऱ्यांसही प्राप्त झाले होते. यादृष्टीने पाहू गेले असता या कायद्याची इतर कलमे इतक्या महत्त्वाची नव्हती; परंतु कौंटीमध्ये घरांच्या मालकास व भाडेकऱ्यास या कायद्यान्वये जो हक्क मिळाला ती एक क्रांतीच होऊन गेली.

जागांच्या पुनःवाटणीचा कायदा, सन १८८५ : या कायद्याची कलमे इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड या तिन्ही प्रदेशांत लागू झालेली आहेत. लोकवस्तीचा आकडा १५००० पेक्षा कमी असलेल्या सर्व शहरांचा स्वतंत्र लोकनियुक्तीचा हक्क या कायद्याने काढून घेतला व ५०००० पेक्षा कमी वस्तीची शहरे प्रत्येकी जे सभासद निवडून पाठवीत असत त्यापैकी एकेका शहरातून एकेक सभासद कमी करून टाकला. लंडन शहरातर्फेचे दोन सभासद कमी केले. ज्या शहरांची वस्ती ५०००० पासून १६५००० पावेतो होती त्यांच्यातर्फे दोन सभासद मामुली बरहुकूम कायम ठेवले. इंग्लिश कौंटीपैकी सर्वांत लहान जी रटलंडची कौंटी तिच्या सभासदांपैकी एक कमी केला. याप्रमाणे कमी केलेल्या जागांची वाटणी नवीन पद्धतीनुसार केली. स्थानिक मंडळयांस मग त्या केवढ्याही असोत, त्यांच्या

आकारमानाकडे लक्ष न देता समान निवडणुकीची सवलत देण्यात यावी हे मध्ययुगात सुरू असलेले व सांप्रतच्या काळात पुष्कळ अंशी ग्राह्य झालेले तत्त्व, या कायद्याने सोडून दिले. लोकसंख्येच्या मानाने सभासद निवडून जावे, हे जे हल्लीच्या काळाचे मोहक तत्त्व आहे त्याचा अंगीकार करण्यात आला. या कायद्याने लंडन शहर व ज्या बरोजतर्फे दोन सभासद निवडले जात असे बरोज हे खेरीजकरून, बाकीच्या संयुक्तराज्याचे, जवळ जवळ सारखी लोकसंख्या येईल अशा घाटाने, निरनिराळे जिल्हे पाडले व प्रत्येक जिल्ह्यातर्फे एक एक सभासद निवडून यावा अशी योजना केली. यामुळे ज्या लिव्हरपूल शहराचा पूर्वी एकच विभाग म्हणून मानत असत व ज्यातर्फे सन १८६७ पासून तीन सभासद निवडून येत असत, त्याचे या कायद्यान्वये नऊ विभाग झाले व प्रत्येक विभागातर्फे एक एक सभासद निवडून येऊ लागला. याप्रमाणेच मिडल सेक्स कौंटीचे सात विभाग झाले.

परंतु आपल्या ध्यानी आलेच असेल, की पूर्वीचे वाटणीचे तत्त्व या कायद्याने अगदीच सोडून दिलेले नव्हते आणि म्हणून जी विभागणी या कायद्याने घडवून आणली होती ती फक्त संख्येच्याच तत्त्वावर अवलंबून होती असे म्हणवत नाही. या ॲक्ट अन्वये स्कॉटलंडला बारा जास्त सभासद मिळाले म्हणून स्कॉटलंडतर्फे एकंदर ७२ सभासद झाले व एकंदर कॉमन्स सभेतील सभासदांची संख्या ६७० झाली. लोकसंख्येच्या मानाने तुलना करून पाहिली असता इंग्लंडपेक्षा स्कॉटलंड, वेल्स व आयर्लंड यांच्यातून येणाऱ्या सभासदांची संख्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. या कायद्याने विश्वविद्यालयातर्फे येणाऱ्या सभासदांसंबंधात काहीच ढवळाढवळ केली नाही. सन १८८४ चा लोकनियुक्ततेचा कायदा व सन १८८५ चा जागांच्या पुनः वाटणीचा कायदा, यांनी आजतागाईत कायद्यांनी घडवून आणलेल्या फेरफारांपेक्षा फारच महत्त्वाचे फेरबदल घडवून आणले आहेत. यांचे परिणाम फार महत्त्वाचे होतील याबद्दल मुळीच शंक नाही. त काय परिणाम घडून येतील त्याचे आगाऊ भविष्य सांगता येत नाही.

निवडणुकीच्या वेळी चालू असलेल्या लाचखाऊपणाचे कमी मान - सुधारणेच्या कायद्यान्वये निवडणुकीच्या विभागांचा विस्तार झाल्याकारणाने निवडणाराना लाच देण्याच्या मार्गात नवीनच एक अडचण उपस्थित झाली. मतांची संख्या वाढल्याकारणाने पूर्वीप्रमाणेच ती सहज रीतीने विकता-घेता येत नव्हती. राजकीय विचार उन्नत दशेला गेलेले होते व पैशाकरिता पक्षाभिमानावर पाणी सोडणारे मतदारांपेक्षा, पक्षाभिमानाने, पैशाला न मोहून जाणाऱ्यांचेच प्रमाण मोठे होते. काही अंशाने ही सुधारणा घडवून आणण्याचे श्रेय वाढलेल्या वृत्तपत्रांच्या जास्त प्रसिद्धीकरणाकडे आहे. खरे जास्त श्रेय म्हटले तर निवडून आलेल्या उमेदवारांवर झालेल्या फिर्यादीवरून त्यांच्या काम चालविण्याच्या सुधारलेल्या पद्धतीस मिळाले पाहिजे. आठव्या शतकाच्या बऱ्याचशा अवधीत सगळ्या कॉमन्स सभेच्या कमिटीकडून निवडणुकीसंबंधी अर्जाचा विचार होत असे. खऱ्या गोष्टी काय घडल्या

याबद्दलची विचारपूस करण्याची तसदी ही कमिटी घेत नसे व ज्या पक्षकारांची मते कॉमन्स सभेतील सभासदांच्या बहुमताला अनुसरून असत त्यांना अनुकूल असा निकाल देत असे. सन १७७० मध्ये जॉर्ज ग्रेनव्हिलाने एक कायदा पास केला व त्याने तेरा जणांच्या कमिटीकडे निवडणुकीच्या अर्जाची चौकशी करण्याचे काम दिले व हे तेरा जाण उभय पक्षांनी बॅलट पद्धतीने निवडलेल्या चाळीस इसमांतून निवडून द्यावे असे ठरले. या कमिटीत प्रत्येक पक्ष आपापली बाजू समर्थन करण्यासाठी एक एक सभासद जास्त देई. सगळ्या कॉमन्स सभेच्या कमिटीपेक्षा या कमिटीकडून जास्त चांगला न्याय होई. कारण आपणावरील जबाबदारी तिजला चांगली कळत असे, तरी पण पूर्ण निःपक्षपातित्व तिच्या अंगी नव्हतेच; म्हणून सन १८६८ मध्ये निवडणुकीच्या अर्जाची चौकशी वरिष्ठ न्याय कचेऱ्यातील न्यायाधीशांकडे सोपविण्यात आली. निवडणुकीच्या वेळी घडत असलेल्या लाचरुस्वत वगैरे देण्याच्या प्रकाराविरुद्ध कायदा हळूहळू जास्त जास्तच कडक होत गेला. या संबंधाने अगदी अलीकडे झालेल्या सन १८८३ च्या कायद्याने तर जुने लाचरुस्वत वगैरे देण्याचे प्रकार अमलात आणणे अडचणीचे व धोक्याचे झाले. मतदारांची न्यायबुद्धी बिघडविण्यास अप्रत्यक्ष साधने जी असत त्यांचे कसेही असो, परंतु प्रत्यक्ष साधने जी लाच देणे व मेजवान्या देणे, ती कमी करण्यात आली.

निवडणुकीच्या वेळचे अयोग्य वजन - बॅलेट ॲक्ट, १८७२ : जोपावेतो पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळी मतदारांची मते उघडपणे घेतली जात होती तोपावेतो निवडणाऱ्यांवर गैरवजनाचा अंमल चालत असेच व या संबंधात वारंवार तक्रारी येत असत. असे म्हणतात की, जमीनदारांचा धाक कुळांना व कारखानदारांचा मजुरांना असे, त्याचप्रमाणे मेहरबानी अगर मदत ज्यापासून मिळण्यासारखी असे, अशा सर्वांचा धाक ज्यास ती पाहिजे असे अशांना असे. या गोष्टीवरून व परदेशच्या लोकसत्तात्मकत्वाच्या उदाहरणावरून चार्टिस्ट मंडळीला आपल्या सनदेमध्ये जे पाच मुद्दे होते त्यात मते देणे ती गुप्तपणे द्यावी अगर चिठ्यांनी द्यावा, अशा मागणीचा समावेश करता आला. तथापि, लिबरल पक्षीय व कॉन्झरव्हेटिव्ह पक्षीय पुष्कळ कर्तृत्त्वान पुरुष चिठ्यांनी मते देण्याच्या पद्धतीचे विरुद्ध होते. जरी या पद्धतीने गैरवजनापासून मतदाराचे रक्षण होत असे तरी तो लोकमताच्या दाबापासून या पद्धतीने सुटतो, अशी त्यांची समजूत होती. स्वातंत्र्याला यद्यपि चिठ्यांनी मते देण्याची तऱ्हा अनुकूल आहे तरी आपल्यावरील जबाबदारी ओळखून तद्रुरूप वागलेच पाहिजे हे कर्तव्य घडवून आणण्यास ती प्रतिकूलतेची आहे, असे ते समजत. चिठ्यांनी मते देण्यास अनुकूल असलेल्या लोकमतावर त्यांच्या विचारांचा काहीच परिणाम झाला नाही. अखेरीस सन १८७२ च्या बॅलट ॲक्टने ते अमलात आले. हा कायदा हंगामी म्हणून पहिल्याने करण्यात येऊन पुनः पुनः नियमितपणे आजतागाईत तो ताजा करण्यात येत आहे.

पार्लमेंट सभेच्या सभासदांची भ्रष्टता : अठराव्या शतकाची अखेर होण्यापूर्वीच

वस्तुतः पेन्शन देऊन, जागा देऊ करून व लाच भरून, पार्लमेंट सभेच्या सभासदांना भ्रष्ट करण्याचा जो सपाटा असे तो बंद झाला होता. हा परिणाम अंशतः दोघे पिट व बर्क यांच्यासारख्या दिलदार मुत्सद्यांच्या स्वतःच्या वर्तनाच्या अनुकरणाचा होय. यापेक्षाही यास विवादाचे प्रकाशन जास्त कारणीभूत झालेले आहे. कारण या विचारप्रकाशनाच्या योगाने मतदारांना सभासद लोक आपण प्रतिपादिलेल्या तत्त्वानुरूप कितपत चालत आहेत हे चांगले कळून येत असे, तसेच लोकांमध्ये राजनीतिबद्दलची गोडी उत्पन्न होऊन, तेही तत्परतेने या गोष्टीकडे लक्ष देत, ही गोष्टही कारण झाली. कायद्याच्या योगाने काहीसा परिणाम घडलाच. सन १७८२ पासून काम नसून पगार फार अशा ज्या जागा असत त्या कमी करण्यात आल्या. चौथ्या विल्यमच्या राज्यरोहणाच्या वेळी राजाचे चालत आलेले उत्पन्न राष्ट्रास देऊन त्याऐवजी बेताचीच नेमणूक राजास करून देण्यात आली, व तीही व्हिक्टोरिया राणी राज्यावर आली त्यावेळी कमी करण्यात आली. पेन्शनकरिता काढून ठेवलेली रक्कमही कमी केली. तिसऱ्या जॉर्ज राजाच्या पद्धतीचे अनुकरण करण्याचे जर कोणी भावी राजा मनात आणील तर त्यास पार्लमेंटच्या सभासदांवर वजन ठेवण्याचे जे साधन असे ते आपणाजवळ नाही, असे आढळून येई. सन १८३२ च्या सुधारणेच्या कायद्याने मोडकळीस आलेले बरोज मोडून टाकून पार्लमेंट सभेत सभासदांचे राहणे लोकानकलतेवर अवलंबून राहिले. या कारणाने राजा व त्याचे मंत्री यांच्या अन्यायमूलक वजनास बराच प्रतिबंध झाला.

कॉमन्स सभा व लोकमत : पार्लमेंटमधील लोकनियुक्तता व जागांची वाटणी या संबंधात कायदे झाले असल्याने कॉमन्स सभेच्या अधिकारात भर पडली; परंतु दुसऱ्या ज्या काही घडामोडी झाल्या त्यांनी पार्लमेंट सभेतील सभासदांवर लोकमताचे वजन जास्त वाढले. पार्लमेंट सभेतील वादविवादांच्या पूर्ण बिनचूक हकीगती प्रसिद्ध होऊ लागल्याने ज्यांना ज्यांना वाचता येत असे त्यांना त्यांना राजकारणाचा ओघ कळू लागला. पार्लमेंटमधील सर्व कागदपत्रे छापून निघू लागल्यामुळे वर्तमानपत्रांना राजकीय विषयांचा विवाद करण्यास भरपूर सामग्री मिळू लागली. वृत्तपत्रास भरावा लागणारा स्टॅम्प १८५५ मध्ये बंद झाल्यामुळे व कागदावरील जकात १८६१ मध्ये कमी केल्यामुळे वर्तमानपत्रे कमी किमतीची झाली व त्यांची संख्या फारच जलद वाढली. सामान्य राजनीतिविशारद मंडळीची जितकी ठराविक भाषणे कॉमन्स सभागृहाच्या बाहेरच राजकीय प्रश्नांची चर्चा होऊन बहुत अंशी त्यांचा निर्णय होतो व विशेष ज्ञान व विशेष कर्तबगारीबद्दलचा कॉमन्स सभेतील सभासदांचा जो लौकिक असे तो ऱ्हास होण्याच्या पंथास लागलेला आहे.

पक्षरचना : हरएक स्वतंत्र देशात पक्ष हे असावयाचेच. मग ते कमी प्रमाणावर असोत अथवा जास्त प्रमाणावर असोत. पहिल्या चार्लस राजाच्या कारकीर्दीपासून पार्लमेंटसभेत विशिष्ट पक्ष हे बनलेले आहेतच; परंतु पार्लमेंटसभेच्या बाहेर पक्ष बनविण्याचा यत्न गेल्या शतकाचा अर्ध भाग होऊन जाईपर्यंत मुळीच झाला नाही. चालू शतकात निवडणुकीचा

हक्क असणाऱ्यांची संख्या मोठी झाल्याकारणाने पक्ष बनविणे ही एक कला अगर धंदा होऊन राहिला असून, त्यात प्रवीणता संपादन करण्यास आयुष्यच्या आयुष्य खर्ची घालावे लागते. सांप्रत काळी प्रत्येक पक्ष मते मिळविण्याच्या कामी काटकसर करण्याचा सारखा यत्न करीत असतो. एकूण एक विभागात निवडणारे कोणते पक्षाचे आहेत व कोणता पक्ष समर्थन करणार याबाबत चौकशी केली जाते. पक्षाचे पुढारी आपल्या पक्षास सार्वजनिक अनुकूलता कशी मिळेल यासंबंधाने कोणत्या अनुकूलता, युक्ती योजाव्यात या विचारात दंग असतात. स्थानिक व्यवस्थापक व पक्षांचे पुढारी यांच्यामध्ये सदोदित पत्रव्यवहार चालू असतो. पक्षविशेषाची विशिष्ट मते विचारात घेऊन उमेदवारांची निवडणूक होते व मत देण्याच्या जागी जाण्यापूर्वी प्रत्येक महत्त्वाच्या प्रश्नाबाबत त्याजकडून कबूल घेतलेली असते. उतरोत्तर तर ते केवळ ठरलेल्या पक्षविशेषांच्या मतांचे अनुवादकच बनत आहेत. विशिष्ट राजकीय उद्देश सिद्धीस नेण्यासाठी उत्पन्न झालेल्या संस्था- वर ज्या संस्थेचे वर्णन दिलेले आहे, ती विशिष्ट पक्षाचे सर्व उद्देश सिद्धीस नेण्याकरिता कायमची बनलेली आहे; परंतु या शतकात काही विशेष राजकीय उद्देशांच्या संसिद्धीकरिता संस्था तात्पुरत्या निर्माण होऊन ते कार्य झाले म्हणजे मोडल्या गेलेल्या आहेत. या प्रकारच्या संस्था म्हणजे कॅथोलिक पंथीयांच्या नालायक्या काढून टाकण्यासाठी झालेली कॅथोलिक असोसिएशन, पार्लमेंटसभेच्या सुधारणेसाठी झालेल्या राजकारणिक जुटी, धान्यावरील कायद्याच्या विरुद्ध झालेला कट-याचा उद्देश तर याचे नावांवरूनच स्पष्ट होत होता व या प्रकारच्या अलीकडील काळात उत्पन्न झालेल्या जुटी, या होत. एकोणिसाव्या शतकातील राजकारणात या संस्थांनी लोकमत बनवून, सार्वजनिक उत्साह जागृत करून व केव्हा केव्हा म्हणणे मान्य न झाल्यास बंड करू असा धाक दाखवून बराच महत्त्वाचा भाग घेतलेला होता. अशा संस्थांनी पार्लमेंट सभेस वाटत असलेले तिचे स्वातंत्र्य बरेचसे कमी झालेले होते.

कॅबिनेट राज्यकारभाराची उन्नती आणि अंमलबजावणी खात्यातील फेरफार : सुधारणेच्या कायद्यांच्या मालिकेच्या योगे पार्लमेंटच्या राज्यसत्तेच्या वाढीस उत्तेजन आले. सन १८३२ पासून सामान्यतः राज्यव्यवस्थेच्या सर्व बाबींवर कॉमन्स सभेचा हळूहळू पूर्ण ताबा आला. राज्यशकट कोणी चालवावयाचा हे ठरविण्याचा पूर्ण अधिकार तिच्याकडे आला. मंत्रिमंडळ पसंत करण्याचा राजाचा अधिकार बहुतेक नाहीसा झाल्यासारखाच होता व कॉमन्स सभेत ज्याकडे बहुमत त्या पक्षाच्या पुढाऱ्यास प्रधानकीच्या हुद्यावर नेमणे राजास प्राप्त झाले आहे. मंत्रिमंडळाची सत्ताही बहुमतावर पूर्ण अवलंबून असून, मताधिक्य कमी होताच आधार सुटून अधिकाराचा राजीनामा देणे त्यास भाग पडते. सन १८६७ पासून जनतेचा तुम्हावर भरवसा नाही, अशा आशयाचा ठराव योग्य प्रकारे पुढे आणण्याचीही वाट न पाहता मंत्री अधिकाराचा राजीनामा देत आले आहेत. चारदा तर निवडणुकीचा निकाल आपणास अनुकूल नाही अशा कारणाने नवीन सभा भरण्याची वाट न पाहता मंत्रिमंडळाने

राजीनामा दिलेला आहे. सांप्रत मंत्रिमंडळाची, कॉमन्स सभेच्या मताधिक्याचा पाठिंबा असता, असणारी सत्ता, पूर्वकाळापेक्षा पुष्कळच निरंकुश आहे. कॉमन्स सभेच्या सत्तेच्या वाढीबरोबरच त्याची वाढ झालेली आहे. असल्या या मोठ्या सभेत मताधिक्याचा पाठिंबा अस्थिर राहावयाचा असे वाटणे हे साहजिक आहे. जेव्हा पहिला सुधारणेचा कायदा पसार झाला तेव्हा पुष्कळ लोकांच्या राजाच्या वजनाखाली असलेले पुष्कळ बरोज कमी केल्याने मताधिक्याचा भक्कम पाठिंबा मंत्रिमंडळास राहणार नाही व अशा रीतीने पार्लमेंटच्या सर्व सत्तेला धक्का बसेल अशी भीती पडली; पण हे भय खरे ठरले नाही राजाच्या पर्वकालीन वजनाची जागा वर निर्दिष्ट केलेल्या पक्ष पद्धतीने भरून काढिली.

ज्या मोठमोठ्या बड्या लोकांच्या घराण्यास पूर्वी कॉमन्स सभेत पुष्कळसे सभासद निवडून पाठविण्याचा अधिकार असे त्यांच्यावर जात वजनाचा अंमल चालून मंत्रिमंडळास मिळणारे त्यांचे पाठबळ अनिश्चित असे; परंतु त्यांची जागा पक्ष बनविण्याचा धंदा करणाऱ्यांनी पटकाविली आहे, त्यांच्या स्वतःच्या मनाच्या कलाचा राजकारणात संबंध असत नाही, त्यांचा मुख्य हेतू मोठेसे दृढ बहुमत उत्पन्न करावयाचे हा असतो. ज्या ज्या बरोजतर्फे ते सभासद असत तेथे तेथे त्यांची पूर्ण सत्ता गाजत असे, असे पूर्वी बरोजतर्फे पुष्कळ सभासद असत, म्हणून स्वतंत्र पक्ष स्वीकारूनही त्यांची सभासदपणाची जागा जात नसे. हल्लीच्या काळी आपल्या पक्षाच्या इच्छेनुरूप वागल्याशिवाय कोणाही सभासदास आपण आपली जागा कायम राखू, अशी आशा धरवत नाही. गेल्या शतकाच्या पार्लमेंट सभेशी सांप्रतकालीन पार्लमेंट सभेची तुलना केली असता हल्लीच्या पार्लमेंटमधील सभासदास जे जातवजन आलेले असते ते बहुतेकास केवळ ते कॉमन्स सभेचे सभासद आहेत या गोष्टीने आलेले असते, म्हणून पक्षाबद्दल हलगर्जीपणा दाखवून आपले वजन कमी न व्हावे अशाबद्दल ते काळजी बाळगतात. या कारणांच्या योगाने पहिला सुधारणेचा कायदा होण्याच्या पूर्वकाळापेक्षा हल्ली मंत्रिजनांचे मताधिक्य जास्त टिकाऊ झालेले आहे.

कॅबिनेट आणि कायदे करणे : कायदे करण्याच्या संबंधात विशेषतः कोणासही आढळून येईल, की अलीकडील मंत्रिमंडळ कॉमन्स सभेवर सर्वस्वी अवलंबून असते व कॉमन्स सभेचे पाठबळ असल्यामुळे त्यांचा अधिकारही निरंकुश चालतो. सन १८३२ चा सुधारणेचा कायदा पसार होईपावेतो, एखादा पुढे आणलेला कायदा पसार झाला नाही या कारणाने कोणत्याही मंत्रिमंडळास राजीनामा देण्याचा प्रसंग आला नाही. हल्ली एखादी महत्त्वाची सूचना पुढे आणून ती जर पसार न झाली तर एकतर मंत्रिमंडळास राजीनामा द्यावा लागतो; अथवा सर्व देशाचे मत समजून घेण्याकरिता निवडणूक करवून घ्यावी लागते. अन्यपक्षी वास्तविकपणे पहिले असता नवीन कायदे पुढे आणण्याचा मंत्रिमंडळास पूर्ण अधिकार आहे. राज्यव्यवस्थेच्या कायद्याचा अक्षरशः अर्थ केल्यास कोणाही सभासदास त्याच्या समजाप्रमाणे योग्य असा एखादा कायद्याचा मसुदा पुढे आणण्याचा अधिकार आहे;

परंतु सांप्रत सरकार पक्षाकडून इतके पुष्कळ व गोंधळाचे कायद्याचे मसुदे पुढे आणण्यात येतात, की कॉमन्स सभेचा बहुतेक वेळ त्यावरील वादविवादात जातो. एखाद्या बिनअधिकारी वर्गापैकी सभासदाने जर एखादा कायद्याचा खर्डा पुढे आणला तर त्यावर वादविवाद क्वचित होतो. मग तो पसार होण्याची गोष्ट तर दूरच राहिली. प्रधान मंडळाने ती गोष्ट उचलून धरल्यास भाग निराळा. एकंदरीने असे असणे हितावह आहे. आमची कायद्यांची संख्या आधीच मोठी आहे, तिच्यात घाईने व पूर्ण विचार न करता पसार झालेल्या कायद्यांची भर पडल्यास अनर्थ ओढवणार. हे संकट टाळण्यासाठी जो खर्डा कायदा व्हावयाचा त्यास, सरकारने त्या कामासाठी मुद्दाम नेमलेल्या अधिकाऱ्याची संमती मिळवावी लागते, अशी एक तजवीज केलेली आहे.

कॅबिनेटची अंतर्बधने : कॉमन्स सभा व कॅबिनेट सभा यांची दृढ ग्रंथी ज्या बंधनांनी झालेली आहे तीच कॅबिनेटमधील सभासदांना एकमेकांशी व त्यांच्या मुख्याशी निगडित करण्यास कारणीभूत झालेली आहे. हल्ली प्रधानांच्या बहाल्या बडतर्ध्या राजाच्या हाती मुळीच राहिल्या नाहीत व मंत्रिमंडळात 'राजमित्र' मंत्रिजनांच्या उपयोगी पडण्याचा आव घालून त्यांच्या मुख्याचे हेतू हाणून पाडण्याचे काम करीत असत. देशात पक्ष इतके सुव्यवस्थित व प्रबळ बनलेले आहेत, की कॅबिनेटमध्ये कौटुंबिक अभिमानाने अथवा दृढनिश्चयाने का म्हणाना वर मान करून वागणे कोणाच्यानेही होत नाही. उद्धटपणा कोणी दाखविला, की बडतर्फीची पाळी आलीच म्हणून समजावे व बडतर्फ होणे म्हणजे सार्वजनिक संबंधातून हद्दपारीचीच शिक्षा होय. मुख्य प्रधानाच्या अनियंत्रित सत्तेवर दाब म्हणून जो काही असतो तो केवळ कर्तृत्वावातच उत्साही मदतनिसाची मदत सुटण्याचाच मात्र व त्या योगे होणाऱ्या गैरसोईचा. या दाबाचा अंशतः उपयोग होतो हे निर्विवाद आहे. कॅबिनेट कौन्सिलामध्ये असल्या एखाद्या मदतनिसाने विरोध दाखविला म्हणजे मुख्य प्रधानास आपले बेत बदलावे लागतात; परंतु जे मंत्रिमंडळात असतात त्यांना निदान बाह्यतः तरी आपली मुख्याशी एकी आहे असे दाखविणे ही गोष्ट कडक रीतीने पाळावी लागते या रीतीने काही सत्याचा अपलाप करूनही कॅबिनेटचा कारभार सुरळीत चालवावा लागतो. कारण कधी कधी कॅबिनेटमधील सभासद, जी गोष्ट त्रासकारक व निरुपयोगी आहे असे त्यांचे मत असते तिच्या संबंधाने, बाह्यतः खोटा आव आणून, विवाद करत असतात, यात बिलकूल संदेह नाही.

अंमलदारीची खाती : या काळात अंमलदारीचे काम सारखे वाढतच गेलेले आहे. नवीन नवीन कामे करण्यासाठी नवीन नवीन खाती अस्तित्वात आली व जुनी खाती जी असत ती कामाच्या सोईकरिता अथवा वळणसूदपणाकरिता सुधारण्यात आली.

सेक्रेटरी ऑफ स्टेट (राजाचा चिटणीस) : इंग्लंड व स्कॉटलंड यांचे एकीकरण होईपावेतो नेहमी बहुधा राजाचे दोन चिटणीस असत. एकीकरणापासून सन १७४५ चे बंड मोडेपावेतो स्कॉटलंडचे काम करण्याकरिता म्हणून तिसरा चिटणीस असे.

(सन १७५६-१७६३ च्या) सप्तवार्षिक युद्धामुळे आमची राष्ट्राची मर्यादा वाढल्याने वसाहतीसंबंधी कामे करण्यासाठी पुनः तिसऱ्या चिटणिसाची नेमूणक झाला; परंतु सन १७८२ मध्ये अमेरिकेतील आमच्या ताब्यातील बहुतेक प्रदेश गेल्यामुळे ही चिटणिसाची तिसरी जागा कमी करण्यात आलेली होती. शेष असलेल्या चिटणिसांमध्ये कामाची वाटणी करण्यात आली. एकाकडे स्वदेशाच्या कामाची सुप्रत असून शिवाय आयर्लंड व वसाहतींच्या कामाचा बोजा त्याजकडे आला. दुसऱ्याने सर्व परदेशीय काम आटोपले. फ्रान्स देशाबरोबर मोठे युद्ध चालू असता वसाहतीची कामे व सैन्यासंबंधी काही कामे करण्यासाठी एक जादा चिटणीस नेमण्यात आला. क्रिमियन युद्ध सुरू झाल्यानंतर एका चिटणिसाचा सर्व वेळ लष्करी कामातच जात आहे, असे निदर्शनास आले म्हणून चौथा चिटणीस नेमून त्याकडे वसाहतीची कामे सोपविण्यात आली. पुढे सन १८५८ मध्ये जेव्हा राणी सरकारांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यातून हिंदुस्थानची राज्यसूत्रे आपल्या हाती घेतली तेव्हा हिंदुस्थानाकरिता म्हणून एक पाचवा चिटणीस नेमण्यात आला. येणेप्रमाणे स्वदेशाकरिता, परदेशीय कामांकरिता, युद्धाकरिता, वसाहतीकरिता आणि हिंदुस्थानाकरिता, असे सांप्रत पाच चिटणीस आहेत. कायदेशीर रीतीने कोणालाही कोणाचे काम करता येते. हे सर्व जण कॅबिनेट सभेचे सभासद असावयाचे, ही रीत अव्याहत चालत आलेली आहे.

देशातल्या देशात चालणारी कामे करणाऱ्या चिटणिसांची कामे पुष्कळ असून, नानाविध आहेत. त्याच्यामार्फतच खुद्द राणीसाहेबांकडे केलेले अर्ज व इतर पत्रव्यवहार चालतो व उत्तरेही त्यांच्या मार्फतच मिळतात. राष्ट्रभर बंदोबस्त राखण्यात येत असून, न्यायदानाच्या योग्य सोई आहेत हे पाहणेही त्यांचे कर्तव्य मानले आहे. तुरुंगांवर व राजधानीतील पोलिसांवर त्यांचाच अंमल असून, अपराध्यास क्षमा करण्याची जी राजसत्ता आहे तिच्याबद्दलचा राजाचा सल्लागार तोच असतो. इंग्लंडप्रमाणेच याबाबतीत तो आयर्लंडबद्दलही जबाबदार असतो; परंतु तो नुसता नावाचा. आयर्लंडसंबंधी खरी जबाबदारी चीफ सेक्रेटरी नावाच्या अधिकाऱ्यावर असते. यद्यपि, दिसण्यात हा लॉर्ड लेफ्टनंटच्या हाताखालील आहे तरी अलीकडील काळात तो बहुतेक स्वतंत्र मंत्रीच बनून राहिला आहे. इंग्लंडचे दुसऱ्या स्वतंत्र परराज्यांशी जे संबंध आहेत त्यावर परदेशांशी चालणाऱ्या कामाकरिता नेमिलेल्या चिटणिसाची देखरेख असून, परदेशात वकील व इतर राजकारणी पुरुष यांच्या नेमणुका करण्यात तो राणीचा सल्लागार असतो व इतर देशांशी पत्रव्यवहार त्याच्या मार्फतच चालतो. ब्रिटिश प्रजाजनांना इतरत्र झालेल्या पीडेचा प्रतिकार मिळविणेही याच्याचकडे आहे. लढाई खात्याचा जो चिटणीस असतो त्याजकडे सांप्रत राजाच्या लष्कराचा पूर्ण अधिकार असतो. वसाहतीकरिता जो चिटणीस असतो त्याजकडे स्वदेश व वसाहती यांच्यामधील संबंधांपासून उत्पन्न होणाऱ्या कामाबद्दलची जबाबदारी असते. वसाहतींवर गव्हर्नर नेमणे अगर त्यास परत आणणे, वसाहतींच्या पार्लमेंटमध्ये पसार झालेल्या कायद्याच्या मसुद्यास निषेध

दर्शविण्याच्या कामी संयुक्तराज्य व स्वतंत्रअधिकार चालविणाऱ्या वसाहती यांच्यामधील तडजोड या सर्व संबंधात तो राजाचा सल्लागार असतो. हिंदुस्थानाकरिता जो चिटणीस असतो त्याची सर्वसाधारण सत्ता हिंदुस्थानच्या बादशाही अमलातील मुलखावर असते. कारण यद्यपि हिंदुस्थानातील राजप्रतिनिधीस स्वतंत्र राजकर्त्याप्रमाणे अधिकार असतात. तथापि, त्याची नेमणूक व त्याला कामावरून दूर करणे हा अधिकार कॅबिनेटचा आहे व या कॅबिनेटचा हिंदुस्थानाचा चिटणीस हा एक सभासद असतो.

आरमार खात्याचा मुख्य अधिकारी : पूर्वकाळी सरकारी आरमाराची सर्व सत्ता लॉर्ड हाय ॲडमिरल या नावाच्या अधिकाऱ्याकडे असे. सन १७०८ यावर्षी लॉर्ड हाय ॲडमिरलाची जागा पंचांकडे सोपविण्यात आली व तेव्हापासून काही थोड्या कालावधीपावेतो मात्र एकदा त्या जागेचे पुनरुज्जीवन झालेले होते. या अधिकाऱ्याची कामे ॲडमिरॅलिटीच्या मंडळाकडे वर्ग केली होती; परंतु आरमारासंबंधी कामे हे मंडळ व इतर मंडळे यांच्यामध्ये वाटून दिली होती. बोर्ड ऑफ ॲडमिरॅलिटीने आरमारासंबंधी कामे आपणाकडे सन १८३२ मध्ये घेतली. हल्ली या बोर्डाचा (मंडळाचा) मुख्य जो फर्स्ट लॉर्ड तो स्वतंत्र अधिकारी असून, बोर्डाचे इतर सभासद त्याच्या सल्लागाराप्रमाणे असतात. लढाई खात्याकडे जसा लढाईखात्याचा चिटणीस तसा अरमाराकडे फर्स्ट लॉर्ड ऑफ दी ॲडमिरॅलिटी हा होय. फर्स्ट लॉर्ड हा नेहमी कॅबिनेटचा एक सभासद असतो.

व्यापारी मंडळाचा अध्यक्ष : बहुतकाल पावेतो व्यापारी मंडळ ही प्रिव्हीकौन्सिलामधील एक कमिटी असे. १८६२ पासून सांप्रतचे नाव त्यास प्राप्त झाले असून, सांप्रतची त्याची रचना १८६७ पासून अमलात आलेली आहे. त्याची कर्तव्ये बहुत व महत्त्वाची आहेत. व्यापारात व शेतकीत उपयोगी पडणारे आकडे हे एकत्र करिते कोष्टकरूपाने ते ते प्रसिद्ध करते; वजने व मापे यांची इयत्ता ठरविण्याचा अधिकार त्याजकडेच आहे. पेटंटाचा कायदा, दिवाळखोरीचा कायदा यांची अंमलबजावणी करण्यात त्याचे पुष्कळ अंग असते. रेल्वे आणि ट्रॅम्वे गाड्यांच्या मंडळ्या, पाणी, धूर, विद्युत पुरविणाऱ्या मंडळ्या व एकंदर मालाची जहाजातून होणारी निर्यात या सर्वांवर त्याचाच ताबा असतो. दीपगृहे व बंदरे यांचाही अधिकार त्याच्याकडेच असतो; परंतु पुनः येथेही या बोर्डाचा अधिकार म्हणजे अध्यक्षाचाच अधिकार असे समजावयाचे. अध्यक्षच सर्व कामे करीत असून बोर्ड काहीही करीत नसते.

स्थानिक राज्यव्यवस्था पाहणाऱ्या मंडळाचा अध्यक्ष : स्थानिक अधिकाऱ्यांकडून त्याजवर सोपविलेली महत्त्वाची कामे योग्य प्रकारे करवून घेण्यास त्यावर वरिष्ठ सरकारच्या देखरेखीची व नियंत्रणाची खास जरूरी आहे, ही गोष्ट इंग्लंडमध्ये अनुभवसिद्ध ठरलेली आहे. असल्या प्रकारची सरकारी तपासणी व नियंत्रण सन १८३४ सालापूर्वी इंग्लंडमध्ये क्वचितच होते. याचवर्षी पसार झालेल्या 'पुअर लॉ दुरुस्तीच्या' कायद्याने गरिबांना देण्यात येणाऱ्या मदतीवर देखरेख ठेवण्यास कमिशनरांच्या नेमणुका झाल्या व सन १८४७ मध्ये

हे कमिशनर कमी होऊन त्यांच्या जागी 'पूअर लॉ बोर्ड' स्थापन झाले. सन १८४८ मध्ये स्थानिक अधिकाऱ्यांकडून रोगप्रतिबंधक योग्य उपयांची योजना करवून आणण्यासाठी 'बोर्ड ऑफ हेल्थ'ची स्थापना झाली. सन १८५८ मध्ये हे बोर्ड कमी करून त्याचे अधिकार काही स्वदेशाच्या चिटणीसाकडे व काही प्रिव्हीकौन्सिलकडे वाटून देण्यात आले; परंतु स्थानिक अधिकाऱ्यांची संख्या, अधिकार व चळवळ ही वाढल्यामुळे ही व्यवस्था लावण्याकरिता स्वतंत्र खाते असावे, अशी जरूरी उत्पन्न तो त्याअन्वये सन १८७१ च्या कायद्याने गरिबांना मदत देण्याबाबतच्या पुअर लॉ बोर्डाची कामे, सार्वजनिक आरोग्याबद्दलची होम सेक्रेटरी व प्रिव्हीकौन्सिलाची कामे, लोकल गव्हर्नमेंट बोर्डाची स्थापना होऊन त्याकडे देण्यात आली. हल्ली लोकल गव्हर्नमेंट बोर्ड हे एक सरकारचे महत्त्वाचे खाते होऊन बसले आहे; परंतु बोर्ड हे केवळ नावाचे आहे, खरी सत्ता स्वतंत्रपणे अध्यक्षाकडे असून तो कॅबिनेटचा सभासद असतो.

कौन्सिलचा उपाध्यक्ष : सन १८३० मध्ये प्रथमतः प्राथमिक शिक्षणास सरकारी मदत मिळाली. सन १८३९ मध्ये जेव्हा ही मदत वाढविण्यात आली तेव्हा तिचा विनियोग योग्य होण्यासाठी प्रिव्हीकौन्सिलची एक कमिटी नेमण्यात आली. सन १८५६ मध्ये झालेल्या कायद्याने शिक्षणासंबंधाने प्रिव्हीकौन्सिलच्या कमिटीच्या उपाध्यक्षांची नेमणूक झाली. या अधिकाऱ्याची कर्तव्ये प्राथमिक शिक्षणाबाबतच्या कायद्यांनी पुष्कळच वाढली आहेत. सांप्रत प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफतचे झालेले आहे आणि 'ग्रँट इन एड'ची रकम दरसालची ६०००००० पौंडावर गेली आहे. हा उपाध्यक्ष हळूहळू युरोपखंडातील इतर देशांत ज्याप्रमाणे शिक्षण खात्याचा मंत्री असतो त्याप्रमाणे झालेला आहे. स्वरूपतः त्याचे खाते प्रिव्हीकौन्सिलची कमिटी होय व कौन्सिलचा जो अध्यक्ष तोच कमिटीचाही अध्यक्ष होय; परंतु अशा या कमिट्यांतून वाढ पावलेल्या इतर मंडळाप्रमाणेच सर्व सत्ता खरोखरीची एका इसमाच्या हाती असते व तो इसम याठिकाणी कौन्सिलचा उपाध्यक्ष हा होय. तो कधी कधी कॅबिनेटचा सभासद असतो, नेहमीचा नसतो.

इतर अंमलदारीची खाती : सांप्रतच्या काळात सारखी वाढ पावत असलेले अंमलदारीचे दुसरे खाते म्हटले म्हणजे टपाल खाते होय. या खात्याचा मुख्य पोस्टमास्तर जनरल हा आहे व टपालासंबंधी कामाची तोच व्यवस्था करणाराही असतो. सन १८५१ साली प्रथमतः बोर्ड ऑफ वर्कर्सची स्थापना झाली. त्याच्या देखरेखीखाली राजवाडे व राजोद्याने असून, इतर खात्यांच्या ताब्यात नसणाऱ्या सर्व सार्वजनिक इमारतीही त्याच्याच देखरेखीखाली असतात. बोर्ड ऑफ वर्कर्सचा जो मुख्य कमिशनर असतो त्याच्या हाती सर्व सत्ता असते. सन १८८९ च्या कायद्यावरून बोर्ड ऑफ ॲग्रिकल्चर (शेतकी)ची स्थापना झाली. निरनिराळ्या बोर्डीमधून व कमिशनरांच्या अधिकारातून काही काही अधिकार काढून

त्याकडे दिले. जनावरांमध्ये रोगाद्भव होऊ न देण्याबद्दल त्यांना खबरदारी घ्यावी लागते व शेतकीची माहिती देणारी कोष्टके प्रसिद्ध करावी लागतात. या बोर्डाचे सर्व अधिकार व सत्ता अध्यक्षाला दिलेली असते.

खात्यांच्या वाढीचा कॅबिनेटवर झालेला परिणाम : खात्यांच्या वाढीबरोबर कॅबिनेटची वाढ झाली. प्रत्येक खात्याच्या मुख्याला कॅबिनेटमध्ये बसण्याचा अधिकार आहे, अशी गोष्ट नाही. पाच सरकारी चिटणीस व फर्स्ट लॉर्ड ऑफ दी ॲडमिरॅलिटी, हे नेहमी कॅबिनेटमध्ये असायचेच. त्याचप्रमाणे मुख्य खजिनदार (हा बहुधा मुख्य प्रधान असतो) जो नावाचाच खजिन्याकडील मुख्य अंमलदार असतो तो व खरोखरीचा खजिन्याचा अंमलदार ज्यास चॅन्सेलर ऑफ दी एक्सचेकर म्हणतात तो असे दोघेही मंत्रिमंडळात असतातच. तसेच लॉर्ड चॅन्सेलर व लॉर्ड प्रेसिडेंट ऑफ दी कौन्सिल हेही कॅबिनेटात असायचेच, वर सांगितलेल्या खात्यांच्या मख्यांशिवाय इतर खात्यांचे जे मुख्य अधिकारी असतात ते प्रसंगविशेषी सभासद असतात व प्रसंगविशेषी नसतातही; परंतु होईल तितके करून निरनिराळ्या खात्यांचे धुरीण कॅबिनेटमध्ये घेण्याचा स्वाभाविक कल असतो. कॅबिनेट उत्तरोत्तर वाढत असल्याने कालेकरून मुख्य प्रधान व त्याच्या उपयोगी पडणारे त्याचे अनुयायी यांची एक आंतरकॅबिनेट होण्याचा संभव आहे.

स्थानिक कारभाराची सुधारणा : तिसऱ्या जॉर्जच्या मरणापावेतो इंग्लंडची स्थानिक व्यवस्था ट्यूडर घराण्याच्या वेळेपासून ज्या घाटाने चालत आली होती तशीच चाललेली होती. तो कारभार (१) पॅरिशचे अधिकारी, (२) शहरच्या कॉर्पोरेशनचे अधिकारी, (३) व कौंटीचे अधिकारी हे चालवीत असत.

पॅरिश : शहरात व प्रांतात स्थानिक स्वराज्याच्या मर्यादेचा आरंभ पॅरिशपासून होतो. पॅरिशमधील अधिकार कर भरणाऱ्या घरमालकांच्या सभेकडे असे व व्हेस्ट्री नावाच्या ठिकाणी सदरील सभा भरत असल्याने त्या सभेलाही व्हेस्ट्री हेच नाव असे. पॅरिशचा मुख्य अधिकारी असे तोच व्हेस्ट्रीचा अध्यक्ष असे. व्हेस्ट्रीचे मुख्य अंमलदार म्हटले म्हणजे चर्चवॉर्डन्स, गरिबांवर देखरेख ठेवणारे व राजमार्गाचे सर्व्हेअर हे असत. पॅरिशच्या अधिकाऱ्यांची मुख्य कामे म्हटली म्हणजे गरिबांना मदत देणे व रस्त्यांची दुरुस्ती राखणे ही असत. आताप्रमाणेच त्यावेळीही, पॅरिश विस्तार, लोकसंख्या, संपत्ती व बुद्धिमान आणि सार्वजनिक कामाचा उत्साह धरणारे लोक, यांच्या मानाने पाहू गेले असता एकमेकांशी मुळीच सारखे नसत. बहुतेक पॅरिशातील व्हेस्ट्री मंडळ्या निष्काळजी असत व त्यातील अधिकारी नालायक असत.

कायदेशीर रीतीने व्यक्तिविषयक हक्क संपादन केलेली शहरे : फार जुन्या काळच्या बहुतेक सर्व शहरांना व्यक्तिविषयक हक्क मिळालेलेच होते. मुद्दाम मिळविलेल्या सनदानुरूप व वहिवाटीस अनुसरून प्रत्येक शहराची व्यवस्था निश्चित झालेली असे.

निरनिराळ्या शहरांच्या व्यवस्थेच्या तपशिलात असंख्य भेद असत; परंतु सगळ्यांची सामान्य एकवाक्यता, आपल्यापुरताच विचार करण्याची जी कोती समजूत, तीत असे. म्युनिसिपालिटीचे अधिकारी बहुतकरून काही थोड्याच विशिष्ट शहरवासीयांना असत. अगर कौन्सिलकडे असत व हे कौन्सिल आपलेतर्फे सभासद निवडीत असे. कॉर्पोरेशन सभा बहुतेक सुस्त असत. यापैकी पुष्कळ सचोटीने चालणाऱ्या नसून सार्वजनिक मिळकतीचा व्यय खाजगी कामाकडे करीत असत. जेथे कोठे सार्वजनिक कामाचा उत्साह असे, तेथे अधिकाराची कमतरता पडून कामे लाथाडली जात. जेव्हा शहरे भरभराटीस आली व वस्ती वाढली तेव्हा त्या स्थितीस अनुरूप अशा सुधारणा मोठ्या प्रमाणावर करण्यास त्यांना अधिकार नव्हता. शिवाय औद्योगिक क्रांतीने नवीन उत्पन्न झालेली शहरे जी असत त्यांना कॉर्पोरेशनचे हक्क मिळाले नव्हते. यामुळे त्यांच्यात व्यवस्था मॅनॉर, पॅरिश अथवा हंड्रेड याप्रमाणे जुन्या पद्धतीची असे. या कारणांनी जेव्हा एखाद्या शहरास एखादे सार्वजनिक काम हाती घ्यावयाचे असे तेव्हा त्या कामाकरिता पार्लमेंटकडून मुद्दाम कायदा पसार करवून अधिकार मिळवावा लागत असे.

कौंटी : प्रत्येक कौंटीतील स्थानिक कारभार मॅजिस्ट्रेटांच्या संहतीवर सोपविलेला असे. हल्लीप्रमाणेच त्याकाळी न्यायाधीशांच्या जागी विशिष्ट मिळकत ज्यांची असे त्यापैकी ज्यांची शिफारस लॉर्ड लेफ्टनंट करीत असत त्यांची नेमणूक सरकारातून होत असे. न्यायाच्या अधिकारांशिवाय त्याजकडे सांप्रतच्या प्रमाणेच नाना प्रकारची अंमलबजावणीची कामे असत व एकंदरीने ती थोडीशी महत्त्वाची असत. पॅरिशच्या अधिकाऱ्यांच्या पुष्कळशा कामांवर त्यांची तपासणी असे. अंमलबजावणीच्या कामात जरी या न्यायधीशांची फारशी चटपट नसे तरी ते सामान्यतः न्यायी व काटकसर करणारे असत. या कारणाने त्यांच्याकडे जरी अंमलबजावणीची कामे असत तरी त्यायोगे कोणास असंतोष वाटला नाही व पॅरिशची सुधारणा व कॉर्पोरेट शहरांची सुधारणा होऊन बराच काळ जाईपावेतो कोणी विचारपूसही केली नाही.

स्थानिक राज्यव्यवस्थेच्या पुनर्घटनेतील मुख्यमुख्य मजलींची स्थळे म्हटली म्हणजे सन १८३४ चा पुअर लॉ अमेंडमेंट ॲक्ट, सन १८३५ चा म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट, सन १८४८ ते १८७५ पावेतो झालेले सार्वजनिक आरोग्यासंबंधी कायदे, १८८८ चा कौंटी कौन्सिल ॲक्ट व १८८८ व १८९४ चे स्थानिक स्वराज्याचे कायदे, ही होती.

सन १८३४ चा पुअर लॉ दुरुस्तीचा कायदा : अर्ल ग्रेचे मंत्रिमंडळ अधिकारारूढ असता पुअर लॉची अंमलबजावणी करताना होणाऱ्या दोषांची चौकशी करण्यासाठी एक कमिशन नेमण्यात आले होते. त्या कमिशनने जी गाहाणी पूर्वी असावीत असा संशयही नव्हता, अशी गाऱ्हाणी उघडकीस आणली. पॅरिशच्या मार्फत जी मदत गरिबांना मिळत असे ती देताना अशा वाईट तत्त्वानुरूप ती देण्यात येत असे व ती देताना असा उधळेपणा होई

व त्याबाबत इतक्या काही लटपटी होत असत, की एकंदर मजूरदार वर्ग बिघडून जाण्याचा प्रसंग आला व जमिनीचा सारा यातच गडप होणार की काय, असा धाक उत्पन्न झाला. कमिशनरांच्या रिपोर्टवरून सन १८३४ चा पुअर लॉ सुधारणेचा कायदा अस्तित्वात आला व त्या कायद्याने निरनिराळ्या पॅरिशांकडे मदत देण्याचा जो अधिकार होता तो त्याकडून निघून पॅरिश मंडळाकडे आला. या कायद्याने जवळ जवळ १५ अगर २० पॅरिशे मिळून एक संघ होत असे व ते आपल्यातर्फे इसम निवडून गरिबांचे संरक्षक बोर्ड (मंडळ) म्हणून जे असे त्यात आपले प्रतिनिधी पाठवीत असत. या रीतीने गरिबांना मदत देणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या कमी करून ही व्यवस्था सोपी करण्यात आली. गरिबांच्या मदतीसंबंधाने जे गोंधळ असत ते कमी करण्यात आले व ही कामगिरी चांगल्या संभावित सुशिक्षितांच्या हाती पडली असल्याने गोंधळ बऱ्याच अंशी नाहीसे झाला; परंतु या एकंदर रदबदलीचा परिणाम, आज तागाईत पॅरिशाला स्थानिक स्वराज्याच्या एक या नात्याने जे एक प्रकारचे महत्त्व असे ते बहुतेक सर्व नाहीसे झाले, असा झाला.

मध्यवर्ती नियंत्रण शक्ती असणे ही गोष्ट स्थानिक व्यवस्थापनेच्या संबंधात इष्ट आहे, असे पुअर लॉ दुरुस्तीच्या कायद्याने प्रत्ययास आणून दिलेले आपल्या अवलोकनात आलेलेच आहे. हा कायदा पसार होईपावेतो स्थानिक अधिकाऱ्यांकडे जोपर्यंत ते कायद्याचे धडधडीत उल्लंघन करीत नसत तोपर्यंत बहुतकरून स्वतंत्र सत्ता असे. पॅरिश अधिकाऱ्यांवर देखरेख जी काय असे, ती केवळ कौंटी मॅजिस्ट्रेटांची व तीही करडी व एकसारखी नसे. कौंटी अधिकारी व म्युनिसिपल कॉर्पोरेशने यावर कोणाचीच देखरेख नव्हती. स्थानिक अधिकारी अज्ञान असल्यास ते तसेच अज्ञानात राखण्यात येत, ते जर आळशी असले तर त्यांना चापल्य आणणे दुरापास्त होते, तसेच ते जर सचोटीचे नसतील तर त्यांना स्वतःचे दोष उघडकीस येऊ न देता शिक्षा टाळता येईल इतकी धूर्तता असली म्हणजे पुरे होई. अशा स्थितीत स्थानिक शासन हे नेहमी निकामी असे. सांप्रत मध्यवर्ती नियंत्रणाची स्थापना सन १८३४ पासून सुरू झाल्याने व तेच लोकल गव्हर्नमेंट बोर्डामध्येही कायम राहिल्याने, स्थानिक अधिकाऱ्यांत दिसून येणारे ज्ञान, उद्योग व सचोटी यांची इयत्ता वाढलेली आहे, म्हणून असे नियंत्रण असणे न्याय आहे असे त्याजपासून होणाऱ्या परिणामांवरून दिसून आले आहे. पुरातन काळापासून इंग्लिश लोकांमध्ये चालत आलेली जी स्थानिक स्वराज्याची कल्पना आहे तिजहून ही सांप्रतची अमलात आलेले नियंत्रण - पद्धती फारच विभिन्न आहे, हे सांगणे नकोच.

सन १८३५ चा म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट : जोपावेतो जुन्या तऱ्हेच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशनतर्फेचे सभासद कॉमन्स सभेत पुष्कळ होते तोपावेतो त्यांनी सुधारणेस दाद दिली नाही; परंतु सन १८३२ च्या सुधारणेच्या कायद्याने जेव्हा त्यांची राजकीय सत्ता नाहीशी झाली तेव्हा सुधारणेसंबंधीची त्यांची दृढ अनिच्छाही नष्ट झाली. सन १८३५ मध्ये लॉर्ड मेलबोर्न

अधिकारारूढ असता त्याच्या सल्लागारांनी लंडनखेरीजकरून इतर स्थानिक हक्क संपादन केलेली शहरे व गावे यांची जुनी व्यवस्था मोडून नवीन एक तऱ्हेची व लोकमताने चालणारी अशी व्यवस्था अमलात आणण्यासंबंधाचा एक मसुदा मंत्रिमंडळापुढे आणला. बड्या लोकांच्या सभेने अखेरीस पसंत केलेल्या या कायद्याने मागील तीन वर्षांत गरिबासंबंधाचा कर ज्यांनी ज्यांनी भरला असेल त्यास टाऊन कौन्सिलचे सभासद निवडण्याचा हक्क आहे असे ठरविले. टाऊन कौन्सिलर मंडळीने काही ऑल्डरमन निवडावेत व हे ऑल्डरमन व टाऊन कौन्सिल मिळून एका लॉर्ड मेअरची नेमणूक करावी, अशा रीतीने निवडलेल्या मेअराकडे त्याचा अधिकार एक वर्ष, ऑल्डरमनांकडे सहा वर्षे व टाऊन कौन्सिलकडे तीन वर्षे असावा. मेअर, आल्डरमेन व कौन्सिलर हे सर्व मिळून टाऊन कौन्सिल बनावे, त्याचे कामकारभार उघडपणे चालावे व त्यांचे हिशोब खजिनदारांनी तपासावेत, अशी तजवीज करण्यात आली होती. या कायद्यान्वये त्यांची मुख्य कामे शहरांत दिवे लावणे व शहर संरक्षण करणे ही असत; परंतु पुष्कळ अलीकडील कायद्यान्वये व विशेषतः सार्वजनिक आरोग्याच्या कायदा व मजुरांच्या घरांचे संबंधाचे कायदे, यांनी त्यांच्यावर नवीन आणि महत्त्वाची कामे सोपविण्यात आली आहेत.

पुष्कळशा लहान लहान शहरांना हा कायदा लागू केला नव्हता म्हणून पुष्कळ वर्षेपावेतो तेथे त्यांची जुनीच व तऱ्हेवाईक कारभार पद्धती चालू होती. सन १८८३ च्या एका कायद्यान्वये हे सर्व बरोज कमी केले व तेथील रहिवाशांनी राजाकडे नवीन तऱ्हेच्या सनदा मिळविण्यासाठी अर्ज करावेत, अशी त्यास सवलत दिली. नवीन सनदा मोठ्या गावांपैकी थोड्यांनीच संपादन केल्या आहेत. कोणत्याही अर्थाने पाहिले तरी ज्यांना गावे म्हणण्यापेक्षा खेडीच म्हणणे शोभेल अशी जी इतर गावे होती त्यांचा हल्लीचा कारभार त्यांच्या सभोवतालच्या प्रदेशात चालणाऱ्या कारभाराप्रमाणे चालत आला आहे. जुन्या पद्धतीचे म्युनिसिपल कॉर्पोरेशन काय ते एकट्या लंडन शहरात मात्र अविशिष्ट राहिले आहे.

तथापि, सांप्रतच्या लंडन शहरच्या थोड्याच भागावर कॉर्पोरेशनचा अंमल चालतो. लंडनच्या बाकी भागांची व्यवस्था सन १८५५ सालापासून एका विशिष्ट व्यवस्थापक मंडळीकडे सोपण्यात आलेली आहे. मुख्य शहर भागाच्या बाहेरील वस्तीची सुधारणा करण्याकरिता त्याच सालात पसार झालेल्या एका कायद्याने मेट्रोपॉलिटन बोर्ड ऑफ वर्कर्सची स्थापना झाली. या बोर्डाने मेम्बर (सभासद) निरनिराह्या पॅरिशांच्या व्हेस्ट्रींकडून निवडून येत. लंडन शहरच्या पॅरिश व्हेस्ट्रींची मंडळी कर भरणारे निवडीत असत. सन १८८८ मध्ये 'बोर्ड ऑफ वर्ल्स'मोडून त्याऐवजी 'लंडन कौंटी कौन्सिल' स्थापित झाले. या कौन्सिलातील सभासद प्रत्यक्ष निवडणुकीने निवडून येत व या कौन्सिलला अधिकारही जास्त असत. शहराबाहेरील लंडनच्या पोलिसांवर स्वतंत्र सरकारी सत्ताच अद्याप चालत आलेली आहे.

इंग्लंडमधील कॉर्पोरेट (सनदी) शहरांत ज्याप्रमाणे पूर्वी घोटाळे होते त्याचप्रमाणे

स्कॉटलंडमधील व आयर्लंडमधील कॉर्पोरेट शहरांतही ते होते. स्कॉटलंडमधील कॉर्पोरेशनची सुधारणा सन १८३५ च्या कायद्याने झाली व आयर्लंडमधील कॉर्पोरेशनची, सन १८३८ च्या कायद्याने झाली. इंग्लंडमध्ये ज्या तत्त्वास अनुसरून सुधारणा झाल्या त्याच तत्त्वास अनुसरून या उभय देशांतही झाल्या.

सार्वजनिक आरोग्यासंबंधी कायदे, १८४८-१८७५ : जुन्या स्थानिक राज्यव्यवस्थेत सार्वजनिक आरोग्यरक्षणाच्या चांगल्याशा सोई नसत. अशा प्रकारच्या सोई होण्यास आरंभ या शतकात झालेल्या सार्वजनिक आरोग्यासंबंधी कायद्याने केला. या कायद्याने कॉर्पोरेट शहरांतील टाऊन कौन्सिले व खेड्यातील संरक्षक बोर्डे यांनाच आरोग्यासंबंधी अधिकार देण्यात आले कॉर्पोरेट शहराचा संबंध नसणाऱ्या भरवस्तीच्या भागांकरिता आरोग्यरक्षणानिमित्त निवडून आलेल्या लोकल बोर्डींची स्थापना करण्यात आली. सर्व आरोग्यरक्षक अधिकाऱ्यांना पाण्याचा वठा करणे, सांडपाण्यासाठी मोऱ्या बांधणे उपद्रवजनक गोष्टी नाहीशा करणे व दवाखाने व स्मशानभूमींची व्यवस्था करणे इत्यादी कामानिमित्त अधिकार देण्यात आले आहेत. म्युनिसिपल बरोज व लोकल बोर्डाच्या अमलाखाली असलेल्या प्रांतातील आरोग्यरक्षक अधिकाऱ्यांकडे वरील अधिकारांशिवाय, त्यांनी व्यापारी दळणवळणाची सोय लावावी, राजमार्ग स्वच्छ व दुरुस्त ठेवावे व शहराच्या सर्व तहेच्या सुधारणा कराव्यात हेही अधिकार दिले आहेत. या कायद्यांनी दिलेले अधिकार निदान शहरातून तरी मोठ्या जारीने अमलात येत असत. सांप्रत काही टाऊन कौन्सिलच्या कामांपैकी मोठ्या महत्त्वाचे व फार खर्चाचे काम म्हटले म्हणजे आरोग्यासंबंधी व्यवस्था राखणे हे झालेले आहे.

स्थानिक राज्यव्यवस्थेचा कायदा सन १८८८ : लोकसत्तात्मकत्वाच्या कल्पनांचा प्रसार व तद्नुसार झालेले इंग्लंमधील संस्थांचे पुनःसंस्थापन यांच्या, योगाने कौंटीतील राज्यव्यवस्थाही निवडणुकीच्या पद्धतीनेच व्हावी अशाबद्दल मागणी सुरू झाली. अशा प्रकारची व्यवस्था सन १८८८ च्या लोकल गव्हर्नमेंट ॲक्टने स्थापित झाली. या कायद्याने राज्यव्यवस्थेसाठी इंग्लंड देशाच्या निरनिराळ्या कौंटी बनविल्या. हे विभाग स्वतंत्र कौंटी असे असत, अगर कामाच्या व्यवस्थेच्या सोईकरिता कौंटीचे पोटविभाग बनलेले असत. उदाहरणार्थ, यॉर्कशायराचे रॉयडिंग्स प्रत्येक कामकाजाकरिता ठरविलेल्या कौंटीत कॉर्पोरेट शहराप्रमाणे एक एक कौन्सिल नेमण्यात आले. या कायद्याप्रमाणे कर भरणाऱ्या लोकांनी काही कौन्सिलर पसंत करावयाचे व त्यांनी आल्डरमन व सदर कौन्सिलर व आल्डरमन यांनी एकमताने चेअरमन (अध्यक्ष) पसंत करावयाचा, असे ठरविण्यात आले होते. चेअरमनची मुदत एक वर्षाची, आल्डरमनांची सहा व कौन्सिलरांची तीन वर्षांची ठरविण्यात आली होती. कौन्सिलर, आल्डरमन आणि चेअरमन या तिघांच्या समन्वयाने कौंटी कौन्सिल बनावयाचे होते. पोलिसांवरील देखरेख राखणे व मादक दारूच्या विक्रीकरिता परवाने देणे.

या दोन बाबींखेरीज न्यायधीशांची सर्व अंमलबजावणीची कामे कौंटी कौन्सिलकडे देण्याचे ठरले. याशिवाय कौन्सिलकडे कमी दर्जाच्या स्थानिक अधिकांकडे आजवर असलेले काही अधिकार देण्याचे ठरले व त्याचप्रमाणे मध्यवर्ती सरकाराकडे असलेली काही लहान लहान कामेही त्याजकडून निघून या कौन्सिलकडे आली. आजपावेतो कौंटीतील वतनदार लोक ज्या करोनराची निवडणूक करीत असत त्या करोनराची निवडणूक कौन्सिलने करण्याचे ठरले. पूर्वी नमूद केल्याप्रमाणे लंडन शहराच्या बाह्यभागांची व्यवस्था राखण्याकरिता काही विशेष अधिकार देऊन एका कौंटी कौन्सिलची स्थापना झालेली होतीच.

५०००० लोकवस्तीपेक्षा जास्त लोकवस्तीच्या सर्व कॉर्पोरेट शहरांना कौंटीच्या ताब्यातून रदबादल करण्यात आले व सदर शहरांना कौंटी बरोजची योग्यता मिळाली. असल्या बरोजमध्ये जी टाऊन कौन्सिले असतात ती कौंटी कौन्सिलच्याच योग्यतेची असतात.

स्थानिक राज्यव्यवस्थेचा कायदा, १८९४ : पॅरिशातील सर्व दिवाणी कामे धर्माच्या कामापासून वेगळी करण्याचा व पॅरिशचे स्थानिक स्वराज्य जास्त विस्तृत करण्याचा या कायद्याचा हेतू होता. हल्ली प्रत्येक खेड्यापाड्यातील पॅरिशमध्ये व्हेस्ट्री (धर्मगुरूची सभा) हून एक अगदी भिन्न अशी एक पॅरिशची सभा असते. एखाद्या पॅरिशाची लोकसंख्या ३०० हून अधिक असली तर तसले पॅरिशात दरवर्षी कर भरणारांनी निवडलेल्या लोकांचे एक कौन्सिल असते. हे कौन्सिल आपला अध्यक्ष निवडिते. या नव्या कौन्सिलास व्हेस्ट्रीची सर्व दिवाणी कामे पाहण्याचा अधिकार व पूर्वी व्हेस्ट्रीस कधीही न मिळालेले काही अधिकार, देण्यात आले आहेत. चर्च वॉर्डनांकडे हल्ली गरिबांवरील ओव्हरसीअरांचे (देखरेख करणाऱ्यांचे) काम नसते व कौन्सिल आपापले ओव्हरसीअर निवडून घेते. शहरातील पॅरिशांची स्थिती खेड्यापाड्यांतील पॅरिशांहून फार भिन्न असल्यामुळे तसल्या पॅरिशांस या कायद्याची कलमे लागू करणे हे उचित वाटले नाही.

उपसंहार : सूक्ष्मदृष्टीने पाहिले असता तिसरे जॉर्जच्या निधनानंतर इंग्लंडमधील बहुतेक राजकीय पुनर्घटना लोकसत्तात्मक राज्याच्या तत्त्वानुरूप झालेली आहे व ज्यांच्यात लोकसत्तात्मकत्वाचा विचारच नाही अशा ज्या काही थोड्याशा संस्था शेष आहेत, त्यांचे पूर्वीचे वैभव व अधिकार नाहीसे झाले आहेत, असे आढळण्यात येईल. या दूरवर खोल गेलेल्या क्रांतीचे परिणाम आजला निश्चिततेने ठरविता येत नाहीत. मोठमोठाल्या राजकीय उलाढाली ज्या काळात होतात त्या काळाच्या जवळपासच्या काळात राहणाऱ्यांना त्याचे यथार्थ ज्ञान कधीही असत नाही; परंतु प्राचीन व प्रसिद्ध लोकांच्या परंपरागत चालत आलेल्या समजुतीची साखळी न तुटता व महान अनर्थही न घडता जर क्रांती घडून आल्या असल्या तर समाधानाला सयुक्तिक कारण आहे. या संबंधात इंग्लंड विशेष प्रकारे सुखी आहे. ब्रिटन देश जर्मन लोकांनी जिंकून घेतल्यापासून परकीयांच्या स्वाऱ्या, आपसातील

लढाया व धार्मिक छळ झाले असताही आमच्या राजकीय जीवित्वाचा तंतू एकवारही तुटला नाही. इंग्लिश संस्थांच्या इतिहासाला आरंभ होऊन आज अव्याहत १४०० वर्षांवर कालावधी होऊन गेलेला आहे. या संस्थांच्या योगाने इंग्लिश राष्टाची जी भरभराट झाली आहे व ज्या स्वास्थ्याचा त्यास अनुभव आला आहे, तशी भरभराट व ते स्वास्थ्य इतर कोणाही लोकांना मिळाल्याचा दाखला उपलब्ध झालेला नाही. राजकीय सुस्थितीचे एकच कारण अगर मुख्य कारण सत्संस्था आहेत, हा समज चुकीचा होईल. संस्था या स्वतः जडवस्तू आहेत. सार्वजनिक कामात जे लोक शहाणपणा, न्याय्यवर्तन व सहनशीलता धारण करीतात व अशा संस्थांचा उपयोग कसा करून घ्यावा हे ज्यास समजते, अशांनाच त्या उपयोगाच्या असतात. या सद्गुणांची आमच्यात गतकाली कधीही पूर्ण उणीव नव्हती. हेच सद्गुण जर आम्ही कायम राखले तर आम्ही भावी काळातही असेच वैभवशाली व आहोत त्यापेक्षा जास्त सुखी होऊ.

❍❍❍

नीतिशास्त्रविचार

लेखक
विनायक सदाशिव गोगटे

पाश्चात्त्य तत्त्वज्ञान या मूळ पुस्तकाचे स्कॅन केलेले पहिले पान वाचकांसाठी

नीतिशास्त्रविचार

लेखक

विनायक सदाशिव गोगटे, एम्. ए.
काशिनाथ त्र्यंबक तेलंग गोल्ड मेडॅलिस्ट;
तत्त्वज्ञानाचे अध्यापक,
बाहाउद्दिन कॉलेज, जुनागड;
ज्ञान-सिंधु आणि इतर लघुकथा ' या पुस्तकाचे कर्ते.

द्वितीयावृत्ति] [जानेवारी १९३४

प्रकाशक

केमकर आणि मंडळी, बुकसेलर्स,
गिरगांव बॅकरोड, मुंबई नं. ४

किंमत १। रुपया

प्रो. रा. द. रानडे यांच्या प्रथमावृत्तीच्या प्रस्तावनेतील उतारा

माझे मित्र व विद्यार्थी प्रो. विनायक सदाशिव गोगटे, एम. ए. यांनी आपल्या 'नीतिशास्त्रविचारा'स प्रस्तावना लिहिण्यास सांगितले, ती लिहिण्यास मजला फार आनंद होत आहे. प्रो. गोगटे यांचे वय अल्प असून, नीतिशास्त्र या प्रकारचा पक्व ग्रंथ त्यांनी लिहावा हे त्यांस फार भूषणावह आहे. पुस्तकातील भाषा फारच सरळ व सुबोध असून, हृदयंगमही आहे. विचाराची दिशा पाश्चात्त्य व पौरस्त्य या उभय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने ठरविली असून, नीतिशास्त्रातील बहुतकरून प्रत्येक प्रश्नाचा या ग्रंथात विचार केला गेला आहे. लो. टिळक, प्रो. वामन मल्हार जोशी, रा. कोल्हटकर यांनी मराठी भाषेमध्ये पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा ऊहापोह विस्तृत रीतीने करून मराठी भाषा पाश्चात्त्य तत्त्वज्ञांच्या विचारांची चर्चा करण्यास पूर्णपणे समर्थ आहे हे सिद्ध करून दिले आहे. प्रो. गोगटे यांनी याच विचारसरणीचा अवलंब करून मराठीमध्ये आधुनिक पाश्चात्त्य नीतिशास्त्रविचारांची चर्चा विशद व सुबोध रीतीने केली आहे, हे त्यास भूषणावह होय. प्रथम ऐतिहासिक पद्धती म्हणजे काय व नीतिशास्त्राचा ऐतिहासिक रीतीने अभ्यास कसा करावा हे प्रो. गोगटे यांनी सांगितले आहे. नंतर सदसद्विवेकबुद्धीची व्यतिरेकान्वयात्मक चर्चा त्यांनी केली आहे. नंतर नीतिदृष्ट्या कोणत्या प्रकारच्या वागणुकीस प्रमाण समजावे व त्या प्रमाणानुरूप वर्तन ठेविल्यास मनुष्याचे स्वातंत्र्य गमावले जाईल किंवा काय, याचा त्यांनी विचार केला आहे. नंतर मनुष्याने सर्व दृष्टीने आपली उन्नती करून घेणे हे श्रेष्ठ किंवा क्षणोक्षणी आपल्या हिताचा त्याग करणे हे श्रेष्ठ, या विषयाचा त्यांनी विचार केला आहे. व्यवसायाची निवड कोणत्या प्रकाराने करावी व कोणता व्यवसाय पत्करला असता आपले अंतिम हित साधल्याप्रमाणे होईल, याचे दिग्दर्शन करून पुढे समता म्हणजे काय आणि शासन करणे हे योग्य आहे की नाही, असल्यास कोणत्या भावनेने प्रेरित होऊन शासन करावे, याचा त्यांनी ऊहापोह

केला आहे. शेवटी नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान यांचा, नीती आणि धर्म यांचा परस्परसंबंध कसा आहे हे दाखवून व नीतिशास्त्राच्या अध्ययनाचे ध्येय 'राजाने तत्त्वज्ञानी बनले पाहिजे' व 'तत्त्वज्ञान्याने राज्य मिळविले पाहिजे.' या प्लेटोच्या उपदेशांत असल्याचे दाखवून प्रो. गोगटे यांनी आपला ग्रंथ पूर्ण केला आहे. अशा प्रकारचा ग्रंथ मराठी वाचकांच्या पुढे ठेविल्याबद्दल प्रो. गोगटे यांचे आभार मानून ही छोटीशी प्रस्तावना पुरी करितो.

निंबाळ, एम. एस. एम. रेल्वे **- रा. द. रानडे**

ता. १५-३-१९२४

काही अभिप्राय

...श्री. गोगटे यांनी विषय मनोरंजक व सोपा करून दाखविला आहे. ग्रंथ सर्वसामान्य लोकांसही व्यवहारात मार्गदर्शक होण्यासारखा आहे... **- केसरी**

...पुस्तकात नुसत्या पाश्चिमात्य नीतिशास्त्राच्या मताचेच विवेचन केले नसून ठिकठिकाणी पौर्वात्य नीतिशास्त्रज्ञांच्या मतांचाही उल्लेख आहे. शिवाय आधुनिक नीतिशास्त्रविषयक मतांचाही विचार केला असल्यामुळे पुस्तकास एक प्रकारची पूर्णता आली आहे... **- ज्ञानप्रकाश**

...पुस्तक सामान्य सुसंस्कृत वाचकांसही सहज समजण्यासारखे सुलभ व चटकदार झाले आहे. त्यांची भाषा जोरदार व स्पष्ट असून, विचार विशदपणे व्यक्त करण्याची हातोटी त्यांनी चांगली साधली आहे... पुस्तकातील सर्वच प्रकरणे वाचनीय व मननीय आहेत... **- महाराष्ट्र**

...ग्रंथाची भाषा प्रौढ व भारदस्त आहे आणि विचारसरणी मार्मिक व समतोलपणाची आहे... **- विविधज्ञानविस्तार**

...रा. गोगटे यांची चर्चा करण्याची पद्धतही चांगली आहे. तीत विचारांचा गोंधळ मुळीच न करता मांडणी व्यवस्थित, सरळ व समजण्यास साधी अशी केलेली आढळते... विचारसरणी कोठेही पाल्हाळीक नाही... कोणत्याही एका पक्षाची बाजू धरण्याचा अन्याय या पुस्तकात केलेला नाही व समतोलपणाकडे बरेच लक्ष देण्यात आलेले आहे. हा या पुस्तकाचा विशेष गुण आहे... **- धर्मजागृती**

...पुस्तकाची भाषा गोड व शुद्ध असून, पुस्तकाच्या 'शरीरा'त इंग्रजी शब्द एकही वापरला नाही हे फार चांगले आहे. लेखकाचे विचार प्रगतिषर व जोमदार आहेत. तत्त्वज्ञानाची आवड नसणारांनाही पुस्तक वाचनीय वाटेल... **- सहविचार**

.....भाषा प्रौढ व भारदस्त, विवेचनपद्धती मार्मिक, मनोरंजक व एकंदरीत वाचकांना स्फूर्ती देणारी आहे... **- डेक्कन कॉलेज त्रैमासिक**

...नीतिशास्त्रातील कित्येक सिद्धांतांचे सुगम विवेचन करून शेवटी नीतिशास्त्र व्यवहारात अगदीच अनुपयुक्त आहे या मताचा निरास करून ग्रंथ समाप्त केला आहे. ...विवेचनपद्धती शास्त्रशुद्ध आहे. क्वचित स्थळी भाषेत विनोदही आहे... **- टिळक महाविद्यालय त्रैमासिक**

... प्रो. गोगटे यांनी बहुतेक सर्व मुख्य प्रश्नांची फारच सुलभ; पण विषयास योग्य अशा प्रौढ भाषेत मांडणी केली आहे... 'शासन व क्षमा', 'आत्मोन्नती व स्वार्थत्याग', 'व्यवसायाची निवड' वगैरे भानगडीच्या प्रश्नांची समतोलपणाने चर्चा करून नीतिशास्त्राचा धर्म व तत्त्वज्ञान याशी संबंध दाखविला आहे... एकंदरीत हे एकादशप्रकरणात्मक पुस्तक उत्तम रीतीने साधले आहे... **- न्यू पूना कॉलेज मॅगेझीन**

....या ग्रंथाची भाषा प्रौढ व भारदस्त आहे आणि विचारसरणी मार्मिक व समतोलपणाची आहे... श्री. गोगटे यांनी अल्पावधीतच इतका चांगला ग्रंथ निर्माण केला यावरून त्यांचे तत्त्वज्ञानावरील खरे, उत्साहपूर्ण व कर्तृत्वशाली प्रेम दिसून येते... समता, व्यवसायाची निवड इत्यादी अर्धवट व्यावहारिक व गुंतागुंतीच्या प्रश्नांचे देखील सुंदर विवेचन करून नीतिशास्त्र हे व्यवहाराच्या अगदी बाहेरचे असे केवळ तात्त्विक शास्त्र नाही, असे सिद्ध करण्याचा श्री. गोगटे यांनी स्तुत्य प्रयत्न केला आहे... **- प्रो. वामन मल्हार जोशी**

... The book makes a decent, handy and fairly complete survey of the problems which the author sets to himelf... Mr. Gogate has taken good care to choose his topics and after choice, to begin and round off the discussion on the same as completely as the small compass of his book would allow. **- The Mahratta.**

... The author makes out a case for the historical method... He proves that the worth of moral principles and rules is not lessened by tracing their evolution through the ages... **- The Indian Daily Mail**

...The lucidity of thought, clearness of expression and the power of explaining abstruse poin's with apt illustrations are noticeable. The manul will no doubt evoke among its readers a desire to know more about ethical problems... **- The Modern Review**

आधारभूत ग्रंथांची यादी

Hastings Rashdall-The Theory of Good and Evil (2 vols.)
F. H. Bradley-Appearance and Reality.
James Martincau-Types of Ethical Theory
J. S. Mackenzie-Manul of Ethics.
बा. गं. टिळक - भगवद्गीतारहस्य

उल्लेखित ग्रंथ

Rev. John Mackenzie-Hindu Ethics.
E. W. Hopkins-Ethics of India.

लेखकाचे चार शब्द

या पुस्तकाची प्रथमावृत्ती १९२४ मध्ये अंमळनेर येथील तत्त्वज्ञान मंदिराने प्रकाशित केली व ती वाचकवर्गास बरीच आवडली, असे म्हणावयास हरकत नाही. डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीकडून व ग्वाल्हेर, इंदूर, बडोदा इत्यादी संस्थानांतून पुस्तकास चांगले उत्तेजन मिळाले व हिंगणे येथील स्त्रियांच्या विद्यापीठाने जी. ए. च्या अभ्यासक्रमात ते नुकतेच प्रविष्ट केले आहे. त्याची दुसरी आवृत्ती मुंबईची प्रसिद्ध केमकर आणि मंडळी यांच्याकडून प्रकाशित होत आहे.

या आवृत्तीत पुढील फेरफार केले आहेत. 'ऐतिहासिक पद्धती' हे प्रकरण प्रथमावृत्तीत पहिले आहे; परंतु ते किंचित कठीण व पुस्तकाच्या मुख्य विषयाहून थोडे निराळे असल्यामुळे ते या आवृत्तीत शेवटी घातले आहे. प्रथमावृत्ती प्रसिद्ध झाल्यानंतर रत्नाकर मासिकात लिहिलेला 'नीतिशास्त्र व आत्मस्वातंत्र्य' हा लेख या आवृत्तीत १० वे प्रकरण म्हणून समाविष्ट केला आहे, तसेच नीतिशास्त्राचा इतर काही शास्त्रांशी असलेला संबंध दिग्दर्शित करण्यासाठी एक व रेव्हरंड जॉन मॅकेन्झी यांच्या भारतीय नीतिशास्त्रावरील ग्रंथाचे परीक्षण करण्यासाठी एक अशी दोन परिशिष्टे जोडली आहेत. मूळ आवृत्तीतील परिशिष्ट आत्मस्वातंत्र्यविषयक असल्यामुळे ते त्या प्रकरणात गोवले आहे.

पुस्तकाच्या प्रथम व द्वितीय आवृत्तीच्या वेळी ज्या अनेक मित्रांनी मला बहुमोल मदत केली व ज्या अनेक नियतकालिकांनी प्रथमावृत्तीवर विस्तृत अभिप्राय लिहून पुस्तकाचा गौरव केला त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे. त्याचप्रमाणे श्री. केमकर आणि मंडळी यांनी पुस्तक प्रकाशित करण्याच्या कामी अत्यंत परिश्रम घेतल्याबद्दल त्यांचे व मुंबई वैभव छापखान्याच्या चालकांनी आपल्या लौकिकास अनुसरून छपाईचे काम सुंदर रीतीने केल्याबद्दल त्यांचेही आभार मानणे जरूरी आहे. या पुस्तकाच्या वाचनाने नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान यांचे अध्ययन करण्याची आवड वाचकांत उत्पन्न झाली, तर माझ्या या अल्प परिश्रमाचे सार्थक झाले, असे मी समजेन.

बाहाउद्दीन कॉलेज, जुनागड **- वि. स. गोगटे**

ता. १-१-१९३४

अनुक्रमणिका

प्रकरण १ ले..... सदसद्विवेकबुद्धी म्हणजे काय?...४६१

प्रकरण २ रे ..... सद्सदविवेकबुद्धीचे स्वरूप...४६९

प्रकरण ३ रे ..... नैतिक प्रामाण्य व नैतिक स्वातंत्र्य...४७३

प्रकरण ४ थे ..... आत्मोन्नती व स्वार्थत्याग...४८२

प्रकरण ५ वे ..... व्यवसायाची निवड...४९५

प्रकरण ६ वे ..... खरी समता कशात आहे?...५०६

प्रकरण ७ वे ..... शासन व क्षमा...५१७

प्रकरण ८ वे ..... नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान...५२५

प्रकरण ९ वे ..... नीती व धर्म...५३१

प्रकरण १० वे ..... नीतिशास्त्र आणि आत्मस्वातंत्र्य...५३९

प्रकरण ११ वे ..... नीतिशास्त्राची उपयुक्तता...५५२

प्रकरण १२ वे ..... ऐतिहासिक पद्धती...५५८

परिशिष्ट (अ) ..... - नीतिशास्त्र व इतर शास्त्रे...५६७

परिशिष्ट (आ)..... - रे. मॅकेन्झी व भारतीय नीतिशास्त्र...५७२

प्रकरण १ ले

सदसद्विवेकबुद्धी म्हणजे काय?

अलीकडील राजकारणात सदसद्विवेकबुद्धी म्हणजे काय व तिच्या बंधनास मर्यादा आहे की नाही या प्रश्नास बरेच महत्त्व आले आहे. एका माणसाच्या सदसद्विवेकबुद्धीस जे पटते ते दुसऱ्याच्या सदसद्विवेकबुद्धीस पटत नाही व एका काळच्या लोकांना जी गोष्ट नैतिकदृष्ट्या योग्य वाटते तीच दुसऱ्या काळच्या लोकांना अयोग्य अगर निंद्यही वाटते. यामुळे सदसद्विवेकबुद्धी ही चीज आहे तरी काय व ती आपणास कितपत बंधनकारक आहे हे प्रश्न साहजिकच उत्पन्न होतात. एका दृष्टीने असे वाटते की, आपल्या सदसद्विवेकबुद्धीस जी गोष्ट करणे योग्य वाटेल ती सबंध आकाश जरी कोसळले तरी केल्याशिवाय कधीही राहू नये, यातच खरे नीतिधैर्य व खरी नीतिनिष्ठा आहे. उलटपक्षी असेही वाटते की, कोणत्याही एका व्यक्तीने सर्वस्वी आपल्याच सदसद्विवेकबुद्धीवर प्रत्येक बाबतीत इतका विश्वास ठेवू नये. मिल्लने विनोदाने म्हटल्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीची सदसद्विवेकबुद्धी ही गाढवाच्या सदसद्विवेकबुद्धीप्रमाणे चुकीची व कुचकामाची असू शकेल. प्रत्येकाची सदसद्विवेकबुद्धी नेहमीच बिनचूक व योग्य निवाडा देईल, असे नाही. यासाठी नेहमी आपलेच म्हणणे खरे करण्यापेक्षा चार लोकांचा विचार घेऊन बहुमताने चालण्यातच शहाणपणा आहे. ही दोन्ही तत्त्वे सारखीच खरी व योग्य दिसत असल्यामुळे, यापैकी अधिक श्रेष्ठ तत्त्व कोणते हे ठरविणे अत्यंत कठीण आहे व तसे ठरविता न आल्यामुळे काहीच न करता हात जोडून स्वस्थ बसण्याची पाळी कित्येकांना येत असल्यास नवल नाही. अशी गोष्ट सांगतात की, दोन्ही बाजूंस सारख्याच अंतरावर ठेवलेल्या एकाच प्रकारच्या गवताच्या पेंढ्यांपैकी कोणती खावी याचा निर्णय करता न आल्यामुळे एक बैल भुकेने व्याकूळ होऊन मेला ! अशीच स्थिती काही विचारी माणसांची होण्याचा संभव आहे. असा हा प्रश्न मोठा बिकट; परंतु मनोरंजक असल्यामुळे सदसद्विवेकबुद्धी म्हणजे काय, तिचा उगम कशात आहे व तिचे

स्वरूप काय, या विषयाचे विवेचन या प्रकरणात करण्याचे योजिले आहे. अर्थात्, या योगाने सद्सदविवेकबुद्धी ही एखाद्या प्रदर्शनात मांडलेल्या वस्तूप्रमाणे स्पष्ट व सुगम होऊन जाऊन ती विषयीचे सर्व प्रश्न एकदम सुटतील, असे कोणी समजू नये.

प्रश्न असा आहे की, एखाद्या पदार्थाची बरी-वाईट चव, वास अगर शोभा कळण्यास ज्याप्रमाणे आपणास आपल्या इंद्रियांचा उपयोग होतो, अगर तर्कशास्त्रांतील एखाद्या अनुमानाची सत्यासत्यता ठरविण्यास आपली तार्किक बुद्धी उपयोगी पडते, त्याप्रमाणे नैतिकदृष्ट्या कोणत्याही गोष्टीचा बरेवाईटपणा ठरविण्यास कोणता मार्ग उपलब्ध आहे? 'आपली सदसद्विवेकबुद्धी !' असे कोणी चटकन उत्तर देईल; परंतु तिचेच स्वरूप ठरविणे अत्यंत कठीण आहे. कारण इतर इंद्रियांप्रमाणे ती दृश्य नसल्यामुळे तिच्या खऱ्या स्वरूपाबद्दल बराच मतभेद होतो; परंतु तिचे खरे स्वरूप समजणे जितके कठीण तितकेच आवश्यकही आहे. तार्किक सिद्धांताच्या बाबतीत एकवाक्यता अगर सार्वत्रिकता दिसून आली नाही, तरी आपणास त्या गोष्टीचे फारसे महत्त्व वाटत नाही. केवळ मतभेद म्हणून आपण ती गोष्ट सोडून देतो; परंतु नैतिक बाबतीत म्हणजे आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या बाबतीत मतभेद झाल्यास आपल्या नीती-अनीतीच्या कल्पनास बसणारा धक्का आपणास सहन होत नाही व तो मतभेद दूर करण्याचा आपण शक्य तितका प्रयत्न करतो.

काही लोकांचे असे म्हणणे आहे की, कोणतीही गोष्ट करण्याची वेळ आली की, त्या वेळी आपणास तिचा बरेवाईटपणा एकदम अंतःस्फूर्तीने समजतो व ही अंतःस्फूर्ती म्हणजेच आपली सद्सदविवेकबुद्धी असे ते मानतात. या मताप्रमाणे अर्थात्च कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी विचार करण्याची अगर नियम ठरविण्याची मुळीच जरूरी नाही. कोणतीही गोष्ट करण्याची वेळ आली की, आपली अंतःस्फूर्ती आपणास एकदम बिनचूक निर्णय देते. आपणही मागचा-पुढचा विचार न करता ताबडतोब त्या अंतःस्फूर्तीच्या आज्ञेप्रमाणे उडी टाकावी ! हे मत ग्राह्य मानल्यास कोणत्याही कृत्याची युक्तायुक्तता प्रत्येक व्यक्तीच्या त्या त्या वेळच्या इच्छेवर अगर लहरीवर अवलंबून असते व त्या इच्छेबरोबर अगर लहरीबरोबर बदलतही जाते, असे म्हणावे लागेल. आज मला एखादी गोष्ट करण्याची अंतःस्फूर्ती होईल; परंतु उद्या-परिस्थिती यत्किंचितही बदललेली नसताना तीच गोष्ट करणे मला अयोग्य वाटल्यास माझ्या दोन्ही दिवसांचे परस्परविरोधी वर्तन अंतःस्फूर्तीने घडलेले म्हणून सारखेच योग्य अगर नैतिक म्हणावयाचे काय? शिवाय एकाच बाबतीत निरनिराळ्या व्यक्तींच्या अंतःस्फूर्तीनी निरनिराळा निर्णय दिल्यास, ते सर्व निर्णय सारखेच ग्राह्य मानावयाचे की काय? ते तसे मानल्यास मोठीच अनवस्था होईल हे उघड आहे. खरी नीतीतत्त्वें ही कोणत्याही एका व्यक्तीच्या अंतःस्फूर्तीवर, लहरीवर अगर इच्छेवर अवलंबून नसून ती पूर्णपणे निरुपाधिक, सार्वत्रिक व शाश्वत असली पाहिजेत, तशी ती नसल्यास सर्वच नीतिमत्ता सापेक्ष होऊन जाऊन मला जे वाटते ते मला योग्य व तुला जे वाटते ते तुला योग्य, असा प्रकार होईल.

अर्थात परिस्थिति भिन्नत्वामुळे कित्येकदा व्यक्तीव्यक्तीच्या अगर एकाच व्यक्तीच्या निरनिराळ्या वेळच्या कर्तव्यांमध्ये भेद होईल. आज जी गोष्ट करणे सर्वस्वी जरूरी आहे ती उद्या करणे योग्य होईलच, असे नाही व एकाला जी गोष्ट योग्य ती दुसऱ्याने करणे योग्य होईलच असेही नाही; परंतु परिस्थिती भिन्न नसताना अगर व्यक्तिव्यक्तींतील भेद महत्त्वाचा नसताना केवळ अंतःस्फूर्तीच्या सबबीवर आपले नैतिक कर्तव्य करण्याचे टाळणे योग्य होणार नाही. एखाद्याने सुताराचा धंदा न केल्यास आपण त्यास दोष देत नाही; परंतु खरे बोलणे हा काही माझा धंदा नाही अगर तसे करण्याची मला अंतःस्फूर्ती होत नाही. तेव्हा मला खरे बोलण्याची जरूरी नाही, असे कोणी म्हणू लागल्यास ते आपणास खपेल काय? तात्पर्य, नीतितत्त्वे ही कोणत्याही एका व्यक्तीच्या अंतःस्फूर्तिवर अगर लहरीवर अवलंबून नसल्यामुळे अंतःस्फूर्तिवाद त्याज्य मानावा लागतो.

दुसरा आक्षेप असा की, अंतःस्फूर्तिवाद मान्य केल्यास कोणत्याही प्रकारच्या सर्वसाधारण व सार्वत्रिक नीतितत्त्वांची अगर नियमांची आवश्यकता राहणार नाही व तसे करणे शक्यही होणार नाही. निरनिराळ्या व्यक्तींना एकाच वेळी अगर एकाच व्यक्तीला निरनिराळ्या वेळी जर निरनिराळी अंतःस्फूर्ती होऊ लागली, तर नीतिनियम तरी कसे घालणार व नीतितत्त्वे तरी कशी ठरविणार? शिवाय आपली अंतःस्फूर्ती जर प्रत्येक वेळी कार्याकार्याचा बिनचूक निर्णय देण्यास हात जोडून उभी असली, तर अशा तहेच्या नियमांची जरूरत तरी काय आहे? परंतु ही विचारसरणी चुकीची आहे, असे आम्हास वाटते. अगदी ठोकळ का होईना; पण काहीतरी नीतिनियम असणे अत्यंत इष्ट व आवश्यक आहे हे कोणीही कबूल करील. एखादा लहान मुलगा जर आपणाकडे येऊन शेजाऱ्याच्या बागेतील आंबा चोरू का, म्हणून विचारू लागला, तर 'अरे बाळा, ही गोष्ट तुला त्या वेळी जी अंतःस्फूर्ती होईल तीवर अवलंबून राहील. मी तुला एकदम सरसकट नियम कसा घालून देऊ? तसे करणे म्हणजे केवळ जुलूम होणार आहे. तू त्या वेळी आपल्या सदसद्विवेकबुद्धीला विचार व तिच्या सल्ल्याप्रमाणे वाग,' असा लांबलचक उपदेश करतो काय? उलट तू चोरी बिलकूल करता कामा नये, असेच आपण त्यास बजावीत नाही काय? कित्येक वेळा चोरी करणे अगर खोटे बोलणे, फार काय हिंसा करणेदेखील सर्वस्वी योग्य अगर आवश्यकही होईल; परंतु त्यामुळे खोटे बोलू नये अगर हिंसा करू नये ही सामान्य नीतितत्त्वे कुचकामाची आहेत, असे कोणी म्हणणार नाही. यावर कोणी असे म्हणेल की, या सर्वसाधारण तत्त्वांची अगर नियमांची व्यवहारात अंमलबजावणी करताना नेहमी केवळ आपल्या अंतःस्फूर्तीसच सर्वस्वी प्रमाण मान नये हे जरी कबल केले. तरीही सर्वसाधारण नीतितत्त्वे तरी केवळ आपल्या अंतःस्फूर्तीनेच आपण जाणतो की नाही? हे म्हणणे खरे आहे. मूळ नीतिविषयक भावना अगर नीतितत्त्वे परिस्थितीजन्य, अनुभवजन्य अगर तर्कसिद्ध नसून ती पूर्णपणे स्वयंप्रेरित अगर अंतःस्फूर्त व स्वतः सिद्ध असतात. वाद आहे तो या सिद्धांताबद्दल अगर तत्त्वाबद्दल

नसून त्याच्या तपशिलाबद्दल आहे. म्हणजे प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक बाबतीत बिलकूल विचार न करता त्या तत्त्वांची अमलबजावणी कशी करावी, याची बिनचूक अंतःस्फूर्ती होते की काय याबद्दल आहे. विशेषतः दोन परस्परविरोधी कर्तव्यांचा लढा पडला असता अशी अंतःस्फूर्ती मुळीच न झाल्यामुळे कित्येकदा आपली मती कुंठीत होऊन जाते हा अनुभव प्रत्येकास आहेच; परंतु अशी अंतःस्फूर्ती होते, असे मानले तरी तिच्या बऱ्या-वाईट परिणामांचा अगर उपयुक्ततेचा विचार केल्याखेरीज एकदम तिच्या सल्ल्याप्रमाणे वागणे योग्य होईल काय? हा प्रश्न शिल्लक राहतोच. असे करणे म्हणजे निव्वळ अविचारीपणा व स्वतःवरील अंधश्रद्धा होय, असे आम्हास वाटते. कोणी निष्काम कर्म-तत्त्वाचा आधार घेऊन असे म्हणेल की, आपणास जे योग्य वाटेल ते आपण केलेच पाहिजे, मग त्याचा परिणाम काहीही होवो. उपयोग होवो अगर न होवो. पण यावर उलट असे विचारता येईल की, कोणत्याही कत्याचा परिणाम योग्य होईल किंवा नाही याचा विचार केल्याशिवाय ते कृत्य योग्य आहे की अयोग्य आहे, हे ठरविणेच मूर्खपणाचे नाही काय? केवळ ते कृत्य करण्याची अंतःस्फूर्ती झाली म्हणून ते योग्य असे म्हणणे शहाणपणाचे होणार नाही. अर्थात्, कित्येक वेळा अशा तहेचा दूरवर विचार करणे शक्य व इष्टही नसते हे खरे आहे. एखादा मनुष्य नदीच्या पुरातून वाहून चालला असता त्याला वर काढण्यापासून एकंदर त्याचे स्वतःचे व समाजाचे किती कल्याण होईल, याचा विचार करीत बसणे अत्यंत मूर्खपणाचे होईल; परंतु अशा वेळी विचार करीत बसण्याचा परिणाम वाईट होईल, म्हणूनच आपण असा विचार करणे मूर्खपणाचे समजत नाही काय? आपणास मुळीच पोहता येत नसून बुडत्याला वाचविण्याची गोष्ट दूरच राहो; परंतु नदीत पाऊल टाकल्यास आपणावरही तीच पाळी येईल, अशी खात्री असताना नदीत उडी घालणे शहाणपणाचे होईल काय? कोणत्याही कृत्याची किंमत केवळ त्याच्या परिणामांवरून अगर उपयुक्ततेवरून ठरवावयाची नसते. या अर्थाने निष्काम कर्माचे तत्त्वे खरे आहे; परंतु अविचाराने केलेल्या गोष्टीचा परिणाम वाईट झाला, तरी त्याचा दोष ती करणाऱ्याला लागत नाही, असा त्याचा अर्थ नसून पूर्ण विचारांती केलेल्या कृत्याचा परिणाम जर काही अनपेक्षित अगर आकस्मिक कारणांनी वाईट झाला, तर त्याचा दोष ते कृत्य करणाऱ्याचा नाही, असा आहे.

विशेषतः ज्या वेळी एकाच व्यक्तीच्या मनात परस्परविरोधी अशा दोन अंतःस्फूर्ती उत्पन्न होतात, त्यावेळी परिणामाचा विचार केल्याखेरीज त्यातील श्रेष्ठ कोणती हे ठरविताच येत नाही. खोटे बोलल्याने जर एखाद्या व्यक्तीवर उपकार होत असला व खरे बोलल्याने जर त्याची मोठीसमजा प्राणहानी-हानी होत असली, तर यापैकी कोणती गोष्ट साधल्याने एकंदर हित अधिक होईल हे पाहिल्याशिवाय कोणता मार्ग स्वीकारावा हे ठरविणे योग्य होणार नाही. ती व्यक्ती निरपराधी असली, तर प्रसंगी खोटे बोलूनही तिचा प्राण वाचविणे योग्य व हितकारक होईल; परंतु ती अपराधी व शिक्षेसच पात्र असल्यास तिचे संरक्षण

करणे समाजाला व तिला स्वतःलाही अहितकारक होईल. नीतिनियमांनादेखील अपवाद असतात हे कोणीही कबूल करील व त्या अपवादाचे मूळ शोधू गेल्यास ज्या ठिकाणी ते नियम पाळण्याने एखाद्या दुसऱ्या त्या बाबतीत अधिक महत्त्वाच्या नीतितत्त्वाचा भंग होत असेल, म्हणजे ते मोडण्यापासून होणाऱ्या परिणामापेक्षाही अधिक वाईट परिणाम होत असेल, त्याच ठिकाणी हे अपवाद उत्पन्न होतात असे दिसून येईल. वर म्हटल्याप्रमाणे हिंसा करू नये हे खरे; पण ज्या ठिकाणी एखाद्या व्यक्तीची हिंसा न केल्याने हजारो व्यक्तींचा नाश होण्याची खात्री असेल, त्या ठिकाणी अहिंसेच्या तत्त्वापेक्षा त्या तत्त्वाच्या अपवादाचेच पालन करणे कोणीही योग्य मानील.

कित्येक गोष्टींच्या परिणामांकडे दुर्लक्ष केल्यास त्या गोष्टी चांगल्या का वाईट, हेच आपणास समजण्यास मार्ग नसतो व परिणामाकडे नजर न देता जर आपण त्यांचा बरेवाईटपणा ठरवू लागलो, तर आपला निर्णय चुकीचा ठरण्याचा बराच संभव असतो. दारू पिण्यापासून होणारे सर्व दुष्परिणाम जर आपण दृष्टीआड केले, तर ती गोष्ट वाईट का, हे आपणास सिद्ध करता येईल काय? उलटपक्षी एक मनुष्य दुसऱ्याच्या शरीरात चाकू खुपशीत आहे असे दिसल्यास एकदम त्याला शासन करण्याची आपणास अंतःस्फूर्ती होईल; परंतु चौकशीअंती ती त्या दुसऱ्या माणसाच्या रोगपरिहारासाठी चाललेली शस्त्रक्रिया आहे, असे ठरण्याचा पुष्कळ संभव आहे.

वरील विवेचनावरून हे दिसून येईल की, कोणत्याही गोष्टीचा बरेवाईटपणा ठरविण्यापूर्वी परिस्थितीचा व त्या गोष्टीच्या बऱ्यावाईट परिणामांचा अगर उपयुक्ततेचा विचार केला पाहिजे. नुसती ती गोष्ट करण्याची मला अंतःस्फूर्ती झाली आहे अगर ती गोष्ट अमुक एका (विशिष्ट) नीतितत्त्वाला अनुसरून आहे, असे म्हणून चालावयाचे नाही. आपली सदसदविवेकबुद्धी ही अंतःस्फूर्त असली तरी ती नेहमी एकदम बिनचूकच निवाडा देईल असे नाही व कोणतेही एक नीतितत्त्व सर्वकाळी पाळणे योग्य आहे असेही नाही. अर्थात कोणत्याही गोष्टीच्या परिणामांचा बरेवाईटपणा हा तरी पुन्हा आपल्या अंतःस्फूर्तीनेच जाणावा लागतो व अशा रीतीने अखेरचा निर्णय आपली अंतःस्फूर्तीच देते हे वर कबूल केलेच आहे. मात्र परिणामाच्या व परिस्थितीच्या विचाराची जोड अंतःस्फूर्तीस देणे आवश्यक आहे. तशी ती न दिल्यास अंतःस्फूर्ती ही केवळ पतंगाच्या दिव्यावरील झडपेप्रमाणे मुर्खपणाची व आत्मघातकी होईल, असे आमचे म्हणणे आहे. तात्पर्य, कोणतीही गोष्ट एकंदरीने चांगली की वाईट हे अंतःस्फूर्तीनेच समजते; परंतु ती गोष्ट अमुक एका परिस्थितीत अमुक एका व्यक्तीने करावी की न करावी याचा निर्णय करण्यास ती अपुरी पडते. आता हे खरे आहे की, काही काही गोष्टी चांगल्या आहेत अगर वाईट आहेत हे ठरविण्यास आपणास परिस्थितीचा अगर उपयुक्ततेचा मुळीच विचार करावा लागत नाही. उदाहरणार्थ, व्यभिचारापासून कितीही चांगली प्रजा निर्माण होण्याचा संभव असला अगर इतर शेकडो फायदे होणार असले, तरी

आपला त्या गोष्टीच्या युक्तायुक्ततेचा निर्णय पालटू शकत नाही अगर त्या फायद्यांचा विचार करण्याची आपणास जरूरतही वाटत नाही; पण अशा अपवादात्मक गोष्टी सोडून दिल्या, तर दूरवर विचार करण्याची आवश्यकता कोणीही मान्य करील; परंतु याचबरोबर दुसरीही एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. केवळ अविचारी, अंध व कोणत्याही तत्त्वाचा आधार नसलेल्या अंतःस्फूर्ती, व्यक्तीव्यक्तींबरोबर अगर एकाच व्यक्तीच्या निरनिराळ्या वेळच्या लहरींबरोबर पालटत जाणाऱ्या अतएव सापेक्ष व बंधनरहित असल्या तरी आपली मूळ नीति-अनीतीची भावना अगर सर्वसामान्य तत्त्वाविषयीचे आपल्या अंतःस्फूर्तीचे निर्णयही काळाबरोबर अगर व्यक्तीबरोबर पालटत जातात, म्हणून तेही सापेक्ष असे म्हणणे सत्याला धरून होणार नाही. एका काळी मनुष्याची शिकार करणे योग्य मानीत असत, म्हणून अहिंसेचे सर्वसाधारण तत्त्व सर्वस्वी सापेक्ष आहे, असे कोणी समजत नाही. कित्येक निरुपाधिक व सार्वत्रिक सिद्धांतही, उदाहरणार्थ दोन आणि दोनचार-सर्वांना सारखेच स्वतःसिद्ध वाटतात अगर समजतात असे नाही. ज्याप्रमाणे व्यक्तीव्यक्तींच्या अगर निरनिराळ्या काळातील लोकांच्या बौद्धिक व शारीरिक वाढीत भेद असतो, त्याचप्रमाणे तो नैतिक उन्नतीच्या बाबतीतही असतो; परंतु यावरून सर्वच नीतिमत्ता सापेक्ष आहे, असे अनुमान करणे चुकीचे होईल. असो.

वरील अंतःस्फूर्तिवादावर केलेल्या एकंदर टीकेवरून कोणास असे वाटेल की, कोणत्याही बाबतीत आपल्या मूळ अंतःस्फूर्तीला परिस्थिती व उपयुक्तता अगर परिणाम यांच्या विचारांची जोड दिली की. तीसच सदसदविवेकबद्धी म्हणण्यास हरकत नाही व अशा प्रकारच्या सदसद्विवेकबुद्धीने दिलेला निर्णय बहुमताविरुद्ध व वाटेल तितकी संकटे आली तरी आपण पाळला पाहिजे; परंतु हा निर्णय मान्य करण्यापूर्वी आणखी एका गोष्टीचा विचार केला पाहिजे. कोणत्याही गोष्टीच्या युक्तायुक्ततेचा विचार करताना आपल्या तार्किक व शांत विचाराखेरीज आणखी एक शक्ती आपले काम करीत असते. ती शक्ती म्हणजे आपल्या वैयक्तिक भावना अगर मनोविकार. या मनोभावना व अंतःस्फूर्ती यामध्ये एक ठोकळ भेद असा सांगता येईल की, अंतःस्फूर्ती ही एका अर्थाने बाहेरचीच, म्हणजे कोणत्याही व्यक्तीच्या शारीरिक रचनेवर, मनोरचनेवर अगर इतर कोणत्याही बाह्य उपाधीवर अवलंबून नसून ती पूर्णपणे स्वयंभू व याच अर्थाने सार्वत्रिक असते; परंतु भावना या पूर्णपणे वैयक्तिक व जशा काही खाजगी मालकीच्या असतात. यामुळे एखाद्या चुकीच्या तार्किक सिद्धांताप्रमाणे त्या एकदम रद्द करता अगर मनातून घालवून देता येत नाहीत. अशा रीतीने या आपल्या मनाविरुद्ध व आपल्या नकळतही आपल्या वरून शांत दिसणाऱ्या विचारसरणीच्या आड दडन तिच्यावर आपला परिणाम करीत असतात. तेव्हा त्यांचा पूर्णपणे छडा लावून आपल्या सदसद्विवेकबुद्धीमध्ये त्यांचे किती अंग असते हे शोधून काढल्याशिवाय आपणास तिचे खरे स्वरूप कळणार नाही; परंतु तसे करण्यापूर्वी सदसद्विवेकबुद्धीविषयी प्रचलित असलेल्या इतर एक-दोन मतांचे परीक्षण करून मग त्या विषयास हात घालू.

काही लोकांचे असे म्हणणे आहे की, ज्याप्रमाणे आपणाला एखादे फूल सुवासिक आहे की नाही अगर एखादा देखावा सुंदर आहे किंवा नाही हे त्या फुलापासून अगर देखाव्यापासून उत्पन्न होणाऱ्या अनुकूल अगर प्रतिकूल संवेदनांवरून बिनचूक व ताबडतोब समजते, त्याचप्रमाणे कोणत्याही गोष्टीची नैतिक युक्तायुक्तताही त्या गोष्टीमुळे उत्पन्न होणाऱ्या अनुकूल अगर प्रतिकूल संवेदनांवरून बिनचूक समजते. जी गोष्ट अनुकूल संवेदना उत्पन्न करते ती योग्य आहे, असे समजून ती करण्यास मुळीच मागेपुढे पाहू नये. अशा रीतीने आपल्या सदसद्विवेकबुद्धीस आपल्या सौंदर्यविषयक भावनेच्या रांगेस आणून बसविण्याचा किंबहुना त्या दोन्ही एकच आहेत असे सिद्ध करण्याचा हा प्रयत्न आहे. आपला सौंदर्यविषयक आनंद हा निर्हेतुक व निःस्वार्थी असल्यामुळे 'जे आपणास सुखदायक ते चांगले व दुःखदायक ते वाईट' या तहेच्या अगदी खालच्या दर्जाच्या सुखवादापेक्षा हे मत जास्त समंजसपणाचे आहे यात शंका नाही; परंतु अंतःस्फूर्तिवादावरील बरीचशी टीका या संवेदनावादालाही लागू पडण्यासारखी आहे. एखाद्याला एखादे फूल सुंदर वाटले म्हणजे दुसऱ्यालाही ते तसे वाटेलच असे नाही. किंबहुना आज मला जे - फूल आवडेल ते काही दिवसांनी आवडेलच असेही नाही. प्रत्येक आईला आपले मूल सुंदर आहे असे वाटते; पण दुसऱ्या लोकांचा या बाबतीत बहुशः मतभेद होतो. अशा रीतीने आपल्या सौंदर्यविषयक भावना बऱ्याचशा सापेक्ष असतात. नीतितत्त्वांप्रमाणे सौंदर्यविषयक सिद्धांतात मुळीच सार्वत्रिकता अगर निरुपाधिकता नसते, असे आमचे म्हणणे आहे; परंतु ती सार्वत्रिकता अगर निरुपाधिकता नीतितत्त्वांइतकी नसते व तशी ती नसली तरी आपणास तार्किक सिद्धांताच्या बाबतीत मतभेद झाल्यास ज्याप्रमाणे त्याचे महत्त्व वाटत नाही, त्याचप्रमाणे याही बाबतीत काही वाटत नाही. एखाद्याला समुद्राचा देखावा न आवडल्यास तो मनुष्य फारशा दोषास पात्र होत नाही; परंतु एखाद्या मनुष्यास खरे बोलणे न आवडल्यास प्रसंगी त्याची तुरुंगातही रवानगी होते. सारांश, नीतितत्त्वांना जी सार्वत्रिकता व निरुपाधिकता लागते ती सार्वत्रिकता व निरुपाधिकता केवळ आपल्या अनुकूल प्रतिकूल संवेदनांवरून नीतिअनीतीचा निर्णय केल्यास मुळीच साध्य होणार नाही व म्हणून सदसद्विवेकबुद्धी व सौंदर्यविषयक भावना ही एकच आहेत, असे मानता यावयाचे नाही.

उलटपक्षी, अगदी भावनारहित अशा आपल्या केवळ तार्किक बुद्धीला विचारून प्रत्येक गोष्टीची युक्तायुक्तता ठरवावी, असे जे कांटप्रभृती लोकांचे मत आहे तेही बरोबर नाही. व्यावहारिकदृष्ट्या पाहिले, तर अत्यंत समतोल बुद्धीने व तर्कशुद्ध विचार करणारी माणसेच बहुशः क्रियाशून्य असतात, असे दिसून येईल. कोणत्याही गुणाचा उत्कर्ष होण्यास जी निष्ठा व भावनांचा जोर लागतो तो विचाराने प्राप्त होतोच असे नाही, बहुशः होतच नाही; परंतु केवळ तात्त्विकदृष्ट्या पाहिले तरी कित्येक गोष्टींची युक्तायुक्तता भावनांच्या अभावी कळणेच शक्य असत नाही. परोपकार, एकपत्नीव्रत अगर ज्ञानसंपादन चांगले का, हे ज्याला त्या गोष्टींविषयी प्रेमाची अगर आदराची भावना नाही त्याला सिद्ध करताच येणार नाही व

म्हणूनच नीतीअनीतीच्या भावना स्वतःसिद्ध आहेत असे आपण म्हणतो. आरोग्य पाहिजे असल्यास स्वच्छता ठेवावी अगर ज्ञान संपादन करावयाचे असल्यास अभ्यास करावा, हे तर्काने सिद्ध करता येईल; परंतु आरोग्याचीच काय आवश्यकता आहे अगर ज्ञानसंपादनच का इष्ट आहे, हे तर्काने सिद्ध करणे अशक्य आहे. अशा तऱ्हेने नीतितत्त्वे सिद्ध करण्याचा प्रयत्न केल्यास तो कसा निष्फळ होतो हे कांटच्याच प्रयत्नाकडे पाहिल्यास सहज दिसून येईल. उदाहरणार्थ, वचन पाळावे अगर आत्महत्या करू नये हे नियम चांगले का, तर याच्या उलट नियम केल्यास (म्हणजे ते नियम न पाळल्यास) ते आत्मविरोधी होतील म्हणून वचन मोडावे असा नियम केल्यास कोणीच कोणास वचन देणार नाही व मग 'वचन मोडावे' हा नियम लागू करण्यास जागाच नसल्यामुळे त्या नियमास आत्मविरोध येईल. त्याचप्रमाणे 'आत्महत्या करावी' असा नियम केल्यास पृथ्वीवर कोणीच मनुष्य शिल्लक न राहिल्यामुळे 'आत्महत्या करावी' या नियमास आत्मविरोध येईल. म्हणून याच्या उलट जे पहिले नियम ते पाळावे, असा कांटचा अभिप्राय आहे. केवळ तार्किक आत्मविरोधाची कांट साहेबांना भीती वाटत असल्यास ती सहज दूर करता येण्याजोगी आहे. "एकाखेरीज सर्व माणसे वचन देईनाशी होईपर्यंत वचने मोडावी,' अगर 'पृथ्वीवर एक मनुष्य शिल्लक राहीपर्यंत आत्महत्या करावी,' असे नियम केल्यास त्यात वरील आत्मविरोधाचा दोष राहत नाही; परंतु हे नियम योग्य मानता येतील काय? खुद्द कांटच्या अविवाहितपणासही वरील न्यायाने दोष द्यावा लागेल. उलटपक्षी, परोपकार करावा हे तत्त्व सर्वांनी पाळल्यास काही दिवसांनी परोपकार करण्याची जरूरत राहणार नाही व तो नियम आत्मविरोधी होईल. मग परोपकार करू नये, हे तत्त्व मान्य करावयाचे काय? वोलॅस्टन नावाच्या एका गृहस्थाने तर याच्याही वर ताण केली आहे. त्यांनी चाळीस वर्षे अभ्यास करून स्वतःच्या बायकोस ठार का करू नये, याचे कारण असे शोधून काढले आहे की, 'स्वतःच्या बायकोस ठार मारावे,' असा जर मूळ सिद्धांत धरला, तर 'ती स्वतःची बायकोच नाही' (म्हणजे उरणार नाही असा अर्थ असेल !) असे त्यावरून अनुमान निघेल म्हणून. ही विचारसरणी कोणास पटेल ती पटो व त्यावरून नीतिअनीतीचा बोध कोणास होईल तो होवो !

यावरून हे सिद्ध होईल की, तार्किक बुद्धी व सदसद्विवेकबुद्धी या काही एक नव्हत. सदसद्विवेकबुद्धीला जो भावनेचा पाठिंबा असतो त्याचा केवळ तार्किक बुद्धीमध्ये अभाव असतो व नीतिअनीतीच्या बाबतीत सदसद्विवेकबुद्धीच्या निर्णयांना जी स्वतः सिद्धता असते ती तार्किकबुद्धीला कधीच प्राप्त करून घेता येणार नाही. त्याचप्रमाणे सदसद्विवेकबुद्धी म्हणजे केवळ अंतःस्फूर्ती नव्हे, अगर सौंदर्यविषयक संवेदनेप्रमाणेच एक प्रकारची संवेदनाही नव्हे हे वर दाखविलेच आहे. येथपर्यंत सर्व निषेधात्मकच वर्णन झाल्यामुळे सदसद्विवेकबुद्धीचे निश्चयात्मक स्वरूप काय, तीत विचार किती व विकार किती हे ठरविल्याखेरीज तिच्यावर अवलंबून किती राहावे हे सांगता येणार नाही; परंतु हे काम पुढील प्रकरणावर टाकणे जरूरी आहे.

○○○

प्रकरण २ रे

सदसद्विवेकबुद्धीचे स्वरूप

या प्रकरणात सदसद्विवेकबुद्धीचे खरे स्वरूप काय व तीत कोणकोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो याचा विचार करण्याचे योजिले आहे. अर्थात्, मार्टिनो साहेबांनी म्हटल्याप्रमाणे सद्सदविवेकबुद्धी ही एखाद्या सहाव्या इंद्रियाप्रमाणे, तार्किक बुद्धी, सौंदर्यविषयक अगर सुखविषयक भावना या सर्वांहून अगदी भिन्न अशी एक स्वतंत्र वृत्ती अगर शक्ती आहे, असे आम्हास म्हणावयाचे नाही. मागील प्रकरणांत जी निरनिराळी मते दिली आहेत त्या सर्वांत थोडाथोडा सत्याचा अंश आहे व तो एकत्र करूनच आपणास सद्सदविवेकबुद्धीचे खरे स्वरूप ठरवावयाचे आहे. अशा रीतीने पुढील विवेचन हे एक प्रकारे मागील सिंहावलोकनाच्याच स्वरूपाचे होणार आहे.

मार्टिनो साहेबांनी आपले मत सिद्ध करण्याकरिता जो कोटिक्रम लढविला आहे तो चुकीचा नाही; परंतु त्यावरून ते जे अनुमान काढतात ते मात्र आम्हास मान्य नाही. एखाद्या तार्किक - उदाहरणार्थ, गणिताच्या सिद्धांतामध्ये नीतिअनीतीचा काहीच प्रश्न नसल्यामुळे, त्या सिद्धांताबद्दल आपणास प्रेम वाटत नाही, अगर तो कोणी अमान्य केल्यास आपणास राग येत नाही हे खरे आहे; परंतु यावरून तार्किक बुद्धी व सद्सदविवेकबुद्धी यामध्ये काहीच साम्य नाही, असे म्हणता यावयाचे नाही. या न्यायाने पाहिल्यास गणिताची बुद्धी निराळी व इतिहासाची निराळी, अगर घरे बांधण्याची बुद्धी निराळी व विहिरी बांधण्याची निराळी असे मानावे लागेल. एकाच बुद्धीच्या या सर्व निरनिराळ्या शाखा आहेत व एकाच माणसाच्या बुद्धीची सर्व शाखांत सारखीच वाढ होणे शक्य नसले तरी त्या शाखा म्हणजे अगदी भिन्न भिन्न वृत्तीच आहेत, असे मानणे चुकीचे होईल.

सदसद्विवेकबुद्धीमध्ये तार्किक बुद्धीचा अंतर्भाव करणे नीतिदृष्ट्या इष्ट आहे हे मागील प्रकरणात दाखविलेच आहे व मानसशास्त्राच्या दृष्टीने पाहिल्यास तसा अंतर्भाव होतोही,

असे दिसून येईल. नैतिक बाबतीखेरीज इतर बाबतीतदेखील आपले निर्णय वैयक्तिक भावनांच्या जोरामुळे पालटतात अगर चुकीचे बनतात; परंतु खोल विचार केल्यास त्या सर्व निर्णयांत तार्किक बुद्धीचा थोडा तरी अंश असतो, असे दिसून येईल. फ्रेंच राज्यक्रांतीच्या कारणांविषयी राजपक्षाचा अनुयायी एक निर्णय देईल, तर लोकपक्षाचा मनुष्य निराळाच ग्रह करून घेईल; परंतु अशा रीतीने त्या दोन्ही व्यक्तींचे निर्णय वैयक्तिक भावनांनी पछाडलेले असले, तरी त्या दोन्ही निर्णयांना कार्यकारणभावाच्या तार्किक अगर बौद्धिक कल्पनेची सारखीच जरूरत आहे, किंबहुना त्या कल्पनेशिवाय कोणताही निर्णय देणे शक्य झाले नसते हे कोणीही कबूल करील. त्याचप्रमाणे एखादा मनुष्य परोपकार करावा हा सिद्धांत बुद्धीला पटल्यामुळे परोपकार करील, तर दुसरा केवळ प्राणिमात्रांवरील प्रेमामुळे सर्वांच्या उपयोगी पडेल; परंतु दुसऱ्याच्याही मनात 'सर्वांवर प्रेम करणे हे चांगले आहे' ही समजूत असतेच. एकाचा निर्णय तार्किक सिद्धांताविषयी व दुसऱ्याचा भावनेविषयी असतो इतकाच फरक. मूळ नीतितत्त्वे सिद्ध करण्याला कारण लागत नाही हे खरे; परंतु कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी ती नीतितत्त्वांना अनुसरून आहे की नाही याचा तार्किक विचार करावाच लागतो. 'दिसते तेच खरे' हा नियम भौतिकशास्त्रांत लागू केल्यास जो घोटाळा होईल तोच घोटाळा केवळ 'वाटते ते चांगले' हा नियम नीतिशास्त्रांत लागू केल्यास होणार आहे. सद्सदविवेकबुद्धी या शब्दाकडेच थोड्या लाक्षणिक अर्थाने पाहिल्यास असे दिसून येईल की, सत् कोणते व असत् कोणते हे जरी अंतःस्फूर्तीने अगर नैतिक भावनांच्या योगाने समजले, तरी त्यांच्या निर्णयाप्रमाणे वागण्यापूर्वी विवेक करण्याची जरूरी असते. रोजच्या व्यवहारात आपण नेहमी असा विचार करतोच असे नाही; परंतु त्याचे कारण पायाखालची वाट ज्याप्रमाणे आपण विचार न करता बरोबर चाल शकतो. त्याप्रमाणे गोष्टींचा बरेवाईटपणाही आपणास सवयीमुळे ताबडतोब समजतो हे होय.

तर्कवादात ज्याप्रमाणे वरील सत्यांश आहे त्याप्रमाणे भावनावादातील सत्यांशही आता आपणास पाहावयाचा आहे. केवळ सौंदर्यविषयक भावना म्हणजे सदसद्विवेकबुद्धी नव्हे हे आपण पाहिलेच आहे. एखाद्याला खोटे बोलण्यात मौज वाटली, तरी तसे करणे योग्य आहे, असे स्वतः खोटे बोलणारा मनष्यदेखील म्हणणार नाही: परंत आपल्या सौंदर्यविषयक भावनांमध्ये जी निर्हेतुकता अगर जो निःस्वार्थीपणा असतो, तसाच तो सदसद्विवेकबुद्धीच्या निर्णयात असतो या अर्थाने सौंदर्यविषयक संवेदनमध्ये व सदसद्विवेकबुद्धीमध्ये बरेच साम्य आहे, हे कबूल केले पाहिजे. मला एखादे फूल आवडल्यास त्या निर्णयामध्ये ज्याप्रमाणे माझा कोणताही स्वार्थ नसतो, त्याचप्रमाणे आपल्या सद्सदविवेकबुद्धीच्या निर्णयामध्येही स्वार्थबुद्धी नसते. उलटपक्षी कित्येक वेळी मोठा स्वार्थत्यागही असतो. एखादा मनुष्य लाच देत असता तो न घेण्याचा निश्चय करणे यात आपला स्वार्थच आहे, असे कोणी म्हणणार नाही. सुखवादी लोक अशाही वर्तनात स्वार्थबुद्धीच आहे असे म्हणतात. यासाठी या सुखवादाचाही या ठिकाणी थोडासा विचार करणे जरूर आहे.

सौंदर्यविषयक भावनांमध्ये फारशी सार्वत्रिकता अगर निरुपाधिकता नसली तरी त्यामध्ये स्वार्थबुद्धी नसून त्यांचे निर्णय निर्हेतुक असतात; परंतु केवळ वैषयिक अगर इंद्रियसुखाच्या भावनांमध्ये स्वार्थबुद्धी असल्यामुळे त्यांचे निर्णय सौंदर्यविषयक भावनांपेक्षाही अधिक वैयक्तिक व परस्परविरोधी असतात. एकाचे जे सुख तेच दुसऱ्याचे दुःख याचा अनुभव व्यवहारात नेहमी येतोच. म्हणून सुखवादी म्हणतात त्याप्रमाणे जे सुखकर ते चांगले व दुःखकर ते वाईट असे मानल्यास एकाला जी गोष्ट नैतिक ती दुसऱ्याला हटकून अनैतिकच वाटणार व अशा रीतीने नीतिमत्ता ही सर्वस्वी सापेक्ष व परस्परविरोधी होऊन जाणार. चांगल्या गोष्टी केल्याने आपणास सुख होते हे खरे आहे. अत्यंत मोठा स्वार्थत्याग करणाऱ्या माणसालादेखील एक प्रकारचे नैतिक समाधान होते हे आम्हास कबूल आहे; परंतु हे सुख केवळ त्या नैतिक आचरणाचे कार्य अगर परिणाम आहे. ते त्या स्वार्थत्यागाचे मूळ कारणच आहे किंवा केवळ ते सुख मिळविण्यासाठीच तो मनुष्य स्वार्थत्याग करतो असे म्हणणे म्हणजे कार्यकारणभावाची उलटापालट करून, पुढे गाडी व मागे घोडा असे जोडण्याप्रमाणेच चुकीचे आहे. असो. केवळ भावना या सर्वस्वी अंध असल्यामुळे त्या जशा चांगल्या तशाच वाईट गोष्टीकडे झुकण्याचा संभव आहे. पुष्कळ भावनाप्रधान माणसे अनीतीच्या पंकांत रुतलेली आपण पाहतो व म्हणूनच अंधश्रद्धा वाईट असे आपण मानतो.

अशा रीतीने केवळ वैयक्तिक भावना म्हणजेच आपली सदसद्विवेकबुद्धी नव्हे हे जरी खरे, तरी या भावनावादातही सत्यांश आहे हे विसरता कामा नये. भावनांच्या जोरामुळे ज्याप्रमाणे कित्येकदा आपला कार्याकार्याचा निर्णय चुकतो, त्याचप्रमाणे कित्येक गोष्टींचा बरेवाईटपणा त्या गोष्टीमुळे उत्पन्न होणाऱ्या भावनांमुळेच ठरत असतो. एकपत्नीव्रत चांगले व व्यभिचार वाईट, असे ठरविण्यात आपल्या तार्किक बुद्धीपेक्षा आपल्या भावनांचेच अंग अधिक आहे हे कबूल करावे लागेल. युक्तायुक्तता ठरविणाऱ्या या भावना नेहमीच उच्च प्रकारच्या असतात, असेही नाही. दुसऱ्याच्या अंगात सुई टोचल्याने त्याला फक्त शारीरिक दुःखच होते; परंतु तेवढे कारण ती गोष्ट वाईट ठरविण्यात पुरेसे होते. राष्ट्रातील सर्व मोठ्या माणसांनी मिळून त्यातील सर्व लहान मुलांचे रक्षण करणे हे कदाचित राष्ट्राच्या एकंदर हिताच्या दृष्टीने जास्त हितकर होईल: परंतु मनुष्याच्या कौटुंबिक प्रेमाच्या भावनेचा विचार केल्यास कौटुंबिक पद्धतीच अधिक योग्य आहे, असे म्हणावे लागते. कोणत्याही प्रकारचे वैवाहिक नियम घालण्यापूर्वी स्त्री-पुरुषांच्या परस्परांवरील प्रेमाचा विचार करावा लागतो. किंबहुना स्त्री-पुरुषांना परस्परांबद्दल प्रेम वाटत नसते, तर कोणत्याही प्रकारची वैवाहिक बंधने घालणे शक्य झाले नसते. यावरून असे दिसून येईल की, आपल्या सदसद्विवेकबुद्धीमध्ये भावनांचाही अंश असतो व या भावना नेहमीच उच्च प्रकारच्या असतात असे नाही. परोपकाराची अगर न्यायाची भावना उच्च म्हणून ती ज्याप्रमाणे आपण चांगली मानतो, त्याचप्रमाणे कौटुंबिक प्रेमाची अगर दुसऱ्याला शारीरिक सुख देण्याची भावनाही आपण त्या त्या प्रमाणात योग्य मानतो.

सारांश, केवळ तार्किक बुद्धीत नीतिअनीतीची कल्पनाच नाही म्हणून भावनांचा सदसद्विवेकबुद्धीत अंतर्भाव होतो व केवळ भावना अंध म्हणून तार्किक बुद्धीचा तीत शिरकाव होतो आणि वैयक्तिक भावनांनी तार्किक बुद्धीही पछाडली जाण्याचा संभव असल्यामुळे सौंदर्यविषयक भावनांमधील निर्हेतुकता सदसद्विवेकबुद्धीमध्ये अंतर्भूत होणे जरूर आहे. अशा रीतीने तार्किक बुद्धी व भावना यांचा निर्हेतुक दृष्टीने उपयोग करून अखेरचा निर्णय अंतःस्फूर्तीने अगर केवळ स्वतःचीच साक्ष घेऊन देणारी जी आपल्या आत्म्याची शक्ती, तिलाच आपण सदसद्विवेकबुद्धी म्हणतो. यापेक्षा तिचे स्वरूप जास्त विशद करणे शक्य नाही. तिचे प्रत्यक्ष ज्ञान प्रत्येकाला आपल्या अनुभवानेच होत असले, तरी तिचा निर्णय मान्य करण्यापूर्वी तीत अंतर्भूत होणाऱ्या सर्व शक्तींचा जोर यथायोग्य प्रमाणात नसल्यामुळे तिचा निर्णय चुकतो व म्हणून त्या शक्ती कोणत्या याचे निरीक्षण करणे आवश्यक आहे. अर्थात, तार्किक बुद्धी अगर भावना यांची वाढ सर्वात सारखी होत नसल्यामुळे व्यक्तीव्यक्तीच्या सद्सदविवेकबुद्धीच्या निर्णयात फरक पडतो हे वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. म्हणून ज्या व्यक्तींमध्ये या सर्व शक्तींची यथायोग्य वाढ झाली नसेल अशा व्यक्तींनी तशी वाढ झालेल्या व्यक्तीवर अगर व्यक्तीच्या संघावर म्हणजे बहुमतावर विश्वास ठेवणे म्हणजे एक प्रकारे नैतिक बाबतीत शिक्षण घेणे आवश्यक असते; परंतु असे नीतिशिक्षण का व कितपत आवश्यक आहे याचा विचार पुढील प्रकरणांत करण्याचे योजिले आहे.

○○○

प्रकरण ३ रे

नैतिक प्रामाण्य व नैतिक स्वातंत्र्य

प्रत्येक मनुष्याने कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी आपल्या सद्सद्विवेकबुद्धीचा सल्ला घेणे अत्यंत आवश्यक आहे. हे तत्त्व सर्वांस पटते; परंतु सूक्ष्म दृष्टीने निरीक्षण केल्यास मनुष्यास आपल्या सद्सद्विवेकबुद्धीचा स्वतंत्र उपयोग करण्यास फारच वाव असतो, असे दिसून येत नाही. जन्मापासून तो मरेपर्यंत प्रत्येक मनुष्य अनेक प्रकारच्या नैतिक, धार्मिक, राजकीय अगर सामाजिक नियमांनी व बंधनांनी जखडून गेलेला असतो व अशा रीतीने आपल्या आयुष्यातील शेकडा नव्वद गोष्टी तो बुद्धीपेक्षा श्रद्धेच्याच योगाने करीत असतो असे आढळून येते. मनुष्य ज्या जातीत जन्मला त्या जातीचे अगर धर्माचे नियम, तो ज्या प्रकारच्या राज्यव्यवस्थेखाली राहत असेल त्या राज्यव्यवस्थेचे नियम, अगर तो जो धंदा करीत असेल, त्या धंद्याचे नियम इत्यादी शेकडो प्रकारच्या नियमांनी व रूढींनी त्याचा आयुष्यक्रम अगोदरच आखून ठेवलेला असतो. अशा रीतीने प्रत्येक मनुष्य हरएक बाबतीत समाजाकडून नीतिशिक्षणाचे धडे घेत असतो व बहुशः फारसा विचार न करता ते धडे वंद्य मानून त्याप्रमाणे आचरण करीत असतो. सर्वच नियम प्रत्येकाला योग्य वाटतात असे नाही; परंतु ज्याप्रमाणे काही नियम श्रद्धेमुळे त्याचप्रमाणे काही नियम भीतीमुळे तो पाळत असतो.

असे नीतिशिक्षण अगर नीतिनियमन असणे आवश्यक आहे. हे कोणीही कबूल करील. अंतःस्फूर्तिवादी समजतात त्याप्रमाणे प्रत्येक मनुष्यास जन्मतःच प्रत्येक गोष्टीचा बरेवाईटपणा अंतःस्फूर्तीने अगर आनुवंशिक संस्कारांमुळे समजू लागतो असे आम्हास मुळीच वाटत नाही. आनुवंशिक संस्काराचा काहीच परिणाम होत नसेल, असे नाही; परंतु तो अत्यंत अल्प असतो. ब्राह्मण धर्मातील सर्व नीतिनियम बरोबर घेऊन कोणीही ब्राह्मण जन्माला येतो असे दिसून येत नाही. जन्मतःच एखाद्या मनुष्यास अरण्यात नेऊन ठेवले तर त्याच्या नीतिविषयक कल्पना व समाजात वाढलेल्या मनुष्याच्या कल्पना यात अत्यंत फरक

पडेल, हे उघड आहे. ज्याच्या बुद्धीचा बराच विकास झाला आहे, अशा मनुष्याच्या मनावर, त्याच्या विशिष्ट जातीच्या अगर धर्माच्या बंधनांचा परिणाम होणार नाही हे खरे; परंतु त्याहून अधिक व्यापक व उदात्त अशा समाजचित्राचा त्याच्या हृदयावर छाप बसल्याखेरीज राहणार नाही. अशा रीतीने समाजातील लोकमताचा व परिस्थितीचा मनावर अत्यंत परिणाम होतो म्हणूनच योग्य संगती व योग्य नीतिशिक्षण ही प्रत्येक मनुष्यास आवश्यक आहेत, असे आपणास वाटते. सद्सद्विवेकबुद्धीत ज्याप्रमाणे तार्किक बुद्धीचा त्याचप्रमाणे भावनांचाही अंतर्भाव होत असल्यामुळे त्या भावनांच्या तीव्रतेबरोबरच सद्सद्विवेकबुद्धीच्या निर्णयात अगर त्याच्या अंमलबजावणीत फरक पडत जातो. अस्पृश्यता नाहीशी करावी हे तत्त्व सर्वांना सारखेच पटेल; परंतु समतेची भावना सर्वांत सारखीच तीव्र नसल्यामुळे त्या तत्त्वाची अंमलबजावणी सर्वांकडून सारखी होणार नाही. प्रस्तूत विषयास धरून उदाहरण द्यावयाचे झाले, तर कित्येक माणसांच्या नीतिविषयक कल्पनांवर त्यांचे ज्या व्यक्तीवर अगर पंथावर प्रेम असते, त्यांच्या कल्पनांचा व आचरणाचा विशेष परिणाम होतो व त्यांच्याप्रमाणेच त्यांचे सर्व विचार व आचरण बनून जाते असे दिसून येईल. समाजातील ज्या व्यक्ती अगर नियम आपले मन आकर्षून घेतात त्यांच्यावर एकदा वळकट श्रद्धा बसली की, विचारी व हुशार माणसेदेखील अगदी अंध होऊन जातात. अशा रीतीने बुद्धीपेक्षा स्वभाव हा अधिक दुरतिक्रम असल्यामुळे नीतिमत्ता ही बुद्धीपेक्षा स्वभावावरच अधिक अवलंबून असते व म्हणून योग्य स्वभाव बनण्यास योग्य नीतिशिक्षण आवश्यक असते.

परंतु अशा रीतीने आपल्या नीतिविषयक कल्पना समाजाकडून व भोवतालच्या परिस्थितीकडून प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीने शिक्षण मिळाल्यामुळे बनलेल्या असतात. म्हणून सर्व नीतिमत्ता ही कृत्रिम अगर केवळ समाजनिर्मित, अतएव ऐच्छिक आहे असे मानणे चुकीचे होईल. गणितशास्त्र हे शिकविल्याशिवाय येत नाही म्हणून, अगर आजचे गणितशास्त्र हे शेकडो वर्षांच्या शिक्षणाचा व अनुभवाचा परिणाम आहे म्हणून ज्याप्रमाणे कोणी त्या शास्त्रातील तत्त्वे स्वतःसिद्ध नाहीत असे मानीत नाही. त्याप्रमाणे नीतितत्त्वे ही शिकवावी लागतात व ज्ञानाबरोबरच अधिकाधिक विकास पावत जातात म्हणून त्यांच्या सत्यतेविषयी व स्वतःसिद्धतेविषयी शंका घेण्याचे मुळीच कारण नाही. उलटपक्षी, ऐतिहासिक बाबतीत मतभेद झाल्यास ज्याप्रमाणे त्याच मार्गाने अधिक अभ्यास केल्यास ऐतिहासिक सत्य सापडेल, अशी आपली खात्री असते, त्याचप्रमाणे नैतिक बाबतीत विकल्प उत्पन्न झाल्यास अधिक विचारांती खरे नैतिक सत्य आपणास सापडलेच पाहिजे याबद्दल शंका घेण्याचे मुळीच कारण नाही. असो.

नीतिशिक्षणाची अगर नीतिनियमनाची आवश्यकता भासल्यास दुसरे एक कारण आहे. प्रत्येक मनुष्याला सर्व बाबतीत कार्याकार्याचा निर्णय बिनचूक करता येण्यास जी विचारशक्ती, दूरदृष्टी, अनुभव व परिस्थितीचे यथायोग्य ज्ञान इत्यादी गोष्टी साध्य होणे आवश्यक असते

त्या सर्व प्रत्येक मनुष्यास साध्य होणे शक्य नाही व या सर्व गोष्टींच्या मागे प्रत्येकाने लागणे इष्टही नाही. यासाठीच नीतिशिक्षणाची अगर नीतिनियमनाची जरूर आहे.

परंतु अशा रीतीने नीतिशिक्षण आवश्यक असले, तरी या नीतिशिक्षणाचे ध्येय प्रत्येक मनुष्यास नैतिकदृष्ट्या स्वतंत्र व जबाबदार करणे हेच होय. कारण समाजातील श्रेष्ठ लोकांकडून शिक्षण घेणे व त्यांचे मत प्रमाण मानून चालणे हे जरी योग्य असले, तरी प्रत्येक बाबतीत केवळ दुसऱ्याचेच ऐकणे व आपली सद्‌सद्‌विवेकबुद्धी गुंडाळून ठेवणे हे अगदी अयोग्य व नैतिक उन्नतीला विघातक आहे. शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवितात, ते जन्मभर त्यांनी आपल्यावर अवलंबून राहावे म्हणून नव्हे, तर विद्यार्थी स्वतः अधिकाधिक ज्ञान मिळविण्यास व त्याचा उपयोग करण्यास लायक व्हावेत म्हणून. त्याचप्रमाणे नीतिशिक्षणाचे ध्येयही प्रत्येकाने सदोदित अंधश्रद्धेने वागावे हे नसून, कार्याकार्याचा योग्य निर्णय करण्यास स्वतः पात्र व्हावे हेच आहे. चोरी करू नये, असे आपण लहान मुलांना सांगतो, ते जन्मभर त्यांनी आपल्या आज्ञेत राहावे म्हणून नव्हे, तर चोरी करू नये हेच तत्त्व स्वतः समजण्यास व त्याप्रमाणे आचरण करण्यास ती लायक व्हावीत म्हणून हे कोणीही मान्य करील.

वरील विवेचनावरून नैतिक प्रामाण्याचे ध्येयही नैतिक स्वातंत्र्य हेच आहे व अर्थात्‌च या दोन तत्त्वांमध्ये श्रेष्ठ तत्त्व तेच आहे हे सहज दिसून येईल; परंतु हे नैतिक स्वातंत्र्य साध्य करून घेण्यास सर्व नैतिक शिक्षणापासून अगर समाजापासून अलिप्त राहिले पाहिजे, असे मानणे चुकीचे होईल. ज्याप्रमाणे दुसऱ्या चित्रांचा अभ्यास केल्यानेच कोणासही अधिक चांगली चित्रे काढता येतात, त्याचप्रमाणे समाजातील नैतिक कल्पनांचे निरीक्षण करूनच नैतिक बाबतीत स्वतंत्र होणे अधिक सुगम व श्रेयस्कर आहे. असा अभ्यास केल्याने आपण एक प्रकारे दुसऱ्यांच्या कल्पनांचा व आवडीनिवडीचा आपल्या मनावर परिणाम होण्यास वाव देतो हे खरे आहे; परंतु असा वाव दिल्यानेच अखेरीस आपणास अधिक नीतिस्वतंत्र व नीतिनिष्ठ होता येणार आहे. वर म्हटल्याप्रमाणे ज्याने दुसरी कोणतीच चित्रे पाहिली नाहीत त्याची प्रतिभा कितीही उज्ज्वल असली, तरी त्याची चित्रे त्या काळाच्या मागेच पडण्याचा फार संभव आहे. आजपर्यंतच्या अनुभवाचा व ज्ञानाचा जाणूनबुजून धिक्कार करणे हे स्वतंत्र बुद्धीचे लक्षण नसून हटवादीपणाचे लक्षण आहे. जो मनुष्य प्रत्येक क्षुल्लक बाबतीत दुसऱ्यावर अवलंबून राहतो, अगर बहुजन समाजाचे जे मत तेच आपले मत. असे मानन चालतो. अशा परप्रत्ययनेयबद्धीच्या मनष्यास स्वतःचे असे चारित्र्य अगर शीलच नाही, असे म्हणावे लागेल; परंतु त्यांना लोकमताचे नीतिशिक्षण पूर्णपणे मिळालेले आहे व समाजाच्या आचारा-विचारांत जे वाढले आहेत, अशाच व्यक्तींमध्ये स्वतंत्र विचारांची व स्वतंत्र वृत्तीची लाट जोराने उसळण्याची वेळ येते. हे विचार कित्येक वेळी क्रांतीच्या स्वरूपाचे अगर कित्येकदा सौम्य प्रगतीच्या स्वरूपाचे असतात; परंतु बहुजन समाजापासून अलिप्त राहिलेल्या व समाजाकडून नीतिशिक्षणाचे बाळकडू मुळीच न मिळालेल्या

व्यक्तींकडून कोणत्याही तऱ्हेची प्रगती होणे शक्य नाही. प्रगतीचे अगर क्रांतीचे मूळदेखील ज्यात क्रांती घडवून आणावयाची त्या आचार-विचारातच असते व म्हणूनच तशी क्रांती घडवून आणण्यासदेखील नीतिशिक्षणाची आवश्यकता असते.

वरील विवेचन ध्यानात ठेवल्यास नैतिक प्रामाण्याच्या व नैतिक स्वातंत्र्याच्या मर्यादा ठरविणे आपणास सुलभ जाईल. नैतिक प्रामाण्याच्या मर्यादेचा प्रश्न लहान वयात फारसा उद्भवत नाही. कारण त्या वेळी वातावरणातील हवेच्या दडपणाप्रमाणे नीतिनियमांचे दडपणही आपणास फारसे भासत नाही. तसे ते ज्या वेळी भासू लागेल त्या वेळी श्रद्धेच्या मर्यादा संपून नीतिस्वातंत्र्यास सुरुवात होते. असे दडपण भासू लागलेला एखादा मनुष्य जर आपणाकडे येऊन नीतिनियमांच्या बाबतीत श्रद्धा किती ठेवावी असे विचारू लागला, तर आपण त्यास असेच सांगू की, 'ऐतिहासिक अगर सौंदर्यविषयक बाबतीत दुसऱ्यांचे मत प्रमाण मानणे जितके योग्य तितकेच ते नीतिशास्त्राच्या बाबतीतही योग्य होईल. चांगली चित्रे काढता येण्यास, चांगली चित्रे कोणती हे ठरविताना प्रथम तरी तुला आपल्या शिक्षकाचेच मत ग्राह्य मानले पाहिजे. कोणाच्याही मदतीशिवाय अगर सल्ल्याशिवाय एकदम चांगली चित्रे काढून दाखवू असे म्हणशील, तर तुला यश यावयाचे नाही; परंतु तू आपली बुद्धी गुंडाळून ठेवून प्रत्येक बाबतीत शिक्षकावरच अवलंबून राहिल्यास तुला यश येण्याचा तितकाच कमी संभव आहे. ज्यावेळी शिक्षकाच्या हाताखाली शिकून तुला थोडेसे मतस्वातंत्र्य प्राप्त होईल, त्यावेळी शिक्षकाशी मतभेद झाल्यास तू आपल्या मतस्वातंत्र्याचा उपयोग करणेच अधिक हितकर व प्रगतिकारक होईल; परंतु आपल्या गुरूच्या योग्यतेबद्दल अगर त्याच्या शिकवणीच्या सत्यासत्यतेबद्दल संशय आल्याखेरीज, केवळ स्वातंत्र्य व्यक्त करण्यासाठीच त्या विरुद्ध बंड करणे मूर्खपणाचे होईल.'

परंतु वर दिलेली इतिहासाची अगर सौंदर्यशास्त्राची उपमा नीतिशास्त्रास तंतोतंत लागू पडते, असे म्हणता यावयाचे नाही. कारण इतर शास्त्रांपेक्षा नीतिशास्त्राचे बाबतीत मतस्वातंत्र्याच्या मर्यादा अधिक आकुंचित असतात. इतर विषयांपेक्षा नैतिक बाबतीत आपली मते विशेष प्रकारच्या व अनेक पूर्वग्रहांनी दूषित झालेली असतात व म्हणून ग्रीन साहेबांनी म्हटल्याप्रमाणे नैतिक बाबतीत रूढ असलेले नीतिनियम अंधश्रद्धेने पाळण्यात विशेष नुकसान होण्याचा संभव नसतो; परंतु त्या नियमांविरुद्ध आचरण करण्यापूर्वी मात्र विशेष विचार करावा लागतो. भौतिकशास्त्रात कोणी एखादा चुकीचा सिद्धांत मांडला, तरी एकंदरीत त्या योगाने त्या शास्त्राची प्रगतीच होते; परंतु नैतिक बाबतीत कोणी बंड केल्यास एकंदर समाजाच्या नीतिमत्तेवर त्याचा फार मोठा परिणाम होतो. निरुपयोगी व ज्यांच्यावर बहुजन समाजाचा विश्वास नाही, अशा नियमांबद्दल लोकांस आदर वाटेनासा होतो व अशा नियमांचे प्राबल्य समाजात कायम राहणे इष्टही नसते; परंतु अशा थोडक्या बाबी वगळल्यास असे दिसून येईल की, कित्येक वेळी नियम उत्तमोत्तम असण्यापेक्षा ते

बंधनकारक असणेच अधिक जरूरी व इष्ट असते. कारण नियम उत्तमोत्तम नसले, तरी ते बंधनकारक असल्याने जितका फायदा होईल तितका ते नुसतेच उत्तमोत्तम असल्याने होणार नाही. शिवाय, कोणताही रूढ नियम मोडण्यापूर्वी आपणास आपल्या स्वतःच्या मताखेरीज इतरही अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. एखादा कायदा आपणास योग्य वाटत नसला, तरी तो एकदम मोडण्यापेक्षा तात्पुरता त्यास मान देऊन हळूहळू तो बदलून घेणेच अधिक इष्ट असते. उलटपक्षी एखादी गोष्ट आपणास स्वतःस इष्ट वाटत नसली, तरी जोपर्यंत ती कायद्याने अगर रूढीने निषिद्ध मानलेली नाही, तोपर्यंत कोणी ती केल्यास एकदम त्यास मोठे शासन करणे, अगर अगदी नीच लेखणे योग्य होणार नाही; परंतु अशा रीतीने कायद्याला अगर रूढीला मान देणे इष्ट आहे की नाही व कितपत इष्ट आहे हे तरी अखेर प्रत्येकाने आपल्या स्वतंत्र बुद्धीनेच ठरविले पाहिजे. मात्र तसे करण्यापूर्वी त्या स्वातंत्र्याच्या मर्यादा नीट ओळखल्या पाहिजेत, एवढेच आमचे म्हणणे आहे. अशा रीतीने आपल्या मताविरुद्ध एखाद्या कायद्याला अगर नीतिनियमाला मान देणे विचारांती एखाद्याला इष्ट वाटले, तरी तो निर्णय त्याने आपल्या स्वतंत्र बुद्धीनेच दिला असल्यामुळे तसा मान देण्यात त्याचे मतस्वातंत्र्य नाहीसे झाले असे म्हणता यावयाचे नाही.

नैतिक स्वातंत्र्याचे तर्फेने अगर केवळ लोकमत प्रमाण मानण्याविरुद्ध आणखी एका गोष्टीचा या ठिकाणी विचार करणे आवश्यक आहे. प्रत्येक मनुष्य ठोकळ मानाने एकाच समाजाचा घटक असला तरी एकाच वेळी तो समाजातील निरनिराळ्या संस्थांचा घटकही असू शकतो. त्या सर्व संस्थांचे नीतिनियम एकाच प्रकारचे असतात असे नाही. किंबहुना कित्येक वेळी ते परस्परविरोधी असतात. उदाहरणार्थ, एखाद्या माणसाचे खाजगी वागणुकीचे नियम व त्याच्या धंद्यांतील वागणुकीचे नियम एकाच तत्त्वाला अनुसरून असतातच असे नाही. एरव्ही अगदी प्रामाणिक असा दुकानदार गिऱ्हाईकाला चकविण्यात काही गैर आहे, असे मुळीच मानीत नाही. जुगाराच्या धंद्यातही काही नीतिनियम असतात व त्या धंद्यातील मनुष्य ते नियम प्रामाणिकपणे पाळत असतो; परंतु एकंदर नीतीच्या दृष्टीने तो मनुष्य चांगला आहे, असे म्हणता यावयाचे नाही; परंतु सर्वसाधारण मनुष्य अशा अंतिम दृष्टीने विचार करीत नसून तो फक्त आपल्या निकट अशा धंद्यातील लोकमताचा अगर आपल्या शेजाऱ्या-पाजाऱ्यांच्या मताचाच विचार करतो. वकिलीचा धंदा हा अगदी उच्च प्रकारच्या नैतिक दृष्टीने पाहिल्यास निर्दोषी आहे, असे म्हणता यावयाचे नाही; परंतु एखादा वकील या दृष्टीने विचार करीत नसून आपल्या धंद्याच्या कक्षेत जे नीतिनियम असतात तेवढेच पाळण्याची खबरदारी घेतो. अशा रीतीने बहुजन समाजाची नीतितत्त्वे भोवतालच्या निकट परिस्थितीने अगर व्यवसायाने मर्यादित व आकुंचित झालेली असल्यामुळे कोणत्याही गोष्टीची अंतिम युक्तायुक्तता केवळ लोकमतावरून ठरविणे योग्य नसते, तशी ती ठरविल्यास नैतिक प्रगती खुंटली, असे म्हणावे लागेल. समाजाची कोणत्याही बाबतीत प्रगती करू पाहाणारास, अगर

त्यातील रूढ नीतिनियम बदलू पाहणारास लोकमताचा पाठिंबा न मिळता उलट लोकमताशी अत्यंत झगडावे लागते हे आपण नेहमी पाहतो व म्हणूनच केवळ लोकमतानुवर्ती माणसाच्या हातून प्रगतीपर गोष्टी होऊ शकत नाहीत, असे दिसून येते.

परंतु याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की, वर लिहिल्याप्रमाणे समाजाच्या नीतिनियमात अगर चालीरीतीत फेरबदल करू पाहणाऱ्या व्यक्तीदेखील इतर लोकमतानुवर्ती लोकांप्रमाणे समाजात वाढलेल्या व समाजाकडून नीतिशिक्षण मिळालेल्या अशाच असतात व त्यांच्या प्रगतिपर कल्पनांचे मूळही त्यांच्या समाजाशी असलेल्या संघटनातच असते. ते मूळ नेहमी अगदी नजीकच्याच परिस्थितीत असते असे नाही, तरी त्या काळच्या वाङ्मयात अगर इतर देशांतील आचारा विचारांच्या ज्ञानामुळे उत्पन्न झालेले असे असते. सारांश, कोणत्याही सुधारणेचे अगर प्रगतिपर कल्पनांचे श्रेय पूर्णपणे कोणत्याही एका व्यक्तीच्या स्वतंत्र बुद्धीला देता येत नाही. त्यात सामाजिक शिक्षणाचा थोडा तरी अंश असतोच. अर्थात, ज्या व्यक्ती कोणत्याही नवीन सुधारणेचा ध्वज प्रथम उभारतात त्यांना इतरांपेक्षा अधिक बुद्धिस्वातंत्र्य नसते, असे आमचे म्हणणे नाही (निदान त्यांना नीतिधैर्य तरी अधिक असतेच). नैतिक बाबतीतदेखील प्रत्येक मनुष्याची सद्‌सद्‌विवेकसारखीच विकास पावलेली नसून तीमध्ये फरक पडतो व जो नियम आज सर्वसाधारण व रूढ मानला जातो तोही एके काळी सुरू करण्यास बुद्धिस्वातंत्र्य असलेल्या व्यक्तींची जरूरी होती हे कबूल केले पाहिजे; परंतु अशा व्यक्ती अगदी असाधारण व अपवादात्मक होत. विशेषतः नैतिक बाबतीत अगर धार्मिक वृत्तीच्या लोकांमध्ये ही चिकित्सक बुद्धी अगर नीतिस्वातंत्र्य कधीच उद्भूत होत नाही. समाजाचे हित करावे ही सर्वसाधारण कल्पना प्रत्येकास असते व त्या हितामध्ये आरोग्य, अन्न, वस्त्र इत्यादी ठोकळ गोष्टींचा प्रत्येक जण समावेश करतो; परंतु समाजाच्या हिताच्या दृष्टीने उच्च प्रकारच्या शिक्षणाचे महत्त्व अगर व्यवहारांतले उदाहरण द्यावयाचे, तर म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीत मत देण्याचे महत्त्व नीट ओळखणारे लोक सुशिक्षितांमध्येदेखील किसे सापडतील? विशेषतः समाजातील निरनिराळ्या घटकांच्या अगर संस्थांच्या ध्येयामध्ये विरोध आल्यास त्याचा न्यायनिवाडा करता येण्याची पात्रता फारच थोड्या लोकांच्या अंगी असते. कायद्याच्या अगर नीतिनियमांच्या अभावी पुष्कळ गोष्टींचे महत्त्व बहुजन समाजाला समजणेच शक्य नसते. कायद्याने अगर लोकमताकडून शासन होण्याची भीती नसल्यामुळे कित्येक लोक खुशाल बालविवाह अगर केशवपन करतात हा अनुभव आपणास आहेच.

अशा रीतीने नीतिशिक्षणाच्या अगर नीतिनियमांच्या मदतीखेरीज प्रत्येकाला कार्याकार्याचा योग्य निर्णय करता येईलच असे मानता येत नाही व म्हणूनच कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी केवळ सामान्य लोकमताचा नव्हे, तर समाजातील श्रेष्ठ व विचारी लोकांचे मत काय आहे, याचा अवश्य विचार केला पाहिजे. आपणा स्वतःला योग्य वाटत असलेली गोष्ट

लोकमताविरुद्ध करण्यापूर्वी आपला निर्णय कितपत ज्ञानमूलक, अनुभवजन्य व दृढ आहे याचा तर विचार केला पाहिजेच; परंतु त्यावेळी लोकमताला मान दिल्यास कितीसे अहित होईल याचाही विचार केला पाहिजे. एखादे वेळी शर्यतीत पैसे घालण्याने आपले मुळीच नुकसान होणार नाही, असे आपणास वाटत असले, तरी तसे केल्याने समाजावर विशेष परिणाम होत असेल, तर तेवढ्या चैनीचा त्याग करणेच बरे हे कोणीही कबूल करील. किंबहुना समाजाची नीतिमत्ता ही थोड्या अंशाने प्रत्येकाच्या नीतिमत्तेवरच अवलंबून असल्यामुळे बहुजन समाजास वाईट वळण न लागेल अगर वाईट उदाहरण घालून दिल्यासारखे न होईल, अशी स्वार्थत्यागपूर्वकही प्रत्येकाने खबरदारी घेतली पाहिजे.

त्याचप्रमाणे कित्येक गोष्टी आपण केवळ श्रद्धेने करीत असतो व त्याचे कारण विचारले तर सांगता येणे फार कठीण असते. उदाहरणार्थ, एकपत्नीव्रत चांगले का, हे पुष्कळ सुशिक्षित लोकांसदेखील सांगता येणार नाही. ज्याप्रमाणे आरोग्याच्या बाबतीत वैद्याचे ऐकणेच अधिक योग्य, त्याचप्रमाणे नैतिक बाबतीत आपणापेक्षा अधिक नीतिमान व विचारी माणसावर श्रद्धा ठेवून वागणे हेच श्रेयस्कर होय. निदान आरोग्याच्या बाबतीत ज्याप्रमाणे आपणापेक्षा वैद्याचेच मत जास्त बरोबर असण्याचा नेहमी अधिक संभव असतो, त्याचप्रमाणे नैतिक बाबतीतही आपणापेक्षा अधिक नीतिमान व विचारी माणसांचे मतच जास्त बरोबर असण्याचा नेहमी अधिक संभव असतो हे कबूल केले पाहिजे व याचसाठी एखाद्या वेळी दारू पिणे आपणास अयोग्य वाटत नसले, तरी दारू पिऊ नये हा नियम पाळणेच अधिक श्रेयस्कर ठरते. सारांश, आज्ञानामुळे, अनुभवामुळे, अगर वैयक्तिक किंवा आनुवंशिक पूर्वग्रहामुळे ज्या बाबतीत आपणास कार्याकार्याचा निर्णय करता येत नाही, अगर समाजाने दिलेला निर्णय चुकीचा आहे, अशी सकारण खात्री होत नाही, अशा बाबतीत योग्य माणसांचे मत अगर सामाजिक नियम यास प्रमाण मानून चालणेच अधिक योग्य होय.

परंतु कित्येक नीतिस्वातंत्र्याच्या भक्तांना नैतिक बाबतीत अशा प्रकारच्या श्रद्धेने वागण्याची कल्पनाच अत्यंत मूर्खपणाची वाटते. कायदा, रूढी किंवा श्रेष्ठ लोकांचे मत, अगर इतर कोणत्याही प्रकारच्या बंधनात वागण्यात बिलकूल चांगुलपणा नाही व अशा कोणत्याही प्रकारच्या नियमनाने कितीही चांगल्या गोष्टी केल्या, तरी त्यास मुळीच नैतिक महत्त्व नाही, असे त्यास वाटते. हे मत बरोबर नाही हे दाखविण्यासाठी या मुद्याचे थोडेसे अधिक विवेचन करून हे प्रकरण पूर्ण करतो.

आम्ही वर म्हटलेच आहे की, प्रत्येक मनुष्य हा जन्मापासून समाजात वाढलेला व समाजाकडून नीतिशिक्षण मिळालेला असल्यामुळे त्याच्या इतर सर्व शक्तींप्रमाणे त्याची सदसद्विवेकबुद्धीही समाजाच्या मदतीनेच विकास पावलेली व सामाजिक परिस्थितीचा छाप बसलेली असते. अशी वस्तुस्थिती असताना एखाद्या पूर्ण नीतिस्वातंत्र्याच्या भक्ताने अशा रीतीने समाजाकडून पोसल्या गेलेल्या व परिस्थितीचा ठसा उमटलेल्या अशा आपल्या

स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीचा निर्णय तरी का प्रमाण मानावा हे आम्हांस समजत नाही. लहान वयात प्रत्येकाने मोठ्या अगर श्रेष्ठ व्यक्तींचे ऐकावे व त्यांच्या शिकवणीप्रमाणे चालावे हे सर्वांस मान्य आहे; परंतु एक ठराविक वयोमर्यादा उलटल्याबरोबर प्रत्येकजण लगेच या नीतिशिक्षण कक्षेच्या बाहेर पडतो व पूर्ण नीतिस्वातंत्र्यास एकदम लायक होतो, असे म्हणता येईल काय? उलटपक्षी समाजातील बहुतेक लोक वयाने मोठे: परंत विचारीपणाच्या बाबतीत जन्मभर मुलेच राहतात. असेच आढळून येत नाही काय?

दुसरे असे की, केवळ अंधश्रद्धेने केलेल्या गोष्टीस अंतिम दृष्टीने नैतिक महत्त्व नाही हे खरे असले, तरी त्यांच्या परिणामांना महत्त्व असते हे विसरता कामा नये. वैद्याने सांगितलेल्या पथ्याची कारणे आपणास मुळीच न समजली तरी परिणामांकडे नजर देऊन ते पथ्य पाळणेच अधिक श्रेयस्कर असते. सर्वत बाबतीत आपणास पूर्ण ज्ञान असते, असे समजून स्वतःचाच हेका नेहमी चालवणे हे स्वतंत्र बुद्धीचे लक्षण नसून मूर्खपणाचे आहे. याच्याही पुढे जाऊन असे म्हणता येईल की, श्रद्धेने केलेल्या गोष्टींस काहीच नैतिक महत्त्व नाही असे म्हणणेच बरोबर नाही, कित्येक लोक केवळ आपली उन्नती होण्याच्या तीव्र इच्छेने एखाद्या व्यक्तीवर अगर धर्मावर पूर्ण श्रद्धा ठेवून वागत असतात. अशा वेळी त्यांच्या श्रद्धेतून अगर सद्भावनांस काहीच किंमत नाही, असे मानता येणार नाही व तसे मानल्यास कुराणावर श्रद्धा ठेवणाऱ्या मुसलमानांस, अगर श्रीकृष्णाच्या भगवद्गीतेवर श्रद्धा ठेवणाऱ्या सर्व हिंदूंस नीच कोटीत ढकलावे लागेल. दुसऱ्या व्यक्तीवर अगर नीतिनियमावर श्रद्धा ठेवून वागणाया मनुष्य, ती व्यक्ती अगर नियम विश्वास ठेवण्यास पसंत करण्यापूर्वी काहीच विचार करीत नाही, असे मानणे चुकीचे आहे. तशी निवड करताना मनुष्य आपल्या बुद्धिस्वातंत्र्याचा उपयोग करीतच असतो व ज्या व्यक्ती अगर नियम त्याला योग्य वाटतात त्यांचाच तो अंगीकार करतो. अशा रीतीने नैतिक श्रद्धेचा उगमही नैतिक स्वातंत्र्यांतच असतो, असे दिसून येईल. एखादी गोष्ट आपल्या गुरूने अगर शिक्षकाने स्वतः विचार करून सांगितलेली नसून दुसऱ्या कोणाचे तरी मत म्हणून सांगितल्यास ती गोष्ट आपल्या गुरूच्या तोंडून निघालेली असली, तरी आपण मानीत नाही. त्याच्या प्रत्येक शब्दापेक्षा त्याच्या सद्सद्विवेकबुद्धीच्या निर्णयासच आपण मान देतो. किंबहुना आपला गुरू अंधश्रद्धाळू अगर चुकीच्या मार्गाने जाणारा आहे, असे आढळून आल्यास त्याच्यावरील आपली श्रद्धा कमी झाल्यावाचून अगर नाहीशी झाल्यावाचून राहत नाही. सारांश, कोणावरही श्रद्धा ठेवण्यात मनुष्य आपली विचारशक्ती मारून टाकतो, असे मानणे सपशेल चुकीचे आहे. ती विचारशक्ती कित्येक वेळी सुप्त असली, तरी नेहमी जिवंत असते व तिला धक्का बसणारी गोष्ट घडून आल्यास कोणत्याही बंधनाविरुद्ध बंड करण्यासही ती समर्थ होते.

अशा रीतीने नैतिक स्वातंत्र्यास अनेक दृष्टींनी विशेष मर्यादा असल्या, तरी त्या प्रत्येक बाबतीत नेमक्या ओळखणे हे प्रत्येकाच्या स्वतंत्र बुद्धीवरच सोपविणे भाग आहे. कारण

अशा मर्यादा प्रत्येक बाबतीत कोणासही अगर कोणत्याही नियमांनी आखून देणे शक्य नाही. नीतिशास्त्र हे बंधनकारक असले, तरी ते नेहमी अपुरेच राहणार. सर्वसाधारण नीतितत्त्वे जरी स्पष्ट असली, तरी व्यवहारात इतकी गुंतागुंतीची परिस्थितीत व इतके अनपेक्षित प्रसंग येतात की, त्या वेळी त्या तत्त्वांची अंमलबजावणी कशी करावी हे ठरविताना आपले बुद्धिस्वातंत्र्य व बुद्धिकौशल्यही चांगलेच कसास लागते. ज्ञानाच्या प्रगतीबरोबरच नीतितत्त्वांच्या अंमलबजावणीचे मार्गही पालटत जातात व श्रद्धाळू मनुष्यासही त्या फरकाबद्दल वाईट वाटत नाही. डॉक्टरी विद्येने नवीन व उपयुक्त शोध लावले असता, केवळ वैद्यकावरील श्रद्धेमुळे त्याचा उपयोग करण्याचे नाकारणारा मनुष्य कोणाच्याही दृष्टीने मूर्खच ठरेल. परिस्थितीबरोबर नीतितत्त्वांच्या अंमलबजावणीचे मार्गच पालटतात असे नाही, तर नवीन नीतितत्त्वेदेखील उद्भृत होतात. याचे कारण पूर्वीची नीतितत्त्वे त्याज्य ठरतात हे नव्हे, तर ते नीतिनियम उत्पन्न होण्यास त्या वेळी कारणच नसते हे होय. गिरण्या सुरू झाल्या नव्हत्या त्या वेळी बायकांनी अगर लहान मुलांनी त्यामध्ये काम करू नये असे मोठ्या विचारी व थोर माणसांनाही सांगता आले नसते. तात्पर्य, व्यवहारातील प्रत्येक बाबतीत नीतिशास्त्राचे आपणास साह्य मिळत नसून त्या बाबी नेहमी प्रत्येकाने आपल्या स्वतंत्र बुद्धीनेच ठरवाव्या लागतात व नीतिशास्त्राची अपूर्णता ही अशा रीतीने नैतिक स्वातंत्र्यास पोषकच होते.

सारांश, नीतिनियमनांचे ध्येयही नैतिक स्वातंत्र्य हेच आहे; परंतु अज्ञानामुळे, अनुभवामुळे अगर दूरदृष्टीच्या अभावामुळे कित्येक वेळी आपणापेक्षा अधिक श्रेष्ठ व विचारी माणसांवर अगर नियमांवर श्रद्धा ठेवणेच अधिक श्रेयस्कर व जरूर होते. अशा श्रद्धेने व शिक्षणानेच मनुष्य अधिकाधिक नैतिक स्वातंत्र्यास लायक होतो. अशी पात्रता आणणे हाच नीतिशिक्षणाचा हेतू असला पाहिजे व 'शिष्यादिच्छेत् पराजयम्' या उक्तीप्रमाणे, नीतिनियमनाचे ध्येय त्या नियमनाच्या बाहेर पडण्यास शक्य तितक्या लवकर वाट दाखविणे हेच असले पाहिजे. अशा नियमनाच्या बाहेर पडणे म्हणजे ते नियमन झुगारून देणे नव्हे, तर जे नियम दुसऱ्याने घातलेले म्हणून आपण पाळतो तेच आपल्या सद्सद्विवेकबुद्धीने स्वतंत्रपणे मान्य करून आत्मसात करणे हे होय. नैतिक स्वातंत्र्य म्हणजे नैतिक स्वच्छंदता नसून त्याचा खरा अर्थ नीतिनियमांच्या उपाधीचे बाह्यत्व काढून टाकून त्या उपाधी स्वतःच आपणास लावून घेणे हा होय. खरे नैतिक स्वातंत्र्य यातच आहे व अशा रितीने समाजातील सर्व व्यक्ती जर नैतिक स्वातंत्र्याचा उपयोग करण्यास ज्ञानाने, अनुभवाने व विचाराने लायक होतील, तर नीतिनियमनाची अगर नैतिक प्रामाण्याची मुळीच जरूरत राहणार नाही हे उघड आहे.

○○○

प्रकरण ४ थे

आत्मोन्नती व स्वार्थत्याग

आत्मोन्नती व स्वार्थत्याग या दोन्ही कल्पना सर्वांस सारख्याच उदात्त अगर सारख्याच नैतिक योग्यतेच्या वाटतात. किंबहुना वरवर पाहाणारास ही दोन्ही तत्त्वे एकच आहेत असे वाटते. अरण्यात जाऊन वैयक्तिक आत्मोन्नती करणारा मनुष्य लोककल्याणाच्या दृष्टीने स्वार्थत्यागी नाही असे फार तर कोणी मान्य करील; परंतु परोपकारासाठी अहोरात्र स्वार्थत्याग करणारा मनुष्यही काही बाबतीत आत्मोन्नतीला मुकण्याचा संभव असतो, असे कबूल करणे कित्येकास फार अवघड वाटते; परंतु सूक्ष्म दृष्टीने विचार करणारास ही दोन्ही तत्त्वे सर्वस्वी अमर्यादित व अबाधित रीतीने अमलात आणणे शक्य व इष्टही नसून ती दोन्ही तत्त्वे परस्परांच्या योगानेच मर्यादित झालेली असतात असे दिसून येईल व हीच गोष्ट या प्रकरणात विशद करून सांगण्याचा इरादा आहे; परंतु या मर्यादा ठरविण्यापूर्वी या दोन्ही तत्वांचा खरा अर्थ काय हे समजणें आवश्यक आहे.

आत्मोन्नती करणे म्हणजे आपल्या ठिकाणी असलेल्या सर्व शक्तींचा शक्य तितका विकास करणे, असा अर्थ करणे शक्य आहे; परंतु अशा तहेची आत्मोन्नती करणे कोणासही शक्य नाही हे उघड आहे. आपल्या शक्तींपैकी कोणत्याही एकीचा विकास केल्यास दुसऱ्याची वाढ त्या मानानें खुंटणे हे अपरिहार्य आहे. सर्वांगांनी परिपूर्ण अशी आत्मोन्नती करणे कोणासही शक्य नाही. बौद्धिक उन्नतीच्या पाठीमागे एखादा मनुष्य अहोरात्र लागल्यास त्याचे व्यावहारिक ज्ञान अगर शारीरिक उन्नती खुंटणे, अगर सदोदित परोपकारात गढून गेलेला मनुष्य शारीरिक उन्नती व बौद्धिक उन्नती या दोहोंसही पारखा होणे अगदी स्वाभाविक व अपरिहार्य आहे. केवळ बौद्धिक उन्नतीच्या कक्षेत देखील आपणास ही गोष्ट आढळून येते. जन्मभर गणिताच्या व्यासंगांत गढून गेलेला मनुष्य इतिहासाच्या अगर चित्रकलेच्या बाबतीत अडाणीच राहणे अगदी अपरिहार्य आहे. सारांश, एका प्रकारची

उन्नती ही दुसऱ्या प्रकारची उन्नती खुंटण्यास कारणीभूत होते व म्हणून आत्मोन्नतीचा वरील अर्थ त्याज्य मानावा लागतो. अर्थात्, एका विशिष्ट मर्यादेपर्यंत प्रत्येकाने सर्वच गोष्टी साध्य करून घेण्याचा प्रयत्न करणे इष्ट आहे हे आम्हांस मान्य आहे. धंदेवाईक मनुष्याने बौद्धिक शिक्षण मुळीच घेऊ नये, अगर बौद्धिक शिक्षण घेणाऱ्या मनुष्याने व्यवहारशून्यच राहावे, असे आमचे म्हणणे नाही. उलट कितीही हलक्या प्रकारचे अगर सोपे काम असले तरी थोडेसे बौद्धिक शिक्षण मिळालेल्या मनुष्यास ते अधिक चांगल्या रीतीने करता येईल, निदान दिवसभर शारीरिक श्रम केल्यानंतर उरलेल्या वेळाचा तरी त्याला इतरांपेक्षा अधिक चांगला उपयोग करता येईल, हे आम्हास मान्य आहे; परंतु सर्वांगीण उन्नतीची ही मर्यादा लवकरच संपते व त्या मर्यादेच्या बाहेर, वर सांगितल्याप्रमाणे, एका अंगाची उन्नती करण्यास इतर काही अंगांच्या उन्नतीकडे दुर्लक्ष करणे भाग पडते. मनुष्याची बुद्धी तीक्ष्ण असली तरी तिची व्यापकता फार मर्यादित असते. काही काही माणसे इतरांपेक्षा अधिक अष्टपैलू असतात हे खरे आहे; परंतु ते सर्व पैलू सारख्याच आकाराचे असू शकत नाहीत व तसे ते असल्यास ते सर्वच पैलू लहान लहान असतात. एकाच मनुष्याने आपण उत्तमोत्तम नट, उत्कृष्ट तत्त्ववेत्ते, श्रेष्ठ प्रकारचे गणितज्ज्ञ व डॉक्टरी विद्येत पारंगत होऊ असे म्हटले, तर त्याला त्यापैकी कोणतीही विद्या पूर्णपणे हस्तगत होणार नाही हे उघड आहे व म्हणून एका गोष्टीचे पूर्ण ज्ञान व इतर गोष्टीची थोडीथोडी माहिती करून घेणे बरे, असे आपण म्हणतो. एकाग्रतेची अगर श्रमविभागाची जरूर याचसाठी असते. सारांश, पूर्ण व सर्वांगीण आत्मोन्नती शक्य नसल्यामुळे एका प्रकारची आत्मोन्नती करणाऱ्या मनुष्यास दुसऱ्या प्रकारचा स्वार्थत्याग करावाच लागतो व अशा रीतीने आत्मोन्नतीच्या कल्पनेतच स्वार्थत्यागाच्या कल्पनेचा अंतर्भाव होतो.

शिवाय, ब्रॅडलेसाहेब म्हणतात त्याप्रमाणे आपल्या ठिकाणी असलेल्या बुद्धीचा व इतर शक्तींचा सर्व शाखांत शक्य तितका विकास करणे इष्टही नसते. समुद्रकिनाऱ्यावरील वाळूचे कण मोजीत बसणे, अगर जगातील सर्व माणसे एकमेकांच्या डोक्यावर उभी राहिल्यास किती उंची होईल हे काढण्यास वेळ घालविणे, हे आत्मोन्नतीला पोषक होईल, असे म्हणता येणार नाही. ज्ञानसंपादन हेही कोणत्या तरी ध्येयाच्या दृष्टीने मर्यादित करणे आवश्यक असते. ज्याने सद्गुणांचा व दुर्गुणांचा दोन्हींचा विकास केला आहे, असा मनुष्य केवळ सद्गुणी माणसांपेक्षा बॅडले साहेबांच्या भाषेत जास्त व्यापक व म्हणून अधिक आत्मोन्नती करणारा आहे, असे म्हणता येईल काय?

उलटपक्षी, आत्मोन्नतीचा अर्थ कनिष्ठ प्रकारच्या सर्व मनोवृत्तींचा (अगर स्वार्थाचा) त्याग करून उच्च प्रकारच्या सर्व मनोवृत्तींना मात्र वाव देणे असा केल्यास, तो अर्थ अत्यंत निष्ठुरपणाचा व अमलात आणण्यास अतिशय कठीण व अनिष्टही होईल. आता हे खरे आहे की, नीतिमत्तेचा सर्वसाधारण अर्थच खालच्या दर्जाच्या स्वार्थाचा त्याग करून उच्च

प्रकारचा स्वार्थ साधणे हा आहे; परंतु मनुष्याच्या अंगातील सामान्यतः कनिष्ठ मानल्या जाणाऱ्या सर्व वृत्ती अगदी निरुपयोगी व सर्वस्वी त्याज्य असे मानणे योग्य होणार नाही. त्यांनाही स्वतःची अशी किंमत असतेच व खरा नीतिमान मनुष्यही त्या सर्व मनोवृत्तींना मारून न टाकता फक्त त्यांना आपल्या कह्यात ठेवतो. कामक्रोधादी षड्रिपू पूर्णपणे नाहीसे करून टाकलेल्या निर्विकार मनुष्याच्या हातून कोणतेही कार्य घडून येणे शक्य नसून त्या सर्व 'शत्रूना आपले गुलाम बनवून आपल्या कामास जुंपणारा मनुष्यच अधिक नीतिश्रेष्ठ व समाजास अधिक उपयोगी समजला पाहिजे. ज्यावेळी त्या मनोवृत्ती आपल्या उच्च मनोवृत्तींना अगर आपल्या ध्येयाला विरोध करतील त्या वेळी त्यांना गप्प बसविणेच इष्ट व आवश्यक असते; परंतु पुन्हा त्यांची जरूर लागल्यास त्यांना उठवून त्यांच्या जोरावरच आपले हित साधणे अधिक श्रेयस्कर व सुलभ होय. सारांश, नीतिमत्तेचा सर्वसाधारण अर्थ जरी कनिष्ठ मनोवृत्तीपेक्षा उच्च मनोवृत्तींना अधिक महत्त्व देणे असा असला, तरी कनिष्ठ मनोवृत्तींची अजिबात कत्तल केली पाहिजे, असे म्हणणे म्हणजे त्या अर्थाचा विपर्यास करणे होय.

खरी आत्मोन्नती म्हणजे सर्व आत्म्यांची अगर सर्व समाजाची उन्नती किंवा समाजाची उन्नती तीच आपली स्वतःची उन्नती, असाही अर्थ कोणी करणे शक्य आहे. हा अर्थ काही अंशी खरा असला तरी पूर्णपणे खरा नाही. लोककल्याणाच्या कार्यात स्वतःला विसरून जाणे हे अत्यंत थोरपणाचे द्योतक आहे हे खरे; परंतु खरे लोकहित करण्यासही अगोदर काहीतरी स्वहित पाहावे लागते अगर लोकांच्या उपयोगी चांगल्या रीतीने पडता येण्याची पात्रता अंगी आणावी लागते. स्वतःला बाराखडी काढता येत नसलेला मनुष्य दुसऱ्याला प्राथमिक शिक्षणही देऊ शकणार नाही हे उघड आहे. अगदी अडाणी मनुष्य देखील दुसऱ्यांची ओझी फुकट उचलून अगर दुसऱ्यांना स्वयंपाक करून घालून परोपकार करू शकेल; परंतु लोकांच्या कनिष्ठ प्रकारच्या अगर शारीरिक सुखाच्या गरजा पुरविण्यापेक्षा अधिक चांगल्या रीतीने त्यांच्या उपयोगी पडण्यास स्वतःची उन्नती अगर तयारी प्रत्येकाने अगोदर करणे जरूर असते. जन्मभर स्वतःचीच उन्नती करीत बसणाऱ्या मनुष्यास आपण अप्पलपोटा म्हणतो. इतकेच नव्हे, तर तो खरी आत्मोन्नती करीतच नाही, असे मानतो; परंतु आपला आत्मा व इतरांचा आत्मा हे सर्वस्वी एकच आहेत म्हणून स्वतःची काहीच उन्नती अगर तयारी न करता जो एकदम लोककल्याणाच्या मागे लागतो त्याच्या हातून लोकांचेही कल्याण नीट होत नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे. तात्पर्य, स्वार्थत्याग अगर परोपकार म्हणजेच आत्मोन्नती या तत्त्वाच्या मर्यादा न ओळखल्यास तो स्वार्थत्याग खऱ्या आत्मोन्नतीला विघातकच होण्याचा संभव असतो. सर्वांभूती आत्मा एक, अगर अहं ब्रह्मास्मि हे तत्त्व वेदांताच्या दृष्टीने खरे असेल; परंतु त्या तत्त्वाचे पूर्ण ज्ञान न झालेल्या अगर नीतिशास्त्राच्या कक्षेच्या बाहेर न पडलेल्या व पडू न इच्छिणाऱ्या मनुष्याने, स्वतःमधील व

इतरांमधील भेद काही बाबतीत तरी ओळखणे जरूर असते. किंबहुना तसे ज्ञान झालेल्या मनुष्यानेही स्वतःसाठी नाही तरी दुसऱ्यांना उदाहरण घालून देण्यासाठी व्यवहारात अशी मर्यादा ओळखून आचरण केल्यास त्याची सिद्धावस्था ही समाजास अधिक हितकर होईल, असे आम्हास वाटते. दुसऱ्याचे हित तेच आपले हित असे एखादा स्वार्थत्यागी मनुष्य मानील, तर त्याच तत्त्वानुसार आपला फायदा तोच दुसऱ्याचा फायदा असे एखादा स्वार्थी मनुष्य म्हणेल. यासाठी अशी तत्त्वे अंतिम दृष्टीने खरी असली तरी नीतिअनीतीची काळजी घेणाऱ्या मनुष्याने ती दृष्टिआड करणेच अधिक श्रेयस्कर असते. कारण त्या तत्त्वांचा खरा अर्थ समजणे अत्यंत दुष्कर असून, त्यांचा दुरुपयोग होण्याचा मात्र फार संभव असतो. ईश्वरभक्ताला ज्याप्रमाणे अद्वैताचे कोरडे ज्ञान, त्याचप्रमाणे नैतिक मनुष्याला सर्वात्मैक्याचा आभास सन्मार्गापासून परावृत्त करण्यासच कारणीभूत होण्याचा संभव असतो. सारांश, आत्मोन्नती म्हणजे केवळ आपल्या स्वतःचीच उन्नती असे मानणारा मनुष्य ज्याप्रमाणे खऱ्या आत्मोन्नतीला मुकतो त्याचप्रमाणे केवळ दुसऱ्यांची उन्नती म्हणजेच आपली उन्नती असे मानणारा मनुष्यही त्या तत्त्वाच्या मर्यादा ओळखून न वागल्यास खऱ्या आत्मोन्नतीला पारखा होतो.

आत्मोन्नतीच्या काही सामान्य व्याख्या पूर्णपणे बरोबर नाहीत हे वरील विवेचनावरून दिसून येईल. अर्थात्, त्या तत्त्वाचा खरा अर्थ तेवढ्याने स्पष्ट होतो असे नाही; परंतु तो अर्थ नीट समजण्यास त्या तत्त्वाला मर्यादा घालणाऱ्या दुसऱ्या तत्त्वाचा, म्हणजे स्वार्थत्यागाचा खरा अर्थ काय हे आपणास पाहिले पाहिजे.

ज्या कारणासाठी सर्वांगीण परिपूर्ण आत्मोन्नती शक्य नाही त्याच कारणासाठी सर्वस्वी परिपूर्ण स्वार्थत्याग करणेही शक्य व इष्ट नाही. स्वार्थत्यागी मनुष्य तरी कनिष्ठ प्रकारच्या स्वार्थाचा त्याग करून उच्च प्रकारचा स्वार्थ-अगर परमार्थ म्हणा, पाहिजे तर-साधीत असतो व तसा कोणताही हेतु नसताना केलेला स्वार्थत्याग हा मूर्खपणाचाच ठरतो. केवळ स्वार्थत्याग करावयाचा म्हणून विहिरीत उडी टाकणाऱ्या मनुष्यास वेड्यांच्या इस्पितळातच पाठवावे लागेल. शिवाय असा विहिरीत उडी टाकणारा मनुष्यदेखील कोणताच स्वार्थ साधीत नाही, असे म्हणता येणार नाही. देशासाठी अगर तत्त्वासाठी प्राण अर्पण करणारा मनुष्यदेखील अत्युच्च स्वार्थच साधीत असतो. सारांश, आत्मोन्नतीप्रमाणेच स्वार्थत्याग हाही सर्वस्वी परिपूर्ण रीतीने करणे शक्य व इष्टही नसल्यामुळे स्वार्थत्याग म्हणजे सर्व प्रकारच्या स्वार्थाचा त्याग असे मानणे चुकीचे होईल. वाईट मनुष्यदेखील कनिष्ठ प्रकारचा स्वार्थ साधीत असताना उच्च प्रकारच्या स्वार्थाचा त्याग करीत असतो; परंतु केवळ स्वार्थत्यागास स्वतःची अशी काही किंमत नसून ज्या तत्त्वासाठी अगर ज्या प्रकारचा स्वार्थ साधण्यासाठी तो करावयाचा, त्या तत्त्वावरूनच स्वार्थत्यागाची किंमत ठरविली जाते व म्हणूनच देशासाठी प्राण देणारा मनुष्य सर्वश्रेष्ठ समजला जातो, उलट केवळ स्वतःच्या शारीरिक अगर मानसिक यातना

चुकविण्यासाठी आत्महत्या करू पाहणारा मनुष्य शिक्षेसाठी पात्र होतो[१]. केवळ शरीराला दुःख देण्यासाठी म्हणूनच जन्मभर आंगठ्यावर उभा राहणारा हठयोगी समाजाच्या उपयोगी पडत नाही. इतकेच नाही, तर शरीराचे कष्ट आत्म्याचे अंगी लागावे अशा हेतूने तो प्रेरित झालेला नसल्यामुळे त्याचा स्वार्थत्याग त्याच्या स्वतःच्या आत्मोन्नतीलाही पोषक न होता भिकाऱ्यास मिळालेल्या हत्तीप्रमाणे निरुपयोगी व निरर्थक होतो. शिवाय ईश्वराकडे चित्त लागावे म्हणून केलेला निर्जल उपास ज्याप्रमाणे खाण्याकडेच अधिक लक्ष लागण्यास कारणीभूत होतो. त्याचप्रमाणे इष्ट मर्यादेच्या बाहेर केलेला स्वार्थत्याग त्याच्या हेतूच्याच आड येण्याचा संभव असतो. अर्थात, स्वार्थत्यागाची शिस्त लागण्यासाठी कित्येक गोष्टींचा मुद्दाम त्याग करावा लागतो हे आम्हास मान्य आहे व या मुद्याचे सविस्तर विवेचनही आम्ही पुढे करणार आहोत; परंतु स्वार्थत्यागाचे ध्येय स्वार्थत्यागापेक्षाही मोठे आहे हे ओळखून आपला स्वार्थत्याग हा त्या ध्येयाला विघातक होईल इतक्या थराला न नेण्याची खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे, एवढेच आम्हास दाखवावयाचे आहे.

त्याचप्रमाणे स्वार्थत्याग म्हणजे कनिष्ठ प्रकारच्या सर्व मनोवृत्तींचा त्याग हा अर्थही चुकीचा आहे हे वर सांगितलेच आहे. अन्न शिजविण्याचे कार्य व घरे जाळण्याचे कार्य

---

१. आत्महत्येचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा व बिकट आहे. ज्यावेळी समाजाच्या कल्याणासाठी आपले प्राण अर्पण करणे आवश्यक असते, त्यावेळी तसे करणे नैतिकदृष्ट्या मुळीच अयोग्य ठरत नसून, तशा तहेच्या आत्मत्यागास आपण आत्महत्या न म्हणता आत्मयज्ञच म्हणतो; परंतु केवळ शारीरिक अगर मानसिक क्लेश चुकविण्यासाठी आत्महत्या करणे योग्य आहे, असे म्हणणे म्हणजे सुख हेच आयुष्याचे ध्येय आहे, असे मानण्यासारखे आहे. केवळ सुखवादाच्या दृष्टीने पाहिले तरीदेखील कोणत्याही व्यक्तीचे जीवित नष्ट होऊ देण्यापेक्षा तिचे दुःख शक्य तितके हलके करण्याचा प्रयत्न करणे हेच समाजाचे कर्तव्य होय व त्या व्यक्तीचे दुःख सर्व समाजाच्या दुःखासच कारणीभूत होऊ लागेल, तर अशा व्यक्तीस आत्महत्या करू देणे फार तर क्षम्य होईल; परंतु केवळ सुखाखेरीज बौद्धिक व नैतिक दृष्टीनेही जीवितास महत्त्व आहे, असे मान्य केल्यास कोणत्याही मनुष्याने केवळ आपले जीवित सुखमय नाही, अगर त्यात सुखापेक्षा दुःखच अधिक आहे, एवढ्याच कारणासाठी आत्महत्येचा प्रयत्न करणे केव्हाही निंद्यच ठरेल. शारीरिक अगर मानसिक सौख्य आपणास लाभले नाही, तरी ज्ञानार्जनात अगर लोककल्याणात आपले आयुष्य वेचल्यास त्या योगाने प्राप्त होणारे सात्त्विक समाधान तरी आपणास खचित मिळेल की नाही? परोपकारासाठी अगर ज्ञानार्जनासाठी अहोरात्र झटणाऱ्या व्यक्तीस शारीरिक सौख्य मिळणे शक्यच नसते; परंतु त्याबद्दल त्यास काडीमात्र तरी दुःख होते काय? त्याचप्रमाणे आपणही आपले आयुष्य बौद्धिक व नैतिक उन्नती करण्यात घालविल्यास आपणास त्या आनंदाचा उपभोग घेता येऊन, शिवाय आपल्या जीविताचे सार्थक होणार नाही काय?

ज्या प्रकारचा अग्नी करतो, त्याचप्रमाणे सद्गुणांचा व दुर्गुणांचा उगम हा एकाच प्रकारच्या मनोवृत्तींमध्ये असतो; परंतु त्याचे नियमन अगर उपयोग करण्याच्या मार्गामधीला फरक हाच सद्गुणांमधील व दुर्गुणांमधील फरक होय. क्रोधाची भावना कनिष्ठ म्हणून ती मारून टाकणे हा खरा स्वार्थत्याग नसून त्या भावनेचा वाईट गोष्टी नाहीशा करण्याकडे उपयोग करून चांगल्या गोष्टींना अधिक वाव देणे यातच अधिक उपयुक्त व अधिक श्रेष्ठ प्रकारचा स्वार्थत्याग आहे. प्रेमाचे पाश अजिबात तोडून टाकण्यापेक्षा ती भावना अधिक व्यापक व तीव्र करून तिच्या जोरावर प्राणिमात्रांच्या उपयोगी पडणे हेच अधिक सुलभ व श्रेयस्कर आहे. ज्याला दुर्गुणांची अगर जुलमाची चीड येत नाही, असा मनुष्य स्वार्थत्यागी नसून अधोगतीस गेलेला आहे असेच कोणीही म्हणेल. कीर्तीची आवडदेखील योग्य प्रमाणात ठेवल्यास ती आपल्या हातून चांगल्या गोष्टी घडवून आणण्यास उत्तेजन देते. सारांश, स्वार्थत्याग म्हणजे आपल्या अंगातील कनिष्ठ प्रकारच्या सर्व मनोवृत्तींचा त्याग हा अर्थ बरोबर नसून आपल्या ध्येयाच्या आड ज्या वृत्ती येतील त्यांचा त्याग व शक्य असल्यास ते ध्येय साधण्यास त्यांचा उपयोग, असा त्याचा अर्थ केला पाहिजे.

याच्याही पुढे जाऊन असे म्हणता येईल की, आपल्या उच्च ध्येयाच्या आड ज्या कनिष्ठ मनोवृत्ती येतील त्यांना किंमत न देता त्यांचा त्याग करणे हे इष्ट व आवश्यक असले तरी तसा विरोध न आल्यास, सामान्यतःही त्या वृत्ती केवळ नैतिक मनोवृत्तीच्या दासी नसून त्यांना स्वतःची अशी किंमत आहे हे विसरता कामा नये. आदर्शभूत जीवित हे कष्टमय असले तरी ते कष्ट सहन करणे आवश्यक असते व तो मनुष्य ते कष्ट सहन करीतच असतो; परंतु आदर्शभूत जीवित म्हणजेच दुःखमय अगर कष्टमय जीवित असे मानणे अगदी चुकीचे आहे. कांट साहेब म्हणतात त्याप्रमाणे आपले कर्तव्य करीत असताना जर का एखाद्या मनुष्याला आनंद वाटला, तर तो मनुष्य एकदम विलासप्रिय अगर कर्तव्यशून्य बनतो, असे म्हणणे म्हणजे निष्ठुरपणाचा अतिरेक होय. किंबहुना कोणतेही काम केवळ कर्तव्य म्हणून अगदी निर्विकार मनाने अगर जुलमाने करणाऱ्या मनुष्यास आपण घोड्यावर बसविलेल्या रडतरावाइतकीच किमत देतो. सुखप्रद कर्तव्यशून्यतेपेक्षा दुःखमय कर्तव्यदक्षता चांगली असेल; परंतु कष्टमय कार्यतत्परतेपेक्षा सुखमय कार्यतत्परता अधिक चांगली हे कोणीही मान्य करील. परोपकार करीत असताना कष्ट झाले, तर ते सोसले पाहिजेत हे खरे; परंतु परोपकार करताना तसे कष्ट न झाल्यास तो मनुष्य स्वार्थीच आहे असे म्हणणे म्हणजे शुद्ध तर्कटपणा आहे, असे आम्हास वाटते. इंग्रजीत अशी एक म्हण आहे की, एखादे संतुष्ट डुक्कर होण्यापेक्षा असंतुष्ट सॉक्रेटीस होणे बरे; परंतु याहीपेक्षा अधिक चांगली एक गोष्ट आहे व ती म्हणजे संतुष्ट सॉक्रेटिस होणे ही होय. काव्य, गायन, अगर इतर कलाकौशल्याच्या व करमणुकीच्या गोष्टी यांनाही सामाजिक हिताच्या दृष्टीने किंमत आहे व प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यक्रमात याही गोष्टींना योग्य स्थान असले पाहिजे. अर्थात्, या सर्व गोष्टींचे परस्पर

प्रमाण प्रत्येकाने आपल्या सदसदविवेकबद्धीनेच ठरविले पाहिजे. परंत या सर्व गोष्टींना सर्वस्वी तुच्छ लेखण्याची वृत्ती ही खऱ्या उन्नतीला पोषक नाही हे नमूद करणे आवश्यक आहे. त्या मनोवृत्ती नैतिक मनोवृत्तीपेक्षा कमी दर्जाच्या असल्या व कित्येक वेळी त्यांना अगदी गप्प बसविणे आवश्यक असले तरी त्यांना स्वतःची अशी किंमत आहे व त्यांना मर्यादित रीतीने योग्य वाव दिल्यास स्वार्थत्यागाच्या तत्त्वास धक्का न बसता त्या स्वतःच्या व इतरांच्याही उन्नतीला पोषकच होतात हे लक्षात ठेवणे जरूर आहे.

स्वार्थत्यागाच्या तत्त्वास दुसऱ्या एका कारणाने मर्यादा घालणे आवश्यक असते. दुसऱ्याच्या सुखासाठी आपल्या हिताचा त्याग करावा हे खरे; परंतु दुसऱ्याच्या क्षुल्लक फायद्यासाठी आपल्या महत्त्वाच्या हिताचा अगर महत्त्वाच्या सुखाचाही त्याग करावा, असे म्हणता यावयाचे नाही. जावई पाहुणा आला म्हणून रेडा पिळण्याचा यत्न करणे ज्याप्रमाणे हास्यास्पद ठरेल, त्याचप्रमाणे दुसऱ्याच्या क्षुल्लक हितासाठी आपले मोठे नुकसान करून घेणे हे शहाणपणाचे होणार नाही. आपल्या घरी आलेल्या मित्राची करमणूक व्हावी अगर त्यास एखादे पुस्तक वाचून दाखवावे म्हणून आपली वार्षिक परीक्षा बुडवून घरी बसणाऱ्या विद्यार्थ्यास कोणीही मूर्खच म्हणेल. रोग्यांच्या शुश्रूषेस शक्य तितका अधिक वेळ सापडावा म्हणून एकाद्या डॉक्टरने अजिबात झोपच न घेण्याचा निश्चय केल्यास त्याच्या स्वार्थत्यागास लवकरच कायमचा खो बसेल हे उघड आहे. अर्थात्, कित्येक गोष्टींत अगर कित्येक व्यक्तींच्या बाबतीत असा प्रमाणाबाहेर स्वार्थत्याग करणेदेखील आवश्यक व इष्टही असते. शिवाजीला थोडीशी जखम होऊ नये म्हणून प्राणत्याग करणारा एखादा मावळा, अगर एलिझाबेथ राणीच्या पायाला चिखल लागू नये म्हणून यावर आपला अमूल्य किमतीचा झगा अंथरणारा वॉल्टर रॅले यास काही अक्कल नव्हती, असे म्हणता येणार नाही; परंतु त्याचे कारण शिवाजीच्या थोड्याशा शरीरस्वास्थ्याची अगर राणी या नात्याने एलिझाबेथच्या सुखाची किंमत, त्यासाठी केलेल्या स्वार्थत्यागापेक्षाही मोठी समजली जात होती हे होय. अशा केवळ अपवादात्मक गोष्टी सोडून दिल्यास, असा स्वार्थत्याग नेहमी इष्टच असतो, असे म्हणता यावयाचे नाही. दुसऱ्याचे हित अगर सुख हे जसे आपण महत्त्वाचे मानतो त्याचप्रमाणे आपल्या स्वतःच्या हिताला अगर सुखालाही काही महत्त्व आहे हे अगदीच विसरता कामा नये. दुसऱ्याच्या चैनीसाठी आपल्या हिताकडे दुर्लक्ष करणे अगदी अयोग्य आहे हे कोणीही मान्य करील. थोड्याशा वावदूकपणाबद्दल वाचकांनी क्षमा केल्यास असेही म्हणता येईल की, अमर्याद स्वार्थत्यागाचे तत्त्व हे आत्मविरोधीच होते. एखादे नारिंग एकाने दुसऱ्यास, त्याने तिसऱ्यास, अशा रीतीने देत गेल्यास ते कुजून जाण्यापलीकडे काहीही होणार नाही. कोणीतरी ते खाल्लेच पाहिजे. कोणीच कोणत्याही गोष्टीचा स्वतः उपभोग न घेता सर्व बाबतीत स्वार्थत्याग करण्याचे ठरविल्यास त्यात कोणाचेच हित होणार नाही. स्वार्थत्याग हाही दुसऱ्याच्या हिताशी सापेक्ष असतो व आपण दुसऱ्याकरिता ज्या गोष्टीचा

त्याग करतो ती दुसऱ्यास मिळावी व दुसरा आपणासाठी जी गोष्ट करतो तिचा आपण स्वीकार करावा, असाच दोघांचाही हेतू असला पाहिजे. शिवाय कित्येक गोष्टी दुसऱ्याने करण्यापेक्षा ज्याच्या त्यासच त्या अधिक चांगल्या रीतीने करता येतात, किंबहुना कित्येक गोष्टी आपण दुसऱ्यासाठी करण्यापेक्षा त्याने त्या स्वतः करणेच अधिक इष्ट व त्याच्या हिताच्या दृष्टीने अधिक आवश्यक असते. आपल्या मित्राच्या उपयोगी पडण्यासाठी त्याचे शाळेतील धडे लिहून देणे, अगर एखाद्या लहान मुलाचे श्रम वाचविण्यासाठी त्याला एकसारखे कडेवर घेऊन हिंडणे हे त्याला हितकर न होता त्याच्या अहितासच कारणीभूत होईल. शिवाय ज्या गोष्टीचा उपभोग स्वतः घेणे आपणास अयोग्य वाटते त्या गोष्टींचा उपभोग नेहमी दुसऱ्यांना घ्यावयास लावणे म्हणजे एक प्रकारे त्यांच्या स्वार्थीपणास उत्तेजन देणेच होय. सारांश, स्वार्थत्यागासही काही मर्यादा आहेत. आपला स्वार्थत्याग अगर परोपकार आपल्या अधिक महत्त्वाच्या हितास अडथळा न करील व दुसऱ्याच्या अहितासच कारणीभूत न होईल इतक्या बेतानेच त्या तत्त्वाची अंमलबजावणी केली पाहिजे.

दुसरे असे की, प्रत्येक मनुष्याने दिवसाचे चोवीस तास दुसऱ्यांची उन्नत्ती करण्यात घालवू, असे म्हटले तरी तसे करणे शक्य नाही. स्वतःच्या पोटच्या व्यवसायात विश्रांतीत अगर मनोरंजनातही काही काळ घालविणे आवश्यक व अपरिहार्य असते, असे मनोरंजन हेही दुसऱ्यास हितकर होऊ शकेल. उदाहरणार्थ, स्वतःच्या करमणुकीसाठी मी एखादे काव्य अगर पुस्तक लिहिल्यास किंवा एखादे गाणे म्हटल्यास ते दुसऱ्यासही आनंददायक होईल. अर्थात्, दुसऱ्यास त्यापासून त्रास अगर कटकट होत असल्यास गाणे म्हणण्याच्या करमणुकीवरही मी पाणी सोडले पाहिजे हे खरे आहे; परंतु दुसरा कोणी ऐकावयास नसल्यास गाणे म्हणताच कामा नये, असे म्हणणे योग्य होणार नाही. अरण्यरुदन निरर्थक खरेच; परंतु अरण्यात सापडलेल्या मनुष्याने रडण्याचे समाधानदेखील उपभोगू नये, असे म्हणणे निष्ठुरपणाचे होईल. दुसऱ्याला आनंद देणे हे जर योग्य ठरते, तर दुसऱ्या कोणाच्याही हिताच्या आड न येता, त्याच आनंदाचा स्वतः उपभोग घेण्यात अयोग्य काय आहे हे आम्हास समजत नाही.

वरील विवेचनावरून कित्येकास असे वाटेल की, केवळ स्वार्थत्यागासाठी स्वार्थत्याग करणे अनिष्ट व अशक्य असल्यामुळे हे तत्त्व पूर्णपणे समजलेला मनुष्य, स्वार्थत्याग व आत्मोन्नती या दोन्ही तत्त्वांना योग्य मर्यादा घालून आपल्या आचरणात त्यांचा सुंदर मिलाफ करून टाकतो. परोपकाराच्या द्वारेच तो आपली आत्मोन्नती करून घेतो व अधिक चांगला स्वार्थत्याग करता येण्यासाठीच घटकाभर परोपकार बाजूस ठेवून तो आपली स्वतःची शारीरिक, बौद्धिक अगर आध्यात्मिक उन्नती करीत असतो. पुढच्या एकंदर हिताकडे नजर देऊन तो क्षणिक सुखाचा त्याग करतो. अशा रीतीने आपला खरा स्वार्थ कशात आहे हे नीट ओळखून वागणाऱ्या मनुष्याला उच्च स्वार्थासाठी कनिष्ठ स्वार्थाचा त्याग करताना

आपण काही स्वार्थत्याग करीत आहोत, असे मुळीच वाटणार नाही. सारांश, आपला खरा स्वार्थ अगर खरी उन्नती कशात आहे हे समजल्यास स्वार्थत्यागाचे तत्त्व शिकविण्याची अगर डोळ्यांपुढे ठेवण्याची मुळीच जरूरत नाही, असे कित्येकास वाटेल; परंतु अशा रीतीने या दोन्ही तत्त्वांचा पूर्ण मिलाफ करणे हे आपले ध्येय असले, तरी व्यवहारात असे करणे खालील कारणांमुळे शक्य होत नाही व म्हणून स्वार्थत्यागाचे तत्त्व सतत डोळ्यापुढे ठेवणे जरूर असते.

पहिले कारण आपणास मनुष्य स्वभावातच आढळून येईल. मनुष्य हा स्वभावतःच सुखप्रिय असतो. सद्गुणांची वाढ करण्यास त्याला आपल्या सुखेच्छेशी व इतर मनोविकारांशी अतिशय झगडावे लागते. असे झगडल्याखेरीज चांगले शील अगर स्वभाव बनणे शक्य नसते. सर्कशीत काम करावयास लावण्यापूर्वी ज्याप्रमाणे एखाद्या घोड्याला ती काम करण्याची सवय लावून ठेवावी लागते, त्याचप्रमाणे आपल्या मनोवृत्तीसही दडपून ठेवण्याची सवय आपण न केल्यास स्वार्थत्याग करण्याचा प्रसंग आला असता आयत्या वेळी त्या आपल्या ताब्यात राहतीलच असे नाही, बहुशः राहणारच नाहीत. यासाठी जनहित साधणाऱ्या मनुष्याने आपले मनोविकार त्या ध्येयाच्या आड न यावेत म्हणून त्यांच्याशी झगडण्याचा व मुद्दाम कष्ट सोसण्याचादेखील सराव ठेवला पाहिजे. अशा रीतीने मनोविकार आपल्या ताब्यात आल्यावर आपल्या इच्छेप्रमाणे त्यांना मोकळे सोडणे सुलभ असते; परंतु ते आपल्या कह्यात नसल्यास आयत्या वेळी ते अनावर होण्याचाच अधिक संभव असतो. हा झगडा थोड्याबहुत प्रमाणात नेहमीच चालू ठेवावा लागतो. कारण आत्मसंयमन करणे ही गोष्ट अत्यंत कठीण असून, ती कोणासही कोणत्याही वयात पूर्णपणे साधेल असे मानणे फार धाडसाचे आहे. आत्मसंयमन करणे सर्वांस सारखेच कठीण जाते असे नाही. कित्येकास ते फार लवकर साधेल, तर कित्येकास त्यासाठी फार श्रम करावे लागतील. तसे श्रम करावे लागण्यात त्यांचा नेहमी दोषच असेल असेही नाही. अशक्त व अग्निमांद्य असलेल्या मनुष्यापेक्षा सशक्त व निरोगी मनुष्यास आपली क्षुधा आवरणे अधिक अवघड जाईल; परंतु आत्मसंयमन करण्यास न शिकलेला अशक्त मनुष्यदेखील एखादे वेळी उपाशी राहाण्याचा प्रसंग आल्यास सशक्त माणसाइतकीच तक्रार करील. सारांश, स्वार्थत्याग म्हणजेच आत्मोन्नती हे तत्त्व मनात बाळगण्यास अगर परोपकारातही आपला उच्च स्वार्थ साधत असल्यामळे तसे करताना आपणास खरा स्वार्थत्याग करावाच लागत नाही, असे वाटण्यास जे आत्मसंयमन असावे लागते ते प्राप्त होण्यास, एरव्हीदेखील स्वार्थत्याग करण्याची सवय ठेवणे व परोपकाराची अगर स्वार्थत्यागाची वृत्ती हाडीमासी खिळवून टाकणे आवश्यक असते. तशी सवय नसलेल्या मनष्यास या दोन तत्त्वांचा मिलाफ करता येणे शक्य नाही व यामळे स्वत:च्या व दुसऱ्याच्या हितामध्ये विरोध आल्यास इतराचे हित अजिबात बाजूस सारण्यासही तो मागेपुढे पाहणार नाही. व्यक्तीव्यक्तींच्या हितामध्ये

असा विरोध नेहमी उत्पन्न होतो हे थोडासा विचार केल्यास कोणासही दिसून येईल व अशा तऱ्हेच्या समाजरचनेतच स्वार्थत्यागाच्या तत्त्वास विशेष महत्त्व देण्याचे दुसरे कारण आपणास सापडेल. निरनिराळ्या व्यक्तीच्या कनिष्ठ दर्जाच्या अगर व्यावहारिक हितसंबंधात तर असा विरोध आपणास पदोपदी आढळून येतो. उदाहरणार्थ पैशाच्या बाबतीत एकाचा जो फायदा तोच दुसऱ्याचा तोटा असे दिसून येते; परंतु असा हितविरोध नेहमी कनिष्ठ बाबतीतच येतो असे नाही. समाजातील सर्व लोकांना खावयास मिळावे म्हणून त्यातील कित्येक लोकांना जन्मभर शेतकीच्या धंद्यात राबून आपल्या बौद्धिक उन्नतीला मुकावे लागते, तर स्वातंत्र्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या मनुष्यास आपल्या शारीरिक, बौद्धिक अगर वैयक्तिक, नैतिक उन्नतीसही मुकावे लागते. सत्यपालन अगर अहिंसा ही आत्मोन्नतीस अत्यंत आवश्यक आहेत हे खरे; परंतु स्वदेशाच्या कल्याणासाठी प्रसंगी असत्याने जिव्हा विटाळणे अगर रक्तात हात माखणे हेही आवश्यक असते. सारांश, आत्मोन्नती व परोपकार यात कधीच विरोध होणार नाही, अशी परिस्थिती कधीही उत्पन्न होणे शक्य नसल्यामुळे आत्मोन्नतीबरोबरच स्वार्थत्यागाचे तत्त्वही नेहमी डोळ्यापुढे ठेवणे आवश्यक आहे.

अशा रीतीने व्यवहारात आत्मोन्नतीपेक्षा स्वार्थत्यागाच्या तत्त्वासच अधिक महत्त्व देणे इष्ट असले, तरी केवळ त्याच तत्त्वाचा अमर्याद व अबाधित रीतीने अंगीकार केल्यास ते तत्त्व अनिष्ट व आत्मविरोधी होते हे वर सांगितलेच आहे. अशा स्थितीत या दोन्ही तत्त्वांच्या परस्पर मर्यादा कशा ठरवाव्यात, असा प्रश्न उपस्थित होणे अगदी स्वाभाविक आहे. या मर्यादा ठरविताना दोन्हीपैकी कोणत्याही तत्त्वाला जर का धक्का बसला, तर आपणास नीती-अनीतीचे ज्ञानच नाही, किंबहुना नीतिअनीती हे केवळ थोतांड आहे असे म्हणावे लागेल. नीतितत्वांचा मिलाफ होऊ शकला नाही, तर एकाच वेळी दोन परस्परविरोधी गोष्टी करणे सारखेच योग्य आहे असे म्हणावे लागेल व या तंट्याचा फायदा घेऊन स्वार्थी मनुष्य त्या दोन्हीच्याही तडाख्यातून सुरक्षितपणे निसटून जाईल. इतकेच नव्हे, तर उलट ती दोन्ही तत्त्वे प्रतिपादन करणाराना मूर्खाचे कोटीत ढकलील. ही कल्पना स्वकपोलकल्पित नसून सुप्रसिद्ध इंग्रज लेखक ब्रॅडले यांनीच हे संकट नीतिशास्त्रावर आणले आहे; परंतु ब्रडले साहेबांचा आक्षेप केवळ गैरसमजाच्या पायावर रचलेला आहे हे सिद्ध करणे मुळीच कठीण नाही. एखादे वेळी दोन चांगल्या गोष्टी करणे इष्ट असता त्यात परस्परविरोध येतो व त्यापैकी एक पत्करून दुसरीचा त्याग करावा लागतो. उदाहरणार्थ, आत्मोन्नती व स्वार्थत्याग ही दोन्ही तत्त्वे चांगली असता ती दोन्ही साधणे एखादे वेळी शक्य नसते, म्हणून सर्व नीतिमत्ता ही मायिक अगर आभासात्मक असून, परब्रह्माच्या दृष्टीने ती अगदी चुकीची आहे, असा ब्रेडले साहेबांचा अभिप्राय आहे; परंतु केवळ चांगले अगर इष्ट व करण्यास प्रशस्त अगर योग्य, या दोन गोष्टींमधील भेद न ओळखल्यामुळे ब्रॅडले साहेबांनी वरील आक्षेप आणलेला आहे. दोन्ही गोष्टी चांगल्या असल्या व त्या परस्परविरोधी असल्या, तरी एकाच वेळी त्या दोन्ही

करणे सारखेच योग्य अगर प्रशस्त आहे, असे नीतिशास्त्राचे म्हणणे असते, तर नीतिशास्त्र हे आत्मविरोधी व मायिक झाले असते; परंतु नीतिशास्त्र असे सांगतच नाही. उलट त्या दोन्ही करण्याचा यत्न करणे मूर्खपणाचे आहे, असेच नीतिशास्त्र सांगते. दारोदार उपदेश करीत हिंडणे चांगले खरे; परंतु परीक्षेच्या वेळी आपला अभ्यास करावयाचा टाकून उपदेश करीत भटकणाऱ्या विद्यार्थ्यास परोपकारी म्हणण्यापेक्षा कोणीही उडाणटप्पूच म्हणेल. सारांश, दोन चांगल्या गोष्टी परस्परविरोध आल्यास या दोन्ही करणे सारखेच प्रशस्त न मानता त्यातील अधिक चांगली असेल ती करून कमी चांगली असेल तिचा त्याग करणे हेच योग्य आहे, असा नीतिशास्त्राचा सिद्धांत आहे. आता हे खरे आहे की, नीतितत्त्वात असा विरोध कधीच आला नसता, तर अधिक बरे झाले असते; परंतु असे म्हणणे म्हणजे एखाद्याला एकाच वेळी दुसऱ्यास आपले अन्न देऊन टाकूनही स्वतःची भूक शांत करणे, अगर इतरांना आपली संपत्ती देऊन टाकूनही स्वतः श्रीमंतच राहणे शक्य झाले असते, तर अधिक बरे झाले असते, असे म्हणण्यासारखे आहे. सारांश, ब्रह्मदेवाने आहे याहून अधिक चांगली व सोयिस्कर सृष्टी निर्माण केली असती, तर अधिक बरे झाले असते, असे म्हणण्यासारखे आहे. नीतितत्त्वांमधील परस्परविरोध हा सृष्टीच्या अगर मनुष्याच्या शक्तीच्या अपूर्णतेचे द्योतक असला, तरी कोणत्याही विशिष्ट बाबतीत त्यातील अधिक श्रेष्ठ तत्त्वाचा स्वीकार करून कनिष्ठ तत्त्वाचा त्याग करावा, असे सांगणारे नीतिशास्त्र हे मायिक अगर सर्वस्वी सापेक्ष कसे ठरते ते आम्हास समजत नाही. नीतिशास्त्र हे ब्रह्मस्वरूपाचेदृष्टीने सापेक्ष अगर असत्यही असले, तरी मायिक जगातून ब्रह्मस्वरूपाप्रत पोहोचविणारी एखादी खरी शिडी असेल, तर ती नीतिमत्तेचीच आहे, असे आम्हास वाटते. आत्मोन्नती स्वार्थत्याग या तत्त्वात परस्परविरोध आला, तरी कोणत्याही विशिष्ट बाबतीत त्यांच्या कमीअधिक युक्तायुक्ततेचा विचार करून न्यायनिवाडा देणे हे नीतिशास्त्राला शक्य व आवश्यक आहे. तसा निवाडा देण्याची साधारण दिशा दाखवून हे प्रकरण संपविले पाहिजे.

दुसऱ्याचे हित ज्या वेळी स्वतःच्या हिताइतकेच महत्त्वाचे असेल, त्या वेळी आपण त्यासाठी स्वतःच्या हितावरच पाणी सोडले पाहिजे हे उघड आहे. दुसऱ्यांच्या हिताकडे पूर्ण दुर्लक्ष करून आपली खरी व पूर्ण उन्नती होणे शक्य नाही. सर्वांचे हित सारख्याच महत्त्वाचे आहे व आपल्या हितासाठी दुसऱ्याचे नुकसान करणे हे सर्वस्वी अयोग्य व आत्मोन्नतीला विघातक आहे. सर्वांचे हित सारख्याच महत्त्वाचे असले, तरी ते साधण्याचे सर्वांचे मार्ग भिन्न भिन्न असतात व ते साधण्यास लागणाऱ्या शक्तीची वाढ सर्वांत सारखीच होणे शक्य नसते. यामुळे ज्या प्रकारचे काम एखादा मनुष्य अधिक चांगले करू शकतो, त्या कामात त्याला इतरांपेक्षा अधिक सवलती देणे हे सर्वांच्याच हिताचे असते. या विषयाचे सविस्तर विवेचन आम्ही पुढील प्रकरणात करणार आहोत. प्रस्तुत मुद्दा हा आहे की, एका मनुष्यास दुसऱ्यापेक्षा जास्त हितकारक अगर सुखकर परिस्थिती समाजाने उत्पन्न करून

दिलेली आहे असे वरवर पाहाणारास दिसले, तरी तसे करणे अन्यायाचेच आहे असे म्हणता येणार नाही. उच्च प्रकारच्या बौद्धिक शिक्षणाचा अगर व्यवसायाचाही समाजाला फायदा होतो व तो करणाऱ्या मनुष्याने अन्नवस्त्राच्या बाबतीत इतरांपेक्षा अधिक सुख उपभोगणे कोणी आपस्वार्थीपणाचे समजत नाही. अशा रीतीने आपले हित दुसऱ्याच्या हितापेक्षा अधिक महत्त्वाचे असल्यास दुसऱ्याच्या क्षुल्लक हितासाठी आपल्या हिताचा त्याग न करणेच अधिक श्रेयस्कर व समाजासही अधिक हिताकारक होय. अर्थात्, ज्या वेळी अशा कोणत्याही रीतीने दुसऱ्याच्या हितापेक्षा आपले, हित अधिक महत्त्वाचे नसते, अगर दुसऱ्याचे हितच आपल्या हितापेक्षा अधिक महत्त्वाचे असते. त्या वेळी आपले हित बाजूस सारून दुसऱ्यास मदत करणे यातच खरी आत्मोन्नती आहे. किंबहुना व्यावहारिकदृष्ट्या विचार केल्यास प्रत्येक मनुष्य हा स्वभावतःच स्वहितदक्ष असल्यामुळे ते त्यास कोणीही सांगावे लागत नाही; परंतु स्वार्थत्यागाचे अगर परहिताचे ध्येय हे नेहमी डोळ्यापुढे न ठेवल्यास ती वृत्ती हळूहळू नाहीशी होत जाण्याचाच अधकि संभव असतो व म्हणून स्वार्थत्यागाचे तत्त्वच व्यवहारांत अधिक श्रेष्ठ मानून चालावे लागते. शिवाय एखादा मनुष्य कितीही हलक्या दर्जाचा अगर कोणत्याही चांगल्या कामास निरुपयोगी असला, तरी त्यास केवळ आपल्या हिताचे साधन असे मानणे, अगर त्यास स्वतःची अशी कांहीच किंमत नाही असे मानणे; सारांश, आपले हित कितीही महत्त्वाचे असले, तरी इतर व्यक्तींना केवळ त्या हिताची साधने असे लेखणे केव्हाही योग्य होणार नाही. सर्वांची शक्ती अगर प्रगती सारखी नसल्यामुळे सर्वांच्या हिताची योग्यताही यासारखी नसते हे खरे आहे; परंतु एका विवक्षित मर्यादेपर्यंत सर्व माणसे सारख्यास दर्जाची असतात हे लक्षात ठेवले पाहिजे. युरोपियन लोक जास्त सुधारलेले व अधिक मोठमोठी कामे करण्यास लायक आहेत, म्हणून त्यांनी एखाद्या वसाहतीतील रानटी लोकांस कापून काढून आपणास जागा मोकळी करून घेणे हे नीतिदृष्ट्या केव्हाही निंद्यच ठरेल. किंबहुना उच्च प्रकारचे बौद्धिक शिक्षण घेतलेल्या मनुष्याचा त्याच्या स्वतःखेरीज इतर समाजास जर काडीमात्रदेखील फायदा होत नसता, तर तसे शिक्षण घेण्यात त्याने केवळ वेळाचा अपव्यय करून समाजावर व्यर्थ भार घातला असेच आपणास वाटले असते. अशा तहेची त्याची वैयक्तिक उन्नती ही इतर कनिष्ठ प्रकारच्या अगर अन्नवस्त्राच्या फायद्याप्रमाणेच इतरांच्या हितास विरोध करणारी अशीच आपण मानली असती. जो जो मनुष्य अधिकाधिक उच्च प्रकारची आत्मोन्नती करून घेईल तो तो तिचे वैयक्तिक स्वरूप जाऊन ती सर्वांस हितकार होत जाते व म्हणूनच तशी वैयक्तिक आत्मोन्नती करणे हे आपण योग्य समजतो. राजकारणाचा अगर तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यात एखाद्या मनुष्याने अनेक वर्षे घालविली, तरी त्या विषयांचा त्याने केवळ करमणुकीखातर अभ्यास केला नसल्यास त्या अभ्यासाचा उपयोग तो आपल्या देशाची राजकीय स्थिती सुधारण्यात अगर समाजात उदात्त तत्त्वांचा प्रसार करण्याकडे करील व अशा रीतीने आपली वैयक्तिक उन्नती त्याने

इतरांच्या कारणी लावल्यास तसा अभ्यास करण्यात घालविलेल्या आयुष्याबद्दल कोणीही त्यास दोष देणार नाही. शास्त्रीय शोधांनी अगर काव्य लिहून आपल्या देशाचे नाव अजरामर करणाऱ्या बोसबाबूंस अगर रवींद्रनाथास स्वार्थी म्हणणाऱ्या मनुष्याची हिताहिताची कल्पना फारच आकुंचित व विचित्र आहे, असे म्हणावे लागेल. राष्ट्रामध्ये वाङ्मयाची म्हणजे ज्ञानाची वाढ मुळीच न झाल्यास त्याच्या नीतिमत्तेचीही वाढ खुंटते हे लक्षांत ठेवले पाहिजे. नीतिमत्ता ही केवळ बौद्धिक उन्नतीवर अवलंबून असते, असे आमचे म्हणणे नाही; परंतु अडाणी लोकांच्या नीतिअनीतीच्या कल्पनाही रानटीपणाच्याच असतात हे सांगावयास पाहिजे असे नाही. केवळ नीती-नीती असे घोकीत बसल्याने नीतिमत्ता वाढत नसून आपले सर्व प्रकारचे व्यवसाय व सर्व शक्तींची वाढ यथायोग्य प्रमाणात व नीतीच्या कक्षेत राहून करण्यातच खरी आत्मोन्नती व खरा स्वार्थत्याग आहे. गुन्हेगारीच्या शास्त्राचा अभ्यास करणाऱ्यानेही चोरीचा प्रयोग करून पाहणे अगर विवाहसंस्थेचा अभ्यास करणाऱ्याने पंचवीस बायका करून घेणे योग्य आहे, असे कोणी म्हणणार नाही. अशा रीतीने इतर सर्व प्रकारची उन्नती नैतिक उन्नतीपेक्षा कमी दर्जाची असली, तर केवळ स्वार्थत्यागाच्या कल्पनेने वाहवून जाऊन सर्व प्रकारची उन्नती खुंटविल्याने मनुष्य आत्मोन्नती व परोपकार या दोन्हीसही मुकतो, असे आम्हास वाटते.

सारांश, समाजाच्या हिताकडे योग्य नजर देऊन व आपला स्वार्थत्याग हा स्वतःच्या व इतरांच्या एकंदर हितास पोषक होत असल्यास तसा स्वार्थत्याग करण्यास नेहमी तत्पर असणे यातच खरी आत्मोन्नती आहे व स्वतःच्या आणि समाजाच्या हितासाठी जी स्वतःची शारीरिक, बौद्धिक अगर नैतिक पात्रता लागते ती अंगी आणण्याचा यत्न करणे यातच खरा स्वार्थत्याग आहे. अशा रीतीने ही दोन्ही तत्त्वे सदैव हृदयात बाळगून त्याप्रमाणे आचरण करणाऱ्या मनुष्यास नीतिमत्ता ही मायिक अगर आत्मविरोधी वाटत नाही, तर या मायिक सृष्टीत जर कोणते श्रेष्ठतम सत्य असेल, तर ते नैतिक सत्य होय असे वाटते, तसे ते वाटण्यातच त्याचे व सर्व समाजाचे कल्याण आहे.

○○○

प्रकरण ५ वे

व्यवसायाची निवड

मागील प्रकरणांत आम्ही असे दर्शविले की, प्रत्येक मनुष्याने नैतिक उन्नतीबरोबरच आपल्या बुद्धीची, कलाकौशल्याची आणि शरीर सामर्थ्याची वाढ नैतिक कक्षेत राहून यथायोग्य प्रमाणात केली पाहिजे व केवळ वैयक्तिक उन्नती ही खरी आत्मोन्नती नसल्यामुळे त्याने समाजाचेही कल्याण करण्यास झटले पाहिजे; परंतु समाजाचे कल्याण हे एखाद्या चलनी नाण्याप्रमाणे अगर गाभाऱ्यात ओतण्याच्या दुधाप्रमाणे एकसारखे नसून ते अनेकविध असते. अगदी सर्वसाधारण ध्येय जरी सर्वांचे एकच असले, तरी ते अत्यंत अस्पष्ट व आकलन करण्यास अतिशय कठीण असून, ते साधण्याचे मार्ग इतके भिन्न भिन्न असतात की, त्या सर्वांचा अवलंब करणे कोणत्याही एका व्यक्तीस शक्य नसते. एखादा मनुष्य आजन्म अविवाहित राहून धर्मोपदेशाच्या मार्गाने समाजाची उन्नती करील, तर दुसरा समाजातील लोकांस अन्न, वस्त्र अगर औषधपाणी पुरवून त्यांची सेवा करील, तिसरा लोकांना लिहिण्या-वाचण्यास शिकवील, तर चौथा त्यांच्या रेल्वेतील गैरसोयी दूर करण्यास झटेल. अशा रीतीने आत्मोन्नतीप्रमाणेच सामाजिक उन्नतीच्याही निरनिराळ्या शाखा असतात व स्वतःची ज्याप्रमाणे सर्व शाखांत सारखी उन्नती होणे शक्य नसते, त्याचप्रमाणे समाजाचेही सर्व बाजूंनी कल्याण करणे कोणासही शक्य नसते. समाजास खावयास मिळावे म्हणून शेतात राबणाऱ्या मनुष्यासही, सर्वच खाण्याच्या पदार्थांची पैदास करणे शक्य नसून त्याला एखाददुसऱ्या पदार्थाचीच निवड करावी लागते. सारांश, मनुष्याची शक्ती अत्यंत मर्यादित असल्यामुळे स्वतःची उन्नती करताना ज्याप्रमाणे आपली आवडनिवड, शक्याशक्यता इत्यादी गोष्टींचा विचार करावा लागतो, त्याचप्रमाणे समाजाचे कल्याण करू इच्छिणाऱ्यानेही कोणत्या प्रकारचे हित करणे आपणास शक्य व सुलभ आहे याचा विचार करणे आवश्यक असते. यासच आम्ही व्यवसायाची निवड असे नाव दिले आहे.

सामान्यतः प्रत्येक व्यवसायात काही फायदे, तर काही तोटे असतात व कोणताही व्यवसाय करणाऱ्या मनुष्याचे काही बाबतीत हित, तर काही बाबतीत अहित होणे हे अगदी अपरिहार्य असते. खेडेगावात अगर शेतात काम करणाऱ्या मनुष्यास स्वच्छ हवेचा व शांत वातावरणाचा उपभोग घेण्यास सापडतो, तर या दोन्ही गोष्टीस मुकणाऱ्या शहरातील कामगारास भोवतालच्या राजकीय अगर सामाजिक परिस्थितीचे ज्ञान व सामाजिक सुखसोयींची अगर करमणुकीची साधने यांचा लाभ होतो. समाजरचनेत कितीही सुधारणा झाली, तरी ही विषमता पूर्णपणे नाहीशी होणे कधीही शक्य नाही. शिवाय सर्वांची शक्ती,आवडनिवड अगर सोयी-गैरसोयीची कल्पना या सारख्या नसल्यामुळे एकच व्यवसाय सर्वांनी करणे शक्य व इष्टही नसते व म्हणून आपल्या व्यवसायाची निवड करण्यापूर्वी समाजाचे कोणते हित करण्यास सर्व दृष्टींनी आपण पात्र आहोत व कोणत्या व्यवसायापासून होणारे हित आपणा स्वतःस अधिक आवश्यक आहे, याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. आपल्या उपजीविकेच्या अगर उदरनिर्वाहाच्या व्यवसायात तर असा विचार करणे अत्यंत जरूर आहे, हे कोणीही मान्य करील. एखाद्या आंधळ्या मनुष्याने चित्रकाराचा व्यवसाय करू म्हटल्यास अगर मेंदू धड नसलेल्या मनुष्याने शिक्षकाचा व्यवसाय पत्करल्यास त्यात त्याला मुळीच यश येणार नाही हे उघड आहे; परंतु केवळ निरपेक्ष बुद्धीने समाजाचे कल्याण करतानाही असा विचार करून कोणत्या तरी प्रकारची निवड करावी लागते. राजकारणास लागणारी विशेष प्रवृत्ती अंगी नसल्यामुळे, अगर सामाजिक सुधारणेचे महत्त्व अधिक आहे असे वाटून ती सुधारणा करण्याकडे कोणी लक्ष पुरवील, तर राजकीय पारतंत्र्याशी झगडण्यात कोणी आपले आयुष्य वेचील; परंतु कोणासही दोन्हीपैकी एक गोष्ट करून दुसरीकडे दुर्लक्ष केल्याबद्दल दोष देणे योग्य होणार नाही. उलट ज्याचे काम त्यानेच करावे असेच कोणीही म्हणेल. मात्र तसे काम पत्करण्यापूर्वी स्वतःच्या पात्रापात्रतेबरोबरच परिस्थितीचा व त्या कामाच्या कमी अधिक महत्त्वाचाही विचार करणे आवश्यक असते. त्या विचाराची साधारण दिशा काय असावी याचे दिग्दर्शन प्रस्तुत प्रकरणात करण्याचे योजिले आहे.

व्यवसायाची निवड कशी करावी, या प्रश्नास मार्टिनो साहेबांनी एक उत्तर दिले आहे. त्या उत्तराची सत्यता पाहू गेल्यास अंतःस्फूर्तिवादातील दोषही आपणास ठळकपणे दिसून येईल. कोणताही व्यवसाय अगर कोणतेही कार्य पत्करताना सर्वांत उच्च भावनेचा, अगर त्या वेळी जी गोष्ट करण्याची अंतःस्फूर्ती होईल तिचा निवाडा मान्य करून त्याप्रमाणे वागावे, असे मार्टिनो साहेबांचे मत आहे. अधिक उच्च मार्ग दिसत असताना कनिष्ठ मार्गाचा अंगीकार करणे केव्हाही योग्य होणार नाही, असा मार्टिनो साहेबांचा सिद्धांत आहे. अर्थात, असा 'अधिक उच्च मार्ग' डोळ्यांपुढे न आल्यास कोणत्याही कनिष्ठ मार्गाचा स्वीकार करणे वरील सिद्धांताप्रमाणे अयोग्य ठरत नाही; परंतु उच्च मार्ग अगर उच्च भावना मनात येण्यासही प्रथम उच्च शीलाची व चांगल्या सवयीची आवश्यकता असते. अशा रीतीने

अगोदर चांगले शील बनल्याखेरीज उच्च भावना उद्भवत नाहीत व उच्च भावना उत्पन्न होऊन त्यांचा अंगीकार केल्याखेरीज चांगले शील बनत नाही, असा हा अन्योन्याश्रयाचा सिद्धांत आहे . शिवाय वरील सिद्धांताप्रमाणे आपल्या मनात परिस्थितीमुळे अगर दुसऱ्या कोठून तरी उच्च भावनांचा उद्भव होईपर्यंत डोळे मिटून स्वस्थ बसण्याखेरीज काहीच कर्तव्य उरत नाही. या आक्षेपास मार्टिनो साहेब असे उत्तर देतात की, आपल्या मनात चांगल्या भावना अगर सद्विचार उत्पन्न होतील, असे वातावरण अगर परिस्थिती उत्पन्न करण्याचा प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे; परंतु अशा उच्च वातावरणाची अगर परिस्थितीची निवड कशी करावयाची हाच मुख्य प्रश्न आहे व तो वरील उत्तराने मुळीच सुटत नाही. कौटुंबिक प्रेमापेक्षा विश्वबंधुत्वाची भावना अधिक उदात्त म्हणून आपल्या कुटुंबाचे हाल करून सदोदित शेजाऱ्यांना मदत करीत राहणे शहाणपणाचे होईल काय? या प्रश्नास नास्तिपक्षी उत्तर देण्यात मार्टिनो साहेबांनी आपल्या उच्च भावनेचा सिद्धांत सोडून देऊन कोणत्याही कार्याच्या परिणामाकडे व त्यापासून होणाऱ्या एकंदर समाजाच्या हिताहिताकडे नजर दिली पाहिजे, असेच कबूल केले आहे. याच्याही पुढे जाऊन असे म्हणता येईल की, स्वतःची अगर कुटुंबाची उपजीविका कोणताही व्यवसाय स्वीकारून केली, तरी ती विश्वबंधुत्वाच्या आड येणारच हे स्पष्ट दिसत असताना मनुष्याने विवाह तरी का करावा, अगर आपला पोटाचा व्यवसाय करण्यात वेळ तरी का दवडावा? याचा शेवट कोणताच व्यवसाय करू नये, असे म्हणण्यात होईल. एखाद्या कुबेरपुत्रास कोणताच व्यवसाय न करता परोपकारात आयुष्य वेचण्याचा उपदेश करणे फार तर शोभेल; परंतु कोणता व्यवसाय पत्करावा, असा प्रश्न विचारणाऱ्या मनुष्यास कोणताच व्यवसाय न करता सर्वांत उच्च प्रकारचे कार्य करीत राहावे, असे उत्तर देणे म्हणजे केवळ थट्टा करणे होय; परंतु या प्रश्नास बरोबर उत्तर देणे अत्यंत महत्त्वाचे आहे, हे थोड्या विचारांती सहज दिसून येईल. कोणतेही ध्येय साधणे हे आपण त्यासाठी आखलेल्या मार्गावर अवलंबून असते. चुकीचा मार्ग आखल्यास आपले ध्येय न साधून शिवाय समाजाचेही अकल्याण होते. अशा रीतीने आपला आयुष्यक्रम ठरवितानाच आपण आपल्या नैतिक उन्नतीची व आपल्या हातून होणाऱ्या सामाजिक उन्नतीची मर्यादा ठरवून टाकतो हे लक्षात ठेवले पाहिजे. व्यवहारातील किरकोळ गोष्टी ठरविताना जरी प्रत्येक वेळी नीतिशास्त्राची जरूर नसली, तरी सर्वसाधारण आयुष्यक्रम ठरविताना नीतिशास्त्राची अत्यंत गरज असते व या बाबतीतही अंत:स्फूर्तीवरच सर्व भार टाकल्यास नीतिशास्त्राचे आणि नीतिनियमांचे अस्तित्वच निष्कारण आहे, असे मानावे लागेल. मार्टिनो साहेब म्हणतात त्याप्रमाणे आपल्या व्यवसायामध्ये उत्पन्न होणारे मनोविकार अगर त्या व्यवसायाला आनुषंगिक असलेले दोष सर्वस्वी टाळता येणे शक्य नाही हे आम्हास मान्य आहे. उदाहरणार्थ, वकिलीच्या धंद्यात खोटे बोलण्याचे अजिबात टाळणे, अगर खाटकाच्या धंद्यात अहिंसेचे व्रत चालविणे अशक्य आहे; परंतु सत्यपालन अगर अहिंसा ही वकिलाचा

अगर खाटकाचा धंदाच सोडून दिल्यास अधिक सुलभ रीतीने साधता येणार नाही काय? किंबहुना आपल्या व्यवसायाचा अगर परिस्थितीचा आपल्या मनावर व नीतिमत्तेवर फार परिणाम होतो व अशा रितीने आपली नीतिमत्ता ही पुष्कळशी आपल्या व्यवसायावर अवलंबून असते, म्हणूनच आपल्या व्यवसायाची निवड करण्यापूर्वी फार विचार करावा लागतो. जाणूनबुजून दारूचा गुत्ता उघडणाऱ्या मनुष्यास स्वतःची निदान समाजाची नीतिमत्ता बिघडविणाऱ्याबद्दल आपण जबाबदार धरीत नाही काय? मनुष्याची नीतिमत्ता ही केवळ त्याच्या व्यवसायावरच अवलंबून असते, असे आमचे म्हणणे नाही. एखादा अत्यंत नीतिनिष्ठ मनुष्य कोणताही धंदा करीत असला तरी आपली नीतिमत्ता यत्किंचितही ढळू देणार नाही; परंतु अशी माणसे केवळ अपवादात्मक होत व ती सोडून दिल्यास काही व्यवसाय इतरांपेक्षा नीतिमत्तेला अधिक पोषक असतात हे नाकबूल करता यावयाचे नाही. दारूची विक्री करण्यापेक्षा शिक्षकाच्या व्यवसायातील वातावरण अधिक उन्नतीकारक नाही, असे कोण म्हणेल? एखाद्या पेढीवर बसून राहण्यापेक्षा वैद्यकीचा व्यवसाय हा अधिक कष्ट करण्यास व परोपकाराचे धडे शिकविण्यास कारणीभूत होतो हे कोणीही मान्य करील. आता हे खरे आहे की, हलक्या धंद्यात ज्याप्रमाणे नीतिश्रेष्ठ माणसे निघू शकतात, त्याचप्रमाणे उच्च व्यवसायात पडलेली माणसेदेखील नीतिभ्रष्ट असू शकतील. आजन्म अविवाहित राहून धर्मोपदेशक बनलेला मनुष्यदेखील त्या व्यवसायातील उच्च वातावरण बाजूस सारून त्यातील फायद्यांचा मात्र यथेच्छ उपभोग घेईल; परंतु हेही एक प्रकारचे अपवादच होत. साधारण प्रवृत्तीचा मनुष्य धर्मप्रसाराच्या व्यवसायात पडल्यास त्याबरोबर येणाऱ्या जबाबदारीमुळे व अनुकूल वातावरणामुळे हळूहळू अधिक नीतिमान बनत जातो, उलट हलक्या धंद्यात पडलेला मनुष्य मूळचा बरा असला तरी वाईट संगती व त्या धंद्यातील लबाड्या वगैरे गोष्टींनी तो लवकरच पूर्ण पछाडला जातो. स्वतःच्या अगर समाजाच्या नीतिमत्तेला विघातक असे धंदे अगदी निर्विकार बुद्धीने करीत राहणे अशक्य असते व म्हणून अशा धंद्यांत पडून पोट भरण्यापेक्षा उच्च प्रकारच्या व्यावसायात थोडे कमी पैसे मिळाले तरी चालतील असे आपण म्हणतो. नदीतून ज्याप्रमाणे कोरड्या पावलांनी जाणे अशक्य असते, त्याचप्रमाणे काही काही धंद्यांत आपले पावित्र्य रक्षण करून राहणे अत्यंत कठीण, किंबहुना अशक्यच असते. शिवाय, कित्येक व्यवसाय स्वभावतःच अगदी अनैतिक व अयोग्य असतात. केवळ पोटासाठी म्हणून कुमार्गाचे आचरण करणाऱ्या वेश्यांस तो केवळ त्यांचा उदरनिर्वाहाचा व्यवसाय आहे असे म्हणून निर्दोष ठरविता येईल काय? तात्पर्य, आपल्या व्यवसायाचा आपल्या स्वतःच्या व समाजाच्या नीतिमत्तेवर अत्यंत परिणाम होत असल्यामुळे व्यावसायाची निवड करताना तसा अनिष्ट परिणाम न होईल, अशी खबरदारी प्रत्येकाने घेतली पाहिजे. केवळ मार्टिनो साहेब म्हणतात त्याप्रमाणे उच्च भावनेच्या अगर अंतःस्फूर्तीच्या लाटेबरोबर वाहत जाण्याने स्वतःचा व्यवसायही धड होत नाही व समाजाचेही

कल्याण होत नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे. दुसरे असे की, व्यवसायाची निवड करताना एका बाजूस केवळ उच्च भावना व दुसऱ्या बाजूस केवळ कनिष्ठ हेतू असा लढा क्वचितच दिसून येतो. उलट ती निवड करताना मनुष्य अनेक प्रकारच्या मिश्र हेतूंनी प्रेरित झालेला असतो. शेतकीचा धंदा सोडून शिक्षकाचा व्यवसाय पत्करणारा मनुष्य केवळ ज्ञानार्जनाच्या उदात्त हेतूनेच प्रेरित झालेला असेल असे नाही, तर शेतकीपेक्षा त्या व्यवसायात मिळणारी अधिक विश्रांती व अधिक मोबदला हेही हेतू त्याच्या मनात असतील. शिवाय दुकानदारीपेक्षा ज्ञानार्जनाचा अगर वैद्यकीचा व्यवसाय अधिक उच्च प्रकारचा आहे, असे वाटत असूनदेखील परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे अशिक्षितपणामुळे अगर दुकानदारीमध्ये विशेष कौशल्य अगर आवड असल्यामुळे एखादा मनुष्य तोच व्यवसाय करील; परंतु मार्टिनो साहेबांच्या सिद्धांताप्रमाणे उच्च व्यवसाय सोडून थोडासा कनिष्ठ व्यवसाय कोणत्याही कारणासाठी करणे योग्य ठरणार नाही. अर्थात्च हा सिद्धांत अत्यंत अव्यवहार्य आहे हे उघड आहे. देशकार्याच्या इच्छेबरोबरच अधिकाराच्या लालसेने अगर महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन एखादा मनुष्य सैन्यात शिरेल; परंतु महत्त्वाकांक्षेपेक्षा ज्ञानलालसेची भावना अधिक उच्च आहे हे ज्यास समजते अशा प्रत्येक मनुष्याने सैनिक न होता इतिहास संशोधकच झाले पाहिजे, अगर ज्ञानार्जनापेक्षाही भूतदयेची भावना अधिक उच्च आहे म्हणून प्रत्येक मनुष्याने इतर कोणत्याही शास्त्राचे अध्ययन न करता केवळ वैद्यकीचाच अभ्यास केला पाहिजे, असे म्हणणे योग्य होईल काय? सामान्यतः कोणताही मनुष्य जो व्यवसाय करतो त्यात त्याचे इतर उदात्त हेतू असले तरी त्या व्यवसायाची आवड हा एक हेतू त्यात असतोच; परंतु मार्टिनो साहेबांचे मत ग्राह्य मानल्यास जो धंदा आपणास सर्वात कमी आवडतो त्याचीच आपण निवड केली पाहिजे, असे म्हणावे लागेल.

वरील विवेचनावरून व्यवसायाची निवड करताना केवळ मार्टिनो साहेबांचे उच्च भावनेचे प्रमाण बिनचूक मानून चालता येणार नाही हे दिसून येईल; परंतु मार्टिनो साहेबांचे प्रमाण चुकीचे ठरले तरी दुसरे चांगले प्रमाण कोणते हा प्रश्न शिल्लक राहतोच. आपल्या व्यवसायापासून एकंदर समाजाचे किती कल्याण होईल याचा विचार केला पाहिजे, असे आम्ही म्हटले; परंतु केवळ समाजाचे सर्वात जास्त कल्याण ज्या योगाने होईल तो व्यवसाय प्रत्येकाने करावा, असे म्हटल्यानेही हा प्रश्न सुटणार नाही. कारण असे म्हणणे म्हणजे अमर्याद स्वार्थत्यागाचे तत्त्व अंगिकारणे होय. अशा तऱ्हेच्या तत्त्वांची अनिष्टता आम्ही मागील प्रकरणात दर्शविलीच आहे. या तत्त्वाचा अवलंब केल्यास केवळ समाजाच्या अन्नवस्त्राच्या गरजा परविण्याखेरीज कलाकौशल्य अगर उच्च प्रकारचा बौद्धिक व्यवसाय यात यत्किंचितही वेळ घालविणे अयोग्य ठरेल; परंतु समाजोन्नतीचे अगर स्वार्थत्यागाचे ध्येय हे मागील प्रकरणात दर्शविल्याप्रमाणे मर्यादित रीतीने डोळ्यापुढे ठेवल्यास व्यवसायाच्या निवडीचा प्रश्न सुटणे अशक्य नाही. तो प्रश्न सोडविताना कोणत्या गोष्टींचा विचार करणे

आवश्यक आहे याचे साधारण दिग्दर्शन पुढीलप्रमाणे करता येईल.

कोणताही व्यवसाय केवळ उच्च भावनेने प्रेरित होऊन आपण होऊन पत्करण्यापूर्वी ती भावना आपल्या हृदयात कितपत टिकेल, अगर ते कार्य करण्याची चिकाटी आपल्या अंगी कितपत आहे, याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या शक्तीबाहेर एखादे ओझे उचलल्यास ज्याप्रमाणे आपली शक्ती वाढण्याऐवजी उलट वाढ खुंटते, त्याचप्रमाणे नैतिक बाबतीतही आपल्या सामर्थ्याबाहेर कार्य पत्करण्यास त्यापासून उन्नती न होता उलट प्रत्याघातन्यायाने अवनती होण्याचाच फार संभव असतो. स्वदेशाभिमानाने प्रेरित होऊन ब्रह्मचर्याचा निश्चय व तुरुंगवासाचा अंगिकार करणारे कित्येक तरुण उत्साहाची पहिली लाट ओसरताच दुप्पट जोराने संसारसुखात व ऐषारामात निमग्न झालेले दृष्टीस पडतात. याचा अर्थ कोणतेही कठीण कर्तव्य करण्याची वेळ आल्यास मागे सरावे असा नव्हे; परंतु जाणून-बुजून समुद्रात उडी टाकण्यापूर्वी आपणास किती लांबपर्यंत पोहता येईल याचा विचार न केल्यास मध्येच गटांगळ्या खाऊन आपल्याबरोबर इतरांनाही बुडविण्याची पाळी येण्याचा फार संभव आहे, एवढेच आम्हास दाखवावयाचे आहे. वाईट गोष्टी करण्यापूर्वी ज्याप्रमाणे विवेक करावा लागतो, त्याचप्रमाणे चांगल्या गोष्टींना हात घालण्यापूर्वीही विवेकाची जरूर असते व तसा विवेक न केल्यास याचा परिणाम विपरीत होण्याचा फार संभव असतो, हे लक्षात ठेवले पाहिजे.

दुसरे असे की, कित्येक व्यवसाय केवळ कर्तव्य म्हणून करणे प्रत्येकास शक्य नसते. ते करण्यास काही विशिष्ट प्रकारचे गुण अगर कौशल्य अंगी असावे लागते. प्रचारकाचे काम करणाऱ्या मनुष्याच्या अंगी वक्तृत्व, लेखनकौशल्य अगर इतरांचे चित्त आकर्षून घेणारा मोहकपणा बिलकूल नसल्यास त्याच्या हातून तो व्यवसाय मुळीच यशस्वी होणार नाही हे उघड आहे. तुरुंगावरील अधिकाऱ्याची जागा पत्करणाऱ्या मनुष्याच्या अंगी न्यायबुद्धीपेक्षा हृदयाचा कोमलपणाच अवास्तव रीतीने वास करीत असल्यास त्याने ती जागा न पत्करता एखाद्या इस्पितळात रोग्यांची शुश्रूषा करीत राहणेच अधिक श्रेयस्कर होय. चित्रकलेची मुळीच आवड नसलेल्या मनुष्याने चित्रकाराचा व्यवसाय करणे, अगर कटू आवाजाच्या मनुष्याने गायन शिक्षकाचा धंदा करणे हास्यास्पद नाही, असे कोण म्हणेल? सामान्यतः ज्याला जो व्यवसाय आवडेल व साधण्याचा संभव असेल तोच त्याने करणे श्रेयस्कर होय. आवडीनिवडीलाही मर्यादा असतात व कोणत्याही मनुष्यास अत्यंत कष्टाचे अगर त्रासाचे काम सामान्यतः आवडत नाही हे खरे आहे. शस्त्रक्रिया करीत असताना सुरू झालेला रक्ताचा प्रवाह वैद्यास प्रिय असतो असे नाही; व केवळ तेवढ्यावरून त्याने आपला व्यवसाय सोडून दिल्यास त्याला कोणीही भ्याडच म्हणेल; परंतु विशिष्ट व्यवसायाबद्दल सदोदित ज्याला तिरस्कार वाटतो अशा मनुष्याने तो व्यवसाय केवळ कर्तव्य म्हणून करीत राहण्यातही विशेष हंशील नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.

आपल्या व्यवसायाचा स्वतःच्या नीतिमत्तेवर काय परिणाम होईल हे पाहणे जसे आवश्यक, तसेच त्याचा समाजावर काय परिणाम होईल याचा विचार करणेही जरूर असते. कोणताही अगर कितीही प्रामाणिकपणाचा व्यवसाय करून पोट भरण्यापेक्षा भिक्षावृत्ती पत्करून देशकार्य करीत राहाणे बरे असे ज्यास वाटते असे महात्मे प्रत्येक समाजात असतात; परंतु आपलेच अनुकरण समाजातील पुष्कळ लोक करू लागल्यास त्याचा परिणाम अनिष्ट होईल हे लक्षात ठेवून त्यांनी वागले पाहिजे. तुकारामबोवांचे वैराग्य पाहताच, राजकारणास विटलेल्या शिवाजी महाराजांस जर समर्थांनी पुन्हा तलवारीचा अंगिकार करण्यास लावले नसते, तर महाराष्ट्रास स्वराज्याचे दिवस कधीच दिसले नसते. युरोपमध्ये एकेकाळी धर्मप्रचाराची लाट इतकी उसळली की, प्रत्येकजण संन्यासी बनून कोणत्या तरी मठास सामील होऊ लागला, अगर पुरेसे द्रव्य जवळ असल्यास स्वतःच मठ स्थापन करू लागला ! यासाठी आपल्या उच्च मनोवृत्तींना बाह्यतः तरी आळा घालून स्वतःच्या दृष्टीने थोड्या कमी दर्जाचा; परंतु समाजाच्या दृष्टीने हितकर असा व्यवसाय पत्करणेच अधिक इष्ट होय. पैशाची देवघेव ही समाजास आवश्यक खरी; परंतु समाजातील सर्वच लोक सदोदित सावकारीत गढून गेल्यास सर्व समाज द्रव्यलोभी बनून जाईल, उलटपक्षी समाजातील सर्व सत्प्रवृत्त लोकांनी पैशाची देवघेव करण्याचे अजिबात सोडून दिल्यास व अशा रीतीने प्रामाणिक देवघेवीचे उदाहरण समाजास घालून न दिल्यास त्यातही समाजाचे अकल्याणच आहे. कोणत्याही मनुष्याने आपल्या उच्च भावनांना अगर उदात्त हेतूंना वाव देण्यापूर्वी आपल्या कौटुंबिक व सामाजिक जबाबदारीचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. चार-पाच मुले-बाळे झाल्यावर संसाराचा वीट येऊन कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची तरतूद न करता संन्यास घेणाऱ्या मनुष्यास वैराग्यशील म्हणण्यापेक्षा कृतकर्माची फळे भोगण्यास कचरणारा भ्याड, असे विशेषण देणेच अधिक योग्य होय. देशकार्यास वाहून घेण्यास उद्युक्त झालेल्या मनुष्यानेही त्याच्या अंगावर संसाराची जबाबदारी असल्यास अगोदर भिक्षावृत्तीपेक्षा थोडा कमी दर्जाचा व्यवसाय करून स्वतःच्या नाही तरी निदान कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था केली पाहिजे. मागील प्रकरणातील एका वाक्यात थोडा फेरबदल करून म्हणावयाचे झाल्यास भिक्षेकरी व परावलंबी देशभक्तापेक्षा श्रीमंत, निदान स्वावलंबी देशभक्तासच देशाचे अधिक हित करता येईल हे उघड आहे.

याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की, व्यवसायाबरोबरच राहणी व सुखसोयी यांचे मानही बदलत जाते व तसे ते बदलून घेण्यात बाह्यतः विषमता दिसली तरी समाजाच्या एकंदर हिताच्या दृष्टीने तसे करणेच इष्ट असते. वैद्यकीचा व्यवसाय करणाऱ्या मनुष्याने गावाबाहेर लांब एखादा बंगला घेऊन राहणे रोग्याच्या दृष्टीने केव्हाही अयोग्यच ठरेल; परंतु वाङ्मयाचा व्यवसाय करणाऱ्या मनुष्याने मध्यवस्तीतील गलबलाटाच्या बाहेर निवांत स्थळी राहणेच अधिक इष्ट होय हे कोणीही मान्य करील. धर्मोपदेशकाचा व्यवसाय करणाऱ्या मनुष्याने

शारीरिक सुखाचा फारसा उपभोग न घेणेच इष्ट असते; परंतु तालीम मास्तराने पौष्टिक पदार्थ खाण्यात अगर चित्रकलेचा व्यवसाय करणाऱ्याने चित्रे खरेदी करण्यात थोडेबहुत अधिक पैसे खर्च केल्यास त्यास दोष देणे योग्य होणार नाही. गिरणीतील मजुरापेक्षा वैद्याने अधिक कपडे वापरणे, अगर वैद्यापेक्षा इतिहास संशोधकाने प्रवासात अधिक पैसा खर्च करणे हे नीतिदृष्ट्या अयोग्य आहे, असे म्हणता येणार नाही. इतकेच नव्हे, तर परराष्ट्रीय राजकारण करणाऱ्या मनुष्याने आपल्या देशाचा मान राखण्यासाठी परकीय मत्सद्यांस एखादी थाटाची मेजवानी देण्यात हजारो रुपये उधळले तरी त्यास आपण दोष देत नाही. सारांश, व्यवसायाबरोबरच त्याच्या मोबदल्याचे स्वरूप व त्याला लागणारी अनुकूल परिस्थिती ही बदलत जातात व म्हणून केवळ उच्च भावनांनी प्रेरित होऊन सर्वांनी एकाच दर्जाची राहणी पत्करणे, व्यवसायाच्या व समाजहिताच्या दृष्टीनेही अनिष्ट होय, गुणकर्मांबरोबरच आयुष्यक्रमात भिन्नता उत्पन्न होणे अगदी स्वाभाविक व अपरिहार्य असते व ती विषमता अजिबात नाहीशी न करता ती यथायोग्य प्रमाणात ठेवण्यातच खरी सुधारणा व खरी समता आहे. खरी साम्यबुद्धी म्हणजे काय याचा विचार पुढील प्रकरणात सविस्तर रीतीने करण्याचा विचार आहे. प्रस्तुत मुद्दा इतकाच आहे की, व्यवसायभिन्नत्वामुळे कित्येकदा वरून दिसणारी विषमता ही समाजहिताच्या दृष्टीने आवश्यकच असते. समाजातील काही लोकांनी जन्मभर इतरांच्या श्रमांवर चैन करीत बसणे हा अन्यायाचा कळस आहे; परंतु सर्वांना सरसकट एकाच कामाला जुंपून सारखाच मोबदला देणे हेही तितकेच अयोग्य होय.

शिवाय काही व्यवसाय इतरांपेक्षा केवळ भावनांच्या दृष्टीने कमी दर्जाचे असले, तरी त्यांचा उपयोग उच्च प्रकारच्या व्यवसायांपेक्षा समाजास अधिक असतो. उदाहरणार्थ, शारीरिक काबाडकष्टांपेक्षा बौद्धिक श्रम करणे अधिक उच्च प्रकारचे, म्हणून सर्वांनीच शिक्षकाचा अगर लेखकाचा व्यवसाय पत्करल्यास समाजातील लोकांवर उपाशी राहण्याचीच पाळी येईल. उच्च प्रकारच्या व्यवसायात लायक; परंतु थोडकेच लोक पडले तरी त्याचा फायदा पुष्कळ लोकांना मिळतो. उलट समाजातील बहुतेक लोक तोच व्यवसाय करू लागल्यास त्याची किंमत कमी होऊन जीवनकलह मात्र दुणावतो. आपल्या देशातील उच्च शिक्षण घेतलेल्या लोकांची स्थिती लक्षात घेतल्यास वरील विधानाची सत्यता कळून येईल. हलकी कामेदेखील कोणीतरी करावीच लागतात व स्वतःची पात्रता व समाजाचे हित याकडे नजर देऊन ती करण्यात आत्मोन्नतीला विघातक अगर अपमानास्पद असे काय आहे हे आम्हास समजत नाही. "समाजाचे पाय' असे नाव मिळालेल्या शूद्रांनी जर रागावून आपले व्यवसाय बंद केले, तर 'समाजाचे शिर' जे ब्राह्मण त्यांची काय स्थिती होईल बरे? यासाठी ब्राह्मणांनी शूद्रांच्या व्यवसायाची किमत ओळखली पाहिजे व शूद्रांनीही आपणास दिलेल्या उपमेचा खरा अर्थ समजून आपला व्यवसाय करीत राहिले पाहिजे. या ठिकाणी आम्हास आनुवंशिक चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करावयाचा नसून व्यवसायाची निवड गुणकर्मानीच ठरविली पाहिजे.

असे आमचे मत वरील विवेचनावरून स्पष्ट दिसून येईल; परंतु व्यवसाय-व्यवसायात नैतिक अगर सुखसोयीच्या दृष्टीने जरी फरक पडत असला, तरी कोणताही व्यवसाय (अर्थात, सर्वस्वी अनैतिक व्यवसाय सोडून दिल्यास) केवळ लौकिकाच्या, मानमरातबाच्या अगर कलाकौशल्याच्या दृष्टीने कमी दर्जाचा म्हणून नाकारण्यात मुळीच मोठेपणा नाही. उलट असा व्यवसाय पत्करून तो प्रामाणिकपणाने करण्याने त्या व्यवसायालाच मोठेपणा येतो. अर्थात, दारूची विक्री हलक्या लोकांच्या हाती गेली आहे, म्हणून ती आपण पत्करल्यास आपणही त्यांच्याच जोडीला जाऊन बसू; परंतु प्राथमिक शिक्षणाचा व्यवसाय अशिक्षित लोकांच्या ऐवजी उच्च शिक्षण मिळालेल्या लोकांनी पत्करल्यास ते कार्य अधिक चांगले होणार नाही काय? सारांश, जोपर्यंत समाजातील लोकांची ध्येये, त्यांची पात्रता, आवडनिवड व गरजा ही अनेकविध असतात, तोपर्यंत व्यवसायाची विविधता ही समाजात असलीच पाहिजे व समाजातील निरनिराळ्या लोकांनी आपापल्या शक्तिबुद्धीनुसार व परिस्थितीचा विचार करून निरनिराळ्या व्यवसायांचा अंगिकार केला पाहिजे.

परंतु याचबरोबर एक इशारा देणे जरूर आहे. एकच व्यवसाय सर्वांनी करणे इष्ट नसले, तरी काही गोष्टी अशा असतात की, कोणत्याही प्रकारच्या व्यवसायात पडलेल्या मनुष्याने त्या टाळणे योग्य ठरत नाही. उलट प्रत्येक व्यक्तीने त्या करणेच जरूर असते. वैद्यकीचा व्यवसाय करणाऱ्यानेही शेजारचा मनुष्य आजारी पडल्यास त्याची शुश्रूषा करण्याचे, 'तो आपला व्यवसाय नव्हे' असे म्हणून नाकारणे, अगर आपला व्यवसाय शिक्षकाचा नव्हे म्हणून स्वतःच्या मुलाबाळांसही मुळीच शिक्षण न देणे योग्य होणार नाही. प्रत्येकाने कोणत्या तरी विशिष्ट व्यवसायास स्वतःस वाहून घेणे सामान्यतः इष्ट असले तरी जरूर पडल्यास अगर आपण होऊनदेखील समाजाच्या कल्याणासाठी सर्व तहेने झटणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. ज्याप्रमाणे बौद्धिक उन्नतीच्या बाबतीत एका विषयाचे विशेष अध्ययन करणाऱ्याने इतर बाबतीत अगदीच अडाणी राहणे योग्य नसते, त्याचप्रमाणे एका विशिष्ट व्यवसायास अगर कार्यास वाहून घेतलेल्या मनुष्याने इतर बाबतीत अगदीच दुर्लक्ष करणे योग्य होणार नाही. एखादा मनुष्य नदीत बुडू लागल्यास त्यास वर काढण्यापूर्वी आपला व्यवसाय पाणबुड्याचा आहे की नाही याचा विचार करणे शहाणपणाचे होईल काय? आत्मोन्नती ही जर एकांगी असणे योग्य नव्हे तर व्यवसायही अगदी एकांगी असता कामा नये.

हे प्रकरण पुरे करण्यापूर्वी प्रस्तुत विषयावरील दोन विद्वान लेखकांच्या मतांचे थोडे दिग्दर्शन करणे जरूर आहे. कोणतेही कार्य पत्करण्यापूर्वी आपल्या आवडीनिवडी व नैसर्गिक प्रवृत्ती यांचाही इतर गोष्टींबरोबर विचार करणे जरूर आहे, हे वर मान्य केलेच आहे; परंतु प्रोफेसर हॉफडिंग यांनी याच मुद्यावर इतका जोर दिला आहे की, त्यायोगाने सर्वच नीतिमत्ता केवळ ऐच्छिक बनून जाते. सर्वांचे कर्तव्य एकच नसते, किंबहुना एका मनुष्याने जी गोष्ट करणे अत्यंत आवश्यक तीच दुसऱ्याने करणे सर्वस्वी अयोग्य ठरते हे खरे आहे;

परंतु याचा अर्थ, प्रत्येकाचे कर्तव्य हे केवळ त्याच्या आवडीनिवडीवर अगर मनोवृत्तीवर अवलंबून असते, असा नव्हे. कित्येक प्रसंग इतक्या गुंतागुंतीचे असतात की, त्यावेळी कसे वागावे हे केवळ ज्याचे त्यासच समजते. उदाहरणार्थ, शेक्सपिअरच्या 'मेझर फॉर मेझर' या नाटकातील इसाबेला या बाईवर आपल्या भावाचे जीवित व स्वतःचे पावित्र्य या दोन्हींपैकी कोणतीतरी एक गोष्ट पत्करण्याचा प्रसंग आलेला आहे. अशा परिस्थितीत तिने कसे वागावे हे ठरविणे दुसऱ्या कोणासही अत्यंत कठीण जाईल यात शंका नाही; परंतु याचे कारण तिचे कर्तव्य केवळ तिच्या स्वतःच्या भावनांवर अगर नैसर्गिक प्रवृत्तीवर अवलंबून आहे हे नसून तिच्या एकंदर परिस्थितीची यथार्थ कल्पना दुसऱ्या कोणासही करता येणार नाही हे होय. सारांश, आपला व्यवसाय अगर कर्तव्य हे जरी अंशतः आपल्या आवडीनिवडीवर अगर मनोरचनेवर अवलंबून असले, तरी सर्वस्वी ते तसेच आहे, असे म्हणणे म्हणजे सर्व नीतिमत्ता केवळ सापेक्ष बनविणे होय.

दुसरे एक विचित्र मत प्रोफेसर सिमेल यांनी प्रतिपादन केले आहे. त्यांच्या मताप्रमाणे प्रत्येक मनुष्याने असा व्यवसाय पत्करावा की, ज्यात त्याला आपल्या अंगातील दुर्गुण अगर नैसर्गिक उणिवा याच उपयोगी पडाव्या ! सिमेल साहेबांच्या म्हणण्यात थोडासा तथ्यांश आहे यात संशय नाही. उदाहरणार्थ, अधिकाराची लालसा ज्याला विशेष आहे त्याने एखाद्या फौजदाराची जागा पत्करावी, अगर फाजील चौकस बुद्धी अंगी असलेल्या मनुष्याने गुप्त पोलिसांची नोकरी करावी, उलटपक्षी ज्याचे हृदय अत्यंत कोमल आहे त्याने सैनिकाचा अगर न्यायाधीशाचा व्यवसाय न करता संगीताचाच व्यवसाय करावा हे आम्हास मान्य आहे; परंतु मनुष्याच्या अंगातील दुर्गुण हे त्याने कोणताही व्यवसाय केला तरी तो करण्यात त्याला प्रत्यक्ष मदत करतील, अगर त्या दुर्गुणामुळेच त्याला कोणताही व्यवसाय अधिक चांगल्या रीतीने करता येईल असे मात्र आम्हास वाटत नाही. एखादा शिपाई अगर न्यायाधीश कोमल मनाचा असेल; परंतु त्याला आपल्या कर्तव्याची योग्य जाणीव असल्यास तो आपले कर्तव्य योग्य रीतीने बजावण्यात मुळीच कसूर करणार नाही. किंबहुना एखाद्या निर्दय न्यायाधीशापेक्षा अगर शिपायापेक्षा कोमल मनाचा मनष्यच ती कामे अधिक चांगल्या रीतीने करील. केवळ काही सद्‌गुणांचा अभाव असल्याने मनुष्य कोणत्याही कामास लायक होत नसून काही अवगुण अंगी असले तरी ते भरून काढणाऱ्या सद्गुणांच्या योगानेच तो कोणतेही कार्य करण्यास पात्र होतो. एखाद्याच गुणाचा अगर अवगुणाचा अत्यंत उत्कर्ष एखाद्या मनुष्याच्या अंगी असल्यास तो केवळ त्या व्यवसायातच फार तर निपुण होईल; परंतु अशा एकांगी मनुष्याच्या हातून कार्यही अगदी एकांगीच होणार व इतर अधिक महत्त्वाच्या कार्याचीही त्याच्या हातून हानी होणार हे उघड आहे. शिवाय ज्याला आपला अभ्यास करावयाचा आहे त्याने इतरांच्या संगतीत मौज करण्याची प्रवृत्ती आवरून धरावी हे खरे आहे; परंतु एकलकोंडेपणा हा गुणच अभ्यासास विशेष महत्त्वाचा आहे, असे

म्हणता यावयाचे नाही. ज्याला नाटके पाहण्याची आवड आहे, असा विद्यार्थीदेखील तेवढी हौस बाजूस सारून परीक्षेत यश मिळवील; परंतु परीक्षेत यश मिळविण्यास नाट्यकलेचा तिटकाराच अंगी असणे आवश्यक आहे, असे म्हणता यावयाचे नाही. कारण नाटकांचा तिरस्कार हा जसा अभ्यासास मदत करील तसाच तो झोपेसही अधिक वाव देईल.

सारांश, सर्वांचे व्यवसाय जरी सारखेच नसले, अगर प्रत्येक गुणाची वाढ सर्वांत सारखीच होणे शक्य नसले, तरी आपापल्या कर्तव्याची योग्य जाणीव असणे हे सर्वास सारखेच आवश्यक आहे व प्रत्येक मनुष्याचे मुख्य कर्तव्य जरी आपला विशिष्ट व्यावसाय प्रामाणिकपणाने व आपले शक्तिसर्वस्व खर्च करून करणे हे असले तरी इतर कर्तव्यांकडे पूर्ण दुर्लक्ष करणे अगर इतर सद्गुणांची मुळीच जोपासना न करणे हे केव्हाही योग्य नव्हे. दिवसभर गिरणीत राबणाऱ्या मजुरास वैद्यकीचे अगर संगीताचे ज्ञान नसल्यास त्यास कोणी फारसा दोष देणार नाही; परंतु अशा मनुष्यासही त्या कलांचे थोडेसे ज्ञान असल्यास तो मनुष्य स्वतःच्या व समाजाच्या दृष्टीने अधिक उन्नत व अधिक उपयुक्त समजला पाहिजे. किंबहुना अहोरात्र काव्याच्या व्यवसायात गढून गेलेल्या मनुष्यानेही आपणास वैवाहिक नियमांचे ज्ञान नाही असे म्हटल्यास ते क्षम्य होणार नाही. प्रत्येक मनुष्याने करावयाच्या निरनिराळ्या कर्तव्यांत अगर व्यवसायात कमीअधिक प्रमाणाचा भेद असला तरी त्यात कर्तव्य व अकर्तव्य असा मुलभूत भेद करणे इष्ट होणार नाही. किंबहुना, कर्तव्याची जाणीव हीच सर्व प्रकारच्या व्यवसायांची व त्यातील भेदांचीही जननी आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. प्रत्येक मनुष्यामध्ये इतर गुण कमी-जास्त प्रमाणात असले तरी चालतील; परंतु न्यायबुद्धी अगर समता ही सर्वांत सारखीच तीव्र असली पाहिजे, असे प्लेटो म्हणतो. वरील सर्व विवेचनाचे तात्पर्य प्लेटोच्या वरील वाक्यात साठविलेले नाही असे कोण म्हणेल?

○○○

प्रकरण ६ वे

खरी समता कशात आहे?

समाजाच्या कल्याणासाठी झटणे हे प्रत्येक मनुष्याचे कर्तव्य आहे व स्वतःच्या उदरनिर्वाहाचा व्यवसाय ठरवितानाही समाजाच्या हिताकडे नजर देणे आवश्यक असते, असे आम्ही मागील प्रकरणांत दर्शविले; परंतु समाज ही एकच वस्तू नसून तो अनेक व्यक्तींचा मिळून बनलेला असतो व समाजाचे हित करताना त्यातील सर्व व्यक्तींच्या हिताकडे पूर्ण दुर्लक्ष करून अगर त्यांचे अहित करून इतर काही व्यक्तींनी आपले हित साधणे हे नीतिदृष्ट्या केव्हाही योग्य ठरत नाही. तसे करणे म्हणजे केवळ अन्याय होय, असे आपण मानतो; परंतु न्यायबुद्धी अगर समता या शब्दांचा सर्वसाधारण अर्थ स्पष्ट व सुगम असला तरी व्यवहारात त्या तत्त्वांची अंमलबजावणी करताना अनेक अडचणी उपस्थित होतात व त्या तत्त्वांचा अर्थ वरवर जितका सोपा वाटतो तितकाच तो कठीण आहे, असे आढळून येते. यासाठी खरी समता म्हणजे काय? व व्यवहारात तिच्या सर्वसाधारण अर्थास कोणत्या मर्यादा घालाव्या लागतात याचे विवेचन प्रस्तुत प्रकरणांत करण्याचे योजिले आहे. हा विचार करताना आम्हास केवळ तात्त्विक दृष्टी सोडून सामाजिक अगर राजकीय विषयांतही थोडाबहुत हात घालावा लागेल; परंतु तसे करणे अप्रस्तुत होईल, असे नाही. नीतिशास्त्र हे केवळ पुस्तकात अगर तत्त्वांतच राहिल्यास त्याला कोणी फारशी किमत देणार नाही. व्यवहारिक जीवनक्रमांत नीतितत्त्वांचा उपयोग कितपत होईल हे दाखविणे हे नीतिशास्त्राचे कर्तव्य-किंबहुना ध्येय आहे.

प्रसिद्ध इंग्रज सुखवादी बेन्थम यांनी समतेची एक सर्वसाधारण व्याख्या केलेली आहे; परंतु ती अत्यंत व्यापक व व्यावहारिकदृष्ट्या निरुपयोगी आहे. त्या व्याख्येचे परीक्षण केल्यास प्रस्तुत विषयाचे धागे आपोआप उलगडत जाऊन तिच्या व्यापकतेस कोणत्या मर्यादा घालणे इष्ट आहे हेही स्पष्ट होईल.

सर्व व्यक्तींना सारखेच लेखणे म्हणजे सर्व माणसे सारख्याच दर्जाची-एकाच ईश्वराची लेकरे असल्यामुळे कोणत्याही व्यक्तीला दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीपेक्षा कमी अगर अधिक महत्त्व न देणे म्हणजेच खरी समता होय, असा बेन्थम साहेबांचा सिद्धांत आहे. या सिद्धांताची एक मर्यादा आम्ही मागील एका प्रकरणात दर्शविलीच आहे. सर्वांचे हित सारख्याच महत्त्वाचे आहे हे खरे; परंतु एकाचे क्षुल्लक हित हे दुसऱ्याच्या महत्त्वाच्या हिताइतके महत्त्वाचे नाही, हे कोणीही मान्य करील. दोघांचे हित ज्या वेळी सारख्याच महत्त्वाचे असेल त्या वेळी एकाच्या हिताकडे दुर्लक्ष करून दुसऱ्याचे हित साधने अन्यायाचे होईल; परंतु एकाचा क्षुल्लक फायदा हा जर दुसऱ्याच्या महत्त्वाच्या हिताच्या आड येऊ लागला, तर फायद्याकडे दुर्लक्ष करणे अन्यायाचे आहे, असे म्हणता येणार नाही. सारांश, 'सर्वांचे हित सारख्याच दर्जाचे आहे.' या बेन्थम साहेबांच्या सिद्धांतात थोडा फेरबदल करून, 'सर्वांचे सारख्याच महत्त्वाचे हित सारख्याच दर्जाचे आहे,' असे म्हणणे अधिक संयुक्तिक होईल; परंतु असा सिद्धांत मान्य करण्यापूर्वी आणखीही कित्येक गोष्टींचा विचार करणे जरूर आहे.

खरी न्यायबुद्धी अगर समता म्हणजे काय हे ठरविताना दोन परस्परविरोधी तत्त्वे आपल्या डोळ्यापुढे उभी राहतात व त्यातील परस्परविरोध काढून न टाकल्यास समतेचा खरा अर्थ ठरविणे अशक्य होऊन जाते. एका दृष्टीने असे वाटते की, अंतिम दृष्टीने पाहिल्यास सर्व माणसे सारख्याच दर्जाची आहेत व कोणत्याही कारणाने एका व्यक्तीस दुसऱ्यापेक्षा कमी-अधिक लेखणे अन्यायाचे आहे. विश्वबंधुत्वाचे तत्त्व पूर्णपणे अमलात आणणे म्हणजेच खरी समता प्रस्थापित करणे होय. उलटपक्षी प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणे त्यास वागविणे, सद्गुणी मनुष्यास त्यांच्या सद्गुणांचा मोबदला देऊन दुर्गुणी मनुष्यास त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल शासन करणे, अगर अगदी व्यावहारिक भाषेत सांगावयाचे झाल्यास ज्याच्या त्याच्या कामाप्रमाणे त्यास वेतन अगर मोबदला देणे हेही तत्त्व तितकेच समंजसपणाचे व न्यायाचे आहे असे वाटते. या दोन तत्त्वांत बाह्यतः तरी परस्परविरोध आहे हे विशद करून सांगण्याची जरूर नाही. तो विरोध नष्ट कसा करावयाचा हाच मुख्य प्रश्न आहे व या प्रश्नाच्या उत्तरातच खरी समता म्हणजे काय, या प्रश्नास उत्तर आहे. ते उत्तर देण्यापूर्वी वरील दोन्ही तत्त्वांचा स्वतंत्रपणे विचार केला पाहिजे.

कित्येक वेळा समाजातील सर्व व्यक्तींमध्ये हिताची सारखीच विभागणी केल्यास त्यात कोणाचेच हित न होता एकंदर सर्वांचेच अकल्याण होते. उदाहरणार्थ, सामान्यतः एखाद्या सैन्यातील सर्व शिपायांस सारखेच अन्न-वस्त्र मिळावे हे कोणी अमान्य करणार नाही; परंतु एखाद्या सैन्यास वेढा पडला असता व एक महिनाभर अन्नसामग्री मिळण्याची मुळीच आशा नसताना केवळ समतेच्या तत्त्वानुसार प्रत्येकास सारखेच अन्न देऊन पंधरा दिवसांत सर्व सैनिकांना उपाशी मारणे योग्य होईल काय? त्यापेक्षा चिठ्या टाकून त्यातील निम्या तरी लोकांना वाचविणे व इतरांना मरू देणे हे अधिक समंजसपणाचे होईल, असे आम्हास वाटते.

काही थोड्या लोकांना इतरांपेक्षा थोडे अधिक सुख मिळू नये म्हणून सर्वांचेच हाल करणे हे आपले नाक कापून दुसऱ्यास अपशकून करण्याइतकेच मूर्खपणाचे होय. वर्गातील एखादा अगदी अजागळ मुलगा मागे राहू नये म्हणून सर्व वर्गाची प्रगती खुंटविणाऱ्या शिक्षकास न्यायी न म्हणता अन्यायीच म्हणावे लागेल. हल्लीची समाजरचना अत्यंत अन्यायाने व विषमतेने भरलेली आहे हे आम्हास मान्य आहे; परंतु सर्व प्रकारच्या विषमतेवर एकदम सरसकट नांगर फिरवून सर्वांना एकाच पंक्तीला बसविल्यानेही समाजाचे खरे हित होऊ शकत नाही, हे अशा तऱ्हेचे युरोपमध्ये जे प्रयत्न झाले, त्यांचा इतिहास वाचणारास सहज दिसून येईल. सारांश, एकंदर समाजाचे जीत हित आहे, अशी विषमता सर्वांनी सहन केलीच पाहिजे. किंबहुना, समाज हिताच्या दृष्टीने पाहिल्यास अशा प्रकारची विषमता हीच खरी समता होय, हे लक्षात ठेवले पाहिजे. खरी समता म्हणजे प्रत्येक व्यक्तीला बरोबर एकसारखे अन्न-वस्त्र अगर इतर सखसोयीचे हक्क देणे ही नसून प्रत्येक व्यक्तीच्या हिताकडे सारखीच नजर देणे अगर प्रत्येकाच्या हिताचा निःपक्षपाताने विचार करणे ही होय. अशा रीतीने विचार करून व एकंदर समाजाचे हित लक्षात घेऊन जर एखाद्या व्यक्तीच्या हिताकडे दुर्लक्ष करणे, अगर एखाद्या व्यक्तीस इतरांपेक्षा अधिक देणे योग्य ठरेल, तर त्यात समतेच्या तत्त्वास धक्का पोहोचतो असे मानण्याचे मुळीच कारण नाही. उलट, समाजाच्या स्थैर्यासाठी वैयक्तिक समतेचा तराजू थोडा अस्थिर झाला तरी त्यात उच्च प्रकारची समताच साध्य होत असते. एखाद्या समाजात शंभर लोक असल्यास त्यातील नव्वद लोकांनी बाकी दहा व्यक्तींकडे दुर्लक्ष करून आपणच त्यातील सर्व सुखसोयींचा उपभोग घेणे हे केव्हाही निंद्यच ठरेल. त्या समाजातील सुखसोयींचा दहावा हिस्सा त्या दहा व्यक्तींना मिळाचा पाहिजे हे खरे आहे; परंतु शंभरच्या शंभर लोकांची कत्तल होण्याचा प्रसंग आल्यास दहा व्यक्तींनी आपले प्राण अर्पण करून बाकीच्या नव्वद लोकांना वाचविणे हे तितकेच आवश्यक आहे. अशा रीतीने आपले प्राण अर्पण करण्यातच त्या दहा व्यक्तींनी आपला सामाजिक हिताचा वाटा उचलला असे म्हणता येईल. एखाद्या सभेतील काम बहुमताने चालल्यास तीतील अल्पसंख्याकाचे हक्क तुडविले गेले, असे म्हणता येईल काय? सभेतील प्रत्येक मनुष्यास आपले मत देण्याचा हक्क असल्यास त्याच्या मताप्रमाणे गोष्टी घडून न आल्या, तरी त्याला सभेवर विषमतेचा आरोप करता येणार नाही. हीच गोष्ट समाजव्यवस्थेमध्ये आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीचे हित (त्याच्या सभेतील मताप्रमाणेच) लक्षात घेतले जाणे हे समतेच्या दृष्टीने जरूर आहे; परंतु ते नेहमी साधलेच पाहिजे असे म्हणणे म्हणजे सभेतील प्रत्येक मनुष्याने माझ्याच मताप्रमाणे सभेचे काम चालले पाहिजे, असे म्हणण्यासारखेच आहे . सारांश, प्रत्येक व्यक्तीचे हित सारख्याच महत्त्वाचे असले, तरी कोणत्याही विशिष्ट बाबतीत त्या हिताला किती वाव द्यावयाचा हे एकंदर समाजहिताच्या दृष्टीनेच ठरवावे लागते.

दुसरे असे की, प्रत्येक मनुष्यास प्रत्यक्ष रीतीने सारखेच अन्न, वस्त्र, शिक्षण अगर इतर स्वहिताची साधने पुरविणे हे कायद्याने अगर इतर कोणत्याही मार्गाने शक्य नसून प्रत्येक मनुष्यास आपली उन्नती करून घेण्यास सारखाच वाव देणे, अगर सारखीच अनुकूल परिस्थिती उत्पन्न करून देणे एवढेच शक्य असते; परंतु केवळ सर्वांना आपले हित करून घेण्यास सारखाच वाव अगर संधी दिल्याने खरी समता साध्य होईल, असे मानणे चुकीचे आहे. सर्वांना आपले हित साधण्याची सारखीच संधी मिळाली, तरी सर्वांची शक्ती व बुद्धी सारखीच नसल्यामुळे सर्वांना त्या संधीचा फायदा सारखाच करून घेता येणार नाही. उलट 'माकडाच्या हाती कोलित,' या न्यायाने कित्येकांकडून संधीचा पूर्ण दुरुपयोग होण्याचा मात्र फार संभव आहे. यावर कोणी असा आक्षेप घेईल की, सर्वांना आपले हित करून घेण्यास सारखीच संधी देणे एवढेच समतेचे कार्य आहे. मग संधीचा कोणी कमी व कोणी अधिक, कोणी चांगला व कोणी वाईट उपयोग केल्यास त्यात त्यांचाच दोष आहे; परंतु थोडा विचार केल्यास सर्वांना सारखीच संधी देणे म्हणजे सर्वांच्या हिताकडे सारखीच नजर देणे नव्हे, असे दिसून येईल. लहान मुलांना व मोठ्या माणसांना, लुळ्यापांगळ्यांना व धडधाकट माणसांना, अगर समंजस व मूर्ख माणसांना सारख्याच परिस्थितीत ठेवल्यास त्यांचे सारखेच हित होणे शक्य आहे काय? रोगी व सशक्त मनुष्यास सारख्याच प्रमाणात अन्नाचा पुरवठा केल्यास त्यात कोणाचेच हित न होता सर्व समाज दुबळा होऊन जाईल. गुन्हेगार व सच्छील मनुष्य या दोघांस सारखीच स्वतंत्रता दिल्यास अगर बुद्धिवान व मठ्ठ डोक्याच्या विद्यार्थ्यांस शिक्षणाची सारखीच संधी दिल्यास त्यात सर्व समाजाचे नुकसान होईल. आंधळ्या मनुष्यास ज्याप्रमाणे आरशाचा उपयोग नाही त्याचप्रमाणे ज्या मनुष्यास मिळालेल्या संधीचा फायदा घेता येत नाही, त्या मनुष्यास तशी संधी देण्यात मुळीच अर्थ नाही. तात्पर्य, व्यक्तीव्यक्तींच्या पात्रतेप्रमाणे, गरजेप्रमाणे व आवडीनिवडीप्रमाणे सर्वांना भिन्न भिन्न परिस्थिती उत्पन्न करून देण्यातच खरी समता आहे. अशा तहेची पात्रता अगर गरज याकडे न पाहता समतेचे तत्त्व अविचाराने लागू करण्यात समता साध्य न होता उलट एकंदर समाजाचे अकल्याणच होते हे लक्षात ठेवले पाहिजे. कौटुंबिक व्यवस्थेच्या योगाने निरनिराळ्या कुटुंबातील व्यक्तीस निरनिराळी परिस्थिती अगर संधी मिळते; परंतु ही विषमता एकंदरीत समाजास हितकरच असते. शिवाय मागील प्रकरणात दर्शविल्याप्रमाणे निरनिराळ्या व्यवसायांत गुंतलेल्या व्यक्तींना निरनिराळ्या प्रकारचे वातावरण व निरनिराळ्या सुखसोयी यांची आवश्यकता असते; परंतु त्यातही समाजाचे कल्याण होत असल्यामुळे अशा प्रकारची विषमता आपण क्षम्य मानतो, यासाठी कोणत्याही प्रकारची विषमता एकदम नाहीशी करण्यापूर्वी ती समाजास हितकर आहे की नाही याचा विचार करणे आवश्यक आहे.

शिवाय, समतेचे तत्त्व अमर्याद रीतीने लागू केल्यास कोणासही आपल्या अंगातील

विशेष गुण प्रकट करण्यास अगर आपल्या विशेष आवडीचे कार्य करण्यास वाव राहणार नाही. आत्मोन्नतीला आत्मस्वातंत्र्याची गरज असते; परंतु समतेच्या तत्त्वानुसार सर्वांना एकाच प्रकारचे काम करावयास लावल्यास व्यक्तिस्वातंत्र्यच नष्ट झाले असे म्हणावे लागेल. प्रत्येक मनुष्याने काहीतरी काम करावे, इतपत फार तर समाजाचा प्रत्येक मनुष्यावर हक्क आहे; परंतु प्रत्येक व्यक्तीने कोणते काम करावे, अगर आपल्या फुरसतीचा वेळ कसा घालवावा, हे ठरविणे समाजाचे कर्तव्य नसून त्यात प्रत्येक व्यक्तीस पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. हे स्वातंत्र्य अर्थात्‌च पूर्ण समतेच्या तत्त्वास थोडाफार आळा घालणार हे उघड आहे. स्वतःस आवडेल व साधेल तो व्यवसाय प्रत्येकाने करावा. त्यासाठी लागणारी साधने व अनुकूल वातावरण ही त्याने उत्पन्न करून घ्यावी व त्या व्यवसायाचा मोबदलाही त्याने घ्यावा. या सर्व गोष्टी कोणाही विचारी मनुष्यास नाकबूल करता यावयाच्या नाहीत. सर्व व्यवसाय एकाच प्रकारचे नसल्यामुळे त्यांच्या मोबदल्यातही भिन्नता असणे व अशा रीतीने व्यक्तीव्यक्तींच्या व्यवसायस्वातंत्र्याबरोबरच त्यांच्या वातावरणात व सुखसोयीत विषमता दृष्टीस पडणे हे अगदी अपरिहार्य व इष्टही आहे. हुशार लोकांशी गाठ पडत गेल्यामुळे वकिलीच्या धंद्यातील मनुष्याची बुद्धी तीक्ष्ण बनेल, तर वैद्यकीचा व्यवसाय करणारा मनुष्य शस्त्रक्रियेत निपुण होईल; परंतु केवळ समतेच्या तत्त्वानुसार कोणासही आपला व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य न देता सर्वास एकाच दर्जाचा व्यवसाय करावयास लावल्यास सर्व लोक सारख्याच योग्यतेचे अगर सारखेच कुचकामाचे होऊन जाऊन सर्व समाजाचे नुकसान होईल. उच्च प्रकारचा बौद्धिक व्यवसाय करणारे लोक समाजावर एक प्रकारचे ओझे घालीत असतात; परंतु समाजास बौद्धिक उन्नतीची गरज असल्यामुळे तो ते ओझे आनंदाने सहन करतो व अशा व्यवसायांत पडलेल्या व्यक्तींना शारीरिक श्रम केल्याशिवाय खावयास घालतो. अर्थात्‌, ज्यांना समाजातील सर्व लोकांनी एकाच तहेने; परंतु अज्ञानांधकारात खितपत पडावे, असे वाटते, त्यांना ही विचारसरणी पटणार नाही. समाजातील सर्व लोकांना उच्च शिक्षण देता येत नाही म्हणून कोणीच ते घेऊ नये असे ते म्हणतील; परंतु समाजास उच्च प्रकारच्या बौद्धिक व्यवसायाची अगर कलाकौशल्याचीदेखील जरूर आहे असे ज्यांस वाटते ते अशा प्रकारच्या विषमतेस दोष न देता उलट वावच देतील. अर्थात अशा प्रकारच्या विषमतेस व व्यक्तिस्वातंत्र्यासही मर्यादा असतात व त्या मर्यादेच्या बाहेर अनवस्था प्रसंगच ठेवलेला आहे हे आम्हास मान्य आहे. प्रस्तुत मुद्दा इतकाच आहे की, थोडेसे व्यक्तिस्वातंत्र्य व त्या स्वातंत्र्याबरोबर येणारी विषमता ही समाजाच्या हितास आवश्यक आहे व खरी समता म्हणजे सर्वांना सरसकट एकाच कामाला जुंपणे अगर सारखाच मोबदला देणे ही नसून प्रत्येकाच्या हिताकडे सारखीच नजर देऊन प्रत्येक व्यक्तीस योग्य तीच परिस्थिती व योग्य तीच हिताची साधने पुरविणे ही होय. समाजात समता घडवून आणू पाहणाऱ्या मनुष्याने केवळ संपत्ती, राजकीय अगर सामाजिक हक्क इत्यादी बाह्य गोष्टीतच ती घडवून

आणल्यास ती फार वेळ टिकणे शक्य नाही. समता ही एक भावना आहे व प्रत्येक मनुष्याच्या हृदयात ती भावना जागृत नसल्यास अगर जागृत करण्याचा यत्न न केल्यास केवळ बाह्य समता ही नेहमी क्षणिकच राहणार हे उघड आहे. उलटपक्षी समाजातील सर्व लोकांत ती भावना प्रामुख्याने वास करीत असल्यास निरनिराळ्या व्यक्तींनी निरनिराळे कार्य करणे व निरनिराळ्या मोबदल्याचा उपभोग घेणे यात कोणासच वैषम्य वाटणार नाही.

पूर्ण समतेच्या तत्त्वाचा निरोप घेण्यापूर्वी त्याची आणखी एक मर्यादा दर्शविणे जरूर आहे. उच्च प्रकारचे जीवित हे कनिष्ठ प्रकारच्या जीवितापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे, हा सामान्य सिद्धांत कोणासही मान्य होण्याजोगा आहे. याच तत्त्वानुसार मनुष्याने जिवंत राहावे म्हणून पशुंची हिंसा करणे आपण सर्वस्वी निंद्य मानीत नाही. केवळ शिकारीच्या शोकासाठी अगर खाण्यासाठीदेखील पशुंची हिंसा करू नये हे आम्हास मान्य आहे; परंतु मनुष्याचा जीव वाचविण्यास लागणाऱ्या औषधासाठी उदाहरणार्थ, लस टोचण्यासाठीदेखील पशुवध करू नये, असे म्हणणे केवळ भूतदयेच्या दृष्टीने इष्ट असले तरी व्यावहारिकदृष्ट्या शक्य नाही. उच्च प्रकारचे जीवित रक्षण करण्यासाठी कनिष्ठ प्रकारच्या जीविताकडे दुर्लक्ष करणे हे आपद्धर्म म्हणून का होईना नीतिदृष्ट्या क्षम्य ठरते. जी गोष्ट मनुष्य व पशू यामध्ये तीच थोड्याबहूत प्रमाणात मनुष्यामनुष्यामध्येही आहे. श्रेष्ठ प्रतीच्या व्यक्तींना जिवंत राहावे अगर त्याचे कार्य सुलभ व्हावे म्हणून कनिष्ठ प्रकारच्या व्यक्तींनी प्रसंगी आपले प्राणही अर्पण करणे आवश्यक असते. राजपुत्राचा जीव वाचविण्यासाठी आपल्या पोटच्या गोळ्यास बळी देणाऱ्या पन्नादाईस, अगर नेपोलियन बादशहाच्या शरीरास गोळी लागू नये म्हणून आपल्या शरीराची ढाल करून ती अडविणाऱ्या शूर शिपायास समतेचे तत्त्व पूर्णपणे समजले असेच म्हणावे लागेल. संपूर्ण लोकसत्ताक राज्यातदेखील लायक प्रधानास अगर न्यायाधीशास सामान्य जनतेपेक्षा अधिक हक्क देणे अन्यायाचे ठरत नाही. समतेच्या तत्त्वानुसार आपल्या घरातील गाई-म्हशींना दिवाणखान्यात आणून बांधणाऱ्या मनुष्यास कोणीही त्यांच्याच दाव्याला बांधील. सारांश, सर्व प्राणिमात्रांचे अगर सर्व व्यक्तीचे जीवित हे सारख्याच योग्यतेचे नसल्यामुळे केवळ समतेपेक्षा 'योग्यतेनुरूप समता' हेच तत्त्व व्यवहारात अधिक समंजसपणाचे ठरते व या दृष्टीने पाहिल्यास 'सर्वांचे हित सारख्याच महत्त्वाचे आहे', या बेन्डमच्या सिद्धांतापेक्षा, 'सर्वांचे सारख्याच दर्जाचे हित सारख्याच महत्त्वाचे आहे', अगर 'सर्व व्यक्ती ज्या मानाने सारख्या असतील त्या मानाने त्यांचे हित सारख्याच महत्त्वाचे आहे.' हा सिद्धांतच अधिक योग्य मानला पाहिजे.

परंतु केवळ (निरुपाधिक) समतेपेक्षा योग्यतेनुरूप समतेचे तत्त्व जरी अधिक व्यवहार्य असले तरी खरी योग्यता कशात आहे, याचा नीट विचार न केल्यास हेही तत्त्व तितकेच व्यापक व कुचकामाचे किंबहुना अहितकारक होईल. खरी योग्यता म्हणजे काय हे न समजल्यामुळे अनेक प्रकारचे कृत्रिम भेद व अनेक प्रकारची अन्याय्य विषमता यांचा

आमच्या समाजात सुळसुळाट झालेला आहे. समतेचा अर्थ ज्याप्रमाणे योग्यतेच्या दृष्टीने मर्यादित करावा लागतो, त्याचप्रमाणे योग्यतेचा अर्थही समतेच्या दृष्टीने मर्यादित केला पाहिजे. तसा तो केल्यासच या दोन तत्त्वांमधील परस्परविरोध नाहीसा होणे शक्य आहे.

प्रत्येक व्यक्तीची योग्यता ही दोन प्रकारची असू शकेल व त्याप्रमाणे 'योग्यतेनुरूप मोबदला' या तत्त्वाचा अर्थही दोन प्रकारांनी करता येईल. एका दृष्टीने प्रत्येक मनुष्य प्रत्यक्ष जितके काम करील त्या मानाने त्यास मोबदला द्यावा असे म्हणता येईल, तर दुसऱ्या दृष्टीने केवळ बाह्य कामगिरीकडे नजर न देता प्रत्येक मनुष्याच्या अंतर्यामीच्या योग्यतेप्रमाणे त्यास मोबदला देणे जरूर आहे, असे कोणी म्हणेल हे दोन्ही अर्थ वरवर पाहणारास जरी एकच दिसले, तरी त्यात अत्यंत फरक आहे. जो मनुष्य काहीच काम करीत नाही, अगर अगदी थोडे काम करतो, त्याची अंतर्यामीची योग्यता मोठी कशी मानावी, असा कोणी आक्षेप घेईल व हा आक्षेप काही अंशी खराही आहे; परंतु या दोन अर्थातील भेद इतकाच की, पहिल्यात केवळ व्यावहारिक योग्यतेवर जोर दिलेला असून, दुसऱ्यात नैतिक अगर बौद्धिक योग्यतेवर भर दिलेला आहे. एखाद्या थोट्या मनुष्याने पायांनी एखादे चित्र काढल्यास त्याची किंमत धड हाताच्या मनुष्याने काढलेल्या तसल्याच चित्रापेक्षा अधिक देणे इष्ट नाही काय? अर्थात केवळ व्यावहारिक दृष्टीने पाहिल्यास म्हणजे बाजारात त्या चित्राची काय किंमत होईल याकडे लक्ष दिल्यास दोघासही सारखाच मोबदला द्यावा लागेल व थोट्या चित्रकारास आपल्या विशेष कौशल्याचे काहीच चीज झाले नाही असे वाटेल; परंतु कोणत्याही मनुष्याच्या प्रत्यक्ष कामावरून, अगर त्याने उत्पन्न केलेल्या वस्तूवरून केवळ व्यावहारिकदृष्ट्या त्याचा मोबदला ठरवावा, असे प्रतिपादन करणारे लोक हे विसरतात की, कोणत्याही कामाची अगर वस्तूची किंमत ही सर्वस्वी सापेक्ष असते. म्हणजे त्या परिस्थिती ती वस्तू दिली असता इतर कोणत्या व किती वस्तू पैदा करता येतील यावरूनच तिची किंमत ठरविली जाते; परंतु ज्या वेळी समतेच्या ध्येयानुसार आपण सर्व समाजाची पुनर्घटना करू पाहतो त्या वेळी अशी किंमत ठरविण्यास आपणाजवळ कोणतेच साधन उरत नाही. एखाद्या गावात वैद्यकीचा व्यवसाय करणारे लोक अगदी थोडे असून, त्यांची गरज मात्र अतिशय असल्यास वैद्याच्या मदतीची किमत शेकडो रुपयांनी मोजली जाईल. उलटपक्षी, ज्या गावात रोग्यापेक्षा वैद्यांचीच संख्या अधिक आहे, अशा गावांत वैद्यांवर उपाशी मरण्याची पाळी येईल. अशा परिस्थितीत वैद्याच्या मदतीची खरी किंमत निश्चित करणे व तेवढाच मोबदला सर्व वैद्यांवर लादणे योग्य होईल काय? शिवाय आपापसातील स्पर्धेमुळे अगर केवळ कालमानामुळे कित्येक गोष्टींची किंमत बदलत जाते. अशा रीतीने व्यावहारिक किंमत ही स्थलकालाबरोबर व अनेक कारणांनी बदलत जाणारी असल्यामुळे कोणत्याही कामाचा अगर वस्तूचा मोबदला निश्चित करून समतेच्या तत्त्वानुसार सर्वांना तेवढाच मोबदला देणे हे समतेपेक्षा विषमतेसच पोषक होईल.

दुसरे असे की, निरनिराळ्या व्यवसायांत निरनिराळ्या प्रकारचे कौशल्य व निरनिराळ्या

प्रकारची मेहनत यांची जरूर असते. शेतात नांगर फिरविणे व घड्याळे दुरुस्त करणे या दोन व्यवसायांत पडलेल्या व्यक्तींना सारखाच मोबदला देणे इष्ट होणार नाही. इतकेच नव्हे, तर केवळ कामाचे मोजमाप करावयाचे झाल्यास एक घड्याळ दुरुस्त करणे हे किती बिघे जमीन नांगरण्याबरोबर आहे, असे प्रमाण ठरविणेही शक्य नाही. केवळ वेळाच्या दृष्टीने पाहिल्यास देखील हा प्रश्न सुटणार नाही. सोपे काम थोड्या वेळात पुष्कळ होईल, तर कठीण काम थोडके करावयास अतिशय वेळ लागेल. रस्ता उकरणारा मनुष्य व ताजमहालाची खिडकी बनविणारा मनुष्य यांच्या कामाकडे केवळ वेळाच्या दृष्टीने पाहिल्यास दुसऱ्याच्या दुप्पट मजुरी पहिल्यास द्यावी लागेल. केवळ शारीरिक श्रमाच्या दृष्टीने पाहिल्यास शिक्षकापेक्षा हमालास शारीरिक श्रम अधिक होतात म्हणून त्यास शिक्षकापेक्षा अधिक मोबदला द्यावा लागेल. बौद्धिक श्रमापेक्षा शारीरिक श्रम करणेच कित्येकास अधिक सुलभ वाटेल; परंतु तसे ते न वाटले, तरी कष्टप्रद शारीरिक श्रम करणाऱ्या मनुष्यासदेखील इतरांपेक्षा अधिक मोबदला मागण्याचा हक्क नसून फार तर थोडा कमी वेळ काम करण्याची सवलत मागता येईल.

यावर कोणी असा आक्षेप घेईल की, निरनिराळ्या व्यवसायांची किंमत केवळ 'रुपये आणे पै'मध्ये करणे शक्य नसले, तरी सामान्यतः त्यांची कमी-अधिक किंमत ठरवणे खचित शक्य आहे. उदाहरणार्थ, अडाणी शेतकऱ्यापेक्षा वैद्याचा व्यवसाय अधिक योग्यतेचा व अधिक मोबदल्यास पात्र नाही काय? या आक्षेपास असे उत्तर देता येईल की, जोपर्यंत समाजात पुरेसे शेतकरी आहेत तोपर्यंत शेतकऱ्यांपेक्षा वैद्यांचीच किंमत समाजास अधिक वाटणार; परंतु शेतात काम करावयास पुरेसे लोक नसल्यास वैद्यांपेक्षा शेतकऱ्यांचेच महत्त्व अधिक वाढेल हे उघड आहे. कारण औषधांपेक्षा अन्नाचीच जरूर केव्हाही अधिक असणार!

सारांश, कोणत्याही कामाची अगर वस्तूची किंमत केवळ व्यावहारिकदृष्ट्या ठरविणे शक्य व इष्टही नसल्यामुळे 'योग्यतेनुरूप मोबदला' म्हणजे केवळ व्यावहारिक योग्यतेनुरूप मोबदला असा अर्थ करणे बरोबर होणार नाही. आता आपणास योग्यता म्हणजे बौद्धिक अगर नैतिक योग्यता हा अर्थ कितपत बरोबर होईल हे पाहावयाचे आहे. या दृष्टीने पाहिल्यास ज्या कामात अधिक बुद्धिकौशल्य अगर अधिक उच्च भावना प्रकट होते त्यास अधिक मोबदला दिला पाहिजे, असे म्हणावे लागेल; परंतु केवळ एखाद्या कामात अधिक श्रेष्ठ प्रकारची बुद्धी अगर भावना प्रकट होते म्हणून त्या कामाचा समाजास अधिक फायदा न झाला, तरी ते काम करणाऱ्यास अधिक मोबदला द्यावा, असे म्हणता येणार नाही. एखादा छापखानेवाला गीतेची पुस्तके छापील, तर दुसरा अंकलिपीची पुस्तके छापील; परंतु या दोन्ही पुस्तकांची समाजास सारखीच जरूर असता केवळ गीतेच्या पुस्तकात अंकलिपीपेक्षा अधिक बुद्धिकौशल्य अगर अधिक उदात्त भावना प्रकट होते म्हणून गीता छापणाऱ्यास

अधिक मोबदला देणे योग्य होईल काय? हमालापेक्षा शिक्षकाचे काम अधिक उच्च प्रकारचे असेल; परंतु शिक्षकाचे काम करणाऱ्यास हमालीपेक्षा तेच काम अधिक सुखकर वाटते व यामुळे हमालास शिक्षकाच्या व्यवसायाची नैतिक योग्यता स्वतः शिक्षक आपणास लावून घेणार नाही. शिक्षकास अगोदर शिक्षण घेण्यास जी अनुकूल परिस्थिती मिळाली ती दुर्दैवाने हमालास मिळाली नसेल व या सुदैवातच शिक्षकास हमालापेक्षा अधिक मोबदला मिळून गेला आहे, असे म्हणता येईल.

परंतु सारख्याच परिस्थितीतून केवळ निसर्गदत्त बुद्धीमुळे अगर कौशल्यामुळे एक मनुष्य, ईश्वराने तशी देणगी न दिलेल्या दुसऱ्या मनुष्यापेक्षा अधिक पुढे आला तर? गणितात शोध लावण्याची बुद्धी हजारात एकालाच असते. अशा मनुष्यास आपली बुद्धी चालविण्यास व शोध लावण्यास इतरांपेक्षा अधिक वाव द्यावा, हे आम्हास मान्य आहे; परंतु याखेरीज केवळ पारितोषिक म्हणून केवळ ईश्वराने त्याला इतरांपेक्षा अधिक बौद्धिक देणगी दिली आहे म्हणून त्याला इतरांपेक्षा अधिक मोबदला देणे योग्य होणार नाही. एखाद्या मनुष्याचे अंगी विशेष प्रकारचे नैतिक अगर आध्यात्मिक गुण वास करीत असल्यास इतरांनी त्या गुणांबद्दल त्यास मान देणे व त्या सद्गुणांस अडथळा न करणे, किंबहुना त्या गुणांची वाढ करण्यास त्यास मदत करणे जरूर आहे; परंतु त्या सद्गुणांबद्दल त्यास इतरांपेक्षा अधिक अन्न, वस्त्र अगर इतर ऐषारामाच्या गोष्टी पुरविणे समाजाचे कर्तव्य कसे ठरते हे आम्हास समजत नाही. किंबहुना असेही म्हणता येईल की, सद्गुणी मनुष्यास जे इतरांपेक्षा अधित सात्त्विक समाधान लाभलेले असते तोच त्याचा अधिक मोबदला होय व कनिष्ठ प्रकारच्या सुखाचा व ऐषारामाचा त्याजवर वर्षाव केल्यास तो आपल्या सद्गुणांस व समाधानास मुकण्याचा अधिक संभव असतो. शिवाय अशा रीतीने सद्गुणांचा मोबदला देण्यात सद्गुण हा जसा काही त्या व्यक्तीचा तोटा आहे व तो भरून काढण्यासाठी त्याला इतर रीतीने अधिक मोबदला देणे जरूरी आहे, असे ध्वनित होते. सारांश, ज्याच्या त्याच्या व्यवसायात लागणारी अनुकूल परिस्थिती उत्पन्न करून देण्यास जरूर असलेल्या विषमतेखेरीज दुसरी कसलीही विषमता न्याय्य ठरत नाही व केवळ नैसर्गिक अगर नैतिक गुणांचा मोबदला ठरवितानाही अशा प्रकारच्या अन्याय्य विषमतेस वाव न देण्याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. संगीताचा व्यवसाय करणाऱ्या मनुष्याने गिरणीतील मजुराप्रमाणे भर वस्तीत न राहाता शांत व रम्य वातावरणात राहणेच अधिक योग्य होय; परंतु याचे कारण केवळ त्याचा व्यवसाय अधिक उच्च प्रकारचा आहे हे नसून त्याच्या कलेची जोपासना होण्यास तशा वातावरणाची जरूर आहे, हे होय. उच्च प्रकारचा बौद्धिक व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींनाही याच कारणासाठी अन्न-वस्त्राच्या बाबतीत इतरांपेक्षा अधिक सुख मिळणे आवश्यक असते. इतर माणसे पायी चालत असताना वैद्याने गाडीतून हिंडणे आपण अन्यायाचे समजत नाही. कारण त्यात रोग्यांचेच हित असते. कोणत्याही व्यक्तीच्या केवळ अंतर्यामीच्या बौद्धिक अगर नैतिक

योग्यतेवरून त्याचा मोबदला ठरविण्यापेक्षा ज्याच्या त्याच्या व्यवसायावरून अगर त्याच्या समाजास होणाऱ्या उपयोगावरूनच तो ठरविला पाहिजे. अर्थात्, तसे करताना त्याचे आपल्या कामातील कौशल्य अगर सचोटी ही लक्षात घ्यावीच लागतात. उदाहरणार्थ, एका कारागिराने दुसऱ्यापेक्षा तेच काम अधिक सुबक व अधिक लवकर केल्यास त्याला दुसऱ्यापेक्षा अधिक मोबदला देणे मुळीच वावगे होणार नाही. अशा रीतीने श्रमाचे अगर कौशल्याचे चीज होणे इष्टच आहे. मुद्दा इतकाच आहे की, केवळ एक कारागीर दुसऱ्यापेक्षा अधिक कुशल म्हणून त्याला अधिक मोबदला देणे योग्य नसून तो दुसऱ्यापेक्षा अधिक चांगले व लवकर काम करतो म्हणून त्यास अधिक मोबदला देणे योग्य व जरूरही आहे. कारण अशा अधिक मोबदल्याची अगर पारितोषिकाची अपेक्षा असल्याशिवाय कोणासही आपल्या अंगच्या गुणांचा अगर कौशल्याचा उत्कर्ष करण्यास उत्तेजन मिळणार नाही. कोणत्याही प्रकारचे उत्तेजन असल्याशिवाय आपण होऊन शक्य तितके चांगले काम करण्यास झटण्याइतकी कर्तव्यदक्षता फारच थोड्या व्यक्तींच्या ठिकाणी असते; परंतु अधिक मोबदला अगर पारितोषिक हे नेहमी अन्न-वस्त्राच्याच स्वरूपाचे असले पाहिजे असे नाही. उलट जो जो कार्य उच्च प्रकारचे तो तो त्याच्या पारितोषिकाची व्यावहारिक किंमत दृष्टीआड होऊन त्यास निराळ्याच प्रकारची किंमत प्राप्त होते. स्वदेशासाठी युद्ध करताना जखमी झालेल्या शूर शिपायास राष्ट्रीय निशाणाचा एक तुकडा जरी सेनापतीने अर्पण केला, तरी त्यात त्याला सर्वस्व मिळाल्यासारखे वाटते. तात्पर्य अधिक योग्यतेच्या मनुष्यास अधिक मोबदला अगर पारितोषिक मिळणे इष्ट असले तरी त्याचा अर्थ केवळ त्याच्या कामगिरीबद्दल अगर गुणांबद्दल ऐषारामात ठेवणे इष्ट आहे असा नसून तेच काम अधिक चांगल्या रीतीने करण्यास त्यास उत्तेजन मिळावे म्हणून पारितोषिकाचे महत्त्व आहे.

वरील विवेचनावरून 'सर्वांचे हित सारख्याच महत्त्वाचे आहे,' व 'योग्यतेनुरूप मोबदला,' ही दोन्ही तत्त्वे परस्परांनी मर्यादित व परस्परांच्या मदतीशिवाय अमलात आणता न येण्याजोगी अशी आहेत, हे दिसून येईल. अंतिम दृष्टीने सर्व माणसे सारख्याच दर्जाची असल्यामुळे कोणत्याही प्रकारची कृत्रिम व अवास्तव विषमता न्याय्य ठरत नाही. उलटपक्षी, सर्व माणसे सारख्याच दर्जाची आहेत म्हणून कोणत्याही प्रकारच्या पात्रतेकडे अगर व्यवसायभिन्नत्वाकडे न पाहता सर्वांना एकाच दावणीस बांधणे हे तितकेच अन्यायाचे होईल. म्हणून आरंभी म्हटल्याप्रमाणे समतेचा अर्थ सर्वांना सारखेच हक्क अगर सारख्याच सुखसोयी देणे असा न करता सर्वांच्या हिताकडे सारखीच नजर देऊन ज्याच्या त्याच्या पात्रतेप्रमाणे व गरजेप्रमाणे त्यास वाव देणे, असा केला पाहिजे. याच दृष्टीने सर्वांचे सारख्याच दर्जाचे हित सारखेच महत्त्वाचे आहे, असे आम्ही म्हटले. ज्या दृष्टीने व ज्या मर्यादेपर्यंत सर्व माणसे सारखीच आहेत त्या दृष्टीने व त्या मर्यादेपर्यंत सर्वांचे हित सारख्याच महत्त्वाचे मानले पाहिजे; परंतु या मर्यादेच्या बाहेर ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे त्यास वागविणे व उच्च

जीवितास कनिष्ठ प्रकारच्या जीवितापेक्षा अधिक महत्त्व देणे हेच श्रेयस्कर व समतेच्या दृष्टीनेही न्याय्य ठरते; परंतु त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की, कोणत्याही व्यक्तीची योग्यता केवळ व्यावहारिक अगर तात्त्विक दृष्टीने न ठरविता त्या व्यक्तीच्या व्यवसायावरून व समाजहिताकडे नजर देऊन ठरविली पाहिजे. कोणत्याही व्यक्तीस प्रत्येक सद्गुणाबरोबर एकेक शेत अगर एकेक बंगला नजर करावा असेच कोणी म्हणणार नाही, तर त्या सद्गुणांची वाढ होण्यास ज्या अनुकूल परिस्थितीची व ज्या उत्तेजनाची जरूर असेल ती परिस्थिती व ते उत्तेजन देणे यातच त्या सद्गुणांचा खरा मोबदला व खरे पारितोषिक आहे, असेच कोणीही म्हणेल. अशा रीतीने वरील दोन्ही तत्त्वांचा खरा अर्थ ध्यानात ठेवल्यास त्यांचा मिलाफ करणे मुळीच कठीण नाही व तसा तो करण्यातच समतेच्या तत्त्वाचा विजय आहे.

○○○

प्रकरण ७ वे

शासन व क्षमा

खरी समता कशात आहे याचा विचार करताना, प्रत्येक व्यक्तीस त्याच्या योग्यतेप्रमाणे मोबदला देणे इष्ट आहे की नाही व असल्यास तो मोबदला कोणत्या स्वरूपाचा असावा, याचे आम्ही विवेचन केले; परंतु येथपर्यंत केवळ चांगल्या प्रकारच्या योग्यतेचाच आपण विचार केला. चांगल्या प्रकारच्या योग्यतेस अगर सद्गुणांस ज्याप्रमाणे चांगला मोबदला अगर पारितोषिक, त्याचप्रमाणे वाईट प्रकारच्या योग्यतेस अगर दुर्गुणांस वाईट मोबदला अगर शासन देणे योग्य आहे की नाही व ते शासन कोणत्या प्रकारचे असावे याचाही विचार करणे आवश्यक आहे व तो या प्रकरणात करण्याचे योजिले आहे.

सामान्यतः गुन्हेगार मनुष्यास शासन करावे, निदान त्यास अधिक गुन्हे करण्यास वाव अगर उत्तेजन मिळणार नाही अशा परिस्थितीत त्यास ठेवावे, याबद्दल सर्वांचे एकमत आहे; परंतु शासनाच्या हेतूबद्दल व त्याच्या स्वरूपाबद्दल अत्यंत मतभेद दिसून येतो. कित्येक लोक असे म्हणतात की, शिक्षेचा हेतू केवळ गुन्ह्याबद्दल सूड घेणे हा होय. मग त्यात गुन्हेगाराचे कितीही नुकसान झाले, तरी हरकत नाही. उलट सुडाच्या भावनेने शिक्षा न देता, केवळ गुन्हेगार मनुष्याचे हित अगर त्याची सुधारणा ज्या योगाने होईल अशी योजना करणे हेच समाजाचे व कायद्याचे कर्तव्य आहे, असे कित्येकांचे मत आहे. पहिल्या मताप्रमाणे गुन्हेगाराच्या हिताकडे पूर्ण दुर्लक्ष करणे, किंबहुना त्याचे शक्य तितके अनहित करणे हे योग्य ठरते, तर दुसऱ्या मताप्रमाणे गुन्हेगार मनुष्याच्या हितासाठी समाजाने झटणे व अशा रीतीने एक प्रकारे सच्छील मनुष्यापेक्षा दुर्वर्तनी मनुष्यासच अधिक लेखणे हे कर्तव्य ठरते. अर्थात ही दोन्ही मत सदोष व एकांगी आहेत हे उघड आहे; परंतु या दोन्ही मतात सत्याचाही अंश आहे. तो शोधून काढण्यास आपणास त्यांचा स्वतंत्रपणे विचार केला पाहिजे.

पहिल्या मतास इतिहासाचा बराच पाठिंबा आहे. रानटी लोकांमध्ये शिक्षा ही नेहमी सुडाच्या भावनेने प्रेरित झालेली असे, इतकी की, घोड्यावरून कोणी पडल्यास घोडा ठार करणे अगर होडीतून कोणी पाण्यात पडून मरण पावल्यास ती होडी जाळून टाकणे, अशा तहेचे हास्यास्पद प्रकार काही देशांच्या प्राचीन इतिहासात आपणास आढळून येतात. सारांश, कोणत्याही प्रकारच्या हेतूकडे अगर सजीव-निर्जीव यांकडेही न पाहता केवळ ठोशास ठोसा या न्यायाने हे शासन दिले जात असे.

अशा प्रकारची शासनपद्धती किती क्रूर व किती मूर्खपणाची आहे हे विशद करून सांगण्याची गरज नाही; परंतु आश्चर्याची गोष्ट ही की, या पद्धतीचा पुरस्कार तिच्या सुधारलेल्या स्वरूपात का होईना अर्वाचीन व सुधारलेल्या काळातही कित्येक विद्वान ग्रंथकारांकडून केला जात आहे. उदाहरणार्थ, प्रसिद्ध जर्मन तत्त्ववेत्ता कांट याचे मत अशा प्रकारचे आहे. शिक्षा हे इतर कोणत्याही ध्येयाचे साधन नसून तेच शासन करणाराचे ध्येय असले पाहिजे. शिक्षा ही नेहमी भूतकाळाकडे म्हणजे घडलेल्या अपराधाकडे पाहून करावयाची असते. भविष्यकाळाकडे अगर गुन्हेगाराच्या पुढील हिताकडे पाहून करावयाची नसते व या दृष्टीने शिक्षा करताना गुन्हेगाराच्या अगर समाजाच्या हिताचा विचार करणे अत्यंत अन्यायाचे आहे, असा कांटचा अभिप्राय आहे. याच्याही पुढे जाऊन तो असे म्हणतो की, उद्या समाजव्यवस्था मोडून टाकून शासन करण्याचीही जरूर नाहीशी करण्याचे समाजातील लोकांच्या मनात आल्यास अगोदर तुरुंगांतील सर्व खुनी मनुष्यास फांसावर चढविले पाहिजे. गुन्हेगारास शासन केल्याच्या योगाने ज्यांचा गुन्हा त्यांनी केला असेल त्यास भरपाई न झाली, तरी त्या गुन्ह्याचे परिमार्जन कोणत्या तरी गूढ मार्गाने खचित होते.

हा अभिप्राय व ही विचारसरणी कोण्याही सहृदय मनुष्यास पटेल असे आम्हास वाटत नाही. अपराधाबद्दल कोणासही संताप येणे व शिक्षेच्या रूपाने तो व्यक्त होणे जरूरी आहे हे खरे; परंतु याचे कारण केवळ गुन्हेगार मनुष्याचा सूड घेतला जावा हे नसून शिक्षा हे गुन्ह्यांपासून स्वतः गुन्हेगारास व इतर लोकांस परावृत्त करण्याचे एक उत्तम साधन आहे हे होय. शिक्षेपासून असा सुपरिणाम होत नसेल अगर उलट अधिक गुन्हे करण्यास उत्तेजन मिळेल, तर केवळ शिक्षेसाठी शिक्षा करणे कितपत इष्ट होईल हा प्रश्नच आहे. तसे करणे म्हणजे केवळ गुन्हेगाराकडून झालेल्या नुकसानीत गुन्हेगाराच्या अहिताची भर टाकणे होय. त्यापेक्षा गुन्हेगारास तुरुंगात चांगल्या रीतीने वागवून त्यास कुमार्गापासून परावृत्त करणे, अगर तसे शक्य नसल्यास त्यास अधिक गुन्हे करता येऊ नयेत एवढाच बंदोबस्त करणे हे अधिक इष्ट नव्हे काय?

ब्रॅडले साहेबांनी कांटच्या सिद्धांताची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षा ही गुन्हेगाराच्या अगर समाजाच्या हितासाठी करावयाची नसून ती केवळ त्याच्या अपराधासाठी करावयाची असते; परंतु गुन्हेगाराच्या अगर समाजाच्या हिताकडे नजर देऊन

ती शिक्षा सौम्य करण्यास हरकत नाही. मात्र तसे करणे हे समाजाचे कर्तव्य आहे असे नाही, असे त्यांचे मत आहे. या मताप्रमाणे शिक्षेचे प्रमाण कमी करणे ही केवळ समाजाच्या अगर कायद्याच्या लहरीची गोष्ट आहे असे ठरते. शिवाय, गुन्हेगाराच्या अगर समाजाच्या हितासाठी शिक्षा कमी करणे हे जर न्याय्य ठरते, तर शिक्षा ही केवळ गुन्हेगाराचा सूड घेण्यासाठी केलेली नसून गुन्हेगाराच्या अगर समाजाच्या हिताचा हेतू त्यात अंशतः तरी असतो, असे सिद्ध होत नाही काय? केवळ अपराधासाठीच शिक्षा दिली पाहिजे असे म्हटल्यास त्या शिक्षेचे प्रमाण ठरविण्यास कोणतेच साधन न उरता अगदी क्षुल्लक अपराधासाठी देहांत शासन देणेदेखील न्याय्य होईल. जिच्या योगाने गुन्ह्यांपासून समाजाचे संरक्षण होईल व गुन्हेगाराचीही उन्नती होईल, एवढीच शिक्षा त्यास देणे योग्य होय, असे कोणीही सुज्ञ मनुष्य म्हणेल; परंतु हे दोन्ही हेतू ज्यास मान्य नसून केवळ सुडाची भावनाच ज्यास प्रिय वाटते असा न्यायाधीश कोणत्याही अपराध्यास जिवंत ठेवील असे मानण्याचे कारण नाही. कारण केवळ सुडाच्या दृष्टीने पाहिल्यास कोणता नैतिक गुन्हा किती शारीरिक कष्टांबरोबर अगर फटक्यांबरोबर आहे हे ठरविणे अशक्य आहे. किंबहुना, हे प्रमाण ठरविणे शक्य आहे, असे धरून चालले तरी गुन्हेगारास स्वतःचे हित अगर हक्कच नाहीत, असे मानल्यावर त्या प्रमाणाबाहेर शासन करण्यास मुळीच हरकत असू नये; परंतु अशा तहेचे प्रमाणाबाहेर शिक्षा करणे अन्यायाचे आहे, असे ब्रॅडले साहेबांचे मत आहे. अर्थात, अशी कबुली देण्यात ड्रडले साहेबांनी आपला मुद्दाच सोडून दिला आहे हे उघड आहे.

परंतु अशा रीतीने ही सुडाच्या भावनेवर रचलेली शासनपद्धती चुकीची असली तरी तीत सत्याचाही बराच अंश आहे हे विसरता कामा नये. तो सत्यांश कोणता हे आता आपणास पाहावयाचे आहे.

प्रथमतः मानसशास्त्राच्या दृष्टीने पाहिल्यास सर्व शिक्षेचे मूळ अपराधामुळे उत्पन्न झालेल्या संतापात अगर सुडाच्या भावनेतच आहे असे दिसून येईल व ज्या मानाने गुन्हा अधिक संतापास कारणीभूत होतो त्या मानाने त्याचा सूड घेण्याची इच्छाही अधिक तीव्र होऊन त्यास स्वाभाविकच अधिक शासन मिळते. अर्थात्, या तत्त्वाचा दुरुपयोग होण्याचा फार संभव असतो. रोमन लोकांमध्ये एखाद्या मनुष्यास प्रत्यक्ष चोरी करीत असताना पकडल्यास त्याचा अधिक संताप आल्यामुळे त्यास अधिक शासन करीत, तर मागाहून पकडल्यास संताप कमी झाल्यामुळे कमी शिक्षा देत. याहून विचित्र उदाहरण द्यावयाचे, तर एखाद्या मनुष्याने दुसऱ्यास खुनाच्या इराद्याने जखम केल्यास त्या जखमी मनुष्याची काय वाट होते ते पाहून तो बरा झाल्यास कमी शासन व मरण पावल्यास देहान्तशासन गुन्हेगारास देण्यात येत असे. या दृष्टीने पाहिल्यास दारू न पिणाऱ्या मनुष्यापेक्षा ती पिणाऱ्या मनुष्याची जखम भरून येण्यास अधिक त्रास होतो, म्हणून दारूबाजाचा खून करू पाहणाऱ्या मनुष्यास अधिक शासन करावे लागेल; परंतु असा अतिरेक बाजूस ठेवला, तर कायद्यास अजूनही

एखाद्या गुन्ह्याबद्दल शासन करण्यापूर्वी त्या गुन्ह्याबद्दल लोकमत कितपत तीव्र आहे याचा विचार करावा लागतो व याच तत्त्वानुसार प्रत्यक्ष खुनाबद्दल गुन्हेगारास जितके शासन केले जाते तितके त्याचा खुनाचा प्रयत्न फसल्यास करता येत नाही. सारांश, गुन्हेगार मनुष्याची सुधारणा हा शिक्षेचा हेतू असला, तरी गुन्ह्याविरुद्ध आलेला क्रोध व्यक्त होणे, किंबहुना ज्या मानाने गुन्हा अधिक क्रोधजनक त्या मानाने त्याची प्रतिक्रियाही गुन्हेगारावर अधिक होणे, हेही आवश्यक असते.

शिवाय, शिक्षा ही नेहमी दुःखकारक असलीच पाहिजे, नाही तर ती शिक्षाच होणार नाही. शिक्षा ही मुळीच दुःखकारक अगर कष्टप्रद असू नये असे म्हणणे म्हणजे शिक्षाच करू नये, असे म्हणण्यासारखे आहे; परंतु अपराधी मनुष्यास सुखात व ऐषारामात ठेवल्यास गुन्ह्यांस आळा न बसता उत्तेजनच मिळेल हे उघड आहे. गुन्हेगाराच्या हिताकडे अगर हक्काकडे अजिबात दुर्लक्ष करणे अयोग्य असले, तरी त्याचा अर्थ त्याच्या हितासाठी व सुखासाठी समाजाने अगर कायद्याने झटावे असा नव्हे. गुन्हेगारास आपल्या कृतकर्माचे फळ भोगावयास लावणे व त्यास पुन्हा गुन्हा करण्याची भीती वाटेल असा धडा त्यास देणे हेच शिक्षेचे मुख्य कार्य आहे. अशा तऱ्हेने गुन्हेगारास मुळीच दुःख देऊ नये, असे जे म्हणतात त्यास शिक्षा व शिक्षण यातील भेद समजत नाही, असे म्हटले पाहिजे. शिक्षेची भीती ही जरी एकदम गुन्हेगाराची मानसिक उन्नती करू शकत नाही, तरी तिच्या योगाने पुष्कळ कार्य होते यात संशय नाही. ज्याप्रमाणे कित्येक लहान मुलांच्याकडून अभ्यास करून घेण्यास त्यांना प्रथम तरी छडीची अगर इतर प्रकारच्या शिक्षेची भीती दाखविणे आवश्यक असते, त्याचप्रमाणे कित्येक मोठ्या माणसांकडूनही कायद्याच्या भीतीशिवाय सद्वर्तनाची अपेक्षा करता येत नाही. रूढीविरुद्ध आचरण केल्यास ज्याप्रमाणे दुलौकिक होण्याची भीती असते, त्याप्रमाणे कायद्याविरुद्ध आचरण केल्यानेही दुलौकिक होईल, अशी शिक्षा तसे आचरण करणाऱ्यास मिळाली पाहिजे, तरच दुर्वर्तनास आळा बसेल. शिवाय शिक्षेच्या योगाने गुन्हेगाराच्या वाईट प्रवृत्ती दडपून टाकल्यास हळूहळू त्याच्या सद्भावना जागृत होण्याचा संभव असतो. एखाद्या मनुष्यावर केवळ दैवी आपत्ती कोसळल्यास आपले 'मागल्या जन्मीचे' पाप काय आहे हे समजण्यास खास मार्ग नसतो; परंतु मानवी शिक्षा त्यास आपल्या अपराधांचे ज्ञान अवश्य करून देते व अशा रीतीने आपली चूक सुधारण्यास त्यास वाव देते. अत्यंत कडक शासनानेही एखाद्याच्या मनावर मुळीच परिणाम न झाला तरी, त्याचे स्वातंत्र्य नष्ट झाल्यामुळे त्याच्या हातून अधिक दुष्कर्म तरी निदान होत नाहीत व अशा रीतीने त्याची अधिकाधिक होणारी अवनती थांबवून शिक्षा ही त्याची सुधारणाच करते असे म्हणण्यास हरकत नाही. दुर्वर्तनास उत्तेजन मिळण्यापेक्षा तरी त्यास जुलमाने का होईना आळा बसणे खचित अधिक हितकर आहे.

शिक्षेच्या योगाने एखाद्या गुन्हेगाराची सुधारणा होणे शक्य नसले तरी त्यास शासन करण्याची आवश्यकता भासण्यास आणखी एक कारण आहे. व्यक्तीस ज्याप्रमाणे स्वतःचे हित अगर ध्येय असते त्याप्रमाणे समाजासही ते असल्यामुळे सामाजिक हितास अगर उन्नतीस कोणी आपल्या वर्तनाने विरोध करू लागल्यास त्यास अटकाव करणे समाजहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. अर्थात्, कित्येक गुन्हे असे असतात की, त्यास कायद्याने शासन करता येत नाही. उदाहरणार्थ, कायद्यास, वेश्यास अगर त्यांचा फायदा घेणाऱ्या पुरुषांस शासन करता येत नाही. सर्व नीतिमत्ता ही कायद्याने लोकांवर लादता येत नाही व तसे करणे खऱ्या आत्मोन्नतीच्या दृष्टीने इष्टही नसते. वैयक्तिक अगर खाजगी बाबतीत प्रत्येक मनुष्यास स्वातंत्र्य असणे आवश्यक असते; परंतु वैयक्तिक अनीतीने समाजाची नीतिमत्ता बिघडण्याचा संभव असल्यामुळे अनीतिपोषक स्वातंत्र्यापेक्षा नीतीची जबरदस्तीच प्रत्येक व्यक्तीवर करणे अधिक श्रेयस्कर होय. दारू पिण्यापासून ती पिणाऱ्याचेच नुकसान होते हे खरे आहे; परंतु एक दारूबाज हा समाजातील कित्येक लोकांत ते व्यसन पसरविण्यास व अशा रीतीने समाजाची अधोगती करण्यास कारणीभूत होत असल्यामुळे दारूबाजास कायद्याने शासन करणे अन्यायाचे होत नाही. व्यक्ती व समाज यामध्ये अंतिम भेद करता येत नाही व याच कारणाने वैयक्तिक गुन्हा अगर पाप व सामाजिक गुन्हा यातही तीव्र भेद करता येत नाही. तसा भेद करावयाचाच झाल्यास जे पाप समाजास इजा करते तो गुन्हा असे म्हणता येईल; परंतु कोणत्याही वैयक्तिक दुर्वर्तनामुळे समाजाचे मुळीच नुकसान होत नाही असे म्हणणे चुकीचे असल्यामुळे अशा तऱ्हेचा वैयक्तिक व सामाजिक गुन्ह्यांमध्ये भेद न करता सर्वच गुन्ह्यास शासन करणे हेच सुधारलेल्या देशातील कायद्याचे ध्येय असले पाहिजे. अशा तहेने कायद्याने शासन ठेवल्यामुळेच कित्येक एरव्ही क्षुद्र वाटणाऱ्या गुन्ह्यांतील वाईटपणा लोकास अधिक स्पष्टपणे कळून येतो व त्या गोष्टी न करण्याची ते अधिक खबरदारी घेऊ लागतात. सतीचा कायदा केल्यामुळेच त्या अपराधाची तीव्रता आमच्या समाजास कळू लागली, हे नाकबूल करता यावयाचे नाही. दुसरे उदाहरण द्यावयाचे, तर निवडणुकीच्या वेळी लाच देणे यात काही गैर आहे, असे त्याविरुद्ध कायदा होण्यापूर्वी फारच थोड्या लोकांस वाटत असेल यात संशय नाही. सारांश, अधोगतीला नेणाऱ्या स्वातंत्र्यापेक्षा जुलमाची नीतीच अधिक श्रेयस्कर व सुपरिणामी होय. इंग्रजीत अशी म्हण आहे की, पार्लमेंटच्या लोकांस नीतिमान बनविणे शक्य आहे; परंतु कायद्याच्या अभावी लोक जितके नीतिमान राहिले असते त्यापेक्षा अधिक नीतिमान तरी कायदा त्यास करतो की नाही? शिवाय, प्रथम जी गोष्ट लोक जुलूमाने म्हणून पत्करतात तिचे सुपरिणाम त्यास दिसून आल्यावर तीच गोष्ट ते आपण होऊन मान्य करतात, किंबहुना अशा रीतीने बाह्य सक्तीचे अंतःस्फूर्तीत रूपांतर न झाल्यास त्यांची खरी उन्नती झाली असे मुळीच म्हणता यावयाचे नाही; परंत जोपर्यंत समाजातील सर्व लोक नैतिक स्वातंत्र्यास लायक झाले

नाहीत, तोपर्यंत अनीतिमान व्यक्तींना ताळ्यावर आणण्यास कायद्याची व शिक्षेची जरूर राहाणारच. जोपर्यंत अशिक्षितपणाचे अगर आळसाचे दुष्परिणाम समाजास समजू लागले नाहीत, तोपर्यंत या गोष्टींबद्दलही शासन करणे अन्यायाचे होणार नाही. नीती व जुलूम या दोन गोष्टी कित्येकास अगदी परस्परविरोधी वाटतात; परंतु स्वातंत्र्याचा दुरुपयोग करण्याची प्रवृत्ती जोपर्यंत मानवी स्वभावात आहे, तोपर्यंत नीतिमत्तेस जुलूमाची जोड देणे आवश्यक आहे. शिवाय, जे लोक अंतःस्फूर्तीने सदाचरण करतात त्यांच्यासाठी कायद्याचे अस्तित्वच नाही व त्यांना या कायद्यात जुलूम वाटण्याचे मुळीच कारण नाही हे उघड आहे. सारांश, शक्य असल्यास गुन्हेगाराच्या हितासाठी व ते शक्य नसले तरी समाजाच्या हितासाठी अपराधी मनुष्यास शासन करणे आवश्यक आहे.

परंतु समाजाच्या हितासाठी गुन्हेगारास शासन करणे म्हणजे त्यास केवळ समाजहिताचे एक साधन लेखण्याप्रमाणे आहे, असा आक्षेप कित्येक लोक घेतात. कोणत्याही व्यक्तीस केवळ समाजहिताचे साधन असे मानणे अयोग्य आहे हे खरे. समाजाचे हित म्हणजे त्यातील व्यक्तीचे हित असल्यामुळे कोणत्याही व्यक्तीचे अनहित करणे म्हणजे त्या मानाने समाजाचेच अनहित करणे होय हे उघड आहे; परंतु कित्येक व्यक्तीस त्याच्या योग्यतेनुरूप मोबदला दिल्यास, म्हणजे समाजहितापैकी त्याचा वाटा त्यास दिल्यास, समाजाचे हित करण्याचे कर्तव्य त्याजवर लादणे म्हणजे त्यास समाजहिताचे केवळ एक साधन लेखण्याप्रमाणे कसे ठरते हे आम्हास समजत नाही. एखाद्या नोकरास आपण पगार दिल्यास त्याच्याकडून आपले काम करून घेणे ज्याप्रमाणे अन्यायाचे ठरत नाही त्याप्रमाणे गुन्हेगार मनुष्याचे हित लक्षात घेतल्यास व त्याच्या योग्यतेप्रमाणे च्या हितास वाव दिल्यास समाजहितासाठी त्यास शासन करणे अन्यायाचे ठरत नाही. अर्थात, गुन्हेगाराचे हित करणे म्हणजे त्यास मुळीच शासन न करणे होय, असे कोणी म्हणेल; परंत तसे करणे म्हणजे समाजाचे नकसान करणे व गन्हेगाराच्याही अधिकाधिक अधोगतीस कारणीभूत होणे होय. गुन्हेगाराचे हित करणे म्हणजे त्यास मोकळे सोडणे असे घटकाभर गृहीत धरले, तरी एका व्यक्तीचे हित हे अनेक व्यक्तीच्या हितापेक्षा केव्हाही कमी महत्त्वाचे असल्यामुळे एका व्यक्तीचे हित करून अनेकांचे अहित करणे हे विषमतेचे द्योतक होईल. अशा त-हेची विषमता अगर अन्याय होऊ न देता म्हणजे गुन्ह्यापासून समाजाचे संरक्षण करून गुन्हेगारास अंती हितकर होईल अगर त्याच्या उन्नतीस कारणीभूत होईल, अशीच शिक्षा त्यास देणे योग्य होय. अशा रीतीने त्याच्या हिताकडे नजर देऊन त्यास शासन केल्यास त्यास केवळ समाजहिताचे साधन लेखण्याप्रमाणे मुळीच होत नाही.

परंतु वरील विवेचनात गुन्हेगार मनुष्याच्या हितास दिलेले महत्त्व कित्येकास अगदी अपुरे वाटते. शिक्षा ही गुन्हेगाराचा सूड उगविण्याकरिता अगर गुन्ह्यांपासून समाजाचे संरक्षण करण्याकरिताही करणे योग्य नसून केवळ गुन्हेगाराचे हित करण्याकरिता अगर त्याची

सुधारणा करण्याकरिताच शिक्षेचा उपयोग केला पाहिजे असे त्यास वाटते. प्रकरणाच्या आरंभी ज्या दोन मतांचा उल्लेख केला आहे त्यातील दुसऱ्या प्रकारचे हे मत होय, हे वाचकांच्या लक्षात येईलच. त्यांचे म्हणणे असे की, कोणताही गुन्हा बुद्धिपुरःस्सर केला जात नसून गुन्हा करण्याची प्रवृत्ती हे एक प्रकारचे वेड अगर रोग आहे. अर्थात्, रोग्यास अगर वेड्या मनुष्यास ज्याप्रमाणे शासन करणे योग्य नसून उलट त्याच्या हितासाठी इतरांपेक्षा अधिक झटणे योग्य ठरते, त्याचप्रमाणे गुन्हेगार मनुष्यासही शासन न करता त्याच्या सुधारणेचा शक्य तितका यत्न करणे हे समाजाचे व कायद्याचे कर्तव्य आहे हे सिद्ध होते. सारांश, सर्व तुरुंग नाहीसे करून त्याच्या ऐवजी वेड्यांची इस्पितळे स्थापली पाहिजेत, असा वरील मत प्रतिपादन करणारांचा अभिप्राय आहे.

या विचारसरणीत अगदीच तथ्यांश नाही असे नाही. कवीप्रमाणेच गुन्हेगारही आपल्या कलेचे बीज जन्मतःच बरोबर घेऊन येतो. आनुवंशिक संस्कारामुळे अगर वाईट वातारणात राहिल्यामुळे कित्येक व्यक्तींची स्वाभाविकच गुन्ह्यांकडे प्रवृत्ती होते व त्या मानाने त्यांचा दोषही कमी होतो हे खरे आहे; परंतु सर्वच अनीती ही रोगाच्या अगर वेड्याच्या कोटीत ढकलणे म्हणजे लाक्षणिक उपमेस अंतिम सत्याचे स्वरूप देण्यासारखे आहे. रोगी मनुष्य हा तेवढ्यापुरता स्वत्वास मुकतो व स्वच्छेने वैद्याच्या हातातील बाहुले बनतो; परंतु प्रत्यक्ष गुन्हेगार मनुष्यास विचारल्यास तो अशा रीतीने दुसऱ्याच्या ताब्यात जावयास मुळीच तयार होणार नाही. कायदा अगर नीतिनियम हे नीतिअनीतीमधील भेदावर उभारलेले असतात; परंतु वरील मताप्रमाणे नीतिअनीतीतील भेद हा केवळ मानसिक सबलतेमधील व दुर्बलतेमधील भेद होऊन जाऊन सर्व नीतिशास्त्र हे मानसशास्त्रात मिसळून जाईल. ही विचारसरणी कोणासही मान्य होणार नाही हे उघड आहे. शिवाय वर म्हटल्याप्रमाणे स्वतः गुन्हेगार आपणास रोग्याप्रमाणे अगर वेड्या मनुष्याप्रमाणे वागवून घेण्यास मुळीच तयार होणार नाही व समाजानेही त्याचे स्वातंत्र्य व त्याचे हक्क तेवढ्यापुरते हिरावून घेतले, तरी त्याचे स्वत्व कायमचे नष्ट करता कामा नये. गुन्हेगार मनुष्य हा आपल्या स्वतंत्र बुद्धीने अपराध करतो व त्याची खरी उन्नतीही जुलूमाने होणे शक्य नसून ती त्याच्या स्वतःच्याच हाती असते. अशा रीतीने गुन्हा हा जाणूनबुजून केला जात असल्यामुळे रोगाबद्दल अगर वेडाबद्दल कोणास वाईट वाटले, तरी पश्चात्ताप होत नाही; परंतु गुन्ह्याबद्दल तसा पश्चात्ताप वाटतो. अत्यंत गुन्हेगार मनुष्याचा शेवट कधी कधी वेड लागण्यात होतो; परंतु गुन्ह्याचे मूळ कारण नेहमी वेडच असते असे म्हणणे सर्वस्वी चुकीचे आहे. सारांश, गुन्हेगार मनुष्याचे हक्क व त्याचे हित याकडे योग्य लक्ष पुरविणे आवश्यक असले, तरी त्यास रोग्याप्रमाणे अगर वेड्याप्रमाणे लेखून केवळ त्याच्या उन्नतीसाठी झटणे म्हणजे गुन्हेगारास डोईजड करून व गुन्हेगारीस उत्तेजन देऊन समाजाचे नुकसान करणे होय.

अशा रीतीने गुन्हेगाराच्या हिताकडे योग्य नजर देणे इष्ट असले, तरी समाजाच्या हिताच्या दृष्टीने त्यास शासन करणेच योग्य आहे, असे ज्यास वाटते, त्यास शासनाबरोबरच क्षमेचेही महत्त्व कळून येते. शिक्षेचा हेतू केवळ सूड घेणे हा होय, असे मान्य केल्यास कोणत्याही अपराध्यास क्षमा करणे योग्य होणार नाही; परंतु गुन्हेगाराच्या व समाजाच्या हितास ज्याप्रमाणे कित्येक वेळी शिक्षेची जरूर असते त्याचप्रमाणे कित्येकदा क्षमेचीही आवश्यकता असते, हे त्या दृष्टीने विचार करणारास सहज दिसून येईल. लहान मुलांना ज्याप्रमाणे पहिल्याच चुकीबद्दल शासन न करता पुन्हा चूक न करण्याची ताकीद देऊन त्यावेळी क्षमा करणेच इष्ट असते, त्याचप्रमाणे मोठ्या माणसांनाही आपले वर्तन सुधारण्याची संधी देणे इष्ट असते. प्रत्यक्ष खुनाच्या अपराध्याससुद्धा एकदम फाशीची शिक्षा न देता जन्मठेपेची दिली जाते व त्या मुदतीत त्याचे वर्तन पाहून त्यास अधिकाधिक सवलती दिल्या जातात. केवळ सुडाच्या दृष्टीने पाहाणारास शासन व क्षमा अगर सवलत या गोष्टी अगदी परस्परविरोधी वाटतात; परंतु गुन्हेगाराच्या व समाजाच्या हिताच्या दृष्टीने पाहिल्यास त्यातील परस्परविरोध नाहीसा होतो. इतकेच नव्हे, तर या दोन्ही गोष्टी एकमेकांस साह्यकर होतात. कारण गुन्हेगाराच्या व समाजाच्या हितास आवश्यक तेवढी शिक्षा व आवश्यक तेवढी क्षमा करणे या दोन्ही गोष्टी सारख्याच आवश्यक ठरतात. केवळ क्षमेनेच ते ध्येय साध्य होत असल्यास तसे करणेही अन्याय्य होत नाही; परंतु अशा रीतीने समाजहितासाठी सुडाची भावना दाबून टाकून गुन्हेगारास क्षमा करणे आवश्यक असले, तरी केवळ गुन्हेगाराबद्दल अनुकंपा उत्पन्न झाल्यामुळे अगर न्यायाधीशाचा त्यात स्वार्थ असल्यामुळे त्यास क्षमा करणे हे केव्हाही अयोग्यच ठरेल. समाजहितासाठी ज्याप्रमाणे सुडाची भावना मारून टाकावी लागते त्याचप्रमाणे अवास्तव अनुकंपेचाही त्याग करावा लागतो. तसा तो करण्यास सदैव तयार असणे हाच शासन व क्षमा या दोन्हीचे ध्येय गाठण्याचा मार्ग आहे.

○○○

प्रकरण ८ वे

नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान

इतर सर्व शास्त्रांप्रमाणेच नीतिशास्त्राचाही तत्त्वज्ञानाशी अत्यंत निकट संबंध आहे. सर्व शास्त्रास काही विशिष्ट मूलतत्त्वे अगर सिद्धांत गृहीत धरावे लागतात व त्या गृहीत तत्त्वांच्या पायावरच आपली सर्व इमारत रचावी लागते. अर्थात, ती गृहीत तत्त्वेच कोणी अमान्य केल्यास अगर चुकीची ठरल्यास त्या त्या शास्त्रांची सर्व इमारत कोसळून पडणार हे उघड आहे; परंतु कोणत्याही शास्त्रास आपली गृहीत तत्त्वे सिद्ध करणे शक्य नसते. ती सिद्ध करण्याचे काम तत्त्वज्ञानाचे आहे. उदाहरणार्थ, मानसशास्त्रास मनाचे अस्तित्व अगर पदार्थ विज्ञानशास्त्रास जड पदार्थ व त्यांची गती यांचे अस्तित्व गृहीत धरावे लागते. कोणी मनाचे अगर जडसृष्टीचे अस्तित्वच नाकारल्यास या दोन्ही शास्त्रांचे अस्तित्वही फोल ठरेल; परंतु मनाचे अगर जडसृष्टीचे अस्तित्व मानसशास्त्राने अगर पदार्थ विज्ञानशास्त्राने सिद्ध करू म्हटल्यास ते शक्य होणार नाही व त्यातच सर्व वेळ जाऊन त्या शास्त्राची मुळीच प्रगती होणार नाही; परंतु व्यावहारिकदृष्ट्या अशी प्रगती होणे अत्यंत जरूर आहे. म्हणून श्रम विभागाच्या तत्त्वानुसार मूलतत्त्वाचा छडा लावण्याचे काम तत्त्वज्ञानाकडे सोपवून प्रत्येक शास्त्र आपल्या मर्यादेत व त्या मूलतत्त्वांच्या आधाराने कार्य करीत असते. नीतिशास्त्र हेही काही मूलभूत तत्त्वांच्या पायावर रचलेले आहे व ती मूलतत्त्वे सिद्ध करण्याचे कामही तत्त्वज्ञानाचे असल्यामुळे इतर शास्त्राप्रमाणेच नीतिशास्त्राचे अस्तित्वही तत्त्वज्ञानावर अवलंबून आहे. उदाहरणार्थ, आपल्या नीतिअनीतीच्या कल्पना अगर आपली सद्‌सदविवेकबुद्धी ही भ्रामक अगर चुकीची नसून त्यांचा निवाडा सत्य असतो, असे नीतिशास्त्र गृहीत धरून चालते; परंतु नीतिअनीती अगर सद्‌सदविवेकबुद्धी हे केवळ थोतांड असून, तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने तिला काहीच किंमत नाही, असे सिद्ध झाल्यास सर्व नीतिशास्त्र मायिक व कुचकामाचे ठरेल हे उघड आहे.

परंतु नीतिशास्त्राचा तत्त्वज्ञानाशी संबंध इतर शास्त्रांपेक्षाही अधिक निकट आहे. भूमितीच्या मूलभूत तत्त्वांविषयी दोघांचा मतभेद असला, तरी एखाद्या शेताच्या दोन बाजूंनी जाण्यापेक्षा त्याच्या मधून गेल्यास कमी अंतर चालावे लागेल, ती गोष्ट ते दोघे सारखीच मान्य करतील व अशा रीतीने त्या शास्त्राच्या मूलतत्त्वाविषयीच्या मतभेदाने त्यांच्या व्यावहारिक जीवनक्रमात फारसा फरक पडणार नाही; परंतु नीतिशास्त्राची गोष्ट तशी नाही. आत्मस्वातंत्र्य मान्य करणारा मनुष्य आपल्या कृत्यांची जबाबदारी स्वतःवरच आहे असे वाटत असल्यामुळे हातून वाईट कृत्ये न होऊ देण्याची खबरदारी घेईल, तर ते अमान्य करणारा मनुष्य वाटेल तसे वर्तन करून त्याची जबाबदारी ईश्वरास अगर दैवावर लादील. सारांश, इतर शास्त्रांच्या मूलभूत तत्त्वांचा व्यवहाराशी विशेष निकट संबंध नसल्यामुळे त्या गृहीत तत्त्वांबद्दल मतभेद असला तरी त्याचा परिणाम व्यवहारात फारसा दिसून येत नाही; परंतु नीतिशास्त्राच्या गृहीत तत्त्वाची त्यास इतकी गरज आहे की, ती तत्त्वे कोणी अमान्य केल्यास नीतिविषयक कल्पनांना इतका मोठा धक्का बसतो की, सर्व नीतिमत्ता उरफाटी जाण्याची भीतीही असते. आता हे खरे आहे की, मूलतत्त्वाविषयी मतभेद असूनदेखील कित्येक लोक एकाच प्रकारचे नीतिशास्त्र अगर नीतिनियमन स्वीकारतील. आत्मस्वातंत्र्य मान्य नसलेला मनुष्यदेखील आपल्या कर्तव्याची जाणीव अजिबात टाकून देणार नाही; परंतु जोपर्यंत त्याच्या मनात आत्मस्वातंत्र्याविषयी संशय आहे तोपर्यंत आपले कर्तव्य करण्यात व त्याची जबाबदारी पत्करण्यात त्यास पूर्ण समाधान वाटणार नाही. आपली चौकस बुद्धी व तात्त्विक विचार बाजूस ठेवून अगर दडपून टाकून तो नीतीने वागेल; परंतु त्याच्या आचारात व विचारात नेहमी झगडा चालू राहणारच व जोपर्यंत त्याच्या आचारास विचाराचा पाठिंबा मिळत नाही तोपर्यंत त्याची नीतिमत्ताही अंधश्रद्धेवर व कच्च्या पायावर उभारलेली अशीच राहाणार.

अशा प्रकारे नीतिशास्त्र हे केवळ अंधश्रद्धेवर अगर व्यावहारिक उपयुक्ततेवर अवलंबून ठेवणे हे कोणाही सत्यनिष्ठ मनुष्यास रुचणार नाही हे उघड आहे. मानवी पूर्णतेस नीतीची जितकी आवश्यकता आहे तितकीच किंबहुना अधिकच आवश्यकता सत्याची आहे व या सत्याच्या प्रकाशात खऱ्या सत्यनिष्ठ मनुष्याने इतर शास्त्रांबरोबरच नीतिशास्त्राकडेही पाहिले पाहिजे. नैतिक सत्य हे अंतिम सत्याचे एक अंग आहे व ते जर अंतिम सत्याशी विरोध करू लागले, तर आपणास नीतिअनीतीचे यथार्थ ज्ञान नाही असे म्हणावे लागेल. 'अंतिम सत्याशी आपणास काय करावयाचे आहे? आपल्या नीतिअनीतीच्या कल्पना अंतिम दृष्टीने खऱ्या असोत की, खोट्या असोत. आपणास तर त्या नेहमी खऱ्याच वाटतात की नाही? तशा त्या जर वाटतात, तर त्यावर विश्वास ठेवून वागण्यास काय हरकत आहे?' असे कांटप्रभृती तत्त्ववेत्त्यांचे म्हणणे आहे; परंतु कल्पनांवर विश्वास ठेवून चालणे म्हणजे मृगजळाच्या मागे लागण्याप्रमाणेच नव्हे काय? सारांश, तत्त्वज्ञानाच्या कसोटीस आपली गृहीत तत्त्वे उतरतात की नाही हे नीट पाहून त्या मानानेच नीतिशास्त्राने आपले पाय पसरावे हे उचित होय.

तत्त्वज्ञानविषयक कल्पनांचा नीतिशास्त्रावर कसा परिणाम होतो, याची काही उदाहरणे मागील काही प्रकरणांत वाचकांस पाहावयास मिळालीच आहेत. उत्क्रांतितत्त्ववादी म्हणतात त्याप्रमाणे आपल्या नीतिअनीतीच्या मूळ कल्पना या स्वतः प्रमाण अगर स्वयंभू नसून अनुभवजन्यच आहेत हे खरे असेल, तर निरनिराळ्या व्यक्तींच्या अगर निरनिराळ्या काळच्या अनुभवांबरोबरच त्या पालटून जाऊन सर्व नीतिमत्ता सापेक्ष बनून जाईल किंवा अंतःस्फूर्तीवादी म्हणतात त्याप्रमाणे आपली सद्सदविवेकबुद्धी ही जर केवळ एक क्षणिक ऊर्मी असेल अगर केवळ सौंदर्यविषयक संवेदनेप्रमाणे असेल. तरीही नीतिमत्तेचे सार्वत्रिक व निरुपाधिक स्वरूप नाहीसे होऊन ती शास्त्रबद्ध करणे अशक्य होईल. सद्सदविवेकबुद्धी ही जर केवळ वैयक्तिक भावना असेल, तर नैतिक भावना ही इतर भावनांपेक्षा श्रेष्ठ का मानावी? या प्रश्नास उत्तर देता येणार नाही. अगर ती अनुभवजन्य आहे असे मानल्यास एका मनुष्याचा अनुभव दुसऱ्यापेक्षा, अगर एका काळचा अनुभव दुसऱ्या काळापेक्षा श्रेष्ठ का मानावा, हेही सांगता येणार नाही. सारांश, नैतिक सत्य हे कोणत्याही व्यक्तीच्या लहरीवर अगर भावनेवर अवलंबून नसून ते निरुपाधिक व अंतिम सत्य आहे असे मानले नाही, तर नीतिशास्त्रास आपली इमारत रचण्यास पायाच उरणार नाही. तर्कशास्त्रास ज्याप्रमाणे तर्कशुद्ध विचार करणे शक्य आहे हे गृहीत धरावे लागते, त्याचप्रमाणे नीतिशास्त्रास खरी नीती ओळखणे शक्य आहे, असे मानून चालणे प्राप्त आहे.

दुसऱ्या एका दृष्टीने तत्त्वज्ञान हे नीतिशास्त्रावर गदा आणू शकते. सर्व नीतिशास्त्र हे कर्तव्याच्या जाणिवेवर व नीतिमत्तेच्या वैयक्तिक जबाबदारीवर रचलेले आहे. अर्थात्, कोणासही त्याच्या कृत्याबद्दल जबाबदार धरावयाचे झाल्यास ते कृत्य त्याने आपल्या स्वतंत्र बुद्धीने व स्वेच्छेने केलेले असले पाहिजे. दुसऱ्या कोणाच्याही जुलूमाने आपण एखादी गोष्ट केल्यास त्याबद्दल आपणास जबाबदार धरता येत नाही. यासाठी आत्मस्वातंत्र्य हे नैतिक उन्नतीस, किंबहुना नीती व अनीती या कल्पना उत्पन्न होण्यास अत्यंत आवश्यक आहे. एखाद्या यंत्रास ज्याप्रमाणे कोणी नीतिमान अगर अनीतिमान म्हणत नाही, त्याचप्रमाणे केवळ ईश्वराच्या इच्छेने अगर यदृच्छेने ज्याचे आयुष्य बांधलेले आहे अशा मनुष्यासही नीतिमान अगर अनीतिमान ठरविता येणार नाही, सारांश, आत्मस्वातंत्र्य हे नीतिशास्त्राचे मुख्य गृहीत तत्त्व आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. अर्थात आत्मस्वातंत्र्याचे अर्थ अनेक असू शकतात व त्याच्या मर्यादाही अनेक असतात हे खरे आहे. एका दृष्टीने मनुष्य स्वतंत्र असला, तरी दुसऱ्या दृष्टीने पाहिल्यास प्रो. वामन मल्हार जोशी यांनी वर्णन केल्याप्रमाणे आगगाडीतील मनुष्यास ज्या प्रकारचे हालचाल करण्याच स्वातंत्र्य असते त्याच प्रकारचे आत्मस्वातंत्र्य या अफाट सृष्टीतील मनुष्यमात्रास आहे असे म्हणता येईल. आत्मस्वातंत्र्याच्या प्रश्नात अधिक खोल शिरण्याचे हे स्थळ नव्हे. त्याचे सविस्तर विवेचन आम्ही पुढे करणार आहोत. मर्यादित का होईना आत्मस्वातंत्र्य हे नीतिशास्त्रास अत्यंत आवश्यक आहे व तसे आत्मस्वातंत्र्य

आपणास नाही, असे तत्वज्ञानाच्या दृष्टीने ठरल्यास सर्व नीतिशास्त्र कोसळून पडेल एवढेच आम्हास दाखवावयाचे आहे. जडवाद अगर अनात्मवाद हे आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्वच नाकारून आत्मस्वातंत्र्यासही अर्थातच रजा देतात. त्याचप्रमाणे दैववादही आत्मस्वातंत्र्य अमान्य करतो. अर्थात् ही सर्व मते नीतिशास्त्रास विघातक आहेत हे उघड आहे. सारांश, आत्मा हा जडसृष्टीतील एक परमाणू अगर बौद्ध लोक म्हणतात त्याप्रमाणे विज्ञान प्रवाहातील क्षणिक लाट नसून तो जडसृष्टीकडून अगदी निराळा व नित्य आहे. जडसृष्टीत पदार्थास ज्याप्रमाणे स्वतः कोणतेही कार्य करण्याची शक्ती नसून त्यांना दुसऱ्या कारणाची आवश्यकता असते, त्याप्रमाणे आत्म्याची स्थिती नसून तो आपल्या स्वतंत्र स्फूर्तीने कार्य करू शकतो व त्याची जबाबदारीही स्वतः घेऊ शकतो. हा नीतिशास्त्राचा मूलभूत सिद्धांत आहे; परंतु याचबरोबर आणखीही काही सिद्धांत नीतिशास्त्रास गृहीत धरावे लागतात, त्यांचा विचार आता आपण केला पाहिजे.

नीतितत्त्वे ही कोणत्याही एका व्यक्तीच्या लहरीवर अवलंबून नसतात हे खरे आहे; परंतु एवढे म्हटल्याने खरी नीतिमत्ता कोणती हा प्रश्न सुटत नाही. कोणत्याही गुणाचा पूर्ण उत्कर्ष अगर आदर्श कोणत्याही मनुष्याच्या ठिकाणी आपणास आढळत नाही; परंतु कोठे तरी तो आदर्श असल्याखेरीज आपल्या नैतिक उन्नतीची दिशा अगर तिची सत्यता पडताळून पाहण्यास आपणास काहीच साधन उरणार नाही. नीतितत्त्वांची सार्वत्रिकता सिद्ध होण्यास त्यांचा उगम सर्वांना आदर्शभूत असलेल्या अशा एकाच शक्तीमधून होतो असे मानणे जरूरी आहे व यासा सर्व नीतिमत्तेचा आदर्श असा ईश्वर नीतिशास्त्रास कल्पावा लागतो. ईश्वरावर विश्वास नसूनदेखील एखादा मनुष्य नीतितत्त्वे मान्य करील; परंतु केवळ वर सांगितलेल्या व्यावहारिक दृष्टीने अशा निसर्गवादी अगर जडवादी मनुष्यास आपल्या नैतिक आचरणाचे कारण अगर आवश्यकता सिद्ध करता येणर नाही; परंतु ज्यास नीतिमत्तेचा आदर्श व उगम गाठावयाचा आहे असा मनुष्य मोठ्या उत्साहाने व आत्मविश्वासाने नैतिक उन्नतीच्या मार्गास लागेल. ज्यास आपल्या नीतिमत्तेचे अगर आयुष्याचे ध्येयच माहीत नाही असा मनुष्य, ज्यास कोठे जावयाचे हे माहीत नाही, अशा वाटसराप्रमाणे, आपल्या मार्गाविषयी नेहमी साशंकच राहाणार; परंतु ज्याच्या ठिकाणी सर्व जीविताची व नीतिमत्तेची पूर्णता साठविलेली आहे त्या ईश्वराकडे त्याच्या अस्तित्वाविषयी निःशंक असलेला मनुष्य साहजिकच जोराने धाव घेईल. आपल्या नीतिमत्तेबद्दल आपण ईश्वरास जबाबदार आहोत ही जाणीव तो सदैव हृदयात बाळगील व आपल्या आवडीनिवडी बाजूस ठेवून ती जबाबदारी पार पाडण्याचा शक्य तितका प्रयत्न करील.

अशा रीतीने परिपूर्ण आत्मोन्नती करून घेणे हे सर्व मानवजातीचे कर्तव्य असून, ईश्वराची इच्छाही तशीच असली पाहिजे असे मानावे लागते; परंतु अशा तऱ्हेची परिपूर्ण आत्मोन्नती होणे शक्य आहे, ही गोष्ट त्याचबरोबर गृहीत धरावी लागते. ज्याप्रमाणे ज्या

गावी पाहोचणे कधीच शक्य नाही त्या गावाची वाटही कोणी धरणार नाही, त्याचप्रमाणे नैतिक उन्नतीचे ध्येयही कधीच साध्य होणे शक्य नसल्यास किंवा कांटने म्हटल्याप्रमाणे, जो जो आपण अधिकाधिक उन्नती करू तो तो ते ध्येयही मागे मागे सरकत गेल्यास तशा उन्नतीच्या मागे कोणीही लागणार नाही हे उघड आहे; परंतु एका जन्मात आत्मोन्नती पूर्ण होणे शक्य नसल्यामुळे ती उन्नती अधिकाधिक होऊन अखेरीस पूर्ण होण्यासाठी अधिक जन्म घेणे आवश्यक असते. शिवाय ज्या नैतिक उन्नतीचे अगर अवनतीचे फळ प्रत्येक व्यक्तीस मिळणे आवश्यक असते, ते फळही एका जन्मात मिळते असे दिसून येत नाही. उलट या जन्मीच्या आयुष्याकडे पाहिल्यास सत्यनिष्ठा व नीतिनिष्ठ व्यक्तीची हालअपेष्टा आणि असत्याची व अनीतीची कास धरणारांची भरभराट याच गोष्टी आपणास प्रामुख्याने दिसून येतात. अर्थात नीतीचे व सत्यनिष्ठेचे हेच पारितोषिक व हीच समाप्ती असे ठरल्यास अशा प्रकारची दुःखकारक नीतिनिष्ठा उराशी बाळगल्याबद्दल कोणासही पश्चात्तापच वाटेल. यासाठी या जन्मी नाही, तर पुढील जन्मी तरी सद्गुणांचे चीज होऊन दुर्गुणांचे पारिपत्य होईल व 'सत्यमेव जयते' हा सिद्धांत खरा ठरेल, असा हवाला नीतिशास्त्रास द्यावा लागतो व अशा रीतीने आत्म्याचे अमरत्व (त्याबरोबर येणाऱ्या कर्मवादासकट) गृहीत धरून चालावे लागते.

परंतु अशा विश्वासाने नैतिक उन्नतीच्या मागे लागलेला मनुष्य व त्या उन्नतीची दिशा दाखविणारा व तिचे फळ देणार न्यायाधीश ईश्वर या दोन्ही, त्या दोन्हींच्याही मूळ कारणाच्या दृष्टीने म्हणजे वेदांतांत प्रतिपादन केलेल्या परब्रह्माच्या दृष्टीने पाहिल्यास सापेक्षच ठरतात. नीती व अनीती या गोष्टी कोणत्याही व्यक्तीशी सापेक्षच नसल्या तरी, त्या दोन्ही एकमेकांशी सापेक्षच आहेत व म्हणून या सर्व सापेक्षतेच्या व सगुणतेच्या बाहेर व अशा रीतीने नीती व अनीती या दोन्हींच्याही पलीकडले जे निर्गुण ब्रह्म, त्याच्या दृष्टीने पाहिल्यास नीतिअनीतीमध्ये गुरफटलेला मनुष्य व सर्वगुण संपन्न असा सगुण ईश्वर हे दोन्ही मायिक म्हणजे केवळ व्यावहारिकदृष्ट्या सत्य ठरतात. अर्थात्, अशा निर्गुण ब्रह्माचे ज्यास ज्ञान झाले, असा मनुष्य ब्रह्मस्वरूपच असल्यामुळे या सापेक्षतेच्या बाहेर नीतिअनीतीच्या पलीकडचा होतो. अशा सिद्धावस्थेतील मनुष्यास कोणत्यास कर्माची बाधा होत नाही. कारण त्याची कर्मे पूर्णपणे निष्काम असल्यामुळे ती करून न केल्याप्रमाणेच असतात, असा गीतेचा स्पष्ट अभिप्राय आहे; परंतु अशा रीतीने ब्रह्मज्ञानाची पायरी नीतिअनीतीच्या पलीकडची असली, तरी चित्त शुद्धीखेरीज ब्रह्मज्ञान होणे शक्य नसल्यामुळे ती गाठण्याचा मार्ग नीतिमत्तेच्या खडतर जिन्यातूनच आहे हे विसरता कामा नये. या दृष्टीने पाहिल्यास नीतिशास्त्रास निर्गुण ब्रह्मापेक्षा सगुण ईश्वराचीच अधिक जरूर आहे हे उघड आहे. मात्र या सापेक्षतेच्या व सगुणतेच्या मार्गानेच; परंतु निरूपाधिक व निर्गुण ब्रह्माप्रत आपणास पोहोचावयाचे आहे हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. नीतिशास्त्राचे पालन करून तत्त्वज्ञानाचा किल्ला हस्तगत करण्याचा अगर चित्तशुद्धीच्या द्वारे मुक्ती मिळविण्याचा विडा प्रत्येक मुमुक्षूने उचलला पाहिजे.

वरील विवेचनावरून इतके दिसून येईल की, आत्मस्वातंत्र्य, ईश्वराचे अस्तित्व आणि आत्म्याचे अमरत्व ही तीन मूलतत्त्वे नीतिशास्त्राला गृहीत धरावी लागतात. अर्थात, ही तत्त्वे खरी आहेत की नाहीत हे ठरविण्याचे काम नीतिशास्त्राचे व अर्थात प्रस्तुत लेखकाचेही नसून ते कार्य तत्त्वज्ञानाचे आहे; परंतु केवळ नीतिशास्त्राच्या दृष्टीनेदेखील ती तत्त्वे खरी असलीच पाहिजेत, असे मानण्यास आपणास सबळ कारण आहे. ते कारण नमूद करून हे प्रकरण आटोपले पाहिजे.

ज्याप्रमाणे नीतिशास्त्रास तत्त्वज्ञानाचा आधार घ्यावा लागतो, त्याचप्रमाणे तत्त्वज्ञानासही नीतिशास्त्राच्या निर्णयाचा विचार करून त्यास योग्य स्थान द्यावे लागते. वर म्हटल्याप्रमाणे नैतिक सत्य हे अंतिम सत्याचे एक अंग असल्यामुळे अंतिम सत्याचे आविष्करण करणाऱ्या शास्त्रास ज्याप्रमाणे इतर सत्यास स्थान द्यावे लागते त्याचप्रमाणे त्याने नैतिक सत्यासही स्थान दिले पाहिजे. कार्डिनल न्यूमनने असे म्हटले आहे की, सद्‌सदविवेकबुद्धीचे अस्तित्व हेच ईश्वराचेही अस्तित्व सिद्ध करण्यास पुरेसे आहे. या विधानांत अतिशयोक्ती असली, तरी आपली सद्‌सदविवेकबुद्धी अगर नीतिअनीतीच्या कल्पना यांचा मुळीच विचार न केल्यास अगर त्या सर्वस्वी भ्रामक आहेत, असे मानून चालल्यास कोणतेही तत्त्वज्ञान अगदी एकांगी व अपुरे राहील हे उघड आहे. सत्यशोधन करणाऱ्या मनुष्याने विश्वातील इतर गोष्टींवरून काढलेल्या निर्णयाबरोबरच नैतिक निर्णयाचाही विचार केला पाहिजे व या सर्व निर्णयांची सुसंबद्ध रीतीने सांगड घातली पाहिजे, नाही तर परस्परविरोधी सिद्धांत उत्पन्न होऊन सत्यशोधन अशक्यच होईल. मनुष्याकडे पाहताच ईश्वर आहे व निसर्गाकडे पाहताच तो नाही, असा निर्णय तत्त्वज्ञान देऊ लागेल, तर आपणास दोन्हींचेही ज्ञान नाही, असे म्हणावे लागेल. याचे पर्यवसान अज्ञेयवादात होईल हे उघड आहे किंवा कांटने प्रतिपादन केल्याप्रमाणे श्रद्धा व बुद्धी यात दुफळी होऊन नीतीचा प्रांत श्रद्धेच्या ताब्यात व सत्यशोधनाचा प्रांत बुद्धीच्या ताब्यात, असा प्रसंग येईल; परंतु जोपर्यंत श्रद्धा व बुद्धी यास एकमेकींचा आधार व जोड नाही, तोपर्यंत दोघींचाही मार्ग निष्कंटक न होता श्रद्धेस अंधश्रद्धेचे स्वरूप येईल व बुद्धीही पंगू होऊन जाईल. कारण मूलतत्त्वांचा छडा बुद्धीने लागत नाही म्हणूनच कांटला श्रद्धेची जरूर भासली हे कोणासही सहज दिसून येईल. याच कारणासाठी सर्व गृहीत तत्त्वांना पराविद्येच्या कोटीत ढकलून त्याविषयीच्या अज्ञानातून वाट काढण्यात येते. याचा अर्थ असाच की, हे सिद्धांत तर्कदृष्ट्या सिद्ध करता न आले, तरी त्यांची सत्यता नाकारणेही तत्त्वज्ञानास शक्य नसते. सारांश, तत्वज्ञानाचे सिद्धांत ज्याप्रमाणे नीतिशास्त्रास बंधनकारक असतात, त्याचप्रमाणे नीतिशास्त्राचे सिद्धांतही तत्त्वज्ञानास झुगारून देता येत नाहीत. हा अन्योन्याश्रय अगदी स्पष्ट असल्याने नीतिशास्त्राने आपल्या पायाच्या भक्कमपणाविषयी साशंक राहण्याचे मुळीच कारण नाही.

○○○

प्रकरण ९ वे

नीती व धर्म

मागील प्रकरणात आम्ही असे दर्शविले की, आत्मस्वातंत्र्य, आत्म्याचे अमरत्व व ईश्वराचे अस्तित्व या गोष्टी नीतिशास्त्राची सत्यता प्रस्थापित करण्यास व नीतिमत्ता सार्थ करण्यास आवश्यक आहेत. प्रत्येक मनुष्याच्या मनात ही गृहीत तत्त्वे प्रामुख्याने वास करीत असतात असे नाही. तर्कशास्त्राची मूलतत्त्वे स्पष्टपणे माहीत नसूनदेखील ज्याप्रमाणे कित्येक लोक तर्कशुद्ध भाषण करतात, त्याचप्रमाणे नैतिक आचरण करणाऱ्या कित्येक लोकांसही आपल्या नीतिमत्तेचा पाया काय आहे हे स्पष्टपणे माहीत नसते; परंतु नकळत का होईना, त्या तत्त्वांविषयींची श्रद्धा नीतिश्रद्धेमध्ये दडून राहिलेली आहे, हे त्याविषयी विचार करणारास दिसून येईल. मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणे, एखादा मनुष्य नीतिनिष्ठ असूनही ही गृहीत तत्त्वे अमान्य करील; परंतु अशा मनुष्यास केवळ व्यावहारिक उपयुक्तता अगर लहर यांखेरीज आपल्या नीतिमत्तेस काहीच आधार दाखवता येणार नाही व त्याची विचारशक्ती जागृत असल्यास तिचा परिणाम हळूहळू त्याच्या नैतिक आचरणावर झाल्यावाचून राहणार नाही.

अशा रीतीने आचारात व विचारात जो संबंध आहे तोच संबंध नीती व धर्म यांमध्ये आहे असे म्हणता येईल. हा संबंध अत्यंत गुंतागुंतीचा व कित्येक वेळी परस्परविरोधी असलेला दिसून येतो. कित्येक नीतिनिष्ठ व्यक्ती धर्माविषयी अगदी उदासीन असलेल्या दृष्टीस पडतात, तर कित्येक धर्मनिष्ठ व्यक्ती नैतिक आचरणाचे महत्त्व ओळखीत नाहीत असे आढळून येते. अशा रीतीने आचार व विचार यात जरी नेहमी सख्य नांदत नसले तरी नीतिनिष्ठेस अगदी अस्पष्ट का होईना, धर्मनिष्ठेचा पाठिंबा असावा लागतो; उलटपक्षी, खऱ्या धर्मनिष्ठेत नीतिनिष्ठेचाही अंतर्भाव होणे आवश्यक असते व एकमेकींच्या मदतीखेरीज दोन्हीही पंगु झाल्यावाचून राहत नाहीत, हीच गोष्ट आम्हास या प्रकरणात विशद करून सांगावयाची

आहे. तसे करताना नीती व धर्म यांमधील खरा संबंध कसा असला पाहिजे हेही स्पष्ट होणार आहे.

प्राचीन काळाकडे नजर टाकल्यास असे दिसून येते की, त्या काळच्या धार्मिक कल्पनांचा नीतिमत्तेशी विशेष संबंध नसे, इतकेच नव्हे, तर कित्येक धार्मिक कल्पना सर्वस्वी अनैतिक असत; परंतु त्या कल्पना आपल्या आजच्या दृष्टीने अनैतिक असल्या तरी, त्या वेळी त्या गोष्टी पूर्णपणे नैतिक, पवित्र अशाच मानल्या जात होत्या. मनुष्याचा देवतेपुढे बळी देणे ही गोष्ट आज आपणांस निंद्य वाटते; परंतु तसा बळी देणारा धार्मिक मनुष्य तसे करणे नीतिदृष्ट्या पूर्णपणे योग्य आहे असेच मानीत होता. उलटपक्षी, बळी देणे हे नैतिकदृष्ट्या अयोग्य आहे असे ज्यास वाटते असा मनुष्य, ते कृत्य धार्मिक आहे असे मुळीच म्हणणार नाही. सारांश, नीती व धर्म यांमध्ये जरी बाह्यतः विरोध दिसला तरी तो विरोध जाणूनबुजून उत्पन्न केलेला नसून, त्याचे कारण मूळ धार्मिक कल्पनाच चुकीची असते हे होय. जी गोष्ट देवास प्रिय आहे ती नीतिदृष्ट्या मुळीच अयोग्य ठरत नाही; उलट, जी गोष्ट अनैतिक आहे ती देवास आवडणे शक्य नसल्यामुळे आपणही तशी गोष्ट मुळीच करता कामा नये, असा अन्योन्याश्रय धार्मिक मनष्याच्या मनामध्ये असतो. आपल्या नैतिक व धार्मिक कल्पना या एकमेकींशी सुसंबद्ध व एकमेकीस साह्यकरच असल्यास त्यांमध्ये मुळीच विरोध येणार नाही; परंतु ज्यावेळी धार्मिक कल्पनांच्या मानाने नैतिक कल्पनांची, अगर नैतिक कल्पनांच्या मानाने धार्मिक कल्पनांची समाजात विशेष वाढ होते त्या वेळी असा विरोध उत्पन्न होतो. हा विरोध नाहीसा करून, नीती व धर्म यांमध्ये पूर्ण एकतानता घडवून आणणे हीच मानवी उन्नतीची दिशा व ध्येय असले पाहिजे.

बौद्धधर्माकडे पाहिल्यास, ईश्वरावर अगर आत्म्याच्या अमरत्वावर विश्वास नसूनदेखील, नैतिक आचरणावर जोर दिलेला आढळून येतो. अशा रीतीने कोणत्याही आधाराशिवाय अगर ध्येयाशिवाय नीतिनिष्ठेचा पुरस्कार केलला दिसतो; परंतु एकतर बुद्धासच देव मानून ईश्वराची उणीव बौद्धांनी लवकरच भरून काढली व दुसरे असे की, निर्वाणाचा अर्थ कितीही निषेधात्मक घेतला तरी, चांगल्या वर्तनाने प्राप्त करून घेण्याची ती एक गोष्ट आहे अशीच त्यांची समजूत होती की नाही? सारांश, कोणत्या तरी प्रकारचे ध्येय असल्याखेरीज नीतिमत्तेस अर्थच उरत नाही. शिवाय, ज्या मानाने त्यांचे ध्येय अर्थशून्य, त्या मानाने यांची त्यावरील श्रद्धाही डळमळीत व वेदान्ताचा हल्ला परतविण्यास असमर्थ अशीच होती असे त्यांच्या इतिहासावरून दिसून येते. अशा रीतीने धार्मिक कल्पनांचा नैतिक कल्पनांवर व आचरणावर अत्यंत परिणाम होत असल्यामुळे, खऱ्या नैतिक उन्नतीस खऱ्या धार्मिक कल्पना असणे आवश्यक आहे. त्या कोणत्या ते आता आपणांस पाहावयाचे आहे.

आस्तिक्यबुद्धी हे धर्माचे मुख्य लक्षण आहे असे म्हणावयास हरकत नाही. वेदान्ताच्या दृष्टीने जरी परब्रह्म हे नीतिअनीतीच्या पलीकडे असले, तरी त्या परब्रह्माचे ज्ञान करून

घेण्यासाठीच, सर्व सद्गुणांचा आदर्श अशा सगुण ईश्वराचीच मनुष्यास अधिक गरज आहे हे आम्ही मागील प्रकरणात दर्शविलेच आहे. सगुणाच्या मदतीशिवाय निर्गुणाकडे पोहोचणे शक्य नसल्यामुळे, निर्गुण ब्रह्माचाच सगुण अवतार तो ईश्वर त्याच्या आधारानेच आपणास तो पल्ला गाठावयाचा आहे. अर्थात् तो आधार पोकळ नसून सत्य व आपली इच्छा परिपूर्ण करण्यास समर्थ असला पाहिजे असे मानणे प्राप्त आहे. अवताराच्या कल्पनेचे महत्त्व यातच आहे. शिवाय, कर्तव्याच्या तात्त्विक भावनेने प्रेरित होऊन नैतिक आचरण करणे शक्य असले तरी; ईश्वरावरील निष्ठेने व त्याची आज्ञा म्हणून कर्तव्य करण्यात कोणासही अधिक उत्साह व अधिक जबाबदारी वाटेल हे उघड आहे. केवळ ईश्वराकडून मिळणाऱ्या पारितोषिकाच्या आशेने, अगर त्याच्याकडून होणाऱ्या शिक्षेच्या भीतीने, सद्वर्तन करण्यात विशेष भूषण नाही हे खरे. परंतु अशा तऱ्हेचा नियंता अगर न्यायाधीश कोणीच नाही असे ज्यास वाटते, अशा मनुष्याची नीतिनिष्ठाही हळूहळू शिथिल होत गेल्यावाचून राहणार नाही. ईश्वरभक्तीपेक्षा देशभक्तीच अधिक श्रेष्ठ व अधिक विश्वासार्ह आहे असे कांटने म्हटले आहे. देशभक्तीची भावना कित्येक व्यक्तींच्या ठिकाणी परमावधीस पोहोचलेली दिसून येते व तिच्या योगाने कार्यही मोठे होते हे खरे आहे; परंतु ही भावना नेहमी नैतिक उन्नतीस पोषकच होईल अशी खात्री देता येत नाही. देशाचे हित ज्याप्रमाणे सन्मार्गाने त्याचप्रमाणे-किंबहुना त्याहूनही अधिक सुलभ रीतीने-कुमार्गाने होण्याचा संभव असतो. शिवाय, केवळ मानवजातीवरील प्रेमाखेरीज ज्यास दुसरा धर्मच नाही असा मनुष्य, इतरांच्या उच्च हितासाठी झटेल, तसाच त्यांच्या चैनीसाठी व ऐषारामासाठीही झटेल; परंतु देशाचे अगर मानवजातीचे हितदेखील एका विशिष्ट ध्येयाच्या व जबाबदारीच्या दृष्टीने केले पाहिजे असे ज्यास वाटते, असा मनुष्य मानवजातीच्या कल्याणासाठी तर झटेलच; परंतु त्यात आपल्या अगर इतरांच्या नैतिक उन्नतीस धक्का न पोहोचेल अशी खबरदारी घेईल. सारांश, आस्तिक्यबुद्धी ही नैतिक उन्नतीस आवश्यक व पोषकच असल्यामुळे, तशी श्रद्धा असलेला धार्मिक मनुष्य केवळ नैतिक मनुष्यापेक्षा अधिक आत्मविश्वासाने, उत्साहाने व जबाबदारीने आपले कर्तव्य करील.

आत्म्याच्या अमरत्वावरील विश्वास हे धर्मनिष्ठेचे दुसरे अंग म्हणता येईल. हा विश्वास निरनिराळ्या प्रकारचा व कमीअधिक उदात्त स्वरूपाचा असू शकेल. केवळ या जन्मीच्या सत्कृत्यांचे पारितोषिक मिळण्यासाठी पुढील जन्माची आवश्यकता भासणे हे कर्तव्यनिष्ठेपेक्षा सुखवादाचेच द्योतक होईल; परंतु पारितोषिकाची आशा ही प्रथमदर्शनी जितकी कुचकामाची अगर नीतिमत्तेस विघातक वाटते तितकी ती नाही हे थोड्या विचारांती कळून येईल. बक्षिसांच्या आशेने अभ्यास करणारा विद्यार्थी, अगर पुण्याच्या आशेने सद्वर्तन करणारा अडाणी मनुष्य यांस अनीतिमान म्हणता येईल काय? आणि असे अडाणी, अगर वयाने मोठे; परंतु बुद्धीने लहान, असेच लोक समजात अधिक आढळून येतात हे नाकबूल करता यावयाचे नाही. ज्याच्या बुद्धीचा पुरेसा विकास झाला आहे असा मनुष्य पुढील

जन्माकडे, या जन्मापेक्षा अधिक आत्मोन्नती करण्याची एक संधी, या दृष्टीने पाहील; परंतु हे तरी एक प्रकारचे पारितोषिकच नव्हे काय? आपल्या मरणाबरोबरच सर्व काही समाप्त होणार असल्यास, या क्षणभंगुर आयुष्यामध्ये नीती नीती करीत बसण्यापेक्षा चैन करणेच काय वाईट, असेच कोणीही म्हणेल. सारांश, नैतिक उन्नती ही पतंगाच्या दिव्याभोवतील धडपडीप्रमाणे निरर्थक व क्षणभंगुर नसून, तिची पूर्तता केव्हातरी झाल्यावाचून राहणार नाही असा विश्वास नसल्यास, नीतिमत्तेचे महत्त्व कमी झाल्यावाचून राहणार नाही. मनुष्याची शक्ती इतकी आकुंचित व ध्येय इतके अमर्याद आहे की, ते साध्य होण्यास एक जन्म पुरेसा होणे शक्यच नाही; परंतु आपल्या ध्येयाची महती व ते प्राप्त करून घेण्याची आवश्यकता ज्यास पूर्णपणे पटली अशा मनुष्यास, आपल्या शरीराबरोबरच ते गाठण्याची शक्यताही नाहीशी होणार हा विचार ईश्वराच्या अस्तित्वाविषयी अगर त्याच्या न्यायीपणाविषयी शंका घेण्यास लावील हे उघड आहे. सारांश, आत्म्याच्या अमरत्वावरील विश्वास हा नीतिनिष्ठेस व ईश्वरनिष्ठेस देखील आवश्यक आहे, व या दृष्टीनेही नीतिनिष्ठेस धर्मनिष्ठेचा पाठिंबा असणे आवश्यक ठरते.

वरील विवेचनात धर्मनिष्ठेस दिलेले महत्त्व व मानवी जीवितांत तीस दिलेले स्थान कित्येकांस अगदी चुकीचे व अन्यायाचे वाटते. धर्मनिष्ठा व नीतिनिष्ठा या दोन गोष्टी सर्वस्वी भिन्न असून त्यांचे कार्यही अगदी वेगवेगळे आहे असे त्यास वाटते. त्यांच्या मताप्रमाणे, नीती व अनीती या कल्पना केवळ मनुष्याचे अज्ञान दर्शविणाऱ्या, अगदी खालच्या दर्जाच्या व सापेक्ष असून ईश्वराचे दृष्टीने त्यास मुळीच किंमत नाही व याच दृष्टीने ईश्वरावर आरोपित केलेले न्यायीपणा, दयालुत्व इत्यादी सद्गुण आपल्या अज्ञानाचेच द्योतक होत, हे सिद्ध होते. ईश्वराच्या दृष्टीने पाहिल्यास जगात नीतीही नाही व अनीतीही नाही, व अर्थात् स्वतः ईश्वरासही नीतिमान अगर अनीतिमान काहीच म्हणता यावयाचे नाही. आपली बुद्धी कोती असल्यामुळे आपणास या जगात दुःख व अपूर्णता आहे असे वाटते व ती नाहीशी करण्यासाठी परोपकाराची अगर इतर सद्गुणांची आवश्यकता भासते; परंतु ही दृष्टी अगदी एकांगी व चुकीची असून, ईश्वरास व त्याने उत्पन्न केलेल्या सष्टीस कशाचीही गरज नाही हे ज्यास समजले आहे असा मनुष्य नीतीची अगर कर्तव्याची मुळीच काळजी न करता सुखात राहील हे उघड आहे.

ही विचारसरणी सर्वस्वी चुकीची व नीतिमत्तेस पूर्ण विघातक आहे, हे विशद करून सांगण्याची जरूर नाही. ईश्वर हाच सर्व नीतिमत्तेचा उगम व आदर्श आहे असे ज्यास वाटते, त्यास अर्थातच नैतिक उन्नतीची जबाबदारी वाटणे स्वाभाविक आहे. आपल्या नीतिअनीतीच्या कल्पना अद्यापि अपूर्ण आहेत-त्या तशा आहेत म्हणूनच नैतिक उन्नतीची आवश्यकता आहेव म्हणून, आपल्या नीतिअनीतीच्या कल्पना म्हणजेच ईश्वराच्या नीतिविषयक कल्पना असे मानणे चुकीचे आहे हे आम्हास मान्य आहे; परंतु आपल्या

नीतिविषयक कल्पना आपणांस चांगल्या वाटतात याच कारणासाठी त्या ईश्वराचे दृष्टीने सपशेल चुकीच्या व भ्रामक आहेत, असे ब्रॅडलेसाहेबांचे म्हणणे आहे. आम्ही प्रतिपादन केलेल्या दृष्टीप्रमाणे, आपली नीतिमत्ता परिपूर्ण नसली, तरी तिचीच पूर्तता ईश्वराचे ठिकाणी आहे व आपल्या आजच्या नैतिक उन्नतीपेक्षा अधिक; परंतु त्याच दिशेने उन्नती आपण करून घेतल्यास आपणांस ईश्वराची नीतिविषयक कल्पना व त्याची इच्छा फलद्रूप करता येईल, अशी आपली खात्री असते. सारांश, आपली नीतिमत्ता आदर्शभूत नसली तरी दिशा चुकलेली नाही असे आपण मानतो; परंतु ब्रॅडलेसाहेबांच्या मताप्रमाणे, आपले तार्किक विचार, सौंदर्यविषयक कल्पना व नीतिविषयक समजुती या सर्व पूर्णपणे भ्रामक असून, ईश्वराच्या या सर्व बाबतीतल्या कल्पना आपल्या अगदी उलट आहेत असे ठरते व ज्यास आपण सद्गुण सद्गुण म्हणून कवटाळतो ते सर्व ईश्वराच्या दृष्टीने अगदी निंद्य असे दुर्गुण आहेत हे सिद्ध होते. आपल्या विवक्षित नैतिक कल्पना ईश्वराच्या दृष्टीने चुकीच्या अगर अपूर्ण असू शकतील; परंतु वरील मताप्रमाणे सर्वच नीतिमत्ता ईश्वराच्या दृष्टीने चुकीची व त्याज्य ठरते. अशा रीतीने ईश्वराच्या नीतिविषयक कल्पना आपणाहून अगदी भिन्न, किंबहुना आपल्या अगदी उलट आहेत असे जर ब्रॅडलेसाहेबांस ज्ञान झाले असेल तर, त्यांच्या नेतृत्वाखाली आपण त्या कल्पनांचे ज्ञान करून घेऊन, उद्यापासून बरोबर आपल्या नीतितत्त्वांच्या उलट आचरण करण्यास सुरुवात केली असता, आपण ईश्वराची मर्जी ताबडतोब संपादन करू यात संशय नाही! अशा प्रकारचे ज्ञान आपणांस नाही, असे ब्रॅडलेसाहेबांचे म्हणणे असल्यास, आपल्या व ईश्वराच्या नैतिक कल्पना अगदी परस्परविरोधी आहेत असे विधान करण्यास त्यांस काय आधार आहे असे विचारता येईल. आपली नीतितत्त्वे अपूर्ण असली तरी ती आपल्या ध्येयाच्या दिशेस आहेत, त्याच्या विरुद्ध दिशेस नाहीत, असे ज्यास वाटते अशा मनुष्याची ईश्वरनिष्ठा अगर धर्मनिष्ठा ही त्याच्या नीतिनिष्ठेस विरोधी न होता पोषकच होईल; परंतु ज्याची ईश्वरावरील निष्ठा ही सर्व प्रकारच्या नीतिमत्तेस विरोधी अशा शक्तीवरील निष्ठा आहे असा मनुष्य नीतीपेक्षा अनीतीचाच मार्ग पत्करील हे उघड आहे. यासाठी, आपले ज्ञान व आपली नीती ईश्वराच्या ज्ञानाचे व नीतीचेच एक अपूर्ण स्वरूप आहे असा विश्वास खऱ्या धर्मनिष्ठेस व खऱ्या नीतिनिष्ठेस आवश्यक आहे. ब्रॅडलेसाहेबांच्या मताचा आम्ही विपर्यास करीत आहो असे कोणास वाटेल. ईश्वर हा नैतिक आहे असे म्हणणे 'त्याहूनही' चुकीचे आहे, अशी पुरवणी ब्रॅडलेसाहेबांनी आपल्या मतास जोडली आहे व अशा रीतीने ईश्वरास एकंदरीने पाहता नीतिमत्तेचे शिफारसपत्र दिले आहे हे खरे; परंतु आपल्या नीतिअनीतीच्या कल्पना जर सर्वस्वी भ्रामक असतील तर, ईश्वर एकंदरीने नैतिकच आहे, असे तरी म्हणण्यास आपणांस काय आधार आहे? सारांश, आपली नीतितत्त्वे भ्रामक अगर चुकीची नसून ती सर्वस्वी निरुपाधिक व ईश्वराच्या दृष्टीनेही सत्य आहेत असे मानणे प्राप्त आहे. ज्या सृष्टीत व ज्या ईश्वराचे दृष्टीने आपल्या ज्ञानास अगर नीतीस काहीच किंमत नाही, अशा सृष्टीतील व

अशा ईश्वराच्या छत्राखालील कोणताही मनुष्य धार्मिक राहणे शक्य नसून, तो शक्य तितक्या लवकर आत्मनाश व शक्य असल्यास अशा सृष्टीचा व अशा ईश्वराचाही नाश करण्याचीच इच्छा करील!

ही भीती काल्पनिक नसून, सुप्रसिद्ध जर्मन निराशावादी व्हॉन् हार्टमन यांनी अशा तऱ्हेचे मत प्रतिपादन केलेले आहे. सर्व सृष्टीचे व सर्व मनुष्यप्राण्यांचेही ध्येय, आपले अस्तित्व नाहीसे करणे हे होय, असे त्यांचे म्हणणे आहे. अर्थात् या मताप्रमाणे, नैतिक आचरणाच्या योगाने जगातील दुःख कमी करण्यापेक्षा, अनीतीने वागून ते वाढविल्यानेच ते ध्येय अधिक लवकर साधण्याचा संभव आहे हे उघड आहे; परंतु ही गोष्ट हार्टमन साहेबांस मान्य नसून, नैतिक उन्नतीच्या योगानेच ते ध्येय अधिक लवकर साध्य होईल असे ते म्हणतात; परंतु ही समजूतदेखील ईश्वराच्या दृष्टीने चुकीचीच असून, त्याचा हेतू नीतिमान मनुष्याच्या हातून जितका सफल होतो तितकाच तो अनीतिमान मनुष्याच्याही हातून होतो. तो हेतू वर सांगितल्याप्रमाणे सर्व विश्वाची व त्याचबरोबर नैतिक उन्नतीचीही समाप्ती करणे, हा होय. हार्टमनसाहेबांचे मत ब्रॅडलेसाहेबांच्या मतापेक्षा अधिक सुसंबद्ध आहे; कारण सृष्टीचे अस्तित्व हीच सर्वात वाईट गोष्ट असून, ती उत्पन्न करण्यात ईश्वरानेच अत्यंत मोठी चूक केली आहे हे मान्य केल्यास, अशा सृष्टीचे अस्तित्व दृढमूल करण्यापेक्षा ती सृष्टी नाहीशी करणे व त्याचबरोबर आपल्या नैतिक उन्नतीचीही समाप्ती करणे हे प्रत्येक मनुष्याचे कर्तव्य आहे असे ठरते. अशा तऱ्हेने आत्मनाश व सृष्टिनाश करण्याच्या प्रयत्नांस चांगले कसे म्हणता येईल, व तसा हेतू हृदयात बाळगणाऱ्या ईश्वराबद्दल मनुष्यास प्रेम कसे वाटेल, हे प्रश्न शिल्लक राहतातच; परंतु अशा रीतीने ईश्वराच्या व मनुष्याच्या ध्येयाबद्दल हार्टमनसाहेबांचे मत विचित्र असले तरी, धर्म व नीती यांचा संबंध कसा असावा हे त्यांस पूर्णपणे समजले आहे असे म्हणण्यास हरकत नाही. कारण, त्यांच्या मताप्रमाणे मनुष्याच्या नीतिमत्तेचे ध्येय तेच सर्व विश्वाचे व विश्वकर्त्याचेही ध्येय असल्यामुळे, मनुष्य आपल्या नैतिक आचरणाने सर्व विश्वधर्माचेच पालन करीत असतो हे सिद्ध होते. अशा रीतीने ब्रॅडलेसाहेबांच्या मतात दिसून येणारा धर्म व नीती यांमधील विरोध आपणांस हार्टमनसाहेबांच्या मतात दिसून न येता उलट त्यांची पूर्ण एकतानता झालेली दिसून येते.

आपल्या नीतिअनीतीच्या कल्पना ईश्वराच्या दृष्टीने सर्वस्वी चुकीच्या असल्या पाहिजेत असे सिद्ध करण्यास, पुष्कळ वेळा आपला कार्याकार्याचा निर्णय चुकतो, अगर कित्येक वेळी आपणांस काय करावे हे मुळीच समजत नाही, असे कारण प्रोफेसर टेलर यांनी शोधून काढले आहे! या आक्षेपास आम्ही मागील एका प्रकरणात उत्तर दिलेच आहे. कित्येक लहान मुलांना गुणाकाराचे तत्त्व समजत नाही म्हणून ज्याप्रमाणे गणितशास्त्राची सार्वत्रिकता अगर निरुपाधिता नाहीशी होत नाही, त्याचप्रमाणे आपल्या अपूर्णतेमुळे कित्येक वेळी आपले नैतिक निर्णय चुकले तरी, त्यावरून आपली सर्व नीतिमत्ता भ्रामक व चुकीची कशी

ठरते हे आम्हांस समजत नाही. सामान्य नीतितत्त्वे सार्वत्रिक असली तरी, कोणत्याही विशिष्ट बाबतीत त्यांची अंमलबजावणी ही त्या काळच्या परिस्थितीवर व इतर अनेक गोष्टींवर अवलंबून असते, व म्हणून सर्व नीतिमत्ता ही केवळ सापेक्ष आहे, असे टेलर साहेबांचे म्हणणे आहे. उदाहरणार्थ, जगात पुरुष व स्त्रिया असा भेद नसता, तर वैवाहिक नीतितत्त्वांची गरजच राहिली नसती हे उघड आहे; परंतु याहून निराळ्या सृष्टीत अगर सर्वस्वी निराळ्या परिस्थितीत नीतिनियम निराळे झाले असते अगर त्यांची जरूरच भासली नसती, यावरून या सृष्टीत व या परिस्थितीत जे नीतिनियम सर्वांना स्वतःप्रमाण वाटतात तेही सपशेल चुकीचे आहेत, असे अनुमान काढणे योग्य होईल काय? याच सृष्टीत, आपणांहून अगदी वेगळ्या परिस्थितीत जन्मास आलेल्या पशूना एकपत्नीव्रताचे महत्त्व समजत नाही, म्हणून मनुष्यानेही ते तत्त्व केवळ थोतांड आहे असे मानावयाचे काय? ईश्वराने याहून निराळी सृष्टी उत्पन्न केली असती तर तीतील नीतितत्त्वेही यांहून वेगळी ठरली असती, म्हणून त्याने उत्पन्न केलेल्या या सृष्टीतील नीतितत्त्वे केवळ मनुष्यनिर्मित अगर भ्रामक आहेत असे मानण्याचे मुळीच कारण नाही. प्रोफेसर टेलर म्हणतात त्याप्रमाणे सदसद्विवेकबुद्धी ही जर केवळ वैयक्तिक भावना असेल तर, ब्रॅडलेसाहेबांप्रमाणेच, ईश्वर हा एकंदरीने पूर्ण नैतिकच आहे, असे म्हणण्यास त्यांस काय आधार आहे? दुर्गुण हे आपण जितके वाईट समजतो तितकेच ते ईश्वराच्या दृष्टीने चांगले, म्हणजे सद्गुण आहेत असे टेलरसाहेब म्हणतात. अर्थात ब्रॅडलेसाहेबांप्रमाणेच टेलरसाहेबांसही ईश्वराच्या नीतितत्त्वांचे ज्ञान झाले असून त्यांची नीतितत्त्वे आपल्या अगदी उलट आहेत असे त्यांस समजले आहे असे दिसते! या मताप्रमाणे, ज्यास ईश्वराचे व सृष्टीचे खरे ध्येय समजले आहे असा खरा धार्मिक मनुष्य, शक्य तितके अनैतिक आचरण करून त्या ध्येयास मदत करील हे उघड आहे. सारांश, धर्मनिष्ठा व नीतिनिष्ठा अगदी परस्परविरोधी करून टाकण्याचा हा प्रयत्न आहे. यापेक्षा, ईश्वराची नीतितत्त्वे काय आहेत हे आपणांस मुळीच ठाऊक नाही "धर्मस्य तत्त्व निहितं गुह्यम्" व त्यांच्यांशी आपणांस काही कर्तव्यही नाही; आपणांस ज्या गोष्टी चांगल्या वाटतात त्या आपण करीत राहावे, ही कांटसाहेबांची विचारसरणी कितीतरी अधिक समंजसपणाची आहे; परंतु ज्यास या धर्मतत्त्वाचे ज्ञान झाले असा मनुष्य, ते तत्त्व नीतितत्त्वांस विरोधी आहे हे ठाऊक असताना, नीतिनिष्ठेस चिकटून राहणे शक्य नाही. धर्म व नीती यांमध्ये विरोध आहे असे ज्यांस वाटते ते अर्थात सर्व नीतिमत्ता भ्रामक व अहितकारक म्हणून एकदम सोडून देतील हे उघड आहे.

वरील विवेचनावरून हे दिसून येईल की, आपली नैतिक उन्नती ही ईश्वराच्या इच्छेस अगद सृष्टीच्या ध्येयास विरोधी नसून पोषकच आहे असे मानल्याखेरीज नीतिमत्तेस काहीच किंमत राहत नाही. खरा धर्म सृष्टीचे धारण करणे हा नसून तिला अधोगतीला नेत नेत शेवटी नाहीशी करणे हा होय, असा मानणारा निराशावाद हा नैतिक उन्नतीचा पुरस्कार करून त्या धर्मास विरोध करणार नाही. सारांश, धर्माचे रहस्य हे नीतिमत्तेच्या योगाने पूर्णतः नाही तरी

अंशतः तरी उकलणे शक्य आहे असे मानणे, व अशा रीतीने नीतिनिष्ठा हे धर्मनिष्ठेचे एक महत्त्वाचे अंग आहे असा विश्वास बाळगणे हाच धर्मनिष्ठा व नीतिनिष्ठा या दोन्ही सदैव जागृत व एकमेकींस साह्यकर अशा ठेवण्याचा खरा मार्ग आहे. जी नीतिमत्ता धर्मास पोषक होत नाही ती नीतिमत्ता जशी कुचकामाची ठरते, त्याचप्रमाणे ज्या धर्मात नीतिमत्तेचा अंतर्भाव होत नाही तो धर्मही कुचकामाचा आहे असे खुशाल समजावे.

अशा रीतीने धर्मनिष्ठा ही नीतिनिष्ठेस अनुकूल असली पाहिजे हे जरी खरे, तरी धर्मनिष्ठा म्हणजेच केवळ नीतिनिष्ठा नसून ती नीतिनिष्ठेहून अधिक व्यापक आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. खरा धार्मिक मनुष्य हा केवळ नैतिक आचरणात संतुष्ट राहत नाही, तर या अनंत विश्वातील गूढ सत्य शोधून काढण्याचाही निश्चय त्याच्या ठिकाणी असतो; नीतिनिष्ठेबरोबरच सत्यनिष्ठेसही त्याच्या हृदयात स्थान असते. त्यास, कांटने वर्णन केल्याप्रमाणे, आपल्या हृदयात वसत असलेल्या नैतिक थोरवीचा उगम म्हणून ईश्वराबद्दल आदर वाटतो, त्याचप्रमाणे आकाशातील ताऱ्यांचा, सर्व निसर्गसौंदर्याचा उगमही तोच म्हणून त्याबद्दल आत्यंतिक कुतूहल व प्रेम वाटते. सारांश, केवळ नीतिनिष्ठेहून व्यापक व जीत सृष्टीच्या गूढ तत्त्वाची जिज्ञासा, तिच्या अनंतत्वाबद्दल व सौंदर्याबद्दल निरपेक्ष आनंद व कुतूहल उचंबळून राहिलेले आहे अशी मनःप्रवृत्ती हीच खऱ्या धार्मिकतेची निशाणी होय. सामान्य मनुष्याची सत्यनिष्ठा अगर सौंदर्यनिष्ठा ही नीतीचे पाश तोडून अनीतीच्या मार्गांनी प्रकट होण्याचा संभव असतो; परंतु धार्मिक मनुष्य जसा सत्यनिष्ठ व सौंदर्यनिष्ठ तसाच तो नीतिनिष्ठही असल्यामुळे, तो आपले सत्यशोधन अगर सौंदर्यसेवन नेहमी नीतीच्या मर्यादेत ठेवतो, व अशा रीतीने आपल्या जीवनक्रमात नीतिनिष्ठेस प्रमुख स्थान देऊन तिच्या मर्यादेत इतर सर्व प्रकारच्या उन्नतीस वाव देतो. सारांश, आपल्या नीतिनिष्ठेच्या जोरावर सर्व प्राणिमात्रांची उन्नती करण्याचा यत्न करणारा, आपल्या सत्यनिष्ठेच्या जोरावर सर्व विश्वाचे गूढ उकलू पाहणारा, व त्याच्या अनंतत्वाची थोरवी गाण्यात तन्मय होऊन जाणारा, असा मनुष्यच खरा धार्मिक समजला पाहिजे. अशा मनुष्यास धर्मनिष्ठा व नीतिनिष्ठा यांत विरोध दिसत नाही. इतकेच नव्हे, तर नीतिमत्तेचा उगम तोच सर्व सृष्टीचा उगम, व नीतिमत्तेचे ध्येय तेच सृष्टीचेही कार्य, असे त्यास दिसून येते, व ते ध्येय गाठण्यासाठी तो आपले तनमनधन अर्पण करतो. या आत्मयज्ञातच सर्व नीतिनिष्ठेचे व धर्मनिष्ठेचे सार आहे.

○○○

प्रकरण १० वे

नीतिशास्त्र व आत्मस्वातंत्र्य

नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान यांचा परस्पर संबंध दर्शविताना आम्ही असे म्हटले की, नीतिशास्त्र हे कर्तव्याच्या जाणिवेवर व वैयक्तिक जबाबदारीवर रचलेले असल्यामुळे त्या शास्त्रास आत्मस्वातंत्र्याची अत्यंत गरज आहे; परंतु आत्मस्वातंत्र्याचे अर्थ अनेक होऊ शकतात व त्यास मर्यादाही अनेक असतात असेही आम्ही दर्शविले. प्रस्तुत लेखात त्या अर्थांचे व त्या मर्यादांचे सविस्तर विवेचन करून, खरे आत्मस्वातंत्र्य कशात आहे व नीतिशास्त्रास कोणत्या प्रकारच्या आत्मस्वातंत्र्याची गरज आहे हे निश्चित करण्याचे योजिले आहे. वास्तविक पाहता आत्मस्वातंत्र्याचा प्रश्न नीतिशास्त्राच्या कक्षेत पडण्यापेक्षा तत्त्वज्ञानाच्या कक्षेतच अधिक येतो; परंतु आत्मस्वातंत्र्य हे नीतिशास्त्राच्या आधारभूत तत्त्वांपैकी असल्यामुळे, तो आधार कोणत्या प्रकारचा व कितपत भक्कम आहे हे पाहणे नीतिशास्त्रास आवश्यक आहे.

सामान्यतः व्यावहारिकदृष्ट्या विचार करणाऱ्या कोणत्याही मनुष्यास, आपणांस आत्मस्वातंत्र्य आहे असेच वाटत असते, व या आत्मस्वातंत्र्याच्या मर्यादा ओळखल्यास हे मत ग्राह्य मानण्यास मुळीच हरकत नाही हे या लेखात दर्शविण्याचा विचार आहे; परंतु कोणत्याही मताचा अतिरेक करण्याची प्रवृत्ती मनुष्यस्वभावात असल्यामुळे, साध्या गोष्टी प्रस्थापित करतानाही अनेक अडचणींच्या व आक्षेपांच्या जाळ्यातून बाहेर पडावे लागते. वरील प्रवृत्तीस अनुसरून, मनुष्याचा आत्मा हा बाह्य परिस्थिती, आनुवंशिक संस्कार, स्वतःची शरीररचना अगर इतर कोणत्याही बंधनाने मुळीच बांधला गेलेला नसून, तो कोणतेही कर्म करण्यास पूर्णपणे स्वतंत्र आहे असे काही लोकांचे म्हणणे आहे; तर याच्या उलट, मनुष्यास अशा प्रकारचे आत्मस्वातंत्र्य मुळीच नसून, तो आनुवंशिक संस्कार इत्यादी उपरिनिर्दिष्ट गोष्टींनी, अगर (काही लोकांच्या मते) दैवयोगाने पूर्णपणे बांधला गेला आहे असे मत कित्येक लोक प्रतिपादन करतात. पहिल्या मताप्रमाणे, मनुष्य कोणतेही कर्म करण्यास

नेहमी स्वतंत्र असल्यामुळे, तो कोणत्यावेळी काय करील हे दुसऱ्या कोणासही-किंबहुना ज्याचे त्यासही-बिनचूक सांगता येणे शक्य नाही. एखाद्या मनुष्याचा स्वभाव, त्याचे शील व पूर्वीचे चारित्र्य ही सर्व कोणास माहीत असली तरी, पुढेही तो त्या शीलास अगर चारित्र्यास अनुसरून वागेलच असे कोणासही निश्चयात्मक रीतीने सांगता येणार नाही; कारण, तसे सांगता आल्यास, मनुष्याची भविष्यकाळाची सर्व कर्मे त्याच्या भूतकाळातील कर्मांच्या योगाने अगर स्वभावाच्या योगाने बांधलेली असतात असे म्हणावे लागेल व अशा रीतीने त्याच्या आत्मस्वातंत्र्यावर गदा येईल, अशी पहिले मत प्रतिपादन करणारांची विचारसरणी आहे. उलट, मनुष्याची सर्व कर्मे, त्याची शरीररचना व मनोरचना अगर स्वभाव, आनुवंशिक संस्कार, भोवतालची परिस्थिती इत्यादी गोष्टींनी पूर्णपणे बांधलेली असल्यामुळे, एखाद्या मनुष्याची मूळ प्रवृत्ती व त्याच्या भोवतालची परिस्थिती यांचे पूर्ण ज्ञान झाल्यास, त्याच्या भविष्यकाळच्या सर्व वर्तनाविषयी आपणास बिनचूक अनुमान करता येईल, असे दुसऱ्या मताप्रमाणे सिद्ध होते. दोन जुळ्या भावंडांस जन्मापासून अगदी सारख्याच परिस्थितीत ठेवल्यास मोठेपणी या दोघांचे स्वभाव या मताप्रमाणे एकसारखेच बनले पाहिजेत; परंतु पहिल्या मताप्रमाणे, त्यांपैकी एक साधू व दुसरा दरोडेखोर बनण्याचा तितकाच संभव आहे. सारांश, मनुष्याची परिस्थिती, संस्कार इत्यादी गोष्टींवरून त्याच्या पुढी वर्तनाविषयी कोणत्याही प्रकारचे अनुमान करता न येणे हे आत्मस्वातंत्र्याचे, व तशा प्रकारचे अनुमान बिनचूक करता येणे हे त्याच्या उलट मताचे म्हणजे बंधनवादाचे लक्षण आहे, असे वरील दोन्ही मते प्रतिपादन करणारांचे मत आहे असे दिसते.

वर दिलेले लक्षण बरोबर आहे असे घटकाभर गृहीत धरून बंधनवादाचे परीक्षण केल्यास, ते मत चुकीचे व आपल्या अनुभवाच्या उलट आहे असे दिसून येते. एकदा मनुष्य आपल्या हातून घडलेल्या चुकीबद्दल विचार करू लागल्यास, आपला पूर्वीचा स्वभाव व वागणूक लक्षात घेऊनदेखील, ती चूक करणे आपणास अपरिहार्यच होते असे समजत नाही. उलट, ती चूक करण्याची आपणास पूर्वी कितीही सवय असली तरी यापुढे ती चूक टाळणे आपणास शक्य आहे असेच तो म्हणतो. किंबहुना, अशा रीतीने आपले वर्तन सुधारणे हे जर शक्यच नसेल तर नीति-अनीतीविषयी विचार करण्यात काही अर्थच नाही असेच कोणीही म्हणेल. सारांश, मनुष्य आपल्या पूर्वकर्मांनी अगर स्वभावाने पूर्णपणे बांधला गेलेला नसून, आपला स्वभाव बदलणे त्यास शक्य आहे असा विश्वास प्रत्येक मनुष्यास असतो, व तो तसा असणे नीतिमत्तेच्या दृष्टीने आवश्यकही आहे.

मनुष्याच्या पूर्वस्वभावावरून त्याच्या पुढील वर्तनाविषयी अनुमान करता न येण्याचे दुसरे कारण असे की, कोणत्याही मनुष्याच्या स्वभावाचे पूर्ण ज्ञान होणे अगोदर कोणासच शक्य नसते, कारण मनुष्याच्या बाह्य वर्तनात त्याचा स्वभाव पूर्णपणे प्रकट होतो असे म्हणणे चुकीचे होईल. एखाद्या विशिष्ट परिस्थितीत मनुष्याचा जो स्वभाव दृष्टीस पडतो तोच स्वभाव

निराळ्या परिस्थितीत दृष्टीस पडेल असे नाही व एकाच परिस्थितीत मनुष्य नेहमी एकाच प्रकारचे आचरण करील असेही नाही. नव्याण्णव वेळा कीर्तन ऐकून कोरडा राहिलेला मनुष्य शंभरावे कीर्तन ऐकताच संन्यास घेण्यासही उद्युक्त होईल, व या त्याच्या परिवर्तनास काही बाह्य कारणच झाले पाहिजे असे नाही. स्वभाव म्हणजे केवळ भूतकाळातील वर्तनात प्रकट झालेला स्वभाव असा त्याचा अर्थ नसून, आपल्या वर्तनास सर्वस्वी निराळी दिशा लावण्याची शक्तीही त्यात सुप्त रीतीने वास करीत असल्यामुळे, स्वभावपरिवर्तन बंधनवादास अमान्य करता येत नाही. मनुष्याच्या स्वभावात कितीही परिवर्तन झाले तरी त्याचे स्वत्व कायम राखणाऱ्या इतर नेक गोष्टी त्याच्या ठिकाणी असतात. अशा रीतीने मनष्याचे स्वत्व कायम राखनही त्याच्या स्वभावात परिवर्तन होऊ शकते ही अनुभवाची गोष्ट असल्यामुळे, केवळ पूर्वीच्या वर्तनावरून पुढील अनुमान करता येणे अशक्य आहे हे सिद्ध होते व अर्थात या लक्षणावर बंधनवादाची इमारत असल्यास ती कोसळून पडते.

परंतु अशा रीतीने मनुष्याच्या पुढील वर्तनाविषयी बिनचूक अनुमान करणे शक्य नसले तरी, तसे अनुमान मुळीच न करता येणे यातच आत्मस्वातंत्र्याचे रहस्य आहे असे मानणे तितकेच चुकीचे आहे. मनुष्याचे वर्तन हे सर्वस्वी त्याच्या पूर्वस्वभावाने बांधले गेले नसले तरी, तसे ते मुळीच बांधलेले नाही असे म्हणणे म्हणजे, कोणत्याही मनुष्यास स्वतःचे असे निश्चित शील अगर चारित्र्यच नाही असे म्हणण्यासारखे आहे. या अर्थाने केवळ लहरीपणा हेच आत्मस्वातंत्र्याचे लक्षण आहे असे मानावे लागेल; परंतु अशा रीतीने पदोपदी विसंगत वर्तन करणाऱ्या मनुष्यास स्वतंत्र म्हणण्यापेक्षा भ्रमिष्ट म्हणणेच अधिक योग्य होईल. शेकडा नव्याण्णव गोष्टी मनुष्य आपल्या स्वभावानुसार व परिस्थित्यनुसार करीत असला तरी, शंभराव्या बाबतीत त्याला या दोन्हीचेही दडपण झुगारून देऊन त्याविरुद्ध आचरण करण्याचे सामर्थ्य आहे एवढे सिद्ध झाले की, आत्मस्वातंत्र्य सिद्ध झाले म्हणून समजावे. ते सिद्ध करण्यास नेहमी आपल्या स्वभावाशी अगर परिस्थितीशी विसंगत वर्तनच करीत राहिले पाहिजे असे नाही, कारण तोही एक प्रकारचा स्वभावच होईल! सारांश, मनुष्याचा स्वभाव व त्याची परिस्थिती यांबरोबरच त्याचे आत्मस्वातंत्र्य लक्षात घेऊन, त्याच्या वर्तनाविषयी बिनचूक नसले तरी साधारण अनुमान काढणे शक्य असल्यामुळे, तसे अनुमान बिनचूक काढता येणे हे जसे बंधनवादाचे खरे लक्षण नव्हे, त्याचप्रमाणे ते मुळीच काढता न येणे हे आत्मस्वातंत्र्याचे लक्षण मानणे योग्य होणार नाही.

आत्मस्वातंत्र्याचे दुसरे एक चुकीचे लक्षण बंधनवादी लोकांकडून पुढे आणण्यात येते, व ते लक्षण चुकीचे असल्यामुळे आत्मस्वातंत्र्याचे तत्त्व चुकीचे आहे असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जातो! आत्मस्वातंत्र्य मान्य करणे म्हणजे कोणत्याही हेतुविरहित अगर प्रेरणारहित आचरण करणे शक्य आहे असे मानण्यासारखेच आहे, असे बंधनवादाचे म्हणणे आहे. मनुष्याचे वर्तन हे त्याला जी प्रेरणा होईल तिजवर अगर त्याच्या हेतूवर अवलंबून

असल्यामुळे, मनुष्य आपल्या स्वतःच्या हेतूंनी अगर प्रेरणांनी बांधला गेलेला असतो असे मानण्यास हरकत नाही. अर्थात् आत्मस्वातंत्र्य मान्य करणे म्हणजे हे बंधन नाकारणे, व मनुष्य कोणत्याही प्रकारच्या हेतूशिवाय अगर प्रेरणेशिवाय आचरण करू शकतो असे म्हणण्यासारखेच आहे. आत्मस्वातंत्र्यवादी मनुष्य असे विधान करीत असल्यास ते सर्वस्वी चुकीचे आहे हे उघड आहे; परंतु आत्मस्वातंत्र्याचा अर्थ हेतुरहित अगर प्रेरणारहित आचरण करण्याची शक्ती असा मुळीच नव्हे व आत्मस्वातंत्र्यवादी मनुष्य तसा अर्थ कधीच करीत नाही. मनुष्य जे काही करतो ते आपल्या हेतूप्रमाणे अगर इच्छेप्रमाणेच करीत असतो व एखादे वेळी निरनिराळ्या व परस्परविरोधी हेतूंचा त्याच्या मनात झगडा सुरू झाल्यास त्या सर्व प्रेरणांमध्ये जी प्रेरणा बलिष्ठ ठरेल त्या प्रेरणेप्रमाणेच त्याच्या हातून वर्तन होते, या सर्व गोष्टी बंधनवादाप्रमाणेच आत्मस्वातंत्र्यवादासही मान्य आहेत. फरक आहे तो या हेतूंच्या अगर प्रेरणांच्या स्वरूपाबद्दल आहे. मनुष्याचे मन हे स्वतः अगदी कर्तृत्वशून्य, एखाद्या मेणाच्या तबकडीप्रमाणे असून, त्याचे हेतू हे जसे काही तिजवर बाहेरून आपले आघात करीत असतात व अशा रीतीने मनुष्यावर आपला अंमल अगर जुलूम गाजवीत असतात, असे बंधनवादाचे म्हणणे आहे. अशा त-हेने मनुष्य व त्याचे हेतू हे दोन्ही अगदी वेगवेगळे असून, जडसृष्टीतील एखाद्या स्थिर पदार्थास दुसऱ्या हलणाऱ्या पदार्थाने लोटावे त्याप्रमाणे मनुष्याचे हेतू हे त्यास हवे तिकडे लोटीत असतात, असे शब्दचित्र डोळ्यांपुढे मांडून बंधनवादी पक्ष आपली सत्यता प्रस्थापित करण्याचा यत्न करतो; परंतु मनुष्य व त्याचा हेतू यांमध्ये अशा प्रकारचा भेद करणे हे सर्वस्वी चुकीचे आहे. मनुष्याचे हेतू हे कोणत्याही प्रकारे बाह्य नसून मनुष्यच त्या हेतूंचा जनक आहे, व त्या हेतूंमध्ये एखादे वेळी झगडा सुरू झाला तरी मनुष्य हा त्या युद्धाकडे एखाद्या प्रेक्षकाप्रमाणे पाहत नसून तोच त्या तंट्यातील न्यायाधीश असतो हे लक्षात ठेवले पाहिजे. सारांश, मनुष्य आपल्या स्वतःच्या हेतूंनी अगर इच्छेने बांधला गेला आहे असे म्हणणे म्हणजे तो पूर्णपणे स्वतंत्र आहे असे मान्य करण्यासारखेच आहे.

वरील विवेचनावरून आत्मस्वातंत्र्याचा अर्थ हेतुरहित अगर प्रेरणारहित आचरण करण्याचे स्वातंत्र्य अगर शक्ती असा नव्हे हे दिसून येईल. त्याचप्रमाणे आत्मस्वातंत्र्याच्या दुसऱ्याही एका चुकीच्या अर्थाचे दिग्दर्शन या ठिकाणी करणे जरूर आहे. जी कृत्ये आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला अनुसरून केली जातात तेवढ्यापुरताच मनुष्य स्वतंत्र असतो, असे कांटचे म्हणणे आहे. कारण वाईट गोष्टी करणारा मनुष्य आपल्या कुवासनांचा गुलाम बनत असल्यामुळे, चांगला मार्ग दिसत असतानाही त्यास तो अंगिकारिता येत नाही; परंतु सद्वर्तन करीत असताना अशा प्रकारचा विरोध मुळीच उत्पन्न होत नसन मनष्य आपल्या इच्छेप्रमाणेच सर्व काही करीत असतो. म्हणन सद्वर्तनापुरते मात्र मनुष्यास आत्मस्वातंत्र्य असून दुष्कर्मापुरता तो परतंत्र असतो, असा कांटचा सिद्धांत आहे; परंतु हा अर्थ चुकीचा

आहे असे आम्हास वाटते. दुर्गुणी मनुष्य हा जर आपल्या सद्भावनांचा गुलाम असतो असे का म्हणू नये? शिवाय, दुर्गुणी मनुष्यास जसे आपल्या सद्सद्विवेकबुद्धीशी झगडावे लागते त्याचप्रमाणे सद्गुणी मनुष्यास आपल्या कुवासनांशी झगडावे लागते. सारांश, मनुष्य जोपर्यंत आपल्या सद्सद्विवेकबुद्धीच्या आज्ञेप्रमाणे वागतो तोपर्यंतच त्यास आत्मस्वातंत्र्य आहे असे म्हणणे म्हणजे, तुरुंगाचे आत जोपर्यंत कैदी आहे तोपर्यंत तो मोकळाच आहे असे म्हणण्यासारखेच आहे! यासाठी, खरे आत्मस्वातंत्र्य म्हणजे चांगल्या अगर वाईट, दोन्ही प्रकारच्या गोष्टी करण्याचे सारखेच स्वातंत्र्य, असा त्याचा अर्थ केला पाहिजे. स्वातंत्र्य म्हणजे केवळ चांगल्या गोष्टी करण्याचेच स्वातंत्र्य असे म्हणणे म्हणजे आत्मविरोधी विधान करणे होय. स्वातंत्र्य हे जसे चांगल्या गोष्टी करण्याचे तसेच वाईट गोष्टी करण्याचेही असले पाहिजे, तरच चांगल्या गोष्टी करण्याबद्दल भूषण व वाईट गोष्टी करण्याबद्दल दूषण मनुष्यास लावता येईल; नाही तर, वर सांगितलेल्या अर्थाप्रमाणे, वाईट गोष्टी करणारा मनुष्य तेवढ्यापुरता परतंत्रच असल्यामुळे त्याबद्दल त्याला दोष देता येणार नाही.

वरीलप्रमाणे आत्मस्वातंत्र्याचा खरा अर्थ निश्चित केल्यावर, आपणास त्या आत्मस्वातंत्र्यास काही मर्यादा आहेत की नाहीत व असल्यास त्या कोणत्या. याचे निरीक्षण करता येईल. तसे करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे, आत्मस्वातंत्र्य विरुद्ध पुढे आणण्यात येणाऱ्या आक्षेपांचा विचार करून त्यातील सत्यांश शोधून काढणे हा होय. तसे केल्याने परिपूर्ण आत्मस्वातंत्र्यवादातील दोषही आपणांस आपोआप आढळून येतील. हे आक्षेप सामान्यतः दोन प्रकारचे आहेत, आध्यात्मिक व भौतिक. प्रथम आपण भौतिक आक्षेपांचा विचार करून नंतर आध्यात्मिक आक्षेपांकडे वळू.

पहिला आक्षेप उत्क्रांतितत्त्ववादी लोकांकडून आणला जातो, व त्या शास्त्राच्या प्रगतीबरोबरच या आक्षेपास विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मनुष्याच्या वर्तनावर त्याच्या आनुवंशिक संस्कारांचा व भोवतालच्या परिस्थितीचा बराच परिणाम होतो हे नाकबूल करता यावयाचे नाही. आईबापांचे अगर इतर निकट आप्तांचे देखील पुष्कळसे गुण मुलांमध्ये उतरतात, व म्हणून एखादा चांगल्या घराण्यातील मनुष्य वाईट निघाल्यास आपण त्यास जितका दोष देऊ तितका एखाद्या पिढीजाद दरोडेखोरास देत नाही; परंतु अशा रीतीने आनुवंशिक संस्कारांचा व परिस्थितीचा मनुष्यावर बराच परिणाम होतो हे खरे असले तरी, मनुष्य त्या गोष्टींना पूर्णपणे बांधला गेलेला आहे, व म्हणून एखाद्या मुलाच्या आनुवंशिक संस्कारांचे, परिस्थितीचे पूर्ण ज्ञान झाल्यास त्याच्या वर्तनाविषयी आपणांस बिनचूक अनुमान करता येईल असे जे काही बंधनवादी लोक विधान करतात ते मात्र सर्वस्वी निराधार आहे; परंतु मनुष्यावर आनुवंशिक संस्कार व परिस्थिती यांचा परिणाम होतो ही गोष्ट निर्विवाद असल्यामुळे, परिपूर्ण आत्मस्वातंत्र्याचे तत्त्व त्या योगाने थोडेसे मर्यादित होते यात संशय नाही.

दुसरा आक्षेप मानसशास्त्राच्या व शरीरशास्त्राच्या प्रगतीमुळे पुढे आला आहे. त्या शास्त्रांच्या वाढीमुळे, मनुष्याचे मन व त्याचा मेंदू आणि इतर मज्जातंतू यांचा परस्परसंबंध किती निकट आहे हे आपणास कळून आले आहे; व याच दिशेने अधिक प्रयत्न करून, मनुष्याच्या मेंदूची आपण पूर्ण माहिती करून घेतल्यास, मनुष्याच्या वर्तनाची सर्व मीमांसा आपणास त्या माहितीच्या जोरावर करता येईल, उदाहरणार्थ, कालिदासाच्या मेंदूची व एकंदर मज्जातंतूंची जर कोणास पूर्ण माहिती असती तर त्याने पुढे लिहिलेली नाटके त्यास अगोदरच अक्षरशः सांगता आली असती, असे काही साहसी मानसशास्त्रवेत्त्यांचे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे असेल तर अर्थातच मनुष्यास आत्मस्वातंत्र्य नसून तो आपल्या विशिष्ट मेंदूच्या व मज्जातंतूंचया योगाने पूर्णपणे बांधलेला आहे हे सिद्ध होईल; इतकेच नव्हे तर, मनुष्याच्या मनास स्वतंत्र असे अस्तित्वच नसून, मन ही केवळ मज्जातंतूंच्या हालचालीतून कार्यरूपाने उत्पन्न होणारी लाट आहे असे म्हणावे लागेल; परंतु एक तर, मेंदूच्या रचनेवरून पुढील वर्तनाबद्दल वर सांगितल्याप्रमाणे बिनचूक अनुमान करणे मुळीच शक्य नाही हे कोणासही सहज दिसून येईल; व दुसरे असे की, मन व मेंदू यांचा संबंध पूर्णपणे एकांगी आहे असे वरील मत प्रतिपादन करणारे लोक गृहीत धरतात; परंतु ही समजूत अगदी चुकीची आहे. मेंदूचा मनावर जितका परिणाम होतो तितकाच-किंबहुना अधिकच-परिणाम मनाचा मेंदूवर व एकंदर शरीरावर होतो. मेंदू अगर शरीर थकले असता ज्याप्रमाणे मन काम करीत नाही, त्याचप्रमाणे भीती, दुःख इत्यादी मानसिक व्याधीमुळे शरीरातही उत्साह असतो, हे विसरता कामा नये.

परंतु अशा रीतीने मनुष्य आपल्या मेंदूच्या व एकंदर शरीररचनेच्या योगाने पूर्णपणे बांधला गेला आहे असे म्हणणे सर्वस्वी चुकीचे असले तरी, या मतातही थोडा तथ्यांश आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. मनुष्याच्या मेंदूच्या व एकंदर शरीराच्या रचनेचा त्याच्या स्वभावावर बराच परिणाम होतो, व निरनिराळ्या देशांतील अगर निरनिराळ्या काळच्या लोकांच्या मेंदूंची रचना भिन्न असल्यामुळे त्यांच्या स्वभावात फरक पडतो, हे सूक्ष्म दृष्टीने पाहणारास दिसून येईल. उदाहरणार्थ, इंग्रज लोकांपेक्षा इटालियन लोकांच्या मेंदूची रचना थोडी भिन्न असल्यामुळे ते लोक इंग्रज लोकांपेक्षा अधिक भावनाप्रधान व सौंदर्यसेवक असतात असे आढळून येते. मनुष्य सोडून इतर प्राण्यांकडे वळल्यास तर त्यांच्या मेंदूची रचना व त्यांची एकंदर बुद्धी यातील परस्परसंबंध आपणास फारच स्पष्ट रीतीने दिसून येतो. त्याचप्रमाणे शरीराच्या उत्क्रांतीबरोबर मेंदूच्या रचनेत व मेंदूच्या रचनेबरोबर मनोरचनेत फेरबदल होत जाणे हे अगदी स्वाभाविक आहे. शिवाय, एखाद्या मनुष्याच्या डोक्यास जखम होऊन अगर अन्य रीतीने त्याच्या मेंदूस काही विकृती झाल्यास त्याच्या स्वभावातही मोठा फरक पडतो, किंबहुना त्यास वेडही लागते, हे आपण पाहतो. सारांश मनुष्याचे बौद्धिक व नैतिक वर्तन हे अशा रीतीने त्याच्या मेंदूच्या रचनेवर पूर्णतः नाही तरी अंशतः अवलंबून असल्यामुळे, त्यायोगाने त्याचे आत्मस्वातंत्र्य थोडेसे मर्यादित होते हे मान्य केले पाहिजे..

तिसरा आक्षेप, आत्मस्वातंत्र्य मान्य केल्यास, ते तत्त्व सर्व सृष्टीत लागू पडणाऱ्या कार्यकारणभावाच्या तत्त्वास विरोधी होते हा होय. कारणाशिवाय कोणतेही कार्य होत नाही हा सिद्धांत सर्व सृष्टीत अबाधित असल्यामुळे, मनुष्याची सर्व कर्मेही त्याच तत्त्वानुसार होत असली पाहिजेत; म्हणजे मनुष्याच्या प्रत्येक कर्मास त्याच्या आधीचे कर्म कारणीभूत असले पाहिजे. अशा रीतीने मनुष्य कार्यकारणभावाच्या चक्रात सापडला म्हणजे त्या चक्रातून बाहेर पडून आपले आत्मस्वातंत्र्य दर्शविण्यास त्यास वाव कोठून मिळणार?

या आक्षेपाचे निरसन करणे फारसे कठीण नाही. इतर सर्व गोष्टींप्रमाणेच मनुष्याच्या प्रत्येक कर्मासही काहीतरी कारण असते हे खरे आहे; परंतु हा कार्यकारणसंबंध जडसृष्टीतील कार्यकारणसंबंधाहून सर्वस्वी निराळा आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. एखाद्या चेंडूच्या एका क्षणाची गती ही त्याच्या तत्पूर्वीच्या क्षणाच्या गतीचा परिणाम असते, व अशा रीतीने त्या चेंडूस प्रथम जी गती मिळाली असेल तीच त्याच्या पुढील सर्व गतींचे कारण होय असे म्हणता येते; परंतु अशा तऱ्हेचा यांत्रिक कार्यकारणसंबंध मनुष्याच्या कर्मामध्ये मुळीच नसतो. एखादी गोष्ट करण्यास मनुष्यास कितीही प्रबळ कारणे असली तरी, चेंडूस ज्याप्रमाणे आपणास मिळालेल्या गतीस विरोध करण्याचे यत्किंचितही सामर्थ्य नसते त्याप्रमाणे आत्म्याची गोष्ट नसून, तो त्या सर्व कारणांविरुद्ध आचरण करू शकतो; परंतु वरील मत मान्य केल्यास मनुष्य जन्मतःच जे कर्म करतो त्या योगानेच त्याच्या पुढील आयुष्यातील सर्व कर्मे बांधली जातात असे म्हणावे लागेल; परंत जडसष्टीतील कार्यकारणसंबंध व आत्मिक कार्यकारणसंबंध हे दोन्ही एकाच प्रकारचे नसल्यामुळे ही आपत्ती मनुष्यावर कोसळत नाही. इतकेच नव्हे तर, जडसृष्टी व मनुष्याचा आत्मा या दोन बाबतीतील कार्यकारणसंबंध एकमेकांच्या अगदी उलट आहे असे म्हणावयास हरकत नाही. कारण, वर दर्शविल्याप्रमाणे जडसृष्टीतील वस्तूंच्या क्रिया या तत्पूर्वीच्या क्रियांनी कारणीभूत झालेल्या असतात, तर मनुष्यांची कर्मे ही भविष्यकाळाकडे नजर देऊन केली जातात. मनुष्याच्या मज्जातंतूंची हालचाल हे त्याच्या कर्मांचे कारण, हे एका दृष्टीने खरे असले तरी, मनुष्याची इच्छा हेच त्या मज्जातंतूंच्या हालचालीचे कारण, हेही तितकेच खरे आहे. कोणतीही इच्छा झाली असता मनुष्य एकदम त्या प्रेरणेने वाहवून जात नाही, तर त्या इच्छेस वाव द्यावा की नाही व कितपत द्यावा हे ठरविण्याचे सामर्थ्य त्यास असते. सारांश, मनुष्याचा आत्मा हाच त्याच्या सर्व कृत्यांचे कारण असतो, व परिस्थिती अगर इतर बाह्य कारणे कितीही असली तरी, त्यांचा परिणाम त्याजवर एखाद्या यांत्रिक कारणाप्रमाणे होत नसून, ती कारणे आत्मसात करून अगर बाजूस सारून तो आपले वर्तन स्वतः ठरवीत असतो.

अशा रीतीने प्रत्येक मनुष्य कोणतेही कर्म करण्यास स्वतंत्र असून त्याच्या कर्माच्या बाबतीतील कार्यकारणसंबंध हा जडसृष्टीतील कार्यकारणसंबंधाहून अगदी वेगळा असल्यामुळे, कोणत्याही विशिष्ट मनुष्याच्या पुढील वर्तनाविषयी आपणास बिनचूक

अनुमान करता येणे शक्य नसले तरी, एकंदर समाजाच्या वर्तनाबद्दल सरासरीच्या तत्त्वानुसार आपण बरेच निश्चयात्मक अनुमान करू शकतो, व म्हणून मनुष्यास आत्मस्वातंत्र्य नसून तो सामाजिक नियमांनी बांधला गेला आहे, असा आक्षेप कित्येकांकडून आणला जातो. इतर शास्त्रे थकल्यावर गणितशास्त्राने आत्मस्वातंत्र्यावर आपले शस्त्र उगारावे हे उचितच आहे! एखादा मनुष्य अतिशय नियमित असला तरी त्याचे घड्याळ चूक असल्यास त्याच्या हातून अनियमित वर्तन होईल. अशा रीतीने एखाद्या विशिष्ट व्यक्तीचे वर्तन अनेक अनपेक्षित गोष्टींनी बदलण्याचा संभव असल्यामुळे त्याविषयी बिनचूक अनुमान करणे शक्य नसते; परंतु एकंदर समाजाची रचना बरीचशी स्थिर असल्यामुळे त्याविषयी आपणास सर्वस्वी नाही तरी सरासरीने बरेचसे बिनचूक अनुमान काढता येते. उदाहरणार्थ, मुंबईत दरवर्षी किती लोक अपघाताने मरतात अगर आत्महत्या करतात याविषयी आपणास सरासरीने बरेच निश्चित प्रमाण ठरवता येईल. एखाद्या गावापेक्षा दुसऱ्या गावात हे प्रमाण कमीअधिक असल्यास, अगर या सरासरीने काढलेल्या प्रमाणात एखादे वेळी एकदम मोठा बदल झाल्यास, या गोष्टींची मीमांसाही आपणास बरोबर करता येते. उदाहरणार्थ, एखाद्या वर्षी एखाद्या प्रांतातील लोकांच्या मृत्युसंख्येचे प्रमाण एकदम वाढल्यास, रोगराई, दुष्काळ, युद्ध यांपैकी एखादे त्या गोष्टीचे कारण आपणस शोधून काढता येते. एखाद्या वर्षी देशातील गुन्हेगारांची संख्या एकदम वाढल्यास, त्या गोष्टीचे कारण आपण केवळ आत्मस्वातंत्र्याच्या तत्त्वानुसार, म्हणजे त्या वर्षी पुष्कळ लोकांना गुन्हे करण्याची इच्छा झाली, असे देत नाही, तर त्या वर्षी उत्पन्न झालेल्या बेकारीत, अगर पोलीस शिपायांच्या विशेष दक्षतेत, आपणास त्या गोष्टीचे खरे कारण सापडते. पूर्ण आत्मस्वातंत्र्याच्या तत्त्वानुसार, एखाद्या वर्षी शेकडो लोकांनी आत्महत्या केली व त्याच्या पुढील वर्षी एकाही व्यक्तीने केली नाही, असे आढळून येण्यास काही हरकत असू नये; परंतु असे आपणास आढळून येत नाही. इतकेच नव्हे, तर उलट आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाण बरेचसे निश्चित करता येते; व सामाजिक परिस्थितीचे यथार्थ ज्ञान झाल्यास हे प्रमाण सर्वस्वी बिनचूक काढता येईल असे म्हणण्यास हरकत नाही. यावरून, प्रत्येक व्यक्तीस आत्मस्वातंत्र्य असले तरी समाजास ते नाही, असे सिद्ध होत नाही काय?

वरील लांबलचक आक्षेपाचे सार काढावयाचे झाल्यास इतकेच म्हणता येईल की, प्रत्येक मनुष्य कोणतेही कर्म करण्यास स्वतंत्र असला तरी त्याच्या आचारविचारांवर त्याच्या सभोवतालच्या परिस्थितीचा व सामाजिक चालीरितींचा बराच परिणाम होतो; परंतु वरील आक्षेपांतच नमूद केल्याप्रमाणे, सामाजिक परिस्थितीचे व चालीरीतींचे आपणास यथार्थ ज्ञान झाले तरी, कोणताही विशिष्ट मनुष्य त्या गोष्टींना अनुसरून वागेलच, असे आपणास निश्चयात्मक रीतीने मुळीच सांगता येणार नाही. एखादा मनुष्य सामान्यतः आपल्या स्वभावानुरूपच वर्तन करतो म्हणून ज्याप्रमाणे तो आपल्या स्वभावाचे योगाने पूर्णपणे

बांधला गेला आहे असे म्हणता येत नाही, त्याचप्रमाणे, समाजातील व्यक्ती सामान्यतः त्यातील चालीरीतींना व परिस्थितीला अनुसरून आचरण करीत असल्या तरी, त्या त्यायोगाने बांधल्या गेलेल्या असतात असे म्हणणे चुकीचे होईल. त्या आपल्या स्वेच्छेनेच सामाजिक परिस्थितीस अनुसरून वागत असतात, आणि योग्य वाटल्यास त्याविरुद्ध आचरण करतात, हे समाजात जी प्रगती व कित्येक वेळा क्रांतीही होते त्यावरून सहज दिसून येईल; परंतु अशा रीतीने मनुष्य सामाजिक बंधनांनी पूर्णपणे बांधला गेलेला नसला तरी त्याजवर भोवतालच्या परिस्थितीचा व त्यास समाजाकडून मिळालेल्या शिक्षणाचा अत्यंत परिणाम होतो व समाजातील आचारविचारांप्रमाणेच त्याचे आचारविचार बनून जातात ही गोष्ट खरी असल्यामुळे, मनुष्याचे आत्मस्वातंत्र्य याही गोष्टीने थोडेबहुत मर्यादित होते हे मान्य केले पाहिजे.

येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून, मनुष्यास आत्मस्वातंत्र्य असले तरी ते सर्वस्वी निरुपाधिक नसून, सभोवतालची परिस्थिती, आनुवंशिक संस्कार, त्याच्या मेंदूची रचना इत्यादी गोष्टींनी मर्यादित असते, हे दिसून येईल; परंतु अशा तऱ्हेच्या मर्यादित आत्मस्वातंत्र्यावर नीतिशास्त्राची इमारत उभी करणे शक्य नसून, नीतिमत्तेस सर्वस्वी परिपूर्ण आत्मस्वातंत्र्याचीच गरज आहे, असे काही लोकांचे म्हणणे आहे. मनुष्य जन्मतःच काही आनुवंशिक संस्कार बरोबर घेऊन येतो व त्याच्या मनावर पुढे सभोवतालच्या परिस्थितीचा परिणाम होतो, या गोष्टी ते नाकबूल करीत नाहीत; परंतु अशा रीतीने जन्मतःच प्राप्त झालेल्या सुसंस्कारांमुळे अगर भोवतालच्या अनुकूल परिस्थितीमुळे किंवा सुशिक्षणामुळे हातून घडलेल्या सद्वर्तनास नैतिकदृष्ट्या बिलकूल किंमत नाही, कारण अशा वर्तनात त्याचे आत्मस्वातंत्र्य प्रकट होत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. नैसर्गिक प्रवृत्ती, परिस्थिती इत्यादी सर्व गोष्टींचा परिणाम वगळून, केवळ निर्भेळ आत्मस्वातंत्र्यामुळे जे वर्तन मनुष्याचे हातून घडेल त्यासच नैतिकदृष्ट्या महत्त्व आहे; एरव्ही आनुवंशिक संस्कारांमुळे अगर शिक्षणामुळे मनुष्याच्या हातून कितीही चांगले वर्तन झाले तरी, ते एक प्रकारे वरील गोष्टींच्या बंधनामुळेच झाले असल्यामुळे, त्यास काहीइतकेही नैतिक महत्त्व देता येत नाही, असे ते म्हणतात. वरीत मत ग्राह्य मानल्यास, चांगल्या संस्कारांमुळे व शिक्षणामुळे एखादा मनुष्य साधू, व वाईट संस्कारांमुळे व कुसंगतीमुळे दुसरा एखादा मनुष्य अनीतिमान बनल्यास, त्या दोघांना नैतिकदृष्ट्या सारख्याच योग्यतेचे मानणे जरूर आहे.

वरील विचारसरणी कोणाही विचारी मनुष्यास पटेलसे आम्हास वाटत नाही. अगोदर, कोणत्याही मनुष्याच्या वर्तनात आनुवंशिक संस्कार, परिस्थिती इत्यादी गोष्टींचा भाग किती व केवळ त्याच्या निर्भेळ आत्मस्वातंत्र्याचा भाग किती हे ठरवणे अत्यंत कठीण, किंबहुना अशक्यच आहे; परंतु असे ठरविणे शक्य आहे असे घटकाभर धरून चालले तरी, आपण त्याच्या वर्तनास जी किंमत देतो ती केवळ या आत्मस्वातंत्र्याच्या भागासच देतो

असे नाही. उदाहरणार्थ, ज्या मनुष्याचा पूर्वेतिहास आपणास मुळीच माहीत नाही अशा एखाद्या मनुष्याशी आपली गाठ पडली, व तो अगदी प्रामाणिक, सच्छील व एकंदरीने सर्वगुणसंपन्न आहे असे आपणास आढळून आले तर अशा मनुष्याविषयी आपणास अत्यंत आदर वाटेल हे उघड आहे. परंतु नंतर एखादे वेळी त्याने आपला पूर्वेतिहास आपणास सांगितल्यास, व त्यावरून, त्याच्या पूर्वीच्या अनेक पिढ्या त्याच्याचप्रमाणे सच्छील असून त्याला सद्वर्तनाचे बाळकडू व शिक्षण एकसारखे मिळत गेले आहे असे आपणास आढळून आल्यास, आपला त्याजविषयीचा आदर एकदम नाहीसा होईल काय? अर्थात् अशा वेळी त्याच्या सद्वर्तनाचे श्रेय आपण सर्वस्वी त्यासच देणार नाही हे खरे आहे; परंतु ते श्रेय पूर्णपणे त्याजपासून आपण हिरावून घेणार नाही हेही तितकेच खरे आहे. आनुवंशिक संस्कार, अनुकूल परिस्थिती व शिक्षण या गोष्टींमुळे तो सच्छील बनला हे खरे असले तरी त्या गोष्टी अनुकूल नसत्या तर तो याहून कमी प्रतीचा, किंवा कदाचित अनीतिमान बनण्याचाही संभव होता, म्हणून आपण त्याच्या नैतिक आचरणास मुळीच किंमत नाही असे समजतो काय? व्यक्तीच्या चांगुलपणाबद्दल आपणास जसा आदर वाटतो तसाच तो त्यावर अनुकूल संस्कार करणाऱ्या त्याच्या पूर्वजांबद्दलही वाटतो. दुसरे उदाहरण द्यावयाचे तर एखाद्या मनुष्याच्या नैतिक परावर्तनाचे देता येईल. एखादे वेळी सहजगत्या घडून आलेल्या एखाद्या अगदी बाह्य कारणानेदेखील एखाद्या मनुष्याच्या आयुष्यात मोठी क्रांती घडून येते. एखादे कीर्तन ऐकल्याने, एखाद्या संकटातून वाचल्याने अगर आजारीपणामुळे देखील एखादा अनीतिमान व नास्तिक मनुष्य एकदम सच्छील व धार्मिक बनून जातो. अशा वेळी, त्याच्या आयुष्यात तसा चुकून आलेला प्रसंग घडून आला नसता तर तो पूर्वीप्रमाणेच अनीतिमान राहिला असता, म्हणून त्याच्या परिवर्तनाचे त्याला स्वतःला बिलकूल श्रेय नाही असे म्हणणे निष्ठुरपणाचे होईल. वाल्या कोळ्याची चुकून नारदाशी गाठ पडली नसती तर तो वाल्मीकी ऋषी न होता दरोडेखोरच राहिला असता, म्हणून कोणी त्यास दरोडेखोराइतकीच किंमत देत नाही; उलट, अशा प्रसंगांचा परिणाम होण्याची पात्रता मनुष्यामध्ये असते, व अशा तऱ्हेने पुढील चांगुलपणाचे बीज त्याच्या ठिकाणी प्रथमपासूनच वास करीत असते, असेच या परिवर्तनाच्या योगाने सिद्ध होते. सारांश, मनुष्याच्या वर्तनास नैतिक किंमत प्राप्त होण्यास त्यास आत्मस्वातंत्र्य असणे आवश्यक असले तरी, केवळ त्या आत्मस्वातंत्र्याच्या योगाने त्याच्या हातून ज्या गोष्टी घडतील त्यासच-अशा गोष्टी बाजूला काढणे शक्य आहे असे मानले तरी-काय ते नैतिक महत्त्व आहे असे मानणे योग्य होणार नाही.

उलटपक्षी, ज्या व्यक्ती वाईट संस्कारांमुळे अगर कुसंगतीमुळे अनीतिमान बनल्या असतील त्या व्यक्तींना, त्यांना जर वाईट संस्कार अगर वाईट परिस्थिती नसती तर त्या सद्वर्तनी झाल्या असत्या म्हणून, चांगल्याच म्हणता येणार नाही. परिस्थिती अगर संस्कार यांना एखाद्या मनुष्याच्या वर्तनाचे बरेचसे श्रेय देणे जरूर आहे हे खरे आहे; परंतु त्यावरच

सर्व भार टाकून मनुष्यास आपल्या नैतिक जबाबदारीतून मुक्त होता येणार नाही. चांगल्या परिस्थितीमुळे अगर संस्कारांमुळे एखादा मनुष्य सद्गुणी बनला तरी आपण ज्याप्रमाणे त्याला त्या सद्वर्तनाचे श्रेय देतो, त्याचप्रमाणे वाईट परिस्थितीमुळे अगर संस्कारांमुळे एखादा मनुष्य दुर्वर्तनी निघाला तरी त्याबद्दल आपण त्यास दोष दिल्यावाचून राहत नाही. याचे कारण, परिस्थिती व संस्कार यांबरोबरच आपण त्याचे आत्मस्वातंत्र्य जमेस धरतो हे होय. वाल्या कोळ्याप्रमाणे सर्वच वाईट मनुष्यांस नारदासारखा गुरू भेटतो असे नाही; परंतु वाल्या कोळ्याच्या परिवर्तनाचे सर्व श्रेय नारदास देऊन, त्या दोघांना सारख्याच कोटीत ढकलणे योग्य होईल काय? केवळ सद्गुरू भेटणे हेच परिवर्तनाचे कारण नसून, त्याची शिकवण मान्य करणे हेही त्यास आवश्यक आहे, व ही मान्यता देणे न देणे ही प्रत्येकाच्या स्वतंत्र बुद्धीची गोष्ट आहे. सारांश, केवळ मनुष्याच्या निर्भेळ आत्मस्वातंत्र्यासच त्याच्या सर्व गुणावगुणांचे श्रेय देण्याचा आग्रह धरणे हे जसे चुकीचे होईल, तसेच परिस्थिती व संस्कार यांवरच सर्व भार टाकून त्यास आपल्या नैतिक जबाबदारीतून पूर्णपणे मुक्त करणे हे तितकेच असमंजसपणाचे होईल. तसे केल्यास, मनुष्य हा पशुंपेक्षा स्वभावतःच अधिक उत्क्रांत व अधिक विकास पावलेला आहे म्हणून पशुंपेक्षा त्याची नैतिक योग्यता मुळीच अधिक नाही असे मानावे लागेल.

अशा रीतीने मनुष्याचे आत्मस्वातंत्र्य आनुवंशिक संस्कार, परिस्थिती इत्यादी गोष्टींनी मर्यादित असले तरी तेवढे आत्मस्वातंत्र्य नीतिशास्त्रास पुरेसे आहे, हे वरील विवेचनावरून दिसून येईल. मनुष्य परिस्थिती, त्याच्या मेंदूची रचना व संस्कार या गोष्टींनी अंशतः बांधला गेला आहे असे म्हणणे म्हणजे दैववादाचा अंगिकार करणे नव्हे. आम्ही अंशतः मान्य केलेला बंधनवाद व दैववाद यात अत्यंत फरक आहे. मनुष्य अनेक प्रकारच्या बंधनांनी मर्यादित असला तरी त्या सर्व बंधनांविरुद्ध झगडण्याचे व अशा रीतीने आपल्या प्रयत्नाने भोवतालची परिस्थिती थोडीफार बदलून घेण्याचे सामर्थ्य त्याच्या ठिकाणी आहे असे आमचे मत आहे; परंतु दैववादी मनुष्यास हे मत मान्य नसून, मनुष्याने वाटेल ते केले तरी होणाऱ्या गोष्टी टळत नाहीत-भवितव्यता बलीयसी असे तो म्हणतो. सर्वच अडचणींविरुद्ध मनुष्यास यश येणे शक्य नसले तरी, पुष्कळ प्रतिकूल गोष्टी प्रयत्नाने सुसाध्य होतात अशी प्रयत्नवादी मनुष्याची खात्री असते. एखादा मनुष्य आजारी पडल्यास दैववादी मनुष्य हात जोडून स्वस्थ बसेल व रोग्याच्या नशिबात असेल तर तो जगेल, असे म्हणेल; परंतु प्रयत्नवादी मनुष्य, रोग्यास हटकून वाचविण्याची हमी त्यास देता न आली तरी, त्यास औषध देऊन बरे करण्याची उमेद मनात धरील. रोग्यास औषध देण्याची बुद्धी तरी त्यास दैवयोगानेच होते की नाही? असा कोणी प्रश्न विचारील; परंतु असा प्रश्न विचारणे अप्रस्तुत आहे असे आम्हास वाटते. इतर सर्व सृष्टीप्रमाणेच मनुष्यासही ईश्वरानेच उत्पन्न केले असल्यामुळे, एका अर्थाने सर्व गोष्टी ईश्वराधीनच आहेत. अशा रीतीने दैव व देव यांस एकच मानून चालावयाचे असेल

तर हा आक्षेप खरा आहे हे कबूल केले पाहिजे. देवाचे सामर्थ्य मनुष्यास नाही इतकाच या आक्षेपाचा अर्थ आहे. लेखाच्या आरंभी सुचविलेला आत्मस्वातंत्र्यावरील आध्यात्मिक आक्षेप हाच होय; परंतु आत्मस्वातंत्र्य म्हणजे सर्वशक्तिमत्व असे आमचे म्हणणेच नसल्यामुळे, या आक्षेपाने आम्ही मान्य केलेल्या मर्यादित आत्मस्वातंत्र्यास मुळीच विरोध येत नाही. मनुष्याचे आत्मस्वातंत्र्य व ईश्वराचे सर्वशक्तिमत्व यांचा परस्परसंबंध कर्मवादाचा विचार करताना दर्शविण्याचा विचार आहे. नीतिशास्त्रास सर्वशक्तिमत्वाची मुळीच जरूर नसून-किंबहुना ते नसण्याचीच जरूर असून-परिस्थितीशी झगडण्याचे व यत्न करण्याचे स्वातंत्र्यच त्यास पुरेसे व आवश्यक आहे. व तसे ते आहेही. स्वतः मनष्यास ईश्वराने उत्पन्न केले असले तरी त्यावरून मनुष्याचे प्रत्येक कर्म म्हणजे ईश्वराचेच कर्म असे म्हणणे, म्हणजे सर्व माणसे ईश्वराने उत्पन्न केलेली व नियंत्रित केलेली चालती बोलती यंत्रेच होत असे म्हणण्यासारखे आहे. या विचारसरणीप्रमाणे, मनुष्य व इतर प्राणी यांमध्ये, अगर मनुष्य व जडसृष्टी यांमध्येही काही भेद नाही असे म्हणावे लागेल, व मनुष्यास आपल्या विशिष्ट नैतिक जबाबदारीतून मोकळे होण्यास ती एक चांगलीच सबब होईल. अर्थातच वरील मताप्रमाणे कोणत्याही गुन्हेगारास त्याच्या अपराधाबद्दल शासन करणे न्याय्य होणार नाही. मनुष्यास आत्मस्वातंत्र्य असल्यामुळे त्याच्या सर्व कृत्यांची जबाबदारी स्वतः त्याजवरच असते, हा सिद्धांत सर्व शिक्षेच्या बुडाशी आहे; परंतु मनुष्याच्या नशिबी जसे असेल, अगर देव त्याला जशी बुद्धी देईल, तसे वर्तन त्याचे हातून घडेल, असे म्हटल्यास सर्व तुरुंग एकदम खुले करून समाजात गुन्हेगारांचे वर्चस्व अबाधितपणे चालू द्यावे लागेल; परंतु वरील विचारसरणी आपल्या सर्व नैतिक भावनांशी पूर्णपणे विसंगत आहे. एखाद्या गुन्हेगाराने, गुन्हा करण्याचे आपल्या नशिबी होते, सबब आपला त्यात काही दोष नाही असे म्हटल्यास, न्यायाधीशही त्यास तुरुंगात ढकलणे आपल्या नशिबी होते, त्यात आपलाही काही दोष नाही, असेच म्हणेल! सारांश, मर्यादित का होईना, आत्मस्वातंत्र्य आपल्या नैतिक भावना सार्थ करण्यास आवश्यक असल्यामुळे, त्या भावनांना विरोध करणारा दैववाद अंतिम दृष्टीनेही खरा असणे शक्य नाही. जे तत्त्वज्ञान आपल्या नैतिक भावनांचा मुळीच विचार करीत नाही ते तत्त्वज्ञान सदोष आहे असे समजण्यास मुळीच हरकत नाही.

मनुष्याच्या आत्मस्वातंत्र्यास ईश्वराचे सर्वशक्तिमत्त्व हे पूर्णपणे विघातक नसले तरी, त्या योगाने ते स्वातंत्र्य बरेच मर्यादित होते हे वर मान्य केलेच आहे. आत्मस्वातंत्र्याची आणखी एक मर्यादा दर्शवून हे बरेच लांबलेले प्रकरण पुरे केले पाहिजे. ही मर्यादा आपणास कर्मवादात दिसून येते. प्रत्येक मनुष्य आपल्या इच्छेप्रमाणे वागण्यास स्वतंत्र असतो खरा; परंतु त्या वागणुकीचे फळ भोगणे हे मात्र त्याच्या इच्छेवर अवलंबून नसते. या जन्मीच्या आयुष्याकडे पाहिल्यास, गुन्हेगारास गुन्हा करण्याचे स्वातंत्र्य असते व तसे असावेही, असे आपण म्हणतो; परंतु गुन्हा करूनदेखील त्याचे फळ न भोगता मोकळे राहण्याचे स्वातंत्र्य

त्यास असावे असे म्हणणे, म्हणजे समाजात अन्याय व अनवस्था यांचे वर्चस्व असावे असे म्हणण्यासारखेच आहे. सारांश, मनुष्यास कर्मे करण्याचे स्वातंत्र्य असले तरी त्यांचे फळ भोगणे हे त्याच्या इच्छेवर अवलंबून नसून, ईश्वरास त्याच्या कर्माच्या बरेवाईटपणाचा न्यायनिवाडा करण्याचे व त्याप्रमाणे त्यास मोबदला देण्याचे सामर्थ्य आहे असे म्हणणे प्राप्त आहे. मानवी व ईश्वरी न्यायात फरक इतकाच की, मानवी न्यायाधीश हा या जन्मापुरतेच पाहू शकतो, व त्याची शासन करण्याची अगर मोबदला देण्याची शक्तीही अत्यंत मर्यादित असल्यामळे. समाजात दुर्गुणांची व अन्यायाची भरभराट दिसून येते; अशा रीतीने प्रत्येक मनुष्यास आपल्या सर्व कर्मांची फळे भोगावयास लावण्याचे सामर्थ्य मानवी न्यायाधीशास नसते; परंतु सर्व मानवी न्यायाधीशांचा जो न्यायाधीश, त्याची दृष्टी अमर्याद व शक्तीही अनंत असल्यामुळे, त्याच्या दृष्टीतून कोणतेही कर्म सुटत नाही, व यामुळे त्या कर्माची फळे भोगण्याची मर्यादाही या जन्माबरोबरच संपत नाही.

परंतु अशा रीतीने मनुष्यास कोणतेही कर्म करावयास लावण्याची शक्ती ईश्वरास नसून, त्या कर्माचे फळ देण्याचे सामर्थ्य मात्र त्याच्या ठिकाणी आहे असे मानल्यास, डॉ. प्रिंगल पॅटिसन यांनी विनोदाने म्हटल्याप्रमाणे, प्रत्येक मजुरास त्याच्या कामाप्रमाणे पगार देणाऱ्या कारकुनापेक्षा अशा ईश्वरास अधिक महत्त्व नाही असे म्हणावे लागेल; परंतु ज्याने स्वतः मनुष्यास उत्पन्न केले, त्याचा त्याच्या कर्मावर ताबा नाही असे म्हणणे सयुक्तिक दिसत नाही. यासाठी, ईश्वराचे सर्वशक्तिमत्त्व व मनुष्याचे आत्मस्वातंत्र्य यांत सांगड घालावयाची असल्यास, आपणास वाटेल ते कर्म मनुष्याच्या हातून घडवून आणण्याचेही सामर्थ्य ईश्वरास आहे; परंतु तो त्या सामर्थ्याचा उपयोग न करता मनुष्यास आपल्या इच्छेप्रमाणे वागण्यास स्वातंत्र्य देतो, आणि मिळालेल्या स्वातंत्र्याचा त्याने दुरुपयोग केल्यास त्यास शासन करतो, असे मानावे लागते. हे मत कर्माच्या अगर संसाराच्या अनादित्वाची ढाल पुढे करणाऱ्या मतापेक्षा अधिक तर्कशुद्ध व अधिक विश्वासार्ह आहे असे आम्हास वाटते. अशा रीतीने मनुष्य आपणास मिळालेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग करील हे सर्वज्ञ ईश्वरास माहीत नव्हते काय? असल्यास, असे स्वातंत्र्य त्यास देऊन जगात दुःख व अन्याय उत्पन्न करण्याची ईश्वरास काय गरज होती, असा कोणी प्रश्न करील; परंतु असा प्रश्न विचारणे म्हणजे ईश्वराने सृष्टी उत्पन्नच का केली, असे विचारण्यासारखेच आहे. या प्रश्नाचा विचार करण्याचे हे स्थळ नसल्यामुळे झाले इतकेच विवेचन पुरे करणे प्राप्त आहे.

○○○

प्रकरण ११ वे

नीतिशास्त्राची उपयुक्तता

येथपर्यंत नीतिशास्त्रात उद्भवणाऱ्या काही प्रश्नांचा आम्ही विचार केला; परंतु अशा तऱ्हेने काथ्याकूट करीत बसण्यापासून काही फायदा आहे काय, व असल्यास तो कोणता, असा प्रश्न कित्येकांच्या मनात उद्भवण्याचा संभव आहे. या प्रश्नाचे उत्तर या प्रकरणात देण्याचा विचार आहे.

नीतिशास्त्र हे एक मुख्यत्वेकरून तात्त्विक शास्त्र आहे, व म्हणून रसायनशास्त्र अगर वैद्यकशास्त्र यांस ज्या प्रकारची व्यावहारिक उपयुक्तता नीतिशास्त्रास नसून, उच्च प्रकारच्या गणितशास्त्राचा अगर ज्योतिषशास्त्राचा जो उपयोग तोच नीतिशास्त्राचाही आहे असे म्हणता येईल. निरपेक्ष ज्ञानलालसेस अगर बौद्धिक उन्नतीस स्वतःची अशी काहीच किंमत नसेल, तर सर्व तात्त्विक शास्त्रांबरोबरच नीतिशास्त्रही कुचकामाचे ठरेल हे उघड आहे; परंतु केवळ व्यावहारिक अगर उदरनिर्वाहाच्या व्यवसायांखेरीज बौद्धिक अगर कौशल्यविषयक व्यवसायांचीही समाजास आवश्यकता आहे असे ज्यास वाटते, त्यास नीतिशास्त्राची आवश्यकता काय आहे हे निराळे सांगण्याची जरूर नाही. शिवाय, तात्त्विक शास्त्रांची किंमत नेहमी तात्त्विकच असते असे नाही. खगोलशास्त्र हे काही जलपर्यटनाच्या सोयीसाठी निर्माण झालेले नाही; परंतु नौकानयनास त्या शास्त्रांचा उपयोग होतोच की नाही? सर्व प्रकारच्या तात्त्विक विषयांबद्दल अनास्था बाळगणे हे व्यावहारिक हितास पोषक न होता विघातकच होते हे लक्षात ठेवले पाहिजे. वरवर पाहणारास तत्त्वज्ञानाइतका निरुपयोगी विषय दुसरा कोणताच नाही असे वाटते; परंतु खऱ्या मुमुक्षूस त्या विषयाइतके महत्त्व दुसऱ्या कशाचेही वाटत नाही. व्यावहारिक गरजांप्रमाणेच आध्यात्मिक अगर पारमार्थिक लालसाही मनुष्यास असतात, व त्या लालसा पूर्ण करणाऱ्या शास्त्रास निरुपयोगी म्हणणे हे कोत्या बुद्धीचे व एकांगीपणाचे लक्षण आहे असे आम्हास वाटते. विशेषतः नीतिमत्ता हे

मानवी जीवितांतील अत्यंत महत्त्वाचे अंग असल्यामुळे, त्या अंगाचा विचार करणारे शास्त्र हे इतर तात्त्विक शास्त्रांहूनही अधिक महत्त्वाचे आहे असे म्हणण्यास हरकत नाही. कार्याकार्य ठरविणाऱ्या व खरे चारित्र्य कशात आहे हे निश्चित करणाऱ्या शास्त्राचा आपल्या चारित्र्यावर अगर आचरणावर मुळीच परिणाम होत नाही असे म्हणणे, म्हणजे विचार व आचार यांचा काडीमात्रदेखील संबंध नाही असे म्हणण्यासारखेच आहे. विचाराशिवाय नुसताच आचार करीत राहावे असे ज्यांचे म्हणणे असेल, त्यांना नीतिशास्त्राचे अस्तित्व निष्कारण आहे असे वाटणे स्वाभाविक आहे; परंतु विचाराची जोड असल्याखेरीज आचारास खरे महत्त्वच नाही असे ज्यास वाटते, त्यास नीतिशास्त्र नाहीसे होण्यापेक्षा त्याची प्रगती होणेच अधिक आवडेल हे उघड आहे. आपल्या रोजच्या आयुष्यक्रमातील प्रत्येक बाबतीत नीतिशास्त्राची आपणास मदत होऊ शकेल असे नाही; परंतु तशी मदत करण्यास समर्थ होणे हेच नीतिशास्त्राचे ध्येय आहे. कितीही गुंतागुंतीचा गुन्हा अगर रोग असला तरी त्याची शहानिशा करता येणे हे ज्याप्रमाणे कायद्यास किंवा वैद्यकास आवश्यक वाटते, त्याचप्रमाणे कितीही बिकट नैतिक प्रश्न उत्पन्न झाला तरी त्याचा योग्य निर्णय नीतिशास्त्रास देता येणे आवश्यक आहे.

ब्रॅडलेसाहेबांनी नीतिशास्त्राची ही उपयुक्तता सर्वस्वी अमान्य केली आहे. तर्कशास्त्र अगर नीतिशास्त्र शिकलेल्या मनुष्यास तर्कशुद्ध भाषण करण्याची अगर बिनचूक नैतिक निर्णय देण्याची कला अवगत होते असे म्हणणे साफ चुकीचे आहे असे त्यांचे मत आहे. अर्थात्, अशा तऱ्हेने या शास्त्रांचे कोणी कलांमध्ये रूपांतर-किंवा विपर्यास-केल्यास, तशा प्रकारच्या कलांना ताबडतोब जलसमाधी देणे हे आपले कर्तव्य आहे हे सिद्ध होते. या आक्षेपात बराच तथ्यांश आहे हे कबूल केले पाहिजे. तर्कशास्त्र मानणाऱ्या मनुष्याचे विचार नेहमी तर्कशुद्ध असतीलच असे नाही; उलट एखादे वेळी ते शास्त्र न जाणणाऱ्या मनुष्यापेक्षाही अधिक चुकीचे असू शकतील; त्याचप्रमाणे नीतिशास्त्र जाणणाऱ्या मनुष्याचे अनेक निर्णय नेहमी बिनचूकच असतील असेही म्हणता यावयाचे नाही. याचे कारण असे की. तर्कशास्त्र जाणणाऱ्या मनष्याची तार्किक बुद्धी, अगर नीतिशास्त्र जाणणाऱ्याची सद्सद्विवेकबुद्धी ही इतरांहून विशेष निराळी असते असे नाही. ज्याप्रमाणे तर्कशास्त्रज्ञ हा विचार करण्याची एखादी नवीन पद्धती शोधून काढीत नसून, आपण ज्या पद्धतीने विचार करतो ती पद्धती कोणती, हे विशद करून सांगणे एवढेच त्याचे कार्य असते, त्याचप्रमाणे आपले नैतिक निर्णय कोणत्या विचारावर रचलेले असतात हे स्पष्टपणे मांडणे एवढेच नीतिशास्त्रज्ञाचे काम असते; परंतु अशा रीतीने तर्कशास्त्रज्ञाचे अगर नीतिशास्त्रज्ञाचे आपली इमारत रचण्याचे साधन हे इतर सर्व लोकांप्रमाणेच असले, तर, त्या शास्त्रांचे ज्ञान असलेल्या मनुष्यास व्यवहारात त्यांचा बिलकूल उपयोग होणार नाही असे म्हणणे चुकीचे होईल. ज्यास आपल्या तार्किक अगर नैतिक विचारांची मूलतत्त्वे पूर्णपणे समजली आहेत अशा मनुष्याचे त्या बाबतीतले निर्णय, तसे ज्ञान मुळीच नसलेल्या मनुष्यापेक्षा अधिक बिनचूक असण्याचा

केव्हाही अधिक संभव आहे उघड आहे. शिवाय, तर्कशास्त्रास स्वतःचा असा स्वतंत्र विषय नसून, इतर शास्त्रे उपयोगात आणीत असलेल्या विचारपद्धतीचेच त्यास परीक्षण करावयाचे असते, व अशा रीतीने तर्कशास्त्रज्ञाचा आपल्या शास्त्राशी संबंध फार दूरचा असतो; परंतु नीतिशास्त्राचा आपल्या आचरणाशी अत्यंत निकट संबंध असून, कार्याकार्याचा निर्णय देण्याची वेळ आपणास पदोपदी येते. अर्थात् तसा निर्णय देण्याची दिशा ज्यास समजली आहे अशा मनुष्याचे निर्णय इतरांपेक्षा अधिक विश्वासार्ह असणार हे उघड आहे. सारांश, तर्कशास्त्र शिकल्याने तर्कशुद्ध भाषण करण्याची अगर नीतिशास्त्र शिकल्याने कार्याकार्य ठरविण्याची कला आपणास पूर्णपणे अवगत होते असे म्हणणे जरी चुकीचे असले तरी, त्या कला आपणास यत्किंचितही प्राप्त होत नाहीत असे मानणे त्याहूनही चुकीचे आहे.

यावर ब्रॅडलेसाहेबांचे असे उत्तर आहे की, नैतिक निर्णय हे अनुमानात्मक अगर वादविवादात्मक, म्हणजे तर्कदृष्ट्या सिद्ध होण्याजोगे नसून ते अंतःस्फूर्त असल्यामुळे, ते शास्त्रबद्ध अगर नियमबद्ध करणे अशक्य आहे; परंतु असे म्हणणे म्हणजे शुद्ध अंतःस्फूर्तिवादाचा अंगिकार करण्यासारखे आहे. या मतातील दोष पहिल्या प्रकरणात आम्ही दाखविलेच आहेत. नैतिक निर्णय अंतःस्फूर्त असले तरी त्यात विचारास मज्जाव नाही; इतकेच नव्हे, तर विचाराची जोड असल्याखेरीज त्यास खरे नैतिक निर्णय न म्हणता क्षणिक लहरीच म्हणावे लागेल, हे लक्षात ठेवले पाहिजे. विचाराची जोड नसल्यास आपल्या नीतिमत्तेस सुसंबद्धता अगर सुसंगती काहीच न उरून, ज्या मनुष्यास ज्या वेळी जे वाटेल तेच त्याने करणे योग्य असा प्रकार होऊन जाईल; परंतु अशा तऱ्हेची सुसंबद्धता आपल्या नीतितत्त्वात असलीच पाहिजे असे आपणास वाटते. 'अ' ने चोरी करणे अगर खोटे बोलणे जर वाईट तर त्याच परिस्थितीत 'ब' ने चोरी करणे अगर खोटे बोलणे हेही वाईट समजले पाहिजे, असे अनुमान करणे आपण चुकीचे समजत नाही; परंतु ब्रॅडलेसाहेबांच्या मताप्रमाणे अशा तऱ्हेचे कोणतेही अनुमान काढणे योग्य ठरत नसून, सर्व नीतिमत्ता वैयक्तिक व क्षणिक लहरींवर अवलंबून आहे असे सिद्ध होते. सारांश, नीतितत्त्वांस काही सार्वत्रिकता अगर निरुपाधिकता आहे असे ज्यास वाटते, त्यास वरील विचारसरणी मान्य होणे शक्य नसून, आपल्या अज्ञानामुळे अगर अननुभवामुळे नीतिमत्तेस जी वैयक्तिकता व असंबद्धता प्राप्त होते, ती नाहीशी करण्याकरिता नीतिशास्त्राची अत्यंत आवश्यकता आहे असेच ते म्हणतील.

दुसरा एक आक्षेप नीतिशास्त्रावर आणला जातो. व्यवहारातील सर्व प्रसंग अगदी वेगवेगळे असल्यामुळे, एका प्रसंगी जसे वागणे आवश्यक असते तसेच दुसऱ्या कोणत्याही प्रसंगी वागणे मुळीच इष्ट नसते. अशा स्थितीत, सर्वसामान्य नीतिनियम ठरवणे कसे शक्य आहे, असा प्रश्न विचारण्यात येतो. हा आक्षेप वरील आक्षेपाचेच एक दुसरे स्वरूप आहे व त्यास उत्तरही वर दिलेच आहे. कोणत्याही दोन रोग्यांची अगर एकाच रोग्याची कोणत्याही

दोन काळांची स्थिती एकसारखी नसते, म्हणून वैद्यक अशक्य अगर कुचकामाचे ठरते काय? कोणत्याही दोन रोग्यांत ज्याप्रमाणे काही फरक असतो त्याचप्रमाणे काही सारखेपणाही असतो; तो सारखेपणा लक्षात घेऊन व त्यातील भेदास वाव देऊन काही सामान्य अनुमान काढणे व औषधयोजना करणे वैद्यास शक्य नसते काय? त्याचप्रमाणे परिस्थितीभिन्नत्वास वाव देऊन सामान्य नीतिनियम ठरवणे नीतिशास्त्रास का शक्य असू नये?

परंतु अशा रीतीने नीतिशास्त्र सर्वस्वी निरुपयोगी नाही हे जरी खरे असले, तरी त्याची उपयुक्तता अत्यंत मर्यादित आहे हे कबूल केले पाहिजे. वैद्यकाचा आपल्या आरोग्यास जितका उपयोग होतो तितका नीतिशास्त्राचा आपल्या नैतिक उन्नतीस होत नाही हे कोणीही मान्य करील. या भेदाचे कारण समजण्यास नीतिशास्त्राच्या उपयोगाबरोबरच त्या उपयुक्ततेच्या मर्यादा काय आहेत हेही आपणास पाहिले पाहिजे.

नीतिशास्त्र जाणणाऱ्या मनुष्याची सद्‌सद्विवेकबुद्धी ही इतरांपेक्षा काही निराळी असते असे नाही, व त्याचे निर्णय इतरांपेक्षा नेहमीच अधिक बिनचूक असतात असेही नाही, हे वर सांगितलेच आहे; परंतु नैतिक बाबतीत विचार करण्याची त्यास सवय असल्यामुळे, त्याचे निर्णय एकांगी होणार नाहीत, व तो कोणताही विशिष्ट ध्येयाच्या मागे लागून वाहवून न जाता, समतोल बुद्धीने विचार करून आपल्या जीवितांतील सर्व प्रकारच्या उन्नतीचे परस्पर प्रमाण ठरवील. शिवाय सामान्य मनुष्याची दृष्टी अनेक प्रकारच्या रूढींनी व पूर्वग्रहांनी दूषित झालेली असल्यामुळे, कित्येक गोष्टींचा बरेवाईटपणा त्यास समजतच नाही; परंतु नीतिशास्त्रज्ञ अशा सर्व पूर्वग्रहांपासून स्वतःस अलिप्त ठेवील, व त्यामुळे कोणत्याही गोष्टीचा निःपक्षपाताने व सांगोपांग विचार करण्यास तो समर्थ होईल.

परंतु याचबरोबर इतर अनेक गोष्टी लक्षात ठेवणे जरूर आहे. केवळ समतोल बुद्धीच्या परंतु भावनाशून्य अगर चारित्र्यहीन मनुष्याच्या शाब्दिक निर्णयापेक्षा, भावनाप्रधान व आचारप्रधान अशा व्यक्तींच्या निर्णयासच व्यवहारात कोणीही अधिक किंमत देईल हे उघड आहे. शिवाय, व्यवहारातील अनेक गुंतागुंतीचे प्रश्न सोडविणे इतके बिकट असते की, शाब्दिक शिकवणुकीपेक्षा प्रत्यक्ष उदाहरणाने इतरास मार्गदाखविणेच अधिक सुलभ व अधिक सुपरिणामी होते. दुसरे असे की, अगदी सर्वसाधारण नीतितत्त्वे सोडून अधिक व्यावहारिक नीतिनियमांकडे नजर दिल्यास, आपणास वाटते तितकी सार्वत्रिकता त्यात नसून त्यास तीव्र मतभेदास वाव आहे असे दिसून येईल. अशा स्थितीत सर्वांस उपयोगी होईल असे नीतिशास्त्र बनविणे अत्यंत कठीण आहे.

वरील सर्वांपेक्षाही अधिक महत्त्वाची एक मर्यादा नीतिशास्त्राच्या उपयुक्ततेस-किंबहुना त्याच्या अस्तित्वास आहे. मनुष्याचा आयुष्यक्रम ज्या अनेक प्रकारच्या रूढींनी, कायद्यांनी व इतर नियमांनी बांधला गेलेला असतो त्या सर्व बंधनांची पूर्ण छाननी करणे व शक्य असल्यास ते नियम बदलण्याची दिशा दाखविणे हे नीतिशास्त्राचे कार्य आहे हे खरे; परंतु

तसे करण्यास व्यवहारातील निरनिराळ्या अंगांचे, त्यांतील विशिष्ट अडचणींचे व गरजांचे पूर्ण ज्ञान होणे आवश्यक असते. उदाहरणार्थ, वैवाहिक नीतिनियम ठरविण्यास वैद्यक, सुप्रजाजननशास्त्र इत्यादी समाजशास्त्राच्या अनेक अंगांचे ज्ञान असणे आवश्यक असते. अर्थात् इतके संपूर्ण ज्ञान करून घेणे कोणत्याही मनुष्यास अशक्य आहे हे उघड आहे. प्रत्येक शास्त्र हे आपापल्या दृष्टीने विचार करीत असते व त्यांचा परस्परांशी अगर नीतिनियमांशी विरोध आल्यास तो नाहीसा करणे हे नीतिशास्त्राचे काम असते. उदाहरणार्थ, एखादा वैद्य रोग्यास थंड हवेच्या ठिकाणी जाऊन राहण्यास अगर मांसभक्षण करण्यास सांगेल; परंतु त्याने आर्थिकदृष्ट्या हवा पालटण्यास जाणे इष्ट आहे किंवा नाही, अगर नैतिकदृष्ट्या मांसभक्षण करणे योग्य आहे की नाही, हे ठरविण्याचे काम वैद्यकाचे नसून नीतिशास्त्राचे आहे. हे काम किती बिकट आहे हे कोणास सांगावयास पाहिजे असे नाही.

परंतु अशा रीतीने व्यवहारातील गुंतागुंतीच्या प्रसंगांतून वाट दाखविणे अत्यंत बिकट असून, अशा प्रसंगी नीतिशास्त्राच्या ज्ञानापेक्षा शीलाचा व अनुभवाचाच अधिक उपयोग होण्याचा संभव आहे हे जरी खरे असले, तरी त्यावरून नीतिशास्त्र कुचकामाचे आहे असे सिद्ध होत नसून, उलट ते अधिक पूर्ण व कार्याकार्याचा निर्णय देण्यास अधिकाधिक समर्थ करण्याचा प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे हे सिद्ध होते. अर्थात् अशा तऱ्हेची पूर्णता नीतिशास्त्रास केव्हाही प्राप्त होईल असे मानणे फार धाडसाचे आहे; परंतु ते शास्त्र अधिकाधिक पूर्ण व अधिकाधिक उपयुक्त करणे हेच नीतिशास्त्राचे ध्येय असले पाहिजे.

व्यवहारातील बिकट प्रसंग जरी घटकाभर बाजूस ठेवले तरी, सामान्यतः नीतिशास्त्राचा समाजास अनेक रीतींनी उपयोग होतो असे दिसून येईल. सामान्य मनुष्य सत्प्रवृत्त असला तरी, आपले ध्येय काय आहे व ते गाठण्याचा मार्ग कोणता याचे त्यास यथार्थ ज्ञान नसते. अशा परिस्थितीत नीतिशास्त्र त्यास आपल्या ध्येयाची व ते साधण्याच्या मार्गाची स्पष्ट कल्पना आणून देईल व त्याचा मार्ग सुलभ करील. नीतिशास्त्राचे काम केवळ निर्णय देण्याचेच आहे असे नाही तर इतरांस योग्य निर्णय देता यावा म्हणन साध्य साधनांचे व परिस्थितीचे यथार्थ ज्ञान करून देणे हेही त्याचे कार्य आहे. कित्येक वेळा असे ज्ञान नसल्यामुळेच, सद्भावनांनी प्रेरित झालेला मनुष्यदेखील भलत्याच मार्गाने जाण्याचा संभव असतो, विशेषतः ज्या वेळी दोन नीतितत्त्वांमध्ये विरोध येतो, त्यावेळी कोणत्या तत्त्वास अधिक किंमत देऊन कोणत्या तत्त्वास अपवादात्मक आचरण करावे हे ठरवणे अत्यंत कठीण असते. अशा वेळी आपल्या अंतिम ध्येयाच्या दृष्टीने त्या दोन्ही तत्त्वांचे कमीअधिक महत्त्व ओळखणे हे सामान्य मनुष्यापेक्षा नीतिशास्त्रज्ञासच अधिक सुलभ जाईल हे उघड आहे. ज्ञानाच्या प्रगतीबरोबरच आपल्या नीतिविषयक कल्पना व आपल्या रूढ नीतिनियमांच्या अंमलबजावणीचे मार्ग बदलणे इष्ट असते. उदाहरणार्थ, मानसशास्त्राच्या प्रगतीमुळे आपल्या शिक्षणविषयक कल्पना अगर गुन्हेगारास व रोग्यास वागवण्याच्या मार्गांविषयीच्या कल्पना यात अत्यंत

फरक पडला आहे. हा फरक लक्षात घेऊन त्याप्रमाणे नीतिनियम बदलणे हे नीतिशास्त्राचे काम आहे.

परंतु नीतिशास्त्राचा समाजास जितका उपयोग होतो त्याहूनही अधिक उपयोग स्वतः ते शास्त्र शिकणारास होतो. धर्मशास्त्राचा अभ्यास करणारा मनुष्य एकदम धार्मिक बनतो असे ज्याप्रमाणे म्हणता यावयाचे नाही, त्याचप्रमाणे नीतिशास्त्राचा अभ्यास करणारा मनुष्य लगेच नीतिमत्तेचा पुतळा बनतो असे म्हणणे मूर्खपणाचे होईल हे खरे आहे; परंतु ज्यास नेहमी आपल्या आचरणाविषयी व त्यातील गुणदोषांविषयी विचार करण्याची सवय झाली आहे असा मनुष्य अगदीच भावनाशून्य नसल्यास, त्याच्या मनावर त्या विचारांचा परिणाम झाल्यावाचून राहणार नाही. ज्ञान म्हणजेच सद्गुण हे सॉक्रेटिसाचे विधान पूर्णपणे खरे नसले तरी अंशतः खरे आहे. अज्ञानाने केलेल्या सदाचरणापेक्षा जाणून बुजून केलेल्या दुराचरणास अधिक महत्त्व आहे हे नाकबूल करता यावयाचे नाही; कारण ज्ञानाची ज्योत ज्याच्या हृदयात सदैव पेटलेली आहे अशा मनुष्याच्या कुवासना केव्हातरी त्या अग्नीत होरपळून जाण्याचा संभव असतो; परंतु अंधश्रद्धेने वागणाऱ्या मनुष्यास आपल्या आचरणाचे रहस्य तर समजत नाहीच; पण त्याच्या आयुष्याची नौका केव्हा कुमार्गाकडे झुकेल याचा नेमच नसतो. ज्यास आपले व सर्व विश्वाचे खरे कल्याण कशात आहे हे समजले आहे असा मनुष्य त्या कल्याणाच्या मार्गापासून परावृत्त होण्याचा फारसा संभव नसतो; परंतु असे ज्ञान नसलेला व केवळ गतानुगतिकत्वाखेरीज ज्यास दुसरा धर्मच नाही असा मनुष्य, भूतकाळातील चुकांचे शब्दशः पारायण करून, आपल्या मागून येणाऱ्या लोकांसही तोच धडा घालून देतो. प्रत्येक राजा हा तत्त्वज्ञानी असला पाहिजे असा प्लेटो म्हणत असे, यातील सार हेच आहे. आपल्या अंतिम ध्येयाकडे नजर देऊन व त्याचे मार्ग नीट पाहून वागणे व इतरांस तसे वागण्यास शिकविणे हेच खऱ्या पुढाऱ्याचे व शास्त्याचे कर्तव्य आहे व हे कार्य सुलभ होण्यासाठीच नीतिशास्त्राची आवश्यकता आहे.

○○○

प्रकरण १२ वे

ऐतिहासिक पद्धती

पाश्चात्त्य वाङ्मयामध्ये ज्यास सामान्यतः इतिहास अशी संज्ञा आहे त्या राजकारणाच्या इतिहासाखेरीज धर्माचा इतिहास, नीतितत्त्वांचा इतिहास, भाषेचा इतिहास वगैरे अशाच तहेचे शेकडो ग्रंथ निर्माण झालेले आहेत व अजून होत आहेत. प्रत्येक विषयाचा-विशेषतः तत्त्वज्ञान, धर्म अशा आध्यात्मिक व स्वतःसिद्ध विषयांचा-ऐतिहासिक पद्धतीने अभ्यास होत असलेला पाहून आमच्या इकडील कित्येक पंडितांना मोठे आश्चर्य व संदेह वाटतो. तत्त्वज्ञानाचा इतिहास, धर्माचा इतिहास हे काय बंड आहे असे त्यास वाटते, व धर्माचा इतिहास, तत्त्वज्ञानाचा इतिहास असे करता करता धर्म व तत्त्वज्ञान एका बाजूसच राहून केवळ ऐतिहासिक दृष्टीलाच प्राधान्य येते अशी त्यांना भीती वाटते. हा आक्षेप काही अंशी खरा आहे. विशेषतः ज्यांनी या ऐतिहासिक पद्धतीचा अंगिकार व पुरस्कार केला त्या उत्क्रांतितत्त्ववादी लोकांनी, केवळ जड सृष्टीलाच लाग पडतील असे उत्क्रांतिवादातील काही सिद्धांत वरील आध्यात्मिक विषयांनाही लागू केल्यामुळे या आक्षेपास विशेष जोर येतो; परंतु हा दोष उत्क्रांतितत्त्ववादी लोकांचा आहे, ऐतिहासिक पद्धतीचा नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. ऐतिहासिक पद्धती सर्वस्वी निर्दोष आहे असे नाही; परंतु विस्तवाने कधी कधी घरे जळतात म्हणून ज्याप्रमाणे कोणी विस्तव निरुपयोगी आहे असे मानीत नाही, त्याचप्रमाणे या पद्धतीतील दोष टाळण्याची खबरदारी घेतल्यास तिचा उपयोग होणार नाही असे नाही. शिवाय वरील आक्षेपास एक सामान्य उत्तर असे देता येईल की. इतिहास म्हणजे केवळ राजकारणाचाच इतिहास किंवा लढायांचा इतिहास अशी कोती व एकांगी दृष्टी का? उलटपक्षी, मार्व्हिनने एका ठिकाणी म्हटल्याप्रमाणे, १६६५ साली इंग्लंडमध्ये मोठा प्लेग झाला किंवा मोठी आग लागली असे प्रत्येक इतिहासकार लिहितो; परंतु त्याच साली गुरुत्वाकर्षणाचा शोध लागला ही गोष्ट कोणीही नमूद करीत नाही हे मोठे आश्चर्य नव्हे काय?

राजकारणाच्या इतिहासाचा जो उपयोग तोच इतर शास्त्रांच्या इतिहासाचा होऊ शकणार नाही काय?

या ऐतिहासिक पद्धतीचा पुरस्कार उत्क्रांतिवादाबरोबर सुरू झाला. डार्विनने या वादास प्रथम सुरुवात केली व स्पेन्सरने हा उत्क्रांतिवाद व त्यातील सिद्धांत सर्व शास्त्रांस सरसकट एकाच मापाने लागू केले. आम्हास या प्रकरणात स्पेन्सरच्या उत्क्रांतिवादाचा विचार करावयाचा नसून, त्याने उत्क्रांतिवाद सिद्ध करण्यासाठी ज्या ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब केला ती पद्धती कितपत उपयोगी आहे हे पाहावयाचे आहे, व या पद्धतीने अभ्यास करण्यास विशेष कठीण व धोक्याची अशी जी तत्त्वज्ञानाची शाखा, त्या नीतिशास्त्राच्या शाखेचा आम्ही विवेचनासाठी उपयोग केला आहे.

चार्लस डार्विन याने असा सिद्धांत मांडला की, रानटी मनुष्य व सुधारलेला मनुष्य यांमध्येच नव्हे तर पशु व मनुष्य यांमध्येदेखील सर्व बाबतीत अखंडता अगर निरंतरता (कंटिन्युइटी) आहे. निसर्गाच्या प्रवाहामध्ये कोणत्याही प्रकारचा खंड नाही. किडामुंगीपासून तो मनुष्यापर्यंत सर्व प्राणी एकाच साखळीचे दुवे आहेत. मधला एखादा दुवा जरी आज उपलब्ध नसला तरी त्याचे कारण आपले अज्ञान होय. हा सिद्धांत पूर्णपणे नाही तरी बऱ्याच अंशी खरा आहे हे कबूल केले पाहिजे, व याच ठिकाणी ऐतिहासिक पद्धतीवरील आक्षेप बरोबर लागू पडतो असे आमच्या आक्षेपकांस वाटते. त्यांचे म्हणणे असे की, आमच्या उदात्त व स्वतःसिद्ध नैतिक कल्पना मूळ अगदी अनैतिक अगर रानटीपणाच्या कल्पनांपासूनच विकास पावलेल्या अगर उत्क्रांत झालेल्या आहेत असे सिद्ध झाले, तर त्यांचे उदात्तत्व किंवा सत्यताही नाहीशी होईल; निदान कमी तरी भासेल; परंतु असे मानण्याचे वास्तविक काही कारण नाही. सृष्टीतील आद्य मानवास दहा अंक सुद्धा नीट मोजता येत नव्हते, म्हणून ज्याप्रमाणे आजच्या गणितशास्त्राची सत्यता अगर महत्त्व कमी होत नाही; किंवा मनुष्याचे आजचे शरीर हे मूळ वानराच्या शरीरापासून उत्क्रांत झालेले आहे, म्हणून ज्याप्रमाणे कोणी त्याची उपयुक्तता अगर थोरवी कमी लेखीत नाही, त्याचप्रमाणे आमच्या आजच्या नैतिक अगर धार्मिक कल्पनांचे महत्त्व, त्यांचा उगम रानटी कल्पनांत आहे या कारणासाठी, कमी होण्याचे मुळीच कारण नाही. इतर सर्वच बाजूंनी आमची प्रगती होत आहे, त्याचप्रमाणे ती तत्त्वज्ञान, धर्म, नीती याही बाबतीत होत आहे. ती कशी झाली आहे अगर होत आहे हे दाखविल्याने, अगर ती प्राचीन काळापासून आजपर्यंत अखंड रीतीने चालली आहे असे म्हटल्याने त्या तत्त्वांच्या महतीला कसा धक्का बसतो हे आम्हांस समजत नाही.

आता याचबरोबर आमच्या आक्षेपकांच्या बाजूने हेही लक्षात ठेवले पाहिजे की, मूळ नीतिअनीतीतील भेद, अगर नीतीची मूळ सर्वसाधारण भावना, ही कोणत्याही सर्वस्वी अनैतिक अशा आदिकल्पनेपासून उत्क्रांत झालेली अगर विकास पावलेली नसून ती पूर्णपणे स्वतःसिद्ध आणि स्वयंभू (ए प्राओरी) आहे. उत्क्रांतिवादी लोकांना अशा तऱ्हेच्या

स्वयंभू कल्पनांचे अस्तित्व मान्य नसून, सर्व कल्पना अगर सिद्धांत हे अनुभवजन्यच असतात असे त्यांचे म्हणणे आहे. उदाहरणार्थ, दोन आणि दोन चार हा सिद्धांत मानवी पूर्वजांच्या काळी स्वतःसिद्ध नसून तो एक वादग्रस्त प्रश्न होता; परंतु अनुभवाने त्यांना तो सिद्धांत सत्यपूर्ण व समाजास पोषक आहे असे आढळून आल्यामुळे त्यांनी तो मान्य केला. ज्यांनी तो मान्य केला नाही ते अर्थातच जीवनकलहामध्ये 'बळी तो कान पिळी' (सर्व्हायव्हल ऑफ दि फिटेस्ट) या न्यायाने मागे पडले व हळूहळू नाहीसे झाले. ज्यांनी तो मान्य केला ते टिकले व त्यांचे वंशज जे आम्ही त्यांना आनुवंशिक संस्कारांमुळे तो स्वयंसिद्ध वाटू लागला आहे, असा या सिद्धांताचा इतिहास ते दत असतात, तो कितपत खरा आहे हे ठरविण्याचे काम आम्ही वाचकांवरच सोपवतो. विकास होतो अगर उत्क्रांती होते ती त्या कल्पनांच्या स्वरूपात अगर विस्तारात होते. शून्यापासून ज्याप्रमाणे काहीही उत्पन्न होऊ शकत नाही, त्याप्रमाणे आमच्या नैतिक अगर धार्मिक कल्पना कोणत्याही सर्वस्वी अनैतिक कल्पनांपासून उत्पन्न होणे शक्य नाही (हीच गोष्ट संख्याविषयक अगर कार्यकारणभावविषयक कल्पनांच्या बाबतीतही खरी आहे). त्या तशा उत्पन्न होतात असे दाखविण्याचा जडवादी उत्क्रांतिवाद्यांचा प्रयत्न आहे; परंतु तो प्रयत्न सफळ होणे शक्य नाही. नैतिक अगर धार्मिक भावना अशा रीतीने स्वयंभू व जड सृष्टीतील उत्क्रांतीच्या आटोक्याच्या पूर्ण बाहेर असल्यामुळे, त्यांचा ऐतिहासिक पद्धतीने अभ्यास करतानाही त्यांना उत्क्रांतिवादातील दोष चिकटू शकत नाहीत व ती शास्त्रे आपले आध्यात्मिक स्वरूप जडवादाच्या संसर्गापासून अलिप्त व कायम ठेवतात असे आम्हास वाटते.

आता उत्क्रांतितत्त्ववादी लोकांकडून काही काही भावनांचा असा इतिहास देण्यात येतो की, तो खरा मानल्यास त्या भावनांची थोरवी कमी झाल्यावाचून राहत नाही; परंतु एक तर तो इतिहास विचारांती चुकीचा ठरतो. उदाहरणार्थ, परोपकाराच्या भावनेचा उगम स्वार्थी भावनेतच आहे असे उत्क्रांतितत्त्ववादी म्हणतात. याचा अर्थ असा होईल की, माझी परोपकाराची भावना केवळ दिखाऊ, म्हणजे आतील खऱ्या स्वार्थी भावनेचेच एक उत्क्रांत स्वरूप आहे. अशा रीतीने परोपकाराची भावना ही खरी स्वार्थाचीच भावना आहे असे ठरल्यास, तिचे उदात्तत्व अर्थातच नाहीसे होणार हे उघड आहे; परंतु हा अर्थ कोणीही विचारी मनुष्य मान्य करील असे वाटत नाही. तथापि हा मुद्दा जरी सोडून दिला तरी, माझ्या मनात या वेळी वास करीत असलेली भावना पूर्णपणे निःस्वार्थी, शुद्ध परोपकाराची आहे अशी माझी खात्री असल्यास, तिची थोरवी अगर सत्यता तिच्या कोणत्याही प्रकारच्या इतिहासाने, अगर तिची उत्क्रांती मूळ स्वार्थाच्या भावनेपासूनच झाली आहे या सिद्धांताने, यत्किंचितही कमी होऊ शकत नाही. दुसरे उदाहरण द्यावयाचे तर, 'कर्तव्याच्या भावनेचा उगम पोलीस शिपायांच्या अगर भुताखेतांच्या भीतीत आहे' या सिद्धांताचे देता येईल. एक काळ असा असेल की, ज्या वेळी लोक केवळ पोलीस शिपायाच्या किंवा भुताखेतांच्या

भीतीमुळेच एकमेकांच्या खिशात हात घालीत नसतील; परंतु आज आपली कर्तव्याची भावना अशा कोणत्याही तऱ्हेच्या भीतीने उत्पन्न झालेली अगर कृत्रिम बंधनाने मर्यादित झालेली नसूनही, आपण ती त्याज्य अगर भ्रामक मानीत नाही, उलट जास्त पवित्र मानतो.

ऐतिहासिक पद्धतीने आध्यात्मिक अगर मानसिक शास्त्रांचा अभ्यास करताना दुसरीही एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. पूर्वीच्या काळच्या मानसशास्त्राचा अगर नीतितत्त्वांचा अभ्यास करण्यास आपणाजवळ आपल्या हल्लीच्या (नैतिक, धार्मिक इ.) कल्पनांशिवाय दुसरे कोणतेही साधन नाही. कारण जड सृष्टीतील पदार्थांप्रमाणे प्राचीन काळच्या लोकांची मने काही अभ्यासासाठी आपणास उपलब्ध होणे शक्य नाही. अर्थात्च आपणास आपल्या हल्लीच्या नैतिक अगर धार्मिक कल्पनांची जितकी माहिती आहे, तितकी पूर्वीच्या लोकांच्या कल्पनांची असणे शक्य नसल्यामुळे, आपल्या कल्पना व भावना यांवरूनच आपण त्यांच्या कल्पना व भावना यांविषयी अनुमाने काढतो. अशा रीतीने या शास्त्रांच्या उत्क्रांतिवादातील नेहमीचा नियम आपणास बरोबर उरफाटा करून लावावा लागतो. तो नियम म्हणजे उत्क्रांतीतील खालच्या पायरीवरून. म्हणजे कमी उत्क्रांत झालेल्या गोष्टीचे स्पष्टीकरण करणे हा होय. जड सृष्टीतील उत्क्रांतीच्या सर्व पायऱ्या थोड्याबहुत प्रमाणात आपणास उपलब्ध असल्यामुळे, जड सृष्टीत हा नियम बराच उपयोगी पडतो यात संशय नाही. पुष्कळ प्राण्यांची शरीररचना ते ज्यांपासून उत्क्रांत झाले त्या प्राण्यांच्या शरीररचनेचा अभ्यास केला असता सुबोध होते; परंतु वर दिलेल्या कारणामुळे, जास्त विकास पावलेल्या आपल्या मनोरचनेवरून कमी विकास पावलेल्या प्राचीन काळच्या लोकांच्या मनोरचनेचा आपणास अभ्यास करावा लागतो व त्यांच्या कल्पनांचे स्पष्टीकरण करावे लागते. अशा रीतीने उत्क्रांतिवादाचा नियम आपणास या बाबतीत उलटा करून वरच्या पायरीवरून खालची पायरी रचावी लागते. हे काम अत्यंत कठीण व धोक्याचे आहे हे कोणीही कबूल करील. उदाहरणार्थ, आपल्या भूमितीच्या ज्ञानामुळे आपण सुंदर आकृती बनवू शकतो, म्हणून मधमाशीलाही आपले पोळे बनविण्यात तिच्या भूमितीच्या ज्ञानाचा उपयोग होत असला पाहिजे, असे कोणी अनुमान काढल्यास ते बरोबर होणार नाही.

वरील विवेचनावरून इतके दिसून येईल की, नीतितत्त्वांचा इतिहास शोधून काढणे ही गोष्ट अत्यंत कठीण व धोक्याची आहे. शिवाय अशा तऱ्हेचा इतिहास हा आपली आजची नीतितत्त्वे फोल ठरवू शकत नाही अगर त्यात बदलही करू शकत नाही. मग अशा इतिहासाचा उपयोग तरी काय, व अशा तहेने अभ्यास करण्यात व्यर्थ वेळेचा अपव्यय तरी का करावा, असा प्रश्न साहजिकच उपस्थित होणार आहे. या प्रश्नास उत्तर देण्याचा खालील विवेचनात प्रयत्न केला आहे.

ऐतिहासिक पद्धतीने नीतितत्त्वांचा अभ्यास करण्यापासून एक महत्त्वाचा फायदा असा होतो की, इतर सर्व बाबतीत ज्याप्रमाणे काळाच्या ओघाबरोबर फेरबदल अगर प्रगती होत

आहे, त्याप्रमाणे नीतितत्त्वांच्याही बाबतीत ही उत्क्रांती होत आहे ही गोष्ट या अभ्यासाने प्रामुख्याने सिद्ध होते. कोणत्याही एका काळची नीतितत्त्वे अगर कल्पना सर्वस्वी स्वयंभू, स्वयंसिद्ध, बिनचूक अगर शाश्वत मानणारांना या ऐतिहासिक अभ्यासाने चांगलेच उत्तर मिळेल यात शंका नाही. एक काळ असा होता की, ज्यावेळी गुलामगिरी ही एक पूर्णपणे नैतिक संस्था मानली जात होती. त्याप्रमाणेच मनुष्याचा देवतेपुढे बळी देणे ही गोष्ट तर एके काळी अत्यंत पवित्र व धार्मिक मानली जात हाती. प्रत्यक्ष प्लेटोच्या रेपब्लिक नामक ग्रंथामध्ये बायका या सामाईक मालकीच्या असाव्यात असे मत प्रतिपादन केलेले आढळते; पण आज त्याच कल्पना आपल्या अंगावर शहारे आणण्यास पुरेशा होतात. त्याचप्रमाणे आज ज्या गोष्टीत-उदाहरणार्थ बालविवाहआपणास गर्दा असे काहीच वाटत नाही, अशा कित्येक गोष्टी काही काळाने शिक्षेसही पात्र होतील. या ठिकाणी कोणी अशी शंका घेईल की, नीतिविषयक कल्पना जर वर म्हटल्याप्रमाणे काळाच्या ओघाबरोबर पालटत जाणाऱ्या असल्या तर त्यांचे पूर्ण बंधनकारकत्व अगर स्वतःप्रामाण्य कसे मानावे, व काळाबरोबर पालटणाऱ्या या लहरींना उदात्त नीतितत्त्वे तरी काय म्हणून मानावे? ही शंका निवारण करणे अगदी सोपे आहे. नीतितत्त्वे सर्वस्वी बंधनकारक व पूर्णपणे स्वतःप्रमाण (सेल्फ-एव्हिडंट) आहेत हे खरे; पण त्याचा अर्थ, सर्व नीतितत्त्वे सर्व काळी, सर्व स्थळी, सर्व व्यक्तींनी पाळलीच पाहिजेत, असा नाही. स्थलकालाचा, परिस्थितीचा पूर्ण विचार करून जर एखादी गोष्ट करणे नीतिदृष्ट्या योग्य आहे असे मला वाटले तर मात्र मी ती केलीच पाहजे, या अर्थाने नीतितत्त्वे सर्वस्वी बंधनकारकच आहेत, व अशा रीतीने विचार करून जर एखादी गोष्ट मला नीतिदृष्ट्या योग्य वाटली, तर मला ती तशी का योग्य वाटली या प्रश्नास काही कारण द्यावे लागत नाही या अर्थाने सर्व नीतितत्त्वे स्वतःसिद्धच आहेत. यावरून नीतितत्त्वांची प्रगती ही त्यांच्या स्वतःप्रामाण्याच्या अगर बंधनकारकत्वाच्या आड येऊ शकत नाही हे थोडा विचार केला असता कळून येणार आहे.

ऐतिहासिक पद्धतीच्या योगाने शारीरिक, बौद्धिक, नैतिक वगैरे सर्व बाबतीत उत्क्रांती होत आहे हे तर स्पष्ट होतेच; परंतु ती उत्क्रांती कसकशी व कोणकोणत्या कारणांनी होत जाते हेही कळून येते. कोणत्याही काळच्या नैतिक अगर धार्मिक भावनांवर त्या काळच्या परिस्थितीचा परिणाम होतो अगर छाप पडलेली दिसते हे विधान कित्येकास विचित्र वाटेल. खरी नीतिमत्ता ही परिस्थितीने कधीही बांधली जात नाही असेच सकृद्दर्शनी सर्वांस वाटते; परंतु ऐतिहासिक पद्धतीने विचार केल्यास, उत्क्रांतिवादातील 'जीवितासाठी धडपड', 'बळी तो कान पिळी' ही ठराविक प्रमेये नैतिक अगर धार्मिक कल्पनांच्याही बाबतीत एका अर्थाने खरी ठरतात, व आपल्या नैतिक अगर धार्मिक भावनादेखील काही अंशी परिस्थितीवर अवलंबून व परिस्थितीबरोबर बदलत जाणाऱ्या असतात हे दिसून येते. यावरून नैतिक भावना या केवळ परिस्थितीच्या फिरत्या चक्रातून उत्पन्न होणाऱ्या ठिणग्या आहेत, अगर

त्या सर्वस्वी परिस्थितीवर अवलंबून असतात असे मानण्याचे कारण नाही. केवळ बाह्य परिस्थितीच्या योगानेच नैतिक अगर धार्मिक कल्पनांचा उगम होत असता तर तो पशुपक्षी किंवा झाडे यांमध्येही झाला असता. तसा तो होत नाही याचे कारण, या भावनांचे खरे मूळ परिस्थितीत नसून मनुष्याच्या मनामध्ये आहे, व याच दृष्टीने या भावना स्वयंभू व स्वतःसिद्ध आहेत. मात्र त्यावर परिस्थितीचा थोडासा परिणाम होतो इतकेच. भूमितीचा सिद्धांत फळयाच्या पृष्ठावर मांडला तरी त्याला त्याचा यत्किंचितही बोध होत नाही; परंतु मनुष्याला तो दुरून दिसला तरी त्याचे ज्ञान होते, यातच त्याची थोरवी आहे. परिस्थितीचा परिणाम होण्यासही पात्रता लागते व ती मनुष्याच्या अंगी आहे, इतकेच नव्हे, तर आपल्या कर्तबगारीने परिस्थिती थोडीफार बदलण्याची शक्तीही त्याच्या अंगी आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

असो. कोणत्याही काळच्या सामाजिक, राजकीय व भौगोलिक परिस्थितीचाही त्या काळाच्या समाजाच्या नैतिक व धार्मिक भावनांवर परिणाम होतो हे थोड्या विचारांती कोणासही दिसून येईल. यासाठी कोणत्याही नैतिक अगर धार्मिक समजुतीवर टीका करताना अगर त्या बदलण्यापूर्वी, त्या समजुती कोणत्या काळी, कोणत्या परिस्थितीत व कोणत्या कारणांनी उत्पन्न झाल्या याचा विचार करणे जरूर आहे. आज कदाचित ती परिस्थिती बदलली असल्यामुळे आपणास त्या समजुती मूर्खपणाच्या अगर निरर्थक वाटत असतील; परंतु ज्या परिस्थितीत त्या उत्पन्न झाल्या व टिकल्या त्या परिस्थितीत त्यांना तशीच सबळ कारणे असण्याचा बराच संभव आहे हे विसरता कामा नये; व ती कारणे अगर ती परिस्थिती अजून अस्तित्वात असल्यास त्या समजुतीत एकदम कोणताही मोठा फेरबदल करण्यापूर्वी आपणास फार विचार केला पाहिजे. आपल्या इकडील सामाजिक सुधारणेचा इतिहास पाहिला असता अशा तऱ्हेची खबरदारी घेण्याची किती जरूर आहे हे दिसून येईल. यावरून कोणत्याही काळच्या समजुती त्याकाळच्या समाजाला पोषक अगर सुखदायक असतातच असे उत्क्रांतितत्त्ववादी समजतात त्याप्रमाणे-समजावयाचे नाही. उलटपक्षी, त्या समजुती केवळ आजच्या समाजाला पोषक अगर सुखदायक नाहीत, म्हणून ज्या काळी त्या रूढ झाल्या त्या काळीही त्या तशा नसतीलच असेही म्हणता यावयाचे नाही, हे ऐतिहासिक पद्धतीने आपणास शिकवले आहे; परंतु अशा सर्व दृष्टींनी विचार करूनही, ज्या समजुती अगर कल्पना आपल्या सदसद्विवेकबुद्धीला सर्वस्वी त्याज्य वाटतील त्या, केवळ त्या अत्यंत प्राचीन, रूढ झालेल्या आहेत एवढ्याच कारणासाठी, टाकू नयेत असेही म्हणणे अयोग्य होईल मात्र तसे करताना जी धोक्याची सूचना द्यावयाची ती या ऐतिहासिक पद्धतीने दिलेली आहे. किंबहुना, कित्येक समजुतींना केवळ रूढी, पूर्वग्रह अगर भुताखेतांची आज नष्ट झालेली भीती, यांखेरीज दुसरा काहीही सबळ आधार अगर कारण नाही, असे त्यांच्या ऐतिहासिक अभ्यासाने दिसून आल्यास, त्या समजुती ताबडतोब टाकून देण्यास अगर बदलण्यासच अशा अभ्यासाने उत्तेजन मिळेल हे उघड आहे व असे होणे योग्यही आहे.

कित्येकदा असे होते की, पूर्वी रूढ असलेल्या समजुती अगर तत्त्वे विचारांती आपण कायम ठेवतो, इतकेच नव्हे तर अधिक दृढ करतो; परंतु पूर्वी ज्या कारणांसाठी त्या रूढ झाल्या ती कारणे मात्र आपण त्याज्य समजतो. उदाहरणार्थ, झाडाखाली निजू नये ही शिकवण आपण आजही मान्य करतो; परंतु तसे केल्यास झाडावरील भूत पछाडील हे कारण आपणास मान्य नसून, ती झाडे सोडीत असलेला कार्बोनिक ॲसिड गॅस आपल्याला अपाय करील हे त्याचे आपण खरे कारण समजतो. स्कॉच लोक रविवारी शिटी वाजविणे हे मोठे पाप असून त्याबद्दल ईश्वर शिक्षा करतो असे समजत असत; परंतु आज स्कॉच लोकांना त्या दिवशी शिटी न वाजविणे बरे वाटत असले तरी, विश्रांतीला व प्रार्थनेला जरूर असणाऱ्या शांततेसाठी घातलेला एक नियम यापलीकडे त्याचे काही महत्त्व वाटत नाही व वाटण्याचे कारणही नाही. हीच गोष्ट आपल्यातील 'लोकभ्रम' या सदरात पडणाऱ्या बहुतेक समजुतींना लागू पडेल यात शंका नाही. अशा रीतीने जी तत्त्वे सकृद्दर्शनी आपणास अगदी स्वतःसिद्ध अगर उदात्त वाटतात, त्याचे खरे कारण व इतिहास कळल्याने आपणास त्याचे खरे स्वरूप व महत्त्व कळून येते व त्यात योग्य तो बदल करता येतो. निदान त्या समजुतींविषयीचे आपले पूर्वग्रह नाहीसे होऊन त्याच्या बरेवाईटपणाविषयी निर्विकार माने विचार करता येतो. ज्यांना केवळ शास्त्राकडे अगर रूढीकडे बोट दाखवून व लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन, किंबहुना त्यांच्या चौकसबुद्धीला बंडखोरपणा हे नाव देऊन, जुन्या समजुतीच समाजात चिरकाल टिकवावयाच्या असतील अशा पुराणमताभिमानी लोकांस ही ऐतिहासिक पद्धती आवडू नये हे स्वाभाविकच आहे; परंतु अज्ञानाच्या पायावर रचलेल्या समजुती फार वेळ टिकत नसतात अगर अंती हितकारक कधीही होत नाहीत हे त्यांनी ध्यानात ठेवावे.

नीतिशास्त्राच्या ऐतिहासिक अभ्यासाने आणखी एक गोष्ट सिद्ध झालेली आहे. समाजातील, किंबहुना सर्व सृष्टीतील, जीवनकलहामध्ये 'बळी तो कान पिळी' या तत्त्वाची अंमलबजावणी नेहमी चालू असते. समाज टिकण्याला व त्याची वाढ होण्याला, त्यात राहण्याला अगदी अयोग्य व कममुवत असलेले घटक हळूहळू नाहीसे होणे, व योग्य व मजबूत घटक टिकणे व वाढणे अत्यंत जरूर असते, व ही क्रिया सर्व बाबतीत आपोआप होतच असते. मात्र नीतिशास्त्राच्या बाबतीत 'योग्य' अगर 'मजबूत' या शब्दांचा अर्थ शारीरिकदृष्ट्या योग्य असा करावयाचा नसून नीतिदृष्ट्या योग्य असा केला पाहिजे. शिवाय जड सृष्टीत अगर पशुपक्ष्यांत ही क्रिया जितकी आपोआप होते तितकी मानवी-आध्यात्मिक-सृष्टीत होत नाही; परंतु थोड्याबहुत प्रमाणात ही क्रिया याही सृष्टीत होत असते असे दिसून येईल. जी नीतितत्त्वे समाजाला पोषक व हितकारक असतात तीच अखेरीस टिकाव धरून सर्वमान्य होतात व बाकीची हळूहळू नाहीशी होतात; परंतु वर म्हटल्याप्रमाणे ही क्रिया सर्वस्वी आपोआप होत नसल्यामुळे, व नीतिशास्त्राच्या दृष्टीने होणे इष्टही नसल्यामुळे समाजातील सर्व लोकांनी समाजाला अहितकारक समजुती नाहीशा करून, उदात्त व

हितकारक तत्त्वांचा समाजात प्रसार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, व अशा रीतीने या उत्क्रांतीला आपले पाठबळ दिले पाहिजे.

वरील विवेचनावरून इतके दिसून येईल की, नीतिशास्त्रासारख्या स्वतंत्र व स्वतःसिद्ध तत्त्वांचा सुद्धा ऐतिहासिक पद्धतीने अभ्यास केल्यास त्या तत्त्वांची अधिक चांगली ओळख करून घेता येते. अर्थात् वर म्हटल्याप्रमाणे अशा अभ्यासापासून केवळ नवीन तत्त्वे अगर सिद्धांत उत्पन्न होऊ शकले नाहीत, तरी त्या शास्त्राची प्रगती कोणत्या दिशेने होत आली आहे हे समजल्यामुळे, पुढे आपण ती प्रगती कोणत्या दिशेने चालवावयाची ती दिशा अनायासेच उपलब्ध होते, व त्या दिशेने पुढे विचार करण्यास चलन मिळते. शिवाय इतर शास्त्रांप्रमाणेच आजचे आपले नीतितत्त्वांचे ज्ञान हे सर्व आपल्याच कल्पकतेचे अगर विचारांचे फळ नसून, याही बाबतीत आपण आपल्या पूर्वजांचे किती ऋण लागतो हे ऐतिहासिक पद्धतीने आपल्या निदर्शनास आणून दिले आहे. उदाहरणार्थ, भौतिकशास्त्रांचा इतिहास पाहिल्यास, न्यूटनने काढलेल्या सिद्धांताकडे जर त्याच्या मागून झालेल्या शास्त्रज्ञांनी दुर्लक्ष केले असते, अगर पूर्वीच्या शोधांशी आपणास काय करावयाचे आहे, असे म्हटले असते तर त्या शास्त्रांची वाढ इतकी झाली असती काय? हीच गोष्ट इतर कोणत्याही शास्त्राच्या बाबतीत खरी आहे. कोणत्याही शास्त्रात जी प्रगती होते ती पूर्वीच्या शोधांच्या-पूर्वीच्या लोकांनी केलेल्या परिश्रमाच्या पायावर पुढच्या लोकांनी उभे राहून त्यांचे कार्य पुढे चालविल्यानेच होऊ शकते. प्रत्येकाने जर गुरुत्वाकर्षणाचा नियम स्वतः पुन्हा शोधून काढण्यापासून सुरुवात करू म्हटले तर त्या विषयात कधीही प्रगती होणार नाही व अशा प्रयत्नात काही अर्थही नाही. आमच्या आधीच्या लोकांनी काय काय करून, शोधून, लिहून ठेवले आहे, त्यांचे आचार कसे होते, विचार कोणत्या प्रकारचे होते, या सर्व गोष्टींचा काळजीपूर्वक अभ्यास करून, त्यांनी तयार केलेल्या शिडीचा धिक्कार न करता तिच्या आधारानेच आपण पुढील मार्ग आक्रमिला पाहिजे. 'थेंबे थेंबे तळे साचे' या न्यायाने, आज आपणापाशी जो ज्ञानाचा साठा आहे तो अनेक शतकांच्या अनेक युगांच्या विचारांचे व परिश्रमांचे फळ आहे; पूर्वीचे थेंब आपण शोधून जतन करून ठेवल्याचा व त्यांचा योग्य उपयोग केल्याचा तो परिणाम आहे, व जितके थेंब आपण काळाच्या उदरात गडप होऊ दिले त्या मानाने आपला हा साठा कमी झाला आहे.

कोणत्याही शास्त्राच्या प्रगतीला त्या शास्त्राच्या ऐतिहासिक अभ्यासाची किती जरूर आहे हे याहून अधिक विशद करून लिहिण्याची जरूर नाही. अशा तऱ्हेचा अभ्यास सुगम होण्यासाठी प्रत्येक शास्त्राचा इतिहास लिहिला जाणे अत्यंत आवश्यक आहे. पौर्वात्य तत्त्वज्ञानाचा संगतवार व सविस्तर इतिहास आपणास उपलब्ध नसल्यामुळे आल्या प्राचीन काळच्या अनेक उत्तम शास्त्रास व विचारसंग्रहास आपण मुकलो आहो. कित्येक ग्रंथ व कित्येक पंथ आज अजिबात लुप्त झालेले आहेत, व त्या मानाने आपली त्या शास्त्रातील

प्रगतीही शिथिल झालेली आहे. ही तात्त्विक दृष्टी जरी सोडली तरी केवळ ऐतिहासिक दृष्ट्यादेखील आपली मोठीच हानी झाली आहे. तरी या सर्व गोष्टींचा विचार करून यापुढे तरी आपल्या देशातील विचार काळाच्या उदरात गडप होऊ न देण्याची सर्वांनी खबरदारी घ्यावी अशी विनंती करून हे प्रकरण पुरे करतो.

❍❍❍

परिशिष्ट (अ)

नीतिशास्त्र व इतर शास्त्रे

नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान यांचा संबंध काय आहे हे आम्ही आठव्या प्रकरणात दर्शवलेच आहे. नीतिशास्त्राचा इतर काही शास्त्रांशी काय संबंध आहे याचे अगदी त्रोटक दिग्दर्शन या ठिकाणी करण्याचे योजिले आहे.

१. वर्णनात्मक व ध्येयविशिष्ट शास्त्रे-सर्व शास्त्रांचे सामान्यतः दोन विभाग कल्पिता येतील. खगोलशास्त्र, भूगर्भशास्त्र अगर पदार्थविज्ञानशास्त्र यांसारखी काही शास्त्रे, सृष्टीत कोणकोणत्या क्रिया आपोआप, नैसर्गिक रीतीने घडत आहेत, याचे वर्णन करतात. त्या वर्णनात कोणत्याही ध्येयाचा अगर त्या क्रियांच्या योग्यायोग्यतेचा प्रश्नच उद्भवत नाही. अशा रीतीने या शास्त्रांस नैसर्गिक अगर वर्णनात्मक शास्त्रे (Natural Sciences) असे नाव देता येईल. उलटपक्षी, नीतिशास्त्र, तर्कशास्त्र, राज्यशास्त्र यांसारख्या नीतिशास्त्राचे कार्य केवळ वर्णनात्मक नसून, आपल्या नीतिमत्तेचा, तर्कशुद्ध विचाराचा अगर राजनीतीचा आदर्श व ध्येय निश्चित करून, त्या ध्येयाच्या दृष्टीने विशिष्ट आचारविचारांची कमीअधिक योग्यता ठरवणे हे या शास्त्रांचे मख्य कार्य असते. म्हणन या शास्त्रांस ध्येयविशिष्ट शास्त्रे (Normative Sciences) असे म्हणण्यास हरकत नाही. अर्थात् अशा ध्येयविशिष्ट शास्त्रांसदेखील वर्णनात्मक कार्य थोडेबहुत करावेच लागते; उदाहरणार्थ, नीतिशास्त्रास अगर तर्कशास्त्रास, प्राचीन काळच्या लोकांच्या नीतिविषयक कल्पना अगर त्यांची तर्कपद्धती यांचे ऐतिहासिक दिग्दर्शन करावेच लागते व त्या शास्त्रांच्या प्रगतीस अशा ऐतिहासिक दृष्टीची किती जरूर आहे याचे विवेचन आम्ही मागील प्रकरणात केलेच आहे; पण हे ऐतिहासिक, वर्णनात्मक कार्य आवश्यक असले तरी, ते या शास्त्रांचे मुख्य कार्य नसून गौण आहे, व ध्येयविशिष्ट दृष्टी व विवेचन हाच त्या शास्त्रांचा मुख्य विषय समजला पाहिजे. नीतिशास्त्र हे ध्येयविशिष्ट शास्त्र असल्यामुळे त्या शास्त्राचे मुख्य कार्यही ध्येयविशिष्टच आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

२. नीतिशास्त्र व भौतिकशास्त्रे-वर सांगितल्याप्रमाणे नीतिशास्त्र हे तात्त्विक व ध्येयविशिष्ट, तर भौतिकशास्त्रे ही जडसृष्टीविषयक व वर्णनात्मक; अर्थात नीतिशास्त्राचा भौतिक शास्त्रांशी फारच थोडा संबंध पोहोचतो हे उघड आहे. जडसृष्टीत अबाधित असलेला यांत्रिक कार्यकारणभाव मानवी नैतिक जीवनात कसा लागू पडत नाही हे आम्ही दहाव्या प्रकरणात दर्शवलेच आहे; परंतु भौतिक शास्त्रांच्या ज्ञानाचा उपयोग मात्र मनुष्यास आपला व्यावहारिक वर्तनक्रम निश्चित करताना पदोपदी होतो हे कबूल केले पाहिजे. कोणतेही कार्य हाती घेण्यापूर्वी, भोवतालच्या मानवी समाजाची नव्हे, तर जडसृष्टीचीदेखील परिस्थिती व वातावरण कशी आहेत याचा विचार करणे, व आपल्या कृत्यांचा इतर व्यक्तींवर व इतर निर्जीव वस्तूंवरदेखील काय परिणाम होईल हे पाहणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे आपण ज्या ठिकाणी राहतो अगर जातो तेथील हवामानाप्रमाणे अगर तेथील अन्नपाण्याच्या गुणधर्माप्रमाणे आपला पोषाख व आहारविहार आपणास ठरवावा लागतो. सृष्टीतील कोणती स्थळे, कोणती फळे, कोणत्या वनस्पती, कोणती हवा आपणास हितकारक आहे याचा विचार करून न वागल्यास लवकरच आपला शारीरिक व मानसिक, व त्याचबरोबर ओघानेच बौद्धिक व नैतिक हास झाल्यावाचून राहणार नाही. शिवाय, भौतिकशास्त्रांच्या ज्ञानाबरोबरच आपली बौद्धिक उन्नती होते, व ही बौद्धिक उन्नती नैतिक उन्नतीसही पोषकच होते हे उघड आहे. सारांश, भौतिकशास्त्रे ही मनुष्यास त्याच्या कार्यक्षेत्राची व त्यातील खांचाखळग्यांची माहिती करून देऊन त्यास आपले वर्तन ठरविण्यास मदत करतात, या दृष्टीने नीतिशास्त्र व भौतिकशास्त्रे यांचा संबंध जोडता येईल.

३. नीतिशास्त्र व जीवशास्त्र-भौतिकशास्त्रांप्रमाणेच जीवशास्त्राशीही (Biology) नीतिशास्त्राचा फारसा निकट संबंध आहे असे म्हणता येणार नाही. काही अर्वाचीन, विशेषतः उत्क्रांतितत्त्ववादी लोक हा संबंध फार निकट आहे असे म्हणतात व कार्याकार्य ठरविण्याची त्यांची कसोटीही त्या मतास अनुसरून अशीच आहे. ज्या कृत्याच्या योगाने आपले जीवन अगर आयुष्य अधिक लांबेल व अधिक सुखमय होईल, व मनुष्यजातीची वाढ होईल ते कृत्य चांगले व तद्विरुद्ध कार्य ते वाईट, असे त्यांचे म्हणणे आहे. या मतातील दोष आम्ही मागील प्रकरणात दर्शविलेच आहेत. एका दृष्टीने स्वतःचा जीव बचावणे व मानवजातीची वृद्धी करणे हे प्रत्येक मनुष्याचे कर्तव्य आहे हे आम्हास मान्य आहे; परंतु वरील कसोटी सर्वस्वी मान्य केल्यास, आत्मयज्ञच काय पण कोणत्याही प्रकारचा अल्प स्वार्थत्यागही अयोग्य व अनैतिक मानावा लागेल; कारण परोपकारात अगर ज्ञानार्जनात देह झिजवल्यास आपली आयुर्मर्यादा थोडीतरी कमी झाल्यावाचून राहणार नाही. अखंड ब्रह्मचर्य हे तर वरील मताप्रमाणे शिक्षेसच पात्र ठरेल! सारांश, स्वार्थी व पशुवत् जीवन हेच या विचारसरणीप्रमाणे मनुष्याचे आद्य कर्तव्य ठरते. ही विचारसरणी कोणाही सुज्ञ मनुष्यास मान्य होण्याजोगी नसल्यामुळे, जीवशास्त्रास नीतिशास्त्राशी फारशी लगट करता येणे शक्य

नाही हे उघड आहे. जीवशास्त्राचा नीतिशास्त्रास उपयोग इतकाच की, मनुष्य सोडून इतर प्राण्यांच्या जीवनाचा सूक्ष्म अभ्यास केल्यास, त्यांच्या व आपल्या जीवनातील फरक व आपल्या नैतिक कल्पनांचे अपूर्वत्व व श्रेष्ठत्व या गोष्टी प्रामुख्याने आपल्या नजरेस येतात.

४. नीतिशास्त्र व मानसशास्त्र-नीतिशास्त्राचा मानसशास्त्राशी संबंध वरील दोन्ही शास्त्रांहून अधिक निकट आहे; इतकेच नव्हे तर, एका रीतीने मानसशास्त्र हे नीतिशास्त्राचे आधारभूत शास्त्र आहे असे म्हणण्यास हरकत नाही. आपल्या वर्तनास योग्य दिशा दाखविणारी नीतितत्त्वे, शारीरिक व मानसिक प्रवृत्ती यांचा अंश किती, व या सर्व गोष्टींमुळे आपला नैतिक विकास कसा होत जातो याचे ज्ञान मानसशास्त्र आपणास करून देते. किंबहुना, कार्याकार्य ठरविण्यापूर्वी आपल्या मानिसक शक्तीचा व त्या शक्तीच्या मर्यादांचा विचार करणे आवश्यक असते. कोणत्याही मनुष्याने मुळीच विश्रांती न घेता चोवीस तास ज्ञानार्जनात अगर आध्यात्मिक उन्नतीत घालवावे, अगर परिपूर्ण एकांतवासात, मौनव्रत धारण करून राहावे असे म्हणणे म्हणजे मनुष्यस्वभावाविषयी व त्याच्या मानसिक शक्तीविषयी अज्ञान प्रकट करणे होय. ज्याप्रमाणे कोणत्याही मनुष्याकडून त्याच्या शारीरिक शक्तीच्या अगदी बाहेर अशा कामाची अपेक्षा करणे अयोग्य ठरेल, त्याचप्रमाणे त्याच्या नैसर्गिक स्वभावाविरुद्ध अगर मानसिक शक्तीच्या अगदी आटोक्याबाहेर असलेले कर्तव्य त्याजवर लादणे योग्य होणार नाही. ज्याप्रमाणे एखाद्या मनुष्यास कोणत्याही साधनाशिवाय हवेत उडण्यास सांगणे अगर ताशी पाचशे मैल चालण्यास सांगणे हास्यास्पद होईल, त्याचप्रमाणे त्याच्या मानसिक अगर बौद्धिक शक्तीचा विचार केल्याखेरीज त्याजकड़न एकदम उच्च प्रकारच्या कार्याची अपेक्षा करणे योग्य होणार नाही. सर्व सद्गुणांचे व दुष्कर्मांचेही उगमस्थान मन हेच असल्यामुळे त्या मनोरचनेची परिपूर्ण माहिती असणे नीतिशास्त्रास आवश्यक आहे व अशा रीतीने मानसशास्त्रास हा नीतिशास्त्राचा पाया आहे असे म्हणता येईल.

५. नीतिशास्त्र व समाजशास्त्र-परंतु मनुष्याच्या मनोव्यापारांची खरी वाढ व उन्नती, त्याच्या सभोवतालच्या मनुष्यांशी, म्हणजे समाजाशी पदोपदी येणाऱ्या संबंधाखेरीज अगर संघटनाखेरीज मनुष्याची कोणत्याच प्रकारची वाढ होणे शक्य नाही हे उघड आहे. अगदी लहान वयापासून मुलाचा शारीरिक व मानसिक विकास मुख्यत्वेकरून इतर व्यक्तींचे अवलोकन व अनुकरण यांच्या योगानेच होत असतो. त्याच्या प्रगतीचे मुख्य साधन जी भाषा ती ज्यास अनुकरणानेच अवगत होते. ऑरिसस्टॉटलने म्हटल्याप्रमाणे, मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे, व त्याचे सर्व आचरण, आम्ही तिसऱ्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे, सामाजिक चालीरीती, रूढी, राजकीय बंधने यांच्या योगाने बहुतांशी निश्चित झालेलेच असते. यामुळे मनुष्याच्या वर्तनाचा विचार करताना त्याच्या भोवतालची सामाजिक परिस्थिती, त्यातील रीतिरिवाज व नीतिविषयक कल्पना यांचा अभ्यास करणे जरूर असते. अशा रीतीने नीतिशास्त्राचा समाजशास्त्राशी फारच निकट संबंध आहे हे दिसून येईल.

६. नीतिशास्त्र व राज्यशास्त्र-समाजशास्त्राची व्याप्ती फार मोठी असून राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र या सर्व समाजशास्त्राच्या शाखा होत. प्रत्येक मनुष्य हा कोणत्यातरी समाजाचा व राज्यव्यवस्थेचा घटक असल्यामुळे, त्याच्या वर्तनाचा विचार करताना त्याचा त्या राज्यव्यवस्थेशी कोणत्या प्रकारचा संबंध असला पाहिजे हा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. उलट, राज्यव्यवस्था ज्यांच्या हाती असेल त्यांनीही प्रत्येक व्यक्तीला कसे वागवावे, तिला स्वातंत्र्य किती द्यावे व त्या व्यक्तिस्वातंत्र्यास कोणत्या मर्यादा घालाव्या हे प्रश्नही त्याबरोबरच उत्पन्न होतात. या व्यक्तिस्वातंत्र्याविषयी निरनिराळ्या कल्पना जगाच्या पाठीवर प्रचलित असल्यामुळे वेगवेगळ्या प्रकारच्या राज्यघटना आपणास पाहावयास मिळतात. कोणत्याही मनुष्यास व्यक्तिस्वातंत्र्य असणे मुळीच इष्ट नसून, सर्व राजकीय सत्ता एका व्यक्तीच्या अगर थोड्याशा निवडक व्यक्तींच्या समूहाच्या हाती असावी असे मत कित्येक लोक प्रतिपादन करतात, तर त्याच्या उलट, प्रत्येक व्यक्तीस त्या राज्यव्यवस्थेच्या कामात एकसारखेच हक्क व एकसारखेच स्वातंत्र्य असावे असेही मत प्रतिपादन करणारे लोक अनेक आढळतात. या दोन्ही टोकांच्या मधलीही अनेक मते आपणास पाहावयास मिळतात. यांपैकी कोणतेही मत ग्राह्य मानले तरी, आम्ही चौथ्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे, केवळ वैयक्तिक आत्मोन्नती करून घेणे हे कोणत्याही मनुष्याचे अंतिम ध्येय असणे इष्ट नसून, तो ज्या समाजात व ज्या राज्यव्यवस्थेत राहतो त्या समाजाची व त्या राज्यव्यवस्थेची सुधारणा करणे हेही त्याचे मुख्य कर्तव्य होय. ऑरिसस्टॉटलने या सामाजिक व राजकीय जीवनास इतके महत्त्व दिले आहे की, वैयक्तिक नीतिशास्त्र ही केवळ राज्यशास्त्राची एक शाखा होय, असे मत त्याने प्रतिपादन केले आहे. या मतात थोडी अतिशयोक्ती असली तरी राज्यशास्त्राचा नीतिशास्त्राशी किती निकट संबंध आहे हे त्यावरून स्पष्ट होते.

७. नीतिशास्त्र व अर्थशास्त्र-मनुष्याचे नैतिक व पारमार्थिक हित पाहणे हे नीतिशास्त्राचे कार्य, तर त्याचे व्यावहारिक व आर्थिक हित साधणे हे अर्थशास्त्राचे साध्य होय. धनधान्य व इतर सखसोयींची साधने त्यांची उत्पत्ती व वाढ हा अर्थशास्त्राचा विषय आहे. अर्थात कोणत्याही प्रकारचे ऐहिक अगर व्यावहारिक सुख व नैतिक अगर आध्यात्मिक उन्नती या दोन गोष्टी सर्वस्वी परस्परविरोधी आहेत असे मानण्यास नीतिशास्त्र व अर्थशास्त्र ही शास्त्रेही परस्परविरोधी आहेत असे म्हणावे लागेल; पण या ग्रंथात मान्य केलेल्या विचारसरणीप्रमाणे, सर्व प्रकारचे व्यावहारिक हित व सुखदेखील समाजहिताच्या दृष्टीने व नीतिमत्तेच्या कक्षेत राहून साधण्याचा यत्न केल्यास, नीतिशास्त्र हे अर्थशास्त्रास विरोधी न होता उलट पोषक, किंबहुना मार्गदर्शकच होईल. अर्थप्राप्ती अगर सुखप्राप्ती हे मनुष्याचे अंतिम ध्येय आहे असे मानणे सर्वस्वी चुकीचे असले तरी, प्रत्येक मनुष्यास आपल्या व आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी द्रव्य संपादन करणे अत्यंत आवश्यक असते हे कोणीही कबूल करील. शिवाय, सर्व प्रकारच्या व्यावहारिक गरजांकडे पूर्ण दुर्लक्ष करणे हे खऱ्या नैतिक उन्नतीस आवश्यकच आहे असे म्हणता येणार नाही. जीवनकलहाने अत्यंत व्यथित झालेल्या अशा

मनुष्याच्या हातून स्वतःचे अगर इतरांचे कितपत कल्याण होईल हा प्रश्नच आहे. वेदकालीन ऋषिवर्यांनीदेखील प्रजापतीची प्रार्थना करताना धनधान्यसमृद्धी मागितलेली आहे हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. बायबलमध्येही 'हे देवा, मला रोजची भाकरी दे,' अशी प्रार्थना आपणास आढळते. 'अर्थस्य पुरुषो दासः' हे वचन पूर्णपणे खरे नसले तरी, अर्थावाचून मनुष्याची सर्वच प्रकारची प्रगती खुंटते हे नाकबूल करता येणार नाही. अर्थात द्रव्यार्जनाच्या मागे लागलेला मनुष्य पुष्कळ वेळा द्रव्य हेच आयुष्याचे ध्येय आहे असे मानू लागतो हे खरे आहे; पण वर सांगितल्याप्रमाणे, त्याने आपले खरे ध्येय डोळ्यांपुढे ठेवून नैतिक उन्नतीच्या मर्यादा न ओलांडल्यास, त्याची आर्थिक उन्नती ही त्याच्या आत्मोन्नतीस विरोधी न होता पोषकच होईल. सारांश, नीतिशास्त्र हे मनुष्याच्या अर्थप्राप्तीस विरोधी न होता त्या अर्थप्राप्तीची योग्य दिशा व तिच्या मर्यादा दर्शविणारे शास्त्र असल्यामुळे, ही दोन शास्त्रे परस्परविरोधी आहेत असे मानण्याचे मुळीच कारण नाही.

८. नीतिशास्त्र व शिक्षणशास्त्र-शिक्षणाची दिशा ही केव्हाही आपणास विद्यार्थ्यांमध्ये ज्या सदगुणांची वाढ करणे व त्यांना ज्या प्रकारचे नागरिक बनवणे श्रेयस्कर वाटत असेल त्यावर अवलंबून राहणार हे उघड आहे. आजचे विद्यार्थी हेच उद्याचे नागरिक असल्यामुळे त्यांचे शीलसंवर्धन योग्य प्रकारे कसे होईल हे पाहणे शिक्षणशास्त्रास आवश्यक आहे. यासाठी त्यास नीतिशास्त्राचे ज्ञान असणेही आवश्यक आहे हे उघड आहे. अशा रीतीने नीतिशास्त्र हे शिक्षणशास्त्रास साह्यकर असे शास्त्र आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

९. नीतिशास्त्र, तर्कशास्त्र व सौंदर्यशास्त्र-ही तिन्ही शास्त्रे ध्येयविशिष्ट व सारख्याच दर्जाची आहेत. नैतिक उन्नतीची दिशा दाखवणे हे नीतिशास्त्राचे कार्य, तर तर्कशुद्ध विचाराच्या योगाने सत्यान्वेषण करणे हे तर्कशास्त्राचे, व कलाकौशल्याच्या योगाने सौंदर्यसाधन करणे हे सौंदर्यशास्त्राचे (Esthetics) ध्येय आहे असे म्हणता येईल. अर्थात ही तिन्ही शास्त्रे अगदी भिन्न भिन्न नसून परस्परांस पोषकच आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. जी गोष्ट नैतिक आहे ती केव्हाही असत्य असू शकणार नाही व असत्य गोष्टीस कोणी नैतिकही म्हणणार नाही. त्याचप्रमाणे असत्य अगर अनैतिक गोष्ट सुंदर दिसली तरी तिचे सौंदर्य केवळ बाह्य व क्षणिक असेच असणार. प्लेटोने आपल्या ग्रंथात हेच तत्त्व प्रतिपादन केले आहे. सर्वश्रेष्ठ असे सत्य तेच सर्वोत्तम सत्य होय, (The Highest Idea is the Idea of the Good) व कलेच्या व सौंदर्याच्या उपासकानेदेखील आभासांच्या मागे न लगता, ज्या योगाने सत्याचा व नीतिमत्तेचा विकास होईल अशाच कलेची जोपासना करावी; चित्रकाराने अंतर्बाह्य सुंदर अशा ईश्वराचीच चित्रे काढावी व कवीने सर्वशक्तिमान व विश्वपालक अशा परमेश्वराचेच गुण गावे, असे प्लेटो म्हणतो. या शिकवणीत सर्व जीवनाचे सार ग्रथित केलेले नाही असे कोण म्हणेल?

○○○

परिशिष्ट (आ)

रेव्हरंड मॅकेन्झी व भारतीय नीतिशास्त्र

या पुस्तकाच्या प्रथमावृत्तीनंतर प्रसिद्ध झालेल्या दोन ग्रंथांचा या ठिकाणी उल्लेख करणे जरूर आहे. पहिले पुस्तक रेव्हरंड जॉन् मॅकेन्झी यांचे Hindu Ethics (Religious Quest of India series) व दुसरे प्रो हॉपकिन्स यांचे Ethics of India (Yale University Press) हे होय. रेव्हरंड मॅकेन्झी यांचे पुस्तक ज्या ग्रंथमालेमध्ये गोवले आहे तीवरून त्या पुस्तकातील विचारसरणी व त्यात ग्रथित केलेले सिद्धांत यांजविषयी सहज कल्पना येण्यासारखी आहे. मॅकेन्झी-साहेबांच्या पुस्तकाचा अगदी थोडक्यात सारांश पुढीलप्रमाणे देता येईल. भारतीय नीतिशास्त्र हे पोकळ अगर अर्थशून्य (Barren), सदोष, विसंगतीपूर्ण व केवळ व्यक्तीविशिष्ट अगर संन्यासमार्गीय (antisocial) असून त्याला तत्त्वज्ञानाचा मुळीच पाठिंबा नाही; यज्ञयागादी मंत्रतंत्रांच्या घोटाळ्यामुळे ते नीतिशास्त्र अगदी कुचकामाचे असे बनले असून पाश्चात्त्य नीतिशास्त्रापेक्षा ते फारच हीन दर्जाचे आहे; त्यात मनुष्याच्या सामाजिक जीवनाचा व प्रगतीचा विचार मुळीच नसून ते केवळ वैयक्तिक आत्मोन्नतीची दिशा दाखविणारे, अतएव स्वार्थमूलक व आप्पलपोटे असे शास्त्र आहे; त्याचप्रमाणे हिंदू धर्मातील ईश्वर हा निर्गुण असल्यामुळे, अशा ईश्वराकडून मनुष्याच्या सद्गुणांचा परिपोष होणे व त्याच्या नैतिक उन्नतीस प्रेरणा व उत्तेजन मिळणे अशक्य आहे. सारांश, हिंदू लोकांजवळ खरे नीतिशास्त्रच नाही, व जे आहे ते त्यांच्या धर्मशास्त्राशी व तत्त्वज्ञानाशी विसंगत असल्यामुळे हिंदू धर्मात नीतिशास्त्रास मुळी स्थानच नाही, असा मॅकेन्झीसाहेबांचा सिद्धांत आहे.

ही विचारसरणी व हा सिद्धांत हिंदू लोकांस नव्याने वाचावयास मिळत आहे असे नाही. थोड्याबहुत फरकाने बहुतेक सर्व पाश्चात्त्य टीकाकारांनी हेच आक्षेप हिंदू धर्मावर व तत्त्वज्ञानावर आणले आहेत. प्रथमतः आमच्या ग्रंथकारांनी धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान व नीतिशास्त्र

ही पाश्चात्त्य ग्रंथकारांप्रमाणे अगदी वेगवेगळी अशी कधीच मानली नाहीत, शिवाय, कै. डॉ. भांडारकर यांनी म्हटल्याप्रमाणे, हिंदू धर्माचे खरे रहस्य समजण्यास व त्यातील बाह्यतः परस्परविरोधी भासणाऱ्या सिद्धांतांचा मेळ घालता येण्यास विशिष्ट प्रकारची मनोभूमिका व विशाल दृष्टी प्रथम असावी लागते, व तिची अपेक्षा परकीय ग्रंथकारांकडून करता येत नाही. मॅकेन्झी साहेबांच्या आक्षेपांचे थोडेबहुत निराकरण या पुस्तकात क्वचित स्थळी व विशेषतः आठव्या प्रकरणात, केलेलेच आहे. व्यवहार व परमार्थ व सगुण आणि निर्गुण ईश्वर यांची सांगड भगवद्गीतेमध्ये इतक्या परिपूर्ण रीतीने घातलेली आहे की, तिचे सूक्ष्म अध्ययन केल्यास कोणासही त्याविषयी बिलकूल संशय राहणार नाही. केवळ ज्ञानमार्गीय अगर संन्यासमार्गीय पंथांकडे पाहिले तरी, चित्तशुद्धीखेरीज कोणताही मनुष्य ज्ञानमार्गात पाऊल टाकण्यासदेखील लायक होत नाही, व ही चित्तशुद्धी यमनियमादींच्या योगे षड्रिपूंना जिंकल्याने व सर्व प्रकारची नित्यनैमित्तिक विधिनिषेधात्मक कर्मे केल्यानेच प्राप्त होते; उलट, अशी चित्तशुद्धी झालेल्या मनुष्याच्या हृदयात, आरशावर पडणाऱ्या सूर्यबिंबाप्रमाणे, आत्मज्ञान सुलभ व स्पष्ट रीतीने प्रकाशित होते असाच त्यांचा सिद्धांत आहे. उच्चतम अशा पारमार्थिक ज्ञानाच्या दृष्टीने जरी कर्माकर्मविचार अगर वेदप्रामाण्यदेखील मायिक व फोल ठरत असली तरी, त्या फोलपणाचा प्रत्यय ज्ञानप्राप्तीनंतरचा आहे, आधीचा नव्हे, व तसे ज्ञान प्राप्त न झालेल्या मनुष्याने, तो ज्या भूमिकेवर असेल त्या (व्यावहारिक) भूमिकेवरील प्रमाणे तेवढ्यापुरती सत्यच मानून चालले पाहिजे, असाच श्रीशंकराचार्यांचा स्पष्ट अभिप्राय आहे. त्याचप्रमाणे सर्व सद्गुणांचा आदर्श व मनुष्याच्या गुणावगुणांचे फल देणारा सगण ईश्वर, व त्या पलीकडचा निर्गुण परमात्मा यांची सांगड अवताराच्या कल्पनेने गीतेमध्ये उत्तम रीतीने घातलेली आहे, व निर्गुण ब्रह्माचे ज्ञान, सगुण ईश्वराची भक्ती व त्याच्या आज्ञेनुसार कर्म, यांचा मिलाफही तीमध्ये आपणास स्पष्टपणे पाहावयास मिळतो. केवळ ज्ञानप्राप्तीच्या मार्गातील मुमुक्षूनेच नव्हे, तर प्रत्यक्ष ज्ञानी मनुष्यानेदेखील लोकव्यवहार व लोकसंग्रहही मुळीच सोडता कामा नयेत हे श्रीकृष्णांनी आपल्या शिकवणीने व प्रत्यक्ष उदाहरणाने सिद्ध केले आहे. रामदासतुकारामादी साधुसंतांची चरित्रे व शिकवणदेखील याच सिद्धांतास पोषक आहेत. त्यांची वैयक्तिक आत्मोन्नती व त्यांचे आत्मज्ञान ही परिपूर्ण असूनदेखील, मॅकेन्झी साहेबांनी ध्वनित केलेल्या स्वार्थमूलक नीतिशास्त्राचा, अगर नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान यांच्या विसंगतीचा, त्यांना स्पर्शही झाला नव्हता. इतकेच नव्हे तर ते केवळ परोपकारासाठी व सामाजिक उन्नतीसाठीच देह धरून राहिले होते. स्वतःस निर्गुण ब्रह्माचे ज्ञान असूनही त्यांनी सगुण ईश्वराची भक्ती केली व त्या भक्तिमार्गाचा सर्वत्र प्रसार केला; आणि स्वतः सर्व कर्मांपासून व कर्मफलांपासून अलिप्त असूनदेखील त्यांनी जगास निर्दोष अशा लोकव्यवहाराचे शिक्षण दिले. अर्थात हिंदू नीतिशास्त्राच्या भरीवपणाचा व त्याच्या धर्माशी व तत्त्वज्ञानाशी असलेल्या पूर्ण एकतानतेचा एवढा पुरावा मॅकेन्झी साहेबांस पुरेसा वाटत

नसल्यास त्यांची त्याकडे पाहण्याची दृष्टीच सदोष आहे असे म्हणणे प्राप्त आहे. असो. मॅकेन्झी साहेबांच्या सर्वच आक्षेपांचे सविस्तर विवेचन करण्याचे हे स्थळ नव्हे. त्यांस त्यांचेच एक वर्णबांधव हॉपकिन्स यांनी परस्पर उत्तर दिले आहे. ते उत्तर पूर्णपणे समाधानकारक नसले तरी, आमच्या ग्रंथांकडे सहानुभूतिपूर्वक नाही तर निदान पूर्वग्रहविरहित दृष्टी ठेवून पाहिल्यास त्यांचे रहस्य उकलण्यास किती मदत होते हे त्यावरून दिसून येईल. हॉपकिन्स यांच्या ग्रंथाचा सविस्तर विचार या ठिकाणी अभिप्रेत नसल्यामुळे त्याचा नामनिर्देश करूनच वाचकांची रजा घेणे प्राप्त आहे.

○○○

सूची

अर्थशास्त्र ५७०; **त्याचा नीति शास्त्राशी संबंध** ५७०, ५७१.
अनात्मवाद ५२८;
अनीति ५३३,५३४ ;
रोग किंवा वेड नव्हे ५२३.
ॲरिस्टॉटल ५६९;
त्याने राज्यशास्त्रास दिलेले महत्त्व ५६९.
अंत:स्फूर्ति, ४६२;
ही सदसद्विवेकबुद्धी नव्हे ४६४;
ही परस्परविरुद्धही असते ४६४;
तिचे पालटणारे निर्णय तंत्र ४६५.
अंत:स्फूर्तिवाद ५५४; **त्यातील दोष** ४९६, ४९७.
अंधश्रद्धा ४७५, ४८०,५३०,५५७.
अमरत्व (आत्म्याचे) ५२९,५३१; नीतिशास्त्राचे गृहीत तत्त्व ५२९, ५३०; बौद्धधर्मात अमरत्वाची उणीव ५३२; अमरत्व हे धर्मनिष्ठेचे अंग ५३३.
आत्मयज्ञ (टीप), ४८६, ५६८.
आत्मसंयमन ४९०.
आत्मस्वातंत्र्य ५१०, ५२६,५२७; नीतिशास्त्राचे गृहीत तत्त्व ५३९,५४०; आत्मस्वातंत्र्य म्हणजे लहरीपणा नव्हे ५४१, ५४२; हेतुविरहित आचरण नव्हे,५४३, ५४४; आत्मस्वातंत्र्याच्या मर्यादा ५४३; आत्मस्वातंत्र्यावरील आक्षेप ५४३,५४४,५४५, ५४६, ५४९; आत्मस्वातंत्र्यास सर्वशक्तिमत्त्वाची जरूर नाही ५४९,५५०; आत्म- तंत्र्य हे सर्वशिक्षेच्या बुडाशी ५५०; त्याचा ईश्वराच्या सर्वशक्तिमत्त्वाशी मिलाफ ५५०,५५१.
आत्महत्या ४६८, ४८६, ५४६
आत्मोन्नति ४८२, ४९४, ५१०; तिचा अर्थ ४८२, ४८३; आत्मोन्नती व स्वार्थत्याग यांचा मिलाफ ४९०; त्याकरिता स्वार्थत्याग ४९१; खरी आत्मोन्नती ४९२; वैयक्तिक आत्मोन्नति ५७०.

आपद्धर्म ५११.
आस्तिक्यबुद्धी ५३२, ५३३; हे धर्माचे मुख्य लक्षण ५३२.
आनुवंशिक संस्कार ४७३, ५६०, ५६१; त्यांचा आत्मस्वातंत्र्यावर ५२७, ५२८; त्याविषयी दोन मते ५२९,५३०.
इतिहास, त्याचे प्रकार ५५८.
इसाबेला ५०४.
ईश्वर ५२९, ५३०, ५३१, ५३२, ५३५; त्याच्या सगुण व निर्गुण स्वरूपांची सांगड ५७३; बौद्धधर्मात ईश्वराच्या अस्तित्वाची उणीव ५३२; नीतिदृष्ट्या आवश्यक ५३०; त्याचे आरोपित गुण ५३५; ब्रॅडलेचे ईश्वराच्या नीतिविषयक कल्पनांविषयी मत ५३५, ५३६; ईश्वराचे सर्वशक्तिमत्त्व ५५०, ५५१; त्याचा न्याय ५५०.
उत्क्रांतिवाद ५५८,५५९; त्याविषयी खबरदारी ५६०, ५६१.
उत्कांतितत्त्ववादी ५५८, ५६३, ५६८; त्यांचे नीतितत्त्वांविषयी मत ५५९, ५६०; परोपकाराविषयी मत ५६०; नैतिक कल्पनांविषयी मत ५२७; त्यांचे आत्मस्वातंत्र्यावरील आक्षेप ५४२,५४३; त्यांचे परीक्षण ५४३.
एलिझाबेथ ४८८.
ऐतिहासिक पद्धती ५५८; तिचा पुरस्कार ५५९; पुराणमताभिमान्यांची नावड ५५८,५६४; तिचे फायदे ५६१, ५६२, ५६३, ५६४; तिच्या अभावी तोटे ५६५.
कर्तव्याची जाणीव ५०५.
कर्मवाद ५२९,५४९,५५०.
टेलर, प्रोफेसर ५३७, ५३८.
डार्विन, त्याचा ५५९ सिद्धांत ५५९.
तत्त्वज्ञान, ५५२ त्याचा उपयोग ५५२.
तर्कशास्त्र ५२७, ५५३, हे ध्येयविशिष्ट शास्त्र आहे ५६७; त्याचा नीतिशास्त्राशी संबंध ५७१, परिणाम ५४३, ५४८,५४९.
कालिदास ५४४.
कांट ४६७, ४८७, ५३०; कार्याकार्याविषयी त्याचे मत व त्याचा विचार ४६७; तार्किक बुद्धीस त्याने दिलेले महत्त्व ४६७, ४६८; त्याचे शिक्षेविषयी मत ५१८; आत्मस्वातंत्र्याचा त्याने केलेला अर्थ व त्याचे परीक्षण ५४२, ५४३.
कार्यकारणभाव (यांत्रिक) ५४५; त्याचा आत्मस्वातंत्र्याशी विरोध ५४५, ५४६, ५६८.
कार्याकार्यनिर्णय ४७८, ४७९, त्यात इतरांच्या मताचा विचार ४७९.
कुराण ४८०.
कांट ४६८, ५१८, ५२६, ५२९.
खगोलशास्त्र ५५२, ५६७.
गुन्हेगारी ५२३, ५२४; तीमुळे समाजाचे नुकसान ५२४.
गुलामगिरी ५६२.
ग्रीन ४७६.
चातुर्वर्ण्य ५०२.
चित्तशुद्धी ५२९, ५७३.
जडवाद ५२८.
जीवशास्त्र ५६८; त्याचा नीतिशास्त्राशी संबंध ५६८; त्याची कार्याकार्य

ठरविण्याची कसोटी व तिचे परीक्षण ५६८.
जोशी, वामन मल्हार ५२७.
नीतितत्त्वे ४७४; त्यांचा इतिहास व त्याचा उपयोग ५६१; त्यातील फेरफार ५६१, ५६२; त्यांचे बंधकत्व ५६२; त्यांचे स्वतःप्रामाण्य हे त्यांच्या प्रगतीस विरोधी नाही ५६२; नीतितत्त्वे सापेक्ष नसतात ४६२, ४६६; अंतःस्फूर्तीने ठरतं ५७१.
तुकाराम ५०१, ५७३.
दैववाद ५२७; त्याचे परीक्षण ५४९, ५५०.
धर्म ५३२; युरोपात त्याच्या प्रसाराचा अतिरेक ५०१; प्राचीन काळच्या अनैतिक कल्पना ५३२; धर्म व नीति यांमधील समेट ५३३; धर्माचे मुख्य लक्षण ५३२; दुसरे लक्षण ५३३.
धर्मनिष्ठा ५३३; धर्मनिष्ठा व नीतिनिष्ठा ५३५.
धर्मशास्त्र ५५७; त्याचा नीतिशास्त्राशी विरोध ५७२.
ध्येयविशिष्ट शास्त्रे ५६७, ५७०, ५७१.
नारद ५४८.
निराशावाद ५३६.
निर्वाण ५३२.
निष्काम कर्म ४६२, ५२९; त्याचा खरा अर्थ ४६३.
नीतिनिष्ठा ५३३; नीतिनिष्ठा व धर्मनिष्ठा ५३५.
नैतिक स्वातंत्र्य ४७३, ४७४, ४७७; त्याच्या मर्यादा ४७५, ४७६, ४७७ ; त्यातच नैतिक श्रद्धेचा उगम ४८०; तेच नीतिनियमनाचे ध्येय ४८१.
न्यायबुद्धी, 'समता' पाहा.
न्यूटन ५६५.
न्यूमन, कार्डिनल ५३०, त्याचे ईश्वराच्या असितत्वाविषयी मत ५३०.
पदार्थविज्ञानशास्त्र ५२५, ५६७.
पन्नादाई ५११.
पराविद्या ५३१.
परोपकार ४६८, ४८२, ४८४, ४८९; त्याविषयी उत्क्रांतिवाद्यांचे मत ५६०.
प्रिंगल् पॅटिसन् ५५१.
नीतितत्त्वे ४६३; लहरीवर अवलंबून नसतात ५२७; त्यांची अंमलबजावणी ४८१, ५३६, ५३७; त्यांची सार्वत्रिकता ५२८, ५५४; नीतितत्त्वांमधील परस्परविरोध ४९७; ईश्वराची नीतितत्त्वे ५३४, ५३५, ५३६, ५३७.
नीतिमत्ता, तिचा आदर्श ५२७; तीत पारितोषिकाची जरूर ५३३, ५३४; तिचे महत्त्व ५५२.
नीतिशास्त्र ५५९; मूळ कल्पना ५५९; ऐतिहासिक दृष्टी ५५९, ५६०; उत्क्रांतिवाद्यांचे त्याविषयी मत ५६०; नीति
उत्क्रांतीच्या आटोक्याबाहेर ५६१; प्राचीन नीतिशास्त्राचा अभ्यास ५६१; नीतिविषयक कल्पनांवर परिस्थितीचा परिणाम ५६२, ५६३; त्यामध्ये येणारे अपवाद ४६५; आयुष्यक्रम ठरवताना नीतिशास्त्राची जरुर ४९७; नीतिशास्त्राचा पाया ५२५; नीतिशास्त्राचा अंतिम

सत्याशी
विरोध नसावा ५२६; नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान यांच्या सिद्धांतांतील अन्योन्याश्रय ५३०; नीति व धर्म ५३१, ५३८; नीतिशास्त्राचा उपयोग ५५२; नीतिशास्त्राचे महत्त्व ५५२; त्याचे कार्य ५५२; त्याची आवश्यश्कता ५५४, ५५५; त्यावरील आक्षेप ५५३, ५५४; त्याच्या उपयुक्ततेच्या मर्यादा ५५४, ५५५; नीतिशास्त्राची अपूर्णता ४८१; त्याचे ध्येय ५०५, ५५६; नीतिशास्त्राचा तत्त्वज्ञानाशी संबंध ५२५; भौतिक शास्त्रांशी संबंध ५६८; जीवशास्त्राशी संबंध ५६८; मानसशास्त्राशी संबंध ५६९; समाजशास्त्राशी संबंध ५६९.
प्लेटो ५०५, ५५७, ५७१ त्याचे मानवी ध्येयांच्या ऐक्याविषयी मत ५६२, ५७१; कलेच्या जोपासनेविषयी मत ५७१.
बालविवाह ४७८, ५६२.
बायबल ५७१.
बंधनवाद ५४०; त्याचे परीक्षण ५४१.
बुद्धी ४७४; बुद्धिकौशल्याची कसोटी ४८१.
बेंन्थेम् ५०६, ५०७; त्याने केलेली समतेची व्याख्या व तिचे परीक्षण ५०७.
बोस, जगदीश चंद्र ४९४.
बौद्ध ५२७, त्यांचे आत्म्याविषयी मत ५२७.
बौद्धधर्म ५२७.
ब्रॅडले ४३८, ४९१, ५१८, ५१९, ५३५, ५३६, ५३७, ५५३, ५५४, ५५५; नीती मायिक या त्यांच्या मताचे परीक्षण ४९१, ४९२; त्यांच्या शिक्षेविषयी मत व त्याचा विचार ५१८, ५१९; ईश्वराच्या नीतिविषयक कल्पनांविषयी मत ५३५; नीतिशास्त्राच्या उपयुक्ततेविषयी मत ५५३, ५५४.
ब्रह्म ५२९, ५३०, ५३१, ५३२.
ब्रह्मचर्य ५६८.
भगवद्गीता ४८०, ५२९, ५७२, ५७३; सिद्धावस्थेविषयी तीतील विचार ५२९, ५३०.
भारतीय नीतिशास्त्र ५७२ त्या विषयी मॅकेन्झी यांचे मत ५७२; त्यांचे परीक्षण ५७३, ५७४.
भांडारकर, डॉक्टर ५७३.
भावना ४६६, ४७१, ४७२; त्यांचे कार्य ४६६;
नीतिशिक्षण, त्याची आवश्यकता ४७३; आनुवंशिक संस्कारांचा व परिस्थितीचा त्यात भाग ४७४, ४७५; त्याचे ध्येय ४७५, ४७६.
नेपोलियन ५११.
नैतिक ध्येय ५२७.
नैतिक प्रामाण्य ४७३; त्याच्या मर्यादा ४७६.
मनोवत्ती. त्यांच्या आत्मोन्नतीत उपयोग ४८४, ४८५, ४८६; त्यांची किंमत ४८५; त्यांचे नियमन ४८६.
मॅकेन्झी, जॉन, ५७२, त्यांचे भारतीय नीतिशास्त्राविषयी मत ५७२, ५७३;

त्यांचे
परीक्षण ५७४.
मानसशास्त्र ४६९, ५१९, ५२३; त्याचा नीतिशास्त्राशी संबंध ५६९.
मार्टिनो ४६९;
त्यांचे सद्सद्विवेकबुद्धी मत ४९५;
व्यवसायाच्या निवडीबद्दल मत ४९६.
मार्टिन ५५८.
मिल्ल ५६१.
मुक्ती ५२९.
योग्यता ५११, ५१२; वैयक्तिक योग्यता ५१३; तिचे दोन प्रकार ५१२; तदनुसार मोबदला ५१२, ५१३, ५१५.
रॅले, सर वॉल्टर ४८८.
रवीन्द्रनाथ टागोर ४९४.
राज्यघटना ५७०, तिचे प्रकार ४७१, ४७२, ५७० .
भूगर्भशास्त्र ५६७.
भौतिकशास्त्रे ४७६;
त्यांचा नीतिशास्त्राशी संबंध ५६७;
त्यांच्या प्रगतीची कारणे ५६५; त्यांच्या ज्ञानाचा व्यवहारात उपयोग ५६७.
राज्यशास्त्र ५६७, ५७०
त्याचा नीतिशास्त्राशी संबंध ५७०;
ॲरिस्टॉटलने त्यास दिलेले
महत्त्व ५७०.
रामदास ५७३.
रूढी ४७३, ४७६, ४७९, ५६३, ५६४, ५६९.
लोकभ्रम ५६४.
लोकहित (टीप) ४८४, ४८६; लोकहित आणि स्वहित ४८९, ४९२, ४९३; त्याचे प्रकार ४९५.
वर्णनात्मक शास्त्रे ५६७.
वाल्मीकी ५४८.
विश्वबंधुत्व ४९७, ५०७.
वॉलेस्टन ४६८.
व्यक्तिस्वातंत्र्य ५१०; तिची व्याप्ती व मर्यादा ५७०.
व्यवसाय ४९५, त्याची निवड ४९६;
त्यातील फायदे व तोटे ४९६;
तो निवडण्याचे अगोदर विचार ४९६;
त्याची निवड व नीतिमत्ता ४९६, ४९७; काही व्यवसायात नीतिमत्ता टिकवणे कठीण ४९७, ४९८;
व्यवसायाच्या निवडीचा प्रश्न ४९९, ५००; स्वसामर्थ्याचा विचार ५००;
स्वतःच्या कौशल्याचा विचार ५००;
समाजहिताविषयी विचार ५००, ५०१;
व्यवसायाच्या निवडीमुळे
उत्पन्न होणारी सामाजिक विषमता ५०१, ५०२; व्यवसायाची निवड गुणकर्मानेच ५०२; ती प्रत्येकाचे ध्येय, पात्रता, आवडनिवड व गरज यांवरून केली पाहिजे ५०३; आपद्धर्म म्हणून अंगीकृत करावा लागणारा व्यवसाय ५०३, ५०४; व्यवसायात लागणारे कौशल्य ५१२, ५१३.
शरीरशास्त्र ५४४
शासन ५१७; त्याच्या हेतूविषयी दोन मते ५१७, ५१८; त्याविषयी कांटचे मत ५१८; ब्रॅडलेचे मत ५१८, ५१९;
पहिल्या मताचा विचार ५१८; शासनात सुडाची भावना ५१७, ५१८,५१९,

५२४;
शासन दुःखकारकच असले पाहिजे ५२०; शासनाचे कार्य ५२०;
त्यामुळे गुन्हेगाराची सुधारणा ५२१;
शासनासंबंधी सामाजिक दृष्टी ५२१;
शासनाचा उपयोग ५२२;
शासन व क्षमा ५२४.
शिवाजी ४८८, ५०१.
शिक्षणशास्त्र ५७१; त्याचा नीतिशास्त्राशी संबंध ५७१.
शील ४९०, ४९६, ५४१; शीलसंवर्धन हेच शिक्षणचे ध्येय. ५७१.
शेक्सपियर ५०४, त्याच्या 'मेझर फॉर मेझर' नाटकातील दृष्टांत ५०४.
शंकराचार्य ५७३.
श्रद्धा ४६८, ४७९, ४८०, ४८१, ५३०; श्रद्धा व अंधश्रद्धा ५३०.
श्रीकृष्ण ४८०, ५७३.
सत्यनिष्ठा ५३८.
सद्सद्विवेकबुद्धी ४६१, ५२७; तिचे स्वरूप ४६१; सद्सद्विवेकबुद्धी म्हणजे अंतःस्फूर्ती नव्हे ४६२, ४६५; तिच्या स्वरूपाविषयी काही मते ५१०, ५११; सद्सद्विवेकबुद्धी व तार्किक बुद्धीचा एक नव्हेत ४६८; तार्किक बुद्धीचा तीत अंतर्भाव ४६९, ४७०; सद्सद्विवेकबुद्धी व सौंदर्यविषयक भावना ४७० ,४७१; सद्सद्विवेकबुद्धी व वैयक्तिक भावना ४७१; सद्सद्विवेकबुद्धीची व्याख्या ४७२.
संन्यासमार्ग ५७२.
समता ५०६; बेंथेमची व्याख्या ५०७, ५१५; समतेसंबंधी दोन तत्त्वे ५०७; कित्येक वेळा समतेमुळे अकल्याण ५०७, ५०९, ५१०;
तिचा दुरूपयोग ५०९; तिच्या मर्यादा ५०७, ५०९; समता म्हणजे योग्यतेनुरूप समता ५११;
समता आणि विषमता ५०७, ५०८, ५१४, ५१५; समतेचा खरा अर्थ ५१५, ५१६.
समाजशास्त्र ५६९; त्याची व्याप्ती ५६९; त्याचा नीतिशास्त्राशी संबंध ५६९.
समाजरचना ४९१; तीतील अन्याय व विषमता ५०७, ५०८, ५११, ५१२.
समाजहित ५०६; त्याचे प्रकार ४९४; व्यवसाय निवडताना समाजहिताचा विचार ५००, ५०१; समाजहिताच्या दृष्टीने सामाजिक विषमता अपरिहार्य ५०१, ५०२; त्यात अधिकांसाठी थोड्यांचा आत्मयज्ञ ५०७, ५०८; त्यातील विषमता ५१०. त्यातील समता ५१५, ५१६, त्यासाठी शासन ५२१, ५२२ ('लोकहित'ही पहा)
सरासरीचे तत्त्व ५४६.
सॉक्रेटिस ४८७, ५५७.
सिमेल, प्रोफेसर, त्यांच्या व्यवसायाच्या निवडीबद्दल मत व त्याचा विचार ५०४, ५०५.
सिद्धावस्था ४८५, ५२९.
सुखवाद ४७१, ४८६(टीप).
सुप्रजननशास्त्र ५५६.
सौंदर्यशास्त्र ५७१; त्याचा नीतिशास्त्राशी संबंध ५७१; हे ध्येयविशिष्ट शास्त्र आहे ५७१.
सौंदर्यविषयक भावना (संवेदना) ४६२, ४६३, ४७१, ४७२, ५२७; ही सद्सद्विवेकबुद्धी नव्हे ५६८.

स्पेन्सर ५५९.
स्वभाव ४९०, ५४०, ५४१, ५६९ ;
त्याचे दुरतिक्रमत्व ४७४; हा बाह्य
वर्तनात पूर्णपणे प्रकट होत नाही ५४०,
५४१; स्वभाव परिवर्तन ५४१, ५४७, ५४८.
स्वहित ४८४, ४८८, ४९२, ४९३; स्वहित
व
लोकहित ४८४, ४९३.
स्वार्थत्याग ४७८, ४८२, ४८५, ४८६,
४९४; त्याच्या मर्यादा ४७८, ४८६, ४८७,
४८८, ४८९; कधी त्याची आत्मविरोधी
४८९; स्वार्थत्याग व आत्मोन्नती
यांचा मिलाफ ४८९, ४९०; व्यवहारात
स्वार्थत्यागाच्या तत्त्वाची श्रेष्ठता ४९२,
४९३.
हॉपकिन्स, प्रोफेसर ५७२, ५७४.
हॉफडिंग, प्रोफेसर ५०३; व्यवसायाच्या
निवडीबद्दल त्यांचे मत ५०४.
हॉर्टमन, व्हॉन् ५३६;
मानवी ध्येयाविषयी मत व त्याचे
परीक्षण ५३६.
क्षमा, तिची आवश्यकता ५२४;
तिची मर्यादा ५२४.
ज्ञान, म्हणजेच सद्गुण ५५७.
ज्ञानसंपादन, हे ध्येयाच्या दृष्टीने
मर्यादित करणे आवश्यक ४८३.

❍❍❍

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - १.

तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्राच्या क्षेत्रातील विचारवंत हे काही नव्या गोष्टी मांडतच असतात आणि बदलत्या काळाप्रमाणे समाजाला एक नवी दिशा देण्याचा प्रयत्न करीत असतात. मुद्दा येतो तो सांस्कृतिक, वैचारिक संचिते सांभाळण्याचा! एक गोष्ट नक्की, की कालबाह्यता कशालाच नसते. नीतिशास्त्र काय किंवा तत्त्वज्ञान काय किंवा मनुष्याचे सांस्कृतिक वैभव उभे करणारे कुठलेही विचारधन काय हे कालबाह्य कधीही असू शकत नाही. महत्त्व प्राप्त होते ते संचित सांभाळण्याला, तेवढे केले पाहिजे. तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्राच्या अभ्यासामागचा हेतू हाच असू शकतो.

गेल्या सहस्रकात आणि या नव्या सहस्रकातील या पहिल्या शतकातील प्रारंभीच्या दोन दशकातच आपण विविध क्षेत्रांमध्ये चालू असलेली उलथापालथ पाहत आहोत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील सत्तासंघर्ष, त्यातून निर्माण झालेली युद्धपिपासा, प्रचंड मोठ्या प्रमाणांवरचे धार्मिक आणि वांशिक उद्रेक, धर्मजिज्ञासेतून धर्मसंस्कार होण्याऐवजी धर्मभयातून चाललेले अनाचार, अनाठायी अंधश्रद्धा आणि तेवढीच अंध विज्ञाननिष्ठता, जगण्याच्या संघर्षातून हरवत चाललेली नीतीची वास्तविक लक्षणे, संभ्रमित आकलनाने अश्रद्ध झालेली सुशिक्षित पिढी आणि त्यांच्यातील प्रचंड अविश्वास, धर्म, संप्रदाय, उपासना पद्धती, वर्ग, समूह, जात, लिंग यांच्या भेदावर आधारित निर्माण होत चाललेली अस्वस्थता यातून माणसाला सुटण्यासाठी काही आश्वासक असे उपाय हवेत, तरच सांस्कृतिक वैभव टिकून राहू शकेल. तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्राचा एक अखंड प्रवाह मानवाच्या ठायी असलेल्या उच्च नैतिकतेला जागवत त्याला त्या ध्येयाप्रत घेऊन जाऊ शकेल, एवढी खात्री आहे. हे सारे विचारवैभव वाचकांच्या हृदयात नैतिकपूर्ण नि:श्रेयसाचा दीप चेतवेल अशी खात्री आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे